कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

[श्रीमद्भागवत-दशमस्कंधावरील टीका]

खंड आठवा

(अध्याय ६६ ते ९०)

सकळमंगळांची जननी । जाल्याध्ययुदयकारिणी ।
ते संपादिजे साधकीं जनीं । हरिभक्ति सज्जनीं सुसेव्य ॥
—हरिवरदा ८७.१५१०

संपादक
रामचंद्र चिंतामण ढेरे

वसंतपंचमी : शके १८८३

मूल्य १४ रुपये

UNIVERSAL
LIBRARY
OU_196144
UNIVERSAL
LIBRARY

DUP—43—30-1-71—5,000

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M294.592 P985 Accession No. M2988

Author [illegible]

Title [illegible]

This book should be returned on or before the date last marked below.

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

[श्रीमद्भागवत-दशमस्कंधावरील टीका]

खंड आठवा

(अध्याय ६६ ते ९०)

सकळमंगळांची जननी । ज्ञानाद्यभ्युदयकारिणी ।
ते संपादिजे साधकीं जनीं । हरिभक्ति सज्जनीं सुसेव्य ॥
— हरिवरदा ८७.१५१०

संपादक
रामचंद्र चिंतामण ढेरे

वसंतपंचमी : शके १८८३

मूल्य १४ रुपये (कागदी); १६ रुपये (कापडी)

प्रकाशक :
दयार्णव रघुनाथ कोपर्डेकर
१२५७ सदाशिव पेठ,
पुणें २

खंड १ ते ४ चें मूल्य :
प्रत्येकीं ६ रुपये
खंड पांचवा : ८ रुपये
खंड ६ व ७ चें मूल्य :
प्रत्येकीं ७ रुपये

मुद्रक :
मा. ह. पटवर्धन,
संगम प्रेस प्रा. लि.,
३८३ नारायण पेठ, पुणें २

प्र स्ता व ना

हरिवरदा-प्रकाशनाची सांगता

या खंडाच्या प्रकाशनानें हरिवरदा-प्रकाशनाची सागता होत आहे, यामुळें माझें मन आनंदानें भारावून गेलें आहे. गेली चार-पांच वर्षे 'दयार्णवा'च्या अतरगात अवगाहन करतांना मला एक आगळें सुख प्राप्त झालें आहे. त्या सुखाचें स्वरूप कांहीसे अनिर्वचनीय आहे. परंतु दयार्णवाची वाक्पूजा बाधणारा पुजारी म्हणून माझी नियुक्ति झालेली असल्यामुळें, लौकिक भूमिकेवरून मी माझ्या सुखाला शब्दरूप देण्याचा प्रयत्न करीत राहिलों. प्रस्तावनेच्या इवल्याशा परडीतून गोळा केलेली ओंजळभर शब्दसुमनें मी दर्याणवांच्या 'वाङ्मयी मूर्ती'च्या चरणावर वाहिली आणि माझी ती वाक्पूजा दयार्णवभक्तानीं गोड मानून घेतली. कृष्णदयार्णव आणि त्यांची हरिवरदा टीका याच्याशीं जडलेला माझा भक्तिबध अतूट आहे. त्याचमुळें चिकित्सकाच्या भूमिकेतून हरिवरदेचें मूल्यांकन करणें मला शक्य राहिलें नाही.

कृष्णदयार्णवाच्या वाग्वैभवाला मराठी रसिकांनीं मुक्त कंठानें मान्यता दिली आहे भाविक-भक्तांपासून अभ्यस्त-रसिकापर्यंत सर्व स्तरांतील जाणत्यानी हरिवरदेचें स्वागत केलें आहे. ही घटना प्रकाशक-सपादकाना कृतार्थतेचें वरदान देणारी आहे. केवळ आपल्या भक्तिसंपन्न पूर्वजाचा ग्रंथ म्हणून नव्हे, तर प्राचीन मराठी साहित्य-सिधूतील एक अमोल रत्न म्हणून या ग्रथाचें विराट् प्रकाशन प्रकाशकानी अंगावर घेतले आणि अत्यत निष्ठेनें ते पार पाडले प्रकाशकांनी घडवून आणलेल्या कृष्णदयार्णवाच्या महा-पूजेच्या या महोत्सवात पुजाऱ्याचा मान मला प्रदीर्घ काळ मिळाला, याबद्दल मला अत्यत धन्यता वाटते.

उत्तमश्लोकांचे उपकार

ज्ञानेश्वरीच्या अवतरणाशीं जसा सच्चिदानंदबाबांचा सबंध आहे, दासबोधाच्या अवतरणाशीं जसा कल्याण-स्वामींचा संबंध आहे, तसाच हरिवरदेच्या अवतरणाशी उत्तमश्लोकाचा सबंध आहे. उत्तमश्लोक हे दयार्णवाचे पट्ट-शिष्य आणि हरिवरदेचे 'लेखक'. आपल्या गुरूच्या मुखांतून प्रकटणाऱ्या साहित्यगगेला उत्तमश्लोकांनी अक्षर-रूप दिलें, एवढेंच नव्हे तर ग्रंथसिद्धीचा सोहळा साजरा करण्यापूर्वी गुरुदेव समाधिस्थ झाल्यामुळें अपुरें राहिलेले ग्रथरचनाकार्य त्यांनीं पुरें केले :

शायशी अध्यायपर्यंत । निरूपिले श्रीकृष्णचरित ।
पुढें सत्यायशीवा प्राप्त । जेथ वेदस्तुत परमात्मा ।।
तो तेवीस श्रुत्युक्त श्लोक- । पर्यंत वाखाणिला सम्यक ।
तव पुरला अवधि अक । अवतारात्मक प्रभूचा ।।
यथोक्त केले विधिपाळणा । यास्तव काळातिक्रमणा ।
न करूनि, सायुज्यसदना । प्रत्युद्गमना आदरिले ।।
तेव्हा समीप स्वभक्तमेळा । होता, त्यामाजी अनन्यशीळा ।
मज आज्ञामकेत केला । ग्रंथ राहिला करावया ।।
सोळा शते बासष्टी अब्दें । शालिवाहनपरिमित शब्दें ।
क्रमितां रौद्रवत्सरी मोदें । मार्गशीर्षे शुभमासी ।।
शुक्ल पंचमी गुरुवासरी । ब्राह्मी मुहूर्ती शुभावसरीं ।
प्रतिष्ठानी गोदातीरी । स्वधाम निर्धारी स्वीकेलें ।।

ह ८८.३०–३५

मार्गशीर्ष शु. ५, गुरुवार, शके १६६२ या दिवशी दयार्णव समाधिस्थ झाले. आपला निजधामगमनकाल समीप आला आहे, असे दिसताच दयार्णवानी आपला 'अनन्यशीळ' शिष्य उत्तमश्लोक यास 'राहिला ग्रथ' करावयाची आज्ञा केली. दयार्णवाच्या समाधीच्या वेळी वेदस्तुतीचा (सत्यायशीवा) अध्याय चालू होता. या अध्यायांतील तेविसाव्या श्लोकापर्यंतचें टीकालेखन पूर्ण झालें होतें. पुढील सत्तावीस श्लोक आणि अध्याय ८८ ते ९० एवढ्या भागावर व्याख्यान करण्याचें उत्तरदायित्व उत्तमश्लोकांवर होतें. परतु गुरुवियोगानें विमनस्क झाल्या-मुळें तो धागा तत्काळ पुढें चालविणें त्याना प्रारभी अशक्य झाले. उत्तमश्लोक म्हणतात :

त्यावरी सगुणवियोगें खेद । करूनि जाहलों मतिमद ।
द्विमासानतर पुन्हा विशद । स्वप्नी अनुवाद हा केला ।।
मज संबोखूनि बहुता परी । म्हणती, 'असो, तुज अतरी ।
प्रज्ञा स्फुरेल, शका न धरी । ग्रंथ पुढारी चालवणें' ।।

– ह. ८८.३६–३७.

गुरुदेवाची ही स्वप्नाज्ञा प्राप्त होताच उत्तमश्लोकांनी हृदयस्थ गुरु-मूर्तीला साक्षी ठेवून ग्रंथपूर्तीचें कार्य समर्थ-

पणें पार पाडलें. आपण केवळ हृदयस्थ गुरुदेवाच्या ज्ञानघन वाणीचें माध्यम आहों, ही भूमिका उत्तमश्लोकांनीं अत्यंत भावनात्म शब्दान व्यक्त केली आहे :

ऐसी सद्गुरूची समर्थ आज्ञा । विशेष समत सकळां सुज्ञां ।
येऱ्हवी सामर्थ्य मज अल्पज्ञा । कैंचें प्रज्ञारहितासी ।।
आता भरवसा मज निश्चित । की दूरस्थ चद्रमा गगनात ।
स्वकान्ति प्रकटित अमृत । अगे विदित सर्वांसी ॥
की सूर्यकान्ति दिवाकर । अतरें प्रसवे ज्योति प्रखर ।
मा हृदयस्थ सद्गुरु भ्रमहर । स्व उद्गार न स्फुरवी ? ।।
पूर्वी स्वमुखें ओवीप्रबध । वदोनि सद्गुरु नित्य बोध ।
लेखनक्रियेसी पै विशुद्ध । मज करुनि विशद करविलें ।।
आता अतर्यामित्वें वक्ता । श्रीस्वामिराजचि तत्वता ।
येथ मीपणाचिया अर्था । ठाव सर्वथा नसेचि की ।।
माझ्या मीपणाचा ग्रास । तैचि केला जी निःशेष ।
जै ठेविले पद्महस्तास । कृपा विशेष करूनिया ।।
नामरूपेंसी पालटिलें । आपुलें नाम मज ठेविलें ।
उत्तमश्लोक मज्ञाथिले । प्रेम दिधले निजभजनी ।।
म्हणोनि येथ परिहार करणें । न लगेचि विविधा बोलणे ।
तुम्ही सत सर्वज्ञपणे । अभेदलक्षणे जाणतसा ।।

– ह. ८८.३८–४५

चंद्रमा सहस्रावधि योजनांवरून धरतीवर अमृतवृष्टि करतो, सूर्य अपरिमित अतरावरून प्रखर प्रकाशाची पखरण करतो, मग माझ्या हृदयांत विराजमान झालेला सद्गुरु माझ्या मुखातून आपल्या ज्ञानाची दीप्ति प्रकटवील, यात आश्चर्य तें कसले ?– उत्तमश्लोकाचा हा विश्वास विनय आणि गुरुभक्ति याच्या प्रीतिसंगमांतून उमललेला आहे. एक तपाहून अधिक काळपर्यंत गुरुमुखातून वाहणाऱ्या साहित्यगंगेत सतत निमज्जन करण्याची सुसधि प्राप्त झाल्यामुळें दयार्णवांच्या टीकेचा ओघ सांभाळून ग्रंथपूर्तीचें कार्य उत्तमश्लोकांना पार पाडतां आलें. या गुरुसान्निध्याच्या लाभाविषयी उत्तमश्लोकानीं अन्यत्र म्हटलें आहे :

सदा वसूनिया निकट । प्रबोधोद्गार उच्छिष्ट ।
प्राशूनि धालो उत्कृष्ट । निमाली अधीष्ट भवतृष्णा ।।

– प्राकृत सप्तशती १.४८.

उत्तमश्लोकांनी गुरूची आज्ञा प्रमाण मानून, मार्गशीर्ष शु. पचमी, गुरुवार, शके १६६५ या दिवशीं, दयार्णवाच्या समाधीनंतर बरोबर तीन वर्षांनीं, पुण्यतिथीच्या दिवशींच गुरुपादुकांच्या सान्निध्यात (पैठण येथील कृष्णदयार्णवाच्या विश्रातिमठात) हरिवरदा-पूर्तीचें कार्य पार पाडलें.

'येथ पुरतीं समस्तांचीं आर्तें'

उत्तमश्लोकानी कृष्णदयार्णवाचे आणि हरिवरदेचें महिमान भक्तिरजित आणि काव्यात्म वाणीने केले आहे. 'जो मज्जनें त्रितापतप्तां निववी । मुमुर्षु मुमुक्षुवर्गा जीववी' असा हा दयेचा अर्णव आहे (प्रा. स २. ३२३). तो साक्षात् 'आदिपुरुष करुणाथिला' असून त्यानें 'स्वज्ञानामृत सुकाळ केला । प्रबोध वर्षला अपरिमित ॥' (प्रा. स. १. ८२), हरिवरदेच्या उपसंहारात हरिवरदेचें गुणगान करताना उत्तमश्लोक म्हणतात :

बद्धमुक्तमुमुक्षुजनां । प्रिय श्रीकृष्ण-चरित जाणा ।
कळिकाळी तो जगदुद्धरणा । न तत्सेवनाविण अन्य ।।
याकारणें श्रीगुरुनाथे । ग्रथ रचिला करुणावतें ।
येथ पुरतीं समस्तांची आर्तें । मनोवाछितें जैसजैसी ।।

– ह. ९०. १०२७–१०२८.

'येथ पुरती समस्ताचीं आर्तें' या अभिप्रायाचें अधिक विशदीकरण ज्यात आहे, असे उद्गार उत्तमश्लोकानी आणखी एके ठिकाणी काढले आहेत :

श्रीमद्भागवती दशमस्कंध । तेथ श्रीकृष्णचरित अगाध ।
त्यावरि टीका अत्यत विशद । केली स्वानदसुखदायी ।।
सकळशास्त्रार्थ प्रमेय । भक्तिविरक्तिज्ञानान्वय ।
वेदान्ततत्त्व निःसंशय । निजपदसोय जीमाजी ।।
जियेचेनि श्रवणें पठणें । बहु हर्षिजे विद्वज्जनें ।
कृतार्थ होयिजे मुमुक्षुगणें । विषयीजनें सुखाविजे ।।
ऐसें सकळांचें जीवन । वक्तृत्व जयाचें पूर्ण ।
नित्य सुखाचें कारण । ज्याचें दर्शन श्रमहर ।।

– प्राकृत सप्तशती १. ४३–४६

विद्वज्जन, मुमुक्षुगण आणि विषयी जन या सर्वांना सुखविणारे, त्रितापतप्तांना निववणारें, मुमुर्षूना जीववणारे, 'सकळाचें जीवन' असणारे दयार्णवाचे वक्तृत्व आजहि आपल्या कानामनाला वेध लावते भाविकाना, रसिकाना आणि पडितांना सारखाच आनद देणारी दयार्णवांची वाणी वर्णितांना उत्तमश्लोकाच्या प्रतिभेला स्फुरण चढावें, हें उचित आहे.

'हा ग्रंथ प्रत्यक्ष कृष्णमूर्ती'

कृष्णभक्तीनें रंगलेली दयार्णवाची वाणी कृष्णमूर्तीला साक्षी ठेवून कृष्णलीलांचें गायन करूं लागली आणि कृष्णभक्तीच्या आंतरिक उत्कटतेने कृष्णरूप बनली, हा अभिप्राय उत्तमश्लोकांनीं बहारीनें मांडला आहे !

हा ग्रथ प्रत्यक्ष कृष्णमूर्ती । एकादशिनी अष्ट ज्या असती ।
तीचि अष्टागें विलसती । चित्सुखकृतिप्रदर्शकें ।।
नव्यायशीव्याची श्लोकथाटी । तेचि कुन्तळाची रम्य दाटी ।
नव्वदाव्याची अर्थगुठी । ते वीरगुठी मूर्धजांची ।।
तरी द्वादशाचें जें निरूपण । जेथ परीक्षिति ब्रह्मसंपन्न ।
ऋषिगण जाले हरिगुणनिपुण । तो शोभायमान मुकुट शिरी ।।
माजि साहित्याची पुरवणी । तेचि अळकारभरणी ।
शब्दलालित्य सुवर्णपणी । अबरमिरवणी अगावरी ।।
पूर्वपीठिका तें सिहासन । वरी मोक्षश्रियेसी विराजमान ।
एव केवळ श्रीभगवान । ऐश्वर्यदानकारक पै ।।

—ह. ९०. १०३१-१०३५.

ही श्रीप्रभूची वाङ्मयी मूर्ति जो हृदयीं धारण करील, तो संसारभयातून मुक्त होईल, असे स्वानुभूत आश्वासनहि उत्तमश्लोकानीं दिले आहे :

येथ काया वाचा आणि मने । सेवक होईल अनन्यपणें ।
तया संसारभयनिस्तरणें । दुर्घट होणें न कदापि ।।

—ह. ९०. १०३६.

'हे ज्ञानसंपदा पुरातन'

हरिवरदेच्या उपसहारांत उत्तमश्लोकांनी गुरुपरपरेचें स्मरण करताना जी माहिती नोंदविली आहे, ती दयार्णव-भक्ताना आणि प्राचीन मराठी साहित्याचें व भक्तिपरंपरेचें संशोधन करणारांना उपकारक ठरणारी आहे. प्रत्यक्ष दयार्णवानी उपक्रमात जसे आपलें चरित्र स्थूल स्वरूपात चितारले आहे, तसे उपसहारात पारमार्थिक आत्मचरित्रहि अधिकृत स्वरूपात नोदविले असते, असें मानायला जागा आहे. परंतु ग्रंथपूर्तीपूर्वीच त्यानी समाधि स्वीकारल्यामुळें त्यांच्या शब्दात त्यांच्या परपरेचें वृत्त आपल्याला उपलब्ध होऊ शकले नाही. उत्तमश्लोकानी आपली ही खंत, अंशतः का होईना दूर केली आहे. 'हे पुरातन ज्ञानसपदा' आपणांपर्यंत कशी येऊन पोंचली, हे सागण्याच्या निमित्ताने त्यानी गुरुपरंपरेचें वृत्त निवेदिलें आहे. दयार्णवाच्या गुरुपरंपरेतील एकनाथांपर्यंतची माहिती आपणांस अन्य साधनांतून ज्ञात झालेली आहे. त्यापुढील चिदानद, स्वानंद आणि गोविंद या तीन सत्पुरुषाविषयी उत्तमश्लोकांनीं दिलेली माहिती महत्त्वपूर्ण आहे.

चिदानंद : चिदानंद हे एकनाथांचे शिष्य. एकनाथ एकादश-टीकेच्या निमित्तानें काशीस गेले असतां, तेथील निवासांत त्याच्या अध्यात्मतेजानें जे भाग्यवत भारले गेले, त्यापैकीच चिदानद हे होत.

त्यावरी बहुतां दिवसांतरीं । श्रीमद्येकादशमस्कंधावरी ।
टीका लिहिताचि माझारी । जालें शिवपुरीप्रति जाणें ।
तव ते वाराणसीमाझारी । श्रीमच्चिदानंद ब्रह्मचारी ।
अष्टागयोगसाधना पुरी । करूनि अंतरी निराकुल ।।
दुग्धमात्राचा स्वल्पाहार । सेवूनि त्यजिले धान्यप्रकार ।
वैराग्ययुक्तचि निरंतर । स्वज्ञानमात्रविरहित ।।
तेथ प्रसगें दर्शन होता । वेधली वृत्ति स्थिति पाहतां ।
शरण होऊनि श्रीएकनाथा । स्वसुख तत्त्वता लाभिन्नला ।।

—ह ९०.१०५३–१०५६.

नाथांना हा शिष्य काशी-निवासांत भेटला आणि त्याची परपरा पुनः दक्षिणेंत नादत राहिली, ही घटना भक्ति-परपरेच्या आंतरभारतीय अनुबधावर प्रकाश टाकणारी आहे. नाथाचे हे शिष्य नाथाच्या समाधीनंतर दक्षिणेंत गुरुसमाधीच्या दर्शनासाठी आले आणि नतर दक्षिणेंत सचार करीत असताना त्यांनीं अनेकाना प्रबोधाचें दान केले.

त्यावरी क्रमूनि बहुत वर्षे । रामेश्वरादि यात्रोद्देशें ।
काशीहूनिया दक्षिण दिशे । क्रमिलें योगीशें चिदानंदें ।।
प्रतिष्ठानीं वृंदावनीं । पूजनें वंदने संपादुनी ।
ज्ञानेश्वराची समाधि नयनी । पुढें पाहूनी भू क्रमिली ।।
तव कृष्णाप्रदेशीं चिमणगांव । तेथ रम्यालयी महादेव ।
चित्ता मानला बहु तो ठाव । एकान्त सर्वसुखावह ।।
विशेष ग्रामस्थ प्रेमळ व्याजें । स्थिर केले आपणां सहजें ।
तत्रस्थ लेखकवृत्तिकतनुजें । भक्तिभोजें नाचविलें ।।

—ह. ९०. १०५७–१०६०.

स्वानंद : चिदानंदांना कृष्णातीरावरील चिमणगांवीं महादेव-मदिरांत (श्रीकालेश्वर-मंदिरांत) भेटलेला कुलकर्ण्याचा मुलगा म्हणजेच दयार्णवांचे परमगुरु स्वानंदस्वामी हे होत. याच्या घराण्यातील कुलकर्ण वतनासंबंधीचें एक निवाडपत्र उपलब्ध आहे. ('सनदापत्रांतील माहिती' : सपादक-मावजी आणि पारसनीस. पृ. ५८-६९.) उत्तमश्लोकानीं दिलेली माहिती आणि त्या निवाडपत्रांतील माहिती याच्या एकत्र निरीक्षणानें स्वानंदस्वामीच्या चरित्रावर बराच प्रकाश पडतो. त्यांचें संपूर्ण नाव रघुनाथ बापूजी दिवाकर. गोत्र गौतम. शाखा माध्यंदिनी. सूत्र वाजसनेयी. त्यांच्या घराण्याकडे चिमणगावचें ज्योतिष-कुलकर्णपणाचें वतन पिढ्यान् पिढ्या चालत आलेलें होतें. त्यांची वंशावळ पुढीलप्रमाणें आहे :

लक्ष्मण

↓	↓
देवजी	चिंतामणि
↓	↓
लुमाजी	विश्वनाथ
↓	↓
रामाजी	चिंतामणि
↓	
बापूजी	
↓	
रघुनाथ	

त्याचे आणखी एक गोत्रज घराणें रुई येथे कुलकर्णपण करीत होतें. दौलताबादचे दिवाण अंबरखान (ज्याचा रमावल्लभदासाच्या चरित्रांत संबंध येतो.) आणि विजापूरचे दिवाण ज्ञानतराव यानी, या घराण्यातील कुलकर्णपणावर इतरांकडून अतिक्रमण झालें असता, निवाडे दिले होते. चिमणगाव शिवछत्रपतीच्या स्वराज्यकक्षेत आल्यानतर खुद्द शिवछत्रपतीनीं पंताजी वाकेनिविसाकरवी राज्याभिषेक शके ४ मध्यें या घराण्याच्या कुलकर्ण वृत्तीसबधीचें निर्णयपत्र दिलें होतें. हें पत्र स्वानदस्वामीचे चुलत पणजोबा विसाजी चिंतामण याच्या नावचें असून त्यासबधीच्या भेटीगांठी मात्र खुद्द स्वानदस्वामीनीच घेतल्या होत्या. स्वानंदस्वामी आणि शिवछत्रपतीचा संबंध उत्तमश्लोकानीहि सांगितला आहे :

ज्या वय पाहता वर्षे बारा । परि पूर्वसाधनसिद्धचि सारा ।
तो श्रीचिदानद - पद्माकरा । लाभला बरा स्वमस्तकी ।।
उपदेशमात्रें बोधैश्वर्य । पावला पक्व अवस्था तुरीय ।
यास्तव स्वानद अभिधा वर्य । ज्ञापिली अक्षय गुरुरायें ॥
पुढें देशिकें यात्रावलंब । केलियानतरे काळी शुभ ।
स्वानंदें सेविलें वन स्वयंभ । दैहिक लोभ विसर्जूनी ।।
स्वसुखसुरवाडें भार्येसह । चिरकाळ क्रमिला सुखावह ।
सुरसिद्ध दर्शना अहरह । येती स्वयमेव जयाचिया ।।
त्या श्रीस्वानंदाची महिमा । अपार वर्णितां अनुपमा ।
अमानित्वादि गुणीं गरिमा । जेथ उत्तमा संपादिली ।।
तया आपुलिया कल्याणकामें । शिवभूपतीनें प्रार्थूनि प्रेमें ।
रायदुर्गी स्थापिले नेमें । सेवानुक्रमें तोषविलें ।।

—ह. ९०.१०६१—१०६६.

उपरिनिर्दिष्ट निवाडपत्रानुसार स्वानंदस्वामी रायगडावर शिवछत्रपति आणि शंभुछत्रपति याच्या कारकीर्दीत दफ्तरदारी करीत होते. ते 'राघोस्वानंद' (लौकिक आणि सांप्रदायिक नांवांचा संयोग) या जोडनांवानें ओळखले जात. शंभुछत्रपतींच्या कारकीर्दीत (कदाचित् स्वराज्यांतील अदाधुदीला विटून असेल) त्यांनीं रायगडावरील दफ्तरदारी सोडली आणि 'वैराग्य घेऊन' ते फलटण येथें जाऊन राहिले. या वेळी त्याचा मुलगा कृष्णाजी हा लहान होता. तो जाणता झाल्यावर ते चिमणगांवीं राहावयास गेले. यापुढची त्यांच्याविषयींची माहिती उपलब्ध नाहीं.

गोविंद : हे स्वानंदस्वामींना रायगडावरील निवासांत प्राप्त झालेले शिष्य. याचें उपनाम चौधरी असे होतें. यांचें मूळ गाव कोणतें, ते माहीत नाही. रायगडावर यांना पालखीपदाचा मान होता.

ये स्थानीं गोविंदराव । शिबिकारूढ सवैभव ।
उदया आलें योगदैव । तयाचें पूर्व ते ठायी ।।
तेणें सेविता स्वानदस्वामी । निवृत्त जाला सर्वकामी ।
टाकिली सपत्ति नाशगामी । आत्मारामीं सुरवाडला ।।
लोकैषणाव्हियादि वृत्ति । अवघी सोडूनिया प्रवृत्ति ।
गुरुपरिचर्या केली निगुति । जिया ज्ञानसपत्ति झड घाली ।।
पुढें गुर्वाज्ञेनें श्रीगोविंदें । जायेसहित सप्रेम छदें ।
विठ्ठलमूर्ति पाहूनि मोदें । अंबापुरीतें अधिष्ठिलें ।।

—ह. ९०.१०६७—१०७०.

गुर्वाज्ञेने यानीं आबेजोगाईत निवास केल्यानतर तेथें कृष्णदयार्णवांची आणि त्यांची भेट झाली आणि श्रावण व.८, श. १६१७ या दिवशीं त्यांनीं दयार्णवांना उपदेश दिला. त्यानंतर त्यांनीं शके १६१९ ते १६२१ या काळांत उत्तरयात्रा आणि शके १६२५ ते १६२६ या काळांत दक्षिणयात्रा आपल्या शिष्यासह केली. उत्तरयात्रेच्या वेळीं गया येथें यांनीं दयार्णवांकडून दशमस्कंधावर गद्य व्याख्यान करविलें. कृष्णदयार्णवाच्या हरिवरदेचे २३ अध्याय लिहून पूर्ण झाल्यानंतर गोविस्वामीचें निर्याण घडलें. हे परमविठ्ठलभक्त होते. पंढरी-यात्रेच्या प्रसंगींच त्यांनी देहत्याग केला. दयार्णवानीं हरिवरदेच्या २४ व्या अध्यायाच्या आरभीं त्यांच्या निर्याणाचें वृत्त नोंदविलें आहे :

सौम्यवत्सरी शरत्काळी । जरिका प्रकटली भूमंडळी ।
तेणें तनू विकळ झाली । म्हणोनि अतरली पंढरी ।
भूमंडळी वलयांकित । मनुष्यमात्र जरिकाग्रस्त ।
मास पक्ष रात्री सप्त । झाले व्याप्त ज्वरशीतें ।।
मग कार्तिक शुद्धपक्षीं । प्रयाण केलें पढरीसी ।
तैं कात्यायनीव्रतव्याख्येसी । मार्गी जातां विवरिलें ।।
तंव येरीकडे मार्गशिर । शुद्ध तृतीया बुधवार ।
शूळयोग मूळ नक्षत्र । अरुणोदयीं शुभ वेळे ।।

वंजरेसमीप उत्तरे ग्राम । खळबिरें ऐसें जयासि नाम ।
तेन्हां तेथ कैवल्यधाम । सद्गुरुनाथें स्वीकेलें ।।
—— ह. २४. १२–१६.

ही घटना वंजरेच्या उत्तरेस असलेल्या खळबिरें या गांवीं शके १६५१ मध्यें मार्गशीर्ष शु. ३, बुधवार या दिवशी घडली. देहत्यागापूर्वी त्यांनीं एक महिनाभर अनशनव्रत स्वीकारलें होतें. त्यांनीं महाभारतावर ग्रंथ लिहिला असावा, असें मध्वमुनीश्वरांच्या संतनामावळीतील उल्लेखावरून वाटतें. त्यांचे पुत्र शिवदीक्षित चौधरी यांनीच दयार्णवांना उत्तरार्ध-लेखनास प्रवृत्त केलें. यांना सिद्धेश्वराचा प्रसाद प्राप्त झाला होता. यांचें वर्णन दयार्णवांनीं 'मंत्रभागवत-व्याख्याते' या सूचक विशेषणानें केलें आहे. ज्या मुरलीपुरीं यांचा निवास असल्याचें सूचन हरिवरदेच्या उत्तरार्धाच्या प्रारंभीं आहे, त्या मुरलीपुराचा शोध लागल्यास गोविंद-स्वामींच्या घराण्याचा तपास करणें सोपें होईल.

स्वानंद-दयार्णव-संबंध : दयार्णवांचे परमगुरु स्वानंदस्वामी आणि दयार्णव यांचा पारमार्थिक संबंधाशिवाय रक्तसंबंधहि होता. स्वानंदांचे आणि दयार्णवाचें कुळ एकच. या कुलाच्या दोन्ही शाखा जवळ जवळच (चिमणगांव आणि कोपर्डे यांतील अंतर थोडें आहे) राहत होत्या. दयार्णव कोपर्डे सोडून आंबें जोगाईस गेले, त्या वेळी स्वानंदस्वामी रायगड सोडून चिमणगांवीं राहावयास आलेले होते. स्वानंदस्वामीचे शिष्य गोविंदस्वामी त्यांच्याच आज्ञेनें पूर्वीच आंबेंजोगाईस गेलेले होते. यावरून असें अनुमान निघतें कीं, दयार्णवांचें कोपडर्घाहून आंबेजोगाईस झालेले स्थलांतर स्वानंद-नियोजित असावें. स्वानंदांनी आपल्याच घराण्यांतील या सात्त्विक वृत्तीच्या मुलाला सहेतुकपणेंच आपल्या शिष्याकडे पाठविलें असावें. दयार्णवांच्या हृदयावर शिव-समर्थ-युगाचे जे उत्कट संस्कार घडल्याचें प्रत्यंतर हरिवरदेंतून आणि दयार्णवांच्या अन्य कृतीतून घडतें, त्याचें बीज केवळ दयार्णवांचें बालपण कृष्णेच्या कांठीं व्यतीत झालें, यांत नसून त्यांचे परमगुरु आणि कुलसबंधी स्वानंदस्वामी यांचा शिवछत्र-पतींशीं घनिष्ठ सबंध होता, या वस्तुस्थितीतहि आहे, असें म्हणावयास हरकत नाहीं.

अष्टम खंडाचें स्वरूप : व्याप्ति, स्थल-काल व विषय

'हरिवरदे' चा हा अष्टम खंड पृष्ठसंख्येनें दुप्पट आहे. या खडांत ६६ ते ९० असे अखेरचे पंचवीस अध्याय समाविष्ट असून, या अध्यायांची ओवीसंख्या ११७१६ आहे. मूळ श्लोकांची संख्या ११६२ आहे. म्हणजे सरासरीनें एका श्लोकावर १० ओव्यांचें भाष्य आहे. या खडांत समाविष्ट असलेल्या अध्यायांच्या रचनेच्या स्थलकालांविषयींहि कांहीं माहिती उपलब्ध आहे : अ. ६६ – मुगी : वैशाख कृ. १०, शके १६५९; अ. ६७–मुगी : ज्येष्ठ शु. २, शके १६५९; अ. ६८ – मुगी : ज्येष्ठ कृ. १२, शके १६५९; अ. ६९ – पैठण : भाद्रपद शु. ११, शके १६५९; अ. ७० – मुंगी : आश्विन शु. ११, शके १६५९; अ. ७१ – खडकी (औरंगाबाद); अ. ७२ – मुगी; अ. ७४ – मुगी : वैशाख कृ. १२, शके १६६०; अ. ७६– मुगी : ?शु. ९, शके १६६०; अ. ७७ – मुंगी : आषाढ शु. १, शके १६६०; अ. ७८ – मुगी : आपाढ कृ. १०, शके १६६०; अ. ७९ – मुगी : श्रावण कृ. १, शके १६६०; अ. ८० – मुगी : भाद्रपद व. २, शके १६६०; अ. ८१ – मुगी : अधिक आश्विन कृ. ८, शके १६६०; अ. ८२ – मुगी : कार्तिक शु. १०, शके १६६०; अ. ८३ – मुगी : मार्गशीर्ष कृ. ७, शके १६६०; अ. ८४ – पैठण : फाल्गुन, शके १६६०; अ. ८५ – पैठण : वैशाख कृ. ५, शके १६६१; अ. ८६ – पैठण : आषाढ कृ. ३, शके १६६१; अ. ८७ – या अध्यायांतील पहिल्या २३ श्लोकांवरचें व्याख्यान पूर्ण झाल्यावर पैठण येथें मार्ग-शीर्ष शु. ५, शके १६६२ या दिवशीं दयार्णवानीं समाधि-स्वीकार केला. पुढें त्याचे शिष्य उत्तमश्लोक यानी मार्ग-शीर्ष शु. ५, शके १६६५ या दिवशी पैठण येथेंच ग्रंथ-समाप्ति केली, याचा उल्लेख प्रारभी येऊन गेलाच आहे.

या पंचवीस अध्यायातील बहुतेक अध्याय मुंगी येथें, थोडे पैठण येथें आणि एक औरंगाबाद येथें लिहिला गेला आहे. दयार्णवांचा निवास अधिक काळ मुगीसच असे. मुगी-मठास ते 'स्वमठ' म्हणतात आणि पैठण-मठास 'विश्रांति-मठ' या नावानें संबोधतात. वरील कालनिर्देशांची पाहणी करतां असें दिसते की, अ ६६ ते ८६ पर्यंतची रचना (वैशाख कृ. १०, शके १६५९ पासून आषाढ कृ. ३, शके १६६१ पर्यंत) सुमारें दोन वर्षे आणि दोन महिने एवढ्या कालात झालेली आहे. ८६ वा अध्याय पूर्ण झाल्यानंतर समाधिकालापर्यंत एक वर्ष साडेचार महिने एवढा कालखंड लोटला आहे आणि या काळात ८७ व्या अध्यायाच्या केवळ ४८७ ओव्याच लिहून झालेल्या आहेत. यावरून असें अनुमान करावेसें वाटते की, ८६ वा अध्याय पूर्ण झाल्या-नंतर म्हणजे शके १६६१ च्या वैशाखानंतर दयार्णवांची प्रकृति लेखनकार्यास अनुकूल राहिली नसावी. दयार्णवांनीं केलेला अवर्षणाचा आणि दुर्भिक्षाचा उल्लेखहि (ह. ६९. ४१८ आणि अ. ७९ च्या अखेरीचा संस्कृत कालोल्लेख) महत्त्वपूर्ण आहे.

या खंडांतील कथाभागांत पौण्ड्रक-काशीराज-वध, द्विविद-वानर-वध, जरासंध-वध, चैद्य-वध, शाल्व-वध, वक्रदंत-विदूरथ-वध, बल्वल-वध, इत्यादि समरप्रसंग आहेत; सांब-लक्ष्मणा-विवाह आणि सुभद्रा-हरण हे स्वयवर-प्रसग आहेत; पृथुकाख्यानामारखा मित्रप्रेमाचें महिमान गाणारा कथा-प्रसग आहे; भगवताचे आह्निक सागण्याच्या निमित्ताने आलेलें गार्हस्थ्याचें सविस्तर वर्णन आहे आणि बलराम-यात्रा व सूर्योपरागतीर्थयात्रा वर्णितांना भारतांतील तीर्थस्थानाची महती गायिलेली आहे युद्धें, स्वयंवरें, यात्रा इत्यादि कथा-प्रसंगांचा विस्तार करताना दयार्णवानी भगवद्भक्तीचें सूत्र अखडपणें गोवलें आहे. वेदस्तुतीसारखा गूढ तात्त्विक विषय दयार्णवाच्या समर्थ लेखणीतून पूर्णाशानें उतरावयाम हवा होता. परतु ईश्वरेच्छा तशी नव्हती. कदाचित् दयार्णवांनी केलेल्या लीलागायनांत रगलेल्या प्रभूला निखळ तत्त्वचर्चा अनावश्यक वाटली असेल आणि त्याने आपल्या या प्रियतम भक्ताला ग्रथपूर्तीपूर्वीच कर्तव्य-मुक्त करून आपल्या चरणकमलीं चिरविश्राति दिली असेल !

समर-प्रसंगांचीं वर्णनें

दयार्णव कथा-कथनांत किती कुशल आहेत, हे गेल्या सात खंडांतील त्यांच्या कथनसौदर्यानें दाखवून दिलें आहेच. ललित आणि रौद्र कथाप्रसंग ते सारख्याच सामर्थ्याने चितारूं शकतात. आख्यानककविमंडळांत दयार्णवाचें स्थान किती वरचें आहे, हें मी गेल्या खंडाच्या प्रस्तावनेत सांगि-तलेच आहे. दयार्णव कथा-कथनांत रंगतात, हें खरे; परंतु कथाकथन करीत असतांना त्याचे तत्त्वचितक मनहि सदैव जागृत असतें. हरिवरदेंत कथाकथन आणि तत्त्वचितन गंगा-यमुनांच्या जीवनाप्रमाणें समरसून वाहात आहे. हरिवरदेंतील कथाकथन तत्त्वचितनानें भारावलेले आहे, तर तत्त्वचितन कथाकथनाने रगलेलें आहे.

दयार्णवांनी केलेली समर-प्रसंगाची रौद्र-भयानक चित्रें आपण यापूर्वी अनेकवार पाहिली आहेत. त्यांची युद्ध-वर्णने आणि द्वंद्ववर्णनें सारखीच चित्तथरारक आहेत. प्रतिपक्षाचें आव्हान, त्या आव्हानाच्या प्रतिक्रिया, सैन्यांची सज्जता, शस्त्रास्त्रांचे सभार, सेनाशिबिरे, सैन्याच्या हालचाली, प्रत्यक्ष युद्धांतील रणधुमाळी, रणवाद्यें, रणगर्जना, युद्धाचे परिणाम, इत्यादि समरसंबद्ध अनेक गोष्टीचें सूक्ष्म आणि परिणामकारक चित्रण दयार्णव लीलया करू शकतात. या चित्रणात अनेकदां त्यांचा राजनीतीचा आणि युद्ध-नीतीचा व्यासंगहि प्रतिबिबित झालेला दिसतो.

सहासष्टाव्या अध्यायाच्या प्रारंभीचाच प्रसंग पाहा; कारुपाचा दूत यदुसभेंत येऊन, " मजवरी दूषण ठेवू नका । सदेशहारका जाणोनी " अशी विनवणी करतो आणि कारुपाने कृष्णाला दिलेले आव्हान यादवांपुढें मांडतो–

मजहूनि वासुदेव त्रिजगी दुसरा । नाहीच,ऐसिया दृढ निर्धारा ।
जाणोनि मम नाम त्यजी त्वरा । मिथ्या अहकारा न धरूनी ।।
मूढत्वास्तव माझीं चिन्हें । शङ्खचक्राब्जकौस्तुभाभरणें ।
जितुकी न कळूनि तुवा धरणें । जीवा वांचवणें त्यजूनी ।।
चिन्हें टाकुनी मातें शरण । येऊनि चुकवी आपुले मरण ।
गर्व धरिसी तरी तू रण । देई निर्घृण मम समरीं ।
स्त्रिया मेळविलिया बहुसाळा । त्याचे सौभाग्य रक्षी कुशळा ।
शरण होऊनि मज चिरकाळ । विचरें प्राज्जळ भूलोकी ।।
अथवा मरणाचे डोहळे । झाले असती प्रेरिल्या काळे ।
तरी तू मजसी गर्वबळें । येऊनि मिसळे समरंगी ।।

– ह. ६६.४०-४५.

स्वत:ला परमेश्वरावतार मानणाऱ्या कारुपानें कृष्णाला दिलेलें हें आव्हान म्हणजे भावी समरप्रसगाची नांदी आहे. कृष्णशत्रूच्या भावनाशी समरसून, कृष्णभक्त दयार्णवांनी कथाकथनाचा आदर्श साभाळला आहे याच अध्यायांत, पराभूत पक्षांतील पोटभरू सैनिकांच्या वृत्तीचे चित्रण कर-तांना दयार्णवाची निरीक्षणशक्ति चागलीच प्रत्ययास येते –

येर पामरें पडली क्षिती । आई-बा-धन-कामिनीते स्मरती ।
प्रपंचयोगें आक्रदतीं । तोडी माती पडिल्याहि ।।
अवयव जाले खंडविखड । तथापि वाचवावया पिड ।
करिती केविलवाणें तोंड । ग्लानि उदड भाकूनि ।।
म्हणती नेणती बाईल घरी । टाकूनि कोठें पातलो समरी ।
येथे पडलिया चक्रप्रहारीं । प्रियतम अतुरी अतरली ।।
एक म्हणती लेकुरें तान्ही । भोळी बापुडी कामिनी ।।
अक्षय त्याचे संगोपनी । जाली विघडणी मज त्याची ।।
एक म्हणती ठेविले धन । त्याचें कोणा न केले कथन ।
माझे समरी गेलिया प्राण । सांगेल कोण स्त्रीपुत्रां ।।
एक स्मरती रिणायिता- । पाशी गुतूनि राहिल्या अर्था ।
आठवूनि हृदयामाजी खतां । प्राण तत्त्वतां विसर्जिती ।।
एक म्हणती वृत्तीसाठीं । व्यवहारी शत्रूची मुखवटीं ।
स्तंभिलीं, ते मज मेलिया पाठीं । जेवितीं ताटी दूधभात ।।

– ह. ६६.१२४-१३०.

या उताऱ्यांतील प्रापंचिकाच्या क्षुद्रतेचें आणि करंटेपणाचें भावचित्र पाहून, तसेंच 'एक म्हणती' या पदांची पुनरा-वृत्ति पाहून, मला श्रीसमर्थांच्या वृत्तीचें आणि शैलीचें स्मरण

होतें. (८० व्या अध्यायांत ओ. ३३४- ३६१ मध्ये केलेलें मनुष्यदेहाच्या क्लेशाचें विदारक चित्रणहि समर्थप्रभावाच्या संदर्भात चितनीय आहे.)

ससैन्य युद्धातील या दोन चित्रांप्रमाणेंच, भीम-जरासंधांचें गदायुद्धहि पाहण्यासारखें आहे :

तया दोघांच्या उभय गदा । बाहुवेगें ताडिती विशदा ।
एकमेकांच्या अवयवभेदा । करिता खेदां न पवती ते ।।
एकमेकांच्या खांदियावरी । निकरें ताडिती गदाप्रहारी ।
घाय वोढिती वरच्यावरी । कटितट प्रहारीं शितरिती ।।
मस्तकीं दावूनिया घाय । वंचनमार्गे ताडिती पाय ।
तेणें जघन चूर्णित होय । परि न धरती भय मरणाचें ।।...
असो ऐसिया अवयवसधी । लक्षूनि ताडिती महाक्रोधी ।
जेंवि अर्कतरूचे सन्निधी । भिडिजे द्विरदी महाक्रोधें ।।
मदोन्मत्त कुजरवनी । तेंवि संघटिजे दोघी जनी ।
दोघामाजी विपादाग्नि । प्रज्वळलेनि आवेशें ।।...
उभय गजाचे दंतखडके । तेवि उभय गदाचे धडके ।
विद्युत्पातासारिखे कडके । उठती चपेट घाताचे ।।
तळताडनें उठती ध्वनी । जेवि तडिद्घान मेघ गगनीं ।
तेंवि चपेटें मुष्टीच्या प्रहरणी । भूमि दणाणी सशैल ।।

– ह. ७२. २४१–२५२.

हें वर्णन वाचतांना आपण प्रत्यक्ष युद्धभूमीवर आहोंत, असा अनुभव येतो. यातील उभय वीराचा रणावेश, आघात-प्रत्याघातांची भीषणता, रणवंचनाची पद्धति आणि मृत्यूला जिणून उरलेली प्रलयकर वीरवृत्ति दयार्णवानी शब्दातून आकारास आणली आहे.

स्वभावोक्तीचें एक उदाहरण

व्यक्तीच्या बाह्य हालचालीचें व मनोव्यापारांचें, प्रसंगाच्या अगोपांगाचें आणि निसर्गदृश्याचें सूक्ष्म निरीक्षण करून, ते शब्दात ग्रथित करण्याची कला दयार्णवाना उत्तम प्रकारें साधलेली आहे. त्यामुळें त्यांनी काढलेलीं शब्दचित्रे वेधक बनलेली आहेत. सदुसष्टाव्या अध्यायात त्यांनी काढलेलें द्विविद वानराच्या हालचालीचें चित्र म्हणजे स्वभावोक्तीचें एक उत्तम उदाहरण आहे :

परमदुष्ट शाखामृग । शाखिशाखावरि सवेग ।
वेंघूनि घुलकावि भ्रूभंग । तवकें निजाङ्ग उफाळवी ।।
एके द्रुमीं न राहे स्थिर । अवघे काननीचे तरुवर ।
वेंघूनि कांपवी थरथर । निर्भय वानर आंगबळें ।।
डोळे मिचकावूनि घुलकावी । उफाळूनियां वांकुल्या दावी ।
खिखाटें भुभुकारें वानरभावीं । कुसी खाजवी गगनाक्ष ।।
उडी घालूनि निकटवृक्षी । गगन लक्षूनि खाजवी कुक्षी ।
पत्रे फळें डासळी भक्षी । वनितावक्षीं झेपावे ।।
किलकिलाटें करी शब्द । रामेंसहित वनितावृंद ।
त्यातें आपणा दावी विशद । विटावी रद विचकूनी ।।
फुफाटें पिंजारी नासिका । मागें सरोनि पुढिली शाखा ।
उफाळूनिया कवळी देखा । देखूनि बायका हासती ।।

– ह ६७. ८०–८५.

वानरचेष्टाचे सर्व बारकावे दयार्णवांनी सूक्ष्म दृष्टीनें हेरले आहेत आणि आपल्या स्मृतिकरंडकातील ते निरीक्षण द्विविदवानर-प्रसगाच्या निमित्तानें अचूकपणें उपयोजिलें आहे.

टीकावैशिष्ट्याचा आणखी एक निर्देश

टीकाकार म्हणून दयार्णवानी आपल्या प्रज्ञेची आणि प्रतिभेची कितीतरी वैशिष्ट्ये व्यक्त केली आहेत, हे हरिवरदेच्या वाचकांना सुपरिचित आहे ज्ञानेश्वरांनी जशी 'गीतेवीणही रग दावी' अशी गीताटीका निर्माण केली, तशीच दयार्णवानीहि 'भागवतावीण रग दाखविणारी' हरिवरदा टीका निर्माण केली आहे दयार्णव भागवतातील श्लोकाचें पदश. विश्लेषण तर करतातच, परंतु तें विश्लेषण करीत असतांना कथाकथनाचा प्रवाह अडखळू देत नाहीत. त्याचमुळें त्यांच्या पडिती टीकेला रुक्षतेचा स्पर्श होत नाहीं. या विधानाच्या स्पष्टीकरणासाठी एक सहज हाताशी आलेलें उदाहरण देतों. अडुसष्टाव्या अध्यायात साब लक्ष्मणेचे हरण करून निघाला आहे, असा प्रसंग आहे. तो लक्ष्मणेला रथात घालून निघाला असता कौरवानीं त्याचा पाठलाग चालविला आहे.

दृष्ट्वानुधावत: साम्बो धार्तराष्ट्रान्महारथ:।
प्रगृह्य रुचिर चापं तस्थौ सिंह इवैकल. ॥६॥

असा मूळ श्लोक आहे. "कौरव आपला पाठलाग करीत आहेत, असें पाहून तो महारथी साम्ब आपले सुदर धनुष्य सांवरून, एकटा असूनहि सिंहाप्रमाणे (धैर्यानें) थाबला." असा या श्लोकाचा आशय आहे. या श्लोकावर भाष्य करतांना दयार्णव लिहितात :

आले देखोनि धार्तराष्ट्र । साम्बें फिरविला रहवर ।
चुम्बूनि धार्तराष्ट्रीचे अधर । म्हणे, 'भीरु, भय न धरी ।।
तुझिये सोडवणें कौरव । धनुर्विद्येचा करूनि गर्व ।
धांविले, परंतु मी हे सर्व । करीन अगर्व समरंगी' ।।
साम्बे ऐसी दौर्योधनी । आश्वासूनी वीरश्रीवचनी ।
श्मश्रु स्पर्शोनी दक्षिणपाणी । ठाकला रणी महारथी ।।

जैसें अमरेन्द्रकोदंड । प्रावृटी भासे सुरंगाढय ।
तैसे रुचिर कार्मुक दृढ । साम्बें झडकरी चढविलें ।।
रुचिर चाप घेऊनि मुष्टी । कौरव लक्षिले दूरदृष्टी ।
सिह जैसा देखे करटी । तैसा पोटी सावेश ।।
समरी ठाकला जैसा मेरु । अढळ अभंग महावीरु ।
एकला एकाकी रहंवरु । जेंवि भास्कर तमोहंता ।।
तयाप्रति धार्तराष्ट्र । देखोनि लोटले अनावर ।
म्हणती, 'धरा, बांधा चोर । कन्या सुदर नेतो हा ।।
आधीच कर्म केलें खोटें । आतां पळसील कोणें वाटे ।
मरण ओढवलें ओखटें । दावी मुखवटे परतोनी ' ।।
ऐसे सक्रोध कौरव । भोगिती शब्दांचें गौरव ।
साम्ब धरू इच्छिती सर्व । समर अपूर्व तो ऐका ।।
—ह. ६८. ५५-६३.

आतां आपण मूळ श्लोक आणि हे दयार्णवकृत भाष्य ताडून पाहूं, म्हणजे दयार्णवांच्या टीका-वैशिष्ट्याची कल्पना येईल. 'तस्थौ' (थांबला) चें स्पष्टीकरण 'साम्बें फिरविला रहवर' असें केलेलें आहे. त्यामुळें सांबाची निर्भयता आणि गतिमान् आवेश व्यक्त झाला आहे. कौरव पाठलाग करताहेत, या घटनेची लक्ष्मणेच्या मनावरची प्रतिक्रिया भयाकुलतेची असणार, हे ध्यानीं घेऊन भावमर्मज्ञ दयार्णवांनीं, साम्बाकरवी तिचे भय निराकरण करण्यात जो हळुवारपणा व्यक्त केला आहे, तो त्याच्या रसिक कल्पकतेचा द्योतक आहे. 'प्रगृह्य रुचिरं चापं' (सुदर धनुष्य चढवून) या पदांचें स्पष्टीकरण 'वर्षाकालांत विलसणाऱ्या इद्रधनुष्याप्रमाणे सुदर दिमणारें आणि दृढ असें धनुष्य सांबाने त्वरेनें (झडकरी) चढविलें' या शब्दांत केलेलें आहे. 'सिह जैसा देखे करटी । तैसा पोटी सावेश ।।' हें 'सिह इवैकलः' या पदाचें विवरण किती समर्थ आणि प्रत्ययकारी आहे ! मेरूच्या उपमेनें सांबाचें 'अढळ अभंग' धैर्य व्यक्त केलें आहे, तर 'भास्कर तमोहंता' या उपमेनें त्याचें अपराजित शौर्य सुचविले आहे. तसेच पाठलाग करणाऱ्या कौरवांच्या विक्रमगर्जनांचें वर्णन करून, 'ऐसे सक्रोध कौरव । भोगिती शब्दाचे गौरव' या शब्दांनी त्यांच्या गर्जनांचें वैफल्यहि सूचित केलें आहे.

—दयार्णवाच्या टीकावैशिष्ट्याचा जों जों विचार करावा, तो तो आपलें हृदय आश्चर्यानें आणि आदरानें भारावून जाते. अशी सुदर स्थळें हरिवरदेंत पानोपानीं विखुरलेली आहेत. या सौदर्यस्थळांच्या माधुर्याचें पान घडविण्याला माझ्या प्रस्तावनाचे द्रोण पुरे पडणार नाहींत. म्हणूनच मी रसिकांना आवाहन करतों कीं, त्यांनीं आपल्या हृदयांचे सुवर्णकुंभ 'दयार्णवा'त बुडवून, त्यांतील अमृताचें मुक्तपान करावे आणि तनामनाला तृप्तीचें वरदान मिळवून द्यावे.

दयार्णव-परंपरेंतील ज्ञानेश्वरीची एक प्रत

दयार्णवाच्या श्रद्धाकेंद्रात ज्ञानेश्वराचें स्थान फार मोठें होतें. आबेजोगाईस गुरूपदेश प्राप्त झाल्यानंतर त्यांनीं जें तप आचरलें, त्यांत ज्ञानेश्वरीच्या पारायणाचा विशेष समावेश होता :

करूनि निरपेक्ष कोरान्न । कृष्णदयार्णव नामस्मरण ।
स्नानसंध्या गीतापठण । पारायण ज्ञानेश्वरी ।। १.३८

या ज्ञानेश्वरीच्या पारायणाचें प्रत्यतर हरिवरदेंत ठायी ठायीं येतें. दयार्णवांच्या वाणीवर ज्ञानेश्वरांच्या अमृतवाणीचा ठसा स्पष्टपणें उमटलेला आहे. हरिवरदा वाचतांना ज्ञानेश्वरीतील किती तरी ओव्याचें स्मरण येतें. हा अनुबंध ध्यानांत घेतला म्हणजे साहजिकच अशी अपेक्षा निर्माण होते की, दयार्णवांनी स्वाध्यायासाठी उतरून घेतलेली वा संग्रहित केलेली ज्ञानेश्वरीची प्रत असली पाहिजे. डॉ. हर्षे यानी संपादिलेल्या ज्ञानदेवीच्या पहिल्या अध्यायाच्या प्रस्तावनेंत ज्या अनेक प्रतीचा परिचय दिला आहे, त्यांतील एक प्रत दयार्णव-संबद्ध आहे. त्या प्रतीचा परिचय पुढें उद्धृत करीत आहें :

" (चां) चांगदेवाच्या मठांतील पोथी, पुणतांबें चांगदेवाचे वंशज व साप्रतचे मठपति यांच्या कृपेनें उपयोगासाठी मिळाली. पधरावा अध्याय गहाळ झाला आहे. पोथी पूर्जेतील दिसते. कारण मळपृष्ठावर गंधाचे शिडकाव आहेत. नांव ज्ञानदेवी. आकार १२" × ६½", ओळी १५, अक्षरें ३४. शक १७१२. नाथोत्तरकालीन पोथीची नक्कल.

पहिल्या अध्यायाच्या प्रारंभी लेखकानें आपली गुरुपरंपरा दिली आहे, ती महत्त्वाची आहे :

ॐ नमः श्रीकृष्णदयार्णवो जयति ।
आदिनाथ गुरुं वन्दे दत्तात्रय जनार्दन ।
जगंनाथं चिदानंदं स्वास्वानंदवर्धन ।।१।।
गोविंदसद्गुरुं वंदे आन्वयेण परपरा ।
प्रनमांत्तेपु एषां नत्वा पृथक् पृ(थ)क् ।।२।।
सर्वकार्यसमारंभे ये पठंति परंपरा ।
विघ्ना विनस्यति सद्यः सिद्धिरवाप्यते ।।३।।

दुसऱ्या अध्यायाच्या प्रारंभी 'श्रीकृष्णमुर्तिर्जयति । श्रीमत्सद्गुरुगोविंदात्मने नमः' असें म्हणून शेवटी 'श्रीकृष्णदयार्णव गोविंदार्पणमस्तु' असें म्हटलें आहे.

चौथ्या अध्यायाच्या प्रारंभीहि कांही नावें आढळतात : 'श्री नारायण गदाधर श्रीसिवराम कृष्ण गोविंद श्रीमहेश्वरायणमः ॥ ॐ नम श्रीआदिगुरुं दत्तात्रय जनार्दन येकनाथश्चीदानंद स्वानंद गोविंदमुर्ति आनादि परमगुरवे नमः' आठव्या अध्यायांतील पत्र ११ अखेर (ओवी २००) एका लेखकाचें अक्षर असून पुढील चार पानें दुसऱ्या लेखकानें लिहिली आहेत. नवव्या अध्यायापासून तिसरा लेखक सुरू होतो. यांत प्रारभी 'नमो ज्ञानराजा नमो (ज्ञान) राजा । नमो ज्ञान(सि)सीधु सखा पु(पू)र्ण माझा । मति(ती)मद त्या ज्ञानदाता दि(दी)नास्गि । नमस्कार साष्टाग ज्ञानेश्वरासी ' असा ओबडधोबड श्लोक आहे.

अठराव्या अध्यायाचा शेवट – ' शके बाराशते बारोतरे । तै टीका केली ज्ञानेश्वरे । सच्चीदानंद बाबा अदरे । लेखकु जाला ।। १८१० ।। ' या ओवीनें झाला आहे व त्यानंतर कालनिर्देश व लेखकाची माहिती दिली आहे ती अशी :

' सके १७१२ साधारण नाम संवछरे पौश मास शुक्लपक्ष द्वादशासह त्रयोदशां इंदुवासरे मृगनक्षत्रे तः दीनें लीखीतार्थ समाप्ता..... हस्ताक्षेर दामोधर अणाजी दाढे कसबे अंब जोगाई हाल्ली वस्ती मौजे धानोर श्रीमाहारूद्रार्पणमस्तु ।।'

— ज्ञानदेवी, अध्याय पहिला : डॉ. रा. ग. हर्षे.
प्रस्तावना, पृ. १३–१४.

प्रस्तुत प्रतीच्या वरील परिचयाचें निरीक्षण करतां पुढीलप्रमाणें अनुमाने सभवतात :

(१) प्रस्तुत प्रतीचा लेखक दामोदर अण्णाजी दाढे हा मूळचा आंबेजोगाईचा. दयार्णवांचें प्रबोधस्थान आणि तपस्यास्थान आंबेजोगाईच. त्यामुळें प्रतीची उपलब्धि पुणतांब्याची असली तरी तिचा दयार्णवपरंपरेशी सबध सुसगत वाटतो.

(२) प्रस्तुत प्रत पुणतांब्याच्या चांगदेव मठांत पूजिली जात असे. आंबेजोगाईस मुधेश चांगा या नांवाचा एक सत्पुरुष (समाधि : ज्येष्ठ शु. ७ शके १४२७) होऊन गेला. त्याचे वंशज अद्यापि आंबेजोगाईस आहेत. पुणतांब्यास असलेली समाधि चांगा वटेश्वराची नसून चांगा मुधेशाची असावी, असें या प्रतींतील अनुबंधावरून वाटू लागतें.

(३) प्रस्तुत प्रत शके १७१२ (पौष शु. १२–१३) मधील म्हणजे दयार्णवांच्या समाधीनंतर सुमारें ५० वर्षांनीं लिहिलेली असली तरी तिच्यांतील परंपरेच्या श्लोकांत गोविंदस्वामींपर्यंतच्या व्यक्तींचाच समावेश असल्यामुळें ती दयार्णवांच्या प्रतीचीच नक्कल असावी, असें वाटतें.

(४) प्रत-लेखक दाढे हा दयार्णवांच्या गुरुबधूच्या वा शिष्याच्या घराण्यातील असण्याचा संभव आहे. या दाढे घराण्याचा शोध घेऊन आणखी कांही साधनें उपलब्ध होतील काय, त्याचा शोध घ्यावयास हवा.

नवे संकल्प

'हरिवरदा' हा दयार्णवांनी महाराष्ट्रशारदेच्या मस्तकावर चढविलेला काव्यकिरीट आहेप; रंतु 'हरिवरदे'-शिवाय आणखीहि काही लेणी दयार्णवानी मराठी शारदेला अर्पण केली आहेत. त्याचे उल्लेख यापूर्वीच्या प्रस्तावनातून येऊन गेले आहेतच. '**तन्मयानंदबोध**' आणि '**चिन्मयानंदबोध**' हीं श्लोकबद्ध प्रकरणे अजून अप्रकाशित आहेत. या प्रकरणांत दयार्णवांच्या पारमार्थिक प्रेरणांचा उदय प्रतिबिंबित झालेला असून, त्यावर पडलेली समर्थवाणीची छाया चिंतनीय आहे. समर्थांच्या कर्मभूमीत ज्याचें बालपण व्यतीत झालें, ते कृष्णदयार्णव परमार्थपथावर पहिली पावले कशा प्रकारें टाकीत होते, हे समजून घेण्यासाठी या दोन्ही प्रकरणांचा परिचय अत्यावश्यक आहे. 'सतकविकाव्यसूचि'-कारांनी उल्लेखिलेले '**सिद्धान्तसार**' आणि '**शिवरात्रिकथा**' हे दयार्णवकृत दोन ग्रथ त्याना कोठे पाहावयास मिळाले होते, तें कळत नाही. त्याचा शोध घेणें आहे.

शके १८५६ मध्यें भारत इतिहास सशोधक मडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेंत दयार्णवांची काही स्फुट कविता प्रसिद्ध झालेली आहे. ('श्रीकृष्णदयार्णवकृत वेदस्तुति आणि स्फुट कविता', पृष्ठे ८१–११९) ही प्रसिद्ध कविता केवळ डेमी आकाराच्या ३९ पृष्ठांत समाविष्ट आहे परतु दयार्णवांच्या **स्फुट रचनेचा प्रचंड संभार** अजून अप्रकाशित आहे. पैठण आणि मुगी येथील दयार्णवाच्या मठांतील स्फुट कविताची बाडें आणि महाराष्ट्रात अन्यत्र असलेल्या हस्तलिखितसंग्रहांतील संकीर्ण बाडांत विखुरलेली दयार्णवाची स्फुटें संशोधून-संपादून प्रकाशित करावयास हवींत ही स्फुट कविता दयार्णवांच्या साधनेवर प्रकाश टाकण्याम अत्यंत उपकारक ठरणारी आहे.

प्रकाशित झालेल्या स्फुटांत गणपति, मल्लारि, जगदंबा, भीमाशकर, मारुति, नारायण, योगेश्वरी, इत्यादि देवदेवता आणि ज्ञानेश्वर, एकनाथ, चांगदेव, सद्गुरु, इत्यादि साधुसंत यांचीं श्लोकबद्ध स्तवनें आहेत. तसेंच काही भक्तिरंजित पदें (७) आणि अभंग (१७) आहेत. हरिवरदेंत जी हरिकथा दयार्णवानी विस्तारानें गायिली आहे, तिचा महिमा एका पदांत त्यांनीं गायिला आहे.

परिसा हेचि कथा जन हो ।। धृ० ।।
तारण जे भवदुःखनिवारण ।
कळिमळभजन हो ।। १ ।।

या हरिकथेंत रगलेले दयार्णवाचें हृदय वर्तमानाचे बध तोडून कृष्णकालात विहरण करीत असे आणि गोपीच्या मधुर प्रीतीशी समरसून गात असे :

हरिनें मन चोरुनि नेलें ।। धृ० ।।
अवचट वेणु पडतां कानी ।
मीपण - तूपण अवघें गेलें ।। १ ।।

हा वेध मनाला लागतांच, 'दृष्टि मुरडुनी नयनी पाहे । पाहाते पाहाणेचि होऊनि राहे ।।' असा आगळा अनुभव त्याच्या हृदयांत उमलून येई आणि दयार्णवाच्या मुखातून अद्वैताचा उद्घोष उमटू लागे--

हरि हा आपणचि जग झाला ।।
आपणचि देव भक्तहि होऊनि ।
पूजित अपणाला ।। १ ।।

अशी शेकडो पदे हस्तलिखित बाडांत भाविकाच्या आणि रसिकांच्या आस्थेला आवाहन करीत वाट पाहत आहेत.

दयार्णवांची अभगवाणी आत्मतेजानें झळाळणारी आहे. तीत तुकोबाच्या अभगवाणीतील प्रभुभेटीची कासाविशी अभावानेच असून, सर्वत्र परमानुभवाची स्थिरता आहे. काव्यात्म प्रगल्भतेनें भारावलेल्या 'हरिवरदे'हून या अभगवाणीचा रग अगदी वेगळा आहे. अधाराचे हृदयविदारण करणाऱ्या सूर्यकिरणाप्रमाणे दयार्णवाचे शब्द मनोमल पुसून टाकतात.

'चतुरंग जिणे तो नव्हे जुझार' असें ते एका अभंगात म्हणतात. त्याच्या मते 'बळानें विश्वाभास उभारणारी अंतरीची अजिक्य आणि दुर्धर्ष सेना' जो जिंकतो, तोच खरा शूर होय. या 'अतरीच्या दुर्धर्ष सेने'चे वर्णन दयार्णवानीं दोन अभगांत (पृ. ८४) उत्कृष्टपणें केले आहे.

अहिंसेचा घोटु भरों धावे कोप ।
ब्रह्मचर्या दाप कदर्पाचा ।। १ ।।
निःस्पृहता मारूं धावे लोभ बळी ।
तेथें होय होळी सत्या ऽस्तेयां ।। २ ।।

या अतरीच्या दुर्धर्ष सेनेवर विजय मिळविण्यासाठी सहाय्यक ठरणारा 'श्रीहरिवांचूनी नाही दुजा कोण्ही' असें दयार्णव म्हणतात. 'भाळचाभोळचा जनां उपाय हा सोपा । मन्मथाच्या वापा शरण जावे ।।' असे त्यानीं आग्रहानें सांगितलें आहे 'निष्काम सत्कर्म ईश्वरी अर्पितां । होय प्रसन्नता ईश्वराची ।।' असें गीतोक्त तत्त्वज्ञान दयार्णवानी पुरस्कारिलें आहे. दांभिकाची हजेरी घेतांना दयार्णवाच्या वाणीला तुकोबांची प्रखरता आलेली दिसते :

सोवळे ओवळे जनांमाजि दावी ।
कामक्रोध जीवी वागवितो ।। १ ।।
त्याचें शुद्धपण पिकले वृंदावन ।
जैसे भले गुण शिदळीचे ।। २ ।।

अशा शब्दात ते दांभिकाचा धिक्कार करतात आणि 'दयार्णवी ऐसे न तरती पापाण' असे स्पष्ट शब्दांत बजावतात.

दयार्णवाच्या अभगवाणीत त्यांची गुरुभक्ति ईश्वर-भक्तीशी अभेद राखून प्रकटली आहे. 'गोविद' हे त्याच्या गुरूचे आणि इष्टदेवाचेंहि नाव आहे. 'गुरुरेव परब्रह्म' या सिद्धान्तानुसार दयार्णवांनी एकाच वेळी गुरुभक्ति आणि प्रभुभक्ति साधली आहे. 'गोविदा'शी आपलें नातें सागताना एका अभगात दयार्णवानी गाय आणि वत्स, माय आणि लेकरूं, पति आणि पतिव्रता, पिता आणि पुत्र, सिधु आणि गंगा, आत्मा आणि आत्मस्थिति, रत्न आणि दीप्ति, दयार्णव आणि दया हे दृष्टान्त वापरले आहेत, तर दुसऱ्या एका अभंगांत जळ-कल्लोळ, बिंब-तेज, हेतु-काज, पूज्य-पूजक या नात्याचा आश्रय घेऊन दयार्णव म्हणतात–

तू रस मी गोडी, तू वृक्ष मी वाढी ।
तू शक्ति मी प्रौढी सामर्थ्याची ।।

वियोगदुःखाने ओथबलेला दयार्णवाचा एक अभंग त्यांनी गुरुनिर्याणानतर केलेल्या आक्रोशाला शब्दरूप देणारा असावा असें वाटते :

चाड नसे मज आणिक कोणाची ।
एका गोविदाची आस पाहें ।। १ ।।
तयाविण जिणे शून्य वाटे लोकी ।
कोण माझे पोखी मनोरथ ।। २ ।।
कोण जाणे माझे जीवीचा कळवळा ।
कोण वेळोवेळां आळवील ।। ३ ।।
दाही दिशा तुजवीण शून्य झाल्या ।
चित्त काही केल्या स्थिर नोहे ।। ४ ।।
दयार्णव तुझ्या छायेसी वाढलों ।
आजी वाटे झालों परदेशी ।। ५ ।।

या अभंगात व्यक्त झालेले दयार्णवाचे वियोगदग्ध हृदय पाहून क्षणभर आपणहि अस्वस्थ होतों ही वियोगदुःखाची उत्कटता किती सरळ साध्या शब्दात व्यक्त झाली आहे ! यात पंडित कवि कृष्णदयार्णवाचा अश-स्पर्शहि नाही.

'जें तेजाचें निजतेज आहे, ब्रह्मांडाचे बीज आहे आणि ज्याचें गुज श्रुतीपरते आहे,' त्या आत्मतत्त्वाचें स्वरूप वर्णितांना दयार्णव म्हणतात :

जिव्हा-वरुण गोडी नेणती तयाची ।
रुची आनंदाची रसनेवीण ।।
गर्भेविण वास सुरतेविण तोप ।
त्वचेविण स्पर्श आलिंगनी ।।
लोहाने ग्रासुनी अग्निकुडी जैसा ।
देही लोपे तैसा देहभाव ।।
कृष्णदयार्णवीं पूर्णता नाठवे ।
नाठव सांठवे आठवात ।।

दयार्णवानी वर्णिलेला हा अपार्थिव अमृतानुभव परतत्त्व-स्पृष्ट शब्दांत व्यक्त झाला आहे.

—'हरिवरदे'च्या प्रस्तावनेंत दयार्णवांच्या स्फुट कवितेची ही चर्चा मी मुद्दामच विस्ताराने केली आहे. दयार्णवांच्या प्रकाशित रचनेइतकीच समर्थ आणि सुंदर रचना अजून अप्रकाशित आहे, हे यावरून वाचकाच्या ध्यानी येईल. 'हरिवरदे'च्या प्रकाशनातून मुक्त झालेले प्रकाशक दयार्णवांची उर्वरित समग्र रचना प्रकाशित करण्यासाठी बद्धपरिकर झाले आहेत. त्याच्या या सत्संकल्पाला सर्व मराठी रसिकानी, भाविक भक्तांनी, साहित्यसंस्थानी आणि शासनाने सहकार दिला, तर मराठी शारदेच्या भांडागारातील आणखी अनेक विस्मृत आणि उपेक्षित रत्ने प्रकाशांत येतील आणि आपल्या अंतरंग-दीप्तीनें रसिक-भाविकाना मोहून टाकतील.

आमच्या मर्यादा

हरिवरदा- प्रकाशनाची सांगता साजरी करतांना आम्हाला —प्रकाशकांना आणि संपादकाला — आमच्या मर्यादाचे पुरेपूर भान आहे प्रस्तुत आवृत्ति ही हरिवरदेची विचिकित्सित आवृत्ति नव्हे — तशी आवृत्ति प्रकाशित करण्याला आवश्यक असणारें द्रव्यबळ आणि स्वास्थ्य आमच्याजवळ नव्हते. आम्ही समग्र 'हरिवरदा' ग्रंथ वाचकांच्या हाती दिला आहे; या कार्यातील त्रुटि दूर करून कृष्ण—दयार्णवाच्या वाणीवर व्यासंगाची आणि सुसंपादनाची लेणीं चढविण्याची प्रेरणा निर्माण व्हावी, अशी आमची अपेक्षा आहे. दयार्णवांच्या वाक्सामर्थ्याचा परिचय जसजसा वाढत जाईल, तसतसे अनेक दयार्णव-भक्त या कार्यासाठी पुढें येतील, असा आम्हांला भरंवसा वाटतो.

चतुर्थ खंडापासून या ग्रंथाचें संपादन माझ्याकडे आले. या ग्रंथाच्या खंडाना मी लिहिलेल्या प्रस्तावना केवळ वाक्-पूजनाच्या स्वरूपाच्या आहेत त्यातून मी 'हरिवरदे' चे अंतर्बाह्य परीक्षण विस्तृत प्रमाणांत करू शकलो नाही, याची मला जाणीव आहे. केवळ 'हरिवरदे' च्या सामर्थ्याचें आणि सौंदर्याचे सूचन मी घडविले आहे अन्य पूर्वनियोजित संकल्पाच्या परिपूर्तीला मी बांधलेलो असल्यामुळे मला प्रस्तावना मर्यादित कराव्या लागल्या हरिवरदेच्या अध्ययनाच्या नाना दिशा माझ्या मनात उजळलेल्या आहेत परंतु तें काम एकट्या-दुकट्याचे नाही; त्यासाठी अभ्यासकाची 'सादियाळी' आवश्यक आहे .

(१) **हरिवरदेचे काव्यसौंदर्य** विस्तारपूर्वक उकलावयास हवें. रसपरिपोष, अलंकरण, शब्दचयन इत्यादि अनेक बाबींची चर्चा व्हावयास हवी.

(२) **हरिवरदेची भाषा** प्राचीन मराठी वाङ्मयाच्या अध्ययनक्षेत्रांत महत्त्वाचे स्थान पटकावणारी आहे आपल्या ग्रंथांत फारसी—अरबी शब्दाचा प्रवेश होऊ नये, म्हणून दयार्णवानी व्यवहारात रुजलेल्या अनेक शब्दाना संस्कृत प्रतिशब्द घडविले. त्याच्या भाषेच्या संस्कृतप्राचुर्याची उकलहि उद्बोधक ठरेल विविध शास्त्राची दयार्णवानी योजलेली परिभाषा वर्गीकृत केल्यास आजहि त्या परिभाषेचा उपयोग होईल. दयार्णवानी योजलेल्या राजकाजातील शब्दाची 'राज्यव्यवहारकोशा'शी तुलना केल्यास त्या वेळच्या एतत्संबंधीच्या प्रयत्नावर वेगळाच प्रकाश पडू शकेल. हरिवरदेच्या शब्दसंपत्तीचा परिचय घडविण्यासाठी एक बृहत्कोशहि तयार व्हावा

(३) **दयार्णवांचा व्यासंग** प्राचीन मराठी कविमंडळात आगळा आहे. टीकाविषय असलेल्या भागवतपुराणावरील एकाधिक टीका, वर्ण्यविषय बनलेल्या कथेचे अन्य पुराणातील पर्याय आणि विस्तार, वेदोपनिषदे, षड्दर्शने, ज्योतिष, वैद्यक, संगीत, शिल्प, व्याकरण, कामशास्त्र, राज्यशास्त्र, स्थलमाहात्म्ये, काव्य नाटके, पूर्वकालीन संतांचे प्राकृत ग्रंथ, इत्यादि त्याच्या व्यासंगविषयांचा धांडोळा घेतल्याशिवाय दयार्णवाच्या पांडित्याचे पुरेसे आकलन होणार नाही.

(४) **दयार्णवांचें निरीक्षणहि** अत्यंत व्यापक आणि सूक्ष्म आहे. त्यानी केलेल्या भारतयात्राचें आणि लोकव्यवहार व निसर्ग यांच्या निरीक्षणाचे प्रतिबिंब हरिवरदेत जागोजाग उमटले आहे. ग्रंथाध्ययनातून स्फुरलेली वर्णनें आणि लोकव्यवहाराच्या व निसर्गाच्या निरीक्षणातून स्फुरलेली वर्णनें सूक्ष्म दृष्टीनें वेगळी करावयास हवीत.

(५) **हरिवरदेंतील स्वकालदर्शन** इतिहासज्ञांनाहि उद्‌बोधक ठरेल. सहेतुकपणें वा अहेतुकपणें हरिवरदेंत दयार्णवानी आपल्या काळाचें प्रतिबिंब उमटविले आहे. मुसलमानांच्या पाशवी अत्याचाराची आणि शिवछत्रपतीनी केलेल्या धर्मरक्षणाची उत्कट जाणीव दयार्णवाना होती, असे हरिवरदेवरून दिसते. शिवाय त्या वेळच्या धर्मकल्पना, देव-देवता, उपासना-प्रकार, जातीजमाती, व्यवसाय, अन्न-वस्त्रें, दागदागिने, इत्यादि नानाविध समाजागाची माहिती हरिवरदेंत प्रसंगाप्रसगांनी व्यक्त झालेली आहे. या माहितीचा धाडोळा सांस्कृतिक इतिहासाला विपुल सामग्री पुरव् शकेल

(६) **दयार्णवांचें तत्त्वज्ञान** आणि **दयार्णवांचा भागवत-धर्म** हे विषय तर हरिवरदेच्या अंतरंगाशीच संबद्ध आहेत. वर वर पाहतां पारपरिक पद्धतीचें वाटणारें दयार्णवाचे विवेचन सूक्ष्म अध्ययनाती अत्यंत मोलाचे वाट् लागेल. मराठी भागवतपरपरेला दयार्णवांसारख्या महापडितानें दिलेली ज्ञानाची बैसका किती दृढ आहे, याचे दर्शन घडतांच आपण आश्चर्यानें थक्क होऊं.

— या नानाविध अंगांनी हरिवरदेचें अध्ययन करण्या-साठी अभ्यासकांनी पुढें यावें, अशी माझी आग्रहाची विनंती आहे हें सर्व करण्यास मी अनेक कारणानी असमर्थ आहे. या उणिवाबद्दल वाचकाची क्षमा मागून, मी उत्तम श्लोकांच्या शब्दात इतकेंच म्हणेन की –

तयाचा सर्वोत्कर्ष वर्णाविया । अथवा सर्वोपचारें भजावया ।
असमर्थ मी हीन, वायां । हाव कासया वाढवूं ।।
म्हणौनि मौनेचि सप्रेम नमन । माझें तत्पदी असे अनन्य ।
नमनाऐसे साधन अन्य । नसे साद्‌गुण्य वर्णाविया ।।

–प्राकृत सप्तशती ५. ३७.

लोककल्याण',
७७ शनिवार, पुणे २.

रामचंद्र चिंतामण ढेरे

प्रकाशकाचें निवेदन

'हरिवरदा' या महाकाव्याचा आठवा आणि शेवटचा खंड प्रकाशित करतांना मनाला अननुभूत आनद होत आहे. या आनंदाला शब्दरूप देणे माझ्या सामर्थ्यापलीकडचे आहे अनेक वर्षे मनात योजलेला सकल्प कृष्णदयार्णवांच्या कृपेनें आणि आई-वडिलाच्या आशीर्वादानें आज सिद्धीस जात आहे. हरिवरदेसारखा श्रेष्ठ ग्रथ संपूर्ण प्रकाशित होणें वाङ्मयक्षेत्रात किती महत्त्वाचें आहे, याचें मोजमाप साहित्य-समीक्षक करतीलच. व्यक्तिश: ही घटना माझ्या आयुष्यात मात्र अत्यंत मोलाची आहे असें मी मानतों. प्रकाशन-क्षेत्रात प्रवेश केल्यापासून मी गेल्या पचवीस वर्षात अनेक लहान-मोठीं पुस्तकें प्रकाशित केली. मराठीतील नामवंत लेखकाच्या पुस्तकांचें प्रकाशन करण्याचीहि सधि मिळाली आणि त्या त्या वेळीं त्या प्रकाशनकार्याचा आनदहि मिळाला. पण 'हरिवरदे'च्या प्रकाशन-सांगतेमुळें मनांत सात्त्विक आनंदाच्या लहरी उठत आहेत. तसा अनुभव पूर्वी कधीच आला नव्हता. या प्रकाशनामागें कर्तव्यकर्माची फार मोठी प्रेरणा होती. तसेंच पूर्वजांचें अशत: का होईना, ऋण फेडण्याचीहि आत्यंतिक इच्छा होती. म्हणूनच या ग्रथपूर्तीमुळें या वेळचा आनंद आगळा आहे, असें मला वाटतें.

कृष्णदयार्णवांसारख्या थोर सतांच्या आणि सत्कवीच्या वंशांत आपला जन्म व्हावा, ही कोणालाहि खरोखरच अभिमान वाटण्यासारखी गोष्ट आहे. मलाहि तसें वाटत असल्यास त्यात अयोग्य असें कांही नाहीं. पण या अभिमानाला साजेशी, अशत का होईना, आपल्या हातून कृति घडावी, अशीहि इच्छा मनात वाटत होती या इच्छेचें मूळ अर्थातच माझे वडील कै. ती. रघुनाथराव कोपर्डेकर यानी दिलेल्या प्रोत्साहनांत आणि मातुश्री गं. भा. जानकीबाई यानीं केलेल्या मार्गदर्शनात आहे. प्रत्यक्ष ग्रथप्रकाशन करण्यामागें काहीं छोटया-मोठया घटना घडल्या, त्या येथें नमूद केल्या म्हणजे त्यांवरून वरील विधानाची साक्ष पटूं शकेल.

सतरा-अठरा वर्षांपूर्वीची गोष्ट. सांगलीकरांचे एक जुने कारभारी श्री. गो. कृ. देशपांडे यांची व माझ्या वडिलांची योगायोगानें कराड येथें भेट झाली. श्री. देशपाडे कांहीं कौटुंबिक कारणामुळें सांगलीहून निघून विमनस्क मन:स्थितीतच पंढरपूरला जाऊन राहिले होते. तेथें एका भगवद्भक्ताच्या सूचनेवरून त्यानी महाप्रयासाने 'हरिवरदा' ग्रथ मिळविला व त्याचें भक्तिपूर्वक वाचन-मनन केलें. त्यामुळें त्यांच्या मनाला अत्यत शांतता लाभली, असे त्यांनींच पुढें प्रत्यक्ष भेटीत सागितलें. तेव्हांपासून हा ग्रथ प्रकाशित करावा, अशी इच्छा त्यांच्या मनात उद्भवली. त्यानंतर जेव्हा माझ्या वडिलाची व त्याची भेट झाली, तेव्हां त्यांनी हा ग्रथप्रकाशनाचा विषय त्यांच्यापुढें माडला. वडिलांनी त्यांना माझ्याकडे पाठविले. माझ्याहि मनात या ग्रंथाच्या प्रकाशनासबंधी विचार घोळतच होते. पण एवढें मोठें कार्य पैशाच्या अभावी आपल्याला झेपणार नाही, असें वाटल्यावरून मनातील कल्पना तशीच राहिली होती. त्या कल्पनेला श्री. देशपाडे यांच्या भेटीमुळें पुन्हा एकदा चालना मिळाली. त्यापूर्वीचा एक लहानसा प्रसंगहि याच सदर्भात सांगणे आवश्यक आहे. प्रकाशनाच्या निमित्तानें माझी व पूज्य सानेगुरुजी याची भेट झाली. त्यांच्या 'स्त्री-जीवन' या पुस्तकाचा पहिला खड प्रकाशित केला, पण दुसऱ्या खडाला पैशाची अडचण पडली. त्या वेळी गुरुजीनीं म. म. द. वा. पोतदार याच्याकडे चिठ्ठी देऊन मला पाठविलें. म. म. पोतदारानीं माझें 'दयार्णव' हें नाव ऐकून कृष्णदयार्णवांचा व आमचा काही सबध आहे की काय, असें विचारलें त्या थोर पुरुषाच्या वशात जन्म घेण्याचा बहुमान मला लाभला आहे, असे त्याना मी सांगितल्यावर लगेच त्यानी 'हरिवरदे'च्या प्रकाशनासबधी सूचित केलें. तेव्हांपासूनच या ग्रंथाचें प्रकाशन आपल्या हातून व्हावें असे वाटूं लागले. त्यांतच वर उल्लेख केल्याप्रमाणें श्री. गो. कृ. देशपांडे यांनीहि तीच इच्छा माझ्यापाशी बोलून दाखविली. त्यानंतर थोड्याच दिवसानी माझे वडील व श्री. देशपांडे हे दोघेहि जवळजवळ लागोपाठच म्हणजे अनुक्रमें तारीख २२ ऑगस्ट १९४६ व ता. ९ सप्टेंबर १९४६ रोजी दिवंगत झाले हरिवरदा ग्रंथ प्रकाशित व्हावा, ही त्या दोघांचीहि इच्छा तशीच राहून गेली. माझ्याहि मनाला ती रुखरुख सतत वाटतच होती. म्हणून मी वडिलांच्या नंतर तेरा दिवसांतच 'हरिवरदेमधील वेंचे' या नांवाचें कै. देशपांडे यांनी संग्रहित केलेलें छोटेंसें पुस्तक प्रकाशित केलें. त्यामुळें मनाला थोडें समाधान वाटले हे खरें; तरीपण मनांतील

कृष्णदयार्णवकृत 'हरिवरदा' (खंड ८ वा)

अनुक्रमणिका

अध्याय	विषय	संस्कृत श्लोक	ओव्या	पृष्ठें
६६	पौण्ड्रक-काशीराज-वध	४३	३५४	१५३३-१५५०
६७	द्विविदवानर-वध	२७	१७२	१५५१-१५६०
६८	बलभद्रविजय, सांब-लक्ष्मणा-विवाह	५४	४२६	१५६१-१५८१
६९	षोडशसहस्रहरिलीलावलोकनलालसा नारदनिर्यापण	४५	४१८	१५८२-१६०२
७०	भगवदाह्निक-नृपग्लानिकथन-नारदागमन-युधिष्ठर-वृत्तान्त-विचारण	४७	४८५	१६०३-१६२६
७१	जरासधवध, नृपविमोक्षण, इंद्रप्रस्थे कृष्णागमन	४६	३६७	१६२७-१६४५
७२	जरासंधवध, नृपविमोक्षण, इंद्रप्रस्थे कृष्णागमन	४९	३३२	१६४६-१६६३
७३	जरासधवध, नृपविमोक्षण, इंद्रप्रस्थे कृष्णागमन	३५	३६८	१६६४-१६८१
७४	चैद्यवधादि-राजसूयकथन	५६	५१८	१६८२-१७०६
७५	राजसूयसमाप्ति, दुर्योधन-विषादकथन	४०	३८०	१७०७-१७२५
७६	शाल्वप्रद्युम्नसमरवर्णन	३३	२११	१७२६-१७३७
७७	शाल्ववध	३८	२७७	१७३८-१७५२
७८	वक्रदंत-विदूरथ-वध, रामहस्तेन सूतहनन	४०	२९१	१७५३-१७६७
७९	बल्वलवध, बलरामयात्रासमाप्ति	३४	२५१	१७६८-१७८०
८०	भगवद्ब्राह्मणसंवादे गुरुपरिचर्यानुस्मरण	४५	५९१	१७८१-१८०७
८१	पृथुकाख्यान (सुदामा)	४२	३०८	१८०८-१८२३
८२	सूर्योपरागतीर्थयात्रा-वृष्णिकुरुसंगमवर्णन	४८	३५०	१८२४-१८४१
८३	सूर्योपरागतीर्थयात्रा-वृष्णिकुरुसंगमवर्णन	४३	३६०	१८४२-१८६०
८४	कुरुक्षेत्रयात्रा, वसुदेवमखवर्णन, नंदवसुदेवसंवाद	७१	४७२	१८६१-१८८५
८५	वसुदेवकृतवासुदेवस्तवन, देवकीषट्पुत्रानयन	६०	४२८	१८८६-१९०७
८६	सुभद्राहरण, श्रुतदेवमैथिलानुग्रहकरण	५९	४५८	१९०८-१९३०
८७	वेदस्तुतिनिरूपण	५०	१५११	१९३१-१९९४
८८	हरिहरोभयशीलपरीक्षार्थ वृकासुरोपाख्यान	४०	६३३	१९९५-२०२२
८९	देवत्रयपरीक्षण, द्विजपुत्रानयन	६६	६६९	२०२३-२०५४
९०	श्रीकृष्णलीलाचरितकथा	५१	१०८६	२०५५-२१०६

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ६६ वा

श्रीकृष्णगोविन्दात्मने नमः । जें कां स्वगत भेदभान । प्रत्यगात्मत्वा अधिष्ठान । सर्व-साक्षित्वाचें वयुन । स्फुरे ज्याचेनि सन्मात्रें ॥१॥ त्या तुज नमो जी सन्मया । गोग्रवर्तका गोमयनिलया । श्रीगोविंदा गोगोप्रया । गोदोहका गोपाळा ॥२॥ तव पदपंकजध्यानयोगें । पांसष्टी अध्याय कथिले मागें । रविजा कर्षिली रेवतीरंगें । लीलाप्रसंगें गोपींच्या ॥३॥ तिये कथेचिया श्रवणीं । परीक्षिति अंतःकरणीं । प्रश्न विवरितां बादरायणि । जाणोनि कथनीं प्रवर्तला ॥४॥ म्हणाल कैसा कोण तो प्रश्न । करूं इच्छी नृपाचें मन । तरी व्रजीं क्रीडला संकर्षण । तंववरी श्रीकृष्ण काय करी ॥५॥ व्रजा गेलिया रेवतीकान्ता । द्वारकेमाजी श्रीकृष्ण असतां । तेथ वर्तली कैसी कथा । ते नृपनाथा प्रश्नेच्छा ॥६॥ हें जाणोनि शुक सर्वज्ञ । नृपें करावा आहेच प्रश्न । तया पूर्वीच तत्कथा-कथन । करितां झाला तें ऐका ॥७॥

नंदव्रजं गते रामे करूषाधिपतिर्नृप । वासुदेवोऽहमित्यज्ञो दूतं कृष्णाय प्राहिणोत् ॥१॥

राम गेलिया नंदव्रजा । मागें करूषदेशींचा राजा । वासुदेव मी ऐसिया वोजा । स्वकीय-प्रजांमाजी म्हणवी ॥८॥ आपण प्राकृत जीव अल्पज्ञ । असतां म्हणवी मी भगवान । षड्-गुणैश्वर्यें संपन्न । वाहे अभिमान मंदमति ॥९॥ द्वितीयपरार्धीं ब्रह्मयाचे । अष्टाविंसावे कलियुगीं साचें । जन्म होईल वासुदेवाचें । भविष्य मुनीचें जाणोनी ॥१०॥ द्वापारान्त कलियुगारंभ । ते संधींत पंकजनाभ । अवतरेल हा भविष्यगर्भ । जाणूनि दंभ रूढ करी ॥११॥ वासुदेव मी मूर्तिमंत । अवतरलों हें भूमंडळांत । प्रकट करूनि ऐसी मात । चिह्नें समस्त मिरवीतसे ॥१२॥ तंव येरीकडे

मथुरापुरीं । देवकीवसुदेवांचिये उदरीं । स्वयें अवतरोनियां श्रीहरि । वाढला घरीं नंदाचे ॥१३॥ पूतनेपासूनि कंसावधि । लीलेकरूनि दैत्यां वधी । कंस कैपक्षी मागधी । सेना समुद्रीं निर्दळिली ॥१४॥ पुढें कालयवनाभेणें । जलधीमाजी करूनि पेणें । द्वारकादुर्गी घालूनि ठाणें । केलीं कदनें दैत्यांचीं ॥१५॥ भूपतनया वरिल्या अष्ट । भौमसंगृहीता सहस्र द्वयष्ट । तत्प्रसंगें वधिले दुष्ट । महापापिष्ठ खळ कुटिळ ॥१६॥ प्रकटप्रतापें द्वारकाभुवनीं । त्रिजगज्जेता यादवगणीं । शङ्खचक्राब्जगदापाणि । कारुषें कर्णीं ऐकूनियां ॥१७॥ म्हणे मी वासुदेव अवतरलों । ऐसा लोकीं विख्यात झालों । कृष्णप्रतापें आच्छादिलों । धिक्कारिलों तैं नृपवर्गीं ॥१८॥ ऐसा कारुष क्षोभे मनीं । विशेष जनवार्ता ऐकूनी । प्रकट वासुदेव द्वारकाभुवनीं । नोकिती वचनीं नृप ऐसें ॥१९॥ कारुष कृत्रिम वाहे चिह्नें । वासुदेव या वृथाभिधानें । लोकांमाजी करी वल्गने । ऐसीं वचनें नृप वदती ॥२०॥ ऐसें ऐकोनि कर्णोपकर्णीं । कारुषें क्षोभोनि अंतःकरणीं । दूत प्रेरिला द्वारकाभुवनीं । आज्ञापूनी तें ऐका ॥२१॥

त्वं वासुदेवो भगवानतीर्णो जगत्पतिः । इति प्रस्तोभितो बालैर्मेन आत्मानमच्युतम् ॥२॥

दूता आज्ञापी कारुष दुष्ट । जाऊनि कृष्णातें सांगें स्पष्ट । बाळकीं खेळवितां तुज यथेष्ट । केली वटवट शब्दांची ॥२२॥ तूंचि वासुदेव श्रीभगवान । जगन्नायक जगज्जीवन । अवतरलासि होवोनि सगुण । धर्मस्थापन करावया ॥२३॥ ऐसिया बाळांच्या क्ष्वेळित गोष्टी । सत्य मानूनि आपुल्या पोटीं । स्वयें अच्युत हे चावटी । वृथा दिक्पटीं मिरविसी ॥२४॥ प्राकृतें अल्पकें पामरें । स्तोभितां गौरविती लेंकुरें । तैं रंजविती राजोपचारें । तें केंवि खरें मानावें ॥२५॥

दूतं च प्राहिणोन्मंदः कृष्णायाव्यक्तवर्त्मने । द्वारकायां यथा बालो नृपो बालकृतोऽबुधः ॥ ३ ॥

अबुध केवळ तूं वृष्णिकुळजा । बाळीं खेळांत केलासि राजा । श्रवणीं धरूनि त्याचि गुजा । न धरीं फुंजा विष्णुत्वें ॥ २६ ॥ घरोघरीं लेंकुराप्रति । इंद्रचंद्रत्वें गौरव देती । तैसा अबुधा अबुधीं नृपति । केलासि तो तूं दृढ न मनीं ॥ २७ ॥ इत्यादि वचनें सांगोनि दूता । निरोप धाडिला कृष्णनाथा । ज्या कृष्णाच्या अव्यक्तपथा । नेणोनि पुरता मूर्खत्वें ॥२८॥ कृष्ण त्रिजगाचा गोंसावी । विधि हर अमरेन्द्र नेणती पदवी । अव्यक्तवर्त्मा ऐसिया नांवीं । ज्या कारणें संबोधिती ॥२९॥ असो सर्पाचें आयुष्य खुंटे । तैं तो लागे पाणधीवाटे । मुंगियेसी पक्ष फुटे । कीं बस्त वेंठे वृककदना ॥३०॥ नेणोनियां श्रीकृष्णमहिमा । द्वेषावेश कारुषा अधमा । दूत धाडूनि पुरुषोत्तमा । मरणधर्मा वश्य झाला ॥३१॥ असो तो दूत द्वारकेप्रति । जाऊनि भटला श्रीपती । कोण्या प्रकारीं केली विनती । कुरुभूपति तें ऐक ॥३२॥

दूतस्तु द्वारकामेत्य सभायामास्थितं प्रभुम् । कृष्णं कमलपत्राक्षं राजसंदेशमब्रवीत् ॥४॥

द्वारकेप्रति जाऊनि दूत । सभास्थानीं श्रीकृष्णनाथ । बैसला असतां द्वास्थीं मात । कथिली

यथोक्त दूताची ॥३३॥ मग प्रभूची घेऊनि आज्ञा । द्वारस्थीं दूत सभास्थाना । आणिला तेणें वंदूनि चरणां । संदेशकथना आदरिलें ॥३४॥ कमलपत्रायताक्ष हरि । त्यातें दूत निवेदन करी । कारुषनृपाची वैखरी । ज्या ज्या परी वदली तें ॥३५॥ दूतें वंदूनि त्रैलोक्यजनका । कारुषसंदेश मम मुखें ऐका । मजवरी दूषण ठेवूं नका । संदेशहारका जाणोनी ॥३६॥ ऐकोनि दूताची विनवणी । सुप्रसन्न चक्रपाणि । शंका सांडूनि कारुषवाणी । आमुच्या कर्णीं घालीं म्हणे ॥३७॥ यावरी दूत कारुषाचे । संदेश कथिता झाला वाचे । सावध सदस्य कुरुनृपाचे । जे परिसती तें ऐका ॥३८॥

वासुदेवोऽवतीर्णोऽहमेक एव न चापरः ॥ भूतानामनुकंपार्थं त्वं तु मिथ्याऽभिधां त्यज ॥ ५ ॥

मी एक वासुदेव साचार । भूतकृपस्तवे अवतार । धरूनि झालोंसें साकार । कैंचा अपर मजहूनी ॥३९॥ मजहूनि वासुदेव त्रिजगीं दुसरा । नाहींच ऐसिया दृढ निर्धारा । जाणोनि मम नाम त्यजीं त्वरा । मिथ्या अहंकारा न धरूनी ॥४०॥ मिथ्या मम नाम वागविसी । कीं वांचावयाची आस धरिसी । दोहीं परी ममाज्ञेसी । सावध परियेसीं सात्वता ॥४१॥

यानि त्वमस्मच्चिह्नानि मौढ्याद्बभिर्षी सात्वत । त्यक्त्वैहि मां त्वं शरणं नो चेद्देहि ममाहवम् ॥६॥

मूढत्वास्तव माझीं चिह्नें । शङ्खचक्राब्ज कौस्तुभाभरणें । जितुकीं न कळनि तुवां धरणें । जीवां वांचवणें त्यजूनी ॥४२॥ चिह्नें टाकूनि मातें शरण । येऊनि चुकवीं आपुलें मरण । गर्व धरिसी तरी तूं रण । देईं निर्घृण मम समरीं ॥४३॥ स्त्रिया मेळविलिया बहुसाळा । त्यांचें सौभाग्य रक्षीं कुशळा । शरण होऊनि मज चिरकाळ । विचरें प्राज्ञळ भूलोकीं ॥४४॥ अथवा मरणाचे डोहळे । झाले असती प्रेरिल्या काळें । तरी तूं मजसीं गर्वबळें । येऊनि मिसळें समरंगी ॥४५॥ ऐसी द्विविध आज्ञा माझी । वंदूनि भजें आवडत्या काजीं । ऐसी दूतें यदुसमाजीं । कारुषवाणी निवेदिली ॥४६॥ दूतमुखें हे कारुषवाणी । यादवीं ऐकूनि सभास्थानीं । पुढें केली जैसी करणी । तेहि श्रवणीं अवधारा ॥४७॥

श्रीशुक उवाच । कत्थनं तदुपाकर्ण्य पौंड्रकस्याल्पमेधसः । उग्रसेनादयः सभ्या उच्चकैर्जहसुस्तदा ॥७॥

शुक म्हणे गा कुरुपुङ्गवा । उग्रसेनादिकां यादवां । ऐकतां पौण्ड्रकोक्ति सर्वा । काथिल्या अपूर्वा ज्या दूतें ॥४८॥ मंदमति जो अल्पमेधस । तया पौण्ड्रकाचे संदेश । ऐकोनि दूतमुखें अशेष । यादवां विशेष स्मय गमला ॥४९॥ सभ्यांसाहित उग्रसेन । पौण्ड्रकाचें विकत्थन । हांसते झाले होतां श्रवण । उच्च दशन प्रकाशुनी ॥ ५० ॥ म्हणती अभिनव ऐकिली मात । मृगेन्द्र समरा आमंत्री बस्त । मत्कुण मानूनि रावण अल्प । युद्धा काकुत्स्थ पाचारी ॥५१॥ मशक मेरूतें आंगवणे । थडकूनि गगनीं उडवीन म्हणे । कीं काळकूटाचे आरोगणे । भणगें बैसणें पाराणिया ॥५२॥ किंवा मुंगीस निघाले पांख । कीं पक्व झालें कदलीपीक । कीं संतानवृद्धीचा मानूनि हारिख । वृश्चिकी तोक धरी जठरीं ॥५३॥ तेंवि

पौण्ड्रकाची आयुष्यगणना । पुरली म्हणोनि हे विकत्थना । दूतद्वारा प्रेरूनि कृष्णा । समरांगणा आमंत्रिलें ॥५४॥ ऐसे समस्त सभास्थानीं । यादव श्मश्रु स्पर्शूनि पाणि । वदते झाले तें ऐकुनी । दूतांलागोनि हरि बोले ॥५५॥

उवाच दूतं भगवान्परिहासकथामनु । उत्स्रक्ष्ये मूढ चिह्नानि यैस्त्वमेवं विकत्थसे ॥ ८ ॥

ऐकोनि दूतोक्तिप्रसंग । देखोनि यदुचक्राचा रंग । बोलता झाला कमलारंग । दूता अमोघ प्रतिवचनें ॥५६॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न । तो दूतातें बोले वचन । पौण्ड्रकोक्ति उपहासून । श्रीभगवान जगज्जेता ॥५७॥ दूताप्रति म्हणे हरि । माझें प्रत्युत्तर अवधारीं । तैसेंचि पौण्ड्रका निवेदन करीं । तो मग तुजवरी न क्षोभे ॥५८॥ अरे पौंड्रका मूढमति । ज्या चिह्नांची तुजला खंती । तुझ्या ठायीं तियें निगुती । मी निश्चिती प्रेरीन ॥५९॥ जया चिह्नांसीं विकत्थना । करूं पाहसी आंगवणा । त्यांच्या ठायीं समरांगणा । माजी ग्रहणा प्रवर्ते ॥६०॥ अथवा अब्जदरारिकौमोदकी । कृत्रिम चिह्नीं कौस्तुभादिकीं । वासुदेव म्हणविसी लोकीं । तीं मी निकीं सांडवीन ॥६१॥ शरण येऊनि वांचवीं प्राण । ऐसें सांगूनि धाडिलें वचन । त्याचें प्रत्युत्तर हें जाण । करीं श्रवण दूतमुखें ॥६२॥

मुखं तदपिधायाज्ञ कंकगृध्रवटैर्वृतः ॥ शयिष्यसे हतस्तत्र भविता शरणं शुनाम् ॥ ९ ॥

शरण होऊनि वांचवीं प्राणा । केली ज्या मुखें हे वल्गना । आच्छादूनियां तया वदना । करिसी शयना जे समयीं ॥६३॥ पक्षी वटादि गृध्र कंक । श्येन वायस मांसभक्षक । तुण्डें तोडिती श्रवण नाक । अवयव सम्यक विदारिती ॥६४॥ तये समयीं शृगाल श्वान । त्यांतें होऊनि ठासी शरण । तुझिये पिशिताश्रयें जाण । प्राणतर्पण ते करिती ॥६५॥ कृष्णें ऐसिया प्रत्युत्तरें । दूत फिरूनि धाडिला त्वरें । पुढें वर्तलें तें कुरुवरें । अत्यादरें परिसावें ॥६६॥

इति दूतस्तदाक्षेपं स्वामिने सर्वमाहरत् । कृष्णोऽपि रथमास्थाय काशीमुपजगाम ह ॥१०॥

कृष्णापाशानि परतला दूत । कारुपा येऊनि भेटला त्वरित । प्रत्युत्तर जें भगवदुक्त । तें समस्त निवेदिलें ॥६७॥ दूत म्हणे जी करुणपति । कृष्णसभेसि तुमच्या उक्ति । निवेदिल्या त्या ऐकुनि चित्तीं । बालिशमतीसम गमिल्या ॥६८॥ मम मुखें तुमचीं आज्ञावचनें । यादवीं ऐकिलीं जेव्हां श्रवणें । उपेक्षिलीं तीं हास्यवदनें । सागर तृणें जोंवि त्यजी ॥६९॥ कृष्णें दिधलें प्रत्युत्तर । ममायुधांचा मानिसी भार । तरी तियें टाकीन तुजसमोर । घेईं सादर होत्साता ॥७०॥ शरण येईं मातें म्हणसी । तो तूं श्वानशृगाला शरण होसी । कंक गृध्र वट बैसोनि शिरीं । मांसकवळासी जै घेती ॥७१॥ इत्यादि निष्ठुरीं प्रत्युत्तरीं । मातें विसर्जूनियां हरि । रथ सज्जूनि अंतकापरी । येतो समरीं जिणावया ॥७२॥ दूतें ऐसी पौण्ड्रकाप्रति । कथिली कृष्णाची प्रत्युक्ति । तंव येरीकडे कमलापति । करी प्रवृत्ति समराची ॥ ७३ ॥

दारुका पाचारूनियां हरि । म्हणे रहंवर सज्ज करीं । जाणें आहे पौण्ड्रकावरी । आयुधें समरीं टाकावया ॥ ७४ ॥ आज्ञा देतां कृष्णनाथ । दारुकें सज्ज केला रथ । वरी बैसोनि कमलाकान्त । काशीप्रान्त आक्रमिला ॥ ७५ ॥ कारुषसमरा केली स्वारी । तरी कां ठाकिली काशीपुरी । ऐसी शङ्का कीजेल चतुरीं । तेंही निर्धारीं परिसावें ॥ ७६ ॥ कारुष काशीपतीचा मित्र । दोघीं मिळोनि रचिला मंत्र । यालागीं पौण्ड्रकें काशीपुर । होतें निरंतर अधिष्ठिलें ॥ ७७ ॥ हें जाणोनि पंकजपाणि । आला काशीपुरा ठाकूनी । पौण्ड्रकें वार्ता ऐकूनि कानीं । केली करणी तें ऐका ॥ ७८ ॥

पौण्ड्रकोऽपि तदुद्योगमुपलभ्य महारथः । अक्षौहिणीभ्यां संयुक्तो निश्चक्राम पुराद्द्रुतम् ॥११॥

आपण द्वारके धाडूनि दूत । कृष्णसंग्राम आणिला उदित । ऐसें देखोनि उद्योगवंत । झाला त्वरित पौण्ड्रक तो ॥७९॥ रथियांमाजी महारथ । कारुष महावीर विख्यात । दोनी अक्षौहिणींसहित । समरा त्वरित निघाला ॥८०॥ पुरापासूनि बाहेरी । द्वय अक्षोहिणी दळभारीं । निघाला विद्युल्लतेचे परी । प्रतापगजरीं वाद्यांच्या ॥८१॥ छत्रें चामरें निशाणें । ध्वज पताका आतपत्राणें । महावीरांचीं आस्फोटनें । सिंहनाद किड्काळिया ॥८२॥ मदें मातले कुंजर । गर्जना करिती भयंकर । अश्वहेषितें परम क्रूर । करिती केकार रथनेमि ॥८३॥ प्रतापें झणाणिल्या गजभेरी । अपरा क्रमेळपृष्ठीवरी । अश्वढके ठोकिती गजरीं । अम्बर रणतुरीं कोंदलें ॥८४॥ पणव टिविटिवीं तिडिमिडी । शृंगें बुरगें बांकें त्रिमोडी । शंख भेरी काहळा डफडीं । कडोविकडी मृदंग ॥८५॥ ताळ घोळ चंग वीणा । वाजताती रणप्रवीणा । वीरश्रीद्योतक वाद्यें नाना । वाजतां सेना मातली ॥ ८६ ॥ ग्रीष्मकाळींचे मेघ उठावे । तैसे वीर दाविती यावे । यंत्रध्वनींच्या भयानक रवें । कांपे आघवें भूचक्र ॥८७॥

तस्य काशीपतिर्मित्रं पार्ष्णिग्राहोऽन्वयान्नृप । अक्षौहिणीभिस्तीसृभिरपश्यत्पौण्ड्रकं हरिः ॥१२॥

प्रबळवाहिनीवेष्टित भंवती । कारुषें ठाकिली समरक्षिति । तयाचा मित्र काशीपति । तत्पक्षपातीं निघाला ॥८८॥ तीन अक्षौहिणी दळ । काशीपतीचें महाप्रबळ । पृष्ठभागीं रक्षणशीळ । झाला केवळ पौण्ड्रक तो ॥८९॥ द्व्यक्षौहिणी कारुषी सेना । तदर्ध काशीपतीची पृतना । एवं त्र्यक्षौहिणीगणना । एक व्याख्याना या करिती ॥९०॥ एवं ऐसा वेष्टितचमू । पौण्ड्रकातें पुरुषोत्तमु । आयुधें आभरणेंही कृत्रिम । देखता झाला तें ऐका ॥९१॥

शङ्खार्यसिगदाशार्ङ्गश्रीवत्साद्युपलक्षितम् । बिभ्राणं कौस्तुभमणिं वनमालाविभूषितम् ॥१३॥
कौशेयवाससी पीते वसानं गरुडध्वजम् । अमूल्यमौल्याभरणं स्फुरन्मकरकुण्डलम् ॥१४॥

कृत्रिम शंख पाञ्चजन्य । अरि म्हणिजे सुदर्शन । नंदकनामा जो कृपाण । असि म्हणूनि बोलिला ॥९२॥ शार्ङ्ग कोदंड कौमोदकी गदा । इत्यादि कृत्रिम वैष्णवायुधां । कौस्तुभ ललाम भृगूच्या

पदा । मिरवी सर्वदा हृत्कमळीं ॥९३॥ माळा आपाद वैजयंती । वनमाळादि चिह्नें समस्तीं । मंडित देखे कारुषाप्रति । स्वयें श्रीपति समरंगीं ॥९४॥ कौशय परिधान पीताम्बर । उत्तरीय केला अपर । ध्वजीं रेखिला विनताकुमर । कुण्डलें मकराकृति घडणी ॥९५॥ अमूल्य मोलागळीं आभरणें । मुकुट मुद्रिका करकंकणें । केयूराङ्गदें पदभूषणें । मेखळे खेवणें रत्नांचें ॥९६॥ इत्यादि कृत्रिमाभरणायुधीं । पौण्ड्रकातें कैवल्यनिधि । सम्मुख देखोनियां युद्धीं । हांसे त्रिशुद्धि घनघोषें ॥९७॥

दृष्ट्वा तमात्मनस्तुल्यवेषं कृत्रिममास्थितम् । यथा नटं रंगगतं विजहास भृशं हरिः ॥१५॥

आपुली प्रतिभा जैसी अपर । तैसा कृत्रिम वेष समग्र । बाणला ऐशातें श्रीधर । देखोनि गंभीर हांसतसे ॥९८॥ रंगामाजी यथासांग । नाटकी नटोनि दावी सोंग । विडम्ब आपणातुल्य अव्यंग । देखोनि श्रीरंग हास्य करी ॥९९॥ ऐसा समरीं पौण्ड्रकाप्रति । आत्मतुल्य कृत्रिमाकृति । पाहोनि हांसिला श्रीपति । स्फुरिला निगुती मग शंख ॥१००॥ पाञ्चजन्याची गर्जना । ऐकोनि क्षोभली पौण्ड्रकसेना । घ्या घ्या म्हणती हाणा हाणा । शस्त्रें खणखणा प्रेरिती ते ॥१॥ कैसीं शस्त्रें कोणे रीती । अरिवर्ग हरीतें हाणिती । तें तूं ऐकें परीक्षिति । म्हणे सुमति शुक वक्ता ॥२॥

शूलैर्गदाभिः परिघैः शक्त्यृष्टिप्रासतोमरैः । असिभिः पट्टिशैर्बाणैः प्राहरन्नरयो हरिम् ॥१६॥

एके रथीं पंकजपाणि । काशीपति पौण्ड्रक दोन्ही । सेना पंच अक्षौहिणी । हरीतें वेष्टूनि अरि भिडती ॥३॥ एक हृदयीं खोंचिती शूळ । गदाघातें भेदिती मौळ । परिघप्रहारें वक्षःस्थळ । परिघकुशळ हाणूं पाहती ॥४॥ एक शक्ति हाणिती निकरें । एक ऋष्टिनामकें शस्त्र । एक भेदिती प्रासप्रहारें । एक तोमरें मेळविती ॥५॥ एक ते खड्गखेटकपाणी । कृष्णा पाचारिती रणीं । एक धनुर्धर विंधिती बाणीं । समराङ्गणीं अरिवर्ग ॥६॥ एक ते पठ्ठे बिरुदाइत । पादचारी प्रतापवंत । अश्वसारथियांचा घात । अस्कमात करूं पाहती ॥७॥ जे कां महारथी अतिरथी । बिरुदें बाडिवारें मिरविती । अस्त्रें शस्त्रें ते प्रेरिती । मंत्रशक्ति प्रकटूनी ॥८॥ मेघ वर्षती प्रबळधारीं । तेणें झांकोळे जेंवि गिरि । तेंवि वीरांच्या शस्त्रमारीं । न दिसे हरिरथकेतु ॥९॥ चहूंकडूनि शस्त्रास्त्रमार । होतां देखोनि शार्ङ्गधर । शिञ्जिनी वाहूनि सत्वर । टणत्कारिलें कोदण्ड ॥११०॥ बाणीं भंगूनि शस्त्रास्त्रघना । पौण्ड्रककाशीराजाच्या सेना । मर्दिता झाला तें कुरुरत्ना । सदस्यगणासह परिसें ॥११॥

कृष्णस्तु तत्पौण्ड्रककाशिराजयोर्बलं गजस्यंदनवाजिपत्तिमत् ।
गदासिचक्रेषुभिरार्दयद्भृशं यथा युगांते हुतभुक्पृथक्प्रजाः ॥१७॥

दिव्यायुधें प्ररूनि हरि ॥ उभय सेना मारिल्या समरीं । जैसा प्रजांतें पृथगाकारीं । पावक संहरी प्रळयान्तीं ॥१२॥ धनुर्विद्याप्रवीण योद्धे । मार्गणीं संहारिले क्षणार्धें । भंवते प्रेरितीं शस्त्रें विविधें ।

चक्रायुधें ते वधिलें ॥१३॥ गज भंगिलें गदाप्रहारीं । अश्वसादी नंदकधारीं । रथी मारिले तीक्ष्णशरीं । केले चकचुरीं पदाति ॥ १४ ॥ शार्ङ्गानिर्मुक्तबाणवृष्टि । होतां सकंप हर परमेष्ठी । म्हणती प्रळय पावली सृष्टि । कूर्में पृष्ठी कांपविली ॥१५॥ थरारिला ब्रह्माण्डगोळ । अमर मानिती प्रळयकाळ । संहाररुद्राचा नेत्रानळ । गमे प्रज्वळला जनदहना ॥ १६ ॥ ऐसिये शरवृष्टीतळवटीं । उभय कटकां केली आटी । तया रणरंगाची गोठी । शुक वाक्पुटीं वाखाणी ॥ १७ ॥

आयोधनं तद्रथवाजिकुंजरद्विपत्खरोष्ट्रैररिणाऽवखंडितैः ।
बभौ चितं मोदवहं मनस्विनामाक्रीडनं भूतपतेरिवोल्बणम् ॥ १८ ॥

वीरश्रीरंग बाणला आंगीं । तेणें रणरंगीं शार्ङ्गी । चतुरंगिणी भंगूनि वेगीं । केले भूभागीं प्रतनिचय ॥ १८ ॥ संग्रामभूमीचें मंडळ । आयोधन नामें बोलती कुशळ । तें ते काळीं प्रेतबहळ । जालें गोपाळकरचक्रें ॥ १९ ॥ चक्रप्रहारें चतुरंगिणी । गजरथखरोष्ट्र विखंडूनी । पडिले तत्प्रेतीं ते धरणी । व्याप्त होऊनि विराजली ॥१२०॥ क्रमेळ पदाति अश्वसादी । चक्रें खंडित अवयवसंधी । पडिले त्यांचीं मांसें गीधीं । खंडिजेताती उत्साहें ॥ २१ ॥ मनस्वी जे वीरश्रीवंत । ते ते स्थानीं आनन्दभरित । शस्त्रास्त्र यानें हय रथ गज । परमपुरुषार्थ वरिताती ॥२२॥ सायुज्यमुक्तीसहित चारी । जेहीं नोवऱ्या वरिल्या समरीं । ते ते कृष्णचक्राच्या प्रहारीं । उत्साहगजरीं विराजती ॥ २३ ॥ येर पामरें पडिलीं क्षिती । आईबाधनकामिनींतें स्मरती । प्रपंचयोगें आक्रंदती । तोंडीं माती पडिल्याही ॥२४॥ अवयव जाले खंडविखंड । तथापि वांचवावया पिण्ड । करिती केवीलवाणें तोण्ड । ग्लानि उदण्ड भाकूनि ॥ २५ ॥ म्हणती नेणती बाईल घरीं । टाकूनि कोठें पातलों समरीं । येथें पडलिया चक्रप्रहारीं । प्रियतम अंतुरी अन्तरली ॥ २६ ॥ एक म्हणती लेंकुरें तान्हीं । भोळी बापुडी कामिनी । अक्षम त्यांचे संगोपनीं । जाली विघडणी मज त्यांची ॥ २७ ॥ एक म्हणती ठेविलें धन । त्याचें कोणा न केलें कथन । माझे समरीं गेलिया प्राण । सांगेल कोण स्त्रीपुत्रां ॥ २८ ॥ एक स्मरती रिणायितां । पाशीं गुंतूनि राहिल्या अर्था । आठवूनि हृदयांमाजी खतां । प्राण तत्वता विसर्जिती ॥२९॥ एक म्हणती वृत्तीसाठीं । व्यवहारीं शत्रूंचीं मुखवटीं । स्तंभिलीं ते मज मेलिया पाठीं । जेवितीं ताटीं दूधभात ॥१३०॥ पुरुषार्थसाधक रणप्रवीण । वीरश्रीवल्लभ मनस्विमान्य । उभयलोकीं धन्य धन्य । जितां मरतां म्हणविती जे ॥ ३१ ॥ नरदेह केवळ हे रणमही । चक्रायुधाच्या चिन्तनघाईं । पडिल्या कैवल्य जोडिलें तिहीं । प्रपंचप्रवाहीं भवभणगें ॥ ३२ ॥ असो ऐसें तें आयोधन । जें कां समरमहीचें स्थान । भूतपतीचें क्रीडासदन । तेंवि उल्बण विराजलें ॥ ३३ ॥ कोण म्हणाल भूतपति । भूतग्रासक जो कल्पान्तीं । प्रलयरुद्र ज्यातें म्हणती । श्मशानक्षितीमाजि वसता ॥ ३४ ॥ भूतग्रासें आनन्दपूर्ण । त्याचें जैसें क्रीडाभुवन । तयासारिखें समरस्थान । शोभायमान विराजलें ॥ ३५ ॥ असो उभय सेनेची कथा । पुढें पौण्ड्रका कृष्णनाथा । समरीं भाषण झालें मिथा । तें कुरुनाथा अवधारीं ॥ ३६ ॥

अथाऽऽह पौण्ड्रकं शौरिर्भो भो पौड्रक यद्भवान् । दूतवाक्येन मामाह तान्यस्त्राण्युत्सृजामि ते ।। १९ ।।

सैन्य मारूनियां समस्त । सम्मुख पौण्ड्रकाचा रथ । एक्या रथेंसी कृष्णनाथ । देखूनि वदत तयाप्रति ।। ३७ ।। उभय सेना भंगलियावरी । भो भो पौण्ड्रका म्हणे हरि । दूत धाडूनि द्वारकापुरीं । मज ज्या उत्तरीं वदलासी ।। ३८ ।। तियें हीं ममायुधें तुजप्रति । मी निक्षेपितों समरक्षिती । त्यांच्या लाभें निजविश्रान्ती । भोगीं पुरती भवनाशें ।। ३९ ।।

त्याजयिष्येऽभिधानं मे यत्त्वयाज्ञ मृषा धृतम् । व्रजामि शरणं तेऽद्य यदि नेच्छामि संयुगम् ।। २० ।।

आणि माझें नाम त्वां वृथा धरिलें । तें मी टाकवीन ऐसें कथिलें । तेंचि येथूनि सत्य झालें । जें दुसरें खंडलें अभिधान ।।१४०।। जरी तुज न देववे मजसीं रण । तरी मज सत्वर येईं शरण । ऐसें ऐकोनि तुझें वचन । आलों तीक्ष्ण वेगेंसी ।। ४१ ।। तुजसीं समर न करवे मातें । तरी आजि शरण येईन तूतें । ऐसें बोलोनि रुक्मिणीकान्तें । शर शार्ङ्गातें सज्जिला ।। ४२ ।।

इति क्षिप्त्वा शितैर्बाणैर्विरथीकृत्य पौण्ड्रकम् । शिरोऽवृश्चद्रथांगेन वज्रेणेंद्रो यथा गिरेः ।। २१ ।।

अरे पौण्ड्रका अचागळी । बोलूनि दूत कुशस्थळीं । धाडिला त्याचें फळ ये काळीं । घ्यावया बळी हो समरीं ।। ४३ ।। इत्यादि त्याचि पूर्ववचनीं । पौण्ड्रकातें निखंदूनी । समरीं बोलोनि चक्रपाणी । भंगिला बाणीं रथ त्याचा ।। ४४ ।। बाणीं मारिले अश्व चारी । सारथि उडविला अंबरीं । ध्वज तोडिला वरिच्यावरी । फोडिली शरीं रथचक्रें ।। ४५ ।। समरीं पौण्ड्रक विरथ केला । आंगींचा गर्व भंगोनि गेला । कृष्णें प्रेरूनि स्वचक्राला । मस्तक नेला छेदूनी ।। ४६ ।। जैसा इंद्र वज्रघातें । गिरिशृंग भंगी अवचितें । तेंवि पौण्ड्रकमस्तकातें । चक्रें अनंतें खंडियेलें ।। ४७ ।। पौण्ड्रकाचें छेदिलें शिर । समरीं उरला काशीश्वर । त्यावरी लोटूनि रहंवर । केलें विचित्र तें ऐका ।। ४८ ।।

तथा काशिपतेः कायाच्छिर उत्कृत्य पत्रिभिः । न्यपातयत्काशिपुर्यांपद्मकोशमिवानिलः ।। २२ ।।

शार्ङ्ग सज्जूनि वामकरीं । बाण काढिला कंकपत्री । शिर छेदुनि वरिच्यावरी । काशीपुरीं पाठविलें ।। ४९ ।। जैसी सहस्रदळकमलकळा । उठे झगडतां प्रबळ अनिळा । अकस्मात अंतराळा । माजूनि भूतळावरी पडे ।। १५० ।। तेंवि काशीश्वराचें शिर । पावलें काशीपुरीचें द्वार । पडतां देखूनि चमत्कार । मानिती समग्र पुरवासी ।। ५१ ।। येरीकडे चक्रपाणि । पौण्ड्रक काशीपती दोन्ही । मत्सरी मारूनि द्वारकाभुवनीं । विजयी होवोनि प्रवेशला ।। ५२ ।।

एवं मत्सरिणं हत्वा पौण्ड्रकं ससखं हरिः । द्वारकामाविशत्सिद्धैर्गीयमानकथामृतः ।। २३ ।।

विजयवीर श्रीचिया कथा । मधुरा पावनसम अमृता । सिद्ध वर्णिती त्या ऐकतां । जीव

भवपथा निस्तरती ॥५३ ॥ ऐसिया प्रकारें गरुडध्वज । शत्रु मारुनि प्रतापपुंज । विजयवीरश्री वरूनि भाज । पातला सहज निज नगरा ॥ ५४ ॥ सभास्थानीं उग्रसेन । यादववृद्ध वरिष्ठ मान्य । नमिले अपर जे सामान्य । तिहीं भगवान वंदिला ॥ ५५ ॥ दारुकें रहंवर स्यंदनशाळे । नेऊनि तुरंग मुक्त केले । मंदुर शाळेमाजी लाविले । मग फेडिलें कवचातें ॥ ५६ ॥ कोटीर कवच कटिबंधनें । विविधें आयुधें गोधात्राणें । विसर्जूनियां जनार्दनें । केलीं नमनें जननियातें ॥ ५७ ॥ रामप्रमुख सभास्थानीं । बैसला ऐकूनि चक्रपाणि । भेटती पुरवासी येऊनि । विजय परिसोनि उल्लासें ॥ ५८ ॥ इतुकें परिसोनि भगवद्यश । शुकातें पुसे कुरुनरेश । कवण गति पौंड्रकास । स्वामी आम्हांस तें सांगा ॥५९॥ शुक म्हणे गा कुरुवरिष्ठा । भगवद्ध्यानीं ज्यांची निष्ठा । हो कां मत्सरी अथवा द्वेष्टा । परि त्या प्रतिष्ठा हरिरूपीं ॥ १६० ॥

स नित्यं भगवद्ध्यानप्रध्वस्ताखिलबंधनः । बिभ्राणश्च हरे राजन्स्वरूप तन्मयोऽभवत् ॥ २४ ॥

तो पौंड्रक जीवें जितां । वाहे कृष्णाची स्वरूपता । द्वेषें अजस्र ध्यान करितां । झाला तत्वता कृष्णमय ॥ ६१ ॥ ध्यानें अखिल बन्धनें तुटलीं । वृत्ती हरिरूपीं नेहटली । सहज स्वरूपता मुक्ति घटली । तेही आटली सायुज्यीं ॥ ६२ ॥ द्वेषें वैरें मित्रें भजनें । अंतर वेधितां श्रीकृष्णध्यानें । प्रध्वस्त होतील अखिल बन्धनें । संतीं ये खुणे जाणावे ॥ ६३ ॥ यालागीं गावे हरीचे गुण । हरिचरित्रें करावीं श्रवण । सदैव करावें हरीचें ध्यान । अनुसंधान न तुटावें ॥ ६४ ॥ मानस नेहटावें हरिभजनीं । काळ क्रमावा हरिचिन्तनीं । वसती करावी भगवज्जनीं । दिवसरजनीं हरिप्रेमें ॥ ६५ ॥ सर्वभूतीं श्रीभगवान्न । अभेद लक्षूनि चैतन्यघन । जनीं वनीं विजनीं जनार्दन । भजतां उन्मन मन होय ॥ ६६ ॥ वत्स धेनूचें करी ध्यान । बाळका मातेचें चिन्तन । ऐसिया प्रेमें जडतां मन । प्रवृत्तिभान मग विसरे ॥ ६७ ॥ अर्चन वंदन दास्य सख्य । सर्व भजनांसी प्रेमा मुख्य ॥ प्रेमें सेवितां पुराणपुरुष । बंधनें अशेष मग तुटती ॥ ६८ ॥ परावर जो परमेश्वर । होतां तयाचा साक्षात्कार । हृदयग्रंथी जे दृढतर । लिंगशरीर जिये म्हणती ॥ ६९ ॥ तेव्हां तियेचा होय भेद । अनुभविलिया अपरोक्षबोध । सहज सर्व संशया छेद । कर्मा उच्छेद अनायासीं ॥ १७० ॥ चरमदशा जियेतें म्हणती ॥ ते संपादे ऐसिये रीती । जितां मरतां सायुज्यमुक्ति । स्वरूपस्थिति ते ऐसी ॥ ७१ ॥ रांडा पोरें गुरें-वासुरें ॥ धनधान्याच्या स्वार्थसुभरें । जागृतीं स्वप्नीं वृत्ति वावरे । वांचे मरे ते ध्यासें ॥ ७२ ॥ तो नर निरयाचा पाहुणा । वरपडा होय जन्ममरणा । तापत्रयाचा अंकणा । योनि नाना परिभ्रमे ॥ ७३ ॥ एके योनीपासोनि जन्मे । अनेक योनि चिंती कामें । त्यामाजी फावल्या तितुकिया रमे । इंद्रियप्रेमें सुख मानी ॥ ७४ ॥ आपण होऊनि देहमात्र । ममत्वें कवळी कलत्र पुत्र । केवळ भ्रमाचें होवोनि पात्र । वृत्ति क्षेत्र संपादी ॥ ७५ ॥ जेव्हां देह पंचत्व लाहे । तैं हें मृषा होवोनि राहे । परंतु त्याचा अध्यास वाहे ॥ जन्मविताहे पुढतीं तो ॥ ७६ ॥ जयासीं

अन्तीं जैसी मति । तया तैसीच होय गति । ऐसें विवरिलें सांख्यमतीं । अन्यथा श्रुति ते नोहे ॥ ७७ ॥ यालागीं मुमुक्षु विरक्त होती । भगवद्भजनीं प्रेमा धरिती । त्यांची अजस्र सत्प्रवृत्ति । कैवल्यप्राप्तिप्रद होय ॥ ७८ ॥ यावज्जन्म सेविला हरि । अन्तीं प्रकटे तो अंतरीं । बुडों नेदी भवसागरीं । स्वजन तारी सप्रेमें ॥ ७९ ॥ असो पौण्ड्रका ऐसी गति । कृष्णद्वेषें झाली अंतीं । यावरी ऐकें परीक्षिति । काशीपतीकडील कथा ॥ १८० ॥

शिरः पतितमालोक्य राजद्वारे सकुण्डलम् । किमिदं कस्य वा वक्त्रमिति संशयिरे जनाः ॥ २५ ॥

काशीपतीचें शिर अंबरीं । कृष्णें उडविलें तीक्ष्ण शरीं । काशीपुरींत महाद्वारीं । पडिलें ज्यापरी पद्मकोश ॥ ८१ ॥ महाद्वारीं पडिलें शिर । अवलोकूनियां नारीनर । भंवते मिळाले जन नागर । करिती विचार परस्परें ॥ ८२ ॥ अकस्मात गगनींहून । काय पडिलें हें कोठून । प्रथम झाले संशयापन्न । स्वस्थ होऊन मग पाहती ॥ ८३ ॥ निर्धारूनियां म्हणती वक्त्र । कुण्डलमंडित जें भासुर । कोणा वीराचें ऐसें समग्र । संशयपर जन झाले ॥ ८४ ॥ तंव पातला मंत्रिवर्ग । तिहीं लक्षूनि चिह्नें साङ्ग । काशीपतीचें उत्तमाङ्ग । कथिलें सवेग राणिवसां ॥ ८५ ॥ यावरी स्त्रियांची विलपनी । पुरजनाची सशोक ध्वनि । ते तूं सावध ऐकें श्रवणीं । कुरुकुळनलिनीप्रबोधका ॥ ८६ ॥

राज्ञः काशिपतेर्ज्ञात्वा महिष्यः पुत्रबान्धवाः । पौराश्च हा हता राजन्नाथ नाथेति प्रारुदन् ॥ २६ ॥

काशीपतिनृपाच्या जाया । बंधु पुत्र भ्रातृभार्या । इष्टमित्रां सोयरियां । विदित झाला वृत्तान्त ॥ ८७ ॥ राजद्वारीं नृपाचें मौळ । गगनींहूनि पडिलें अमळ । ऐकता धांवूनि आले सकळ । रुदती प्रबळ मोहभरें ॥ ८८ ॥ पुरजन म्हणती काशीराया । आम्हां प्रजांतें सांडूनियां । तूं गेलासी कवण्या ठायां । वीरश्रीजाया पर्णूनी ॥ ८९ ॥ कान्ता म्हणती भो भो नाथ । तुझेनि अंतःपुर सनाथ । आम्हां करूनियां अनाथ । वैकुंठपथ प्रार्थिला ॥ १९० ॥ परम कोमळ तुझें वदन । केवळ साम्राज्यसुखाचें सदन । समरीं शत्रूंसीं करूनि कदन । कां पां रुदनप्रद झालें ॥ ९१ ॥ श्मश्रु थरकले ओष्ठांवरी । दंत दिसती मुखाबाहेरी । सक्रोध भयंकर पाहोनि नेत्रीं । कां पां आम्हांवरी रुसलासी ॥ ९२ ॥ आजि न बोलसी कां वचन । कोठें रमोनि गेलें मन । तुजवीण आम्ही दिसतों दीन । विषाद कोण वद वदनीं ॥ ९३ ॥ आम्ही अंगना प्रीतिपात्रें । टाकोनि गेलासी कोण्या यात्रे । कोठें ठेविलीं आपुलीं गात्रें । आम्हांसी वक्त्रें गुज सांगें ॥ ९४ ॥ बाहु घालूनि ग्रीवेतळीं । आलिंगिसी शयनकाळीं । ते भुज आजि न दिसती जवळी । कुच करतळीं न सिवसी कां ॥ ९५ ॥ मस्तकावरील काढूनि पदरा । तेणें पुसिति नृपाच्या शिरा । अधर चुम्बूनि कपोल नेत्रां । लावूनि वक्त्रा विलोकिती ॥ ९६ ॥ शंख चक्र गदा पद्म । मुकुट कुण्डलें कौस्तुभोत्तम । वासुदेव हें मिरवीं नांव । त्याचा संगम कां त्यजिला ॥ ९७ ॥ कोठें त्यजिले हय गज रथ । कैसा धरिला गगनपथ । अवयव सेना यूथप

आप्त । सांडूनि येथ शिर आलें ॥ ९८ ॥ ऐशा विलपती सकळ जाया । मंत्री म्हणती भो भो राया । आम्हां दाखविली आपुली काया । तुझिया पायां अभिवंदूं ॥ ९९ ॥ आम्ही तुझिया प्रकृति सप्त । आम्हां मानिसी जिवलग आप्त । आमुसीं विचार करिसी गुप्त । आजी अकृप्त कां करिशी ॥ २०० ॥ आमुचा उबग किमर्थ आला । कोण आमुचा अपराध झाला । उपेक्षूनियां स्वप्रजांला । धरिला अबोला कां सांगें ॥ १ ॥ ऐसे विलपती सर्व प्रधान । तंव सुदक्षिणनामा नृपनंदन । म्हणे राया कां धरिलें मौन । सिद्धी अभिमान नेईन मी ॥ २ ॥ मी जन्मलों तुझिये उदरीं । तरी हे प्रतिज्ञा माझी खरी । मारीन शत्रु निर्धारीं । सत्य वैखरी जाणावी ॥ ३ ॥ ऐसीं अनेकें शोकोत्तरें । प्रजा प्रधान दारा कुमरें । विलाप करिती त्यानंतरें । कृत्य पुढारें तें ऐका ॥ ४ ॥

सुदक्षिणस्तस्य सुतः कृत्वा संस्थाविधिं पितुः । निहत्य पितृहंतारं यास्याम्यपचितिं पितुः ॥२७॥

सुदक्षिणनामा नृपाचा सुत । सारूनि अंत्येष्टि समस्त । पितृहंता कृष्णनाथ । त्या वधूनि कृतार्थ हो पाहे ॥ ५ ॥ पितृहंत्यातें मारीन जेव्हां । पुत्रधर्मा उत्तीर्ण तेव्हां । भरूनि ऐसिया दुर्धर हांवा । केला उठावा तो ऐका ॥ ६ ॥

इत्यात्मनाऽभिसंधाय सोपाध्यायो महेश्वरम् । सुदक्षिणोऽर्चयामास परमेण समाधिना ॥ २८ ॥

सारूनि जनकाची उत्तरक्रिया । पुरोहित प्रधान पाचारूनियां । प्रबळ शत्रु जिणावया । कोणा उपाया प्रवर्तिजे ॥ ७ ॥ तंव ते वदतीं सुदक्षिणभूपा । ऐकें कृष्णाचिया प्रतापा । जेणें यमलार्जुनां पादपां । रांगत असतां उन्मळिलें ॥ ८ ॥ जातमात्र असतां तान्हा । तैं बळितनया पूतना । प्राशूनि विषाचा उल्बण पान्हा । सायुज्यसदना पाठविली ॥ ९ ॥ तृणावर्ताचा चेंपिला गळा । शकट स्पर्शूनि चरणकमळा । वदनीं विश्व दाखविलें डोळां । धर्षितां हेळा जननीतें ॥ २१० ॥ वत्सासुर कपित्थपृष्ठीं । बक चिरिला चांचुवटीं । अघासुराची फोडिली घांटीं । कालिय क्ष्वेडी पळविला ॥ ११ ॥ धेनुक टाकिला तृणराजाग्रीं । प्रलंब मारिला मुष्टिप्रहारीं । वदनें वणवा प्राशन करी । तो केंवि समरीं तुज आकळे ॥ १२ ॥ अमरपतीचा रोधिला मख । तेणें प्रळयबलाहक । आज्ञापिता नंदघोष । महावर्षें पीडियला ॥ १३ ॥ जेव्हां सप्त वर्षांचा हरि । गोवर्धनाद्रि उचलूनि करीं । गोकुळ रक्षिलें सप्त रात्री । शक्रें स्वनेत्रीं विलोकिलें ॥ १४ ॥ अरिष्ट केशी महासुर । खेळतां मारिले न धरूनि शस्त्र । कुवलयापीड मत्त कुंजर । हस्तप्रहारें संहारिला ॥ १५ ॥ चाणूर मुष्टिक शल तोशल । रंगीं क्रीडतां मर्दिले मल्ल । कालनेमी जो कंस खळ । वधिला वाळ कर्षूनी ॥ १६ ॥ तपाच्या कैपक्षा मागध । करावया कृष्णवध । अठरा वेळ केलें युद्ध । परी नाहीं साध्य जय झाला ॥ १७ ॥ काळयवन जाळिला कपटें । विदर्भाचें मौळ मुखवटें । बीभत्स वपन लज्जापटें । आच्छादूनि विसर्जिला ॥ १८ ॥ राजकन्या वरिल्या अष्ट । तये प्रसंगीं नृप यथेष्ट । झाले समरंगीं प्रविष्ट । अद्यापि कष्ट भोगिती ते ॥ १९ ॥ जाम्बवत जो ऋक्षेश्वर ।

प्रत्यक्ष ब्रह्मयाचा अवतार । रामदळींचा महावीर । कांपे थरथर रावण ज्या ॥२२०॥ बिळीं रिघोनि त्या बाहुयुद्धीं । दमितां विसरविली शुद्धि । भौम मारिला निर्जरदंदी । त्याच्या समृद्धि अपहरिल्या ॥ २१ ॥ बाण शिवाचा वरदपुत्र । ज्यातें रक्षी भालनेत्र । त्याचा छेदूनि बाहुभार । शोणितपुर विध्वंसिलें ॥२२॥ बाणासुराच्या धेनूलागीं । वरुण भांगिला समरंगीं । ऐसिया युद्धाचे प्रसंगीं । कोण त्रिजगीं जिणों शके ॥ २३ ॥ यालागीं कृष्णेसीं युद्ध न घडे । त्वां जे प्रतिज्ञा केली तोंडें । तियेतें सत्यत्व कैंवि घडे । अवघड कोडें हेंचि असे ॥ २४ ॥ पुरोहितातें सुदक्षिण । म्हणे तुम्हीं प्रयोगप्रवीण । जिया प्रयोगें निवटे कृष्ण । तें अनुष्ठान मज सांगा ॥ २५ ॥ बुद्धि निश्चय विवरूनि ऐसा । पुरोहितमतें श्रीमहेशा । आभिचारमार्गें ऋत्विजां सरिसा । शरण होवोनि आराधी ॥ २६ ॥ नियम चालूनि परम क्रूर । आकर्षुनि निज शरीर । प्रसन्न केला भूतेश्वर । कर्म अभिचार आचरोनी ॥ २७ ॥ परमसमाधि-निष्ठावंत । देखोनि तोषला गिरिजाकांत । वरद होतां नृपाचा सुत । याची अभिप्रेत तै ऐका ॥२८॥

प्रीतोऽविमुक्ते भगवांस्तस्मै वरमदाद्भवः । पितृहंतृवधोपायं स वव्रे वरमीप्सितम् ॥ २९ ॥

सुदक्षिणाचा देखोनि भाव । मागें वरदान म्हणे भव । पितृहंत्याचा निर्दळे ठाव । तो उपाव वर याची ॥ २९ ॥ जेणें माझा मारिला पिता । त्याचा वधोपाय तत्वता । इतुका माझा वर आवडता । पार्वतीकान्ता दे वेगीं ॥ २३० ॥ इतुकी ऐकोनि वरप्रार्थना । काय बोलिला कैलासराणा । तें तूं ऐकें इरारमणा । कुरुभूषणा परीक्षिति ॥ ३१ ॥

दक्षिणाग्नि परिचर ब्राह्मणैः सममृत्विजम् । अभिचारविधानेन स चाग्निः प्रमथैर्वृतः ॥
साधयिष्यति संकल्पमब्रह्मण्ये प्रयोजितः ॥ ३० ॥

भूतेश म्हणे सुदक्षिणा । दक्षिणाग्निमाजी हवना । करीं अभिचारविधिविधाना । सहित ब्राह्मणा तन्मंत्रीं ॥ ३२ ॥ यजमानाचिये आज्ञेवरून । ऋत्विज सारी यज्ञविधान । तैसा आज्ञाधारक कृशान । करील हनन शत्रूचें ॥ ३३ ॥ साठी सहस्र वेष्टित प्रमथ । हवनांतूनि महाद्भुत । प्रकट होऊनि साधील कृत्य । तो वृत्तान्त अवधारीं ॥ ३४ ॥ मद्वरें या प्रयोगाग्नीसी । अब्रह्मण्यावरी प्रयोजिसी । तरी तो साधील संकल्पासी । या वर्मासी जाणावें ॥ ३५ ॥ गूढ रहस्य भूतपति । यामाजी वदला इये रीती । तें तूं ऐकें परीक्षिति । म्हणे सुमति शुक योगी ॥ ३६ ॥ ब्रह्मण्यदेव श्रीकृष्णनाथ । त्यावरी प्रेरितां प्रयोगाद्भुत । तोचि क्षोभोनियां विपरीत । भस्मीभूत करील ॥ ३७ ॥ ऐसा गूढार्थ सूचिला शिवें । परि सुदक्षिणातें नोहे ठावें । कृष्ण मानूनि मनुष्यभावें । आचरें आघवें तें ऐका ॥ ३८ ॥

इत्यादिष्टस्तथा चक्रे कृष्णायाभिचरन्व्रती । ततोऽग्निरुत्थितः कुण्डान्मूर्तिमानतिभीषणः ॥
तप्ततास्रशिखाश्मश्रुरंगारोद्गारिलोचनः ॥ ३१ ॥

शिवें आज्ञापिला होत्साता । तैसाचि झाला तो आचरता । कृष्णाकारणें अभिचार घाता । इच्छानि तत्वता व्रतस्थ ॥ ३९ ॥ अभिचारयज्ञीं जे जे नियम । ते ते आचरला सकाम । तेणें अभिचार देवता विकराळ परम । संपतां होम प्रकटली ॥ २४० ॥ कुण्डापासूनि भयानक । प्रकटला मूर्तिमंत पावक । पिङ्गट शिखा श्मश्रु तिख । तप्त ताम्र प्रतिभाती ॥ ४१ ॥ खदिराङ्गारसदृश डोळे । बाहेर पडों पाहती बुबुळें । प्रळयरुद्राचे नेत्रखोळे । पासोनि ईशाळ क्षोभला ॥ ४२ ॥ तयाचे साङ्ग अवयव राया । सावध होईं परिसावया । ऐसें प्रार्थितां कौरववर्या । शुक आचार्या कौतुकें ॥ ४३ ॥

दंष्ट्रोग्रभ्रुकुटीदंडकठोरास्यः स्वजिह्वया । आलिहन्सृक्किणी नग्नो विधुन्वंस्त्रिशिखं ज्वलत् ॥ ३२ ॥
पद्भ्यां तालप्रमाणाभ्यां कंपयन्नवनीतलम् । सोऽभ्यधावद्वृतो भूतैर्द्वारिकां प्रदहन्दिशः ॥ ३३ ॥

दंष्ट्रा दण्ड अतिकठोर । भृकुटी कुटिल भयंकर । तिहीं करूनि क्रूर वक्त्र । जिह्वा उग्र लाळीतसे ॥ ४४ ॥ जिह्वा लळलळी ताम्रतिख । तेणें विशाळ विक्राळ मुख । चाटित सृक्किणी सम्यक । श्रवणपर्यंत चपलत्वें ॥ ४५ ॥ सूर्यबिम्बाच्या उदयकाळीं । ज्वाळा भासती उदयाचळीं । तैसा त्रिशिख त्रिशूळ करतळीं । विद्युन्माळी झेलीतसे ॥ ४६ ॥ उच्चताल वृक्षप्रमाण । दीर्घ भयंकर दोन्ही चरण । मूर्धा भेदूनि गेला गगन । भासती ग्रहगणसम नेत्र ॥ ४७ ॥ जयाच्या विक्रमतळवटीं । भूतळ कांपे थरथराटी । वेष्टित भूतगणाची घरटी । नग्न कटितटीं पिङ्गरोम ॥ ४८ ॥ डोंगरीं प्रज्वळला वडवाग्नि । तैसा सर्वाङ्गीं प्रदीप्त वह्नि । असंख्यात प्रमथगणीं । द्वारकादहनीं प्रवर्तला ॥ ४९ ॥ पश्चिम दिशा जाळावया । धाविन्नला कौरवराया । पर्वतपृष्ठीं क्षोभोनियां । वज्रकल्लोळ जेंवि पडे ॥ २५० ॥ द्वारका-भुवनीं अकस्मात । जैसा पडे विद्युत्पात । तैसा क्षोभला भूतां सहित । पुरी जाळीत चालिला ॥ ५१ ॥ उच्चतरें प्रासादशिखरें । माड्या मंदिरें दामोदरें । त्वष्टृनिर्मितें पुरगोपुरें । प्रळयाङ्गारें धडकलीं ॥ ५२ ॥ अट्टाळिया सभास्थानें । पण्यवीथि दीर्घ दुकानें । अमूल्य वैदूर्यमणिरत्नें । कपटकृशानें जळताती ॥ ५३ ॥ हाहाकार द्वारकापुरीं । आक्रंदती नरनारी । म्हणती पडलों प्रळयाङ्गारीं । स्मरती हरि-आकान्तीं ॥ ५४ ॥

तमभिचारदहनमायांतं द्वारकौकसः । विलोक्य तत्रसुः सर्वे वनदाहे यथा मृगाः ॥ ३५ ॥

अभिचार प्रयोगजनिताग्नि । क्षोभें आला प्रज्वळोनी । द्वारका धडकली देखोनी । आकान्त पुरजनीं मांडिला ॥ ५५ ॥ अग्नि देखोनि भयंकर । द्वारकावासी नारीनर । प्राणिमात्र लहान थोर । त्रासले समग्र प्राणभयें ॥ ५६ ॥ पळूनि जावया नाहीं ठाव । आतां कैसे वांचती जीव । म्हणती क्षोभला वासुदेव । कांहीं उपाव या न करी ॥ ५७ ॥ मृग श्वापदें वणवयामाजी । पडलिया कोंडूनि जळती सहजीं । तैसी अवस्था आम्हांसी आजी । धूम्रध्वजीं वरपडिलों ॥ ५८ ॥ गगनीं झळंबती प्रचंड आद्या । पाषाण फुटोनि होती लाह्या । कोठें ठाव न दिसे राह्या । द्वारकाराया मग स्मरती ॥ ५९ ॥ प्रयोगजनिताभिचारवह्नि । क्षोभें पेटला द्वारकाभुवनीं । रत्नखचितां हेमसदनीं । धडके तृणीं

जियापरी ॥२६०॥ ऐसिया जोहरीं जनसंघाट । जयासि जिकडे सांपडे वाट । पळत आले दाटोदाट । करिती बोभाट राजसभे ॥ ६१ ॥ जिये राजसभेच्या ठायीं । यादव वृष्णि भोज सर्वही । उग्रसेन-प्रमुख पाहीं । शेषशायी उपविष्ट ॥ ६२ ॥ तंव जनाचा हाहाकार । एकसराचि ऐकिला गजर । कोण्या प्रकारें तो विचार । ऐक साचार परीक्षिति ॥ ६३ ॥

अक्षैः सभायां क्रीडंतं भगवंतं भयातुराः । त्राहि त्राहि त्रिलोकेश वह्नेः प्रदहतः पुरम् ॥ ३६ ॥

सारीपाट मांडूनि पुढा । भगवन्तातें करितां क्रीडा । अग्निभयार्तीं हंमरडा । केला रोकडा ते ठायीं ॥ ६४ ॥ त्राहि त्राहि भो जगदीशा । त्रिजगद्रक्षका त्रिलोकेशा । प्रकर्षें वह्नि क्षोभला कैसा । केली कोळसा द्वारावती ॥ ६५ ॥ जैसा जाळी शुष्केन्धना । तयाचि सारिखा दिव्यभुवना । रत्नखचिता हेमसदना । जाळितां कृशाना पळ न लगे ॥ ६६ ॥ भगवंता तूं पाहसी कायी । आम्हा तुजवीण रक्षिता नाहीं । द्वारकापुराची केली लाही । धांव लवलाहीं जगज्जीवना ॥ ६७ ॥ ऐसें प्रार्थिती लहान थोर । ऐकतां जनांचा सशोक गजर । क्रीडा टाकूनि जगदीश्वर । पाहे सत्वर तें ऐका ॥ ६८ ॥

श्रुत्वा तज्जनवैक्लव्यं दृष्ट्वा स्वानां च साध्वसम् । शरण्यः सहसन्प्राह मा भैष्टेत्यवितास्म्यहम् ॥ ३७ ॥

ऐकूनि जनाची वैक्लव्यग्लानि । संकट स्वकीयांचें देखूनी । शरणां शरण्य चक्रपाणि । बोले हांसोनि तयांप्रति ॥ ६९ ॥ ना भी म्हणोनि अभयहस्तें । तयाचीं चित्तें केलीं स्वस्थें । भेऊं नका कृतान्तातें । रक्षितां तुम्हांतें मी आहें ॥२७०॥ माझिये छायेसि असतां तुम्हां । कायसी अग्निभयाची गरिमा । मज न स्मरतां पावलां श्रमा । कीजे क्षमा तें अवघें ॥ ७१ ॥ ऐसें अभय देऊनि सर्वां । ज्ञानीं पाहतां वासुदेवा । कपटकृत्या जाणोनि बरवा । प्रयोग योजिला तो ऐका ॥ ७२ ॥

सर्वस्यांतर्बहिःसाक्षी कृत्यां माहेश्वरीं विभुः । विज्ञाय तद्विघातार्थ पार्श्वस्थं चक्रमादिशत् ॥ ३८ ॥

सर्वांचिये अभ्यंतरीं । व्यापक गगनाही माझारी । तेणें कृत्या माहेश्वरी । प्रयोगाभिचारी जाणीतली ॥ ७३ ॥ विभु समर्थ श्रीभगवान । कृत्याप्रतिकारार्थ पूर्ण । आज्ञापिलें सुदर्शन । देदीप्यमान धगधगित ॥ ७४ ॥ कृष्णाज्ञेचा प्रताप । सुदर्शनाचें उग्र रूप । भंगावया कृत्याग्निदर्प । प्रेरिलें सकोप तें ऐक ॥ ७५ ॥

तत्सूर्यकोटिप्रतिमं सुदर्शनं जाज्वल्यमानं प्रलयानलप्रभम् ।
स्वतेजसा खं ककुभोऽथ रोदसी चक्रं मुकुन्दास्त्रमथाग्निमार्दयत् ॥ ३९ ॥

कृष्णाज्ञेसरिसें चक्र । गगनीं संचरलें अवक्र । कोटिभास्कर भा भासुर । विधि हर शक्र भयचकित ॥ ७६ ॥ स्फुरदूप ज्वालानिचय । गगन झालें ज्वालामय । प्रळयपावक कैंचा काय ।

कृतान्ता आय न संवरे ॥ ७७ ॥ अधोर्ध्व दिक्चक्र भरलें नभ । केंउता प्रलयरुद्राचा क्षोभ । मुकुन्दास्त्र तें काळाग्निप्रभ । कृत्या अशुभ आर्दितसे ॥ ७८ ॥ अभिचारप्रयोगजनितकृत्या । माहेश्वरी परम व्रात्या । देखतां चक्राग्नीच्या नृत्या । प्रेरका मृत्या अर्पितसे ॥ ७९ ॥ केवळ विष्णुस्मरणापुढें । अभिचारकापट्य समूळ उडे । कृत्याकृत्य तें केवढें । चक्रपडिपाडें तुळावया ॥ २८० ॥ लागतां सुदर्शनाच्या ज्वाळा । धरि न पुरे कृत्यानळा । प्राणधाकेंचि तये वेळा । क्षोभें परतला तें ऐका ॥ ८१ ॥

कृत्यानलः प्रतिहतः स रथांगपाणेरस्त्रौजसा स नृप भग्नमुखो निवृत्तः ।
वाराणसीं परिसमेत्य सुदक्षिणं तं सर्त्विग्जनं समदहत्स्वकृतोऽभिचारः ॥ ४० ॥

म्हणाल परतोनि केलें काय । तो ऐकावा अभिप्राय । निर्बळाच्या शस्त्रन्यायें । फिरोनि अपायकर झाला ॥ ८२ ॥ रथाङ्गपाणि जो श्रीकृष्ण । त्याचें अस्त्र सुदर्शन । तयाच्या तेजें कपट-कृशान । पोळतां क्षोभोन परतला ॥ ८३ ॥ अब्रह्मण्यावरी प्रयोजिसी । तरी हा साधील संकल्पासी । ब्रह्मण्यावरी प्रेरितां त्यासीं । विपरीतार्थेंसी क्षोभला ॥ ८४ ॥ चक्राग्नीनें करितां भग्न । अभिचाराग्नि क्षोभला पूर्ण । विमुख झाला द्वारकेहून । सम्मुख सुदक्षिण लक्षिला ॥ ८५ ॥ जैसा होय विद्युत्पात । तैसा पडिला वाराणसींत । ऋत्विग्ब्राह्मणजनपदासहित । केला घात नृपाचा ॥ ८६ ॥ स्वकृत क्षोभला अभिचार । तेणें केला तत्संहार । ज्याचें त्यावरी फिरलें शस्त्र । सर्व परिवार जाळिला ॥ ८७ ॥ अद्यापि जे प्रयोगपर । प्रेरिती साबरादि अभिचार । विपरीत होऊनि ते सत्वर । करिती संहार प्रेरकांचा ॥ ८८ ॥ असो क्षोभला अभिचार । तेणें राजा सहपरिवार । जाळिला तयाचिसरिसें चक्र । पातलें क्रूर तें ऐका ॥ ८९ ॥

चक्रं च विष्णोस्तदनुप्रविष्टं वाराणसीं साट्टसभालयापणाम् ।
सगोपुराट्टालकगोष्ठसंकुलां सकोशहस्त्यश्वरथान्नशालाम् ॥ ४१ ॥

विष्णुचक्र सहस्रार । भग्न करूनि कृत्याङ्गार । त्याच्या पाठीं लागे क्रूर । काशीपुर प्रवेशलें ॥ २९० ॥ प्रलयज्वाळांची महामारी । भरली वाराणसीमाझारी । मारुतिपुच्छें जयापरी । केली बोहरी लंकेची ॥ ९१ ॥ हाट बाजार धडधडां जळती । प्राणभयें लोक पळती । पुरी प्रज्वळली सभोंवती । आक्रन्दती पुरवासी ॥ ९२ ॥ प्रतिपण्यस्थें सभास्थानें । राजमुद्रांचीं शासनें । धडधडां जळती चक्राग्नीनें । शङ्खस्फुरणें जन करिती ॥ ९३ ॥ नाना पदार्थ प्रतिदुकानीं । घृतें तैलें चर्मभाजनीं । मधु ऐक्षवरसश्रेणी । जळती धडकोनि पण्यस्थ ॥ ९४ ॥ अग्नियंत्राचे द्रव्यसांठे । स्पर्शमात्रें कडकडाटें । गगना उसळूनि जाती नेटें । प्रळय वाटे प्रान्तस्था ॥ ९५ ॥ गोधूम साळी जव जोंधळे । माष मुद्ग मसुरा राळे । खल्व चणक सर्षप काळे । तिळ तण्डुल श्यामक ॥ ९६ ॥ नानाविधा द्विदलराशि । नृपोपभोग्या वरान्नासी । कुलित्थ कोद्रव अढक अतसी । करडी अंबाडी

पौष्करिका ॥ ९७ ॥ इत्यादि धान्यांचे पर्वत । धडधडां जळोनि भस्मीभूत । मुखीं मृत्तिका निक्षेपित । वार्धुषगण भोंवताला ॥ ९८ ॥ राजभोग्यादि महार्हवसनें । जनपदभोग्यें गौण सामान्यें । कृमिजें कोशेये रोमजें तार्णें । राजतें सौवर्णें हत होती ॥ ९९ ॥ शिंपी सोनार चर्मकार । नाना धातूंचे भाण्डकार । हयगजवृषादिपल्याणकार । शरचापकार जळताती ॥ ३०० ॥ माल्यकार रंगकार । परिमळद्रव्यक्रयी अपार । भिषक नापित नृत्यकार । अवघे बाजार जळताती ॥ १ ॥ हेमरजततास्रनाणीं । विकिती वेव्हारे सोवाणी । तेथ प्रज्वळतां चक्राग्नि । धातु द्रवोनि रस वाहती ॥ २ ॥ एक पळोनि बाहेर जाती । एक जेथील तेथें जळती । पळतां पथ ते न लाहती । आहुति होती चक्रानळा ॥ ३ ॥ एक एकासाठीं रडती । तेही अग्निमुखीं पडती । पडतां क्षण एक तडफडती । मग सोडिती प्राणांतें ॥ ४ ॥ स्त्री माहेरा काली गेली । आमुची शान्ति पावकें केली । मही धन संपत्ति जे पुरिली । तुम्हीं ते कथिली पाहिजे ॥ ५ ॥ ऐसें भोंवतालियां लोकां । जळतां एक मारिती हाका । एक म्हणती मुलां बायकां । करितां शोका शान्तविजे ॥ ६ ॥ एक म्हणती प्रळयांतून । शान्तवावया वांचेल कोण । अंतीं करा हरिहरस्मरण । कांहीं सोडवण जीवाची ॥ ७ ॥ ज्वाळा धडकत लागल्या गगनीं । तप्ततास्रमय तापली धरणी । सळसळां कढों लागलें पाणी । जळचर श्रेणीसमवेत ॥ ८ ॥ तों पुरगर्भीं भरले ज्वाळ । तेणें फुटोनि उडती उफळ । जैसे यंत्रगर्भींचे गोळ । वज्रकल्लोळसम पडती ॥ ९ ॥ अट्टालिया दामोदरें । श्रीमंतमदनें राजमंदिरें । भस्म केलीं मुकुंदास्त्रें । चमत्कारें निमिषार्धें ॥ ३१० ॥ पशुगोटणें अश्वशाळा । कुंजरशाळा रहंवरशाळा । खेचरक्रमेळरामभशाळा । जाळिल्या सकळा सुदर्शनें ॥ ११ ॥ अजाअविकांचिया कोंडणी । पाकशाळा पाचकश्रेणी । कोश मांदुसा भरल्या रत्नीं । सुवर्णनाणीं अपरिमितें ॥१२॥ चक्राग्नीच्या कडकडाटें । रत्नें फुटती तडतडाटें । हेम द्रवोनि वाहे पाटें । झालें उफराटें जन म्हणतीं ॥ १३ ॥ भणगें भिकारी याचक । गणक जोशी ग्रामयाजक । वैयाकरणी नैयायिक । वेदपाठक हुत झाले ॥ १४ ॥ सुदक्षिण नृप नव्हे गाढव । प्रयोगें क्षोभविला वाडव । आपणांसहित आमुचे जीव । होमिले सर्व पूर्णाहुतीं ॥ १५ ॥ सांख्य मीमांसक वेदान्ती । धर्मशास्त्रज्ञ दशग्रंथी । वाजपेयी श्रौतस्मार्ती । पडिले आहुती चक्राचे ॥ १६ ॥ यति वनस्थ ब्रह्मचारी । आगमी कौळिक वामाचारी । कादिहादिदीक्षाधारीं । महाअभिचारीं प्रवीण जे ॥ १७ ॥ साबरी आसुरी पंचाक्षरी । जारणमारणप्रयोगकारी । नानापाखंडी वेषधारी । कर्कश अघोरीं हुत झाले ॥ १८ ॥ राजनियोगी ग्रामलेखक । जळतां वदनें करिती शंख । वेतन बुडालियाचें दुःख । स्मरतां पावक त्यां कवळी ॥ १९ ॥ मूषक बिडालें श्वान जंबुक । गो सरड सर्प वृश्चिक । सामान्य जंतुयोनि अनेक । चक्रपावका हुत झाले ॥ ३२० ॥ पूर्वी जैसा खाण्डववनीं । कृष्णार्जुनांच्या अभयेंकरूनी । पावकें भक्षिले समस्त प्राणी । तद्वत करणी हे झाली ॥ २१ ॥ मुंगी मत्कुण मूषक माशी । न सुटत पडलीं पावकग्रासीं । गगनगर्भीं उडतां पक्षी । पडती हुताशीं आहळुनी ॥ २२ ॥ श्रोते आशंका करिती येथ । यति वेदान्ती व्रती वनस्थ । चक्रें जाळिले हे किमर्थ । तरी तो वृत्तान्त अवधरा ॥ २३ ॥ धान्यासरिसे रगडिती किडे । ऐसें बोलती लोक वेडे । गुंततां धान्यभक्षणचाडे । मरणा वरपडे ते होती ॥ २४ ॥ महापातकियाचा संग । धरितां तत्तुल्य तो

अव्यंग । संसर्गजनितपापप्रसंग ॥ दे फळभोगसमसाम्य ॥ २५ ॥ राजा प्रवर्तला अभिचारा । ऐसिया ऐकतांचि विचारा । त्यागूनि गेले काशीपुरा । चक्राङ्गारा न जळती ते ॥ २६ ॥ कुकर्म कळतां पळती त्वरित । ते तद्दोषें न होती लिप्त । धनसदनादिममताव्याप्त । ते संतप्त तत्पापें ॥ २७ ॥ असंप्रज्ञात समाधिस्थ । निर्विकल्पदशा प्राप्त । ते सर्वदा स्वरूपस्थ । शारीर स्वार्थ नेणती ते ॥ २८ ॥ जितां मरतां आत्मस्थिति । ज्यांची न मोडे कल्पान्तीं । चक्राग्नि जाळितां तयांप्रति । न वटे खंती अणुमात्र ॥ २९ ॥ हरिरूप केवळ योगीश्वर । हरितेजोमय हरीचें चक्र । समरसें होती ते तन्मात्र । जळतां शरीरभय कोणा ॥ ३० ॥ पूर्वींच नाहीं देहभान । असंप्रज्ञातसमाधिवान । त्यांसी जाळितां सुदर्शन । कवळी पूर्ण आत्मत्वें ॥ ३१ ॥ असो ऐसी वाराणसी । पडली सुदर्शनाच्या ग्रासीं । पुढें कथा वर्तली कैसी । तें नृपासी शुक सांगे ॥ ३२ ॥

दग्ध्वा वाराणसीं सर्वां विष्णोश्चक्रं सुदर्शनम् । भूयः पार्श्वमुपातिष्ठत्कृष्णस्याक्लिष्टकर्मणः ॥ ४२ ॥

पुराणपुरुष जो कां विष्णु । अक्लिष्टकर्मा तो श्रीकृष्णु । त्याचें चक्र सुदर्शन । काशी जाळून परतलें ॥ ३३ ॥ सर्व जाळीली वाराणसीं । तेव्हां वनस्थ यति तापसी । वांचलें ऐसें म्हणावयासी । सामर्थ्य कोणासी असेना ॥ ३४ ॥ एवं कथिला अल्प विस्तार । संपूर्ण जाळिलें काशीपुर । सर्वज्ञ जाणती श्रोते चतुर । नलगे परिहार यदर्थीं ॥ ३५ ॥ पूर्ण जाळूनि वाराणसी । चक्र पातलें द्वारकेसी । श्रीकृष्णाचे पार्श्वदेशीं । दक्षिणेसी स्थिर झालें ॥ ३६ ॥ श्रीकृष्णाचें जें जें कर्म । दुष्ट भंगूनि स्थापी धर्म । अक्लिष्टकर्मा ऐसें नाम । जाणोनि वर्म मुनि म्हणती ॥ ३७ ॥ प्राकृत म्हणती हिंसापर । म्हणोनि श्रीशुक योगीश्वर । या कर्माचा महिमा सधर । वर्णी सादर तो परिसा ॥ ३८ ॥

य एनं श्रावयेन्मर्त्य उत्तमश्लोकविक्रमम् । समाहितो वा शृणुयात्सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ४३ ॥

शुक म्हणे गा परीक्षिति । उत्तम श्लोकाची विक्रमख्याति । श्रवण करवील जो वक्ता सुमति । प्राण्याप्रति एकादिया ॥ ३९ ॥ अथवा सप्रेमभावें करून । एकाग्र इंद्रियां नियमून । समाहित करूनि अंतःकरण । करील श्रवण श्रद्धाळु ॥ ३४० ॥ एवं कथिलें जैसें तूतें । इतिहासाचे श्रोते वक्ते । ते या श्रवणें सर्व पापांतें । भस्म करिती क्षणमात्रें ॥ ४१ ॥ महापातकें उपपातकें । ज्ञाताज्ञातें सांसर्गिकें । नैमित्तिकें उपहासकें । आर्द्रें शुष्कें जळताती ॥ ४२ ॥ अखिल पातकां भस्म करिती । विशेष लाहती श्रीकृष्णभक्ति । इतिहास श्रवणाचिये ख्याति । प्रियतम श्रीपति त्यां मानी ॥ ४३ ॥ इहामुत्रार्थ जो फलभोगी । जो मर्त्यधर्मी मनुष्यवर्गी । तो हा इतिहास श्रवणप्रसंगीं । मिळे श्रीरंगीं नियमात्मा ॥ ४४ ॥ हें कृष्णाचें उज्वल यश । श्रवण करिती शुद्धमानस । ते ते होती नित्य निर्दोष । अमृतत्वासी पावती ॥ ४५ ॥ इतुकी श्रीमद्भागवतीं । दशमस्कंधीं श्रीशुकोक्ति । ऐकूनि निवाला परीक्षिति । निर्दोष चित्तीं होत्साता ॥ ४६ ॥ एथवरी एकादशनीपट्क । कथिलें श्रोतयां निष्टंक । यावरी परीक्षिती

सुटंक । रामप्रताप पुसेल ॥ ४७ ॥ ये कथेचिया श्रवणा । श्रोतीं देऊनियां अवधाना । श्रवणमात्रें कैवल्यसदना । माजी चिद्घना अनुभविजे ॥ ४८ ॥ इतुकी कथा प्रतिष्ठानीं । एकनाथाचे साम्राज्य-सदनीं । चिदानंदें स्वानंदश्रवणीं । कृपा वरदानीं सांठविली ॥ ४९ ॥ स्वानंदकृपारसाचा ओघ । गोविन्दहृदीं भरला साङ्ग । तत्पादोदकप्रवाहगाङ्ग । रिघालें अव्यंग दयार्णवीं ॥ ३५० ॥ ऐसा दयार्णव आपूर्यमाण । विग्रहधारी अग्रवर्ण । एकनाथाचे लक्षूनि चरण । वसतिस्थान पिपीलिका ॥ ५१ ॥ तेथें अध्याय हा षट्षष्ठि । श्रीधरस्वामीची पदवीदृष्टी । पाहोनि केली जे चावटी । ते टीका मराठी हरिवरदा ॥ ५२ ॥ इच्या श्रवणें पठनें स्मरणें । दुर्गम भवाब्धि निस्तरणें । ऐसें वरदान नारायणें । श्रोत्यांकारणें दिधलेंसे ॥ ५३ ॥ एथ धरिती जे विश्वास । ते पावती कैवल्यास । अविश्वासिया माथां दोष । वाराणसीदहनाचा ॥ ५४ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचराविरचितायां पौण्ड्रककाशीराजवधाभि-चारकृत्याभंगसार्त्विक्सुदक्षिणकाशीपुरीदहनं नाम षट्षष्टितमोऽध्यायः ॥ ६६ ॥

श्लोक ४३ ॥ टीका ३५४ ॥ एवं संख्या ३९७ ॥
(पासष्टावा अध्याय मिळून ओवीसंख्या ३१,११८)

सहासष्टावा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ६७ वा

श्रीकृष्णगोविन्दात्मने नमः ॥ गोविन्द परमसुखाचा सुरतरु । गोविन्द प्रकृतीहूनि परतरु । गोगम्य गोगोप्ता साचारु । गोविन्द सद्गुरु सन्मात्र ॥ १ ॥ तत्पद स्थापूनि हृदयपीठीं । आरब्ध-ग्रंथाची परिपाटी । अध्याय संपला सासष्टी । पुढें सप्तषष्टि उपाइला ॥ २ ॥ तयामाजी इतुकी कथा । रामप्रताप राजा पुसतां । द्विविदवानरवध तत्वता । सांगेल आतां शुकयोगी ॥ ३ ॥ तें परिसावया पुण्याख्यान । श्रोतीं व्हावें सावधान । महाराष्ट्र हरिवरद व्याख्यान । अमृतपान भवतप्तां ॥ ४ ॥ दयार्णवाची हे विनवणी । हृदयीं चिन्तूनि चक्रपाणि । सप्रेमभावें बैसतां श्रवणीं । कल्याणश्रेणी घररिघती ॥ ५ ॥ येथूनि एकादशनी सप्तम । आरंभिली उत्तमोत्तम । कैसा तियेचा कथानुक्रम । तोही सुगम अवधारा ॥ ६ ॥ सप्तषष्टीं रेवताचळीं । राम करितां कंदर्पकेली । द्विविदवानरें केली कळी । तो ते काळीं निर्दळिला ॥ ७ ॥ अष्टषष्टीं हस्तिनापुरीं । साम्बें हरिली धार्तराष्ट्री । कौरवीं निरोधितां हलधारी । करी नगरी वक्र हळ ॥ ८ ॥ नवषष्टितमीं कथा । गार्हस्थ्यधर्म कृष्णनाथा । नारदें पाहिलें आचरतां । मग झाला जाता स्तुति करूनी ॥ ९ ॥ सप्ततितमाध्यायीं हरि । राजसूयार्थ पाण्डवां घरीं । नृपाङ्गनांच्या दूतोत्तरीं । विचार विवरी खळदमना ॥ १० ॥ एकाहत्तराध्यायीं कथा । उद्धवमंत्रें इंद्रप्रस्था । जाऊनि मंत्र बाहेद्रथा । करी हननार्थी कौशल्यें ॥ ११ ॥ बाहत्तराविया अध्यायीं । धर्मज्ञेनें शेषशायी । दुर्जय मागध वधिला पाहीं । भीमहस्तें द्विजवेशें ॥ १२ ॥ त्र्याहत्तराव्या अध्यायीं हरि । बद्ध नृपांचें मोक्षण करी । गौरवूनि त्यां राजोपचारीं । धर्माध्वरीं अनुमोदी ॥ १३ ॥ यावरी चौऱ्याहत्तरीं कथा । राजसूयमख संपतां । अग्रपूजार्थ चैद्यघाता । करी तत्वता तें कथिलें ॥ १४ ॥ पंचाहत्तरीं अवभृथ स्नान । पाहतां मयकृत सभास्थान । स्थळजळभ्रमें

दुर्योधन । पावला अपमान स्वमौख्यें ॥ १५ ॥ शाहत्तरावियामाझारीं । शाल्वें त्रासितां द्वारकापुरी । प्रद्युम्न भिडतां गदाप्रहारीं । रणचत्वरीं परताविला ॥ १६ ॥ धर्मराजाचा राजसूय । संपादूनि देवकीतनय । सौभ मर्दुनि द्वारके जाय । सप्तसप्ततितमीं अध्यायीं ॥ १७ ॥ एवमादि एकादशनी । सप्तम प्राप्त निरूपणीं । प्रज्ञा चकित तद्वचाख्यानीं । ते सज्जनीं पुष्ट कीजे ॥ १८ ॥ सद्गुरुगोविन्दाचिया वरदें । कृपा केलिया विदुषवृंदें । श्रीधरस्वामीचीं व्याख्यात पदें । पाहूनि विनोदें वर्णीन ॥ १९ ॥ सादर तया श्रवणाप्रति । अवधान देऊनि बैसिजे श्रोतीं । पौण्ड्रकवधश्रवणाअंतीं । पुसे परीक्षिति तें ऐका ॥ २० ॥

राजोवाच । भूयोऽहं श्रोतुमिच्छामि रामस्याद्भुतकर्मणः । अनंतस्याप्रमेयस्य यदन्यत्कृतवान्प्रभुः ॥ १ ॥

राजा म्हणे जी योगपति । प्रश्न वांछी माझी मति । अद्भुत बळरामाची ख्याति । वाटे पुढती परिसावी ॥ २१ ॥ जो कां अनंत अप्रमेय । त्याचें चरित्र आणिक काय । असेल तें तूं कथिता होय । वाटे प्रिय मम श्रवणां ॥ २२ ॥ हें ऐकूनि म्हणे योगीन्द्र । परीक्षिति तूं पूर्णचंद्र । प्रश्नकिरणीं मतिसागर । ओसंडतसे पैं माझा ॥ २३ ॥ आतां होवोनि सावधान । कृतप्रश्नाचें निरूपण । करी चरित्रें संकर्षण । तीं तूं श्रवण करीं राया ॥ २४ ॥

श्रीशुक उवाच । नरकस्य सखा कश्चित्द्विविदो नाम वानरः । सुग्रीवसचिवः सोऽथ भ्राता मैंदस्य वीर्यवान् ॥ २ ॥

सम्यक् कालिन्दीकर्षण । करिता झाला संकर्षण । तयापुढें प्रताप आन । द्विविदहननादि कथावा ॥ २५ ॥ तंव पौण्ड्रकें द्वारके दूत । धाडूनि समरंगा अच्युत । निमंत्रिला ते कथा समस्त । काशीदहनान्त निरूपिली ॥ २६ ॥ पुढती संकर्षणाचें यश । पुसता झाला कुरुनरेश । सप्रेम देखूनि शुकमानस । सादर विशेष निरूपणीं ॥ २७ ॥ ज्याच्या प्रतापा नाहीं अंत । यालागीं नामें तो अनंत । प्रमाप्रमेयप्रमाणातीत । अप्रमेय यास्तव तो ॥ २८ ॥ तयाचें चरित्र ऐकें राया । श्रीशुक म्हणे कौरववर्या । द्विविदवानरें रोहिणीतनया । धर्षितां प्रळया पावला ॥ २९ ॥ द्विविदवानर म्हणसी कोण । सुग्रीवनृपाचा प्रधान । साधकबाधकोपायप्रवीण । राजमंत्रज्ञ नृपचक्रीं ॥ ३० ॥ कपियूथप मैन्दनामा । तद्भ्रंधु हा नृपोत्तमा । राक्षसकदनीं प्रतापगरिमा । प्लवंगमांमाजी श्रेष्ठ ॥ ३१ ॥ म्हणसी रामदळींचा वीर । तरी तो असावा निर्जर । विष्णुपक्षीं असतां वैर । करी कां वानर कृष्णेंसीं ॥ ३२ ॥ तरी त्या वैरासि हेतु राया । ऐकें सादर होवोनियां । द्विविदा आणि भूमितनया । सख्य होतें सुस्निग्ध ॥ ३३ ॥ स्वधामा गेलिया रामचंद्र । सवें गेले थोर थोर । मागें राहिले जे वानर । ते ते कान्तारपति झाले ॥ ३४ ॥ मेरुहिमाचळकान्तारीं । द्विविदवानर क्रीडा करी । प्राग्जोतिषपुरान्तरीं । नरकासुर नांदतसे ॥ ३५ ॥ भौमासुराचें नाम नरक । द्विविदा तया परम सख्य । एकें वीण अंध एक । स्नेहाधिक्यास्तव होती ॥ ३६ ॥ कृष्णें मारिला नरकासुर । मित्रकैपक्षें वानर । क्षोभूनि हरीसीं चाळी वैर । तेंही समग्र अवधारा ॥ ३७ ॥

सख्युः सोऽपचितिं कुर्वन्वानरो राष्ट्रविप्लवम् । पुरग्रामाकरान्घोषानदहद्वह्निमुत्सृजन् ॥ ३ ॥

आपुल्या सख्याचा घ्यावया सूड । वानरें अहंकार धरिला दृढ । अद्भुत करूनियां कैवाड । पीडा उदंड करी जनां ॥ ३८ ॥ उपप्लवें भंगी देश । पुरें पट्टणें ग्राम घोष । जाळी चेतवूनि हुताश । म्हणे कृष्णास जा सांगा ॥ ३९ ॥ कृष्णें मारिला भौमासुर । द्विविदनामा मी त्याचा मित्र । करीन मित्राचा प्रतिकार । देश समग्र भंगूनी ॥ ४० ॥ देश जाळूनि ऐसिया हाका । मारूनि स्वनाम प्रकटी लोकां । याहूनि चंडविघ्नें देखा । करी तें ऐका श्लोकोक्त ॥ ४१ ॥

क्वचित्स शैलानुत्पाटच तैर्देशान्समचूर्णयत् । आनर्तान्सुतरामेव यशस्ते मित्रहा हरिः ॥ ४ ॥

भौमासुराचा घातक । मित्रहंता तो यदुनायक । त्याचे देशींचे जाची लोक । दुःखें अनेक देऊनी ॥ ४२ ॥ पर्वत उपडूनि महाथोर । नगरां पुरांवरी प्रहार । पर्वतप्रहारें प्राणी समग्र । करी चकचूर राष्ट्राचा ॥ ४३ ॥ विशेष आनर्तदेशाच्या ठायीं । मित्रहंता राहतो पाहीं । म्हणोनि प्रचंड-पर्वतघायीं । देश सपायीं चूर्ण करी ॥ ४४ ॥

क्वचित्समुद्रमध्यस्थो दोर्भ्यामुत्सृज्य तज्जलम् । देशान्नागायुतप्राणो वेलाकुलानमज्जयत् ॥ ५ ॥

उपामंडळ सौराष्ट्रदेश । प्राची सरस्वती प्रभास । समुद्रतीरींच्या पुरग्रामास । बुडवी निःशेष जळवर्षें ॥ ४५ ॥ दहा सहस्र गजांचें बळ । जळीं राहोनि उपसी जळ । मुसळप्राय जळकल्लोळ । वर्षतां सकळ जन बुडती ॥ ४६ ॥ पुरें पट्टणें ग्रामें नगरें । दुर्गम दुर्गें क्षेत्रें थोरें । घोष पल्लिका अग्रहारें । बुडवी निकरें जळलोटें ॥ ४७ ॥ उडवी सागरजळ अंबरीं । तें वर्षतां मुसळधारीं । देशा होय महामारी । बुडती सागरीं वाहूनी ॥ ४८ ॥ समुद्रापासूनि कांहीं दूर । राहती थोर थोर मुनिवर । त्यांतें त्रासी परमक्रूर । तोही प्रकार अवधारीं ॥ ४९ ॥

आश्रमानृषिमुख्यानां कृत्वा भग्नवनस्पतीन् । अदूषयच्छकृन्मूत्रैरग्नीन्वैतानिकान्खलः ॥ ६ ॥

महर्षिमुख्य तपस्वी थोर । त्यांचे आश्रम मनोहर । तेथ प्रवेशूनि वानर । करी संहार वृक्षांचा ॥ ५० ॥ आश्रमाभोंवतीं वनोपवनें । पुष्पवाटिका देवायतनें । वापीकूपतडागजीवनें । यज्ञायतनें मखशाळा ॥ ५१ ॥ वृक्ष उन्मळी महाप्रबळ । केलीं पुष्पें वनें निर्मूळ । कुत्सित करी निर्मळ जळ । लावी अनळ उटजांतें ॥ ५२ ॥ आहवनीयादिअग्निकुंडीं । हगे मुते लेंडें सांडी । तापसांची धरूनि शेंडी । मुरडी बोंडी घ्राणाची ॥ ५३ ॥ कानीं धरूनि उचली एकां । घ्राणामाजी फुंकी फुंका । गुतगुलिया करूनि बायकां । धर्षी मुखा विचकूनी ॥ ५४ ॥ ऐशा अनेक वानरचेष्टा । करूनि तापसां

वोपी कष्टां । करुणा नयेचि त्या पापिष्ठा । मुनिवरिष्ठा श्रम देतां ॥ ५५ ॥ म्हणसी श्रम दे कोणे परी । निर्दय कुविद्या वानरी । कुरुभूपाळा श्रवण करीं । शुकवैखरी वर्णितसे ॥ ५६ ॥

पुरुषान्योपितो दृप्तः क्ष्माभृद्द्रोणी गुहासु सः । निक्षिप्य चाप्यधाच्छैलैः पेशस्कारीव कीटकम् ॥ ७ ॥

पुरुष योपिता एके शयनीं । उन्मत्त त्यांतें ने उचलूनी । पर्वत दरीगुहास्थानीं । ठेवी कोंडूनि शिळानिचयीं ॥ ५७ ॥ अपर वनिता अपर पुरुष । अकस्मात ने उचलूनि त्यांस । पर्वतदरकुटीं विवरीं वास । करवी द्वारास झांकूनी ॥ ५८ ॥ पर्वत नेऊनि ठेवी द्वारीं । कीटकाप्रति जैसी भ्रमरी । सदनीं कोंडूनि स्वेच्छाचारीं । विचरे बाहेरी नैर्घृण्यें ॥ ५९ ॥ वानराचें उन्मत्तपण । तें तूं राया करीं श्रवण । आश्रम केले सदूपण । वनिता छळण अवधारीं ॥ ६० ॥

एवं देशान्विप्रकुर्वन्दूषयंश्च कुलस्त्रियः । श्रुत्वा सुललितं गीतं गिरिं रैवतकं ययौ ॥ ८ ॥

एवं पूर्वोक्तप्रकारीं । प्रकर्षें विघ्नें देशावरी । करूनि प्रजांची बोहरी । तपस्वी भारी पीडियेले ॥ ६१ ॥ कुलस्त्रियांचीं वस्त्रें हरणें । बलात्कारें करी छळणें । पुरुषां देखतां त्यांसीं रमणें । गिरिकाननें फिरवी त्यां ॥ ६२ ॥ जळीं निर्जळीं वनोदरीं । गिरिगह्वरीं गुहान्तरीं । वनिता नेवोनि बलात्कारीं । क्रीडा वानरी करी त्यांसीं ॥ ६३ ॥ ऐसा अन्याय झाला फार । तेणें करपला सुकृताङ्कुर । धर्मगोपक जगदीश्वर । क्षोभे सत्वर साक्षित्वें ॥ ६४ ॥ उन्मत्तपणें वानर बळी । देश बुडवी समुद्रजळीं । कित्येक रगडिले पर्वतातळीं । जाळूनि धुळी मेळविले ॥ ६५ ॥ विध्वंसिले मुनिआश्रम । भंगिले सफळित दिव्य द्रुम । मोडिले पतिव्रतांचे नेम । बळें दुष्कर्म करूनिया ॥ ६६ ॥ ऐसा उन्मत्त वानर द्विविद । अन्याय आचरला बहुविध । तेणें हृदयस्थ ईश्वर सद्य । दुर्बुद्धिप्रद झाला पैं ॥ ६७ ॥ पतिव्रता गिरिकंदरीं । नेऊनि छळितां बलात्कारीं । तंव अकस्मात सप्तस्वरी । गीतमाधुरी ऐकियेली ॥६८॥ सुललित ऐकूनि गायन । सप्तस्वरीं तानमान । तेणें मोहित झालें मन । ध्वनि लक्षूनि निघाला ॥६९॥ सुगंध लक्षूनि धांवे भ्रमर । तैसाचि ध्वनिमार्गें वानर । गायनीं लोधूनियां सत्वर । रैवताद्रीतें पातला ॥ ७० ॥ तेथें जाऊनि पाहिलें काय । तो ऐकावा अभिप्राय । वक्ता सर्वज्ञ योगिराय । कथिता होय तें ऐका ॥ ७१ ॥

तत्रापश्यद्यदुपतिं रामं पुष्करमालिनम् । सुदर्शनीयसर्वांगं ललनायूथमध्यगम् ॥ ९ ॥

द्विविद पाहे जंव रैवतीं । तंव तो बळभद्र यादवपति । पंकजमाळा कंठीं रुळती । सुष्ठुकान्ति दर्शनीय ॥ ७२ ॥ पहावया योग्य तनु । लावण्यमंडित नवयौवन । ललनायूथीं विद्यमान । त्यातें देखोनि कपि खवळे ॥ ७३ ॥ पुन्हा त्यातें कोणे परी । देखता झाला द्विविद हरि । तें परिसिजे श्रोतीं चतुरीं । मुनिवैखरी कुरुपतिवत् ॥ ७४ ॥

गायंतं वारुणीं पीत्वा मदविह्वललोचनम् । विभ्राजमानं वपुषा प्रभिन्नमिव वारणम् ।। १० ।।

वरुणप्रहिता मदिरा वारुणी । तीव्र जीची उन्मादकरणी । बळभद्र तियेतें प्राशूनी । सुललित-गायनीं निमग्न ।। ७५ ।। मदिरामदें घूर्णित नयन । स्वशरीरें विराजमान । जैसा मदोन्मत्त वारण । संकर्षण तेंवि डुल्ले ।। ७६ ।। वारुणीमदिरामद शरीरीं । सुललितगायन ललनानिकरीं । करीत असतां द्विविद हरि । त्यातें नेत्रीं अवलोकी ।। ७७ ।। आंगीं ऐश्वर्यप्रताप पूर्ण । मदिरामदाचें घूर्णितपण । कामिनीकंदर्पकेलिप्रवीण । निर्भय गायन करीतसे ।। ७८ ।। देखूनि ऐसिया बळरामातें । द्विविदवानरें येऊनि तेथें । न साहोनि तत्क्रीडेतें । करी चेष्टांतें त्या ऐका ।। ७९ ।।

दुष्टः शाखामृगः शाखामारूढः कंपयन्द्रुमान् । चक्रे किलकिलाशब्दमात्मानं संप्रदर्शयन् ।। ११ ।।

परम दुष्ट शाखामृग । शाखिशाखांवरी सवेग । वेंघूनि घुलकावी भ्रूभंग । तंवकें निजाङ्ग उफाळवी ।। ८० ।। एके द्रुमीं न राहे स्थिर । अवघे काननींचे तरुवर । वेंघूनि कांपवी थरथर । निर्भय वानर आंगबळें ।। ८१ ।। डोळे मिचकावूनि घुलकावी । उफाळूनियां वांकुल्या दावी । खिखाटें भुभुकारें वानरभावीं । कुसी खांजवी गगनाक्ष ।। ८२ ।। उडी घालूनि निकटवृक्षीं । गगन लक्षूनि खांजवी कुक्षी । पत्रें फळें डांसळी भक्षी । वनितावक्षीं झेंपावें ।। ८३ ।। किलकिलाटें करी शब्द । रामेंसहित वनितावृंद । त्यातें आपणा दावी विशद । विटावी रद विचकूनी ।। ८४ ।। फुंपाटें पिंजारी नासिका । मागें सरोनि पुढिली शाखा । उफाळूनियां कवळी देखा । देखूनि बायका हांसती ।। ८५ ।। रामा भोंवता ललना-वृंद । कंदर्पकेली हास्यविनोद । करितां देखोनि तिन्हीं द्विविद । हांसती खदखद तें ऐका ।। ८६ ।।

तस्य धाष्टर्यं कपेर्वीक्ष्य तरुण्यो जातिचापलाः । हास्यप्रिया विजहसुर्बलदेवपरिग्रहाः ।। १२ ।।

स्वभावें चपळा अबळा तरुणा । देखूनि कपीच्या धीटपणा । बळरामेंसी उदितरमणा । त्या हासती दशना प्रकाशूनी ।। ८७ ।। हास्यप्रिया नवयौवना । निर्भय रामकामाङ्गना । कपिचेष्टित देखूनि नाना । सस्मितवदना विलोकिती ।। ८८ ।। रामेंसहितरामानिचय । हांसता वानर करी काय । तोही कथितों अभिप्राय । सादर होई कुरुवर्या ।। ८९ ।।

ता हेलयामास कपिर्भ्रूक्षेपैः संमुखादिभिः । दर्शयन्स्वगुदं तासां रामस्य च निरीक्षतः ।।१३ ।।

रामपरिग्रह वनितानिकर । त्यांची हेलना करी बानर । अधोर्ध्व भ्रूभंग चाळूनि वक्र । दात करकर खावूनी ।। ९० ।। पुढें उकावे झोंबावया । सवेंचि फिरे मागिल्या ठायां । आपुली तांबडी गांडी तया । दावूनियां खांजवी ।। ९१ ।। वनितां सहित वनजमाळी । वानरचेष्टा मुसळी हली । देखूनि धर्षिता झाला उपळीं । श्रोतीं सकळीं परिसावें ।। ९२ ।।

तं ग्राव्णा प्राहरत्क्रुद्धो बलः प्रहरतां वरः । स वंचयित्वा ग्रावाणं मदिराकलशं कपिः ।
गृहीत्वा हेलयामास धूर्तस्तं कोपयन्हसन् ॥ १४ ॥

बळभद्र होवोनि क्रोधायमान । टाकी वानरावरी पाषाण । ज्याचें अचुक करप्रहरण । वर प्रहरता यास्तव तो ॥ ९३ ॥ परन्तु वानर समरशाली । वरिष्ठ योद्धा प्लवंगमदळीं । राक्षससमरीं न डंडळी । तो ते काळीं काय करी ॥ ९४ ॥ रामहस्तींचा पाषाणप्रहार । त्यातें चुकवूनि अतिसत्वर । मदिराकलश घेऊनि क्रूर । हांसे वक्र विकासुनी ॥ ९५ ॥ तटतटां उडे ठायीं ठायीं । हेलना करूनि हांसे पाहीं । क्रोध उपजवी रामादेहीं । न पळे पाहीं दटावितां ॥ ९६ ॥ झोंबों धांवे वनितांकडे । तोंड करूनियां वांकुडें । रामा वांकुल्या दावी कोडें । निर्भय पुढें पुढें पिळंगे ॥ ९७ ॥ राम दटावी वानरा वारी । वानर त्याची अवज्ञा करी । वनिता बळेंचि धरी पदरीं । तें अवधारीं कुरुपाळा ॥ ९८ ॥

निर्भिद्य कलशं धृष्टो वासांस्यास्फालयद्बलम् । कदर्थीकृत्य बलवान्विप्रचक्रे मदोद्धतः ॥ १५ ॥

राम दटावी वानरा धृष्टा । तो रामेंसी करी चेष्टा । कलश घेऊनि उडे तटतटां । न गणी श्रेष्ठा धृष्टत्वें ॥ ९९ ॥ अकस्मात रामापुढें । मदिराकलशाचे केले तुकडे । मद्य विखुरलें चहूंकडे । सवेग उडे तेथूनी ॥ १०० ॥ रामरमणी नवयौवना । धांवोनि झोंबे त्यांचिया वसना । हिसकूनि करूं पाहे नग्ना । संकर्षणा न गणूनी ॥ १ ॥ राम धांवे वानरा वारूं । तंव तो त्यावरी करी गुरगुर । झोंबूनि त्रासी वनितानिकर । नावरे अनावर धृष्टत्वें ॥ २ ॥ कदर्थी करूनि बळरामासी । त्या देखतां तद्वनितांसी । फाडूनि वसना कंचुकियांसी । अवयवांसी बोचकरी ॥ ३ ॥ बळिष्ठ वानर मदोन्मत्त । रामा आंगबळें न गणित । रामरमणी त्रासिल्या बहुत । अपकार उद्धट आचरला ॥ ४ ॥ कंदर्पक्रीडेसी केलें विघ्न । रामेंसहित वनितामन । झालें ते काळीं उद्विग्न । म्हणती दारुण कपि नोहे ॥ ५ ॥

तं तस्याविनयं दृष्ट्वा देशांश्च तदुपद्रुतान् । क्रुद्धो मुसलमादत्त हलं चारिजिघांसया ॥ १६ ॥

वानर नव्हे हा वनचर । कोणी दैत्यवेषधर । म्हणती भंगिलें जेणें राष्ट्र । तो हा मावकर दुरात्मा ॥ ६ ॥ प्रलंब जैसा गोपाळवेषी । अश्वरूप नटला केशी । तैसाचि हाही भगवद्द्वेषी । देशोदेशीं जनहंता ॥ ७ ॥ दिसतो सामान्य पारखा मृग । परि हा रणकर्कश अभंग । मुनिआश्रमा केला भंग । त्रासिलें जग उपसर्गें ॥ ८ ॥ प्राकृता सामान्य गोळाङ्गुळा । समान पातला रैवताचळा । वानरीचेष्टामिषें बळा । येऊनि अबळा धर्षितसे ॥ ९ ॥ आमुची करूनियां अवगणना । ओढी वनितांचिया वसना । दुष्ट चेष्टा करी नाना । मुकेल प्राणा मम हस्तें ॥ ११० ॥ अविनय त्याचा देखूनि ऐसा । क्रोध चढला यादवेशा । नांगर मुसळ त्याचिया नाशा । घेऊन सहसा उठावला ॥ ११ ॥ देखूनि रामाचा उत्कर्ष । वानरें धरिला समरावेश । श्रोतीं होवूनि सावकाश । तो रस अशेष परिसावा ॥ १२ ॥

द्विविदोऽपि महावीर्यः शालमुद्यम्य पाणिना । अभ्येत्य तरसा तेन बलं मूर्द्धन्यताडयत् ॥ १७ ॥

सुनंद मुसळ संवर्त हळ । परजूनि उठिला देखूनि बळ । द्विविदें उपडूनि महाशाळ । उचलूनि तत्काळ लोटला ॥ १३ ॥ बळें उचलोनि दोनी हातें । बलरामाच्या मस्तकावरुतें । हणिता झाला शालघातें । शक्र गिरीतें जेंवि वज्रें ॥ १४ ॥ दांत खाऊनियां करकरां । शाल भवंडूनियां गरगरां । मस्तकीं हाणी रोहिणीकुमरा । येरु प्रतिकारा काय करी ॥ १५ ॥

तं तु संकर्षणो मूर्ध्नि पतंतमचलो यथा । प्रतिजग्राह भगवान्सुनंदेनाहनच्च तम् ॥ १८ ॥

जैसा प्रचंड पर्वतापरी । शालप्रहार पडतां शिरीं । लाङ्गलें वळूनि वरिच्यावरी । सुनंद प्रहारी द्विविदातें ॥ १६ ॥ मुसळघात बैसतां शिरीं । द्विविद उभाच नाहला रुधिरीं । वज्रप्रहारें जैसा गिरि । भंगोनि भूवरी जळ वाहे ॥ १७ ॥ अक्षय वीजविहिऱ्याचें नीर । तेंवि द्विविदमस्तकींचें रुधिर । धारा लागली निरंतर । तेणें वानर न डंडळी ॥ १८ ॥

मुसलाहतमस्तिष्को विरेजे रक्तधारया । गिरिर्यथा गैरिकया प्रहारं नान्वचिंतयत् ॥ १९ ॥

जैसी सरळ गिरीच्या शिरीं । गैरिका वाहे मेघधारीं । तैसा रामाच्या मुसळप्रहारीं । द्विविद रुधिरीं शोभतसे ॥ १९ ॥ गैरिकेकरूनि शोभे गिरि । तैसाचि वानर रुधिरधारीं । विराजला तैं परंतु समरीं । त्रास न धरी अणुमात्र ॥ १२० ॥ पक्कोदुम्बरफळाच्या घातें । कुञ्जर कुम्भस्थळीं निघातें । ताडिला असतां न मनी व्यथे । निर्भयचित्तें तेंवि कपि ॥ २१ ॥

पुनरन्यं समुत्क्षिप्य कृत्वा निष्पत्रमोजसा । तेनाहनत्सुसंक्रुद्धस्तं बलः शतधाऽच्छिनत् ॥ २० ॥

ओजसा म्हणिजे प्रचंडबळें । पुढती दुसरा गोळाङ्गुळें । शाळ विशाळ तिये विळे । आवेश-बहळें उन्मळिला ॥ २२ ॥ मोडूनि टाकिला अग्रभाग । साळूनि निष्पत्र केला साङ्ग । तेणें रामाचें उत्तमाङ्ग । क्रोधें सवेग ठोकिलें ॥ २३ ॥ रामें शालद्रुमाप्रति । शतधा छेदूनि पाडिला क्षिती । तेणें द्विविद वीरवृत्ति । महानिघातीं प्रवर्तला ॥ २४ ॥

ततोऽन्येन रुषा जघ्ने तं चापि शतधाऽच्छिनत् । एवं युध्यन्भगवता भग्ने भग्ने पुनः पुनः ॥
आकृष्य सर्वतो वृक्षान्निर्वृक्षमकरोद्वनम् ॥ २१ ॥

पुढती तिसरा उपडूनि शाळ । क्षोभें ताडिला बळाचा मौळ । येरें परजूनियां मुसळ । केला तत्काळ शतखंड ॥ २५ ॥ वानरयुद्धाचिया रीती । लंके सम्मुख राक्षसांप्रति । निर्दाळिलें वृक्षघातीं ।

शिळाजीमूत वर्षोनी ॥ २६ ॥ तया प्रकारें ये अवसरीं । भिडे रामेंसी वृक्षप्रहारीं । तंव तो षड्गुणैश्वर्यधारी । वानरसमरीं न डंडळी ॥ २७ ॥ जो जो वृक्ष प्लवंगम । टाकी तो तो भंगी राम । तेणें द्विविद विजयकाम । क्षोभे निस्सीम आवेशें ॥ २८ ॥ वृक्षांपाठीं टाकी वृक्ष । राम भंगी साधूनि लक्ष । ऐसे मोडिले लक्षें लक्ष । केलें निर्वृक्ष वन अवघें ॥ २९ ॥ जे जे टाकिले तरुवर । रामें केले ते शतचूर । वानरें आवेश धरिला क्रूर । मग प्रस्तर निक्षेपी ॥ १३० ॥

ततोऽमुंचच्छिलावर्ष बलस्योपर्यमर्षितः । तत्सर्वं चूर्णयामास लीलया मुसलायुधः ॥ २२ ॥

सक्रोध वानर आवेशा चढे । झडझडां मारी शिळा धोंडे । मुसळघातें त्यांचे तुकडे । करी रोकडे बलभद्र ॥ ३१ ॥ जैसा संवर्तकमेघगण । करावया विश्वसंहरण । वर्षे त्यापरी पाषाण । दावी आंगवण द्विविदकपि ॥ ३२ ॥ कोपें खवळूनि अधिकतर । एकसमयीं शिळा सहस्र । गगनीं उडोनि करी प्रहार । त्या भंगी बलिभद्र निमिषार्धें ॥ ३३ ॥ मुसळें शिळा चूर्ण करी । निर्भय बलराम अंतरीं । तेणें वानरा क्रोध भारी । पुढती धरी आवेश ॥ ३४ ॥ शिळापरिणाह गव्यूतिमात्र । ऐसे प्रस्तर दीर्घतर । बलरामावरी सहस्रेंसहस्र । टाकूनि भुभुःकार करी कपि ॥ ३५ ॥ लघुलाघवें मुसलपाणि । शिळाचूर्ण उधळी गगनीं । निश्चळ निर्भय अंतःकरणीं । हास्य वदनीं करीतसे ॥ ३६ ॥ मग वानरें शिलायुद्ध । सोडूनि आवेशें प्रसिद्ध । अंगसंघट्टना झाला सिद्ध । तेंही विशद अवधारा ॥ ३७ ॥

स बाहू तालसंकाशौ मुष्टीकृत्य कपीश्वरः । आसाद्य रोहिणीपुत्रं ताभ्यां वक्षस्यरूरुजत् ॥ २३ ॥

अपर कपींमाजी ईश्वर । म्हणोनि म्हणिजे कपीश्वर । द्विविदनामा महावीर । क्रोधें दुर्धर उठावला ॥ ३८ ॥ तालाऐसे बाहु दोन्ही । वज्रमुष्टि वळूनि पाणि । रोहिणीपुत्रातें धांवूनी । हृदयस्थानीं ताडिलें ॥ ३९ ॥ जैसे इन्द्राचे वज्रप्रहार । साहे मंदराद्रि कठोर । तैसा अचळ बळभद्र । मुष्टिप्रहारें न डंडळी ॥ १४० ॥ मुष्टिप्रहार ओपिते काळीं । सहज वानर पातला जवळी । राम प्रतापी समरशाळी । धरी ते काळीं तें ऐका ॥ ४१ ॥

यादवेंद्रोऽपि तं दोर्भ्यां त्यक्त्वा मुसललांगले । जत्रावभ्यर्दयत् क्रुद्धः सोऽपतद्रुधिरं वमन् ॥ २४ ॥

यादवीं वरिष्ठ जो बळभद्र । यालागीं म्हणती यादवेन्द्र । तेणें मुसळ आणि नांगर । टाकूनि सत्वर कपि धरिला ॥ ४२ ॥ बाहुकंठाचे जे संधि । जत्रु त्यां म्हणिजे गीर्वाणशब्दीं । उभयाङ्गुष्ठतर्जनीमधीं । धरूनि निरोधी बळ कपीतें ॥ ४३ ॥ सक्रोध राम रगडी जत्रा । तेणें वानरा निर्वाणयात्रा । कर पद खोडूनि वमी रुधिरा । विवर्णवक्त्रा विकासी ॥ ४४ ॥ प्राणप्रयाणाचिये वेळे । वटारिले भयंकर डोळे । कर पद ज्ञातांती बेंबळे । देहीं मावळे स्मृतिचक्र ॥ ४५ ॥ जत्रु रगडितां नाकीं तोंडीं । लागली रक्ताची मुसाण्डी । गांडीवाटे लेंडें सांडी । निघाली नाडी प्राणांची ॥ ४६ ॥

माकड मारिलें पाला हगलें । तें बलरामें साच केलें । द्विविदें प्राण विसर्जिले । येरें सोडिलें शव त्याचें ॥ ४७ ॥ वानरकलेवर पृथ्वीवरी । पडतां झाली कैशी परी । कुरुशार्दूला तें अवधारी । वदे वैखरी वाशिष्ठि ॥ ४८ ॥

चकपे तेन पतता सटंकः सवनस्पतिः । पर्वतः कुरुशार्दूल वायुना नौरिवांभसि ॥ २५ ॥

द्विविदशरीर पडतां स्थूळ । थरथरां कांपला रैवताचळ । टांकी म्हणिजे विवरें सजळ । सहित विशाळ वनस्पति ॥ ४९ ॥ तरुवल्ली वीरुध लता । सानुशिखरांसह पर्वता । कंप झाला तो सांगतां । वाटे चित्ता आश्चर्य ॥ १५० ॥ प्रचंड वायु झगटतां नौका । माजी थरकते समुद्रोदका । तैसाचि रेवताचळही देखा । सकंप शाखामृगपतनें ॥ ५१ ॥ द्विविद नव्हे तो वानर । रामदळींचा महावीर । पडतां तयाचें शरीर । प्रचंड भूधर कांपिन्नला ॥ ५२ ॥ लाङ्गलिगोलाङ्गुळांच्या कदनीं । पाहूं पातले पीयूषपानी । गगनीं दाटल्या विमानश्रेणी । त्यां ते क्षणीं उत्साह ॥ ५३ ॥

जयशब्दो नमःशब्दः साधु साध्विति चांबरे । सुरसिद्धमुनीद्राणामासीत्कुसुमवर्षिणाम् ॥ २६ ॥

विजय होतां बळरामाचा । जयजयकार करिती वाचा । घोष गाजविती स्तवनाचा । नमो नमस्ते या शब्दीं ॥ ५४ ॥ साधु साधु भला भला । इहीं शब्दीं बळरामाला । पूजिती तो रव गगनीं भरला । विशद कथिला जातसे ॥ ५५ ॥ सुरवर गर्जती जयजयकारीं । सिद्ध स्तविती नमस्कारीं । साधुशब्दें ऋषीश्वरीं । प्रलम्बारी पूजियला ॥ ५६ ॥ तेव्हां बळभद्राचिये मुकुटीं । मुनिसुरासिद्धीं कुसुमवृष्टि । करितां सुगंधें भरली सृष्टि । वनिता दृष्टी विलोकिती ॥ ५७ ॥ ऐसा द्विविद मर्दूनि राम । विजयी झाला पूर्णकाम । देखोनि वनिता ससंभ्रम । कवळिती सकाम होत्सात्या ॥ ५८ ॥ कंदर्पविलासविहार पूर्ण । स्वेच्छा करूनि संकर्षण । परतला तें निरूपण । सावधान अवधारा ॥ ५९ ॥

एवं निहत्य द्विविदं जगद्व्यतिकरावहम् । संस्तूयमानो भगवाञ्जनैः स्वपुरमाविशत् ॥ २७ ॥

एवं म्हणिजे पूर्वोक्तपरी । द्विविदवानर मारूनि समरीं । द्वारका प्रवेशला सीरी । उत्साहगजरीं स्तुतिस्तवनीं ॥ १६० ॥ व्यतिकरशब्दें बोलिजे नाश । तत्कर्मीं ज्या विशेष हर्ष । ऐसिया द्विविद वानरास । मारूनि त्रिजगास तोषविलें ॥ ६१ ॥ तेणें जनांसी उत्साह भारी । म्हणती रामें मारिला वैरी । देश त्रासिले येणें भारी । छळिल्या नारी पतिव्रता ॥ ६२ ॥ आजि हृद्रोग जनांचा शमला । कंटक काळजांतील उपडला । रामें द्विविदवानर वधिला । त्रिजगा झाला उत्साह ॥ ६३ ॥ धन्य रामा रेवतीरमणा । भला भला गा संकर्षणा । प्रतापवंता प्रलम्बघ्ना । यमुनाकर्षणा सुरपूज्या ॥ ६४ ॥ वासुदेवाग्रजा रामा । सीरपाणि पवित्रनामा । हली मुसळी कल्याणकामा । कामपाळा तालाङ्का ॥ ६५ ॥ इत्यादि सुललित संबोधनीं । रामा स्तविती अनेक स्तवनीं । जनपदवेष्टित द्वारकाभुवनीं । लाङ्गल-

पाणि प्रवेशला ॥ ६६ ॥ ऐसें विशुद्ध रामयश । त्रिजग भरित नित्य निर्दोष । ऐकोनि तोषला कुरु-नरेश । पुन्हां विशेष श्रवणेच्छु ॥ ६७ ॥ ऐशी श्रीमद्भागवतीं । अठरा सहस्र श्लोकगणती । पारमहंसी संहिता म्हणती । शुकपरीक्षितिसंवाद ॥ ६८ ॥ त्यांतील हा दशमस्कंध । अध्याय सप्तषष्टितम प्रसिद्ध । रामें केला द्विविदवध । तें आख्यान विशुद्ध संपविलें ॥ ६९ ॥ श्रीएकनाथ प्रतिष्ठानीं । विद्वद्वृंद-चूडामणि । त्याचें सेवूनि पायवणी । महाराष्ट्रवाणी हरिवरदा ॥ १७० ॥ वाखाणिली दयार्णवें । श्रोतीं परिसतां सद्भावें । भोगिती अक्षयें साम्राज्यविभवें । सद्गुरुसेवे निवटोनि ॥ ७१ ॥ पिपीलिका-पुरीं वसति । करूनि व्याख्यान यथामति । निरूपिलें तें परिसोनि श्रोतीं । गुरुपदभक्ति मज द्यावी ॥ ७२ ॥
इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां रामचरिते द्विविदवानरवधोनाम सप्तषष्टितमोऽध्यायः ॥६७॥

पिंगलाब्दे ज्येष्ठशुक्ले द्वितीयाभानुवासरे ।
पिपिलिकापुरे पूर्ण द्विविदाख्यानमुत्तमम् ॥

श्लोक २७ ॥ ओवी-संख्या १७२ ॥ एवं संख्या १९९ ॥
(सहासष्टावा अध्याय मिळून ओवीसंख्या ३१२९०)

सदुसष्टावा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ६८ वा

श्रीकृष्णपरमात्मने नमः ॥ जय जय वीरश्रीवल्लभा । जय जगज्जनका पंकजनाभा । नमनें नाशक भवभ्रमकोंभा । वैराग्यलाभा लाभवुनी ॥ १ ॥ तव पदपंकजप्रणतिमात्रें । प्रज्ञाप्रकाश लाहनि वक्त्रें । निसंत्रिलीं सद्गुणपात्रें । भगवच्चरित्रें परिसावया ॥ २ ॥ सप्तषष्टीपर्यंत कथा । शुकें कथिली कौरवनाथा । अष्टषष्टीमाजी आतां । वर्णीं तत्वता बळविजय ॥ ३ ॥ कैसा विजय केला कोठें । ऐसा प्रश्न करणें घटे । तरी संक्षेपें श्रवणपुटें । सप्रेमनिष्ठें परिसावें ॥ ४ ॥ साम्बें दुर्योधनाची तनया । स्वयंवरीं हरिली पाहतां राया । कौरवीं जिंकूनि रोधिलें तया । हें यदुवर्या श्रुत झालें ॥ ५ ॥ ऐकूनि यादव चढले क्षोभा । म्हणती कौरवगर्वकोंभा । खंडूनि समरीं काढूं शोभा । प्रकटूं प्रभा शौर्याची ॥ ६ ॥ तयां वारूनि रेवतीरमण । करूं गेला स्नेहरक्षण । कौरवें करितांचि हेळण । मग संपूर्ण क्षोभला ॥ ७ ॥ पालथें घालीन हस्तिनापुर । म्हणूनि नांगरें भेदिले वप्र । चडळ उचटितां हाहाकार । झाला अपार पुरगर्भीं ॥ ८ ॥ भीष्मप्रमुख कौरव सकळ । शरण होवूनि नमिती बळ । नेईं म्हणती स्नुषा बाळ । रक्षीं कुरुकुळ कृपाळुवा ॥ ९ ॥ इतुकी कथा ये अध्यायीं । परीक्षितीच्या श्रवणालयीं । शुकें कथिली ते समयीं । आनंददायी सेवावी ॥ १० ॥

श्रीशुक उवाच—

दुर्योधनसुतां राजन्लक्ष्मणां समितिंजयः । स्वयंवरस्थामहरत्सांबो जांबवतीसुतः ॥ १ ॥

शुक म्हणे गा कुरुवरिष्ठा । हरिगुणश्रवणा एकनिष्ठा । सुयोधनतनया जे बरवंटा । लावण्यचोहटा वररत्न ॥ ११ ॥ सौन्दर्यरसाची पूतळी । मनसिजमानसभवमराळी । कामाङ्गनेची विलासकेली । लावण्यजलमयसुखसरिता ॥ १२ ॥ सर्व शुभलक्षणें संपन्ना । यालागीं नामें ते लक्ष्मणा । अधिष्ठितां

नवयौवना । स्वयंवररचना आदरिली ॥ १३ ॥ पत्रें देऊनि भाटवार्तिक । ब्राह्मण उपाध्ये ग्रामयाजक । धाडूनि भूपति अनेक । प्रार्थिले कौतुक पहावया ॥ १४ ॥ दुर्योधनसुता नोवरी । लावण्यरसाची माधुरी । पार्थिवीं ऐकोनि पृथ्वीवरी । आले झडकरी स्वयंवरा ॥ १५ ॥ अंगवंगकलिंगप्रमुख । त्रिपुर कामरूप कामाक्ष । पर्वतवासी भूप अनेक । मिनले कौतुक पहावया ॥ १६ ॥ काश्मीर गौड गुर्जर मद्र । कैकेय कोसल चैद्य माथुर । मालव सैन्धव सुह्म सौराष्ट्र । मैथिल औत्किल नृप आले ॥ १७ ॥ माण्ड्य पाण्ड्य माण्डलिक । हैहय पाञ्चाळ मागधप्रमुख । नैषध विदर्भ वेणुदारिक । आले सकळिक महाराष्ट्र ॥ १८ ॥ आन्ध्र द्रविड केरळ । कर्णाटक तैलंग तिगळ । चौळ मल्याळ सिंहळ । पावळ मावळ वैराट ॥ १९ ॥ एवमादि समस्त राजे । स्वयंवरा आले नोवरीकाजें । कौरवीं सम्मानूनि त्यां वोजें । नृपसमाजीं बैसविलें ॥ २० ॥ मंगळतुरांचे बोभाट । बिरुदें पढती नृपांचे भाट । वंदिमागध-स्तोत्रपाठ । सभा घनदाट विराजली ॥ २१ ॥ शृंगारूनियां नोवरी । वेष्टित सखियांच्या परिवारीं । जैशा गौरीतें किन्नरी । तेंवि किङ्करी वोळगती ॥ २२ ॥ घेऊनि रत्नदंडी चामरें । उभयभागीं ऊर्ध्वकरें । किङ्करी वारिती अपरा चीरें । सूक्ष्म सपूरें विराजती ॥ २३ ॥ वेत्रपाणि चेटिकावर्ग । पुढें कौतुकें सूचिती मार्ग । नृपैश्वर्ये बोधिती साङ्ग । सखिया सवेग नृपतनये ॥ २४ ॥ कुळ शीळ सौन्दर्य यश । ऊर्जित ऐश्वर्य निवास देश । लक्ष्मणा परिसोनि अशेष । न घाली मानस यांमाजी ॥ २५ ॥ ऐसी पाहत असतां सभा । विरहावेश न धरे साम्बा । नोवरीची लक्षूनि शोभा । इच्छी वल्लभा करावया ॥ २६ ॥ सवेग उचलूनि दोहीं करीं । नोवरी वाहूनि निज रहंवरीं । निघता झाला पवनापरी । द्वारकापुरी लक्षूनी ॥ २७ ॥ साम्ब जाम्बवतीचा बाळ । समराङ्गणीं केवळ काळ । पाहत असतां सर्व भूपाळ । चालिला प्रबळ रणजेता ॥ २८ ॥ संग्रामतेजा समितिञ्जय । जाम्बवतीचा वरिष्ठ तनय । कौरवांसहित न गणूनि राय । जाया घेऊनि निघाला ॥ २९ ॥ तेणें हडबडिल्या किङ्करी । म्हणती नोवरी बलात्कारीं । वाहूनियां निज रहंवरीं । नेतो लौकरी धांवा हो ॥ ३० ॥ सभा खळबळिली संपूर्ण । क्रोधा चढिले भीष्मद्रोण । लहान थोर कौरवगण । वदती वचन तें ऐका ॥ ३१ ॥

कौरवाः कुपिता ऊचुर्दुर्विनीतोऽयमर्भकः । कदर्थीकृत्य नः कन्यामकामामहरद्बलात् ॥ २ ॥

सर्व कौरव कोपा चढले । त्यांमाजी श्रेष्ठ बोलते झाले । म्हणती आम्हां अवमानिलें । धारिष्ट केलें केवढें ॥ ३२ ॥ धीट उद्धट हा अर्भक । अल्पही आमुचा न धरूति धाक । नृपति न गणूनियां अनेक । नोवरी निःशंक नेतसे ॥ ३३ ॥ कदर्थी करूनि आम्हां सकळां । अष्टवार्षिकी कन्या अबळा । अकामा हरिली कौरवबाळा । करधृतमाळा स्वयंवरीं ॥ ३४ ॥ न विचारूनि आपुलें बळ । न गणूनि पृथ्वीचे भूपाळ । न मानूनियां कौरवपाळ । उद्धत केवळ अर्भक हा ॥ ३५ ॥ बळेंचि नेतो आमुची कन्या । ऐसिया अयोग्य सामान्या । धरूनि करा दृढबंधना । दुर्योधना अविनीता ॥ ३६ ॥

बध्नीतेमं दुर्विनीतं किं करिष्यंति वृष्णयः । येऽस्मत्प्रसादोपचितां दत्तां नो भुंजते महीम् ॥ ३ ॥

धरूनि बांधा यातें दृढ । कायसा यदुवृष्णींचा पाड । आमुच्या आश्रयें झाले वाड । मिरविती तोंड नृपांमाजी ॥ ३७ ॥ ययातिशापें जे वाळिले । कुलीननृपतींहीं हेळिले । भूपसम्मानीं गाळिले । आम्हीं पाळिले सुहृदत्वें ॥ ३८ ॥ कुन्तिभोजाची पोसणी कन्या । पृथा पाण्डूची वराङ्गना । तत्संबंधें या सामान्यां । आम्ही सम्माना मिळविलें ॥ ३९ ॥ अल्प भूखंड देऊनि यांतें । नृपांमाजी केलें सरते । विपरीत होती जैं आम्हांतें । तैं मग यांतें कोण पुसे ॥ ४० ॥ आमुच्या प्रसादें लाधले मही । तयेचें ऐश्वर्य भोगूनि इहीं । विपरीत होतां आमच्या ठायीं । पाड काई मग यांचा ॥ ४१ ॥

निगृहीतं सुत श्रुत्वा यद्येष्यंतीह वृष्णयः । भग्नदर्पाः शमं यांति प्राणा इव सुसंयताः ॥ ४ ॥

सुतातें घातलें कारागृहीं । ऐकोनि वृष्णियादवीं तिहीं । क्षोभें धांवोनि आलिया पाहीं । भग्नदर्प तेही होतील ॥ ४२ ॥ नृपांमाजी म्हणविती शूर । जंव कौरवेंसी न घडे समर । वृष्णिभोजांध दाशार्हकुकुर । विदर्प सत्वर होतील ॥ ४३ ॥ दर्प भंगल्या होतील शान्त । प्रशम पावती सुशिक्षित । पुढती धरिती विनयपथ । होती सनाथ आमुचेनी ॥ ४४ ॥ जैसीं इंद्रियें अनावरें । केलीं सुखरतींहीं घावियें । तथापि साधकें साधनें क्रूरें । करितां सत्वरें आकळती ॥ ४५ ॥ प्राणायामादियोगाभ्यास । यमनियमादिशमदमास । करितां शिक्षा इंद्रियांस । तैं प्रशमास पावती ॥ ४६ ॥ अनावर जो करणगण । त्याचें करितां सुष्ठु दमन । मग तो सम्यक् पावे पूर्ण । तैसेचि जाण यादवही ॥ ४७ ॥ न धरूनि वृष्णिपाळांची भीड । अर्भक धरूनि बांधा दृढ । ऐसें कुरुवृद्धाचें तोंड । वदतां झडझड उठावले ॥ ४८ ॥ कवच टोप बाणले वीरीं । सन्नद्ध होऊनि शस्त्रास्त्रीं । सगेग वळघले रहंवरीं । पवनापरी धांविन्नले ॥ ४९ ॥ ऐसी आज्ञा करितां भीष्में । वीर लोटले पराक्रमें । कोण कोण तयांचीं नामें । कथितों नियमें अवधारा ॥ ५० ॥

इति कर्णः शलो भूरिर्यज्ञकेतुः सुयोधनः । सांबमारेभिरे बद्धुं कुरुवृद्धानुमोदिताः ॥ ५ ॥

कर्ण कानीन कुन्तीसुत । प्रतापतेजस्वी भास्वत । बाह्लिकात्मज सोमदत्त । तत्सुत विख्यात भूरिश्रवा ॥ ५१ ॥ शल सुयोधन यज्ञकेतु । धृतराष्ट्राचे रेतोजात । कुरुवृद्ध तो गंगासुत । अपर कृतान्त समरंगीं ॥ ५२ ॥ जेणें जिंकूनि परशुराम । ब्रह्मचर्याचा रक्षिला नेम । ऐसा कुरुवृद्धनामा भीष्म । साम्बदमना उठावला ॥ ५३ ॥ महारथी हे साही जण । अपरिमित कौरवसैन्य । पाठीं धांवतां देखोन । कृष्णनंदन परतला ॥ ५४ ॥

दृष्ट्वानुधावतः सांबो धार्तराष्ट्रान्महारथः । प्रगृह्य रुचिरं चापं तस्थौ सिंह इवैकलः ॥ ६ ॥

आले देखोनि धार्तराष्ट्र । साम्बें फिरविला रहंवर । चुम्बूनि धार्तराष्ट्रीचे अधर । म्हणे भीरु भय न धरीं ॥ ५५ ॥ तुझिये सोडवणे कौरव । धनुर्विद्येचा करूनि गर्व । धांविले परंतु मी हे सर्व । करीन

अगर्व समरंगीं ॥ ५६ ॥ साम्बें ऐसी दौर्योधनी । आश्वास्नि वीरश्रीवचनीं । श्मश्रु स्पर्शोनि दक्षिण-पाणी । ठाकला रणीं महारथी ॥ ५७ ॥ जैसें अमरेन्द्रकोदंड । प्रावृटीं भासे सुरंगाढ्य । तैसें रुचिर कार्मुक दृढ । साम्बें झडकरी चढविलें ॥ ५८ ॥ रुचिर चाप घेऊनि मुष्टीं । कौरव लक्षिले दूरदृष्टी । सिंह जैसा देखे करटी । तैसा पोटीं सावेश ॥ ५९ ॥ समरीं ठाकला जैसा मेरु । अढळ अभंग महावीरु । एकला एकाकी रहंवरु । जोंवि भास्कर तमोहंता ॥ ६० ॥ तयाप्रति धार्तराष्ट्र । देखोनि लोटले अनावर । म्हणती धरा बांधा चोर । कन्या सुन्दर नेतो हा ॥ ६१ ॥ आधींच कर्म केलें खोटें । आतां पळसील कोणे वाटे । मरण ओढवलें ओखटें । दावीं मुखवटें परतोनी ॥ ६२ ॥ ऐसे सक्रोध कौरव । भोगिती शब्दाचें गौरव । साम्ब धरूं इच्छिती सर्व । समर अपूर्व तो ऐका ॥ ६३ ॥

तं ते जिघृक्षवः क्रुद्धास्तिष्ठ स्तिष्ठेति भाषिणः । आसाद्य धन्विनो बाणैः कर्णाग्रण्यः समाकिरन् ॥ ७ ॥

कोठें पळसी उभारे उभा । बोलती लंबा करूनि जिभा । महारथी चढले क्षोभा । वीरश्रीशोभा प्रकाशिती ॥ ६४ ॥ कर्ण कौरवां अग्रणी । धनुष्यें वाहिलीं समराङ्गणीं । साम्ब सभवंता परिवेष्टूनी । वर्षती बाणीं धनुर्धर ॥ ६५ ॥ वीर धनुवाडे झुंजार । मुख्य करूनि कर्णादि प्रवर । साम्बावरी वर्षती शर । प्रळयजलधरपाडिपाडें ॥ ६६ ॥ सिंहनादें आरोळिया । मत्तगजांच्या किड्काळिया । शस्त्रश्रेणी मोकळिया । भेदिती बळिया साम्बातें ॥ ६७ ॥ तडक फुटती अकस्मात । जैसे मेघीं विद्युत्पात । वीर वर्षती शरजीमूत । साम्ब निवान्त ते ठायीं ॥ ६८ ॥ नवल केलें परीक्षिती । अचिन्त्यैश्वर्य जो श्रीपति । साम्ब तयाची संतति । समरक्षिती न डंडळी ॥ ६९ ॥

सोऽपविद्धः कुरुश्रेष्ठ कुरुभिर्यदुनंदनः । नामृष्यत्तदचित्यार्भः सिंहः क्षुद्रमृगैरिव ॥ ८ ॥

शशक जंबुक शाखामृग । ऋक्ष सूकर लांडगे वाघ । गोगज गवयसहकुरंग । क्षुद्र अनेग मृग-निचय ॥ ७० ॥ ऐसा क्षुद्र मृगांचा भार । सिंह न गणी एकाङ्गवीर । तैसाचि साम्ब महाशूर । समरीं सधीर दृढत्वें ॥ ७१ ॥ अचिन्त्य जो कां जनार्दन । तत्सुत साम्ब यदुनंदन । कौरववीरांतें न गणून । करी संधान तें ऐका ॥ ७२ ॥

विस्फूर्ज्य रुचिरं चापं सर्वान्विव्याध सायकैः । कर्णादीन्षड्रथान्वीरस्तावद्भिर्युगपत्पृथक् ॥ ९ ॥

रुचिरचापाची शिञ्जिनी । सांबें कौतुकें आस्फाळूनी । काढूनि निषंगाची गवसणी । सज्जिला गुणीं दिव्यशर ॥ ७३ ॥ कौरवांच्या शस्त्रश्रेणी । छेदूनि धुरोळा उडविला गगनीं । सर्व महारथी मार्गणीं । कर्णाग्रणीं भेदियले ॥ ७४ ॥ सामान्य सैन्य मारिलें किती । शुक्राचार्य तें न वदे ग्रथीं । ग्रंथभूयस्त्वाची खंती । म्हणोनि व्युत्पत्ति न वाढवी ॥ ७५ ॥ एऱ्हवीं प्रभु सामान्य कोणी । विचरे वेष्टित परिवारगणीं । मा हे तो भीष्मादि कौरवाग्रणी । सेनेवांचूनि कैं जाती ॥ ७६ ॥ असो साम्बें

मारिली सेना । पुढें कौरवां साही जणां । महारथियां भीष्मा कर्णा । दुर्योधना शलप्रमुखां ॥७७॥ एकेचि समयीं साही वीर । भेदिले विंधूनि तीक्ष्ण शर । व्याख्यान करितां लागे उशीर । परी केला मार चमत्कारें ॥ ७८ ॥ दिशाविभागीं साही जणीं । साम्ब भेदिला असतां बाणीं । परन्तु तेणें अलौकिक करणी । दाविली रणीं कुरुवृद्धा ॥ ७९ ॥ साही जणांचे छेदूनि बाण । अपार मारिलें कौरवसैन्य । एकेचि समयीं साही जण । भेदूनि आंगवण दाखविली ॥ ८० ॥ रणप्रवीण महारथी । भीष्मकर्णादि यूथपति । साम्बें भेदिले कोणे रीती । तें परीक्षिति अवधारीं ॥ ८१ ॥

चतुर्भिश्चतुरो वाहानेकैकेन च सारथीन् । रथिनश्च महेश्वासांस्तस्य तत्तेऽभ्यपूजयन् ॥ १० ॥

चारी चारी चौं चौं बाणीं । यन्ते एकैकें भेदूनी । साही जणां साही बाणीं । एकेचि क्षणीं भेदियलें ॥ ८२ ॥ भीष्मादि योद्धे रणप्रवीण । धनुर्विद्यापरायण । तथापि साम्बाचें संधान । तयां लागून न लक्षे ॥ ८३ ॥ साम्बें भेदिले वारू सारथि । भीष्मकर्णादि महारथी । भला रे भला साम्बा म्हणती । शब्दें पूजिती अवघेची ॥ ८४ ॥ धन्य ते जाम्बवती माय । धन्य श्रीकृष्णाचें वीर्य । धन्य साम्बाचें वीरश्रीधैर्य । देखूनि कुरुवर्य मानवला ॥ ८५ ॥ म्हणती वीर हा प्रतापजेठी । आंगा स्पर्शों नेदी काठी । दिसे विजयाची विफळ गोठी । केंवि गोरटी सोडविजे ॥ ८६ ॥ विचार करूनि साही जणीं । विभागें साम्ब भेदिला बाणीं । तें तूं ऐकें कोदंडपाणि । कुरुकुळतरणि परीक्षिति ॥ ८७ ॥

तं तु ते विरथं चक्रुश्चत्वारश्चतुरो हयान् । एकस्तु सारथिं जघ्ने चिच्छेदान्यः शरासनम् ॥ ११ ॥

साही वीर महारथी । एकें मारिला सारथि । चौघीं चौं वारुवांप्रति । एकें कार्मुक छेदिलें ॥ ८८ ॥ महावीरीं साही जणीं । साम्ब विरथ केला रणीं । रथ भंगतां आला धरणी । कौरवीं ते क्षणीं आकळिला ॥ ८९ ॥ उड्या घालूनि साही वीर । साम्ब आकळिती सत्वर । सोमींच्या बस्तापरी क्रूर । मुष्टिप्रहार येरू करी ॥ ९० ॥ मुष्टिप्रहार सेवूनि साही । आंगीं संघटले लवलाहीं । महाक्लेशें साम्ब तिंहीं । धरिला तेंही अवधारा ॥ ९१ ॥

तं बद्ध्वा विरथीकृत्य कृच्छ्रेण कुरवो युधि । कुमारं स्वस्य कन्यां च स्वपुरं जयिनोऽविशन् ॥ १२ ॥

साम्ब वृष्णिकुळकुमार । धनुर्धरांमाजी प्रवर । त्यातें साही कौरववीर । भंगूनि रहंवर आकळिती ॥ ९२ ॥ महाक्लेशें करूनि युद्धीं । साम्ब कौरवीं धरिला बुद्धी । बांधूनि आणिला विजयसिद्धी । स्वपुरामधीं कन्येसीं ॥ ९३ ॥ साम्ब धरिला वृष्णिकुमर । विजयवाद्यांचा करिती गजर । लक्ष्मणेसहित कौरववीर । विजयी स्वपुर प्रवेशले ॥ ९४ ॥ साम्ब प्रतापी महारथी । भीष्मादि कौरवां लाविली ख्याति । महाक्लेशें धरिला म्हणती । आणिला निगुती नृपसदना ॥ ९५ ॥ साम्ब ठेविला निग्रहनी । कौरव बैसले सभास्थानीं । म्हणती वार्ता हे ऐकोनि । यादव धांवणी करितील ॥ ९६ ॥

म्हणोनि बळिष्ठ द्वारकापथीं । गुल्मी स्थापिले महारथी । आज्ञा वार्तालेखकांप्रति । वार्तिकाहातीं पाठविली ॥ ९७ ॥ यादवसभेचा वृत्तान्त । क्षणक्षणांचा अतन्द्रित । लिहूनि पाठविजे त्वरित । ऐसा संकेत सूचविला ॥ ९८ ॥ हयरथशस्त्रास्त्रीं सन्नद्ध । आदि करूनियां कुरुवृद्ध । सदा सर्वदा समरा सिद्ध । कौरव सावध सभास्थानीं ॥ ९९ ॥ कौरवांकडील ऐसी मात । यादवीं साम्बाचा वृत्तान्त । कैसा ऐकिला तें समस्त । परिसे यथार्थ परीक्षिति । ॥ १०० ॥

तत्श्रुत्वा नारदोक्तेन राजन्संजातमन्यवः । कुरून्प्रत्युद्यमं चक्रुरुग्रसेनप्रचोदिताः ॥ १३ ॥

तंव नारदें द्वारकाभुवनीं । साम्बावस्था यादवां कर्णीं । कथिली येऊनि सभास्थानीं । चक्रपाणिबळप्रमुखां ॥ १ ॥ नारद म्हणे यादवांप्रति । साम्बचर्या ऐका पुरती । हस्तिनापुरीं सर्व भूपति । आले असतां स्वयंवरा ॥ २ ॥ सुयोधनतनया लावण्यखाणी । नृपां निरीक्षी सभास्थानीं । साम्बें वाहूनि ते स्यंदनीं । निघाला न गणूनि नृपांसीं ॥ ३ ॥ यादवीं मागधप्रमुख राजे । भंगिले सुरवर पार्थातकाजें । यास्तव भूपति सांडूनि तेजें । वरूनि लाजे निघाले ॥ ४ ॥ तिये समयीं भीष्मप्रमुख । कर्णदुर्योधनादिक । कौरव क्षोभले अशेख । न धरूनि धाक कृष्णाचा ॥ ५ ॥ आमुची कन्या यादवां घरीं । हें कैं घडेल विपरीत परी । अर्भकें कैसी बलात्कारीं । हरिली नोवरी कुरुकुळींची ॥ ६ ॥ वरिष्ठ मानूनि आपुलें कुळ । हांवे चढूनि धांवले सकळ । वेष्टिला जाम्बवतीचा बाळ । केलें तुंबळ रण तेणें ॥ ७ ॥ मग साहीजणीं महारथीं । साम्ब धरिला निःशस्त्र विरथी । विजयोत्साहें स्वपुराप्रति । जाऊनि निगुतीं निग्रहिला ॥ ८ ॥ साम्बनिग्रहणाची मात । नारदें कथितां सभेआंत । क्रोधें यादव झाले तप्त । प्रळयीं कृतान्त ज्या परी ॥ ९ ॥ विशेष उग्रसेन नृपवर । म्हणे पालाणा सत्वर । पालथें घाला हस्तिनापुर । धरा गान्धार भीष्मेंसी ॥ ११० ॥ लेंकरूं एकाकी निःशस्त्री । यानरहित धरिलें समरीं । भीष्मादिकीं महावीरीं । लज्जा अंतरीं न धरूनी ॥ ११ ॥ नोवरीसहित आणा साम्ब । झाडा भीष्माचा वीरश्रीमद । धृतराष्ट्राचें संतानथोंब । उपडा विलंब न करूनी ॥ १२ ॥ उग्रसेन राजें ऐसी । आज्ञा देतां यादवांसी । सन्नद्ध बद्ध शस्त्रास्त्रेसीं । प्रबळ सेनेसीं निघाले ॥ १३ ॥ हें देखोनि संकर्षण । इच्छूनि कुरुकुळा कल्याण । करविता झाला क्षमापन । तें संपूर्ण अवधारा ॥ १४ ॥

सांत्वयित्वा तु तान्रामः सन्नद्धान्वृष्णिपुंगवान् । नैच्छत्कुरूणां वृष्णीनां कलिं कलिमलापहः ॥ १४ ॥

उग्रसेनापुढें राम । भक्तकामकल्पद्रुम । उभा ठाकूनि अमृतोपम । प्रार्थी निस्सीम हितवाक्यें ॥ १५ ॥ जयाच्या नामस्मरणें सकळ । नासती अशेषही कलिमळ । तो संकर्षण रोहिणीबाळ । सुहृद्वत्सल प्रार्थीतसे ॥ १६ ॥ म्हणे जी यदुचक्रचूडामणि । प्रार्थनापूर्वक माझी वाणी । ऐकूनि कौरवांवरी येक्षणीं । सेना क्षोभूनि न धाडिजे ॥ १७ ॥ काय म्हणोनि कीजे क्षमा । ऐका त्याही वदतों वर्मा । कलह नसावा कौरवां आम्हां । अमरोत्तमांमाजिवडा ॥ १८ ॥ उतरावया धराभार । दोहीं

वंशांमाजी अमर । अवतरले हा दृढ निर्धार । वदला साचार देवर्षि ॥ १९ ॥ भीष्म द्रोण आणि कर्ण । पाण्डव धर्म भीमार्जुन । उभय माद्रीचे नंदन । केवळ सुरगण अवतरले ॥ १२० ॥ यालागीं यादवां आणि कौरवां । सहसा विरोध न घडावा । जाणोनि ऐसिया रहस्यभावा । क्रोध क्षमावा लागतसे ॥ २१ ॥ आपुले दशन आपुले ओष्ठ । उभय संघटें पाविजे कष्ट । यादव कौरव ते हे स्पष्ट । विरोध अरिष्ट अनुचित यां ॥ २२ ॥ यावरी क्षोभें कौरवांवरी । सहसा राया न कीजे स्वारी । स्वयें जावोनि साम्ब नोवरी । सामोपचारीं आणीन ॥ २३ ॥ ऐकोनि रामाचें प्रार्थन । तथास्तु म्हणे उग्रसेन । आज्ञा होतां यादवसैन्य । रामें संपूर्ण राहविलें ॥ २४ ॥ प्रद्युम्नप्रमुख हरिसुत सर्व । वसुदेव औरस वासुदेव । भोजान्ध कुकुर मधु यादव । वृष्णिपुङ्गव अवघेची ॥ २५ ॥ ससेनाशस्त्रास्त्रसन्नद्धातें । सान्तवूनि वृष्णिपुङ्गवातें । आणावया स्नुषासुतांतें । हस्तिनापुरातें चालिला ॥ २६ ॥

जगाम हस्तिनपुरं रथेनाऽऽदित्यवर्चसा । ब्राह्मणैः कुलवृद्धैश्च वृतश्चंद्र इव ग्रहैः ॥ १५ ॥

सूर्यप्रभाभासुर रथ । तालकेतुविराजित । हलादि शस्त्रास्त्रीं मंडित । रेवतीकान्त निघाला ॥ २७ ॥ बुध गुरु भार्गव मंगळ मंद । इत्यादिग्रहगणवेष्टित चांद । गगनगर्भीं चाले विशद । तेंवि हलायुध द्विजवर्गीं ॥ २८ ॥ ऋग्यजुःसामाथर्वण । निगमपारंगतब्राह्मण । वेदार्थप्रमुखशास्त्रसंपन्न । अनुग्रानप्रवीण जे ॥ २९ ॥ कुळ शीळ श्रेष्ठ वृद्ध । जीवावतार उद्धव प्रबुद्ध । प्रज्ञा प्रगल्भ द्विज कोविद । सहित पार्षदगण भंवता ॥ १३० ॥ ऐसा बळभद्र हस्तिनापुरा । भेटावया कुरुनरेन्द्रा । गेला लक्षूनि सहोदरा । स्नुषाकुमरा आणावया ॥ ३१ ॥ बळभद्र उद्धव विप्रमांदी । कौरवां भेटी स्नेहवादीं । येतो ऐसी नृपा शुद्धि । वार्तालेखकीं जाणविली ॥ ३२ ॥ तयावरूनि प्रतिगुल्मस्थां । कुरुनरेन्द्रें आज्ञापितां । तिंहीं वंदूनि रेवतीकान्ता । कुरुपुरप्रान्ता प्रवेशविती ॥ ३३ ॥ द्विजवरवेष्टित सुनंदधर । ऐसा पावला हस्तिनापुर । कौरवभेटीचा प्रकार । तो सविस्तर अवधारा ॥ ३४ ॥

गत्वा गजाह्वयं रामो बाह्योपवनमास्थितः । उद्धवं प्रेषयामास धृतराष्ट्रं बुभुत्सया ॥ १६ ॥

हस्तिनापुर पावला राम । पाहूनि उपवन उत्तम रम्य । पुष्पीं फळीं अमोघ द्रुम । देखोनि विश्राम पावला ॥ ३५ ॥ तेथें राहोनियां आपण । पुढें उद्धवातें धाडून । धृतराष्ट्रातें निजाभिगमन । स्नेहवर्धन जाणविलें ॥ ३६ ॥ परम स्नेहाळ रोहिणीसुत । भेटीलागीं आर्तभूत । आला ऐसा निजवृत्तान्त । धृतराष्ट्रातें कळावया ॥ ३७ ॥ स्नेहवाद धृतराष्ट्रातें । जाणवितां त्याचेनि चित्तें । काय कल्पिजेल तेंही निरुतें । आपणातें जाणावया ॥ ३८ ॥ यालागीं उद्धव धाडिला पुढें । तेणें प्रेरूनि वार्तिकजोडें । महाद्वारापासूनि तोंडें । निरोप निवाडें पाठविला ॥ ३९ ॥ राम उपवनीं राहून । तुम्हां पें उद्धव पाठवून । सर्व कथावें वर्तमान । वार्तिकीं जाऊन निवेदिलें ॥ १४० ॥ ऐकूनि वार्तिकांची वाणी । दुःशासनातें पाठवूनी । उद्धवालागीं सम्मानूनी । सभास्थानीं आणियला ॥ ४१ ॥ उद्धव

येतां कौरवसभे । धार्तराष्ट्र ठाकले उभे । येरें स्नेहाच्या वालभें । नमिले लोभें तें ऐका ॥ ४२ ॥

सोऽभिवाद्याबिकापुत्रं भीष्मं द्रोणं सबाह्लिकम् । दुर्योधनं च विधिवद्राममागतमब्रवीत् ॥ १७ ॥

धृतराष्ट्रातें नृपासन । यालागीं त्यातें अभिवादन । मग वंदिले भीष्मद्रोण । दुर्योधन सबाह्लिक ॥ ४३ ॥ मान्य आणि वयोवरिष्ठ । त्यांचें वंदोनि पादपीठ । समवयस्कां संलग्नकंठ । क्षेमालिङ्गनें दीधलीं ॥ ४४ ॥ अल्पवयस्कां सामान्य मान्य । तिहीं उद्धवा करूनि नमन । नृपानिकटीं रम्यासन । देऊनि सम्मान वैसविला ॥ ४५ ॥ सुहृद्भेटीच्या आदरें । राम आला हें कथिलें येरें । तोष मानिला अम्बिकाकुमरें । भीष्मादि अंतरें हरिखेले ॥ ४६ ॥ म्हणती आजिचा सुदिन धन्य । स्नेहवादें संकर्षण । आला भेटावयालागून । पूर्ण कल्याण कुरुवंशा ॥ ४७ ॥ रामागमन ऐकूनि सकळ । भेटीलागीं उतावीळ । जाती सामोरे तत्काळ । तेंही नवल अवधारा ॥ ४८ ॥

तेऽतिप्रीतास्तमाकर्ण्य प्राप्तं रामं सुहृत्तमम् । तमर्चयित्वाऽभिययुः सर्वे मंगलपाणयः ॥ १८ ॥

सभास्थानीं उद्धवासी । कौरवीं पूजिलें उपचारेंसीं । सर्वीं घेऊनि उपायनासी । रामभेटीसी निघाले ॥ ४९ ॥ सुहृदांमाजी सुहृत्तम । आमुचा प्राणसखा बळराम । तत्पूजनीं धरूनि प्रेम । आले निस्सीम उत्साहें ॥ १५० ॥ रामासन्निध रम्योपवनीं । प्रविष्ट झाल्या कौरवश्रेणी । पुढें नमनाची काहणी । ऐकें श्रवणीं कुरुवर्या ॥ ५१ ॥

तं संगम्य यथान्यायं गामर्घ्यं च न्यवेदयन् । तेषां ये तत्प्रभावज्ञाः प्रणेमुः शिरसा बलम् ॥ १९ ॥

बळभद्रातें यथान्यायें । पूजिते झाले पूर्व स्नेहें । जाणोनि अमोघपूर्णैश्वर्य । नमिती पाय अवघेची ॥ ५२ ॥ रामप्रभावा जाणते । वडील वृद्ध जे जे होते । तिहीं सप्रेमभावें तेथें । बळरामातें वंदियलें ॥ ५३ ॥ मग विष्टर समर्पून । केलें मधुपर्कपूजन । अर्घ्यपाद्यसह गोदान । वसनाभरणें समर्पिलीं ॥ ५४ ॥ सर्वीं घालूनि नमस्कार । स्तवनीं तोषविला हलधर । समीप वैसूनियां सादर । पुसती परिवार तें ऐका ॥ ५५ ॥

बन्धून्कुशलिनः श्रुत्वा पृष्ट्वा शिवमनामयम् । परस्परमथो रामो बभाषेऽविक्लवं वचः ॥ २० ॥

उद्धवें सकळ कौरवांप्रति । क्षेमकल्याण पुसिलें निगुती । अंबिकातनय कौरवपति । सह तत्पंक्ति भीष्मादि ॥ ५६ ॥ सुना कन्या पुत्र जामात । बन्धु भ्रातृजाया समस्त । पौत्र प्रपौत्र सुहृद आप्त । दासदासीप्रमुखही ॥ ५७ ॥ देश कोश यूथपति । दुर्गें सेना राष्ट्रें संपत्ति । क्षेम कल्याण सर्वांप्रति । यारे म्हणती कृपेनें ॥ ५८ ॥ तैसाचि कौरवा उद्धवासी । शेभाजान्दासाहाधर्कु कुर । वृष्णिप्रमुख

यदुकुळासी । कुशळ सर्वांसी पूसिलें ॥ ५९ ॥ पुसूनि सर्वांसी कल्याण । कथिलें तैसें करूनि श्रवण । परस्परें आनंदोन । म्हणती सुदिन आजीचा ॥ १६० ॥ यानंतरें बोले राम । स्नेहवर्धनकल्याणकाम । यदुकुळवंशामाजी प्रेम । राहे क्षेम ज्यापरी ॥ ६१ ॥ विक्लव म्हणिजे दुःखरूप । उभयवंशीं पडे विकल्प । कलहदुमाचें वाढे रोप । तो संकल्प तुटावया ॥ ६२ ॥ आपुल्या आगमनाची सिद्धि । पूर्वस्नेह पावे वृद्धि । यदर्थीं राम कृपानिधि । बोले सुबुद्धि तें ऐका ॥ ६३ ॥

उग्रसेनः क्षितेरीशो यद्व आज्ञापयत्प्रभुः । तदव्यग्रधियः श्रुत्वा कुरुध्वं मा विलंबितम् ॥ २१ ॥

म्हणे ऐका जी कौरवनाथा । विषादरहित करूनि चित्ता । आज्ञा नृपाची जे तत्वता । ते मी आतां निरूपितों ॥ ६४ ॥ उग्रसेन क्षितीचा ईश । जेणें पाळिला यदूचा वंश । आज्ञाधारक हृषीकेश । प्रभुत्वें शक्रास जो न गणी ॥ ६५ ॥ तेणें आज्ञा तुम्हांसि केली । ते अव्यग्रबुद्धी ऐकिजे सकळीं । सर्वीं राहोनि आज्ञेतळीं । पाहिजे केली वर्तणुक ॥ ६६ ॥ विलंब न करावा येविषयीं । माझा स्नेह तुमच्या ठायीं । म्हणोनि आलों मी लवलाहीं । आज्ञा कायी ते ऐका ॥ ६७ ॥

यद्यूयं बहवस्त्वेकं जित्वाऽधर्मेण धार्मिकम् । अवद्नीताथ तन्मृष्ये बंधूनामेक्यकाम्यया ॥ २२ ॥

द्वारकेमाजी सभास्थानीं । नृपासन्निध यादववृष्णि । बैसले असतां नारदें श्रवणीं । वार्ता येऊनि निवेदिली ॥ ६८ ॥ नारद म्हणे हस्तिनापुरीं । सुयोधनतनया स्वयंवरीं । साम्बें हरूनि ते नोवरी । निज रहंवरीं वाहिली ॥ ६९ ॥ द्वारके आणितां पवनगती । भूभुज गेले स्वदेशाप्रति । कौरव धाविन्नले महारथी । तिंहीं तो पथीं पडखळिला ॥१७०॥ साम्बें तयांसीं केलें रण । अपार मारिलें कौरवसैन्य । भीष्मप्रमुख साही जण । समराङ्गणीं तोपविले ॥ ७१ ॥ साही जणांसी केलें विरथ । सैन्या दाविला मृत्युपथ । कौरवीं करूनि अधर्म तेथ । भंगिला रथ साम्बाचा ॥ ७२ ॥ युगपत क्षोभले साही वीर । चौघीं मारिले चाऱ्ही वारु । एकें सारथियाचें शिर । चाप कठोर पैं एकें ॥ ७३ ॥ साम्ब विरथ येतां धरणीं । मिळ्या घालूनि साही जणीं । धरूनि बांधिला समराङ्गणीं । अन्यायकरणी हे केली ॥७४॥ ऐसें ऐकूनि नारदवचन । आवेशले यदुनंदन । त्यांसी वारूनि उग्रसेन । आज्ञाशासन पाठविलें ॥ ७५ ॥ तुम्ही बहुत साम्ब एकला । विरथ निःशस्त्र धार्मिक भला । अधर्मयुद्धें आकळिला । यास्तव घडला दोष तुम्हां ॥ ७६ ॥ मूर्छित यानविवर्जित । अनवधान शस्त्ररहित । आणिकासम्मुख कीं दुश्चित्त । एका बहुत अधर्म हे ॥ ७७ ॥ इतुके अधर्म घडले तुम्हां । असो आम्हीं ते केले क्षमा । विरोध न घडावा तुम्हां आम्हां । सुहृदगरिमा लक्षूनी ॥७८॥ आम्ही तुम्ही सुहृद बन्धु । न व्हावा उभयांमाजी विरोधु । ऐसा लक्षूनि स्नेहवादु । क्षमिला क्रोधु ये विषयीं ॥ ७९ ॥ आतां कीजे स्नेहवर्धन । प्रेमें वंदूनि संकर्षण । शीघ्र वधूवरें घेऊन । यावें बोळवणे प्रसंगें ॥ १८० ॥ सौहार्द वाढविजे पहिलें । वृथा कलहें जें डहुळलें । आम्हीं सर्वेही क्षमा केलें । आज्ञापिलें स्वीकरणें ॥ ८१ ॥ ऐसें बोलतां संकर्षण ।

कौरव क्षोभले होतां श्रवण । वदती आपणांमाजी आपण । श्रोतीं श्रवण तें कीजे ॥ ८२ ॥

वीर्यशौर्यबलोन्नद्धमात्मशक्तिसमं वचः । कुरवो बलदेवस्य निशम्योचुः प्रकोपिताः ॥ २३ ॥

वीर्य शौर्य आणि बळ । इहीं करूनि उच्छृंखळ । जे न गणिती कृतान्तकाळ । अमोघ शीळ जयांचें ॥ ८३ ॥ आपुले शक्तिसमान वचन । स्वयें बोलिला संकर्षण । कौरव कोपले तें ऐकून । करिती हेळण दुर्वचनें ॥ ८४ ॥

अहो महच्चित्रमिदं कालगत्या दुरत्यया । आरुरुक्षत्युपानद्वै शिरो मुकुटसेवितम् ॥ २४ ॥

करूनि यदुकुळाचें हेळण । कौरव आपणामाजी आपण । संकर्षणा ऐकवण । करूनि वचनें बोलती ॥ ८५ ॥ अहो शब्दें महाखेद । म्हणती कटा हा प्रमाद । कालकलनेचा विनोद । आश्चर्य अगाध पहा हें ॥ ८६ ॥ काळगति हे दुरत्यय । तेणें विचित्र केलें काय । पादरक्षा त्यजूनि पाय । आरूढों पाहे मस्तकीं ॥ ८७ ॥ मुकुट मस्तका भूषण । मस्तक मुकुटा भूषितें स्थान । मुकुट लोटूनि पादत्राण । म्हणवी भूषण मुकुटाचें ॥ ८८ ॥ पायींची वाहाण पायींच बरी । ते आजी बैसों धांवे शिरीं । काळगतीची विपरीत परी । जे आम्हां पामरीं आज्ञापिजे ॥ ८९ ॥ यालागीं नीच दुरिल्या दोरें । पहिल्यापासूनि ठेवितां बरे । यादवें क्षुद्रें हीनें पामरें । आम्हीं अविचारें वाढविलीं ॥ १९० ॥

एते यौनेन संबद्धाः सहशय्यासनाशनाः । वृष्णयस्तुल्यतां नीता अस्मद्दत्तनृपासनाः ॥ २५ ॥

पृथा वसुदेवाची बहिणी । दिधली कुंतिभोजा पोसणी । पाण्डुरायें ती केली राणी । पाणिग्रहणीं विध्युक्त ॥ ९१ ॥ तिया सोयरिकेचिया पदरें । यादववृष्णि हे सोयरे । ऐश्वर्यदानें स्नेहादरें । आपणांसमान वाढविले ॥ ९२ ॥ राजसभेचा सम्मान । यांसी देऊनि अभ्युत्थान । नृपानिकटी तुंगासन । देखोनि नृपगण वोळंगती ॥ ९३ ॥ अन्नसंबंध एकपंक्ती । न विचारूनि यांची ज्ञाति । भोजनीं शयनीं क्रीडतां द्यूतीं । समान नृपति हे केले ॥ ९४ ॥ ययातिशापें यादव हीन । आम्ही तें सर्वही नाठवून । सुहृद्भावें स्नेहवर्धन । केले मान्य नृपवर्गीं ॥ ९५ ॥ आम्हीं स्थापिले नृपासनीं । अस्मद्दत्त भोगिती अवनि । कृतोपकार तो विसरोनी । भूभुजचिह्नीं विराजती ॥ ९६ ॥

चामरव्यजने शंखमातपत्रं च पांडुरम् । किरीटमासनं शय्यां भुंजत्यस्मदुपेक्षया ॥ २६ ॥

शरीरसंबंध सामान्यासी । उमजावया या न्यूनत्वासी । आपणांसमान यां नृपसभेसी । सम्मानेंसी मिरविलें ॥ ९७ ॥ नृपसिंहासन तुंगातपत्रें । किरीटकुण्डलें युग्मचामरें । कंबुघोषें पांडुरच्छत्रें । दुंदुभिगजरें नृप झाले ॥ ९८ ॥ राजयानें राजशयनें । राजपानें राजसम्मानें । धनें गोधनें भूभुजाचिह्नें । ऐश्वर्यभूषणें मिरविती हे ॥ ९९ ॥ आम्हांपुढें अपरच्छत्र । उभवी कोण मायेचा पुत्र ।

यादव सोयरे अस्वतंत्र । जाणूनि अन्यत्र न गणूं यां ॥ २०० ॥ राजचिह्नाचा आग्रह । आम्हीं न केला धरूनि स्नेह । तेणें मदगर्वाचा रोह । झाला पहा हो यां आंगीं ॥ १ ॥ आम्ही उपेक्षा करितां पाहीं । राजपदवी भोगिली इहीं । उपकार विसरूनियां सर्वही । धारिलें देहीं आढ्यत्व ॥ २ ॥

अलं यदूनां नरदेवलांछनैर्दातुः प्रतीपैः फणिनामिवामृतम् ।
येऽस्मत्प्रसादोपचिता हि यादवा आज्ञापयंत्यद्य गतत्रपा बत ॥ २७ ॥

येथूनि याचा स्नेह पुरे । कायसे आमुचे हे सोयरे । वाढले नृपचिह्नांच्या भरें । तें यां न स्मरे कृतघ्नां ॥ ३ ॥ नरदेव जे चक्रवर्ती । त्यांचीं चिह्नें नृपसंपत्ति । पुरे येथूनि यादवांप्रति । केंवि मिरविती आम्हांपुढें ॥ ४ ॥ जेहीं यां दिधलीं साम्राज्यचिह्नें । प्रतीप झाले त्यांकारणें । सर्प पोसिला अमृतपानें गरळदानें । जेंवि फळें ॥ ५ ॥ आमुच्या प्रसादेंचि उपचय । पावला यादवांचा निचय । तो विसरूनि पूर्वान्वय । निर्लज्ज काय वदती हे ॥ ६ ॥ बत हा खेद वाटे मोठा । यादवीं धरिला केवढा ताठा । जे न लाहती पादपीठा । ते आजि मुकुटा चढूं आले ॥ ७ ॥ करुनृपाची आज्ञा कानीं । ऐकतां येती जे धांवूनी । तिहीं आजी निर्लज्जपणीं । आज्ञा सांगोनि पाठविली ॥ ८ ॥ ऐसे कृतघ्न हे यादव । पुरे यांचें नृपवैभव । आतां हिरोनि घेऊं सर्व । देऊं लाघव यां योग्य ॥ ९ ॥

कथमिद्रोऽपि कुरुभिर्भीष्मद्रोणार्जुनादिभिः । अदत्तमवरुंधीत सिंहग्रस्तमिवोरणः ॥ २८ ॥

इन्द्रही हो कां अमरनायक । न देतां भीष्मार्जुनादिक । वाहों न शके भूभुजाङ्क । जेंवि अविक सिंहग्रासा ॥ २१० ॥ वस्त मातलाही सबळ । घेऊं न शके सिंहकवळ । तैसे यादव झाले प्रबळ । अनर्ह केवळ नृपचिह्नां ॥ ११ ॥ कौरवांपुढें राजचिह्नां । इन्द्रही मिरवूं न शके जाणा । तेथें यदुवृष्णींची गणना । असो सामान्यांमाजिवडी ॥ १२ ॥ शुक म्हणे कौरवपाळा । इत्यादि हेलनोक्तीच्या माळा । परस्परें बोलतां खळां । रोहिणीबाळा ऐकविलें ॥ १३ ॥

श्रीशुक उवाच । जन्मबंधुश्रियोन्नद्धमदास्ते भरतर्षभ । आश्राव्य रामं दुर्वाच्यमसभ्या. पुरमाविशन् ॥ २९ ॥

कौरव अष्टमदें उन्मत्त । जन्म म्हणिजे मद आभिजात्य । बन्धुवर्गांचा सन्निपात । बळें औद्धत्य मिरविती ॥ १४ ॥ विशेष राज्यश्रियेचा मद । वीरश्री आंगीं वाहती विशद । शीळदुर्विनीतता प्रसिद्ध । श्रियोन्नद्ध असभ्य जे ॥ १५ ॥ यदुनिंदेचीं परुष वाक्यें । रामा परिसवोनियां स्वमुखें । असभ्य म्हणिजे दुर्जन असिके । उठिले तवकें तेथूनी ॥ १६ ॥ न पाहोनि रामाकडे । हेलनोक्ति वदती तोंडें । स्वपुरीं प्रवेशले रोकडे । आले निवाडे स्वस्थाना ॥ १७ ॥ आधीं देऊनियां सम्मान । अर्घ्यपाद्यादि समर्पून । शेखीं गेले उपेक्षून । परुष वचनें बोलोनियां ॥ १८ ॥ कौरवांचें देखोनि शीळ । काय करिता झाला बळ । तें तूं कुरुवर्या प्राज्ञजळ । ऐकें समूळ निरूपितों ॥ १९ ॥

दृष्ट्वा कुरूणां दौःशील्यं श्रुत्वाऽवाच्यानि चाच्युतः । अवोचत्कोपसंरब्धो दुष्प्रेक्ष्यः प्रहसन्मुहुः ॥ ३० ॥

दुष्ट शीळ हें कौरवाचें । रामें सविस्तर देखूनि साचें । बोलिले वचनें जे दुर्वाचे । करी तयांचें अनुस्मरण ॥२२०॥ क्रोधें उचंबळला फार । दुःखें न पाहवे ज्या समोर । प्रस्तावला वारंवार । विस्मयपर हास्य करी ॥ २१ ॥ उद्धव आणि श्रेष्ठ ब्राह्मण । तयांसी बोले प्रस्तावून । राया होऊनि सावधान । तें तूं श्रवण करीं आतां ॥ २२ ॥

नूनं नानामदोन्नद्धाः शांतिं नेच्छंत्यसाधवः । तेषां हि प्रशमो दंडः पशूनां लगुडो यथा ॥ ३१ ॥

नानामदें जे उद्धत । ते नेणती आपुलें हित । दुष्ट अशान्त दुर्विनीत । भ्रान्त उन्मत्त दुरात्मे ॥ २३ ॥ जे का असाधु दुर्जन । इच्छितां तयांचें कल्याण । मदोन्मत्त ते विक्षेपून । करिती हेलन बहुतेक ॥ २४ ॥ कुलीनत्वाभिजात्यमद । शिष्टाचारें शीळमद । वीर्यशौर्यें प्रबळमद । आणि श्रीमद धनाढ्यें ॥ २५ ॥ यौवनभरें वयसामद । श्रुताध्ययनें विद्यामद । रूपलावण्यसौन्दर्यमद । सत्तामद भूपाङ्गें ॥ २६ ॥ इत्यादिमदें जे उन्नद्ध । त्यांसी प्रशमार्थ न कीजे बोध । बोधें होती ते विरुद्ध । दण्ड प्रबोध त्यां योग्य ॥ २७ ॥ ज्ञानविहीन पशूंचें जिणें । हित नुमजे त्यांकारणें । त्यांसी प्रबोध डंगारणें । येती तेणें स्वस्थाना ॥ २८ ॥ लगुड म्हणिजे काष्ठदंड । घडिघडी तेणें ठेंचितां तोंड । तरी ते वोढाळ तरमुंड । देती मुसाण्ड पुढें पुढें ॥ २९ ॥ हेचि तयांची शिकवण । कीजे क्षणक्षणा ताडन । यावांचूनि विवेकहीन । निजकल्याण न मानिती ॥२३०॥ वेदशास्त्रीं नाहीं गति । ईश्वरनिष्ठा न बाणे चित्तीं । पादत्राणें तयांप्रतिं । ताडन युक्तिप्रबोध ॥ ३१ ॥ ऐसे दुर्जन हे कौरव । नेणती स्वहिताचें गौरव । आम्हीं रक्षिला स्नेहभाव । इहीं अपाव तो केला ॥ ३२ ॥

अहो यदून्सुसंरब्धान्कृष्णं च कुपितं शनैः । सांत्वयित्वाऽहमेतेषां शममिच्छन्निहागतः ॥ ३२ ॥

साम्बनिग्रहणाची वार्ता । ऐकोनि यदुचक्रा समस्तां । कौरवनाशा प्रवर्ततां । आम्हीं तत्त्वता वारिलें ॥ ३३ ॥ ब्रह्माण्डाचिया उतरडी । इच्छामात्रें घडी मोडी । तया कृष्णाच्या पडिपाडीं । कायसीं बापुडीं कौरवें हीं ॥ ३४ ॥ अहो आश्चर्य वाटे थोर । करावया कुरुकुळा संहार । यादव क्षोभले महाक्रूर । झाला श्रीधर सक्रोध ॥ ३५ ॥ रथ गज अश्व पदातिदळ । युयुधानप्रमुख यादवदळ । कुरुकुळ करावया निर्मूळ । क्रोधें तत्काळ उठावले ॥ ३६ ॥ यांचें इच्छूनियां कल्याण । हळुहळु शान्त करूनियां कृष्ण । प्रार्थूनियां उग्रसेन । केलें आगमन म्यां येथ ॥ ३७ ॥ कौरवां यादवां माजी कळी । न व्हावी कोणे एके काळीं । ऐसी आम्हीं इच्छा केली । ती भंगिली इहीं दुष्टीं ॥ ३८ ॥

त इमे मंदमतयः कलहाभिरताः खलाः । तं मामवज्ञाय मुहुर्दुर्भाषान्मानिनोऽब्रुवन् ॥ ३३ ॥

ते हे मंदमति दुर्जन । कलहाकारणें उदित जाण । क्षेम इच्छित्या मातें पूर्ण । अवज्ञा हेळणें उपेक्षिलें ॥ ३९ ॥ वारंवार दुष्ट वचनें । निंदा दुरुक्ति हेलनें । ऐकवूनियां मजकारणें । गेले उठोनि नगरांत ॥ २४० ॥ तुच्छ मानूनि मज हलधरा । वृद्धा उद्धवा बुद्धिसागरा । कौरव चढले अहंकारा । वदले उत्तरां निकृष्ट ॥ ४१ ॥ तयां उत्तरांचा विस्मय । स्मरोनि मानी रेवतीप्रिय । कौरवीं केला परमान्याय । जें अमृत विषमय मानिलें ॥ ४२ ॥

नोग्रसेनः किल विभुर्भोजवृष्ण्यंधकेश्वरः । शक्रादयो लोकपाला यस्यादेशानुवर्तिनः ॥ ३४ ॥

कौरवांतें आज्ञापन । करावया असमर्थ उग्रसेन । कौरवांचें हें दुर्भाषण । विस्मयेंकरून अनुस्मरे ॥ ४३ ॥ भोज अंधक वृष्णि सर्व । कुकुर सात्वत मधु दाशार्ह । इत्यादि यदुकुळांचा राव । कौरवीं अनर्ह तो केला ॥४४॥ इंद्र अग्नि वैवस्वत । निर्ऋति वरुण सह मारुत । कुबेर ईशान लोकनाथ । अतंद्रित आज्ञेतें ॥ ४५ ॥ उग्रसेनाची आज्ञा माथां । वंदूनि वर्तणें लोकनाथा । ते कौरवीं केली वृथा । मानूनि आढ्यता स्वपदाची ॥ ४६ ॥ आत्मसंभावित हे स्तब्ध । केला स्नेहभाव विरुद्ध । लोकत्रयीं जो प्रसिद्ध । तो महत्वें वृद्ध इहीं केला ॥ ४७ ॥ असो उग्रसेनाची कथा । त्रिजगज्जनका श्रीकृष्णनाथा । लज्जा न वटे यां हेळितां । प्रकट सामर्थ्या जाणोनी ॥ ४८ ॥

सुधर्माऽऽक्रम्यते येन पारिजातोऽमरांघ्रिपः । आनीय भुज्यते सोऽसौ न किलाध्यागनार्हणः ॥ ३५ ॥

सुधर्मा सभा स्वर्गींहून । द्वारके प्रतिष्ठिली आणून । अमराङ्घ्रिपाचें सेवन । भोगी प्रद्युम्नें ललनांशीं ॥ ४९ ॥ ब्रह्माण्डसाम्राज्यपट्टाभिषेक । करूनि निर्जर शक्रादिक । किङ्करवृत्ती एकें एक । तिष्ठती सम्यक ज्या सदनीं ॥ २५० ॥ त्या कृष्णासी नृपासन । पाण्डुर च्छत्रें आतपत्राण । उभय चामरें किरीट व्यजन । अयोग्य म्हणोनि जल्पती हें ॥ ५१ ॥ साम्राज्यश्रियेचें ऐश्वर्य । भोगार्ह एक कौरवधुर्य । अनर्ह मानिती यदुवर्य । यथार्थ कोण हे गोष्टी ॥ ५२ ॥

यस्य पादयुगं साक्षाच्छ्रीरुपास्तेऽखिलेश्वरी । स नार्हति किल श्रीशो नरदेवपरिच्छदान् ॥ ३६ ॥

विश्वश्री जे अखिलेश्वरी । जियेच्या सुरस्त्रिया किङ्करी । ते जे साक्षात् परमेश्वरी । पदयुग स्वकरीं मर्दितसे ॥ ५३ ॥ तो श्रीनायक निश्चयेसीं । योग्य नव्हे नृपचिह्नांसी । ऐसें बोलतां कौरवांसी । लज्जा मानसीं कां न वटे ॥ ५४ ॥ खद्योत नोकिती दिनेशा । वायस न मानिती राजहंसा । तेंवि कौरव परमपुरुषा । गणिती मानुषांमाजिवडे ॥ ५५ ॥ ज्या कृष्णाचा अगाध महिमा । वर्णूं न शके शङ्कर ब्रह्मा । प्रत्यक्ष दिसतो आम्हां तुम्हां । प्रकट गरिमा ते ऐका ॥ ५६ ॥

यस्यांघ्रिपंकजरजोऽखिललोकपालैर्मौल्युत्तमैर्धृतमुपासिततीर्थतीर्थम् ।
ब्रह्मा भवोऽहमपि यस्य कलाः कलायाः श्रीश्चोद्वहेम चिरमस्य नृपासनं वव ॥ ३७ ॥

ज्या कृष्णाचे चरणाब्जरज । अखिल लोकपाळांचे पुज्य । उत्तम मौळी करूनि सहज । चर्चिती सुतेज ऐश्वर्या ॥ ५७ ॥ हरिपदपंकजरजोलेपनें । मौळी मिरविती उत्तमपणें । ऐसिये निगमगर्भींचे खुणे । जाणूनि भूषणें मिरवती ॥ ५८ ॥ सार्धे त्रिकोटी जिहीं तीर्थें । उपासिलीं सप्रेम आतें । तयां योगीश्वरांपरौतें । वरिष्ठ तीर्थ आन नसे ॥ ५९ ॥ तयां योगियांही तीर्थ परम । हरिपदाब्जरज उत्तम । अथवा जाह्नवी कैवल्यधाम । ओपी निस्सीम उपासितां ॥ २६० ॥ तयेचें जें जन्मस्थान । यालागीं तीर्थांचें पूण । श्रीकृष्णाचे पादाब्जरेणु । त्रिजगत्पावनपटुतर जे ॥ ६१ ॥ लक्ष्मी विरंचि गौरीरमण । आणि मी जो संकर्षण । कृष्णपादाब्जरजःकण । वाहों भूषण निजमौळीं ॥ ६२ ॥ कृष्णांशाचे अंशभूत । श्रीविधिहरादि आम्ही समस्त । त्यातें नृपासन नाशवंत । अल्प प्राकृत कोणीकडे ॥ ६३ ॥ ऐसिया त्रिजगज्जनका हरी । कौरवीं हेळिलें व्यंग्योत्तरीं । हाचि विस्मय मज अंतरीं । वदतां वैखरी लाजतसे ॥ ६४ ॥ कृष्णनिंदा ऐकतां कानीं । निंदकांची प्राणहानि । म्यां करावी तेचि क्षणीं । तो मी आज्ञूनि उगा असें ॥ ६५ ॥ आणिक बोलिले पैशून्यवचन । त्याचें करूनि अनुस्मरण । वदे विस्मयें संकर्षण । तें सज्जन परिसतू ॥ ६६ ॥

भुजते कुरुभिर्दत्तं भूखंडं वृष्णयः किल । उपानहः किल वयं स्वयं तु कुरवः शिर. ॥ ३८ ॥

कौरवीं दिधली परिमिता क्षिती । तेथील ऐश्वर्य वृष्णि भोगिती । आजि ते कुरुवरा आज्ञा करिती । हे काळगति विपरीत ॥ ६७ ॥ आम्ही उपानह केवळ । स्वयें कौरव अमळ मौळ । ऐशा दुरुक्ति वदले बहळ । लज्जा अलुमाळ न धरूनियां ॥ ६८ ॥ किल म्हणिजे निश्चयात्मक । आम्ही उपानहचि सम्यक । कौरव उत्तमाङ्ग मस्तक । ऐसा विवेक दृढ केला ॥ ६९ ॥ हेलनोक्तीच्या अनुस्मरणें । रसरसूनि संकर्षणें । आवांकिलें जें अंतःकरणें । तें श्रोतीं श्रवणें परिसावें ॥ २७० ॥

अहो ऐश्वर्यमत्तानां मत्तानामिव मानिनाम् । असंबद्धा गिरोरूक्षाः कः सहेतानुशासिता ॥ ३९ ॥

सखेद परमाश्चर्यें म्हणे । ऐश्वर्यमत्तांचें बोलणें । मद्यपा उन्मत्ताग्रमाणें । कोणा साहणें घडेल ॥ ७१ ॥ गौडी माध्वी पैष्टी वारुणी । क्षौद्री मैरेयी गोस्तनी । उन्मत्त इत्यादि मदिरापानी । परुषभाषणी भ्रमग्रस्त ॥ ७२ ॥ कौरव तैसे ऐश्वर्यमस्त । परुषवाक्यें अपरिमित । वदतां सोढव्य करील येथ । कोण सामर्थ्य असतांही ॥ ७३ ॥ स्वयें होत्साता दण्डधर । आणि कुटिलोक्ति या कठोर । कोण साहील धरूनि धीर । आजि हे पामर निर्दाळीन ॥ ७४ ॥ करितां कृतघ्नां उपकार । फिरूनि करिती ते अपकार । त्यांचा करूनियां संहार । गर्वपरिहार करूं आजी ॥ ७५ ॥ पंजरी न शोभे काउळा । पुष्पभूषणें गोळाङ्गुळा । तेंवि कौरवां कुटिलां खळां । स्नेहजिव्हाळा अयोग्य ॥ ७६ ॥ पंचाङ्गुळीं मंडित पाणि । भोजनीं प्रविष्ट अन्नीं वदनीं । तेथ उधवतां नखाग्रश्रेणी । सवेग छेदूनि काढाव्या ॥ ७७ ॥ तेंवि आप्तांमाजीं दप्त । कौरव करीन आजि समाप्त । मज कोपतां यातें गुप्त । न करी व्युप्तकेशविधिही ॥ ७८ ॥

अद्य निष्कौरवीं पृथ्वीं करिष्यामीत्यमर्षितः । गृहीत्वा हलमुत्तस्थौ दहन्निव जगत्त्रम् ॥ ४० ॥

आजि निष्कौरवी धरा । करीन ऐसिया निर्धारा । बोलोनि उचलिलें नांगरा । दांत करकरां खाऊनी ॥ ७९ ॥ क्रोधें थरथरां कांपे गात्र । खदिराङ्गारासारिखे नेत्र । प्रळयकाळीं कुबेरमित्र । त्रिजगत्संहारक जैसा ॥ २८० ॥ तैसा क्षोभे उठिला बळ । प्रबळबळें परजिला हळ । दिसे जैसा कृतान्त काळ । प्रळयानळ कीं दूसरा ॥ ८१ ॥

लांगलाग्रेण नगरमुद्विदार्य गजाव्हयम् । विचकर्ष स गंगायां प्रहरिष्यन्नमर्षितः ॥ ४१ ॥

दक्षिणभागींचे प्रचंड वप्र । भेदिले करूनि हळप्रहार । तेणें उचलिलें हस्तिनापुर । द्रोणगिरिवर कपि जैसा ॥ ८२ ॥ पयोधिमथनीं मंदराचळ । तैसें हस्तिनापुरीचें चडळ । हलें उचलिता झाला बळ । न्युब्ज केवळ करावया ॥ ८३ ॥ पालथें घाला हस्तिनापुर ॥ ऐसें बोलिला यादवेश्वर । मी नृपाचा आज्ञाधर । करीन साचार नृपाज्ञा ॥ ८४ ॥ उलथून पालथें गंगेमाजी । हस्तिनापूर घालीन आजी । नांगरें उत्पतितां सहजीं । पुर गजबजी हाहाकारें ॥ ८५ ॥ माड्या गोपुरें लक्षकोडी । पडलीं भू होतां कानवडी । सदनीं गडबडिल्या उतरडी । पुरी हडबडी एकसरें ॥ ८६ ॥ बोंबा मारिती नारीनर । म्हणती मातले कौरव फार । त्यांचा करावया संहार । आजि हलधर क्षोभला ॥ ८७ ॥ नगरीं झाला हाहाकार । शंख करिती लहान थोर । कौरवसंगें जन समग्र । आजि संहार पावेल ॥ ८८ ॥ बळें उचलितां हस्तिनापुर । कोण्या प्रकारें झालें वक्र । कौरवांचा कोण प्रकार । तो साचार अवधारा ॥ ८९ ॥

जलयानमिवावूर्ण गंगायां नगरं पतत् । आकृष्यमाणमालोक्य कौरवा जातसंभ्रमाः ॥ ४२ ॥

जैसी नौका पालथी होये । गंगेमाजी तेणें न्यायें । हस्तिनापूर कळथों पाहे । म्हणती प्रळय वोढवला ॥ २९० ॥ गंगेमाजी अकस्मात । न्युब्ज होतां नगरपात । कौरव घाबरले समस्त । करिती आकांत प्राणभयें ॥ ९१ ॥ सर्वेही करिती हाहाकार । एक सवेग वेंधले वप्र । एक पळाले सांडूनि पुर । कुटुंबें समग्र घेऊनी ॥ ९२ ॥ एकीं आणिला समाचार । कौरवीं अपमानिला बळभद्र । क्षोभला जैसा प्रळयरुद्र । नांगरें नगर उचटीतसे ॥ ९३ ॥ ऐकूनि भीष्मद्रोणादि म्हणती । कौरव मातले हे दुर्मति । कां क्षोभविला रेवतीपति । कोण आकान्तीं रक्षील या ॥ ९४ ॥ पालथी घालूं शके धरा । तया क्षोभविलें हलधरा । आतां रडती रांडा पोरा । मृत्यु अवमरा वरपडती ॥ ९५ ॥

तमेव शरणं जग्मुः सकुटुम्बा जिजीषवः । सलक्ष्मणं पुरस्कृत्य साम्बं प्राञ्जलयः प्रभुम् ॥ ४३ ॥

जीव वांचवावयाची आशा । घेऊनि कुटुंबा अशेषा । कींव भाकिती द्वारकाधीशा । म्हणती दासां रक्षावें ॥ ९६ ॥ त्या रामातें जाऊनि शरण । कुटुंबेंसहित वंदिती चरण । म्हणती आमुचे रक्षीं

प्राण । होईं सघृण दयाळुवा ॥ ९७ ॥ कुटुंबेंसहित कौरवीं सकळीं । राम वंदूनि बद्धाञ्जळी । स्तविते झाले मुसळी हली । चंद्रमौळी जेंवि सुरीं ॥ ९८ ॥ आदिकरूनि भीष्मद्रोण । सहित अंबिकानंदन । कृपाचार्य विदुर कर्ण । दुर्योधन सह बंधु ॥ ९९ ॥ शकुनि भूरिश्रवा बाल्हिक । प्रजा प्रधान मुख्य मुख्य । वंदूनि रामाचे पदाङ्क । म्हणती सेवक संरक्षीं ॥ ३०० ॥ केविलवाणीं करूनि तोंडें । एक रडती रामापुढें । एक दाविती मोडलीं हाडें । वरी भिंताडें पडोनियां ॥ १ ॥ एक म्हणती संपदा सकळी । क्षणामाजी मिळाल्या धुळी । कौरवीं दुष्टीं हेळिला हली । आम्ही वेगळीं निरागसें ॥ २ ॥ वणव्यामाजी जंतु जळती । तैसी आम्हां झाली गति । चरणाङ्गुष्ठ दांतीं धरिती । रक्षीं यदुपति निजशरणां ॥ ३ ॥ भीष्मादिक करिती स्तवन । वंदूनि बळरामाचे चरण । करविती अपराधक्षमापन । तें आख्यान अवधारा ॥ ४ ॥

राम रामाखिलाधार प्रभावं न विदाम ते । मूढानां नः कुबुद्धीनां क्षंतुमर्हस्यतिक्रमम् ॥ ४४ ॥

जय जय रामा कल्याणधामा । लोकत्रयाच्या विश्रामा । अखिलाधारा पुरुषोत्तमा । रक्षीं आम्हां कृतागसां ॥ ५ ॥ तुझा प्रभाव आम्हां न कळे । मूर्ख नृपमदें आंधळे । विषयभ्रमें घूर्णित डोळे । शरीरबळें उन्मत्त ॥ ६ ॥ आम्ही कुबुद्धि कुटिल खळ । तूं परमात्मा त्रैलोक्यपाळ । अपराध क्षमा करूनि सकळ । होईं कृपाळ बळरामा ॥ ७ ॥ धरणीधर तूं संकर्षण । धरणीआंगीं सोढव्य पूर्ण । तुझिये सत्तेचा तो गुण । क्षमस्वी पूर्ण तूं रामा ॥ ८ ॥ शरणागता वज्रपंजर । हा तव बिरुदाचा बडिवार । कौरव कृतागस पामर । रक्षूनि साचार बिरुद करीं ॥ ९ ॥ जिहीं निन्दा केली तोडें । ते हे खालती करिती मुण्डें । कींव भाकिती प्राणचाडे । काय हें थोडें यश लोकीं ॥ ३१० ॥ कुटुंबेंसहित लोटाङ्गणीं । कौरव निन्दक लागले चरणीं । हें यश मिरवीं हिमकर तरणि । जंववर गगनीं भ्रमती तों ॥ ११ ॥ ऐसा हलधर भीष्मप्रमुखीं । स्तवितां सस्मित बोले मुखीं । पादत्राण कुरुमस्तकीं । कींवि भूलोकीं मिरवेल ॥ १२ ॥ कौरवदत्तभूखंडभाजी । वृष्णि वरिष्ठ झाले आजी । नृपचिह्नेंसी राजसमाजीं । भूभुजपुंजीं विराजले ॥ १३ ॥ ऐसें बोलतां संकर्षण । भीष्मप्रमुखीं धरिले चरण । म्हणती दुष्टांचें भाषण । न करीं स्मरण याउपरी ॥ १४ ॥ गंगेमाजी पडती समळ । गंगा त्यांतें करूनि अमळ । निर्मळ राहे सर्वकाळ । तेंवि हें कुटिळ विसरावें ॥ १५ ॥ साम्बनिग्रहण ऐकोन । क्षोभला राजा उग्रसेन । आमुचें इच्छूनि क्षेमकल्याण । त्वां त्यालागून शान्तविलें ॥ १६ ॥ तूं आलासी स्नेहकामा । परि तें न कळे कौरवाधमां । कृतापराध करूनि क्षमा । रक्षीं आम्हां निजशरणां ॥ १७ ॥ ऐसें स्तविती नाना परी । ससाम्ब लक्ष्मणा नोवरी । पुरस्करूनि ते अवसरीं । प्रलंबारी प्रार्थिती ते ॥ १८ ॥

स्थित्युत्पत्त्यप्ययानां त्वमेको हेतुर्निराश्रयः । लोकान्क्रीडनकानीश क्रीडतस्ते वदंति हि ॥ ४५ ॥

सर्वीं जोडूनि अंजलिपुट । घडघडां करिती स्तोत्रपाठ । केवळ संकर्षणाचे भाट । करिती बोभाट

बिरुदांचा ॥ १९ ॥ म्हणती उत्पत्ति स्थिति प्रळय । देवत्रयाचें कर्म त्रितय । तयां त्रिगुणां तूं आश्रय । निर्गुण निराश्रय केवळ तूं ॥ ३२० ॥ पूर्णचैतन्य तूं ईश्वर । अखिल ब्रह्माण्ड चराचर । तुझी क्रीडा हे अजस्र । विविधाकार क्रीडनकें ॥ २१ ॥ तुझिये क्रीडेचीं बाहुलीं । विविध लोकें प्रतिष्ठिलीं । शक्रादि अभिधानें ठेविलीं । विविधा चाली चालवूनि ॥ २२ ॥ तुझा महिमा हा अव्यय । सर्वत्र प्रकटिती अम्नाय । वाखाणिती मुनिसमुदाय । प्राकृता सोय तद्योगें ॥ २३ ॥ आम्ही पामरें प्राकृतें हीन । तूं परमात्मा संकर्षण । मुनिवर करिती श्रुतिव्याख्यान । भाग्यें श्रवण तैं होय ॥ २४ ॥ कैसें व्याख्यान मुनि करिती । जितुकें विदित आमुचे मति । तितुकें ऐकें अनंतमूर्ति । ऐसें प्रार्थिती कुरुवृद्ध ॥ २५ ॥

त्वमेवमूर्ध्नीदमनंत लीलया भूमंडलं बिभर्षि सहस्रमूर्धन् ।
अंते च यः स्वात्मनि रुद्धविश्वः शेषे द्वितीयः परिशिष्यमाणः ॥ ४६ ॥

भो भो अनंता सहस्रशिरि । तूंचि हें भूमंडळ धरिसी शिरीं । अनंत लीलेच्या प्रकारीं । विश्वाकारीं अभिरमसी ॥ २६ ॥ आधारभूत अनंतमूर्ध्नी । तेथ आधेय अवघी धरणी । धराधर तूं पूर्णपर्णी । लीलेकरूनि भू धरिसी ॥ २७ ॥ यथानुक्रमें प्रकृतिमान । पुरतां होसी संकल्पशून्य । निर्विकल्प करूनि मन । विश्व संपूर्ण सांठविसी ॥ २८ ॥ तैं अद्वितीय उरे जो शेष । शेषशायी म्हणणें त्यास । नित्य निर्गुण निर्विशेष । तो तूं परेश सन्मात्र ॥ २९ ॥ गुणमय समष्टि ब्रह्माण्ड । अविद्या-गुणात्मक व्यष्टि पिण्ड । तेणें आवृत होतां मूढ । झालों सदृढ भ्रमग्रस्त ॥ ३३० ॥ अविद्याभ्रमाची भुली पडली । एकीं अनेकता विरूढली । करणज्ञानें निष्ठा घडली । प्रतीति बिघडली वास्तव जे ॥ ३१ ॥ यालागीं सगुण मर्त्यलिंग । प्रकाशी जैसा करणवर्ग । तोचि प्रत्यय बाणें चांग । नुमजे अव्यंग आत्मत्व ॥ ३२ ॥ यालागीं अद्वया अखिलानंता । देऊं प्रत्यक्ष हे सगुणता । मानूं मानवासम प्राकृता । हा आमुचे माथां दोष नसे ॥ ३३ ॥ दृश्य साच मानिती करणें । यास्तव तूंतें वृष्णिपणें । जाणोनि केलीं जीं हेळणें । क्षमा करणें तीं अवघीं ॥ ३४ ॥ तुझा कोप हा आमुच्या ठायीं । सहसा उचिता नोहे पाहीं । म्हणसी यदर्थीं कारण कायी । तें सर्वही अवधारीं ॥ ३५ ॥ अनादिसिद्ध ब्रह्माण्डवर्ती । निगमप्रतिपाद्य जे कां स्थिति । तत्पथ दैत्य जे भंगिती । ते प्रतिपंथी धर्माचे ॥ ३६ ॥

कोपस्तेऽखिलशिक्षार्थं न द्वेषान्न च मत्सरात् । बिभ्रतो भगवन्सत्त्वं स्थितिपालनतत्परः ॥ ४७ ॥

ते धर्माची संस्थापना । करावया अवतार नाना । घेऊनि करणें स्थितिपालना । दुष्टां दुर्जनां दंडूनि ॥ ३७ ॥ मुंगीपासूनि विरंचीवरी । धर्मोच्छेदनीं शिक्षा करी । अखिलशिक्षार्थ दंडधारी । तूं अवधारी जगदीशा ॥ ३८ ॥ जितुका अपराध तितुका दंड । करूनि पाळिसी ब्रह्माण्ड । तात्पर्यार्थ कोप उदंड । दुष्ट प्रचंड निर्दळना ॥ ३९ ॥ द्वेषा अथवा मत्सरास्तव । तुझ्याठायीं क्रोधोद्भव । न घडे निश्चय हा वास्तव । तव कृपेस्तव जाणतसों ॥ ३४० ॥ यादव मनुष्य तुज मानूनी । वास्तव तव ऐश्वर्य नेणोनी । हेलना केली मूर्खपणीं । ते तूं मनीं न धरिसी ॥ ४१ ॥ तुवां मनुष्यमात्र व्हावें ।

तें हेलनोक्तीनें विषादा यावें । वास्तव स्वरूप झालें ठावें । कृपावैभवें स्वामीच्या ॥ ४२ ॥ आतां स्वपादशरणां रक्ष । आमुचे अपराध लक्षेंलक्ष । विसरूनि शरणागताचा पक्ष । कृपाकटाक्षें अवलोकीं ॥४३॥

नमस्ते सर्वभूतात्मन्सर्वशक्तिधराव्यय । विश्वकर्मन्नमस्तेऽस्तु त्वां वयं शरणं गताः ॥ ४८ ॥

सर्व भूतांचा अंतरात्मा । सर्वसाक्षी सर्वोत्तमा । सवशक्तिधर तव गरिमा । अव्यय अनामा अक्षरा ॥ ४४ ॥ ब्रह्माण्डसमुच्चय होय जाय । त्यामाजी तूं अज अव्यय । मायानियंता मायाश्रय । मायातीता अमायिका ॥ ४५ ॥ विश्वकर्मन्संबोधनें । याचिलागीं तूंतें म्हणणें । अखिल विश्वाचें होणें जाणें । स्थितिलयगोपनें तव सत्ता ॥ ४६ ॥ कालकलनाप्रवर्तक । माया स्वसत्ता नियामक । नाहीं तुजपरता आणिक । जाणोनि पदाङ्क दृढ धरिलें ॥ ४७ ॥ तूंतें आम्ही शरणागत । आलों कृतागस दुष्कृत । करीं अभयदानें सनाथ । आमुचें औद्धत्य विसरूनी ॥ ४८ ॥ बाळकाचे अन्याय कोटी । कृपेनें माऊली घाली पोटीं । तेंवि आमुचें कृपादृष्टी । रक्षीं संकटीं दयाळुवा ॥४९॥ भीष्मप्रमुखीं केला स्तव । रामें साद्यंत ऐकूनि सर्व । जाणोनि तयाचा अंतर्भाव । आला द्रव कारुण्यें ॥ ३५० ॥

श्रीशुक उवाच–एवं प्रपन्नैः सविग्नैर्वेपमानायनैर्बलः । प्रसादितः सुप्रसन्नो मा भैष्टेत्यभयं ददौ ॥ ४९ ॥

नगर घालितां पालथें । थोर आकान्त नगरस्थांतें । भयें व्यापिलें कौरवांतें । उद्विग्नचित्तें यास्तव ते ॥५१॥ एवं कौरव संविग्नचित्त । पूर्वोक्तप्रकारें शरणागत । स्तवनें नमनें रेवतीकान्त । प्रसन्न त्वरित तिहीं केला ॥ ५२ ॥ प्रसन्न होत्साता बळराम । अभयहस्तें पूर्णकाम । सस्मितवदनें बोले क्षेम । येथूनि तुम्हां मम वरें ॥ ५३ ॥ म्यां ओपिलें अभयदान । येथूनि सर्वांचें कल्याण । तुमचें दौर्जन्य तुम्हांसि विघ्न । होतां शरण तें क्षमिलें ॥ ५४ ॥ इत्यादि स्तवनीं वृष्णिपाळा । स्तवितां अपराध क्षमा केला । नांगर काढूनि पुरवप्राला । दडपिता झाला पूर्ववत ॥ ५५ ॥ अभय ओपितांचि बळभद्र । कौरवीं केला जयजयकार । मंगळतुरांचा वाद्यगजर । नेला हलधर नृपसदना ॥ ५६ ॥ यथाविधि पाणिग्रहण । चारी दिवस संपादून । साडे ऐरणी वंशविधान । लक्ष्मीपूजन जानवसा ॥ ५७ ॥ दुर्योधन जो कौवरराव । सांडूनि ऐश्वर्यमदाचा गर्व । देता झाला पारिबर्ह । संतोषार्ह जामात्या ॥ ५८ ॥

दुर्योधनः पारिबर्हं कुंजरान्षष्टिहायनान् । ददौ च द्वादश शतान्ययुतानि तुरंगमान् ॥ ५० ॥

षष्टायन जे भद्रजाति । बारा शतें मत्त हस्ती । देता झाला सप्रेमभक्ति । जामात्या दुहितृवात्सल्यें ॥ ५९ ॥ एक लक्ष वीस सहस्र । पर्वतसंभव तुरंगसार । जवें जिंकिती जे समीर । ते साळंकार समर्पिले ॥ ३६० ॥

रथानां षट्सहस्राणि रौक्माणां सूर्यवर्चसाम् । दासीनां निष्ककण्ठीनां सहस्रं दुहितृवत्सलः ॥ ५१ ॥

सहा सहस्र सुवर्णरथ । रविभाभासुर रत्नखचित । आसनें वितानें शिबिरान्वित । तुरंगमंडित स्रुतेंसीं ॥ ६१ ॥ एक सहस्र तरुणा दासी । सालंकृता लावण्यराशि । अमौल्य पदकें कंठदेशीं । उपचारेंसी समर्पिल्या ॥ ६२ ॥ वस्त्रें पात्रें दिव्याभरणें । महिषी अजा अविक गोधनें । कन्यावत्सलें दुर्योधनें । नृपोपकरणें निवेदिलीं ॥ ६३ ॥ आंदण अर्पूनि दुर्योधन । म्हणे लक्ष्मणा नेणती सगुण । प्रतिपाळावी कृपेंकरून । वदतां नयनीं जळ आलें ॥ ६४ ॥ सहित धृतराष्ट्र गांधारी । भानुमतीप्रमुख नारी । लक्ष्मणा निरवूनि रामाकरीं । देतां नेत्रीं जळ लोटे ॥ ६५ ॥ भीष्मप्रमुखां कौरवां सकळां । मोह जाकळी तये वेळां । म्हणती रामा वृष्णिपाळा । स्नेहें सांभाळा कुमरीतें ॥ ६६ ॥ इत्यादि वचनीं लक्ष्मणा । निरोविली संकर्षणा । सवें देऊनि दुःशासना । द्वारकाभुवना बोळविती ॥ ६७ ॥

प्रतिगृह्य तु तत्सर्वं भगवान्सात्वतर्षभः । ससुतः सस्नुषः प्रायात्सुहृद्भिरभिनंदितः ॥ ५२ ॥

रामें पारिवर्ह समस्त । सवें घेऊनि स्नुषा सुत । द्वारकापुरा आनंदभरित । सात्वतनाथ निघाला ॥ ६८ ॥ इष्ट मित्र सुहृद आप्त । कौरवपाण्डवादि समस्त । गव्यूतिमात्र बोळवित । कलत्रेंसहित निघाले ॥ ६९ ॥ स्तुतिस्तवनें रामाप्रति । स्नेहवादें तोषविती । सुप्रसन्न रेवतीपति । सुहृदप्रेमोक्ति परिसोनी ॥३७०॥ गव्यूतिमात्र क्रमिल्या पंथ । रामें स्थिर करूनि रथ । सर्व कौरव कलत्रेंसहित । प्रार्थूनि तेथ राहविले ॥ ७१ ॥ कुरुवृद्धाची घेऊनि आज्ञा । राम आरूढला स्यंदना । मंगळतुरांची गर्जना । द्वारकाभुवना चालियले ॥७२॥ उद्धव केला पुरःसर । दुःशासन पार्ष्णिधर । मध्यें बळराम ओहर । सेनापरिवारवेष्टित ॥ ७३ ॥ स्थिर स्थिर चाले सेना । मथुराप्रान्तीं लंघिली यमुना । चर्मण्वतीचिया जीवना । त्रितीय दिवशीं ठाकिलें ॥ ७४ ॥ अर्बुदाचळेश्वर वंदून । साभ्रमती उल्लंघून । आनर्तदेश अतिक्रमून । द्वारकाभुवन पावले ॥ ७५ ॥ बळराम येतां द्वारकेनिकटीं । कृष्ण सम्मुख पातला भेटी । सवें यदुचक्राची दाटी । पुरजनदाटी बहुसाल ॥ ७६ ॥ उद्धव आणि संकर्षण । नमिले ब्राह्मण अभिवंदून । वोहरें नमिती श्रीकृष्णचरण । मौळावघ्राण येरू करी ॥ ७७ ॥ दुःशासनें नमिला हरि । येरू कवळूनि हृदयीं धरी । आलिंङ्गूनि स्नेहभरीं । तोष अंतरीं वोसंडे ॥ ७८ ॥ त्यानंतरें यदुपुङ्गवां । अनुक्रमेंचि नमिलें सर्वां । कृष्णतनुजां अनुजां खेवा । देऊनि गौरवा मानविलें ॥ ७९ ॥ मंगळतुरांचिया गजरीं । प्रवेशले द्वारकापुरीं । तें कुरुवर्या अवधारीं । शुकवैखरी वर्णीतसे ॥ ३८० ॥

ततः प्रविष्टः स्वपुरीं हलायुधः ममेत्य बंधूननुरक्तचेतसः ॥
शशंस सर्वं यदुपुंगवानां मध्ये सभायां कुरुषु स्वचेष्टितम् ॥ ५३ ॥

त्यानंतर हलायुध । द्वारका प्रवेशला सुस्निग्ध । त्या समयींचा परमानंद । कोण विशद कवि वर्णी ॥ ८१ ॥ महाद्वारीं सांडिल्या बळि । भूरि वांटिली कनकाञ्जळी । जयजयकार करिती सकळी । वैष्णव धुमाळी नाचती ॥ ८२ ॥ नृत्य करिती नृत्यांगना । सप्तस्वरीं तानमाना । गंधर्व गाती साम-

गायना । वेदाध्ययना द्विज करिती ॥ ८३ ॥ ठायीं ठायीं ठाकती उभे । पुरजनदाटणी पाहती शोभे । वोहरें मिरवितां पंकजनाभें । समारंभ पुरगर्भीं ॥ ८४ ॥ पुढें वाजती गजदुंदुभी । दीर्घपताका फडकती नभीं । तुङ्गातपत्रें छत्रें उभीं । भंवरी देती गरगरां ॥८५॥ रत्नदंडी चामरजोडें । वोहरा वीजिती चहूंकडे । वेत्रपाणि खोलती पुढे । मांदी निवाडें सारावया ॥८६॥ अस्तमाना गेला तरणि । पुरप्रवेशीं झाली रजनी । अग्निद्रव्याची विचित्र करणी । कौतुक नयनीं जन पाहती ॥८७॥ पुष्पवृष्टि वोहरांवरी । परिमळद्रव्यें उधळिती भारी । ऐसे अनेक उत्साहगजरीं । आले झडकरी भद्रपीठा ॥ ८८ ॥ पुढें सुधर्मासभास्थानीं । राजा उग्रसेन सिंहासनीं । भोंवत्या यादवांचिया श्रेणी । जेंवि सुरगणीं अमरेन्द्र॥८९॥ देवकआनकदुंदुभिप्रमुख । विकट कृतवर्मा सात्यक । भानुदेवभागादिश्वफल्क । वृद्ध अनेक यदुवर्य ॥ ३९० ॥ ऐसिये नृपसभेमाझारी । संकर्षण ते अवसरीं । वधूवर दोहीं कडियेवरी । घेऊनि झडकरी प्रवेशला ॥ ९१ ॥ रायें कवळूनियां वोहर । मुखावरूनि उतारिला कर । उभयतांची प्रीति स्थिर । उमामहेश्वरसम राहो ॥ ९२ ॥ आज्ञा करूनि सेवकाला । उघडूनि नेपथ्यवसनशाळा । दिव्याभरणां दिव्य दुकूळां । वधूवरांला लेवविलीं ॥ ९३ ॥ दुःशासन भेटला राया । समग्र वृष्णींच्या समुदाया । सभास्थानीं वैसोनियां । कथिती झालिया वृत्तान्ता ॥ ९४ ॥ हस्तिनापुरींची समग्र कथा । उद्धवें निवेदिली नृपनाथा । दुर्योधनें चरणीं माथा । ठेवूनि दुहिता निवेदिली ॥ ९५ ॥ कौरवीं सन्मान केला पूर्वी । तुमची आज्ञा ऐकतां गुर्वी । क्षोभा चढले महागर्वी । जैसा पर्वीं जळराशि ॥ ९६ ॥ हेलनोक्ति नानापरी । बोलोनि प्रवेशले नगरीं । तेव्हां प्रळयरुद्रापरी । रामशरीरीं क्रोधोर्मी ॥ ९७ ॥ पालथें घाला हस्तिनापुर । तुमचे आज्ञेचें उत्तर । स्मरोनि म्हणे नृपकिङ्कर । करीन साचार नृपाज्ञा ॥ ९८ ॥ नांगर घालूनि वप्रातळीं । उचटूनि नगराची ढेंपुळी । पालथें घालितां गंगाजळीं । कौरवमंडळी गजबजली ॥ ९९ ॥ भीष्मादिक आले शरण । मुकुटें वंदूनि संकर्षण । स्वतनें करूनि सुप्रसन्न । स्नुषा नंदन समर्पिली ॥ ४०० ॥ विवाहसंभ्रम केला थोर । पारिबर्हे दिधलें फार । राया अर्पिलें तें समग्र । हयरथकुंजरदासीसीं ॥ १ ॥ उग्रसेनें तें आंदळ पुढती । वोहरां अर्पिलें परमप्रीती । ऐकोनि बळरामाची कीर्ति । यादव हांसती करधरणी ॥ २ ॥ ताम्बूल अर्पिले सर्वांप्रति । दुःशासनें पूजिला नृपति । अहेर वसनाभरण निगुतीं । पात्राप्रमाणें निवेदिलीं ॥ ३ ॥ घेऊनि उग्रसेनाची आज्ञा । रामप्रमुख गेले सदना । करिते झाले श्रीपूजना । जाम्बवतीचे मंदिरीं ॥ ४ ॥ गृहप्रवेश संपादिला । द्वारकेमाजी उत्साह झाला । सुहृदां स्वजनां सह द्विजाला । दिव्य भोजनें समर्पिलीं ॥ ५ ॥ रेवती रुक्मिणी जाम्बवती । इत्यादि वरिष्ठा कृष्णयुवती । वरमातरा गौरविती । यादवपंक्ति सुहृदत्वें ॥ ६ ॥ श्रेष्ठ यादव निजमंदिरीं । वोहरें वरमाय वाद्यगजरीं । अभ्यंगादि सर्वोपचारीं । पृथगाकारीं गौरविती ॥ ७ ॥ ऐसा आनंद झाला थोर । वर्णिती सुर नर मुनि किन्नर । द्वारकेपुढें अमरपुर । भासे लघुतर पलिवत ॥ ८ ॥ दुःशासन मास दोनी । राहिला स्नेहें द्वारकाभुवनीं । पुढती हस्तिनापुरीहूनी । विकर्ण शकुनि मूळ आले ॥ ९ ॥ शकुनिप्रमुखां सर्वोपरी । यादवीं आपुलालिये मंदिरीं । पूजूनियां पृथगाकारीं । श्रेष्ठ अहेरीं गौरविलें ॥ ४१० ॥ उत्तम मुहूर्तीं माहेरा । बोळविली ते साम्बदारा ।

लक्ष्मणा घेऊनि हस्तिनापुरा । शकुनिप्रमुख पावले ॥ ११ ॥ ये अध्यायीं इतुकी कथा । शुक सांगोनि कौरवनाथा । म्हणे रामाचें यश तत्त्वता । कोण वक्ता वदों शके ॥ १२ ॥

अद्यापि च पुरं ह्येतत्सूचयद्रामविक्रमम् । समुन्नतं दक्षिणतो गंगायामनुदृश्यते ॥ ५४ ॥

अद्यापि राया हस्तिनापुर । कुरुवंशाचें राज्य भद्र । उत्तरभागीं निम्नतर । जाह्नवीतीरपर्यंत ॥ १३ ॥ वप्र भेदिले लाङ्गलघातें । यास्तव उच्छ्रित दक्षिणप्रान्तें । यश रामाचें जाणविते । उत्तरोत्तर युगानुयुगीं ॥ १४ ॥ अद्यापिही गंगातीरीं । दक्षिणोच्छ्रित हस्तिनापुरीं । देखिजे ते अमरीं नरीं । प्रतापथोरी रामाची ॥ १५ ॥ इतिश्रीमद्भागवतीं । दशमस्कंधीं परीक्षिति । अद्भुत बळरामाची शक्ति । ऐकूनि चित्तीं स्मय मानी ॥ १६ ॥ श्रीशुक म्हणे राया चतुरा । संकर्षणा धरणीधरा । इत्यादि कर्में चमत्कारा । कारणरूप न भासती ॥ १७ ॥ एक ईश्वरद्विधा रूपें । भूभार उतरावयाच्या पडपें । नटला बळकृष्णस्वरूपें । पूर्वसंकल्पें सुरावना ॥ १८ ॥ त्यांचीं ऐसीं अगाध कर्में । येरां मानवां ज्यांचेनि नामें । सांडिजेतसे भवसंभ्रमें । जपतां प्रेमें अहर्निशीं ॥ १९ ॥ ऐसें बळरामाचें यश । जे ऐकती नित्य निर्दोष । ते नर वरिती कैवल्यास । इतुका विशेष ये श्रवणीं ॥४२०॥ पुढिले अध्यायीं कुरुवर्या । श्रीकृष्णाची अद्भुत चर्या । आला नारद पहावया । स्वर्गींहूनियां तें ऐका ॥ २१ ॥ प्रतिष्ठानकैवल्यनिलयीं । श्रीएकनाथशेषशायी । चिदानंदें लक्ष्मी पाहीं । स्वानंददायी पद सेवी ॥ २२ ॥ गोविंदपादपंकजरज । वाहिनी गंगा तेजःपुंज । दयार्णवीं ते भरतां सहज । त्रिजगाभोज निमज्जनीं ॥ २३ ॥ श्रवणमात्रें कीजे पान । अर्थानुप्रभवें अवगाहन । मननें निर्दोषसुखसंपन्न । तीर्थविधान हें येथ ॥ २४ ॥ विधानवक्ता आचार्यमूर्ति । करूनि भवभयाघनिवृत्ति । शुद्ध प्रकटी आत्मप्रतीति । चिन्मात्र स्थिति वास्तव जे ॥२५॥ यालागीं हे त्रिजगत्पावनी । दयार्णवसंगमीं मंदाकिनी । सेवूनि वसिजे कैवल्यसदनीं । हे जाणवणी मुमुक्षूतें ॥ ४२६ ॥ इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां बलभद्रविजयसाम्बलक्ष्मणाविवाहोनामाष्टषष्टितमोऽध्यायः ॥ ६८ ॥

पिंगलाब्दे परे शुक्ले द्वादश्यां भौमवासरे । पिपीलिकापुरे पूर्ण लक्ष्मणाहरणं शुभम् ॥

श्लोक ५४ ॥ टीका ४२६ ॥ एवं संख्या ४८० ॥
(सदुसष्टावा अध्याय मिळून ओवीसंख्या ३१७१६)

अडुसष्टावा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ६९ वा

श्रीकृष्णपरमात्मने नमः । विपरीतबोधें भरलें हृदय । अबोध त्यालागीं खाऊनि ठाय । स्वबोधाचा नोहे उदय । तैं गुरुपाय भजिन्नलों ॥ १ ॥ विपरीतबोधें प्रपंचभान । करणसमुच्चयें प्रकाशी मन । निर्विकल्प अंतःकरण । अबोधपूर्ण गाढ मूढ ॥ २ ॥ अन्यथा बोध मानसमात्र । विषयकरणें स्थूळगात्र । होऊनि व्यवहारे कल्पनातंत्र । प्रत्यय सर्वत्र हा वर्ते ॥ ३ ॥ एवं अबोध दोहों परी । विपरीत अन्यथा बोधकुसरी । दावी लपवी निजान्तरीं । निश्चळ करी घनगाढ ॥ ४ ॥ परंतु स्वबोधाची वाट । साधनें करितां न चले स्पष्ट । शास्त्राध्ययनीं करूनि कष्ट । होती चावट बहुतेक ॥ ५ ॥ न्यायमीमांसा वेदान्त । साङ्ख्यपातंजळसिद्धान्त । शिकिवां घोकिवां युक्ति बहुत । वक्ते विख्यात भूपृष्ठीं ॥६॥ शास्त्राभ्यासें श्रमलें तोंड । करिती तदनुसार बडबड । आत्मोपलब्धीची न धरूनि चाड । प्रचंड कावाड वाहताती ॥ ७ ॥ ऐसियापाशीं स्वबोध पुसतां । शब्दप्रबोध लाभे नुसता । वास्तव आत्मप्रत्यय नसतां । शिष्य कुसमुसितां रुसताती ॥ ८ ॥ एवमादि वयुनवन्तां । भजावें भावूनिया भगवन्ता । भजनमात्रें मनोरथा । होय पूर्णता हरिवरें ॥ ९ ॥ वाचूनि तयांची व्युत्पत्ति । न करी अक्षर अमृतावाप्ति । म्हणूनि सद्गुरु करुणामूर्ति । अभेदभक्ति आश्रयिला ॥ १० ॥ माझा गोविन्द करुणासिन्धु । अबोधीं प्रकटोनि चिन्मात्रबोधु । भवभ्रमाचा छेदूनि कंदु । परमानंदु जागविला ॥ ११ ॥ असो ते वंदूनि गोविन्दचरण । आरब्धदशमस्कंधव्याख्यान । अडुसष्टि अध्यायीं भाषाकथन । लक्ष्मणाहरण निरूपिलें ॥ १२ ॥ पुढें एकोनसप्ततितमीं । षोडशसहस्रगृहस्थाश्रमीं । एकला कृष्ण पृथक धामीं । वर्ते नियमीं समसाम्य ॥ १३ ॥ पहावया हें परमाश्चर्य । येता जाहला देवर्षिवर्य । इये कथेचें रसमाधुर्य । कुरुनरधुर्या शुक सांगे ॥ १४ ॥ मागेंचि वर्तली असे हे कथा । येथ योगीन्द्रें प्रसंगतः । निरूपिली कौरवनाथा । तैसीच श्रोतां परिसावी ॥ १५ ॥

नरकं निहतं श्रुत्वा तथोद्वाहं च योषिताम् । कृष्णेनैकेन बह्वीनां तद्दिदृक्षुः स्म नारदः ।। १ ।।

कुरुकुळनरवरधुरंधरा । श्रवणकोविदा मात्स्यीकुमरा । कृष्णलीलाब्जरसमधुकरा । त्यक्तनीरा नररत्ना ।।१६।। परमेष्ठीचिये सभास्थानीं । देवगंधर्वीं गातां वदनीं । नारदें हरियश ऐकोनि श्रवणीं । इच्छी नयनीं पहावया ।। १७ ।। सहज संचारप्रसंगें । अमरावतिये आला वेगें । नरकहननादि हरियश अवघें । ऐकोनि निजाङ्गें सुखावला ।। १८ ।। नरक निवटिला विश्वकंटक । अदितिअमरां दिधलें सुख । तत्संगृहीत कन्यका देख । नेऊनि पृथक पर्णियल्या ।। १९ ।। एकें कृष्णें अनेक कन्या । एके घटिकेंत विधिविधाना । पृथक पृथक पाणिग्रहणा । करूनि वरल्या हें नवल ।। २० ।।

चित्रं बतैतदेकेन वपुषा युगपत्पृथक् । गृहेषु द्व्यष्टसाहस्रं स्त्रिय एक उदावहत् ।।२ ।।

बत हें आश्चर्य आपुले मनीं । अघटित विचित्र नारदमुनि । एके घटिकेंत अनेक पत्नी । एकला पर्णी केंवि हरि ।। २१ ।। द्व्यष्टसाहस्रां सदनीं कैसा । एक्या शरीरें वर्ते सरिसा । समान रमवी सर्व योषा । हर्षामर्षीं न भजोनी ।। २२ ।। हेंचि पहावया कौतुक । नारद होत्साता उत्सुक । द्वारावतीप्रति सभ्यक । येता झाला तें ऐका ।। २३ ।।

इत्युत्सुको द्वारवतीं देवर्षिर्द्रष्टुमागमत् । पुष्पितोपवनारामद्विजालिकुलनादिताम् ।। ३ ।।

जिये द्वारावतीप्रति । पहावया नारद प्रीती । पातला तयेची शोभा वदती । साडे तीं श्लोकीं शुकस्वामी ।। २४ ।। उपवनें फुललीं विविध फुलीं । रम्य उद्यानें शोभलीं । वृक्ष लगडले सुधोपमफळीं । यास्तव द्विजाळी रुंजति ।। २५ ।। द्विज म्हणिजे पक्षिजाति । अमरभोग्यें फळें खाती । तदुन्मादें सुस्वर गाती । विविधा जाती विविधा रवें ।। २६ ।। अळिशब्दें बोलिजे भ्रमर । सेविती प्रसूनामोदसार । तदुन्मादें मधुरोत्तर । गुञ्जारवाति स्वानंदें ।। २७ ।। तया द्विजालिकुळाचें कूजित । तेणें द्वारका सुनादित । अमरावतीहूनि बहुत । गुणमंडित मुनि मानी ।। २८ ।। पुष्पवाटिका वनोद्यानें । वर्णिलीं येथें शुकव्याख्यानें । यावरी सरोवरें पूर्णजीवनें । शोभायमानें तें ऐका ।। २९ ।।

उत्फुल्लेंदीवराम्भोजकह्लारकुमुदोत्पलैः । छुरितेषु सरस्सूच्चैः कूजितं हंससारसैः ।। ४ ।।

पुन्हां कैसी सुनादित । नारदें द्वारका पाहिली तेथ । कुमुदोत्पलें प्रफुल्लित । सरोवर व्याप्त सर्वत्र ।। ३० ।। पंकेरुहें सरसीरुहें । रातोत्पलें कुशेशयें । तामरसें नवगाङ्गेयें । इन्दीवरें कल्हारें ।। ३१ ।। चतुःपंच षष्टाष्ट दळें । दशद्वादशारें निर्मळें । चतुर्दशषोडशपत्री कमळें । अतिविशाळें सहस्रारें ।। ३२ ।। ऐसीं सरोवराच्या ठायीं । अनेकजाती कमळें पाहीं । द्वारकेभोंवतीं सर्वदाही । विराजमानें मुनि पाहे ।। ३३ ।। तया जलाश्रयकमलाश्रयें । मधुकर मधुपानें तन्मय । हंस सारस

पक्षिनिचय । क्रीडताती संतोषें ॥ ३४ ॥ जैसें हरिपदकमळासक्त । उपासक प्रेमळ भवविरक्त । वृत्त्यु-परमें तटस्थ । तैसे द्विजाळी सरोवरीं ॥ ३५ ॥ नीलोत्पलीं नील मधुप । स्तिमित भासती अभेदरूप । कृष्णभजनें कृष्णसारूप्य । भक्त अमूप जयापरी ॥ ३६ ॥ विविध भक्तांचीं अनेक मनें । तेंवि सरोवरीं विविध सुमनें । अनेक रंगाढ्यें सद्गुणें । लक्षी नयनें देवर्षि ॥ ३७ ॥ श्रवणरंगीं रंगले भ्रमर । तैसे कीर्तनरंगीं अपर । स्मरणरंगीं रत मधुकर । स्मरणाकार सारूप्यें ॥ ३८ ॥ एक रंगले पादाब्जरसा । एक निविष्ट सपर्याकोशा । एक पदकंजा अशेषा । नमनविलासें पकडले ॥ ३९ ॥ एक भ्रमर देऊनि घरटी । हास्यरसाची हातवटी । साधूनि सर्वदा सुखसंतुष्टी । निर्भय पोटीं तत्प्रेमें ॥ ४० ॥ एक संख्यारसाचे भोक्ते । अवंचकभावें आसक्तचितें । रंगले अनन्वय होत्साते । अमूयाद्वैतें मांडवले ॥४१॥ एक आत्मार्पणीं निरत । आमोदामृतीं होऊनि अमृत । विभ्रम भ्रमर भ्रमातीत । भ्रमणरहित विराजले ॥ ४२ ॥ एक हरिपदकंजयोगी । एक ध्यानामृत भोगी । एक विरक्त भवभ्रमत्यागी । एक निःसंगी आत्मरत ॥ ४३ ॥ असो ऐसे अनेक भ्रमर । सुमनरंगीं सुमनाकार । गुञ्जारवतां द्वारकापुर । नादाकार मुनि लक्षी ॥ ४४ ॥ ऐसी भंवती द्वारकापुरी । पाहूनि नारद तोषला भारी । मग प्रवेशला माझारी । तें अवधारीं कुरुवर्या ॥ ४५ ॥

प्रासादलक्षैर्नवभिर्जुष्टां स्फाटिकराजतैः । महामरकतप्रख्यैः स्वर्णरत्नपरिच्छदैः ॥ ५ ॥

नव लक्ष प्रासाद दामोदरीं । मंडित शोभे द्वारकापुरी । स्फाटिकी राजती रचनाकुसरी । क्रिया त्वाष्ट्री मुनि लक्षी ॥ ४६ ॥ नवलक्ष रमणीय दामोदरें । रजतस्फटिकांचीं सुन्दरें । निघोटिलीं कार्तस्वरें । रत्नें विचित्रें खेवणिलीं ॥ ४७ ॥ तेजःपुंज रत्नखचित । कळस झळकती गगनाआंत । जैसे उदेले भास्वत । असंख्यात नभोगर्भी ॥ ४८ ॥ महामरकतमणींची प्रभा । द्वारका आच्छादित भरल्या नभा । प्रासादकलशकदंबाभा । संमिश्रशोभा फांकतसे ॥ ४९ ॥ ऐसिये द्वारके माझारी । नवलक्ष प्रासादशिखरहारी । माजी संपदा प्रतिमंदिरीं । वदतां वैखरी मौनावे ॥ ५० ॥ परिच्छद-पर्याय परिकर । वदला यतिवर्य श्रीधर । याचा कीजे तरी विस्तार । जरी श्रोते चतुर सर्वज्ञ ॥ ५१ ॥ सर्वां सदनीं सर्वोपकरणें । स्वर्णरत्नांचीं संपूर्णें । नानारत्नीं नानावर्णें । विश्वकर्म्यानें निर्मिलीं ॥५२॥ देवायतनें प्रतिमंदिरीं । रत्नखचितें कार्तस्वरी । तेथिची उपकरणसामग्री । भासे कार्वुरी लालामी ॥ ५३ ॥ पाकशाळेचीं भाजनें । सुवर्णरजतांचीं संपूर्णें । विविधेंरस पचनाकारणें । विश्वकर्म्यानें प्रयोजिलीं ॥ ५४ ॥ पानपात्रें भोजनपात्रें । रत्नखचितें चित्रें विचित्रें । चषक झारिया गंडूषपात्रें । सर्वीं सर्वत्र जडितांचीं ॥ ५५ ॥ रत्नजडितांचे पर्यंक । शयनभुवनीं एकें एक । तगटीं चांदवे रंग अनेक । मुक्ताघोष लखलाखिती ॥ ५६ ॥ असो इत्यादि समस्तां भुवनीं । रत्नजडितपरिच्छदभरणी । एकैक पदार्थ वदतां वाणी । ग्रंथ गगनीं न समाये ॥ ५७ ॥ इत्यादिपदार्थमंडित पुरी । वैकुंठभुवना-हूनि साजिरी । नारद पाहत चालिला नेत्रीं । तें अवधारीं कुरुनाथा ॥ ५८ ॥

विभक्तरथ्यापथचत्वरापणैः शालासभाभी रुचिरां सुरालयैः ।
संसिक्तमार्गांगणवीथिदेहली पतत्पताकाध्वजवारितातपाम् ॥ ६ ॥

विभागें विभक्त पृथक्पृथक । विशाळ विस्तीर्ण राजमार्ग । सूत्रें धरूनि निर्मिले साङ्ग । शोभती अव्यंग चौबारें ॥ ५९ ॥ दोहीं भागीं दुकानश्रेणी । निर्मिल्या दिव्यरत्नीं सुवर्णीं । सूर्यप्रभेचे वैदूर्यमणि । दिवसरजनि नुमसविती ॥ ६० ॥ पण्यशाळा विराजित । भरले अनेक पदार्थ । वार्धुष वैसले समर्थ । करिती यथार्थ क्रयविक्रय ॥ ६१ ॥ द्वारकारचनावर्णनकाळीं । पण्य सभा शाळा सकळी । कथिल्या तिहीं पुरी शोभिली । तैसी पाहिली मुनिवर्यें ॥ ६२ ॥ पंचायतनीं देवालयें । रत्नखचितें कनकमयें । शिखरें गोपुरें त्रिदिवप्रायें । देखता होय मुनि नेत्रीं ॥ ६३ ॥ केशरकस्तुरीचन्दनसडे । मार्गीं घातले चहूंकडे । वीथि अंगणे प्राङ्गणें कोडें । सिंपिलीं निवाडें लखलखिती ॥ ६४ ॥ मण्डप गोपुरें देहलिया । भगवच्चरित्रें चित्रिलिया । ध्वजपताका कलशाथिलिया । गगनीं तळपती प्रभंजनें ॥ ६५ ॥ प्रचुर पताकांचीं वसनें । गगनीं विस्तीर्ण लंबायमानें । तळपतां वारिती भास्करकिरणें । द्वारका तेणें सुशोभित ॥ ६६ ॥ ऐसिये द्वारके माझारी । सशत सोळा सहस्रां घरीं । विराजमान सर्वां परी । अन्तःपुर कृष्णाचें ॥ ६७ ॥

तस्यामंतःपुरं श्रीमदर्चितं सर्वधिष्ण्यपैः । हरेः स्वकौशलं यत्र त्वष्ट्रा कात्स्न्र्येन दर्शितम् ॥ ७ ॥

नारदें पाहिलें द्वारकापुर । वैकुंठभुवनाहूनि सुन्दर । त्यामाजी हरीचें अंतःपुर । लक्षुनि सत्वर प्रवेशला ॥ ६८ ॥ तें अंतःपुर म्हणाल कैसें ॥ सर्व धिष्ण्यपीं अर्चिलें असे । पदार्थरक्षकांचेनि मिषें । वास्तुविशेषें विराजती ॥ ६९ ॥ धिष्ण्यप म्हणिजे लोकपाळ । पूर्वभागीं आखण्डळ । हयगजगोधनादिक क्रमेळ । शिक्षी रक्षी अजस्र ॥ ७० ॥ पाकशाळा आधिष्ठून ॥ सावध सर्वदा कृशान । शयनशाळेचें रक्षण । करी आपण संयमिता ॥ ७१ ॥ आयतनमळजळपरित्याग । मळोत्सर्ग शाळामार्ग । तें स्थळ निर्ऋति रक्षी साङ्ग । सावध अव्यंग अहर्निश ॥ ७२ ॥ वस्त्रशाळा रक्षी वरुण । शस्त्रशाळा प्रभंजन । द्रविणभाण्डार वैश्रवण । रक्षी आपण अंतर्दिन ॥ ७३ ॥ देवायतनशाळेप्रति । वर्ते अधिष्ठानि पशुपति । जो कां लोकपाळांचे पंक्ति । ईशान म्हणती दिग्नाथ ॥ ७४ ॥ अमो धिष्ण्यप ऐसिये परी । श्रीकृष्णाचे अन्तःपुरीं । सर्वदा स्वर्चित स्वाधिकारीं । सादर वर्तती हरिप्रेमें ॥ ७५ ॥ निखिल कुशलत्वाची सीमा । अन्तःपुरीं श्रीहरिधामा । निर्मूनि दावी विश्वकर्मा । पुरुषोत्तमा तोषार्थ ॥ ७६ ॥ ऐसीं अन्तःपुरमंदिरें । षोडशसहस्र पृथागाकारें । कृत्स्नकौशल्यें त्वष्टारें । निर्मूनि सुंदरें दाखविलीं ॥ ७७ ॥

तत्र षोडशभिः सद्मसहस्रैः समलंकृतम् । विवेशैकतमं शौरेः पत्नीनां भवनं महत् ॥ ८ ॥

सोळा सहस्र सदनें करून । हरि अन्तःपुरीं विराजमान । त्यामाजी कोणे एके स्त्रीचें भुवन ।

विधिनंदन प्रवेशला ॥ ७८ ॥ मुनि प्रवेशला जे मंदिरीं । ते सदनींची लावण्यकुसरी । सादर पाहता झाला नेत्रीं । शुकवैखरी ते वर्णी ॥ ७९ ॥

विष्टब्धं विद्रुमस्तंभैर्वैदूर्यफलकोत्तमैः । इन्द्रनीलमयैः कुड्यैर्जगत्या चाहतत्विषा ॥ ९ ॥

चौं श्लोकीं ते भुवरचना । शुकें निवेदिली कुरुभूषणा । श्रवणमात्रें अमरसदना । देखिलें वाटे श्रोतयां ॥ ८० ॥ वास्तुवेदिका पाचुबंदी । वज्रस्तंभनें निरवधि । विद्रुमस्तंभ दडापिले बुद्धी । वैदुर्यउथाळीं अष्टदळें ॥ ८१ ॥ भित्ती इंद्रनीळमय शोभती । शक्रोपळमय निबद्ध जगती । उभयप्रभा-भासुरकान्ति । निरभ्रनभ भासतसे ॥ ८२ ॥ पुष्कारागाचे तुळवट । पद्मरागाचे किलचा पाट । गोमेदाचे कांसवट । दांडे निर्घोट मारकती ॥ ८३ ॥ वज्रमणि कोरूनि निगुती । हिंदोळियाची केली आयती । मंचकपालकलंबनाप्रति । शृंखळा युक्ति निर्मिल्या ॥ ८४ ॥ रत्नभितीचे कोनाडे । कौशल्याकळितां कंजज नाडे । लक्ष्मीलालस लक्षील कोडें । ऐसिये चाडे करी त्वष्टा ॥ ८५ ॥ कर्बुरकर्दमनिर्मितभित्ति अमररत्नाच्या चित्राकृति । विश्वकर्मा निर्मी निगुती । त्रैलोक्यपति तोषावया ॥ ८६ ॥ हर्म्यभित्ती भर्ममया । शर्मद सर्वांच्या डोळ्या । कर्मे साच्चिकें पहावया । अर्ह होती सुकृति जे ॥ ८७ ॥ ऐसिये भुवनीं विलाससदनीं । निःशंक प्रवेशे नारदमुनि । तेथिची शोभा श्रीशुक वर्णी । तेही श्रवणीं अवधारा ॥ ८८ ॥

वितानैर्निर्मितैस्त्वष्ट्रा मुक्तादामविलंबिभिः । दांतैरासनपर्यंकैर्मण्युत्तमपरिष्कृतैः ॥ १० ॥

अमल्यवितानें भुवनगर्भी । विश्वकर्मा स्वयंभ निर्मी । उपमा द्यावया तिये कर्मी । निर्जरसर्भी लक्षेना ॥ ८९ ॥ चंद्रपुटाचे चांदवे । मुक्ताफळांचे घोंस बरवे । त्यांमाजी रत्नमणींचे यावे । निजस्वभावें प्रकाशती ॥ ९० ॥ अष्टदिग्भागीं बंधनें । निर्मिलीं जाम्बूनदसुवर्णें । जिया वितानांकारणें । पृथग्विधानें अनेक ॥ ९१ ॥ खणोखणीं वितानें भिन्न । तिहींकरूनि शोभाढ्य भुवन । सादर पाहोनि विधिनंदन । कौतुकें आन अवलोकी ॥ ९२ ॥ क्षीरोदमथनोद्भव कुंजर । तत्संतति तत्तुल्य अपर । तयांचे दंत विशालतर । आणूनि सादर त्वष्ट्यानें ॥ ९३ ॥ पर्यंक निर्मिले कुसरी । उत्तम मणि जडिले वरी । जैसे दिनमणि प्रकटले रात्रीं । हरिमंदिरीं बहुरंगी ॥ ९४ ॥ कनककौशेयसंमिश्रवसनें । ज्यांवरी चित्रिलीं निर्जरभुवनें । ऐसीं जवनिकें विधिनंदने । पाहोनि नयनें स्मय मानी ॥ ९५ ॥ हंसपिच्छांच्या तळिका । सुरंगवसनीं छादिल्या देखा । कुंजरदंताच्या पर्यंका । सोपबर्हणा विराजती ॥ ९६ ॥ रत्नखचितगण्डूषपात्रें । मंचकातळीं पंकजाकारें । विशेष ताम्बूलष्ठीवनाधारें । कार्तस्वरमय जडितांचीं ॥ ९७ ॥ ऐसी उपकरणसामग्री । वदतां मौनावे वैखरी । कुशला पटुतर तत्परिचारीं । किंकर किंकरी तें ऐका ॥ ९८ ॥

दासीभिर्निष्ककण्ठीभिः सुवासोभिरलंकृम् । पुंभिः सकंचुकोष्णीषसुवस्त्रमणिकुण्डलैः ॥ ११ ॥

बाह्यप्रचारींपुरुष व्यक्ति । भगवद्भवनीं विराजती । सर्व व्यवहारी सावधवृत्ती । नियुक्ता कृत्यीं अतंद्रित ॥ ९९ ॥ पट्टकूले पीताम्बर परिधानें । कंचुकोपकंचुक अमूल्य वसनें । तगटी पल्लव कटिबंधनें । विविधा रत्नीं रागाढ्यें ॥ १०० ॥ उष्णीषें म्हणिजे शिरोवेष्टनें । शशाङ्कसाम्यें शुभ्रवर्णें । एकें सुरंगें सहस्रकिरणें । एकें अरुणें आरक्तें ॥ १ ॥ एकें इन्द्रनीळभासुरें । एकें सुपीतकार्तस्वरें । एकें गारुत्मतरागप्रचुरें । अमूल्य अपारें उष्णीषें ॥ २ ॥ मणिमयकुण्डलें झळकती श्रवणीं । मुद्रिकामण्डित मिरवती पाणि । कटकांगदीं कण्ठाभरणीं । पुरुषश्रेणी विराजती ॥ ३ ॥ जे जे ज्या ज्या कार्यावरी । अधिष्ठिले नियमोत्तरीं । ते ते वर्तती निजाधिकारीं । आत्मशरीरीं करणवत् ॥ ४ ॥ तिहींकरूनि शोभायमान । दिसे सालंकृत भगवद्भुवन । तें पाहोनि विधिनंदन । अंतःसदनें अवलोकी ॥ ५ ॥ अंतःसदनीं अंतःपुर । तेथें दासींचा व्यवहार । नाहीं पुंव्यक्तिसंचार । वृद्धाचारपरंपरा ॥ ६ ॥ दासी सुंदरा नवयौवना । चपळा चतुरा कर्माभिज्ञा । लावण्यरसाच्या मूर्ति नाना । गमती नयनां रूपीचिया ॥७॥ सर्वा समान शुभसद्गुणी । प्रथमवयस्का प्रमुदित तरुणी । बहुधारूपीं मन्मथरमणी । श्रीकृष्णसदनीं वर्तें कां ॥ ८ ॥ अमूल्य हार कण्ठाभरणें । पदकीं लोपिती भास्करकिरणें । मुद्रिकावलयें बाहुभूषणें । कुंडलें श्रवणीं जडितांचीं ॥ ९ ॥ श्रवणाकल्प विविधापरी । रत्नजडित कार्तस्वरीं । मुक्त जालिया मिरवती शिरीं । वेणिकाभरणीं विराजती ॥ ११० ॥ अमूल्य नथनिका नासापुटीं । मेखळा मिरवती कटितटीं । विविधारंगी कंचुक्या तगटी । दिव्यवसनें परिधानें ॥ ११ ॥ ऐसिया अंतःपुरभुवनीं । किङ्करींचिया अनेक श्रेणी । विविधा परिचर्ये लागूनी । व्यवहारती अतंद्रिता ॥ १२ ॥ एवं दासदासीमण्डित । भगवद्भुवन सालंकृत । नारदें विलोकुनी समस्त । देखे अद्भुत तें ऐका ॥ १३ ॥

रत्नप्रदीपनिकरद्युतिभिर्निरस्तध्वांतं विचित्रवलभीषु शिखण्डिनोऽङ्ग ।
नृत्यंन्ति यत्र विहितागुरुधूपमक्षैर्नियन्तमीक्ष्य घनबुद्धय उन्नदन्तः ॥ १२ ॥

जया मंदिरामाजी पाहीं । रत्नदीपांच्या समुच्चयीं । तेजःपुंज प्रकाशसमयीं । ध्वान्त कांहीं न थरेची ॥ १४ ॥ ब्रह्माण्डमठी जेंवि दिनमणि । तेंवि हरिभवनीं रत्नमणि । ध्वान्त निरसूनि स्वतेजःकिरणीं । पदार्थश्रेणी प्रकाशती ॥ १५ ॥ अंग या कोमळ संबोधनें । शुक संबोधी नृपाकारणें । म्हणे नारद कौतुकें लक्षी नयनें । तीं निजश्रवणें अवधारी ॥ १६ ॥ वलभी नामें चन्द्रशाळिका । त्यांवरी मयूर पावूनि हरिखा । नृत्य करिती तें कारण ऐका । कुरुनायका म्हणे मुनि ॥ १७ ॥ जया भगवद्भुवनामाजी । अगुरुदशाङ्गधूप सहजीं । जळती तद्गतधूमराजी । गवाक्षमार्गें नभ व्यापी ॥ १८ ॥ बर्ही लक्षूनि तें श्यामप्रभा । मानिती सजलघन हा नभा । माजी ओळला ऐसिया क्षोभा । पाहोनि गर्जती ऊर्ध्वमुखें ॥ १९ ॥ उत्साहभरित प्लुतस्वरें । नाचती वलभीवरी मयूरें । अगुरुधूमाचिया धूसरें । मेघोदरें प्रमोहितें ॥ १२० ॥ तिये मंदिरीं नारदमुनि । भगवंतातें आपुले नयनीं । देखता झाला तें कुरुमणि । सादर श्रवणीं अवधारी ॥ २१ ॥

तस्मिन्समानगुणरूपवयःसुवेषदासीसहस्रयुतयाऽनुसवं गृहिण्या ।
विप्रो ददर्श चमरव्यजनेन रुक्मदण्डेन सात्वतपतिं परिवीजयंत्या ॥ १३ ॥

गजदंतपर्यंकारूढ हरि । सन्निध रुक्मिणी सुंदरी । अजस्र सप्रेम दासी सेवा करी । दासी-सहस्रांसमवेत ॥ २२ ॥ तिया दासी म्हणाल कैशा । आपणासमान ज्यांची वयसा । लावण्यरूपगुणांचा ठसा । आपणऐसा प्रतिबिम्बवत ॥ २३ ॥ वसनाभरणें आपणांऐसीं । चापल्यचातुर्यताही सरिसी । ऐशा रुक्मिणी सहस्र दासी । घेऊनि स्वामीसी सेवीतसे ॥ २४ ॥ सहस्र दासींसह वोळगे । तथापि परिचर्या निजाङ्गें । करितां क्षणमात्रही नुबगे । श्रीरंगसंगें रंगल्या ॥ २५ ॥ रुक्मदंड रत्नखचित । चामरनिष्टमुष्टिमंडित । मुद्रिकावलयाङ्गदें राजित । कंचुकीयुक्त ऊर्ध्वभुज ॥ २६ ॥ सात्वतपति भक्तपति । मंचकासनीं सप्रेमभक्ति । दासीसहस्रासहित युवति । रुक्मिणी सती वीजितसे ॥ २७ ॥ तिये गृहिणीसहित हरि । वीजितां नारदें देखिला नेत्रीं । नारदातें कवणेपरी । हरि सत्कारी तें ऐका ॥ २८ ॥

तं संनिरीक्ष्य भगवान्सहसोत्थितः श्रीपर्यंकतः सकलधर्मभृतां वरिष्ठः ।
आनम्य पादयुगलं शिरसा किरीटजुष्टेन सांजलिरवीविशदासने स्वे ॥ १४ ॥

सम्यक म्हणिजे बरवे परी । सर्वज्ञ जो कां सर्वान्तरीं । नारदातें तो श्रीहरि । लक्षूनि नेत्रीं अकस्मात ॥ २९ ॥ रुक्मिणीचिया मंचकावरूनि । सवेग उठूनि चक्रपाणि । किरीटेंसहित मस्तकें करूनी । लागला चरणीं मुनीचिया ॥ १३० ॥ भूत भविष्य वर्तमान । जितुके असती धार्मिक जन । त्यांमाजी वरिष्ठ जो श्रीकृष्ण । जाणे सम्मान विप्रांचा ॥ ३१ ॥ बद्धाञ्जळि चरणयुगळ । प्रेमें नमूनि श्रीगोपाळ । निजासनीं विप्रवत्सळ । बैसवी केवळ पूज्यत्वें ॥ ३२ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न । यालागीं म्हणती श्रीभगवान । अंतरसाक्षी नारदागमन । जाणे संपूर्ण हृत्कमळीं ॥ ३३ ॥ जाणोनि नारदाचें हृद्गत । जें पाहों आला निजाचरित । स्वयें आचरूनि इत्थंभूत । दर्शवीतसे तें ऐका ॥ ३४ ॥

तस्यावनिज्य चरणौ तदपः स्वमूर्ध्नाऽबिभ्रज्जगद्गुरुतरोऽपि सतां पतिर्हि ।
ब्रह्मण्यदेव इति यद्गुणनाम युक्तं तस्यैव यच्चरणशौचमशेषतीर्थम् ॥ १५ ॥

तया नारदाचें पदकंज । करतळभाळें अधोक्षज । आधीं मर्दूनियां सुरज । कल्याणपुंज भूषितसे ॥ ३५ ॥ त्यानंतरें रत्नखचित । मांडूनि कनकपात्र प्रशस्त । हेमकलशीं गंगामृत । धारा वोतीत वैदर्भी ॥ ३६ ॥ रत्नखचित प्रवाळवज्री । दक्षिणहस्तें घेऊनि चक्री । नारदतळवा मर्दन करी । मृदुतरकरीं सप्रेमें ॥ ३७ ॥ रुक्मगौरा रुक्मिणीदेवी । शातकुम्भाची शुद्धोदचरवी । करतळीं धरूनि धारा बरवी । ओती अवयवीं साभरणा ॥ ३८ ॥ मृदुकरतळें पदतळ हरि । प्रक्षालूनि हृदयीं धरी । स्पर्शूनि वक्त्रीं नेत्रीं शिरीं । वदूनि वस्त्रीं परिमार्जी ॥ ३९ ॥ ऐसें करूनि अवनेजन । पादाब्जावनेजित

जीवन । मस्तकीं धरीं श्रीभगवान । गुरुतर पूर्ण त्रिजगाचा ॥१४०॥ त्रिजगज्जनक जो विधाता । श्रीकृष्ण विधात्याचा जनिता । जगद्गुरुतर या संकेता । जाणेनि वक्ता शुक वर्णी ॥ ४१ ॥ स्वधर्मीं निरत धार्मिक जन । त्रिजगीं वाखाणिती सज्जन । तयांचाही स्वामी भगवान । पादावनेजन धरी शिरसा ॥ ४२ ॥ ऐसा विप्रपादार्चनादर । अत्यंत देखूनि व्यासकुमर । म्हणे ब्रह्मण्यदेवनामोच्चार । पढती साचार आम्नाय ॥ ४३ ॥ ब्रह्मण्यदेव हें गुणनाम । यथार्थ मिरवी पुरुषोत्तम । त्याच्या पादशौचोदकाचा नेम । धरिती सकाम तीर्थनिचय ॥ ४४ ॥ तीर्थें सकाम पादोदका । गुरुतर गुरुत्वें जगज्जनका । तोही विप्रपदजळपंका । धरी मस्तकावरी मानें ॥ ४५ ॥ ब्रह्मशब्दें बोलिजे वेद । वेदवेत्ता तत्प्रतिपाद्य । ब्रह्मण्यदेव आनंदकंद । श्रीमुकुन्द अन्वर्थ ॥ ४६ ॥ ब्रह्मण्यप्रतिपादनेस्तव । विप्रपादार्चा करी देव । एऱ्हवीं फळाशा असंभव । कायसी हांव सुकृताची ॥ ४७ ॥ दोषक्षाळनें समर्थ त्रिपथा । ते जयाची पादप्रसूता । तोही विप्रपादावनेजन माथां । सेतुसंस्थेलागीं धरी ॥ ४८ ॥ एवं चरण प्रक्षाळून । षोडशोपचारीं विधिपूजन । स्वस्थासनीं बैसवून । करी भाषण तें ऐका ॥ ४९ ॥

संपूज्य देवऋषिवर्यमृषिः पुराणो नारायणो नरसखो विधिनोदितेन ।
वाण्याऽभिभाष्य मितयामृतमिष्टया तं प्राह प्रभो भगवते करवामहे किम् ॥ १६ ॥

देवर्षींमाजि जो वर्य । ब्रह्मनिष्ठांमाजी धुर्य । ऐसा नारद आर्यां आर्य । पूजोनि कार्य पुसे हरि ॥ १५० ॥ राया म्हणसी हरि तो कैसा । पुराण ऋषींमाजी ज्याचा ठसा । नरनारायण नरसखा ऐसा । कंजजईशां जो पूज्य ॥ ५१ ॥ नरनारायणवेशें पूर्वीं । तपश्चर्या केली गुर्वी । त्रिजगीं विख्यात सर्वत्र सर्वी । जाणती दर्वीकर सुरही ॥ ५२ ॥ तोचि हा धर्मसंस्थापना । स्वयें अवतरला त्रैलोक्यराणा । यथाविधि उदिताचरणा । शिक्षी सज्जना आचरोनी ॥ ५३ ॥ हित मित मेध्य अमिष्याघाणी । मधुर अमृताहूनि कल्याणी । तियेकरूनि नारदमुनि । संभाषणीं गौरविला ॥ ५४ ॥ भो भगवंता मुनिवरश्रेष्ठा । तव परिचर्या हा मम वांटा । लक्षूनि आमुच्या पूर्णाभीष्टा । करणीयनिष्ठा आज्ञापीं ॥५५॥ ऐसा कृष्णें नारदमुनि । पूजितां शंकित अंतःकरणीं । म्हणे तव हस्तें सपर्याग्रहणीं । मजलागूनि अनर्हता ॥ ५६ ॥ कैसी अनर्हता जरी म्हणसी । तें तूं ऐकें भो हृषीकेशी । निगमप्रत्यय मम मानसीं । सनकादिकांसी संमत जे ॥ ५७ ॥

॥ नारद उवाच ॥ नैवाद्भुतं त्वयि विभोऽखिललोकनाथ मैत्री जनेषु सकलेषु दमः खलानाम् ।
निःश्रेयसाय हि जगत्स्थितिरक्षणाभ्यां स्वैरावतार उरुगाय विदाम सम्यक् ॥ १७ ॥

तुझ्या ठायीं योग्यता घडे । नोहे अद्भुत ना वांकुडे । परन्तु आम्हां योग्यता न घडे । वाटे कोडें यास्तव हें ॥ ५८ ॥ कैसी योग्यता तुझ्या ठायीं । ऐकें कथितों तें सर्वही । त्रैलोक्यनायक सर्वां देहीं । सर्वग साक्षी तूं एक ॥ ५९ ॥ तूं सर्वांचा आत्मा होसी । अखिलात्मकत्वें मित्रजनासी ।

आपणा आपण तूं अर्चिसी । अद्‌भुत येविषीं कोणतें ॥ १६० ॥ जागृता स्वप्नींची अनेकता । भ्रामक नोहे जेंवि स्वप्नस्था । स्वप्नभ्रमभेदें ते सुप्ता । दुःखावर्तामाजी भंवडी ॥ ६१ ॥ करूनि अहिताचें निरसन । स्वहितीं करी संयोजन । मित्र म्हणती त्या सज्जन । जे सर्वज्ञ कविवर्य ॥ ६२ ॥ तुजहूनि स्वहितकर्ता नाहीं । जडता निरसूनि चित्प्रवाहीं । नांदविसी संविन्मयीं । सर्वां ठायीं सर्वगत्वें ॥६३॥ सर्वमित्रत्वास्तव हें तुझें । अर्चन करणेंतुजचि साजे । देवर्षित्वगौरव ओझें । न घडे सहजें पूज्यत्वा ॥६४॥ जरी तूं म्हणसी श्रीमुकुन्दा । जगन्मित्रता मज न घडे कदा । मजसीं विरोध मागधा चैद्या । कंसादि द्वंद्वा जग जाणे ॥ ६५ ॥ ऐसें न म्हणावें श्रीगोपाळा । तूं या विश्वाच्या प्रतिपाळा । अवतरूनि मर्दिसी खळां । हे श्रुतिमाळा यश वर्णी ॥ ६६ ॥ जैं मी खळाचें करी दमन । तैं सर्वमित्रता न घडे जाण । ऐसें म्हणसी तरी व्याख्यान । ऐकें सर्वज्ञशिरोमणि ॥ ६७ ॥ देहतादात्म्याची जडता । भेदबुद्धीची आढ्यता । धरूनि खळत्वें निवडितां । तूं त्यां दण्डिता स्वयें होसी ॥ ६८ ॥ अन्तर्यामित्वें तूं मित्र । भेदें भाससी त्यां अमित्र । जडता सांडूनि कैवल्यपात्र । करिसी सन्मात्र मित्रत्वें ॥ ६९ ॥ निःश्रेयसाकारणें खळा । दमिसी दुर्दान्तां गोपाळा । मित्रां अमित्रां सप्रेमळा । समान मंगळा मेळविसी ॥ १७० ॥ यालागीं तूं जगन्मित्र । नव्हसी खळ दमितां अमित्र । विवेकहीना वाटे चित्र । न मानिती सन्मात्रवेत्ते जे ॥ ७१ ॥ म्हणोनि तूं या जगाची स्थिति । आणि स्वधर्मसेतुरक्षणशक्ति । दोहीं कारणें स्वेच्छा व्यक्ति । धरूनि क्षिति अवतरसी ॥ ७२ ॥ भूयिष्ठ कीर्ति निगम गाती । यालागीं उरुगाय ज्यातें म्हणती । तो तूं प्रत्यक्ष कैवल्यपति । बरव्या रीती आम्ही जाणों ॥ ७३ ॥ खळातें दमिता अमित्र नव्हसी । साजे जगन्मित्रता तुज ऐसी । ऐसें बहुत आश्चर्यासी । कारण नव्हे जगदीशा ॥ ७४ ॥ इतुकें बोलोनि नारदमुनि । पुढती काय बदला वाणी । तें तूं कौरव चूडामणि । सावध श्रवणीं अवधारीं ॥ ७५ ॥

दृष्टं तवांघ्रियुगलं जनतापवर्ग ब्रह्मादिभिर्हृदि विचिंत्यमगाधबोधैः
संसारकूपपतितोत्तरणावलंबं ध्यायंश्चराम्यनुगृहाण यथा स्मृतिः स्यात् ॥१८॥

प्रभो समर्था विश्वव्यापी । करणीयनिष्ठा मज आज्ञापीं । ऐसें बदलासी धार्मिकजल्पीं । सत्यसंकल्पीं पूर्ण करीं ॥ ७६ ॥ करणीयनिष्ठ म्हणसील कोण । तवाङ्घ्रियुगळ देखिलें जाण । भक्तजनाचें कैवल्यसदन । दुर्लभ म्हणोन सुर ध्याती ॥ ७७ ॥ सामान्य सुरवर सुकृतभाजी । मर्त्यामर्त्यातिग्राजी । भ्रमणशीळ जे कां सहजीं । कर्मामाजी निबद्ध जे ॥ ७८ ॥ असो तयांतें दुर्लभतर । परंतु जे कां विधिहरशक्र । केवळ तुझे गुणावतार । नित्य सादर पदभजनीं ॥ ७९ ॥ स्वस्वरूपीं जे सावध । ज्यांतें म्हणिजे अगाध बोध । तेहि तुझें पादारविंद । चिंतिती विशद हृत्कमळीं ॥१८०॥ ते कां चिंतिती ऐसे म्हणसी । तरी तूं ऐकें हृषीकेशी । सृष्टिस्थितिलयगुणकर्मांसी । निस्तरणासी लक्षूनी ॥ ८१ ॥ बीजामाजी पादप प्रकटे । स्तंभ विटप शाखा फांटे । पत्रीं पुष्पीं फळीं निवटे । परि जीवन घडे तन्मूळीं ॥ ८२ ॥

तेंवि विश्वाचें स्थितिलयसृजन । कर्ते विधिहरसंक्रंदन । भवकूपींहूनि त्यां निस्तरण । ध्याती लक्षून तव चरणा ॥ ८३ ॥ अथवा संसारकूपीं पतित । तदुद्धरणा कारणभूत । तवाङ्घ्रियुगळध्यानीं निरत । होती संतत सत्पुरुष ॥ ८४ ॥ काय करूं हें पुससी जरी । तरी तूं इतुकाचि अनुग्रह करीं । भवाब्धि-नौका जे तवाङ्घ्रि । ममान्तरीं तत्स्मृति राहो ॥ ८५ ॥ तवाङ्घ्रियुगळ सप्रेमध्यानीं । धरूनि विचरें मी त्रिभुवनीं । अजस्र अनुरक्त अविस्मरणीं । रथाङ्पाणि करीं इतुकें ॥ ८६ ॥ ऐसा प्रार्थूनि रुक्मिणीवर । नारदें केला नमस्कार । न वाढवीच वाग्व्यापार । तेंही अंतर हरि जाणे ॥ ८७ ॥ पाहणें सोळा सहस्र घरें । यालागीं तेथूनि उठिला त्वरें । अंतर जाणोनि यादवेश्वरें । प्रेमोपचारें बोळविला ॥ ८८ ॥

ततोऽन्यदाविशद्गेहं कृष्णपत्न्याः स नारदः । योगेश्वरेश्वरस्यांग योगमायाविवित्सया ॥ १९ ॥

त्यानंतरें नारदमुनि । आणिकी कृष्णपत्न्यांचे सदनीं । प्रवेशला आदरें करूनी । पहावया नयनीं हरिमाया ॥ ८९ ॥ अंग या कोमळ आमंत्रणें । श्रीशुक परीक्षितीतें म्हणे । राया सादर ऐकें श्रवणें । गुणकीर्तिनें कृष्णाचीं ॥१९०॥ योगेश्वरांचा योगेश्वर । त्याची योगमाया विचित्र । जाणों इच्छूनि तो मुनिवर । अन्यमंदिर प्रवेशला ॥ ९१ ॥ ते मंदिरीं कौतुक काय । नारद जाऊनि नयनीं पाहे । तें तूं राया ऐकता होय । म्हणे तनय व्यासाचा ॥ ९२ ॥

दीव्यंतमक्षैस्तत्रापि प्रियया चोद्धवेन च । पूजितः परया भक्त्या प्रत्युत्थानासनादिभिः ॥ २० ॥

तेथही एकान्तविलासभुवनीं । प्रियेंसहित चक्रपाणि । उद्धवेंसीं सभास्थानीं । पाश ढाळूनि क्रीडतसे ॥ ९३ ॥ मांडूनियां सारिपाट । प्रियसहित श्रीवैकुंठ । पाश ढाळूनि क्रीडानिष्ठ । सुखोपविष्ट मुनि देखे ॥ ९४ ॥ तेथ येतां तो देवर्षि । आसनावरूनि हृषीकेशी । धांवोनि लागला मुनिचरणांसी । बैसवी त्यासी निजासनीं ॥ ९५ ॥ पूर्विल्या ऐसा यथोपचारीं । नारदा पूजिता झाला हरि । मग संवाद अमृतोत्तरीं । जो आदरी तो ऐका ॥ ९६ ॥

पृष्टश्चाविदुषेवासौ कदाऽऽयातो भवानिति । क्रियते किं नु पूर्णानामपूर्णैरस्मदादिभिः ॥ २१ ॥

नारदागमन विदित नाहीं । तया अविदुषापरी पाहीं । त्रिकाळज्ञ शेषशायी । पुसे काई तें ऐका ॥ ९७ ॥ भवान् म्हणिजे अगा मुनि । केव्हां आलासि द्वारकाभुवनीं । काय करावें आम्हीं अपूर्णीं । तुम्हांसारिख्या पूर्णांचें ॥ ९८ ॥ आम्हांसारिखे अपूर्ण जन । तिन्हीं पूर्णांचें दास्याचरण । कैसें काय करावें कोण । योग्यता गौण गमे आमुची ॥ ९९ ॥ आम्ही कुटुंबी कुटुंबासक्त । स्वामी निष्काम निजात्मरत । आम्ही स्वामीचा पुरवूं हेत । हें अघटित असो पैं ॥ २०० ॥ तथापि आमुच्या कल्याणकाजा । आज्ञा करावी जी मुनिराजा । इत्यादिवचनीं प्रार्थी द्विजा । कुरुभूभुजा तें ऐक ॥ १ ॥

अथापि ब्रूहि नो ब्रह्मञ्जन्मैतच्छोभनं कुरु । स तु विस्मित उत्थाय तूष्णीमन्यदगाद्गृहम् ॥ २२ ॥

आम्ही कुटुंबी भवनिमग्न । तथापि ब्राह्मणा बोले वचन । मम जन्म हें करीं शोभन । दास्याचरणें आपुलिया ॥ २ ॥ ऐसें ऐकूनि नारदमुनि । विस्मित होत्साता निजमनीं । सवेग उठिला मौनेंकरूनी । अन्य सदनीं प्रवेशला ॥ ३ ॥

तत्राप्यचष्ट गोविंदं लालयंत सुताङ्घ्रिशून् । ततोऽन्यस्मिन्गृहेऽपश्यन्मज्जनाय कृतोद्यमम् ॥ २३ ॥

हरिरमणीचें रमणीय भुवन । मुनि पाहे जंव प्रवेशून । तेथ गोविंद सुतलालन । करी घेऊन उत्संगीं ॥ ४ ॥ सस्निग्धप्रेमें चुम्बी वदन । हनु कपोल उदर स्तन । शिशूतें हांसवी स्पर्शून । कमलारमण परमात्मा ॥ ५ ॥ एका बोलवी कलभाषणीं । एका उठवी धरूनि पाणि । एका हांसवी अमृतेक्षणीं । एका धरूनि चालवित ॥ ६ ॥ ऐसा स्वसुतां शिशूंतें । लालवितां कमलाकान्तें । नारदें देखूनि कौतुकातें । विस्मितचित्तें मग परते ॥ ७ ॥ या जी मुनि कां परतलां । ऐसें भगवान बोलता झाला । नारद न देऊनि प्रतिवचनाला । रिघता झाला अन्य गृहीं ॥ ८ ॥ हरीतें त्याचें अभीष्ट विदित । म्हणोनि आग्रह त्या न करित । स्वस्थमानसें शिशु लालित । जेथिंचा तेथ स्थिर राहे ॥९॥ नारद अन्य सदनीं पाहे । तेथ कौतुक देखता होये । सहस्रदासींचिया समूहें । हरि भजताहे हरिणाक्षी ॥ २१० ॥ मांडूनि स्फटिकाची चवाई । वरी बैसवूनि शेषशायी । सुगंध स्नेह चर्चिती पाहीं । कुवलयवदना कुरळातें ॥ ११ ॥ दिव्य सुगंधद्रव्यकर्दम । वनिता लावण्यरसलळाम । करीं मर्दूनि मेघश्याम । अतिसप्रेम उटिती ॥ १२ ॥ भगवंताची तनु निर्मळ । उटूनि करूं पाहती अमळ । अमळीं सहसा न निघे मळ । चकित मेळ अबलांचा ॥ १३ ॥ भरूनि कनकाचीं गंगाळें । उष्णोदक घालिती ढाळें । अभ्यंगोद्योग हा मुनीचे डोळे । चकित झाले देखूनी ॥ १४ ॥ पुढें न घालितां पाउला । सवेग मागुती परतला । अन्यसदनीं प्रवेशला । तें कुरुपाळा अवधारीं ॥ १५ ॥

जुह्वतं च वितानाग्नीन्यजंतं पंचभिर्मखैः । भोजयंतं द्विजान्क्वापि भुंजानमवशेषितम् ॥ २४ ॥

कोणे एके सदनीं मुनि । प्रत्यूषकाळीं प्रवेशूनी । काय करी चक्रपाणि । तें निजनयनीं अवलोकी ॥ १६ ॥ याज्ञवल्क्यशाखासूत्र । अनुदित होमाचा अवसर । आहवनीयादि कृतविहार । यजी सादर गृहपति ॥ १७ ॥ इतुकें देखूनि तया स्थानीं । मागुता पाउलीं परते मुनि । रिघोनि अन्य एके सदनीं । कौतुक नयनीं पाहतसे ॥१८॥ तेथ पंचमहायज्ञा अवसर । कक्षेमाजी धरूनि वज्र । महानसाग्नि मणिकोदपात्र । करी श्रीधर संमेलन ॥ १९ ॥ आवसथ्यीं महानसाग्नि । एक्या श्वासें मेळवूनी । उद्धृतचरु संस्कारूनी । पंचमहायज्ञीं प्रवर्ते ॥२२०॥ देवयज्ञ भूतयज्ञ । पितृयज्ञ मनुष्ययज्ञ । ब्रह्मपठनें ब्रह्मयज्ञ । पंचमहायज्ञ मुनि देखे ॥ २१ ॥ तेथूनि नकळत मुरडे मुनि । सवेग प्रवेशे अन्य सदनीं । तेथ विप्रांच्या अर्चनीं । चक्रपाणी रत देखे ॥ २२ ॥ वेदयज्ञ तपोवतार । पावक भास्कर जे कां अपर । नानाशाखी धरामर । पूजी श्रीधर सद्भावें ॥ २३ ॥ पादावनेजनें करूनी । अत्रगंधाद्युपचार-

श्रेणी । सप्रेमभावें समर्पूनी । परिवेषूनी दिव्यान्नें ॥ २४ ॥ शलाटवादिव्यंजनें नाना । नागर-रामठमरीचिचूर्णा । अनेक संधिता पृथगलवणा । कुशिविरिका बहुविधा ॥ २५ ॥ द्वादश पायसान्नांच्या परी । चरु चित्रान्नें विविधाकारीं । घृतपाचितादि पंचप्रकारीं । बहुविधभक्ष्यें परिवेपिलीं ॥ २६ ॥ लेह्यपेयचोष्यखाद्यें । भक्ष्यभोज्यादि षड्विधें । अन्नें अर्पूनि परमानंदें । विप्रवृंदें संतर्पी ॥ २७ ॥ वितुषमुद्गदाळीचीं सूपें । हरिद्रालवणरामठकल्पें । सद्य गोघृतें अनल्पें । द्विजां साक्षेपें हरि अर्पी ॥२८॥ विप्रां जेववितां भगवान । अमृताहूनि गौल्य भाषण । करी क्षणक्षणा प्रार्थन । इतुकें देखून मुनि-परते ॥ २९ ॥ सवेंचि कोणे एके ठायीं । रिघोनि मुनि पाहे नवायी । तंव तेथेंही शेपशायी । करी कायी तें ऐका ॥ २३० ॥ जेवूनि उठिल्या द्विजांच्या श्रेणी । त्या वर्पती आशीर्वचनीं । भूरी ताम्बूल त्यां अर्पुनी । मग भोजनीं स्वयें बैसे ॥ ३१ ॥ पाकशाळेमाजी अन्न । विप्रयज्ञावशिष्ट पूर्ण । पंक्तिकारांमह आपण । करी भोजन यज्ञभोक्ता ॥ ३२ ॥ दुरूनि इतुकें लक्षी मुनि । मग प्रवेशे आणिके सदनीं । तेथ कौतुक देखे नयनीं । कुरुकुळतरणी तें ऐक ॥ ३३ ॥

क्वापि सन्ध्यामुपासीनं जपन्त ब्रह्मवाग्यतम् । एकत्र चासिचर्माभ्यां चरन्तमसिवर्त्मसु ॥ २५ ॥

कोणे एके अन्य सदनीं । हरि तत्पर संध्यावंदनीं । उपांशु जपे वेदजननी । वाङ्नियमूनि मौनस्थ ॥ ३४ ॥ इतुकें देखूनि नारद । अन्य सदनीं पाहे विशद । खड्गखेटकधर गोविंद । देखूनि मुग्धवत् राहे ॥ ३५ ॥ छत्तीस दंडावती विद्या । सान्दीपनिप्रबोधलब्धा । तत्परिशीलनीं गोविंदा । उत्साह आद्या जगदीशा ॥ ३६ ॥ खेटक धरूनि वाममुष्टीं । दक्षिणकरीं कृपाणयष्टि । तदभ्यासाची कसवटी । दावी सृष्टी खड्गधरां ॥ ३७ ॥ सरक चवंक वैसका ठाण । तिर्यक वक्र परिवर्तन । वामसव्यप्रहारप्रवीण । अग्रप्रेरण खड्गाग्रें ॥ ३८ ॥ भ्रमणचापल्य मंडळें । अधोर्ध्वप्रहार करकौशल्यें । परप्रहारें खेटकें विफळें । कीजती सकळें अभ्यस्तें ॥ ३९ ॥ इत्यादि असिचर्मेंकरून । खड्गविद्यामार्गीं प्रवीण । विचरतां ऐशातें देखोन । मुनि तेथून परतला ॥ २४० ॥ मग प्रवेशे अन्य सदनीं । तेथ प्रशस्त देखे अवनि । हरिकृत कौतुक पाहे नयनीं । कुरुकुळतरणि तें ऐकें ॥ ४१ ॥

अश्वैर्गजै रथैः क्वापि विचरंतं गदाग्रजम् । क्वचिच्छयानं पर्यंके स्तूयमानं च बंदिभिः ॥ २६ ॥

अश्वशिक्षापरायण । जवीनार्थीं कृतारोहण । परजूनियां चर्मकृपाण । अथवा बाण सचाप ॥ ४२ ॥ शक्ति शूळ पट्टिश गदा । अश्वयानीं प्रहरणविद्या । परिशीलनपर देखूनि आद्या । विस्मय वंद्या मुनिवर्या ॥ ४३ ॥ ऐसे अनेक अश्व फिरवी । अश्वशिक्षेची दीक्षा दावी । त्रिजगज्जेता जो गोसांवी । समरवैभवीं विराजित ॥ ४४ ॥ कावे मंडळें भंवरी फेर । दूर दुर्गम धांवणें क्रूर । उलट चुचुकार थैकार । नर्तनपर हयदीक्षा ॥ ४५ ॥ घोटकजाति अनेका परी । सैन्धवा पावनी गति खेचरी । गोचरा-गोचरें अश्वें फेरी । देखे चक्री देवर्षि ॥ ४६ ॥ कोठें देखे गजारोहणीं । कुंजरमौळ मर्दूनि चरणीं ।

अंबष्ठरहित फिरवी धरणी । रहितश्रृणि पदप्रहारें ॥४७॥ कोठें अंबष्ठमंडित गज । पार्ष्णिग्राहक धृतध्वज । गजगुढारीं अधोक्षज । दावी ओज नृपचिह्नीं ॥ ४८ ॥ शस्त्रविद्या अस्त्रविद्या । अप्रतिरथी धनुर्विद्या । कौलाहली प्रतापसाध्या । भंजन सद्या परसैन्या ॥ ४९ ॥ परपृतनाप्रभंजन । गजशिक्षेचें परिशीलन । दावी गजयानीं श्रीकृष्ण । नारद देखून परतला ॥ २५० ॥ अन्य मंदिरीं प्रवेशे मुनि । तेथें श्रीधर रहंवरयानीं । परिवारित महारथगणीं । देखे मुनि विचरतां ॥ ५१ ॥ जो गदाचा अग्रज बन्धु । योगमायावी कौशल्यसिन्धु । क्रीडतां देखूनि एवंविधु । परते नारद तेथूनी ॥ ५२ ॥ मग प्रवेशे अन्य भुवनीं । निहाळ देखोनि तिये स्थानीं । कोठें गेले चक्रपाणि । म्हणूनि मुनि प्रश्न करी ॥५३॥ चेटिका दाविती मौनमुद्रा । देशिनी स्पर्शोनि नासिकाग्रा । म्हणती मृगाङ्काननें केली निद्रा । मृगनयनेसहित पर्यंकीं ॥ ५४ ॥ तेथ न वचिजे मुनिसमर्था । इतुका वृत्तान्त किंकरी कथितां । अन्य सदनीं प्रवेशता । झाला तत्त्वता देवर्षि ॥ ५५ ॥ तेथ देखे बंदिजन । करिती हरिगुणगणस्तवन । सूत मागध निर्जर मुनिजन । स्तूयमान तत्सम्मूहीं ॥५६॥ इतुकें देखूनि परते मुनि । लगबगां प्रवेशे अन्य सदनीं । तेथ कौतुक पाहे नयनीं । तें परिसें श्रवणें परीक्षिति ॥ ५७ ॥

मंत्रयंतं च कस्मिंश्चिन्मंत्रिभिश्चोद्धवादिभि. । जलक्रीडारतं क्वापि वारमुख्याऽबलावृतम् ॥ २७॥

उद्धवप्रमुखमंत्रिवर्गीं । मंत्र विवरितां एकान्तमार्गीं । कोठें ऐसें देखूनि वेगीं । परते लगबगीं मुनिवर्या ॥५८॥ अन्य कोणे सदनीं रिघे । तेथ कौतुक देखे आंगें । जलक्रीडेच्या प्रसंगें । वनितावर्गें विराजित ॥ ५९ ॥ वाराङ्गनांमाजी प्रवरा । क्षीरोदसंभवा दिव्य अप्सरा । कृष्णभोगार्थ त्या सुंदरा । मर्त्यभुवनीं अवतरल्या ॥२६०॥ अबळा म्हणिजे अभुक्त ललना । वारमुख्या ज्या दिव्याङ्गना । तिहीं वेष्टित जनार्दना । जळीं क्रीडतां देखोन ॥ ६१ ॥ परतोनि रिघे अन्य सदनीं । तेथें कौतुक देखे नयनीं । तें तूं राया ऐकें श्रवणीं । म्हणे कुळमाणि व्यासाचा ॥ ६२ ॥

कुत्रचित्द्विजमुख्येभ्यो ददतं गाः स्वलंकृताः । इतिहासपुराणानि शृण्वंतं मंगलानि च ॥ २८ ॥

कोणा एका गृहाच्या ठायीं । पात्रविशिष्ट द्विजातें पाही । सुष्ठु सालंकृता गाई । शेषशायी दान करी ॥६३॥ नारद देखूनि ऐसियातें । सवेग मौनें तेथूनि परते । आणिके सदनीं चकारार्थें । देखे कृष्णातें श्रवणार्थीं ॥ ६४ ॥ मंगळरूप जे इतिहास । पुराणकथा सावकाश । एके सपत्नीसह सदस्य । नारद अशेष तें देखे ॥ ६५ ॥ तेथूनि मागुता पाउलीं निघे । सवेग अन्य सदनीं रिघे । तेथें देखता होय आंगें । जें श्रीरंगें आचरिजे ॥ ६६ ॥

हसंतं हास्यकथया कदाचित्प्रियया गृहे । क्वापि धर्म सेवमानमर्थकामौ च कुत्रचित् ॥ २९ ॥

तिये सदनींही श्रीहरि । हास्यकथांच्या नमोच्चारीं । स्वप्रियेसीं सप्रेमभरीं । हास्य करितां मुनि

देखे ॥ ६७ ॥ कौतुकाविष्ट देखुनि युग्म । मुनि अवलंबी मग निर्गम । तंव आणिकेही सदनीं सुगम । देखे धर्मपरायण ॥ ६८ ॥ धर्मसेवनीं हरि तत्पर । स्वयें आचरोनि बोधी इतर । म्हणे इहलोकीं धर्मसार । येर नश्वर स्वप्नवत ॥ ६९ ॥ धर्में व्याधि विनाशती । धर्में भयाची निवृत्ति । धर्में शत्रु पराभवती । धर्में कीर्ति उज्वळित ॥२७०॥ पिता माता वनिता सुत । बंधु सुहृद गोत्र आप्त । दास दासी हय गज रथ । विमुख अंतीं विभवेंसी ॥ ७१ ॥ धनधान्यादि पुरगोपुरें । कळा चातुर्य वृत्ति क्षेत्रें । ऊर्ध्वगतीचीं नोहती पात्रें । धर्ममात्रें तें साधे ॥ ७२ ॥ धेनु फिरे जिकडे जिकडे । वत्स मागें लागे तिकडे । तैसा धर्म न संडी कोडें । होय निवाडें अनुयायी ॥ ७३ ॥ ऐसी धर्माची प्रशंसा । करूनि धर्माचरणीं धिंवसा । वाहतां देखोनियां जगदीशा । अन्यनिवासा मुनि जाय ॥ ७४ ॥ तेथ पाहे जंव निवान्त । तंव धर्माविरुद्ध जे जे अर्थ । तत्संग्रहीं श्रीभगवंत । देखे अत्यंत यत्नपर ॥ ७५ ॥ धर्माचरण अर्थें घडे । अधर्मार्थें धर्म विघडे । यालागीं धर्मोचित अर्थ जोडे । जोडी निवाडें तो अर्थ ॥ ७६ ॥ ऐसा शुद्धार्थपरायण । देखोनियां मधुसूदन । मुनि प्रवेशे अन्यसदन । हरिवर्तन तेथ पाहे ॥ ७७ ॥ देखे तत्पर कामिनीकामा । परंतु ऋतुमती ज्या ज्या रामा । शास्त्रनिर्दिष्ट त्यागूनि त्रिमाया । विधिकृत नियमा न उल्लंघवी ॥ ७८ ॥ स्वयें असोनि पूर्णकाम । तथापि श्रौतस्मार्तादिनियम । आचरे होत्साता सकाम । गृहस्थाश्रम विधिवादें ॥ ७९ ॥ ऐसें देखोनि भगवद्व्रत । तेथूनि नारद निघे त्वरित । आणिके सदनीं प्रवेशे गुप्त । पाहे तेथ हरिचर्या ॥ २८० ॥

ध्यायंतमेकमासीनं पुरुषं प्रकृतेः परम् । शुश्रूषंतं गुरून्क्वापि कामैर्भोगैः सपर्यया ॥ ३० ॥

तंव तिये सदनीं एकान्तवासीं । स्वस्तिकाद्यासनीं हृषीकेशी । नियमूनि इंद्रियग्रामासी । उत्तमपुरुषासी ध्यात असे ॥ ८१ ॥ जो कां प्रकृतीहूनि पर । शुद्ध शाश्वत निर्विकार । अलक्ष्य अपार अगोचर । तयाकार होत्साता ॥ ८२ ॥ भालनासिकाग्रांचा मध्य । भृकुटियुगलसंधि विशद । एकाग्रतल्लक्षी सावध । कषायवृंद निरसूनी ॥ ८३ ॥ प्राणायाम ज्यातें म्हणती । गृहस्थाश्रमीं कर्मप्रवृत्ति । कर्मारंभीं प्राणसंयति । बोलली नियती अनुल्लंघ्य ॥ ८४ ॥ तो प्राणायामाचा विचार । प्रकृतीहूनि जो पुरुष पर । चिन्तूनि होइजे तदाकार । चतुःशरीर लंघूनी ॥ ८५ ॥ येर जे जे हठादि योग । गृहस्थाश्रमीं ते निलाग । यालागीं मुख्य राजयोग । संयममार्ग प्राणांचा ॥ ८६ ॥ प्राणायामाविण कर्मा । अर्हता नाहीं गृहस्थाश्रमा । यालागीं ध्यानीं पुरुषोत्तमा । लक्षूनि आत्मा उपशमिजे ॥ ८७ ॥ म्हणोनि पुरुषोत्तमातें ध्यानीं । लक्षूनि एकाग्र चक्रपाणि । बैसला देखोनि विविक्तासनीं । परते मुनि तत्काळ ॥ ८८ ॥ मग प्रवेशे अन्य गेहीं । तेथ कौतुक पाहे कांहीं । गुरुसेवनीं शेषशायी । तत्पर देहीं अनुरागें ॥ ८९ ॥ विद्या वयसा वर्णें गुरु । कर्मणा तपसा विचारें थोर । ज्यांचे सेवनीं निजाधिकार । सेवी सादर हरि त्यांतें ॥ २९० ॥ मनोवांछित त्यां जे भोग । ते ते अर्पी यथासाङ्ग । पूजाविधि करूनि अव्यंग । वोळगे श्रीधर शुश्रूषेतें ॥ ९१ ॥ नारद म्हणे हा ब्रह्मण्यदेव । धर्मस्थापक श्रीकेशव । विषयसेवन लाटिकी माव । विधिगौरव प्रतिपादी ॥ ९२ ॥ ऐसा

नारदें तुक्वूनि माथा । अन्य सदनीं झाला जाता । तेथ देखिलें ज्या वृत्तान्ता । अभिमन्युसुता तें ऐक ॥ ९३ ॥

कुर्वत विग्रहं कैश्चित्सन्धिं चान्यत्र केशवम् । कुत्रापि सहरामेण चिंतयंतं सतां शिवम् ॥ ३१ ॥

उद्धवप्रमुख मंत्रिवर्ग । घेऊनि एकान्तीं श्रीरंग । बलिष्ठदुर्मदशत्रुभंग । करणीयमार्ग विवरीतमे ॥ ९४ ॥ मगधपाळप्रमुख रिपु । तद्विग्रहीं कृतसंकल्प । समरीं अजिंक असुरकल्प । कोंवि दुर्दर्प दमिजे पैं ॥ ९५ ॥ ऐसिये मंत्ररचनेसाठीं । एकान्तसदनीं मंत्रियानिकटी । हरि विवरितां रहस्यगोठी । जाणोनि पोटीं मुनि परते ॥ ९६ ॥ तेथूनि प्रवेशे अन्यालयीं । तेथ अमात्यें‌सी शेषशायी । मंत्ररचना विवरी कायी । ते नवायी अवधारा ॥ ९७ ॥ युधिष्ठिराचें भविष्यमाण । राजसूययज्ञाचरण । जाणोनियां हरि सर्वज्ञ । मंत्रविवरण करीतसे ॥ ९८ ॥ दिग्विजयार्थ पाण्डव येती । तिहींसीं न धरवे विग्रहमती । संधि करूनि सुहृदप्रीति । सप्रेम भक्ती वाढविजे ॥ ९९ ॥ मयूरध्वजप्रमुख राजे । क्षात्रधर्माचिये ओजे । झणें भिडती यालागीं कीजे । संधि समाजें सुहृदत्वें ॥ ३०० ॥ आत्मनिष्ठ ते केवळ । परमभक्त सप्रेमळ । तिहीं जिंकिलों मी गोपाळ । द्वारपाळ मी त्यांचा ॥ १ ॥ त्यांची सवाह्य शुश्रूषा करीं । नीच सेवक मी त्यांचे घरीं । तिहींसीं विग्रहें न चले हरि । म्हणोनि विवरी संधिमंत्र ॥ २ ॥ तेथूनी मुनि परते वेगें । अन्य निलयामाजी रिघे । तेथें रामेंसी श्रीरंगें । भक्तकल्याण चिंतिजेतें ॥ ३ ॥ जेणें होय विश्वपालन । ऐसी कृपा अवलंबून । तदर्थ कीजे दुष्टदमन । हें विवरी भगवान रामेंसी ॥ ४ ॥ ऐसा करुणावत्सल हरि । संकर्षणेंसी मंत्र विवरी । हें जाणोनियां अंतरीं । अन्यागारीं मुनि पाहे ॥ ५ ॥

पुत्राणां दुहितॄणां च काले विध्युपयापनम् । दारैर्वरैस्तत्सदृशैः कल्पयतं विभूतिभिः ॥ ३२ ॥

तेथ वृद्धस्वजनमेळीं । कन्यापुत्रांचे यथोक्तकाळीं । विवाह योजी श्रीवनमाळी । तुल्यभूपाळीं सोयरिका ॥ ६ ॥ आपणांसमान विभवें ज्यांचीं । समता रूपशीळतेगुणांची । लक्षूनि सोयरीक करी साची । विवाह रची विधिप्रणीत ॥ ७ ॥ कन्येसारिखा पाहोनि वर । कन्यादानीं होय तत्पर । स्नुषा लक्षूनियां सुन्दर । योजी श्रीधर पुत्रातें ॥ ८ ॥ ऐसें देखोनि परते मुनि । सवेग प्रवेशे आणिके सदनीं । तेथ देखता होय नयनीं । कोदंडपाणि तें ऐक ॥ ९ ॥

प्रस्थापनोपानयनैरपत्यानां महोत्सवान् । वीक्ष्य योगेश्वरेशस्य येषां लोका विसिस्मिरे ॥ ३३ ॥

अपत्यांच्या महोत्सवीं । मूळें पाठवी कन्या आणवी । स्नुषा जामात गौरवीं । आणूनि मांडवी सोहळियां ॥ ३१० ॥ तैसाचि सुहृदांचिये सदनीं । कन्या पुत्र चक्रपाणि । धाडी सोहळिया सम्मानीं । वस्त्राभरणीं मंडित पैं ॥ ११ ॥ निष्प्रपंच निर्विकार । योगीश्वरांचा ईश्वर । देखोनि प्रपंचीं तत्पर ।

विस्मयपर जन होय ॥ १२ ॥ योगेश्वराचे हे अपूर्व । अपत्यांचे महोत्सव । देखूनि लोक विस्मित सर्व । करिती नवलाव हृत्कमळीं ॥ १३ ॥ देखूनि मुनि आणिका गृहा । जाऊनि पाहे भगवदीहा । तेथ कौतुक देखे महा । तें कुरुवर्या अवधारी ॥ १४ ॥

यजंतं सकलान्देवान्क्वापि क्रतुभिरूर्जितैः । पूर्तयंतं क्वचिद्धर्म कूपाराममठादिभिः ॥ ३४ ॥

ऊर्जित ऐसे जे क्रतुवर । तिहींकरूनि सर्व सुरवर । यजितां देखूनि कमलावर । मुनि सत्वर परतला ॥ १५ ॥ अन्य सदनीं रिघोनि पाहे । तेथ अपूर्वधर्मप्रवाहें । तदुचित क्रिया संपादितांहे । तें लवलाहें अवधारीं ॥ १६ ॥ पूर्व सदनीं इष्टाचरण । देखोनि निवाला विधिनंदन । येथ आपूर्तविधिविधान । दिसे संपूर्ण हरि करितां ॥ १७ ॥ आपूर्त म्हणावें कशासी । ऐसा संशय ज्यां मानसीं । तिहीं ऐकावें आपूर्तासी । संक्षेपेंसी कथिजेल ॥ १८ ॥ वापी कूप तडाग सर । वनोद्यानें आराम रुचिर । देवायतनें विश्रामकर । धर्मशाळा मठ मठिका ॥ १९ ॥ पुरें गोपुरें अग्रहारें । तीर्थें क्षेत्रें मनोहरें । पुण्यसरिता उभयतीरें । सोपानबद्ध पथरचना ॥ ३२० ॥ इत्यादि आपूर्तधर्मप्रवाह । करितां देखोनि कमलानाहो । सवेग सांडूनि मुनि तें गृह । अन्य मंदिरीं प्रवेशला ॥ २१ ॥

चरंतं मृगयां क्वापि हयमारुह्य सैंधवम् । घ्नंतं ततः पशून्मेध्यान्परीतं यदुपुंगवैः ॥ ३५ ॥

सिन्धुदेशसंभव हय । सैन्धव त्याचें नामधेय । त्यावरी वैसोनि रमाप्रिय । पारधी जाय साटोपें ॥ २२ ॥ यदुवंशीं जे नामाथिले । शूरप्रतापी वर दादुले । तिहीं वेष्टित मृगयालीले । मुनीचे डोळे हरि पाहती ॥ २३ ॥ तेथ सज्जूनि चापबाण । पवित्रां पशूतें शर विंधून । मारिता होय श्रीभगवान । अनुलक्षून मुनि परते ॥ २४ ॥

अव्यक्तलिंगं प्रकृतिष्वंतःपुरगृहादिषु । क्वचिच्चरंतं योगेशं तत्तद्भावबुभुत्सया ॥ ३६ ॥

अंतःपुरगृहाच्या ठायीं । आपुल्याप्रकृतींमाजी पाहीं । वेपान्तरें शेषशायी । गूढरूपें विचरतसे ॥ २५ ॥ त्याचे ते ते अंतर्भाव । जाणूं इच्छूनि श्रीकेशव । वेषान्तरें निज अवयव । लपवूनि विचरे गूढत्वें ॥ २६ ॥ अथवा अंतःपुरगत ललना । त्यांच्या जाणोनि भोगभावना । तद्भोगइच्छेकरूनि जाणा । अव्यक्तलिंगें हरि विचरे ॥ २७ ॥ म्हणाल भोगवासना कैशा । हरि केंवि लपवी आकृतिठसा । यदर्थीं आश्चर्य न मना सहसा । नव्हे योगीशा दुर्घट हें ॥ २८ ॥ यालागीं योगीश्वराच्या ठायीं । अघटितघटना दुर्घट नाहीं । ऐसें जाणोनि शंका हृदयीं । श्रोतीं कांहीं न धरावी ॥ २९ ॥ योगमायेच्या नटनाट्यें । लीले विचरतां वैकुंठपीठें । नारद जाणोनि आत्मनिष्ठ । प्रकट भेटे तें ऐका ॥ ३३० ॥

अथोवाच हृषीकेशं नारदः प्रहसन्निव । योगमायोदयं वीक्ष्य मानुषीमीयुषो गतिम् ॥ ३७ ॥

समस्त सदनें फिरल्यावरी । नारद जाऊनि भेटे हरी । मग हरीतें मधुरोत्तरीं । बोले वैखरी स्मितवक्त्रें ॥ ३१ ॥ प्रकर्षें हांसतियाचे परी । हृषीकेशातें निजवैखरी । योगयामेचा उदय नेत्रीं । वेदनिर्धारीं लक्षूनि ॥ ३२ ॥ मनुष्याची जैसी गति । तियेतें अनुसरे जो श्रीपति । त्यासी नारद निष्कपटोक्ति । बोले निश्चिती तें ऐका ॥ ३३ ॥

विदाम योगमायास्ते दुर्दर्शा अपि योगिनाम् । योगेश्वरात्मन्निर्भाता भवत्पादनिषेवया ॥ ३८ ॥

नारद म्हणे भो योगीश्वरा । जाणोनि तव मायाविचारा । जे दुर्दर्श योगियां अपरां । त्या निर्धारा अवधारीं ॥ ३४ ॥ अशक्य दावावयाकारणें । अपर योगियांलागिं जें म्हणे । ते तव माया अंतःकरणें । जाणों आम्ही तव कृपा ॥ ३५ ॥ अगा ये आत्मया श्रीहरि । आमुचे मानसीं प्रतीति खरी । तुझी माया हे निर्धारीं । स्वरूपाधारीं भासतसे ॥ ३६ ॥ तुझिया पादसेवनेंकरून । आम्ही तव मायाभिज्ञ । येरहवीं योगियांलागून । दुःखेंकरून न देखवे ॥ ३७ ॥ षोडशसहस्रसदनान्तरीं । साष्टशतादि वरिष्ठां घरीं । विराजलासि पृथगाचारीं । म्यां निर्धारीं लक्षिलासी ॥ ३८ ॥ हे तव अवघी योगमाया । योगेश्वरांही न ये आया । प्रतीत बाणली आमुच्या हृदया । अभेदें तुझिया पदभजनें ॥ ३९ ॥ मनुष्यनाट्याची पाहिली लीला । हे तव माया श्रीघननीळा । वास्तवपरमार्थतत्त्व-जिह्वाळा । नोहे गोपाळा मी जाणें ॥ ३४० ॥ तुझिया मनुष्यनाट्येंकरून । मोहें भ्रमले विधि ईशान । इंद्र अग्नि यम निर्ऋति वरुण । कुबेर पवनप्रमुख सुर ॥ ४१ ॥ मनुष्यनाट्येंकरूनि तुझिया । झणें मोहिसी माझिया हृदया । या कारणास्तव शरण पाया । जे देऊनि अभया आज्ञापीं ॥ ४२ ॥

अनुजानीहि मां देव लोकांस्ते यशसाप्लुतान् । पर्यटामि तवोद्गायन्लीलां भुवनपावनीम् ॥ ३९ ॥

कृपा करूनि आज्ञा देयीं । म्हणसी जासील कोणे ठायीं । तरी सर्वगा त्वां हें जाणिजे हृदयीं । तव यशनवाईगतदेशा ॥४३ ॥ मातें जाणिजे त्वां देवा । तव यशोमंडितां लोकां सर्वां । तव कीर्ति मी गात फिरेन बरवा । श्रीकेशवा हृदयस्था ॥ ४४ ॥ भुवनपावनी जे तव लीला । उच्चस्वरें भुवनपाळा । गात होत्साता लोकां सकळां । पर्यटन मी करीन ॥ ४५ ॥ यदर्थीं तुवां कृपा कीजे । मायामोहें न मोहिजे । लीलागायनीं प्रमोदिजे । अभीष्ट माझें हें पुरवीं ॥ ४६ ॥ हें ऐकोनि श्रीभगवान । भ्रमभयाकुळ नारद शरण । जाणोनि अभयद बोले वचन । करुणापूर्ण तें ऐका ॥ ४७ ॥

श्रीभगवानुवाच । तच्छिक्षयँल्लोकमिममास्थितः पुत्र मा खिदः ।
ब्रह्मन्धर्मस्य वक्ताऽहं कर्ता तदनुमोदिता ॥ ४० ॥

अरे ब्राह्मणा ब्रह्मनंदना । सवर्था खेद न करीं मना । ऐकोनि साकल्य ममाचरणा । समाधाना अवलंबीं ॥ ४८ ॥ मी धर्माचा संस्थापक । वक्ता कर्ता अनुमोदक । धर्मसन्मार्गी शिक्षीं लोक ।

म्हणोनि सम्यक आचरें पैं ॥ ४९ ॥ मी आचरोनि शिक्षीं लोकां । जाणोनि ऐशिया विवेका । खेद न कीजे त्वां पुत्रका । अखिल लोकामाजी रमतां ॥ ३५० ॥

श्रीशुक उवाच ॥ इत्याचरंतं सद्धर्मान्पावनान्गृहमेधिनाम् । तमेव सर्वगेहेषु संतमेकं ददर्श ह ॥ ४१ ॥

शुक म्हणे गा परीक्षिति । पावना धर्मातें श्रीपति । इत्यादि आचरणीं त्याप्रति । मुनि संत्पथीं अवलोकी ॥ ५१ ॥ वेदविहित ते सद्धर्म । गृहस्थाचें नित्य कर्म । सर्वां गेहीं मेघश्याम । आचरे त्यातें मुनि देखे ॥ ५२ ॥ एवं गृहस्थधर्मा पाहीं । एक असतां सर्वां गेहीं । आचरत्यातें देखूनि हृदयीं । मुनि नवायी हे मानी ॥ ५३ ॥ मुनिनारदें हरि प्रार्थिला । जे मायामोहीं न भुलवीं मजला । ऐसें ऐकूनि अनुग्रह केला । पुत्र मा खिदः म्हणोनियां ॥ ५४ ॥ अनुग्रह कैसा म्हणसी राया । कृपेनें कथिली निजात्ममाया । धर्मस्थापनाचिया कार्या । लोकशिक्षार्थें नरनाट्य ॥५५॥ तया कृपानुग्रहप्रकाशें । एक होत्साता अनेक वेशें । आपणा दाविलें हृषीकेशें । नारदा ऐसें उमजलें ॥ ५६ ॥

कृष्णस्यानंतवीर्यस्य योगमायामहोदयम् । मुहुर्दृष्ट्वा ऋषिरभूद्विस्मितो जातकौतुकः ॥ ४२ ॥

ऐसा अनंतवीर्य श्रीकृष्ण । त्याचें योगमायाचरण । महोदयरूप अनुलक्षून । वारंवार बहु सदनीं ॥ ५७ ॥ ज्याचा योगमायामहोदय । जाणों न शके श्मशाननिलय । विधाता वज्री विदुषनिचय । तेथ काय अल्पमति ॥ ५८ ॥ ऐसा असतां विधिनंदना । योगमाया कळली जाणा । हे कृष्णाची अनुग्रहकरुणा । यास्तव मना स्मय मानी ॥ ५९ ॥ अद्भूतपूर्व हें कौतुक । मानूनि वारंवार सम्यक । विस्मित होय विरंचितोक । हा विवरीं विवेक कुरुवर्या ॥३६०॥ इतुकें कथूनि पुढतें काय । शुक नृपातें कथिता होय । तें परिसावया श्रोतृनिचय । चातकन्यायें सादर हो ॥ ६१ ॥

इत्यर्थकामधर्मेषु कृष्णेन श्रद्धितात्मना । सम्यक्सभाजितः प्रीतस्तमेवानुस्मरन्ययौ ॥ ४३ ॥

ऐशा प्रकारें कामधर्मार्थे । साधावयाचें परम आर्त । दावी स्वदेहीं भगवंत । श्रद्धावंत होत्साता ॥ ६२ ॥ तेणें नारद वरत्या परी । भजविला होत्साता स्वशरीरीं । मग सप्रेमप्रीतीकरूनि हरि । अनुस्मरूनि निघाला ॥ ६३ ॥ स्मरत होत्साता त्या कृष्णातें । अनुलक्षितें विविधें चरितें । वारंवार आठवी चित्तें । गगनपथें जातां तो ॥ ६४ ॥ त्यावरी नारदें देखिली लीला । एक्या श्लोकें तें कुरुपाळा । प्राञ्जळ प्रेमें शुक बोलिला । तो अर्थ परिसिला पाहिजे ॥ ६५ ॥

एव मनुष्यपदवीमनुवर्तमानो नारायणोऽखिल भवाय गृहीतशक्तिः ॥
रेमेऽङ्गषोडशसहस्रवरांगनानां सव्रीडसौहृदनिरीक्षणहासजुष्टः ॥ ४४ ॥

एवं म्हणिजे पूर्वोक्तपरी । मनुष्यनाट्यमार्गकुसरी । अनुलक्षूनि वर्ततशरीरीं । नारायण जो

नररूपी ॥ ६६ ॥ अखिलचराचरांच्या उत्पत्ती । कारणें जो अनेक मूर्ती । धरूनि प्रकटे अनेक शक्ति । अनेकां मदनीं विविधरूपें ॥ ६७ ॥ अंग ऐसिया संबोधनें । शुकाचार्य नृपातें म्हणे । जो सोळा सहस्र अंगनेक्षणें । रमता झाला सुसेवित ॥ ६८ ॥ नव्हती समान प्राकृता जना । ज्या कां केवळ वरांगना । सव्रीड सौहृद निरीक्षणा । हास्यविभ्रमें भुलविती ज्या ॥ ६९ ॥ वरांगना म्हणाल कैशा । निगमोक्त-मांगश्रुति सुवेशा । सगुणनिर्गुणभावीं सरिशा । ज्या परेशा अनुसरती ॥३७०॥ प्रधानगुणसाम्या जिये म्हणती । पयोब्धिमथनीं सगुणोत्पत्ति । पावोनि रमा रमणीय मूर्ति । सेवी श्रीपति अभि-न्नत्वें ॥ ७१ ॥ तियेचिसरिशा पयोब्धिभवा । अप्सरा सुरांगना ज्या अभिनवा । त्या येथ वरललना केशवा । ललितलाघवा भजविती ॥ ७२ ॥ सलज्जहास्यनिरीक्षणीं । सप्रेममौहार्दविनयभाषणीं । सोळा सहस्रा वरांगनीं । अभीष्टक्रीडनीं क्रीडविला ॥ ७३ ॥ ऐसा तिहीं सेविला हरि । सकळ भावाची उत्पत्तीवारी । मनुष्यपदवीच्या अनुकारीं । अनेकापरी जो एका ॥ ७४ ॥ एवं ऐसीं मनुष्यनाट्यें । अभिनवकर्में श्रीवैकुंठें । केलीं तियें जो ऐके पढे । श्रेय घडे तें ऐका ॥ ७५ ॥

यानीह विश्वविलयोद्भववृत्तिहेतु. कर्माण्यनन्यविषयाणि हरिश्चकार ॥
यस्त्वङ्गगायति शृणोत्यनुमोदते वा भक्तिर्भवेद्भगवति ह्यपवर्गमार्गे ॥ ४५ ॥

अंग ऐसिया आमंत्रणें । बादरायणि नृपातें म्हणे । अभिनव कर्में केलीं कृष्णें । जीं पढतां वदनें भवहंतीं ॥ ७६ ॥ विश्वसृजनावनान्तभूतें । असाधारणें जियें कर्में येथें । केलीं न वचती आणि-कांतें । कर्ता त्यांतें हरि झाला ॥ ७७ ॥ नृपातें मुनि म्हणे भो अंग । तीं हरिकर्में जो गाय सांग । अथवा परिसे जो अव्यंग । किंवा अभंग अनुमोदी ॥ ७८ ॥ श्रोत्यां वक्त्यांतें देखून । नमनें पूजनें सम्मानून । धन्य म्हणोनि अनुमोदन । करितो पावन हरि साम्यें ॥ ७९ ॥ अव्यभिचारिणी भगवद्भक्ति । अपवर्गातें जे प्रसवती । मोक्षप्रद मार्गाची दाती । करी प्रसरती त्रिजगीं तो ॥३८०॥ राया तुज हा संशय एक । सृजनावनान्तकर्में पृथक । विरंच्यादि यां प्रवर्तक । यदुनायक कोंवि हेतु ॥ ८१ ॥ तरी तें मायिक गुणत्रय । तिये मायेसी जो आश्रय । तो हा केवळ अज अव्यय । देवकीतनय हरि येथ ॥ ८२ ॥ गुणत्रयाची सामर्थ्यशक्ति । तियेचें कारण जे प्रवृत्ति । निजांगें स्फुरद्रूप श्रीपति । दावी ते स्थिति तुज वदलों ॥ ८३ ॥ विरंचीनें करावें सृजन । तेणें करितां वत्साहरण । वत्सें गोपाळ हरि होऊन । मोहित पूर्ण तो केला ॥ ८४ ॥ पाहों पातला हरिगरिमेतें । तंव ते गोपाळ वत्सें समस्तें । हरिरूप देखूनि आपणयातें । नेणे स्मृतीतें सांडवला ॥ ८५ ॥ अवघे दरारिगदाब्जपाणी । तितुक्या पृथक ब्रह्माण्डश्रेणी । आपुल्या मूर्ति तितुकिया चरणीं । अनेका देखूनि निर्बुजला ॥ ८६ ॥ कीं उदधीमाजी द्वारका सृजिली । नकळत मथुरा तेथ नेली । कीं रासरमार्थ रजनी केली । विविधाण्मासिक निजयोगें ॥ ८७ ॥ गोपां निकटीं सुत गोपिका । रासरंगणी रत सकळिका । एकल्या किंवा पृथक्पृ-थका । सृजिल्या ऐसें विधि नेणे ॥ ८८ ॥ मुचुकुन्दासी अनुग्रह केला । पूर्ववेश तैं प्रकटिला ।

तद्दक्षपातें यवन वधिला । हरवरदाला वंचूनी ॥ ८९ ॥ कीर्तिश्रवणशुल्कावारी । आत्मप्रकृति जे सुन्दरी । हरिली वैदर्भी नोवरी । विधिहर थोरी हे गाती ॥ ३९० ॥ रुक्मिणीचे हरणसंधी । जरासंधादि गजे वरदी । जिंकूनि कीर्ति कोणें कधीं । केली ऐसी सांग पां ॥ ९१ ॥ रुक्मि विटंबूनि समरंगीं । रुक्मिणीमानसातें न भंगी । ऐसा अंतरवेत्ता जगीं । दुसरा कोण दावीं पां ॥ ९२ ॥ आंगीं सामर्थ्य अमतां पुरतें । प्रद्युम्नहरणीं सशोक वर्ते । रुक्मिणीमानस मोही पुरतें । वेत्तृत्व कोणातें हें सांग ॥ ९३ ॥ भक्तकामकल्पद्रुम । जाम्बवताचा अहंताभ्रम । भंगूनि संतुष्ट आत्माराम । पूर्णकाम तत्सुता वरी ॥ ९४ ॥ श्वशुरहंता शतधन्वान । त्यासी वधूनि श्रीभगवान । तत्संमतही अक्रूर जाण । स्वभक्त जाणून बुझाविला ॥ ९५ ॥ आत्मनिरता नृपात्मजा । त्यांच्या जाणूनि हृदयकंजा । पांचही वरिल्या जाणोनि पैजा । स्वभक्तकाजा कळवळुनी ॥ ९६ ॥ ऐसा भक्तवत्सल हरि । असाधारणें कर्में करी । केलीं न वचती नरनिर्जरीं । भूचरीं खेचरीं असुरींही ॥ ९७ ॥ भौमें अदितीचीं कुण्डलें । सहित मणिशृंगही हरिलें । वरुणच्छत्र हिरोनि नेलें । परि विक्रम न चले देवांचा ॥ ९८ ॥ अमरीं येऊनि द्वारकापुरीं । ग्लानि दावूनि प्रार्थिला हरि । तैं भौमातें समरीं मारी । तें सुरवर स्वपुरीं यश गाती ॥ ९९ ॥ भामाप्रीतीस्तव सुरतरु । हरितां क्षोभला पुरंदरु । कृतघ्न होऊनि करितां समरु । कृष्णें सत्वर त्या दमिलें ॥ ४०० ॥ पार्यात आणूनि दिधला भामे । सोळा सहस्र कन्या भौमें । संग्राहिल्या त्या पुरुषोत्तमें । वरिल्या नियमें पृथक्त्वें ॥ १ ॥ एके घटींत अवघ्या जणी । वरिल्या पृथक पाणिग्रहणीं । ऐसी असाधारण करणी । केली कोणीं सांग पां ॥ २ ॥ तया पाणिग्रहणावसरीं । सर्वां मंडपीं सर्व सामग्री । सृजिली पृथक्पृथगाकारीं । हे शक्ति पुरी हरिआंगीं ॥ ३ ॥ सांदीपनीचा पुत्र यमें । नेला त्यातें पुरुषोत्तमें । आणिलें ऐसीं अवनकर्में । आणिक कोणा करवती पैं ॥ ४ ॥ साक्षात् रुद्रही रक्षणपर । असतां छेदिले बाणकर । समरीं जिंकूनि श्रीशंकर । आणिलें बोहर निजनगरा ॥ ५ ॥ ब्रह्मशापें अंधकूपीं । अधोमुखी सरटरूपी । ऐसिया नृगातें निष्पापी । करूनि स्थापी सुरसभीं ॥ ६ ॥ काशीश्वरात्मज सुदक्षिण । तेणें तोषवूनि ईशान । अभिचारकृत्याहुताशन । द्वारकादहनीं क्षोभविला ॥ ७ ॥ कृत्यानळाची बोहरी । सुदक्षिणेसीं काशीपुरी । ऋत्विज आचार्य सहपरिवारीं । जाळी श्रीहरि क्षणमात्रें ॥ ८ ॥ ऐसी प्रळयात्मकें कर्में । अनेक केलीं पुरुषोत्तमें । एवं गुणत्रयाचीं जन्में । संकल्पनियमें जो प्रकटी ॥ ९ ॥ प्रस्तुत राया ये अध्यायीं । हरिलीलेची नवनवलायी । कथिली ते त्वां श्रवणालयीं । भरिली कीं ना सांग पां ॥ ४१० ॥ येथ पोडश सहस्रां सदनीं । नारदें देखिला चक्रपाणि । विविधा क्रीडा विविधाचरणीं । तुज व्याख्यानीं निवेदिल्या ॥ ११ ॥ विश्वस्थितिलयसृजनात्मकें । गुणकर्में जीं पृथक्पृथकें । केलीं एकें यदुनायकें । अलौकिकें अघहंतीं ॥ १२ ॥ जो या कर्मांतें अनुमोदी । ऐके पढे आणिकां बोधी । तो भक्तीची परम सिद्धि । अपवर्ग साधी हरिभजनीं ॥ १३ ॥ इतुकी कथा बादरायणि । परीक्षितीचे घाली श्रवणीं । शौनकसत्रीं रौमहर्षणी । जें वाखाणी सप्रेमें ॥ १४ ॥ तें हें श्रीमद्भागवत । अठरा सहस्र मुनिगदित । दशमस्कंधीं कृष्णचरित । नारदेक्षित हरिलीला ॥ १५ ॥ शुकपरीक्षितिसंवादमिषें । जगदुद्धरणास्तव श्रीव्यासें । पारमहंसी संहिता

तोषें । पीयूषवल्ली पल्लवली ॥ १६ ॥ ऊनसप्ततितम दशमांतील । अध्याय अमरतरूचें फूल । श्रोते होऊनि अळिउळ । हरियशः परिमळरम घेती ॥ १७ ॥ एकनाथी प्रतिष्ठानीं । पिंगलाब्दीं अवर्षणीं । प्रौष्ठपदीं मित हरिदिनीं । भाषाटिप्पणी दयार्णवी हे ॥ ४१८ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायांदयार्णवानुचरविरचितायां षोडशसहस्रहरिलीलावलोकनलालसा नारदनिर्यापणं नामोनसप्ततितमोऽध्यायः ।

शके ॥१६९२॥ विकृतिनामसंवत्सरे फाल्गुनशुक्ल एकादशी प्रभातेधारुरीअध्यायसमाप्त

॥ श्लोक ॥ ४५ ॥ ओंव्या ॥ ४१८ ॥ एवं संख्या ४६३ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु

(६८ वा अध्याय मिळून ओवी संख्या ३२१३५)

एकोणसत्तरावा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ७० वा

श्रीगोविन्दसद्गुरवे नमः । प्रपंच परमार्थ मोघामोघा । तुज नेणतां प्रपंच अवघा । जाणितिलिया अखिलामोघा । प्रपंचभोगा अनवसर ॥१॥ ऐसिया गोविन्दा तुज नमन । नमितां मन होय उन्मन । मनें भाविलें जें भवभान । अस्तमान त्या सहजें ॥ २ ॥ ओतप्रोत तूंचि अवघा । तेथ नम्य नमिता उभय विभागा । ठाव नाहीं अद्वयाभंगा । ओघ तरंगा निर्व्योमीं ॥ ३ ॥ तथापि स्वेच्छा चिद्विलास । अबळां भ्रमवी विश्वाभास । स्वजनानंदलीलालास्य । भवभ्रम निःशेष नाशक जें ॥ ४ ॥ तेथ दशमीं श्रीकृष्णलीला । पहावया नारद आला । षोडशसहस्र सदनें फिरला । मग निश्चय केला हा तेणें ॥५॥ अर्थकामधर्मविषयीं । श्रद्धावंत चित्तें पाहीं । निजाचरणें लोकीं तिहीं । प्रकृति प्रकटी गार्हस्थ्यें ॥ ६ ॥ तस्मात् गृहस्थधर्माचरणीं । सिद्धाधिकार चक्रपाणी । असतां नृपाह्निकव्याख्यानीं । बादरायणि प्रवर्तला ॥ ७ ॥ इत्यर्थ नारदकृत निर्धार । तदनंतरें आह्निकाचार । अथशब्दार्थ हा विस्तार । पूर्व-पीठिके विवरिला ॥ ८ ॥ शुक म्हणे गा कुरुवरपाळा । नारद कृष्णा नमूनि गेला । अथेत्यनंतर कृष्णलीला । सादर सकळांसह परिसें ॥ ९ ॥

श्रीशुक उवाच ॥ अथोषस्युपवृत्तायां कुक्कुटान्कूजतोऽशपन् । गृहीतकठचः पतिभिर्माधव्यो विरहातुराः ॥१॥

सप्ततितमीं कृष्णाह्निक । नृपग्लानी आणि धर्ममख । दूतनारदवाक्यविवेक । मंत्र निष्टंक निरूपिला ॥१०॥ ये अध्यायीं इतुकी कथा । द्वैपायनि नृपातें वक्ता । सादर होऊनि परिसिजे श्रोतां । आह्निक प्रथमतः त्यामाजी ॥ ११ ॥ नारदागमनानंतर हरि । रमणींसहित निशि अवसरीं । निद्रिस्त सोळा सहस्रां घरीं । विलासभरीं स्मररासिक ॥१२ ॥ अनेका सदनीं अनेक हरि । कंठ कवळूनि सप्रेम नारी ।

पहुडल्या अमतां हरिशेजारीं । तंव शर्वरी अतिक्रमली ॥ १३ ॥ समीप जाणोनि उपःकाळ । निसर्गे चेइला कुक्कुटमेळ । ह्रस्व दीर्घ प्लुत प्राञ्जळ । करिती कोल्हाळ स्वकूजितीं ॥१४॥ माधवपत्न्या त्या माधवी । सप्रेमभरें रत माधवीं । वियोग सूचितां कुक्कुटरवीं । सक्षोभ जीवीं विरहार्ता ॥ १५ ॥ कुक्कुटा निंदिती धिक्कारें । म्हणती तुमची जळोत वक्त्रें । आमुचा विघड करितां स्वरें । दीर्घगजरें स्वकूजितें ॥ १६ ॥ तुमचें परिमोनियां कूजित । उपःकाळीं आह्निकार्थ । आमुचा सांडोनि रतिएकान्त । उठेल भगवंत उताविळा॥१७॥ ऐशा विरहातुरा माधवी । क्षोभें कुक्कुटा शापित स्वजीवीं । तंव शकुन्तवर्ग हरि बोधवी । ते व्याख्यानपदवी अवधारा ॥१८॥

वयांस्यरूरुवन्कृष्णं बोधयंतीव बंदिनः । गायत्स्वलिष्वनिद्राणि मंदारवनवायुभिः ॥२ ॥

स्वप्रभूतें बंदिजन । प्रबोध करिती गायनें करून । भैरव बीभास आळवून । बिलावल भूपाळ इत्यादि ॥ १९ ॥ कीं विष्णूतें वैकुण्ठभुवनी । नारदप्रमुख स्वभक्तगणीं । जागृत कीजे सामगायनीं । द्विजीं कूजनि तेंवि हरीतें ॥ २० ॥ पूर्वींच जागृत वयांसिगण । आमन्न उपःकाळ जाणून । करूनि अतिशयें कूजन । श्रीभगवान जागविती ॥२१ ॥ अंडजजागरानिमित्त काय । प्रश्न करील हा कुरुराय । ऐसें जाणोनि व्यासतनय । कथिता होय प्रश्नादौ ॥ २२ ॥ कृष्णें अमरभुवनीहून । सत्यभामेच्या प्रीतीकरून । सुरतरूचें केलें हरण । लाविलें तद्वन निजभवनीं ॥ २३ ॥ तया मंदारसुमन गंधें । रोलंब रुञ्जती परमानंदें । म्हणोनि अनिद्र पक्षिवृन्दें । गायनवेधें भ्रमराच्या ॥ २४ ॥ मंदारवनवायूच्या झुळका । मंदसुगंधशीतळ देखा । षट्पद पक्षी सेविती सुखा । तुच्छ पीयूषा मानूनी ॥२५॥ श्रीकृष्णचरण-पंकजामोद । संमिश्र मंदारपवनगंध । लोपूनि विषयसुखाचा स्वाद । परमानंद हरिभजनीं ॥ २६ ॥

मुहूर्तं तं तु वैदर्भी नामृष्यदतिशोभनम् । परिरंभणविश्लेषात्प्रियबाह्यंतर गता ॥ ३ ॥

वैदर्भी हें उपलक्षण । परंतु सर्व हरिवनिता समान । प्रियपरिरंभणाचा क्षण । अतिशोभन मानिती ॥ २७ ॥ प्राणेश्वराचें बाह्यंतर । जें कां हरिहृदय गंभीर । तेथें स्वहृदयें संलग्नतर । विश्लेषभीरु रतिरसिका ॥ २८ ॥ हरिपरिरंभविश्लेषास्तव । शोभनमुहूर्तगौरव । भीमकीप्रमुख वनिता सर्व । लब्धानुभव न साहती ॥ २९ ॥ प्रियतमाच्या बाह्यंतरीं । गाढालिङ्गनें संलग्न नारी । काळ क्रमला त्याची थोरी । मुहूर्तावारी उमाणिती ॥ ३० ॥ गाढालिङ्गनें हरिहृदयासी । संलग्न असतां योषितांसी । मुहूर्तातें अवघी निशी । तुल्य विलासीं अवगमिती ॥ ३१ ॥ वैदर्भी हें उपलक्षण । परंतु सर्वा विरहिणी जाण । त्रियामा मानिती जैसा क्षण । परिरंभणास्तव कृष्णाच्या ॥ ३२ ॥ स्मरार्त्त परिरंभप्रेमपाडिभरीं । कृष्णकंठीं संलग्न नारी । तंव कुक्कुटद्विजालिकूजितगजरीं । उपसि मुरारि जागविला ॥ ३३ ॥ रुक्मिणी-प्रमुख समस्त वनिता । कृष्णालिङ्गनीं विघड होतां । वियोग न साहती तत्वता । मानिती मुहूर्ता युगसाम्यें ॥ ३४ ॥

ब्राह्मे मुहूर्त उत्थाय वार्युपस्पृश्य माधवः । दध्यौ प्रसन्नकरण आत्मानं तमसः परम् ॥ ४ ॥

कुक्कुटद्विजालिगजरें हरि । ब्राह्म मुहूर्तीं जागरावसरीं । उठोनि स्पर्शता झाला वारी । शौचाचारीं साचमनें ॥ ३५ ॥ फेडूनि रात्रींचें परिधानवसन । सुधौत दिव्याम्बर वेष्टून । उत्तराभिमुख घालूनि आसन । आत्मचिंतनीं उपविष्ट ॥ ३६ ॥ स्वस्तिक किंवा पद्मासन । ईषत् पृष्ठवंश उत्तान । चिबुक वक्षीं असंलग्न । संवृतवदन भ्रू लक्षी ॥ ३७ ॥ अनास्य प्राणांचा संचार । तोही परम नियमित मात्र । वर्णरचना मुद्रापर । मनोव्यापार निरसूनी ॥३८॥ तेथ मायान्धकाराती । जो कां आत्मा सदोदित । त्या आत्म्यातें ध्यानीं धृत । दीप निर्वात ज्यापरी ॥ ३९ ॥ कोण आत्मा कैसें चिन्तन । तें संक्षेपें करूं कथन । राया ऐकें सावधान । म्हणे नंदन व्यासाचा ॥ ४० ॥

एकं स्वयंज्योतिरनन्यमव्ययं स्वसंस्थया नित्यनिरस्तकल्मषम् ।
ब्रह्माख्यमस्योद्भवनाशहेतुभिः स्वशक्तिभिर्लक्षितभावनिर्वृतिम् ॥ ५ ॥

जो एकचि द्वैतातीत । अखंड एकात्मा संतत । अखंडत्वाचा ऐकें हेत । अनन्यपदार्थ प्रतिपादी ॥ ४१ ॥ अन्य नाहीं तो अनन्य । अन्यरूपिणी प्रकृति भिन्न । भूतगुणांचें अधिष्ठान । जे प्रसवोन रूढ करी ॥ ४२ ॥ हे उपाधि जेथ नाहीं । त्यातें निरुपाधि म्हणिजे पाहीं । यालागीं अनन्यपदनिश्चयीं । श्रुतिनिर्वाहीं प्रतिपाद्य ॥४३॥ उपाधिमात्र भासे नासे । अखंड अनन्य अव्यय असे । म्हणोनि श्रुतींहीं नित्य ऐसें । प्रबोधवशें बोधियलें ॥ ४४ ॥ आम्ही स्वयंज्योति ऐसें म्हणती । हेतु ऐकावा यदर्थी । जे कां अविद्या कल्मषबुद्धि । तिची निवृत्ति ज्या स्वरूपीं ॥ ४५ ॥ जेथूनि अविद्यावरणा नाश । तेंचि नित्य निवृत्तकल्मष । उपलक्षण बोलतों यास । जें या विश्वास गुणहेतु ॥ ४६ ॥ म्हणसी माया गुणा प्रसवली । तरी मायाप्रकाशक जें का मुळीं । सृजनावनान्तमय सृष्टि झाली । तीमाजि पहिली आस्तिक्यता ॥ ४७ ॥ मायागुणात्मक विश्व सहज । भावनिर्वृति मुळींचें बीज । याचें व्याख्यान राया उमज । कथितों तुज प्रकटार्थें ॥ ४८ ॥ सत्ताशब्दार्थ बोलिजे भाव । आनंद निर्वृतिशब्दा नांव । एवं सदानंद ब्रह्म स्वमेव । ज्यावरी माव भवभ्रम हा ॥ ४९ ॥ मुळीं सन्मात्र जोंधळा । विश्वाकारें विरूढला । दंडपत्रावयवीं झाला । अंतीं निवडला सदूपें ॥ ५० ॥ विश्वासाद्यंतीं सन्मात्र । सदैव श्रुत्युक्त आनंदप्रचुर । सहजानंद शब्दाधार । केवळ सन्मात्र सदानंद ॥ ५१ ॥ ऐसें नित्यनिवृत्तकल्मष । ब्रह्म ऐसें नाम ज्यास । बृहत्त्वास्तव बोलती विदुष । नित्य निर्दोष स्वयंज्योति ॥ ५२ ॥ ऐसिया अत्मयातें ध्यानीं । पूर्वोक्त मुद्राबद्ध आसनीं । तादात्म्य पावे आत्मचिन्तनीं । तुजलागुनी हें कथिलें ॥ ५३ ॥ राजा म्हणे योगीश्वरा । कृष्ण सन्मात्राचि ऐसें विवरा । तो कां शरीर आसन मुद्रा । ध्यानव्यापारा अवलंबी ॥ ५४ ॥ मुनि म्हणे भो परीक्षिति । पूर्वीच कथिलें म्यां तुजप्रति । आह्निक लोकसंग्राहार्थीं । प्रकटी श्रीपति आचरोनी ॥ ५५ ॥ कृष्ण परब्रह्मांचे केवळ । त्यासि न बाधी कर्ममळ । जरी प्रकाशी अनेक शीळ । तरी तो अमळ स्वयंज्योति ॥ ५६ ॥ झाली शंकेची

निवृत्ति । पुढें कृष्णाह्निकपद्धति । शुक निरूपी रायाप्रति । तें व्याख्यान श्रोतीं परिसावें ॥ ५७ ॥

अथाप्लुतोऽम्भस्यमले यथाविधि क्रियाकलापं परिधाय वाससी ।
चकार सध्योपगमादि सत्तमो हुतानलो ब्रह्म जजाप वाग्यतः ॥ ६ ॥

आत्मचिन्तनानंतर हरि । सनकादिस्वभक्तनामोच्चारीं । प्रातःस्मरणीं पठन करी । शिष्टाचार-प्रवर्तना ॥ ५८ ॥ त्यानंतरें स्नानविधि । गोमती मिनली जेथ जळधी । तिये चक्रतीर्थीं विशुद्धीं । स्नानविधि नेमस्त ॥ ५९ ॥ तये अमलोदकीं स्नान । स्नानद्रव्यें प्रयोगपठन । विधिपूर्वक संपादून । करूनि परिधान दिव्याम्बरें ॥ ६० ॥ संध्यावंदन उपासन । इत्यादिक्रियाकलाप पूर्ण । जैसा होय तैसा जाण । करिता झाला स्वयें हरि ॥ ६१ ॥ आर्घ्यान्त संध्या करूनि आधीं । अनुदित होम उपासनासिद्धी । उपस्थानान्त होमविधि । सारूनि जपनीं वाङ्नियमें ॥ ६२ ॥ ब्रह्म म्हणिजे वेदजननी । मौने करूनि चक्रपाणी । जपता झाला उपांशु वाणी । अर्थचिन्तनीं नियतात्मा ॥ ६३ ॥

उपस्थायार्कमुद्यंतं तर्पयित्वाऽऽत्मनः कला. । देवानृषीन्पितॄन्वृद्धान्विप्रानभ्यर्च्य चात्मवान् ॥ ७ ॥

अर्कोदयीं जपसमाप्ती । सूर्योपस्थान भास्कर सूक्तीं । निजांशसुरमुनिपितरांप्रति । अर्ची श्रीपति पंचमखें ॥ ६४ ॥ हव्यें स्वाहान्त देवयज्ञ । ब्रह्मतीर्थें ऋषितर्पण । पितृतीर्थें स्वधान्त जाण । पितृतर्पण जलदानें ॥ ६५ ॥ जीवत्पितृकी दिव्य पितर । अपसव्य वामांगुष्ठमात्र । पितृयज्ञाचा हा प्रकार । वृद्धाचार परंपरा ॥ ६६ ॥ तैसाचि पिण्डपितृयज्ञ । याचि प्रकारें कीजे जाण । सहसा न कीजे विधि-लंघन । निजाचरणें हरि बोधी ॥ ६७ ॥ सनकादिमनुष्यतर्पण । कृतोपवीतसूत्रें जाण । खंब्रह्मान्त वेद-पठन । ब्रह्मयज्ञ या नांव ॥ ६८ ॥ इत्यादि पंच महामख । जळें आणि हवनात्मक । संपादूनि मन्मथ-जनक । पूजी सम्यक गुरुवृद्धां ॥ ६९ ॥ गुरुपूजनपूर्वक प्राज्ञ । तपोवृद्धादि श्रेष्ठ सर्वज्ञ । वेदवेत्ते विप्र जाण । अर्ची आपण मनोभावें ॥ ७० ॥ इत्यादि सारूनि पूजाविधि । धेनुदानीं कृपानिधि । आचरूनि प्रवृत्ति बोधी । ऐकें सुबुद्धि कुरुवर्या ॥ ७१ ॥

धेनूनां रुक्मशृंगीणां साध्वीनां मौक्तिकस्रजाम् । पयस्विनीनां गृष्टीनां सवत्सानां सुवाससाम् ॥ ८ ॥
ददौ रूप्यखुराग्राणां क्षौमाजिनतिलैः सह । अलंकृतेभ्यो विप्रेभ्यो बद्धं बद्धं दिने दिने ॥ ९ ॥

प्रतिदिवशीं धेनुदान । स्वयें करी जनार्दन । सालंकृत धेनु लक्षून । ऐका विवरण तयाचें ॥ ७२ ॥ साध्वी सुशीळ सुवर्णशृंगी । सवत्सा सुदोहा सुलिङ्गी । पयस्विनी पृष्ठभागीं । सुष्ठु वसनें विराजती ॥ ७३ ॥ गृष्टिनामें प्रथमप्रसूता । रौप्यशफाग्रमंडिता । ज्यांच्या पृष्ठीं आच्छादिता । क्षौमवसनीं नूतनीं ॥ ७४ ॥ कंठीं मुक्ताफळांच्या माळा । केशरचंदनचर्चितभाळा । कांस दोहा अतिनिर्मळा । देता झाला द्विजां हरि ॥ ७५ ॥ दानपात्र जे ब्राह्मण । वस्त्राभरणीं मंडित पूर्ण ।

सर्वोपचारीं अभ्यर्चन । मग गोदान त्यां अर्पी ॥ ७६ ॥ नामगोत्रोच्चारपूर्वक । प्रतिग्रहप्रतिग्रणात्मक । पुच्छें तर्पण करूनि देख । विप्रां सम्यक गोदानें ॥ ७७ ॥ अजिना तिळांसहित हरि । ऐसीं गोदानें नित्य करी । ब्रह्मशब्दार्थव्याख्याकुसरी । ग्रंथान्तरीं मुनि वदला ॥ ७८ ॥ चौदा लक्ष तेरा सहस्र । सात शतें चौऱ्यांशीं उत्तर । बद्ध संख्येचा विस्तार । अर्पी श्रीधर प्रतिदिवशीं ॥ ७९ ॥ सोळा सहस्र शत साष्ट सदनीं । बद्ध बद्ध दिनीं दिनीं । यथोक्त संख्या चक्रपाणि । करि साभरणीं गोदानें ॥ ८० ॥ दानप्रसंग संपल्यावरी । नित्यनेमें आह्निकाचारी । मंगळें स्पर्शोनि नमस्कारी । तियें अवधारीं कुरुवर्या ॥ ८१ ॥

गोविप्रदेवतावृद्धगुरून्भूतानि सर्वशः । नमस्कृत्यात्मसभूतीर्मगलानि समस्पृशत् ॥ १० ॥

कपिला मुख्य करूनि धेनु । स्वर्चित सालंकृत ब्राह्मण । कृतसपर्या सुप्रसन्न । पंचायतन देवता ॥ ८२ ॥ सदय संतुष्ट श्रीगुरुनाथ । पंचभूतें भौतिकासहित । नमस्कारूनि इयें समस्तें । मंगळरूपें हरि स्पर्शी ॥ ८३ ॥ इया जाणूनि स्वविभूति । मंगळप्रदा कल्याणार्थी । नमस्कारूनि स्पर्शे हातीं । जगत्पति जनबोधा ॥ ८४ ॥ मंगळस्पर्शानंतर हरि । आपणातें अळंकारी । कोणे रीती कैशा परि । तें अवधारीं परिक्षिति ॥ ८५ ॥

आत्मानं भूषयामास नरलोकविभूषणम् । वासोभिर्भूषणैः स्वीयैर्दिव्यस्रग्गंधलेपनैः ॥ ११ ॥

मनुष्यलोकींचीं अळंकरणें । दिव्य वसनें दिव्याभरणें । दिव्य पीताम्बरपरिधानें । निज भूषणें स्वीकेलीं ॥ ८६ ॥ मस्तकीं मुकुट तेजःपुंज । मकरकुंडलें अतिसतेज । वज्रमणिसम वदनीं द्विज । झळकती सहज स्मितवक्त्रें ॥ ८७ ॥ केशरचंदनतिलक ललाटीं । सुरंग अक्षता लखलखाटीं । काश्मीरावरी कस्तूरी भृकुटीं । मध्यभागीं विराजित ॥ ८८ ॥ आंगीं मलयजसार पिंजरी । त्यावरी द्वादश तिलक केशरी । अंगदें बाहुवटां कार्बुरी । जडित कंकणें मणिबंधीं ॥ ८९ ॥ विचित्र रत्नखचित मुद्रिका । चतुरष्ट षोडश दळात्मका । त्रिकोण वर्तुळा चंद्रिका । अनामिका सपवित्रा ॥ ९० ॥ जाम्बूनदात्मक मेखळा । नवरत्नाच्या फांकती किळा । बिरुदें रुळती चरणकमळा । कंठीं वनमाळा वैजयंती ॥ ९१ ॥ कौस्तुभ श्रीवत्सलाञ्छनानिकटी । प्रावरण अमूल्य क्षीरोद दुटी । मंदारसुमनें खोंविलीं मुकुटीं । ते परिपाटी अवधारी ॥ ९२ ॥

अवेक्ष्याज्यं तथा दर्श गोवृषद्विजदेवताः । कामांश्च सर्ववर्णानां पौरांतःपुरचारिणाम् ॥
प्रदाप्य प्रकृतीः कामैः प्रतोष्य प्रत्यनंदत ॥ १२ ॥

करूनि आत्मालंकरण । कनकपात्रीं आज्य भरून । स्वप्रतिबिंब तेथ लक्षून । केले अर्पण तें विप्रा ॥ ९३ ॥ आदर्श पाहिल्या त्यानंतर । धेनु वृषभ देवता विप्र । अवलोकूनि जगदीश्वर । तदुत्तर काय करी ॥ ९४ ॥ ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र । पुरनिवासी वर्ण समग्र । अंतःपुरचारिजन अपर ।

कथिती सादर मनोरथ ॥ ९५ ॥ देऊनि त्यांचे अभिलषितार्थ । प्रधान सचिव मंत्री अमात्य । अष्टधा प्रकृति या सनाथ । करी वाञ्छित अर्थूनी ॥ ९६ ॥ करूनि प्रकृतीतें संतुष्ट । अर्थूनि जें जें ज्या अभीष्ट । स्वयें तत्तोपें उत्कृष्ट । कमलाइष्ट आनंदे ॥ ९७ ॥ इतुकें आह्निक अंतःसदनीं । स्वयें सारूनि चक्रपाणि । मग पातले सभास्थानीं । तेंही श्रवणीं अवधारा ॥ ९८ ॥

संविभज्याग्रतो विप्रान्स्रक्तांबूलानुलेपनैः । सुहृदः प्रकृतीदारानुपायुङ्क्त ततः स्वयम् ॥ १३ ॥

सभास्थानीं पार्षदगण । किङ्कर अनुचर सेवकजन । तिहीं आणिलें उपचारभरण । करी अर्पण हरि तेंही ॥ ९९ ॥ वर्णांमाजि जे अग्रज । सर्ववर्णां ब्राह्मण पूज्य । त्यांसि अग्रीं अधोक्षज । उपचार सहज समर्पी ॥ १०० ॥ मंदारसुमनांचिया माळा । आधीं घालूनि विप्रां गळां । चंदनतिलक रेखिले भाळा । परिमळउधळा वरि केला ॥ १ ॥ फळताम्बूलसमर्पण । इत्यादि उपचारीं ब्राह्मण । आधीं पूजूनि जनार्दन । सुहृदगण अभ्यर्ची ॥ २ ॥ त्यानंतरें राजप्रकृति । मंत्रिधुरंधर ज्यांतें म्हणती । माळा तिलक ताम्बूल निगुती । अर्पिले त्यांप्रति उपचार ॥ ३ ॥ ताम्बूल चंदन सुमनमाळा । दारांप्रति विभाग दिधला । त्यानंतरें अंगीं केला । उपचारसमुच्चय श्रीकृष्णें ॥ ४ ॥ मंदारमाळा घातल्या कंठीं । कुसुमावतंस खोविले मुकुटीं । पुष्पामोद श्रवणपुटीं । भरूनि परिमळ उधळिला ॥५॥ पुष्पादिउपचार सभास्थानीं । विप्रपूर्वक विभागूनीं । स्वयें घेतां चक्रपाणि । वंदिजनीं स्तव केला ॥ ६ ॥ विरुदमाळा पढती भाट । झाला वाद्यांचा बोभाट । संकेत जाणोनि घडघडाट । रथ आणिला सारथियें ॥ ७ ॥

तावत्सूत उपानीय स्यंदनं परमाद्भुतम् । सुग्रीवादैर्हयैर्युक्तं प्रणम्यावस्थितोऽग्रत ॥ १४ ॥

रत्नखचितसुवर्णरथ । गरुडध्वजविराजित । किङ्किणीज्वाळमाळामंडित । जैसा भास्वत भूनभींचा ॥ ८ ॥ शैब्य सुग्रीव बळाहक । मेघपुष्पादि तुरंगचौक । रथीं जुम्पूनियां दारुक । आला सम्यक मनोजवें ॥९॥ परमाद्भुतपदव्याख्यान । जैसें प्राकृतनृपांचे स्यंदन । तैसा नोहे जो गगनींहून । मागधसमरीं उतरला ॥११०॥ हरिसंकल्पमनोजवें । चिंतिल्या स्थानापर्यंत पावे । गगनगर्भीं स्वेच्छा धांवे । अतिलाघवें त्वाग्रकृत ॥ ११ ॥ दिव्यायुधांची ज्यावरी भरणी । प्रभे लोपवी हिमकर तरणि । ब्रह्मा साकल्यें न वर्णी । न शिवे धरणी रथनेमि ॥ १२ ॥ एवं परमाद्भुत हरिरथ । दारुकें सज्जूनि आणिला त्वरित । मस्तकें जुहारूनियां नाथ । अग्रीं विनीत ठाकला ॥ १३ ॥ घटिकायंत्रें सूचितां वेळा । उभा ठाकला पार्षदमेळा । सदस्यैसीं घनसांवळा । स्यंदनाजवळा स्वयें आला ॥ १४ ॥ दारुकें मौळें स्पर्शोनि चरण । केलें धुरेवरी आरोहण । कैसा बैसला नारायण । हें संपूर्ण अवधारा ॥ १५ ॥

गृहीत्वा पाणिना पाणी सारथेस्तं समारुहत् । सात्यक्युद्धवसंयुक्ताः पूर्वाद्रिमिव भास्करः ॥ १५ ॥

सारथियाचा धरूनि पाणि । रथीं बैसला चक्रपाणि । सात्यकि उद्धव दोघीं जणीं । सहित अर्क

उदयाद्रीवरी जैसा ॥ १६ ॥ दारुकें तुरंगा देतां साट । रथ चालिला घडघडाट । अंतःपुरवनिता घनदाट । गवाक्षीं स्पष्ट विलोकिती ॥ १७ ॥

ईक्षितोऽन्तःपुरस्त्रीणां सव्रीडप्रेमवीक्षितैः । कृच्छ्राद्विसृष्टो निरगाज्जातहासो हरन्मनः ॥ १६ ॥

अंतःपुरस्त्रियांचीं ईक्षणें । तिहीं सप्रेम निरीक्षणें । सलज्ज ईक्षिला सक्लेशमनें । सुटतां तेथूनि निघाला ॥ १८ ॥ परस्परें दृष्टादृष्टी । प्रेमोत्कर्ष न सुटे पोटीं । सलज्ज हास्य ओष्ठपुटीं । कवळिती गोरटी हृद्गतीं । १९ ॥ एवं सस्निग्धहास्यवदन । करूनि अंतःपुरवधूंचें मन । स्वयें हरूनि जनार्दन । निघे तेथून चमत्कारें ॥ १२० ॥ सोळा सहस्र साष्टशतका । गृहीं सारूनियां आह्निका । सदनीं वर्ततां पृथक्पृथका । रथीं एका विलोकिती ॥ २१ ॥ दारुकें हांकितां रहंवर । रथनेमींचा केकास्वर । ज्वाळमाळाकिङ्किणीगजर । झळके खगेन्द्रध्वज गगनीं ॥२२॥ समग्र अंतःपुरगोपुरा । बाहिर येतांचि रहंवरा । यादवीं जुहारूनि श्रीधरा । होती सत्वरा अनुयायी ॥ २३ ॥ एवं वृष्णिभोजान्धगण । वेष्टित कृष्णाचा स्यंदन । पातले सुधर्मासभास्थान । तें निरूपण मुनि सांगे ॥ २४ ॥

सुधर्माख्यां सभां सर्वैर्वृष्णिभिः परिवारितः । प्राविशद्यन्निविष्टानां न सत्यंग षड्भिर्मयः ॥ १७ ॥

सभास्थानीं ठाकूनि रथ । सवेग उतरला कृष्णनाथ । सात्यकि उद्धव यादवांसहित । सभेआंत प्रवेशला ॥ २५ ॥ अंग ऐसिया संबोधनें । परीक्षितीतें शुक म्हणे । सुधर्मासभेचें वैसणें । बहुतां पुण्यें सुर लाहती ॥ २६ ॥ वृष्णिभोजान्धमाधवकुक्कुर । इत्यादि यदुकुळ सविस्तर । होऊनि कृष्णाचे सहचर । अवघे सुरवर अवतरले ॥ २७ ॥ म्हणोनि सुधर्मासभास्थानीं । त्यांसि अधिकार उपवेशनीं । येरां प्राकृतांलागूनीं । ध्यानीं नयनीं दुर्लभ जे ॥ २८ ॥ बैसतां जिये सभासदीं । षड्भिं बाधूं न शकती कधीं । शोक मोह आधि व्याधि । दुःख दुर्बुद्धि न स्पर्शे ॥ २९॥ स्थूलता कृशता न ये शरीरा । क्षुधेतृषेचा न शिवे वारा । हर्ष विषाद भय अंतरा । जिये ठायीं न झळंबे ॥१३०॥ असो ऐसे सुधर्मागुण । कथितां वाढेल व्याख्यान । तेथ उपविष्ट भगवान । झाला आपण तें ऐका ॥ ३१ ॥

तत्रोपविष्टः परमासने विभुर्बभौ स्वभासा ककुभोऽवभासयन् ।
वृतो नृसिंहैर्यदुभिर्यदूत्तमो यथोडुराजो दिवि तारकागणैः ॥ १८ ॥

आला देखूनि जनार्दन । सभासदीं अभ्युत्थान । करिते झाले प्रत्युद्गमन । आमनें सोडून झडझडा ॥ ३२ ॥ तिये सभेच्या ठायीं हरि । प्रवेशोनि यादवभारीं । आहुकनृपातें जुहारी । वृद्धां त्यावरी अभिवंदी ॥ ३३ ॥ आपुलें जें कां निजासन । परम उत्तम सुरवरमान्य । त्यावरी उपविष्ट श्रीभगवान । सहस्रनयन जेंवि सुरीं ॥ ३४ ॥ कर्कीं जैसा बृहस्पति । कीं वस्तराशिस्थ जेंवि गभस्ति । नातरी उक्षस्थ रोहिणीपति । तेंवि श्रीपति विराजला ॥ ३५ ॥ म्हणाल विभु समर्थ कैसा । सुरवर आज्ञा

वंदिती शिरसा । स्वभासें भासवी सर्वही दिशा । उज्ज्वल यशा प्रकटूनी ॥ ३६ ॥ भोवते अंगलग यादववीर । जे का मृगेंद्र नराकार । तिहीं वेष्टित श्रीयदुवीर । जैसा हिमकर भगणेंसीं ॥ ३७ ॥ कृष्ण उपविष्ट आसनीं । उग्रसेन सिंहासनीं । अपर यादव यथास्थानीं । यथाधिकारें उपविष्ट ॥ ३८ ॥ येर उभे तिष्ठती भूप । उपासिती यदुकुळदीप । केवळ भक्तकामरपादप । स्वसंकल्पपूरणार्थ ॥ ३९ ॥

तत्रोपमन्त्रिणो राजन्नानाहास्यरसैर्विभुम् । उपतस्थुर्नटाचार्या नर्तक्यस्तांडवैः पृथक् ॥ १९ ॥

तेथ उपमंत्री उपविष्ट । शृंगारहास्यरस अभीष्ट । तिहींकरूनि प्रभु वैकुंठ । यथासंतुष्ट उपासिती ॥ १४० ॥ संगीतशास्त्र सनाटक । तदुपदेष्टे जे दैशिक । गायक नर्तकी नर्तक । ताण्डवें पृथक दर्शविती ॥ ४१ ॥

मृदंगवीणामुरजवेणुतालदरस्वनैः । ननृतुर्जगुस्तुष्टुवुश्च सूतमागधवंदिनः ॥ २० ॥

एक मृदंग वीणा वेणु । कंबु ताल मुरजवादन । सप्तस्वरीं यशोगायन । करिती स्तवन स्तवपाठी ॥ ४२ ॥ सूत पुराणेतिहासवक्ते । मागध वंशावळि शंसिते । बंदी प्रस्तावप्रसंगज्ञाते । भाट बिरुदें पठताती ॥ ४३ ॥

तत्राहुर्ब्राह्मणाः केचिदासीना ब्रह्मवादिनः । पूर्वेषां पुण्ययशसां राज्ञां चाकथयन्कथाः ॥ २१ ॥

तिये सुधर्मासभेआंत । वेदवेदांगपारंगत । तपस्वी श्रौतस्मार्तनिरत । आनंदभरित बैसले ॥४४॥ नहुष ययाति पुरूरवा । खट्वांग मान्धाता अज राघवा । दुष्यंत भरत मधुयादवां । सहित पूर्वी पुण्य नृपां ॥ ४५ ॥ मुचुकुन्द रुक्मांगद अंबरीष । शिवि शर्याति महाभिष । इत्यादि पूर्वनृपांचें पुण्य यश । शंसिती अशेष द्विज कोण्ही ॥ ४६ ॥ पूर्वापर जे पुण्यश्लोक । त्रिजगीं ज्यांचा कीर्तिघोष । त्यांच्या पुण्यकथा अशेष । वदती निर्दोष ब्रह्मविद्या ॥ ४७ ॥ ऐसिये सुधर्मासभास्थानीं । उपविष्ट यदुचक्रचूडामणि । सादर गुणकीर्तिसत्कथाश्रवणीं । तंव पुरुष कोण्ही तेथ आला ॥ ४८ ॥

तत्रैकः पुरुषो राजन्नागतोऽपूर्वदर्शनः । विज्ञापितो भगवते प्रतीहारैः प्रवेशितः ॥ २२ ॥

पूर्वीं देखिला नाहीं कोण्हीं । यालागीं तो अपूर्वदर्शनी । पुरद्वारींच्या द्वारस्थां श्रवणीं । वृत्तान्त कथूनि ठाकला ॥ ४९ ॥ द्वारस्थीं घेऊनि प्रभूची आज्ञा । पुरीं प्रवेशविला तो जाणा । सभाद्वारींच्या द्वारस्थीं पुन्हा । प्रभूते सूचना जाणविली ॥ १५० ॥ प्रभुसंकेतें त्या प्रतिहारीं । प्रवेशविला सभागारीं । ससभ्य नृपा तो जुहारी । जोडिल्या करीं नम्रशिरें ॥ ५१ ॥

स नमस्कृत्य कृष्णाय परेशाय कृतांजलिः । राज्ञामावेदयद्दुःखं जरासंधनिरोधजम् ॥ २३ ॥

जो कां परेश परात्पर । त्या कृष्णाकारणें नमस्कार । करूनि ठाकला समोर । बद्धाञ्जलि पद-लक्ष्यें ॥ ५२ ॥ राजयांचें परम दुःख । मागधकृतनिरोधात्मक । स्वमुखें निवेदी तें सम्यक । सखेद-मुख होत्साता ॥ ५३ ॥ कोण राजे कैसें दुःख । ऐसा पुससी जरी विवेक । तरी तूं कुरुवर्या आइक । म्हणे श्रीशुक तें ऐका ॥ ५४ ॥

ये च दिग्विजये तस्य सनति न ययुर्नृपाः । प्रसह्य रुद्धास्तेनासन्नयुते द्वे गिरिव्रजे ॥ २४ ॥

मागधें करितां दिग्विजयातें । तयास नम्र जे झाले नव्हते । क्षात्रधर्में समरंगातें । दळें बळेंसीं प्रवर्तले ॥ ५५ ॥ ऐसे राजे अयुतें दोनी । बळात्कारें समरांगणीं । मागधें निरोधिले जिंकूनी । नेले बांधोनि निजनगरा ॥ ५६ ॥ गिरिव्रजनामें मागधदुर्ग । त्यामाजि जिंकूनि भूभुजवर्ग । वीस सहस्र राजे सुभग । ओपोनि अभाग्य निग्रहिले ॥५७॥ तिहीं पाठविलों मी दूत । सेवेसि निरूपिला वृत्तान्त । तो परिसावा इत्थंभूत । कथितों नृपोक्त जगदीशा ॥ ५८ ॥

कृष्ण कृष्णाप्रमेयात्मन्प्रपन्नभयभंजन । वयं त्वां शरणं यामो भवभीताः पृथग्धियः ॥ २५ ॥

कृष्ण कृष्ण आम्रेडितीं । दूतें संबोधिला श्रीपति । परि ते म्हणावी दूतोक्ति । नृपांची विज्ञप्ति जाणावी ॥ ५९ ॥ आणिक संबोधनें दोनी । तींही परिसावीं व्याख्यानीं । प्रपन्नभयभंजन म्हणोनी । अप्रमेयात्मन् हें दुसरें ॥ १६० ॥ कृष हा भूवाचक शब्द । णकार केवळ जो आनंद । एवं श्रीकृष्ण सच्चिद्बोध । तो तूं विषद परमात्मा ॥ ६१ ॥ द्वितीय कृष्णसंबोधन । युगपरत्वें पृथक वर्ण । क्रमें कळिकाळीं तूं कृष्ण । भूभारहरण अवतार ॥ ६२ ॥ पूर्वी दैत्य मर्दिले बळी । ते अवतरले भूमंडळीं । विविध राजयांच्या कुळीं । प्रतापशाळी धर्मघ्न ॥ ६३ ॥ ते हे आदिपर्वीं असुरसुर । कथिले भूभार नृपवर । त्यांमाजि विप्रचित्ति असुर । तो मागधवीर जरासंध ॥ ६४ ॥ हिरण्यकशिपु तो शिशुपाळ । सह्लादनामा बोलिजे शल्य । अनुह्लाद धृष्टकेतु प्रबळ । शिबि विशाळदुमरावो ॥ ६५ ॥ अश्वशिरादि दैत्यपंचक । ते कैकेयवंशीचे नृपनायक । केतुमान्नामा दैत्यमुख्य । तो हा नरेन्द्र अमितौजा ॥ ६६ ॥ वृषपर्व्याचा कनिष्ठ बंधु । तो हा शाल्व प्रतापसिन्धु । वृषपर्वा जो महादुर्मदु । दीर्घप्रख्य नृप जाणा ॥६७॥ दिर्घाजिह्वा दैत्यपति । तो हा काशिराजनृपति । राहोदैत्य जो दुर्मति । तो क्रथनामा भूपाळ ॥ ६८ ॥ दैत्यकुळीं बोलिजे वृत्र । मणिमान्नामा तो नरेंद्र । क्रोधवर्धन महासुर । तो दंडधर भूपाळ ॥ ६९ ॥ कालेयनामा दैत्यश्रेष्ठ । तयाचे प्रतापी पुत्र अष्ट । खळदुरात्मे महादुष्ट । जन्मले स्पष्ट भूलोकीं ॥१७०॥ जयत्सेन राजा पाहीं । जन्मला मगध देशाच्याठायीं । अपराजित या नामें महीं । मनुष्यदेही नृप झाला ॥ ७१ ॥ त्रितीय झाला निषादपति । चौथा श्रेणिमान् राजा क्षिती । पांचवा महौजा भूपती । षष्ठ नरपति अभित जो ॥ ७२ ॥ सातवा राजा समुद्रसेन । आठवा बृहद्भुपाळ जाण । आठही कालेयदैत्यनंदन । भूमंडळीं अवतरले ॥ ७३ ॥ कुक्षिनामा जो दानव । तो हा पार्वतीयनामक राव ।

क्रथनदैत्याचा आविर्भव । सूर्याक्ष राव भूलोकीं ॥ ७४ ॥ सूर्यनामा असुरश्रेष्ठ । तो हा वाल्हिकनामा वरिष्ठ । वाल्हिकांमाजि अपर कनिष्ठ । ते अवशिष्ट अवधारा ॥ ७५ ॥ गण क्रोधवश आणि वस्त । मद्रकर्णवेष्ट सिद्धार्थ । कीटक सुवीर सुबाहु सुरथ । वाल्हिकदेशीं नृप झाले ॥ ७६ ॥ क्रथ विचित्र श्रीमान्नीळ । चिरवासा भूमिपाळ । वक्रदंत महाखळ । दुर्जयनामा भूपति ॥ ७७ ॥ रुक्मी नृपांमाजि मृगेंद्र । तैसाचि जनमेजय नरेन्द्र । वायुवेग आपाढ क्रूर । भूरितेजा तैसाचि ॥ ७८ ॥ सुमित्र आणि एकलव्य । वाटधान गोमुखराय । काम्बोजदेशीं नरवर सर्व । झाले दानव भूलोकीं ॥ ७९ ॥ क्षेमधूर्ती आणि श्रुतायु । उद्वह बृहत्क्षेम शतायु । क्षेमक उग्रतीर्थ कुहरबाहु । कलिंगदेशीं नृप झाले ॥ १८० ॥ एवं अवघे हे दानव । भूमंडळीं झाले राव । परंतु दैत्याचा स्वभाव । भंगिती गौरव धर्माचें ॥ ८१ ॥ गंधर्वराव तो देवक । सुराचार्य द्रोण मुख्य । प्रकट भारद्वाजनामक । अतिसुटंक धनुर्धारी ॥ ८२ ॥ महादेव आणि अंतक । कामक्रोध चाऱ्ही एक । या चहूंचा अवतार मुख्य । अश्वत्थामा जाणावा ॥ ८३ ॥ अष्ट वसु शंतनुजठरीं । जन्मले त्यामाजि क्षितीवरी । कनिष्ठ राहिला महाक्षत्री । भीष्मनामक कुरुवंशीं ॥ ८४ ॥ भार्गवरामाचा जो शिष्य । धनुर्विद्येचा महेश । जेणें उद्धरिला कुरुवंश अपर दिनेश नृपवर्गी ॥ ८५ ॥ अकरा रुद्रांचा जो गण । त्यांचें तेज एकवटून । कृपाचार्यनामा ब्राह्मण । अस्त्रप्रवीण अवतरला ॥ ८६ ॥ द्वापरयुगाचा अवतार । तो हा शकुनि सौबळवीर । मरुद्गणांमाजि क्रूर । तो सात्यकि शूर वृष्णिकुळीं ॥ ८७ ॥ द्रुपद कृतवर्मा विराट । इत्यादि मरुद्गणांश स्पष्ट । हंसनामा गंधर्वश्रेष्ठ । धृतराष्ट्रनामा कुरुवंशीं ॥ ८८ ॥ कृष्णद्वैपायनात्मज । दीर्घबाहु तेजःपुंज । प्रज्ञाचक्षु कौरवराज । जो जात्यंध कुरुवर्य ॥ ८९ ॥ त्याचा कनिष्ठ बंधु पाण्डु । यमांश विदुर ज्ञाता प्रचंड । कळीचा अंश जो प्रचंड । तो दुर्योधन दुष्टात्मा ॥ १९० ॥ जे कां पौलस्त्य राक्षस । दुर्योधनावरज अशेष । शतावधि पापपुरुष । दुःशासनप्रमुख जे ॥ ९१ ॥ एवं भूभार सर्व राजे । सुरासुरावतार सहजें । तन्निर्दलना गरुडध्वजें । केला अवतार कळिवर्णें ॥ ९२ ॥ कृष्ण कृष्ण संबोधनें । द्विधा वाखाणिलीं भिन्नें । अग्राह्या तूं करणज्ञानें । अप्रमेयात्मन् अगोचर ॥ ९३ ॥ प्रमाता प्रमाण प्रमेय । तो हा भवभ्रम त्रिपुटीमय । तूं परमात्मा अप्रमेय । अज अव्यय अविनाश ॥ ९४ ॥ उतरावया धराभार । स्वधर्माचा जीर्णोद्धार । रक्षावया मुनि निर्जर । तव अवतार नरलोकीं ॥ ९५ ॥ अप्रमेयात्मा सर्वगत । तरी कां मजला त्रिविध कृत्य । प्रपन्नभवभंजनें हें सत्य । विरुदाकारणें युगीं युगीं ॥ ९६ ॥ देहाभिमानी पृथक बुद्धि । मागधें निग्रहिलों धरूनि युद्धीं । शरण आलों कृपानिधि । रक्षीं त्रिशुद्धी निजदासां ॥ ९७ ॥ आपुले विरुदरक्षणासाठीं । अभयपाणि आमुचे मुकुटीं । ठेवूनि रक्षावें जगजेठीं । ऐसें वाक्पुटीं नृप वदले ॥ ९८ ॥ षट्श्लोकात्मक नृपांची विनति । त्यामाजि प्रथम हे विज्ञप्ति । हरिचरणाश्रय शरणागतीं । विनीतभक्तीं आश्रयिला ॥ ९९ ॥ श्लोकत्रयें भयाचें कथन ।

पुढें दोश्लोकीं प्रार्थन । षट्श्लोकात्मक विज्ञापन । ऐक व्याख्यान तयाचें ॥ २०० ॥ वाखाणिला प्रथम श्लोक । यावरी भयाचा विवेक । मत्स्यजामाता वदला शुक । तोही सम्यक अवधारा ॥ १ ॥

लोको विकर्मनिरतः कुशले प्रमत्तः कर्मण्ययं त्वदुदिते भवदर्चने स्वे ॥
यस्तावदस्य बलवानिह जीविताशां सद्यश्छिनत्त्यनिमिषाय नमोऽस्तु तस्मै ॥ २६ ॥

देहबुद्धि पृथग्द्रष्टे । कर्में करूनियां अभीष्टें । फळें पावती अनिष्टें । दुखें कनिष्ठें भोगिती ॥ २ ॥ ऐसे प्राणी जिये ठायीं । तो हा मर्त्यलोक भवभयीं । बुडाला दुःखाच्या प्रवाहीं । तेचि नवायी निवेदिती ॥ ३ ॥ मृत्युलोकींची हे प्रवृत्ति । अनिष्ट इष्टत्वें आचरती । जेव्हां होय फळवाप्ति । तेव्हां रडती दुःखभयें ॥ ४ ॥ विवरीत होत्साते भवभय । नमस्कारिती रुक्मिणीप्रिय । तो हा श्लोकींचा अन्वय । पूर्वपीठिके संग्रहिला ॥ ५ ॥ आतां ऐका पदव्याख्यान । राजे भवभया वाखाणून । नमिती काळात्मा भगवान । विपरीत वयुन विशदर्थें ॥ ६ ॥ देहात्ममानी जेथिंचे जन । तो हा मृत्युलोक संपूर्ण । येर्थांचें विपरीत कर्माचरण । कथिती नृपगण जगदीशा ॥ ७ ॥ विकर्म म्हणिजे विरुद्ध कर्म । जें कां केवळ निषिद्ध काम । तयाच्या ठायीं धरिती प्रेम । निरतप्रेम होत्साते ॥ ८ ॥ आपणा मानूनि देहमात्र । विषयप्राप्तिसुख स्वतंत्र । ऐसें जाणोनि यत्नपर । होती तन्मात्र प्रलोभें ॥ ९ ॥ दृष्टादृष्ट जें कां कर्म । ज्यातें म्हणती निषिद्ध काम्य । तेथ होऊनियां सकाम । धरिती प्रेम सुख-भोगीं ॥ २१० ॥ त्यांमाजि प्रथम कर्म दृष्ट । ज्याचें नाम निषिद्ध स्पष्ट । विषयभोगार्थ तें यथेष्ट । वृथापुष्ट आचरती ॥ ११ ॥ म्हणाल निषिद्ध कोण तें कैसें । ब्रह्महत्यादि हिंसादोषें । धन जोडी विषयमोसें । अन्याय मानसें न म्हणूनी ॥ १२ ॥ जो स्वभावें आपणा निन्दी । त्यातें वधिती मानूनि दन्दी । स्तवन करिती होऊनि बंदी । त्यांतें वंदी आप्तत्वें ॥ १३ ॥ बळात्कारें परस्त्रीगमन । अथवा कौटिल्यें प्रलोभून । प्रत्यक्षचि रतिसेवन । मातृगमन न विचारी ॥ १४ ॥ सुवर्ण चोरी धूर्तपणें । विश्वासघातें व्यवहार करणें । आनंद मानी मद्यपानें । अगम्यमैथुनें सर्वत्र ॥ १५ ॥ कामी वामी उपासना । काली यक्षिणी स्वर्णाकर्षणा । यजिती अर्पूनि दिव्यें नाना । पिशिता मीना मद्यें सीं ॥ १६ ॥ मुद्रा मैथुन विविधा शक्ति । प्रसंगें पंचमी आराधिती । तेथ प्रत्यक्ष फळावाप्ति । सकाम कामिती अभिचारें ॥ १७ ॥ वश होऊनि क्रोधानळा । शत्रु मानूनि धर्मशीळा । निरपराध चाळिती सळा । लाविती अनळा तत्सदना ॥ १८ ॥ विषप्रळया न शिणती । बळात्कारें सर्वस्व हरिती । घातपातीं प्रवर्तती । भेदभ्रान्ति देहलोभें ॥ १९ ॥ आपण उपकरे जो पापकर्मी । तोचि जिवलग समागमी । दृष्टफळभोगाचे कामीं । निषिद्ध अधमी आचरती ॥ २२० ॥ यावरी काम्य अदृष्ट कर्म । तें जे आचरती सकाम । धरूनि फळभोगाचें प्रेम । म्हणती निगमप्रतिपाद्य ॥ २१ ॥ इहलोकींचें क्षणभंगुर । विषयसुख जें स्वप्नाकार । तें दृश्य फळ मानूनि अधर । म्हणती मधर आमुष्मिक ॥ २२ ॥ पशुबंध सोम वाजपेय । चयन पौण्ड्रक राजसूय । हयनरगोमेध अध्वरनिचय ।

ज्योतिष्टोमप्रमुख जे ॥ २३ ॥ इत्यादि यज्ञीं सुकृतावाप्ति । तेणें होय स्वर्गप्राप्ति । या निश्चयें व्यवसितमति । याज्ञिक होती सकाम ॥ २४ ॥ सौत्रामण्याचरणीं मद्य । प्राशन करिती दीक्षित मद्य । तेणें होती जगद्वंद्य । म्हणती वैध्य अनुलंघ्य ॥ २५ ॥ एवं सकाम हिंसादोष । करूनि मानिती परम तोष । स्वर्गावाप्ति होय फोस । गर्भवास न चुकती पैं ॥ २६ ॥ पुढती जनन मरण । पुढती जननीजठरीं शयन । सकाम यजमानालागून । काम्याचरणफळ ऐसें ॥ २७ ॥ इष्टापूर्त द्विविध काम्य । त्यामाजि कथिलें इष्ट कर्म । आतां आपूर्ताचें वर्म । तेंही सप्रेम अवधारा ॥ २८ ॥ वापी कूप सरें तडाग । गंगातटें सोपानमार्ग । देवायतनें शाळा अनेग । पुरें गोपुरें अग्रहारें ॥ २९ ॥ प्रासाद पवळिया दीपमाळा । प्रवाहनिरोधसंग्रह जळा । वनें वाटिका पाटस्थळा । सर्वकाळ जळऋद्धि ॥ २३० ॥ वाटिका उपवनें आराम । चूताश्वत्थादि अनेक द्रुम । पल्लिका खेट खर्वट ग्राम । आपूर्तनाम पैं यांचें ॥ ३१ ॥ एवं काम्य इष्टापूर्त । निषिद्ध म्हणिजे घातपात । विकर्मशब्दें हें विख्यात । लोक हा निरत ये विपर्यां ॥ ३२ ॥ नितराम म्हणिजे अतिशयेंसीं । मृत्युलोक या विकर्मांविषीं । आसक्त होत्साता भवपाशीं । निज कुशलासी भांसळला ॥ ३३ ॥ स्वकीय कुशलधर्म तो कोण । तरी जें तुझें पादार्चन । पाञ्चरात्रादि विधिविधान । मिश्रपूजन त्वदुदित जें ॥ ३४ ॥ उपासनाकाण्ड वेदप्रणीत । तेंचि केवळ तव मुखोदित । अथवा सामान्य सर्वगत । स्मृतिसंमत तव भजन ॥ ३५ ॥ जें जें निपजे कर्म सहज । तेथ या लोकांस अनुमज । विषयसेवनभ्रमाचा माज । त्वदर्पणबोज विसरले ॥ ३६ ॥ शुक म्हणे गा परीक्षिति । गीतेमाजि अर्जुनाप्रति । अहिंसाभजन सहजस्थिति । स्वमुखें श्रीपति जें वदला ॥३७॥ अर्जुना सहज जें जें करिसी । जें होमिसी जें भक्षिसी । जें जें देसी अनुष्ठिसी । हृदयस्थासि तें अर्पीं ॥ ३८ ॥ मी जो सहज सर्वगत । हें यथार्थ श्रुतिसंमत । तरी स्वतःसिद्ध हृदयस्थ । अर्पीं समस्त त्या मज तूं ॥ ३९ ॥ ऐसिये त्वदुदित तुझिये भजनीं । लोक हा प्रमत्त भवभ्रमेंकरूनी । देहलोभें विषयाचरणीं । निरत होऊनि विकर्मा ॥ २४० ॥ कुशलकर्मीं अनवधान । विरुद्धाचरणीं परम प्रवीण । फुकट सांडूनि सुधापान । मोल वेंचूनि विष घेती ॥ ४१ ॥ कोटि ब्रह्महत्या निरसती । तें हरिनीराजन न पाहती । श्वानमैथुनें कां चोरा वधिती । श्रमोनि धांवती तें पाहों ॥ ४२ ॥ नित्य प्रकटती शशिभास्कर । त्यांतें न करिती नमस्कार । ग्रहणीं विलोकिती सादर । अभिचारमंत्रजपनिष्ठा ॥ ४३ ॥ वृद्ध हेळूनि माता पिता । आप्त मानिती वनिताभ्राता । आदर करिती निज जामाता । जो कुटिळता व्यंग वदे ॥ ४४ ॥ नित्यनैमित्तिक नावडे । परंतु गळां घाली कवडे । यात्रोद्देशें वावडे । चार वेडे अवलंबी ॥ ४५ ॥ दूर देशीं कुळस्वामिनी । मुख्य देवता मायराणी । रांड बोडकी सुवासिनी । पूजी आणूनि कुळधर्मी ॥ ४६ ॥ हळदी वदना कज्जल डोळां । भांगीं शेंदुर कुंकुम भाळां । मस्तकीं कंठीं सुमनमाळा । परिमळउधळा वरी करिती ॥ ४७ ॥ पंचमहायज्ञलोप । बोडकी पूजूनि अतिसाक्षेप ।

मायराणीस येईल कोप । तरी कुळदीप केंवि राहे ॥ ४८ ॥ न यजी दर्श पौर्णमासी । निंब नेसे साक्षेपेंसीं । जाऊनि कुळस्वामिनीपासी । दंपती शप्पांसि दाखविती ॥ ४९ ॥ वेदमाता जे गायत्री । अनुष्ठिली वशिष्ठविश्वामित्रीं । तिये सांडूनि सावरमंत्रीं । पंचाक्षरी द्विज होती ॥२५०॥ कोटि गोदानें सत्क्षेत्रीं । ग्रहणीं केलीं यथोक्त पात्रीं । कीं ब्रह्मप्रयागीं आकल्पवरी । सदाचारी वसिन्नलिया ॥ ५१ ॥ किंवा साङ्ग अयुत यज्ञ । कीं मेरूइतुकें सुवर्णदान । एवमादि समस्त पुण्य । गोविंदस्मरणीं न तुळे पैं ॥ ५२ ॥ इत्यादि अनंत हरीच्या नामा । अमोघ अक्षय अगाध महिमा । तेथ नुपजे अधमा प्रेमा । रुचती वामास्तवनिंदा ॥ ५३ ॥ अपान हागवणें पिटिपिटी । तैसा वैसूनि हाटवटीं । सांगे फुकटा निष्फळ गोठी । वृथा वटवटी तोंडबळें ॥ ५४ ॥ एका स्तवनें गगना चढवी । एका निंदूनि लघुत्व लावी । ऐसी वृथाच वाणी शिणवी । परि न शिणे जीवीं वयवेंचें ॥ ५५ ॥ पूज्य ब्राह्मणा न लवे कधीं । पोटासाठीं नीचा वंदी । सज्जनाचा होय दंदी । दुष्टा आगधी इष्टत्वें ॥ ५६ ॥ ऐसा हा लोक समस्त । स्वकीयकुशली प्रकर्षे मत्त । विरुद्धकर्माचरणीं निरत । त्यजूनि अमृत विष प्राशी ॥ ५७ ॥ देहबुद्धीचा अहंकारी । स्वकीय कुशलीं उमज न धरी । विषयलोभें हांव धरी । उन्मत्त जोंवरी भ्रमग्रस्त ॥ ५८ ॥ आपणा मानूनि अजरामर । करी विरुद्ध कर्माचार । तंव तूं काळात्मा ईश्वर । छेदिसी सत्वर जीविताशा ॥ ५९ ॥ कामप्रलोभें लोक हा हांवे । भरूनि विषयीं घेतां धांवे । प्रमादें वास्तव नाहींच ठावें । तंव जो स्वभावें निवटी या ॥ २६० ॥ निमेषामूनि ब्रह्मायुवरी । येवढी ज्याची परिणाहथोरी । तो काळात्मा तूं श्रीहरि । बळात्कारें संहरिसी ॥ ६१ ॥ मानूनि अजरामर शरीर । विषयार्थ जीविताशा फार । ते तत्काळ बळात्कार । करूनि सत्वर छेदी जो ॥ ६२ ॥ तया काळात्मका तुजकारणें । आम्ही नमितों दासपणें । जिये लोकीं आमुचें जिणें । तेथिंची जाणणें गति ऐसी ॥ ६३ ॥ असो प्रमादी लोक ऐसा । आम्हां केवळ तुझिया दासां । कायानिमित्त दुःखबळसा । विस्मय परेशा हा वाट ॥ ६४ ॥

लोके भवाञ्जगदिनः कलयाऽवतीर्णः सद्रक्षणाय खलनिग्रहणाय चान्यः ।
कश्चित्त्वदीयमतियाति निदेशमीश किंवा जनः स्वकृतमृच्छति तन्न विद्मः ॥ २७ ॥

अगा ईशा जगदात्मया । जगदीश्वर तूं अवतरलिया । साधु सज्जन रक्षावया । खळ दंडाया ये लोकीं ॥ ६५ ॥ तुजसारिखा रक्षक असतां । आम्हां दासां दुःखव्यथा । कीं आणिक कोण्ही तुजहूनि परता । समर्थ तव आज्ञालंघना ॥ ६६ ॥ आम्हां दासां दुःखावर्त । मागधादिकां विजय ऊर्जित । कीं अन्य कोणा हें सामर्थ्य । तव निदेश लंघावया ॥ ६७ ॥ जरासंधादिक तव द्वेष्टे । सुखें भोगिती विजयाभीष्टें । आम्ही प्रपन्न पीडतों कष्टें । कोंवि उफराटें हें स्वामी ॥ ६८ ॥ तूं तव प्रपन्नार्तिहरणा । अवतरलासि भो जनार्दना । निग्रहावया खळ दुर्ज्जना । कीं विपरीत कोणा करवतसे ॥ ६९ ॥ किंवा तुवा रक्षिला स्वजन । तथापि जैसें पूर्वाचरण । तैसें सुखदुःख त्यालागून ।

न सुटे गहन हें न कळे ॥ ७० ॥ तन्हीही दोन्ही न होती युक्त । जे दुःख भोगिती तुझे भक्त । निदेश लंघिती ते समर्थ । विजयवंत सुखभोक्ते ॥ ७१ ॥ आणि तुवां रक्षिला असतां जन । कर्मदुःख पावेचि पूर्ण । द्विविध शंका न कळे म्हणून । आम्ही अनभिज्ञ विचंबतसों ॥ ७२ ॥ दुःख म्हणसी कोणतें तुम्हा । तरी ऐकावें पुरुषोत्तमा । तुझिया शरणागतां आम्हां । या भवभ्रमा वरपडणें ॥ ७३ ॥

स्वप्नायितं नृपसुखं परतंत्रमीश शश्वद्भयेन मृतकेन धुरं वहामः ॥
हित्वा तदात्मनि सुखं त्वदनीहलभ्यं क्लिश्यामहेऽतिकृपणास्तव माययेह ॥ २८ ॥

इहलोकींचें नृपासन । क्षणिक सुख जैसें स्वप्न । तामिस्रातमीं विद्युत्स्फुरण । जे लखलखोन हारपे ॥ ७४ ॥ मनुष्यलोकीं सुखाची गरिमा । नृपैश्वर्यपर्यंत सीमा । ते उपभोग करणग्रामा । आत्मारामा क्लेशरूप ॥ ७५ ॥ इन्द्रियग्रामाधीन सुख । तस्मात परतंत्र निष्टंक । जें कां केवळ विषयात्मक । क्लेशजनक क्लेशमय ॥ ७६ ॥ शब्दावांचूनि श्रवणाप्रति । नाहीं सुखाची विश्रांति । शब्द प्रकटी अपकीर्ति कीर्ति । निंदा स्तुति द्विविध पैं ॥ ७७ ॥ स्पर्शविषयें त्वचेसि सुख । तो स्पर्शही द्विविध देख । मृदु आणि कठिनात्मक । दुःख हरिख प्रकाशी ॥ ७८ ॥ रूपविषय नेत्राप्रति । सुंदर भयंकर उभय प्रतीति । करी सुखदुःखांची प्राप्ति । सर्व जाणती अनुभव हा ॥ ७९ ॥ जिह्वा जाणे कडू गोड । रसविषय तो द्विविध रूढ । घ्राण गंधाची धरी चाड । सुगंध दुर्गंध द्विविध पैं ॥ २८० ॥ एवं सुख हें विषयात्मक । प्राणिमात्र जाणती देख । नृपैश्वर्य तें विशेष । दोषजनक दुःखमय ॥८१॥ विषयसुख हें सर्वां कळे । परि दुःखही त्यामाजि मिळे । नृपा सुखाचे सोहळे । जनाचे डोळे भाविती ॥ ८२ ॥ सर्वां आवडे आपुली स्तुति । आणि लोकीं प्रख्यात कीर्ति । परंतु नाहीं तैसी स्थिति । निंदा अपकीर्ति होय तेणें ॥ ८३ ॥ नृपासमोर न करिती निन्दा । आत्मस्तुति ऐके सदा । तेणें भोगी श्रवणानंदा । दुःखशब्दा नायकतां ॥ ८४ ॥ जे जे स्तविती होऊनि विनीत । त्यांचे पुरवी मनोरथ । निंदकाचा करी घात यालागिं संतत सुखश्रवणें ॥ ८५ ॥ त्वचेसि मृदु स्पर्श जे रुचती । ते संपादी ऐश्वर्यशक्ती । वनिताालिंगनीं धरी प्रीती । तैशा मिळती रतिरसिका ॥ ८६ ॥ रूपविषय आवडे नयनां । त्या त्या भूषी रत्नाभरणा । दिव्य वसना याना भुवना । निर्मी आसना दक्सुखदा ॥ ८७ ॥ जिह्वे आवडती नाना रस । मेळविती करूनि बहु सायास । पुरविती नृपाचे आवडीस । प्रजा विशेषयत्नपरा ॥ ८८ ॥ सुगंध आवडे नासिका । तदर्थ वेंचूनि रत्ना कनका । मोलागळीं द्रव्यें देखा । आणूनि तोषा पाववितीं ॥ ८९ ॥ मृगनाभिकस्तूरी दिव्य सुगंधी । विडाळवृपणोद्भव जवादी । चंद्रकाश्मीर मलयजगंधी । द्रव्यीं विविधीं सुख भोगी ॥ ९० ॥ शरीरनिष्ठ इंद्रियद्वारा । विषयसुखाचा हा उभारा । नृपैश्वर्यें भोगी धरा । मानूनि खरा इहलोक ॥ ९१ ॥ परंतु नेणे हें परतंत्र । स्वप्नासारिखें क्षणभंगुर । विषान्न जिह्वेपासीं मधुर । कीं संवचोरवसतींत ॥ ९२ ॥ उर्वशीसमान लावण्यखाणी । वनितारूप नटे यक्षिणी । भुलोनि रमतां आनंद मानी । परि प्राणहानि उमजेना ॥ ९३ ॥ एवं

नलिनीदलगतजळ । तेंवि विषयसुख बहळ । क्षणदासुप्तासि अळुमाळ । नृपसुख केवळ स्वप्नवत् ॥ ९४ ॥ देहाभिमानजनित नृपसुख । येऱ्हवीं केवळ साद्यंत दुःख । शरीरवंतासी हें सम्यक । विदित नावेक असे कीं ॥ ९५ ॥ जन्ही नृपाचें शरीर झालें । तन्ही तें शरीरधर्माथिलें । शरीरधर्मारहित केलें । ऐश्वर्यबळें हें न घडे ॥ ९६ ॥ क्षुधा तृषा निद्रा तंद्रा । शीतोष्णादि पीडा प्रचुरा । बाल्य तारुण्य आणि जरा । शरीरमात्रा समसाम्य ॥ ९७ ॥ आधि व्याधि नाना आमय । हर्षामर्ष शोक भय । दैवोपलब्ध विकारनिचय । करी उदय देहमात्रीं ॥ ९८ ॥ वातपित्तकफादि त्रिविध । एतज्जनित व्याधि विविध । पीडितां न म्हणती बुधाबुध । दरिद्री धनद रंक नृप ॥ ९९ ॥ देवी गोंवर शरीर-मात्रा । ते काय न पीडिती नृपगात्रा । बाळग्रहादि पीडा अपरा । नृपा किंकरा समसाम्य ॥ ३०० ॥ सेवितां दिव्योत्तमाहारा । नृपाचिया अपानद्वारा । सहसा न निघे सुगंध वारा । विवेक विवरा हृदयीं हा ॥ १ ॥ सर्वेंद्रियीं याचिपरी । नृपा किंकरां सम शरीरीं । दुःखावाप्ति होय पुरी । कर्मसामग्री-अनुरूप ॥ २ ॥ एकाकी नर कर्म करी । तें शुभाशुभ त्याचेचि शिरीं । राष्ट्रकृतकर्माधिकारी । नृप निर्धारीं होतसे ॥ ३ ॥ राष्ट्रजनित जितुकें पाप । तें भोगावया समर्थ नृप । पापाचें फळ दुःख अमूप । लागे आकल्प भोगावें ॥ ४ ॥ स्वप्नप्राय नृपासन । पुढें न चुके यमशासन । गर्भवासी निर्बुजून । नवमास पचून उपजावें ॥ ५ ॥ विष्ठामूत्रीं नवमासवरी । सर्वशरीरीं मातृकोदरीं । कीं नृपशरीरालागिं कस्तूरी । माता जठरीं भरिजेतसे ॥ ६ ॥ अमूल्य सौरभ्य भोग वरिवरी । विष्ठामूत्र नृपादि जठरीं । कीं जरा जर्जर जनातें करी । नृपा न करी हें विवरा ॥ ७ ॥ जितुका भोग तितुका रोग । सुखदुःखाचा समान योग । काळ मृत्यु भयप्रसंग । न सोडी संग निरंतर ॥ ८ ॥ जितुकें वाढे तितुकें मोडे । उडे तें तें पुढें पडे । घडे तें तें काळें विघडे । नृप सुखाडे कोण सुखें ॥ ९ ॥ संचिलें त्याचा होय व्यय । जन्मलें तें मरोन जाय । नृपशरीरीं विशेष काय । हें विवरूनि पाहे तो धन्य ॥ ३१० ॥ ऐसें काळभय निरंतर । ज्यामाजि वसे तें हें शरीर । जीतचि असतां प्रेत साचार । तेणें धुरंधर आम्ही झालों ॥ ११ ॥ अहो ऐसे महत्कष्ट । आम्ही भोगूं जे पापिष्ठ । तव पदभजन परम इष्ट । सांडूनि अनिष्ट कां भजलों ॥ १२ ॥ महत्कष्टभोगाचे पूर्वीं । निष्काम होत्साते सर्वत्र सर्वीं । तव पदप्रणति परम उर्वी । होऊनि अगर्वी नाश्रयिली ॥ १३ ॥ स्वामी म्हणसी धूर ते कोण । तरी पुत्र दारा धन धान्य सदन । इत्यादिचिंता-विस्तीर्णगहन । वाहों अभिमान धरूनी ॥ १४ ॥ अमृत टाकूनि घेतलें विष । हा कोणातें लाविजे दोष । मायाजनितविषयाभास । देखोनि अशेष भ्रमलों पैं ॥ १५ ॥ अविद्यावेष्टित जीव आम्ही । विषयसुखाची लिप्साउर्मी । उठतां दरिद्री कृपणकामीं । भयसभ्रमीं भांसळलों ॥ १६ ॥ तुझिये मायेकरूनि येथ । दुःखीं वरपडलों अनाथ । आतां जाणूनि शरणागत । करीं सनाथ जगदीशा ॥ १७ ॥ म्हणती टांकिलें अमृत कोण । ऐकें तयाचें लक्षण । जिहीं उपासिले तुझे चरण । निष्काम भजन

करूनियां ॥ १८ ॥ तिहीं निष्काम भजनास्तव । कैवल्यसुख जें तुजपासाव । पाविजेलें सांडूनि माव । प्रपंच सर्व भवभ्रम हा ॥ १९ ॥ कर्मज्ञानचेष्टाप्रमुख । कर्तृकरणादिरहित देख । आत्मस्वरूपीं स्वतःसिद्ध सुख । अनीह उपासक जें लाहती ॥ ३२० ॥ आम्ही ऐसें परमामृत । सांडूनि झालों विषयीं रत । तव मायेनें भुलविलों येथ । क्लेश मंतत भोगीतसों ॥ २१ ॥ तव मायाकृत कर्मबंध । त्यातें छेत्ता तूं मुकुन्द । यालागिं नमितों पादारविन्द । छेदीं अगाध भवपाश ॥ २२ ॥ तव मायाकृत कर्मबंधन । त्याचा छेदक तुजवीण आन । नाहींच निश्चय हा जाणून । करिती प्रार्थन तें ऐका ॥ २३ ॥

तन्नो भवान्प्रणतशोकहरांघ्रियुग्मो बद्धान्वियुंक्ष्व मगधाह्वयकर्मपाशात् ।
यो भूभुजोऽयुतमतंगजवीर्यमेको बिभ्रद्रुरोध भवने मृगराडिवावीः ॥ २९ ॥

तस्मात ज्याचें चरणयुगळ । प्रणतशोकहर केवळ । तो तूं आम्हां प्रपन्नपाळ । सोडवीं दयाळ होत्साता ॥ २४ ॥ चरणयुगळाच्या चिन्तनें । तुटलीं बहुतांचीं बंधनें । पुढें तुटती हीं व्याख्यानें । श्रुतिपुराणें प्रशंसिती ॥ २५ ॥ तुम्हां निग्रहिलें म्हणसी कोणीं । तरी आमुच्या कर्में चक्रपाणि । जरासंधाख्य पाश होउनी । निगडबंधनीं निरोधिलों ॥ २६ ॥ कोण म्हणसी जरासंध । तरी विप्रचित्तिनामा दैत्य । तो हा भूलोकीं मागध । जन्मला प्रसिद्ध नृपवर्गीं ॥ २७ ॥ तेणें करितां दिग्विजयासी । जे जे शरण झाले त्यासी । ते ते लाविले परिचर्येसी । दास्यधर्मासि नियोजुनि ॥२८॥ आम्ही क्षात्रधर्मसमरीं । भिडतां जिंकूनि बळात्कारीं । धरूनि निग्रहिलों श्रीहरि । गिरिव्रजपुरीं निजदुर्गीं ॥ २९ ॥ जरी तूं म्हणसी निजप्रतापें । क्षात्रवृत्तीच्या क्रूर कोपें । मागधा जिंकूनि शौर्यरूपें । विक्रमा आटोपें प्रकट करा ॥ ३३० ॥ यदर्थीं ऐकें भो यदुवर्या । मागध अमाम्य इतरां रायां ॥ तयासि समरीं जिणावया । नर शूर शौर्या नागविती ॥ ३१ ॥ अयुत मत्त गजांचें बळ । तदुपरि शस्त्रास्त्रविद्याकुशळ । सेनासमुद्र महा प्रबळ । कोणपां भूपाळ त्या दमिता ॥ ३२ ॥ दहा सहस्र कुंजर मत्त । तितुकें बळ जो एकीभूत । आंगीं बाहे प्रतापवंत । मागधनाथ पटु ऐसा ॥ ३३ ॥ तेणें समरीं वीस सहस्र । राजे जिंकूनि प्रतापी शूर । रोधिलों जैसा कां मृगेन्द्र । मेंढरा कोंडी स्वदर्पें ॥ ३४ ॥ गिरीव्रजनामें आपुले भवनीं । कर्मपाशयमलोहदामनीं । बांधिल्या नृपाचिया श्रेणी । हें श्रीचरणीं निवेदिलें ॥ ३५ ॥ आमुची तुझिये चरणीं रति । तूं आमुचा पक्षपाती । यालागीं तो आम्हांप्रति । दिवसराती बहु जाची ॥ ३६ ॥ त्याचा प्रताप सर्वां विदित । सर्वज्ञ जाणसी तूं भगवंत । तुजसीं तेणें संग्राम बहुत । केले वृत्तान्त तो ऐक ॥ ३७ ॥

यो वै त्वया द्विनवकृत्व उदात्तचक्र भग्नो मृधे खलु भवंतमनंतवीर्यम् ।
जित्वा नृलोकनिरतं सकृदूढदर्पो युष्मत्प्रजा रुजति नोऽजित तद्विधेहि ॥ ३० ॥

अगा ये उदात्तचक्रा हरि । जो निश्चयें तुजसी समरीं । अठरा वेळा बळात्कारीं । धरूनि वीरश्री

संघटला ॥ ३८ ॥ दोनी नवकें म्हणिजे अठरा । तुजसीं भिडतां येऊनि निकरा । तुवां भंगिला वेळां सतरा । सेनापरिवारा लुटूनियां ॥ ३९ ॥ परंतु आवेश न संडी कोपी । क्षोभें खवळे महाप्रतापी । सेनावीरश्रीसाटोपीं । संग्रामकल्पीं प्रवर्तेतां ॥ ३४० ॥ तुझा प्रताप अपरिमित । वर्णितां विधि हर न पवती अंत । यालागिं नामें तूं अनंत । अनंतवीर्य अगाध तूं ॥ ४१ ॥ परंतु नृलोकींची अवगणी । धरिली येथ भूभारहरणीं । तैसीच केली संपादणी । समरांगणीं मागधाच्या ॥ ४२ ॥ सतरा वेळ भंगिलें मागधा । अठराविये वेळे युद्धा । येतां देखोनि जरासंधा । पुरी गोविन्दा पळविली त्वां ॥४३॥ अनंतवीर्या तूतें समरीं । जिंकिलें ऐसी मिरवी थोरी । परम गर्व हा मागधा शरीरीं । अतुलवीरश्रीमय झाला ॥४४॥ तेणें गर्वें तो दुर्मति । आम्हां तुझिया लेंकुरांप्रति । बळात्कारें दिवसराती । करी विपत्ति बहुसाळ ॥४५॥ आमुचा नाथ तूं गरुडध्वजा । आम्ही भूभुज तुझिया प्रजा । तुजपुढें आम्हां जाचितां लज्जा । अवघी तुजला जगदीशा ॥ ४६ ॥ त्रिजगज्जिता भो भो अजिता । आम्हां तवपदशरणागतां । मागध जाची या अनुचिता । उचित काय तें विवरीं पां ॥४७॥ शरणागतां वज्रपंजर । हा तव विरुदाचा बडिवार । आम्ही शरणागत किंकर । जाची क्रूर तुज असतां ॥ ४८ ॥ आम्हां उपेक्षूनि क्षमा करणें । किंवा बिरुदातें रक्षिणें । दोहींमाजि युक्तपणें । तें आचरणें जें उचित ॥४९॥ मागधबद्धनृपांची विनति । बद्धांजलि नम्रवृत्ति । इतुकी कथूनियां श्रीपति । दूत प्रार्थी तें ऐका ॥ ३५० ॥

॥ दूत उवाच ॥ इति मागधसंरुद्धा भवद्दर्शनकांक्षिणः । प्रपन्नाः पादमूलं ते दीनानां शं विधीयताम् ॥ ३१ ॥

दूत म्हणे भो जगदीशा । कथिलें नृपाचिया संदेशा । विवरूनि कार्यार्था अशेषा । नृपाची आशा पुरवावी ॥ ५१ ॥ मागधें रोधिलें प्रतापशक्ती । ते तव दर्शना अपेक्षिती । शरण तुझिया चरणांप्रति । अनन्यभक्ति अंकित जे ॥ ५२ ॥ तया दीना भूपाळगणा । सुखी करावें जगज्जीवना । सर्व विदित तुज सर्वज्ञा । निमित्त प्रार्थना दूताची ॥ ५३ ॥ इतुकें दूत वदों सरला । तंव प्रसंग अपूर्व झाला । तोही कथिजेत असें तुजला । कौरवपाळा अवधारीं ॥ ५५ ॥

श्रीशुक उवाच ॥ राजदूते ब्रुवत्येवं देवर्षिः परमद्युतिः । बिभ्रत्पिंगजटाभारं प्रादुरासीद्यथा रविः ॥ ३२ ॥

ऐसें दूताचें बोलणें । कृष्णेंसहित मंत्रिगणें । अवधारिलें तों देखती नयनें । गगनौनि येणें मुनीचें ॥ ५६ ॥ लोकां मान्य हरिहरांसि । ज्ञानवैराग्यतपोराशि । मौळें वंदिती ज्या महर्षि । तो देवर्षि नारद ॥ ५७ ॥ तेजःपुंज चामीकर । तैसा पिंगट जटाभार । तेणें मौलिभा भासुर । जैसा भास्कर प्रकटला ॥ ५८ ॥ चरमाद्रीवरी रविमंडळ । कीं गगनाहूनि विद्युल्लोळ । तैसा उतरला दुहिणबाळ । यादव सकळ विलोकिती ॥ ५९ ॥ शुद्ध पादुका शोभती चरणीं । वीणामंडित वामपाणि । सामगानपठनी वाणी । समदर्शनी निगमात्मा ॥३६०॥ ऐसा नारद द्वारकेआंत । सभेनिकटीं अकस्मात । देखते झाले जन समस्त । तो वृत्तान्त अवधारा ॥ ६१ ॥

तं दृष्ट्वा भगवान्कृष्णः सर्वलोकेश्वरेश्वरः । ववंद उत्थितः शीर्ष्णा ससभ्यः सानुगो मुदा ॥ ३३ ॥

तया मुनीतें देखुन । लोकेश्वरांचा ईश्वर पूर्ण । सवेग उठिला श्रीभगवान । कृष्ण सर्वज्ञ जगदात्मा ॥ ६२ ॥ सभामान्य जे सभासद । अनुचर किंकरगण पार्षद । तिहींसहित श्रीगोविन्द । हर्षें नारद अभिवंदी ॥ ६३ ॥

सभाजयित्वा विधिवत्कृतासनपरिग्रहम् । बभाषे सूनृतैर्वाक्यैः श्रद्धया तर्पयन्मुनिम् ॥ ३४ ॥

नारदा देऊनि अभ्युत्थान । सभेसि सम्मानें येऊन । दिव्यासनीं बैसवून । केलें पूजन विधियुक्त ॥ ६४ ॥ आसनपूर्वक पूजा सर्व । अंगिकारूनि आर्यगौरव । बैसला अमतां मुनींचा राव । त्यातें केशव बोलतसे ॥ ६५ ॥ कल्याणकर आणि सुखतर । सूनृत पावन आणि मधुर । ऐसा गुणाढ्य वाक्यनिकर । बोले श्रीधर मुनीप्रति ॥ ६६ ॥ इत्यादि रसाळ सुभगा वचनीं । मुनीतें पूजूनि सभास्थानीं । बोलता झाला चक्रपाणि । शुक वाखाणी तें ऐका ॥ ६७ ॥

अपि स्विदद्य लोकानां त्रयाणामकुतोभयम् । ननु भूयान्भगवतो लोकान्पर्यटतो गुणः ॥ ३५ ॥

भगवान म्हणे निश्चयेंसीं । त्रिजगामाजिही आम्हांसी । अभयावाप्ति झाली ऐसी । प्रतीति मानसीं दृढ झाली ॥ ६८ ॥ प्रतीति होवावया काय कारण । म्हणाल तरी तें ऐका पूर्ण । आजि देवर्षि सुप्रसन्न । सर्व सद्गुण त्या योगें ॥ ६९ ॥ नाना भुवनीं वार्तिक चार । प्रेरूनि आणिजे समाचार । त्रिजगीं मुनीचा संचार । तो सर्व साचार अवगत या ॥३७०॥ तस्मात् मुनीच्या दर्शनें । विदित झालीं समस्त सुवनें । ऐसा निश्चय केला मनें । कृपावलोकनें मुनीचिया ॥ ७१ ॥ आम्हांसि भयद कोणे भुवनीं । असता तरी ते जाणुनि ग्लानि । म्लानतेवरूनि सूचिता मुनि । प्रसन्नचिह्नीं अभय असे ॥ ७२ ॥ त्रिजगीं वर्तमान जें स्वयंभ । आम्हां येथें तो रहस्यगर्भ । अवगमला हा मुख्यलाभ । मुनिप्रसादसद्गुण हा ॥ ७३ ॥ इतुकें बोलोनि पुढती हरि । नारदातें मधुरोत्तरीं । वदता झाला तें अवधारीं । कुरुधरित्रीजनपाळा ॥ ७४ ॥

न हि तेऽविदितं किंचिल्लोकेष्वीश्वरकर्तृषु । अथ पृच्छामहे युष्मान्पांडवानां चिकीर्षितम् ॥ ३६ ॥

हरि म्हणे गा देवर्षिवरा । तूं या जाणसी चराचरा । त्रिजगाचिया बाह्यान्तरा । विकारनिकरा वेत्ता तूं ॥ ७५ ॥ ईश्वरनिर्मित जितुके लोक । त्यांमाजि तूतें कोणी एक । विदित नाहीं हा विवेक । न करवें निष्टंक हरिहरां ॥ ७६ ॥ असो अखिलां लोकांची मात । त्यांमाजि किंचितही वृत्तान्त । तुज सर्वज्ञा नोहे विदित । ऐसा प्राकृत कोण वदे ॥ ७७ ॥ तस्मात् भूत भविष्य वर्तमान । अबाधित ऐश्वर्य त्रिकालज्ञ । आमुच्या भाग्यें तूं सर्वज्ञ । प्राप्त झालासि ये समयीं ॥ ७८ ॥ ऐसा अपार तुमचा महिमा । वर्णितां सहसा न करवे सीमा । यावरी अपेक्षित जितुकें आम्हां । पूर्णकामा

तेंचि पुसो ॥ ७९ ॥ चिरकाळ पाण्डवांकडील कांहीं । आम्हां वर्तमान कळलें नाहीं । स्वामी सर्वज्ञ वैसले ठायीं । तें सर्वही प्रकाशिती ॥३८०॥ पाण्डवांचें मनोवांछित । आम्ही पुसतों यथातथ्य । यावरी तेचि कथा मात । इतुकें भगवंत बोलिला ॥ ८१ ॥ हें ऐकोनि नारदमुनि । साद्यंत विवरी भगवद्वाणी । इत्यर्थ करूनि अंतःकरणीं । मग निरूपणीं प्रवर्तला ॥ ८२ ॥ इत्यर्थ केला कोणे परी ॥ म्हणसी राया तरी अवधारी । सर्वज्ञ असतां अज्ञापरी । मज कां श्रीहरि हें पुसतो ॥ ८३ ॥ तस्मात बार्हद्रथवधार्था । पाण्डवांचिया मनोवांछिता । मजला पुसे भीमकीभर्ता । विदित वार्ता असतांही । ॥ ८४ ॥ नारद हे अवघी माया । अंतःकरणीं जाणूनियां । वदता झाला तें कुरुराया । अभिमन्यु-तनया अवधारीं ॥ ८५ ॥ मायामय हा तुझा प्रश्न । तिहीं लोकीं प्रतिपादून । वदता झाला विधि-नंदन । श्रोतीं श्रवण तो कीजे ॥ ८६ ॥

॥ श्रीनारद उवाच ॥ दृष्टा मया ते बहुशो दुरत्यया माया विभो विश्वसृजश्च मायिनः ।
भूतेषु भूमंश्चरतः स्वशक्तिभिर्वह्नेरिव च्छन्नरुचो न मेऽद्भुतम् ॥ ३७ ॥

भो समर्था जगदीश्वरा । तुझिये मायेचा पसारा । बहुत दुस्तर चराचरा । म्यां देखूनि बहु वेळां ॥ ८७ ॥ धालों निवालों जगदीशा । म्हणूनि अद्भुत न वाटे सहसा । जरी मी म्हणसी समर्थ कैसा । तरी तें परेशा अवधारीं ॥ ८८ ॥ विश्वा मोहक ब्राह्मी माया । त्या विश्वसृजकाही ब्रह्मया । तुझी माया दुरत्यया । ऐसा स्वामिया समर्थ तूं ॥ ८९ ॥ विद्यादिका तुझिया शक्ति । तिन्हीं लपवूनि आपणाप्रति । तूं वर्तसी सर्वां भूतीं । म्हणोनि श्रीपति अगम्य तूं ॥ ३९० ॥ भूतान्तरीं वर्तमान । असोनि अलिप्त नित्य निर्गुण । त्या तव माया म्यां देखून । अद्भुत मम न मनी पैं ॥ ९१ ॥ म्हणसी भूतान्तरीं मम वसति । तरी कां भूतें न देखती । यदर्थी ऐकावी उपपति । भो श्रीपति भगवंता ॥ ९२ ॥ बीजारोपणा भू आधार । जळेंचि वाढती जे तरुवर । तयां गर्भी वैश्वानर । झांकूनि भासुरपण वर्ते ॥ ९३ ॥ शोषण दीपन उज्ज्वलीकरण । तरुवर-रूपें परिणमोण । इत्यादि दशधा शक्ति करून । लपे कृशान तरुरूपें ॥ ९४ ॥ तैसाचि तूंही जगदी-श्वरा । मेधा कान्ति धृति स्मृति गिरा । विद्याप्रमुख शक्तिनिकरा-। माजि ईश्वरा लपसी तूं ॥ ९५ ॥ पृथ्वीमाजि पुण्यगंध । जळीं रसाळता जे विविध । चंद्रार्काग्न्यादिकीं प्रसिद्ध । अनेक भेद तेजाचे ॥ ९६ ॥ तैसाचि भूतभौतिकीं पवन । सबाह्य व्यापक सर्वत्र गगन । भूतान्तरीं हे भूतगुण । स्वयें होऊन लपसी तूं ॥ ९७ ॥ आंबा गोड रसाळ मधुर । ऐसें वदती भोक्ते चतुर । परि न म्हणती रसाळ नीर । तेंवि अगोचर भूतीं तूं ॥ ९८ ॥ प्रकट असतांचि तूं अप्रकट । त्या तव मायांचा शेवट । पावे ऐसा ज्ञाता श्रेष्ठ । ब्रह्माण्डघटीं मज न दिसे ॥ ९९ ॥ विधि हर सुरवर मुनीश्वर । न पवती तव मायेचा पार । तेथ तुझा हा प्रश्नविचार । अद्भुततर मज न गमे ॥ ४०० ॥

तवेहितं कोऽर्हति साधु वेदितु स्वमाययेदं सृजतो नियच्छत. ।
यद्विद्यमानात्मतयाऽवभासते तस्मै नमस्ते स्वविलक्षणात्मने ॥ ३८ ॥

भो भगवंता तव चेष्टित । जाणावया इत्थंभूत । तुजविण दुसरा ब्रह्माण्डांत । कोण समर्थ असे पां ॥ १ ॥ माझें चेष्टित कोणे परी । म्हणसी तरी तें ऐकें हरि । लटिकेंचि जग हें साचपरि । मायाविकारीं भासविसी ॥ २ ॥ रज्जूवरी अध्यारोप । नसतां साच प्रकाशी सर्प । मरणभयाचा अहा कंप । विकार अमूप तो प्रकटी ॥ ३ ॥ रज्जु नेणे सर्पत्ववारें । अथवा घेपे तद्विकारें । जड अचेत निज निर्धारें । भय कावियें सचेतातें ॥ ४ ॥ सर्प केवळ अविद्यमान । परि द्रष्ट्याचें विपरीत ज्ञान । अविद्यायोगें परिणमोन । विद्यमानत्व त्या कल्पी ॥ ५ ॥ वास्तव आस्तिक्यें जो शुद्ध । अविद्याभ्रमें तो विपरीत बोध । लाहोनि भावी सर्प विरुद्ध । पावे खेद भ्रम कंपें ॥ ६ ॥ तैसें जग हें अविद्यमान । प्रत्यक्ष मृगाम्भासमान । मायात्मकत्वें विपरीत वयुन । विद्यमानत्व त्या प्रकटी ॥ ७ ॥ जड अचेत दुःखालय । अविद्यमान क्षणिकप्राय । तेथ विकारसमुच्चय । कैंचा काय कोटुनी ॥ ८ ॥ आत्मा निर्विकार निर्लेप । साक्षी सर्वग चिन्मात्रदीप । अविद्यामायाभ्रमसंकल्प । अध्यारोप तद्योगें ॥ ९ ॥ अविद्याविम्बित चिदाभास । जीवचैतन्य बोलिजे त्यास । करणरूप तें तत्प्रकाश । भावी दृश्य साचवत् ॥ ४१० ॥ चित्प्रकाशें मनाच्या ठायीं । विपरीत कल्पना स्फुरती पाहीं । इन्द्रियद्वारा विषयप्रवाहीं । अवस्था दोन्हींमाजि रमे ॥ ११ ॥ तृतीय अवस्था जे सुषुप्ति । तीमाजि दोहींची लयोत्पत्ति । कल्पनाभ्रमें सत्यप्रतीति । स्वप्न जागृन्मय होय ॥ १२ ॥ जागृतीमाजि जेव्हां असे । तेव्हां विश्व हें साचचि भासे । सुषुप्तिविसरें जागृति नासे । तैं स्वप्न आभासे सत्यत्वें ॥ १३ ॥ एवं अवघी हे कल्पना । अवस्थाभेदें प्रत्यय नाना । मिथ्या असोनि विपरीत वयुना । सत्य भासूनि विचंबवी ॥ १४ ॥ षड्रस पक्कान्नें पंचामृत । कल्पनेचीं करूनि बहुत । ताटें भरूनि शतानुशत । जेविल्या क्षुधित तैसाचि ॥ १५ ॥ तैसेंचि काल्पनिक हें जग । तेथ तुझा हा मायात्मयोग । विद्यमानत्व करी सांग । वास्तव अव्यंग न चोजवे ॥ १६ ॥ ऐसिया तूतें नमस्कार । करावया शक्य अधिकार । नमनावांचूनि तूं साचार । अन्यप्रकारें न चोजविसी ॥ १७ ॥ न्यायें सांख्यें पातंजलें । वैशेषिकें मीमांसाबळें । तुझें वास्तव तत्त्व न कळे । एवं सकळें तुज अरुयीं ॥ १८ ॥ एवं सर्वांचीं लक्षणें । अचिंन्य अगाध अगम्य गहन । अलक्ष लक्ष रजोनिर्गुण । तो तूं सगुण सुरकार्या ॥ १९ ॥ जरी तूं म्हणसी जगदीश्वरा । अचिंत्य अगाध मी जरी खरा । तरी कां मायाजनित विकारा । आरोप करा मम माथां ॥ ४२० ॥ मायाचेष्टित करून । काय मजला प्रयोजन । म्हणसी तरी तें निरूपण । ऐकें संपूर्ण सर्वगता ॥ २१ ॥

जीवस्य यः संसरतो विमोक्षणं न जानतोऽनर्थवहाच्छरीरतः ।
लीलावतारैः स्वयशः प्रदीपकं प्राज्वालयत्त्वा तमहं प्रपद्ये ॥ ३९ ॥

तरी अविद्यावेष्टित जो कां जीव । त्यासि अविद्याभ्रमवेष्टनास्तव । दुःखालयवर्ष्मापासाव । मोक्षोपाव नावगमे ॥ २२ ॥ पुढती पुढती जनन मरण । पुढती जननीजठरीं शयन । संतत विषयात्मक चिन्तन । वासनाबंधन बीजमय ॥ २३ ॥ साळी विरूढोनि तृणवत होये । पुढती परिणमे बीजमये । जीवचैतन्या येणें न्यायें । अविद्यावरणें संसरणें ॥२४॥ एका देहापासूनि सुटे । कर्मजनित अन्य घटे । एवं भवभ्रमतमअव्हाटे । पासूनि न सुटे कल्पान्तीं ॥ २५ ॥ एवं पावतां संसरण । करूं न शके स्वमोक्षण । त्याची करावया सोडवण । कृपाळु पूर्ण होत्साता ॥ २६ ॥ अध्यारोप भवभ्रम जो हा । जीवां दुर्गम जाला महा । त्याचा अपवादपावकें दाहा । करणें कणवां जीवांच्या ॥ २७ ॥ वास्तव अपरोक्षज्ञानोदयें । जगदारोपा अपवाद होय । जीवा न लभे ज्ञानसोय । म्हणूनि उपाय करिसी हा ॥ २८ ॥ धरूनि लीलावतार नाना । करिसी धर्मसंस्थाना । उत्पथ मारूनि रक्षिसी स्वजना । स्वयशें त्रिभुवना प्रकाशिसी ॥ २९ ॥ तियें तव अवतारगुणचरित्रें । अमोघकीर्तिश्रवणमात्रें । पावन होती श्रोतृगात्रें । पुत्रकलत्रें मोहितही ॥४३०॥ मोहभ्रांतीचे सप्त पाश । तिंहीं बद्ध असतांही अशेष । श्रवणीं पडतां अमोघ यश । तत्काळ नाश भवपाशां ॥ ३१ ॥ स्वप्नीं चोरीं जो बांधिला । जागृती येतां मुक्तचि पहिला । तोचि न्याय तव यशें केला । चित्तशुद्धीला प्रकटूनी ॥ ३२ ॥ तव गुणश्रवणीं चित्त-शुद्धी । होतां विषयीं न रमे बुद्धी । रमे वास्तव निजात्मबोधीं । अविद्योपाधी निरसूनी ॥ ३३ ॥ ऐसीं ज्याच्या गुणयशःश्रवणें । तुटती जीवांचीं बंधनें । तया अजन्मा तुजकारणें । नादर म्हणे मी शरण ॥३४॥ तो तूं मायालीलावतारी । नव्हसी मानवशरीरधारी । सर्वज्ञ असतां अज्ञापरी । वदसी वैखरी प्रश्नामिसें ॥ ३५ ॥ असो तुझें हें वास्तव स्तवन । यावरी तुवां जो केला प्रश्न । तेंचि साकल्येंकरूनि कथन । ऐकवीन मी आतां ॥ ३६ ॥

अथाप्याश्रावये ब्रह्मन्नरलोकविडंबनम् । राज्ञः पैतृष्वस्रेयस्य भक्तस्य च चिकीर्षितम् ॥ ४०॥

ब्रह्मन् म्हणोनियां संबोधी । भो परमात्मया कृपानिधि । मनुष्यलोकींच्या अनुकारविधी । दाविता जो तूं त्या तूतें ॥ ३७ ॥ पुसिला तितुका समाचार । कथितों ऐकें सविस्तर । पितृभगिनीचा ज्येष्ठकुमर । राजा युधिष्ठिर जें वांछी ॥ ३८ ॥ करूं इच्छी जें धर्मराजा । तें तूं ऐकें गरुडध्वजा । ऐकोनि मिळे जें धर्मकाजा । तें मग पैजा अवलंबी ॥ ३९ ॥

यक्ष्यति त्वां मखेंद्रेण राजसूयेन पांडवः । पारमेष्ठ्यकामो नृपतिस्तद्भवाननुमोदताम् ॥ ४१ ॥

क्रतूंमाजी श्रेष्ठतर । राजसूयनामा जो मखेन्द्र । तेणें तूतें कुन्तीकुमर । कुरुनृपवर यजितसे ॥४४०॥ पारमेष्ठ्यपदाचा धरूनि काम । निष्ठापूर्वक यज्ञोत्तम । आदरिला हें जाणूनि वर्म । तुवां सप्रेम प्रशंसिजे ॥ ४१ ॥ त्याचा वांछितमनोभाव । अनुमोदावा त्वां कुरुराव । इतुकेंचि म्हणसी कार्यगौरव । तरी सहेतु सर्व अवधारीं ॥ ४२ ॥ बैसले ठायीं द्वारकेहून । करीन यज्ञप्रशंसन । धर्मा देईन अनुमोदन ॥ तरी

कार्य याहून आन ऐका ॥ ४३ ॥ येथूनि न कीजे अनुमोदन । इंद्रप्रस्थाप्रति कीजे गमन । तव गमनाचें प्रयोजन । त्रिजगदानंदनपर ऐकें ॥ ४४ ॥

तस्मिन्देव क्रतुवरे भवंतं वै सुरादयः । दिदृक्षवः समेष्यंति राजानश्च यशस्विनः ॥ ४२ ॥

तया मखेन्द्राच्या ठायीं । देखों इच्छिते तुज सर्वही । सुरवर मुनिवर नृपवर पाहीं ॥ परमयशस्वी येतील ॥ ४५ ॥ देवा तुझिया दर्शनासाठीं । वांछा अमरादिकांच्या पोटीं । मम दर्शनाची किमर्थ गोठी । तरी जगजेठी अवधारीं ॥ ४६ ॥

श्रवणात्कीर्तनाद्ध्यानात्पूयंतेऽन्तेऽवसायिनः । तव ब्रह्ममयस्येश किमुतेक्षाऽभिमर्शिनः ॥ ४३ ॥

भो ईश्वरा ईश्वरपती । तूतें ऐकती गाती ध्याती । श्वपचादिकही ते उद्धरती । मां देखों इच्छिती ते किमुत ॥ ४७ ॥ दर्शना स्पर्शनाचे अधिकारी । उद्धरती हे नवल ना थोरी । श्रवणा कीर्तना ध्यानावरी । पवित्र होती श्वपचादि ॥ ४८ ॥ अनधिकारियां पावनकरण । मंगळायतन तुझे चरण । या वाक्याचें प्रतिपादन । करी तें वजन अवधारा ॥ ४९ ॥

यस्यामलं दिवियशः प्रथितं रसायां भूमौ च ते भुवनमंगल दिग्वितानम् ।
मंदाकिनीति दिवि भोगवतीति चाधो गंगेति चेह चरणांबु पुनाति विश्वम् ॥ ४४ ॥

भो भो त्रिभुवनमंगळकरणा । तव यश पावनकर त्रिभुवना । मर्त्यामर्त्या पन्नगसदना । माजि विस्तीर्ण यशगरिमा ॥ ४५० ॥ ब्रह्मांडगर्भी जीं दिग्भुवनें । तितुकीं छादिलीं यशोवितानें । तव यशाच्या विस्तीर्णवसनें । मंगळाभरणें विराजती ॥ ५१ ॥ तैसेंचि तुझें चरणोदक । पवित्र विस्तीर्ण त्रिजगदात्मक । कैसे म्हणसी तरी सम्यक । कथितों ऐक कलुषारी ॥ ५२ ॥ तव पदसलिलप्रवाहिनी । मंदाकिनी स्वर्ग पावनी । भोगवती ते पन्नगभुवनीं । पवित्रकरिणी विषायुधां ॥ ५३ ॥ इहलोकीं ते भागीरथी । प्राणिनिचया पावनकर्त्री । त्रिपथगामिनी ऐसें म्हणती । विश्वसंस्मृति भंजक जे ॥ ५४ ॥ तस्मात् तुझिया दर्शनासाठीं । सुर नर पन्नग सकाम पोटीं । तुज गोलिया यज्ञवाटी । कोटयनुकोटी उद्धरती ॥ ५५ ॥ दर्शनें स्पर्शनें गुणकीर्तनें । श्रवणें ध्यानें यशश्चिन्तनें । पावन होती समस्त भुवनें । वर्तमानें भावीही ॥ ५६ ॥ नारद इतुकें हरिसी वदला । पुढें कैसा प्रसंग झाला । तो तूं ऐकें कुरुनरपाळा । कथितों तुजला संक्षेपें ॥ ५७ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ तत्र तेष्वात्मपक्षेष्वगृह्णत्सु विजिगीषया । वाचः पेशैः स्मयन्भृत्यमुद्धवं प्राह केशवः ॥ ४५ ॥

तिये सुधर्मा सभेआंत । यादववीर वीरश्रीमंत । कृष्णपक्षीय परमाद्भुत । प्रतापादित्य तेजस्वी ॥ ५८ ॥ मेरुधैर्याचे प्रचंड । तैसे जयांचे दोर्दंड । स्फुरती समरार्थ अखंड । कृतान्तदंडपडिपाडें ॥ ५९ ॥ धनुर्विद्येचे अवतार । तुम्बळ बळाचे सागर । कीं रौद्ररसाचे शृंगार । लेवूनि वरिले वीरश्रिया ॥ ४६० ॥ कोपें कृतान्ता मारिती थापे । प्रळयरुद्रातें पापिती दापें । आंगींच्या वीरश्रीप्रतापें ।

मानिती अल्पें त्रिभुवनें ॥ ६१ ॥ आत्मपक्षोय हे समस्त । वैसले असतां सभेआंत । नृपाची ग्लानी वदला दूत । धर्मवृत्तान्त नारदही ॥ ६२ ॥ तेथ समस्त यादववीरीं । दूतविज्ञप्ति ऐकूनि पुरीं । आवेश उथळला अंतरीं । मागध समरीं जिणावया ॥६३॥ पूर्वी सप्तदश संग्रामीं । प्राणावशिष्ट सोडिला आम्हीं । अद्यापि न संडी समरोर्मी । उग्रकर्मी दुष्टात्मा ॥ ६४ ॥ नारदवार्तेचा विक्षेप । मानूनि सर्वां वीरश्री-कोप । म्हणती आजीच मागधदर्प । झाडूं साटोप समरंगीं ॥ ६५ ॥ त्यानंतरें नारदवचना । मान द्यावा हे वासना । परंतु भगवंताची आज्ञा । यंत्रकृशानासम पाहती ॥ ६६ ॥ मागधें जिंकिलें जगदीश्वरा । म्हणोनि समुद्रीं निर्मिलें नगरा । ऐसिया गोष्टीचा दरारा । न धरूनि समरा करूं पाहती ॥ ६७ ॥ ऐसें जाणूनि स्वपक्षाभीष्ट । हांसूनि सर्वज्ञ श्रीबैकुंठ । प्रधानांमाजि उद्धव श्रेष्ठ । त्यातें संतुष्ट वाक्य वदे ॥ ६८ ॥ स्वपक्षप जे यादववीर । त्यांचें रक्षावया अंतर । सर्वज्ञ असतांही श्रीधर । उद्धवा सादर नीति पुसे ॥ ६९ ॥ मधुरोत्तरीं उद्धवाप्रति । नीतिसूचक कौशल्योक्ति । तिहीं गौरवूनि श्रीपति । बोलता झाला तें ऐका ॥ ४७० ॥

श्रीभगवानुवाच । त्वं हि नः परमं चक्षुः सुहृन्मंत्रार्थतत्त्ववित् । अथाऽत्र ब्रूह्यनुष्ठेयं श्रद्दध्मः करवाम तत् ॥ ४६ ॥

षड्गुणैश्वर्यसंपन्न । भूत भविष्य वर्तमान । त्रिकाळवेत्ताही सर्वज्ञ । उद्धवालागून मंत्र पुसे ॥ ७१ ॥ अमरगुरु जो बृहस्पति । उद्धवा तच्छिष्य तूं सुमति । आमुचा सुहृद सर्वां आम्हीं । परमचक्षु मी जाणें ॥ ७२ ॥ चर्मचक्षु सर्वां असती । धिषणाचक्षु बृहस्पती । तच्छिष्य तूं तेचि मूर्ति । हें मम प्रतीतीमाजि असे ॥ ७३ ॥ मंत्रार्थतत्त्वविचक्षण । इच्छिसी आमुचें कल्याण । तरी आम्हांसि करणीय कोण । हें विवरून बोल पां ॥ ७४ ॥ दूतें नृपांची विज्ञापना । नारदें कथिली धर्मकामना । दोहींमाजि अनुष्ठाना । योग्य कोणतें कर्म आधीं ॥ ७५ ॥ विवरूनि वदसी जें करणीय । भक्तिपूर्वक तें करूं कार्य । ऐकूनि प्रभूचा अभिप्राय । उद्धव काय बोलतसे ॥ ७६ ॥

इत्युपामन्त्रितो भर्त्रा सर्वज्ञेनापि मुग्धवत् । निदेशं शिरसाऽऽधाय उद्धवः प्रत्यभाषत ॥ ४७ ॥

ऐसा बहुमानपुरःसर । पुसिला स्वामीनें विचार । सर्वज्ञ असतांही साचार । मनुजाकार मुग्धवत् ॥ ७७ ॥ जाणोनि प्रभूचें मनोगत । आज्ञा मस्तकीं वंदूनि त्वरित । मंत्र विवरूनि प्रसंगोचित । कथी मंत्रार्थ उद्धव पैं ॥ ७८ ॥ पुढिले अध्यायीं उद्धव । विवरूनि कथील मंत्रार्थतत्त्व । सावध होऊनि श्रोते सर्व । कथा अपूर्व ते ऐका ॥ ७९ ॥ इतुकी कथा सप्ततितमीं । वाखाणूनि श्रीशुकस्वामी । एकसप्ततितमामाजि नियमी । धर्मदर्शना. हरियात्रा ॥ ४८० ॥ श्रीमद्भागवतींचा दशम । त्यामाजि भूभारहरणोद्यम । कौरवांकडील कथानुक्रम । तो उपक्रम येथूनी ॥ ८१ ॥ परीक्षितीतें सांगे शुक । श्रोतीं होऊनि श्रवणोन्मुख । भाषाव्याख्यान तें सम्यक । श्रवण कीजे हरिवरद ॥ ८२ ॥ एकनाथ प्रतिष्ठानीं । त्यांचें चरणप्रक्षाळवणी । गौतमीप्रवाहें लक्षूनी । दयार्णव सेवी पिपीलिके ॥ ८३ ॥ शके

सोळाशें एकुणसाठीं । पिंगळाब्दीं अनावृष्टी । शुक्लहरिदिनीदिवसा घटी । द्वादश क्रमतां अश्वयुजीं ॥८४॥
भाषाव्याख्यान दयार्णवें । केलें हरिवरगौरवें । संतीं सादर तें परिसावें । जळे आघवें अघ तेणें ॥ ४८५ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां भगवदाह्विकनृपग्लानिकथननारदागमनयुधिष्ठिरवृत्तान्तविचारणं नाम सप्ततितमोऽध्यायः ॥ ७० ॥

श्लोक ४७ ॥ ओवी-संख्या ४८५ ॥ एवं संख्या ५३२ ॥
(एकोणसत्तरावा अध्याय मिळून ओवीसंख्या ३२६२०)

सत्तरावा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ७१ वा

श्रीगणेशाय नमः । श्रीकृष्णपरमात्मने नमः । अंतरबाह्याविवर्जिता । अंतरबाह्यद्योतकसत्ता । स्फुरणमात्रें चिद्विवर्ता । प्रतिपादकता पैं ज्याची ॥ १ ॥ तया सन्मया सद्गुरुराया । अनन्यभावें भजलों पायां । आरब्ध व्याख्यान चालवावया । प्रज्ञा सदया मज दीजे ॥ २ ॥ सप्ततितमीं नृपांची ग्लानी । दूतें कथिली चक्रपाणी । युधिष्ठिराच्या यज्ञायतनीं । जावें म्हणोनि मुनि वदला ॥ ३ ॥ हें ऐकोनि उद्धवाप्रती । मंत्र पुसतां रुक्मिणीपती । तेणें उभयकार्यार्थ चित्तीं । निर्धारूनियां ठेविले ॥४॥ ते येथ एकसप्ततितमीं । उभयकार्यार्थसाधनक्षमी । मंत्र कथिजेल तो सत्तमीं । श्रवण केला पाहिजे ॥ ५ ॥ नारदाचें ऐकोनि वचन । इंद्रप्रस्था कृष्णागमन । देखोनि पाण्डवीं आनंदोन । उत्साह पूर्ण पैं केला ॥ ६ ॥ राजसूयमिषें हरी । पाण्डवां धार्त्तराष्ट्रां माझारीं । कलह रचून भूभार उतरी । अधर्मकारी संहरुनी ॥ ७ ॥ तेथ मखारंभीं जरासंध । गखान्तीं नाश पावेल चैद्य । भीमवचनें गान्धार क्षुब्ध । धरील विषाद कुळहंता ॥ ८ ॥ इतुकी कथा एकसप्ततितमीं । राया कथील श्रीशुक स्वामी । ते परिसावया सज्जन तुम्हीं । अवधान दिधलें पाहिजे ॥ ९ ॥

। श्रीशुक उवाच । इत्युदीरितमाकर्ण्य देवर्षेरुद्धवोऽब्रवीत् । सभ्यानां मतमाज्ञाय कृष्णस्य च महामतिः ॥१॥

अमात्यांमाजि वरिष्ठमान । प्रज्ञा बृहस्पती समान । ऐसा उद्धव मुख्य प्रधान । सम्मानूनियां श्रीकृष्णें ॥ १० ॥ दूतमुखें नृपांची विनती । धर्मयज्ञार्थ नारदोक्ती । त्यांमाजि करणीय जे निश्चिती । उद्धवाप्रति पुसतां पैं ॥ ११ ॥ इतुकें हरीचें उदीरित । ऐकोनि उद्धव बुद्धिमंत । जाणता झाला त्रिविध मत । इत्थंभूत तें ऐका ॥ १२ ॥ नारदमतें पाण्डवसदना । राजसूयार्थ कीजे गमना । उद्धवें अवगमूनि

Library

ऐसें मना । स्वपक्षवासना अवगमिली ॥ १३ ॥ तंव सभास्थानीं यादववीर । देदीप्य वीरश्रीभास्कर । त्या सर्वांचें अभ्यंतर । मागधसंहार आधीं कीजे ॥ १४ ॥ श्रीकृष्णाचें मनोगत । एकतंत्रें उभय कार्यार्थ । साधूनि रक्षिजे शरणागत । पुण्यपुरुषार्थ हा मुख्य ॥ १५ ॥ महासुमति उद्धव मंत्री । प्रभूचें वचन ऐकोनि श्रोत्रीं । इत्यर्थ वदता झाला वक्त्रीं । तो सत्पात्रीं परिसिजे ॥ १६ ॥

उद्धव उवाच । यदुक्तमृषिणा देव साचिव्यं यक्ष्यतस्त्वया । कार्यं पैतृष्वस्रेयस्य रक्षा च शरणैषिणाम् ॥ २ ॥

सर्वां बुद्धीचें द्योतन । करी जो स्वप्रकाशें पूर्ण । त्या कृष्णातें मुख्य प्रधान । देव म्हणून संबोधी ॥ १७ ॥ अगा देवा द्योतमाना । जें बोलिला मुनींचा राणा । तेंचि मुख्य कर्तव्य जाणा । मंत्राविवरणांमाजि घडे ॥ १८ ॥ आपुले पितृभगिनीचा तनय । सुहृदां मान्य कुरुकुळधुर्य । तेणें मखेन्द्र राजसूय । अभीष्ट कार्य मनीं धरिलें ॥ १९ ॥ साचिव्यं म्हणिजे साहाय्य त्याचें । तुवां जाऊनि कीजे साचें । तेणें प्रसंगें शरणागतांचें । रक्षण नृपांचें करणें ही ॥ २० ॥ आधीं मखेन्द्र संपादून । मग नृपांचें कीजे रक्षण । ऐसें नोहे मम भाषण । एक कारण दोहींचें ॥ २१ ॥ राजसूयार्थ इंद्रप्रस्था । आधीं जावें जी समर्था । तेणें प्रसंगें शरणागता । संरक्षूनि सुख द्यावें ॥ २२ ॥ दोन्ही कार्यार्थ एकतंत्रें । संपादती माझेनि मंत्रें । कैसें म्हणाल तरी तें श्रोत्रें । अरविन्द्रनेत्रें परिसावें ॥२३॥ आठां श्लोकीं निरूपण । करील उद्धव मुख्य प्रधान । श्रोतीं होऊनि सावधान । तें व्याख्यान परिसावें ॥ २४ ॥

यष्टव्यं राजसूयेन दिक्चक्रजयिना विभो । अतो जरासुतजय उभयार्थो मतो मम ॥ ३ ॥

उद्धव म्हणे जनार्दना । तेणें यजावें राजसूययज्ञा । जेणें दिक्चक्रप्रदक्षिणा । करूनि नृपगणा जिंकावें ॥ २५ ॥ जेणें कीजे दिक्चक्रविजय । तेणेंचि करावा राजसूय । तस्मात जिंकितां मागधराय । द्विधा कार्य साधतसे ॥ २६ ॥ न करितां मागधपराभव । दिग्विजयाचा असंभव । दिग्विजयाविण धर्मराव । मखेन्द्रगौरव कोंवि लाहे ॥ २७ ॥ यालागि आधीं जरासुत । संहारिजे दिग्विजयार्थ । मागधमरणें भूप समस्त । होती मुक्त अनायासें ॥ २८ ॥ राजयांचा कैपक्ष केला । पाण्डवयज्ञ सिद्धी गेला । एक जरासंध आधीं वधिला । म्हणिजे साधला उभयार्थ ॥ २९ ॥ ऐसें मम मन मनासिज जनका । मंत्र विवरूनि कीजे निका । यदुकुळहृच्छल्यकंटका । उन्मोचन तद्योगें ॥ ३० ॥

अस्माकं च महानर्थो ह्येतेनैव भविष्यति । यशश्च तव गोविंद राज्ञो बद्धान्विमुञ्चतः ॥ ४ ॥

नृपांचें बंधविमोचन । करिता जो तूं श्रीभगवान । त्रिजगीं तें तव यश पावन । होय संपूर्ण उज्ज्वलित ॥ ३१ ॥ जेणें प्रसंगें श्रीवैकुंठा । आम्हां यादवांचा हृच्छल्यकांटा । भंगेल ऐसा कार्यार्थ मोठा । येणेंचि क्रमें होईल पैं ॥ ३२ ॥ सतरा वेळ भंगिला रणीं । तथापि न शिणे अंतःकरणीं ।

यदुकुळातें निर्मूळकरणीं । दीर्घप्रयत्नीं पडिलासे ॥ ३३ ॥ युधिष्ठिराचा यज्ञ मुख्य । दिग्विजयें तो अशक्य । आमुचा हृच्छल्यकंटक । मागध मुख्य निर्दळिजे ॥ ३४ ॥ ऐसी ऐकूनि उद्धववाणी । उत्सुक यादववीरांच्या श्रेणी । म्हणती मागध येच क्षणीं । समरांगणीं संहारू ॥ ३५ ॥ सर्वीं सादर ऐकूनि मंत्र । थरकलें यदुवीरांचें चक्र । म्हणती मागध कोण पामर । कायसा विचार तद्विषयीं ॥३६॥ अमर जिंकिले भौमासुरें । भौम भंगिला तो यदुवीरें । पार्यातहरणाच्या अवसरें । शक्र निर्जरांसह दमिला ॥ ३७ ॥ उषा भाळली जैं अनिरुद्धा । तैं बाणाच्या करितां वधा । तदर्थ शंकर आला युद्धा । तोही मुग्धासम केला ॥ ३८ ॥ तया कृष्णाची सक्रोध भृकुटी । साहों शके सकळ सृष्टी । ऐसा योद्धा कोण जगजेठी । भावितो पोटीं यदुभार ॥ ३९ ॥ भगवान् शरणागतवत्सल । कैंपक्षील नृपांचें कुळ । तरी संहारूं मागध खळ । न भरत पळ समरंगीं ॥ ४० ॥ ऐसा वीररसाचा यावा । हृदयीं जाणवला उद्धवा । मग तो म्हणे वासुदेवा । मंत्र अवघा अवधारीं ॥ ४१ ॥ तुंबळ वीररसाचा सिंधु । क्षोभला देखूनिया अगाधु । उद्धव सचिवांमाजि प्रबुद्धु । रहस्य प्रसिद्ध प्रकाशी ॥ ४२ ॥

स वै दुर्विषहो राजा नागायुतसमो बले । बलिनामपि चान्येषां भीमं समबलं विना ॥ ५ ॥

भो भगवंता ऐकें वचन । जरासंधाचें रहस्यकथन । जेणें उपायें पावे मरण । तें गुह्य संपूर्ण मी कथितों ॥ ४३ ॥ दहा सहस्र गजांचें बळ । अंगीं वाहे जो एकला प्रबळ । तोही जरासंधातें केवळ । दमूं न शके समरंगीं ॥ ४४ ॥ भूमंडळींचे बळिष्ठ राजे । अयुतगजबळाचिये बोजे । जेणें जिंकिलें प्रतापतेजें । अविकें अजें शार्दूळवत् ॥ ४५ ॥ भूमंडळींच्या प्रबळ पार्थिवां । दुःखें न साहवे ज्याचा यावा । चंडकौशिकवरगौरवा । तव अजिंक्य भूचक्रा ॥ ४६ ॥ म्हणाळ बळिष्ठ महारथी । तयांपुढे मागध किती । तरी अयुतमत्तगजांची शक्ती । वर विजयोक्ति मुनिप्रणीत ॥ ४७ ॥ नागायुत-बळिष्ठ नर । भूमंडळीं असती वीर । तथापि मागधेंसी समर । करावयातें असमर्थ ॥ ४८ ॥ तयाचा मृत्यु ज्याचेनि हातें । तें गुह्य विदित आहे मातें । तें मी कथितों ऐका निश्चितें । मग मंत्रातें मान्य करा ॥ ४९ ॥ तयासि समबळ भीम एक । भीमाचि तयाचा मुख्य अंतक । ऐसा निर्दिष्ट ब्रह्मलेख । मुनि कौशिक वदलासे ॥ ५० ॥ भीमाहूनि अनेक बळी । जन्ही मिळाले एके काळीं । तन्ही मागध रणमंडळीं । कोण्हे काळीं त्यां न मरे ॥ ५१ ॥ तस्मात भीमचि अंतक त्याचा । ऐसी चंडकौशिक-वाचा । यामाजि सूक्ष्म विचार साचा । मम मंत्राचा इत्यर्थ हा ॥५२॥ म्हणाल सूक्ष्मविचार काय । तरी भीमार्जुनेंसींही कुरुवर्य । समरीं करितां मागधजय । प्रताप होय निष्फळ तो ॥ ५३ ॥ मागध नागायुतबळिष्ठ । सेना प्रतापी वरिष्ठ धृष्ट । उभय सामर्थ्यें गरिष्ठ । न पवे कष्ट समरंगीं ॥५४॥ अस्त्र-विद्येचा उदन्वानु । दृढ धैर्याचा रत्नसानु । प्रळयतेजाचा हुताशनु । वीरश्रीसंपन्न वरविजयी ॥ ५५ ॥ ऐसा मागध सर्वांपरी । बळिष्ठे दमिजे उपायकुसरी । तो उपायही ऐका श्रोत्रीं । मम वैखरी निवेदितां ॥ ५६ ॥

द्वैरथे स तु जेतव्यो मा शताक्षौहिणीयुतः । ब्रह्मण्योऽभ्यर्थितो विप्रैर्न प्रत्याख्याति कर्हिचित् ॥ ६ ॥

मागधासमान जो प्रतिरथी । तेणें येऊनि समरक्षिती । द्वंद्वयुद्धीं प्रतापशक्ति । वीरपुरुषार्थी दमावा ॥ ५७ ॥ द्वंद्वयुद्धावांचूनि कांहीं । शतशा अक्षौहिणींच्या समूहीं । मागध न जिणवे रणमही । हें निश्चयीं विधिवाक्य ॥ ५८ ॥ यालागिं द्वैरथें युद्धें दमिजे । साह्य त्रितीय पुरुषें न कीजे । ऐसीं जाणोनि रहस्यबीजें । उभय काजें साधावीं ॥ ५९ ॥ म्हणाल एकला संग्राममही । मागध सहसा येणार नाहीं । यदर्थी उपायकौशल्य कांहीं । सांगतों तेंही अवधारा ॥ ६० ॥ ब्राह्मणभक्त जरासंध । सहसा नुलंघी विधिवाद । विप्रयाच्ञेचा न करी छेद । सहसा विरुद्ध मानूनी ॥ ६१ ॥ अदेय पदार्थ याचिला अमतां । विमुख नोहे प्राणान्त होतां । ऐसा निश्चय ज्याचा पुरता । अढळ सर्वथा न ढळे पैं ॥ ६२ ॥ युक्ती वधिजे हा मपत्न । यदर्थ कथितों दीर्घ प्रयत्न । ऐकोनि तैसाचि कीजे यत्न । कांहीं अनुमान न करूनी ॥ ६३ ॥

ब्रह्मवेषधरो गत्वा तं भिक्षेत वृकोदरः । हनिष्यति न संदेहो द्वैरथे तव सन्निधौ ॥ ७ ॥

ब्राह्मणवेशें अनिळबाळें । जाऊनि वैश्वदेवाचे वेळे । भिक्षा याचितां मागधपाळें । वाक्य मानिलें जाणोनी ॥ ६४ ॥ मग मागावें द्वंद्वयुद्ध । विमुख नोहे चित्तें मागध । द्वंद्वयुद्धीं जरासंध । भीम प्रसिद्ध वधील ॥ ६५ ॥ म्हणाल मागध आणि भीम । दोघे बळिष्ठ समान सम । तरी भीम त्या वधील ऐसा नेम । कां पां विषम हों न शके ॥ ६६ ॥ तुझिया सान्निध्यें श्रीधरा । मागधकदनीं वृकोदरा । वरील विजयश्री सुंदरा । द्वंद्वसमरामाजिवडी ॥ ६७ ॥ ऐसा मंत्रार्थनिश्चय । कांहीं न धरावा संदेह । सन्निद्ध असतां यादवराय । वधील पाण्डव मगधेशा ॥ ६८ ॥ कांहीं न करितां मी साक्षी । सन्निध असतां उभय पक्षीं । मागधा वधूनि भीमा रक्षीं । केंवि हें लक्षीं तुज लक्षे ॥ ६९ ॥ ऐसें न म्हणावें श्रीहरी । सत्ता अखिल चराचरीं । निमित्तमात्र पृथगाकारीं । गुणव्यापारीं गुणकर्मे ॥ ७० ॥

निमित्तं परमीशस्य विश्वसर्गनिरोधयोः । हिरण्यगर्भः शर्वश्च कालस्यारूपिणस्तव ॥ ८ ॥

तूं काळात्मा एकाकी । संतत स्थितिलयसृजनाविखीं । निमित्तमात्र कृतकौतुकीं । गुणाभिमानी विधि हर पैं ॥ ७१ ॥ अरूप अव्यय अगोचर । श्वास निमेष त्रुटि अक्षर । अखंडदंडायमान क्षिप्र । जो तूं ईश्वर काळात्मा ॥ ७२ ॥ विक्षेपरूप विश्वसर्ग । लयोपसंहार निरोध साङ्ग । एतद्विषयीं निमित्तयोग । कंजज भर्ग गुणकर्मी ॥ ७३ ॥ काळरूपिया ते तव सत्ता । निमित्त विधिहरांच्या माथां । तव सान्निध्यें मागधहंता । निमित्तमात्र भीम तैसा ॥ ७४ ॥ अचेष्ट चेष्टे सत्तायोगें । माया दावूनि लपवी जगें । तस्मात ऐश्वर्य हें अवघें । तुझे नियोगें योगीशा ॥ ७५ ॥ यास्तव आतां विलंब न करीं । येणेंचि उपायें मागधवैरी । निमित्तमात्र भीमा करीं । शीघ्र संहारीं जनार्दना ॥ ७६ ॥ येचि

विषयीं नृपांच्या सती । शिशु लालितां तव यश गाती । यश गाती ते मुक्त होती । दुर्घट आर्ति खंडूनियां ॥ ७७ ॥ दरिद्रियांच्या जैशा सुता । ओंवी गाती कांडितां दळितां । परि त्या निष्फळ-मनोरथा । तैसें अच्युता न कीजे ॥ ७८ ॥ शालवृक्षातळीं बैसे । सुख ना सुकृत न लाहे जैसें । कल्पतरुतळींही तैसें । तरी मग कायसें श्रेष्ठत्व ॥ ७९ ॥ यालागिं जैशा नृपांच्या सती । पूर्वप्रत्ययें तव यश गाती । साफल्य त्यांचिये मनोरथीं । करूनि स्वकीर्ति विस्तारीं ॥ ८० ॥ कशा गाती त्या मम यशा । पूर्वप्रत्यय त्यांप्रति कैसा । ऐशी प्रश्नेच्छा मानसा । तरी ते परिसा मी वदतों ॥ ८१ ॥

गायंति ते विशदकर्म गृहेषु देव्यो राज्ञां स्वशत्रुवधमात्मविमोक्षणं च ।
गोप्यश्च कुंजरपतेर्जनकात्मजायाः पित्रोश्च लब्धशरणा मुनयो वयं च ॥ ९ ॥

राजे निग्रहिले मागधें । त्यांचिया वनिता सदैव खेदें । जाकळिल्या तव पदारविन्दें । स्मरोनि विरुदें पढताती ॥ ८२ ॥ मनुष्यदेव म्हणिजे राजा । पट्टमहिषी तयाची भाजा । तयेसि देवीनामें सहजा । बोलती प्रजा सर्वत्र ॥ ८३ ॥ मागधरुद्धनृपांच्या देवी । आर्ता गाती तव यशःपदवी । तैसेचि त्यांचे मनोरथ पुरवीं । प्रार्थना गुर्वी हे माझी ॥ ८४ ॥ सदैव असतां आपुल्या गृहीं । दलन-कंडनादिकर्मप्रवाहीं । शिशुलालनादिकांच्या ठायीं । स्मरोनि हृदयीं यश गाती ॥ ८५ ॥ कर्म म्हणिजे जे तव लीला । अवतारनाट्यें बहुत वेळा । प्रकाशिली ते गुणकर्ममाळा । गाती वेल्हाळा दुःखार्ता ॥८६॥ पूर्वीं जैसा बहुतां हरि । शत्रु वधूनि मुक्त करी । तैसाचि आम्हां ये अवसरीं । प्रणतकैवारी नोपेक्षीं ॥ ८७ ॥ देवी म्हणती पुरुषोत्तमा । स्वकीय शत्रु मागधनामा । यातें वधूनि देइजे आम्हां । नृपललामा सोडवुनी ॥ ८८ ॥ आमुचा शत्रु मागध मारीं । नृपति आमुचे मुक्त करीं । पूर्वील विरुदें साचोकारीं । उपेक्षा न करीं प्रणतांची ॥ ८९ ॥ ऐशा नृपवनिता तव गुण । गाती इच्छूनि मागधमरण । म्हणसी पूर्वी म्यां वधिले कोण । केलें मोक्षण कोणाचें ॥ ९० ॥ तरी तां पूर्वीं कामवनीं । गोपींसहित चक्रपाणी । क्रीडत असतां त्यां धरूनी । नेता झाला शंखचूड ॥ ९१ ॥ तैं दुःखें स्मरती तूतें गोपी । तेव्हां वधूनि गुह्यक पापी । मुक्त केल्या कृतसंकल्पी । साफल्य वोपुनी तयांच्या ॥ ९२ ॥ तेंवि स्व-शत्रु मागध मारीं । आमुचे वल्लभ मुक्त करीं । नृपवनिता हें आपुले घरीं । गाती अवधारीं आणि-कांही ॥ ९३ ॥ वसुदेवदेवकी बंदिशाळे । कंसें रोधिलीं परम कुटिळें । कंसा वधूनि त्यां मोकळें । जैसें केलें गुण गातां ॥ ९४ ॥ तैसा वधूनि मागध खळ । आमुचे मुक्त करीं नृपाळ । ऐशा गाती तव यश अमळ । वनिता सुशीळ भूपांच्या ॥ ९५ ॥ पुराणान्तरींच्या ऐकूनि कथा । देवी गाती अवतार-चरिता । जे गजेंद्र नक्रें त्रास देतां । झाला स्मरता तुज तो तैं ॥ ९६ ॥ उडी घालूनि गंडकीजळीं । चक्रें ताडूनि नक्रमौळीं । गजेंद्र सोडविला तत्काळीं । गाती वनमाळी तव यश हें ॥ ९७ ॥ जनका-त्मजेसि रावणें लंकें । नेऊनि रोधितां दाटली दुःखें । ते सोडविली राक्षसकटकें । रावणासहित निर्द-लुनी ॥ ९८ ॥ असो ऐसिया नृपांगना । गाती प्रणतक्लेशहरणा । मुनिजनभवाब्धिनिस्तरणा । तैसेचि

शरण आम्हीही ॥ ९९ ॥ यालागिं नृपांगना जगा आर्ता । तव यश गाती श्रीभगवंता । त्यांच्या पुरवीं मनोरथा । मागधा दमा निर्दाळुनी ॥ १०० ॥ आणिक ऐकें भो वनमाळी । राजसूयार्थ मागध बळी । वधितां साधती अर्थ सकळी । भूमंडळीं अनायासें ॥ १ ॥

जरासन्धवध. कृष्ण भूर्यर्थायोपकल्पते । प्राय: पाकविपाकेन तव चाभिमत: क्रतु: ॥ १० ॥

मागध वधितां द्वंद्वयुद्धीं । बहुता अर्थांचिया सिद्धी । साधूनि येती कृपानिधि । विवरितां बुद्धीमाजि गमे ॥ २ ॥ बहुतेक पाकविपाकें करून । सर्वप्रकारें राजसूययज्ञ । संमत आहे तुजलागून । पाहें विवरून जनार्दना ॥ ३ ॥ पचौनि पक्वता जें जें पावे । त्यालागीं पाक ऐसें म्हणावें । तस्मात शुभाशुभ कर्म आघवें । पाक जाणावें श्रुतिगदित ॥ ४ ॥ विपाक म्हणिजे कर्मफळ । पाक परिणाम तो केवळ । तोही द्विविध होऊनि सकळ । तुज अनुकूळ मख साजे ॥ ५ ॥ म्हणसी द्विविध विपाक कैसा । मागधें रोधिल्या नृपांची आशा । पुण्यविपाकें फळेल सहसा । मागध नाशा पावेल ॥ ६ ॥ पापविपाकें जरासंध । भीमहस्तें पावेल वध । तस्मात राजसूयाख्य मेध । तुजलागीं प्रसिद्ध अभिमत हा ॥७॥ तुज गेलिया यज्ञागारा । सर्वही साधेल जगदीश्वरा । उद्धवें इतुकिया विचारा । द्वारकेश्वराप्रति कथिलें ॥ ८ ॥

श्रीशुक उवाच ॥ इत्युद्धववचो राजन्सर्वतोभद्रमच्युतम् । देवर्षिर्यदुवृद्धाश्च कृष्णश्च प्रत्यपूजयन् ॥ ११ ॥

शुक म्हणे गा कुरुवरपाळा । सर्वकल्याणफळीं सफळा । उद्धवें कथिली मंत्रमाळा । अक्षय सकळा सुखदात्री ॥ ९ ॥ इतुकी उद्धवमंत्ररचना । ऐकोनि संतोष ब्रह्मनंदना । म्हणे भला रे भला दाशार्हगणा । माजि वरिष्ठ वक्ता तूं ॥११०॥ यादवांमाजि वरिष्ठ वृद्ध । श्वफल्क देवक वसुदेव प्रसिद्ध । कुकुर माधव भोज अंध । साधुवादें गौरविती ॥ ११ ॥ तैसाचि श्रीकृष्ण म्हणे भला । उद्धवा जो त्वां मंत्र कथिला । अभिमत आम्हां समस्तांला । आणि धर्ममखाला अनुकूळ ॥ १२ ॥ राजसूययज्ञ पावेल सिद्धी । शरणनृपांची रक्षणाविधी । मागध आमुचा मुख्य दंदी । भीमें त्रिशुद्धी निवटिलिया ॥ १३ ॥ ऐसा यदुवृद्धीं गौरविला । कृष्णें साधुवादें पूजिला । चकाराख्ययें सम्मानिला । अनिरुद्धादि अवर वीरीं ॥ १४ ॥ सर्वीं ऐकूनि मंत्ररहस्य । हृदयीं मानिला परम तोष । परमोल्लासें द्वारकाधीश । आज्ञा नृपास मागतसे ॥ १५ ॥

अथाऽदिशत्प्रयाणाय भगवान्देवकीसुत: । भृत्यान्दारुकजैत्रादीननुज्ञाप्य गुरून्विभु: ॥ १२ ॥

आहुकराजा उग्रसेन । तया सम्मुख रुक्मिणीरमण । आज्ञा प्रार्थी कर जोडून । यज्ञार्थ प्रयाण करावया ॥ १६ ॥ गुरु म्हणिजे वडील वृद्ध । देवकवसुदेवादि प्रबुद्ध । त्यांसि आज्ञा मागूनि सिद्ध । करवी सन्नद्ध चित्रचमू ॥ १७ ॥ उद्धवमंत्र ऐकिल्यावरी । गुरुवरांची आज्ञा हरी । घेऊनि भृत्यांतें

पाचारी । दारुकजैत्रप्रमुखांतें ॥ १८ ॥ प्रयाणसंकेतसूचक भृत्य । त्यांसि स्वमुखें प्रयाणकृत्य । सांगतां सैनिकांप्रति तें त्वरित । कथिती वृत्तांत दीर्घरवें ॥ १९ ॥ प्रभु समर्थ जो दैत्यारी । इंद्रप्रस्था करितो स्वारी । पुत्र कलत्र सहपरिवारीं । सिद्ध दळभारीं होइजे ॥१२०॥ गज रथ तुरंग आणि पदाती । चमू चतुरंगिणी चंड निगुती । सन्नद्ध करा हे आज्ञा दूतीं । सैनिकांप्रति जाणवितां ॥ २१ ॥ सवेग ठोकिल्या प्रस्थानभेरी । गुढारें बाणलीं रथकुंजरीं । अश्व पल्याणिले वीरीं । पदाति शरीरीं वेंठले ॥२२॥ ऐकोनि प्रयाणभेरीगजर । सन्नद्ध करूनियां दळभार । सैनिकीं येऊनि यादवेश्वर । नमूंनि एकाग्र तिष्ठती ॥ २३ ॥ सन्नद्ध देखूनि प्रबळ चमु । भग आज्ञापी पुरुषोत्तमु । समस्त बंधूंचा पूर्णकामु । करावयार्थ सवें ने ॥ २४ ॥

निर्गमय्यावरोधान्स्वान्ससुतान्सपरिच्छदान् । संकर्षणमनुज्ञाप्य यदुराजं च शत्रुहन् ।
सूतोपनीतं स्वरथमारुहद् गरुडध्वजम् ॥ १३ ॥

सात्यकिनामा सिंहकप्रवर । त्यासि आज्ञापी जगदीश्वर । पुढें चालों द्या अंतःपुर । सोपस्कर सन्नद्ध ॥ २५ ॥ षोडश सहस्र अवरोधजन । दासी दास किङ्करगण । कुमरी हरिसंतान । परिवारून निघाले ॥ २६ ॥ प्रयाण करवूनि स्वान्तःपुरा । आज्ञा मागोनि रेवतीवरा । पुसोनि उग्रसेना नृपवरा । निघे सत्वरा तेथूनि ॥ २७ ॥ शत्रुचक्रातें संहर्त्ता । यदुचक्राचा प्रतिपालिता । त्या उग्रसेनाची आज्ञा माथां । वंदूनि निघता हरि झाला ॥ २८ ॥ शत्रुमथना परीक्षिति । राम द्वारकारक्षणाप्रति । संस्थापूनि रुक्मिणीपति । निघता झाला सेनेसीं ॥ २९ ॥ सभामंडपाबाहेर हरी । येतां दारुक विनति करी । स्वामी वैसावें रहंवरीं । रथ शस्त्रास्त्रीं सिद्ध असे ॥१३०॥ गरुडध्वजा लखलखित । तुरंगचौकीं जुंपिला रथ । दारुकें समीप आणितां त्वरित । स्वरथीं भगवंत आरूढला ॥ ३१ ॥ धरूनि सारथियाचा हस्त । रथीं वळघला कमलाकान्त । जेथें सेनेचा चतुष्पथ । पातला तेथ जगज्जेता ॥ ३२ ॥ ऐकोनि रथ-नेमीचा गजर । सवेग वरिष्ठ सेनाधर । भंवते मिनले अतिसत्वर । तोही प्रकार अवधारा ॥ ३३ ॥

ततो रथद्विपभटसादिनायकैः करालया परिवृत आत्मसेनया ।
मृदंगभेर्यानकशंखगोमुखैः प्रघोषघोषित्ककुभो निराक्रमत् ॥ १४ ॥

भंवते वरिष्ठ महारथी । अनेक विचित्र ध्वज शोभती । कित्तेक गजयानीं मिरवती । सन्नद्ध बद्ध शस्त्रास्त्रीं ॥ ३४ ॥ गगनगामी अश्वरत्नें । रत्नखचितें वरी पल्याणें । स्वार झाले राउत राणे । सायुधत्राणें मंडित जे ॥ ३५ ॥ पदातिवीर महासुभट । शस्त्रास्त्रबद्ध अभ्यासनिष्ठ । एवं चतुरंगिणी उद्भट । चाले वैकुंठ वेष्टूनी ॥ ३६ ॥ चतुरंगिणीचे यथूपति । वीरनायक जे जे होती । तिहीं वेष्टूनियां श्रीपती । भवंती चालतीं चक्रवत् ॥ ३७ ॥ ऐसे सैनिक यथाविभागें । दक्षिणोत्तर पुढें मागें । नेमिले जैसे जे श्रीरंगें । ते तद्विभागें चालती ॥ ३८ ॥ कराळ म्हणिजे भयंकर । प्रचंड सेनेचा

महापूर । वेष्टित निघाला यदुवीर । अपर भास्कर भूनभींचा ॥ ३९ ॥ घटिकायंत्रें मुहूर्तवेळा । सूचितां वाद्यांचा गजर झाला । पणव भेरी मृदंग काहळा । शंख गोमुख पटहादि ॥१४०॥ हस्तर्क्षींचीं मेघगर्जनें । कीं हिमगिरि दणाणी गंगापतनें । तेंवि गंभीर दुंदुभिस्वनें । काष्ठामंडळ प्रघोषित ॥ ४१ ॥ ऐसिया प्रचंड वाद्यगजरीं ॥ मुहूर्तवेळेच्या अवसरीं । द्वारकेबाहीर कैटभारी । निघता झाला शुभ शकुनें ॥ ४२ ॥ गंधाक्षता कुसुमहार । मंगळमंडित विप्रभार । पुढें देखूनि नमस्कार । करिता झाला यदुवर्य ॥ ४३ ॥ आशीर्वादांचिया श्रेणी । प्रयाणोचित सूक्तपठनीं । मंत्राक्षता वर्षतां मूर्ध्नी । धरानिर्जर जयघोषें ॥ ४४ ॥ पूर्ण कनककलश माथां । चेटिकाश्रेणी सम्मुख येतां । सव्य घालूनि मन्मथजानिता । इंद्रप्रस्था चालियला ॥ ४५ ॥ सुपुत्र वनिता पुत्र कडे । प्रयाणीं येतां देखूनि पुढें । शुभशकुनार्थ तियेतें कोडें । सव्य घालूनि चालती ॥ ४६ ॥ कुसुमेंसहित माल्यकार । अर्पिती सुमनांचे संभार । पुष्पावतंस सुमनहार । जयजय करोनि निवेदिती ॥ ४७ ॥ कावडीमाजि गोरसभरणी । पुढें भेटल्या बल्लवश्रेणी । माथां दधिदुग्धें घेऊनि । आल्या गौळणी सम्मुख ॥ ४८ ॥ सवत्स धेनु दक्षिणभागीं । चास नकुळ शिखी वामांगीं । इत्यादि शुभशकुनप्रसंगीं । निघे शार्ङ्गी शक्रप्रस्था ॥ ४९ ॥ द्वारकेबाहीर जनार्दन । सेनामंडित निघतां पूर्ण । तंव तो अंतःपुर घेऊन । झाला युयुधान अनुयायी ॥ ५० ॥ अष्ट पट्टमहिषी प्रवर । अवर सशत षोडश सहस्र । एवं अंतःपुर समग्र । कुमरी कुमरां समवेत ॥ ५१ ॥ पूर्वी कृष्णाज्ञेप्रमाणें । पुढें अंतःपुर युयुधानें । नेलें होतें तें या क्षणें । केलें तेणें अनुयायी ॥ ५२ ॥ श्लोकद्वयें तें निरूपण । परीक्षितीतें शुक भगवान । कथिता झाला तें व्याख्यान । सावधान अवधारा ॥ ५३ ॥

नृवाजिकाञ्चनशिबिकाभिरच्युतं सहात्मजाः पतिमनु सुव्रता ययुः ।
वरांबराभरणविलेपनस्रजः सुसंवृता नृभिरसिचर्मपाणिभिः ॥ १५ ॥

यानारूढ हरिकामिनी । कित्तेक मिरवती सुखासनीं । कित्तेक वरिष्ठा अश्वयानीं । काञ्चनशिबिकारूढ एकी ॥५४॥ आत्मजांसहित यानारूढा । सपूर सूक्ष्म वसनीं गूढा । पतिव्रता नियमदृढा । परम सुघडा हरिरमणी ॥ ५५ ॥ इत्यादि मंडित नाना यानीं । अच्युतातें अनुलक्षूनी । पट्टमहिषी अनुगामिनी । तदनु श्रेणी अवरांच्या ॥ ५६ ॥ वसनाभरणीं सालंकृता । मलयजकर्दम कुंकुमीं लिप्ता । पार्यातसुमनें ग्रथिलीं माथां । कंठीं हार विराजती ॥ ५७ ॥ कृष्णरथाच्या पश्चाद्भागें । वनितायानें चालती वेगें । भंवते पुरुष खेटकें खड्गें । धरूनि निजाङ्गें खोलती ॥ ५८ ॥ वनितायानांभंवते नर । चालती खड्गखेटकधर । वसनाभरणीं सालंकार । सुमनहार अवतंसीं ॥ ५९ ॥ मस्तकीं सुरंग शिरोवेष्टनें । जानूपर्यंत अंगत्राणें । चरणकंचुकादि परिधानें । पादत्राणें दृढ चरणीं ॥१६०॥ इत्यादि किंकरनराची घरटी । यानें चालती घडघडाटी । अपरा विविध यानीं चेटी । शुक वाक्पुटीं वाखाणी ॥ ६१ ॥

नरोष्ट्रगोमहिषखराश्वतर्यनः करेणुभिः परिजनवारयोषितः ।
स्वलंकृताः कटकुटिकंबलांबराद्युपस्करा ययुरधियुज्य सर्वतः ॥ १६ ॥

दासि किंकरी वारांगना । दिव्यनटिनी स्वर्गभूषणा । आरूढोनियां विविध याना । कृष्णाङ्गनानुगा ज्या ॥६२॥ विविध यानांची ऐका रीती । एक नरयानीं शोभती । क्रमेळपृष्ठीं विराजती । एक वळघती बलीवर्दीं ॥ ६३ ॥ महिषारूढा कित्येक दासी । शोभती खरयानें एकीसी । अश्वापाशानि खरींच्या कुसीं । जन्मल्या त्या अश्वतरी ॥ ६४ ॥ कित्येक वाहिल्या तयांच्या पृष्ठीं । अपरा राजती हास्तिनीपाठीं । एक किंकरी बैसल्या शकटीं । घडघडाटीं पथ क्रमिती ॥६५॥ सालंकृता वसनाभरणीं । उशीरमूळिकादी विविध तृणीं । कट निर्मिले तिंहींकरूनी । विविधा यानीं गुढारिल्या ॥ ६६ ॥ आंत बैसल्या बाहिर दिसे । बाह्य जनांतें अंतस्थ न दिसे । कटकुटिकादि आवरणविशेषें । गुप्ता संवृता निजयानीं ॥ ६७ ॥ कित्तेक कंबळजा तिपट । अंतर्धानीं योजिले स्पष्ट । कित्तेक सूक्ष्म वसनें धुवट । योजिल्या निघोंट जवनिका ॥ ६८ ॥ सुरंगें विस्तीर्ण चित्रासनें । वसनप्रकार बृहद्वितानें । विशाळ शिबिरें विविध वर्णे । शकटीं उष्ट्रीं गजपृष्ठी ॥ ६९ ॥ कनकरत्नरजतपात्रें । ग्रंथितें नरनारींचीं वस्त्रें । सुगंध द्रव्यें चित्रविचित्रें । वोझीं अपरें चालविती ॥ १७० ॥ प्राकारभिंत्ति जैशा सदनीं । तैशा वसनकंबळात्मका यानीं । कुड्यात्मकीं शिबिरावरणीं । शकटीं वाहनि चालवती ॥ ७१ ॥ बळिष्ठ बळीवर्द जुंथिले शकटीं । सन्नद्ध बद्ध सज्जिले करटी । रथगजाश्वां झोडिती साठीं । चालती थाटीं अनुयायी ॥ ७२ ॥ ऐसे कृष्णाचे अवरोध । कृष्णानुलक्षें सन्नद्ध बद्ध । विचित्रयानीं कथिले विविध । सेना साद्यंत अवधारा ॥ ७३ ॥

बलं बृहद्ध्वजपटछत्रचामरैर्वरायुधाभरणकिरीटवर्मभिः ।
दिवांशुभिस्तुमुलरवं बभौ रवेर्यथाऽर्णवः क्षुभिततिमिंगिलोर्मिभिः ॥ १७ ॥

प्राक् प्रत्यक् दक्षिणोत्तर । बृहत्सेनांचा विस्तार । रचूनि चालिला वीरभार । गमे सागर संक्षुब्ध ॥ ७४ ॥ कनकदंडी पताकाछत्रें । मेघडंबरें आतपत्रें । रत्नजडितें कार्तस्वरें । कलशशिखरें लखलखिती ॥ ७५ ॥ गजादि वरयानीं यूथप । मुख्य जे जे सामंतभूप । चामरें तळपती या समीप । रत्नकल्प प्रकाशती ॥ ७६ ॥ उत्तमोत्तमें शस्त्रें विविधें । ज्यांतें बोलिजे वरायुधें । सूर्यकिरणांच्या संबंधें । तेजें समुदें भारती ॥ ७७ ॥ खड्गमुष्टी रत्नखाचिता । चर्मपृष्ठीं चन्द्रान्विता । भल्लफलकावली निशिता । तीक्ष्णीकृता कर्म्मारी ॥७८॥ अश्वगजरथादि आभरणें । तीं लोपिती रविकिरणें । वीरा अंगींचें विविध लेणें । दिव्यभूषणें लखलखती ॥७९॥ कुंडलें कटकें करमुद्रिका । विचित्र बाहुभूषणें देखा । मुक्ताफळादि अनेका । कंठमाळिका रत्नमया ॥१८०॥ कटिप्रदेशी शस्त्रधारणें । चर्मनिर्मित कटिवेष्टणें । रत्नखाचितें दिव्यसुवर्णें । बद्ध कृपाणयमदंष्टा ॥ ८१ ॥ वज्रकिरीट लखलाखिती । वर्मे कनकोदकीं झळकती । एवमादिकीं प्रतिबिंबती । प्रचंड किरण तरणीचे ॥ ८२ ॥ त्यांमाजी दुंदुभीचे घनरव । विविध वाद्यें

वाजती सर्व । तेणें तुंबळ चमूगौरव क्षुब्धार्णवसम शोभे ॥ ८३ ॥ तिमिंगिलादि यादोगणीं । क्षुब्ध तळपतां झळकती किरणीं । पाच वज्रेंद्र रत्नमणी । सलील चलनीं लखलखिती ॥ ८४ ॥ तिमिंगळादि महाविशाळ । उल्हाळ घेती जळचरमेळ । तेणें चंडोर्मिकल्लोळ । गमती केवळ दळश्रेणी ॥ ८५ ॥ ऊर्मीमागें धांवती ऊर्मी । जवीन सेना तैसी भूमी । सिंधुगर्जनान्यायें व्योमीं । कुंजरभेरी दणाणिती ॥ ८६ ॥ एवं संक्षुब्ध सलिलराशी । बृहत्सेना भासे तैसी । यानंतर तो नारदामी । कृष्ण विसर्जी तें ऐका ॥ ८७ ॥

अथो मुनिर्यदुपतिना सभाजितः प्रणम्य तं हृदि विदधद्विहायसा ।
निशम्य तद्व्यवसितमाहृतार्हणो मुकुंदसंदर्शननिर्वृतेंद्रियः ॥ १८ ॥

यदुपती जो कां श्रीभगवान । तेणें नारद सभामान्य । अत्यादरें नमस्कारून । अंगीकारून तत्प्रणीत ॥ ८८ ॥ निघता झाला इंद्रप्रस्था । उद्योग देखूनि मुनीच्या चित्ता । सर्वेन्द्रियीं आल्हाद-सरिता । हरिदर्शनें तुंबळली ॥ ८९ ॥ नारदें घेऊनि हरिकृत पूजा । ऐकूनि व्यवसित मंत्रबीजा । हृदयीं चिंतूनि गरुडध्वजा । जाता झाला नभःपथें ॥ १९० ॥ ऐसा विसर्जून नारद । राजदूतातें गोविन्द । आश्वासिता झाला विशद । तो अनुवाद अवधारा ॥ ९१ ॥

राजदूतमुवाचेदं भगवान्प्रीणयन्गिरा । मा भैष्ट दूत भद्रं वो घातयिष्यामि मागधम् ॥ १९ ॥

अमृतापरिस मधुरोत्तरीं । राजदूतातें श्रीहरी । अश्वासोनि नाभीकारीं । म्हणे अवधारीं प्रति-वचन ॥ ९२ ॥ जाय नृपातें कथीं मात । मागधाचा मी करीन घात । तुम्हां कल्याण इत्थंभूत । झालों विमुक्त हें माना ॥ ९३ ॥ भेऊं नका येथूनि आतां । मागध मारूनि तुम्हां समस्तां । मुक्त करीन ऐसी वार्ता । कथी दुःखिता नृपवर्गा ॥ ९४ ॥ ऐसें बोलिला जगदीश्वर । ऐकूनि दूतासि आल्हाद थोर । म्हणे साधला शुभावसर । केला निर्धार हृत्कमळीं ॥ ९५ ॥

इत्युक्तः प्रस्थितो दूतो यथावदवदन्नृपान् । तेऽपि संदर्शनं शौरेः प्रत्यैक्षन्यन्मुमुक्षवः ॥ २० ॥

ऐसा बोलिला असतां दूत । आज्ञा घेऊनि निघाला त्वरित । सर्व नृपांतें यथावृत्त । कथिला-वृत्तान्त अभयाचा ॥ ९६ ॥ दूतमुखें ते अभयवाणी । ऐकोनि भूभुज हरिदर्शनीं । सप्रेम उत्सुक अंतः-करणीं । निजमोक्षणीं मुमुक्षु जे ॥ ९७ ॥ प्रतीक्षा करिती त्या समयाची । मुक्तता होईल कैं आमुची शांति करुनि मागधाची । आम्हां सुखाची हरिप्राप्ति ॥ ९८ ॥ दूतवचनें उत्साहभरित । नृपति झाले ते समस्त । त्यावरी सेनेसीं श्रीकांत । लंघी पथ तें ऐका ॥ ९९ ॥

आनर्त्तसौवीरमरूंस्तीर्त्वा विनशनं हरिः । गिरीन्नदीरतीयाय पुरग्रामव्रजाकरान् ॥ २१ ॥

प्रथमदिवशीं आनर्त्तदेश । सौवीरलंघना द्वितीय दिवस । तिसरे दिवसीं हृषीकेश । मरुमंडला पातला ॥ २०० ॥ मरुमंडळीं निर्जळमही । तो देश लंघूनि शेषशायी । पुष्करतीर्था सह समुदायीं । क्रमिलें त्रिरात्र संतोषें ॥ १ ॥ राठापुरीचा अवघड घाट । लंघूनि चालिले घडघडाट । कुरुक्षेत्रीं श्रीवैकुंठ । झाला प्रविष्ट सेनेसीं ॥ २ ॥ तेथ क्रमूनि पंचरात्र । तीर्थविधानें यथासूत्र । आचरूनि सह कलत्र । आणि सर्वत्र कटकेंसी ॥ ३ ॥ मार्गीं लंघूनि दुर्गम गिरि । दुस्तर सरिता चक्रमूनि हरि । पुरीं ग्रामीं व्रजीं आकरीं । पृथगाकारीं कृत वसती ॥ ४ ॥ परिवारेंसी प्रयाण केलें । म्हणोनि मार्गीं स्थिर चाले । तत्प्रसंगें दाखविले । नाना देश वधूवर्गा ॥ ५ ॥ नाना नद्या नाना गिरि । नानातीर्थीं क्षेत्रीं उपरीं । राहूनि तेथींचा महिमा हरि । प्रकट करी सर्वांतें ॥ ६ ॥

ततो दृषद्वती तीर्त्वा मुकुंदोऽथ सरस्वतीम् । पञ्चालानथ मत्स्यांश्च शक्रप्रस्थमथागमत् ॥ २२ ॥

त्यानंतरें दृषद्वती । परम दुर्गम जीतें म्हणती । तेही लंघूनि रुक्मिणीपती । मध्यप्रान्ती पातला ॥ ७ ॥ तदुपरि सरस्वतीचें पाणी । परिवारेंसी चक्रपाणी । त्रिरात्र प्राशूनि विधिविधानीं । पांचाळधरणी अतिक्रमिली ॥ ८ ॥ तयापुढें मत्स्यविषय । लंघूनि चालिला देवकीतनय । पुढें प्रेरिला वार्तिकनिचय । सबंधु कुरवर्य बोधावया ॥ ९ ॥ यावरी शक्रप्रस्था हरि । येता झाला सह परिवारीं । वार्ता-ऐकुनि पाण्डुकुमरीं । तोषले भारी तें ऐका ॥ २१० ॥

तमुपागतमाकर्ण्य प्रीतो दुर्दर्शनं नृणाम् । अजातशत्रुर्निरगात्सोपाध्यायः सुहृद्वृतः ॥ २३ ॥

समीप ससैन्य हृषीकेशी । आला म्हणूनि वार्ता ऐसी । श्रवणीं पडतां पाण्डवांसी । तोष मानसीं न सांठे ॥११॥ परमप्रीतीनें आथिला । म्हणे अलभ्य लाभ झाला । ज्याचें दर्शन मनुष्याला । दुःखें श्रमतां दुर्लभ पै ॥ १२ ॥ श्रीकृष्णाच्या दर्शनासाठीं । एक रिघती गिरिकपाटीं । दुर्धर तपश्चर्यांच्या कोटी । करिती हठी दृढनियमें ॥ १३ ॥ वात पर्जन्य शीत उष्ण । साहती होऊनियां वितृष्ण । इत्यादि दुःखें त्यां दर्शन । दुर्लभ पूर्ण मनुजांतें ॥ १४ ॥ तो हा प्रत्यक्ष पंकजपाणी । आला शक्रप्रस्थालागुनी । परम भाग्योदय मानूनी । कुरुवरमणी हरिखेला ॥ १५ ॥ अजातशत्रु धर्मराजा । भेटावया गरुडध्वजा । निघता झाला कोणे वोजा । उत्तरातनुजा तें ऐका ॥१६॥ बंधु सुहृद उपाध्याय । मंत्री अमात्य सह समुदाय । ज्येष्ठकनिष्ठ भगवत्प्रिय । परिवेष्टित निघाला ॥ १७ ॥ जैसा उत्साह झाला मनीं । तो अवतरला सर्वां करणीं । तेणें सभ्रम कुरुपाटनीं । ऐका श्रवणीं तो आतां ॥१८॥

गीतवादित्रघोषेण ब्रह्मघोषेण भूयसा । अभ्ययात्स हृषीकेशं प्राणाः प्राणमिवादृतः ॥ २४ ॥

कृष्णाभिगमना कुरुराव । निघतां निशाणीं घातला घाव । तेणें हरिदर्शनातें सर्व । निघती मानव पुरवासी ॥ १९ ॥ ताल मृंदग वीणे चंग । घन कांसोळा वितंतोपांग । पणवपटहप्रमुख चांग ।

वाजती साग वाजंत्रें ॥२२०॥ गायक गाती सप्तस्वरीं । नृत्य करिती नृत्यकारी । जेंवि अप्सरा अमरपुरीं । तेंवि सुंदरी वारांगना ॥ २१ ॥ वादित्रघोषें भरलें नभ । त्यामाजि ब्रह्मघोष स्वयंभ । कृष्णप्रेमाचें वालभ । मानूनि दुर्लभ द्विज पढती ॥ २२ ॥ ब्राह्मणोत्तम धर्मानिकटीं । विष्णुसूक्तीं शान्तिपाठीं । शाखाभेदें घडघडटीं । मंत्र वाक्पुटीं पढताती ॥ २३ ॥ शाकल वाष्कल आश्वलायन । माण्डूकेयादि वह्वृचगण । ऋग्वेदाचें करीत पठन । आशीर्वचन पुरःसर ॥२४॥ कृष्णयजुप यातयाम । तैत्तिर ऐसें जयासि नाम । शाखाषट्कें पुरुषोत्तम । स्ववितो सप्रेम श्रुतिघोषें ॥ २५ ॥ अयातयामत माध्यंदिन । याज्ञवल्क्य कात्यायन । वाजसनेयप्रमुख गण । करिती स्तवन शुक्लयजु ॥२६॥ सहस्रशाखी जे सामक । सामें बृहत्सामादिक । पठनीं स्तविती पुण्यश्लोक । नित्य निर्दोष शुभसूक्तीं ॥ २७ ॥ तैसेचि अथर्वांगिरस । अथर्वहृदय शिरोरहस्य । मंत्रप्रयोगपठनीं घोष । करूनि जगदीश तोषविती ॥ २८ ॥ भूयसा म्हणिजे बहु ब्राह्मण । बहुशाखांचें बहुधा पठन । करितां ब्रह्मघोषें गगन । नादें संपूर्ण कोंदलें ॥ २९ ॥ ऐसा युधिष्ठिर कृष्णाप्रति । गेला सामोरा अतिप्रीति । प्राणांसम्मुख इंद्रियवृत्ति प्रफुल्ल होती जयापरी ॥ २३० ॥ प्रावृटीं सुभरें वर्षतां मेघ । ब्रह्माद्रीहूनि गौतमीवोघ । ठाकी महोदधीचें आंग । तेंचि श्रीरंग युधिष्ठिरें ॥ ३१ ॥

दृष्ट्वा विक्लिन्नहृदयः कृष्णं स्नेहेन पांडवः । चिराद्दृष्टं प्रियतमं सस्वजेऽथ पुनःपुनः ॥ २५ ॥

ऐसा महोत्साह सप्रेमगजरीं । युधिष्ठिर सहित बंधु चाऱ्ही । पुढें येऊनि अत्यादरीं । पाहे मुरारी निज नयनीं ॥ ३२ ॥ धर्मे देखोनि श्रीकृष्णातें । हृदयीं कोंदलें सप्रेम भरतें । हृदय द्रवलें चंद्रकान्तें । चंद्रदर्शना जेंवि लाहतां ॥ ३३ ॥ हरि जगदात्मा जगत्प्रिय । सुहृद्भावें मातुलेय । चिरकाळें तो अज अव्यय । देखोनि तन्मय युधिष्ठिर ॥ ३४ ॥ कृष्ण धर्मा जों नमस्कारी । येरू कवळी वरिच्यावरी । आलिङ्गूनि हृदयीं धरी । प्रेमलहरी अनावर ॥ ३५ ॥ पुनःपुनः दृढालिङ्गी । ते घटिकेचा आल्हाद त्रिजगीं । उमाणूं न शकती भोगी त्यागी । अथवा योगी आत्मरत ॥ ३६ ॥

दोर्भ्यां परिष्वज्य रमामलालयं मुकुंदगात्र नृपतिर्हताशुभः ।
लेभे परां निर्वृतिमश्रुलोचनो हृष्यत्तनुर्विस्मृतलोकविभ्रमः ॥ २६ ॥

दोर्भ्यां म्हणिजे दोहीं बाही । रमानिलय जें निर्मळ पाहीं । श्रीकृष्णहृदय तें आपुलें हृदयीं । धर्म लवलाहीं आलिंगी ॥ ३७ ॥ कुरुवंशीं जो सार्वभौम । भविष्यमाण राजा धर्म । तेणें आलिंगूनि मुकुंदवर्म्म । जाला निःसीम हुतशुभ ॥ ३८ ॥ आयसा आलिंगी स्पर्शमणी । अशुभ काळिमा तेचि क्षणीं । सांडूनि निवडे स्वर्णपणीं । दिव्याभरणीं हेम जैसें ॥ ३९ ॥ तेंवि कवळूनि मुकुंदगात्र । निष्पाप झाला युधिष्ठिर । सबाह्य परमानंद प्रचुर । नयनीं पाझर प्रेमाचे ॥२४०॥ हर्षनिर्भर झाली तनु । तेणें रोमांचपुलकोद्गमन । आपादमस्तक स्वेदजीवन । विश्रांतिपवनें सकंप ॥ ४१ ॥ श्वासविगत लागली

काष्ठा । विस्मृत लौकिक विक्रम चेष्टा । बाणली कृष्णवेधैकनिष्ठा । अखिल कष्टां नष्टत्व ॥ ४२ ॥
कृष्णालिंगनीं ऐसी दशा । धर्मा झाली कुरुनरेशा । त्यानंतरें भीम कैसा । भेटला ईशा तें ऐका ॥ ४३ ॥

तं मातुलेयं परिरभ्य निर्वृतो भीमः स्मयन्प्रेमजवाकुलेंद्रियः ।
यमौ किरीटी च सुहृत्तमं मुदा प्रवृद्धबाष्पाः परिरेभिरेऽच्युतम् ॥ २७ ॥

आपुल्या मातुळाचा पुत्र । कृष्ण परमात्मा त्रिजगन्मित्र । आलिंगूनि त्याचें गात्र । झाला चिन्मात्रमय भीम ॥ ४४ ॥ प्रेमवेधें हरिली स्मृती । विराली देहभावाची ज्ञप्ति । आनंदजीवनें नेत्र ढळती । परम विश्रांती उपलब्ध ॥ ४५ ॥ लवण भेटतां स्वकारणा । विसरे आंगींच्या कठिनपणा । तेंवि करणां प्राणांसह अभिमाना । माजि चैतन्या नुरणूक ॥ ४६ ॥ भीम भेटला ऐसिये परी । मग अर्जुनें आणि माद्रीकुमरीं । सोयरा जिवलग श्रीमुरारी । सप्रेमभरीं अलिंगिला ॥ ४७ ॥ त्र्यंबकीं लागतां घन वांकुडी । गौतमीपात्र भरे तांतडी । तेंवि अष्टभावांची प्रवृद्ध प्रौढी । नेत्रीं अनुघडी सुख बाष्पा ॥ ४८ ॥ अच्युतालिंगनें ऐसी स्थिती । माद्रीकुमारांसी अर्जुनाप्रति । जालियावरी परिष्वंगरीती । कौरवपति अवधारीं ॥ ४९ ॥

अर्जुनेन परिष्वक्तो यमाभ्यामभिवादितः । ब्राह्मणेभ्यो नमस्कृत्य वृद्धेभ्यश्च यथार्हतः ॥ २८ ॥

आधीं वंदूनि ब्राह्मणां । मग भेटावें कुरुनंदना । ऐंशिया क्रमाच्या लंघना । घडलें कृष्णा या साठीं ॥ २५० ॥ पाण्डवांचा प्रेमोत्कर्ष । देखोनि कळवळिला जगदीश । धांवूनि वंदितां धर्मास । तेणें परेश वरि धरिला ॥ ५१ ॥ क्षेमालिंगनीं भेटतां धर्म । वयें आगळा जाणोनि भीम । कृष्णें करूं जातां प्रणाम । धरी तो वर्ष्म उचलूनी ॥ ५२ ॥ भीमें आलिंगिला कृष्ण । अर्जुनें वंदितां श्रीकृष्ण-चरण । कृष्णें समयवस्क तो जाणून । क्षेमा कवळून सुखी केला ॥ ५३ ॥ त्यानंतरें माद्रीपुत्रीं । श्रीकृष्णचरण उत्तमगात्रीं । स्पर्शोनि बाष्पोदकें नेत्रीं । द्रवतां भूपात्रीं क्षाळिले ॥ ५४ ॥ कृष्णें स्पर्शोनियां करतळें । अवघ्राळ केलीं उभयमौळें । मग वंदिलीं द्विजांचीं कुळें । त्यावरी नमिले कुरुवृद्ध ॥ ५५ ॥ प्रधान मंत्री अमात्य सचिव । नगरनागरिक महाजन सर्व । तिहीं वंदितां द्वारकाराव । सम्मान यथार्ह त्यां दिधला ॥ ५६ ॥ त्यावरी राजे माण्डलिक । कृष्णदर्शनें पावले हरिख । नमिते झाले एकें एक । तो हा श्लोक अवधारा ॥ ५७ ॥

मानिनो मानयामास कुरुसृंजयकैकयान् । सूतमागधगंधर्वान्बंदिनश्चोपमंत्रिणः ॥ २९ ॥

कुरुदेशींचे सामंत पृथक । सृंजय कैकय कोसल प्रमुख । उभे ठाकूनि कृष्णसम्मुख । दंडप्राय नमिताती ॥ ५८ ॥ त्यांमाजि पूर्वीं वृद्धमान्य । त्यांतें तैसाचि सम्मान । देऊनियां जनार्दन । संतोषविता जाहला ॥ ५९ ॥ पुढें सूत मागधबंदी । कौतुकें दर्शक जे विनोदी । एवं उपमंत्री इत्यादि ।

पाहोनि संधी स्तव करिती ॥ २६० ॥ वंदूनि श्रीकृष्णाचे चरण । सूत मागध बंदिजन । विद्योपजीवी प्रशंसन । करिती स्वगुण प्रकटूनी ॥ ६१ ॥

मृदंगशंखपटहवीणापणवगोमुखैः । ब्राह्मणाश्चारविंदाक्षं तुष्टुवुर्ननृतुर्जगुः ॥ ३० ॥

मुरजमंदल मृदंगजजाती । कंबु कल्याणरवें गर्जती । चर्मापिनद्धपटहपंक्ती । ढके दुंदुभि पणवादि ॥ ६२ ॥ ब्रह्मविपंची रुद्रवीणा । शारदा वल्लकीवादनप्रवीणा । सप्तस्वरीं गायनरचना । सारमंडळें सुरतंत्री ॥ ६३ ॥ मुखश्वासपूरित वाद्यें । तद्विद वाहूनि दाविती विद्ये । घंटा जेंगटें झल्लरी शब्दें । ताळ कांसोळ किंकिणिका ॥ ६४ ॥ वदना स्पष्ट अष्टोधारी । वेणु वाजती सप्तस्वरीं । नटवे नटिनी नृत्यकारी । नृत्य करिती चपळांगीं ॥ ६५ ॥ सप्तस्वरीं गंधर्व गाती । किन्नर किन्नरी ताल धरिती । दिव्याप्सरी नृत्य करिती । रंग भरिती तौर्यत्रिक ॥ ६६ ॥ सूत मागध बंदिजन । करिती वंशप्रशंसन । भाट विरुदावळीचें पठन । करिती वदनीं दीर्घस्वरें ॥ ६७ ॥ शांतिपाठ कल्याणसूक्तें । पढती द्विजवर्य वेदोक्तें । एक पढताती निरुक्तें । सांगोपांग वेदांगें ॥ ६८ ॥

एवं सुहृद्भिः पर्यस्तः पुण्यश्लोकशिखामणिः । संस्तूयमानो भगवान्विवेशालंकृतं पुरम् ॥ ३१ ॥

ऐसिया प्रकारें सुहृदस्वजनीं । परिवेष्टित चक्रपाणी । पुण्यश्लोकांचा मुकुटमणी । नानास्तवनीं स्तविताती ॥ ६९ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न । तो परमात्मा जनार्दन । सालंकृत धर्मपत्तन । प्रवेशला सैन्यें सीं ॥ २७० ॥ सालंकृत म्हणाल कैसें । शुकें वर्णिलें जें समासें । भाषाव्याख्यानही तैसें । श्रोतीं अल्पसें परिसावें ॥ ७१ ॥

संसिक्तवर्त्म करिणां मदगंधतोयैश्चित्रध्वजैः कनकतोरणपूर्णकुंभैः ।
मृष्टात्मभिर्नवदुकूलविभूषणस्रग्गंधैर्नृभिर्युवतिभिश्च विराजमानम् ॥ ३२ ॥

दों श्लोकीं तें पुर शोभन । सालंकृत कीजे श्रवण । जेथ प्रवेशतां भगवान । पाहे संपूर्ण पुर-लक्ष्मी ॥ ७२ ॥ मत्त गजांचें दानोदक । गंधाथिले उन्मादक । केशर कस्तूरी चंदनपंक । तिहीं सम्यक पथ सिक्त ॥ ७३ ॥ विचित्रवसनध्वजांच्या श्रेणी । उच्च उज्ज्वल शोभती गगनीं । समुक्त तोरणें कनकपर्णीं । द्वारीं गोपुरीं सर्वत्र ॥ ७४ ॥ कनककुंभाम्भपूर्ण द्वारीं । उभय भागीं वृद्धाचारीं । तिहीं करूनि कुरुनृपनगरी । अमरपुरश्री लाजवी ॥ ७५ ॥ उद्वर्तनाभ्यक्त स्नात । दिव्य वसनें परिवेष्टित । विचित्र ललामपुरटघटित । सालंकृत नरनारी ॥ ७६ ॥ सहज विचरतां कुरुवरपुरीं । गमती निर्जर सह अप्सरी । गंधकुंकुमीं प्रसूनहारी । दिसे साजिरी पुरशोभा ॥ ७७ ॥

उद्दीप्तदीपवलिभिः प्रतिसद्मजालनिर्यातधूपरुचिरं विलसत्पताकम् ।
मूर्द्धन्यहैमकलशै रजतोरुशृंगैर्जुष्टं ददर्श भवनैः कुरुराजधाम ॥ ३३ ॥

राजमार्गाच्या उभयप्रांतीं । सदनराजी विराजती । पूर्णकनककलशपंक्ती । वरी दीप शोभती प्रज्वलित ॥ ७८ ॥ पुष्पें फळें पल्लव दधी । साक्षतसदीप मंगळविधी । वृद्धाचार कल्याणवृद्धी । कुरुपुरऋद्धि हरि पाहे ॥ ७९ ॥ प्रासादगर्भीं दामोदरीं । गवाक्षमार्गीं जालरंध्रीं । दशांग जळतां धूम्रपिंजरीं निघे वाहेरी मघमाघित ॥२८०॥ धूम्रपिंजरी गगनगामी । चैलपताका झळकती व्योमीं । तेणें कुरुवरपुरींची लक्ष्मी । अमरसद्मीं असाम्य ॥ ८१ ॥ रजतशृंगें प्रासादशिखरीं । हेमकलशांच्या त्यांवरी हारी । वैदूर्यमणी भास्करापरी । कलशमूर्ध्निस्थ प्रकाशती ॥ ८२ ॥ इत्यादि अनेकशोभाजुष्टें । भुवनें विराजती घनदाटें । पद्मासद्में रविकरस्पृष्टें । श्रीवैकुंठें विलोकिलीं ॥ ८३ ॥ तैसी अनेक श्रीमद्भवनीं । मंडित कुरुवरराजधानी । पहाता झाला चक्रपाणी । सहज कुमुदिनी सरेंदुवत् ॥ ८४ ॥ असो ऐशी पुरप्रवेशीं । धर्मभवनींची हृषीकेशी । साकल्य शोभा ससैन्येंसीं । पाहोनि मानसीं आह्लादे ॥ ८५ ॥ पुरीं प्रवेशला श्रीपती । ऐकोनि पुरवनितांच्या चित्तीं । निसर्गोत्साह चापल्य प्रीती । ते व्युत्पत्ति अवधारा ॥ ८६ ॥

प्राप्तं निशम्य नरलोचनपानपात्रमौत्सुक्यविस्रथितकेशदुकूलबंधाः ।
सद्यो विसृज्य गृहकर्मपतीश्च तल्पे द्रष्टुं ययुर्युवतयः स्म नरेंद्र मार्गे ॥ ३४ ॥

सर्वां योनींमाजि सार । नरदेह जो कां पुण्यप्रचुर । त्याहीमाजि सभ्याग्यनर । सुकृती सुंदरतर पाहती ॥ ८७ ॥ श्रवणेंद्रियासी श्राव्यामृत । हरिगुणकीर्तन विबुधप्रणीत । तेंवि नेत्रेन्द्रियासी रुचिरामृत । उत्कट मन्मथसौंदर्य ॥ ८८ ॥ ऐशा अनेक मन्मथकोटी । लोपती ज्याचिये कटाक्षदृष्टी । लावण्यरससिंधु ये सृष्टी । तो जगजेठी श्रीकृष्ण ॥ ८९ ॥ केवळ कृष्णमूर्ति तें भाजन । लावण्यरसें भरलें पूर्ण । अगाध सुकृती जे जे जन । नयनीं पान ते करिती ॥ २९० ॥ ऐसें कृष्णाचें लावण्य । दुर्लभ म्हणोनि होतें श्रवण । नगरीं आला हें ऐकोन । उत्सुक संपूर्ण नरनारी ॥ ९१ ॥ जो नरलोचना पानपात्र । लावण्यरसपानें नरनेत्र । न धाती तेथ नारीगात्र । विह्वळतर किती म्हणिजे ॥ ९२ ॥ सादर पहावया श्रीरंग । प्रेमविह्वळ वनितावर्ग । विस्मृत देहगेहप्रवृत्तिमार्ग । निघती सवेग विवशत्वें ॥ ९३ ॥ विसरीं विसर्जिलीं गृहकृत्यें । त्यजिलीं स्तनपानीं अपत्यें । विस्मृत भूषणें अस्ताव्यस्तें । हरी स्मृतीतें हरिस्मरणें ॥ ९४ ॥ सद्य म्हणिजे तेच क्षणीं । कृष्ण पहावया निज ईक्षणीं । मंचकीं स्वपती सांडूनि शयनीं । सवेग कामिनी धांविनल्या ॥ ९५ ॥ धांवतां सुटले केशपाश । श्लथित नीवी विगलित वास । स्वजनत्रपेचा झाला ह्रास । राजमार्गास वधू आल्या ॥९६॥ ज्यांचें पदनख जनांचे नयनीं । न दिसे ऐशा निगूढ सदनीं । त्या धांवती श्लथितां वसनीं । कृष्णागमनीं पुरवनिता ॥ ९७ ॥ भो परीक्षिती कुरुनरेन्द्रा । येतां लावण्यरससमुद्रा । प्राशावया तन्मुखचंद्रा । नयनचकोरां उल्लास ॥ ९८ ॥ ऐशा धांवती विगतस्मृति । तमिस्रा भीकर हें न म्हणती । पुढें जाऊनि काय करिती । तें कुरुनृपती अवधारीं ॥ ९९ ॥

तस्मिन्मुसंकुल इभाश्वरथद्विपद्भिः कृष्ण सभार्यमुपलभ्य गृहाधिरूढाः ।
नार्यो विकीर्य कुसुमैर्मनसोपगुह्य सुस्वागतं विदधुरुत्स्मयवीक्षितेन ।। ३५ ।।

सुतराम् म्हणिजे वरवेपरी । तया मार्गाचे ठायीं हरी । संकूल इभाश्वनररहंवरीं । नलभती नारी रीघ तेथें ।। ३०० ।। मग वेधल्या दामोदरीं । पथोपभागीं दोहीं हारी । वळघल्या माडिया गोपुरीं । पाहती सुंदरी कृष्णातें ।। १ ।। मागें पुढें जनपदभार । रथाश्वपदातिं कुंजर । भार्यापुत्रेंसीं यदुवीर । प्राशिती मादर तृषिताक्षी ।। २ ।। नारीनयनकुमुदें ऊर्ध्व । हरिमुखचंद्रमा देखती अध । विपरीत अळंकारोक्तिबोध । अळंकारकोविद अनुभविती ।। ३ ।। ललना हरिमुख पाहोनि दृष्टी । सप्रेम करिती प्रसूनवृष्टि । मनोबाहीं लावण्यमुकुटीं । तो जगजेठी आलिंगिती ।। ४ ।। पथश्रमांचिये परिहारीं । स्वागतप्रश्न कीजे चतुरीं । तो तेथ करूं न शकती नारी । वदनीं स्मेरीं त्या करिती ।। ५ ।। मंदस्मेराननीं नयनीं । सप्रेम अपांगईक्षणीं । सभार्य लक्षूनि चक्रपाणी । स्वागतप्रश्नीं अव-गमिती ।। ६ ।। ऐसा लक्षूनि चक्रपाणी । पुरजनवनिता अंतःकरणीं । अनुमानिती तें तूं श्रवणीं । कुरुकुळतरणी अवधारीं ।। ७ ।।

ऊचुः स्त्रियः पथि निरीक्ष्य मुकुंदपत्नीस्तारा यथोडुपसहाः किमकार्यमूभिः ।
यच्चक्षुषां पुरुषमौलिरुदारहासलीलावलोककलयोत्सवमातनोति ।। ३६ ।।

चंद्रासवें जैशा तारा । तैशा कृष्णेंसीं सहचरा । देखोनि हरिरमणी नागरा । परस्परें म्हणताती ।। ८ ।। मार्गीं मुकुंदअनुगामिनी । सुभगा हरिरमणी देखोनी । नागरवनिता वदती वदनीं । सुकृतखाणी म्हणोनियां ।। ९ ।। इहीं केलें सुकृत काय । जेणें जोडले मुकुंदपाय । विभय भोगिती कमलाप्राय । धन्य हा उदय भाग्याचा ।। ३१० ।। नरसुरवरिष्ठ पुरुषमौळी । त्याचा मुगुटमणी वनमाळी । ज्या कारणास्तव तो हे सकळी । ललनामंडळी प्रोत्साही ।। ११ ।। उदार म्हणिजे प्रसन्न हास । लीलावलोक शृंगाररस । तेणें यांचिया लोचनांस । उत्साह जगदीश विस्तारी ।। १२ ।। यास्तव धन्यतमा हरिरमणी । अपरा दुर्भगा भवश्रमखाणी । ऐशा नागरा वदती वाणी । अंतःकरणीं रसरसूनी ।। १३ ।। तथापि म्हणती आम्ही धन्य । नयनीं देखोनीं श्रीभगवान । अनेक जन्मींचा हरला शीण । हरिरसपानें मन धालें ।। १४ ।। असो वनितांची कल्पना । वार्धुषवर्गी पूजिलें कृष्णा । तें तूं ऐकें कुरुभूषणा । करी कथना योगीन्द्र ।। १५ ।।

तत्र तत्रोपसंगम्य पौरा मंगलपाणयः । चक्रुः सपर्यां कृष्णाय श्रेणीमुख्या हृतैनसः ।। ३७ ।।

पुण्यमार्गें येतां हरी । वार्धुषवर्गाचिया हारी । आपुलाल्या स्वव्यापारीं । शतसहस्रीं जे मुख्य ।। १६ ।। श्रेणीमुख्य जे नागरजन । करीं घेऊनि उपायन । कृष्ण पावतां आपुलें स्थान ।

करिती पूजन यथोचित ॥ १७ ॥ वसनक्रयी स्वर्णक्रयी । इत्यादि अनेक जे व्यवसायी । कृष्ण येतां ते ते ठायीं । अतिलवलाहीं भेटती ॥ १८ ॥ करीं घेऊनि मंगळ द्रव्यें । कल्याणरूपें जीं जीं द्रव्यें । स्वधारूपें नव्हती कव्यें । जें कां गव्यें दध्यादि ॥ १९ ॥ ऐशा अनेक वार्धुषश्रेणी । पृथक पूजिती चक्रपाणी । कृष्णदर्शनें पातकधुणी । जैसे तरणी वितिमिर जे ॥ ३२० ॥ तया निष्पापांची पूजा । घेऊनि चालिला सात्वतराजा । धर्मालयासमीप सहजा । आले वोजा तें ऐका ॥ २१ ॥

अंतःपुरजनैः प्रीत्या मुकुन्दः फुल्ललोचनैः । ससंभ्रमैरभ्युपेतः प्राविशद्राजमंदिरम् ॥ ३८ ॥

धर्मसद्मासमीप कृष्ण । येतां अंतःपुरचरजन । कृष्णदर्शना प्रफुल्ल नयन । करिती अभिगमन सप्रेमें ॥ २२ ॥ अंतःपुरजन म्हणाल कोण । ऐका तयांचें उपलक्षण । देहळीं सदमीं ज्यांचें स्थान । आज्ञानियमन अनुलंघ्य ॥ २३ ॥ दुर्गरक्षक दिग्विभागीं । दुर्गाधिपतीचे संभर्गी । आयव्ययलेखक जे नियोगी । धनधान्यादिसंगोप्ते ॥ २४ ॥ वृद्धाचारें नृपमंदिरें । सौविदल्लक अंतःपुरीं । पाण्डवावरोधरक्षणकारी । आले बाहेरी ते अवघे ॥ २५ ॥ प्रेमाह्लाद भरला देहीं । प्रफुल्ललोचनीं समस्तीं तिहीं । प्रीतीकरूनि मनोबाहीं । मुकुन्द हृदयीं आळंगिला ॥ २६ ॥ जुहारूनि प्रभूचें पद । पुढें ठाकती समर्याद । राजमंदिरीं श्रीगोविन्द । सहवधूवृन्द प्रवेशविती ॥ २७ ॥ प्रवेशतां नृपमंदिरीं । न वैसोनियां सभागारीं । पृथा नमावया श्रीहरी । गेला भीतरीं तें ऐका ॥ २८ ॥

पृथा विलोक्य भ्रात्रेयं कृष्णं त्रिभुवनेश्वरम् । प्रीतात्मोत्थाय पर्यंकात्सस्नुषा परिषस्वजे ॥ ३९ ॥

आपुल्या बंधूचा नंदन । भेटावया आला कृष्ण । पृथा उठिली मंचकावरून । येतां देखोन सप्रेमें ॥ २९ ॥ सामान्य नोहे बंधुतनय । त्रिभुवनेश्वर कमलाप्रिय । ज्यातें वंदिती समस्त आर्य । यदुकुळधुर्य जगत्पति ॥ ३३० ॥ येतां देखोनि त्या गोपाळा । स्नुषा ते कां द्रुपदबाळा । तयेसहित हृदयकमळा । क्षेमालिंगनीं कवळिला ॥ ३१ ॥ असो पृथेचें आलिङ्गन । येरीकडे पाण्डुनंदन । प्रेमें विस्मृत प्रपंचभान । तें व्याख्यान शुक वर्णी ॥ ३२ ॥

गोविंदं गृहमानीय देवदेवेशमादृतः । पूजायां नाविदत्कृत्यं प्रमोदोपहतो नृपः ॥ ४० ॥

देव म्हणिजे निर्जर सर्व । त्यांचा देव जो वासव । तयाचा ईश श्रीकेशव । द्वारकाराव गोविंद ॥ ३३ ॥ गोविन्दातें निजमंदिरीं । धर्में आणूनि सप्रेमगजरीं । पूजाप्रकार विविधोपचारीं । आह्लादभरीं न स्मरती ॥ ३४ ॥ परमानंदें निर्भर झाला । कृष्णदर्शनीं तटस्थ ठेला । पूजा व्यवहारकृत्य विसरला । कृष्णें मानिला संतोष ॥ ३५ ॥ मद्दर्शनें प्रेमनिर्भर । पूजांमाजि हें पूजासार । अंतर जाणोनि रुक्मिणीवर । म्हणे हा युधिष्ठिर धन्यतम ॥ ३६ ॥ पृथा देवी पितृष्वसा । तिणें आलिङ्गितां जगदीशा । येरें नमिली त्या विशेषा । कुरुनरेशा शुक बोधी ॥ ३७ ॥

पितृष्वसुर्गुरुस्त्रीणां कृष्णश्चक्रेऽभिवादनम् । स्वयं च कृष्णया राजन्भगिन्या चाभिवदितः ॥ ४१ ॥

मौळ चरणांवरी ठेवूनी । कृष्णें नमिली पितृभगिनी । वडिला वृद्धा कुरुकामिनी । कुंतीसमान त्या नमिल्या ॥ ३८ ॥ द्रौपदी सुभद्रा निजाधिकारीं । नमित्या झाल्या कैटभारी । स्नुषेतें आज्ञापी यावरी । कुंती झडकरी तें ऐका ॥ ३९ ॥

श्वश्रूश्च संचोदिता कृष्णा कृष्णपत्नीस्तु सर्वशः । आनर्च रुक्मिणीं सत्यां भद्रां जांबवती तथा ॥ ४२ ॥
कालिंदी मित्रविंदां च शैब्या नाग्नजितीं तथा । अन्याश्चाभ्यागता यास्तु वासग्रजमंडनादिभिः ॥ ४३ ॥

कुंती म्हणे वो दुपदतनये । कृष्णपत्न्यांतें पूजीं माये । रुक्मिणीप्रमुख यथान्वयें । येरी लवलाहें ऊठिली ॥ ३४० ॥ स्वकांतजननीनें प्रेरितां । द्रौपदी अर्चीं कृष्णवनिता । रुक्मिणीप्रमुख ज्या समस्ता । पट्टमहिषी वरमान्या ॥ ४१ ॥ सौभाग्यद्रव्यें वृद्धाचारीं । हरिद्राकुंकुमांजन कस्तूरी । भांगीं सिंदूरभा साजिरी । मलयपिंजरी विलेपनीं ॥ ४२ ॥ कुसुमग्रथनें वेणिका मौळीं । पुष्पमालिका सुपरिमळी । सुमनहार कुचमंडळीं । आपाद रुळती मघमघित ॥ ४३ ॥ त्यावरी परिमळद्रव्यउधळा । श्रवणीं पौष्पज सुगंध भरिला । दशांग कर्पूरदीपमाळा । फळतांबूला समर्पिलें ॥ ४४ ॥ इत्यादि उपचारीं रुक्मिणी । पूजिती झाली याज्ञसेनी । तंव जांबवतीतें अर्जुनपत्नी । पूजी सन्मानीं सुभद्रा ॥ ४५ ॥ सत्यभामेतें द्रौपदी । पूजिती झाली यथाविधी । सुभद्रा तैसीच पूजाविधी । कालिंदीतें समर्पी ॥ ४६ ॥ मित्रविंदेतें पूजी कृष्णा । सुभद्रा नाग्नजितीतें जाणा । द्रौपदी भद्रेच्या पूजना । करितां लक्ष्मणा येरी पूजी ॥ ४७ ॥ सौभाग्यद्रव्यीं वसनाभरणीं । ऐशा अर्चिल्या श्रीकृष्णरमणी । निवाससदनें त्यांलागुनी । धर्म अर्पी तें ऐका ॥ ४८ ॥ पट्टांगना पूजिल्या ऐशा । अपरा षोडशसहस्रा तैशा । द्रौपदी पूजी वसुदेवस्नुषा । सौभाग्यद्रव्या अर्पूनी ॥ ४९ ॥

सुखं निवासयामास धर्मराजो जनार्दनम् । ससैन्यं सानुगामात्यं सभार्यं च नवं नवम् ॥ ४४ ॥

जनार्दनातें पाण्डुसुत । सानुग ससैन्य महामात्य । भार्यासहित सुखसदनांत । निवासार्थ प्रवेशवी ॥ ३५० ॥ निवाससदनें पृथकपृथक । यथावकाशें सर्वां सुख । पूर्णसमृद्धीसह सम्यक । अर्पिलीं देख युधिष्ठिरें ॥ ५१ ॥ नित्य नूतन सुखोपचार । अर्पी होत्साता सादर । बंधुसहित पाण्डुकुमर । सदा तत्पर हरिभजनीं ॥ ५२ ॥ पूर्वीं कालिंदीउपयमनीं । फाल्गुनेशीं चक्रपाणी । मय सोडवी खाण्डवदहनीं । तें शुकमुनी सुचवीतसे ॥ ५३ ॥

तर्पयित्वा खांडवेन वह्निं फाल्गुनसंयुतः । मोचयित्वा मयं येन राज्ञे दिव्या सभा कृता ॥ ४५ ॥

जेथ समृद्धि नित्य नूतन । निवासार्थ तें सभासदन । धर्में वोपिलें त्याचें कथन । आणि

उपकारस्मरण कृष्णाचें ॥ ५४ ॥ जो प्रेमें करूनि फाल्गुनेंसहित । वर्ते सर्वदा वियोगरहित । तत्साहाय्यें भूभारदैत्य । भावी समस्त मारावया ॥ ५५ ॥ अर्जुनसाहाय्यें पूर्वीच कृष्णें । अग्नि तर्पितां खाण्डवदानें । उपकार केला मयमोक्षणें । मय त्यागुणें आभारला ॥ ५६ ॥ उपकारासी उत्तीर्ण कांहीं । होऊं इच्छी मय जे समयीं । त्यासी आज्ञापी शेषशायी । करीं ये ठायीं दिव्य सभा ॥ ५७ ॥ युधिष्ठिररायाचे मंदिरीं । दिव्य सभा तूं निर्माण करीं । ऐसे कृष्णाचे आज्ञेवरी । रचिली कुरुपुरीं सभा तेणें ॥ ५८ ॥ हें कृष्णोपकाराचें नृपा स्मरण । आणि दिव्य सभेचें ऐश्वर्य पूर्ण । यथावकाशें नित्य नूतन । उपचारार्पण दर्शविलें ॥ ५९ ॥ एवं कुरुवरस्नेहास्तव । इंद्रप्रस्थीं वासुदेव । बृहत्सेना वनिता सर्व । सहित स्वमेव राहिला ॥ ३६० ॥

उवास कतिचिन्मासान्राज्ञः प्रियचिकीर्षया । विहरन्रथमारुह्य फाल्गुनेन भटैर्वृतः ॥ ४६ ॥

कित्तेकमासपर्यंत हरी । राहता झाला कुरुवरपुरीं । धर्मराजाचे प्रीतीवरी । प्रेम अंतरीं बहुसाल ॥ ६१ ॥ पार्थेसहित एके रथीं । वैसोनि मृगयाव्याजें क्षिती । वेष्टित वीरसेनासंपत्ती । विचरे श्रीपती उत्साहें ॥ ६२ ॥ राजदूताचें विज्ञापन । राजसूयाचें संपादन । उभयकृत्यें वक्ष्यमाण । हृदयीं चिंतून स्थिरावला ॥ ६३ ॥ ये अध्यायीं इतुकी कथा । परीक्षितीतें श्रीशुक वक्ता । पुढिले अध्यायीं तत्त्वता । मागधघाता करवील ॥ ६४ ॥ एकनाथाचा प्रतापमहिमा । निरसूनि ब्रह्माण्डगर्भोन्मा तमा । प्रबोधचंद्रें मतिपूर्णिमा । दयार्णवाची प्रकाशिली ॥ ६५ ॥ तेथें साधकजनचकोर । श्रवणेच्छेचें चंचुपात्र । प्रबोधचंद्रीं अवधाननेत्र । लावूनि सारामृत घेती ॥ ६६ ॥ विश्वनाथानंतमदनीं । खडकीनामकें नृपपाटनीं । एकसप्ततितमलेखनीं । कृत शुभदिनीं अळंकरण ॥ ३६७ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां जरासंधवधनृपविमोक्षणराजसूययज्ञचिकीर्षया इंद्रप्रस्थे कृष्णागमनं नामैकसप्ततितमोऽध्यायः ॥ ७१ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ।

श्लोक ४६ ॥ टीका ३६७ ॥ एवं सख्या ४१३ ॥
(सत्तरावा अध्याय मिळून ओवीसंख्या ३२९८७)

एकाहत्तरावा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ७२ वा

श्रीगणेशाय नमः । श्रीकृष्णपरमात्मने नमः । ब्रह्मानंदोदधीची वीची । उद्भवविलासाविलयी तोची । काळत्रयीं अभेदाची । आस्तिक्यता नित्यत्वें ॥ १ ॥ ऐसिया अभेद काळत्रया । नित्यात्मकत्वें नमन पायां । द्विसप्ततितमाअध्याया । विवरावया प्रवर्तवीं ॥ २ ॥ कित्तेक मास इंद्रप्रस्थीं । रुक्मिणीरमणें करूनि वसती । पाण्डवप्रेमें निशि गमस्ती । उदय अस्तीं न चोजविति ॥ ३ ॥ अर्जुनसहित मृगयाव्याजें वनीं विचरतां गरुडध्वजें । कौरवनिर्दलनाच्या काजें । सख्य स्ववोजें वाढविलें ॥ ४ ॥ ऐसा कित्तेक मासवरी । इंद्रप्रस्थीं असतां हरी । कोणे एके शुभवासरीं । यज्ञार्थ विवरी युधिष्ठिर ॥ ५ ॥ शुक म्हणे गा परीक्षिति । हरिप्रेमळा कौरवपति । तुझिया पूर्वजांची कीर्ति । प्रकटी श्रीपति तें ऐक ॥ ६ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ एकदा तु सभामध्य आस्थितो मुनिभिर्युतः । ब्राह्मणैः क्षत्रियैर्वैश्यैर्भ्रातृभिश्च युधिष्ठिरः ॥ १ ॥

कोणे एके दिवसीं धर्म । सभ्यांसहित पुरुषोत्तम । संपादूनि आहनिक नेम । सभासदन प्रवेशले ॥ ७ ॥ धर्मराजा सभास्थानीं । विराजमान मुख्यासनीं । धौम्यप्रमुख भोंवते मुनी । नृप वेष्टुनी बैसले ॥ ८ ॥ दक्षिणभागीं ब्राह्मणपङ्क्ती । चतुर्वेदी देदीप्यव्यक्ती । पावक किंवा ते गभस्ती । आजिष्ठ ज्योतिर्मय गमती ॥ ९ ॥ वामभागीं पुरुषोत्तम । यशोधनक्षेत्रीं उत्तमोत्तम । वृष्णिभोजान्धकसत्तम । धृतविक्रम धीमंत ॥ १० ॥ अग्रभागीं अमात्यपंक्ती । पौरप्रजाजन शोभती । मुख्य मुख्य वैश्ययाती । मंत्रिवर्ग पृष्ठभागीं ॥ ११ ॥ ईषदंतरें पार्श्वीं पृष्ठीं । चौघे बंधु धर्मानिकटीं । श्वेत चामरें धरूनि मुष्टीं । मंद माद्रेय वीजिती ॥ १२ ॥ सन्नद्ध बद्ध तयां पाठीं । गदा गाण्डीव कवळूनि मुष्टीं । भीमार्जुन

प्रतापजेठी । सभास्थानीं विराजती ॥ १३ ॥ आणिक ही प्रगल्भ धिषणामंत । धर्मसदनीं बैसणाईत । राया ऐकें ते समस्त । शुक सांगत संक्षेपें ॥ १४॥

आचार्यैः कुलवृद्धैश्च ज्ञातिसंबंधिबांधवैः । शृण्वतामेव चैतेषामाभाष्येदमुवाच ह ॥ २ ॥

अनेकव्यववहारशिक्षागुरु । धनुर्विद्यादिदीक्षागुरु । छत्तीस दंडी राजगुरु । मल्लप्रवर द्वंद्वांगी ॥१५॥ व्याकरणप्रमुखषडंगवक्ते । वेदांतादिशास्त्रवेत्ते । आयुर्वेदादिपरिज्ञाते । प्रश्नप्रदर्शक दैवज्ञ ॥ १६ ॥ इत्यादि वक्तृप्रवराचार्य । क्षत्रिय कुलीन वृद्ध जे आर्य । गोत्रजबंधु सुहृद्वर्य । धैर्यमेरु धुरंधर ॥ १७ ॥ ऐसे वसले असतां सदसीं । ऐकतां तयां समस्तांसी । धर्म विवरूनि निजमानसीं । कार्यसिद्धीसी अनुमानी । ॥ १८ ॥ समस्तां सभ्यां ऐका म्हणे । काय बोले त्यांकारणें । प्रसन्न असतां एकें कृष्णें । असाध्य साधन घडेल ॥ १९ ॥ प्रसन्नपणें जें करील कृष्ण । तें कृत्य करूं न शके आन । ऐसें मानसीं निर्धारून श्रीभगवान आमंत्री ॥ २० ॥ सभ्यांसी म्हणे युधिष्ठिर । आमुचे मनींचा हा निर्धार । कृष्णावांचूनि कोण्ही अपर । कार्य दुस्तर न साधी ॥ २१ ॥ जी जी म्हणोनि सभासदीं । राजा पूजिला यथोचित शब्दीं । मग तो युधिष्ठिर विशाळबुद्धी । बोले संसदीं तें ऐका ॥ २२ ॥

युधिष्ठिर उवाच । क्रतुराजेन गोविंद राजसूयेन पावनीः । यक्ष्ये विभूतीर्भवतस्तत्संपादय नः प्रभो ॥ ३ ॥

भो भो स्वामी श्रीगोविंदा । ऐकें आमुचिया मनोरथवादा । राजसूयमखेंद्रें सुरवृंदा । यजूनि मोदा पावेन ॥ २३ ॥ म्हणसी सुरवृंद ते कोण । ज्या तव विभूति पुण्य पावन । त्या मी यजीन मखेंद्रें करून । सांग संपादन करीं तें तूं ॥ २४ ॥ सार्वभौम जो चक्रवर्ती । हे मनोरथ त्या शोभती । ऐसें म्हणसी जरी श्रीपती । तरी ऐकें विनंती यदर्थीं ॥ २५ ॥

त्वत्पादुके अविरतं परि ये चरंति ध्यायंत्यभद्रनशने शुचयो गृणति ।
विंदंति ते कमलनाभ भवापवर्गमाशासते यदि त आशिष ईश नान्ये ॥ ४ ॥

हो कीं कोण्ही सामान्य नर । परंतु तुझा पादुकाधर । कालत्रयीं निज शरीर । परिचर्यापर सप्रेमें ॥ २६ ॥ ध्यान मूर्ति हृदयकमळीं । प्रमोदोत्कर्षें सर्वदा कवळी । तव पदमहिमा सर्वकाळीं । नामावळीसह वर्णी ॥ २७ ॥ तव पदप्रेमा म्हणसी कैसा । तरी जो नाशक दरिद्रदोषा । स्मरणमात्रें अभद्र क्लेशां । भंगी निशा रवि जेंवि ॥ २८ ॥ जाह्नवीचें जन्मस्थान । अविरत करितां चिन्तन । प्रेमा प्रकटे अघ भंगून । करिती गणन सत्वस्थ ॥ २९ ॥ तयांसि म्हणसी काय लाभ । तरी जे तव पादुकावल्लभ । ते भवाचा उपड़नि कोंभ । पावती सुलभ अपवर्ग ॥ ३० ॥ जरी ते ऐश्वर्यमनोरथ करिती । ते ते अमोघ आशिष लाहती । तैसे अन्यत्र चक्रवर्ती । लाहों न शकती बहु क्लेशें ॥ ३१ ॥

ऐसें निर्द्वारें मी जाणें । म्हणोनि प्रार्थी प्रभूकारणें । स्वभक्तपक्षपाताचें लेणें । आंगीं मिरवणें तें वदतों ॥ ३२ ॥

तद्देवदेव भवतश्चरणारविन्दसेवानुभावमिह पश्यतु लोक एष. ।
ये त्वां भजंति न भजंत्युत वोभयेषां निष्ठां प्रदर्शय विभो कुरुसृंजयानाम् ॥ ५ ॥

भो भो स्वामी देवाधिदेवा । जे कां तुझिया पादाब्जसेवा । तियेचा अनुभव येथ सर्वां । प्रकट करावा ये काळीं ॥ ३३ ॥ जो हा येथ मर्त्य लोक । त्यामाजि भाविक अभाविक । तव पदभजनाचें कौतुक । पाहोत सम्यक सर्वत्र ॥ ३४ ॥ तव पादाब्जा जे जे भजती । अथवा द्वेष्टे जे न भजती । त्या उभयतांतें निष्ठा पुरती । दावीं श्रीपती प्रकटूनी ॥ ३५ ॥ चैद्य मागध कुरु सृंजय । शाल्व सोमक हैहय । गौड मद्रक शिवि कैकय । नृपसमुच्चय हा पाहो ॥ ३६ ॥ तव पदभवजननिष्ठाबळ । यांसि दाखवीं एक वेळ । भगवद्भक्तिअनादरशीळ । लावीं काजळ तद्वदना ॥३७॥ भगवत्पदभक्तीचा महिमा । देखोनि भक्तां उथळे प्रेमा । भक्तचकोरां पूर्ण पूर्णिमा । अभक्तां अमा अभाग्यें ॥ ३८ ॥ ऐसी उभयां भजननिष्ठा । प्रकटूनि दावीं भो वैकुंठा । जरी तूं म्हणसी अभेदपीठा । वैषम्यचेष्टा या कैच्या ॥३९॥ तरी ऐकें गा जनार्दना । वैषम्यभेदाची भावना । तुज नातळे जेंवि गगना । तुहिनादिकें न शिवती ॥ ४० ॥

न ब्रह्मणः स्वपदभेदमतिस्तव स्यात्सर्वात्मनः समदृशः स्वसुखानुभूतेः ।
संसेवतां सुरतरोरिव ते प्रसादः सेवाऽनुरूपमुदयो न विपर्ययोऽत्र ॥ ६ ॥

स्वपरभेदमति तुज । नाहींच हा निश्चय मज । कीं तूं ब्रह्म निरुपाधि सहज । स्वपरभेदवर्जित पैं ॥ ४१ ॥ स्वपर नाहीं मज कां म्हणसी । तरी ऐकावें इयेविषीं । तूं सर्वात्मा सर्व देशीं । परिच्छेदासी अस्पृष्ट ॥ ४२ ॥ सर्वात्मका चिदेकरसा । तुजमाजि भेद भाविजे कैसा । जरी तूं म्हणसी दृश्याभासा । विरहित महमा मी कोठें ॥ ४३ ॥ तरी तूं सर्वात्मा समदृष्टि । तव संवेदनमात्रें सृष्टि । भूतभौतिकें तुष्टि पुष्टि । यथामंतुष्टि लाहती पैं ॥ ४४ ॥ म्हणती विषयसेवनें सुख । भूतां भौतिकांलागीं अशेष । तरी तूं विषयीं विषयात्मक । करणभ्रामक होत्साता ॥ ४५ ॥ तुझेनि पृथ्वी गंधवती । आंगीं वाहे धारण्यशक्ति । त्या गंधाची ग्रहणासक्ती । भौतिकीं भूतीं एकत्वें ॥ ४६ ॥ तुझेनि जीवन रसाळ जगीं । भौतिकें भूतें रसनामार्गीं । एकात्मसुखाचे प्रसंगीं । चित्सुकरंगीं रंगलीं ॥ ४७ ॥ तुझेनि तेजा द्योतनशक्ती । शोषणपचनकर्मा व्यक्ती । तुझेनि प्राणा पवना गती । भौतिकीं भूतीं अभेदें ॥ ४८ ॥ पोकळ गगनीं उमटे ध्वनी । तेथ तव संवेदनेंकरूनी । अर्थावबोधें अंतःकरणीं । पडतां श्रवणीं एकत्वें ॥ ४९ ॥ यालागीं अभेद स्वसुखानुभूती । तुझी सर्वत्र भौतिकीं भूतीं । ऐसी सर्वत्र प्रतीती । प्रवृत्तिनिवृत्तींमाजि अमे ॥ ५० ॥ म्हणोनि या कारणास्तव । रागादिवर्गाचा अभाव ।

तुझ्या ठायीं वर्ते सर्व । दृश्यादिभाववर्जित तूं ॥ ५१ ॥ तथापि स्वपर भासती जन । तेंही ऐकें विवेचन । निद्रित एकचि देखे स्वप्न । माजि नाना जनपद पैं ॥ ५२ ॥ तेंवि चैतन्यसागराअंगीं । अविद्याकामकर्मात्मकौघीं । प्रतिबिंबतां जीव तरंगीं । अनेकलिंगीं भेद गमे ॥ ५३ ॥ तिये भेदभ्रमभावने । माजि स्वपरमतीचें होणें । तेथ स्वसंकल्पाचेनि गुणें । घडे भोगणें सुखदुःखा ॥ ५४ ॥ तूं अभीष्टकाम-कल्पतरु । जे जे होती तुजसमोर । ते ते स्वसंकल्पानुसार । फळसंभार लाहती ॥ ५५ ॥ कल्पतरूसी नाहीं विषम । परि कल्पितयाचे जैसे काम । तैसींच फळें विषम सम । लाहती निःसीम भेदभ्रमें ॥ ५६ ॥ एकें कल्पूनि शिविकायान । सवेग पावला आत्मभुवन । एकें आपणा कल्पूनि श्वान । गेला धांवूनि निजसदना ॥ ५७ ॥ कल्पनेसारिखीं पावले फळें । सुरद्रुम विषमत्वा नातळे । तेंवि द्वेषिती अभक्त सळें । भक्त पदकमळें आश्रयिती ॥ ५८ ॥ उभयां प्राप्ति यथोचित । नोहे विपर्यय निश्चित । ऐसा माझा निश्चय सत्य । तूं हृदयस्थ जाणसी ॥ ५९ ॥ ऐसें ऐकूनि धर्मवचन । परमानंदें जनार्दन । म्हणे राया तव भाषण । परम धन्य श्रुतिसाम्य ॥ ६० ॥ अनुमोदूनि धर्मवचना । म्हणे मद्भक्त कैवल्यसदना । लाहती तें अभक्त जना । प्राप्त नोहे कल्पान्तीं ॥ ६१ ॥ ऐसा अनुमोदनपूर्वक । बोलता झाला यदुनायक । तें तूं साकल्यें आइक । श्रवणपीयूष रसरसिका ॥ ६२ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥ सम्यग्व्यवसितं राजन्भवता शत्रुकर्शन । कल्याणी येन ते कीर्तिर्लोकाननुभविष्यति ॥७॥

शत्रुकर्शन या संबोधनें । भूचक्रजयाचें सामर्थ्य देणें । विजयश्रीचें आविर्भवणें । केलें वरदानें संबोधनीं ॥ ६३ ॥ सम्यक म्हणिजे बरव्या परी । व्यवसाय धरिला जो अंतरीं । तो तुज कल्याण-कीर्तिकारी । निज निर्धारीं जाण पां ॥ ६४ ॥ जेणें तुझी उत्कर्षकीर्ती । सर्वत्र होईल कल्याणवती । भुवनत्रयामाजि व्याप्ती । विश्वलक्षिती यशोलक्ष्मी ॥ ६५ ॥

ऋषीणां पितृदेवानां सुहृदामपि नः प्रभो । सर्वेषामपि भूतानामीप्सितः क्रतुराडयम् ॥ ८ ॥

सर्वां अभीष्ट हा क्रतुराव । यातें देव पितर ऋषि मानव । आम्हां सुहृदांसीं भूतें सर्व । सादर सदैव इच्छिती ॥ ६६ ॥ माझा यज्ञ हा संपादीं । म्हणोनि मातें सभासदीं । प्रभुत्व देऊनि वदसी शब्दीं । करवणें विधी मज सांगें ॥ ६७ ॥ म्यां श्रीकृष्णें अथवा कोण्हीं । काय संपादिजे येऊनी । तुझ्या आंगीं ऐश्वर्यश्रेणी । मखेंद्रसाधनीं स्वतःसिद्धा ॥ ६८ ॥ मखेंद्राचें साधन काय । तेंही कथितों परिसता होय । सिद्ध करूनि साधनत्रय । मग मखराय आरंभीं ॥ ६९ ॥ साधनत्रय म्हणसी कोण । यथानुक्रमें करीं श्रवण । आधीं तितुकीं संपादून । मग हा यज्ञ आरंभीं ॥ ७० ॥

विजित्य नृपतीन्सर्वान्कृत्वा च जगती वशे । संभृत्य सर्वसंभारानाहरस्व महाक्रतुम् ॥ ९ ॥

राजसूययज्ञविधी । उचित ज्या संभारसमृद्धी । त्या न करितां यज्ञसिद्धी । केंवि हें बुद्धी

माजि विवरीं ॥ ७१ ॥ जगतीमंडळ वश जों नाहीं । तंव संभारसमृद्धि कैंच्या काई । सर्व नृपति जिंकितां मही । होय सर्वही वशवर्ती ॥ ७२ ॥ यालागिं राया युधिष्ठिरा । राजे जिंकूनि साधीं धरा । तदुत्थ संपादूनि संभारा । यजीं क्रतुवरा सुरेंद्रवत ॥ ७३ ॥ जरी तूं म्हणसी येचि विषयीं । मी तुजलागीं प्रार्थितों पाहीं । तरी हें तुजला अवघड नाहीं । ऐक तेंही निरोपितों ॥ ७४ ॥

एते ते भ्रातरो राजन्लोकपालांशसंभवाः । जितोऽस्म्यात्मवता तेऽहं दुर्जयो योऽकृतात्मभिः ॥ १० ॥

राया तुझे हे अनुज चारी । लोकपालांश देहधारी । प्रतापें जिंकूनि दिशा चारी । दास्याधिकारी नृपां करिती ॥ ७५ ॥ चतुर्दिशु देऊनि घरटी । राजे जिंकूनि भूतळवटीं । करविती परिचर्याराहाटी । आज्ञा मुकुटीं धरवूनी ॥ ७६ ॥ ऐसे तुझे हे बंधु चारी । भूचक्रविजयाची सामग्री । म्हणसी अजिंक द्वारकापुरी । तरी अवधारीं ये विषयीं ॥ ७७ ॥ आत्मविजयें तां मज पाहीं । प्रतापें जिंकिलें बैसले ठायीं । या लागीं राया तुझिये गेहीं । करीं सर्वही परिचर्या ॥ ७८ ॥ अजितात्मका लोकत्रया । सर्वथा दुर्जय मी कुरुवर्या । आत्मविजयें मज ऐसिया । जिंकावया समर्थ तूं ॥ ७९ ॥ आत्मशब्दें बोलिजे देह । पंचविध करणांचा समूह । ज्ञातृचेष्टा ज्ञानप्रवाह । क्रियादि करणां तन्मात्रीं ॥ ८० ॥ तें त्वां शरीर करणें प्राण । वृत्तिचतुष्टय अंतःकरण । वश्य करूनि जिंकिलों पूर्ण । जो दुर्जय गहन आकृतात्मकां ॥ ८१ ॥ मज जिंकिलें जिये काळीं । तैं तूं जयवान भूमंडळीं । मत्पर मामक महाबळी । त्या आकळी कोण दुजा ॥ ८२ ॥

न कश्चिन्मत्परं लोके तेजसा यशसा श्रिया । विभूतिभिर्वाऽभिभवेद्देवोऽपि किमु पार्थिवः ॥ ११ ॥

ऐसिया मत्परा तूतें धर्मा । पराभवूं न शके ब्रह्मा । येरां अमरां कायसी गरिमा । नृपां अधमां कोण पुसे ॥ ८३ ॥ ऐसिया तुझी पराभवशंका । असो परती कुरुनायका । परि अपरां मत्परां अकिंचन रंकां । कोण्ही न शके पराभवूं ॥ ८४ ॥ तेजःप्रभावें करूनि कोण्ही । मत्परा पराभवूं न शके जनीं । अथवा प्रबळ चतुरंगिणी । सन्नद्ध रणीं न जिंकवे ॥ ८५ ॥ अथवा केवळ उज्ज्वल यशें । कीं तुंगैश्वर्यलक्ष्मीवशें । कीं विभवें महत्त्वें चातुर्यलेशें । गुणें अशेषें न लोपवें ॥ ८६ ॥ मत्परां जिंकूं न शके देव । तेथ केवुते नर पार्थिव । तो मी वशवर्ती केशव । असतां भेव मग काय ॥ ८७ ॥ कोण्हां एका आंगें भवीं । मत्परातें पराभवी । ऐसा न देखें सुरमानवीं । दैत्यीं दानवीं असुरींही ॥ ८८ ॥ ऐसें वदतां जगदीश्वर । परमानंदें युधिष्ठिर । उचंबळला जेंवि सागर । पूर्ण गंभीर सुधामय ॥ ८९ ॥ शुक म्हणे गा कुरुमंडना । राया परीक्षिति सर्वज्ञा । धर्में परिसोनि भगवद्वचना । केली योजना ते ऐका ॥ ९० ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ निशम्य भगवद्गीतं प्रीतः फुल्लमुखाम्बुजः ।
भ्रातॄन्दिग्विजयेऽयुङ्क्त विष्णुतेजोपबृंहितान् ॥ १२ ॥

जें जें वदला अधोक्षज । धर्में विवरूनि तद्गत बीज । फुल्लारमान वदनाम्भोज । झालें सहज शरदिन्दुवत ॥ ९१ ॥ भगवद्वचनें धर्मानुजीं । देवांश ऐसी ऐकोनि वाजी । वीरश्री आवेश भरला भुजीं । वैष्णव तेजीं भ्राजिष्ठ ॥ ९२ ॥ विष्णुतेजें आप्यायित । भीमार्जुन माद्रीसुत । त्यांतें युधिष्ठिर नियोजित । दिग्विजयार्थ तें ऐका ॥ ९३ ॥

सहदेवं दक्षिणस्यामादिशत्सह सृंजयैः ।
दिशि प्रतीच्यां नकुलमुदीच्यां सव्यसाचिनम् । प्राच्यां वृकोदर मत्स्यैः केकयैः सह मद्रकैः ॥ १३ ॥
ते विजित्य नृपान्वीरा आजह्रुर्दिग्भ्य ओजसा । अजातशत्रवे भूरि द्रविणं नृप यक्ष्यते ॥ १४ ॥

सहदेवनामा माद्रीसुत । दक्षिणे प्रेरिला दिग्विजयार्थ । सवें सृंजय सेनेसहित । प्रतापवंत प्रयोजिला ॥ ९४ ॥ पश्चिमदिशे नकुळ वीर । सवें देऊनि मत्स्य नृपवर । प्रवळ चतुरंग दळभार । प्रेरी युधिष्ठिर योजुनि ॥ ९५ ॥ उदीचीप्रति सव्यसाची । प्रवळ सेना कैकयांची । देऊनि प्रेरिता तो नृपाची । आज्ञा वंदूनि निघाला ॥ ९६ ॥ पूर्व दिशेतें वृकोदर । सवें देऊनि मद्रकभार । प्रेरिता झाला युधिष्ठिर । तोही सत्वर चालिला ॥ ९७ ॥ कोणे दिशे कोण कोण नृपती । प्रवळ सेनासंभार किती । युद्धें झालीं त्यांची गणती । महाभारतीं सविस्तर ॥ ९८ ॥ येथ समासें बादरायणि । सूत्रप्राय वदला वाणी । यालागीं संक्षेप व्याख्यानीं । भारत श्रवणीं अनुगमिजे ॥ ९९ ॥ इतुकीं श्रोतीं जाणिजे सूचना । यथाविभागें कुरुनंदना । पाण्डवीं जिंकिले देश नाना । युधिष्ठिराज्ञा ते नमिती ॥ १०० ॥ ऐसे प्रतापी पाण्डववीर । नृपांतें जिंकूनि वश भूचक्र । करूनि आणिलें धन अपार । यज्ञसंभारसिद्धयर्थ ॥ १ ॥ ऐकें राया परीक्षिति । अजातशत्रु धर्मनृपति । दीक्षित जाणोनि धनसंपत्ति । राजे वोपिती जिंकिले ते ॥ २ ॥ सर्व भूमंडळ केलें वश । राजे वर्त्तती होऊनि दास । त्रैलोक्यविभव इंद्रप्रस्थास । जैं राजसूयास धर्म यजी ॥ ३ ॥ यज्ञकर्त्या धर्मप्रति । अनुजीं भूचक्रजयसंपत्ति । समर्पिली संभाराथीं । हें ऐकूनि परीक्षिति पुसों पाहे ॥ ४ ॥ दिक्चक्र जिंकूंनि वसुधा वश । भूपमात्र केले दास । म्हणतां मागधजय विशेष । पुसावया नृप इच्छी ॥ ५ ॥ जाणोनि नृपाचें अंतर । मागधवधाचा प्रकार । कथिता झाला व्यासकुमर । सविस्तर तो ऐका ॥ ६ ॥

श्रुत्वाऽजितं जरासंधं नृपतेर्ध्यायतो हरिः । आहोपायं तमेवाऽऽद्य उद्धवो यमुवाच ह ॥ १५ ॥

शुक म्हणे गा परीक्षिति । मागधवधानंतर क्षिति । पाण्डवीं जिंकिली हें तुजप्रति । सांगों सुमति विसरलों ॥ ७ ॥ जेव्हां धर्में विचार पुसिला । तेव्हांचि कृष्ण त्यातें वदला । जंववरी मागध नाहीं वधिला । तंव न वचे केला राजसूय ॥ ८ ॥ मागधवधाचें दुर्घट कार्य । ऐसें पुसतां धर्मराय । कृष्णें कथिता अभिप्राय । ऐकोनि राहे स्तब्ध मनीं ॥ ९ ॥ जरासंध अजिंक रणीं । राजा सचिंत हें ऐकोनी । त्यासि आद्य जो चक्रपाणी । सांगे श्रवणीं कृत मंत्र ॥ ११० ॥ यादवसभेमाजि उद्धवें । उपाय कथिला

कौशल्यविभवें । त्या मंत्राचें रहस्य आघवें । धर्मा देवें प्रकाशिलें ॥ ११ ॥ धर्म ऐकोनि उपायरचना । पाचारूनि भीमार्जुनां । समर्पूनि जनार्दना । म्हणे या यत्नां सफळ करीं ॥ १२ ॥ कृष्णें ऐकूनि धर्मवचन । सवें घेऊनि भीमार्जुन । निघता झाला तें व्याख्यान । सावधान अवधारा ॥ १३ ॥

भीमसेनोऽर्जुनः कृष्णो ब्रह्मलिंगधरास्त्रयः । जग्मुर्गिरिव्रजं तात बृहद्रथसुतो यतः ॥ १६ ॥

कृष्णार्जुन भीमसेन । क्षत्रियवेष पालटून । ब्राह्मणचिह्नें अवलंबून । झाले ब्राह्मण षट्कर्मीं ॥ १४ ॥ वत्सें वत्सप वत्सहरणीं । होऊनि मोहिल्या गोगोळणी । त्या येथें विप्राची अवगणी । अशक्य नटनीं कायसें ॥ १५ ॥ तिघीं धरूनि ब्राह्मणवेष । सवेग ठाकिला मागध देश । बृहद्रथसुताचा जेथ वास । त्या गिरिव्रजपुरास पातले ॥ १६ ॥ तेथ जाऊन केलें काय । तोही कथितो अभिप्राय । परिसावया सावध होय । म्हणे तनय व्यासाचा ॥ १७ ॥

ते गत्वातिथ्यवेलायां गृहेषु गृहमेधिनम् । ब्रह्मण्यं समयाचेरन्राजन्या ब्रह्मलिंगिनः ॥ १७ ॥

गृहमेधी जे गृहस्थाश्रमी । वर्तत असतां नित्य स्वधर्मीं । त्यांचिये अतिथिवेळानियमीं । मागधसद्मीं प्रवेशले ॥ १८ ॥ क्षत्रिय असतां ब्राह्मणवेषीं । याचिते झाले मागधासी । अतिथिसमयाच्या विशेषीं । तें नृपासि शुक सांगे ॥ १९ ॥

राजन्विद्धचतिथीन्प्राप्तानर्थिनो दूरमागतान् । तन्नः प्रयच्छ भद्र ते यद्वयं कामयामहे ॥ १८ ॥

राया अमो तुज कल्याण । आम्ही दूरस्थ अतिथि जाण । अतिथिसमयातें ठाकून । प्राप्त झालों धर्मज्ञा ॥ १२० ॥ आम्ही जिया अर्थाचे अर्थीं । तो तूं देईं आम्हांप्रति । संकल्पधारा सोडितां क्षिती । मागूं तुजप्रति अभिलषित ॥ २१ ॥ विमुख होऊं नये ये काळीं । यालागीं संकल्पजळाञ्जली । वदान्य होऊनियां भूतळीं । सोडितां सकळी काम वदों ॥ २२ ॥ जरी तूं राया वदसी ऐसें । आधीं गोवितां संकल्पपाशें । पुढें याञ्चा दुर्घट असे । शंका मानसें हे धरिजे ॥ २३ ॥ तुम्ही गोवूनि संकल्पजाळीं । अदेय याञ्चा दुर्घट केली । देऊं न शकतां वृथा गेली । तरी काळिमा लागली दातृत्वा ॥ २४ ॥ तुम्ही ब्राह्मण याञ्चापर । नृपाभरणें वरिष्ठतर । मुकुट कुंडलें श्वेत चामर । अदेय साचार हें तुमचें ॥ २५ ॥ अत्यंत दुस्सह पुत्रवियोग । कीं धनरत्नभांडारही अनेक । जो पुत्राचा दायभाग । म्हणसी निलाग याञ्चा हे ॥ २६ ॥ तरी ऐकें गा मगधपाळा । परम वदान्य धर्मशीळा । हे मति अल्पका दीना कुटिळा । नोहे निर्मळा तुजयोग्य ॥ २७ ॥ यदर्थीं अवधारीं दृष्टान्त । जेणें नोहे धर्मोपहत । सत्त्वधीराचा वृत्तान्त । असेल विदित पुन्हा ऐक ॥ २८ ॥

किं दुर्मर्ष तितिक्षूणां किमकार्यमसाधुभिः । किं न देयं वदान्यानां कः परः समदर्शिनाम् ॥ १९ ॥

असाधु जे नर दुर्जन । त्यांसि अकार्य ऐसें कर्म कोण । छळन परपीडन हिंसन । सर्व त्यालागून करणीय ॥ २९ ॥ तैसे क्षमस्वी तितिक्षु साधु । त्यांसि न सोसवे कोणता खेदु । सहनशीळांप्रति दुःखद । कोण संबंध दुस्त्यज पैं ॥ १३० ॥ अत्यंत वदान्य जे उदार । कोण पदार्थ त्यां अदेयतर । येथिंचें वैभव सर्व नश्वर । जाणोनि धीर सर्वार्पणीं ॥ ३१ ॥ सर्वज्ञ जाणती एकात्मता । तेचि समदर्शी तत्त्वता । त्यांसि स्वपरभेदवार्ता । म्हणतां वक्तृता मोघ गमे ॥ ३२ ॥ यालागीं राया तुझ्या ठायीं । सर्वसद्गुण वसती पाहीं । अतिथियाञ्च्या भंगितां कांहीं । लाभ कीं हानि हें विवरीं ॥ ३३ ॥

योऽनित्येन शरीरेण सतां गेयं यशो ध्रुवम् । नाचिनोति स्वयं कल्पः स वाच्यः शोच्य एव सः ॥२०॥

मनुष्यलोकीं जन्मूनि प्राणी । अनित्य शरीरादि जाणोनी । अढळ उज्ज्वळ यशःसाधनीं । जो प्रयत्नीं न प्रवर्तें ॥ ३४ ॥ शरीरारोग्य बळ पाटव । इंद्रियव्यापार पटुतर सर्व । तेज ऐश्वर्य बुद्धिगौरव । अमतां यश ध्रुव न साधी जो ॥ ३५ ॥ वाच्य म्हणिजे त्रिजगीं निन्द्य । तो नर पामर अभाग्य मंद । शोकदुःखांचा सजीव कंद । कल्मषहृद कुटिळात्मा ॥ ३६ ॥ म्हणसी यश तें कैसें काये । ध्रुव होत्सातें कोठें राहे । नाक डोळे हात पाये । त्रिजगीं जाय केंवि पां तें ॥ ३७ ॥ यदर्थी ऐकें मागधपाळा । सारासारविचारकुशळा । पय प्राशूनि सांडी जळा । बुद्धि मराळसम विवरीं ॥ ३८ ॥ सज्जन गाती जें यश वदनीं । शीतळ उज्वळ शशिसम गगनीं । भूतभविष्यद्वर्तमानीं । त्रिजगीं कोंदूनि ध्रुव राहे ॥ ३९ ॥ भाट वंदिजन गायक । वेतनें भक्षूनि यशाचे घोषक । पठती सादरता सन्मुख । होती विमुख अवेतनें ॥ १४० ॥ महिमा वदती तोंडावरी । वेतन न पावतां छीथू करी । ऐसे यशम्वी घरोघरीं । नरीं पामरीं गाइजती ॥ ४१ ॥ संतत गाती ऐसियांतें । अविरत पढती भगवच्चरितें । जें यश वसवी सद्वदनातें । त्रिजगीं त्यातें ध्रुव म्हणिजे ॥ ४२ ॥ संतीं गाइजे तेंचि संत । येर वैभव तें अनंत । क्षणिक दृश्य नाशवंत । जाणोनि महंत उपेक्षिती ॥४३॥ म्हणसी संतीं हरिगुण गावे । कासया नृपयश तिंहीं पढावें । तरी जे अर्थनि नश्वरविभवें । हरिगौरवें नर तुळती ॥ ४४ ॥ त्यांची सत्कीर्ति मंदाकिनी । प्रवाहरूपें संतां वदनीं । कालिमळ क्षाळी श्रवणीं पठनीं । अढळ त्रिभुवनीं विस्तृत जे ॥ ४५ ॥ यालागीं तोचि बुद्धिमंत । जो नश्वरदानें यश शाश्वत । जोडूनि मिरवे त्रिजगाआंत । याञ्चा उपहत न करूनि ॥ ४६॥ कुटुंबें प्राणेंसि अवंचक । राया पाहें मुद्गलादिक । याञ्चाभंगाचाकळंक । न शिवोनि यशाङ्कयश साजे ॥ ४७ ॥ पूर्वी गाती ज्यां पुराणें । वर्तमानीं ऐकिजे श्रवणें । पुढें तरती श्रवणें पठनें । यशें विस्तीर्णें जयांचीं ॥ ४८ ॥ राया म्हणसी ऐसे कोण । ऐक संक्षेपें करितों कथन । कावल देऊनि कैवल्यसदन । साधूनि यशोधन ध्रुव जें का ॥ ४९ ॥

हरिश्चंद्रो रंतिदेव उंछवृत्तिः शिबिर्बलिः । व्याधः कपोतो बहवो ह्यध्रुवेण ध्रुवं गताः ॥ २१ ॥

राजा हरिश्चंद्र सूर्यवंशीं । विश्वामित्रें छळितां त्यासी । राज्यदानाचे दक्षिणेसी । जो कुटुंबेंसि विकूनि

घे ॥ १५० ॥ विकूनि घेतलें चाण्डालसदनीं । परंतु सत्त्व न संडी छळूनी । अयोध्याजनेंसीं स्वर्गभुवनीं । बैसूनि विमानीं प्रवेशला ॥ ५१ ॥ अडेचाळिस दिवसवरी । सकुटुंब निर्जळ निराहारी । किंचित प्राप्त झाल्या तदुपरी । याचक अवसरीं ते आला ॥५२॥ त्याचा न करूनि यांचा भंग । रंतिदेव धार्मिक चांग । तदन्नोदकें तो पूजूनि साङ्ग । पावला अभंग ब्रह्मलोक ॥ ५३ ॥ कुटुम्बेसहित मुद्गलमुनि । उंछवृत्ति अवलंबूनी । षण्मासपर्यंत उपोषणीं । धान्य संग्रही पारणया ॥ ५४ ॥ तंव त्या पारणयाचे काळीं । दुर्वासा मुनि येऊनि छळी । परि तो सत्त्वधीर न डंडळी । अर्पूनि सकळीं व्रत रक्षी ॥ ५५ ॥ ऐसा चिरकाळ छळितां मुनि । मुद्गल न करी सत्त्वहानि । कुटुम्बेंसहित ब्रह्मसदनीं । बैसोनि विमानीं प्रवेशला ॥ ५६ ॥ तैसेंचि शिबिनृपाचें करणें । कपोता श्येन घेतां प्राणें । मखमंडपीं शिबीतें तेणें । प्राणरक्षणें याचिलें ॥ ५७ ॥ रायें धर्षितां श्येनाप्रति । श्येन म्हणे मी परम क्षुधार्ति । माझा भक्ष्य माझे हातीं । न देतां अपकीर्ति तव माथां ॥ ५८ ॥ यज्ञमंडपीं मज निराश । जातां वरील तुज अपयश । ऐसें ऐकूनि शिबी नरेश । बोले श्येनास मृदुवचनें ॥ ५९ ॥ कपोतकाच्या भारंभार । तुजला अर्पीन मांस अपर । श्येन म्हणे तूं सत्त्वधीर । तरी स्वशीर खंडूनी ॥ १६० ॥ शरणागता रक्षावया । शिबीनें सोलूनि दिधली काया । सत्त्वप्रतापें त्रिदशालया । गेला अन्वयासह नगरा ॥ ६१ ॥ बळीतें विष्णु वामनवेशें । त्रिपादभूदानाच्या मिषें । विष्णुकापट्या भार्गवाधीशें । कथितां मानसें न डंडळी ॥ ६२ ॥ त्रिपादभूदानाचे भरीं । बळि सर्वस्व अर्पण करी । आत्मनिवेदनें बटुवेषधारी । सत्त्वें श्रीहरि जिंकियला । ६३ ॥ अद्यापि होऊनि द्वारपाळ । बळीतें रक्षूनि गोपाळ । पुढें करीन आखंडळ । प्रतिज्ञा अढळ हे ज्याची ॥ ६४ ॥ असोत नरवरांच्या गोठी । ऐकें सामान्य जीवकोटी । माजि सत्त्वधीर जे जगजेठी । ते मम पाठीं अवधारीं ॥ ६५ ॥ कपोतपक्षी तिर्यग्योनी । क्षुधित व्याध अतिथिस्थानीं । पत्नीसहित स्वमांसदानीं । होऊनि विमानीं मिरविले ॥ ६६ ॥ व्याधें देखूनि कपोतधैर्य । पश्चात्तापें तापला होय । दावानळीं होमूनि देह । मग निष्पाप राहे सुरभुवनीं ॥ ६७ ॥ ऐसें सांगूं आणिक किती । अध्रुवशरीरलोभनिवृत्ति । करूनि अपवर्गातें भजती । धन्य त्रिजगतीं तुज ऐसें ॥ ६८ ॥ राया ऐकें ब्राह्मद्रथा । कायशा पूर्वनृपांच्या कथा । अतिथियाज्ञा न करीं वृथा । होयीं परता सत्त्वस्थ ॥६९॥ ऐसें ऐकूनि ब्राह्मणवचन । मगधेन्द्र झाला सावधान । चिह्नें लक्षूनि करी विवरण । बोले वचन तें ऐका ॥ १७० ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ स्वरैराकृतिभिस्तांस्तु प्रकोष्ठैर्ज्याहतैरपि । राजन्यबंधून्विज्ञाय दृष्टपूर्वानचिंतयत् ॥ २२ ॥

शुक म्हणे गा कुरुसत्तमा । ऐसा ब्राह्मणीं सत्त्वमहिमा । कथितां ऐकूनि मागधनामा । हृदय-पद्मामाजि विवरी ॥ ७१ ॥ वर्णिती पूर्वील सत्त्वधीर । दिसती ब्राह्मणवेषधर । यथार्थ नसती हे द्विज-वर । क्षत्रिय साचार अवगमती ॥ ७२ ॥ शस्त्रास्त्रशिक्षितवर्म्माकृति । भैरवकंठीरवस्वर गमती । ज्याहतप्रकोष्ठ मज अवगमती । देखिले वाटती पूर्वीं हे ॥७३॥ द्रौपदीस्वयंवरादिकांच्या ठायीं । देखिले

वाटती हे ब्राह्मण तयीं । असो आणिकही कोठें कहीं । लक्षिलें ऐसें वाटतसे ॥ ७४ ॥ ब्राह्मण नव्हती हे क्षत्रिय । हे जाणोनि मानसीं कृतनिश्चय । करिता झाला मागधराय । तो मुनिवर्य निरूपी ॥ ७५ ॥

राजन्यबंधवो ह्येते ब्रह्मलिंगानि बिभ्रति । ददामि भिक्षितं तेभ्य आत्मानमपि दुस्त्यजम् ॥ २३ ॥

ब्राह्मण म्हणती हे क्षत्रियबंधु । इहीं ब्रह्मचिह्नें धारिलीं विविधु । मायिक छळूं आले प्रसिद्धु । तऱ्ही सत्त्व विशुद्ध मी न टाकीं ॥७६॥ मज ये काळीं जे मागती । तें मी देईन तयांप्रति । धनसुतवनितादि संपत्ति । हो कां दुस्त्यज स्वतनूही ॥ ७७ ॥ वचन गोवूनि वदती काम । तैं तो अदेय दुस्त्यज परम । ऐसें जाणोनिही मी नियम । सत्त्व निःसीम नुलंघीं ॥ ७८ ॥

बलेर्नु श्रूयते कीर्तिर्विततां दिक्ष्वकल्मषा । ऐश्वर्याद्भ्रंशितस्यापि विप्रव्याजे न विष्णुना ॥ २४ ॥

अकल्मष निर्मळ बळीची कीर्ति । विस्तीर्ण विस्तारली दिगंतीं । तें काय अविदित आम्हांप्रति । जाणों निश्चिती अवघेंच कीं ॥ ७९ ॥ श्रीविष्णूनें ब्राह्मणमिषें । बळीचें ऐश्वर्य छलनावशें । भ्रंशिलें असतां सत्त्वविशेषें । उज्ज्वल यशें मिरवे तो ॥ ८० ॥

श्रियं जिहीर्षतेंद्रस्य विष्णवे द्विजरूपिणे । जानन्नपि महीं प्रादाद्वार्यमाणोऽपि दैत्यराट् ॥ २५ ॥

ब्राह्मणभजनें इंद्रसंपत्ति । जिंकूनि हरितां बळीनें निगुती । वामनवेषें तयाप्रति । छळी श्रीपति याज्ञेनें ॥ ८१ ॥ तया बटुरूपा विष्णूतें । छळक अंतरीं जाणोनि निरुतें । शुक्रें वारितांही बळीतें । तथापि महीतें तो त्या दे ॥ ८२ ॥ यास्तव द्वारपाळ श्रीपति । त्रिजगीं विस्तृत उज्ज्वल किर्ति । वामन इंद्रपदाची सुती । घेऊनि सुतळीं संरक्षी ॥ ८३ ॥ छळना साहूनि सर्वस्वदानें । यश ऐश्वर्य साधिलें बळीनें । नश्वरलोभें विमुखपणें । अतिथि दवडणें धिक् तेव्हां ॥ ८४ ॥

जीवतात्राह्मणार्थाय कोऽन्वर्थः क्षत्त्रबंधुना । देहेन पतमानेन नेहता विपुलं यशः ॥ २६ ॥

क्षत्रकुळीं जो जन्मला होय । पडणार जाणोनि नश्वर देह । विप्रकामनासाधनीं राहे । तो नर लाहे विपुल यश ॥ ८५ ॥ ब्राह्मणकारणीं जीवित ज्याचें । यावज्जन्म सर्वस्व वेंचे । याहूनि विशेष कोण अर्थाचें । जोडल्या यशाचें विपुलत्व ॥ ८६ ॥

इत्युदारमतिः प्राह कृष्णार्जुनवृकोदरान् । हे विप्रा ब्रियतां कामो ददाम्यात्मशिरोऽपि वः ॥ २७ ॥

इतुकें विवरूनि उदारमति । भीमार्जुनकृष्णांप्रति । म्हणे विप्र हो कामना चित्तीं । असेल मजप्रति ते मागा ॥ ८७ ॥ तुम्ही दिसतां वेषधारी । छळनही करूं आलेंति जरी । तऱ्ही ब्राह्मणां न अव्हेरीं । विभवीं

नश्वरीं भुलोनियां ॥ ८८ ॥ छलनीं मन्व राक्षितां मरण । लाहतां पाविजे कैवल्यसदन । नश्वरलोभें विमुख ब्राह्मण । दवडितां पतन अंधतमीं ॥ ८९ ॥ यालागिं अभीष्ट काम जो तुमचा । तुम्ही मागा तो प्रसन्नवाचा । मस्तकें सहित म्यां विभवाचा । सोडिला साचा संकल्प ॥ १९० ॥ मस्तक मागाल ये अवसरीं । तोही देईन तुमच्या करीं । कार्यसिद्धीतें जाणोनि हरी । बोले वैखरी ते ऐका ॥ ९१ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥ युद्धं नो देहि राजेंद्र द्वंद्वशो यदि मन्यसे । युद्धार्थिनो वयं प्राप्ता राजन्या नान्नकांक्षिणः ॥२८॥

हरि म्हणे गा भो राजेन्द्रा । आम्हीं युद्धार्थ तुझिया भद्रा । पातलों जाणोनि द्वंद्वसंगरा । देईं उदारा मगधेशा ॥ ९२ ॥ आम्ही अन्नार्थी न हों ब्राह्मण । द्वंद्व युध्दार्थी क्षत्रिय जाण । आम्हांसि द्वंद्वयुद्ध देऊन । म्हणवीं धन्य तिहीं लोकीं ॥ ९३ ॥ जरी हें मानेल तुझिया मना । तरी पुरवावी युद्धकामना । इतुकें बोलूनि परिज्ञाना । करी अभिधाना प्रकटूनी ॥ ९४ ॥

असौ वृकोदरः पार्थस्तस्य भ्रातार्जुनो ह्ययम् । अनयोर्मातुलेयं मां कृष्णं जानीहि ते रिपुम् ॥ २९ ॥

म्हणसी क्षत्रिय तुम्ही कोण । तरी हा भीम पृथात्मज जाण । त्याचा अनुज भ्राता अर्जुन । मातुळनंदन मी त्यांचा ॥ ९५ ॥ सतरा वेळा समराङ्गणीं । जिंकूनि सोडिलें तुजलागूनी । तो मी तव रिपु कृष्ण जाणोनी । युद्धदानीं दृढ होईं ॥ ९६ ॥ कृष्णवचन ऐकोनि ऐसें । हास्य केलें मगधाधीशें । हांसोनि बोलिला जें संतोषें । तें तूं परिसें परीक्षिती ॥ ९७ ॥

एवमावेदितो राजा जहासोच्चैः स मागधः । आह चामर्षितो मंदा युद्धं तर्हि ददामि वः ॥ ३० ॥

स्वनामें ऐसिये प्रकारीं । मागधा जाणवितां श्रीहरी । मग तो हांसोनि उच्चस्वरीं । सक्रोध उत्तरीं बोलतसे ॥ ९८ ॥ अरे मंदहो द्वंद्वयुद्ध । तुम्हीं याचिलें मजविरुद्ध । तुम्हांसि दिधलें तें प्रसिद्ध । परि ऐका सावध ये अर्थी ॥ ९९ ॥

न त्वया भीरुणा योत्स्ये युधिविक्लवचेतसा । मथुरां स्वपुरी त्यक्त्वा समुद्रं शरणं गतः ॥ ३१ ॥

युद्ध करावें कोणासीं । जेणें श्लाघ्यता ये आपणासी । तुम्हां ऐसिया पामरांसीं । युद्ध आम्हांसि अयोग्य ॥ २०० ॥ कृष्णा कालीचें तूं लेंकरूं । तुझा वाळला नाहीं जारू । दिग्विजयी मी मागधवीरू । नव्हें श्लाघ्यतर तव युद्धीं ॥ १ ॥ गरुड शेपेंसी समराङ्गणीं । अश्लाघ्य मारणें त्यां उंडणीं । सिंह शशका मारितां रणीं । धन्य कोणी न म्हणे कीं ॥ २ ॥ युद्धीं व्याकुळ चित्तेंकरून । समरीं करिसी पलायन । मथुरा राजधानी टाकून । समुद्रा शरण गेलासी ॥ ३ ॥ ऐसिया तुजसीं भांडतां मज ।

वीरमंडळीं पावेन लाज । मातुलहंता तूं निर्लज्ज । मुखाम्भोज दाखविसी ॥ ४ ॥ एवं तुजसीं युद्ध न घडे । म्हणसी धनंजयासीं भिडें । तोही अतुल्य तुझेनि पाडें । तेंही निवाडें अवधारीं ॥ ५ ॥

अयं तु वयसाऽतुल्योनातिसत्त्वो न मे समः । अर्जुनो न भवेद्योद्धा भीमस्तुल्यबलो मम ॥ ३२ ॥

अर्जुन कनीयवयसायोगें । परम सूक्ष्म निर्बळ आंगें । समरीं न शोभे वीरविभागें । युद्ध वाउगें येणेंसी ॥ ६ ॥ अर्जुन योद्धा नव्हे धीर । त्यासीं भिडतां हांसती वीर । भीमही केवळ कोमळ पोर । मजसीं समर या न घडे ॥ ७ ॥ परंतु तुम्ही ब्राह्मणवेशें । दरिद्री आलेति भिक्षामिषें । याचिलें द्वंद्वयुद्ध आपणें । तें म्यां कैसें न देइजे ॥ ८ ॥ समस्त मनोरथ जो तुमचा । तदनुसार केली याज्ञा । तदर्पणीं म्यां गोविली वाचा । देईन साचा युद्ध तुम्हां ॥ ९ ॥ यालागीं तुम्हां तिघां जणां । भीम कांहींसा आंगवणा । मजसीं तुल्य ऐसें म्हणा । समराङ्गणा माजिवडा ॥ १० ॥ ऐसे सम्मानूनि ब्राह्मण । कृष्णार्जुनभीमसेन । त्यांमाजि द्वंद्वयुद्धाचा क्षण । भीमालागून दिधला पैं ॥ ११ ॥

इत्युक्त्वा भीमसेनाय प्रादाय महतीं गदाम् । द्वितीयां स्वयमादाय निर्जगाम पुराद्बहिः ॥ ३३ ॥

इतुकें बोलूनि मागधें तेणें । विशाळ गदा भीमाकारणें । आणूनि दिधली संतुष्टमनें । दुसरी आपण घेतली ॥ १२ ॥ मग वंदूनि कुलदेवता । त्रेताग्निऋत्विजां द्विजां समस्तां । गौरवूनि सुहृदां आप्तां । झाला निघता समरातें ॥१३॥ लागली वाजंतरांची घाई । चामरें ढळती दोहीं बाहीं । भीमार्जुनशेषशायी । ब्राह्मणवेशें विराजती ॥ १४ ॥ पुरावाहिर निघाला गजरें । रणमही ठाकिली आनंदभरें । द्वंद्वयुद्धाच्या दानाधिकारें । साधनें अपरें निषेधिलीं ॥ १५ ॥ सेनासंभार पार्षद । प्रधान मंत्री अमात्यवृंद । यातें वारुनि जाहला सिद्ध । द्वंद्वयुद्धदानार्थ ॥ १६ ॥

ततः समे स्थले वीरौ संयुक्ताविवरेतरौ । जघ्नतुर्वज्रकल्पाभ्यां गदाभ्यां रणदुर्मदौ ॥ ३४ ॥

शस्त्रास्त्रविद्येचा आखाडा । शिष्यां राजगुरुसंग्रामचाडा । युद्धकौशल्यें शिक्षिती होडा । तो तो पवाडा ठाकियला ॥ १७ ॥ लांब रुंद विस्तीर्ण भूमी । मीदुपदेवता वेताळनामी । स्थापूनि संग्राम-भिक्षाकामी । अभ्यासनियमीं जे ठायीं ॥ १८ ॥ चतुष्कोण चारी भुजा । अरत्निमात्र उच्छ्रित वोजा । पाषाणबद्ध वेदी सहजा । मेखळामंडित रंगमही ॥ १९ ॥ मृदुळवाळुकामय विस्तीर्ण । यथेष्ट विखुरिलें गैरिकाचूर्ण । लहुडी भुशुण्डी गुरु पाषाण । बाहुबळगणनार्थ ॥ २२० ॥ ऐसिये समेखळे भूमी । तिये समयीं संग्रामकामी । वीर पातले पराक्रमी । उद्भटकर्म मदोद्धत ॥ २१ ॥ गगनचुंबित रोविले ध्वज । पताका फडकती तेजःपुञ्ज । समरश्रियेची लावण्यवोज । दाविती मत्तगजपडिपाडें ॥ २२ ॥ वीरश्रीचूर्णरंगीं डवरले । ठाणठकारें मज्ज झाले । द्वंद्वयुद्धाप्रति वेठले । जेंवि मातले बळसिंधु ॥ २३ ॥

कास कसानि मालगांठीं । वळिल्या केशांच्या वीरगुंठी । गदा पडताळूनियां मुष्टी । युद्धीं जगजेठी मिसळले ॥ २४ ॥ दंडीं मणगटीं सुबद्ध बिरुदें । गगन गाजविती सिंहनादें । वीरश्रीद्योतक वाजती वाद्यें । स्मरती पदें स्वगुरूचीं ॥ २५ ॥ गदा धरूनि स्वकक्षपुटीं । पृथ्वी स्पर्शोनि वंदिती मुकुटीं । मृत्तिका चर्चूनियां ललाटीं । गदा मुष्टी आकळूनी ॥ २६ ॥ परस्परें करिती प्रहार । वज्रप्रहारतुल्य कठोर । जेंवि मदोन्मत्त कुंजर । दुर्मदें धीर रणरंगणीं ॥ २७ ॥ मंदर भेदिती कठोरप्रहारें । तेंवि त्या गदा जैसीं वज्रें । कीं तीं सुनाभसुदर्शनचक्रें । युद्धीं हरिहरें परजिलीं ॥ २८ ॥ गदायुद्धीं अभ्यासशीळ । परीक्षा देती शिक्षाकुशळ । तैसे दुर्मद वीर प्रबळ । करिती तुंबळ द्वंद्वयुद्ध ॥ २९ ॥

मंडलानि विचित्राणि सव्यं दक्षिणमेव च । चरतोः शुशुभे युद्धं नरयोरिव रंगिणोः ॥ ३५ ॥

गदायुद्धाची शिक्षाझडती । तैसी परस्परें परीक्षा देती । रंगीं शिक्षित नट ज्या रीती । तेंवि शोभती समरंगीं ॥२३०॥ दक्षिण सव्य पदसंचारी । विचित्र मंडळांचिया परी । गदाप्रहार अभ्यासकुसरी । देती भंवरी परस्परें ॥ ३१ ॥ जैसे रंगीं नरश्रेष्ठ । तैसेच मागध भीम सुभट । या दोघांचें युद्ध उद्भट । शोभा यथेष्ट पावले ॥ ३२ ॥ हां हां म्हणोनि हाकिताती । घे घे म्हणोनि संघटती । ओष्ठ रगडूनि घाय । हाणिती । साहें म्हणती परस्परें ॥ ३३ ॥ मस्तकीं हाणिती कठोर घाय । लत्ताप्रहारें मोडिती पाय । जानुप्रहारें चूर्ण हृदय । करूं धांवती क्षोभोनी ॥३४॥ श्रावणमासीं जेंवि अवळा । टिपरी घेऊनि खेळती खेळा । तैशा वाजती गदा चपळा । कुरुभूपाळा ते काळीं ॥ ३५ ॥

ततश्चटचटाशब्दो वज्रनिष्पेषसन्निभः । गदयोः क्षिप्तयो राजन्दंतयोरिव दंतिनोः ॥ ३६ ॥

त्यानंतरें परम क्रूर । उभयतांचे गदाप्रहार । वज्रासारिखे कठोर । अतिनिष्ठुर पडताती ॥ ३६ ॥ गदेवरी वोढिती गदाघाया । हस्तलाघवें चपळ राया । चटचटाशब्द उमटती तया । उपमावया गजयुद्धा ॥ ३७ ॥ जैसे कुञ्जर मदोन्मत्त । निकरें भिडती अरण्यांत । चटचटाशब्दें वाजती दंत । हेही तद्वत गदाप्रहार ॥ ३८ ॥ दोघेही न धरिती मरणभया । नागायुतबळिष्ठ काया । समान सदट दोघांचिया । इच्छिती विजया परस्परें ॥ ३९ ॥ वीरश्री बाणली दोघां आंगीं । निर्भय निःशंक भिडती रंगीं । गदा प्रेरिती बाहुवेगीं । मर्मविभागीं तें ऐका ॥ २४० ॥

ते वै गदे भुजजवेन निपात्यमाने अन्योऽन्यतोंऽसकटिपादकरोरुजत्रून् ।
चूर्णीबभूवतुरुपेत्य यथार्कशाखे संयुद्धचतोर्द्विरदयोरिव दीप्तमन्यवोः ॥ ३७ ॥

तया दोघांच्या उभय गदा । बाहुवेगें ताडिती विशदा । एकमेकांच्या अवयवभेदा । करितां खेदा न पवती ते ॥ ४१ ॥ एकमेकांच्या खांदियांवरी । निकरें ताडिती गदाप्रहारीं । घाय वोढिती वरिच्यावरी । कटितट प्रहारीं शितरिती ॥ ४२ ॥ मस्तकीं दावूनियां घाय । वंचनमार्गे ताडिती

पाय । तेणें जघन चूर्णित होय । परि न धरिती भय मरणाचें ॥ ४३ ॥ बाहु कोंपर मणगटें मुष्टी । लक्षूनि ताडिती जगजेठी । एकमेकांच्या अंगयष्टी । झोडिती हठी गदाप्रहारें ॥ ४४ ॥ मन्यु म्हणिजे क्रोधानळ । तेणें प्रदीप्त जाले प्रबळ । हिमाचळावरी वज्रकल्लोळ । तेंवि विशाळ गदाप्रहार ॥ ४५ ॥ मांडिया मोडिती गदाघातीं । जत्रु म्हणिजे कंठप्रान्तीं । अग्रभागींच्या उभय अस्थी । चूर्ण करिती परस्परें ॥ ४६ ॥ असो ऐसिया अवयवसंधी । लक्षूनि ताडिती महाक्रोधी । जेंवि अर्कतरूचे सन्निधी । भिडिजे द्विरदीं महाक्रोधें ॥ ४७ ॥ द्विरदयुद्धाचे संघटनीं । अर्कशाखांची भंगाणी । तेंवि अवयव दोघीं जणीं । गदाप्रहरणीं भंगिजती ॥ ४८ ॥ मदोन्मत्त कुञ्जर वनीं । तेंवि संघटिजे दोघीं जनीं । दोघांमाजि विषादाग्नि । प्रज्वळलेनि आवेशें ॥ ४९ ॥

इत्थं तयोः प्रहृतयोर्गदयोर्नृवीरौ क्रुद्धौ स्वमुष्टिभिरयःस्पर्शैरपिष्टाम् ।
शब्दस्तयोः प्रहरतोरिभयोरिवाऽसीन्निर्घातवज्रपरुषस्तलताडनोत्थ ॥ ३८ ॥

ऐसे सक्रोध मानववीर । हाणित असतां गदाप्रहार । स्वमुष्टीचे स्पर्श कठोर । तिहीं चकचूर उभयाङ्गें ॥ २५० ॥ उभय गजांचे दंतखडके । तेंवि उभय गदांचे धडके । विद्युत्पातासारिखे कडके । उठती चपेट घाताचे ॥ ५१ ॥ तळताडनें उठती ध्वनी । जेंवि तडिद्घान मेघ गगनीं । तेंवि चपेटें मुष्टीच्या प्रहरणीं । भूमि दणाणी सशैल ॥ ५२ ॥ एवं दोघे समान बळी । समान गदाशिक्षाशाळी । दोघे अभंग रणमंडळीं । हें परीक्षितीजवळी शुक सांगे ॥ ५३ ॥

तयोरेवं प्रहरतोः समशिक्षाबलौजसोः । निर्विशेषमभूद्युद्धमक्षीणजवयोर्नृप ॥ ३९ ॥

ऐसिया भिडतया दोघांचे । बळप्रभाव समान साचे । शिक्षाअभ्यासशीळतेचे । समान वीर दोघेही ॥ ५४ ॥ कोण्ही कोण्हा न मेजती । कोण्हा कोण्ही न भंगती । समान वीरश्रीइंगितीं । आवेशवृत्ती समसाम्य ॥ ५६ ॥ म्हणोनि निर्विशेष युद्ध । अक्षीण शक्ती अत्यंत क्रुद्ध । आवेश वेग अतिसुबद्ध । समान सन्नद्ध समरंगीं ॥ ५७ ॥ कोण्ही कोण्हा न येती हारी । यालागिं युद्ध चिरकाळवरी । चपेटमुष्टिगदाप्रहारीं । करिती समरीं सावेश ॥ ५८ ॥ राया म्हणसी किती दिवस । द्वंद्वयुद्धीं गेले त्यांस । ऐक कथितों तो विशेष । जें वदला व्यास मम जनक ॥ ५९ ॥

एवं तयोर्महाराज युद्धचतोः सप्तविंशतिः । दिनानि निरगंस्तत्र सुहृद्वन्निशि तिष्ठतोः ॥ ४० ॥

सत्तावीस दिवसवरी । द्वंद्वयुद्धाचिया कसुरी । ऐसे भिडतां महावीरीं । न येती हारीं परस्परें ॥ २६० ॥ जिवलग सोयरे परम आप्त । तैसे निर्वैर रात्रीं सुप्त । कापट्यमळें न होती लिप्त । सदा सतृप्त स्वानंदें ॥ ६१ ॥ निर्दोषयशाची करणें जोडी । धरूनि मानसीं हेचि आवडी । दिवसां भिडती

प्रतापप्रौढी । निर्वाणगुढी उभवावया ॥ ६२ ॥ भिडतां या रीती अजस्र । लक्षूनि एकान्तीं श्रीधर । तयाप्रति वृकोदर । बोले उत्तर तें ऐका ॥ ६३ ॥

एकदा मातुलेयं वै प्राह राजन्वृकोदरः । न शक्तोऽहं जरासधं निर्जेतु युधि माधव ॥ ४१ ॥

कोणे एके समयीं भीम । मातुळपुत्र जो मेघश्याम । तयाप्रति समरकाम । माधनीं अक्षम हें प्रकटी ॥ ६४ ॥ राया ऐकें कौरवपाळा । म्हणे वृकोदर भो गोपाळा । समर्थ नव्हें मी मागधा खळा । समरीं तळा आणावया ॥ ६५ ॥ मायानियंता तूं माधव । यावरी न कळे तुझी माव । माझी निःशेष भंगली हांव । समरपाटवविजयाची ॥ ६६ ॥ मागध योद्धा प्रतापी सदट । ऐसा मजमीं कोण्ही सुभट । समरीं न संघटेचि धीट । मजहूनि वरिष्ठ बळिष्ठ हा ॥ ६७ ॥ ऐसीं वृकोदराचीं वचनें । श्रवणीं ऐकूनि जनार्दनें । मायालाघवी रहस्यसूचनें । करिता झाला तें ऐका ॥ ६८ ॥

शत्रोर्जन्ममृत्यो विद्वान्जीवित च जराकृतम् । पार्थमाप्याययन्स्वेन तेजसार्चितयद्धरि. ॥ ४२ ॥

शत्रु म्हणिजे जरासंध । तयाचें जन्ममृत्यु विशद । स्वयें जाणता श्रीगोविन्द । जीवनकंद महेतुक ॥ ६९ ॥ जें बृहद्रथाच्या उभय नारी । दोनी शकलें दोघीं उदरीं । जन्मतां टाकिलीं बाहेरी । विपरीत परी मानूनी ॥ २७० ॥ तेथ जरानामका राक्षसी । नगरीं भ्रमतां माजि निशीं । तिणें योजितां उभयाङ्गांसी । वैसली अनायासीं दृढ संधी ॥ ७१ ॥ यास्तव जरासंध हें नांव । प्रसिद्ध मिरवी मागधराव । याच्या मरणाचा उपाव । तोही स्वमेव येचि रीती ॥ ७२ ॥ इतुकें विवरूनि जनार्दनें । भीम पाहिला अमृतनयनें । बळप्रतापौजोगुणें । आपुलेपणें प्रौढविला ॥ ७३ ॥ आपुल्या तेजें सुतेजस्वी । भीम करूनियां ओजस्वी । मागध वधूनियां यशस्वी । व्हावया दावी गूढ युक्ती ॥ ७४ ॥

संचित्यारिवधोपायं भीमस्यामोघदर्शनः । दर्शयामास विटपं पाटचयन्निव संज्ञया ॥ ४३ ॥

दुर्घटशत्रुवधोपाय । बरव्या प्रकारें चिंतिता होय । चिन्तूनि भीमासि दाविली सोय । कैसी काय तें ऐका ॥ ७५ ॥ सफळ दर्शन ज्या कृष्णाचें । झालिया साफल्य बहुजन्मांचें । तो भक्तांच्या छंदें नाचे । हें हरियश वाचे श्रुति गाती ॥ ७६ ॥ अरिवधोपाय बरवे रीती । हृदयीं चिन्तूनियां श्रीपति । संज्ञेकरूनि भीमाप्रति । सांगे निगुती कैवाडें ॥ ७७ ॥ दावूनि वृक्षशाखेचे फांटे । चरणीं रगडूनि उधडिजे नेटें । तैसा मागध उधडितां निवटें । संकेत कूटें दाखविले ॥ ७८ ॥ सूचना जाणोनि भीम बळी । हृदयीं बोधला प्रतापशाली । तदनुसार क्रिया केली । तेही परिसिली पाहिजे ॥ ७९ ॥

तद्विज्ञाय महासत्त्वो भीमः प्रहरतां वरः । गृहीत्वा पादयोः शत्रुं पातयामास भूतले ॥ ४४ ॥

महाबळिष्ठ भीमसेन । कृष्णसंकेत जाणून । समरीं करिती जे प्रहरण । त्यांसि मंडन वीरवर

॥२८०॥ मागधा मस्तकें थडकूनि हृदयीं । चरण वोढूनि पाडिला मही । एक चरण रगडूनि पायीं । दुजा द्विबाहीं आकळिला ॥ ८१ ॥

एकं पादं पदाक्रम्य दोर्भ्यामन्यं प्रगृह्य सः । गुदतः पाटयामास शाखामिव महागजः ॥ ४५ ॥

दोहीं पायीं एक चरण । भूतळीं रगडिला बळेंकरून । दुसरा दोर्दंडी कवळून । ऊर्ध्व झोंकूनि उधडिला ॥ ८२ ॥ झोंक मारितां भीम बळी । सांधा उखळला गुदस्थळीं । आधारचक्राच्या चतुर्दळीं । भिन्नता झाली वर्णाची ॥ ८३ ॥ जैसी चंडदुमाची शाखा । बळें कुञ्जर उधडितां देखा । शकलें होती तोचि लेखा । मागथाचा पैं केला ॥ ८४ ॥ आधार स्वाधिष्ठान मणिपुर । अनाहत विशुद्ध आज्ञाचक्र । त्रिकूट श्रीहट गोल्हाट पर । सहस्रारपर्यंत ॥ ८५ ॥ औटपीठ पुण्यागिरी । भ्रमरगुंफेचिये शिरीं । ब्रह्मरंध्रींची खापरी । उधडूनि करी द्वय शकलें ॥ ८६ ॥

एकपादोरुवृषणकटिपृष्ठस्तनांसके । एकबाह्वक्षि भ्रूकर्णे शकले ददृशुः प्रजा ॥ ४६ ॥

एक चरण गुडघा मांडी । ऊर्ध्व आमुडितां दोर्दंडीं । तडतडाटें चिरली गांडी । फुटली कांडी चक्राची ॥ ८७ ॥ एक वृषण अर्ध शिश्न । एक कटी एक जघन । पृष्ठ नाभि समसमान । एक स्तन एक खांदा ॥ ८८ ॥ एक बाहु अर्ध नासिक । कर्ण नयन भ्रू एकैक । ब्रह्मरंध्रांत शकलें देख । जालीं सम्यक सम तुल्य ॥ ८९ ॥ बळें उधडूनि शकलें केलीं । विपरीत द्विभागीं टाकिलीं । जनपदप्रजा देखती झाली । म्हणती भंगली नृपपदवी ॥ २९० ॥ उपचारप्रद किंकरजन । प्रजा पौर जनपद आन । तिहीं नृपशकलें देखोन । शंखस्फुरण आदरिलें ॥ ९१ ॥

हाहाकारो महानासीन्निहते मगधेश्वरे । पूजयामासतुर्भीमं परिरभ्य जयाच्युतौ ॥ ४७ ॥

मोठा माजला हाहाकार । म्हणती हा भंगला महावीर । जरासंध मगधेश्वर । खचला मंदरगिरि जैसा ॥ ९२ ॥ एकीं हाक नेली नगरीं । बोंब जाहली राजमंदिरीं । शोक करिती मागधनारी । आल्या बाहेरी प्रेतापे ॥ ९३ ॥ शकलें कवळूनि विलपती वनिता । म्हणती अहो मगधनाथा । नृपैश्वर्य कवणा माथां । घालूनि जातां परलोका ॥ ९४ ॥ गुह्यवृत्तान्त आम्हांप्रति । सांगूनि रंजवा परम प्रीति । आजि सांडूनि आमुची रति । सायुज्यमुक्ति आलिंगिली ॥ ९५ ॥ शत्रु याचितां ब्राह्मणवेषीं । प्राणभिक्षा वोपूनि त्यासी । तुम्हीं वरिलें सायुज्यतेसीं । निजमत्त्वामी न टळूनी ॥ ९६ ॥ प्रजा म्हणती मागधराया । आमुच्या पाळणा उबगूनियां । तूं गेलासि कवण्या ठायां । उपेक्षूनियां राष्ट्रातें ॥ ९७ ॥ अमात्य सचिव मंत्रिवर्ग । सुहृद इष्टामित्र जिवलग । शेटे महाजन आप्त अनेग । म्हणती प्रसंग संपादा ॥ ९८ ॥ मागधाचें कवळूनि प्रेत । ऐसे रडती जन समस्त । तंव येरीकडे पार्थाच्युत । आलिंगिती भीमातें ॥ ९९ ॥ धन्य धन्य भीमा म्हणती । तुझी अभंग प्रतापशक्ति । नागायुतबळ मागधनृपति ।

उधडूनि कीर्ति माजविली ॥ ३०० ॥ वारंवार हृदयीं भीमा । कवळूनि प्रेमें देती क्षेमा । म्हणती तुझिया बळाची सीमा । सहसा आम्हां न वर्णवे ॥ १ ॥ जयजयकारें विजयलाभ । साहूनि पार्थपंकजनाभ । म्हणती आजि वीरश्रीकोंभ । समूळ स्वयंभ उन्मळिला ॥ २ ॥ एकच्छत्री भूमंडळ । लाधला युधिष्ठिर भूपाळ । निष्कंटक वसुधातळ । झालें केवळ येथूनि ॥ ३ ॥ सिद्धी गेलाच राजसूय । येथूनि झाला दृढ निश्चय । युधिष्ठिराचे वंदिती पाय । नृपसमुदाय भूतळींचे ॥ ४ ॥ भीमार्जुनकृष्ण ऐसे । विजय वरूनि वीरश्रीतोषें । निर्भर वदती परमोल्लासें । मागधेशा संहरतां ॥ ५ ॥ तंव येरीकडे जनपदश्रेष्ठ । अमात्य राजवर्गी वरिष्ठ । येऊनि वंदिती वैकुंठपीठ । याचिती अभीष्ट राज्यातें ॥ ६ ॥ म्हणती नृपति नसतां भद्रीं । दस्यु तस्कर माततो राष्ट्रीं । यालागीं तुम्हां तिघांमाझारी । मागधराष्ट्रीं अभिषेका ॥ ७ ॥ तिघांमाजी एक राजा । करूनि त्यासि निरवा प्रजा । मागधपतीच्या धर्मभाजा । प्रेतकाजा प्रवर्तवा ॥ ८ ॥ ऐसी ऐकोनियां प्रार्थना । कृपा उपजली जनार्दना । मग तो म्हणे नृपनंदना । भेटी आणा मंत्री हो ॥ ९ ॥ अभय लाहूनि भगवत्प्रद । सवेग जाऊनि मंत्रिवृंद । सहदेवनामा नव मागध । आणिला प्रसिद्ध भेटीतें ॥ ३१० ॥ सहदेवनामा मागधतनय । नमिता झाला श्रीकृष्णपाय । येरे देऊनि पूर्ण अभय । केला राय तें ऐका ॥ ११ ॥

सहदेवं तत्तनयं भगवान्भूतभावनः । अभ्यषिञ्चदमेयात्मा मागधानां पतिं प्रभुः ॥ ४८ ॥

मागधतनय तो सहदेव । प्रजा जनपद अमात्य सर्व । आज्ञापूनि केला राव । देऊनि गौरव मागधाचें ॥ १२ ॥ पाचारूनि श्रेष्ठ ब्राह्मण । ब्रह्मनिष्ठ जे तपोधन । त्यांच्या मंत्रीं पट्टाभिषेचन । केलें विधानपूर्वक पैं ॥ १३ ॥ सहदेव मगधेश्वराच्या भद्रीं । स्थापूनि छत्र धरिलें शिरीं । मुकुट कुंडलें युग्मचामरीं । श्रेष्ठ नृपवरीं मिरवला ॥ १४ ॥ त्यानंतरें कव्यवाहना । नृपकलेवर होमिलें जाणा । पट्टमहिषी सहप्रयाणा । करित्या झाल्या ते काळीं ॥ १५ ॥ सहदेव करूनि मगधपाळ । त्यातें आज्ञापी गोपाळ । तेंही निरूपण अळुमाळ । ऐका सकळ श्रोतेहो ॥ १६ ॥

मोचयामास राजन्यान्संरुद्धा मागधेन ये ॥ ४९ ॥

कृष्ण म्हणे गा मगधेश्वरा । ऐकें जरासंधाच्या कुमरा । आजि दुर्दैवकारागारा । पाठवून नृपवरां सोडावें ॥ १७ ॥ माझी आज्ञा वंदूनि माथां । कारागारीं नृपां समस्तां । मुक्त करूनि निरसिजे व्यथा । मानूनि आज्ञां गौरविजे ॥ १८ ॥ दोनी अयुतें बळिष्ठ नृपती । मागधें रोधूनि रक्षिले निगुती । त्यांतें सोडवी रुक्मिणीपती । आज्ञासंकेतीं क्षणमात्रें ॥ १९ ॥ परम प्रतापी जरासंध । वदान्य ब्राह्मणभक्त अगाध । परंतु दुर्वृत्ततेचा बाध । जे केला रोध नृपांचा ॥ ३२० ॥ राजे जिंकिलिया समरंगीं । त्यांची फेडोनि अपमानधगी । मान देऊनि सोडिजे वेगीं । ऐसी मागी श्रेष्ठाची ॥ २१ ॥ प्रतापें जिंकूनि भूतळ । मित्र करूनियां भूपाळ । होऊनि सर्वांसि स्नेहाळ । जनकातुल्य वर्तावें ॥२२॥ ऐसें सांडोनियां

सद्वृत्त । मागध झाला पैं दुर्वृत्त । म्हणोनि त्याचा केला घात । नाहीं राज्यार्थ निर्दळिला ॥ २३ ॥ प्रकट कळावें हें जनांसी । म्हणोनि राज्य सहदेवासी । देता झाला हृषीकेषी । रुद्रनृपांसी सोडवुनी ॥२४॥ दोनी अयुतें प्रतापी राजे । समरीं जिंकोनि वीरश्रीतेजें । गिरिद्रोणीमाजि सहजें । कोंडिले होते चिरकाळ ॥ २५ ॥ तयांचें करवूनियां मोक्षण । नृपोपचारीं गौरवून । बोळविले तें व्याख्यान । परिसा वक्ष्यमाण अध्यायीं ॥ २६ ॥ द्विसप्ततितम संपला येथ । त्रिसप्ततितमाचा निरूपणार्थ । होतां राजसूय समाप्त । पावेल अंत शिशुपाळ ॥ २७ ॥ बहात्तराव्यियामाझारी । इतुकी कथा शुक वैखरी । वदला तैसी भाषेवारी । श्लोकाक्षरीं प्रकाशिली ॥ २८ ॥ अधिष्ठानींचा जो परमेष्ठी । प्रतिष्ठानीं गोदातटीं । श्रीएकनाथ विदुषां मुकुटीं । कोटीरकोटिरत्नमणि ॥ २९ ॥ तयाचिया पादोदकें । जिह्वा तिंवतां केवळ मुकें । बृहस्पतीतें जिंकूं शके । वक्तृत्वकौतुकें प्रज्ञेच्या ॥ ३३० ॥ तया श्रीप्रभूचे चरण । क्षाळूनि गौतमीचें अर्ण । पिपीलिकेसि येतां पूर्ण । केलें प्राशन दयार्णवें ॥ ३१ ॥ तो हा तद्रसवाग्व्यापार । श्रोते वक्ते प्राश्निक चतुर । सेवूनि होती अजरामर । कैवल्यभद्रपरमेष्ठी ॥ ३३२ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां जरासंधवधोनाम द्विसप्ततितमोऽध्यायः ॥ ७२ ॥

॥ श्लोक ४९ ॥ ओवी-संख्या ३३२ ॥ एवं संख्या ३८१ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु

(एक्काहत्तरावा अध्याय मिळून ओवी-संख्या ३३,३१९)

बहात्तरावा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ७३ वा

श्रीगणेशाय नमः । श्रीपाण्डुरंगाय नमः । नभ न असोनि व्यापक भावीं । अचरचरत्वें मारुत प्रभवी । अरूपरूपें तेज संभवी । जीवनीं उभवी रसाळता ॥ १ ॥ अनाधार धारण्य धरणी । भूतां भौतिकां सवाह्यपणीं । अगाध अगोचर गवसणी । अभिन्नपणीं एकात्मा ॥ २ ॥ तया सद्गुरुगोविन्दराया । नमिलें हृदयीं स्मरोनि पायां । त्रिसप्ततितमाध्याया । विवरावया हरिवरें ॥ ३ ॥ नमनमात्रें मन उन्मन । होतां प्रज्ञा कवळी गगन । मेरुप्राय तुङ्गलंघन । पङ्गु आंगवी ज्याचेनी ॥ ४ ॥ ज्याचेनि माधुर्य सारस्वतीं । नवरस प्रसवे कविभारती । तदनुग्रहबृंहणें मति । भगवच्चरितीं प्रवर्तली ॥ ५ ॥ भीमहस्तें जरासंध । कृष्णें वधिला अतिदुर्मद । इतुकें सांगोनि शुक कोविद । कथा विशद नृपा कथी ॥ ६ ॥ त्रिसप्ततिमाध्यायीं । राजे सोडवूनि शेषशायी । राजार्हे भोग त्यां सर्वही । देऊनि स्वान्वयीं पाठवी ॥ ७ ॥ गिरिद्रोणीमाजी राजे । रोधित होते मागधराजें । मुक्त करूनि त्यां गरुड-ध्वजें । निजरूप वोजें दाखविलें ॥ ८ ॥ तिये कथेच्या व्याख्यानीं । अवधान देइजे श्रोते जनीं । श्रवणमात्रें विष्णुभुवनीं । चित्सुख भोगूनि समरसिजे ॥ ९ ॥

श्रीशुक उवाच ॥ अयुते द्वे शतान्यष्टौ लीलया युधि निर्जिताः । ते निर्गता गिरिद्रोण्यां मलिना मलवाससः ॥ १ ॥

कुरुकपक्षा विपक्षदमना । शुक म्हणे गा नृपमंडना । एकाग्र परिसें भगवद्गुणां । पूर्वजाचरिता समवेत ॥ १० ॥ वीस सहस्र अष्ट शतें । शौर्यप्रतापें मगधनाथें । राजे जिङ्कोनि कोंडिले होते । चिरकाळवरी निजदुर्गीं ॥ ११ ॥ लीले करूनि क्रीडे बाळ । तैसा समरीं मगधपाळ । संग्राम म्हणिजे ज्याचा खेळ । हेळा भूपाळ निग्रहिले ॥ १२ ॥ मागधमरणानंतर हरि । तया नृपांतें विमुक्त करी ।

मग ते गिरिद्रोणीबाहेरी । मलिनाम्बरीं निघाले ॥ १३ ॥ निगूढ गिरिदुर्गमदरकुटीं । त्यामाजि कोंडिल्या नृपांच्या थाटी । कृष्णें पाहूनि कृपादृष्टी । पुनः सृष्टि दाविली त्यां ॥ १४ ॥ मागधकाळदाढेमधून । बळें काढूं शके कोण । कृष्ण साक्षात श्रीभगवान । म्हणोन आंगवण हे घडली ॥ १५ ॥ जननीजनक वनमाळी । भाग्यें लाधलीं इये काळीं । ऐसें भावूनि हृदयकमळीं । पातले सकळी हरिजवळी ॥१६॥ भूमि आकाश दाही दिशा । चंडकिरणाचिया प्रकाशा । लाहती द्रोणी गर्भवासा । पाखनि प्रसवा पावलिया ॥ १७ ॥ उल्बवेष्टित गर्भस्थ समळ । तैशीं शरीरें अमंगळ । चैलखंडें समळ बहळ । परम कुश्चळ वनचरवत ॥१८॥ मूर्धजांचीं वाढलीं भिसें । शरीरें भासती पिशाच्या ऐसें । कक्षोपस्थींचिया केशें । अत्यंत क्लेशें जाकळती ॥ १९ ॥ घ्राणाबाहीर रोमावळी । कूर्चश्मश्रूमाजि धुळी । लिक्षा जंतु सर्व वाळीं । झडती भूतळीं व्यवहारें ॥ २० ॥ जलस्पर्शरहित तनु । ऐशा नृपांच्या अत्यंत मलिन । अशनवसनावांचूनि दीन । त्वचा संलग्न अस्थींसीं ॥ २१ ॥

क्षुत्क्षामाः शुष्कवदनाः संरोधपरिकर्शिताः । ददृशुस्ते घनश्यामं पीतकौशेयवाससम् ॥ २ ॥

क्षुधाव्याधीचा भडका पोटीं । जठराग्नीची जळे अगिठी । मेदोमांसाची तेणें आठी । शुष्क अंगयष्टी काष्ठसम ॥ २२ ॥ तोंडें वाळलीं काचऱ्यापरी । सखोल निस्तेज नेत्रगारी । त्राण अणुमात्र न थरे गात्रीं । भ्रमें अंधारी मूर्छना ये ॥ २३ ॥ इक्षुकाण्डें पिळिती घाणां । निरोधें कर्शिती तैसे जाणा । निःसार निःसत्त्व क्षणक्षणा । क्लेशें मूर्छना पावती ॥ २४ ॥ ऐशियां विमुक्त करितां हरि । निघाले गिरिद्रोणीबाहेरी । लंघिली क्लेशांची शर्वरी । देखती नेत्रीं हरिसूर्य ॥ २५ ॥ कृष्णकृपेचें अमृतपान । तिन्हीं देखिलें श्रीकृष्णध्यान । तीं श्लोकीं तें शुकभगवान । करी वर्णन मूर्तीचें ॥ २६ ॥ एके श्लोकें प्रेमोत्सुकता । अपर श्लोकें नतिनम्रता । क्लेशमार्जन झाला वक्ता । तें येथ श्रोतां परिसिजे ॥ २७ ॥ राजे देखते झाले ध्यान । तें ऐकावें सावधान । जैसा प्रावृटीं सजळ घन । तैसें लावण्य कान्तीचें ॥ २८ ॥ इन्द्रनीळाची भासुरप्रभा । नातरी निरभ्र गगनगाभा । कीं अनिमेष पाहतां भास्करबिम्बा । माजील गर्भासम कान्ति ॥ २९ ॥ सान्द्रपयोदीं सौदामनी । तेंवि पीताम्बर परिधानीं । किंवा जाम्बूनदसुवर्णीं । इन्द्रनीलमणि खेवणिला ॥ ३० ॥

श्रीवत्साकं चतुर्बाहुं पद्मगर्भारुणेक्षणम् । चारुप्रसन्नवदनं स्फुरन्मकरकुण्डलम् ॥ ३ ॥

श्रीवत्साङ्क हृदयकमळीं । अरुणप्रभा नेत्रकमळीं । चतुर्बाहु श्रीवनमाळी । पद्मगर्भासम भासे ॥ ३१ ॥ लावण्याचें अधिष्ठान । सुप्रसन्न सुंदर वदन । मकरकुण्डलें भ्राजमान । उभयकर्णीं तळपती ॥ ३२ ॥ चंचत्कुन्तळ चंचरिकाभ । हास्यवदन पंकजनाभ । आयुधचतुष्टयाची शोभ । चहूं हस्तकीं देदीप्य ॥ ३३ ॥

पद्महस्तं गदाशंखरथांगैरुपलक्षितम् । किरीटहारकटककटिसूत्रांगदाचितम् ॥ ४ ॥
भ्राजद्वरमणिग्रीवं निवीतं वनमालया ।

दृगारिपंकजकौमोदकी । तीक्ष्ण तेजस्वी लखलखी । देखतां अरिवर्गातें धडकी । धाकें सम्मुखीं न थरती ते ॥ ३४ ॥ भासुरभास्करकोटिकोटीर । शशाङ्कभासम मौक्तिकहार । अमूल्यमणिमय शोभती अपर । कौस्तुभ मणिवर भ्राजिष्ठ ॥ ३५ ॥ जडित अंगदें बाहुवटीं । कंबुकटकद्वय मनगटीं । सुरत्न-मेखळा कटितटीं । क्षीरोददुटी प्रावरणा ॥ ३६ ॥ मुकुटीं तुरंबिलीं प्रसूनें । सज्जनांचीं विशुद्ध मनें । त्यावरी जैशीं पाळिगणें । सात्वतनयनभृंगांचीं ॥ ३७ ॥ मागधबंदींचे विमुक्त भूप । ऐसें देखती कृष्णरूप । तयांचा प्रेमोत्कर्ष अमूप । वर्णी संक्षेपे योगिराट् ॥ ३८ ॥

पिबंत इव चक्षुर्भ्यां लिहंत इव जिह्वया ॥ ५ ॥ जिघ्रंत इव नासाभ्यां रंभंत इव बाहुभिः ।
प्रणेमुर्हृतपाप्मानो मूर्धभिः पादयोर्हरेः ॥ ६ ॥

अनंतकोटि जन्मासाठीं । दुर्लभ ध्यान देखिलें दृष्टी । तेणें नृपांची प्रेमपुष्टी । वदतां गोष्टीमाजि न पवे ॥ ३९ ॥ नयनचकोरां चिरकाळ क्षुधा । तद्वत् प्राशिती लावण्यसुधा । रसना रसाळ हरि-रसस्वादा । जेंवि कां समुदा चाटिती ॥ ४० ॥ चरणपद्में करपंकजें । वदनारविन्द नयनाम्भोजें । हृदयजलजासह विराजे । वनजवनवत् वनमाळी ॥ ४१ ॥ तेथें नृपांचीं आसक्तपणें । भृंगन्यायें जिघ्रती घ्राणें । कीं हरिनभोगर्भा आलिङ्गनें । दिङ्मय बाहु नृपांचे ॥ ४२ ॥ ऐसे सप्रेम सर्व नृपति । विह्वळ आनंदें संलग्नमूर्ति । कवळिते झाले भगवन्मूर्ति । तें वाग्वृत्ती वदवेना ॥ ४३ ॥ तथापि वदलों उद्देशमात्र । यानंतरें कमलामित्र । भूभुजीं वदला तो प्रकार । परिसा श्रोतृसाफल्यें ॥ ४४ ॥ ऐसें सप्रेम भगवद्ध्यान । कवळितां तया नृपांचें मन । आकल्पपातका क्षालन । झालें दर्शनप्रभावें ॥ ४५ ॥ यावरी मस्तकें चरणांवरी । ठेवूनि राजे नमिती हरि । कृष्णदर्शनाह्लाद शरीरीं । सप्रेमभरीं उथळला ॥ ४६ ॥

कृष्णसंदर्शनाह्लादध्वस्तसंरोधनक्रमाः । प्रशशंसुर्हृषीकेशं गीर्भिः प्रांजलयो नृपाः ॥ ७ ॥

त्यामाजि मागधबंधींचे क्लेश । हारपोनि गेले निःशेष । बद्धांञ्जळि हृषीकेश । स्तविती दासवत वदनें ॥ ४७ ॥ कृष्णप्रशंसा करिती मुखें । कृष्णप्रताप गाती सुखे । कृष्णदर्शनप्राप्तिहरिखें । नाचती तोखें निःशंक ॥ ४८ ॥ तया नृपांहीं केलें स्तवन । तें तूं ऐकें सावधान । परीक्षितीतें व्यासनंदन । कथी तें श्रवण कीजे श्रोतीं ॥ ४९ ॥

॥ राजान ऊचुः ॥ नमस्ते देवदेवेश प्रपन्नार्तिहराव्यय । प्रपन्नान्पाहि नः कृष्ण निर्विण्णान्घोरसंसृतेः ॥ ८ ॥

अशुभाधिक्यें तिर्यक्जीव । तुल्यशुभाशुभें मानव । शुभसुकृताधिक्यें देव । एवं सर्वत्र त्रिजग हें ॥ ५० ॥ तिर्यङ्मर्त्या देव वर । देवां देव पुरंदर । पुरंदरचा जो ईश्वर । तो तूं श्रीधर श्रीकृष्ण ॥ ५१ ॥ आणि तूं प्रपन्नार्तिहरण । शरणागतांसि शरण्य । ब्रह्मप्रतिपादक ब्रह्मण्य । अक्षर पूर्ण अव्यय तूं ॥ ५२ ॥

शरणागतां वज्रपंजर । ऐसा बिरुदाचा बडिवार । आम्हां प्रपन्नां नाभीकार । देऊनि दुस्तर भय निरसीं ॥ ५३ ॥ तूं जरी म्हणसी भो श्रीपति । दूतमुखें मी तुमची आर्ति । ऐकूनि वधिला मगधपति । भयाची खंती कां आतां ॥ ५४ ॥ तरी ऐके गा वृष्णिनाथा । मागधभयाची केंतुली कथा । जन्मरणाची घोर व्यथा । ते संसृति सर्वथा छेदावी ॥ ५५ ॥ असतों राज्यभोगीं आसक्त । तरी नोच्छितों संसृतिघात । मागधें रोधितां क्लेश बहुत । भोगूनि विरक्त झालों पैं ॥ ५६ ॥ म्हणूनि संसृतिनिरसना । करूनि रक्षीं पदप्रपन्नां । इतुकी सेवेंसी प्रार्थना । करुणापूर्णा अवधारीं ॥ ५७ ॥ जरी तूं म्हणसी भो श्रीपति । निष्काम वर्णाश्रमवृत्ति । उभयभोगीं अनासक्ति । रागद्वेषान्ति अपवर्ग ॥ ५८ ॥ तुम्ही मागधा मानां दुष्ट । विपक्षें तदसूयाविष्ट । सकाम उभयभोगनिष्ठ । तरी संसृतिकष्ट केंवि चुकती ॥ ५९ ॥ ऐसें न म्हणें मधुसूदना । मागधप्रसादें तुझिया चरणां । अनुसरलों हा अनुग्रह जाणा । करूनि कल्याणा पावविलों ॥ ६० ॥ आठां श्लोकीं हें निरूपण । विरागें वदला भूभुजगण । राया ऐकें तें व्याख्यान । सावधान क्षण एक ॥ ६१ ॥

नैनं नाथान्वसूयामो मागध मधुसूदन । अनुग्रहो यभ्दवतो राज्ञां राज्यच्युतिर्विभो ॥ ९ ॥

भो भो अनाथनाथा हरि । आम्ही मागधा न मानूं वैरी । त्यातें न निन्दूं वैखरीं । अनुग्रहकारी तो आमुतें ॥ ६२ ॥ कैसें अनुग्राहिलें म्हणसी । ऐकें मधुसूदना हृषीकेशी । तुझा अनुग्रह हा आम्हांसी । मूळ व्हावयासी मागध पैं ॥ ६३ ॥ तूं अनुग्रहूं ज्या इछिसी । त्याचें सर्वस्व हरण का सी । अकिञ्चनत्व बाणे जयासी । तव कृपेसी तो अर्हे ॥ ६४ ॥ आम्हां राजयां राज्यच्युति । हा तवानुग्रह निश्चिती । यासि निमित्त मागधपति । केंवि त्याप्रति आम्ही निन्दूं ॥ ६५ ॥ मागधविषयीं अनसूय आम्ही । हें या श्लोकीं कथिलें स्वामी । यावरी विरक्त उभय धामीं । निर्वाणकामीं केंवि ऐक ॥ ६६ ॥

राज्यैश्वर्यमदोन्नद्धो न श्रेयो विंदते नृपः । त्वन्मायामोहितोऽनित्या मन्यते संपदोऽचलाः ॥ १० ॥

ऐश्वर्य म्हणिजे सर्व संपत्ति । राज्य म्हणिजे राष्ट्रप्रशक्ति । या दोहीं करूनि मदोन्मत्ति । अनर्गळवृत्ति उच्छृंखळ ॥ ६७ ॥ राज्यैश्वर्यमदेंकरून । अंध झाले विवेकनयन । कृत्याकृत्य नुमजे पूर्ण । विषयाचरण प्रिय वाटे ॥ ६८ ॥ अभीष्टविषयसाधक मित्र । विषयरोधक तो अमित्र । आत्मा भावूनि पुत्रकलत्र । स्वगात्र पात्र नृपभोगा ॥ ६९ ॥ स्वगात्र भोगाचें भाजन । मानूनि विचरे यथेष्टाचरण । चारी पुरुषार्थ पडिले शून्य । एवं कल्याण नृप न पवे ॥ ७० ॥ इहलोकींची ऐशी रीति । यावरी आमुष्मिकाची स्थिति । तुझे मायेनें मोहितमति । ते वांच्छिती स्वर्गसुख ॥ ७१ ॥ म्हणती इहलोक अशाश्वत । स्वर्गसंपदा अचळ नित्य । यालागीं क्रतु शतानुशत । मायामोहित आचरती ॥ ७२ ॥ जंववरी होय पुण्यक्षय । तंववरी स्वर्गीं वसती होय । रागादिशत्रूंचा समुदाय । सेवितां विषय पुण्य हरी ॥ ७३ ॥ स्वर्गभोगें सुकृत वेंचे । मग ते पात्र अधोगतीचें । अनेक योनि भोगितां जाचे । गर्भीं पचे नरकघटीं ॥ ७४ ॥ विद्युत्प्राय अनित्य तरळ । स्वर्गसंपदा चंचळ बहळ । मायामोहित जे

केवळ । सुरश्री निश्चळ नित्य म्हणती ॥ ७५ ॥ यदर्थीं राया दृष्टान्त ऐक । परीक्षितीसि म्हणे शुक । भगवन्मायेचें कौतुक । नृप सम्यक निरूपिती ॥ ७६ ॥

मृगतृष्णां यथा बाला मन्यंत उदकाशयम् । एवं वैकारिकी मायामयुक्ता वस्तु चक्षते ॥ ११ ॥

राजे म्हणती भो श्रीपति । बाळक जैं प्राकृतमति । अध्यारोपविनिमयगति । अवस्तु भाविती वस्तुत्वें ॥ ७७ ॥ भास्करकिरणांची झळझळ । देखूनि जलाशय मानिती बाळ । नेणती मृगतृष्णा केवळ । स्थळीं चंचळ दृग्भ्रम हा ॥ ७८ ॥ तैसे अयुक्त जे अविवेकी । न म्हणती माया वैकारिकी । बुजाली वस्तूची ओळखी । अवस्तु लेखी वस्तुत्वें ॥ ७९ ॥ वस्तु सच्चित्सुखमय घन । अवस्तु विषयभवभ्रम पूर्ण । अवस्तु वस्तुत्वें भावून । अयुक्त अतज्ज्ञ पाहताती ॥ ८० ॥ अवस्तूसी मानूनि वस्तु । बालिश झाले विषयासक्त । बोलूनि दृष्टान्त प्रशस्त । प्रत्यय स्वगत नृप वदती ॥ ८१ ॥ दृष्टान्तमात्र अयुक्त बाळ । प्रत्यक्ष आम्हीच ते केवळ । राज्ययोगवियोगहळहळ । भोगूं तत्फळ सुखदुःख ॥ ८२ ॥ राज्ययोग मानितां अर्थ । वियोगें तोचि होय अनर्थ । अनर्थ त्याग अर्थ स्वार्थ । दुःखावर्त भव भोगूं ॥ ८३ ॥ अयुक्त अविवेकी अज्ञानी । मृगतृष्णेतें जलाशय मानी । आमुच्या ठायीं तेचि करणी । देखिली म्हणोनि नृप बदती ॥ ८४ ॥ कोणें देखिली म्हणसी जरी । जंव तुझी कृपा नव्हती हरी । तंववरी भ्रमलों भवभ्रमलहरीं । आतां अंतरीं देखतसों ॥ ८५ ॥ प्रथमश्लोकें तो भवभ्रम । द्वितीयें तवानुग्रह परम । दों श्लोकीं तें नृपोत्तम । पुरुषोत्तमाप्रति वदती ॥ ८६ ॥

वयं पुरा श्रीमदनष्टदृष्टयो जिगीषयास्या इतरेतरस्पृधः ।
घ्नंतः प्रजाः स्वा अतिनिर्घृणाः प्रभो मृत्युं पुरस्त्वाविगणय्य दुर्मदाः ॥ १२ ॥

प्रभो समर्था ऐकें हरि । पूर्वी आम्ही श्रीमदभारीं । अंध होत्साते विवेकनेत्रीं । भवभ्रमलहरी वर पडलों ॥ ८७ ॥ मदिरादिकांचा मादक मद । त्रिपंचरात्रें उतरे विशद । तारुण्याचा होतां वृद्ध । नोहे प्रमादकर माद ॥ ८८ ॥ कुळ शीळ रूप विद्या । इत्यादि मादकें नव्हतीं सद्या । एका श्रीमदें अविद्या । सर्व विरुद्धा आचरवी ॥ ८९ ॥ कठोर अयस्मय कुठार । तथापि छेदूं न शके तरुवर । दंड योजूनि करितां प्रहार । सर्व कान्तार विखंडी ॥ ९० ॥ तेंवि मादक श्रीमद प्रबळ । राजसत्तेचें होतां बळ । मदोन्मत्त अंध केवळ । प्रलयकालपर्यंत ॥ ९१ ॥ आम्हां आंगीं नृपश्रीमद । तेणें अविवेकें झालों अंध । विषयस्वार्थें झालों बद्ध । तें तूं प्रसिद्ध जाणसी ॥ ९२ ॥ इये पृथ्वीच्या ऐश्वर्यस्वार्थें । परराष्ट्रपभंजनीं जिगीषा वर्ते । तये करूनि सरतें पुरतें । चतुरंगयूथप सज्जूनी ॥ ९३ ॥ परराष्ट्रभंजना प्रवर्ततां । तंव तद्राष्ट्रप प्रतीकारार्थी । आवेशोनियां युद्ध करितां । प्रजा समस्ता आक्रंदती ॥ ९४ ॥ चतुरंगसेनेचिया भरणा । स्वप्रजा पीडूनि घेतां धना । अन्याय ऐसें नवटे मना । परमनिर्घृणा मदान्धा ॥ ९५ ॥ परप्रजांचें लुण्ठन करितां । अणुमात्र घृणा नुपजे चित्ता । ऐशिया राज्यें श्रीमदमत्तां । राष्ट्रें भंगितां शीण न वटे ॥ ९६ ॥ सर्वात्मा

तूं सर्वगत । त्या तुज विसरूनि श्रीमदद्दप्त । परस्परें प्रजांचा घात । करितां आकान्त भूचक्रीं ॥ ९७ ॥ एकापरीस बळिष्ठ एक । समरीं संघटतां निःशंक । पीडा पावती प्रजालोक । हा विवेक मावळला ॥ ९८ ॥ अत्यन्त निर्दय कृतान्तापरी । विजयस्वार्थाचिया भरीं । प्रवर्तोनि प्रजासंहारीं । मानूनि शरीरीं प्रभुत्व ॥ ९९ ॥ आम्ही समर्थ पृथ्वीपति । आम्ही भंगूं शत्रूप्रति । आम्ही प्रतापें जिंकूं क्षिती । दिगंतीं कीर्ति विस्तारूं ॥ १०० ॥ ऐसे श्रीमदनष्टदृष्टि । पाञ्चभौतिक कलेवरयष्टि । आश्रयूनि ऐश्वर्यपुष्टि । म्हणवूं सृष्टी नरेश्वर ॥ १ ॥ तूं सर्वगत सर्वां ठायीं । असतां आम्हां झालासि नाहीं । निमेष लव पळ भरतां पाहीं । युगप्रवाहीं घडमोडी ॥ २ ॥ एवं अखंडदंडायमान । तूं कालात्मा करिशी कलन । कळत कळतां मदान्ध पूर्ण । तुजलागून न गणूं पैं ॥ ३ ॥ वाढे तितुकें काळें मोडे । सांचे त्याचा वेंच घडे । जन्मलें मरणातें वरपडे । घडलें विघडे यथाकाळें ॥४॥ ऐसा पुढें तूं प्रत्यक्ष काळ । असतां दुर्मद आम्ही खळ । तुज न गणूं अहंतावळ । राहूं केवळ नृपगर्वें ॥ ५ ॥ ऐसे आम्ही मोहग्रस्त । होतों दुर्मद विवेकरहित । तें तव कृपेनें यथार्थ । उमजलें स्वहित जगदीशा ॥ ६ ॥ कैसें उमजलां ऐसें म्हणसी । तें तूं अवधारीं हृषीकेशी । तुझिया कृपाकटाक्षलेशीं । उमज मानसीं जो घडला ॥ ७ ॥

त एव कृष्णाद्य गभीररंहसा दुरन्तवीर्येण विचालिताः श्रियः ।
कालेन तन्वा भवतोऽनुकम्पया विनष्टदर्पाश्चरणौ स्मराम ते ॥ १३ ॥

अगा ये कृष्णा करुणासिन्धु । राज्यमदें होतों अन्धू । ते आजि जाहलों विगतमदु । स्मरों तव पद स्वलाभें ॥८॥ देहादि राज्यैश्वर्यमाज । जयाचे भुली न गणूं तुज । तो त्वां आजि भंगिला सहज । लाधलों सुतेज निजचक्षु ॥ ९ ॥ जो तूं कालात्मा गभीर गहन । तुजशीं न तुळे सौक्ष्म्यें गगन । महाकल्पान्तीं स्थूळमान । विशाळ विस्तीर्ण प्रवाह ॥ ११० ॥ सूक्ष्म वेगाची परवडी । माजि परमाणुघडमोडी । स्थूलमानें ब्रह्माण्डकोडी । जे घडी विघडी काळतनू ॥ ११ ॥ ते तुझिये काळतनू करून । झालें नृपश्रीमदभंजन । राज्यभ्रंशाचा न मनूनि शीण । अनुग्रह पूर्ण हा तुझा ॥ १२ ॥ तुझिया कृपेच्या अमृतलेशें । विदर्प झालों निजमानसें । आतां तुझे चरण कैसे । विषयविनाशें स्मरतसों ॥ १३ ॥ कृपालेशें विवेकदृष्टि । निवळली ते ऐकें गोष्टी । भ्रामक नोहे भवभ्रमसृष्टि । ते परिपाटी अवधारीं ॥१४॥

अथो न राज्यं मृगतृष्णिरूपितं देहेन शश्वत्पतता रुजां भुवा ।
उपासितव्यं स्पृहयामहे विभो क्रियाफलं प्रेत्य च कर्णरोचनम् ॥ १४ ॥

ऐश्वर्यमदभंगें राज्यच्युति । हे तव कृपानुग्रहप्राप्ति । यानंतरें भो श्रीपति । आम्हांप्रति तें न रुचे ॥ १५ ॥ मृगतृष्णिकामय संसार । दृग्गोचर क्षणभंगुर । भवभ्रमग्रस्त जे पामर । ते या साचार मानिती ॥ १६ ॥ तव कृपानुग्रहें स्वामी । तैसें आतां न मनूं आम्ही । सज्ज न होतांचि तत्कामकर्मीं । भवभ्रमऊर्मिमाजिवडे ॥ १७ ॥ नवमृद्भाण्डीं पाझरे नीर । तेंवि शश्वत् शीर्यमाण शरीर । सकळ

रोगांचें पिकतें क्षेत्र । आत्माकार तें न मनूं ॥ १८ ॥ मातृरुधिर पितृशुक्र । उभयमलात्मक जें शरीर । आतां तेथें अहंकार । नुठे साचार आत्मत्वें ॥ १९ ॥ आत्मा भावूनि स्थूळतनु । धरूनि तेथिचा दृढाभिमान । भेदबुद्धि भिन्नभिन्न । विषयसेवन सत्य गमे ॥ १२० ॥ भूतभौतिकीं एक माती । पृथक् योनि पृथक् जाती । अविद्याभ्रमाचिया भ्रान्ती । माजी भासती सत्यत्वें ॥ २१ ॥ एक लोपोनि अनेकाकार । दृश्याभास गमे साचार । त्रिताप षड्रिपु षड्विकार । दुःख दुस्तर भोगविती ॥ २२ ॥ असो सामान्याची कथा । विशेष नृपासनाची अहंता । राज्यलोभाचिया स्वार्था । माजि परमार्था कोण पुसे ॥ २३ ॥ रंक इच्छी अन्नवसन । तत्संपन्न इच्छी धन । धनाढ्य वांछी वृत्तिभुवन । राज्यासन तद्भोक्ता ॥ २४ ॥ सामान्य राजे सार्वभौम । व्हावयाचा इच्छिती काम । एवं मृगतृष्णा भवभ्रम । यावरी दुर्गम हें न मनूं ॥ २५ ॥ एवं मृगतृष्णमय राज्य । देह केवळ आमयपुंज । जेथ आत्मत्वें होऊनि मज्ज । सहमा भोज्य हें न मनूं ॥ २६ ॥ आपण मानूनि देहमात्र । नृपैश्वर्यभोग विचित्र । तत्सेवनीं स्पृहातंत्र । न हों स्वतंत्र सुखलाभें ॥ २७ ॥ एवं इहलोकींचें सुख । राज्यभोगादि देह क्षणिक । जाणोनि येथें स्पृहोत्सुक । न हों निष्टंक सेवावया ॥ २८ ॥ यावरी आमुष्मिक जो स्वर्ग । सुकृतकर्माचा फळभोग । मेलिया नंतर भोगिजे साङ्ग । करिती याग ज्या लाभा ॥ २९ ॥ याज्ञिक पुष्पिता वेदवाणी । तद्विधासें भजती यज्ञीं । पूर्वमीमांसा पडतां श्रवणीं । स्पृहा सेवनीं बहु धरिती ॥ १३० ॥ परि ते कर्णरोचनमात्र । मीमांसकांचें फळभोगसूत्र । तेथही सुखदुःख सर्वत्र । इहामुत्र सममाम्य ॥ ३१ ॥ अल्पसुकृती जे जे होती । श्रेष्ठपुण्यभाग त्यां न गणिती । तुल्यसुकृती द्वेष करिती । भोगमहती परस्परें ॥ ३२ ॥ कनिष्ठ श्रेष्ठांची करिती स्पृहा । सुकृताभावें पावती मोहा । परंतु कनकत्व दुर्लभ लोहा । विवेकस्पर्शावांचूनी ॥ ३३ ॥ दुर्धरतपें बळिष्ठ दैत्य । ते आदरिती संग्रामकृत्य । तैं सुरवरां भय आक्रान्त । पळती भ्रान्त दिग्विजयीं ॥ ३४ ॥ ऐसिया स्वर्गा दुःखपूर्णा । स्पृहा न धरूं तत्सेवना । लक्षूनि अक्षयसुखकल्याणा । तुझिया चरणां चिन्तितसों ॥ ३५ ॥ जरी तूं ऐसें म्हणसी हरी । ऐसा निश्चय तुम्हां अंतरीं । तरी मम चरणांच्या स्मरणादरीं । मुक्ति निर्धारीं पावाल ॥ ३६ ॥ मच्चरणांचिया अनुस्मृति । आयास न करितां पावाल मुक्ति । माझी अपेक्षा याहीपरती । किमर्थ म्हणसी तरी ऐक ॥ ३७ ॥

तं नः समादिशोपायं येन ते चरणाब्जयोः । स्मृतिर्यथा न विरमेदपि संसरतामिह ॥ १५ ॥

प्राणिमात्रीं विषयात्मक । निसर्गप्रेमा वर्ते एक । त्याहीमाजि न्यूनाधिक । संसार विशेष कर्माचा ॥ ३८ ॥ कर्में तितुकीं त्रिगुणात्मकें । त्यांमाजि सुखदें शुचें सात्विकें । राजसें मिश्रें उभयात्मकें । तामसें सुखें भोगविती ॥ ३९ ॥ त्यांमाजिही उच्चावच । गुणकर्मात्मक प्रेमा साच । प्राक्तननिष्ठेचा नटनाच । करी आहाच न मनूनी ॥ १४० ॥ प्राक्तनयोगें निसर्ग प्रेमा । सुचे अमेध्यीं प्रीति अधमा । रति सन्मार्गी उत्तमोत्तमा । उभयीं समा समकर्में ॥ ४१ ॥ कर्मसंस्कारें निसर्गप्रीति । पालट

न करवे कल्पान्तीं । तुझिया अनुग्रहें सत्संगती । जंववरी श्रीपति न जोडे ॥ ४२ ॥ एवं कर्मतंत्र सकळ प्राणी । उत्तम सांडूनि अधमाचरणीं । जाणतां ही प्रवर्तोनी । कर्मी प्राक्तनीं दुःख दीजे ॥ ४३ ॥ दोघां एक जननीजनक । एका सत्कर्मी प्रेमा देख । दुज्या आवडे आभिचारिक । नरकदायक दुष्कर्म ॥ ४४ ॥ कर्मसंस्कारीं निसर्गप्रेमा । तस्मात् तव पदस्मृति आम्हां । आकळावयाची अशक्य गरिमा । पुरुषोत्तमा तुज विदित ॥ ४५ ॥ यालागीं तो उपाय आतां । आम्हां उपदेशीं भगवंता । जेणें तव पंदपंकज स्मरतां । विराम चित्ता न उपजे ॥ ४६ ॥ जरी आम्ही कर्मसंस्कारें । पावतां अनेक जन्मान्तरें । तेथही तव पदाप्रेमादरें । प्रियकर दुसरें न रुचों दे ॥ ४७ ॥ तुझिया कृपानुग्रहावीण । सहसा न रुचे तव पदस्मरण । यालागिं कृपा करूनि पूर्ण । चरणस्मरण अविरत दे ॥ ४८ ॥ सप्रेम चरणस्मरणोपाय । म्हणसी बोधिजे कैसा काय । तरी सत्संगाचा लाभ होय । इतुकीच सोय दावावी ॥ ४९ ॥ सत्संगाचा होतां लाभ । ते चिन्तिती पंकजनाभ । श्रवणमात्रें भंगे अशुभ । मग होय सुलभ हरिप्रेम ॥ १५० ॥ संत स्मरती तुझिया नामा । ज्या नामाचा अगाध महिमा । आकल्प वर्णूं न शके ब्रह्मा । कैवल्यधामा तें ऐक ॥ ५१ ॥

कृष्णाय वासुदेवाय हरये परमात्मने । प्रणतक्लेशनाशाय गोविन्दाय नमो नमः ॥ १६ ॥

कृष्ण वासुदेव हरी । परमात्मा प्रणतक्लेशहारी । गोविंद इत्यादि नामगजरीं । संतवैखरी संबोधी ॥ ५२ ॥ चतुर्थीयुक्त हृदयें साहित । साही महामनु हे समर्थ । वोपिती चाऱ्ही पुरुषार्थ । सप्रेमभरित जपजाप्यें ॥ ५३ ॥ अथवा षण्मासात्मक एक । बत्तीस अक्षरी मंत्र सम्यक । अखिलक्लेशांचा नाशक । मोक्षदायक नृप पढती ॥ ५४ रमाकामभुवनेश्वरीं । प्रणववाग्भवबीजोच्चारीं । यामाजी एकाही बीजाक्षरीं । जपतां वैखरी कामद हा ॥ ५५ ॥ साही माजी एक नाम । सबीज जपतां अमरद्रुम- । न्यायें पुरुषार्थ ओपी परम । एवं निःसीम महिमा हा ॥ ५६ ॥ इत्यादि नाममंत्रपठनीं । नृपांहीं स्तवितां चक्रपाणी । वदता झाला प्रसन्नवाणी । ऐकें श्रवणीं तें राया ॥ ५७ ॥

॥ श्रीशुक उवाच । संस्तूयमानो भगवान्राजभिर्मुक्तबंधनैः । तानाह करुणस्तात शरण्यः श्लक्ष्णया गिरा ॥ १७ ॥

मागधबंधनापासोनि मुक्त । कृष्णदर्शनें भवनिर्मुक्त । तिहीं स्तविला श्रीभगवंत । करुणावंत शरण्य जो ॥ ५८ ॥ बंधविमुक्त नृपांची स्तुति । ऐकोनि करुणार्णव श्रीपति । वदता झाला तयांप्रति । अमृतभारतीकरूनियां ॥ ५९ ॥ कुरुसौभाग्यकंठमणि । अर्जुनपौत्रा कोदंडपाणि । सावध म्हणे बादरायणि । भगवद्वाणी परिसावया ॥ १६० ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥ अद्यप्रभृति वो भूपा मय्यात्मन्यखिलेश्वरे ।
सुदृढा जायते भक्तिर्बाढमाशंसितं तथा ॥ १८ ॥

अगा ये नृप हो म्हणे हरि । तुम्हीं स्तविलें मज वैखरी । तेणें तोषोनि अभ्यंतरीं । तुम्हां निर्धारीं वर वदतों ॥ ६१ ॥ अखिलेश्वर मी सर्व देहीं । आजिपासोनि त्या माझ्या ठायीं । सुदृढभक्ति याचिली पाहीं । निःसंशयी म्यां दिधलो ॥ ६२ ॥ तुम्ही भूपाळ सत्यवादी । निश्चयात्मक हे तुमची बुद्धी । स्वमुखें वर्णूनि कृपानिधी । जें प्रतिपादी तें ऐका ॥ ६३ ॥

दिष्टया व्यवसितं भूपा भवन्त ऋतभाषिणः । श्रियैश्वर्यमदोन्नाहं पश्य उन्मादकं नृणाम् ॥ १९ ॥

ऋतभाषणी तुम्ही विरक्त । नृप हो बोलिलां तितुकें सत्य । सप्रेम मद्भजनाचें कृत्य । केलें निश्चित संकल्पीं ॥ ६४ ॥ व्यवसित म्हणिजे निश्चयात्मक । मत्प्रेम निर्धारिलें निष्टंक । महत्कल्याण हें सम्यक । अक्षय सुख त्यामाजी ॥ ६५ ॥ तुम्ही होऊनि भवीं विरक्त । जें जें । प्रतिपादिलें तें तें सत्य । श्रीमद सर्वांसि करी भ्रान्त । विशेष त्यांत नृपसत्ता ॥ ६६ ॥ श्रीमद आणिं नृपैश्वर्य । दोहींकरूनि जो उन्माद होय । तैं तो नरखे स्वधर्मसोय । भंगी त्राय विहिताची ॥ ६७ ॥ अविहितमार्गें यथेष्टाचरण । करूनि मानिजे मुक्तपण । परी तें केवळ उद्बंधन । पाहोनि पूर्ण त्रासलों ॥ ६८ ॥ हें यथार्थ वदलां तुम्ही । श्रीमद आणि ऐश्वर्यामीं । पुरुषालागिं भवसंभ्रमीं । दुःखधामीं आतुडवी ॥ ६९ ॥ गोडपणें रुचवूनि मना । प्रवर्तवूनियां यथेष्टाचरणा । बलात्कारें नरकयातना । भोगवी जना भुलवूनी ॥ १७० ॥ सामान्याची केउती गोठी । ऐश्वर्य आणि मदासाठीं । भ्रंश पावले कोट्यानुकोटी । अपरां मुकुटीं मिरवूनी ॥ ७१ ॥ सूचनेसाठीं तयांचीं नांवें । कथितों रहस्य हें जाणावें । उभय मदांचे पडतां कवे । भ्रंश पावे निर्धारें ॥ ७२ ॥

हैहयो नहुषो वेनो रावणो नरकोऽपरे । श्रीमदाद्भ्रंशिताः स्थानाद्देवदैत्यनरेश्वराः ॥ २० ॥

हरि म्हणे नृप हो सावधान । पूर्वील राजे ऐश्वर्यपूर्ण । मदें भ्रंशले कोण कोण । संक्षेप कथन तें ऐका ॥ ७३ ॥ हैहयवरिष्ठ कार्तवीर्य । महाप्रतापी नरेन्द्रधुर्य । जिंकूनि समग्र उर्वीवलय । सार्वभौम चक्रवर्ती ॥ ७४ ॥ सुदर्शनाचा अवतार । सहस्रबाहु नृपभास्कर । ज्याचा करितां नामोच्चार । विघ्नें थरथर कांपती ॥ ७५ ॥ अद्यापि ज्याचा मंत्रप्रयोग । कल्पप्रवीण करितां साङ्ग । असाध्य साधे कार्यभाग । ऐसा अभंग दिग्विजयी ॥ ७६ ॥ ऐशियातेंही भ्रंशिलें मदें । तेंही व्याख्यान ऐका सप्रमुदें । त्रिजग जिंकोनि वैभवें विशदें । निरुतें ऐका संकेतें कथितों मी ॥ ७८ ॥ मृगयाव्याजें वनासि गेला । काननें भ्रमतां श्रान्त झाला दमदग्नीच्या आश्रमा आला । तेणें पूजिला आतिथ्यें ॥ ७९ ॥ विष्णुचक्र जें सहस्रार । सहस्रार्जुन हा तदवतार । साक्षात् विष्णु नरेश्वर । जाणोनि मुनिवर सम्मानी ॥ ८० ॥ सचिव मंत्रि अमात्यांसहित । हैहय येतां आश्रमांत । जमदग्नि म्हणे ममातिथ्य । अंगिकारा ये वेळीं ॥ ८१ ॥ राजा म्हणे सेना सकळ । भ्रमतां उष्णें झाली विकळ । सर्वांवेगळें म्यां फळजळ । घेणें केवळ अयोग्य ॥ ८२ ॥ जमदग्नि म्हणे सर्वांसहित । अंगीकारावें ममातिथ्य । ऐकोनि कार्तवीर्य विस्मित । पाहे अमात्यवर्गातें ॥ ८३ ॥ मंत्री म्हणती जी नृपवरा । तपःश्रीसंपन्ना मुनिवरा । समता न करवे सुरवरा

इन्द्रचंद्रांसह धनदा ॥ ८४ ॥ न कळे मुनीचें महिमान । यालागीं कीजे आज्ञा मान्य । सेनेसहित निमंत्रण । अंगीकारिलें मग रायें ॥ ८५ ॥ कामधेनु प्रार्थूनि मुनि । सपरिवार नृप पुजूनी । दिव्योपचारीं जीवनीं अन्नीं । सर्वांलागूनि तोषवी ॥ ८६ ॥ अमोघ मुनीचें वैभव । देखोनि मंत्रियां पुसे राव । येथें कोठोनि उपचार दिव्य । संपादिले हें मज सांगा ॥ ८७ ॥ आश्रमीं लक्षूनियां प्रधान । म्हणती कामधेनु प्रसन्न । दिव्योपचार तिजपासोन । तुम्हां संपूर्ण मुनि अर्पी ॥ ८८ ॥ हें ऐकोनि हैहयपति । पाचारूनियां मुनीप्रति । कामधेनु हे नृपसंपत्ति । आम्हांप्रति अर्पावी ॥ ८९ ॥ धनधान्यादि लागेल तुम्हां । तें मी अर्पीन मुनिसत्तमा । सहस्रेंसहस्र नित्य होमा । सुदोहा धेनु समर्पीन ॥१९०॥ ऐशी ऐकोनि नृपाची गोष्टी । जमदाग्नि आश्चर्य मानी पोटीं । म्हणे नृपा म्यां तवार्चेसाठीं । आणिली मठीं कामधेनु ॥ ९१ ॥ जे इन्द्राची सुरभि जाण । नंदिनीनामका तत्संतान । तुझिया आतिथ्यालागून । म्यां प्रार्थूनी आणिलीसे ॥ ९२ ॥ हें ऐकोनि मदोन्मत्त । राजा न मनी मुनिभाषित । धेनुहरणीं झाला उदित । निकट दूत प्रेरूनी ॥ ९३ ॥ दूतीं बलात्कारें धेनु । हारिली सवत्सा आश्रमींहून । परम दुःखिता क्रंदमान । गेले घेऊन नृपनगरा ॥ ९४ ॥ आश्रमीं ऐसी नृपाची करणी । ऐतां भार्गवें देखिली नयनीं । जनकजननी कथितां वदनीं । अनय ऐकोनि प्रज्वळला ॥ ९५ ॥ अग्नियंत्रींचा उसळे गोळ । तैसा क्षोभला जमदग्निबाळ । परशु शरचाप आयुधमेळ । घेऊनि प्रबळ उठावला ॥ ९६ ॥ सवेग ठाकिली माहिष्मती । समरा पाचारिला हैहयपति । सेनेसहित महारथी । केली शान्ति सर्वांची ॥ ९७ ॥ सहस्र बाहु विखंडोनी । कुठारें मस्तक पाडिला धरणी । हैहयाऐशी अयोग्य करणी । मदें क्षोभोनि घडाविली ॥ ९८ ॥ ज्याचे मठीं भक्षिलें अन्न । केलें तयाचें धेनुहरण । ऐसा उन्मत्त लुब्ध कृतघ्न । पावला मरण कार्यवीर्य ॥ ९९ ॥ पुढें तयाचे अयुत पुत्र । पळाले सांडूनि समरक्षेत्र । तया दुर्मदांचें चरित्र । ऐका विचित्र संक्षेपें ॥ २०० ॥ रामें वधूनि कार्तवीर्या । आश्रमा येऊनि वंदिलें आर्या । जनकें बोधिलें स्वधर्मकार्या । तें नृपवर्या हरि सांगे ॥ १ ॥ हैहय वाधिला सेनेसहित । होमदोग्ध्री सवत्सा मुक्त । करूनि आश्रमा आला त्वरित । कथिला वृत्तान्त निजजनका ॥ २ ॥ जमदग्नि परम धर्मशीळ । म्हणे रामा हें पाप बहळ । सर्वदेवतामय भूपाळ । वधूनि कळिमळ संग्रहिलें ॥ ३ ॥ आतां होऊनि भगवत्पर । वृत्ति नियमूनियां समग्र । तीर्थयात्रा व्रत आचर । तेणें दुस्तर अघ निरसे ॥ ४ ॥ निजजनकाची वंदूनि आज्ञा । रामें आचरोनि तीर्थाचरणा । संवत्सरान्तीं पुनरागमना । आश्रमस्थानाप्रति केलें ॥ ५ ॥ कार्तवीर्याचे अयुत सुत । निजजनकाच्या प्रतीकारार्थ । छिद्र लक्षूनि आश्रमीं प्राप्त । परमदुष्कृत दुरात्मे ॥ ६ ॥ बंधुसहित परशुपाणि । वना गेला हें लक्षूनी । समाधिस्थ यज्ञभुवनीं । मुनि वधूनि शिर नेलें ॥ ७ ॥ रेणुकेनें भाकिली करुणा । दया नुपजेचि त्या निर्घृणां । जमदग्नीच्या करूनि हनना । झाले पितृऋणा उत्तीर्ण ॥ ८ ॥ परशुरामातें स्मरूनि माता । दीर्घस्वरें आक्रंदतां । आर्तस्वरातें ऐकतां । राम मारुतासम आला ॥ ९ ॥ बंधूपाशीं पितृदेहो । ठेवूनि राम महाबाहो । पितृहंत्यांचा निर्मूळ ठावो । गेला पहा हो करावया ॥ २१० ॥ सवें घेऊनियां कुठार । क्षत्रियकुळाचा संहार । करावया

महावीर । परम क्रूर सक्रोधें ॥ ११ ॥ सवेग ठाकिली माहिष्मती । कळाहीन जे ब्रह्मघाती समरा पाचारिले दुर्मती । महारथी हैहय जे ॥ १२ ॥ कुठारें खंडूनि शिरःश्रेणी । पर्वत केले समराङ्गणीं । महानदी रक्तेंकरूनी । लोटली रणीं भयंकरा ॥ १३ ॥ जमदग्निवधाचें निमित्त । क्षत्रकुळाचा पुरला अंत । क्षोभला भार्गवरूप कृतान्त । वर्तला आकान्त भूचक्रीं ॥ १४ ॥ पुनः पुनः एकवीस वेळा । संहार केला क्षत्रियकुळा । प्रमाद घडला हैहयपाळा । ऐश्वर्यमदें यापरी ॥ १५ ॥ दत्तात्रेयासारिखा गुरु । जो ब्रह्मविद्येचा सागरु । ऐशियावरीही बलात्कारु । मदें ऐश्वर्यें हा केला ॥ १६ ॥ ऐसाचि नहुष सार्वभौम । अमोघ ज्याचा पराक्रम । जेणें यजिले स्वाराज्यकाम । साङ्ग सनेम शत क्रतु ॥१७॥ प्राप्त झालिया शक्रासन । श्रीऐश्वर्यमदें भुलोन । यानीं नियोजिले ब्राह्मण । अधःपतन त्या तद्योगें ॥ १८ ॥ श्रीऐश्वर्यमदें वेन । ब्राह्मणांतें अवमानून । भंगूनियां वेदविधान । ईश्वर आपणा मानूनी ॥ १९ ॥ ब्राह्मणाच्या क्षोभहुङ्कारें । प्रजापीडकदुराचारें । श्रीमदऐश्वर्यमदें घोरें । सद्यः शरीरें सांडवला ॥ २२० ॥ तैसाचि रावण पुलस्तिकुळीं । श्रीऐश्वर्यें मिळाला धुळी । मदोन्मत्त न साम्भाळी । वरदवचना शिवाचिया ॥ २१ ॥ दृढ शिवाची उपासना । प्रमादें याची तदंगना । पतिव्रतेच्या करितां छलना । विधिवरदाना आंचवला ॥ २२ ॥ अमरत्व अजय्यत्व ऐश्वर्यवंत । त्रिजगज्जेता राक्षसनाथ । निर्जर करूनि पादाक्रान्त । आयुष्मंत मनुचौक ॥ २३ ॥ प्रमादें तोहि पावला भ्रंश । नरवानरीं केला नाश । समरीं लाहूनियां अपयश । राक्षसवंश निर्दळिला ॥ २४ ॥ तैसाचि अपर भौमासुर । जयासि कांपती निर्जरासुर । तेणें होऊनी प्रमादपर । हरिलें छत्र वरुणाचें ॥ २५ ॥ अदितिमातेचीं कुण्डलें । मणिमय सुमेरुशृंग हरिलें । सोळा सहस्र नृपांचीं कुळें । भंगूनि कन्या संग्रहिल्या ॥ २६ ॥ ऐसा प्रमादें मदा चढला । मग म्यां समरीं तो निवटिला । अपरां नृपांची अवकळा । ऐशीच केली श्रीमदें ॥ २७ ॥ त्रिजग जिङ्कूनि जालंधर । विष्णु निर्जर पुरंदर । केले आपुले आज्ञाधर । ऐसें अपार यश वरिलें ॥ २८ ॥ श्रीऐश्वर्यमदें तोंही । उमाकामें समरमही । भ्रंश पावला हें सर्वांहीं । विदित नाहीं कीं काय ॥ २९ ॥ केवळ दुर्वासा क्रोधाग्नि । तेणें इन्द्रासि प्रमत्तपणीं । मंदरमाळा संतोषोनि । प्रसाद दिधला कृपेनें ॥ २३० ॥ श्रीऐश्वर्यमदास्तव । प्रमादें भ्रंशिला वासव । समुद्रीं पडिलें अमरविभव । त्रिलोकीराव बळि झाला ॥३१॥ श्रीमदास्तव सुरनरासुर । भ्रंश पावले थोर थोर । स्वपदापासोनि च्यवले फार । सांगतां अपार असो आतां ॥ ३२ ॥ ऐशिया थोरथोरांच्या गोष्टी । भ्रंशिले ऐश्वर्यभोगासाठीं । ज्या देहास्तव तो शेवटीं । नश्वरकोटीमाजि पडे ॥३३॥ ऐसें जाणोनि तुम्ही सकळ । मत्पर जालेति जरी केवळ । तरी पुनरपि न होनि बरळ । पाळिजे अढळ ममाज्ञा ॥३४॥

भवन्त एतद्विज्ञाय देहाद्युत्पाद्यमन्तवत् । मां यजन्तोऽध्वरैर्युक्ताः प्रजाधर्मेण रक्षथ ॥ २१ ॥
सन्तन्वंतःप्रजाततून्सुखं दुःखं भवाभवौ । प्राप्तं प्राप्तं च सेवन्तो मच्चित्ता विचरिष्यथ ॥ २२ ॥

कर्मसंस्कारें उत्पाद्य देह । देहभोगार्थ ऐश्वर्यसमूह । जाणोनि नाशवंत हें सर्व । मातें अगर्व भजा तुम्ही ॥ ३५ ॥ क्षात्रधर्में प्रजापालन । समरीं शत्रु विभाण्डून । साङ्गविधानें करूनि यज्ञ । मातें

संपूर्ण यजा तुम्ही ॥ ३६ ॥ प्रमत्त न होनि सर्व काळ । सर्वदा मदंघ्रिभजनशीळ । होवोनि क्रमिजे उरला काळ । यावरी बोल अवधारा ॥ ३७ ॥ धर्मपत्न्यांचे गर्भकोशीं । संतति वाढवा स्वधर्मेंसीं । भजोनि विध्युक्त ऋतुकाळासी । न होतां कामासि वशवर्ती ॥ ३८ ॥ याचि न्यायें प्रजाराष्ट्र । राजवर्गीं मंत्रिप्रवर । वर्तविजे स्वधर्मपर । प्रजाविस्तार करवूनी ॥ ३९ ॥ मत्पदचिन्तनीं चित्त रमवा । जे जे काळीं ज्या ज्या विभवा । प्राप्त होतां विषमभावा । न भजोनि सेवा समबोधें ॥ २४० ॥ समबोध म्हणाल कैसिये परी । तरी दुःख मानिजे सुखाचिपरी । जें जें प्राप्त जे अवसरीं । तत्स्वीकारीं सम होणें ॥ ४१ ॥ ऐशिया बोधें विचरा मही । तैं मग न बाधे राज्यपदही । अंतीं पावाल सुख अक्षयी । ऐका तेंही निरूपितों ॥ ४२ ॥

उदासीनाश्च देहादावात्मारामा धृतव्रताः । मय्यावेश्य मनः सम्यङ् मामन्ते ब्रह्म यास्यथ ॥ २३ ॥

देहादि समस्त संसारभरण । नश्वर निश्चयें जाणोन । सहजचि तेथें उदासीन । समाधान स्वस्वरूपीं ॥ ४३ ॥ इंद्रियनिग्रहा नांव दम । मनोनिग्रहा नाम शम । स्वात्मप्रत्यय तो उपरम । सांडूनि भवभ्रम वृत्तीचा ॥ ४४ ॥ प्रपंचीं रमली असतां वृत्ति । नामें बोलिजे तें प्रवृत्ति । स्वरूपीं रमतां तयेप्रति । म्हणती उपरति सज्ञान ॥ ४५ ॥ विषयीं प्रेमा प्रवृत्ति लावी । निवृत्ति निजात्मप्रेमा रुचवी । तत्साधनें व्रतस्थ जीवीं । होऊनि उर्वी सुखें विचरा ॥ ४६ ॥ ऐशिया साधनें वरव्यापरी । मनें प्रवेशा मजमाझारी । मदेकनिष्ठा चराचरीं । यावीण दुसरी स्थिति न बणो ॥ ४७ ॥ ऐसे होऊनियां मत्पर । संततिमाथां राज्यभार । देऊनि वर्ततां निरंतर । प्रारब्धपर तनुयात्रा ॥ ४८ ॥ प्रारब्धक्षयीं शरीरें पडती । तेव्हां पावाल अमृतावासी । ब्रह्मनिर्वाण श्रुति मज म्हणती । त्या मजप्रति मिळाल ॥ ४९ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ इत्यादिश्य नृपान्कृष्णो भगवान्भुवनेश्वरः ।
तेषां न्ययुङ्क्त पुरुषान्स्त्रियो मज्जनकर्मणि ॥ २४ ॥

तया नृपांतें ऐसियापरी । आज्ञानुग्रह करूनि हरी । काराग्रहींचे श्रम परिहारी । शुकवैखरी वर्णितसे ॥ २५० ॥ विप्रवेशें तिघेजण । श्रीकृष्ण वृकोदर अर्जुन । शत्रुनगरीं सेवकाविण । करिती शासन केंवि म्हणा ॥ ५१ ॥ तरी भगवान आणि भुवनेश्वर । दोहीं विशेषणीं व्यासकुमर । ये शंकेचें रहस्यसार । वदला प्रकार तो ऐका ॥ ५२ ॥ श्रीमंत एकाकी न म्हणावा । देशीं विदेशीं जेव्हां तेव्हां । पाहिजे तितुका जनमेळावा । त्यातें बोळगे सर्वत्र ॥ ५३ ॥ आणि यशस्वी प्रतापवंत । देखूनि होती जन अंकित । अनन्यभावें अतंद्रित । वर्तती नियत सेवेसी ॥ ५४ ॥ अभीष्टदानीं जो उदार । त्याचे किङ्कर होती थोर । भूतभविष्यज्ज्ञानपर । मोही चतुर चमत्कारें ॥ ५५ ॥ विरक्त तितिक्षु क्षमावंत । सुरनर तयाचे अंकित । पूर्णैश्वर्यें कृष्णनाथ । न्यून सामर्थ्य त्या कोण ॥ ५६ ॥ प्रकट श्रीकृष्ण भुवनेश्वर । चतुर्दशभुवनांचा ईश्वर । विधि हर सुरवर शशि भास्कर । ज्याचे किङ्कर अनुयायी ॥ ५७ ॥ तें कैंवि म्हणावे एकाकी । शंका किमर्थ इयेविषीं । मंत्री अमात्य सैन्यप्रमुखीं ।

सेवक होऊनि सेविजती ॥ ५८ ॥ वीस सहस्र शतें अष्ट । मागधबंधींचे राजे श्रेष्ठ । मुक्त करूनि त्यांचे कष्ट निरसी अभीष्टसुखदानें ॥ ५९ ॥ नापितांचीं आणूनि शतें । करवी नृपांच्या श्मश्रुकर्मातें । सुगंध द्रव्यें उपचारयुक्तें । अभ्यंगातें प्रयोजवी ॥ २६० ॥ अभ्यंगकर्माच्या ठायीं निगुती । योजूनि कुशळ पुरुषांप्रति । सुतप्तजळदानें ओळंगती । उपपुरंध्री नृपवर्गा ॥ ६१ ॥ समस्त राजे बंधविमुक्त । श्मश्रुकर्मादिमळनिर्मुक्त । उद्वर्तनाभ्यंगसुस्नात । निदेशमात्रें करविले ॥ ६२ ॥ नवीन मगधेश्वर सहदेव । त्यासि आज्ञापी वासुदेव । नृपोपचारीं राजे सर्व । देऊनि गौरव पूजावे ॥ ६३ ॥

सपर्यां कारयामास सहदेवेन भारत । नरदेवोचितैर्वस्त्रैर्भूषणैः स्रग्विलेपनैः ॥ २५ ॥

आज्ञापूनि सहदेवातें । करविता झाला नृपार्चनातें । तें सविस्तर सावधचित्तें । परीक्षितीतें शुक सांगे ॥ ६४ ॥ मनुष्यदेव म्हणिजे राजे । यथोचित तयाचे पूजे । वस्त्रें भूषणें उपचारं जे जे । ते तद्वोजे समर्पूनी ॥ ६५ ॥ दिव्यपरिधानीं क्षौमाम्बरें । उत्तरीयार्थें अनर्घ्यें अपरें । विचित्र निर्मिलीं कार्तस्वरें । अर्पी आदरें सहदेव ॥ ६६ ॥ मुकुट कुण्डलें कंठमाळा । अंगदें कंकणें मुद्रिक सकळा । अमूल्य पदकें कटिमेखळा । अर्पी नृपाळां मगधेश ॥ ६७ ॥ कंठीं आपादपुष्पहार । मुकुटीं अवतंस-गुच्छ विचित्र । चंदनकस्तूरीसह केशर । तिलक मनोहर रेखियले ॥ ६८ ॥ अंगीं मलयागुरु चर्चिला । सुगंध धूमर वरी उधळिला । दशाङ्गशलाका योजूनि अनळा । स्थापी नृपाळां द्वय भागीं ॥ ६९ ॥ कनकपात्रीं घृताक्तवाती । उजळूनि केली एकारती । समस्त बैसवूनि एकपंक्तीं । नैवेद्य निगुती तें ऐका ॥ २७० ॥

भोजयित्वा वरान्नेन सुस्नातान्समलंकृतान् । भोगैश्च विविधैर्युक्तांस्तांबूलाद्यैर्नृपोचितैः ॥ २६ ॥

त्रिपादिकांचिया हारी । तळीं मांडूनि वृद्धाचारीं । कनकताटें तयांवरी । वाढिती परी अन्नांच्या ॥ ७१ ॥ कुशिविरी लवणशाका । फळमूळदळादि अनेका । शुण्ठीरामठलवणात्मका । मरीचिचूर्ण वाढिती ॥ ७२ ॥ भर्जित पर्पट कुष्माण्डवटक । लेह्य पेय रस अनेक । द्वादश शिम्रा क्षीरात्मक । पायसान्नें परिवेषिलीं ॥ ७३ ॥ सूक्ष्मसाळीचा ओदन । वितुषमुद्गांचें वरान्न । घृतपाचित भक्ष्यें आन । खंडशर्करावियुक्त जीं ॥ ७४ ॥ कनकचषकांचिया हारी । मध्वाज्य पय साय पंचधारी । श्वेतशर्करा पायसावरी । क्वथिका रुचिकर तक्राची ॥ ७५ ॥ प्रार्थनापूर्वक वाढिती अन्नें । स्वेच्छा यथारुचि भोजनें । करावीं म्हणोनि मृदुवचनें । नृपां सम्मानें प्रमोदिती ॥ ७६ ॥ जे जे पदार्थ जयाप्रति । रुचती तैसे त्या अर्पिती । रंभारसाळफळनिष्पत्ती । नाना शिखरणी नृपभोग्या ॥ ७७ ॥ अमृतापरिस स्वादिष्टें । अन्नें नृपभोग्यें वरिष्ठें । मगधेश्वरें परमनिष्ठें । नृपां यथेष्टें जेवविलीं ॥ ७८ ॥ सुस्नात सुभुक्त सालंकृत । सभास्थानीं नृप समस्त । ताम्बूळादि उपचार युक्त । यथोचित समर्पिले ॥ ७९ ॥ नृपार्ह विविध भोग्य विषयां । यथारुचि समर्पूनियां । राजोपचिह्नें अर्पिलीं तयां । तें कुरुवर्या अवधारीं ॥ २८० ॥ छत्रें चामरें आतपत्राणें । ढक्के दुन्दुभि गज निशाणें । नाना आयुधें अंगत्राणें । दिव्य

दर्पणें समर्पिलीं ॥ ८१ ॥ राया ऐकें कौरवपति । ऐसे सुपूजित भूपति । शोभते झाले कवणे रीति । तें तूं निगुती परियेसीं ॥ ८२ ॥

ते पूजिता मुकुंदेन राजानो मृष्टकुंडलाः । विरेजुर्मोचिताः क्लेशात्प्रावृडते यथा ग्रहाः ॥ २७ ॥

भगवंताचिये आज्ञाबोलें । सहदेवें ते नृप पूजिले । क्लेशापासोनि मुक्त केले । भक्तवत्सलें मुकुंन्दें ॥ ८३ ॥ राहुवदनापासूनि मुक्त । मृगाङ्क कौमुदी आलिंगित । तैसे भूपति कान्तियुक्त । उज्ज्वळ कुंडलीं मिरवती ॥ ८४ ॥ नाते वर्षाकाळीं ग्रह । निबिडघनपटळाचा समूह । लोपतां अणुमात्रही रोह । स्वप्रभेचा न दावितीं ॥ ८५ ॥ वर्षान्तीं ते निर्मळ गगनीं । प्रभाभासुर तारागणीं । तेंवि नृपति मागधहननीं । हरिशारदीं राजती ॥ ८६ ॥ वदनीं नृपश्रियेची कळा । मुकुटकुंडला दिव्यदुकूळा । धरितां दिसती शशिमंडळा । समसोज्ज्वळ भूभुजते ॥ ८७ ॥ यावरी तयांची बोळवण । करविता जाला श्रीभगवान । कुरुवर्या तें करीं श्रवण । म्हणे सर्वज्ञ शुकवक्ता ॥ ८८ ॥

रथान्सदश्वानारोप्य मणिकांचनभूषितान् । प्रीणय्य सूनृतैर्वाक्यैः स्वदेशान्प्रत्यापयत् ॥ २८ ॥

नृपयानार्ह अमूल्य रथीं । तुरंगरत्नें योजूनि निगुती । धुरे बैसोनियां सारथी । मागधनृपति त्यां अर्पी ॥ ८९ ॥ रत्नखचित सुवर्णशिबिरें । सुवर्णघटितें रहंवरचक्रें । अश्वाभरणेंही समग्रें । कार्तस्वरें लखलखिती ॥२९०॥ शिविकाप्रमुख विचित्र यानें । शिबिरें वितानें यात्रोपकरणें । अल्पस्वल्पें चतुरंग सैन्यें । दासदासींसमवेत ॥ ९१ ॥ इत्यादि सम्मान संपत्ती । सूनृतवाक्यें परमप्रीती । गजरें बैसवूनियां रथीं । स्वदेशाप्रती त्यां धाडी ॥ ९२ ॥ श्रीकृष्णाचे आज्ञेवरून । बार्हद्रथाचा नंदन । तया नृपांची बोळवण । करिता झाला ते कथिली ॥ ९३ ॥ द्वारकेमाजी नृपांचा दूत । येऊनि कथिला जो वृत्तान्त । तदनुसार शरणागत । केले विमुक्त श्रीकृष्णें ॥ ९४ ॥

त एवं मोचिताः कृच्छ्रात्कृष्णेन सुमहात्मना । ययुस्तमेव ध्यायंतः कृतानि च जगत्पतेः ॥ २९ ॥

जेणें निरसे जन्ममरण । परमामृत त्या न म्हणे कोण । तैसे अमोघ श्रीकृष्णगुण । प्रत्यय बाणून नृप गाती ॥ ९५ ॥ एवं क्लेशापासूनि सकळ । कृष्णें सोडविले भूपाळ । मग ते म्हणती हरि केवळ । भक्तवत्सल परमात्मा ॥ ९६ ॥ प्रत्यय बाणला निजान्तरीं । त्यातें ध्याती निरंतरीं । जगत्पति जो चक्रधारी । गाती वैखरी तत्कर्में ॥ ९७ ॥

जगदुः प्रकृतिभ्यस्ते महापुरुषचेष्टितम् । यथाऽन्वशासद्भगवांस्तथा चक्रुरतंद्रिताः ॥ ३० ॥

आपुलिया अष्टधा प्रकृति । मंत्री अमात्य सेनापति । राजे जाऊनि स्वदेशाप्रति । त्यापें वानिती

हरिचरित्रें ॥ ९८ ॥ अविद्यावेष्टित जीवपुरुष । त्यांतें सोडविता जो परेश । मायानियंता जगदधीश । महापुरुष तो श्रीकृष्ण ॥ ९९ ॥ तयाचें अलौकिक चेष्टित । नृपति स्वमुखें स्वराष्ट्रांत । वाखाणिती सप्रेम भरित । सुहृदां आप्तां स्त्रीपुत्रां ॥ ३०० ॥ ज्यातें विधि हर नमिती नियमें । ज्याचें महत्त्व वर्णिजे निगमें । सुरवर पढती ज्याचीं नामें । मुनिवर प्रेमें स्तव करिती ॥ १ ॥ तो हा प्रत्यक्ष चक्रपाणि । नटोनि मानुषी अवगणी । प्रतापें मर्दूनि दानवश्रेणि । द्वारकाभुवनीं नांदतसे ॥ २ ॥ आम्ही मागधाचिये बंदीं । दैवोपहत भुभूजमांदी । महासंकटें पडलों सांदी । अजिंक्य दंदी भूचक्रीं ॥ ३ ॥ दूतमुखें ते आमुची ग्लानि । ऐकूनि निर्जरचूडामणि । करुणावत्सल कळवळूनी । आला धांवोनि जगदात्मा ॥ ४ ॥ वदान्य त्रिजगत्पालनपटु । तेणें घेतला ब्राह्मणनटु । भीमार्जुन हे महासुभटु । शिष्य निकट द्विजरूपी ॥ ५ ॥ आमुच्या कैपक्षें श्रीरंगें । अतिथिवेळेच्या प्रसंगें । मागध छळिला याच्यामार्गें । प्रतिज्ञा न भंगे तें केलें ॥ ६ ॥ मग याचितां द्वंद्वसमरा । तेणें वरिलें वृकोदरा । क्षण देवोनि चढला निकरा । सैन्यपरिवारा सांडूनी ॥ ७ ॥ दोघे नागायुतबळिष्ठ । एकाहूनि एक वरिष्ठ । गदाप्रहरणविद्यानिष्ठ । महोद्भट समरंगीं ॥ ८ ॥ सप्तविंशति अहोरात्रें । गदाप्रहारें चूर्ण गात्रें । तथापि विजयवेशमात्रें । अमर्षसूत्रें संघटती ॥ ९ ॥ भीम प्रतापी महाबळी । विशेष कैपक्षी वनमाळी । यास्तव मागध समरशाळी । उधडूनी धुळी मिळविला ॥ ३१० ॥ भीमें वधितां जरासंध । शरण पातला प्रजावृंद । जारासंधि जो मागध । त्यासि नृपपद अर्पिलें ॥ ११ ॥ केलें आमुचें बंधमोचन । देऊनि पूजा नृपसम्मान । केली आमुची बोळवण । ऐसे हरिगुण नृप कथिती ॥ १२ ॥ आम्हां शरणागतांकारणें । मागध मारिला नारायणें । राज्याभिलाष अंतःकरणें । न धरूनि हृदयीं कवळिला ॥ १३ ॥ सहदेव करूनि मागधपति । आमुची निरसूनियां विपत्ति । राजसूयार्थ इंद्रप्रस्थीं । यावें म्हणोनि निमंत्रिलें ॥ १४ ॥ अनुग्रहरूप परमार्थबोध । आम्हां दासांसि केला शुद्ध । ऐसा कृपाळु श्रीगोविन्द । स्वमुखें गुणवाद नृप कथिती ॥ १५ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न । तेणें परमार्थ अनुशासन । जैसें केलें तैसे नृपगण । करिती वंदूनि हर्याज्ञा ॥ १६ ॥ आलस्य अनवधान विस्मृती । निद्रा तंद्रा सारूनि परती । अलोट हर्याज्ञा आचरती । स्मरूनि युक्ती कृष्णाच्या ॥ १७ ॥ असो नृपांकडील कथा । शुक म्हणे गा कौरवनाथा । भीमहस्तें बाहेद्रथा । झाला वधिता श्रीकृष्ण ॥ १८ ॥ केलें नृपांचें मोचन । सहदेवातें भद्रासन । अर्पूनि कृष्णभीमार्जुन । जाते झाले तें ऐका ॥१९॥

श्रीशुक उवाच ॥ जरासंधं घातयित्वा भीमसेनेन केशवः । पार्थाभ्यां संयुतः प्रायात्सहदेवेन पूजितः ॥ ३१ ॥

भीमहस्तें जरासंध । वधूनि प्रतापी गोविन्द । भीमार्जुनांसहित सिद्ध । इंद्रप्रस्थासी चालिला ॥ १२० ॥ तंव मागधें तये काळीं । श्रीकृष्णाच्या चरणकमळीं । हस्तमस्तक पुष्पाञ्जळि- । प्राय अर्पूनि हरि विनवी ॥ २१ ॥ स्वामी आपुल्या दासगणा । माजी कनीय मातें जाणा । अंगीकारूनि मम पूजना । मग प्रयाणा आदरिजे ॥ २२ ॥ जनकें तुमचिये कृपादृष्टी । देह ठेवूनि चरणांनिकटीं । समरीं सत्यप्रतिज्ञेसाठीं । सायुज्यपेठीं विराजला ॥ २३ ॥ स्वपादुका जाणूनि मज । केलें स्वामीनें मगधराज । आतां माझी सर्व लाज । गरुडध्वजें रक्षावी ॥ २४ ॥ ऐकूनि सहदेवाचें वचन । कृपें कळवळिला

भगवान । अंगीकारूनि तत्पूजन । केलें प्रयाण तेथूनी ॥२५॥ निघते समयीं रुक्मिणीकान्तें । आज्ञापिलें सहदेवातें । युधिष्ठिराच्या दर्शनातें । राजसूयार्थ येइजे ॥ २६ ॥ बार्हद्रथाच्या विजयरथीं । तिघें बैसले महारथी । पुरंदरप्रस्थाचिये पंथीं । स्वस्थ चालती स्वानंदें ॥ २७ ॥ जेथ आपुल्या निजायुधांतें । स्थापूनियां कमळाकान्तें । विप्रवेश धरिले होते । मागधातें छळावया ॥ २८ ॥ पुढती येवोनि तये ठाईं । आयुधें घेऊनियां लवलाहीं । रथीं बैसोनि विश्वविजयी । खाण्डवप्रस्थाप्रति गेले ॥ २९ ॥

गत्वा ते खाण्डवप्रस्थं शंखान्दध्मुर्जितारयः । हर्षयंतः स्वसुहृदो दुर्हृदां चासुखावहाः ॥ ३२ ॥

मग ते खाण्डवप्रस्थानिकटीं । तिघे पातले प्रतापजेठी । विजयशब्दाच्या बोभाटीं । शंख स्फुरिते त्रिवर्गीं ॥ ३३० ॥ शत्रुजयाचा उत्साह भारी । तया आवेशें महावीरीं । शंखस्फुरणाचिये गजरीं । केली नगरीं जयसूचना ॥ ३१ ॥ सुहृद जिवलग आप्त स्वजन । शंखस्वरें ते हर्षायमान । केले तैसेच दुष्ट दुर्जन । कंपायमान तद्घोषें ॥ ३५ ॥ ऐसा विजयशंखोत्साह । सुहृदां आप्तां सुखावह । दुष्टदुर्जनां दुःखावह । जाला पहा हो ते काळीं ॥ ३३ ॥

तच्छ्रुत्वा प्रीतमनस इंद्रप्रस्थनिवासिनः । मेनिरे मागधं शांतं राजा चाप्तमनोरथः ॥ ३३ ॥

श्रीकृष्णाचा पाञ्चजन्य । वृकोदराचें पौण्ड्रस्फुरण । देवदत्त स्फुरी अर्जुन । नागरीं ते स्वर ओळखिले ॥ ३४ ॥ इंद्रप्रस्थनिवासिजन । तिहीं ऐकूनियां ते स्वन । हृदयीं पावले समाधान । म्हणती दुर्जन निर्दळिला ॥ ३५ ॥ मागधासारिखा भूकंटक । शान्त झाला हें मानिती सुख । धन्य युधिष्ठिर कुरुनायक । पावला सम्यक मनोरथ ॥ ३६ ॥ येथोनि महाभाग्याचा उदय । सिद्धी जाईल राजसूय । मागधवधें त्रैलोक्यविजय । नृपसमुदाव वशवर्ती ॥ ३७ ॥ यावरी धर्माचें दर्शन । जालें त्रिवर्गालागून । तये कथेचें व्याख्यान । सावधान अवधारा ॥ ३८ ॥

अभिवंद्याथ राजानं भीमार्जुनजनार्दनाः । सर्वमाश्रावयांचक्रुरात्मना यदनुष्ठितम् ॥ ३४ ॥

धर्मराजा सभास्थानीं । नमिला जाऊनि तिघीं जणीं । परस्परें आलिंगूनी । स्वागतप्रश्नीं नृप अर्ची ॥ ३९ ॥ भीमार्जुनजनार्दन । गेले धर्माज्ञा घेऊन । तैं पाञ्चनि वर्तमान । करिती कथन सविस्तर ॥ ३४० ॥ जैसा रचिला होता मंत्र । कृत्य साधिलें तदनुसार । मागध करूनि प्रतिज्ञातंत्र । द्वंद्वसमरीं संहारिला ॥ ४१ ॥ आपण जैसें अनुष्ठिलें । तें तें धर्मा ऐकविलें । धर्में ऐकूनि काय केलें । तें परिसिलें पाहिजे ॥ ४२ ॥

निशम्य धर्मराजस्तत्केशवेनानुकपितम् । आनंदाश्रुकलां मुंचन्प्रेम्णा नोवाच किंचन ॥ ३५ ॥

जरासंधवध चरित्र । ऐकोनि धर्मराजाचे श्रोत्र । निवाले आणि अभ्यंतर । सात्त्विकाष्टकें कवळिलें ॥ ४३ ॥ भीम जरासंधसमरीं । जर्जर जाला गदाप्रहारीं । आंगीं मूर्छना दाटतां भारी । कैटभारी अनुकंपी ॥ ४४ ॥ केशवकृपावलोकमात्रें । आप्यायितां भीमगात्रें । दृढतर जाहलीं वज्रप्रहारें । न डंडळिती समरंगीं ॥ ४५ ॥ जरासंधाचें निधनमर्म । सांगतां भीमें भीमविक्रम । करूनि चिरिलें मागधवर्ष्म । जें दुर्घट कर्म सुरासुरां ॥ ४६ ॥ येरवीं भीम मागधपाळा । समरीं न्यून तुकितां तुळा । केशवकृपामृतजिव्हाळां । वधिलें खळा तद्योगें ॥ ४७ ॥ श्रीकृष्णाचा येथवरी । कृपाविशेष आम्हांवरी । आम्ही उत्तीर्ण या संसारीं । केंवि पामरें हों शकिजे ॥ ४८ ॥ हृदयामाजि युधिष्ठिर । कृष्णकृपेचा कृतोपकार । स्मरतां सजळ जाले नेत्र । आनंदाश्रु स्रवताती ॥ ४९ ॥ थरथर कांपे अंगयष्टी । सद्गद श्वास रोधला कंठीं । रोमाञ्च उठिले जेंवि प्रावृटीं । होतां वृष्टी तृणाङ्कुर ॥ ३५० ॥ पुलक दाटले रोममूळीं । सजळ सार्द्रता स्वेदजळीं । भासे कंचुक मुक्ताफळीं । खचित लेइला ज्यापरी ॥ ५१ ॥ कृष्णकृपेचें अपारपण । उमजों न शकवे म्हणोन । वाचे पडिलें सुदृढ मौन । सहज विस्मरण तनुभावा ॥ ५२ ॥ ऐसी युधिष्ठिराची दशा । अष्टभावांचा पडिला ठसा । तेचि अवस्था जगदधीशा । जाहली सहसा सप्रेमें ॥ ५३ ॥ ये यथा मां प्रपद्यंते । मीही तैसाचि भजें त्यांतें । या वाक्याचें सत्यत्व निरुतें । परीक्षितीतें शुक बोधी ॥ ५४ ॥ अष्टभाव हे परस्परीं । जेंवि दर्पण दर्पणान्तरीं । बिम्बती तेथ नसे दुसरी । शोभा प्रतिभा एकत्वीं ॥ ५५ ॥ सुखसंपन्न झाली वृत्ति । स्वमानें चेइली तेथ स्मृति । करणवर्गाची प्रवृत्ति । पूर्वस्थिति प्रवर्तली ॥ ५६ ॥ नयन असतांचि पैं उघडे । देखणे परतले मागिलेकडे । ते फिरूनि परतले पुढें । दृश्य निवाडें पहावया ॥ ५७ ॥ मनें आळंगिला संकल्प । परिमार्जिलें नयनींचें बाष्प । स्वेदपुलका झाला लोप । गात्रींचा कंप स्थिरावला ॥ ५८ ॥ पुढें देखूनि कृष्णमूर्ति । जाली वक्तृत्वा प्रवृत्ति । तें व्याख्यान चतुःसप्ततीं । सांगेल सुमती शुकराया ॥ ५९ ॥ राजसूयमखेंद्रयजन । अग्रपूजाप्रसंगेंकरून । चैद्य निन्दितां श्रीभगवान । करील हनन चैद्याचें ॥ ३६० ॥ इये कथेचिये श्रवणीं । सप्रेमभरित अंतःकरणीं । वैसती त्यांतें चक्रपाणि । पाण्डवांहूनि प्रिय होय ॥ ६१ ॥ प्रतिष्ठानीं एकनाथ । जनार्दनकृपाधनें समर्थ । चिदानंदाख्यशेवधिभरित । स्वानंदकोशीं परिपूर्ण ॥ ६२ ॥ तया कोशाचा आयव्यय । अन्वयाङ्कुर गोविंदराव । पाहोनि अधिकाराची सोय । ओपिता होय सद्विभव ॥ ६३ ॥ दयार्णव जन्मला तयाचे उदरीं । झाला भाण्डाराधिकारी । न जोडितां घरचेघरीं । सर्व सामग्री स्वतःसिद्ध ॥ ६४ ॥ श्रोतीं होऊनि सावधान । श्रवणपात्रीं भरिजे धन । जेणें तुटे भववंधन । संसृतिदैन्य मग कैचें ॥ ६५ ॥ तो अठरा सहस्र ग्रंथ । नामें श्रीमद्भागवत । दशमस्कंध जो हा विख्यात । वक्ता समर्थ शुकराया ॥ ६६ ॥ अध्याय हा त्रिसप्तति । मागधाची करूनि शान्ति ।

सोडूनियां निरुद्ध नृपति । शक्रप्रस्था हरि आला ॥ ६७ ॥ दयार्णवाची इतुकी विनति । सदैव कृष्णीं रंगल्या मति । संकटीं नुपेक्षी निश्चिती । शकुनग्रंथी हे बांधा ॥ ३६८ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां जरासंधवधनृपविमोचनंनाम त्रिसप्ततितमोऽध्यायः ॥ ७३ ॥

श्लोक ३५ ॥ टीका ३६८ ॥ एवं संख्या ४०३ ॥
(बहात्तरावा अध्याय मिळून ओवीसंख्या ३३,६८७)

त्र्याहत्तरावा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ७४ वा

श्रीगणेशायनमः ॥ श्रीपाण्डुरंगसहाय । जयजय जनका जगन्मया । जगदुत्पत्तिस्थितिलयनिलया । जगत्कल्याणकीर्तिनिचया । श्रीगुरुवर्या गोविन्दा ॥ १ ॥ तव पदस्मृतीचा सोज्ज्वळ तरणी । प्रकट होतां हृदयगगनीं । हरिगुणपरागें मतिकमलिनी । विद्वद्भृंगा निमंत्री ॥ २ ॥ त्रिसप्ततितमाध्याया अंतीं । ऐकोनि जरासंधशान्ति । अष्टभावांची सुखोत्पत्ति । धर्मोप्रति उपलब्ध ॥ ३ ॥ तेणें तात्पर्य तनूच्या ठायीं । वाचेशीं मौनमुद्रा पाहीं । ते विमुक्त ये अध्यायीं । करूनि बोले युधिष्ठिर ॥ ४ ॥ तो हा चतुःसप्ततितम । अध्याय परिसा उत्तमोत्तम । ज्यामाजी राजसूयसंभ्रम । चैद्य अधम निवटेल ॥ ५ ॥ यज्ञसंकल्पार्थ मागध । भीमहस्तें पावला वध । येथ मखान्तीं द्वेष्टा चैद्य । वधील आद्य जगदात्मा ॥ ६ ॥ हें सविस्तर निरूपण । ये अध्यायीं कीजे श्रवण । वक्ता व्यासाचा नंदन । सावधान म्हणे नृपा ॥ ७ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ एवं युधिष्ठिरो राजा जरासंधवधं विभोः ।
कृष्णस्य चानुभावं तं श्रुत्वा प्रीतस्तमब्रवीत् ॥ १ ॥

एवं म्हणिजे पूर्वोक्त रीती । कृष्णयुधिष्ठिर उभयतांप्रती । सत्वावस्था बाणली होती । ते मागुती ओसरली ॥ ८ ॥ लब्धस्मृति धर्मराजा । जरासंधवध बरवे वोजा । आणि श्रीकृष्णैश्वर्यतेजा । ऐकूनि गुज बोलतसे ॥ ९ ॥ जरासंधाचिया वधातें । श्रीकृष्णाच्या अनुभावातें । ऐकूनि सप्रेमभरितचित्तें । बोलता झाला श्रीकृष्णा ॥ १० ॥ चकारार्थें आपल्या मनीं । निजाधिकारातें विवरूनी । तदनुसार मंजुळ वाणी । बोले वदनीं सप्रेमें ॥ ११ ॥ कैसा लक्षिला निजाधिकार । तोही ऐकावा विचार । कृष्ण केवळ जगदुद्धार । आपण पामर सामान्य ॥ १२ ॥ त्या कृष्णातें आज्ञा करणें । पाहतां अयोग्य

वहुतां गुणें । तथापि समर्थें पूर्णपणें । सिद्धी नेणें हें उचित ॥ १३ ॥ ऐसा लक्षूनि अभिप्राव । बोलता झाला धर्मराव । श्रीकृष्णाचें ऐश्वर्यविभव । अयोग्यत्व आपुलेंही ॥ १४ ॥ तया शब्दाची कडसणी । परिसें कौरवचूडामणी । जया शब्दें चक्रपाणी । अंतःकरणीं सुखावला ॥ १५ ॥

॥ युधिष्ठिर उवाच ॥ ये स्युस्त्रैलोक्यगुरवः सर्वे लोकमहेश्वराः । वहंति दुर्लभं लब्ध्वा शिरसैवानुशासनम् ॥२॥

कुरुकुळवंशाचें मंडन । केवळ धर्माचा नंदन । तो युधिष्ठिर प्रस्तावोन । म्हणे वचन अवधारा ॥ १६ ॥ जे का त्रिजगामाजी थोर । प्रवृत्तिनिवृत्तीचे ईश्वर । यालागीं ते सर्वेश्वर । श्रेष्ठ गुरुवर सुरासुरां ॥ १७ ॥ निवृत्तीमाजी सनकादिक । जगद्वंद्य जे कां मुख्य । तेही वोडविती मस्तक । अनुशासना जयाचिया ॥ १८ ॥ प्रवृत्तिप्रतिपादक ईश्वर । विधि हर शक्र वैश्वानर । यम निर्ऋति वरुण कुबेर । सहसमीर ईशान ॥ १९ ॥ इत्यादि लोकपाळ पृथक । ईश्वरत्वें मिळती मुख्य । तेही अनुशासनें सम्यक । वाहती मस्तक वोडवुनी ॥ २० ॥ प्रजा राजाज्ञेतें शिरीं । वाहती म्हणाल जैसिया परी । हेही आज्ञा तैसिया परी । बळात्कारें न लंघिती ॥ २१ ॥ तैसें येर्थांचें रहस्य नोहे । मर्त्यां अमृत जेणें भावें । दुर्लभ लाभतां तें आघवें । घेती जीवें अनुसरूनी ॥ २२ ॥ कीं दरिद्रियाच्या कमलालया । प्रसन्न होऊनि येतां निलया । दुर्लभ जाणोनि तिचिया पाया । मस्तक बैसणें जेंवि करिती ॥ २३ ॥ तैसा आज्ञेचा दुर्लभ । सर्वांहूनि मानिती लाभ । तो तूं प्रत्यक्ष पद्मनाभ । सगुण सुलभ ये काळीं ॥ २४ ॥

स भवानरविदाक्षो दीनानामीशमानिनाम् । धत्तेऽनुशासनं भूमंस्तदत्यंतविडंबनम् ॥ ३ ॥

पामर जीव अनाथ दीन । तथापि धरिती राज्याभिमान । वाहसी त्यांचे आज्ञाप्रमाण । हें विडंबन तुज साजे ॥ २५ ॥ भूमन् म्हणिजे अपरिच्छिन्ना । भो भगवंता अरविन्दनयना । मादृशांची वंदिसी आज्ञा । सुहृदानुकरणा दावूनी ॥ २६ ॥ प्रभुत्वें नृपाची आज्ञा शिरीं । सामान्य वंदिती जयापरी । तयावरूनि जाणिजे इतरीं । लघिष्ठगरिष्ठपण जैसें ॥ २७ ॥ तेंवि मादृश जीव दीन । परि आंगीं नृपाभिमान । वाहसी त्यांचें अनुशासन । तेणें सामान्य तूं नव्हसी ॥ २८ ॥ श्रेष्ठें कनिष्ठालागूनी । भजतां होय तेजोहानी । तें कां पां मजलागूनी । नोहे म्हणसी तरी ऐक ॥ २९ ॥

न ह्येकस्याद्वितीयस्य ब्रह्मणः परमात्मनः । कर्मभिर्वर्धते तेजो ह्रसते च यथा रवेः ॥ ४ ॥

कर्मफळभोक्ते पृथक जीव । कर्मानुसार त्यांचें दैव । नृपासनारूढ राव । किङ्करसमुदाव वोळगणे ॥ ३० ॥ कर्मसंस्कारें पृथक पृथक । तत्फळभोक्ते जीव अनेक । तारतम्य जाणती लोक । सेव्यसेवक म्हणोनियां ॥ ३१ ॥ जेंवि किटणाचीं कुशलपणें । शिल्पिक निर्मिती राजोपकरणें । चित्रिलीं

लखलखिती सुवर्णें । होती तेणें मूल्याढ्यें ॥ ३२ ॥ तेंवि केवळ सुवर्णमय । निर्मिला उपकरणसमुदाय । सबाह्य जेंवि तो अद्वितीय । किटनप्राय न म्हणावा ॥ ३३ ॥ भिजतां जळतां भंग होतां । किटणमूल्य होय वृथा । तैसी सुवर्णा न्यूनता । नोहे महत्त्व उणें पुरें ॥ ३४ ॥ सुवर्णाचा खंडेराव । श्वान सेवक म्हाळसा अश्व । एक्या मूल्यें तुकती सर्व । नोहे महत्त्व उणें पुरें ॥ ३५ ॥ तेंवि तूं अद्वितीय परब्रह्म । एक परमात्मा कैवल्यधाम । तुझें तेज न्यूनोद्दाम । न करवे कर्मश्रेणीतें ॥ ३६ ॥ उदयास्तादिकर्मेंकरून । भास्करतेजा क्षयवर्धन । नोहे जैसा तैसा पूर्ण । प्रकाशघन स्वस्वरूपें ॥ ३७ ॥ दृश्या जितुकी स्थळोपाधी । तच्छायेतें ह्रासवृद्धी । नयनीं देखूनि जन प्रतिपादी । चंडदीधितिवंतातें ॥ ३८ ॥ प्रभाते म्हणती कोंवळा सूर्य । मध्याह्नकाळीं दाहक होय । सायाह्नीं तत्किरण निचय । क्षीण झाला जन म्हणती ॥ ३९ ॥ हाही अर्थ असो परता । तुज परिपूर्णा श्रीभगवंता । आज्ञापकता आणि धारकता । असो योग्यता द्विविधही ॥ ४० ॥ दोहीं योगें तेजोहानि । तुझी न घडे चक्रपाणि । यास्तव कृपेच्या अवलंबनीं । स्वामिसेवकीं अभेद ॥ ४१ ॥ म्हणोनि अघटितघटनापटी । कृपेक्षणें पावे पुष्टी । लीलालास्यें दावी सृष्टी । तुज ते शेवटीं अस्पृष्ट ॥४२॥ मी परमेश्वर सर्ववंद्य । दास्यकर्म मज अयोग्य निन्द्य । ऐसा तुजमाजि न वसे भेद । तरी तें विशद अवधारीं ॥ ४३ ॥

न वै तेऽजित भक्तानां ममाहमिति माधव । त्वं तवेति च नानाधीः पशूनामिव वैकृता ॥ ५ ॥

तव भक्त जे सप्रेमळ । अनन्यबोधात्मक केवळ । अहंताममतामय जो मळ । त्यापें अळुमाळ न वसे पैं ॥ ४४ ॥ अहंता ममता त्वंता तवता । इत्यादिभेदबोधात्मकता । पशुत्वें यथार्थ जैसी भ्रान्ता । तेंवि भगवंता न तावकां ॥ ४५ ॥ तावकांप्रति हे भेदबुद्धि । तव सान्निध्यें जेथ न बधी । मा माधवा तूतें बाधी । हें न घडे कधीं पशुसाम्यें ॥ ४६ ॥ पशु हें नाम कोणाप्रति । ऐसें पुससी जरी श्रीपति । तेंही कथितों यथामति । प्रकृतिविकृतिसमुच्चयें ॥ ४७ ॥ भो भो अजिता अज अव्यया । अष्टधाप्रकृति स्थूळमाया । विकृता जीवरूपा जिया । आणिलें आया भवस्वप्न ॥ ४८ ॥ एकें अनेकता दावून । मी माझें हें दृढावून । तूं तुझें हें तत्प्रतिभान । केलें स्वप्न सुप्तातें ॥ ४९ ॥ अविद्यावरणात्मक जो देह । आत्मविसरें अप्रत्यय । ज्यातें म्हणती कारणदेह । जेथूनि उदय स्वप्नाचा ॥ ५० ॥ स्वप्नश्रमें भ्रमले भ्रान्त । देहात्मबोधें विषयग्रस्त । तुझें माझें करिती नित्य । केवळ प्राकृत पशू प्राणी ॥ ५१ ॥ देहाहंता ते तव भक्तां । नाकळी ममता त्वंता तवता । कारणदेहाचिया ध्वान्ता । लंघूनि तत्वता जे गेले ॥ ५२ ॥ प्रत्यगात्मत्वचित्प्रकाश । जेणें अवगमे विश्वाभास । आश्रय सर्वसाक्षी त्यास । तोही निःशेष जिंहीं केला ॥ ५३ ॥ तादात्म्यबोधें स्वरूपानिष्ठ । होऊनि झाले समरसाविष्ट । अनेकतेचे विसरूनि कष्ट । झाले भ्राजिष्ठ पूर्णत्वें ॥ ५४ ॥ त्या जे न शिवे अनेकता । तूं तो माधव मायानियंता । तुझ्या ठायीं अहंता ममता । पशुसाम्यता केंवि घडे ॥ ५५ ॥ इत्यादिवचनें गरुडध्वजा । सप्रेमभावें धर्मराजा । प्रार्थूनि यज्ञारंभकाजा । यज्ञ करिता जाहला ॥ ५६ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ इत्युक्त्वा यज्ञिये काले वव्रे युक्तान्स ऋत्विजः ।
कृष्णानुमोदितः पार्थो ब्राह्मणान्ब्रह्मवादिनः ॥ ६ ॥

इत्युक्त्वा हें सहेतु पद । ऐका येथींचा अर्थ विशद । धर्मराज वदला विविध । कार्य सावध लक्षूनि ॥५७॥ दीक्षाग्रहणकाळीं पार्थ । भूतभविष्यद्वर्तमानार्थ । संपादनीं श्रीकृष्णनाथ । स्तवी यथार्थ प्रारंभीं ॥ ५८ ॥ दीक्षाग्रहणानंतर कांहीं । प्रार्थावया अवसर नाहीं । व्रतस्थ होऊनि यज्ञकार्यीं । एकवृत्ति नियमस्थ ॥ ५९ ॥ म्हणोनि आधीं ऐशियापरी । श्रीकृष्णातें निजवैखरी । बोलोनि यज्ञारंभ करी । ऋत्विज वरी ते ऐका ॥ ६० ॥ विद्धयुक्तयज्ञारंभकाळ । वसंतप्रमुख अतिनिर्मळ । बहुलाप्रमुख भगण अमळ । द्विदैवान्त देवर्क्षें ॥ ६१ ॥ नवांश होरा द्रेष्काण लग्न । सप्तांश द्वादशांश त्र्यंशांश पूर्ण । निर्वेध तारा चंद्र ग्रहण । अभीष्ट दैवज्ञनिर्दिष्ट ॥ ६२ ॥ एवमादिकाळशुद्धि । यथार्थ शोधोनि ज्योतिर्विदीं । तिये काळीं यथाविधि । ऋत्विज सुबुद्धि वरियेले ॥ ६३ ॥ श्रीकृष्णाच्या अनुमोदनें । ब्रह्मनिष्ठ सद्द्विजरत्नें । त्यांमाजि निवडूनिया यजमानें । युक्तविधानप्रवीणांतें ॥ ६४ ॥ यजमान युधिष्ठिर भूपति । वरिता झाला ऋत्विजांप्रति । सभापर्वीं महाभारतीं । व्यासभारती तें वदली ॥ ६५ ॥ येथ संक्षेपें मितवाणी । नृपा वदला बादरायणि । तथापि हरिवरदव्याख्यानीं । अनुक्रमणी दाविजते ॥ ६६ ॥ जाणोनि यज्ञारंभप्रसंग । प्रार्थूनि आणिला मुनिवरवर्ग । त्यांचीं नांवें ऐक साङ्ग । केवळ याग द्विजवेषीं ॥ ६७ ॥

द्वैपायनो भरद्वाजः सुमंतुर्गोतमोऽसितः । वसिष्ठश्च्यवनः कण्वो मैत्रेयः कवषस्त्रितः ॥ ७ ॥
विश्वामित्रो वामदेवः सुमतिर्जैमिनिः क्रतुः । पैलः पराशरो गर्गो वैशंपायन एव च ॥ ८ ॥
अथर्वा कश्यपो धौम्यो रामो भार्गव आसुरिः । वीतिहोत्रो मधुच्छंदा वीरसेनोऽकृतव्रणः ॥ ९ ॥

गौतम भरद्वाज सुमंतु । वसिष्ठ द्वैपायन कण्व असित । च्यवन मैत्रेय कवषस्त्रित । विश्वामित्र वामदेव ॥ ६८ ॥ सुमति जैमिनि वैशंपायन । अथर्वा कश्यप वीरसेन । गर्ग पराशर अकृतव्रण । वीतिहोत्र क्रतु पैल ॥६९॥ मधुच्छंदा आसुरी धौम्य । भगवन्मूर्ति भार्गवराम । मंगलफलांचे कल्पद्रुम । मुनिसत्तम इत्यादि ॥ ७० ॥ वेदद्रुमाचे विटप चारी । पृथक् शाखा विटपावरी । तदध्यायिच्छात्रनिकरीं । सहपरिवारीं मुनि आले ॥ ७१ ॥ सहस्र अष्टयांशीं परिमिति । त्यांमाजि सप्तर्षि आणि अगस्ति । या आठांच्या प्रवरपंक्ति । गोत्रसंतति गणवेना ॥ ७२ ॥ तेथ धौम्यमहर्षिमतें । ऋत्विज कथिले यजमानातें । धर्में वरणी दिधली त्यांतें । तेंही निरुतें अवधारीं ॥ ७३ ॥ पैलनामा वसूचा पुत्र । होता केला तो पवित्र । ग्रावस्तोता धौम्यद्विजवर । स्वयें झाला होतृगणीं ॥ ७४ ॥ मैत्रावरुणस्थानीं द्विज । धर्में वरिला भरद्वाज । सुमतिनामा तेजःपुंज । अच्छावाग् होतृगणीं ॥ ७५ ॥ पैल धौम्य भरद्वाज सुमति । होतृगणीं या चारी मूर्ति । गमे निगमें धरिल्या व्यक्ति । धर्मयज्ञार्थ संतोषें ॥ ७६ ॥ स्वयें द्वैपायन झाला ब्रह्मा । ब्राह्मणाच्छंसी सुमंतनामा । आग्नीध्रत्व दिधलें गौतमा । असित पोता

ब्रह्मगणीं ॥ ७७ ॥ द्वैपायन सुमंत गौतम । असितादि चौघे द्विजोत्तम । ब्रह्मगणीं या वरी धर्म । केवळ निगम द्विजरूपी ॥ ७८ ॥ कण्वनामा अध्वर्यु केला । प्रतीपस्थाता वसिष्ठ भला । नेष्टा मैत्रेय-बोलिला । च्यवन जाला उन्नेता ॥ ७९ ॥ काण्व वसिष्ठ च्यवन । चाऱ्ही मिळूनि अध्वर्युगण । ब्रह्म-निष्ठ हे चौघेजण । श्रवण नयन वेदशिरा ॥ ८० ॥ धनंजयगणींचा जो सुसामा । उद्गाता तो द्विजोत्तमा । जैमिनि प्रस्तोता सत्तम । वैशंपायन प्रतिहर्ता ॥ ८१ ॥ सुब्रह्मण्यस्थानीं थोर । धर्में वरिला पराशर । उद्गातृगण हा अतिसुन्दर । राजसूयीं धर्माचे ॥ ८२ ॥ सुसाम जैमिनि वैशंपायन । पराशरादि चौघेजण । गमे कीं वेदोनारायण । मूर्तिचतुष्टय अवगला ॥ ८३ ॥ ऐसे ऋत्विज होत्रग सोळा । सदस्य सतरावा बोलिला । सदस्यस्थानीं कश्यप वरिला । प्रेक्षक सकळा यज्ञातें ॥ ८४ ॥ अशेष मुनिवर सदस्यगणीं । धर्में स्थापिले सभास्थानीं । मधुपर्कादि समर्पूनी । यथाविधानीं पूजियले ॥ ८५ ॥ ऋत्विग्वरणाचें व्याख्यान । कथिलें यथोक्त विस्तारून । यावरी नृपवर सुहृदस्वजन । आले कोण तें ऐका ॥ ८६ ॥

उपहूतास्तथा चान्ये द्रोणभीष्मकृपादयः । धृतराष्ट्रः सहसुतो विदुरश्च महामतिः ॥ १० ॥
ब्राह्मणाः क्षत्रिया वैश्याः शूद्रा यज्ञदिदृक्षवः । तत्रेयुः सर्वराजानो राज्ञां प्रकृतयो नृप ॥ ११ ॥

धर्मराजें स्वमुखें वचनीं । नकुळाप्रति आज्ञापूनी । गजसाह्वया पाठवूनी । कौरवांलागूनी आणविलें ॥ ८७ ॥ भीष्म द्रोण कृपाचार्य । प्रज्ञाचक्षु सशततनय । त्रिकाळज्ञ विदुर आर्य । आर्यावर्य वक्तृत्वें ॥ ८८ ॥ यालागीं महामति ऐसें । श्लोकीं विशेषण दिधलें असे । आदिपदाच्या सौरसें । अशेष कौरव सूचिले ॥ ८९ ॥ कर्ण शकुनि जयद्रथ । बाह्लीक भूरिश्रवा सोमदत्त । अश्वत्थामा शल्य सुरथ । नकुळें समस्त आणिले ॥ ९० ॥ सहदेवातें युधिष्ठिरें । आज्ञापितां दूर येरें । प्रेरूनि राजे अत्यादरें । यज्ञमंडपा प्रार्थिले ॥ ९१ ॥ पूर्वी दिग्विजयाचे काळीं । भूभुजांतें आज्ञा केली । दूतसंकेतें वंदूनि मौळी । आली मंडळी नृपांची ॥ ९२ ॥ बाहेद्रथें जिंकूनि रणीं । रोधिल्या होत्या नृपांच्या श्रेणी । त्या सोडितां मागधमरणीं । आज्ञा केली श्रीकृष्णें ॥ ९३ ॥ ते आज्ञेतें स्मरोनि हृदयीं । राजे मिनले मखालयीं । चातुर्वर्ण्य सहसमुदायीं । आले तेंही अवधारा ॥ ९४ ॥ श्रेष्ठ ब्राह्मण चतुर्वेदी । सहित शिष्योपशिष्यमांदी । शास्त्राध्यायी दर्शनवादी । मीमांसकादि पातले ॥ ९५ ॥ तैसींच समस्त क्षत्रिय-कुळें । परमस्वधर्मशीळें अमळें । धर्मराजाचे यज्ञशाळे । पाहों आलीं सप्रेमें ॥ ९६ ॥ वैश्य सदाचार-संपन्न । धनाढ्य अपर जे वैश्रवण । धर्मराजाचा पहावया यज्ञ । आले संपूर्ण सद्भावें ॥ ९७ ॥ तैसोचि शूद्र आस्थावंत । द्विजपरिचर्याविषयीं निरत । धर्मराजाचा मख समस्त । पहावयार्थ पातले ॥ ९८ ॥ अष्टधा नृपांचिया प्रकृती । यज्ञ पहावयाचे आर्ती । पातल्या नृपांचिये संगती । न लगे पुनरुक्ति करावी ॥ ९९ ॥ ऐसे मंडपीं चाऱ्ही वर्ण । अपार मिनले भूभुजगण । द्विजीं शोधिलें देवयजन । तें व्याख्यान अवधारा ॥ १०० ॥

ततस्ते देवयजनं ब्राह्मणाः स्वर्णलाङ्गलैः । कृष्ट्वा तत्र यथाम्नायं दीक्षयाञ्चक्रिरे नृपम् ॥ १२ ॥

ब्राह्मणीं यथोक्त यज्ञकर्मा । भू याचिजे नृपोत्तमा । धर्मराजें यज्ञकामा । कैसी क्षमा स्वीकारिली ॥ १ ॥ परशुरामें ब्राह्मणांप्रति । दान केली अवघी क्षिति । धर्में ब्राह्मणांपासुनि पुढती । कवणे रीती प्रार्थियली ॥ २ ॥ आधुनिक राजे झाले क्षत्री । प्राचीन ब्राह्मणांची धरित्री । त्यांपासुनि परिमितसूत्रीं । यज्ञायतना पुरे ऐसी ॥ ३ ॥ सूत्रमानें भू मोजिली । स्वर्णनिष्कीं आच्छादिली । तान्निष्कदानें ते स्वीकेली । मग शोधिली यथाविधिं ॥ ४ ॥ देवयजन तें यज्ञभूमी । लांब रुंद यथानियमीं । ब्राह्मणीं आकृष्ट लाङ्गलीं हैमीं । यज्ञवित्तमीं विलोकुनी ॥ ५ ॥ काच खर्परें अस्थिशकलें । प्रतिमा अवयवादि भंगले । इटा लोष्ठ दुर्दुममूलें । काढूनि केली भूशुद्धि ॥ ६ ॥ भूमि शोधूनि यज्ञायतनें । वेदि निर्मिली सूत्रज्ञानें । धर्मराजातें वेदविधानें । दीक्षा करिते जाहले ॥ ७ ॥ दीक्षाङ्गसंस्कार समस्त । तिहीं करूनि संस्कारयुक्त । करिते जाहले द्विज समर्थ । युधिष्ठिरातें ते काळीं ॥ ८ ॥

हैमाः किलोपकरणा वरुणस्य यथा पुरा ।

समस्त यज्ञांचीं उपकरणें । निर्मिलीं जाम्बूनदसुवर्णें । जैसीं पूर्वीं केली वरुणें । स्वमखाकारणें स्वभुवनीं ॥ ९ ॥ म्हणाल वरुण तो दिक्पाल । धर्म मानवी भूपाळ । ऐसें नव्हे हे पाण्डव सकळ । अमर केवळ अवतरले ॥ ११० ॥ म्हणोनि हरिहरांच्या मूर्ति । आल्या युधिष्ठिरमखाप्रति । ते हे ऐका शुकभारती । शंका चित्तीं न धरूनियां ॥ ११ ॥

इन्द्रादयो लोकपाला विरञ्चिभवसंयुताः । सगणाः सिद्धगंधर्वा विद्याधरमहोरगाः ॥ १३ ॥
मुनयो यक्षरक्षांसि खगकिन्नरचारणाः । राजानश्च समाहूता राजपत्न्यश्च सर्वशः ॥ १४ ॥
राजसूयं समीयुः स्म राज्ञः पांडुसुतस्य वै । मेनिरे कृष्णभक्तस्य सूपपन्नमविस्मिताः ॥ १५ ॥

इंद्राग्नि यम निर्ऋति । वरुण वायु कुबेर पशुपति । ब्रह्मादि निर्जर सहसंपत्ति । आले निगुती धर्ममखा ॥ १२ ॥ गण गंधर्व सिद्ध चारण । उरग यक्ष रक्षोगण । खग मुनि किन्नर विद्याभरण । आले पूर्ण मख लक्षूं ॥ १३ ॥ आज्ञापत्रें भूभुज सर्व । पाहूं आले मख अपूर्व । पत्न्या पुत्र सेनाविभव । घेऊनि मखार्ह संभार ॥ १४ ॥ पाण्डुसुत जो धर्मराज । तयाचा यज्ञ सुकृतपुंज । पाहों आले सर्व भूभुज । मानिती चोज विलोकनीं ॥ १५ ॥ म्हणती कृष्णभक्ताचा अध्वर । म्हणोनि सिद्धी पावला सधर । येरव्हीं विघ्नें धुरंधर । जिणोनि पार कोण पावे ॥ १६ ॥ ऐसे विस्मित भूपाळ । अमरेंसहित अमरपाळ । विरंचिसहित जाश्वनीळ । मानिती केवळ कृष्णकृपा ॥ १७ ॥ ऐसी संभारसमृद्धि । देखोनि ऋत्विज यथाविधि । आसादनी करूनि आधीं । योजिते झाले तें ऐका ॥ १८ ॥

अयाजयन्महाराज याजका देवबर्चसः । राजसूयेन विधिवत्प्राचेतसमिवामराः ॥ १६ ॥

महाराज या संबोधनें । श्रीशुक परीक्षितीतें म्हणे । यजिते झाले विधिविधानें । मंत्रपठनें ऋत्विज ते ॥ १९ ॥ पूर्वी जेंवि वरुणयज्ञीं । बृहस्पतिप्रमुखनिर्जरगणीं । साङ्गता केली विधिविधानीं । तेंवि मुनिजनीं धर्ममखीं ॥ १२० ॥ निर्जरतुल्य तेजःपुञ्ज । धर्मराजाचे ऋत्विज । यजनकाळीं दावियती ओज । धूम्रध्वज संतुष्ट ॥ २१ ॥ प्रतिदिनीं यथोक्त करिती इष्टि । सदस्य सुरवर पाहती दृष्टी । हव्यवाहना परम तुष्टी । करिती गोष्ठी परस्परें ॥ २२ ॥ पुढें सोमाभिषवदिवशीं । वर्तणूक जाहली कैसी । तें तूं परीक्षिति परियेसीं । कांहीं अल्पसी निवेदितों ॥ २३ ॥

सुत्येऽह्न्यवनीपालो याजकान्सदसस्पतीन् । अपूजयन्महाभागान्यथावत्सुसमाहितः ॥ १७ ॥

सोमनिष्पत्ति विधिविधानीं । प्रवर्तिजे जिये दिनीं । तया म्हणिजे सुत्येहनी । अर्थ सर्वज्ञीं जाणावा ॥ २४ ॥ तिये दिवसीं धर्मराजा । सुरभूसुरभूवरपूजा । करावया यथोक्तवोजा । नियतेन्द्रिय जाहला ॥ २५ ॥

सदस्याग्र्यार्हणार्हं वै विमृशंतः सभासदः । नाध्यगच्छन्नैकांत्यात्सहदेवस्तदाब्रवीत् ॥ १८ ॥

ऋत्विजांचा पूजाक्रम । सूत्रीं बोलिला अनुक्रम । विचार करणें नलगे परम । जाणोनि निगमप्रतिपाद्य ॥ २६ ॥ सदस्यांमाजि दिधला क्षण । कश्यपनामा तो ब्राह्मण । त्याचें करूनियां पूजन । पुसे यजमान सर्वांसी ॥ २७ ॥ ऋत्विज सदस्य सर्व वरिष्ठ । विवरूनि सांगा मजला स्पष्ट । सदस्यार्हणग्रहणा श्रेष्ठ । कोणता सुभट भूभर्ता ॥ २८ ॥ मग ते सदस्य विचार करिती । शौर्यादित्य जो क्षत्रियजाती । अग्रपूजार्ह तोचि नृपती । श्रुतिसंमतीं निर्दिष्ट ॥ २९ ॥ वीर्य शौर्य तुळितां देखा । आगळे दिसती एकएकां । श्रेष्ठत्वाचा न करवे लेखा । कथनीं शंका सभासदां ॥ १३० ॥ सर्वांमाजी एकचि श्रेष्ठ । असतां वदों शकिजे स्पष्ट । बहुतां श्रेष्ठांमाजि वरिष्ठ । म्हणतां कष्ट त्यां गमती ॥ ३१ ॥ एकाहूनि एक आगळा । देखूनि ऐसियां बहु भूपाळां । स्तब्ध झाला सदस्यमेळा । मग बोलिला सहदेव ॥ ३२ ॥ अग्रपूजेचा अग्रणी । कोण्ही सदस्य न वदती प्राणी । ऐसी अनवस्था देखोनी । बोले वचनीं माद्रेय ॥ ३३ ॥

अर्हति ह्यच्युतः श्रैष्ठ्यं भगवान्सात्वतां पतिः । एष वै देवताः सर्वा देशकालधनादयः ॥ १९ ॥

श्रेष्ठत्वाचें प्रशंसन । करूं न शकती सदस्यगण । यदर्थी सदस्य गमला कोण । तो विवरून प्रकटावा ॥ ३४ ॥ सूर्य प्रकट असतां गगनीं । कासया गिंवसिजे तारकागणीं । प्रकट असतां मंदाकिनी । सरितांलागूनि कां पुसिजे ॥ ३५ ॥ सफळ सद्गुणी अमरतरु । प्रकट दिसतांहि समोरु । बोरी बाभळी अर्केखादिरु । वज्र शेर विवरावें ॥ ३६ ॥ तैसे अनेक कुलीन भूप । वीर्यशौर्यादिप्रतापवंत । देखोनि

सदस्य न करिती जल्प । तरी न कीजे कोपै मद्वचनीं ॥ ३७ ॥ यादवपति भक्तपात । षड्गुणैश्वर्य-संपत्ति । अच्युत तो हा सात्वतपति । अखिलात्ममूर्ति श्रेष्ठत्वें ॥ ३८ ॥ तो हा श्रीकृष्ण प्रकट असतां । संदेह कोण तुमचिया चित्ता । मार्तंड गवेषणा खद्योतां । माजि करितां कां न लजां ॥ ३९ ॥ अग्र-पूजेचें श्रेष्ठत्व । द्यावया योग्य श्रीकेशव । हाचि केवळ देवता सर्व । काळावयवादिकरूनि ॥ १४० ॥ देश काळ वस्तु विशेष । इहीं न करवे निर्देश । अपरिच्छेद्य हृषीकेश । कां पां कोणास नावगमे ॥ ४१ ॥ श्रेष्ठत्व असतां जनार्दना । अग्र्याहर्णीं विषाद कोन्हां । झळंबेल ही शंका मना । तरी मम वचना अवधारा ॥ ४२ ॥ सकळ करणें एका देहीं । तरी प्राणावदानें मुखाच्या ठायीं । योजितां संतोषती सर्वही । कीं विषाद कांहीं गमे तयां ॥ ४३ ॥ तेंवि जगदात्मा श्रीकृष्ण । पूजितां संतुष्ट आब्रह्मभुवन । तेंचि वदतों प्रकट वचन । कीजे श्रवण सर्वांहीं ॥ ४४ ॥

यदात्मकमिदं विश्वं क्रतवश्च यदात्मकाः । अग्निराहुतयो मंत्रा. साख्य योगश्च यत्परः ।। २० ।।

आत्मा म्हणिजे देहाप्रति । तरी विश्व हें ज्या कृष्णाची मूर्ति । क्रतुकलाप वदल्या श्रुति । ते मख निश्चिती कृष्णतनु ॥ ४५ ॥ अग्नि कृष्णाचें शरीर । कृष्णमयाचि आहुतिमंत्र । आज्यसमिधादिक संभार । तो हा श्रीधर एकात्मा ॥ ४६ ॥ साङ्ख्य म्हणजे केवळ ज्ञान । आत्मानात्मविचारण । गुरु-शिष्यात्मकमीमांसन । केवळ कृष्ण बोधात्मा ॥ ४७ ॥ योग म्हणिजे उपासना । अनादिवियोगपृथगा-पूर्णा । करावया तत्संयोजना । जिया साधना साधिजे ॥ ४८ ॥ ब्रह्मरंध्रीं जें चैतन्य । अविद्याबिम्ब भासोनि भिन्न । आधारपर्यंत अधोवदन । प्रत्यग्बोधें अवगमलें ॥ ४९ ॥ तुरीय कारण सूक्ष्म स्थूळ । गुणकंचुकें प्रत्यय बहळ । लाहोनि भवभ्रम हा टवाळ । घाली गोंधळ विषयार्थ ॥ १५० ॥ परंतु मी कोण ऐसें नुमजे । अविद्याभ्रमरसपानें माजे । घेऊनि अहंता देहा ओझें । फुंजे रंजे कर्तृत्वें ॥ ५१ ॥ सुखदुःखाचे साटपाठी । वाजतां हांव अधिकचि उठी । भोगी जन्ममरणाच्या कोटी । परि नुमजे गोठी सुटकेची ॥ ५२ ॥ जेंवि मंचकीं सुखशेजारीं । निद्रित होतां निज मंदिरीं । स्वप्नभ्रमें दुःख-सागरीं । सुखदुःखलहरी वरपडणें ॥ ५३ ॥ तया अविद्याभ्रमितां जीवां । चेयिरें ह्मावयाचिया उपावा । कृपा उपजे श्रीकेशवा । तैं जाजावा तो पावे ॥ ५४ ॥ भ्रमिष्ठ जाहलों येथूनि सुटणें । भ्रमितां न कळे भ्रमलेपणें । अतिकारुणिकें श्रीभगवानें । कृपा करणें तें उमजे ॥ ५५ ॥ तैं जाजावे स्वप्नातिशयें । उत्कट भयें वोसणाये । येथूनि कैसी सुटका होये । तैं हें लाहे वैराग्य ॥ ५६ ॥ तैसा प्राणी भावावर्ती । त्रासोनि लाहे विषयोपहती । शरण जाय सद्गुरुप्रती । भवनिर्मुक्ति वाञ्छूनी ॥ ५७ ॥ तैं सद्गुरु बोधी ज्ञान । जो परमात्मा पूर्णचैतन्य । तदंश जीवात्मा तूं भिन्न । अविद्या वरून झालासी ॥ ५८ ॥ अविद्यावरण तें निरसाया । पूर्णचैतन्या परमात्मया । भजसी तैं तूं मुळींच्या ठायां । समरस पावसी तत्प्रेमें ॥ ५९ ॥ ऐसें बोधूनि सद्गुरुनाथ । कृपेनें मस्तकीं ठेवूनि हात । पूर्णचैतन्य सर्वगत । बोधी भजनार्थ क्रम त्याचा ॥ १६० ॥ अधोमुख जी कुण्डलिनी । मुख आधारीं पुच्छ मूर्धि । आसनमुद्रा-

प्राणरोधनीं । ऊर्ध्ववदनी ते कीजे ॥ ६१ ॥ आधार स्वाधीन मणिपुर । अनाहत विशुद्ध आज्ञाचक्र भेदूनि पाविजे सहस्रार । परमसधीर सप्रेमें ॥ ६२ ॥ प्रपंचप्रेमा ते आसक्ति । भगवत्प्रेमा नाम भक्ति । तन्सिद्धयर्थ हे योगपद्धति । भवनिर्मुक्ति कारण पैं ॥ ६३ ॥ उपास्य जें तें पूर्णचैतन्य । उपासक प्रत्यगात्मा आपण । अविद्याभ्रमें वियोग जाण । तत्संयोजन या मार्गीं ॥ ६४ ॥ यया मार्गा म्हणिजे योग । तन्मय केवळ हा श्रीरंग । मान्त्रिकांचा भिन्नप्रसंग । म्हणाल सांग तरी ऐका ॥ ६५ ॥ सबीज करोनि मंत्रोपदेश । बोधी ब्रह्मरंध्रीं उपास्य । अष्टधा बाह्य जड जें दृश्य । तेथ भजनास उपपादी ॥६६॥ दैनंदिन प्रळयास्तमानीं । सौषुप्त प्रेतत्व पावे रजनी । तन्निरसना अपर दिनीं । अधिकारसाधनीं प्रवर्तिजे ॥ ६७ ॥ उषमीं जागृत होऊनि साङ्ग । देहशुद्धयर्थ मलोत्सर्ग । मृज्जलें शौच सारूनि चांग । मुखक्षालन विद्धयुक्त ॥ ६८ ॥ विसर्जूनि रात्रीचें वसन । करूनि धौताम्बर परिधान । एकाग्र कीजे आत्मचिन्तन । तनु झांकोन दृढवसनें ॥ ६९ ॥ आधारपर्यंत प्रत्यगात्मत्व । षट्चक्रक्रमें तें जीवित्व । ब्रह्मरंध्रीं जें पूर्णत्व । त्यामाजि एकत्व पावविजे ॥१७०॥ भावना मात्र करूनि ऐसी । पुन्हां भजिजे अन्वयासी । पूर्णचैतन्य शरीरकोशीं । भरलें ऐसें चिन्तावें ॥ ७१ ॥ शिव होऊनि शिवातें यजिजे । ऐसें मान्त्रिकें जें बोलिजे । तें जाणावें इये ओजें । भजनाधिकारप्रसंगें ॥ ७२ ॥ सगुणमूर्तीचें उपासन । तरी नचान्योऽस्मि अहं कृष्ण । ब्रह्माहमस्मि हें चिन्तन । निर्गुणभजकीं भावावें ॥ ७३ ॥ स्नानादिकर्मारंभीं सहसा । भजनाधिकारसिद्धयर्थ ऐसा । संकल्प कीजे निजमानसा । माजि फळाशा न धरूनी ॥ ७४ ॥ दक्षिणकानिष्ठाग्रें करून । जळीं कीजे यंत्रलेखन । आधारादिपीठपूजन । उपास्य ध्याऊन ब्रह्मरंध्रीं ॥ ७५ ॥ नासाश्वासें यंत्रपीठीं । प्रधानोपास्य तें प्रतिष्ठीं । त्यातें पुजूनि आवरणघरटी । क्रमपरिपाटीं पूजावी ॥ ७६ ॥ तया प्रधानपादजळीं । आपण मारावी बुडकुळी । मग निघूनि तीर्थकुळीं । करावीं सकळीं नित्यकर्में ॥ ७७ ॥ मग येऊनि देवतासदना । करूनि यथोक्त भूशोधना । आसनीं बैसोनि दिग्बंधना । भूतशोधना करावें ॥ ७८ ॥ प्राणायामक्रमें पूर्ण । पापपुरुषाचें निर्दहन । रेचकाख्य समीरण । तद्भस्म तेणें उडवावें ॥ ७९ ॥ पुढती अमृतबीजें पूर्ण । चंद्रामृतें अभिवर्षोन । अमृतरूप तनु नूतन । चैतन्यघन भावावी ॥ १८० ॥ अंतरमात्रा बहिर्मात्रा । यथागमें न्यसिजे गात्रा । प्राणप्रतिष्ठापूर्वक तंत्रा । लक्षूनि पात्रां आसादिजे ॥ ८१ ॥ आधारादिपीठपूजन । यंत्रीं प्रतिमादिकीं जाण । कीं शालिग्रामादि पंचधा बाण । मांडूनिं अर्चन करावें ॥ ८२ ॥ वामदक्षिणपद्धतिभेद । परस्परें कर्मविरोध । असो किमर्थ हा अनुवाद । काम्य निषिद्ध त्यागावें ॥ ८३ ॥ शुद्ध मुमुक्षु जे साधक । काम्य निषिद्ध त्यां बाधक । चित्तशुद्धयर्थ उपासक । सद्विवेकें आचरती ॥ ८४ ॥ पुष्पाञ्जलि घेऊनि करीं । पूर्ण उपास्य ब्रह्मरंध्रीं । नासाश्वासें त्या बाहेरी । प्रतिमायंत्रीं प्रतिष्ठिजे ॥ ८५ ॥ सबीजमंत्राचें जें ध्यान । सावयव उपास्य तें चिन्तून । सर्वोपचार समर्पून । साङ्ग सावरण पूजूनियां ॥ ८६ ॥ पुढती संहारमुद्रायोगें । आकर्षूनि नासामार्गें । ब्रह्मरंध्रीं स्वसंयोगें । ऐक्यबोधें विसर्जिजे ॥ ८७ ॥ मान्त्रिकपूजा योगक्रमें । तैसे तन्निष्ठ असतां नियमें । सहसा नाकळिजे भवभ्रमें । उपास्य अवगमे उपासकीं ॥ ८८ ॥ एवं उपासना म्हणिजे योग । तोही कृष्णमयचि जाणिजे साङ्ग । कृष्णार्चनें

साङ्गोपाङ्ग । ब्रह्माण्ड अव्यंग संतुष्ट ॥ ८९ ॥ मीमांसादि सांख्ययोग । कृष्णमय हे कथिले साङ्ग । वेदान्तप्रतिपाद्य श्रीरंग । तोही प्रसंग अवधारा ॥ १९० ॥ योग साङ्ख्य आणि मीमांसा । ऐक्यबोध यां घडे कैसा । तरी तें एकाग्र परिसा । श्रुतिरहस्या विवरूनि ॥ ९१ ॥

एक एवाद्वितीयोऽसावैतदात्म्यमिदं जगत् । आत्मनाऽऽत्माश्रयाः सभ्याः सृजत्यवति हत्यजः ॥ २१ ॥

सकळ सभ्यां सहदेव म्हणे । मद्वाक्य विवरिजे सदस्यगणें । एवं या अव्ययें निश्चय करणें । एक अद्वितीय हा कृष्ण ॥ ९२ ॥ एतदात्मक जग हें सत्य । ऐसा सिद्धांत श्रुतिप्रणीत । यदर्थीं शंका ते किमर्थ । इत्थंभूत उमजलिया ॥ ९३ ॥ आत्मानात्माश्रयभगवान । चिद्विलासमय भगवान । याचें सृजनावनसंहरण हरिहरदुहिणगुणात्मक ॥ ९४ ॥ ऐसी शंका धरिली चित्तीं । तरी या मायिका गुणमूर्ती । माझा नियंता श्रीपति । अज अव्यय अविनाश ॥ ९५ ॥ स्वप्न देखोनि जागृतीं आला । स्वप्नप्रपंच विस्तारिला । जागृत होतां उपसंहारला । स्वयें उरला एकात्मा ॥ ९६ ॥ स्वप्नें देखिलीं उच्चावचें । त्याचे पदरीं शुभाशुभ कैचें । अवघे वयुन प्रसुप्ताचें । तदाकारें प्रस्फुरित ॥ ९७ ॥ तैसा अज अव्यय श्रीहरी । अलिप्त कर्मादिसंस्कारीं । जीवमृगांतें मृगाम्भापरी । वेधी संसारीं तें ऐका ॥ ९८ ॥

विविधानीह कर्माणि जनयन्यदवेक्षया । ईहते यदयं सर्वः श्रेयो धर्मादिलक्षणम् ॥ २२ ॥

अन्यनिरपेक्ष स्वतंत्र । केवळ आत्मा श्रीधर । यालागीं अजन्म अक्षर । परात्परतर परमात्मा ॥ ९९ ॥ स्वप्नप्रपंचाचें जनन । पाळन आणि उपसंहरण । सुषुप्तिगर्भीं त्रिविध जाण । अलिप्त आपण तद्द्रष्टा ॥ २०० ॥ ज्याचें अनुग्रहकृपादृष्टी । तपोयोगादिकर्मराहाटी । करूनि अवघी जनपदसृष्टी । कल्याणपुष्टी साधितसे ॥ १ ॥ वेदप्रणीत ज्याची आज्ञा । विश्वासोनि वैध्यवचना । जन आचरती कर्माचरणा । तत्फलदाना । दायक जो ॥ २ ॥ धर्मलक्षण जें कल्याण । सर्वप्रकारें आचरे जन । ज्याच्या अनुग्रहें तत्फळदान । तो हा श्रीकृष्ण प्रत्यक्ष ॥ ३ ॥

तस्मात्कृष्णाय महते दीयतां परमार्हणम् । ऐवं चेत्सर्वभूतानामात्मनश्चार्हणं भवेत् ॥ २३ ॥

तत्मात् कृष्ण सचराचर । पूर्णचैतन्य परमेश्वर । प्रकट असतां कां विचार । अग्रपूजनीं करावा ॥ ४ ॥ महच्छब्दें परब्रह्म । अणुही अंतर्गत जो सूक्ष्म । अग्रपूजा परमोत्तम । या कारण समर्पिजे ॥ ५ ॥ जाणूनि ऐसिया श्रीकृष्णातें । समर्पील अग्र्याहयणातें । तरी आपणासहित सर्वभूतांतें । साङ्ग समर्हण तें होय ॥ ६ ॥ पुढती माद्रेय बोले वचन । झणें शंका मानील मन । जें आपण करितां कृष्णपूजन । ते आपणालागून केंवि होय ॥ ७ ॥ कृष्ण पूज्य आपण पूजक । प्रकट असतां हा विवेक । आपणा आपण पूजिलें देख । केंवि हें सम्यक घडेल ॥ ८ ॥ तरी हा ऐका अभिप्राय । सर्व भूतात्मा वासुदेव । वर्तमान भूतभाव्य । श्रुतिनिर्धार हा वदती ॥ ९ ॥

सर्वभूतात्मभूताय कृष्णायानन्यदर्शिने । देयं शांताय पूर्णाय दत्तस्यानंत्यमिच्छता ॥ २४ ॥

सर्वभूतांचा आत्मभूत । तया कृष्णाकारणें येथ । अग्रपूजा इत्थंभूत । देईजे निश्चित यजमानें ॥ २१० ॥ अन्यदर्शी तो भेदज्ञ । कृष्ण केवळ भेदशून्य । या कारणें अग्र्याहरण । दीजे संपूर्ण फळार्थ ॥ ११ ॥ अणूचाही हृदयंगम । महत्त्वें केवळ परब्रह्म । तयामाजी भेदागम । कोण पां अधम प्रतिपादी ॥ १२ ॥ अणूपासूनि ब्रह्मवरी । ज्याचें पूर्णत्व चराचरीं । तेथ आत्मपूजेची कुसरी । मानोनि बाहेरी कें उरिजे ॥ १३ ॥ म्हणाल श्रीकृष्ण या ठायीं । भेद संभव देखिजे कांहीं । अभेद एवात्मा तो कहीं । पूतनादि वधूं शकता ॥ १४ ॥ तरी पूर्णचैतन्य भेद न सरे । भेदसंकल्पें पूतना मरे । अभेदबोधें आत्माकारें । समरसी नुरे शत्रुत्वें ॥ १५ ॥ म्हणाल कृष्ण असहिष्णुता । क्रोधें अघादिदैत्यघाता । केलें ऐसें दूषण शांता । विपश्चितीं न मानावें ॥ १६ ॥ भेदसंकल्पें दैत्य मेले । कृष्णें आत्मत्वें ते स्वीकेले । भेदबोधें त्यांतें त्यजिलें । हें नाहीं कथिलें आम्हांसी ॥ १७ ॥ राज्याभिलाषें कंसवध । हा पूर्णासि नलगे बाध । कृष्ण पूर्णत्वें अगाध । सहसा नृपपद इच्छीना ॥ १८ ॥ सर्वात्मकत्वें जो सहिष्णु । अभेदबोधें अनिच्छ पूर्णु । त्या कृष्णाकारणें अग्र्यार्हणु । सदस्यगणीं समर्पिजे ॥ १९ ॥ क्रतुसुकृतें पावती अंत । कृष्णार्हणें ते अनंत । जाणोनि यजमानें इत्थंभूत । रुक्मिणीकान्त अर्चावा ॥ २२० ॥ श्रीकृष्णाचा वास्तवमहिमा । उपासकत्वें भक्तोत्तमा । विदित म्हणोनि सहदेवनामा । वदला धर्मा ते काळीं ॥ २१ ॥

इत्युक्त्वा सहदेवोऽभूत्तूष्णी कृष्णानुभाववित् । तच्छ्रुत्वा तुष्टुवुः सर्वे साधु साध्विति सत्तमाः ॥ २५ ॥

श्रीकृष्णाचा अनुभाव विदित । म्हणोनि सहदेव सुनिश्चित । इतुकें बोलोनियां मौनस्थ । होऊनि निवान्त राहिला ॥ २२ ॥ हें ऐकूनि भला भला । साधुवादें गौरविला । सदस्यसत्तमें पूजिला । सर्वीं स्तविला सुशब्दें ॥ २३ ॥ अग्रपूजेचा निर्धार । केला सहदेवें साचार । पूजनार्ह रुक्मिणीवर । जयजयकार प्रवर्तला ॥ २४ ॥ सदस्य म्हणती हा माद्रेय । पाहतां याचें धाकुटें वय । अगाध याचा कृतनिश्चय । धन्य माय प्रसवली या ॥ २५ ॥ धन्य धन्य भला भला । सदस्यीं जयजयकार केला । ऋत्विजीं मुनिवर्गीं पूजिला । साधुवादें शुभवचनें ॥ २६ ॥

श्रुत्वा द्विजेरितं राजा ज्ञात्वा हार्दं सभासदाम् । समर्हयद्धृषीकेशं प्रीतः प्रणयविह्वलः ॥ २६ ॥

तेथ राजा युधिष्ठिर । ऐकूनि विप्रवाणीचा गजर । जाणोनि सदस्यांचें अंतर । जाला निर्भर स्वानंदें ॥ २७ ॥ सर्व भूतळींचे भूपती । भीष्मप्रमुख जे महारथी । त्यांचें हृद्गत जाणोनि प्रीती । अग्रीं श्रीपति अर्चिलासे ॥ २८ ॥ रुग्णा प्रियतम पथ्य कथिलें । कीं तृषिता अमृत प्राप्त झालें । कीं जात्यंधासि नेत्र आले । तेंवि मानिलें सुख धर्मे ॥ २९ ॥ कृष्ण प्राणाचा प्रियतम । कृष्ण त्रिजगाचा हृदयंगम ।

कृष्ण केवळ पुरुषोत्तम । हें जाणे धर्म हृत्कमळीं ॥ २३० ॥ कृष्णें रक्षिलें जोहरीं । कृष्णें पांचाळी नोवरी । योजिली पाण्डवां स्वयंवरीं । कृष्ण कैवारी सर्वस्वीं ॥३१॥ कृष्णें पाठीची सुभद्रा बहिणी । अर्जुन प्रवर्तला तिचे हरणीं । तैं बोधूनि यादवश्रेणी । पाणिग्रहणीं समर्पिली ॥३२॥ जरासंधा समरांगणीं । भूतळीं जिंकूं न शके कोण्ही । कृष्ण घेऊनि द्विज अवगणीं । अघटित करणी करूनियां ॥ ३३ ॥ निर्दळिलें बार्हद्रथा । मुक्त केल्या नृपांच्या चळथा । येरव्हीं मागध जित असतां । कैंवि हा होतां राजसूय ॥ ३४ ॥ कृष्ण आमुचा प्रिय प्राण । कृष्ण आमुचें ध्येय ध्यान । कृष्णावेगळा त्रिजगीं आन । श्रेष्ठ नाहीं हें मी जाणें ॥ ३५ ॥ परंतु आपुले मखप्रसंगीं । आज्ञा न देतां सदस्यवर्गीं । अर्पितां अग्र्याहरण श्रीरंगीं । लागे आंगीं मूर्खत्व ॥ ३६ ॥ म्हणोनि प्रार्थिले सदसस्पति । तेथ सहदेव बाळमति । बोलिला तें सर्वांप्रति । मान्य झालें मम भाग्यें ॥ ३७ ॥ महर्षि ब्रह्मर्षि देवर्षी । भूभुजवरिष्ठजे राजर्षी । सर्वां मान्य हृषीकेशी । अग्रपूजेतें पूज्यतम ॥ ३८ ॥ ऐसी आज्ञा सदस्यगणीं । दिधली ते म्यां धरिली मूर्ध्नीं । परमानंदें चक्रपाणी । अग्रपूजनीं वैसविला ॥ ३९ ॥ ऐकूनि सभ्यांचें अनुमत । धर्मराजाही सप्रेमभरित । भावी लक्षूनि अभीष्ट कृत्य । पूजा भगवंत मान्य करी ॥२४०॥ रत्नपीठीं सदस्याग्रणीं । प्रतिष्ठूनि चक्रपाणी । द्विजगणांच्या मंत्रपठनीं । धर्म पूजनीं प्रवर्तला ॥ ४१ ॥ विधिप्रबोधी धौम्यवचनें । धर्म तैसेंचि तनुवाङ्मनें । आचरे जेंवि सूत्रचळनें । करी नर्तन सायखडें ॥ ४२ ॥ कनकपात्र मांडूनि तळीं । धर्म हरिचरणा प्रक्षाळी । कनककलशीं गंगाजळीं । धारा ओती सहदेव ॥४३॥ हृदयीं नयनीं निढळीं मौळीं । पाद स्पर्शोनि पुशिले चैलीं । पीठीं प्रतिष्ठूनि ते काळीं । साङ्ग आदरिली सपर्या ॥ ४४ ॥ चंद्रकान्ताच्या चौरंगीं । मृदुल चित्रासन झगमगी । हंसतूळिका तदुपयोगी । क्षीरोदचौघडी त्याउपरी ॥ ४५ ॥ गमे क्षीराब्धि तिये काळीं । आपणा सांडूनि कां वनमाळी । आला म्हणोनि आसनातळीं । वसनसंभ्रमें विराजला ॥ ४६ ॥ करूनि पादप्रक्षालन । आसनीं उपविष्ट श्रीभगवान । उभयभागीं भीमार्जुन । उपचारदानें ओळंगती ॥ ४७ ॥ व्यजनचामरें घेऊनि चौघे । द्रौपदीतनय उभयभागें । छत्र धरूनि तिष्ठे मागें । प्रतिविंध्यनामा तें काळीं ॥ ४८ ॥ रत्नजडित श्रीपादुका । धरूनि अभिमन्यु ठाकला निका । निर्जर निरखोनियां कौतुका । मानिती हरिखा हृत्कमळीं ॥ ४९ ॥ मंगळवाद्यें वाजती मधुरें । सात्वत कीर्तनें करिती गजरें । सुरवर गर्जती जयजयकारें । सुमनासारें वर्षती ॥ १५० ॥ नारदसनकादिक वैखानस । पूर्णानंदें पावले तोष । धर्में पूजितां हृषीकेश । त्रिजगीं उल्लास उथळला ॥ ५१ ॥ पादावनेजन पात्रीं धरिलें । म्हणाल मग तें काय केलें । व्यासपुत्रें निरोपिलें । तेंही कथिलें जातसे ॥ ५२ ॥

तत्पादावनिज्यापः शिरसा लोकपावनीः । सभार्यः सानुजामात्यः सकुटुंबोऽवहन्मुदा ॥ २७ ॥

कृष्णपादावनेजनआपा । निरसिती ब्रह्माण्डगर्भींच्या तापा । तीर्थें प्रक्षाळिती निजतापा । जनसंकल्पास्तवजनिता ॥ ५३ ॥ लोकपावनी मंदाकिनी । दुसरेन जन्मली श्रीकृष्णचरणीं । परमानंदें वाहिली मूर्ध्नीं । शंभुसमान युधिष्ठिरें ॥ ५४ ॥ भार्या बंधु अमात्य मंत्री । कुटुम्बेंसहित सह परिवारीं ।

धर्मराजें सर्वगात्रीं । आणि पवित्रीं स्वीकेली ॥ ५५ ॥ पादावनेजन वंदिलें ऐसें । त्यावरी अर्चन जालें कैसें । कुरुवर्या तें सावध परिसें । म्हणे संतोषें शुकवक्ता ॥ ५६ ॥

वासोभिः पीतकौशेयैर्भूषणैश्च महाधनैः । अर्हयित्वाश्रुपूर्णाक्षो नाशकत्समवेक्षितुम् ॥ २८ ॥

परिधानप्रावरणादि उपचारें । अर्पिलीं बहुविध पीताम्बरें । रत्नखचित भूषणें रुचिरें । परम-भास्वरें लेवविलीं ॥ ५७ ॥ मुकुट कुंडलें कंठाभरणें । केयूराङ्गदें करकंकणें । मुद्रिकांवरी जडिलीं रत्नें । भास्करकिरणें लाजविती ॥ ५८ ॥ आपाद वैजयंतीमाळा । कौस्तुभ श्रीवत्साङ्काजवळा । माणिक मुक्ताफळांच्या किळा । तेजागळिया देदीप्य ॥ ५९ ॥ जडित मेखळा कटितटीं । सुरत्नजडिता क्षुद्र-घटी । तोडरीं दितिजांचीं मुखवटी । वांकी नूपुरें रुणझुणती ॥ २६० ॥ ऐसीं अर्पूनि वस्त्राभरणें । ब्रह्म-सूत्र पृथगाचमनें । त्यावरी दिव्य विलेपनें । मलयजचंदनें कस्तूरिका ॥ ६१ ॥ केशरतिळक रेखिला पिंवळा । कुङ्कुमाक्षता माणिक्यकिळा । आंगीं चंदन चर्चिला धवळा । मंदारमाळा समर्पिल्या ॥६२॥ मुकुटीं तुरंबिले अवतंस । निर्विकल्प कल्पतरूचे घोष । सुगंधशलाका आग्नेयांश । योजूनि धरिती द्विभागीं ॥ ६३ ॥ कनकपात्रीं एकारती । फळपुष्पान्नें रत्नज्योती । कुरवंडूनि विसर्जिती । श्रीकृष्णमूर्ती-वरूनियां ॥ ६४ ॥ दिव्योपहार नैवेद्य सुरस । अमृतोपम फळविशेष । ताम्बूलद्रव्यें त्रयोदश । अर्पिलीं जाजीफळप्रमुखें ॥ ६५ ॥ कायावाचामनधनेंसीं । साङ्गोपाङ्ग दक्षिणेशीं । धर्म अर्पी बंधुवर्गेंसी । अनन्यप्रेमें हरिचरणीं ॥ ६६ ॥ बहळ उधळूनि परिमळरोळा । श्रवणीं पौष्पज मधु चर्चिला । दिव्य पोतास उजळिळा । कनकपर्यळीं नीरांजनें ॥ ६७ ॥ बहुविध आरतिया गायनें । द्विजवर करिती सूक्त-पठनें । चहूं वेदींचीं भिन्नभिन्नें । शाखापरत्वें बहुशाखीं ॥ ६८ ॥ अनेक वाद्यांचिया ध्वनी । गंधर्व गाती तानमानीं । सात्वत नाचती कीर्तनीं । नामस्मरणीं सर्व सभा ॥ ६९ ॥ पुष्पाञ्जळी समर्पून । सबंधुधर्में साष्टाङ्गनमन । करूनि सप्रेमें प्रदक्षिण । स्तवनीं मौन विसर्जिलें ॥ २७० ॥ ॐनमोजी श्रीजनार्दना । त्रिजगज्जनका जयवर्धना । जगत्पति जलजेक्षणा । जन्ममरणा जहि अजिता ॥ ७१ ॥ करुणासिन्धु कलुषान्तका । कपटकटाहविपाटका । कलिमलकरटिकुम्भभंजका । कंठीरवा कंसारे ॥ ७२ ॥ मंगलायतना मंगलनामा । मंगलजनका मंगलधामा । मंगलपूर्णा पूर्णकामा । पुरुषोत्तमा पुरातना ॥७३॥ ऐसी अनेकपरी स्तुति । करूनि पुढती केली प्रणति । सप्रेम लक्षूनि श्रीकृष्णमूर्ति । प्रेमाश्रुपातीं भू भिजवी ॥ ७४ ॥ चरणापासूनि मुकुटवरी । स्वर्चित पाहों न शके हरी । दृष्टिदोषाचिये परिहारीं । करी कुरवंडी भेदाची ॥ ७५ ॥ परमानंदीं निमग्न वृत्ति । फावली चिन्मात्रैकविश्रान्ति । ऐसिये दशेच्या सज्जनपंक्ति । प्रत्यय भोगिती तो तेव्हां ॥ ७६ ॥

इत्थं सभाजितं वीक्ष्य सर्वे प्रांजलयो जनाः । नमो जयेति नेमुस्तं निपेतुः पुष्पवृष्टयः ॥ २९ ॥

ऐसा धर्में अग्रपूजनीं । सप्रेम पूजिला चक्रपाणी । त्यातें सदस्यीं देखोनी । हृदयभुवनीं

संतुष्ट ॥ ७७ ॥ बद्धाञ्जलि समस्त जन । उभे ठाकले निरभिमान । करिती जयशब्दें गर्जन । नमो-नमस्ते म्हणोनियां ॥ ७८ ॥ पुष्पाञ्जलि कृष्णावरी । सर्व टाकिती जयजयगजरीं । मंत्रपुष्पें ऋषीश्वरीं । स्वस्ति म्हणोनी टाकिलीं ॥ ७९ ॥ विमानीं दाटल्या सुरवरथाटी । तिहीं केलिया पुष्पवृष्टी । परमानंदें ब्रह्माण्डमठीं । तिये घटिकेचा न समाये ॥ २८० ॥ कृष्णपूजनें लोकत्रय । ऐसें जालें आनंदमय । विरोधी भक्तांचा समुदाय । निसर्गभजनीं प्रवर्तला ॥ ८१ ॥ जयामाजी जितुकी शक्ति । तदनुसार ते करिती भक्ति । जिह्वा रसस्वादाची भोक्ती । रुचि औपस्थीं ते नेणे ॥८२॥ रसना करितां षड्रसपान । तेणें क्षोभे जेंवि अपान । सुरभिगंधा शंसी घ्राण । त्याचें भंजन करी स्वयें ॥ ८३ ॥ एकाचि देहीं विरोध करणा । तैसाचि सज्जना दुर्जना । परस्परें विरोध भजना । दुष्ट सज्जना न साहती ॥ ८४ ॥ यावरी तेंचि निरूपण । ऐका होऊनि सावधान । धर्में करितां हरिपूजन । क्षोभें दुर्जन उठावला ॥८५॥

इत्थं निशम्य दमघोषसुतः स्वपीठादुत्थाय कृष्णगुणवर्णनजातमन्युः ।
उत्क्षिप्य बाहुमिदमाह सदस्यमर्षी संश्रावयन्भगवते परुषाण्यभीतः ॥ ३० ॥

एका जळें मोगरे जाती । दिव्य सौरभ्यें मघमघिती । पुंगळवेली पाल्हाळती । तयाचि जलें दुर्गंधा ॥ ८६ ॥ नातरी माधुर्यें गोस्तनी । तैक्त्यें प्रसवे इंद्रवारुणी । आसुरीदैवीसंपत्ति गुणीं । तेंवि हे दोन्ही दुष्टेष्ट ॥ ८७ ॥ अग्रपूजनीं पूजितां हरि । साधु गर्जती हरियशोगजरीं । दमघोषतनय तें ऐकूनि श्रोत्रीं । क्षोभें अंतरीं प्रज्वळला ॥ ८८ ॥ इत्थं म्हणिजे पूर्वोक्तरीती । कृष्णयशाच्या ऐकूनि उक्ति । अत्यंत क्रोध उपजला चित्तीं । जो प्राणान्तीं अनावर ॥ ८९ ॥ सवेग तेणें क्रोधेंकरून । उठिला निजासनापासून । दक्षिण बाहु उभारून । सदस्यांलागून निखंदी ॥ २९० ॥ बोले सदस्यांकारणें । कृष्णातें करी ऐकवणें । मर्मस्पर्शें कठोर वचनें । निर्भयपणें मुमुर्षु ॥ ९१ ॥ श्रवणाप्रति लागती कटु । जियें ऐकतां उपजे विटु । ऐसीं वचनें घडघडाटु । बोले पापिष्ठ तें ऐका ॥ ९२ ॥

ईशो दुरत्ययः काल इति सत्यवती श्रुतिः । वृद्धानामपि यद्बुद्धिर्बालवाक्यैर्विभिद्यते ॥ ३१ ॥

रसरसनि आपुले ठायीं । विस्मय करूनि बोले कांहीं । समर्थ काळशक्ति कवणांही । उल्लंघिली नवजाय ॥ ९३ ॥ दुःखें नातिक्रमवे काळ । समर्थ ईश्वर हा केवळ । ऐसा श्रुतीचा चावळ । असत्य विफळ न म्हणावा ॥ ९४ ॥ काल दुरत्यय ऐसी श्रुती । काळसामर्थ्यें सत्यवती । प्रत्यक्ष प्रत्यय हा बाणला चित्तीं । जे भ्रंशली मती वृद्धांची ॥ ९५ ॥ बाळवाक्यांतें ऐकून । वृद्धही झाले बुद्धिहीन । बाळवचना अनुसरून । बुद्धिभेद त्यां जाला ॥ ९६ ॥ ऐकूनि बाळांचा अनुवाद । वृद्धां झाला बुद्धिभेद । ऐसी काळशक्ति अगाध । कोण कोविद लंघील ॥ ९७ ॥ ऐसा श्रीकृष्णपूजनें । शिशुपाळ रसरासित दुखवलेपणें । यावरी सदस्यांकारणें । बोले वचनें तें ऐका ॥ ९८ ॥

यूयं पात्रविदां श्रेष्ठा मा मन्ध्वं बालभाषितम् । सदसस्पतयः सर्वे कृष्णो यत्संमतोऽर्हणे ॥ ३२ ॥

सदसस्पति हो तुम्ही सुज्ञ । पात्र जाणत्यांमाजि मान्य । मान्य करणें बाळवचन । तुम्हांलागून अयुक्त तें ॥ ९९ ॥ धर्माहूनि सहदेव बाळ । अज्ञान अल्पमति केवळ । तद्वाक्य मानितां सदस्य सकळ । अन्यायशीळ होत्साते ॥ ३०० ॥ तरी मान्य न कीजे बाळभाषण । कीं तें केवळ अप्रमाण । बाळवाक्या वरूनि कृष्ण । अग्र्याहर्णीं योग्य म्हणां ॥ १ ॥ बाळभाषणा मानूनि तुम्हीं । अग्र्याहर्ण अर्पिलें अधर्मीं । कृष्ण केवळ गोरक्षनामी । केंवि सत्तमीं संमत हा ॥ २ ॥ सदस्यीं पहावें न्यूनपूर्ण । अध्वर सदस्य प्रेक्षकगण । तेथ न वदतां भीड धरून । लागे दूषण सदस्यां ॥ ३ ॥ पूज्य मानूनि अपूज्य पंक्ती । अपूज्य तेथें पूजिजती । मरण दुर्भिक्ष महाभीती । प्राप्त होती ते ठायीं ॥ ४ ॥ कृष्णाहूनि पूज्य कोण । ऐसा प्रजल्पे यजमान । तरी यदर्थी ऐका वचन । सभ्यां दूषण तें कथितों ॥ ५ ॥

तपोविद्याव्रतधरान्विज्ञानध्वस्तकल्मषान् । परमर्षीन्ब्रह्मनिष्ठांल्लोकपालैश्च पूजितान् ॥ ३३ ॥
सदसस्पतीनतिक्रम्य गोपालः कुलपांसनः । यथा काकः पुरोडाशं सपर्यां कथमर्हति ॥ ३४ ॥

तपस्वियांमाजी जे श्रेष्ठ । अथवा उपासक वरिष्ठ । महाव्रतधारी जे ज्येष्ठ । सभ्य यथेष्ट तुम्ही असतां ॥ ६ ॥ विद्याविनयसंपन्न थोर । कायवाङ्मानसजित व्रतधर । कीं ज्ञानविज्ञानभास्कर । सारासारप्रकाशक ॥ ७ ॥ अविद्यात्मकभ्रममलध्वस्त । विगतकल्मष जे भास्वत । व्रतस्थ निर्जित-जिह्वोपस्थ । जे कां प्रशस्त सद्बोधें ॥ ८ ॥ साङ्गोपाङ्गव्रताचरणीं । मानसमळाची केली धुणी । जे कां नितान्तनिर्मळपणीं । अपरतरणिसम तपती ॥ ९ ॥ ज्यांचे वाचेसी अनृतदोष । काळत्रयीं न करी स्पर्श । महासतीतें जारपुरुष । जेंवि अभिलाष करूं न शके ॥ ३१० ॥ ऐसे परमर्षिवरिष्ठ । आत्मवेत्ते ब्रह्मनिष्ठ । त्यांतें लंघूनि वृथापुष्ट । केंवि हा श्रेष्ठ पूज्यत्वीं ॥ ११ ॥ ब्रह्मनिष्ठ तपोधन । विद्याविनयता-संपूर्ण । ध्वस्तकल्मषविवस्वान । ज्ञानविज्ञानपारग जे ॥ १२ ॥ पुरंदरप्रमुखलोकपाळीं । जे पूजिले सुरमंडळीं । ऐसियांतें त्यागूनि सकळीं । केंवि हा गौळी योग्य केला ॥ १३ ॥ ऐसियां श्रेष्ठां सदस्यांतें । अतिक्रमूनियां हा गोरक्ष येथें । योग्य होय अग्रपूजेतें । कोण्या मतें मज सांगा ॥ १४ ॥ अंत्येष्टीच्या दशाहदिवशीं । प्रेतपिण्डार्हता वायसासी । त्यासी योग्यता पुरोडाशीं । घडे कैसी विचारा ॥ १५ ॥ जो कां केवळ कुळदूषण । त्या बोलिजे कुलपांसन । प्रत्यक्ष केलें मातुलहनन । कीं हें श्रवण तुम्हां नसे ॥ १६ ॥ गोपाल कुलपांसन यथा काके । पुरोडाशासि अनर्ह देख । अग्रपूजेसी यदुनायक । अयोग्य सम्यक जाणा हो ॥ १७ ॥ ऐसी शिशुपाळाची वाणी । निन्दा करितां सभास्थानीं । वाग्देवता सत्य म्हणोनी । वास्तववोधें प्रतिपादी ॥ १८ ॥ स्वर्ग श्रुति आणि भूमी । वाखाणिती गो या नामीं । पाळक म्हणिजे यांचा स्वामी । हृषीकेश हा गोपाळ ॥ १९ ॥ कुत्सितार्थाचें लापन । करिती तयां कुलपाभिधान । ऐसे कुलप म्हणाल कोण । वेदबाह्यजन पाखंडी ॥ ३२० ॥ तया वेदबाह्यांचें हनन । करित्यां बोलिजे कुलपांसन । तो हा यथार्थ श्रीभगवान । मुख्य व्याख्यान वास्तव हें ॥ २१ ॥ यथापदीं दीर्घता वसे । अकारलोप झाला असे । व्याकरणसूत्रें पदनिर्देशें । अकाक ऐसा प्रतिपाद्य ॥ २२ ॥ अकाक ऐसीं अक्षरें तीन । यांचा समास कीजे श्रवण । क म्हणिजे सुख संपूर्ण ।

असुखाभिधान अक ऐसें ॥ २३ ॥ उभय मिळोनि म्हणिजे काक । नशिवे काक ज्यातें तो अकाक । एवं सुखदुःखातीत सम्यक । सर्वात्मक श्रीकृष्ण ॥ २४ ॥ अकाक पुरोडाशा योग्य नव्हे । कीं तो आप्तकाम स्वभावें । पुरोडाश हविती देवतानामें । कृष्ण ते अवघे एकात्मा ॥ २५ ॥ अग्नि देवता मंत्र हवी । इत्यादि यज्ञक्रिया आघवी । कृष्ण साकल्यें आहेच पूर्वी । पुरोडाश केंवि तदर्ह ॥ २६ ॥ देवतापरिच्छिन्न स्वर्गस्थ । पुरोडाश विध्युक्त द्रव्य शस्त । देवतार्ह तो विधिप्रणीत । केंवि अनंत त्या योग्य ॥ २७ ॥ अखिलात्मकत्वें संचला । पुरोडाश मात्र कें योग्य त्याला । अकाका योग्य नव्हे हें वदला । अर्थ सरळ वास्तव हा ॥ २८ ॥ अकाका योग्य पुरोडाश । तद्वत अग्रपूजा कृष्णास । सर्वस्व अर्पणें योग्य ज्यास । सपर्यामात्र अनर्ह त्या ॥ २९ ॥ मुख्य ब्रह्मर्षि सदस्यगणीं । त्यांसि योग्यता अग्र्याहणीं । अखिलात्मकत्व वर्ते कृष्णीं । आत्मार्पण त्या अर्ह ॥ ३३० ॥ आणिक निंदेचीं उत्तरें । चैद्य बोले तें ऐका श्रोत्रें । परीक्षितीतें व्यासकुमरें । कथिलीं तैशीं निरोपितों ॥ ३१ ॥

वर्णाश्रमकुलापेतः सर्वधर्मबहिष्कृतः । स्वैरवर्ती गुणैर्हीनः सपर्यां कथमर्हति ॥ ३५ ॥

चैद्य सदस्यां विपश्चितां । म्हणे या वर्णाश्रमकुळादिरहिता । सर्वधर्मबहिष्कृता । पूजार्हता केंवि घडे ॥ ३२ ॥ स्वैरवृत्ति गुणविहीन । यासि अनर्ह अग्र्याहण । तथापि पूजिलें हें दूषण । सभ्यां आंगीं संक्रमलें ॥ ३३ ॥ इत्यादि निन्देचीं जीं वचनें । वाग्देवता वास्तववयुनें । वाखाणी तें ऐका श्रवणें । सावधमनें क्षण एक ॥ ३४ ॥ वर्ण म्हणिजे ब्राह्मणादिक । आश्रम ब्रह्मचर्यादि चौक । कुळ म्हणिजे मूळपुरुष । गोत्रप्रवर्तक जो ज्यातें ॥ ३५ ॥ यांपासूनि वेगळा कृष्ण । बृहत्त्वें ब्रह्म जो परिपूर्ण । अरूप अगोत्र अनभिधान । करिती व्याख्यान श्रुति ऐसें ॥ ३६ ॥ वर्णाश्रमकुळादि सकळ । हें देहासि लागलें केवळ । देहातीत आत्मा अमळ । न शिवती मळ त्याप्रति हे ॥ ३७ ॥ कृष्ण अयोनिसंभव मुळीं । तो लावावा कवणे कुळीं । वर्णाश्रमातीत वनमाळी । हे वाचाळी उपनिषदीं ॥ ३८ ॥ ज्यासि नाहीं वर्ण गोत्र । सर्व धर्मीं त्या अनधिकार । सर्वधर्मांचें अभ्यंतर । वसवूनि श्रीधर बहिष्कृत ॥३९॥ नेत्रा आड आलिया अभ्र । म्हणती आच्छादिला भास्कर । तेंवि सर्व धर्म ज्या बाहीर । करिती बहिष्कार कर्मठ त्या ॥१४०॥ सर्व धर्मांचा अनधिकारी । तो परमेश्वर स्वैराचारी । अतएव निर्गुण निर्विकारी । नोहे विकारी त्रिगुणात्मा ॥ ४१ ॥ एवं परमेश्वर श्रीहरी । नोहे जीववत् कर्माधिकारी । जीवायोग्य सपर्या खरी । नोहे निर्धारीं हरियोग्य ॥ ४२ ॥ पुढती निन्दोक्ति वदे चैद्य । त्या वाखाणी भारती विशद । क्षण एक बैसोनियां सावध । विद्वद्वृंद तें ऐका ॥ ४३ ॥

ययातिनैषां हि कुलं शप्तं सद्भिर्बहिष्कृतम् । वृथापानरतं शश्वत्सपर्यां कथमर्हति ॥ ३६ ॥

ययातीनें जयांचें कुळ । निश्चयें शापूनि केलें समळ । सज्जनें बहिष्कारिलें केवळ । आचारबरळ म्हणोनियां ॥ ४४ ॥ सर्वदा करिती वृथापान । ऐसे केवळ आचारहीन । ऐसियां योग्य अग्रपूजन ।

बोला वचन सदस्य हो ॥ ४५ ॥ ऐसा निन्दी चैद्यराव । गिरा प्रतिपादी वास्तव । तोही अर्थ कोविद सर्व । ऐका अपूर्व लापनिका ॥ ४६ ॥ ययातीनें यांचें कुळ । जही शापूनि केलें ममळ । तरी सज्जनीं अत्यंत अमळ । जाणोनि मौळीं वंदिलें ॥ ४७ ॥ अमळ कैसें म्हणाल जरी । तरी आम्हां भूपाळांचिये परी । नोहे सर्वथा दुराचारी । सर्वदा न करी वृथापान ॥ ४८ ॥ नियताचारें विधिपालन । करूनि स्वधर्मसंस्थापन । इतरां सन्मार्गप्रदर्शन । अनुशासन हें ज्याचें ॥ ४९ ॥ यदुकुळाचा महिमा ऐसा । न भंगे ययातिशापामरिसा । तेथें हा श्रीकृष्ण परेश कैसा । तुळिजे सहसा नृपतुलने ॥ ५० ॥ तस्मात् सपर्यामात्र यातें । योग्य नव्हे हें जाणा निरुतें । याचें स्वरूप त्रिपुटीपरतें । पूज्यपूजकपूजनादि ॥५१॥ यावीण भिन्न नमेचि कांहीं । तरी पूजक पूजन करील कायी । चैद्य वदला यथार्थ पाहीं । मूर्खप्रवाहीं निंदोक्ति ॥ ५२ ॥ पुढती वदे दामघोषी । कुटिलोक्ति ज्या निन्दा दोषी । त्या वाग्देवी यथार्थभाषी । अतिनिर्दोषी वाखाणी ॥ ५३ ॥

ब्रह्मर्षिसेवितान्देशान्हित्वैतेऽब्रह्मवर्चसम् । समुद्रं दुर्गमाश्रित्य बाधंते दस्यवः प्रजाः ॥ ३७ ॥

पूर्वश्लोकीं आचारबरळ । ऐसें बोलिला जें शिशुपाळ । तेंचि ये श्लोकीं प्राज्जळ । पुन्हां कुटिळ प्रतिपादी ॥ ५४ ॥ यादव आचारबरळ कैसे । प्रजापीडक दस्यु जैसे । दुर्गमस्थळाच्या आश्रयवशें । प्रजा पीडिती सर्वत्र ॥ ५५ ॥ वेदोदित जो आचारमार्ग । जिये देशीं चाले साङ्ग । तो देश सेविती अभंग । साङ्गोपाङ्ग ब्रह्मर्षि ॥ ५६ ॥ वेदोदित क्रियाचरणें । ब्रह्मवर्चस त्यातें म्हणणें । इहीं तें टाकूनि प्राणरक्षणे । समुद्रदुर्ग आश्रयिलें ॥ ५७ ॥ ब्रह्मर्षि सेविती जो देश । यादवीं टाकूनि तो निःशेष । समुद्रदुर्गीं करूनि वास । दस्यु प्रजांस पीडिती हे ॥ ५८ ॥ ऐसिया अग्रपूजा यजमानें । दिधली कोण्या योग्यतागुणें । योग्यायोग्य सदस्यीं पाहणें । कीं प्रशंसा करणें हें उचित ॥ ५९ ॥ इत्यादि-निन्देचिया वचनीं । यदुकुळ निन्दी चैद्याग्रणी । वास्तवबोधें गीर्वाणवाणी । पदसंदर्भें प्रतिपादी ॥३६०॥ तीच श्लोकान्वययोजना । वास्तवबोधें प्रतिपादना । निंदेमाजी प्रकटी स्तवना । पदलापना ते ऐका ॥ ६१ ॥ वेदोक्ताविहिताचरणनिष्ठ । ब्रह्मवर्चस्वी राजे श्रेष्ठ । प्रजापीडक दस्यु दुष्ट । त्या दुष्टां कष्ट ते देती ॥ ६२ ॥ तया राजयांचिया भेणें । दुष्टीं करूनि पलायनें । कीकटादि अब्रह्मण्यें । निन्द्य भुवनें वसविती ते ॥ ६३ ॥ जो देश न सेविती ब्रह्मर्षी । अनर्ह वेदोदितकर्मासी । दुष्टीं राहूनि ऐसिये देशीं । पीडिजे प्रजांसी दुष्टत्वें ॥ ६४ ॥ तरी हा यादवां नाहीं दोष । सेविती ब्रह्मर्षि जे देश । तेथें राहूनि सावकाश । अब्रह्मवर्चस सांडविती ॥ ६५ ॥ पूर्वी विष्णूनें दैत्यहनन । करूनिं केलें धर्मस्थापन । तैं जे थ क्षाळिलें सुदर्शन । तें अतिपावन चक्रतीर्थ ॥ ६६ ॥ गोमतीरत्नाकरसंगम । जेथ प्रकटूनि त्रिविक्रम । कुश मर्दूनिं केलें धाम । मोक्षद परम त्रिजगातें ॥ ६७ ॥ परम पावन ते कुशस्थळी । महर्षी देवर्षी ब्रह्मर्षी सकळीं । जेथ वसिजेत सर्वकाळीं । ते यदुकुळीं आश्रयिली ॥ ६८ ॥ ब्रह्मज्ञानें मोक्ष घडे । अथवा काशींत देह पडे । गोमतीस्नानमात्रें निवाडें । प्राणी रोकडे जेथ वारिती ॥ ६९ ॥ तस्मात ब्रह्मर्षिसेवित देश । आश्रयूनियां यादवेश । ब्रह्मवर्चस सावकाश । प्रतिपादिती आचरणें ॥३७०॥

आणि दस्यु जे प्रजावेषी । चोर उत्पथ महादोषी । त्यांतें दंडिती प्रतापेंसी । हे यदुवंशीं वर्तणुक ॥७१॥ अब्रह्मवर्चस सांडविती । तेही ऐका कोणे रीती । समुद्रदुर्ग दुष्प्रवृत्ती । साधूंप्रति भ्रामक जे ॥ ७२ ॥ अब्रह्मवर्चस जे पाखंड । वेदविरुद्धाचरणबंड । मुद्रालिंगधारणें दृढ । अवघें थोताण्ड वेदबाह्य ॥ ७३ ॥ मुद्रासहित लिंगधारणें । समुद्र ऐसें त्यातें म्हणणें । दुर्ग म्हणिजे कवण्या गुणें । तेंही श्रवणें अवधारा ॥ ७४ ॥ पाखंड आणि झळफाळित । अधर्म परंतु धर्मवत । भाविकां गमे भक्तिपंथ । भांबावत जन तेणें ॥ ७५ ॥ पाखंडमार्ग न गमें कोणा । धर्मपथाचि भासे जनां । निगूढत्वें दुर्गाभिधाना । यया वचना पात्रता ॥ ७६ ॥ मुद्रासहित लिङ्गधारणें । अतर्क्य अधर्म दुर्गमपणें । ऐसीं समुद्रदुर्गाचरणें । यादवशासनें सांडविती ॥ ७७ ॥ अब्रह्मवर्चस जें पाखण्ड । अतर्क्य अधर्मकारक बंड । तें मत खंडूनि करिती दंड । ऐसे प्रचंड यदुवीर हे ॥ ७८ ॥ घेऊनि प्रजांची अवगणी । देशोदेशीं दस्युगणी । त्यांतें बाधती हे हुडकुनी । स्वधर्माचरणीं ते प्रवर्तविती ॥ ७९ ॥ लावितां न लागती धर्मपथा । तया दंडूनि देती व्यथा । ऐसी यदुवर्यांची कथा । कोण दुर्वक्ता निन्द्य म्हणे ॥ ३८० ॥ यास्तव दुजा यादवांहून । कोण धार्मिक ब्रह्मिष्ठ मान्य । ऐसें निन्देमाजी स्तवन । वदली संपूर्ण वाग्देवी ॥ ८१ ॥

एवमादीन्यभद्राणि बभाषे नष्टमंगलः । नोवाच किंचिद्भगवान्यथा सिंहः शिवारुतम् ॥ ३८ ॥

इत्यादिकां अभद्रा वचनीं । बोलता झाला चैद्य ते क्षणीं । कीं तो अनष्टमंगळ म्हणोनी । सायुज्यवरणीं केळवला ॥ ८२ ॥ सदेह चैद्यासनाचा भंग । पावावयासि झाला योग्य । यास्तव नष्टमंगळप्रसंग । कोविद चांग वाखाणिती ॥ ८३ ॥ ऐशीं शतशःनिन्द्यवचनें । ऐकूनियां जनार्दनें । किंचितही न बोलतां मौनें । परावरज्ञें उपेक्षिलीं ॥ ८४ ॥ शिवाशब्दें बोलिजे भालु । तिणें केला बहु कोल्हाळु । तो ऐकतां राहे निश्चळु । न वदे अळुमाळु सिंह जैसा ॥ ८५ ॥ शब्द निघाले अपानद्वारें । पंडित न म्हणती त्यां अक्षरें । दुर्गंधि मात्र क्षण एक पसरे । वायुप्रसारें विध्वंसे ॥ ८६ ॥ तैसें चैद्याचें भाषण । कृष्णें साहिलें धरूनि मौन । परंतु भगवन्निन्दाश्रवण । होतां सज्जन दुखवले ॥ ८७ ॥

भगवन्निंदनं श्रुत्वा दुःसहं तत्सभासदः । कर्णौ पिधाय निर्जग्मुः शपंतश्चेदिपं रुषा ॥ ३९ ॥

ऐसी भगवंताची निन्दा । ऐकूनि समस्तां सभासदां । दुःखें साहूं न शकवे कदा । परम विषादा वरपडले ॥ ८८ ॥ श्रवणीं घालूनियां बोटें । तेथोनि निघाले झडझडाटें । सक्रोध चैद्या शापिती वोठें । ओखटें दुष्टें अनुष्ठिलें ॥ ८९ ॥ मृत्यु समीप आला यासी । म्हणोनि प्रवर्तला निन्देशी । दूषण ठेवूनि सदस्यांसी । वृथा प्राणांसी मुकेल ॥ ३९० ॥ जैसा दीप निवान्तमंदिरीं । सरतां आयुष्य स्नेहसामग्री । सूत्र जाळूनि उभारे भारी । क्षणामाझारी विझावया ॥ ९१ ॥ तेंवि चैद्याची भरली घडी । मुमूर्षु सन्निपातें बडबडी । अमर्यादेची अरुचि तोंडीं । विषादें खोडी कर पद पैं ॥ ९२ ॥

ऐसें बोलूनियां सज्जन । हस्तें झांकूनियां कर्ण । तेथूनि निघाले झडझडून । काय म्हणोन तें ऐका ॥९३॥ हरीची अथवा हरिभक्तांची । श्रवणीं निन्दा ऐकतां साची । तेथूनि न निघे जो तयांची । बुद्धि तत्पापीं संक्रमली ॥ ९४ ॥

निदां भगवतः शृण्वंस्तत्परस्य जनस्य वा । ततो नापैति यः सोऽपि यात्यधः सुकृताच्च्युतः ॥ ४० ॥

निन्दकातुल्य तोही झाला । सद्य सुकृतापासूनि च्यवला । अंधतमातें पावला । यालागीं भला तेथ न वसे ॥ ९५ ॥ ऐसा निश्चय श्रुतिपुराणीं । तो प्रकट वदोनि तेथ सज्जनीं । बोटें घालूनि उभयश्रवणीं । गेले उठोनि तत्काळ ॥ ९६ ॥ तया समयीं पृथाकुमर । भीमार्जुन युधिष्ठिर । नकुळ सहदेव राजे अपर । क्षोभले समग्र तें ऐका ॥ ९७ ॥

ततः पांडुसुताः क्रुद्धा मत्स्यसृंजयकैकयाः । उदायुधाः समुत्तस्थुः शिशुपालजिघांसवः ॥ ४१ ॥

महाभारतीं सविस्तर । चैद्यनिन्देचा प्रकार । येथ श्रीशुक संक्षेपमात्र । वदला अवसर जाणोनी ॥ ९८ ॥ सदस्यांप्रति एसिया परी । वदली चैद्याची वैखरी । त्यावरी धर्म निन्द्योत्तरीं । निर्भर्त्सिला बहुसाळ ॥ ९९ ॥ धर्में क्षमा करूनि तितुके । चैद्या सान्तवितां निजमुखें । तैलें शिंपिलिया पावकें । क्षोभिजे तेंवि तो प्रज्वळिला ॥ ४०० ॥ तेथ भीष्में वारिलें धर्मा । कायसें सान्त्वन पामरा अधमा । पंचत्वाची भरली सीमा । सन्निपातभ्रमास्तव बरळे ॥ १ ॥ हें ऐकोनि भीष्माप्रति । निन्दता झाला चैद्य दुर्मति । राजे क्षोभवूनि स्वपक्षपाती । दुष्ट निघातीं उठावला ॥ २ ॥ सदस्यांचें निर्भर्त्सन । श्रीकृष्णाचें निन्दाकथन । युधिष्ठिराचें प्रहेलन । भीष्मगर्हण ऐकोनी ॥ ३ ॥ भीमें पडताळितां गदा । वधावया निन्दिका चैद्या । तैं त्या भीष्में वृत्तान्त समुदा । चैद्यवधाचा प्रकटविला ॥ ४ ॥ साक्षात वसुदेवाची भगिनी । दमघोषाची मुख्य राणी । प्रसवली शिशुपाळालागुनी । तैं हा दुश्चिह्नीं जन्मला ॥ ५ ॥ चतुर्भुज ललाटेक्षण । भुङ्के रासभस्वनें करून । सर्वीं मानूनियां दुश्चिह्न । म्हणती कल्याणकर नोहे ॥ ६ ॥ याचिया त्यागाप्रति उदित । जाले असतां अकस्मात । गगनवाणी वदली तेथ । गूढ वृत्तान्त प्रकटार्थें ॥ ७ ॥ त्यागूं नका या आत्मजा । हा होईल प्रतापी राजा । ज्याच्या दर्शनें भाळाक्ष भुजा । लोपती तो या मारील ॥ ८ ॥ ऐसी ऐकूनि गगनवाणी । तोपले मंत्री राव राणी । भूपाळ पहावया लागूनी । येतां ओपिती सुत त्यांपें ॥ ९ ॥ भूप भूतळींचे समस्त । स्पर्शितां नेत्र भुजा गुप्त । नव्हती त्यातें द्वारकानाथ । शिवतां लुप्त कर नयन ॥ ४१० ॥ तये काळीं याची जननी । कृष्णा प्रार्थी करुणावचनीं । मत्पुत्राचे अपराध सोसुनी । याचे हननीं न प्रवर्तें ॥ ११ ॥ ऐकोनि बोले श्रीभगवंत । कायसी अपराधाची मात । क्षमा करीन शतपर्यंत । चिन्तारहित तूं राहें ॥ १२ ॥ ऐसें ऐकूनि अच्युतवचन । तिनें मानिलें समाधान । ते मर्यादा जाली पूर्ण । पावेल हनन हरिहस्तें ॥ १३ ॥ ऐकूनि भीष्माची वैखरी । पुढती शिशुपाळ निन्दी हरी । म्हणे रुक्मिणी स्वयंवरीं । मज नेमिली तां हरिली ॥ १४ ॥ जननीजनकें

बंधुवर्गीं । मातें अर्पिली जे शुभाङ्गी । मनें कवळिली तत्प्रसंगीं । मग ते वेगीं तां नेली ॥ १५ ॥ ऐशीं शतशः निन्द्य वचनें । स्त्रीनिन्देचे न येती तुलने । निन्दा ऐकोनि पाण्डव मनें । क्षोभलेपणें उठावले ॥ १६ ॥ सभापर्वींची संक्षेपसूचना । सूचिली ते श्रोतृजना । श्रवण करितां शंका मना । माजि कोण्हा न वसावी ॥ १७ ॥ कृष्णनिन्दा ऐकूनि कानीं । पाण्डवां क्रोध न धरे मनीं । भीमार्जुन माद्रेय दोन्ही । आयुधें परजूनि उठावले ॥ १८ ॥ पाण्डवांचा क्रूरावेश । देखोनि राजयां न धरवे रोष । कृष्णपक्षीं जे नृप अशेष । खड्ग विकोश तिहीं केले ॥ १९ ॥ मत्स्यराजे विराटप्रमुख । कैकय संतर्दनादिक । सृंजयादि नृप अनेक । चैद्य सन्मुख उठावले ॥४२०॥ कृष्णनिन्देचिया श्रवणीं । हेंचि प्रायश्चित्त या क्षणीं । जे निन्दकाची प्राणहानी । समरांगणीं करावी ॥ २१ ॥ म्हणोनि उठिले उदायुध । वधावया निन्दक चैद्य । तंव तो शिशुपाळ दुर्मद । झाला सनद्ध समरंगा ॥ २२ ॥

ततश्चैद्यस्त्वसंभ्रांतो जगृहे खड्गचर्मणी । भर्त्सयन्कृष्णपक्षीयान्राज्ञः सदसि भारत ॥ ४२ ॥

श्रीकृष्णाचे पक्षीय नृपति । त्यांची देखोनि आवेशवृत्ति । त्यांवरी चैद्य प्रतापमूर्ति । उठिला निगुती साटोपें ॥ २३ ॥ सदस्यसभेमाजि तयां । मुखें निर्भर्त्सी कृष्णपक्षीयां । खड्गखेटक घेऊनियां । आसन मांडूनि ठाकला ॥ २४ ॥ चैद्या पाण्डवां समरांगणीं । निकरें व्हावी खणाखणी । तंव श्रीकृष्ण अंतःकरणीं । पाहे विवरूनि सर्वज्ञ ॥ २५ ॥ जय विजय हे द्वारपाळ । मद्वरें विरोधभजनशीळ । हिरण्याक्ष हिरण्यकशिपु प्रबळ । दैत्य केवळ पूर्वभवीं ॥ २६ ॥ द्वितीयजन्मीं हे निर्घृण । राक्षस रावण कुंभकर्ण । तृतीय जन्मीं नृप होऊन । जन्मले शिशुपाळ वक्त्रदंत ॥ २७ ॥ मद्वरें मत्तुल्य हे मम द्वास्थ । तो हा चैद्य निजमोक्षार्थ । क्षोभें उठला येथ । मारील समस्त नृपचक्रा ॥ २८ ॥ ऐसें विवरूनि नारायण । चैद्यनृपवरां न घडे रण । तंव उठिला त्वरा करून । निवारूनियां नृपचक्रा ॥ २९ ॥

तावदुत्थाय भगवान्स्वान्निवार्य स्वयं रुषा । शिरः क्षुरांतचक्रेण जहारापततो रिपोः ॥ ४३ ॥

स्वकीय वारूनि प्रतापतेजें । स्वस्थ केले स्वपक्षीय राजे । क्रोधें करूनि अधोक्षजें । चैद्य ओजें आमंत्रिला ॥ ४३० ॥ अरे रे चैद्या दुष्टा दुर्मती । तोंडें अचागळी बोलसी किती । मम पूजेची तुजला खंती । तरी घेईं निगुतीं अग्रपूजा ॥ ३१ ॥ शिशुपाळ खड्गखेटकधर । उठावला कृष्णा समोर । कृष्णें सुदर्शन क्षुरधार । प्रेरूनि क्षिर छेदियलें ॥ ३२ ॥ रिपु पडतां आपणावरी । त्याचा मस्तक चक्र-प्रहारीं । हरिता झाला श्रीमुरारी । भूतीं समग्रीं विलोकितां ॥ ३३ ॥

शब्दः कोलाहलोऽप्यासीच्छिशुपाले हते महान् । तस्यानुयायिनो भूपा दुद्रुवुर्जीवितैषिणः ॥ ४४ ॥

शिर उडालें गगनोदरीं । कबंध पडलें धरणीवरी । हाहाकार ते अवसरीं । सभेमाझारी प्रवर्तला ॥ ३४ ॥ महाराजा चैद्य पडतां । कोल्हाळशब्द सभेआतौता । दुष्ट नृपगण झाला पळता ।

निजजीविता रक्षावया ॥ ३५ ॥ शिशुपाळाचे पक्षपाती । जितुके राजे खळ दुर्मती । ते पळाले पवन-गती । समरक्षिती सांडूनी ॥ ३६ ॥ जीवितें वांचवावयाचे चाडे । पळती खालती करूनि मुण्डें । न पाहती मागिलेकडे । मरण रोकडें चुकवावया ॥ ३७ ॥ न साम्भाळिती कोणा कोण्ही । चैद्यदेह पडला धरणी । झाली नृपांची भंगाणी । यावरी करणी ते ऐका ॥ ३८ ॥

चैद्यदेहोत्थितं ज्योतिर्वासुदेवमुपाविशत् । पश्यतां सर्वभूतानामुल्केव भुवि खाच्च्युता ॥ ४५ ॥

चैद्यदेहींचें चैतन्यतेज । ज्योतिर्मय जें तेजःपुंज । गगनीं संचरूनियां सहज । अधोक्षजीं तें प्रवर्तलें ॥ ३९ ॥ सर्व भूतें पाहत असतां । उल्कापात होय अवचिता । तैसें प्रवेशलें अच्युता । माजि तरुता तत्तेज ॥ ३४० ॥ गगनींहूनि तुटे तारा । त्या तेजातें प्राशी धरा । चैद्यज्योति तेंवि श्रीधरा-माजि कुरुवरा प्रवेशली ॥ ४१ ॥ अंतीं मति तैसीच गति । धन्य म्हणती विरोधभक्ती । सभ्य स्वमुखें प्रशंसिती । तें तूं कुरुपति अवधारीं ॥ ४२ ॥

जन्मत्रयानुगुणितवैरसंरब्धया धिया । ध्यायंस्तन्मयतां यातो भावो हि भयकारणम् ॥ ४६ ॥

म्हणाल निन्दकाची चैतन्यज्योति । कैसी प्रवेशली भगवंतीं । तरी जन्मत्रयाची विरोधभक्ती कारण तद्गतीतें जाणा ॥ ४३ ॥ जन्मत्रयीं वैरानुबंध । तेणें ध्याननिष्ठा साधली शुद्ध । चरमदेहीं गमला चैद्य । ध्यानें स्वरूप लाधला ॥ ४४ ॥ वैरें ध्याननिष्ठा चित्ता । अवस्थात्रयीं विसर न पडतां । दृढ बाणली तन्मयता । तेणें स्वरूपता पावला ॥ ४५ ॥ स्वरूपता मुक्ति पावला विशद । यथापूर्व जाला पार्षद । तस्मात भावना जन्मप्रद । निगमानुवाद हा सत्य ॥ ४६ ॥ करणद्वारा विषयाध्यास । संस्कार-जनितकर्महव्यास । सत्य मानूनि विश्वाभास । कलेवरास जैं टाकी ॥ ४७ ॥ तैं संकल्पान्तःपाती । कर्मसंस्कारबीजें होती । तदनुसार परिणमे वृत्ती । जन्म पावती तद्रूपें ॥ ४८ ॥ वैरानुबंधें तदाकार । अवस्थात्रयीं निरंतर । ध्यानीं वृत्ति झाली स्थिर । पडतां शरीर तद्योगें ॥ ४९ ॥ वैरें भगवन्मूर्तिध्यान । वस्तुसामर्थ्यें अघभंजन । नितान्त निर्मळ शुद्ध चैतन्य । गेलें मिळोन भगवंतीं ॥ ५० ॥ करणद्वारा विषयाभिलाषें । ध्यानसंकल्प दृश्याभासें । देह पडतां भवभ्रमपिसें । जन्मे आपैसें न फिटतां ॥ ५१ ॥ तैसें नोहे भगवद्ध्यान । ध्यानें नितान्त निर्मळ मन । विशुद्ध होय संकल्पशून्य । समरसोन हरि होय ॥ ५२ ॥ यया नाम वैधदीक्षा । वेधें साधिती लयलक्षा । आत्माकार होतां दक्षा । पावणें मोक्षा या योगें ॥ ५३ ॥ कीटकी केवळ अज्ञान जड । भयें भृंगीचें ध्यान दृढ । लागतां तद्रूप होय उघड । वेधें अवघड घडे ऐसें ॥ ५४ ॥ तस्मात भावचि कारण भवा । हा गुह्यार्थ साधकां सर्वां । दृढनिश्चयें असो ठावा । दयार्णवा कळवळा हा ॥ ५५ ॥ विषयीं मानसा न कीजे वेध । गुरुमुखें आपुला करूनि शोध । पूर्णत्वाचा अपरोक्षबोध । प्रत्यगात्मत्वा वेधावें ॥ ५६ ॥ असो साधका शिकवण । करावया माझा अधिकार कोण । जरी मी पायींची वहाण । म्हणा लोचना सुखदायी ॥५७॥ असो शिशुपाळाची

कथा । त्यावरी युधिष्ठिरें तत्त्वता । पूजिलें ऋत्विजां समस्तां । तें कुरुनाथा अवधारीं ॥ ५८ ॥

ऋत्विग्भ्यः ससदस्येभ्यो दक्षिणां विपुलामदात् । सर्वान्संपूज्य विधिवच्चक्रेऽवभृथमेकराट् ॥ ४७ ॥

विपुळ दक्षिणा ऋत्विजांप्रती । धर्में पूजूनि अर्पिली निगुती । सदस्य पूजिले येथोचितीं । कुळ-शीळादि लक्षूनी ॥ ५९ ॥ याचक इच्छारहित केले । ज्येष्ठ श्रेष्ठ सम्मानिले । सम्राट्पदीं अभिषेकिले । तिहीं समस्तीं धर्मातें ॥ ६० ॥ धर्मराजाचे आज्ञेवरून । चैद्या उत्तरक्रियाचरण । तत्पुत्रातें भद्रासन । सर्वभूभुजीं दीधलें ॥ ६१ ॥ राजसूय साङ्ग जाहला । अवभृथस्नानोत्सव संपला । सिंहावलोकनें पुन्हा कथिला । जाईल पुढिले अध्यायीं ॥ ६२ ॥ यज्ञ संपूर्ण झालियावरी । इंद्रप्रस्थीं राहिला हरी । कित्येक मास सप्रेमभरीं । सुहृदादरीं तें ऐका ॥ ६३ ॥

साधयित्वा क्रतुं राज्ञः कृष्णो योगेश्वरेश्वरः । उवास कतिचिन्मासान्सुहृद्भिरभियाचितः ॥ ४८ ॥

योगेश्वरांचा ईश्वर । कृष्ण केवळ परमेश्वर । तेणें रायाचा क्रतुवर । संपादूनियां निर्विघ्न ॥ ६४ ॥ परिवारेंसीं द्वारके जाया । उदित आज्ञा मागावया । सुहृद्वर्गीं प्रार्थूनियां । कित्येक मास राहविला ॥ ६५ ॥ समस्त पाण्डवांचिये भक्ती । सुभद्राद्रौपदीपृथेचे प्रीती । सभार्य ससैन्य श्रीपती । इंद्रप्रस्थीं स्थिरावला ॥ ६६ ॥ तेथ क्रमिले कित्तेक मास । पुढती जावया द्वारकेस । धर्मा प्रार्थी हृषीकेश । तें नृपास शुक सांगे ॥ ६७ ॥

ततोऽनुज्ञाप्य राजानमनिच्छंतमपीश्वरः । ययौ सभार्यः सामात्यः स्वपुरं देवकीसुतः ॥ ४९ ॥

कित्तेक मास क्रमिल्यावरी । धर्मरायातें प्रार्थी हरी । आज्ञा द्यावया निजान्तरीं । धर्म नादरी प्रार्थना ॥ ६८ ॥ श्रीकृष्णासी आज्ञा देणें । सर्वदा धर्म हें नेच्छी मनें । तथापि बहुधा प्रार्थूनि कृष्णें । आज्ञा घेऊनिं निघाला ॥ ६९ ॥ सवें सर्वही अंतःपुर । मंत्री सचिव सेनाधर । तिहीं सहित देवकी-कुमर । पावला स्वपुर स्वानंदें ॥ ४७० ॥

वर्णितं तदुपाख्यानं मया ते बहुविस्तरम् । वैकुंठवासिनोर्जन्म विप्रशापात्पुनःपुनः ॥ ५० ॥

वैकुंठवासी हरिपार्षद । विप्रशापास्तव ते विशद । दैत्य जाले महादुर्मद । प्रथमजन्मीं हरिद्वेष्टे ॥ ७१ ॥ नामें हरिण्याक्ष हरिण्यकशिपु । ज्यांचा लोकत्रयीं प्रतापदर्पु । भगवद्द्वेष्टे क्रूर अमूप । अहंताजल्पें प्रजल्पती ॥ ७२ ॥ न घेती महाविष्णूचें नाम । इतरां मुखें ऐकतां अधर्म । स्मरातियां दाविती कृतान्तधाम । हा दृढ नेम जयांचा ॥ ७३ ॥ वराहनृसिंहवेषें हरी । तया दैत्यांतें संहारी । द्वेषें दृढतर त्यां अंतरीं । ध्यान निर्धारीं ठसावलें ॥ ७४ ॥ ध्यानयोगें तमोपशमन । पुढें तमाक्त

रजोगुण । उरला यास्तव पावले जनन । राक्षसयोनी माझारी ॥ ७५ ॥ रावण कुंभकर्ण ते दोघे । शरीरें केवळ प्रळयमेघ । प्रतापें जिंकोनियां त्रिजग । लंकादुर्ग आश्रयिलें ॥ ७६ ॥ रमाभिलाष रमारमण । शत्रु मानूनि करितां ध्यान । जालें रजतमा क्षालन । विरोधभजनसंस्कारें ॥ ७७ ॥ पुढें रजतमाक्त सत्त्व मात्र । उरला यास्तव मनुष्यगात्र । जाले प्रतापी भूवर । पूर्वसंस्कारें हरिद्वेष्टे ॥ ७८ ॥ ते हे शिशुपाळ वक्रदंत । हनना अवतरला कृष्णनाथ । पूर्वसंस्कारें विरोधयुक्त । सुहृद आप्त असतांही ॥ ७९ ॥ विरोधभजनीं तृतीयभवीं । शिशुपाळ समरसला केशवीं । ध्यानयोगाची हे पदवी । तुज म्यां आघवी निरोपिली ॥ ४८० ॥ ध्यानें जळाले त्रिगुणमळ । जाहला नितान्त निर्मळ । निंदामिसे स्तवनरोळ । करितां केवळ हरि झाला ॥ ८१ ॥ विप्रशापीं पुनःपुनः । वैकुण्ठवासीं पावले जनना । सविस्तर म्यां तदाख्याना । केलें कथना कुरुवर्या ॥ ८२ ॥ प्रसंगें वक्रदंताचीही कथा । कथिजेल तें असो आतां । प्रस्तुत ऐकें कौरवनाथा । यज्ञसाङ्गता धर्माची ॥ ८३ ॥

राजसूयावभृथ्येन स्नातो राजा युधिष्ठिरः । ब्रह्मक्षत्रसभामध्ये शुशुभे सुरराडिव ॥ ५१ ॥

राजसूयमख संपूर्ण । धर्में करूनि अवभृथस्नान । सभास्थानीं देदीप्यमान । इंद्रासमान विराजला ॥ ८४ ॥ दीक्षिता ब्राह्मणांमाजि श्रेष्ठ । प्रतापें क्षत्रियांमाजि वरिष्ठ । भद्रपीठासनीं उपविष्ट । शोभे त्रिविष्टपपति जैसा ॥ ८५ ॥

राज्ञा सभाजिताः सर्वे सुरमानवखेचराः । कृष्णं क्रतुं च शंसंतः स्वधामानि ययुर्मुदा ॥ ५२ ॥

अवभृथानंतर सभास्थानीं । कुळशीळशौर्यगुणी । राजे पूजिले बहुसम्मानीं । वस्त्राभरणीं यथोचित ॥ ८६ ॥ यज्ञा पातले अमरवर । धर्में अर्चिले ते समग्र । सर्ववर्णात्मक मानव अपर । यथोपचारें गौरविले ॥ ८७ ॥ सुर भूसर खेचर नृपती । अपर मानव समस्त याती । धर्में पूजिले संतुष्टमती । स्वधामा जाती पुसोनियां ॥ ८८ ॥ स्वधामा जातां पृथगाकर । म्हणती धन्य युधिष्ठिर । धन्य राजसूय अध्वर । धन्य श्रीधर अभिगोप्ता ॥ ८९ ॥ निर्विघ्न राजसूय संपला । ऐसा नाहींच कैं ऐकिला । अथवा भावी आणिकांला । न वचे केला भूचक्रीं ॥ ४९० ॥ धर्मयज्ञाची साङ्गता । स्वमुखें वर्णूं न शके धाता । जेथ उच्छिष्टें रमाभर्ता । काढी तत्त्वता स्वानंदें ॥ ९१ ॥ एक म्हणती सर्वकृत्य । कृष्णें साधिलें अतंद्रित । पाण्डवस्नेहें सप्रेमभरित । करी नृत्य तत्सदनीं ॥ ९२ ॥ एरवीं एथ महाघोर । विघ्नें उदेलीं होतीं थोर । रक्षिता सधर कमलावर । म्हणोन अध्वरवर झाला ॥ ९३ ॥ विप्रवेशें अतिथिवेळे । मागध छळिला याज्ञाछळें । भीमहस्तें तो घननीळें । द्वंद्वयुद्धीं निर्दळिला ॥ ९४ ॥ मागधबंदीचे सुटले नृपति । अनुकूळ झाले धर्माप्रति । भूमंडळींच्या सर्व संपत्ति । आणिल्या श्रीपती-प्रतापें ॥ ९५ ॥ अग्रपूजेचिया काळीं । निन्दिला शिशुपाळें वनमाळी । कृष्णें त्याचा छेदिला मौळी । दुष्ट हृत्कमळीं भंगले ॥ ९६ ॥ ऐसीं विघ्नें भंगिलीं कृष्णें । मखेन्द्र सिद्धी गेला तेणें । एक म्हणती

पूर्वपुण्यें । धर्माचिया हें घडलें ॥ ९७ ॥ धर्म भक्तिप्रेमाथिला । म्हणोनि कृष्ण सेवक झाला । राजसूय सिद्धी नेला । आनंद केला त्रिजगातें ॥ ९८ ॥ धर्माचिया यज्ञेंकरून । लोकत्रयीं कृतकल्याण । एका दुर्योधनावांचून । आब्रह्मभुवन संतुष्ट ॥ ९९ ॥

दुर्योधनमृते पापं कलिं कुरुकुलामयम् । यो न सेहे श्रियं स्फीतां दृष्ट्वा पांडुसुतस्य ताम् ॥ ५३ ॥

पापराशि दुर्योधन । जो कलीचा अवतार पूर्ण । कुरुकुळासी क्षयकारण । रोग निर्माण केवळ जो ॥ ५०० ॥ रोगें क्षीण होय शरीर । तेंवि कुरुकुळा जो क्षयकर । तया दुर्योधनाविण इतर । त्रिजग समग्र संतुष्ट ॥ १ ॥ युधिष्ठिर जो पाण्डुसुत । झाला साम्राज्यपट्टाभिषिक्त । त्याची लक्ष्मी परमोर्जित । जळे पाहून जो पोटीं ॥ २ ॥ तो एक दुर्योधन वेगळा । करूनि उत्साह त्रिजगीं सकळां । धर्माध्वरें कौरवकुळा । वारिती झाली यशोलक्ष्मी ॥ ३ ॥ यावरी म्हणे शुक सर्वज्ञ । हा इतिहास जे करिती श्रवण । ऐका तयांचें महिमान । निश्चळ मन करूनियां ॥ ४ ॥

य इदं कीर्तयेद्विष्णोः कर्म चैद्यवधादिकम् । राज्ञां मोक्षं वितानं च सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ५४ ॥

जो हें विष्णूचें कर्म विशद । जैसा केला चैद्यवध । आदिशब्दें खळ मागध । वधिला द्वंद्वसमरंगीं ॥ ५ ॥ आणि नृपांचें विमोक्षण । राजसूयमखसाधन । भावें करील संकीर्तन । पापापासून तो सुटला ॥ ६ ॥ अनंतमहापापांच्या राशी । भस्म होती या इतिहासीं । कीर्तन करितां सद्भावेंशीं । पावे मुक्तीशीं चैद्यवत ॥ ७ ॥ विशेष आराधनप्रेमें । युधिष्ठिरासम मेघश्यामें । महासंकटें पूर्णकामें । स्नेहसंभ्रमें रक्षिजे ॥ ८ ॥ आराधक तो युधिष्ठिर । विरोधभक्त चैद्येश्वर । द्विविध भजनें परमेश्वर । भजतां मोक्षद तें कथिलें ॥ ९ ॥ ऐसें श्रीकृष्णचरित्र । पठन करील ज्याचें वक्त्र । अथवा ऐकती ज्यांचें श्रोत्र । कैवल्यपात्र ते होती ॥५१०॥ तें हें श्रीमद्भागवत । अठरा सहस्र श्रुतिनिर्मथित । श्रोता परीक्षिति नृपनाथ । वक्ता समर्थ शुक योगी ॥ ११ ॥ तयामाजी दशमस्कंधीं । धर्माध्वरीं नृपसंसदीं । मागध चैद्य वधिले दंदी । कथा संमुदी ते कथिली ॥ १२ ॥ इचिया श्रवणीं पठनीं मननीं । कैवल्य पाविजे श्रोतृजनीं । फलादेश हा बादरायणि । नृपालागुनी प्रशंसी ॥ १३ ॥ ब्रह्मनिष्ठां अग्रगणी । तो श्रीएकनाथ प्रतिष्ठानीं । चिदानंदें स्वानंदभुवनीं । भद्रासनीं विराजला ॥ १४ ॥ स्वानंदकृपासंभव चांग । गोविन्दपादप्रभवगाङ्ग । दयार्णवीं तें भरलें साङ्ग । कृपापांगें प्रभूचिया ॥ १५ ॥ तें हें कथामृत जे घेती । विष्णुभुवनीं ते विराजती । यालागीं अत्यादरें तें श्रोतीं । सेवूनि श्रीपति वश कीजे ॥ १६ ॥ पुढले अध्यायीं इतिहास । सिंहावलोकनें गतकथेस । प्रश्न करितां कुरुनृपास । शुक

अशेष निरोपील ॥ १७ ॥ तें आख्यान वक्ष्यमाण । पंचसप्ततितमीं जाण । श्रोतीं सावध कीजे श्रवण । भवभंजन करावया ॥ ५१८ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे अष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां चैद्यवधादिराजसूयकथनं नाम चतुःसप्ततितमोऽध्यायः ॥ ७४ ॥

॥ श्लोक ५६ ॥ ओवी-संख्या ५१८ ॥ एवं संख्या ५७४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु
(त्र्याहत्तरावा अध्याय मिळून ओवी-संख्या ३४,२०५)

कालयुक्ताब्दिके कृष्णे माधवे द्वादशी दिने । पिपीलिकायां संख्यातं राजसूयमखादिकम् ॥ १ ॥

चौऱ्याहत्तरावा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ७५ वा

श्रीगणेशाय नमः । मुनिजनमानसनिवासहंसा । नमो गोविन्दा प्रबोधसुरसा । स्वपदभजनें अनन्यदासां । आत्मसमरसा पाववियी ॥ १ ॥ तुझिया चरणप्रसादेंकरून । चतुःसप्ततितमपर्यंत जाण । केलें दशमाचें व्याख्यान । पुढें निजगुण वदवावे ॥ २ ॥ पंचसप्ततितमाध्यायीं । कथा वर्तली जे जे कांहीं । ते श्रोत्यांचे श्रवणालयीं । भाषाकथनीं सांठविजे ॥ ३ ॥ इत्यादि सद्गुरूचिया स्तवनें । प्रज्ञाप्रकाश लाहोनि मनें । भाषाव्याख्यान हरि वरदानें । दयार्णववदनें वाखाणी ॥ ४ ॥ पंचसप्ततितमीं कथा । सिंहावलोकनें अवभृथा । सांगूनि मयकृत सभा पाहतां । दुर्योधनाचा अपमान ॥ ५ ॥ पूर्वाध्याय संपते काळीं । एका दुर्योधनाविण सकळी । आनंदली नृपमंडळी । पाण्डवलक्ष्मी विलोकुनी ॥ ६ ॥ हे ऐकूनि शुकाची बोली । नृपा प्रश्नाची इच्छा झाली । ते ये अध्यायीं शंका पहिली । नृपें पुशिली ते ऐका ॥ ७ ॥

॥ राजोवाच ॥ अजातशत्रोस्तं दृष्ट्वा राजसूयमखोदयम् । सर्वे मुमुदिरे ब्रह्मन्नृदेवा ये समागताः ॥ १ ॥

दुर्योधनं वर्जयित्वा राजानः सर्षयः सुराः । इति श्रुतं नो भगवंस्तत्र कारणमुच्यताम् ॥ २ ॥

राजा म्हणे जी योगीश्वरा । देखोनि धर्माच्या अध्वरा । आल्हाद समस्तां नृपवरां । चराचरांसमवेत ॥ ८ ॥ शत्रुभावना धर्मापोटीं । त्रिजगीं कोणे काळीं नुठी । यालागीं अजातशत्रु नाम सृष्टी । मुनि वाक्पुटीं वाखाणी ॥ ९ ॥ तयाचा मखेन्द्र राजसूय । ऐश्वर्यलक्ष्मीचा महोदय । देखोनि नृपांचा समुदाय । आनंदला जो मखागत ॥ १० ॥ एकला दुर्योधन वर्जून । सुरवर नृपवर मुनिवर पूर्ण ।

तोषले ऐसें वदलां वचन । यदर्थीं कारण तें सांगा ॥ ११ ॥ पाण्डवलक्ष्मी ऊर्जित मख । देखतां त्रिजगा जालें सुख । एका दुर्योधनासीच कां दुःख । हा हेतु सम्यक मज बोधा ॥ १२ ॥ हें ऐकूनि नृपाचें वचन । वक्ता शुकाचार्य सर्वज्ञ । दुखवे मानसीं दुर्योधन । काय म्हणोन तें कथितो ॥१३॥

श्रीशुक उवाच ॥ पितामहस्य ते यज्ञे राजसूये महात्मनः । बांधवाः परिचर्यायां तस्यासन्प्रेमबंधनाः ॥ ३ ॥

न सांगतां सविस्तर । नोहे शंकेचा परिहार । यालागीं पुढती धर्माध्वर । सिंहावलोकनें निरोपी ॥ १४ ॥ सावध कुरुवर्या अवधारीं । तव जनकाचे जनकाध्वरीं । कार्यें नेमिलीं पृथगाकारीं । बंधुवर्गांतें आप्तत्वें ॥ १५ ॥ आपुले सदनींचा मखोत्सव । जाणोनि बंधूंचा समुदाव । नियमित परिचर्येतें सर्व । सप्रेमभावें प्रवर्तला ॥ १६ ॥ कोण कार्य कोणा योग्य । हा अधिकार पाहोनि चांग । नियमिला कार्याचा नियोग । तो प्रसंग अवधारा ॥ १७ ॥

भीमो महानसाध्यक्षो धनाध्यक्षः सुयोधनः । सहदेवस्तु पूजायां नकुलो द्रव्यसाधने ॥ ४ ॥
सतां शुश्रूषणे जिष्णुः कृष्णः पादावनेजने । परिवेषणे द्रुपदजा कर्णो दाने महामनाः ॥ ५ ॥

पाकशाळेचा अध्यक्ष । पाकशासना तुल्य दक्ष । तो भीम महानसाध्यक्ष । केला मुख्य लक्षूनी ॥ १८ ॥ सूपशास्त्रीं परम कुशळ । पुण्यश्लोक नैषध नळ । तैसा मध्यम कुन्तीबाळ । निर्जरपाळसमतेचा ॥ १९ ॥ किंवा पावक पाकप्रवीण । किंवा रसज्ञ जैसा वरुण । पाककियाविचक्षण । तो भीम स्थापिला महानसीं ॥ २० ॥ पाकक्रियाप्रवीणदूत । धर्माज्ञेनें शतानुशत । भीमापासीं अतंद्रित । परमसंयुक्त ओळंगती ॥ २१ ॥ कौरवांमाजि प्रभु वरिष्ठ । जो दुर्योधन मानें श्रेष्ठ । तो धनाध्यक्ष केला स्पष्ट । परम दुष्ट असहिष्णु ॥ २२ ॥ भूमंडळींचे सर्व नृपती । उपायनें जीं घेऊनि येती । अर्पूनि दुर्योधनाप्रती । लेख लिहिती ते सर्व ॥ २३ ॥ दुर्योधन पाहूनि नयनीं । कोशभाण्डार निक्षेपसदनीं । निक्षेपवी आज्ञापूनी । सेवकांलागूनि तन्निष्ठ ॥ २४ ॥ हेमललामें नाना वस्त्र । गजाश्व जवीन मारुतजित । दास दासी संख्येरहित । देखोनिहृदयांत जळे दुःखें ॥ २५ ॥ शस्त्रें वस्त्रें पात्रें नाना । धान्यें षड्रसपूर्णभाजना । केशर कस्तूरी दिव्य चंदना । पशुगोधना रथशिबिका ॥ २६ ॥ रत्नखचित विचित्र भूषा । भरूनि अर्पिती नृप मंजूषा । देखूनि दुर्योधन मानसा । माजी कोळसा होतसे ॥ २७ ॥ ऊर्जित लक्ष्मी पाण्डवां घरीं । ऐसी नायकों नृपनिर्जरीं । येथूनि बळिष्ठ जाले वैरी । कोणे परी हे आकळती ॥ २८ ॥ जंव जंव देखे धनाचा यावा । तंव तंव भडका लागे जीवा । जाणोनि तयाच्या अंतर्भावा । कार्यगौरवा प्रतिष्ठिलें ॥ २९ ॥ पूजासामग्री घेऊनि सकळी । धर्मराजाचे आज्ञेतळीं । सहदेव सर्वदा तिष्ठे जवळी । सेवकमंडळीसमवेत ॥ ३० ॥ यज्ञद्रव्यें पूजाद्रव्यें । अन्य जें सदस्यां नृपां सेव्यें । पाकप्रयोजनार्ह दिव्यें । ऐक्षवें गव्यें रसरूपें ॥ ३१ ॥ तयां द्रव्यांच्या साधनीं । नकुळ केला अग्रगणी । शतानुशत सेवकजनीं । सावधान सर्वदा ॥ ३२ ॥ पाकशाळेमाजी जें जें । भीमें

आणविजती ओजें । तें तें द्रव्यें माद्रीतनुजें । समर्पिजती तत्काळ ॥ ३३ ॥ धौम्याचिये आज्ञावचनीं । होमद्रव्यें ते ते क्षणीं । अर्पी अविलंबेंकरूनी । मानस लक्षूनि वर्ततसे ॥३४॥ पूजाद्रव्यें जिष्णूकडे । कीं धर्म आज्ञापी जें जें तोंडें । तें तें अर्पी वाडेंकोडें । सावध चहूंकडे माद्रेय ॥ ३५ ॥ सदस्य अथवा सर्व नृपती । उपचारद्रव्यें जियें मागती । तें तें अर्पी तयांप्रती । सावधवृत्ती सर्वत्र ॥३६॥ हय गज वृष गो क्रमेळ खर । इत्यादि पशुगण जो समग्र । तयांसि पिण्याक तृण कण नीर । पाववी सादर होत्साता ॥ ३७॥ विष्णुसंमत श्रीकृष्णासी । तो संतांचे परिचर्येसी । नियोजिला सदुणराशी । दासदासींसमवेत ॥३८॥ देव देवर्षि ब्रह्मर्षि । राजे राजर्षि महर्षि । अपर व्रतस्थ तपोराशि । तत्सेवेसी सावध जो ॥३९॥ शतानुशत किङ्करगण । घेऊनि सर्वकाळ फाल्गुन । सत्सेवनीं सावधान । मृदुभापणें नम्रत्वें ॥ ४० ॥ पादप्रक्षालनाचें काज । अंगीकारी गरुडध्वज । स्वजना दावी दीक्षावोज । कल्याणबीज म्हणोनियां ॥४१॥ सर्वत्र पूजेच्या प्रकरणीं । हरि प्रवर्ते पादार्चनीं । प्रवाळवज्री धरूनि पाणीं । मृदुतर चरणीं मर्दूनियां ॥ ४२ ॥ निर्मळ घालूनि गंगाजळ । मृदुळ प्रक्षाळी पदकमळ । सकलैश्वर्याचें स्थळ । जाणोनि मौळें अभिवंदी ॥ ४३ ॥ गाढालिङ्गनें हृदयीं धरी । केवळ श्रीवत्साङ्कापरी । पादावनेजन वंदी शिरीं । कल्याणकारी जाणोनी ॥ ४४ ॥ उत्तरीयपीताम्बरें । श्रीपद परिमार्जी निजकरें । महद्भाग्य हें उत्साह-गजरें । निजजननिकरां प्रतिबोधी ॥ ४५ ॥ ऐसें पादावनेजनकार्य । धर्ममखीं करी यदुवर्य । पतिव्रतांमाजि धुर्य । ते पाञ्चाळी परिवेपीं ॥ ४६ ॥ मुनिवरनृपवरद्विजवरपंक्ति । सुहृदां सदस्यां ऋत्विजां प्रति । द्रौपदी वाढी ढसाळ हस्तीं । भीम निष्पत्ति अर्पीतसे ॥ ४७ ॥ शतानुशत परिवेषणीं । कुशळा सुशीळा सुवासिनी । ब्रह्मनिष्ठांच्या ब्राह्मणी । याज्ञसेनीअनुगा ज्या ॥ ४८ ॥ द्रौपदी आज्ञा करितां तोंडें । तिया वाढिती सर्वांकडे । न्यूनपूर्ण कोठें न पडे । गमे निवाडें सुरसुरभि ॥ ४९ ॥ ऐसी परिवेपणाधिकारीं । नियोजिली पाञ्चाळकुमरी । दक्षिणादानप्रकरणावसरीं । केला भास्करि अध्यक्ष ॥ ५० ॥ वदान्य दाता कर्णासम । याचकेच्छाप्रद निःसीम । तुलने एक कल्पद्रुम । किंवा राम दशरथि ॥५१॥ परंतु पाण्डवांसीं वैर । कौरवस्नेह वाहे सधर । तया कर्णा दानाधिकार । जाणोनि उदार नेमियला ॥ ५२ ॥ सरावी शत्रूची संपत्ती । म्हणोनि वांटी उदारहस्तीं । तेणें धर्माची यश कीर्ती । झाली पसरती त्रिजगांत ॥ ५३ ॥ गान्धार देखे धनसंपदा । तों तों हृदयीं पावे खेदा । कर्ण वांटी मानूनि मोदा । सदासर्वदा सरावया ॥ ५४ ॥ अनंतहस्तें पुरवी हरी । अढळ संपदा धर्माघरीं । कर्णें वांटितां नानापरी । त्रिजगीं भरी तत्कीर्ति ॥ ५५ ॥ द्रौपदी वाढी जेव्हां पंक्ति । तेथ जे दुष्टात्मे दुर्मति । कामबाणें भ्रान्त होती । ते आंचवती ऐश्वर्या ॥ ५६ ॥ महासतीचा अभिलाष मनीं । उठतां आयुष्या होय हानी । त्रयोदशाब्दांनंतर रणीं । पाण्डवबाणीं त्यां पडणें ॥ ५७ ॥ ऐसीं हेतुगर्भितें कार्यें । भीष्मसंमतें वृष्णि-धुर्यें । योजूनि दिधलीं तीं तात्पर्यें । शुकाचार्यें नृपा कथिलीं ॥ ५८ ॥ यावरी सर्वसाधारणें । सुहृदां

जिवलगां कारणें । कार्यभागीं नियोजणें । त्यांचीं अभिधानें अवधारा ॥ ५९ ॥

युयुधानो विकर्णश्च हार्दिक्यो विदुरादयः । बाल्हीकपुत्रा भूर्याद्या ये च संतर्दनादयः ॥ ६ ॥
निरूपिता महायज्ञे नानाकर्मसु ते तदा । प्रवर्तते स्म राजेंद्र राज्ञः प्रियचिकीर्षवः ॥ ७ ॥

शिनिवंशींचा प्रतापसिन्धु । सत्यभामेचा पितृव्यबंधु । अर्जुनशिष्यांमाजि अगाधु । युयुधाननामा सात्यकि तो ॥६०॥ धृतराष्ट्राचिये पोटीं । दुर्योधनादि कौरव कपटी । त्यांमाजि विकर्ण एक जगजेठी । जो नातळे गोठी कपटाची ॥ ६१ ॥ आणि कृतवर्मा महावीर । हार्दिक्य तयाचा नामोच्चार । तैसाचि यमाचा अवतार । सर्वज्ञ विदुर नृपबंधु ॥ ६२ ॥ भूरिश्रवा आदिकरून । समस्त बाल्हीकनंदन । आणि कृष्णाचे श्यालक जाण । संतर्दनादिक अवघे ॥ ६३ ॥ ऐसिया जिवलगां सुहृदां आप्ता । कृष्णकृपाकटाक्षयुक्तां । श्रीपदभजनानंदतृप्तां । समस्त कृत्यें निरोपिलीं ॥ ६४ ॥ राजसूयाख्यमहामखीं । पृथक कार्यें भीष्मादिकीं । ज्यां जीं कथिलीं तीं तीं निकीं । करावया प्रवर्तले ॥ ६५ ॥ धर्मराजासि करावें प्रिय । येच इच्छेकरूनि कार्य । ज्यां जें कथिलें तें तद्धुर्य । करिती तात्पर्य जाणोनी ॥ ६६ ॥ इत्यादिरचनापूर्वक याग । प्रवर्तलिया साङ्गोपाङ्ग । पूर्वाध्यायीं तो प्रसंग । कथिला अव्यंग तुज राया ॥ ६७ ॥ अजातशत्रुयज्ञें सकळा । उत्साह झाला भूमंडळा । त्यामाजि दुर्योधन वेगळा । तें कारण नृपें पुशिलें ॥ ६८ ॥ यालागीं सिंहावलोकनें । कथिलीं पृथक प्रयोजनें । धनाध्यक्षता करितां मनें । दुर्योधनें न साहिजे ॥ ६९ ॥ धर्मयज्ञें सर्वांसि सुख । आणि दुर्योधनासि जें कां दुःख । या तव प्रश्नाचा विवेक । आतां सम्यक कळालाकीं ॥ ७० ॥ अंतरसाक्षी जनार्दन । तेणें जाणोनि अंतःकरण । धनाध्यक्ष दुर्योधन । केला संपूर्ण क्षोभार्थ ॥ ७१ ॥ तप्ततैलीं शितळ जळ । घालितां गगनीं धांवती ज्वाळ । तेंवि दुर्योधना पोटींचें कुटिळ । क्षोभलें केवळ बहुमानें ॥ ७२ ॥ दुर्योधनाचे कुटिळान्तर । प्रकट करावया बाहीर । मानभंगाचा प्रकार । पुढें समग्र कथिजेल तो ॥ ७३ ॥ प्रस्तुत राजसूयोपसंहरणीं । सिंहावलोकने बादरायणि । ऋत्विक्पूजावभृथकथनीं । प्रवर्तला तें अवधारा ॥ ७४ ॥

ऋत्विक्सदस्यबहुवित्सु सुहृत्तमेषु स्विष्टेषु सूनृतसमर्हणदक्षिणाभिः ।
चैद्ये च सात्वतपतेश्चरणं प्रविष्टे चक्रुस्ततस्त्ववभृथस्नपनं द्युनद्याम् ॥ ८ ॥

ऋत्विज आणि सदस्यगण । बहुवेत्ते जे सर्वज्ञ प्रवीण । सुहृदांमाजि वरिष्ठ मान्य । पूजिले असतां सभास्थानीं ॥ ७५ ॥ वसनाभरणीं सर्वोपचारीं । बहुदक्षिणावाद्यगजरीं । तेथ अग्रपूजेन्या अवसरीं । चैद्या मारी हरि चक्रें ॥ ७६ ॥ अग्रपूजा चैद्यमरण । ऋत्विक्सदस्यसुहृदर्चन । संपलें असतां अवभृथस्नपन । करविते झाले धर्मातें ॥ ७७ ॥ विष्णुपादपंकजभवा । मौळभूषण जे शंभवा । त्रिजगत्पावनी दिव्यार्णवा । मंदाकिनी जे सुरसरिता ॥ ७८ ॥ तिये भागीरथीच्या ठायीं । ऋत्विज सदस्य नृप सर्वही । धर्मासहित पुण्योदयीं । अवभृथस्नाना प्रवर्तले ॥ ७९ ॥ तिये धर्माचे अवभृथस्नानीं । महोत्साह झाला अवनी । तो ऐकें आपुल्या श्रवणीं । कुरुकुळनलिनीप्रबोधका ॥ ८० ॥

मृदंगशंखपणवधुंधुर्यानकगोमुखाः । वादित्राणि विचित्राणि नेदुरावभृथोत्सवे ॥ ९ ॥

यज्ञशाळा सोडूनि सकळीं । अवभृथस्नाना निघते वेळीं । वाद्यप्रवीण वादित्रशाळी । करिती धुमाळी वाद्यांची ॥ ८१ ॥ मधुर मृदंग ताल घोळ । शंख स्फुरिती शुभ मंगळ । पणव पटह ढक्के ढोल । दुंदुभि विशाळ दुमदुमिल्या ॥ ८२ ॥ धुंधुर्या त्या डफड्या जोडे । वादक वाहूनि नाचती पुढें । भाट बंदिजन पवाडे । गर्जती तोंडें उच्चस्वरें ॥ ८३ ॥ आनक गोमुख करणे बांके । शृंगें बुरंगें तुतारें निकें । सूर सनया काहळाप्रमुखें । वाजती अशेषें वाजंत्रें ॥ ८४ ॥ ऐसे अवभृथस्नानप्रकरणीं । गमनागमनीं गंगापुलिनीं । वाजंत्रांचें विचित्र ध्वनी । घोष गगनीं न समाये ॥ ८५ ॥

नर्तक्यो ननृतुर्हृष्टा गायका यूथशो जगुः । वीणावेणुतलोन्नादस्तेषां स दिवमस्पृशत् ॥ १० ॥

नर्तकी ज्या नृत्याङ्गना । दिव्याप्सरातुल्य ललना । चंचल चपला चारुवदना । चंपकगौरा चलिताक्षा ॥ ८६ ॥ ऐसिया वाराङ्गनांचे यूथ । ठायीं ठायीं करिती नृत्य । परमाल्हादें गायक तेथ । गाती गंधर्वपडिपाडें ॥ ८७ ॥ गायकयूथ पृथक पृथक । रागरागिणीमूर्च्छनादिक । आरोह अवरोह गिरड्या गमक । कौतुकें अनेक दाविती ॥ ८८ ॥ तेथ वादक पृथक तालें । त्रिवटपडनाचे पडताळें । घेऊनि दाविती करचापलें । अतिकौशल्यें संगीतें ॥८९॥ वीणे वल्लकी विपंची । सारमंडळें कौतुकांची । हस्तीं ताल धरिती त्यांची । ध्वनी नृत्यांची गति प्रकटी ॥ ९० ॥ पूर्वश्लोकींचा वाद्यगजर । ये श्लोकींचा उच्चस्वर । तेणें कोंदलें अंबर । अमरमंदिरपर्यंत ॥ ९१ ॥ तया अवभृथस्नानयानीं । निघाले भूभुज विविधा यानीं । तें तूं कुरुवरचूडामणी । सावध श्रवणीं अवधारा ॥ ९२ ॥

चित्रध्वजपताकाग्रैरिभेंद्रस्यंदनार्वभिः । स्वलंकृतैर्भटैर्भूपा निर्ययू रुक्ममालिनः ॥ ११ ॥
यदुसृंजयकांबोजकुरुकेकयकोसला. । कंपयंतो भुवं सैन्यैर्यजमानपुरस्सराः ॥ १२ ॥

भूप निघाले श्रीसन्नद्ध । विचित्र ध्वजपताका विविध । इभेन्द्र सज्जिले गाळिती मद । स्यंदन सिद्ध शातकौम्भी ॥ ९३ ॥ अर्वशब्दें अश्व जवीन । सज्ज संग्रामशिक्षाप्रवीण । जे कां बळिष्ठ प्रबळ नवीन । सपल्याण सालंकृत ॥ ९४ ॥ वरी वळघले राऊत राणे । रुचिर विलसती रत्नाभरणें । कटिबंधनें अंगत्राणें । शस्त्रप्रहरणीं प्रवीण जे ॥ ९५ ॥ अग्रीं पदातियांचे निकर । सन्नद्ध बद्ध यंत्रधार । परिजिती विविध शस्त्रभार । करिती गजर सिंहरवें ॥ ९६ ॥ ध्वज गज रथ अश्व पदाति । वेष्टित पृथक भारें भूपति । कनकरत्नाभरणद्युति । तिहीं शोभती भासुर जे ॥ ९७ ॥ ऐक तयांचीं नामाभिधानें । पांच सात कथिजती वदनें । तयांमाजी अपरें गौणें । श्रोतीं अनुमानें जाणावीं ॥ ९८ ॥ वृष्णिभोजान्धक-यादव नृपति । सृंजयकाम्बोजादि भूपति । दुर्योधनादि कौरवपति । केकयकोसलमगधादि ॥ ९९ ॥ पूर्वीं चैद्याचिये हननीं । चैद्यपक्षींच्या भूपाळगणीं । पलायन केलें मख सांडूनी । विमुख ये क्षणीं ते झाले ॥ १०० ॥ अपर लहान थोर जे राजे । सुकृत साधनाचिये काजें । धर्मावभृथस्नानें वोजें ।

पुनीत व्हावया सादर ॥ १ ॥ ऐसिया समस्तनृपांचीं कटकें । जियें कृतान्ता गमती अटकें । यजमान वेष्टूनियां कुतुकें । निघाले तोपें स्नानार्थ ॥ २ ॥ तिया पृथक चतुरंगिणी । निघतां भारें भू दणाणी । कंपायमान करिती अवनी । देखतां नयनीं भय भेडां ॥ ३ ॥ ऐसे यजमानपुरस्सर । निघाले समस्तही नृपवर । धर्माभोंवते ऋषीश्वर । करिती गजर मंत्रांचा ॥ ४ ॥

सदस्यर्त्विग्द्विजश्रेष्ठा ब्रह्मघोषेण भूयसा । देवर्षिपितृगंधर्वास्तुष्टुवुः पुष्पवर्षिणः ॥ १३ ॥

सदस्य म्हणिजे सभानायक । महर्षि जे कश्यपादिक । श्रेष्ठ द्विजवर योगिप्रमुख । तपस्वी स्नातक व्रतनिष्ठ ॥ ५ ॥ ऋत्विजसहित या द्विजवरीं । भूयसा म्हणिजे बहुतां परी । वेदघोष दीर्घस्वरीं । केला तेथ ते काळीं ॥ ६ ॥ वेदपठनघोषें द्विज । स्तविते झाले तेजःपुञ्ज । पितृदेवर्षिगंधर्व सहज । पुष्पवृष्टि करिताती ॥ ७ ॥ धर्मराजाच्या अवभृथोत्सवा । पहावया उत्साह सर्वां । नागरा नरनारींचा यावा । श्रवण करावा श्रुतिरसिकीं ॥ ८ ॥

स्वलंकृता नरा नार्यो गंधस्रग्भूषणांबरैः । विलिंपंत्योऽभिषिंचंत्यो विजह्रुर्विविधै रसैः ॥ १४ ॥

धर्म यज्ञशाळेबाहीर । निघतां झाला मोठा गजर । तो ऐकूनि सर्व नागर । लहान थोर निघाले ॥ ९ ॥ आणि नृपांचीं विढागारें । तेथ जीं होतीं अंतःपुरें । दासदासी सहपरिवारें । अत्यादरें तीं आलीं ॥१०॥ वसनाभरणें विराजित । केशरचंदनतिळकाङ्कित । मलयजगंधें सुचर्चित । पुष्पहार ज्यां कंठीं ॥ ११ ॥ ऐसिया नारीनरांचें यूथ । पाहों मिनलें सालंकृत । परस्परें आनंदभरित । क्रीडती तेथ निःशंक ॥ १२ ॥ नारीनरांचीं नवनीतगोळीं । मुखें माखिती तये काळीं । एकीं भरूनि दध्यंजळी । पुरुषां मौळीं प्रक्षेपिती ॥ १३ ॥ पुरुष तैसेचि नारीवरी । वर्षती इक्षुरसाच्या धारीं । एक माक्षिक मधु घेऊनि करीं । वनितावक्त्रीं विलेपिती ॥ १४ ॥ एकी एकावरी दुग्धा । सप्रेम शिंपूनि क्रीडती मुग्धा । एक ऐक्षव एक स्निग्धा । टाकिती मोदास्तव तेथ ॥ १५ ॥ ऐसिया विविध रसांच्या घटीं । वर्षोनि वाराङ्गनांच्या थाटी । पुरुषसमुदाय कोट्यानुकोटी । क्रीडती गोठी ते ऐका ॥ १६ ॥

तैलगोरसगंधोदहरिद्रासाद्रकुंकुमैः । पुभिर्लिप्ताः प्रलिंपंत्यो विजह्रुर्वारयोषितः ॥ १५ ॥

चंपक मोगरे सुगंधजाती । इत्यादि तैलीं सुवासितीं । जवादि कस्तूरी कुंकुमार्क्तीं । पुरुष माखिती वधूवदनें ॥ १७ ॥ वारमुख्या ज्या कुशला तरुणी । लावण्यामृतरसतरंगिणी । पुरुषसमाजीं निःशंकपणीं । पुरुषां वदनीं विलेपिती ॥ १८ ॥ सुगंधद्रव्यांचे कर्दम । चर्चिती नरवदना निःसीम । यूनपुरुष जे सकाम । क्रीडती सप्रेम ते तेथ ॥ १९ ॥ वेणिका धरूनि वनितावक्त्रा । विकसित करूनि ओतिती तक्रा । जें दुर्लभ स्वर्गीं शक्रा । शतक्रतूंच्या सुकृतेंही ॥ १२० ॥ अहव्य जाणोनि ऋत्विजवर्गीं । पूर्वी होमिलें

नाहीं यागीं । यालागिं ऐश्वर्य भोगितां स्वर्गीं । दुर्लभ तक्र शक्रातें ॥ २१ ॥ ऐसीं तक्रें वनितामुखीं । यून ओतितां ललना एकी । फिरूनि तद्वदनावर धुंकी । होय तो सुखी तद्योगें ॥ २२ ॥ वनिताधरामृताचें पान । विशेष सतक्रष्ठीवन । स्वर्गसुधा मानूनि गौण । करी लेहन औत्सुक्यें ॥ २३ ॥ एकी मलयज-गंधोदकें । प्रोक्षिती यूना नरांचीं मुखें । क्रीडा शोभे परम हरिखें । वनितावदनीं शिम्पिती ते ॥ २४ ॥ एकी हरिद्रामिश्रित जळें । प्रोक्षिती नरांचीं वदनकमळें । ते नर तरुण उताविळे । वनितामौळें प्रोक्षिती ॥ २५ ॥ जवादि कस्तूरी केशर प्रचुर । नववनितांचीं वदनें रुचिर । यूनां विलेपती विलासचतुर । क्रीडापर होत्साते ॥ २६ ॥ तेणें संक्षुब्ध वाराङ्गना । तत्कर्दमीं यूनां नाना । विलेपती त्या कुरुभूषणा । विहारकाळीं उत्साहें ॥ २८ ॥ ऐसिया नरनारी नागरा । विशेष वाराङ्गना अप्सरा । अवभृथस्नानीं क्रीडापरा । सुरनिम्नगेमाझारी ॥ २८ ॥ यावरी नृपाच्या पट्टमहिषी । प्रमुदित होत्सात्या मानसीं । त्या क्रीडल्या तद्विलासीं । तें नृपासी शुक सांगे ॥ २९ ॥

गुप्ता नृभिर्निरगमन्नुपलब्धुमेतद्देव्यो यथा दिवि विमानवरैर्नृदेव्यः ।
ता मातुलेयसखिभिः परिषिच्यमानाः सव्रीडहासविकसद्वदना विरेजुः ॥ १६ ॥

जिया नृपांच्या वाराङ्गना । कनकरत्नमय स्यंदना । वळंघूनि आल्या अवभृथस्नाना । रक्ष-कगणासमवेत ॥ १३० ॥ रथ चालती घडघडाट । वेष्टित नृपभटांचे थाट । पुलोमारक्षक सुर सुभट । तैसे निकट प्रगोप्ते ॥ ३१ ॥ जैशा देवाङ्गना विमानीं । उत्साहभरिता विचरती गगनीं । तैशाचि राजाङ्गना अवनी । स्यंदनयानीं विराजती ॥ ३२ ॥ सर्वत्र रक्षिता राजभटीं । रथाश्वनरांची रक्षक-घरटी । जळक्रीडा पहावयासाठीं । जाह्नवीतटीं पातलिया ॥ ३३ ॥ मग त्या उतरोनि रथातळीं । प्रवेशोनियां जाह्नवीजळीं । मेहुणियांसीं करिती रळी । मातुलेयां समवेत ॥ ३४ ॥ आपुले सुहृद जिवलग सखे । मेहुणे मातुलेय देवर निके । तिहीं वेष्टिल्या शिम्पिती उदकें । परम कौतुकें उत्साहें ॥ ३५ ॥ पूर्वोक्त सुगंधद्रव्यें रस । परस्परें शिम्पिती बहुवस । वदनारविन्दीं सव्रीड हास । परमोल्लास हृत्कमळीं ॥ ३६ ॥ सलज्जवदनीं मंदस्मितें । तेणें वदनाब्जें विकसितें । ऐशा करितां जलक्रीडेतें । ललनारत्नें विराजती ॥ ३७ ॥ वनितायूनांची जळकेली । धर्मराजाचे अवभृथकाळीं । प्रवर्तली ते कुरुकुळमौळी । सचिवमंडळीसह परिसें ॥ ३८ ॥

ता देवरानुत सखीन्सिषिचुर्दृतीभिः क्लिन्नांबरा विवृतगात्रकुचोरुमध्याः ।
औत्सुक्यमुक्तकबराच्च्यवमानमाल्याः क्षोभं दधुर्मलधियां रुचिरैर्विहारैः ॥ १७ ॥

तया नृपांचिया नृदेवी । धर्मराजाच्या अवभृथोत्सवीं । निःशंक क्रीडत्या झाल्या सर्वी । जोंवि सुपर्वी सुरसदनीं ॥ ३९ ॥ कनिष्ठ बंधु निजकान्ताचे । देवर तयांसि म्हणिजेत साचे । मातुळादि-पितृष्वसांचे । तनय मेहुणे सुहृद सखे ॥ १४० ॥ चुलते आता चुलतमामे । ऐसे संबंधी गोत्रनियमें ।

तत्पुत्र मेहुणे सुहृत्प्रेमें । सखे या नामें बोलिजती ॥ ४१ ॥ ऐसिया सखिवर्गा देवरां । माजी निःशंक नृपवरदारा । गंगेमाजी शिम्पिती नीरा । आर्द्राम्बरा प्रकटांगा ॥ ४२ ॥ भुभुजभोग्यें सूक्ष्मवसनें । जळविहारीं भिजलीं क्लिन्नें । त्वचेसमान तनु संलग्नें । अवयव तेणें स्फुट दिसती ॥ ४३ ॥ सखयां सुहृदां देवरांवरी । करचापल्यें शिम्पितां वारी । अंबरें न थरतीच शरीरीं । उघडा गात्रीं क्रीडती त्या ॥ ४४ ॥ पादांगुष्ठादि शिरोरुह । पर्यंत निगूढ वनितादेह । क्रीडाप्रसंगें निःसंदेह । देखती समूह यूनांचे ॥ ४५ ॥ अवयवांमाजी गोपना योग्य । क्रीडासमयीं भर्तृभोग्य । तेही अवयव दिसती सांग । जळक्रीडेच्या प्रसंगें ॥ ४६ ॥ मध्य म्हणिजे कटिपदसंधी । मांडिया जाणिजे ऊरु या शब्दीं । वक्षोज कुचनामें प्रसिद्धी । कथितां प्रकट जाणिजती ॥ ४७ ॥ ऐसे स्त्रियांचे गुप्तावयव । जळविहारीं उघडेचि सर्व । अपरशरीरांमाजी ठाव । उघडे झांकले न पुसावे ॥ ४८ ॥ जयांचे अंगुष्ठ न दिसती दृष्टी । त्या नृपाङ्गनांच्या सर्वांङ्गयष्टी । अवभृथजळचर्याराहटी । करितां सृष्टी स्फुट दिसती ॥ ४९ ॥ उत्कट क्रीडेचा विशेष । तेणें मुक्त वेणिकाकेश । च्यवती ग्रथित पुष्पघोष । वनितावि लासऔत्सुक्यें ॥ १५० ॥ चामीकराभ गौरा तरुणी । नव्हती दरिद्रा निराभरणी । सालंकृता सर्वभूषणीं । नृपकामिनी कमनीया ॥ ५१ ॥ देखोनि त्यांच्या अंगयष्टी । कामविकारें समळ पोटीं । तया नरांच्या जडल्या दृष्टी । लाळ घोंटिती संकल्पें ॥ ५२ ॥ ब्रह्मचारी स्नातक यती । वेदपारंगत सांगों किती । अपक्व साधनीं स्मरमळ चित्तीं । नेत्र न लविती तें पाहतां ॥ ५३ ॥ देवर मेहुणे सखी समाजीं । नृपाङ्गना ज्या क्रीडाभाजी । क्रीडती त्यांचें कौशल्य सहजीं । जनपदराजी अवलोकी ॥ ५४ ॥ जलविक्षेपयंत्रें नाना । चर्मनिर्मितें वेणवें जाणा । हैमें राजतें शौल्वें कोण्हां । कोण्हां केवळ कराञ्जळी ॥५५॥ गोरसैक्षव-प्रमुख रस । सुगंध सस्निग्ध द्रव्यें विशेष । यंत्रीं भरूनि वनिता तोष । मानूनि यूनां शिम्पिती त्या ॥ ५६ ॥ चिपोळ्या चमत्कारें चिरकांडीं । लक्षूनि यूनां नाकीं तोंडीं । सोडितां वोडविती ते गांडी । तोंडें वांकुडीं करूनियां ॥ ५७ ॥ ऐसे रुचिर मनोहर । नृपांगनाचे जलविहार । अवभृथ नाहतां युधिष्ठिर । समस्त नागर अनुभविती ॥ ५८ ॥ निगूढा नृपांगनांची क्रीडा । उद्दाम कथिली विगतव्रीडा । सामान्य जनाच्या विलासकोडा । उमजें सुघडा न सांगतां ॥ ५९ ॥ धर्मराजा तये काळीं । ऐसी वेष्टित नृपमंडळी । पातला भागीरथीचे कूळीं । तेंही समूळीं परिसावें ॥ १६० ॥

स सम्राड्रथमारूढः सदश्वं रुक्ममालिनम् । व्यरोचत स्वपत्नीभिः क्रियाभिः क्रतुराडिव ॥ १८ ॥

राजसूयक्रतु सम्यक । यजिल्यानंतर कुरुनायक । सम्राट्पदवी पावला देख । ऐश्वर्यपूर्वक भूचक्रीं ॥ ६१ ॥ रत्नखचितकनकरथ । उत्तम जुंपिले अश्व तेथ । दिव्याभरणीं विराजित । जेंवि भास्कर प्रकाशला ॥ ६२ ॥ मग तो सम्राट तिये रथीं । द्रौपदीप्रमुख वनिता सतीं– । सह बैसला क्रतुसुकृतीं । जेंवि सुरपती शचीसहित ॥ ६३ ॥ कीं तो क्रियांसीं मखेन्द्र जैसा । स्वपत्न्यांशीं युधिष्ठिर तैसा । शोभता झाला पूर्णयशसा । भगणामाजी हिमकरवत ॥ ६४ ॥ ऐसा दिव्य रथीं कुरुराय । स्वपत्न्यांसीं

शोभला होय । क्रियांसहित राजसूय । मूर्तिमंत जियापरी ॥ ६५ ॥ एवं जान्हवीजीवनानिकटीं । रथौनि उतरला भूतटीं । तेथील जैसी विधिराहटी । तेही गोठी अवधारीं ॥ ६६ ॥

पत्नीसंयाजावभृथ्यैश्चरित्वा ते तमृत्विजः । आचांत स्नापयांचक्रुर्गंगायां सह कृष्णया ॥ १९ ॥

पत्नीसंयाजनामक याग । जो कां केवळ अवभृथाङ्ग । तिहींसीं अवभृथ सांङ्गोपाङ्ग । ऋत्विजीं अव्यंग संपविलें ॥ ६७ ॥ कृष्णा म्हणिजे द्रौपदीदेवी । तयेसहित श्रीजान्हवी । माजी यजमान ऋत्विजीं सर्वीं । केला अवभृथीं सुस्नात ॥ ६८ ॥ विध्युक्त आचमनपूर्वक । अवभृथीं सुस्नात कुरुनायक । वरुणशुक्तादिमंत्रघोक । करिती ऋत्विज ते काळीं ॥ ६९ ॥ धर्मराजातें ऋत्विजगणीं । पत्नीसंयाज विधिविधानीं । द्रौपदीसहित अवभृथस्नानीं । अवगाहन करविलें ॥१७०॥ नृपाङ्गनांची जळकेली कथिली । धर्मद्रौपदी जेथ नाहलीं । सुकृती नाहती तया तळीं । प्रवाहजळीं जाह्नवीच्या ॥ ७१ ॥ द्रौपदीचीं मौळसुमनें । गळितें प्रवाहें उद्यमानें । सुकृताभिलाषी अतिसम्मानें । लब्धें धरिती निजमौळीं ॥ ७२ ॥ ऐसिया अवभृथस्नानोत्सवीं । विमानीं दुन्दुभि त्राहाटिल्या देवीं । भूतळीं गजदुन्दुभि मानवीं । सर्वत्र सर्वीं वाजिन्नल्या ॥ ७३ ॥

देवदुंदुभयो नेदुर्नरदुंदुभिभिः समम् । मुमुचुः पुष्पवर्षाणि देवर्षिपितृमानवाः ॥ २० ॥

विमानीं सुरवरांच्या श्रेणी । तिहीं दुन्दुभि वाजविल्या गगनीं । नरदुन्दुभि मृत्युभुवनीं । धर्मावगाहनीं लागल्या ॥ ७४ ॥ समस्त वाजंत्रांचे गजर । नृत्य करिती नृत्यकार । सुमनें वर्षती देवर्षिपितर । गंधर्वकिन्नरमनुजादि ॥ ७५ ॥ ऐसा उत्कट समारंभ । सुज्ञीं साधिला सुकृतलाभ । महिमा जाणोनि तो दुर्लभ । सदंभ-निर्दंभ-दुष्कृतिहीं ॥ ७६ ॥

सस्नुस्तत्र ततः सर्वे वर्णाश्रमयुता नराः । महापातक्यपि यतः सद्यो मुच्येत किल्बिषात् ॥ २१ ॥

ऐसा साधारण समस्त । वर्णाश्रमीं आचारवंत । अनुलोमविलोमकक्षागत । झाले सुस्नात धर्मातळीं ॥ ७७ ॥ त्यांहीहूनि कनिष्ठलोकीं । आर्द्रीं शुष्कीं सांसर्गिकीं । कायिकीं वाचिकीं मानसिकीं । महापातकीं खिळिले जे ॥७८॥ व्रात्य पतित बहिष्कृत । घोरकर्मीं अतिदुष्कृत । तेही ते काळीं सुस्नात । पापनिर्मुक्त जाहले कीं ॥ ७९ ॥ धर्मराजाचे अवभृथस्नानीं । जान्हवीप्रवाहजीवनीं । सर्वांतळीं निमज्जूनी । जाले तेथूनी निष्पाप ॥ १८० ॥ सद्यःकल्मषपाशानि सुटले । दोषसंस्कार आंगींचे फिटले । स्वधर्मकर्मांतें विनटले । दुर्गुण तुटले नैसर्गी ॥ ८१ ॥ अवभृथस्नानीं सुकृतलाभ । झाला ऐसा समस्तां सुलभ । जिये ठायीं पंकजनाभ । वाढवी वालभ भक्तीचें ॥ ८२ ॥ ऐसें सारूनि अवभृथस्नान । वस्त्राभरणादि यजमान । धरिता झाला तें व्याख्यान । कीजे श्रवण सुभगांहीं ॥ ८३ ॥

अथ राजाहते क्षौमे परिधाय स्वलंकृतः । ऋत्विक्सदस्यब्रह्मादीनानर्चाभरणाम्बरैः ॥ २२ ॥

या उपरी युधीष्ठरराजा । द्रौपदीप्रमुख समस्त भाजा । स्नानवस्त्रें फेडूनि ओजा । केलीं नूतन परिधानें ॥ ८४ ॥ महामोलागळीं क्षौमें । कांठीं पदरीं सूत्रें हैमें । निर्जरभोग्यें अमरोत्तमें । जियें परिधानें करिजती ॥ ८५ ॥ तियें धर्में परिधान केलीं । दिव्य भूषणें वरी बाणलीं । तिलक माळा सुमनें धरिलीं । मग पूजिली सुरपंक्ति ॥ ८६ ॥ निर्जरतटिनीतटीं अवभृथ । सारूनि यजमान सालंकृत । वाद्यघोषें आनंदभरित । आला त्वरित मखशाळे ॥ ८७ ॥ मखमंडपीं दिव्यास्तरणें । झाडूनि आस्तरिलीं विस्तीर्णें । यथाधिकारें भूभुजरत्नें । उपविष्ट झालीं ते ठायीं ॥ ८८ ॥ त्यानंतरें ऋत्विक्पूजा । करिता झाला धर्मराजा । चरण प्रक्षाळूनियां ओजा । पादसरोजा अभिवंदी ॥ ८९ ॥ हस्तमात्रा कर्णमात्रा । परिधानार्थ कनकाम्बरा । आच्छादना दिव्य वस्त्रां । परम पवित्रां समर्पी ॥१९०॥ गंधाक्षता टिळे माळा । वरी उधळिला परिमळरोळा । साज्यत्रिवर्ति देदीप्य अनळा । कनकपात्रीं धूप दीप ॥९१॥ दशाङ्गशलाका सुपरिमळ । अर्पिती अग्रीं योजूनि अनळ । एकारती तेज बहळ । उजळी केवळ करकमळें ॥ ९२ ॥ नैवेद्य अमृतोपम उपहार । फल ताम्बूल कार्तस्वर । गो भू अनर्घ्य रत्नभार । दक्षिणा अपार समर्पिली ॥ ९३ ॥ मंगळ दीप पुष्पाञ्जली । अर्पूनि ऋत्विजां चरणकमळीं । प्रदक्षिणा करूनि मौळीं । पादाब्ज वंदी सप्रेमें ॥ ९४ ॥ ब्रह्मादिसदस्यान्त ऋत्विज । यथानुक्रमें जैसे पूज्य । तैसे पूजूनि धर्मराज । अर्ची भूभुज तें ऐका ॥९५॥

बंधुज्ञातिनृपान्मित्रसुहृदोऽन्यांश्च सर्वशः । अभीक्ष्णं पूजयामास नारायणपरो नृपः ॥ २३ ॥

महाराज युधिष्ठिर । यज्ञ नारायण साचार । जाणोनि तेथ प्रेमादर । वर्ते अतितर सद्भावें ॥९६॥ ऋत्विज वेदपरायण । वेद मूर्तिमंत ब्राह्मण । जाणोनि वेदोनारायण । करी अर्चन हरिप्रेमें ॥ ९७ ॥ ना विष्णुः पृथ्वीपतिः । ऐसें बोलती मन्वादि स्मृति । विष्णुप्रतिमा मानूनि चित्तीं । अभेदभक्ती नृप पूजी ॥ ९८ ॥ कुळ शीळ वीर्य शौर्य । स्नेहार्जव प्रेम ऐश्वर्य । धृत धार्मिकता चातुर्य । ते नृपवर्य क्रमें अर्ची ॥९९॥ मुकुटकुंडलें कंठमाळा । अंगदें कटकें मुद्रिकाङ्गुळां । पदकें अवतंस कटिमेखळा । सहित अबळां वामाङ्गीं ॥ २०० ॥ वेणिका मस्तक श्रवण घ्राण । बाहु मणिबंध अंगुळी पूर्ण । मुक्तमाळा कंठाभरण । वनिताभूषणभूपाङ्गें ॥ १ ॥ कटितट गुल्फ पादाङ्गुळें । इत्यादि भूषणें भूषित स्थळें । रत्नखचितें भूषणें अमळें । अर्पूनिं केलीं सालंकृतें ॥ २ ॥ अंतर्वासावरी परिधान । कंचुकी आच्छादन वैरण । आपादगोपक रम्यावरण । इत्यादिवसनसमुच्चय ॥ ३ ॥ कनकताटीं पृथगाकारें । समर्पिजती माद्रीकुमरें । धर्में पूजिलीं नृपओहरें । आनंदगजरें मखशाळे ॥ ४ ॥ गंधाक्षता कुसुममाळा । नैश चूर्णें कुंकुमें अबळा । सिन्दूररेखा मध्यमौळा । नयनीं कज्जळ द्रौपदी दे ॥ ५ ॥ दिव्य धूसर उधळूनि वरी । मोकळीं पुष्पें वाहिलीं शिरीं । धूप दीप दिव्योपहारीं । गंडूषपात्रीं करशुद्धि ॥ ६ ॥ फलताम्बूल उपायनें । राजोपचार भूभुजचिह्नें । समर्पूनियां अतिसम्मानें । भूपाळरत्नें गौरविलीं ॥ ७ ॥ याच प्रकारें बंधुवर्ग । भीष्मप्रमुख पूजिले साङ्ग । स्वयाति मान्य पूजना योग्य । सुभट चांग अर्चियले ॥८॥

आपुले ज्ञातीहूनि इतर । परंतु केवळ प्राणमित्र । यथाधिकारें ते समग्र । पूजिले सादर सद्भावें ॥ ९ ॥ व्याही जामात भागिनेय । श्वशुर माउसे मातुळतनय । साडू श्यालक सुहृदनिचय । अर्चीं कुरुवर्य सद्भावें ॥२१०॥ याही वेगळ्या समस्त जाति । वर्ण उपवर्ण राजप्रकृति । पूजिता झाला धर्म नृपति । भगवत्प्रीति लक्षूनी ॥ ११ ॥ याञ्चे रहित याचक केले । कीर्ति वर्णित दिगंतीं गेले । उज्ज्वळ यशें ब्रह्माण्ड भरिलें । कौरवपाळें यज्ञान्तीं ॥ १२ ॥ नृपांनिकटीं नृपांगना । पूजितां कथिलें वसनाभरणा । सिंहावलोकें कवींचा राणा । करी व्याख्याना तें ऐका ॥ १३ ॥

सर्वे जनाः सुररुचो मणिकुंडलस्रगुष्णीषकंचुकदुकूलमहार्घ्यहाराः ।
नार्यश्च कुंडलयुगालकवृंदजुष्टवक्त्रश्रियः कनकमेखलया विरेजुः ॥ २४ ॥

धर्मराजें सुपूजित । सर्व भूभुज अंगनांसहित । बंधु ज्ञाति मित्र आप्त । सुहृद समस्त जनपदही ॥१४॥ ऐसे स्वर्चित सर्वजन । रुचिराभरणीं शोभायमान । शोभते जाले अमरांहून । मर्त्यभुवनीं सम्मानें ॥१५॥ जडित मुकुट नृपांच्या मौळीं । इतरां उष्णीषें मौलागळीं । मणिमय कुंडलें श्रवणयुगळीं । मुक्तमाळा रत्नहार ॥ १६ ॥ कौशेय पीताम्बर परिधानें । कंचुकोपकंचुक अंगत्राणें । चरणकंचुक सुरंग वसनें । दिव्य प्रावरणें अमूल्य ॥ १७ ॥ कंठीं आपाद सुमनमाळा । कुसुमावतंस खोंविले मौळा । गंधाक्षता परिमळउधळा । यज्ञशाळा मघमघित ॥ १८ ॥ अनर्घ्यरत्नमणींचे हार । केयूरांगदें कटकें रुचिर । मुद्रिकामंडित चंचळ कर । स्वर्चित ते नर सुर गमती ॥ १९ ॥ तैशाच नारी दिव्याभरणीं । सुभगा लावण्यललामश्रेणी । दिव्य कुंडलें जडित रत्नीं । श्रवणभूषणीं विराजती ॥२२०॥ अलकग्रथित वेणिका पृष्ठीं । ग्रथिल्या दिव्याभरणाभीष्टीं । मस्तकीं मौळभूषणांची थाटी । मुक्ताजाळिया उज्ज्वळिता ॥२१॥ वेणिका मौळें ग्रथिलीं सुमनीं । अमूल्य मुक्ताफळें घ्राणीं । मंगळसन्निभ गोमेदमणी । समुक्त नथनी लेइलिया ॥ २२ ॥ दंतीं वज्रमणींच्या पंक्ति । ताम्बूलरंगें सुरंग दीप्ति । माणिक्यप्रभा वोप देती । मंदस्मितीं प्रकाशतां ॥ २३ ॥ गळसरिया कृतकृष्णमणि । तदनुक्रमें मुक्तश्रेणि । एकावळी कंठाभरणीं । अनर्घ्य पदकें विराजती ॥ २४ ॥ बाहुभूषणें रत्नजडित । चुडे मनगटीं पुरटघटित । मुद्रिका कराग्रीं झळकत । ते प्रभा फांकत नभोगर्भीं ॥ २५ ॥ परिधान पीताम्बर पट्टकुलें । रत्नें जडिलीं स्वर्णमेखळे । झणत्कारिती वांकी वाळे । अंदु नूपर रुणझुणिती ॥ २६ ॥ अणवट जोडवीं पोल्हारे । विरोद्या झिणिया वृश्चिकाकारें । इत्यादि मंडित अळंकारें । वनिताशरीरें विराजती ॥ २७ ॥ एवं धर्मराजें अध्वरीं । सर्वही पूजिले यथाधिकारीं । शोभती सालंकृत नरनारी । अमराप्सरीपाडिपाडें ॥२८॥

अथर्त्विजो महाशीलाः सदस्या ब्रह्मवादिनः । ब्रह्मक्षत्रियविट्शूद्रा राजानो ये समागताः ॥ २५ ॥

या नंतरें ऋत्विजगण । सदस्य ब्रह्मवादी ब्राह्मण । शालाधिकारी भिन्न भिन्न । पृथक्प्रयोजननियमित जे ॥ २९ ॥ ब्राह्मण क्षात्रिय वैश्य शूद्र । वर्णोपवर्ण जन अपार । देशोदेशींचे नृप समग्र ।

पाहों अध्वर जे आले ॥२३०॥ देवता कोटि या वेगळ्या । धर्माध्वरा पाहों आल्या । धर्मराजें ज्या पूजिल्या । त्याही कथिल्या जाताती ॥ ३१ ॥

देर्षिपितृभूतानि लोकपालाः सहानुगाः । पूजितास्तमनुज्ञाप्य स्वधामानि ययुर्नृप ॥ २६ ॥

नारदप्रमुख देवर्षिगण । मरीचिप्रमुख महर्षि जाण । वसिष्ठादि ब्रह्मिष्ठ मान्य । अपर तपोधन भूसुर जे ॥ ३२ ॥ कव्यवाट्प्रभृति पितर । भूजलप्रभृति भूतनिकर । अष्टकाष्ठांचे दिगीश्वर । सहानुचर जे आले ॥ ३३ ॥ यज्ञप्रसंगें युधिष्ठिरें । सर्व पूजिले यथोपचारें । परम संतुष्ट प्रेमादरें । आज्ञा घेती धर्माची ॥ ३४ ॥ आज्ञा दिधालिया यजमानें । करिती स्वधामा प्रयाणें । गगनमार्गें व्योमयानें । देदीप्यमानें जन पाहती ॥ ३५ ॥ ज्या ज्या भुवना जे जे जाती । ते ते प्रशंसा तेथ करिती । ते तूं अवधारीं भूपती । म्हणे सुमती शुक वक्ता ॥ ३६ ॥

हरिदासस्य राजर्षे राजसूयमहोदयम् । नैवातृप्यन्प्रशंसंतः पिबन्मर्त्योऽमृतं यथा ॥ २७ ॥

क्षत्रियांमाजी ब्रह्मनिष्ठ । राजसूयमखयाजी कर्मठ । राजर्षि हें नाम स्पष्ट । म्हणती श्रेष्ठ युधिष्ठिरा ॥३७॥ आणि कृष्णाचें दास्य करी । कृष्ण वोळगे ज्याचे घरीं । प्रेमें भजती परस्परीं । यास्तव म्हणती हरिदास ॥ ३८ ॥ धर्म राजर्षि हरिदास । तयाच्या यज्ञाचा विशेष । प्रशंसिती सावकाश । स्वमुखें यश वर्णूनी ॥ ३९ ॥ राजसूयाचा महोदय । धर्मा ऐसा अपर राय । करूं न शके लोकत्रय । जरी वशवर्ती जालिया ॥ २४० ॥ धर्म हरिदास सप्रेममळ । धार्मिक राजर्षि केवळ । म्हणोनि श्रीकृष्ण अळुमाळ । कोठें विकळ हो नेदी ॥ ४१ ॥ चरणक्षालनाचें काम । स्वयें आंगवी मेघश्याम । नीचपरिचर्ये निःसीम । उच्छिष्ट पात्रें विसर्जी ॥ ४२ ॥ पीताम्बराची घालूनि कांस । सांवरूनियां कौस्तुभास । निजदासांचा होऊनि दास । नीच कृत्यांस न लाजे ॥ ४३ ॥ सोळा सहस्र अंतःपुरा । अष्टोतरशत पट्टदारा । देखतां राबे नीच किङ्करा । सम कामारा होऊनियां ॥ ४४ ॥ निर्जरविभवांचिया श्रेणी । जिचिया अपाङ्गमात्रें करूनी । ते श्री लंपट ज्याचे चरणीं । तो मखसदनीं दास्य करीं ॥ ४५ ॥ ऐसा धर्माचा महोदय । म्हणोनि साङ्ग राजसूय । संपादला यदर्थीं काय । महदाश्चर्य मानावें ॥ ४६ ॥ नहुष ययाति सगर शिबी । श्वेतकिप्रमुख वरिष्ठ विभवीं । तथापि धर्माध्वरगौरवीं । न तुळती दिवि भव विधिही ॥ ४७ ॥ ऐसे स्वधामा जे जे जाती । मख शंसितां ते न धाती । अमृत प्राशितां मर्त्याप्रती । नोहे तृप्ति जयापरी ॥ ४८ ॥ कीं स्तनपा स्तनपान । कीं कामुकां कामिनीध्यान । नातरी दरिद्रियां धनागम । होतां मन अतृप्त ॥ ४९ ॥ तेवि आपुल्या स्वधामा जातां । न धाती धर्ममखा शंसितां । असो ऐसी मखसाङ्गता । भामाकान्तास्तव जाली ॥ २५० ॥ आज्ञा मागूनि धर्माप्रती । सर्व आपुल्या स्थळा जाती । तैं युधिष्ठिर सप्रेमभक्ति । सुहृदांप्रति राहवीतसे ॥ ५१ ॥

ततो युधिष्ठिरो राजा सुहृत्संबंधिबांधवान् । प्रेम्णा निवासयामास कृष्णं च त्यागकातरः ॥ २८ ॥

भूतळ जिङ्कूनि निष्कंटक । राजसूया सारिखा मख । निर्विघ्न संपला सम्यक । उत्कट हरिख धर्मातें ॥ ५२ ॥ पादपीठा प्रणतमौळी । राजे झाले संग्रामशाळी । इंद्रप्रस्थीं सुकृतबहळीं । धर्मराजा विराजला ॥ ५३ ॥ सुरमंडळीं अमरपति । तेंवि भूतळीं धर्मनृपति । साम्राज्यविभवें चक्रवर्ती । उज्ज्वल कीर्ति त्रिजगांत ॥ ५४ ॥ ऐसी धर्ममखसाङ्गता । सिद्धि आंगीं बाणली असतां । मुनि सुर नृपति आज्ञा घेतां । राहवी तत्वता सुहृदांतें ॥ ५५ ॥ आग्रह करूनि बहुतां परी । द्रुपद विराट सह परिवारीं । शल्य कुन्तिभोजयदुभारीं । श्रीकृष्णातें राहवीतसे ॥ ५६ ॥ एकल्या कृष्णासी राहवितां । आग्रह करी मन्मथजनिता । म्हणोनि समस्तां सुहृदां आप्तां । राहवी तत्वता युधिष्ठिर ॥ ५७ ॥ श्रीकृष्णाचा वियोग सहसा । क्षणही न साहवे मानसा । यालागीं सोयरियां अशेषां । राहवी परेशास्तव भावें ॥५८॥ वना जातां धेनु तानी । वत्स जैसे युगान्त मानी । धर्मा मानसीं तैसीच ग्लानी । रुक्मिणीजानी जाणतसे ॥ ५९ ॥ जाणोनि धर्माचें अंतर । तैसाचि विव्हळ कमळावर । इंद्रप्रस्थीं झाला स्थिर । द्वारके परिवार प्रेरूनी ॥ २६० ॥

भगवानपि तत्रांग न्यवात्सीत्तत्प्रियंकरः । प्रस्थाप्य यदुवीरांश्च सांबादींश्च कुशस्थलीम् ॥ २९ ॥

जैसा भजे जो मजकारणें । मीही तैसाचि त्या कारणें । ऐसें बिरुद साच करणें । श्रीभगवानें भक्तप्रियें ॥ ६१ ॥ अंग या कोमळ आमंत्रणें । परीक्षितीतें श्रीशुक म्हणे । युधिष्ठिराच्या प्रेमबंधनें । निबद्ध झाला गोविन्द ॥ ६२ ॥ धर्मराजाचा अत्यादर । देखोनि गुंतला रुक्मिणीवर । साम्बादि-यदुवीरांचा भार । केला स्वार द्वारके ॥ ६३ ॥ स्वधामा गेले मुनि निर्जर । स्वदेशा गेले नृप भूसुर । द्वारके गेले यादवभार । राहिला श्रीधर धर्मापें ॥ ६४ ॥ ऐसा जो जो मनोरथ । धर्में केला अत्यद्भुत । तो तो पुरवी कृष्णनाथ । प्रेमासक्त होत्साता ॥ ६५ ॥

इत्थं राजा धर्मसुतो मनोरथमहार्णवम् । सुदुस्तरं समुत्तीर्य कृष्णेनासीद्गतज्वरः ॥ ३० ॥

यमधर्माचा अवतार । तो हा राजा युधिष्ठिर । म्हणोनि धर्मसुतनामोच्चार । व्यासकुमर प्रशंसी ॥ ६६ ॥ तो धर्मसुत धर्मराव । मनोरथाचा महार्णव । परम दुस्तर जो अथाव । श्रीकृष्णनावबळें तरला ॥ ६७ ॥ निष्कंटक धरातळ । जाले वशवर्ती भूपाळ । ब्रह्मांडमंडित यश उज्ज्वळ । लाधला केवळ श्रीकृष्णकृपा ॥ ६८ ॥ ऐसा कृष्णाचे कृपेकरून । राजसूयमुख संपादून । झाला विजयसुखसंपन्न । नित्य निमग्न स्वानंदीं ॥ ६९ ॥ दुस्तर मनोरथसागर । उतरूनि गेला पैल पार । कृष्णयोगें सुखनिर्भर । विगतज्वर यास्तव तो ॥ २७० ॥ ऐसा साम्राज्यभद्रपीठीं । समस्तनृपांचिये मुकुटीं । धर्म विराजला जगजेठी । जेंवि परमेष्ठी सुरचक्रीं ॥ ७१ ॥ यावरी बादरायणि पुसे । निरोपिलें तव प्रश्नासरसें । तें निरूपण तव मानसें । कथिलें तैसें अवगमिलें ॥ ७२ ॥ धर्मलक्ष्मी प्रकाशमान । देखूनि त्रिजगा आनंद पूर्ण । तें न साहे दुर्योधन । काय म्हणोन हे शंका ॥ ७३ ॥ ये शंकेच्या निरसना । पुढती कथिलें

अवभृथस्नाना । यज्ञारंभीं कोणकोणां । कार्ययोजना निरूपिली ॥ ७४ ॥ धनाध्यक्ष दुर्योधन । भावी कार्यार्थ जाणून । कृष्णें केला सम्मानून । तेंही निरूपण तुज केलें ॥ ७५ ॥ यावरी कथेचा उपसंहार । ऐकोनि शंकेचा परिहार । करावया रहस्यसार । चमत्कार निरूपितों ॥ ७६ ॥

एकदान्त.पुरे तस्य वीक्ष्य दुर्योधनः श्रियम् । अतप्यद्राजसूयस्य महित्त्वं चाच्युतात्मनः ॥ ३१ ॥

राजा म्हणे जी सर्वज्ञा । हेचि आवडी माझिया मना । कैसा विषाद दुर्योधना । संभवला तें ऐकावें ॥ ७७ ॥ हें ऐकूनि व्यासतनय । म्हणे श्रवणीं सादर होय । धृतराष्ट्रात्मज कौरवराय । कोण्हे एके दुःसमयीं ॥ ७८ ॥ धर्मराजाचे अंतःपुरीं । पाहोनि उद्दाम ऐश्वर्यश्री । संतापला अभ्यंतरीं । विषाद शरीरीं प्रज्वळिला ॥ ७९ ॥ दुग्धें बाचटे नवज्वर । तैलें प्रोक्षितां वैश्वानर । हस्तें स्पर्शितां विखार । तेंवि गान्धार संक्षुब्ध ॥ २८० ॥ आणि राजसूयमखाच्या ठायीं । युधिष्ठिरमहिमा लोकीं तीन्ही । नरसुरपितरीं गाइला तोही । अवलोकूनि निजनयनीं ॥ ८१ ॥ राजसूयाचें अगाधपण । साद्यंत साङ्गोपाङ्ग अविघ्न । धर्म अच्युतात्मा म्हणोन । सिद्धी यजन हें गेलें ॥ ८२ ॥ ऐशी विश्वतोमुखीं कीर्ति । ऐकूनि दुर्योधनदुर्मति । परम संतापला चित्तीं । तें तूं नृपति अवधारीं ॥ ८३ ॥

यस्मिन्नरेंद्रदितिजेंद्रसुरेंद्रलक्ष्मीर्नाना विभांति किल विश्वसृजोपकॢप्ताः ।
ताभिः पतीन्द्रुपदराजसुतोपतस्थे यस्यां विषक्तहृदयः कुरुराडतप्यत् ॥ ३२ ॥

धर्मराजाच्या अंतःपुरीं । लक्ष्मी गान्धारें देखिली पुरी । अपर भूमंडळावरी । कोण्हां घरीं ते नाहीं ॥ ८४ ॥ लक्ष्मीशब्दें बोलिजे शोभा । सुरनरपार्थिवां सदनीं प्रभा । त्या सर्वही युधिष्ठिरसभा । सदनगर्भामाजि वसती ॥ ८५ ॥ नरसुरासुरां घरींच्या लक्ष्मी । तितुक्या धर्माचे सभासद्मीं । असुर विश्वस्रष्टा मयनामीं । तेणें स्वकर्मीं प्रकटिलिया ॥ ८६ ॥ त्या मयनिर्मिता नाना विभूती । धर्ममंदिरीं विराजती । तिहीं सहित द्रौपदी सती । पाण्डवां प्रती उपासिते ॥ ८७ ॥ म्हणाल लक्ष्मीशोभा मात्र । देखूनि भुलती बालिशनेत्र । तैसें नव्हे जें स्वतंत्र । ऐश्वर्यपात्र त्रिजगाचें ॥ ८८ ॥ शक्रप्रमुख अमरां सदनीं । हिरण्याक्षप्रमुखदितिजां भुवनीं । विप्रचित्त्यादि असुरायतनीं । ललामश्रेणी प्रचुर श्री ॥ ८९ ॥ मनुपुत्रादिभूपां गृहीं । जिया समृद्धि विलसती पाहीं । तिया समस्ता धर्मा निलयीं । भाग्योदयीं विराजती ॥ २९० ॥ तिच्या विभूती सालंकृता । तिहींशीं मंडित द्रुपदसुता । जिये अंतःपुरीं तत्त्वता । उपासी पार्था सतीधर्मे ॥ ९१ ॥ सुभगा कुशला शतशा दासी । सादर द्रौपदीचिये आज्ञेसी । असतां स्वयेंचि पाण्डवांसी । प्रेमें उपासी पाञ्चाळी ॥ ९२ ॥ सालंकृता वसनाभरणीं । सुभगा सलज्जा लावण्यखाणी । चातुर्यमंडित सर्वसद्गुणीं । देखोनि तरुणी हरिणाक्षी ॥ ९३ ॥ तियेच्या ठायीं आसक्त चित्त । पूर्वींच विषादें होतां ज्वरित । धर्मलक्ष्मी द्रौपदीयुक्त । देखोनि संतप्त गान्धार ॥ ९४ ॥ ऐसें धर्मान्तःपुर । तेथें कृष्णवनितांचें सहस्र । सर्वाभरणीं सालंकार । तेंही रुचिर अवधारा ॥ ९५ ॥

यस्मिंस्तदा यदुपतेर्महिषीसहस्रं श्रोणीभरेण शनकैः क्वणदङ्घ्रिशोभम् ।
मध्येसुचारु कुचकुंकुमशोणहारं श्रीमन्मुखं प्रचलकुंडलकुंतलाढ्यम् ॥ ३३ ॥

अष्टनायिका पट्टमहिषी । म्हणाल अपर गौण विलासीं । ऐसें नव्हे तो हृषीकेशी । वर्ते सर्वांसीं समभावें ॥ ९६ ॥ एकलक्ष्मीचे अवतार । श्रीकृष्णाचें अंतःपुर । सम सद्गुणीं सोळा सहस्र । साष्ट शतोत्तर महिषी ॥ ९७ ॥ महिषीसहस्र हें एकवचन । बहुत्वाचें उपलक्षण । समाहारार्थक व्यासनंदन । वदला म्हणोन जाणावें ॥ ९८ ॥ तें महिषीसहस्र कैसें । वाखाणिलें विशेषणवशें । श्रोतीं श्लोकान्वयविशेषें । जाणिजे ऐसें सुचविलें ॥ ९९ ॥ क्वणित भूषणें मंदगमनीं । शोभायमान तिहीं चरणीं । महिषीसहस्र ऐसें सुज्ञीं । प्रतिविशेषणीं जाणावें ॥ ३०० ॥ मेखळा निबद्ध श्रोणीतटीं । क्वणित कंकणें मणगटीं । झणत्कारिती क्षुद्रघंटी । तेणें सृष्टी विराजत ॥ १ ॥ सूक्ष्म मध्य नितंब पृथुळ । नाभि गंभीर कुच वर्तुळ । कुङ्कुमाक्त कुचमंडळ । हार निर्मळ शोणाभ ॥ २ ॥ कुचकुङ्कुमीं संलग्नहार । रुळती तेणें शोण भासुर । येरव्हीं ते धवळतर । कुन्दमंदारकुसुमांचे ॥ ३ ॥ परिधान सुरंग रुचिराम्बरें । कंचुक्या तगटी कनकसूत्रें । करकौशल्यें चित्रविचित्रें । सूचिकारें विनिर्मित ॥ ४ ॥ मौळाग्रभागीं हिमकर तरणी । वरी ग्रथिलिया सुमनश्रेणी । विरचित वेणिका सर्वाभरणीं । कुण्डलें श्रवणीं जडितांचीं ॥ ५ ॥ गंडमंडित कुण्डलप्रभा । मधुकरभासुरकुन्तलशोभा । कुङ्कुमतिलक ललाटीं उभा । कनकसन्निभा वक्त्रश्री ॥ ६ ॥ अंजनरंजित नयनलक्ष्मी । आकर्ण विलसे चंचल पक्ष्मीं । वदनप्रभा सलक्ष्मसोमीं । कविसत्तमीं उपमिजती ॥ ७ ॥ मुक्ताफळभा विलसे घ्राणीं । दशन गमती वज्रमणी । सुरंग ताम्बुलरंगें वदनीं । माणिक्यकिरणीं विकासती ॥ ८ ॥ विद्रुमकान्ति विलसे अधरीं । भाषणीं पियूषरसमाधुरीं । ऐसें महिषीसहस्र चतुरीं । सालंकारीं अवगमिजे ॥ ९ ॥ अल्पज्ञ शंका करितील येथ । नसतां मौळभूषा श्लोकोक्त । विशेष व्याख्यान तें अनुचित । ऐसें प्राकृत जरी म्हणती ॥ ३१० ॥ श्लोकीं वसनें वदला नाहीं । तरी नग्नचि होत्या कायी । एवं मूर्खांची चतुराई । सर्वज्ञांहीं नादरिजे ॥ ११ ॥ लबाड तरमुंड थोताण्डें । क्लिष्टकल्पना बोलूनि तोंडें । पंडितसभेसी हालविती मुण्डें । वृथा पाखाण्डें रूढविती ॥ १२ ॥ हर्षामाजी करिती विष । ऐसे निन्दक जे सदोष । पादत्राणें शिक्षा त्यांस । वृश्चिकासमान मुनि वदती ॥ १३ ॥ धर्मराजाचें अंतःपुर । विशेष मधुपतीचें महिषीसहस्र । सद्गुणमंडित सालंकार । देखोनि गान्धार संतप्त ॥ १४ ॥ द्रौपदी लावण्यरत्नखाणी । हृदयीं रुतली शस्त्राहूनी । तेणें वैक्लव्य दुर्योधनीं । गमे करणीं सन्निपात ॥ १५ ॥ सन्निपात होतां ज्वरिताप्रति । बाह्याचरणीं पडे भ्रान्ति । दुर्योधना ते दशाप्राप्ति । परिसिजे श्रोतीं यावरी ती ॥ १६ ॥

सभायां मयकल्पितायां क्वापि धर्मसुतोऽधिराट् । वृतोऽनुजैर्बंधुभिश्च कृष्णेनापि स्वचक्षुषा ॥ ३४ ॥

कोणे एके अपूर्व दिनीं । मयनिर्मित सभास्थानीं । धर्मराजा सिंहासनीं । अनुज वेष्टुनी विराजला ॥ १७ ॥ बंधु संबंधी सुहृद आप्त । सचिव अमात्य मंत्री समस्त । हितोपदेष्ट्या कृष्णा-सहित मखेन्द्रदीक्षित चक्रवर्ती ॥ १८ ॥ ज्ञानचक्षु जे तिहींकरून । हिताहिताचें परिज्ञान । चार वार्तिक नृपांचे नयन । राष्ट्रदर्शन तद्द्वारा ॥ १९ ॥ ऐशा स्वचक्षूंकरूनि नृपति । सार्वभौम चक्रवर्ती । काञ्चनासनीं धर्ममूर्ति । विराजमान उपविष्ट ॥ ३२० ॥

आसीनः काञ्चन साक्षादासने मघवानिव । पारमेष्ठ्यश्रिया जुष्टः स्तूयमानश्च बंदिभिः ॥ ३५ ॥

रत्नखचित सिंहासन । भद्रपीठ जें देदीप्यमान । तेथ पृथेचा ज्येष्ठनंदन । सुखासीन स्वानंदें ॥ २१ ॥ जैसा इंद्र अमरभुवनीं । विराजमान भद्रासनीं । वेष्टित अमरगणांच्या श्रेणी । तेंवि कुरुमणि विराजला ॥ २२ ॥ पारमेष्ठ्यलक्ष्मी आंगीं । सूतमागधवंधुवर्गीं । स्तवित असतां तत्प्रसंगीं । आला सवेगीं सुयोधन ॥ २३ ॥ कुरु सृंजय कैकयभूप । मत्स्यकोसलप्रमुख अमूप । अजातशत्रु पाण्डुनृप । वेष्टूनि समीप तिष्ठती ॥ २४ ॥ भाट पढती विरुदावळी । पारमेष्ठ्यश्रीसुखकेली । धर्मनंदन स्वधर्म-शाली । उडुमंडळीं शशी जैसा ॥ २५ ॥ कीं अमरमंडळीं जेंवि मघवा । कीं विरांचि विराजे वेष्टित देवां । कीं गगनमंडळीं भुवनदिवा । तेंवि कौरवांसह धर्म ॥ २६ ॥ साम्राज्यविभवें देदीप्यमान । काञ्चनासनीं पाण्डुनंदन । बैसला असतां दुर्योधन । आला आपण तें ऐका ॥ २७ ॥

तत्र दुर्योधनो मानी परीतो भ्रातृभिर्नृप । किरीटमाली न्यविशदसिहस्तः क्षिपन्रुषा ॥ ३६ ॥

ऐसिये धर्मसभेमाझारी । सुयोधन आला कवणेपरी । विषादविषाची आंगीं लहरी । तेणें नादरी सौम्यत्व ॥ २८ ॥ गर्वें पर्वता ऐसा न लवे । देखों न लाहे धर्मविभवें । अनुज बंधु वेष्टित आघवे । नृपगौरवें मुसमुसित ॥ २९ ॥ मुकुट कुंडलें माळा कंठीं । खड्ग कवचानि दक्षिणमुष्टीं । द्वास्थां दापूनि क्षोभदृष्टी । सभे जगजेठी प्रवेशला ॥ ३३० ॥

स्थलेऽभ्यगृह्णद्वस्त्रांतं जलं मत्वा स्थलेऽपतत् । जले च स्थलवद्भ्रांत्या मयमायाविमोहितः ॥ ३७ ॥

सभा घनवटली घनदाट । बंदी करिती स्तोत्रपाठ । भद्रीं धर्मराजा उपविष्ट । तेथ प्रविष्ट सुयोधन ॥ ३१ ॥ मयकृत विस्तीर्ण सभागार । पाहे कौतुकें गान्धार । ठायीं ठायीं होय स्थिर । चमत्कार अवलोकी ॥ ३२ ॥ करकौशल्यें अनुजां दावी । अमरेन्द्रसभेची प्रतिमा भावी । विषाद-संतापोर्मी जीवीं । तेणें ठावी शुद्धि नव्हे ॥ ३३ ॥ पूर्वोक्त सन्निपाताची भ्रान्ति । तेणें उमज न पडे चित्तीं । हरिमायेनें हारिली स्मृति । जाली प्रवृत्ति अनोळख ॥ ३४ ॥ मयकृतमायालाघव नयनीं ।

लक्षित जातां सभास्थानीं । स्फटिकनिबद्धा देखे अवनी । पूर्ण जीवनीं ते मानी ॥ ३५ ॥ चंद्रशाळिका शक्रोपलीं । स्फटिकीं तद्गत भा बिम्बली । नेत्रचंचलता आपुली । तैं तेथ गमली जळभावें ॥ ३६ ॥ सभेमाजी हें प्रशस्त जळ । लंघितां भिजती कंचुकाञ्चळ । म्हणोनि सांवरूनि ते निश्चळ । जातां सकळ नृप हांसती ॥ ३७ ॥ तेणें सलज्ज झाला मनीं । म्हणे मूर्खत्व आलें मजलागूनी । पुढें सकळ चतुष्कोणीं । वापिका देखोनी स्थळ मानी ॥ ३८ ॥ चित्रासनमय चंद्रशालिका । सुरंगजलीं बिम्बली देखा । देखूनि म्हणे समस्त लोका । विस्तीर्ण बैसका आस्तरिली ॥ ३९ ॥ तेथ चालतां नावरी वसना । पदविक्रमें पावे पतना । देखोनि हांसती नृपाङ्गना । भीमसेना सह सभ्य ॥ ३४० ॥ मयमायेनें मोहित झाला । स्थळभ्रान्तीस्तव जळीं पाडिला । धर्माज्ञेनें किङ्करें वाहिला । कडे काढिला ते समयीं ॥ ४१ ॥

जहास भीमस्तं दृष्ट्वा स्त्रियो नृपतयोऽपरे । निवार्यमाणा अप्यंग राज्ञा कृष्णानुमोदिताः ॥ ३८ ॥

गवाक्षमार्गें नृपांच्या सती । भीमेंसहित सर्व नृपती । पाहोनि खदखदां हांसती । उपहासिती स्मितवचनें ॥ ४२ ॥ साम्बश्वशुर दुर्योधन । आमुचा व्याही परम सुज्ञ । म्हणोनि हांसतसे श्रीकृष्ण । दे अनुमोदन नृपवर्गा ॥ ४३ ॥ पार्षद किङ्कर सेवक सकळी । नृपमहिषींची सर्व मंडळी । हांसतां देखोनि तये वेळीं । लज्जा जाहली सुयोधना ॥ ४४ ॥ हस्तसंकेतें धर्मराजें । भीमप्रमुख वारूनि राजे । निकट दूत प्रेरूनि बोजे । काढवी सहजें सुयोधना ॥ ४५ ॥ दूतें काढितां दुर्योधन । भवतें पाहे सलज्जनयन । द्रौपदी हांसतां अवलोकून । मनीं कृशानसम धडके ॥ ४६ ॥ धर्मराजें दिव्य वसनें । देऊनि गौरविला सम्मानें । परंतु उपहासिला भीमसेनें । समर्म वचन बोलूनी ॥ ४७ ॥ पुढें मयकृतसभे प्रति । पाहों पवाडे सुयोधन नृपतिं । स्फटिककपाटीं द्वारीं पिहितीं । रिघों जातां शिर आदळे ॥ ४८ ॥ तेणें पडिला मागिली सवां । लज्जायमान झाला तेव्हां । पुढें पुढें जंव करी रिघावा । मयकृतमावा नेणोनी ॥ ४९ ॥ पुढें गोमेदमय चौकटी । पाचूचिया मुक्तकपाटीं । पिहित नसतां भासती दृष्टी । पिहितपरिपाटीं नयनातें ॥३५०॥ लोटूं जातां कपाटजोडे । सुभरें पडे पुढिल्या तोंडें । देखोनि हांसती मागें पुढें । तेणें रोकडें मन दुखवे ॥ ५१ ॥ तये समयीं भीमसेन । म्हणे धृतराष्ट्राचा तूं नंदन । साच केलें जनकाभिधान । शतसंताना माजिवडें ॥ ५२ ॥ असो हें कथिलें सभापर्वीं । येथें शुकोक्ति वाखाणावी । दुर्योधनातें विषाद तावी । गोष्टी आघवी ते ऐका ॥ ५३ ॥

स व्रीडितोऽवाग्वदनो रुषा ज्वलन्निष्क्रम्य तूष्णीं प्रययौ गजाह्वयम् ।
हाहेति शब्दः सुमहानभूत्सतामजातशत्रुर्विमना इवाभवत् ।
बभूव तूष्णीं भगवान्भुवो भरं समुज्जिहीर्षुर्भ्रमति स्म यद्दृशा ॥ ३९ ॥

तों दुर्योधन लज्जायमान । क्रोधें हृदयीं प्रज्वळोन । सभे माजी अधोवदन । गेला निघोन दृढ मौनें ॥ ५४ ॥ गजाह्वय जें हस्तिनापुर । पावला अनुजांसीं गान्धार । धर्मसभेंत हाहाकार । महाघोर प्रवर्तला ॥ ५५ ॥ हांसयाचा निकुर झाला । म्हणती दुर्योधन क्षोभला । महाअनर्थ आरंभला । नोहे भला विनोद हा ॥ ५६ ॥ महाभिमानी दुर्योधन । सर्व गर्वाचा उदधि पूर्ण । मंत्री शकुनि दुःशासन । आणि कर्ण कुटिलात्मा ॥ ५७ ॥ दुष्टचतुष्टय एके ठायीं । होऊनि कैवाड रची कायी । न कळे म्हणूनि आपुले ठायीं । अजातशत्रु भय मानी ॥ ५८ ॥ त्रिभुवन जिंकावयालागीं । पुरता प्रताप पाण्डवां आंगीं । परी कौरवांचे कुटिळप्रसंगीं । राहे उगी मति शक्ति ॥ ५९ ॥ विस्मयें प्रस्तावलियावरी । विमनस्क युधिष्ठिर अंतरीं । म्हणे गान्धारें घातलें घोरीं । विषादें भरीं भरूनियां ॥३६०॥ तेथ असतां स्वयें कृष्ण । स्तब्ध राहिला धरूनि मौन । भूतभविष्यद्वर्तमान । जाणे सर्वज्ञ भगवंत ॥६१॥ षड्गुणैश्वर्यमंडित । तो सर्वज्ञ भगवंत । म्हणे साधलें अवतारकृत्य । भूभार समस्त उतरिला ॥ ६२ ॥ भूभार उतरावयाचें बीज । लक्षूनियां अधोक्षज । गान्धारविषादाचें काज । सहजीं सहज योजियलें ॥ ६३ ॥ भूभारहरणेच्छामात्रें । दुर्योधनातें कमळामित्रें । लक्षितां त्याचीं भ्रमलीं नेत्रें । विषादें गात्रें बाचटलीं ॥ ६४ ॥ ज्या कृष्णाचे दृष्टीकरून । भ्रान्त केला दुर्योधन । मयमायेचें निमित्त पूर्ण । पावला अपमान जळभ्रान्ती ॥ ६५ ॥ द्रौपदीप्रमुखवनिताहासें । विशेष भीमाच्या उपहासें । संतापला क्रोधावेशें । लज्जा मानसें मानूनी ॥ ६६ ॥ कृष्णें ऐसें स्वदृक्पातें । भूभारहरणाचें बीज पुरतें । दुर्योधनहृदयीं निरुतें । विषादरूपें आरोपिलें ॥ ६७ ॥ पुढें विषादें दुर्योधन । द्यूतीं धर्मातें जिङ्कून । द्रौपदीचें वस्त्राहरण । वनप्रयाण करवील ॥ ६८ ॥ द्वादशाब्द पांडवांप्रति । द्रौपदीसहित वनीं वसति । नष्टचर्याची प्रवृत्ति । गुप्तस्थिति त्रयोदशीं ॥ ६९ ॥ महाभारतीं हा इतिहास । वदला सविस्तर श्रीव्यास । हरियशःप्रसंगें परीक्षितीस । कथिला उद्देश भागवतीं ॥३७०॥ इतुकें सांगूनि राया प्रति । उपसंहरणाचिये रीति । राजसूयमखसमाप्ति । करी सुमति तें ऐका ॥ ७१ ॥

एतत्तेऽभिहितं राजन्यत्पृष्टोऽहमिह त्वया । सुयोधनस्य दौरात्म्यं राजसूयमहाक्रतौ ॥ ४० ॥

इह म्हणिजे इये क्षणीं । राजसूयमखव्याख्यानीं । त्वां मज पुशिलें आशंकोनी । ज्या कारणास्तव राया ॥ ७२ ॥ तें हें तुझें म्यां अभिहित । राया निरोपिलें समस्त । राजसूयमखा आंत । दुर्योधनकृत दौरात्म्य ॥ ७३ ॥ त्यावरी मयकृतसभास्थानीं । स्थळजळभ्रांन्तीचिये पतनीं । हास्य करितां सर्व जनीं । गेला लाजोनी सक्रोधें ॥ ७४ ॥ इतुकें तव प्रश्नाचें बीज । सविस्तर कथिलें कीं ना तुज । पुढें द्वारके अधोक्षज । जाईल सहज तें ऐका ॥ ७५ ॥ पंचसप्ततितमाध्याय । संपला यावरी रुक्मिणीप्रिय । द्वारके

जाऊनि करील काय । तो अध्याय पुढें असे ॥ ७६ ॥ वक्ष्यमाण षट्सप्तति । माजि शाल्व द्वारके प्रति । जाऊनि प्रद्युम्ना गदाघातीं । मूर्च्छाप्राप्ती करील ॥ ७७ ॥ तिये कथेसि सावधान । श्रोतीं होऊनि कीजे श्रवण । इहामुत्रें कैवल्यसदन । अखिल कल्याण हरिवरदें ॥ ७८ ॥ प्रतिष्ठानाचिद्ब्रह्मसदनीं । श्रीएकनाथ भद्रासनीं । चिदानंदें स्वानंददानी । गोविन्दसद्गुणी दयार्णव ॥ ७९ ॥ श्रीमद्भागवत-दशमस्कंध । टीका हरिवरद अगाध । दयार्णवकृत परम विशुद्ध । अध्याय प्रसिद्ध पंचसप्ततितम ॥३८०॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुक-परीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां राजसूयसमाप्तिदुर्योधनविषादकथनं नाम पंचसप्ततितमोऽध्यायः ॥ ७५ ॥

श्लोक ४० ॥ टीका ३८० ॥ एवं संख्या ४२० ॥
(चौऱ्याहत्तरावा अध्याय मिळून ओवीसंख्या ३४,५८५)

पंचाहत्तरावा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ७६ वा

श्रीकृष्णपरब्रह्मणे नमः । शुद्धसत्वाचा संभव जयाचे इच्छेचें गौरव । तो म्यां नमिला सद्गुरुदेव । मतिपाटवप्रवर्द्धना ॥ १ ॥ तत्प्रसादें उपलब्ध धिषणा । लाहूनि दशमाचिया या व्याख्याना । देशभाषा कथिलें जाणा । राजसूययज्ञपर्यंत ॥ २ ॥ यावरी षट्सप्ततितमाध्यायीं । इंद्रप्रस्थाहूनि शेषशायी । द्वारके जाऊनि शाल्वमायी । मारिला तेंही अवधारा ॥ ३ ॥ धर्मराज राजसूय । संपादूनि तो महोदय । सौभपति जो शाल्वराय । शलभप्राय संहारिला ॥ ४ ॥ तो इतिहास लक्षूनि पुढें । परीक्षितीतें निजनिवाडें । शुकाचार्य म्हणे कोडें । ऐकें पवाडे कृष्णाचे ॥ ५ ॥

अथान्यदपि कृष्णस्य शृणु कर्माद्भुतं नृप । क्रीडानरशरीरस्य यथा सौभपतिर्हतः ॥ १ ॥

राजासूयमखाच्या व्याजें । मागध वधूनि सोडिले राजे । चैद्यवधान्तीं अधोक्षजें । केलें बीजें द्वारकेशी ॥६॥ धर्मयज्ञें त्रिजगा सुख । एका दुर्योधनासीच कां दुःख । ऐसा तुझा प्रश्न देख । म्यां सम्यक निरोपिला ॥७॥ यावरी आणिक श्रीकृष्णाचें । अद्भुत कर्म ऐकें साचें । लीलेंकरूनि मनुष्याचें । अनुकरण जो संपादी ॥ ८ ॥ अद्भुत कर्में सांगों किंती । जे हे लिहितां न पुरे क्षिती । जैसा मारिला सौभपती । तें प्रस्तुतीं अवधारीं ॥ ९ ॥ सौभ म्हणिजे कैसें काय । सौभपति तो कोण राय । कृष्णहस्तें मरण होय । कोण्या कारणास्तव त्यातें ॥१०॥ तें आख्यान सविस्तर । परिमें कुरुवर्या सादर । जेणें पापाचे गिरिवर । भस्म होती श्रोत्यांचे ॥ ११ ॥

शिशुपालसखः शाल्वो रुक्मिण्युद्वाह आगतः । यदुभिर्निर्जितः संख्ये जरासंधादयस्तथा ॥ २ ॥

तरी सौभपति तो शाल्वराजा । पूर्वी रुक्मिणीस्वयंवरकाजा । शिशुपाळस्नेहाचिया लाजा । भिडतां पैजा यादवेंमीं ॥ १२ ॥ रुक्मिणीचें स्वयंवरकाळीं । यादव येऊनि करिती कळी । मागध-शाल्वप्रमुख बळी । चैद्यें स्वमेळीं मिळविले ॥ १३ ॥ मागधप्रमुख पक्षपाती । चैद्यें आणिले अनेक नृपती । त्यांमाजी शाल्व महारथी । शिशुपाळाचा प्राणसखा ॥ १४ ॥ असो उद्वाहीं अंबिकावना । भीमकी गेली श्रीपूजना । कृष्णें केलें रुक्मिणीहरणा । संकेतसंधि लक्षूनियां ॥ १५ ॥ रुक्मिणीचिया सरल्या निकटा । तिहीं तैं कोल्हाळ केला मोठा । शाल्व प्रतापी वीर लाठा । तेणें वैकुंठा पडखाळिलें ॥ १६ ॥ जरासंधादि प्रबळ राजे । वरवाळले संग्रामकाजें । रुक्मिणी हरिली गरुडध्वजें । ऐकोनि सलज्ज होत्साते ॥ १७ ॥ यादववीरीं तीक्ष्ण बाणीं । केली नृपांची भंगाणी । मागधप्रमुख समरांगणीं । पाठी देऊनि पळाले ॥ १८ ॥ तेथ शाल्व शिशुपाळसखा । म्हणे काळिमा लागला मुखा । यादवें दिधलें अपयशोदुःखा । सर्पासारिखा तें आठवी ॥ १९ ॥ यादवीं संग्रामीं भंगिला । अपयश पाहूनि स्वदेशा गेला । तैं तो प्रतिज्ञा करिता झाला । तें कुरुपाळा अवधारीं ॥ २० ॥

शाल्व. प्रतिज्ञामकरोच्छृण्वतां सर्वभूभुजाम् । अयादवी क्ष्मां करिष्ये पौरुषं मम पश्यत ॥ ३ ॥

सकळ भंगले भूभुजभार । शाल्व बोले तयां समोर । करीन यादवांचा संहार । दृढ निर्धार हा माझा ॥ २१ ॥ प्रतापें समग्र पृथ्वीतळीं । शून्य घालीन यादवकुळीं । आराधूनि शशाङ्कमौळी । यादव समूळीं निर्दाळीन ॥ २२ ॥ माझा पहा हा पुरुषार्थ । जरी मी न करीं यदुकुळा अंत । तरी जननीजठरीं जन्मलों जंत । कीं जितांचि प्रेत अपवित्र ॥ २३ ॥ ऐसी समस्त नृपांचे मेळीं । शाल्वें स्वमुखें प्रतिज्ञा केली । परंतु मूर्खें न विचारिली । योग्यता आपुली तत्कर्मी ॥ २४ ॥

इति मूढः प्रतिज्ञाय देवं पशुपतिं प्रभुम् । आराधयामास नृप पांसुमुष्टिं सकृद्ग्रसन् ॥ ४ ॥

ऐसी प्रतिज्ञा करूनि मूढ । आराधिला चंद्रचूड । नियम केला अति अवघड । तोही उघड अवधारीं ॥ २५ ॥ एकमुष्टिमात्र धुळी । भक्षूनि आराधी चंद्रमौळी । अहोरात्र नियमशाली । करणीं सकळीं समाहित ॥ २६ ॥

संवत्सरान्ते भगवानाशुतोषउमापतिः । वरेण च्छंदयामास शाल्वं शरणमागतम् ॥ ५ ॥

यादवांचा कुळक्षय । करावयार्थ गिरिजाप्रिय । आराधनीं नियतेन्द्रिय । शाल्व जाला चिर-काळ ॥ २७ ॥ स्वल्पसेवनें जो संतुष्ट । उमापति नीळकंठ । आशुतोष हा नामपाठ । करिती वैकुण्ठ विधि शक्र ॥ २८ ॥ आशुतोषही उमापति । शाल्वा तुष्टला वत्सरान्तीं । देखोनि तयाची दुर्मति । नोहें चित्तीं द्रवीभूत ॥ २९ ॥ ते दुर्मति म्हणाल कैसी । शाल्व श्रीकृष्णाचा द्वेषी । यास्तव याच्या संकल्पासी । साफल्य नोहे कल्पान्तीं ॥ ३० ॥ ऐसें जाणोनि उमारमण शीघ्र नोहेचि त्या प्रसन्न ।

तथापि त्याचें अनुष्ठान । क्रूर देखोन प्रकटला ॥ ३१ ॥ कृष्णद्वेष धरिला चित्तीं । म्हणोनि अनुष्ठान-मिषें मती । भ्रंशली यास्तव तोंडीं माती । घाली स्वहस्तीं मुष्टीभरी ॥ ३२ ॥ शंकर म्हणे हा मजला शरण । होऊनि चिन्ती माझें मरण । मम हृत्कमळ जो श्रीकृष्ण । द्वेष्टा पूर्ण हा त्याचा ॥ ३३ ॥ यास्तव संवत्सरपर्यंत । उदास झाला उमाकान्त । शाल्व नियतेन्द्रिय अत्यंत । देखोनि निवान्त प्रकटला ॥ ३४ ॥ याचा संकल्प नोहे सफळ । मूर्ख आणि नियमशीळ । म्हणवी शरणागत केवळ । तरी हा वोफळ टाळावा ॥ ३५ ॥ ऐसिया भावें हर प्रकटला । वरें प्रलोभविता झाला । म्हणे शाल्वा वर माग वहिला । देईन तुजला तो सद्य ॥ ३६ ॥ शाल्वें शंकरा याचिला वर । सावध परिसा तो सादर । कुरुवर्यातें योगेश्वर । करी सविस्तर व्याख्यान ॥ ३७ ॥

देवासुरमनुष्याणां गंधर्वोरगरक्षसाम् । अभेद्यं कामगं वव्रे स यानं वृष्णिभीषणम् ॥ ६ ॥

प्रसन्न जाणोनियां पशुपति । अभीष्ट याची तो शाल्व नृपति । वृष्णिप्रमुखयादवांप्रति । भयाची प्राप्ति ज्या यानें ॥ ३८ ॥ कामग म्हणिजे इच्छिल्या ठाया । ज्या यानावरी आरूढोनियां । सामर्थ्य सैन्येंसीं जावया । कैलासराया मज दे तें ॥ ३९ ॥ मनुष्य अथवा असुर देव । उरग राक्षसगण गंधर्व । भूत प्रेत पिशाचें सर्व । अभेद्य अपूर्व जें यांसी ॥ ४० ॥ इन्द्रादिकांच्या वज्रप्रहारीं । भंगिलें न वचे जें कां समरीं । असुरविद्या मायिकांस्त्रीं । घायीं कठोरीं न भेदवे ॥ ४१ ॥ जें न भेदवे महाराक्षसां । न जळे महासर्पाच्या विषा । भूतप्रेतांचा कोण दशा । जें अभेद्य मनुष्यगंधर्वां ॥ ४२ ॥ जयाची गति लोकत्रयीं । सवेग जाय चिन्तिले ठायीं । वृष्णियादवां भयंकर पाहीं । तें यान देईं मज शंभो ॥ ४३ ॥ ऐसा शान्वें याचितां वर । तथास्तु म्हणे गिरिजावर । मय असुरांचा शिल्पकार । त्यातें शंकर आज्ञापी ॥ ४४ ॥

तथेति गिरिशादिष्टो मयः परपुरंजयः । पुरं निर्माय शाल्वाय प्रादात्सौभमयस्मयम् ॥ ७ ॥

परदुर्गाचा करी जय । यास्तव तो परपुरंजय । सौभनामक त्रिपुरप्राय । निर्मी लोहमय पुर अपर ॥ ४५ ॥ शिवाज्ञेनें शाल्वाप्रति । मयें अर्पिलें कथूनि युक्ति । शाल्वा होतां सौभप्राप्ति । खवळे दुर्मति तो ऐका ॥ ४६ ॥

स लब्ध्वा कामगं यानं तमोधाम दुरासदम् । ययौ द्वारवतीं शाल्वो वैरं कृष्णकृतं स्मरन् ॥ ८ ॥

जैसें याचिलें शिवाप्रति । तैसीच झाली सौभप्राप्ति । स्मरतां अप्राप्य अपरांप्रति । ते यान-संपत्ति लाहूनि ॥ ४७ ॥ गगनगामी कामगयान । चिन्तिल्या स्थळा करी प्रयाण । कामनारूप जें विस्तीर्ण । ज्याचा वर्ण शर्वरवत् ॥ ४८ ॥ नभान्तींची कुहुतमिस्रा । जैसी घनदाट शर्वरप्रचुरा । तेंवि

ज्याचा सान्निध्यवारा । करी नरसुरां अंधवत् ॥ ४९ ॥ अंधकाराचें अधिष्ठान । जें झांकोळी भास्कर-नयन । तेथ इतरांचा पाड कोण । संक्रंदनही अदेखणा ॥ ५० ॥ तें सौभ लाहूनि शाल्वरायें । सवेग पातला द्वारावतीये । रुक्मिणीस्वयंवरींचा डाय । कृष्ण दुर्जय जिणावया ॥ ५१ ॥ रुक्मिणीस्वयंवरीं पराभविलें । हृदयशल्य तें गुल्म झालें । म्हणोनि शंकरा आराधिलें । सौभ याचिलें ज्यासाठीं ॥५२॥ या कृष्णातें यादवांसहित । निर्दाळीन हा स्मरोनि हेत । द्वारावतीये आला त्वरित । अपरकृतान्तसम भासे ॥ ५३ ॥ द्वारकेमाजि नसतां हरी । दुष्टें येऊनि रोधिली पुरी । प्रजा घातल्या महाघोरीं । तें अवधारीं कुरुवर्या ॥ ५४ ॥

निरुध्य सेनया शाल्वो महत्या भरतर्षभ । पुरीं बभंजोपवनान्युद्यानानि च सर्वशः ॥ ९ ॥

महती म्हणिजे प्रचंड सेना । सहित वळंघूनि कामगयाना । द्वारका रोधूनि वनोपवना । करी उद्याना विध्वंस ॥ ५५ ॥ भरतकुळामाजि गहन । यास्तव भरतर्षभ म्हणोन । नृपा संबोधी व्यासनंदन । शाल्वदौर्जन्य परिसावया ॥ ५६ ॥ प्रचंड सेनेच्या संभारीं । शाल्वें रोधिली द्वारकापुरी । केली वनोपवना बोहरी । दुःखें नगरी आक्रंदें ॥ ५७ ॥ अलकावती अमरावती । आर्चिष्मती वरुणावती । पारमेष्ठ्यादि कैलासप्रान्तीं । अमोघयाति तरुवर जे ॥ ५८ ॥ विश्वकर्म्यानें ते तरुवर । द्वारके आणूनि ते सविस्तर । वनें उपवनें पृथगाकार । निर्मिलीं सुखकर सर्वांसी ॥ ५९ ॥ जया वनांमाजि वृक्षीं । अगाधसुकृतीं होऊनि पक्षी । म्हणती हें सुख नाहीं मोक्षीं । जें येथ फळ पक्षीं पाविजे ॥ ६० ॥ जया तरुवरांचिये छाये । बैसतां अजरामरत्व काये । लाहोनि म्हणती कैवल्य काय । विशेष होय शर्मद पैं ॥ ६१ ॥ ऐसीं वनें सुरवरसेव्यें । परमरमणीयें केवळ दिव्यें । ज्यांचा महिमा सजीवकाव्यें । जाणोनि वास्तव्यें वसविती तें ॥ ६२ ॥ तियें वनें खंडिलीं दुष्टीं । नगरीमाजी जनपद कष्टी । निर्घृण करिती शस्त्रवृष्टि । तेणें सृष्टिप्रळय गमे ॥ ६३ ॥

सगोपुराणि द्वाराणि प्रासादाट्टालतोलिकाः । विहारान्स विमानाग्र यान्निपेतुः शस्त्रवृष्टयः ॥ १० ॥

तो जो शाल्व दुर्मति क्रूर । स्मरोनि पूर्वील पराजयवैर । दांत खाऊनियां करकर । करी प्रहार पुरवप्रीं ॥ ६४ ॥ गोपुरें म्हणिजे पुरद्वारें । त्रयोदश खणांची उच्चतरें । दुष्ट भंगिती शस्त्रास्त्रप्रहारें । अग्नियंत्रें प्रेरूनि ॥ ६५ ॥ माडिया भंगिती उच्चतरा । प्रासाद पवळिया दुर्गाकारा । अट्टालिया दामोदरा । यंत्रप्रहारा करिताती ॥ ६६ ॥ माडियांच्या सुरत्न भिन्ती । उंच बैठका सांगों किती । क्रीडास्थानें भंगताती । परमनिघातीं यंत्रांच्या ॥ ६७ ॥ सौभनामक लोहपुर । गगनगर्भी चंचलतर । तेथूनि करिती वज्रप्रहार । भंगिती नगर कृष्णाचें ॥ ६८ ॥ मेघा आडूनि रावणसुत । वानरसैन्या करी घात । तैसाचि शाल्व द्वारके आंत । शस्त्रजीमूत वर्षतसे ॥ ६९ ॥ गगनौनि पडती पर्जन्यधारा । सौभापासूनि शस्त्रमारा । द्वारकेमाजी नारीनरां । दिव्यमंदिरां भंग करी ॥ ७० ॥ आसुरी प्रयोगजनित

विद्या । घोराभिचारकपटमाध्या । त्या मायामयवृष्टि विविधा । परिसा निन्द्या शाल्वाचिया ॥ ७१ ॥

शिलाद्रुमाश्चाशनयः सर्पा आसारशर्कराः । प्रचंडश्चक्रवातोऽभूद्रजसाच्छादिता दिशः ॥ ११ ॥

गगनींहूनि पडे सर्पवृष्टि । तक्षकादि विखार कोटि । नरनारींच्या झोंबतां कंठीं । आकान्त उठी द्वारकेंत ॥ ७२ ॥ शिळावर्षाव होतसे भारी । रत्नखचित मंदिरावरी । पडतां होती ते चकचुरी । तेणें बोहरी जनपदा ॥ ७३ ॥ वृक्ष पडती मोठमोठे । निर्भय ठाव न मिळे कोठें । विजा पडती कडकडाटें । वाळुका घनदाट वरी वर्षे ॥ ७४ ॥ प्रचंड भंवती चक्रवात । धुळी गगनोदरीं भ्रमत । तेणें दिक्चक्र आच्छादित । महा आकान्त पुरगर्भी ॥ ७५ ॥

इत्यर्द्यमाना सौभेन कृष्णस्य नगरी भृशम् । नाभ्यपद्यत शं राजंस्त्रिपुरेण यथा मही ॥ १२ ॥

विधिहरां जो नाभीकारी । त्या कृष्णाची दिव्य नगरी । सौभें त्रासिली नाना परी । दुखः-लहरींमाजी भ्रमे ॥ ७६ ॥ अत्यंत आर्दिता द्वारका । महा आकान्त मांडला लोकां । सुख न पवोनि पावले दुःखा । मारिती हांका आक्रोशें ॥ ७७ ॥ जैसी पूर्वीं त्रिपुरासुरें । मही त्रासिली महानिकरें । तैसींच सौभें कठोरप्रहारें । भंगिली क्रूरें द्वारावती ॥ ७८ ॥ माभापाह्मनि शस्त्रास्त्रवृष्टी । होतां जनपद देखूनि कष्टी । प्रद्युम्न प्रतापी जगजेठी । सक्रोध पोटीं आवेशला ॥ ७९ ॥

प्रद्युम्नो भगवान्वीक्ष्य बाध्यमाना निजा प्रजाः । मा भैष्टेत्यभ्यधाद्वीरो रथारूढो महारथः ॥ १३ ॥

षड्गुणैश्वर्यसंपन्न । जैसा जनक जनार्दन । तैसाचि तदात्मज प्रद्युम्न । आर्दित देखोन निज नगरी ॥ ८० ॥ पीडित देखूनि आपुल्या प्रजा । आवेश न धरे रुक्मिणीतनुजा । प्रजातें नाभीकारूनि बोजा । निघाला पैजा समरंगा ॥ ८१ ॥ मन्मथनामा महारथी । ज्याचा दारुकात्मज सारथी । शस्त्रास्त्रांची करूनि भरती । संग्रामाप्रती उठावला ॥ ८२ ॥ महावीर वीरश्रीकान्त । अपर न पाहोनि संघात । शत्रुसमरीं लोटिला रथ । जेंवि आदित्य तमावरी ॥ ८३ ॥ शंख स्फुरिला वीरश्रीभरें । ऐकूनि यादववीर बावरे । उठावले आवेशें क्रूरें । जेंवि कां वारें अनळेसीं ॥ ८४ ॥ वीर निघाले सग्रामहांवे । त्यांमाजी मुख्यमुख्यांचीं नांवें । कथितों तैसें तां जाणावें । येर आघवे त्यांसरिसे ॥ ८५ ॥

सात्यकिश्चारुदेष्णश्च सांबोऽक्रूरः सहानुजः । हार्दिक्यो भानुविंदश्च गदश्च शुकसारणौ ॥ १४ ॥

अपरे च महेष्वासा रथयूथपयूथपाः । निर्ययुर्दशिता गुप्ता रथेभाश्वपदातिभिः ॥ १५ ॥

सात्यकिनामा जो युयुधान । धनुर्विद्यामंत्रप्रवीण । आणि वैदर्भीनंदन । चारुदेष्ण महारथी ॥८६॥ साम्ब जाम्बवतीचा सुत । समरंगीं अपर कृतान्त । अक्रूर अनुजबंधूंसहित । निघता झाला संग्रामा ॥ ८७ ॥

अक्रूराचे अनुज कोण । श्वफल्कतनय बारा जण । आसंगादि रणप्रवीण । धनुर्विद्यापारग जे ॥ ८८ ॥ आसंग सारमेय मृदुर । मृदुवद्गिरि महाक्रूर । धर्मवृद्ध सुकर्मा क्षेत्र । अरिमर्दन शत्रुघ्न ॥ ८९ ॥ गंधमाद आणि प्रतिबाहु । हे अक्रूराचे अनुज भाऊ । समरीं ज्यांचा धरिती भेऊ । शत्रुसमुदाय प्रबळही ॥ ९० ॥ बारा अक्रूराचे हे अनुज । द्वादश सूर्यासम तेज । तैसेचि दोघे अक्रूरतनुज । उपदेव आणि देववान ॥ ९१ ॥ प्रबळ योद्धा जो कृतवर्मा । हार्दिक्यसंज्ञा ज्याचिया नामा । आणि भानुविन्द ज्या सत्यभामा । कृष्णवीर्यें प्रसवली ॥ ९२ ॥ देवकीची ज्येष्ठ भगिनी । देवरक्षिता वसुदेवपत्नी । तिचे जठरींचा वज्रमणी । वीराग्रणी गद नामा ॥ ९३ ॥ कृष्णानुज म्हणती ज्यातें । जेणें भंगिलें मागधातें । तोही वीरश्रीआवेशातें । मदनासांगातें निघाला ॥ ९४ ॥ आणि शुक्र सारण हे दोन्ही । संग्रामभुवनींचे केवळ तरणी । अपार यादवांचिये श्रेणी । गणना वदनीं वदवेना ॥ ९५ ॥ तुळणा नसेचि कार्मुकास । म्हणोनि वीर ते महेष्वास । जिणे अयुतरथ कर्कश । अतिरथी त्यास म्हणावें ॥ ९६ ॥ संख्यारहित रथियां जिणे । महारथी तयातें म्हणणें । यादव ऐसिये आंगवणे । समराङ्गणा निघाले ॥ ९७ ॥ अयुतरथांची संख्यागणती । त्याचा यूथप तो अतिरथी । अयुतयूथपांचा पती । महारथी यादव तो ॥ ९८ ॥ ऐसे यूथपांचे यूथप । यादवसेनापति अभूप । निघाले समरंगा साटोप । शाल्वदर्पप्रभंजना ॥ ९९ ॥ यूथपा माथां आतपत्राणें । पृथक दुन्दुभि ध्वज निशाणें । द्विभागीं चामरें ढळती तेणें । भासती तुळणे अमरांचे ॥ १०० ॥ आंगीं वज्रकवचें बाणलीं । प्रतापें शस्त्रास्त्रें पराजिलीं । हयगजयानें पालाणिलीं । रथी पदाति सन्नद्ध ॥ १ ॥ यूथ यूथप महारथी । सैन्यवलयें वेष्टित भवतीं । ऐसे अनेक चमूपती । समरक्षिती प्रवेशले ॥ २ ॥ त्यानंतरें युद्ध प्रबळ । शाल्वांयादवांमाजी प्रबळ । कैसें झालें तें प्राञ्जळ । परिसा केवळ रौद्र रसा ॥ ३ ॥

ततः प्रववृते युद्धं शाल्वानां यदुभिः सह । यथाऽसुराणा विबुधैस्तुमुलं लोमहर्षणम् ॥ १६ ॥

असुरांविबुधांमाजी जेंवि । तारकामयसंग्राम पूर्वी । तुमुल झाला तयाची ठेवी । व्यासादि कवि या उपमिती ॥ ४ ॥ महाभीषण रौद्र घोर । ऐकतां रोमाञ्चित शरीर । होय ऐसा संग्राम क्रूर । परस्पर आरंभला ॥ ५ ॥ सौभाश्रयें शाल्वसेना । दिसे न दिसे माजी गगना । तेथूनि वर्षती शस्त्रास्त्रघना । यादवपृतना भूभागीं ॥ ६ ॥ प्रबळ वळिवांचे थेंबुटे । तैसे बाण सणसणाटें । पडती आणि कडकडाटें । महा अस्त्रें सुटताती ॥ ७ ॥ महायंत्रांचिया मारें । भंगती प्रासाद पुरगोपुरें । हें देखोनि रुक्मिणीकुमरें । भिडिजे निकरें तें ऐका ॥ ८ ॥

ताश्च सौभपतेर्माया दिव्यास्त्रै रुक्मिणीसुतः । क्षणेन नाशयामास नैशं तम इवोष्णगुः ॥ १७ ॥

महाप्रयोगकृताभिचारें । सौभ साधिलें शंकरवरें । मायामय ज्याचे अंधारें । पडतां भास्करें हारपिजे ॥ ९ ॥ निबिड मेहुडीं दाटतां गगनीं । विशेष अमावास्येची रजनी । सौभमायेचें तम

त्याहुनी । अलक्ष्य नयनीं सुरासुरां ॥ ११० ॥ तेथ रुक्मिणीजठरींचा ज्येष्ठ । पद्युम्ननामा वीर वरिष्ठ । तेणें सौभमायेचें कपट । केलें सपाट क्षणमात्रें ॥ ११ ॥ पूर्वी शंबरसमरीं युद्धा । शस्त्रदेवता जिया शुद्धा । मन्मथें मंत्रूनि तया क्रुद्धा । सोडूनि विरुद्धा निखंडिलें ॥ १२ ॥ वैष्णवस्त्र तेजःपुञ्ज । सोडितां गगनीं न समाय तेज । सौभतमाचा तिमिरपुञ्ज । लोपला सहज तत्तेजें ॥ १३ ॥ परम दिव्यास्त्रें देदीप्यमानें । प्रेरितां समरंगीं प्रद्युम्नें । निशीतमातें विकर्तनें । तेंवि नाशिलें सौभतमा ॥१४ ॥ सौभमाया जे तामसी । दिव्यास्त्रांच्या महाप्रकाशीं । भंगितां प्रद्युम्नें आपैसी । गोचर झाली शाल्वचमू ॥ १५ ॥ प्रकट दिसतां शाल्वकटक । यदुवीरांतें न वटे अटक । वृष्णिभोजान्ध वीर सुटंक । भिडती नेटक चुटक्यानें ॥ १६ ॥ यादव अवनीं सौभ गगनी । तथापि यदुवीराच्या बाणीं । अर्दिली शाल्याची अनीकिनी । देखती नयनीं सुरासुर ॥ १७ ॥ तिये समयीं रुक्मिणीकुमर । समरीं शाल्वासि म्हणे स्थिर । डोळे झांकूनियां आंधार । करूनि वीर म्हणविसी तूं ॥ १८ ॥ पडिली प्रद्युम्नाशीं गांठी । आतां रिघसी कवणा पाठीं । सौभमायेच्या विसरें गोठी । साहें काठी धीर धरीं ॥ १९ ॥ ऐसें बोलूनि रौक्मिणेय । समरीं करिता झाला काय । तिये कथेचा अभिप्राय कथिता होय शुक राया ॥ १२० ॥

विव्याध पंचविंशत्या स्वर्णपुंखैरयोमुखैः । शाल्वस्य ध्वजिनीपालं शरैः सन्नतपर्वभिः ॥ १८ ॥

शाल्वा पाचारी मन्मथ । तंव शाल्वाचा सेनानाथ । पुढें घालूनि आपुला रथ । रुक्मिणीसुत पडखळिला ॥ २१ ॥ शाल्वसैनिक झाला पुढें । देखूनि प्रद्युम्नें निवाडें । पंचविंशति कुन्हाडें । विंधिलें रोकडें त्या हृदयीं ॥ २२ ॥ तीक्ष्ण तिखयांचीं नाराजें । सुवर्ण पुङ्ख झळकती तेजें । ऐसे सायक मकरध्वजें । भेदिले पैजे रिपुहृदयीं ॥ २३ ॥ पर्वें म्हणिजे शरांच्या ग्रंथी । सुदृढ विश्वकर्म्यानें निगुती । सज्जिल्या तिहीं शरीं दळपती । भेदोनि रथी लोळविला ॥ २४ ॥ जो शाल्वाचा ध्वजिनीपाळ । द्युमन्नामा महाप्रबळ । त्यातें भंगूनि रुक्मिणीबाळ । शाल्वा तत्काळ पाचारी ॥ २५ ॥

शतेनाताडयच्छाल्वमेकैकेनास्य सैनिकान् । दशभिर्दशभिर्नेतॄन्वाहनानि त्रिभिस्त्रिभिः ॥ १९ ॥

प्रद्युम्नवीरें समराङ्गणीं । शाल्व विन्धिला शतबाणीं । शाल्वनिकटीं वीरश्रेणी । एकैक शरीं ताडियल्या ॥ २६ ॥ महावीरांचे सारथि । दश दश बाणीं पृथगाप्राति । भेदूनि पाडिले समरक्षिति । तीं तीं शरीं तुरंगम ॥ २७ ॥ यानें सारथि रथी सुभट । भेदिले वर्षोनि बाणसंघाट । प्रद्युम्नयोद्धा महावरिष्ठ । देखोनि श्रेष्ठ मानवले ॥२८ ॥

तदद्भुतं महत्कर्म प्रद्युम्नस्य महात्मनः । दृष्ट्वा तं पूजयामासुः सर्वे स्वपरसैनिकाः ॥ २० ॥

विशाळ मनाचा निर्धार । तो हा प्रद्युम्न रुक्मिणीकुमर । त्याचें कर्म हें अद्भुततर । देखोनि

स्वपर भला म्हणती ॥ २९ ॥ भला रे भला रुक्मिणीतनया । अक्रूरप्रमुख म्हणती तया । भंगूनि शाल्वसेनाचिया । आश्चर्य डोळ्यां दाखविलें ॥१३०॥ आसंगादि गद सारण । प्रद्युम्नाची आंगवण । देखोनि म्हणती धन्य धन्य । केवळ श्रीकृष्ण अपर हा ॥ ३१ ॥ शाल्वसैनिक शाल्वें सहित । प्रद्युम्नाचें कर्म अद्भुत । देखोनि म्हणती प्रतापवंत । शौर्यें समर्थ हा योद्धा ॥ ३२ ॥ धन्य म्हणोनि उभय दळीं । प्रद्युम्न पूजिला तिये काळीं । त्यावरी शाल्वें कपटमेळीं । माया दाविली ते ऐका ॥३३॥

बहुरूपैकरूपं तद्दृश्यते न च दृश्यते । मायामयं मयकृतं दुर्विभाव्यं परैरभूत् ॥ २१ ॥

क्वचिद्भूमौ क्वचिद्व्योम्नि गिरिमूर्ध्नि जले क्वचित् । अलातचक्रवद्भ्राम्यत्सौभं तददुरवस्थितम् ॥ २२ ॥

सौभ मयकृतमायामय । मयोपदिष्टयुक्तिनिचय । स्मरूनि शाल्व चाळिता होय । अलातप्राय तीव्रजवें ॥ ३४ ॥ प्रद्युम्नप्रमुख यादववीर । पाहती सौभसेनाभार । तंव ते चंचल अत्यंततर । नोहे स्थिर पळमात्र ॥ ३५ ॥ गगनीं पवनीं अवनीं जीवनीं । अनेक रूपें दिसती नयनीं । एक किंवा अनेक म्हणोनी । निश्चय कोणी करूं न शके ॥ ३६ ॥ क्षणैक दिसे क्षणैक न दिसे । दूर समीप यथावकाशें । तर्किलें नवचेचि मानसें । चाञ्चल्यवशें चमत्कृत ॥ ३७ ॥ मयासुराची दैत्यमाया । यास्तव लक्षिलें न वचे राया । अतर्क्य नेत्रां यादवांचिया । भ्रमकर झालें ते काळीं ॥ ३८ ॥ क्षणैक भूतळवटीं दिसे । क्षणैक गगनगर्भीं आभासे । क्षणैक पर्वतमौळीं वसे । क्षणैक विलसे सिन्धुजळीं ॥ ३९ ॥ कोलती आंधारीं गरगर । भवंडितां भासे चक्राकार । न दिसे सांधा भिन्न पदर । तैसें सर्वत्र सौभ दिसे ॥१४०॥ एके स्थळीं स्थिर ऐसें । न वचे निर्द्धारिलें मानसें । मयमायेच्या भ्रमावेशें । लक्षितां दिसे सर्वत्र ॥ ४१ ॥ ऐसें मयमायेचें कपट । तथापि यादववीर सुभट । समराङ्गणीं महाधीट । शरसंघाट वर्षती ॥ ४२ ॥

यत्र यत्रोपलक्ष्येत ससौभः सहसैनिकः । शाल्वस्ततस्ततोऽमुंचन्शरान्सात्वतयूथपाः ॥ २३ ॥

ससैन्य शाल्व जिकडे जिकडे । सौभेंसहित देखतां पुढें । अमोघ विन्धिती कुन्हाडें । यादव गाढे यूथपति ॥ ४३ ॥ परम कर्कश सोडिती बाण । समरीं शाल्वाचे घ्यावया प्राण । मारूं पाहती ससौभ सैन्य । शरौघ तीक्ष्ण वर्षोनी ॥ ४४ ॥ म्हणाल तीक्ष्ण शरौघ कैसे । शुकें वर्णिले उपमावशें । भाषाव्याख्यान श्रोतीं तैसें । निजमानसें जाणावें ॥ ४५ ॥

शरैरग्न्यर्कसंस्पर्शैराशीविषदुरासदैः । पीड्यमानपुरानीकः शाल्वोऽमुह्यत्परेरितैः ॥ २४ ॥

यादव वर्षती तीक्ष्ण बाण । दाहक प्रळयाग्निसमान । कीं कल्पान्तींचे चंडकिरण । तैसें दारुण कडतरती ॥ ४६ ॥ अग्नि सूर्य सर्वांग तावी । मारक मार्गण दाहक तेंवी । सर्पोपमेची ऐका ठेवी । वदती कवी ज्या अर्थें ॥ ४७ ॥ आशीविष हें सर्प नांव । स्पर्शतां कोण्ही एक अवयव । अल्पस्पर्शमात्रें जीव ।

जाय अपूर्व हें याचें ॥ ४८ ॥ यदुवीरांचे तेंसे शर । भेदतां भंगती शत्रुभार । अल्पशराचा स्पर्श मात्र । होतां गात्र अरि त्यजिती ॥ ४९ ॥ ऐसे दुःसह क्रूर मार्गण । पडतां त्रासिला शाल्व ससैन्य । सौभपुरेंसीं भिद्यमान केला म्लान समरंगीं ॥ १५० ॥ वृष्णिभोजान्धयादववीरीं । ससौभ सेनेसीं शाल्ववैरी । सूर्याग्निसर्पासमान शरीं । त्रासिला समरीं प्रतापें ॥ ५१ ॥ म्हणाल शाल्वा शिववरदान । सौभ मयमायाकृत गहन । विशेष प्रतापी प्रचंड सैन्य । कांहीं आंगवण त्या नव्हती ॥ ५२ ॥ ससैन्य शाल्वें तिये समयीं । यादव त्रासिले समस्मही । ऐका समग्र कथितों तेंही । कथाप्रवाहीं अनुक्रमें ॥ ५३ ॥

शाल्वानीकपशस्त्रौघैर्वृष्णिवीरा भृशार्दिताः । न तत्यजू रणं स्वं स्व लोकद्वयजिगीषवः ॥ २५ ॥

शाल्वनृपाचे यूथपति । तिहीं समरीं यादवांप्रति । भेदूनि त्रासिलें बहुतां रीती । परी न डंडळिती अणुमात्र ॥ ५४ ॥ वर्षूनी शस्त्रास्त्रांचे निकर । वृष्णिप्रमुख यादवभार । केले समरंगीं जर्जर । तथापि धीर न सांडिती ॥ ५५ ॥ यादव वीर जे जे ठायीं । होते अधिष्ठूनि रणमही । अणुमात्र सोडिली नाहीं तिहीं । प्रलोभ देहीं धरूनियां ॥ ५६ ॥ विजयी मरूनि वरिजे स्वर्ग । कीं शत्रु भंगूनि कीर्ति चांग । दोहींवीण तिसरा मार्ग । वृष्णि अभंग न जाणती ॥ ५७ ॥ उभय लोक जयाचे चाडे । यादवसमरीं भिडती गाढे । प्राण वांचवावया कुडकुडे । मागिलीकडे न पळती ॥ ५८ ॥ मायावतीची विद्या गहन । शंबरहननार्थ लाधला पूर्ण । तेणें मायावी प्रद्युम्न । गगनीं स्यंदन गतिमंत ॥ ५९ ॥ शाल्व सौभेंसीं पळे जिकडे । प्रद्युम्न रथें वावडे तिकडे । अमोघ वर्षोनियां कुन्हाडें । त्रासिले गाढे रिपुभार ॥ १६० ॥ प्रद्युम्न रथेंसीं लागला पाठीं । ससैन्य शाल्व धुकधुकी पोटीं । सौभ पळवी उठाउठी । देतसे घरटी दिक्चक्रा ॥ ६१ ॥ सौभ उतरतां धरणीतळीं । प्रद्युम्नरथ संघाटतां जवळी । द्युमान्नामा महाबळी । समरशाळी काय करी ॥ ६२ ॥

शाल्वामात्यो द्युमान्नाम प्रद्युम्न प्राक्प्रपीडितः । आसाद्य गदया मौर्व्या व्याहत्य व्यनदद्बली ॥ २६ ॥

शाल्वप्रधान तो समरंगीं । पूर्वीं प्रद्युम्नें ज्या लागीं । पंचविंशति शरीं आंगीं । भंगिला होता भेदूनियां ॥ ६३ ॥ प्रद्युम्नाचा रथ ते काळीं । आला देखूनि घाया तळीं । गदघातें हृदयकमळीं । म्हणोनि बळी लोळविला ॥ ६४ ॥ प्रद्युम्नाच्या हृदयावरी । कठोर गदाप्रहारें वैरी । हाणितां मूर्च्छा दाटली गात्रीं । आली आंधारी स्मरनयना ॥ ६५ ॥ लोहजातीमाजी जें तीक्ष्ण । मौर्वी गदा ते तन्मय जाण । तिणें हृदयीं कृष्णनंदन । ताडूनि दुर्जन गर्जिन्नला ॥ ६६ ॥ प्रद्युम्नासी गदा कठोर । लागतां विकळ रहंवरीं गात्र । पडतां सारथि दारुकपुत्र । करी चरित्र तें ऐका ॥ ६७ ॥

प्रद्युम्नं गदया शीर्णवक्षस्थलमरिंदमम् । अपोवाह रणात्सूतो धर्मविद्दारुकात्मजः ॥ २७ ॥

गदाप्रहारें हृदय चूर्ण । रथीं मूर्छित हरिनंदन । दारुकात्मजें हें जाणोन । रथ तेथून परतविला

॥ ६८ ॥ अरिमर्दना भो परीक्षिती । घायें मूर्च्छित जाणोनि रथी । कुशलधर्मवेत्ता सारथी । समरक्षिती त्यजूनि निघे ॥ ६९ ॥ संग्रामभूमि सांडूनि वेगें । सवेग रहंवर फिरविला मागें । स्वसैन्याच्या पृष्ठभागें । अति लगबगें तो आला ॥ १७० ॥ फिरूनि पाठिमोरी जे गति । अपोवाह म्हणिजे तियेप्रति । तीतें अनुसरला सारथि । मूर्च्छित रथी जाणोनियां ॥ ७१ ॥ मुहुर्तें मूर्छना सावरून । प्रद्युम्न झाला लब्धसंज्ञ । पुसे सारथिया कोपून । तें व्याख्यान अवधारा ॥ ७२ ॥

लब्धसंज्ञो मुहूर्तेन कार्ष्णि. सारथिमब्रवीत् । अहो असाध्विदं सूत यद्रणान्मेऽपसर्पणम् ॥ २८ ॥

सारथियासि पुसे कार्ष्णि । कां अधिष्ठिली सेनापार्ष्णि । अपोवाह समराङ्गणीं । अनर्ह करणी हे तुझी ॥ ७३ ॥ अहो ऐशा खेदेंकरून । म्हणे सारथि या प्रद्युम्न । रणापासूनि जें पलायन । मजलागून अयोग्य हें ॥ ७४ ॥ डाग लाविला तां मम शौर्या । केंवि मुख म्यां दाविजे आर्या । आचरलासि असाधुकार्या । समरीं धैर्या सांडूनी ॥ ७५ ॥

न यदूनां कुले जात: श्रूयते रणविच्युत. । विना मत्सलीवचित्तेन सूतेन प्राप्तकल्मषात् ॥ २९ ॥

आमुचे यदुकुळीं जन्मला । समर सांडूनियां पळाला । ऐसा कोण्हीच न ऐकिला । मजवेगळा भूतभावीं ॥ ७६ ॥ पुरुषार्थरहिता नरा कारणें । अधैर्यास्तव क्लीब म्हणणें । सारथियानें अधैर्यमनें । मज ही दूषणें पाविलीं ॥७७॥ पळतां देखोनि माझा रथ । शत्रु मिरविती पुरुषार्थ । समरीं हांसती वीर समर्थ । तैं हें व्यर्थ जीवितही ॥ ७८ ॥ असो परवीरांची कथा । येतां देखूनि पिता चुलता । त्यांप्रति जाऊनि म्यां भेटतां । काय त्यां पुसतां जय सांगूं ॥ ७९ ॥

किं नु वक्ष्येऽभिसंगम्य पितरौ रामकेशवौ । युद्धात्सम्यगपाक्रांत: पृष्टस्तत्राऽऽत्मन: क्षमम् ॥ ३० ॥

कोण्या तोंडें भेटों तयां । कोण्या साधिलें सांगूं जया । पळालों जीव वाचवावया । समरीं अपजया लाहोनी ॥ १८० ॥ कोण ते सांगू स्वयोग्यता । कोणतें क्षेम प्रशंसूं ताता । इहपरकल्याण समरीं मरतां । अपयशें वांचतां धिक्कार ॥ ८१ ॥ रामकृष्णांची असो कथा । पराजयें मज सदना जातां । माझिया भाउजया समस्ता । हांसती तत्त्वता मजलागीं ॥ ८२ ॥

व्यक्तं मे कथयिष्यंति हसंत्यो भ्रातृजामय: । कर्तव्यं कथं कथं वीर तवान्यै: कथ्यतां मृधे ॥ ३१ ॥

माझिया बंधूच्या अंगना । परस्परें उपहासवचना । नर्मोक्ति त्या समान बाणा । माझिया श्रवणा कडतरती ॥ ८३ ॥ ज्येष्ठा म्हणती भो देवरा । तुम्हांसि पाहूं द्या नोवरा । येथूनि तुम्ही म्हणवा दारा । सहसा संगरा न वचावें ॥ ८४ ॥ वलयें भरा म्हणती एकी । अपरा म्हणती घ्या

कंचुकी । कज्जल कुङ्कुम हरिद्रा मुखीं । शोभवा नाकीं मुक्ताफळ ॥ ८५ ॥ व्यक्त म्हणिजे निश्चयेंसीं । मम क्लीबत्व या उपहासीं । भ्रातृजाया सुहृदांपासीं । अनुकारेंसीं प्रकाशिती ॥ ८६ ॥ कैसे भावोजी समरंगीं । तुम्हीं पलायन केलें वेगीं । क्लीबत्व शोभविलें निजाङ्गीं । कीर्ति त्रिजगीं रूढविली ॥ ८७ ॥ सांगा सांगा कैसें समरीं । ग्लानिवचनें शत्रुनिकरीं । कैशीं वदलां निजवैखरी । किंवा नारी म्हणविलें ॥ ८८ ॥ प्राण रक्षूनि आलां सदनीं । येथें प्रताप बोला वदनीं । बहुत शत्रु मारिले कदनीं । किंवा रदनीं तृण धरिलें ॥ ८९ ॥ ऐशा मेहुण्या भाउजया । मज देखूनि करिती रळिया । ते वाग्बाण सहावया योग्यता । दिधली मज सूता ॥१९०॥ प्रद्युम्न ऐसा सारथियातें रससंसोनियां विषादें बहुतें । निखंदूनि संतप्त चित्तें । म्हणे अनुचित त्वां हें केले ॥ ९१ ॥ हें ऐकूनि सारथि वदे । स्वामी वदलां जें विषादें । ऐसें वदावें अकोविदें । क्षत्रियवृंदें नादरिती ॥ ९२ ॥

॥ सारथिरुवाच ॥ धर्म विजानताऽऽयुष्मन्कृतमेतन्मया विभो । सूतः कृच्छ्रगतं रक्षेद्रथिनं सारथिं रथी ॥ ३२ ॥

विभो समार्था भो भो मदना । कालिमा न लवीं माझिया वदना । समरीं केलें अपसर्पणा । धर्माचरणा जाणूनि ॥ ९३ ॥ धर्म जाणता मी जो तेणें । समरा पासूनि तुज परतवणें । अधर्म नोहे ऐसें मनें । बहुता गुणें जाणावें ॥ ९४ ॥ रथी जर्जर होऊनि घायीं । वीर मूर्च्छित पडते समयीं । सूतें तया प्रति विषम ठायीं । अपोवाही करावें ॥ ९५ ॥ घायीं विकळ पडतां रथी । रक्षणा समर्थ तेथ सारथी । रथ पळविजे पवनगती । समरक्षिती सांइनियां ॥ ९६ ॥ नीतिशास्त्रीं हे सारथिशिक्षा । विदित आहे क्षत्रियां दक्षां । पात्र नोहें मी अधर्मपक्षा । विवरूनि लक्षा आणावें ॥ ९७ ॥ सारथियाचा धर्म ऐसा । रथी पावल्या वैकल्यदशा । अपोवाहित करूनि सहसा । टाळिजे वळसा मूर्च्छेचा ॥ ९८ ॥ पुढती झालिया लब्धस्मरण । रथिया युद्धाची आंगवण । असतां पुढती कीजे रण । सहसा दूषण येथ नसे ॥ ९९ ॥ सारथि विकळ पडतां घायीं । रथस्थें रक्षिजे तिये समयीं । ऐसा प्राचीन धर्म पाहीं । स्मृतिकर्त्यांही लिहिलासे ॥ २०० ॥

एतद्विदित्वा तु भवान्मयाऽपोवाहितो रणात् । उपसृष्टः परेणेति मूर्च्छितो गदया हतः ॥ ३३ ॥

ऐसें शास्त्राचें निर्णीत । जाणोनि म्यां तिरोहित । समरीं करूनि आणिलें येथ । हें अनुचित न मनावें ॥ १ ॥ शत्रुप्रहारें विशीर्ण हृदय । मूर्च्छोपसर्गें विकळ देह । निःसंज्ञ जाणोनि अपोवाह । करणें अहे मज स्वामी ॥ २ ॥ सहसा नव्हे हा मम अन्याय । मन्वादिस्मृतिसंमत हा न्याय । या वरी शत्रूंचा समुदाय । भंगूनि विजय वरा सुखें ॥ ३ ॥ ऐसें दारुकसुत बोलिला । ऐकूनि प्रद्युम्न मानवला । म्हणे सारथिया भला भला । समय रक्षिला यथोचित तां ॥ ४ ॥ इतुकी श्रीशुकगंगातटी । परीक्षितीचे कर्णपुटीं । कथा कथिली ते मन्हाठी । वदला गोठी दयार्णव ॥ ५ ॥ यावरी सांवरूनि मूर्च्छेना । मन्मथ करील समराङ्गणा । पुढिले अध्यायीं त्या कथना । कीजे श्रवणा सत्पुरुषीं ॥ ६ ॥ एकनाथ एक दुसरा

नाहीं । अधिष्ठानीं निविष्ट पाहीं । प्रतिष्ठानीं सगुणविग्रही । देशिकाग्रणी जगदीश ॥ ७ ॥ प्रणता चिदानंददानी । मग ते होती स्वानंदखाणी । गोविन्दनामाच्या चिन्तनीं । सायुज्यभुवनीं विराजती ॥८॥ गोविन्दनामस्मरणोत्सव । लाहतां परिपूर्ण दयार्णव । कृष्णकीर्तीचें गौरव । कथनीं अहे तो झाला ॥ ९ ॥ तें हें हरिवरदव्याख्यान । भावें करिती श्रवण पठन । त्याचें दुर्घट भयखंडन । करील आपण हरिवरदें ॥ २१० ॥ श्रीमद्भागवत दशमस्कंध । टीका हरिवरद अगाध । दयार्णवकृत परम विशुद्ध । अध्याय प्रसिद्ध षट्सप्ततितम ॥ २११ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुक-परीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां शाल्वप्रद्युम्नसमरवर्णनं नाम षट्-सप्ततितमोऽध्यायः ॥ ७६ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु

श्लोक ३३ ॥ ओवी-संख्या २११ ॥ एवं संख्या २४४ ॥
(पंचाहत्तरावा अध्याय मिळून ओवीसंख्या ३४७९६)

कालयुक्ताक्षिके शुक्ले नवम्यामसिते कुजे । शाल्वमन्मथयोयुद्धं पूर्ण पिपिलिकापुरे ॥ १ ॥

शहात्तरावा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ७७ वा

श्रीकृष्णपरमात्मने नमः । कपटविटपपाटनपटो । तव पादाब्जीं वृत्ति हे विनटो । गुणगणकथनीं प्रेमा घटो । अघटित विघटो भवभ्रम हा ॥ १ ॥ भवभयहरणचरणारविन्द । विज्ञानकिरणीं प्रकाशप्रद । नमिला चित्सूर्य गोविन्द । अगाधबोध अखिलात्मा ॥ २ ॥ यावरी गतकथासंबंध । शाल्वामात्या मन्मथा युद्ध । होतां मन्मथ केला मुग्ध । मूर्च्छा अगाध त्या आली ॥ ३ ॥ तिये समयीं सारथियानें । रथ परतविला सांडूनि कदनें । मूर्च्छा भांजूनियां प्रद्युम्नें । सूता कारणें निपेधिलें ॥ ४ ॥ सूतें कथिली धर्मनीती । सारथियानें रक्षिजे रथी । तैसाच रथियानें सारथी । समरक्षिती रक्षावा ॥ ५ ॥ म्हणोनि अपोवाह रथ । रणा पासूनि करणें उचित । जाणोनि प्रभूतें मूर्च्छित । म्यां तिरोहित रथ केला ॥ ६ ॥ इतुकें कथिलें पूर्वाध्यायीं । या वरी प्रद्युम्न वीर कायी । करिता झाला तिये समयीं । ते नवायी शुक सांगे ॥ ७ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ स उपस्पृश्य सलिलं दंशितो धृतमुकाक.। नय मां द्युमतः पार्श्वं वीरस्येत्याह सारथिम् ॥१॥

तो प्रतापी वीर मदन । उठिला मूर्च्छा निवारून । कनककलशींचें जल घेऊन । नेत्रानन परिमार्जिलें ॥ ८ ॥ गदाप्रहारें केलें विकळ । म्हणोनि अंजळी घेऊनि जल । भरूनि टाकिले द्वादश चूळ । सिद्ध ताम्बूल स्वीकेला ॥ ९ ॥ सोडिल्या होत्या सन्नाहग्रंथी । वज्रकवच तें पुढती । अधिज्य कार्मुक घेऊनि हातीं । बैसला रथीं सन्नद्ध ॥ १० ॥ मग आज्ञापी सारथियाला । द्युमंतपार्श्वीं नेयीं मजला । तेणें समरीं प्रताप केला । तो फेडिला जाईल ॥ ११ ॥ सारथियानें ऐकूनि वचन । रथ लोटिला जैसा पवन । चाऱ्ही अश्व परम जवीन । स्वपरसैन्यें अतिक्रमिलीं ॥ १२ ॥

विधमन्तं स्वसैन्यानि द्युमन्तं रुक्मिणीसुतः । प्रतिहत्य प्रत्यविध्यन्नाराचैरष्टभिः स्मयन् ॥ २ ॥

जैसा अग्नियंत्रींचा गोळ । गगनगर्भीं संचरे चपळ । तैसा रहंवर सुतेजाळ । भासे केवळ रवितुल्य ॥ १३ ॥ रहंवराची प्रचंडगती । लोटा सरिसीं सैन्यें पडती । महावीरांतें जाकळी भ्रान्ती । चवंकोनि पाहती ते भंवते ॥ १४ ॥ ऐसिया तवकें रुक्मिणीसुत । जाऊनि द्युमंता पाचारित । म्हणे तूं शाल्वाचा अमात्य । केला पुरुषार्थ समरंगीं ॥ १५ ॥ आतां तैसाचि सज्ज होयीं । पुढतीं संघटें उशिणा घायीं । ऐसें म्हणोनि विन्धिला पाहीं । कार्मुक बाहीं ओढूनी ॥ १६ ॥ स्मरूनि पूर्वील गदाप्रहार । म्हणे द्युमंता होयीं सधर । कृतान्तदूता समान शर । आले क्रूर अवलोकीं ॥ १७ ॥ कठोर कार्मुक आकर्ण ओढी । काढूनि अष्ट मार्गण सोडी । हरिपद चिन्तूनि स्वशौर्यप्रौढी । दावी रोकडी ते ऐका ॥ १८ ॥

चतुर्भिश्चतुरो वाहान्सूतमेकेन चाहनत् । द्वाभ्यां धनुश्च केतुं च शरेणान्येन वै शिरः ॥ ३ ॥

प्रळयरुद्राचा तृतीय नयन । तैशा सायकीं इषुधि पूर्ण । त्यांतील घेऊनि अष्ट मार्गण । द्युमंत लक्षून मोकलिले ॥ १९ ॥ चारी अश्व चौं मार्गणीं । एकें सारथि पाडिला रणीं । केतु कोदंड दोहीं बाणीं । एकें छेदूनि शिर नेलें ॥ २० ॥ द्युमंत मारूनियां मदनें । सिंहनाद केला वदनें । ऐकूनि यादववीरराणे । भंगिती सैन्यें शाल्वाचीं ॥ २१ ॥

गदसात्यकिसाम्बाद्या जघ्नुः सौभपतेर्बलम् । पेतुः समुद्रे सौभेयाः सर्वे सच्छिन्नकन्धराः ॥ ४ ॥

गदसात्यकिसाम्बादिक । यादववीर अक्रूरप्रमुख । प्रतापें सौभपतीचें कटक । मारिती निःशंक ते वेळीं ॥ २२ ॥ जिकडे जिकडे सौभ पळे । तिकडे यादव मारिती बळें । रिचवती समुद्रीं कोथळे । तुटती मौळें शरघातें ॥ २३ ॥ मस्तकें तुटोनि गगना जाती । कबंधें समुद्रीं रिचवती । शिरःकमळांची वृष्टि वरती । होय पुढती महार्णवीं ॥ २४ ॥ शंकरवराचा होता गर्व । तो शाल्वाचा भंगला सर्व । कैसें विपरीत म्हणे अपूर्व । कां पां शर्व मज न पवे ॥ २५ ॥ सौभाश्रयें प्रबळ कटकें । सुरनरखेचरां होती अटकें । तीं भंगिलीं न भरतां घटिके । केलें लटिकें शिववरा ॥ २६ ॥

एवं यदूनां शाल्वानां निघ्नतामितरेतरम् । युद्धं त्रिनवरात्रं तदभूत्तुमुलमुल्बणम् ॥ ५ ॥

ऐसें शाल्वां यादवां रणीं । परस्परें झोंटधरणी । युद्ध झालें भो कुरुमणी । सप्तविंशतिदिनरात्रें ॥ २७ ॥ ऐसें युद्ध महाकर्कश । अहोरात्रें सत्तावीस । तुमुल होतां द्वारकाधीश । आला नगरास अवचितां ॥ २८ ॥ सत्तावीस दिवस वरी । कोठें गुंतला होता हरी । ऐसें राया पुससी जरी । तरी अवधारीं ते गोष्टी ॥ २९ ॥

इन्द्रप्रस्थं गतः कृष्ण आहूतो धर्मसूनुना । राजसूयेऽभिनिर्वृत्ते शिशुपाले च संस्थिते ॥ ६ ॥

धर्मराजें राजसूयार्थ । पाचारिलिया कृष्णनाथ । परिवारेंसीं इंद्रप्रस्थ । ठाकूनि तेथ स्थिरावला ॥ ३० ॥ मखेन्द्रसिद्धीच्या साधना । सवें घेऊनि भीमार्जुनां । विप्रवेशें मागधहनना । करूनि नृपगणा सोडविलें ॥ ३१ ॥ राजसूययज्ञ सिद्धी नेला । निन्दितां चैद्य मुक्त जाला । त्यावरी परिवार द्वारके आला । कृष्ण राहविला युधिष्ठिरें ॥ ३२ ॥ जाणोनि धर्माचें अंतर । अंतःपुरेंसीं रुक्मिणीवर । इंद्रप्रस्थीं जाला स्थिर । जंव गान्धार भ्रम पावे ॥ ३३ ॥ मयकृतसभावलोकनीं । दुर्योधनाची मानहानी । जालिया नंतर चक्रपाणी । निघे तेथूनी तें ऐका ॥ ३४ ॥

कुरुवृद्धाननुज्ञाप्य मुनींश्च ससुतां पृथाम् । निमित्तान्यतिघोराणि पश्यन्द्वारवतीं ययौ ॥ ७ ॥

कौरवांमाजि जे वृद्ध वडील । तैसाचि मुनीश्वरांचा मेळ । सुहृद आप्त सप्रेमळ । निघे गोपाळ पुसूनि तयां ॥ ३५ ॥ पांचही पुत्रां सहित कुन्ती । तयेतें पुसोनियां श्रीपती । सुभद्रे सहित द्रौपदी सती । अमृतहस्तीं स्पर्शोनी ॥ ३६ ॥ पृथा धर्मादि प्रार्थना करिती । द्वारके जावया कां श्रीपती । येव्हढी लगबग तुमचे चित्तीं । आमुचे संगती उबगूनी ॥ ३७ ॥ आम्ही अनाथ तुज वांचून । तुझेनि सनाथ श्रीसंपन्न । तुझ्या वियोगें अर्धक्षण । युगा समान गमे आम्हां ॥ ३८ ॥ धेनुवियोगें वत्स तान्हें । किंवा बाळक स्तनें वीणें । मत्स्य विघडिलिया जीवनें । तुज वीण जिणें तेंवि आमुचें ॥ ३९ ॥ पृथाप्रमुखपांडवग्लानि । ऐकूनि त्यांतें चक्रपाणि । म्हणे विघ्नें द्वारकाभुवनीं । दुष्टीं दुर्जनीं मांडियलीं ॥ ४० ॥ दुर्निमित्तें दिसती घोर । वामबाहु वामनेत्र । स्फुरे आणि मानस स्थिर । नोहे दुस्तर भय मानी ॥ ४१ ॥ स्वप्नें पडताती बोखटीं । स्वप्नीं श्वानें लागलीं पाठीं । रजस्वला विधवा कंठीं । धांवे मिठी घालावया ॥ ४२ ॥ वणवया माजि पडल्या धेनु । त्या बोभाती आक्रंदोन । ऐसीं दुश्चिह्नें देखून । मन उद्विग्न होत असे ॥ ४३ ॥ या लागि मी द्वारकापुरा । जावयास्तव करितों त्वरा । येरव्ही तुमचा मी म्हणियारा । नीचाकिङ्करापासूनी ॥ ४४ ॥ तुमच्या वियोगें माझें मन । युगा येवढा मानी क्षण । तथापि दुश्चिह्नें देखून । द्वारके विघ्न घोर गमे ॥ ४५ ॥ या लागिं वसुदेवकीचरणां । पहावया मज देइजे आज्ञा । ऐसी करूनियां प्रार्थना । द्वारकाभुवना चालियला ॥ ४६ ॥ आज्ञा घेऊनि समस्तांची । मार्गीं जातां हरि विवंची । ते विवंचना श्रीकृष्णाची । वदे शुकाची वाग्देवी ॥ ४७ ॥

आह चाह मिहायात आर्यमिश्राभिसङ्गतः । राजन्याश्चैद्यपक्षीया नूनं हन्युः पुरीं मम ॥ ८ ॥

मार्गीं जातां मानसीं हरी । म्हणे म्यां सोडिली द्वारकापुरी । बळरामेंसीं सैन्यसामग्री । घेऊनि अध्वरीं स्थिरावलों ॥ ४८ ॥ येथ सर्वांच्या जाल्या भेटी । परस्परें सस्निग्ध गोठी । राजसूयाध्वर पाहिला दृष्टी । सुखसंतुष्टी दिन क्रमले ॥ ४९ ॥ चैद्य मागध निर्दाळिले । तेणें स्वपक्षीय नृप तोषले ।

चैद्यपक्षींचे संतापले । जळपूनि गेले पळोनियां ॥ ५० ॥ ससैन्य मजवीण रिक्त पुरी । देखूनि मागें कपटी वैरी । बहुतेक माझी मारिती नगरी । ऐसें अंतरीं वाटतसे ॥ ५१ ॥ ऐसा सचिन्त बैसोनि रथीं । वितर्क करी चालतां पंथीं । पुढें ठाकिली द्वारावती । तंव ते विपत्ती देखियली ॥ ५२ ॥

वीक्ष्य तत्कदनं स्वानां निरूप्य पुररक्षणम् । सौभं च शाल्वराजं च दारुकं प्राह केशवः ॥ ९ ॥

आपुल्या प्रजांचें आक्रंदन । वनोपवनांचें विध्वंसन । पुरगोपुरें छिन्नाभिन्न । आणि स्वसैन्य रिपुसमरीं ॥ ५३ ॥ मयमायाकृत अयस्मय । हरवरदानें त्रिपुरप्राय । कामग सौभ शाल्वराय । देखूनि यदुवर्य काय करी ॥ ५४ ॥ सौभपतीचें दुष्टाचरण । स्वकीयजनांचें देखूनि कदन । बळरामातें पुररक्षण । निरोपून पाठविलें ॥ ५५ ॥ अंतःपुर घेऊनि सवें । पुरी प्रवेशता बळदेवें । मग निःशंक श्रीकेशवें । मयकृतभावे अवगामिलें ॥ ५६ ॥ नगरी निरोविलीं बळरामा । स्वयें प्रवर्तला संग्रामा । आवेश आला मेघश्यामा । शाल्वा अधमा वधावया ॥ ५७ ॥ दारुकनामा निजसारथि । तयासि बोले रुक्मिणीपति । क्षणैक सावध होऊनि श्रोतीं । ते शुकोक्ति परिसावी ॥ ५८ ॥

रथं प्रापय मे सूत शाल्वस्यान्तिकमाशु वै । सम्भ्रमस्ते न कर्तव्यो मायावी सौभराडयम् ॥ १० ॥

सारथियातें म्हणे हरी । माझा रहंवर अतिलौकरी । शाल्वा सन्निध नेई समरी । आजि हा वैरी निर्दळणें ॥ ५९ ॥ मायावी हा सौभपती । सौभाश्रयें दुर्ज्जय क्षितीं । मज येणेंसीं भिडणें निगुती । झाडीन दुर्मती मी याची ॥ ६० ॥ शिववराच्या सौभाश्रयें । त्रिजगीं म्हणवी हा दुर्जये । आजि वोपीन या पराजय । कृतान्तनिलय दावीन ॥ ६१ ॥

इत्युक्तश्चोदयामास रथमास्थाय दारुकः । विशन्तं ददृशुः सर्वे स्वे परे चारुणानुजम् ॥ ११ ॥

ऐसा बोलिला असतां सूत । मनोजवें तो प्रेरूनि रथ । नेता जाला रुक्मिणीकान्त । स्वपर समस्त विलोकिती ॥ ६२ ॥ फोडूनि उभय सेनेची फळी । रहंवर रिघतां शाल्वा जवळी । स्वपर सैनिक महाबळी । देखती ते काळीं खगकेतु ॥ ६३ ॥ ध्वजीं तेजस्वी अरुणानुज । उभयदळींचे वीरराज । त्यांतें देखूनि प्रतापपुज । म्हणती अधोक्षज पातला ॥ ६४ ॥ आला जाणूनि यदुनायक । यदुचक्रातें जाला हरिख । शंका पावले शाल्वप्रमुख । ऐका सम्यक संगर तो ॥ ६५ ॥

शाल्वश्च कृष्णमालोक्य हतप्रायबलेश्वरः । प्राहरत्कृष्णसूताय शक्तिं भीमरवां मृधे ॥ १२ ॥

यादवीं मारिलें ज्याचें सैन्य । तो हतसैन्येश्वर शाल्व पूर्ण । श्रीकृष्णांतें अवलोकून । मनीं क्षोभून प्रज्वळला ॥ ६६ ॥ दारुकावरी शक्तिप्रहार । समरीं केला भयंकर । जये शक्तीचा घोर गजर । गमे भीकर भूतांतें ॥ ६७ ॥

तामापतन्तीं नभसि महोल्कामिव रंहसा । भासयन्तीं दिशः शौरिः सायकैः शतधाच्छिनत् ॥ १३ ॥

प्रचंड शाल्वप्रेरित शक्ति । वेगीं व्यापूनि गगना प्रति । उल्का पडे महोत्पातीं । तेंवि सारथी लक्षूनी ॥ ६८ ॥ गगनींहूनि अवचिती पडतां । दिशा केल्या स्वतेजोरहिता । तीतें देखूनि मन्मथजनिता । करिता झाला शत खंडें ॥ ६९ ॥ शार्ङ्गनिर्मुक्त शरें करून । शक्ति शतधा विखंडून । सिंहनादें करी गर्जन । शाल्व लक्षून समरंगीं ॥ ७० ॥

तं च षोडशभिर्विध्दवा बाणैः सौभं च खे भ्रमत् । अविद्धयच्छरसंदोहैः खं सूर्य इव रश्मिभिः ॥ १४ ॥

षोडशशरें विन्धिला शाल्व । सुर नर मानिती हें अपूर्व । शाल्वा आंगीं सौभगर्व । झाडिला सर्व ते काळीं ॥ ७१ ॥ मयमायाकृत अभेद्य सौभ । तरळ तमोमय आक्रमी नभ । भ्रमतां देखूनि पंकजनाभ । भेदी स्वयंभ शरजाळें ॥ ७२ ॥ रत्नजाडित सुवर्णपुङ्ख । कृष्णमार्गण अत्यंत तीख । सौभा भेदले ते लखलख । अर्कमयूखसम गमती ॥ ७३ ॥ सौभ तमोमय जैसें गगन । अर्का समान रथस्थ कृष्ण । दशदिग्भागीं पसरले बाण । रश्मिसमान गमती ते ॥ ७४ ॥ सौभ नभोगर्भीं दे भंवरी । लक्षूनि श्रीकृष्ण त्या शर मारी । ते भासती किरणांपरी । भासे मुरारी भास्करवत् ॥ ७५ ॥ ससौभ शाल्वा ऐसिये परी । कृष्णें केली अपांपरी । या वरी शाल्व काय करी । तें अवधारीं कुरुवर्या ॥ ७६ ॥

शाल्वः शौरेस्तु दोः सव्यं सशांऽगंशाऽर्गधन्वनः । बिभेद न्यपतद्धस्ताच्छाऽर्गमासीत्तदद्भुतम् ॥१५ ॥

शार्ङ्गधन्वा जो कां शौरी । त्याचा सव्य बाहु प्रहारीं । सौभ लोटूनि भेदितां शरीं । पडिलें भूवरी शार्ङ्गधनु ॥ ७७ ॥ शाल्वें भेदितां सव्य भुज । हस्तौनि शार्ङ्ग गळालें सहज । तेणें थरारला अधोक्षज । मानिती चोज सुर नर पैं ॥ ७८ ॥ सव्य म्हणिजे डावा पाणी । शार्ङ्गें सहित भेदितां बाणीं । शार्ङ्ग निष्टलें मुष्टीहुनी । दृष्टी देखूनी अद्भुत तें ॥ ७९ ॥

हाहाकारो महानासीद्भूतानां तत्र पश्यताम् । निनद्य सौभराडुच्चैरिदमाह जनार्दनम् ॥ १६ ॥

कृष्णपक्षीप जितुके वीर । आणि भूतभौतिकांचा निकर । करिते जाले हाहाकार । सचाप हरिकर भेदिलिया ॥ ८० ॥ म्हणती शाल्वाचा प्रताप गाढा । कृष्णहस्तींचा पडिला मेढा । याशीं कोण भिडेल होडा । केला पवाडा हरिसमरीं ॥ ८१ ॥ ऐसे सचिन्त हरिपक्षीय । शाल्वा मानूनि साधिला विजय । उच्चस्वरें गर्जना होय । बोले काय कृष्णातें ॥ ८२ ॥

यत्त्वया मूढ नः सख्युर्भ्रातुर्भार्या हृतेक्षताम् । प्रमत्तः स सभामध्ये त्वया व्यापादितः सखा ॥ १७ ॥

म्हणे रे मूढा यदुनायका । शिशुपाळ जो कां आमुचा सखा । त्याची भार्या तां हरिली मूर्खा । कांहीं विवेका न करूनी ॥ ८३ ॥ हा तों अपराध तुझा पहिला । आम्ही आजिवरी क्षमा केला । प्रस्तुत राजसूयार्थ आला । तेथ तां वधिला पापिष्ठें ॥ ८४ ॥ असावधान सभेच्या ठायीं । नीतिनिर्णय वदतां पाहीं । पाहत असतां नृप सर्वही । प्राणें तोही तां वधिला ॥ ८५ ॥ शिशुपाळ मित्र सखा भ्राता । जिवलग प्राणांहूनही परता । मारिला त्याच्या प्रतीकारार्था । आलों तत्वता मी जाण ॥ ८६ ॥ म्हणसी येऊनि काय तां करणें । ऐसें वदसी मूर्खपणें । तरी तें ऐकें कथितों वचनें । जाण हें आवंतणें काळाचें ॥ ८७ ॥

तंत्वाद्य निशितैर्बाणैरपराजितमानिनम् । नयाम्यपुनरावृत्तिं यदि तिष्ठेर्ममाग्रतः ॥ १८ ॥

जिङ्कूं न शकती मजला कोण्ही । अपराजित मी त्रिभुवनीं । ऐसा गर्व वाहसी मनीं । त्याची झाडणी करीन मी ॥ ८८ ॥ आजि माझिया तिखटां बाणीं । ऐसिया तूतें समराङ्गणीं । भेदूनि धाडीन कृतान्तभुवनीं । मग परतूनी न येसी तूं ॥ ८९ ॥ कार्मार शाणनिशित शर । माझे अत्यंत तीक्ष्णतर । तिहीं खंडूनि तव शरीर । दावीन घर मृत्यूचें ॥ ९० ॥ जरी तूं मम समरीं ठाकसी । तरी तुज मारीन निश्चयेंसीं । प्राणभयें तूं पळोनि जासी । तरी नगरासी भंगीन ॥ ९१ ॥ धरूनि नेईन तावकांप्रति । भोगवीन बहु विपत्ति । तैं मग तुझिया अश्रुपातीं । वोपीन तृप्ति शिशुपाळा ॥९२॥ ऐसी बहुधा अचागळी । सौभाग्यें शाल्व बळी । बोलता जाला तिये काळीं । त्या वनमाळी काय वदे ॥ ९३ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥ वृथा त्वं कथ्यसे मंद न पश्यस्यंतिकेऽन्तकम् । पौरुषं दर्शयन्ति स्म शूरा न बहुभाषिणः॥ १९॥

कृष्ण म्हणे रे शाल्वा मूर्खा । दावितां न लजसी पुढती मुखा । भीमकीस्वयंवरींच्या लोकां । असे ठाउका तव महिमा ॥ ९४ ॥ पिशाच मूर्ख द्रव्योन्मत्त । किंवा जालिया सन्निपात । त्याचें बोलणें अवघें व्यर्थ । सर्वज्ञ पंडित नादरिती ॥ ९५ ॥ मृत्यु न पाहसी पातला जवळी । म्हणोनि तोंडा सुटली बरळी । सन्निपाताची अचागळी । ज्ञाते आगळी न मानिती ॥ ९६ ॥ अंतक समीप हें नेणसी । यास्तव विकत्थन हें करिसी । मंदा प्रताप आंगीं वाहसी । तरी समरासी दृढ होयीं ॥ ९७ ॥ शूर प्रताप वाहती आंगीं । पुरुषार्थ दाविती ते समरंगीं । न करिती बडबड हे वाउगी । जे तुज जोगी विकत्थना ॥ ९८ ॥

इत्युक्त्वा भगवान्शाल्वं गदया भीमवेगया । ताडयत्रौ संरब्धः स चकंपे वमन्नसृक् ॥ २० ॥

ऐसें बोलूनियां श्रीपती । गदा घेऊनि दक्षिणहस्तीं । शाल्व ताडिला सक्रोधवृत्ती । जत्रुप्रांन्तीं दृढप्रहारें ॥ ९९ ॥ बाहुकंठांचा अग्रसंधी । तया अवयवा जत्रुशब्दीं । अवयववेत्ते विशालबुद्धी । वदती

निबंधीं ग्रंथान्तरीं ॥ १०० ॥ महाराष्ट्र म्हणती सुताटीहाड । त्यावरी गदेचा प्रहार दृढ । बैसतां झाले खंड विखंड । मग विचकिलें तोंड शाल्ववीरें ॥ १ ॥ सकंप जालें शरीर । मुखें भडभडां वमी रुधिर । म्हणे मज कोपला ईश्वर । यास्तव दुस्तर ओढवलें ॥ २ ॥ कृष्णें वोपूनि गदाप्रहार । चूर्ण केलें शाल्वजत्र । तेणें विकळ पडिलें गात्र । विचकिलें वक्त्र अतिदुःखें ॥ ३ ॥ पडिली डोळां झांपडी । राहों राहों कर पद खोडी । शरीरीं मूर्च्छेना दाटली गाढी । भडभडां तोंडीं रुधिर वमी ॥ ४ ॥ एवं घटिकाचतुष्टय । शाल्वें भोगिला मूर्च्छाप्रळय । सावध होतां स्मरूंन मय । केलें काय तें ऐका ॥ ५ ॥

गदायां सन्निवृत्तायां शाल्वस्त्वंतरधीयत । ततो मुहूर्त्त आगत्य पुरुषः शिरसाऽच्युतम् ॥ २१ ॥

गदाघाताची मूर्च्छेना गेली । शरीरीं स्मृति प्रकटती जाली । मयकृतमाया अवलंबिली । अगोचर केली सौभप्रभा ॥ ६ ॥ गगनीं हरपे गंधर्वनगर । तेंवि लोपलें सौभपुर । ऐसा लोटतां मुहूर्त मात्र । कपट विचित्र प्रकटिलें ॥ ७ ॥ मुहूर्तमात्र क्रमल्या वरी । पुरुष एक पातला समरीं । जेणें नमस्कारूनि हरी । बोले उत्तरीं तें ऐका ॥ ८ ॥

देवक्या प्रहितोऽस्मीति नत्वा प्राह वचो रुदन् । कृष्ण कृष्ण महाबाहो पिता ते पितृवत्सल ॥२२॥

दूत म्हणे भो भगवंता । देवकीनें मी धाडिलों आतां । तिणें कथिलें त्या वृत्तान्ता । ऐका तत्वता निवेदितों ॥ ९ ॥ ग्लानिवदनें दूत रडत । रडूनि कथी वर्तली मात । टपटपा अश्रु भूतळीं पडत । स्फुंदे वृत्तान्त निवेदितां ॥ ११० ॥ कृष्ण कृष्ण या वीप्सावचनीं । संबोधिलें तुज पावूनि ग्लानी । महाबाहो चक्रपाणी । नेला दुर्ज्जनीं तव जनक ॥ ११ ॥ पितृवत्सल तूं पितृभक्त । असतां वर्तला हा आकान्त । परिवार आक्रंदे समस्त । जालों अनाथ म्हणोनियां ॥ १२ ॥ कैसा नेला कोणें पिता । ऐसें पुससीं जरी तत्वता । त्याही कथितों तुज वृत्तान्ता । श्रीभगवंता अवधारीं ॥ १३ ॥

बद्ध्वाऽपनीतः शाल्वेन सैनिकेन यथा पशुः । निशम्य विप्रियं कृष्णो मानुषीं प्रकृतिं गतः ॥ २३ ॥
विमनस्को घृणीस्नेहाब्दाभाषे प्राकृतो यथा ॥ २४ ॥

बळेंचि शाल्वें येऊनि सदनीं । दृढतर तव पिता बांधोनी । पशुहिंसक पशू लागूनि । उदित हननीं ने जैसा ॥ १४ ॥ अंगदभूषास्थानीं दृढ । बांधिले पृष्ठभागीं दोर्दंड । पुढें वोढूनि मागें दंड । ताडी उदंड निष्ठुरता ॥ १५ ॥ ऐसा नेला तुझा पिता । जेंवि पशूतें पशुहंता । इतकिया देवकीच्या वृत्तान्ता । तुज भगवंता म्यां कथिलें ॥ १६ ॥ दूतमुखींची अशुभ वार्ता । ऐकूनि सदया श्रीकृष्णनाथा । मोहें जाकळिलें तत्वता । सर्वज्ञता विसरविली ॥ १७ ॥ घेतली मनुष्याची अवगणी । तदनुसार अंतःकरणीं । जाली मोहाची झळंबणी । पडिला करणीं चाकाट ॥ १८ ॥ प्राकृत जैसा पितृग्लानी । देखोनि दुःख पावे मनीं । तैसा स्नेहाळ चक्रपाणी । विमनस्क होऊनी काय वदे ॥ १९ ॥

कथं राममसंभ्रांतं जित्वाऽजेयं सुरासुरैः । शाल्वेनाल्पीयसा नीतः पिता मे बलवान्विधिः ॥२४॥

राम सावध प्रतापतेजें । सुरासुरां जिंकिला न वजे । शाल्वें त्यासि जिंकूनि पैजे । क्लीबत्वलाजे भेटविलें ॥ १२० ॥ त्रिजगज्जेता प्रतापशाली । तो बळराम असतां जवळी । शाल्वें अल्पकें केंवि धुमाळी । केली ये काळीं मज न कळे ॥ २१ ॥ कैसी बळिष्ठ अदृष्टरेखा । शाल्वें काळिमा लाविली मुखा । जनका बांधूनि दिधलें दुःखा । अश्लाघ्य लोकांमाजि केलें ॥ २२ ॥ दूता मुखींच्या ऐकूनि गोठी । पितृमोहें सदय पोटीं । अंतरीं द्रवूनियां कटकटीं । तंव शाल्व कपटी पुढें प्रकटे ॥ २३ ॥

इति ब्रुवाणे गोविंदे सौभराट् प्रत्युपस्थितः । वसुदेवमिवानीय कृष्णं चेदमुवाच सः ॥ २५ ॥

आपण आपणया माझारी । रसरसूनि अभ्यंतरीं । ऐसें बोलत असतां हरी । तंव ससौभ वैरी पुढें आला ॥ २४ ॥ सन्मुख येऊनि कृष्णाप्रति । आणूनि वसुदेवाकृति । दूत वदला ज्या ज्या उक्ति । त्या त्या प्रतीती आणावया ॥ २५ ॥ पाठिमोरे बांधूनि बाहु । सन्मुख मायामय वसुदेव । आणूनि कृष्णाप्रति तो शाल्व । बोले लाघव दावूनि ॥ २६ ॥

एष ते जनिता तातो यदर्थमिह जीवसि । वधिष्ये वीक्षतस्तेऽमुमीशश्चेत्पाहि बालिश ॥ २६ ॥

मायामोहें कृष्णाप्रति । मोहूनि बोले खळदुर्मति । देवकी जठरीं तव उत्पत्ति । ज्यास्तव जाली तव देहा ॥ २७ ॥ तो हा जन्मविता तव पिता । नंद गोप तो अन्नदाता । कंसभयापासूनि त्राता । तो हा तत्वता गोप नव्हे ॥ २८ ॥ तुझ्या देहाचें जेथूनि जनन । तो हा तुझा जनक जाण । ज्या कारणें मथुराभुवन । यादव म्हणवून वसविसी ॥ २९ ॥ तुझ्या देहाचा पोषक । नंद गोप अपर जनक । त्यातें टाकूनि येथ सम्यक । वृष्णि म्हणविसी ज्याचेनि ॥ १३० ॥ ज्याचेनि येथ तुझें जिणें । त्या या तव जनका कारणें । तुज देखतां घेईन प्राणें । निजलोचनें अवलोकी ॥ ३१ ॥ यातें वधितों तुज देखतां । सोडवणेसी समर्थ पुरता । न होसी तरी जायीं आतां । तोंड घेऊनि बालिशा ॥ ३२ ॥ सोडवणेचें सामर्थ्य आंगीं । धरिसी तरी ये युद्धालागीं । ऐसें बोलूनि ते प्रसंगीं । घातला खड्गीं कर तेणें ॥ ३३ ॥

एवं निर्भर्त्स्य मायावी खड्गेनानकदुंदुभेः । उत्कृत्य शिर आदाय स्वस्थं सौभं समाविशत् ॥ २७ ॥

ऐसा निर्भर्त्सूनि यदुवीर । शाल्व कपटी मावकर । घेता जाला वसुदेवशिर । खड्गें सत्वर छेदूनि ॥ ३४ ॥ गगनगर्भीं सौभा माजि । शिर घेऊनि रिघाला सहजीं । मोहभ्रान्ति अधोक्षजीं । मयमायाकृत योजूनियां ॥ ३५ ॥

ततो मुहूर्त्त प्रकृतावुपप्लुतः स्वबोध आस्ते स्वजनानुपंगतः ।
महानुभावस्तदबुध्यदासुरीं मायां स शाल्वप्रसृतां मयोदिताम् ॥ २८ ॥

त्या नंतरें मुहूर्तमात्र । षड्गुणैश्वर्य स्वतंत्र । तोही मायाभ्रमाचें पात्र । जाला विचित्र मनुजत्वें ॥ ३६ ॥ मानुषीप्रकृतीतें वश जाला । यास्तव मोहजळी बुडाला । स्वतःसिद्ध चिन्मात्रबोध पहिला । लोपूनि गेला ते काळीं ॥ ३७ ॥ वसुदेवातें मानिलें जनक । शाल्व मानिला दुष्ट मायिक । ऐसा स्वजनस्नेहाचा कळंक । अवगूनि शोक आंगविला ॥ ३८ ॥ माझा जनक मारिला दुष्टें । व्यसन घडलें हें अदृष्टें । ईश्वरें केलें कां उफराटें । जे निमिजे ज्येष्ठें मज असतां ॥ ३९ ॥ न होतां पितृऋणा उत्तीर्ण । पिता वसुदेव पावला मरण । जन्ही शाल्वाचे घेतले प्राण । तन्ही परतून हा नये ॥ १४० ॥ देवकीप्रमुख माझिया माता । शोक करितील मज देखतां । अपयश आलें माझिये माथां । हांसें समस्तां शत्रूंचें ॥ ४१ ॥ ऐसा प्राकृत मनुजा परी । स्वजनमोहाब्धीचे पूरीं । बुडता जाला मुहूर्तभरी । स्वयें श्रीहरी सर्वज्ञ ॥ ४२ ॥ त्या नंतरें हृषीकेश । स्वशौर्याचा परामर्श । करूनि म्हणे मी शाल्वास । सौभें सहित निर्दळीन ॥ ४३ ॥ जनकवधाचे प्रतीकारीं । कपटी सौभ मारीन समरीं । ऐसी आंगवितां वीरश्री । माया आसुरी हारपली ॥ ४४ ॥ मग म्हणे मी भूभारहरण । अवतरलों सहसंकर्षण । आसुरीमायेचें प्रावरण । आम्हां भुलवणकर जालें ॥ ४५ ॥ द्वारकारक्षक राम असतां । शाल्व आणील माझिया ताता । अघटित गोष्टी हे कल्पान्ता । पाखूनि तत्वता दूर असे ॥ ४६ ॥ विकर्त्तनातें खद्योत गिळी । कीं मृगेन्द्र भक्षिजे बिडाळबाळीं । हें अघटितही घडते वेळीं । शाल्व नाकळी रामातें ॥ ४७ ॥ महान् म्हणिजे निजानुभाव । तेव्हां स्मरूनि वासुदेव । म्हणे शाल्वें पसरिली माव । मयकृत प्रभाव हा तीचा ॥ ४८ ॥ मयोपदिष्टमायावशें । शाल्वें मोहिलें कळतां ऐसें । मायाभ्रमाचें फिटलें पिसें । कपट न दिसे तें ऐका ॥ ४९ ॥

न तत्र दूतं न पितुः कलेवरं प्रबुद्ध आजौ समपश्यदच्युतः ।
स्वाप्नं यथा चाम्बरचारिणं रिपुं सौभस्थमालोक्य निहन्तुमुद्यतः ॥ २९ ॥

स्वप्नींचा प्रपंच जया परी । हारपे मिथ्यात्वें जागरीं । तेंवि स्वबोधें श्रीहरी । पाहतां नेत्रीं भ्रम न थरे ॥१५०॥ न दिसे दूत देवकीचा । अथवा देह वसुदेवाचा । भ्रम निरसला मयमायेचा । जाला बोधाचा सूर्योदय ॥ ५१ ॥ आजौ म्हणिजे संग्राममही । गगनगर्भीं शाल्व ते समयीं । कृष्णें देखिला असतां पाहीं । विवंची हृदयीं वध त्याचा ॥ ५२ ॥ गगनचारी सौभस्थातें । कृष्णें देखूनियां शाल्वातें । उद्योग त्याचिया हननातें । विवरी चित्तें स्मरजनक ॥ ५३ ॥ शाल्व फलकट मर्कट धीट । याचें झाडीन आतां कपट । सौभें सहित करीन पीठ । मार्गण तिखट विन्धूनी ॥ ५४ ॥ असो ऐसें विवरी हरी । कुरुभूपातें गंगातीरीं । वक्ता श्रीशुक विरक्तोत्तरीं । वदे वैखरी मतान्तरें ॥ ५५ ॥

एवं वदन्ति राजर्षे ऋषयः केच नान्विताः । यत्स्ववाचो विरुध्येत नूनं ते न स्मरन्युत ॥ ३० ॥

शुक म्हणे गा कुरुनायका पूर्वराजऋषीं माजि तूं निका । कां पां न घेसी श्रवणीं शंका ।

व्याख्याविवेका विवरूनियां ॥ ५६ ॥ जऱ्ही तुज शंका फिरली नाहीं । तथापि निरूपितों मी तेही । प्राचीन ऋषि कित्तेक पाहीं । वदोनि संशयीं स्वयें पडिले ॥ ५७ ॥ पूर्वापर अनुसंधान- । रहित वदती जें कां वचन । यास्तव अनन्वित तें जाण । आपणा आपण विरोधक ॥ ५८ ॥ अपरपूर्व वचनाप्रती । विरोधकता न विचारिती । श्रवणीं शंका करितां श्रोतीं । संशयावर्त्तीं पडती ते ॥ ५९ ॥ आपण पूर्वी बोलिलो काय । पुढें कथितों जो अन्वय । पूर्वापार विरोध होय । ऐसी सोय न वदती ॥ १६० ॥ ऐसे कित्तेक अनन्वित । विरोध पूर्वापर वचनांत । पडे ऐसा लाविती ग्रंथ । तो तुज येथ निरूपितों ॥ ६१ ॥ एकसप्ततितमाच्या व्याख्यानीं । राजसूयार्थ चक्रपाणी । आज्ञा रामाची घेऊनी । निघाला म्हणूनी वाखाणिलें ॥ ६२ ॥ ये अध्यायीं विरोधवचन । कीजे दुर्निमित्तें देखून । आपणा माजी आपण कृष्ण । बोले वचकून सचिन्त ॥ ६३ ॥ ऐसा स्ववाक्यें विरोध । बहुतेक न स्मरती ते बुध । असंभावनीय अनुवाद । करिती विशद तें ऐका ॥ ६४ ॥

क्व शोकमोहौ स्नेहो वा भयं वा येऽज्ञसम्भवाः । क्व चाखण्डितविज्ञानैश्वर्यस्त्वखण्डितः ॥ ३१ ॥

कोणीकडे शोक मोह । भय अथवा स्वकीय स्नेह । कोठें संभवे हा समूह । अज्ञान जीवां वांचूनी ॥ ६५ ॥ अज्ञान जीवांच्या ठायीं यांचा । घडे संभव शोकादिकांचा । अखंडितैश्वर्य जो साचा । तेथ कैंचा संभव या ॥ ६६ ॥ असंभावनीय संभावना । करितां विरोध ये स्ववचना । पूर्वापर या अनुसंधाना । न विचारूनियां वाखाणिती ॥ ६७ ॥ जो कां अखंडैकचिद्रसमय । ज्ञानविज्ञानपूर्णैश्वर्य । तो हा स्वतःसिद्ध यदुवर्य । कीं शोकादिभय संभवे त्या ॥ ६८ ॥ अबाधित कालत्रयाचें ज्ञान । त्या केंवि दुर्निमित्तदर्शन । बहुतेक मम पुरीचें हनन । करिती म्हणोन सचिन्त तो ॥ ६९ ॥ दुर्निमित्तदर्शनें तर्क करी । जे दुर्जन भंगिती माझी पुरी । ऐसा संशय ज्या अंतरीं । तरी सर्वज्ञ हरी मग कैसा ॥ १७० ॥ आणि सौभस्थ शाल्वें रणचत्वरीं । सव्य बाहु कठोर प्रहारीं । ताडूनि शार्ङ्ग पाडिलें समरीं । हे भयाची लहरी अद्वैता ॥ ७१ ॥ शोकमोहभयादिकें । जीवा संभवती हीं अशेखें । ज्ञानविज्ञानसंपन्ना कें । यांचा संभव घडेल ॥ ७२ ॥ विज्ञान म्हणिजे स्वरूपनिष्ठा । ज्ञान म्हणिजे स्वविवेकचेष्टा । प्रपंच-प्रवृत्ति विधिनिर्दिष्टा । जो उभयद्रष्टा पूर्णत्वें ॥ ७३ ॥ इत्याद्यनंतगुणपरिपूर्णा । शोकमोहादिसंभावना । जे संभवे जीवा अज्ञाना । ते सर्वज्ञा कें वदिजे ॥ ७४ ॥ सर्वज्ञता ज्या प्रतिपादिली । तेथ हे संभावना जैं केली । तैं ते आपुली वक्तृता जाली । विरोधरूपा आपणया ॥ ७५ ॥ इत्यादि अन्वयें अनन्वित । कोण्ही ऋषि लाविती ग्रंथ । तो हा शंकेचा वृत्तान्त । सूचिला समस्त तुज राया ॥ ७६ ॥ स्पर्शें लोहाची कालिमा । तुटोनि लाहे हैम गरिमा । तो स्पर्शचि लोहधामा । पावतां महिमा कां वदिजे ॥ ७७ ॥ जे लक्ष्मीचे कृपादृष्टी । सुसंपन्न सुरासुर परमेष्ठी । ते जैं झोळिये देऊनि गांठीं । भिक्षेसाठीं भ्रमण करी ॥ ७८ ॥ तैं तें लक्ष्मीचें सामर्थ्य । बोलिलें तितुकें होय व्यर्थ । ऐसा अर्थाचा अनर्थ । विरोधार्थ न जाणतां ॥ ७९ ॥ कैसा विरोध तोही राया । या दृष्टान्तें योजूनियां । ऐकें सावध होऊनियां । महिमा अद्वय कृष्णाचा ॥ १८० ॥

यत्पादसेवोर्जितयात्मविद्यया हिन्वन्त्यनाद्यात्मविपर्ययग्रहम् ।
लभन्त आत्मीयमनन्तमैश्वरं कुतो नु मोहः परमस्य सद्गतेः ॥ ३२ ॥

ज्याचें सेवितां चरणकमळ । चित्त होय नितान्त अमळ । ऊर्जित आत्मविद्या प्राञ्जळ । लाहती प्रेमळ पदभजनें ॥८१॥ जिये आत्मविद्ये अरून । अनाद्यविद्यानिरसन । करूनि आत्मत्व लाहती पूर्ण । साधक सज्जन सद्बोधें ॥ ८२ ॥ अनादि अविद्या म्हणाल कैसी । घेववी आत्मविपर्ययासी । सरतें करूनि मोहभ्रमासी । अध्यारोपासी प्रतिपादी ॥ ८३ ॥ म्हणसा कोण्हा सरतें केलें । तरी चिन्मया जीवत्व आणिलें । मग तो बरळे आपुल्या बोलें । तेंही काथिलें जातसे ॥ ८४ ॥ म्हणे मी सुकृती सुख-संपन्न । आजि दुष्कृती दुःखी पूर्ण । ह्रस्व दीर्घ अमांसळ पीन । देह आपण स्वयें मानी ॥ ८५ ॥ मज जाकळिती क्षुधा तृषा । जालों पात्र मी यशा अपयशा । ऐसा अविद्याभ्रमाचा वळसा । चिदाभासा भ्रमवीतसे ॥ ८६ ॥ रज्जुवरी सर्पभ्रम । तैसा चिदंशा इन्द्रियग्राम । विपरीतबोधें आग्रह परम । घेऊनि श्रम अनुभविजे ॥८७॥ ऊर्जित श्रीपादसेवे करून । आत्मविद्या तो लाहे पूर्ण । विपरीत अविद्येचें ग्रहण । तिणें खंडन करी त्याचें ॥ ८८ ॥ श्रीपदसेवेच्या उर्जितीं । आत्मविद्या लाहूनि पुरती । अविद्याग्रहण विपरीत मती । खंडूनि होती सत्स्वरूप ॥ ८९ ॥ ऐसे जयाच्या श्रीपदभजनें । जीव खांडिती अविद्यावरणें । वास्तव सन्मय प्रत्यय वयुनें । घडे समरसणें आनंदीं ॥ १९० ॥ मग त्या शोक मोह स्नेहभय । कोण्हीकडे हा प्रत्यय । ज्याच्या सेवनें जीवासि होय । आनंद अद्वय पूर्णत्व ॥ ९१ ॥ त्या या जगदात्मया कृष्णातें । शोकमोहादिकांचें भरतें । प्रतिपादणें हें वक्तृत्व रितें । जाण तूं निरुतें परीक्षिति ॥ ९२ ॥ कथाप्रसंगें प्रतिपादिलें । तें तूं सत्य मानिसी बोलें । तरी हें वाचारंभण केलें । श्रवणरोचनास्तव जाण ॥ ९३ ॥ जो संताची परम गति । अमृत कैवल्य ज्यातें म्हणती । तो हा केवळ रुक्मिणीपति । मोहभ्रान्ति त्या कैची ॥ ९४ ॥ परीक्षिति म्हणे जी महंता । असत्य प्रमेय प्रतिपादितां । केचिदषिमत ऐसें म्हणतां । गमे मम चित्ता आश्चर्य ॥ ९५ ॥ ऋषि ऐसें ज्यांतें म्हणणें । तिहीं कें ऐसें प्रतिपादणें । ये शंकेचें उठवा ठाणें । अतीन्द्रियज्ञानें विवरूनियां ॥ ९६ ॥ हें ऐकूनि बोले शुक । प्राकृत दृश्य जें मायिक । तितुकें जाण दंभात्मक । करणरोचक नवरसमय ॥९७॥ या माजि एक वेदान्तशास्त्र । प्रकाशी वास्तव सच्चिन्मात्र । येर अवघें भवचारित्र । गुणकर्मतंत्र पूर्वपक्ष ॥ ९८ ॥ जे शास्त्रीं जो प्रतिपाद्य विषय । तें प्रतिपादक त्याचोंचि होय । वास्तव बोध या माजि काय । हे कें सोय ते ठार्या ॥ ९९ ॥ सूपशास्त्रीं अमृतान्नें । हें कें वास्तवामृतनिर्वाण । ग्रासाधिक्यें वोपी मरण । तथापि शंसन तच्छास्त्रीं ॥ २०० ॥ पय दधि घृत मधु शर्करा । पंचामृतत्वें शंसी गिरा । या माजि दंभाचा उभारा । तो नृपवरा अवधारीं ॥ १ ॥ परमामृत जें उत्तमोत्तम । त्या सापेक्ष रस कृत्रिम । लवण मिरबोंडें रामठाधम लशुन कुष्माण्डवटकादि ॥ २ ॥ कामशास्त्रीं प्रशंसन । श्रुत्युक्त उपस्थ आनंदायतन । केवळ निधिमिव हर्षनिधान । ऐसें प्रशंसन कवि करिती ॥ ३ ॥ कामोर्मीतें क्षोभ घडे । यूना आंगीं हव्यास चढे । ऐसें रहस्य वाडेंकोडें । प्रतिपादिती तच्छास्त्रीं ॥ ४ ॥ अज्ञातयौवना ज्ञतयौवना । मुग्धा प्रगल्भा प्रौढाङ्गना ।

कलहान्तरिता नाना । नायिकाचिन्हा प्रशंसिती ॥ ५ ॥ ष्ठीवना म्हणती अधरामृत । शशाङ्क वदनेंसीं उपमित । अस्थि चर्म रक्त मूत । विष्ठाभरित प्रशंसिती ॥ ६ ॥ एवं नवरसउभारणी । तितुकी बाह्य दंभाची भरणी । या माजि वास्तव लाहिजे कोण्हीं । शास्त्र म्हणोनी हुडकिलिया ॥ ७ ॥ याचि प्रकारें वैद्यशास्त्र । म्हणती मुख्य रक्षिजे गात्र । वदती भेषजोपाय विचित्र । स्वयें ते अमर कां नव्हती ॥ ८ ॥ एवं आयुर्वेद धनुर्वेद । ज्योतिष गान्धर्वादि हे उपवेद । प्रशंसिती प्रवृत्तिबोध । येथ वास्तव शुद्ध कैं उमजे ॥ ९ ॥ चौदा विद्या चौसष्टी कळा । रुचविती प्रपंचा टवाळा । एका वेदान्ता वेगळा । स्वबोधजिव्हाळा अनोळख त्यां ॥२१०॥ पूर्वमीमांसा कर्कश तर्क । भाट्ट प्राभाकर चार्वाक । न्यायवितंडा जल्प अनेक । प्रपंचरोचक प्राकृत हे ॥ ११ ॥ मूळीं असत्य प्रपंचभान । त्याचें जेथ प्रशंसन । तेथ कैंचें वास्तवज्ञान । लाहती सज्जन मुमुक्षु ॥ १२ ॥ ऐसीं प्रवृत्तिरोचकें शास्त्रें । जिहीं प्रकाशिलीं स्ववक्त्रें । तेही महर्षिच हें तूं श्रोत्रें । अवधारूनियां निर्द्धारीं ॥ १३ ॥ ते तूं महर्षि कैसे म्हणसी । तरी अवधारीं इये विशीं । अविद्याभ्रमग्रस्तां जीवांसी । तारावयासी हरि जन्मे ॥ १४ ॥ तया हरीचें जन्मकर्म । गुणैश्वर्यरूपनाम । श्रवणें पठनें अविद्याभ्रम । तुटोनि विभ्रम जन होती ॥ १५ ॥ पंचामृत जिह्वेसि न रुचे । रामठादि दुर्द्रव्यें तीं रुचे । तेंवि इत्यादि शास्त्रीं हरिगुणांचें । कथन जीवाचें मन मोही ॥ १६ ॥ प्राकृतां तारावयाचि साठीं । कृपा उपजे ईश्वरा पोटीं । तैं तो नटूनि प्राकृतनटीं । करी रहाटी रोचक त्यां ॥ १७ ॥ अवताररूपें जें आचरण । करी जो अनंगुणरूप परिपूर्ण । व्यासादिकें तें करूनि कथन । जगदुद्धरण आदरिलें ॥ १८ ॥ तया हरिगुणांचिया कथना । इत्यादिशास्त्रप्ररोचना । करितां रुचती प्राकृतां जनां । मग ते श्रवणा अनुसरती ॥ १९ ॥ हरिगुणश्रवणीं रतल्या मन । भंगूनि जाय अविद्यावरण । नित्यानित्य उमजे पूर्ण । मग होती शरण गुरुचरणा ॥ २२० ॥ नित्यानित्यविवेक करितां । समर्थापर्यंत अनित्यता । कळल्या नेच्छी इहामुत्रार्था । विरक्त पुरता तैं होय ॥ २१ ॥ विरक्ति येतां अंतःकरणा । न भुले मायिका प्रपंचभाना । करी वास्तवगवेषणा । वेदान्तश्रवणा अनुसरूनी ॥ २२ ॥ तस्मात् प्राकृतां जीवां साठीं । कृपा उपजे ईश्वरा पोटीं । त तो अवतार धरूनि सृष्टी । करी राहटी वेधक त्यां ॥ २३ ॥ येऱ्हवीं नित्य तृप्त आत्मरता । किमर्थ सोळा सहस्र वनिता । पुत्र भ्राता माता पिता । गृहधनममता कोण्हीकडे ॥ २४ ॥ सुहृद आप्त मित्र स्वजन । शत्रु द्वेष्टे दुष्ट दुर्जन । अभेदबोधा कैंचे जाण । जगदुद्धरणास्तव अवगे ॥ २५ ॥ तस्मात त्याची अवतारलीला । वर्णितां सार्थक शास्त्रां सकळां । येऱ्हवीं वेदान्ता वेगळा । वास्तव चिद्बोध घडेना ॥ २६ ॥ वीररसाचें उद्दाम कथन । शत्रु जो कां हन्यमान । त्याचें शौर्य कथिजे गहन । तें यश पूर्ण हनकाचें ॥ २७ ॥ म्हणोनि शाल्वाचा विक्रम । कथिला उत्कट पराक्रम । तितुका वीररससंभ्रम । ऐसें निर्भ्रम तूं जाण ॥ २८ ॥ येऱ्हवीं शोक मोह स्नेह भय । कृष्णा बाधूं शकेल काय । प्राकृत प्रपंच असत्यमय । सत्य सन्मय श्रीकृष्ण ॥ २९ ॥ प्राकृत जीवांच्या उद्धरणा । प्राकृताचरणा सम हरिगुणां । वदतां केचिन्मतव्याख्याना । केलें प्राचीना ऋषींचिया ॥२३०॥ आतां वास्तव स्वमत ऐक । पूर्णैश्वर्य यदुनायक । जन्ही अवगला मनुष्यवेख । तन्ही निष्टंक अखिलात्मा ॥ ३१ ॥ सत्यशौर्यश्रीसंपन्न । सत्यसंकल्प श्रीभगवान । त्यासि शाल्व बापुडें गौण ।

केतुलें तृण प्रळयानळीं ॥ ३२ ॥ येथूनि सावध कुरुसत्तमा । कथितों यथार्थ हरिविक्रमा । कैसें वधिलें शाल्वा अधमा । त्या संग्रामा अवधारीं ॥ ३३ ॥

तं शस्त्रपूगैः प्रहरन्तमोजसा शाल्वं शरैः शौरिरमोघविक्रमः ।
विद्ध्वाच्छिनच्चर्मधनुः शिरोमणि सौभं च शत्रोर्गदया रुरोज ह ॥ ३३ ॥

शाल्व मारावया उद्यत । जाला सक्रोध मन्मथतात । अधिज्य शार्ङ्ग वसवूनि हात । शरजीमूत वर्षतसे ॥ ३४ ॥ अग्निवातादि अनेकास्त्रें । प्रासपरिघादि विचित्र शस्त्रें । यांचे प्रहार करितां अमित्रें । कमलामित्रें न गणूनि ते ॥ ३५ ॥ शार्ङ्गनिर्मुक्त अमोघ शर । अमोघविक्रम जो श्रीधर । तेणें विन्धूनि शाल्ववीर । केला निःशस्त्र समरंगीं ॥ ३६ ॥ अमोघविक्रम जो कां शौरी । तेणें विन्धूनि तीक्ष्णशरीं । धनुष्य छेदिलें शाल्वा करीं । मुकुट शराग्रीं भेदियला ॥ ३७ ॥ वज्रप्राय अंगत्राण । तें वर्म भेदिलें विन्धूनि बाण । केला समरंगीं वित्राण । गेली उतरून वीरश्री ॥ ३८ ॥ शाल्वमस्तकींचा मुकुटमणी । वरिच्या वरी उडविला बाणीं । गदाप्रहारें चक्रपाणी । सौभ भंगूनि पाडियलें ॥ ३९ ॥ होलगडियानें पाडिती अंबा । तैसेंचि म्हणाल पाडिलें सौभा । ऐसें नव्हे तें पंकजनाभा । हस्तें भंगलें तें ऐका ॥२४०॥

तत्कृष्णहस्तेरितया विचूर्णितं पपात तोये गदया सहस्रधा ।
विसृज्य तद्भूतलमास्थितो गदामुद्यम्य शाल्वोऽच्युतमभ्यगाद् द्रुतम् ॥ ३४ ॥

कृष्णहस्तींचा गदाप्रहार । लागतां सौभ जालें चूर । खंडविखंडें सहस्रें सहस्र । शकलें पडिलीं जलार्णवीं ॥ ४१ ॥ गदाप्रहारें करून तुकडे । सौभ समुद्रीं पडे न पडे । तंव तेथूनियां शाल्व उडे । हरिसीं भिडे तें ऐका ॥ ४२ ॥

अधावतः सगदं तस्य बाहुं भल्लेन च्छित्वाथ रथांगमद्भुतम् ।
वधाय शाल्वस्य लयार्कसन्निभं बिभ्रद्बभौ सार्क इवोदयाचलः ॥ ३५ ॥

गदा पडतांचूनियां मुष्टी । लक्षूनि कृष्णातें सक्रोधदृष्टी । धांवतां येरें विन्धूनि काठी । बाहु भूतटीं पाडियला ॥ ४३ ॥ गदेसहित तोडूनि भुज । सावेश गर्जे गरुडध्वज । चक्र उचलूनि प्रळयार्कतेज । कैसा अधोक्षज विराजला ॥ ४४ ॥ जैसा उदयाचलपर्वत । प्रभाते अर्कमंडळा सहित । शोभे तैसा रुक्मिणीकान्त । सचक्रहस्त शोभतसे ॥ ४४ ॥ उदयाचळाची उपमा हरी । रविवलया सम चक्र करीं । ऊर्ध्व संचरे रवि अंबरीं । तद्वत्प्रहारीं उचकरें ॥ ४६ ॥ देदीप्यमान सहस्रार । प्रभे लोपी कोटि भास्कर । हरनेत्रींचा प्रळयाङ्गार । तत्तुल्य क्रूर भासतसे ॥ ४७ ॥

जहार तेनैव शिरः सकुण्डलं किरीटयुक्तं पुरुमायिनो हरिः ।
वज्रेण वृत्रस्य यथा पुरन्दरो बभूव हाहेति वचस्तदा नृणाम् ॥ ३६ ॥

तया सुदर्शनचक्रें करून । शाल्वशिराचें केलें हरण । काये पाखानि छेदितां पूर्ण । आक्रमी गगन तीव्र जवें ॥ ४८ ॥ विमानीं पाहती सुरवरकोटी । नृपवर मुनिवर लक्षिती दृष्टी । मुकुटकुंडलमंडित सृष्टी । गगना पोटीं संचारतां ॥ ४९ ॥ जैसें वृत्रासुराचें मौळ । वज्रप्रहारें आखंडळ । खंडूनि उडवी तेंवि घननीळ । हरी शिरकमळ शाल्वाचें ॥ २५० ॥ तेव्हां जाला हाहाकार । अवशिष्ट शाल्वाचा परिवार । म्हणती निमाला शाल्ववीर । सखेद नर रसरसिती ॥ ५१ ॥ बहु मायावी शाल्व कपटी । त्यातें वधूनि रणतळवटीं । विजयी जाला त्रिजगज्जेठी । जाली सृष्टी अकंटक ॥ ५२ ॥ विमानीं पहावया हरिसमर । गगनीं दाटले होते सुर । तिहीं केला जयजयकार । तो समग्र अवधारा ॥ ५३ ॥

तस्मिन्निपतिते पापे सौभे च गदया हते । नेदुर्दुन्दुभयो राजन्दिवि देदगणेरिताः ॥ ३७ ॥

सखीनामपचितिं कुर्वन्दन्तवक्त्रो रुषाभ्यगात् ॥ ३८ ॥

गदाप्रहारें तें भंगिलें असतां । चक्रप्रहारें शाल्वघाता । केल्या नंतर विमानस्थां । अमरां समस्तां सुख जालें ॥ ५४ ॥ सौभ मयकृत अयस्मय । कठोर दुर्गम त्रिपुरप्राय । सुरवर ज्याचें मानिती भय । त्रिजगीं दुर्जय सुरासुरां ॥ ५५ ॥ अमरवरांचे आज्ञे करून । दुंदुभि त्राहाटिती देवगण । नंदनोद्भव कुसुमांचा घन । करिती संपूर्ण हरिमाथां ॥ ५६ ॥ यादव गर्जती जयजयकारीं । ठोकिती दुन्दुभि कुञ्जरभेरी । वरूनि संग्रामीं विजयश्री । उत्साहगजरीं परतले ॥ ५७ ॥ भाट पढती बिरुदावळी । वैष्णव नाचती धुमाळी । सुरवर पढती नामावळी । पूर्ण वनमाळी जयवंत ॥ ५८ ॥ मुनिजन आशीर्वादसूक्तीं । मंत्राक्षता घेऊनि हातीं । श्रीकृष्णावरी वर्षती । अक्षय्य म्हणती यशोलक्ष्मी ॥ ५९ ॥ ऐसे उत्साहें द्वारकापुरीं । माजि प्रवेशतां श्रीहरी । तंव अकस्मात अपर वैरी । पातला समरीं तें ऐका ॥ २६० ॥ कृष्णें मारिले आपुले सखे । मागधपौण्ड्रकां सारिखे । शिशुपाळशाल्वांच्या दुःखें । हृदयीं धडके क्रोधाग्नि ॥ ६१ ॥ व्हावया मित्रत्वा उत्तीर्ण । साच करावया सखेपण । श्रीकृष्णासीं समराङ्गण । वक्त्रदंत करूं आला ॥ ६२ ॥ क्रोधें फुम्पाटे जैसा व्याळ । भयंकर भासे प्रळयकाळ । सवें न घेतां सेनाबळ । पातला केवळ एकाकी ॥ ६३ ॥ यावरी तेणेंशीं संग्राम । करिता होईल मेघश्याम । तें व्याख्यान अत्युत्तम । श्रोते सत्तम परिसोत ॥ ६४ ॥ पुढिले अध्यायीं ते कथा । शुक निरूपील कुरुनाथा । तेथ सावध होऊनि श्रोतां । सेविजे तत्वता हरिवरदा ॥ ६५ ॥ अध्याय सप्तसप्ततितम । एकादशिनी हे सप्तम । शाल्वकृष्णांचा संग्राम । वदला सुगम दयार्णव ॥ ६६ ॥ या वरी दशमाचे उपसंहरणीं । कथिजेल अष्टम एकादशिनी । बैसोनि तिचिये व्याख्यानीं । सुकृत सज्जनीं संग्रहिजे ॥ ६७ ॥ अष्टसप्ततितमाध्यायीं । वक्त्रदंत विदूरथ पाहीं । समरीं वधूनि शेषशायी । होईल विजयी त्रिजगातें ॥ ६८ ॥ त्या नंतरें संकर्षण । तीर्थयात्रा करितां जाण । सूतें न देतां अभ्युत्थान । करील हनन तयाचें ॥ ६९ ॥ इतुकी वक्ष्यमाण कथा । अवधान देऊनि परिसिजे श्रोतां । दयार्णव भाषाटिप्पणीवक्ता । केला तत्वता गुरुनाथें ॥ २७० ॥ भागवतींचा दशम स्कंध । परीक्षितीतें शुक

कोविद । कथिता जाला शाल्ववध । तो हा विशुद्ध वाखाणिला ॥ ७१ ॥ प्रतिष्ठानीं एकच्छत्र । एका जनार्दनकृपापात्र । अद्वयबोधें विश्वामित्र । गोत्रीं स्वतंत्र अवतरला ॥ ७२ ॥ चिदानंदें स्वानंदघणी । देतसे प्रणतां गोविन्दगुणीं । त्याचें संपूर्ण पायवणी । दयार्णवनिम्नीं सांठवलें ॥ ७३ ॥ तेणें निम्नता पूर्ण जाली । अकूपाराची अभिधा आली । साधकीं चिन्मुक्ति साधिलीं । मग्न होऊनि तीर्थजळीं ॥ ७४ ॥ अभिमानमळ विसर्जून । निरभिमान शौचाचमन । करूनि श्रवणतीर्थीं स्नान । सायुज्यसदन प्रवेशिजे ॥ ७५ ॥ इतुकी दयार्णवाची विनती । मान्य करूनि सज्जनीं श्रोतीं । चिदात्मबोधें कमलापती । कैवल्यप्रातीवरी भजिजे ॥ ७६ ॥ श्रीमद्भागवत दशमस्कंध । टीका हरिवरद अगाध । दयार्णवकृत परम विशुद्ध । अध्याय प्रसिद्ध सप्तसप्ततितम ॥ २७७ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां शाल्ववधोनाम सप्तसप्ततितमोऽध्यायः ॥ ७७ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

कालयुक्ताक्षिके शुक्ले चाषाढे प्रतिपद्बुधे । सप्तसप्ततितमोऽध्यायः पिपीलिकपुरेऽथितः ॥ १ ॥
श्लोक ॥ ३८ ॥ ओवी-संख्या २७७ ॥ एवं संख्या ३१५ ॥

खरवत्सरे मधुकृष्ण चतुर्दशी मंदवार प्रथम प्रहरी एकादशिनी सप्तम समाप्त ।
(शहात्तरावा अध्याय मिळून ओवीसंख्या ३५०७३)

सत्याहत्तरावा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ७८ वा

श्रीकृष्णपरमात्मने नमः । स्वपादप्रणता अभयदपाणी । अक्षयविभवद मंगळवाणी । कृपापाङ्गीं कल्यणखाणी । तीर्थश्रेणी चरणाब्जीं ॥ १ ॥ ऐसिया स्वामी श्रीगोविन्दा । अनन्यभावें सेवितां वरदा । लाधलिया वरी दशमस्कंधा । शाल्ववधान्त वाखाणिलें ॥ २ ॥ अध्याय विवरिले सप्तसप्तति । सप्तम एकादशिनी पुरती । येथें संपली यावरी श्रोतीं । श्रवणीं आस्था वाढाविली ॥ ३ ॥ परंतु ये व्याख्यानीं घिवसा । प्रज्ञा नावलंबी च सहसा । जे येथ विपश्चितां विद्वांसां । चंचुप्रवेशा अनवसर ॥ ४ ॥ पृथुकाख्यानीं द्विजाचें प्रेम । कीं कुरुक्षत्रयात्रा प्रियसंगम । वसुदेवाचा मख उत्तम । कथितां दुर्गम मति मानी ॥ ५ ॥ विदेहा श्रुतदेवाचिया भावें । द्विधा होऊनि वासुदेवें । मिथिले माजि वसतां ठावें । न कीजे लाघवें प्रेमाच्या ॥ ६ ॥ असो सर्व दुर्गमा मुकुटीं । वेदस्तुति केंवि मन्हाटीं । वदवेल ऐसी शंका पोटीं । वाटे गोठी अघटित हे ॥ ७ ॥ यास्तव हांव ये व्याख्यानीं । प्रवर्तावया नुपजे मनीं । देशिकेन्द्राचे पदचिन्तनीं । सज्जनां ग्लानि निवेदिली ॥ ८ ॥ हें ऐकूनि सज्जनवृंद । म्हणती वारंवार काय हा छंद । यथार्थ वरद श्रीगोविन्द । तरी तो विशद वदवील ॥ ९ ॥ वरद असतां सद्गुरुवर्य । मंद ही वंद्य मानिती आर्य । तेथ संदेहाचें कार्य । नसतां अधैर्य कां कथिंजे ॥ १० ॥ परिसाचिया वरकलावरी । हेम लोह एकाचि परी । तेंवि गुरुवरदें मंदवैखरी । समता करी सुरगुरुसीं ॥ ११ ॥ किंवा गंगेचिये मिळणीं । यमुना अथवा वोहळवणी । न्यून पूर्ण पवित्र पाणी । निवडून कोण्ही दावूं शके ॥ १२ ॥ एवं तुझिया वदनें वक्ता । समर्थ जाणोनि त्रैलोक्यभर्ता । शंका सांडूनि भगवच्चरिता । पदपदार्था वाखाणीं ॥ १३ ॥ न्यून पूर्ण तोचि जाणे । आपण पायिकी मात्र करणें । समर्थाचीं पादत्राणें । जाणोनि नमनें जन करिती ॥ १४ ॥ श्रीप्रभूनें अंगीकारिलें । तें त्रैलोकीं सरतें जालें ।

भाषाव्याख्यान न वचे केलें । हें कें बोलें वदों शकिजे ॥ १५ ॥ ऐसा सज्जनीं निष्ठुरां वचनीं । गुरुकृपेचा महिमा कथुनी । दुर्बोध अष्टम एकादशिनी । तद्व्याख्यानीं प्रवर्तविलें ॥ १६ ॥ ऐसा सज्जनीं नाभीकार । देतां दयार्णव जाला सधर । म्हणतो तुम्हांसि भारअभार । परिसा सादर या उपरी ॥ १७ ॥ येथूनि अष्टम एकादशिनी । ऐका तियेची अनुक्रमणी । विदूरथ वक्रदंत हे दोन्ही । अष्टसप्ततिमाजि वाधिले ॥ १८ ॥ नवसप्ततितमामाजि हळी । बल्वलवधें मुनिमंडळी । तोषोनि सूतहत्या क्षाळी । तीर्थें सकळीं करूनियां ॥ १९ ॥ पुढें अध्यायीं अशीतितमीं । श्रीदामगुरुबंधुसंगमीं । गुरुगृहनिवासकथासंभ्रमीं । परमानंदीं हरि तुष्टे ॥ २० ॥ एकाशीतितमीं त्याचे । आदरें पोहे भक्षूनि साचे । नगर निर्मूनि सुवर्णाचें । अर्पीं देवां दुर्लभ जें ॥ २१ ॥ कुरुक्षेत्रीं द्व्यषीतितमीं । सूर्यग्रहण-यात्रोद्यमीं । वृष्णि देखोनि नृपसत्तमीं । कृष्णमहिमा वर्णियला ॥ २२ ॥ त्र्यशीतितमीं कृष्णवनिता । आपुलाल्या स्वयंवरकथा । द्रौपदीनें प्रश्न करितां । वदत्या झाल्या सविस्तर ॥ २३ ॥ चतुरुत्त-राशीतितमीं । मुनीश्वराच्या संगमीं । वसुदेवाच्या मखोद्यमीं । बंधुवर्गा प्रस्थापी ॥ २४ ॥ पंचोत्त-राशीतितमामाजी । मातृप्रार्थना ऐकूनि सहजीं । संकर्षणाधोक्षजीं । मृतात्मजासि आणियलें ॥ २५ ॥ षडशीतितमीं सुभद्राहरण । अर्जुन केलें तें कथी पूर्ण । कृष्णें मिथिले प्रति जाऊन । विदेह ब्राह्मण तोषविले ॥ २६ ॥ नारदनारायणसंवाद । सप्ताशीतितमीं कैवल्यप्रद । वेदस्तुतीचा अर्थ विशद । विद्वद्वृंदाप्रिय कथिला ॥ २७ ॥ अष्टाशीतितमाध्यायीं । विष्णुभक्ति कैवल्यदायी । अपरदेवताभजनें पाहीं । विभवनवायी लाहिजती ॥ २८ ॥ एवंमा दिअध्यायवरी । अष्टम एकादशिनी पुरी । वाखाणिजेल सविस्तरी । सज्जनानिकरीं श्रवण कीजे ॥ २९ ॥ पूर्णकथानुसंधान । शाल्व मारूनि विजयी कृष्ण । नगरीं प्रवेशतां दुर्जन । वक्रदंत उठावला ॥ ३० ॥ शुक म्हणे गा परीक्षिती । पूर्वाध्यायाच्या समाप्तीं । वक्रदंत महादुर्मती । आला पुढती तें ऐका ॥ ३१ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ शिशुपालस्य शाल्वस्य पौण्ड्रकस्यापि दुर्मतिः । परलोकगतानां च कुर्वन्पारोक्ष्यसौहृदम् ॥ १ ॥

व्हावया स्वसख्यांचें उत्तीर्ण । वक्रदंत कोधें करून । जैसा धांवें प्रळयपवन । तैसा जवीन पातला ॥ ३२ ॥ पौण्ड्रक शिशुपाळ शाल्व नृपति । त्यांचिया कैपक्षें दुर्मति । ते पावलिया कर्मगति । उत्तीर्णार्थी स्वयें आला ॥ ३३ ॥ जितां सुत्यद्भाव आचरती । मेलिया वार्ताही न करिती । तैसी वक्रदंताची प्रीती । नोहे निश्चितीं कुरुवर्या ॥ ३४ ॥ मेलिया मागें सख्याचें उशिणें । घ्यावें किंवा जावें प्राणें । ऐसा निश्चय करूनि मनें । केलें धांवणें कृष्णावरी ॥ ३५ ॥ मित्रा माघारिया उत्तीर्ण । व्हावया लागीं प्रज्वळून । शाल्व वधूनि जनार्दन । जातां येऊन पडखळिला ॥ ३६ ॥ कैसा आला कोणे रीती । ऐसें पुससी जरी भूपती । ऐक ते ही तुज प्रती । समरस्थिती निरूपितों ॥ ३७ ॥

एकः पदातिः संक्रुद्धो गदापाणिः प्रकंपयन् । पद्भ्यामिमां महाराज महासत्त्वो व्यदृश्यत ॥ २ ॥

पदाति एकाकी एकट । सक्रोधें धांवे महाधीट । गदा पडताळूनि सुभट । वळें उद्भट उठावला ॥ ३८ ॥ राहो जैसा खवळे ग्रहणीं । निर्भय तैसा गदापाणी । रथीं लक्षूनि कृष्ण तरणी । समराङ्गणीं संघटला ॥ ३९ ॥ पादप्रहारें कांपवी धरा । निकट संघटला अवचित समरा । कृष्ण पाहतां झाला पुरा । पिशाच दुसरा अवगमिला ॥ ४० ॥ कृष्णें तयातें देखोनियां । क्षात्रधर्मानुसार राया । प्रवर्तला युद्धकार्या । तें कुरुवर्या अवधारीं ॥ ४१ ॥

तं तथायांतमालोक्य गदामादाय सत्वरः । अवप्लुत्य रथात्कृष्णः सिन्धु वेलेव प्रत्यधात् ॥ ३ ॥

प्रळयसिन्धूचा जैसा लोट । तैसा वक्रदंत सुभट । आला त्यातें श्रीवैकुण्ठ । देखूनि नीट उठावला ॥ ४२ ॥ कौमोदकी गदा घेऊन । उडी टाकिली रथावरून । वेळा सांवरी सिन्धुजीवन । तेंवि धांवून पडखाळिला ॥ ४३ ॥ पादचारी वक्रदंत । रथीं असतां कमलाकान्त । क्षात्रधर्मास हें अनुचित । म्हणोनि पदाति स्वयें जाला ॥ ४४ ॥ किंवा आपुला द्वारपाळ । विघडला होता बहुकाळ । त्यासि देखूनि उतावीळ । जाला गोपाळ किम्बहुना ॥ ४५ ॥ वीरश्रीरसाची सपर्या । विरोधभजनें करावया । भक्त सादर झाला तया । प्रसन्न व्हावया प्रवर्तला ॥ ४६ ॥ असो ऐसा गदाधर । सवेग सांडूनियां रहंवर । वक्रदंता समरीं स्थिर । झाला सत्वर जगज्जनिता ॥ ४७ ॥ वक्रदंतें तिये काळीं । देखोनि सावेश वनमाळी । पतंग जैसा दीपा कवळी । तैसा जवळी संघटला ॥ ४८ ॥

गदामुद्यम्य कारूषो मुकुन्दं प्राह दुर्मदः । दिष्टया दिष्टया भवानद्य मम दृष्टिपथं गतः ॥ ४ ॥

वृद्धशर्मा करुषनाथ । या लागीं कारुष नामसंकेत । तयाचा पुत्र वक्रदंत । असे विख्यात नृपचक्रीं ॥ ४९ ॥ मुकुन्दातें तो देखोनि । दृष्टीं प्रतापें गदा कवळूनि मुष्टीं । परम दुर्मद वीर जेठी । म्हणे रे भेटो आजि तुझी ॥ ५० ॥ बहुत दिवस शोधितां सृष्टी । तूं आजि दैवें माझिया दृष्टी । गोचर झालासि येथूनि कष्टी । पडल्या मिठी न सुटसी ॥ ५१ ॥ ऐसा वक्रदंत विषादें । वचनें बोलिला जियें विरुद्धें । वाग्देवी तीं परमार्थबोधें । सुस्निग्धवादें प्रतिपादी ॥ ५२ ॥ दूर केला जेणें मद । या लागीं वक्रदंत दुर्मद । गदा उचलोनि बोले शब्द । तोही विशद अवधारा ॥ ५३ ॥ मुकुन्दातें म्हणे वेगें । दृष्टिगोचर जालासि भाग्यें । आजि कल्याण भद्र अवघें । दैवयोगें मज घडलें ॥ ५४ ॥ मुकुम् म्हणिजे मोक्षानंद । तद्दायक तूं श्रीमुकुन्द । जन्मत्रयादि आजि विशद । भाग्यें उपलब्ध झालासी ॥५५॥ जन्मत्रयीं अन्वेषण । करितां आजि हें तव दर्शन । झालें कल्याण कल्याण । परमादरें मी मानीं ॥५६॥ माझा स्वामी तूं श्रीधर । मज आजि झालासि दृग्गोचर । दिष्टया म्हणिजे भद्र भद्र । वीप्सोद्गार हर्षोक्ति ॥ ५७ ॥ ब्रह्मशापाच्या विमोक्षणा । आलों पात्र मी मुक्तिदाना । ऐसें जाणोनि करुणापूर्णा । मम कामना सफळ करीं ॥ ५८ ॥ ये श्लोकीं हा परमार्थ कथिला । वाग्देवीनें वाखाणिला । या वरी कारुष श्लोक पुढिला । बोलता झाला तो ऐका ॥ ५९ ॥

त्वं मातुलेयो नः कृष्ण मित्रध्रुङमां जिघांससि । अतस्त्वां गदया मन्द हनिष्ये वज्रकल्पया ॥ ५ ॥

भो भो कृष्ण तूं आमुचा । सुहृद्बंधु होसी साचा । जिवलगमित्र जवळिकेचा । कथितों वाचा ते ऐका ॥ ६० ॥ तव जनकाची जे भगिनी । श्रुतदेवी ते माजी जननी । मातुलेय तूं मज लागूनी । सोयरेपणीं अतिनिकट ॥ ६१ ॥ परंतु केवळ तूं मित्रघ्न । न मना हें मम निष्ठुर वचन । याचें पूर्वापर व्याख्यान । हृदयीं जाणून क्षमा करीं ॥ ६२ ॥ श्रुतश्रवा वसुदेवस्वसा । पूर्वीं दीधली जे दमघोषा । तत्सुत शिशुपाळ मजचि ऐसा । सुहृद्बंधु मित्रत्वें ॥ ६३ ॥ त्याचें तुंवा केलें हनन । या लागीं केवळ तूं मित्रघ्न । आतां मज ही वाधिमी पूर्ण । तें ही कारण अवधारीं ॥ ६४ ॥ मी आणि शिशुपाळ दोघे जण । प्रभूचे द्वास्थ पार्षदगण । सनकादिकांच्या शापें करून । दैत्य होऊन जन्मलों ॥ ६५ ॥ पुढती तयांच्या उच्छापवचनीं । तुझेनि हस्तें चक्रपाणी । मृत्यु लाहूनि वैकुण्ठभुवनीं । द्वास्थ होऊनि तुज सेवूं ॥ ६६ ॥ यास्तव आमुचा तुझेनि हस्तें । मृत्यु दुर्निवार हें जाणोनि निरुतें । या लागिं मी प्रार्थितों तूतें । हें भगवंतें मज द्यावें ॥ ६७ ॥ हें अमंदसंबोधन । जें तूं सर्वत्र आनंदघन । यास्तव करिसी सर्व सहन । न स्पर्शोन विषमता ॥ ६८ ॥ तव सोढव्यें सोढव्यशक्ती । धरित्री अंगीं विराजे पुरती । तो तूं केवळ सोढव्यमूर्ती । माझी विनती अवधारीं ॥ ६९ ॥ तुझेनि हस्तें मृत्यु माझा । अचुक विहिला गरुडध्वजा । तथापि क्षात्रधर्म वोजा । आधीं घे पूजा हे माझी ॥ ७० ॥ वज्रप्राय परम कठोर । साहें माझा गदाप्रहार । गदाप्रहारें तव संहार । आजि साचार करीन मी ॥ ७१ ॥ अरे मंदा न विचारितां । तुंवा केलें मित्रघाता । गदाप्रहार वोपूनि माथां । तुज मी आतां संहरितों ॥ ७२ ॥ ऐसीं क्षात्रधर्माचीं वचनें । परमार्थबोधें वाग्देवीनें । वाखाणिलीं तीं श्रोतीं श्रवणें । शब्दशास्त्रज्ञीं परिसावीं ॥ ७३ ॥ क्षात्रधर्मास्तव शब्द कठोर । तैसाचि माझा गदाप्रहार । क्षमा करूनि एकवार । साहें साचार निजमाथां ॥ ७४ ॥ म्हणसी वज्रतुल्य तुझी गदा । घायें मस्तक करील चेंदा । तरी अवज्रकल्पा श्रीगोविन्दा । समान कुमुदा अर्पीन ॥ ७५ ॥ म्हणसी पंकजप्राय प्रहार । केलिया तुझा पुरुषार्थ थोर । कोंवि होईल तरी साचार । ऐक उत्तर जगदीशा ॥ ७६ ॥

तर्ह्यनृण्यमुपैम्यज्ञ मित्राणां मित्रवत्सलः । बन्धुरूपमरिं हत्वा व्याधिं देहचरं यथा ॥ ६ ॥

नाहीं ज्ञानी जयाहून । त्यासि संबोधन हें अज्ञ । तस्मात संबोधी हे सर्वज्ञ । ऐसें मुज्ञ समजती ॥ ७७ ॥ भो सर्वज्ञा स्वामी तूतें । देहसंबंधें बंधुत्वनातें । ब्रह्मशापें शत्रुत्व तेथें । गोचर होतें तनुभावी ॥ ७८ ॥ एवं शापानुबंध शत्रुता । तूतें मानूनि कृत्रिमता । आजि तयेच्या करूनि घाता । उत्तीर्णता लाहीन ॥ ७९ ॥ माझे मित्र शाल्व शिशुपाळ । मी तद्विषयीं परम स्नेहाळ । मज मानीं तूं मित्रवत्सल । होईन केवळ उत्तीर्ण त्यां ॥ ८० ॥ बंधुसंबंधरूप तूं अरि । क्षात्रधर्में तुज मारूनि समरीं । मित्रऋणाचिये प्रतिकारीं । वरीन यापरी आनृण्य ॥ ८१ ॥ विशेषें करूनि आधीयमान । म्हणिजे मानसीं अतिचिन्तन । व्याधि ऐसें त्या अभिधान । शब्दशास्त्रज्ञप्रतिपाद्य ॥ ८२ ॥ आणि जो देही अन्तर्यामी ।

देहचाळक चर्याधर्मीं । तो तूं ईश्वर चित्सुखधामीं । सर्वीं सर्वग पूर्णत्वें ॥ ८३ ॥ ऐसिया सर्वगा तुजलागून । क्षात्रधर्में तुज आराधून । हत्वापर्याय ज्ञात्वा जाण । होईन उत्तीर्ण मित्रपणा ॥ ८४ ॥ एवं हृदयस्था जाणोनि तूतें । उत्तीर्ण होईन मित्रपणातें । जैसा पुत्र पितृऋणातें । ब्रह्मनिष्ठत्वें परिहारी ॥ ८५ ॥ क्षात्रधर्में वरी कठोर । वास्तवबोधें तारतम्यपर । वाक्यें बोलिला दंतवक्र । तिहीं श्रीधर मानवला ॥ ८६ ॥

एवं रुक्षैस्तुदन्वाक्यैः कृष्णं तोत्रैरिव द्विपम् । गदयाताडयन्मूर्ध्नि सिंहवद्घनदच्च सः ॥ ७ ॥

अहंता त्वंता द्वैतभेद । एवंरूपा तुझा वध । करूनि ऐक्यें आनृण्यबोध । लाहीन स्वतःसिद्ध समरसता ॥ ८७ ॥ ऐसीं रुक्षें कठोर वचनें । ताडिलीं वक्रदंतें दारुणें । चाबुकें कुञ्जरा जेंवि ताडणें । तेणें मानें कृष्णातें ॥ ८८ ॥ वक्रदंत इत्यादिवचनीं । कृष्णाप्रति समराङ्गणीं । बोलिला गदा ताडूनि मूर्ध्नि । गर्जे वदनीं सिंहरवें ॥ ८९ ॥ प्रार्थनागर्भित क्रूरोत्तरा । क्षमूनि त्याचिया गदाप्रहारा । न निवारूनि बोडवी शिरा । तें कुरुवरा अवधारीं ॥ ९० ॥

गदयाऽभिहतोऽप्याजौ न चचाल यदूद्वहः । कृष्णोऽपि तमहन्गुर्व्या कौमोदक्या स्तनांतरे ॥ ८ ॥

गदाघातें समराङ्गणीं । वक्रदंतें ताडितां मूर्ध्नि । अणुमात्र चंचळ चक्रपाणी । यादवाग्रणी न जाला ॥ ९१ ॥ पुष्प पडतां मेरुशिखरीं । नोहे चंचळ तो ज्या परी । तैसा कृष्ण गदाप्रहारीं । नादरी समरीं चाञ्चल्य ॥९२॥ कारुपाचा गदाप्रहार । साहूनि पुष्पासम श्रीधर । स्वगदा कौमोदकी कठोर । करी तत्प्रहार रिपुहृदयीं ॥ ९३ ॥ दोहीं स्तनांचा मध्यभाग । केवळ हृदय जें मर्माङ्ग । तिये ठायीं अतिसवेग । करीं श्रीरंग गदाप्रहार ॥ ९४ ॥ श्रीकृष्णाच्या गदाप्रहारीं । वक्रदंताची कैसी परी । जाली ते तूं सविस्तरीं । श्रवण करीं कुरुवर्या ॥ ९५ ॥

गदानिर्भिन्नहृदय उद्वमन्रुधिरं मुखात् । प्रसार्य केशबाह्वङ्घ्रीन्धरण्यां न्यपतद्व्यसुः ॥ ९ ॥

गदाप्रहारें हृदय चूर्ण । तेणें भडभडां मुखांतून । रुधिर वमी आणि नयन । फिरवी विवर्ण भयंकर ॥ ९६ ॥ पसरला भूतळीं उताणा । केश मोकळे विखुरले जाणा । कर पद खोडी सोडितां प्राणा । चाळी दशना विवशत्वें ॥ ९७ ॥ घुरघुरघोषें कंठ वाजे । प्राण मांडिले ऐसिये ओजे । प्रेत पहुडलें समरशेजे । गगन गाजे हरिविजयें ॥ ९८ ॥

ततः सूक्ष्मतर ज्योतिः कृष्णमाविशदद्भुतम् । पश्यतां सर्वभूताना यथा चैद्यवधे नृप ॥ १० ॥

कारुप ऐसा समराङ्गणीं । प्राण सोडूनि पडिला धरणी । त्रितीयजन्मीं विरोधभजनीं ।

वैकुण्ठभुवनीं वसावया ॥ ९९ ॥ त्या नंतरें तयाची ज्योती । सूक्ष्म चिन्मात्रें देहीं होती । ते ते समयीं व्योमपथीं । जाली रिघती देदीप्य ॥ १०० ॥ भूतभौतिकां पाहत असतां । कृष्णीं पावली समरसता । शिशुपालवधीं कृष्णनाथा । जैशी चित्प्रभा समरमली ॥ १ ॥ शिशुपाल वक्त्रदंत दोघे जण । वैकुण्ठवासी पार्षदगण । विरोधभजनें शापमोक्षण । जन्मत्रयान्तीं पावले ॥ २ ॥ यावरी वक्त्रदंताचा अनुज । विदूरथनामा कारुपराज । भ्रातृमरणाची मानूनि लाज । प्रतापपुञ्ज उठावला ॥ ३ ॥

विदूरथस्तु तद्भ्राता भ्रातृशोकपरिप्लुतः । आगच्छदसिचर्मभ्यामुच्छ्वसंरतज्जिघांसया ॥ ११ ॥

विदूरथ वक्त्रदंताचा बंधु । कृष्णहस्तें अग्रजवधु । देखोनि क्षोभला जैसा सिन्धु । लोटे अगाध प्रतिपर्वी ॥ ४ ॥ देखोनि अग्रजाचें निर्याण । शोकसागरीं झाला मग्न । शौर्यवृत्ति आंगवून । आला कृष्ण वधावया ॥ ५ ॥ कृतान्ताची जिह्वा कल्लोळ । तैसा खड्ग सुतेजाळ । वामहस्तीं चर्म वर्तुळ । घेऊनि प्रबळ उठावला ॥ ६ ॥ भस्त्राधमिता पावकशिखा । ऊर्ध्व धांवती गगनोन्मुखा । तेंवि उच्छ्वास मुखनासिका । पासूनि निघती खरपुस पैं ॥ ७ ॥ हस्त चोळूनिं भूतळपृष्ठीं । खड्ग कवळिला सुदृढ मुष्टी । कृष्ण लक्षूनि क्रूर दृष्टी । धांवे कपटी हननार्थ ॥ ८ ॥

तस्य चापततः कृष्णश्चक्रेण क्षुरनेमिना । शिरो जहार राजेन्द्र सकिरीटं सकुण्डलम् ॥ १२ ॥

अकस्मात विद्युत्पात । होय तैसा विदूरथ । खड्गचर्मेंसीं पडतां त्वरित । कमळाकान्त काय करी ॥ ९ ॥ विधातृसृष्टीहूनि जें पूर्वी । विष्णुचक्र हें जाणिजे सर्वी । विधिहरशक्रादिसुपर्वी । स्वर्चित दर्वीकरप्रमुखीं ॥ ११० ॥ क्षुरप्राय तीक्ष्ण धार । तें प्रेरूनि सहस्रार । विदूरथाचें उडविलें शिर । सकिरीट सकुण्डल ॥ ११ ॥ चक्रप्रहारें शिर गगनीं । उडोनि पडलें कृष्णचरणीं । कीं ते पुष्पाञ्जळी स्वमरणीं । अर्पूनि विदूरथ उद्धरला ॥ १२ ॥

एवं सौभं च शाल्वं च दन्तवक्त्रं सहानुजम् । हत्वा दुर्विषहानन्यैरीडितः सुरमानवैः ॥ १३ ॥

एवं म्हणिजे ऐशिया परी । ससौभशाल्वप्रमुख वैरी । विदूरथवक्त्रदंतादि समरीं । वधूनि हरी जयवंत ॥ १३ ॥ भूमंडळींचे भुभूज थोर । मानव अथवा सुरासुर । तिंहीं ज्यांसीं न करवे समर । ऐसें दुर्धर प्रतापी ॥ १४ ॥ तया दुर्विषहांतें हरी । मारूनि विजयी झाला समरीं । सुरवर गर्जती जयजयकारीं । तें अवधारीं कुरुभूपा ॥ १५ ॥

मुनिभिः सिद्धगंधर्वैर्विद्याधरमहोरगैः । अप्सरोभिः पितृगणैर्यक्षैः किन्नरचारणैः ॥ १४ ॥
उपगीयमानविजयः कुसुमैरभिवर्षितः । वृतश्च वृष्णिप्रवरैर्विवेशालंकृतां पुरीम् ॥ १५ ॥

मुनींहीं ज्याचा विजयस्तव । केला आणि सिद्ध गंधर्व । विद्याधर उरग सर्व । गाती विभव विजयाचें ॥ १६ ॥ अप्सरा गाती नृत्य करितां । चारण किन्नर ताल धरितां । तौर्यत्रिकामाजी तत्वता । विजयकथा कृष्णाची ॥ १७ ॥ ऊर्जित विजय वर्धमान । वर्णिती यक्षादि पितृगण । दुन्दुभिघोषें भरिती गगन । वर्षती नंदनवनसुमनीं ॥ १८ ॥ देवीं ऐसा जयोत्सव । केला कुसुमांचा वर्षाव । वृष्णिवेष्टित श्रीकेशव । जेंवि वासव अमरेंसीं ॥ १९ ॥ वृत्र भंगूनि अमरपुरीं । प्रवेशे तैसी द्वारकापुरी । शाल्व कारूष वधूनि समरीं । विजयी श्रीहरी प्रवेशला ॥ १२० ॥ तोरण पताका कुङ्कुमसडे । द्वारके माजी चहूंकडे । सदीप कलश कदली झाडें । दोहींकडे सुफळित ॥ २१ ॥ ऐसी द्वारका सालंकृत । तीमाजी प्रवेशला भगवंत । शत्रु भंगूनि विजयवंत । यादवें सहित जयघोषें ॥ २२ ॥ वृष्णिभोजान्धककुकुर । माधव दाशार्ह सात्वतप्रवर । इहींसीं वेष्टित कमलावर । वरूनि आला विजयश्री ॥ २३ ॥ द्वारकेचिया नगरनारी । सदीप आरत्या घेऊनि करीं । ओंवाळिती अत्यादरीं । पुष्पीं हरिवरी वर्षोनियां ॥ २४ ॥ ऐसा अगाध कृष्णमहिमा । ऐकिला कीं कुरुसत्तमा । तया प्रति पराजयकाळिमा । मूर्खां अधमां प्रतिभासे ॥ २५ ॥

एवं योगेश्वरः कृष्णो भगवाञ्जगदीश्वरः । ईयते पशुदृष्टीनां निर्जितो जयतीति सः ॥ १६ ॥

धरूनियां मानुषी नट । लीलालाघवें करी अचाट । वधिले बालवेशें बलिष्ठ । महादुष्ट दुरात्मे ॥ २६ ॥ एवं विजयी श्रीभगवान । सूर्य नित्यत्वें प्रकाशमान । तैसा जो कां जयसंपन्न । पराजय कोठून त्या स्पर्शे ॥ २७ ॥ जड अज्ञान प्राकृत पशु । ऐसे सामान्य जे नरविशेषु । ते म्हणती हा हृषीकेशु । कोठें अपयश यश लाहे ॥ २८ ॥ पळाला जरासंधा भेणें । समरीं पिटिला कालयवनें । जयापजयांचीं लाञ्छनें । भाविती अज्ञानें पशुदृष्टी ॥ २९ ॥ कृष्ण नित्यत्वें जयवान । सूर्य जैसा प्रकाशमान । त्यासि तमाचें प्रावरण । चक्षुहीन भाविती ॥ १३० ॥ म्हणती जळासि लागली तृषा । पृथ्वी पळोनि गेली परदेशा । अग्नि हिंवाचा पडिला वळसा । नभ आकाशा हुडकीतसे ॥ ३१ ॥ ऐसें जयांचें कोमळ ज्ञान । तेचि पशुदृष्टी अज्ञान । म्हणती जयाजय पावे कृष्ण । मनुजा समान मानूनी ॥ ३२ ॥ कृष्ण नित्यत्वें यशस्वी । हाचि निश्चय घडे कैंवि । तरी यदर्थीं गोष्टी ऐकावी । जें वदला कवी शुक वक्ता ॥ ३३ ॥ तरी योगेश्वर आणि भगवान । परमैश्वर्याचें कारण । दोन्ही हेतु वदला पूर्ण । नित्य जयवान या योगें ॥ ३४ ॥ अचिन्त्यैश्वर्यपरिपूर्ण । यास्तव म्हणिजे तो भगवान । योगमाया ज्या अधीन । तो श्रीकृष्ण योगीश्वर ॥ ३५ ॥ अनंत ब्रह्माण्डें घडी मोडी । ऐसी जिये मायेची प्रौढी । सत्तायोगें जडाजडीं । जियेच्या कोडी जो नियमी ॥ ३६ ॥ तो योगेश्वर श्रीकृष्ण । मायानियंता परिपूर्ण । यास्तव म्हणिजे तो भगवान । जय पराजय कोठून ते ठायीं ॥ ३७ ॥ पशुदृष्टी जे केवळ जड । कृष्णमहिमा नेणती मूढ । मनुष्यवेश देखोनि उघड । जयाजय रूढ त्या म्हणती ॥ ३८ ॥ एवं राया कुरुवरिष्ठा । ज्ञानाज्ञानें द्विविध निष्ठा । कृष्णीं प्रेमा ज्ञानियां श्रेष्ठा । द्वेष

पापिष्टा दुष्टातें ॥ ३९ ॥ असो कोण्हे एके परी । कृष्णवेध अभ्यंतरीं । लागतां मोक्ष राबे घरीं । हें निर्द्धारीं जाणावें ॥ १४० ॥ द्वेषें अनुरागें कां मैत्रें । प्रेमें स्नेहें हो व्यभिचारें । भयें प्रलोभें कां वैरें । कृष्णीं आदरें समरसिजे ॥ ४१ ॥ ऐसा कथिला श्रीकृष्णमहिमा । या वरी ऐकें कुरुसत्तमा । कुरुक्षेत्रींच्या समरोद्यमा । ऐकोनि रामा सुख न वटे ॥ ४२ ॥ वैकुण्ठभुवनींचे पार्षद । त्रिजन्मध्यानें होऊनि शुद्ध । वक्रदंत शिशुपाळ चैद्य । पावले स्वपद हरिहस्तें ॥ ४३ ॥ तो हा इतिहास संपला । भाषा दयार्णवें विवरिला । तीर्थयात्रे बलराम गेला । या वरी लीला ते ऐका ॥ ४४ ॥

श्रुत्वा युद्धोद्यमं रामः कुरूणां सह पाण्डवैः । तीर्थाभिषेकव्याजेन मध्यस्थः प्रययौ किल ॥ १७ ॥

पाण्डवांसीं कौरवाचा । समरोद्यम ऐकूनि साचा । कुरुक्षेत्रा जावयाचा । उद्योग करी बळराम ॥ ४५ ॥ तीर्थस्नानयात्रामिसें । जावें कुरुक्षेत्राला आपैसें । युद्धीं मध्यस्थ व्हावया तोषें । जाता जाला कळवळूनी ॥ ४६ ॥ ते तीर्थाची अनुक्रमणी । नृपा संक्षेपें बादरायणी । वदला तैशीच भाषा कथनीं । दयार्णववदनें हरि वदवी ॥ ४७ ॥

स्नात्वा प्रभासे सन्तर्प्य देवर्षिपितृमानवान् । सरस्वतीं प्रतिस्रोतं ययौ ब्राह्मणसंवृतः ॥ १८ ॥

पाचारूनि श्रेष्ठब्राह्मण । करूनि विध्युक्त स्वस्तिवाचन । यात्राङ्गसंकल्प करून । प्रभासपाटन ठाकिलें ॥ ४८ ॥ हिरण्या मिनली रत्नाकरा । सुस्नात होऊनि तेथ सागरा । माजि तर्पिलें देवर्षि-पितरां । देऊनि नीरा मनुजादिकां ॥ ४९ ॥ पूजूनि सोरठीसोमनाथ । अर्चिलीं ब्रह्मवृंदें समस्त । यात्राविधान यथोचित । संपादूनियां तेथींचें ॥१५०॥ प्राचीसरस्वतीसंगम । तेथ सुस्नात होऊनि राम । तीर्थविधान उत्तमोत्तम । यथानुक्रम सारूनियां ॥ ५१ ॥ महाभारतीं गदापर्वीं । रामें तीर्थयात्रा बरवी । केली ते येथ लिहितां आघवी । गाथा गुर्वी वाढेल ॥ ५२ ॥ तेथ समस्त यादवगण । तीर्थाभिलाषी प्रजाजन । सेनापरिवार सहब्राह्मण । गेला घेऊन बळराम ॥ ५३ ॥ हेम रत्नें धान्यें धनें । वसना-भरणें पशु गोधनें । द्विजार्पणार्थ संकर्षणें । द्वारकेहूनि आणिलीं ॥ ५४ ॥ आणि देशोदेशीं शासनपत्रें । प्रजा भजती सर्वोपचारें । हा विस्तार पराशरकुमरें । गदापर्वीं कथिलासे ॥ ५५ ॥ आणि समस्त तीर्थावळी । उत्पत्ति माहात्म्यें सहित कथिलीं । ती येथ श्रोतयां सूचविली । शंका समूळीं निरसावया ॥ ५६ ॥ या वरी ऐका शुकाची वाणी । प्राचीसंगमीं मुसळपाणी । तीर्थविधान संपादूनी । पुढें तेथुनी चालिला ॥ ५७ ॥ दक्षिणहस्तें सरस्वती । घालूनि चालिला रेवतीपती । संगमा पासूनि उगमा-प्रति । प्रतिलोमगती प्रदक्षिणा ॥ ५८ ॥ समागमें सुब्राह्मण । तीर्थावळी प्रशंसून । तेथ तेथ करविती स्नान । विधिविधान बोधूनी ॥ ५९ ॥ तेथूनि पृथूदक सेविलें । तीर्थविधान संपादिलें । बिन्दुसरोवर ठाकिलें । तेथ अर्चिलें सुरपितरां ॥ १६० ॥

पृथूदकं बिन्दुसरस्त्रितकूपं सुदर्शनम् । विशालं ब्रह्मतीर्थं च चक्रं प्राचीं सरस्वतीम् ।। १९ ।।
यमुनामनु यान्येव गंगामनु च भारत । जगाम नैमिषं यत्र ऋषयः सत्रमासते ।। २० ।।

त्या नंतरें संकर्षण । स्त्रितकूपा प्रति जाऊन । यथाविधि तीर्थस्नान । देव ब्राह्मण अर्चिले ।।६१।। सुदर्शनतीर्थ तया वरी । स्नानादि यथोक्त प्रकारीं । आचरूनि मग पुढारीं । तीर्थयात्रा आदरिली ।। ६२ ।। विशाळतीर्था केलें गमन । तेथ सारूनि तीर्थविधान । ब्रह्मतीर्था प्रति जाऊन । देव ब्राह्मण समर्चिले ।।६३ ।। पुढें ठाकिलें चक्रतीर्थ । सारूनि तेथील आचारकृत्य । प्राचीसरस्वतीचा प्रान्त । केली समस्त तीर्थयात्रा ।। ६४ ।। त्या नंतरें यमुनातीरें । जितुकीं तीर्थें पृथगाकारें । ते ते स्थळींच्या विधानतंत्रें । रोहिणीकुमरें संपादिलीं ।। ६५ ।। भागीरथीच्या उभयकूळीं । अनुक्रमें जे तीर्थावळी । प्रदक्षिणाविधानें सकळी । मुमली हली आचरला ।। ६६ ।। तेथूनि नैमिषारण्या प्रति । जाता झाला रेवतीपति । जेथ समस्त मुनीश्वर करिती । दीर्घसत्र हरिप्रेमें ।। ६७ ।। क्षेत्रा आला संकर्षण । शौनकप्रमुखां होतां श्रवण । तिहीं केलें अभ्युत्थान । तें संपूर्ण अवधारा ।। ६८ ।।

तमागतमभिप्रेत्य मुनयो दीर्घसत्रिणः । अभिनंद्य यथान्यायं प्रणम्योत्थाय चार्चयन् ।। २० ।।

दीर्घसत्रींचे समस्त ऋषी । आला ऐकूनि बळरामासी । प्रत्यभिगमनें भजले त्यासी । जैसें ज्यासि यथोचित ।। ६९ ।। एकीं केलें प्रत्यभिगमन । यथान्यायें अभिवंदन । एकां वंदी संकर्षण । लोटाङ्गण घालूनियां ।। १७० ।। जैसें जैसें ज्या ज्या उचित । तिहीं तैसा रेवतीकान्त । सम्मानिला तो वृत्तान्त । अल्प संकेत सूचविला ।। ७१ ।। नमस्कारूनि यथाविधी । मुनींहीं राम ईश्वरबुद्धी । पूजिला सर्वोपचारसमृद्धी । अर्पूनि त्रिशुद्धी सप्रेमें ।। ७२ ।। या वरी वर्तलें जें अपूर्व । तें कुरुवर्या ऐकें सर्व । सुकृत साधितां पर्वें पर्व । घडलें अनर्ह त्या माजि ।। ७३ ।।

सोऽर्चितः सपरीवारः कृतासनपरिग्रहः । रोमहर्षणमासीनं महर्षेः शिष्यमैक्षत ।। २२ ।।

परिवारेंसीं पूर्णकाम । मुनींहीं पूजिला तो बळराम । आसन देऊनि परमोत्तम । परमादरें बैसविला ।। ७४ ।। रामें पाहिली मुनिवरसभा । आपणा सूत न ठाके उभा । अनम्र देखूनि भाविलें दंभा । चढला क्षोभा ते काळीं ।। ७५ ।। कृष्णद्वैपायनाचा शिष्य । तुङ्गासनीं रोमहर्ष । देखोनि विषाद बळरामास । आला विशेष तो ऐका ।। ७६ ।।

अप्रत्युत्थायिनं सूतमकृतप्रह्वणांजलिम् । अध्यासीनं च तान्विप्रांश्चुकोपोद्वीक्ष्य माधवः ।। २३ ।।

मधुकुळीं जयाचा अवतार । या लागीं माधव नामोच्चार । देखोनि सूतातें अनम्र । क्षोभें उत्तर काय वदे ।। ७७ ।। सक्रोध पाहूनि क्रूरदृष्टी । म्हणे हा प्रतिलोम सूत तुमचे मठीं । अवलंबूनि

अनार्यराहटी । वर्ते श्रेष्ठीं श्रेष्ठत्वें ॥ ७८ ॥ येणें न केलें अभ्युत्थान । अल्प मस्तक ही लववून । बद्धाञ्जलि न वोडवून । उच्चासनीं बैसला ॥ ७९ ॥ समस्तां विप्रांहूनि तुङ्ग । प्रतिलोमज हीनभाग । बैसला स्तब्धत्वें अयोग्य । आर्यमार्ग लंघूनी ॥ १८० ॥ ऐसियातें देखोनि राम । अनय मानूनि क्षोभला परम । बोलता झाला यदूत्तम । तो अनुक्रम अवधारा ॥ ८१ ॥

कस्मादसाविमान्विप्रानध्यास्ते प्रतिलोमजः । धर्मपालांस्तथैवास्मान्वधमर्हति दुर्मतिः ॥ २४ ॥

प्रतिलोमज हा दुर्मति । शरण गेला आपुले जाती । तुङ्गासनीं स्तब्धवृत्ती । बैसला चित्तीं न लाजूनी ॥ ८२ ॥ धर्मपाळक हे द्विजवर । ब्रह्मनिष्ठ थोर थोर । यांतें न गणूनि हा पामर । कोण्या कारणा स्तव पूज्य ॥ ८३ ॥ आम्ही धर्मसंस्थापक । अधर्मनिष्ठां शिक्षापक । त्या आम्हांतें ही तैसाचि मूर्ख । न गणी नावेक आढ्यत्वें ॥ ८४ ॥ ऐसिया स्तब्ध सगर्वातें । हनन योग्य शास्त्रसंमतें । ऐसें वदूनि रेवतीकान्तें । पुढती मुनींतें काय वदे ॥ ८५ ॥

ऋषेर्भगवतो भूत्वा शिष्योऽधीत्य बहूनि च । सेतिहासपुराणानि धर्मशास्त्राणि सर्वशः ॥ २५ ॥

नेणत्या योग्य हें अनुचित । हा तंव जाणता बुद्धिमंत । शिष्य व्यासाचा म्हणवित । श्रुताधीत सर्वज्ञ ॥ ८६ ॥ बहुत अध्ययन केलें येणें । सहित इतिहास पुराणें । श्रुतिस्मृतींचे निर्णय जाणे । शास्त्रें संपूर्ण धर्मरूपें ॥ ८७ ॥ भगवान कृष्णद्वैपायन । शिष्य तयाचा होऊन । श्रुतिस्मृतिधर्मनिर्णय-प्रवीण । शास्त्रसंपन्न होत्साता ॥ ८८ ॥ ऐसा सज्ञान असोनियां । उत्पथ याची ऐसी क्रिया । तस्मात उपदेश अनधिकारिया । होय केलिया प्रतिकूळ ॥ ८९ ॥

अदान्तस्याविनीतस्य वृथा पण्डितमानिनः । न गुणाय भवन्ति स्म नटस्येवाजितात्मनः ॥ २६ ॥

दमन नाहीं इन्द्रियांतें । म्हणोनि अदान्त म्हणिजे यातें । अविनीत म्हणोनि औद्धत्यें । वर्ते श्रेष्ठांतें न गणूनी ॥ १९० ॥ ऐसिया अदान्ता अविनीतांची । वृथापाण्डित्यगर्वितांची । विद्यायोग्यता विफळ त्यांची । दुर्गुणांची ऋद्धि फळे ॥ ९१ ॥ अंत्यजें घेतला द्विजविडंब । तेथ कें सदाचाराचा वाढे कोंभ । अनाचाराचें थांवे थोंव । बाह्य दंभ लसलसित ॥ ९२ ॥ मनोजय केला नसतां । विद्या न होती सद्गुणफळिता । या लागिं अजितात्मकां या दृष्टां । वध तत्वता योग्य असे ॥ ९३ ॥ सर्पें केलें जें पयःपान । परिणमे काळकूट होऊन । पावक पूजिला इन्धनें करून । परि तो क्षोभून प्रज्वळे ॥९४॥ अजितात्मका अदान्ता अविनीता । बहुधा वेदशास्त्रीं ही योग्यता । परि ते नोहे सद्गुणभारिता । देहाहंतावैगुण्यें ॥ ९५ ॥ ऐसियांचा देहाभिमान । समूळ झाडावया लागून । इतुक्याच अर्थाचें कारण । मज संपूर्ण इहलोकीं ॥ ९६ ॥

एतदर्थो हि लोकेस्मिन्नवतारो मया कृतः । वध्या मे धर्मध्वजिनस्ते हि पातकिनोऽधिकाः ॥ २७ ॥

इतुक्याचि अर्थाचिया काजें । येथ अवतार धरणें माझें । अधर्मनिष्ठ धार्मिकव्याजें । त्यां म्यां वधिजे पापिष्ठां ॥ ९७ ॥ स्मृतिशास्त्राध्ययनाभिमान । अदान्त गर्वित अविनीत पूर्ण । आगीं आर्यचिह्नें मिरवून । अनार्याचरण औद्धत्यें ॥ ९८ ॥ सुहृदत्वें जे स्नेहपात्र । क्रिया अभीष्ट अदान्त अपवित्र । मज कारणें ते सर्वत्र । वध्य स्वतंत्र विधिनियमें ॥ ९९ ॥ आपली चोरूनि दुष्टचर्या । बाह्या मिरविती श्रेष्ठ क्रिया । ऐसियांचिया हननकार्या । मी अवतरलों इहलोकीं ॥ २०० ॥

एतावदुक्त्वा भगवान्निवृत्तोऽसद्वधादपि । भावित्वात्तं कुशाग्रेण करस्थेनाहनत्प्रभुः ॥ २८ ॥

इत्यादिकें अमर्षवाक्यें । बोलूनियां यदुनायकें । षड्गुणैश्वर्य असतां असिकें । तन्ही अविवेकें कवळिला ॥ १ ॥ तीर्थयात्रेचा संकल्प केला । तैंहूनि दुष्टवधही विसर्जिला । तथापि न चले होणाराला । प्रमाद घडला तद्योगें ॥ २ ॥ होणाराची बळिष्ठता । राम षड्गुणी सर्वज्ञ पुरता । हेममृगातें झाला वधिता । स्त्रीवचनार्था वशवर्ती ॥ ३ ॥ व्यास नारद आणि कृष्ण । इत्यादिकीं धर्म बोधून । जन्ही केला सावधान । तथापि स्त्रीरत्न पणीं हरवी ॥ ४ ॥ यास्तव भावितव्य जें होणार । त्याचा ब्रह्माही परिहार । करूं न शके हा विचार । श्रेष्ठमुनिवर विवरिती ॥ ५ ॥ यास्तव सर्वज्ञ संकर्षण । षड्गुणैश्वर्यसंपन्न । भवितव्यार्थें प्रक्षोभून । कुशाग्रें ताडन करी सूता ॥ ६ ॥ सहज हस्तीं होता कुश । तेणें सूतातें सरोष । ताडितां पावला पंचत्वास । घडला दोष मुनि म्हणती ॥ ७ ॥ प्रभु समर्थ सर्वज्ञ राम । होणारास्तव त्यास ही भ्रम । पडोनि विसरला यात्राङ्गनेम । क्षोभें विषम आचरला ॥ ८ ॥ कुशाग्रें सूतातें करितां हनन । तेणें तत्काळ त्यजिले प्राण । मुनिमानसें जालीं खिन्न । करिती ब्राह्मण हाहाकार ॥ ९ ॥

हाहेति वादिनः सर्वे मुनयः खिन्नमानसाः । ऊचुः सङ्कर्षणं देवमधर्मस्ते कृतः प्रभो ॥ २९ ॥

हाहाकार करिती मुनी । जाले विमनस्क आसनीं । म्हणती समर्था लाङ्गलपाणी । अधर्म करणी तुज घडली ॥ २१० ॥ प्रभो अवधारीं परीक्षिती । मुनिवर म्हणती रामा प्रति । द्योतमान तुझी मती । दैवें अनुचितीं घातली ॥ १२ ॥ आदिपश्चात न विचारितां । दीर्घ विवेकें न विवारितां । सूतवधाची हत्या माथां । घेतली तत्त्वता प्रमादें ॥ १२ ॥ अदान्त अविनीत अजितात्मक । ऐसा स्वमनीं तां विवेक । करूनि वधिला पौराणिक । आम्हां सम्यक न पुसतां ॥ १३ ॥ ब्रह्मासन या दीधलें आम्हीं । सप्रेम होऊनि श्रवणकामीं । तें सविस्तर ऐकें स्वामी । सक्रोधऊर्मी सांडूनी ॥ १४ ॥

अस्य ब्रह्मासनं दत्तमस्माभिर्यदुनन्दन । आयुश्चात्माक्लमं तावद्यावत्सत्रं समाप्यते ॥ ३० ॥

कलिमलसिन्धुनिस्तरणार्थ । सहस्राब्दिक सत्र येथ । आरंभिलें तैं प्रार्थिला सूत । वक्ता समर्थ पौराणिक ॥ १५ ॥ कलिमलाब्धि माजि नौका । हरिगुणकीर्तनश्रवणात्मका । जाणोनि आश्रय केला निका । पौराणिका सूताचा ॥ १६ ॥ आम्ही समस्त ऋषीश्वर । आरंभूनि दीर्घसत्र । नैमिषारण्यीं जालों स्थिर । हरिगुणचरित्रश्रवणार्थ ॥ १७ ॥ ब्रह्मा अध्वर्यु आणि होता । यजमान सदस्यादि उद्गाता । तैसाचि सूत प्रवचनार्था । पुराणवक्ता प्रतिष्ठिला ॥ १८ ॥ सत्रसमाप्तिपर्यंत जाण । यासि दिधलें ब्रह्मासन । जैसा ब्राह्मण तैसाचि मान्य । प्रतिलोम गौण न मनावा ॥ १९ ॥ तुवां नेणोनि हा वृत्तान्त । प्रतिलोमज जाणूनि सूत । अनघ्र अधार्मिक उद्धत । देखोनि घात या केला ॥ २२० ॥ श्रेष्ठांमाजि तुङ्गासन । न करी प्रह्वण अभ्युत्थान । प्रतिलोमजा कारितां हनन । अल्प दूषण असेना ॥ २१ ॥ ऐसा निश्चय करूनि मनीं । प्रवर्तलासि तूं शासनीं । परि हे अयोग्य केली करणी । बैसली भूम्नि द्विजहत्या ॥ २२ ॥ ऋत्विज सहस्राब्दपर्यंत । अहोरात्र शुचिष्मंत । तैसाचि पुराणवक्ता सूत । ब्रह्मासनीं प्रतिष्ठिला ॥ २३ ॥ जंव वरी सत्र सिद्धी पावे । तंव वरी आम्ही तपःप्रभावें । यासि सामर्थ्य दिधलें बरवें । तें तूं आघवें अवधारीं ॥ २४ ॥ तों वरी निश्चळ ब्रह्मासनीं । शरीर याचें न पवे ग्लानी । निद्रा तंद्रा क्रमें करूनी । नोहे हानी स्फूर्तीची ॥ २५ ॥ बळ प्रज्ञा आयुष्यवृद्धी । आम्ही या दिधली वरद सिद्धी । ब्रह्मासनाची मर्यादाविधी । जाणोनि कोविदीं या भजिजे ॥ २६ ॥ येणें कोण्हा अभ्युत्थान । न कीजे प्रह्वण अभिवादन । जेथवरी यातें ब्रह्मासन । तंव हा ब्राह्मण पूज्यत्वें ॥ २७ ॥ ऐसें येथींचें साद्यंत गुज । नेणोनि वधिला प्रतिलोमज । तरी ब्रह्मवध घडला तुज । वृष्णिवंशज धुरंधरा ॥ २८ ॥ तथापि तूं यदुनायक । योगमायानियामक । अवगलासि मनुष्यवेख । परि सम्यक योगेश्वर ॥ २९ ॥

अजानतैवाचरितस्त्वया ब्रह्मवधो यथा । योगेश्वरस्य भवतो नाम्ना योऽपि नियामकः ॥ ३१ ॥

यद्येतद्ब्रह्महत्यायाः पावनं लोकपावन । चरिष्यति भवांल्लोकसंग्रहोऽनन्यचोदितः ॥ ३२ ॥

म्हणसी योगेश्वरा मातें । ब्रह्महत्येचें अघ केउतें । तरी हें सत्याचि तथापि निरुतें । मुनिवचनातें अवधारीं ॥ २३० ॥ वेदही योगेश्वरा न नियमी । कीं तो नित्य मुक्त नैष्कर्मी । तथापि लोकसंग्रहकामीं । अविहित तुम्हीं नाचरिजे ॥ ३१ ॥ सहसा न वधिजे ब्राह्मण । ऐसें प्रमाण वेदवचन । लोकसंग्रह लक्षून पूर्ण । हत्यानिरसन तां कीजे ॥ ३२ ॥ मान देईजे वेदवचना । कीजे स्वधर्मसंस्थापना । पुढें प्रवृत्ति लाविजे जना । स्वयें आचरण करूनियां ॥ ३३ ॥ त्रिजगत्पावन तूं संकर्षण । तुज न बाधी ब्रह्महनन । तथापि प्रायश्चित्त पूर्ण । लोकसंग्रहास्तव कीजे ॥ ३४ ॥ तुज नियामक दुसरा नाहीं । नियमूं न शके वेदही । तुझा तूंचि लोकसंग्रहीं । प्रवर्तसी जरी कारुण्यें ॥ ३५ ॥ तरी ब्रह्महत्यानिरसनार्थ । अवश्य कीजे प्रायश्चित्त । तुझा देखूनि आचारपथ । लोक दुष्कृत निस्तरती ॥ ३६ ॥ जरी तूं जासी पूर्णपणें । ब्रह्महत्या नाणिसी गणने । तरी प्राकृत अज्ञान भ्रंशती तेणें । आम्नायवचनें नादरिती ॥३७॥ ऐसें ऐकूनि मुनींचें वचन । षड्गुणैश्वर्यसंपन्न । धर्मस्थापक भूभारहरण । वदे संकर्षण तें ऐका ॥ ३८ ॥

श्रीभगवानुवाच ॥ करिष्ये वधनिर्वेशं लोकानुग्रहकाम्यया ॥
नियमः प्रथमे कल्पे यावान्स तु विधीयताम् ॥ ३३ ॥

राम म्हणे भो मुनीश्वरा । ब्रह्महत्येचिया परिहारा । वेदनिर्णय मुख्य विवरा । ममाधिकारा अनुरूप ॥ ३९ ॥ ब्रह्महत्येचा निर्वेश । उत्तम मध्यम कनिष्ठ पक्ष । त्यामाजि प्रथम जो विशेष । तो मज अशेष निरूपा ॥ २४० ॥ लोकसंग्रहार्चीं कारणें । निगमनिर्णीत ब्राह्मणवचनें । प्रायश्चित्त म्यां अगत्य करणें । निरसे जेणें ब्रह्महत्या ॥४१॥ आणखी एक वदतों तुम्हां । आज्ञापिजे भो मुनिसत्तमा । जैसा तुमचा असेल प्रेमा । मी त्या संभ्रमा साधीन ॥ ४२ ॥

दीर्घमायुर्बलंतस्य सत्वमिन्द्रियमेव च । आशासितं यत्तद्ब्रूत साधये योगमायया ॥ ३४ ॥

बत ऐसिया निर्धारणे । मुनीश्वरा प्रति राम म्हणे । तुमचिये आज्ञेप्रमाणें । अभीष्ट करणें म्यां तुमचें ॥ ४३ ॥ दीर्घ आयुष्य ओज बळ । इंद्रियपटुता प्रज्ञा अमळ । यासि अपेक्षाल तरी बोला सकळ । मी हें तत्काळ साधीन ॥ ४४ ॥ योगमायेच्या सामर्थ्यें । तुमचे मनोरथ साधीन पुरते । प्रायश्चित्त याहीवरतें । कथाल निरुतें तें करीन ॥ ४५ ॥ ऐसें ऐकूनि रामवचन । मुनिवर करिती आज्ञापन । तें तूं राया करीं श्रवण । म्हणे सर्वज्ञ शुक योगी ॥ ४६ ॥

॥ ऋषय ऊचुः ॥ अस्त्रस्य तव वीर्यस्य मृत्योरस्माकमेव च । यथा भवेद्वचः सत्यं तथा राम विधीयताम् ॥३५॥

मुनि म्हणती भो भो रामा । तुझा अस्त्रप्रतापमहिमा । याचिया मृत्यूची अलोट सीमा । मिथ्या नोहे तें करीं ॥ ४७ ॥ आमुचें वरद वाक्य ही सत्य । होय तैसेंचि साधीं कृत्य । त्या माजि तूं विवेकवंत । सर्वज्ञ समर्थ ईश्वर पैं ॥ ४८ ॥ ऐसें ऐकूनि मुनींचें वचन । तोषूनि बोले संकर्षण । राया होऊनि सावधान । तें व्याख्यान अवधारीं ॥ ४९ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥ आत्मा वै पुत्र उत्पन्न इतिवेदानुशासनम् । तस्मादस्य भवेद्वक्ता आयुरिंद्रियसत्ववान् ॥३६॥

मुनींहीं जैसें आज्ञापिलें । हृदयीं साद्यंत तें विवरिलें । जाय जेणें संपादिलें । तैसें बोलिलें बळरामें ॥ २५० ॥ अलोट मृत्यु याचा सत्य । व्यासानुग्रहें कैवल्य प्राप्त । येणें माझें अस्त्रसामर्थ्य । लोकीं यथार्थ प्रकाशलें ॥ ५१ ॥ या वरी तुमचा वरद नियम । सफळ करीन मी निःसीम । ऐका तोही अनुक्रम । यथानिगमप्रतिपाद्य ॥ ५२ ॥ आत्मा आत्मज निश्चयेंसीं । सर्वाङ्गींहूनि संभव ज्यासी । हृदयापासूनि हृदयकोशीं । स्मृतिप्रज्ञेसि आविर्भव ॥ ५३ ॥ आत्मा पुत्रत्वें आपण । ऐसें वेदोक्त अनुशासन । शतसंवत्सर आयुष्मान । हें आशीर्वचन जातकर्मीं ॥५४॥ तरी याचा पुत्र हा उग्रश्रवा । याचि समान सद्गुणी बरवा । तुमचे वरदें या सदैवा । सफळ करीन योगबळें ॥ ५५ ॥

यासि वोपिजे ब्रह्मासन । आयुष्यबळप्रज्ञासंपन्न । पित्याचि ऐसा पुराणज्ञ । वक्ता संपूर्ण हा केला ॥५६॥ याचा पटुतर करणगण । क्षुधा तृषा न करी म्लान । निद्रालस्यें विकळपण । या लागून कदा न वधी ॥ ५७ ॥ रोमहर्षणा तुमचा वर । तो म्यां या लागिं केला सधर । आत्मा पुत्रचि हा साचार । वाक्यनिर्धार वेदाज्ञा ॥ ५८ ॥ या वरी तुमचें अपेक्षित । तें मज आज्ञापिजे निश्चित । तें मी आधीं साधीन कृत्य । प्रायश्चित्त मग करीन ॥ ५९ ॥

किं व. कामो मुनिश्रेष्ठा ब्रूताहं करवाण्यथ । अजानतस्त्वपचितिं यथा मे चिंत्यतां बुधाः ॥ ६७ ॥

तुम्ही श्रेष्ठ मुनिसत्तम । अभीष्ट जो कां तुम्हांसि काम । मज आज्ञापिजे निःसीम । तो मी बळराम साधीन ॥ २६० ॥ हो कां सुगम अथवा कठिन । तुमचा मनोरथ साधीन पूर्ण । मग मी ब्रह्मदंड स्वीकारून । आज्ञा करीन पैं तुमची ॥ ६१ ॥ तुम्ही मुनिवर सर्वज्ञ बुध । नेणतां घडला मज द्विजवध । यासि प्रायश्चित्त जें शुद्ध । तें मज प्रसिद्ध सांगावें ॥ ६२ ॥ उत्तम मध्यम कनिष्ठ त्रिधा । त्यामाजि मुख्य पक्ष तो मज वदा । मी अनुसरेन त्या विधिवादा । हे मुनिवृंदा मम विनति ॥ ६३ ॥ ऐसें ऐकूनि रामवचन । मुनिजन आनंदले संपूर्ण । म्हणती तुष्टला संकर्षण । केला मान्य ब्रह्मदंड ॥ ६४ ॥ उग्रश्रवा पुराणवक्ता । रोमहर्षणा सायुज्यता । आमुच्या असाध्य मनोरथा । साधील तत्त्वता योगबळें ॥ ६५ ॥ रोमहर्षणाची ऊर्ध्वगति । सारूनि उग्रश्रव्या प्रति । अभीष्टकाम रामा प्रति । मुनिवर कथिती तें ऐका ॥ ६६ ॥

॥ ऋषय ऊचुः ॥ इल्वलस्य सुतो घोरो बल्वलो नाम दानवः । स दूषयति नः सत्रमेत्य पर्वणि पर्वणि ॥३८॥

मुनिजन म्हणती भो ईश्वरा । प्रतापसिन्धो रोहिणीकुमरा । तूंचि समर्थ दीर्घसत्रा । विघ्नपरिहारा कारणें ॥ ६७ ॥ आमुचा प्रार्थिला अभीष्ट काम । तन्ही इल्वलतनय बल्वलनाम । घोर राक्षस क्रूर अधम । तो दे श्रम प्रतिपर्वी ॥ ६८ ॥ पर्वा पर्वा प्रति येऊन । कुत्सित करी यज्ञायतन । अमंगळ अमेध्य वर्षे पूर्ण । दूषी यज्ञ तद्योगें ॥ ६९ ॥ कैसा दूषी यज्ञायतना । ते ही ऐकें विवंचना । कुत्सित अमेध्यें वर्षे नाना । तें सर्वज्ञा अवधारीं ॥ २७० ॥

तं पापं जहि दाशार्ह तन्नः शुश्रूषणं परम् । पूयशोणितविण्मूत्रसुरामांसादिवर्षिणम् ॥ ३९ ॥

दुष्ट येऊनियां अंबरीं । कुत्सितपूयवृष्टि करी । विष्ठामूत्ररक्तधारीं । वर्षे भारी गर्जोनि ॥ ७१ ॥ तैसाचि अमेध्यसुराघन । मांसवृष्टि करी दुर्जन । दुर्गंधीनें भरे गगन । यज्ञविधान विध्वंसी ॥ ७२ ॥ तया पापिष्ठा राक्षसातें । वृष्णिपुङ्गवा वधीं निघातें । आमुचें शुश्रूषण हेंचि तूतें । अत्यंत आर्त्तें कथिलेंसें ॥ ७३ ॥ इतुकी आमुची मनःकामना । पूर्ण करीं संकर्षणा । या वरी ब्रह्महत्यानिरसना । कथितों विधान तें ऐका ॥ ७४ ॥

ततश्च भारतं वर्ष परीत्य सुसमाहितः । चरित्वा द्वादश मासांस्तीर्थस्नायी विशुध्यसे ॥ ४० ॥

बल्वलवधा नंतर रामा । ब्रह्महत्याविशुद्धिकामा । संकल्पपूर्वक करीं नियमा । विधानक्रमा मग आचरें ॥ ७५ ॥ सुष्ठु म्हणिजे बरव्या परी । दृढ समाहित इन्द्रियाचारीं । कामक्रोधादिदुर्विकारीं । सर्वप्रकारीं नातळिजे ॥ ७६ ॥ ऐसा संकल्पपूर्वक नियम । करूनि नियामिजे भूतग्राम । प्रायश्चित्तपक्ष उत्तम । कथितों सुगम तो ऐक ॥ ७७ ॥ ब्रह्महत्यानिरसनार्थ । द्वादशाब्द प्रायश्चित । सूक्ष्मार्द्रता-विचार त्यांत । तो वृत्तान्त अवधारीं ॥ ७८ ॥ नेणोनि प्रमादें हत्या घडली । एकाब्दचर्या तिसी नेमिली । नियमपूर्वक करितां भली । विशुद्धि कथिली जातसे ॥ ७९ ॥ भारतवर्षाची प्रदक्षिणा । तीर्थोतीर्थीं तीर्थविधाना । संपादितां ब्रह्महनना । पाप्मानि मुक्त होसील ॥ २८० ॥ ऐसा संवत्सरपर्यंत । तीर्थस्नायी विधानयुक्त । होतां ब्रह्महत्या निर्मुक्त । जाली निश्चित जाण पां ॥ ८१ ॥ केतु उगळी रविमंडळ । तैसा निष्पाप होसी अमळ । संवत्सरान्तीं पुण्यशीळ । हव्यकव्यानळ यजनार्ह ॥ ८२ ॥ ऐसें प्रायश्चित्त मुनींहीं कथिलें । संकर्षणें तें मान्य केलें । रामें तैसेंचि आचरिजेलें । जें निरूपिलें वक्ष्यमाणीं ॥ ८३ ॥ एवं अध्याय अष्टसप्तति । पुढें नवोत्तर सप्तति । माजी बल्वलाची शान्ति । राम स्वहस्तीं करील ॥ ८४ ॥ तें श्रीमद्भागवत । शुकपरीक्षितिसंवादजनित । अठरा सहस्र संख्या गणित । संहिता निश्चित पारमहंसी ॥ ८५ ॥ वक्रदंतविदूरथवध । कौरवार्थ रामविषाद । व्याजें तीर्थयात्रा प्रसिद्ध । सूतघ्नवध तद्योगें ॥ ८६ ॥ ब्रह्महत्यानिरसनोपाय । कथिला रामासि विधिनिर्णय । तो अष्टसप्ततितमाध्याय । दयार्णववदनें समर्थिला ॥ ८७ ॥ एकनाथ विज्ञानतरणी । उदेला प्रतिष्ठानाख्यगगनीं । चिदानंद स्वानंदकिरणीं । मुमुक्षुकमलिनी प्रबोधिल्या ॥ ८८ ॥ तद्गत गोविन्दाख्य आमोद । सेविती साधकभ्रमरवृंद । तयांच्या पादोदकाचा हृद । जो हरिवरद दयार्णव ॥ ८९ ॥ रजस्तमांचें सुटतां ग्रहण । चित्तशुद्धीचें विमुक्त स्नान । हरिवरदाब्धीमाजि करून । चिद्रसपान श्रवण कीजे ॥ २९० ॥ श्रीमद्भागवत दशमस्कंध । टीका हरिवरद अगाध । दयार्णवकृत परम विशुद्ध । अध्याय प्रसिद्ध अष्टसप्ततितम ॥ २९१ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां वक्रदंतविदूरथवधरामहस्तेनसूतहननं नाम अष्टसप्ततितमोऽध्यायः ॥ ७८ ॥

शुचौ वह्यदशम्यां च कालयुक्ताक्षिके भृगौ । वक्रदंतवधाख्यानं पिपीलिकपुरे कृतम् ॥ १ ॥

॥ श्लोक ४० ॥ ओव्या २९१ ॥ एवं संख्या ३३२ ॥
सत्त्याहत्तरावा अध्याय मिळून ओवी संख्या ३५,३६४

अठ्याहत्तरावा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ७९ वा

श्रीगणेशाय नमः । श्रीकृष्णपरमात्मने नमः । समष्टिचैतन्यचक्रवर्ती । अगम्यगम्या गोगणपति । गुणातीता गुणैकमूर्ति । अचिन्त्यशक्ति गोविन्दा ॥ १ ॥ तवानुग्रहप्रसादलब्ध । वाखाणितां दशम स्कंध । अठ्याहत्तरी अध्याय विशद । हरिगुण प्रसिद्ध उपलविले ॥ २ ॥ तेथ विदूरथ वक्रदंत । कृष्ण-हस्तें जाले मुक्त । त्या वरी संकर्षणें तूत । ऋषिसभेंत संहारिला ॥ ३ ॥ तयाचें प्रायश्चित्त पुसतां । मुनींहीं कथिली निष्क्रियता । भारतवर्षींच्या पुण्यतीर्थां । विध्युक्त फिरतां निर्मुक्ति ॥ ४ ॥ आणि मुनींहीं आपुली सेवा । अज्ञापिली जे बळदेवा । कीं बल्वलराक्षस निर्दळावा । जो प्रतिपर्वी मख भंगी ॥ ५ ॥ मुनींची आज्ञा वंदूनि माथां । रामें जैसें बल्वलघाता । केलें या वरी तेचि कथा । कौरवनाथा शुक सांगे ॥ ६ ॥

ततः पर्वण्युपावृत्ते प्रचन्डः पांसुवर्षणः । भीमो वायुरभूद्राजन्पूयगंधस्तु सर्वशः ॥ १ ॥

त्या नंतरें संकर्षण । राहिला निवान्त होऊन । पर्वणि प्राप्त होतां जाण । आला दुर्जन पूर्ववत् ॥७॥ प्रळयकाळींचा प्रचंड वात । त्याहूनि भयंकर सुटला तेथ । धुळीनें शशिसूर्यांतें आच्छादित । निबिड व्याप्त नभोगर्भीं ॥ ८ ॥ जैसा गोकुळीं तृणावर्त । अपर तैसाचि हाही दृप्त । शर्करापांसुवृष्टि कीरत । दुःखावर्त्त तत्रस्थां ॥ ९ ॥ कडकडां मोडती वृक्षशाखा । उटजें गगनीं भ्रमती देखा । कुत्सित दुर्गंधि पूयपंका । आणि नरका सम सुटली ॥ १० ॥ पांसु शर्करा भरल्या नयनीं । कुत्सित दुर्गंध कोंदला घ्राणीं । मुखें भडभडां वमिती प्राणी । प्राणहानी ओढवली ॥ ११ ॥ पाहों न शकती उघड्डनि डोळे । मुखें आच्छादिती करतळें । तंव वरी पडती विष्टागोळे । मेघमाळे समसाम्य ॥ १२ ॥

ततोऽमेध्यमयं वर्षं बल्वलेन विनिर्मितम् । अभवद्यज्ञशालायां सोऽन्वदृश्यत शूलधृक् ॥ २ ॥

बल्वलें निर्मिली अमेध्यवृष्टि । अमेध्यवृष्टि होतसे सृष्टी । तेणें मुनिजन होती कष्टी । आकान्त उठी सर्वत्र ॥ १३ ॥ ढाळ घेतल्या खचती मळ । तैसे विष्टेचे पनळ । क्रिमिदुर्गंध अतिकुश्चळ । केल्या अमंगळ मखशाळा ॥ १४ ॥ पडे रक्ताचा पाऊस । त्या माजि पूयपंक बहुवस । सडलें कुजलें दुर्गंधि मांस । पडतां चिळसीप्रद होय ॥ १५ ॥ नाना विचित्र उठती ध्वनी । दुर्गंध वर्षतां गर्जे गगनीं । रोहिणीतनय आश्चर्य मानी । अद्‌भुत करणी लक्षूनियां ॥ १६ ॥ गगनीं निबिड अमेध्यपटळें । कोट्टनि वोळलीं ऐसें नकळे । मुनिआज्ञेचिया सांभाळें । राम न ढळे तेथूनियां ॥ १७ ॥ चिळसी दुर्गंधि अमंगळ । मुनिकार्यास्तव साहूनि सकळ । लक्षितां अवचट देखिला खळ । कज्जळाचळ शूलधर ॥१८॥ रामें राक्षस भीषणगात्री । जैसा साङ्ग लक्षिला नेत्रीं । तैसाचि सादर परिसिजे श्रोत्रीं । सुकृतपात्रीं श्रोतृगणीं ॥ १९ ॥

तं विलोक्य बृहत्कायं भिन्नाञ्जनचयोपमम् । तप्ततास्रशिखाश्मश्रुं दंष्ट्रोग्रभ्रुकुटीमुखम् ॥ ३ ॥

विदीर्ण अंजनाचळ काळा । तैसा विशाळ खळ देखिला । तप्ततम्राची उपमा वाळा । सतैल ज्वाळां सम गमती ॥ २० ॥ कूर्च श्मश्रु शिरोरुह । तप्ततास्रज्वाळासमूह । भयंकर उग्रदंष्ट्रानिचय । विकराळ देह बळ देखे ॥ २१ ॥ सक्रोध भृकुटि कटाक्ष विकट । प्रचंड शूळ परजिला तिखट । गगना माजि तळपतां निकट । रामें अवचट लक्षूनी ॥ २२ ॥ मग चितिलें मुसळ हळ । परसैन्या जें प्रळयकाळ । स्मरणा सरिसें तें तत्काळ । आलें केवळ रिपुदमना ॥ २३ ॥

सस्मार मुसलं रामः परसैन्यविदारणम् । हलं च दैत्यदमनं ते तूर्णमुपतस्थतुः ॥ ४ ॥

संवर्तसौनंद देखूनि नयनीं । परम आवेश रामा मनीं । प्रवर्तला मग बल्वलहननीं । सादर श्रवणीं तें ऐका ॥ २४ ॥

तमाकृष्य हलाग्रेण बल्वलं गगनेचरम् । मुसलेनाहनत्क्रुद्धो मूर्ध्नि ब्रह्मद्रुहं बलः ॥ ५ ॥

गगनीं तळपतां बल्वल कपटी । रामें सादर लक्षूनि दृष्टी । नांगर घालूनियां पेंकटीं । वोढूनि भूतटीं पाडियला ॥ २५ ॥ लाङ्गलें गोंविलें असतां कडवे । बल्वला तेथूनि गगनीं नुडवे । म्हणे हें दुर्घट आलें आडवें । बळें न कढवें कढवाचें ॥ २६ ॥ निष्टावया करी चळवळ । ब्रह्मद्रोही दुर्जन खळ । तंव सक्रोध रामें वोपिलें मुसळ । फोडिलें मौळ तद्‌घातें ॥ २७ ॥ रामहस्तींचा सौनंदप्रहार । जैसा विद्युत्पात कठोर । ललाट फुटोनि वाहे रुधिर । तें सविस्तर अवधारा ॥ २८ ॥

सोऽपतद्भुवि निर्भिन्नललाटोऽसृक्समुत्सृजन् । मुञ्चन्नार्त्तस्वरं शैलो यथा वज्रहतोऽरुणः ॥ ६ ॥

कढवा गुन्ततां लाङ्गलाग्रा । निष्टावया जंव करी त्वरा । तंव मस्तकीं मुसळप्रहारा । वैसतां धरा आश्रयिली ॥ २९ ॥ मुसळघायें भिन्नललाट । पडला धरणीवरी पापिष्ठ । भडभडां वाहती रुधिरपाट । दुःखें अचाट अर्डाये ॥ ३० ॥ प्राण न जाय झडकरी । दुखें आरडे आर्त्तस्वरीं । डोळे भंवडी लागतां चंद्री । करपद पसरी एकवटी ॥ ३१ ॥ कंठ घुरघुरी लागला घोर । नेत्र वटारी भयंकर । दांत वाजती करकर । विकळ गात्र प्राणान्तीं ॥ ३२ ॥ पुरंदराच्या भिदुरप्रहारें । पतन पाविजे जेंवि गिरिवरें । ऐसा राक्षस पडिला धरे । रंगला रुधिरें गैरिकोपम ॥ ३३ ॥ पर्वतपतनीं गैरिका विखुरे । तेणें अरुणभा त्या वरी पसरे । तैसाचि बल्वल मुसळप्रहारें । रंगला रुधिरें सर्वाङ्गीं ॥ ३४ ॥ करपद पाखडी क्षणक्षणा । नेत्र भोंवडी पसरी वदना । ऐशा प्रकारें सोडिलें प्राणां । पडिला उताणा शवदेह ॥ ३५ ॥ असो बल्वल वधिला रामें । मुनिमनोरथ साधिले नियमें । मुनिवर नाचती पूर्णकामें । स्तवितीप्रेमें हळायुधा ॥ ३६ ॥

संस्तुत्य मुनयो रामं प्रयुज्यावितथाशिषः । अभ्यषिञ्चन्महाभागा वृत्रघ्नं विबुधा यथा ॥ ७ ॥

बल्वल राक्षस रामें वधिला । देखूनि मुनिवरा आनंद जाला । मग ते स्तविती बळरामाला । जेंवि इंद्राला दिवि विबुध ॥ ३७ ॥ वृत्रासुरातें वधितां समरीं । शक्रें वरिली जैं विजयश्री । तैं तो स्तविला जैसा अमरीं । तेंवि मुनिवरीं हळायुध ॥ ३८ ॥ इंद्र अमरीं अभिषेकिला । तैसा मुनींहीं बळ पूजिला । आशीर्वचनीं गौरविला । प्रशस्त लीला लक्षूनी ॥ ३९ ॥ मुनींहीं पूजिला कवणे परी । संकेत वदली शुकवैखरी । तें व्याख्यान श्रोतीं चतुरीं । भाषाप्रकारीं श्रवण कीजे ॥ ४० ॥

वैजयंतीं ददुर्मालां श्रीधामाम्लानपङ्कजाम् । रामाय वाससी दिव्ये दिव्यान्याभरणानि च ॥ ८ ॥

अभिषेकिला शक्रापरी । बैसवूनि मग आसना वरी । अर्घ्यपाद्यादि दिव्योपचारीं । ईश्वरा परी समर्चिलें ॥ ४१ ॥ मुकुटीं लोपती सहस्रकिरण । एककुण्डलमंडित श्रवण । ग्रैवेयकादि कंठाभरण । माळा अम्लान वैजयंती ॥ ४२ ॥ जें कां लक्ष्मीचें मंदिर । आमोदवेधें सेविता भ्रमर । केवळ पीयूषसरोवर । संभव अपर अनुपम ॥ ४३ ॥ ऐसी आपाद वैजयंती । मुनींहीं अर्पिली रामा प्रति । नीलाम्बर परिधानार्थी । दिधलें सुरपतिसेव्य जें ॥ ४४ ॥ अंगदें कंकणें मुद्रिका । जडित मेखळे क्षुद्रघंटिका । विरुदमाळा अंदू वांक्या । पदपंकजीं लेवाविल्या ॥ ४५ ॥ येथ अल्पज्ञ शंका करिती । सर्वाभरणें दिव्या आयिती । मुनीं पासीं कोठें होती । जे रामा प्रति समर्पिली ॥ ४६ ॥ तरी संकल्पमात्रें सृष्टिकर्त्ते । तपोवीर्य अमोघ ज्यांतें । महासिद्धीचीं अनेक शतें । अपाङ्गपातें वोळगती ॥ ४७ ॥ तेथ हे बालिशमतीची शंका । करणें उचित प्राकृतां लोकां । वाचूनि हरिवरदाची टीका । बोधनीं मूर्खा अयोग्यता

॥ ४८ ॥ दिव्याभरणें अनेक ऐसीं । लेववियलीं बळरामासी । दिव्यावतंस मुकुटदेशीं । आणि सुमनांसी अर्पियेलें ॥ ४९ ॥ उत्तरीयाम्बर अनर्घ्य दिव्य । वैकुण्ठनायकाहें सुसेव्य । तें अर्पितां असंभाव्य । प्रभा फांकली नभोगर्भीं ॥ ५० ॥ केशरमिश्रितचंदनउटी । तिलक रेखिला ललाटीं । अमूल्य सुमनहार घातले कंठीं । माणिक्य अक्षता लखलखित ॥ ५१ ॥ सौरभ्य धूसर उधळिला वरी । दशांग घातला विधूमाङ्गारीं । एकारती कृत कार्पूरी । अमृत पहारीं समर्पिलें ॥ ५२ ॥ फळ ताम्बूल सुवर्णसुमन । दक्षिणे अर्पूनियां मुनिजन । मंगलदीप नीराजन । पुष्पाञ्जली वाहिलिया ॥ ५३ ॥ प्रदक्षिणा नमस्कार । ऐसे अर्पोनि सर्वोपचार । संतोषविला रोहिणीकुमर । स्तुतिस्तोत्रजयगजरीं ॥ ५४ ॥ ब्रह्महत्येच्या निरसना । म्हणाल नेमिलें तीर्थाटना । प्रायश्चित्तीं कोंवि पूजना । अहे ऐसें खळ म्हणती ॥ ५५ ॥ यास्तव तेथेंचि ऋषीश्वरीं । ईश्वर जाणोनि प्रलंबारी । साङ्ग पूजिला दिव्योपचारीं । तें गुह्य चतुरीं जाणावें ॥ ५६ ॥ तस्मात ईश्वर संकर्षण । त्यासि कें सूतहत्यादूषण । वेदाज्ञेसि दीधला मान । लोकसंग्रहणा कारणें ॥ ५७ ॥ ज्याच्या स्मरणें स्तवनें ध्यानें । लीलाचरित्रश्रवणपठनें । कळिमलाब्धि निस्तरणें । कोंवि दूषणें तो लिम्पे ॥ ५८ ॥ आकाशासि जंव लागेल मळ । प्रळयानळासि भरे तरळ । सूर्यप्रभेवरी काजळ । धरिती कुशल जरी कोण्ही ॥ ५९ ॥ हेंही घडे कदाचित । परि कर्मे न लिम्पे नित्यमुक्त । प्रत्यक्ष ईश्वर रोहिणीसुत । त्यातें दुष्कृत कें बाधी ॥ ६० ॥ धर्मसंस्थापनेचि साठीं । निगमाज्ञा वंदूनि मुकुटीं । मान्य करूनि मुनींची गोठी । निर्वेशराहटी आदरिली ॥ ६१ ॥ भारतवर्षप्रदक्षिणा । मुनींहीं कथिली संकर्षणा । तदनुसार तीर्थाटना । करिता जाला अनुक्रमें ॥ ६२ ॥ बल्वलवधाख्यान कथिलें । मुनींहीं रामा प्रति पूजिलें । हरिवरदें तें समर्थिलें । दयार्णववदनें गोविन्दें ॥ ६३ ॥ या वरी तीर्थयात्रा रामें । जैसी केली अनुक्रमें । श्रवण करितां ते सप्रेमें । तत्फळगरिमे लाहिजे ॥ ६४ ॥

अथ तैरभ्यनुज्ञातः कौशिकीमेत्य ब्राह्मणैः । स्नात्वा सरोवरमगाद्यतः सरयुरास्रवत् ॥ ९ ॥

बल्वलवधा नंतर हळी । आज्ञा देतां मुनिमंडळी । यात्रापरिवार घेऊनि सकळी । पातला कूळीं कौशिकीचिया ॥ ६५ ॥ कौशिकीनामें पुण्यसरिता । ब्राह्मणां सहित रेवतीभर्त्ता । तीर्थविधानें स्नान कर्त्ता । जाला तत्वता द्विजवाक्यें ॥ ६६ ॥ तेथ त्रिरात्रावस्थान । करूनि सारिलें तीर्थविधान । पूजिले देवद्विजवर मान्य । याचक दीन तोषविले ॥ ६७ ॥ पुढें सामान्य मार्गीं तीर्थें । श्रद्धापूर्वक रेवतीकान्तें । करूनि सरयूच्या उगमातें । जाता जाला अनुक्रमें ॥ ६८ ॥ म्हणाल कोठूनि सरयूउगम । तरी मानससरोवर जें उत्तम । जेथ क्रीडती अमरोत्तम । मराळसङ्घ मुनिसेव्य ॥ ६९ ॥ अमृततुल्य जेथिंचें तोय । पुलिनें केवळ रत्ननिचय । जेथ वाळु मुक्ताफळमय । मराळनिचय तद्भोक्ते ॥ ७० ॥ परम सुकृती भ्रमरपक्षी । होऊनि वसती कमळवृक्षीं । मृत्युलोकीं मनुजा चक्षीं । देखावयासि दुर्गम जें ॥ ७१ ॥ संकर्षणें स्वसामर्थ्यें । समुदायेंसि जाऊनि तेथें । तीर्थविधान सारूनि पुरतें । देवद्विजांतें

तोषविलें ॥ ७२ ॥ मानससरोवरींहून स्रवली । सरयूनामका सरिता भली । उगमा पासूनि तीर्थावळी । अनुलोम केली तत्तीरें ॥ ७३ ॥ सरा पासूनि स्रवली सरिता । सरयूनामका ते विख्याता । ऐरावताच्या दंतक्षता । स्तव उद्भवली सुरसेव्या ॥ ७४ ॥ रघुनामक सूर्यवंशीं । राजा प्रतापतेजोराशी । तेणें स्वशरें सरोवरासी । भेदूनि शरयू निर्मिली ॥ ७५ ॥ सरयू म्हणती सरःसंभवा । शरयू शरप्रहरोद्भवा । पात्र जाली दोहीं नांवा । दंततालव्य सशवर्णी ॥ ७६ ॥ ते शरयू घालूनि दक्षिणहस्तें । उगमा पासून संगमातें । जातां अनुलोम जितुकीं तीर्थें । केलीं समस्तें तें ऐका ॥ ७७ ॥

अनुस्रातेन सरयूं प्रयागमुपगम्य सः । स्नात्वा संतर्प्य देवादीञ्जगाम पुलहाश्रमम् ॥ १० ॥

शरयूचिया उत्तरतीरें । पुण्यतीर्थें परम रुचिरें । पदोपदीं पृथकागारें । रोहिणीकुमरें संपादिलीं ॥ ७८ ॥ पंकजनाभपादोद्भवा । किरीटभूषण जें शंभवा । ते जाह्नवीचिया नांवा । स्मरतां आघवा भव निरसी ॥ ७९ ॥ तयेसिं शरयूचा संगम । दर्दरक्षेत्र ज्याचें नाम । तोचि प्रयाग उत्तमोत्तम । तीर्थानुक्रमें ठाकियला ॥ ८० ॥ तेथ मुख्य भृग्वासनीं । रामें क्रमिल्या पंच रजनी । महर्षींच्या सप्तासनीं । तीर्थविधानीं भजोनियां ॥ ८१ ॥ देव ब्राह्मण अनाथ दीन । त्यांतें यथोचित अभ्यर्चून । पुलहाश्रमा संकर्षण । जाता जाला अनुक्रमें ॥ ८२ ॥ पुलहाश्रम म्हणाल कोण । हरिक्षेत्र ज्या अभिधान । तेथील समस्त विधिविधान । पद्धतिप्रमाण सारियलें ॥ ८३ ॥

गोमतीं गंडकीं स्नात्वा विपाशां शोण आप्लुतः । गयां गत्वा पितॄनिष्ट्वा गंगासागरसङ्गमे ॥ ११ ॥

येथ आशंका केली श्रोतीं । तीर्थराजचि प्रयाग म्हणती । दर्दरक्षेत्राची प्रख्याति । आधुनिकोक्ती ऐकियली ॥ ८४ ॥ तरी उभयसरितांचा संगम । तितुक्यांस ही प्रयाग नाम । ब्रह्मप्रयाग उत्तमोत्तम । सार्वभौम तीर्थांचा ॥ ८५ ॥ जेथ संगत सितासिता । श्रुतींहीं ज्यांची गायिली गाथा । स्वर्गावाप्ति तत्राप्लुता । देह त्यागितां अपवर्ग ॥ ८६ ॥ या लागिं तो तीर्थराव । येर प्रयाग काय वाव । प्रतितीर्थींचा महिमा अपूर्व । वक्ता गौरव श्रीव्यास ॥ ८७ ॥ साठी सहस्रवर्षें वरी । काशीवासाची सुकृतथोरी । निमेषार्धें ते दर्दरक्षेत्रीं । वदली वैखरी व्यासाची ॥ ८८ ॥

श्लोकसंमतिः ॥ षष्टिवर्षसहस्राणि काशीवासस्य यत्फलम् । तत्फलं निमिषार्धेन कलौ दर्दरसङ्गमे ॥ १ ॥

असो इत्यादिमहात्म्यकथन । संगममात्र प्रयाग जाण । तीर्थराज हें अभिधान । ब्रह्मप्रयागा वाखाणे ॥ ८९ ॥ एवं शरयू अनुलोमगती । येऊनि पुलहाश्रमा प्रति । तेथील निधान सारूनि निगुती गंगासागर ठाकियला ॥ ९० ॥ शरयूमनुस्रोतेन । या पदाचें हें व्याख्यान । ग्रंथवृद्धीच्या भयें करून । केलें कथन व्यत्यासें ॥ ९१ ॥ गोमतीशरयूच्या दक्षिणतीरीं । तेथ सुस्नात झाला शौरी । तैसाचि

सुस्नात शोणभद्रीं । गंडकी माझारी नाहला पैं ॥ ९२ ॥ वशिष्ठें पुत्रशोकें करून । प्राणत्यागार्थ पाशबंधन । करूनि कलेवर त्यागिलें जाण । सरिता गहन देखूनियां ॥ ९३ ॥ सर्व पाश विखंडूनी । तीरीं टाकिला वसिष्ठमुनी । विपाशानामें ते तैंहुनी । सरिताग्रणी वाखाणे ॥ ९४ ॥ तिये विपाशेचिया जळीं । परिवारेंसीं मुसळी हळी । सुस्नात होऊनि विप्रमंडळी । विधिविधानें समर्चिली ॥ ९५ ॥ तेथूनि गेला गयाक्षेत्रा । केली उत्तरदक्षिणयात्रा । क्षेत्रदेवतात्मकां पितरां । यजिता जाला सद्भावें ॥ ९६ ॥ जीवत्पितृक असतां राम । गयेसि पित्रार्चनाचें प्रेम । धरिलें ऐसें ऐकूनि विषम । श्रोतीं निःसीम न मानावें ॥ ९७ ॥ विष्णुक्षेत्रीं देवता विष्णु । शिवक्षेत्रीं देवता स्थाणु । तैसेचि देवता पितृगणु । पितृक्षेत्रीं गये माजि ॥ ९८ ॥ पितृस्वरूपी गदाधर । तैसाचि पिता महेश्वर । वृद्ध प्रपितामहेश्वर । देवतानिकर हा तेथें ॥ ९९ ॥ कव्यवाडनळादिक । दिव्य पितर जे सम्यक । इत्यादि यजूनि अन्नोदक । ब्राह्मणपूर्वक सर्व भूतां ॥ १०० ॥ गंगासागरविधिविधान । पूर्वीच कथिलें तें संपूर्ण । तेथूनि दक्षिणप्रान्ती गमन । करीं संकर्षण तें ऐका ॥ १ ॥

उपस्पृश्य महेन्द्राद्रौ रामं दृष्ट्वाऽभिवाद्य च । सप्तगोदावरी वेणां पम्पां भीमरथीं ततः ॥ १२ ॥

पुढें जाऊनि महेन्द्राचळीं । श्रीराम पूजिता जाला हळी । सप्तगोदासागरमेळीं । केला सकळी तीर्थविधि ॥ २ ॥ सप्तमुखें गोदावरी । होऊनि मिनली जेथ सागरीं । महर्षींच्या नामोच्चारीं । पावनकारी ते ओघ ॥ ३ ॥ तेथूनि उभयतोमुखी कृष्णा । मिनली सागरा सहित वेणा । तये सागरसंगमीं स्नाना । करूनि प्रयाणा पुढें केलें ॥ ४ ॥ जाऊनि निवृत्तिसंगमा । नमिली तुङ्गा भद्रा भीमा । कृष्णावेणीसमागमा । करूनि सागरीं समरस ज्यां ॥ ५ ॥ तेथूनि ठाकिली पंपापुरी । पूर्वी तेथ राघवा हरि । भेटला केवळ जो मदनारी । सुस्नात सरोवरीं तिये जाले ॥ ६ ॥ तेथ सारूनि तीर्थविध । कपाटीं जाऊनि वंदिला स्कंद । स्वामी कार्त्तिक जो प्रसिद्ध । ब्राह्मण्यप्रद सप्तभवीं ॥ ७ ॥

स्कन्दं दृष्ट्वा ययौ रामः श्रीशैलं गिरिशालयम् । द्रविडेषु महापुण्यं दृष्ट्वाद्रिं वेङ्कटं प्रभुम् ॥ १३ ॥

कृत्तिकानक्षत्र कार्त्तिकमासीं । पडतां पूर्णिमेचिये दिवशीं । स्वामिदर्शन घडे ज्यासी । विप्रत्व त्यासि सप्त जन्में ॥ ८ ॥ रामें करूनि स्वामिदर्शन । तेथूनि श्रीशैल्या केलें गमन । तेथ वंदिला मल्लिकार्जुन । तीर्थविधानें यथाविधि ॥ ९ ॥ पाताळगंगा नीळगंगा । तीर्थस्नानें करूनि वेगा । पूजूनि श्रीशैल्य महालिङ्गा । मग भुजंगाचळ ठाकी ॥ ११० ॥ नंदिकोल अहोबळ । काळहस्तीश्वर निर्मळ । ते ते तीर्थीं जाऊनि वळ । करूनि सकळ तीर्थ तीर्थविधि ॥ ११ ॥ पुढें ठाकिला वेङ्कटाद्री । द्रविडदेशी पुण्यभद्रीं । जो सेविला सुरनरेन्द्रीं । इंद्रचंद्रीं विधिशर्वीं ॥ १२ ॥

कामकोष्णीं पुरीं काञ्ची कावेरीं च सरिद्वराम् । श्रीरङ्गाख्यं महापुण्यं यत्र सन्निहितो हरिः ॥ १४ ॥

भक्तकामकल्पद्रुम । आदिवराह पुरुषोत्तम । त्यातें पूजूनियां बळराम । चालिला याम्यादि ग्भागीं ॥ १३ ॥ पुढें ठाकिली शिवकाञ्ची । जेथ वसती कामाक्षीची । प्रकट एकाम्बरेश्वराची । क्रीडा साची सुर गाती ॥ १४ ॥ विष्णुकाञ्ची तिये पुढें । तेथील तीर्थाचरण उघडें । विप्रवाक्याच्या उजिवडें । केलें रोकडें बळरामें ॥ १५ ॥ तेथूनि गेला पक्षतीर्थी । जेथ पूषा विधाता धाता । अहरह मध्याह्नकाळीं येतां । देखती अर्चितां जन अवघे ॥ १६ ॥ पुढें ठाकिली कावेरी । जयेचा उगम कवेरागिरीं । शंखमुखीं पूर्वसागरीं । एका मुखें मिनलीसे ॥ १७ ॥ भागीरथी ओघीं सहस्रीं । सप्त ओघीं गोदावरी । कृष्णा उभयतोमुखीं सागरीं । मिनली कावेरी एकमुखें ॥ १८ ॥ गौरीमयूर मध्यार्जुन । वैद्यनाथादि कुम्भकोण । सूकर आरुणाचळ वामन । तीर्थगण तो अवघा ॥ १९ ॥ कावेरीचें अभ्यंतर । तें ठाकिलें श्रीरंगक्षेत्र । जेथ जळलिङ्ग जम्बुकेश्वर । सर्व सुरवर निषेविती ॥ १२० ॥ प्रकाश न सोडी भास्करा । ताप न सोडी वैश्वानरा । तैसा श्रीरंग जिया क्षेत्रा । सन्निहितत्वें वर्त्ततसे ॥ २१ ॥ भूअस्पृष्ट दिव्य विमान । श्रीरंगालय पुण्यपावन । तें संपादूनि संकर्षण । पुढें तेथून चालियला ॥ २२ ॥

ऋषभाद्रिं हरेः क्षेत्रं दक्षिणां मथुरां तथा । सामुद्रं सेतुमगमन्महापातकनाशनम् ॥ १५ ॥

श्वेतारण्य वटारण्य । चिदंबर सभास्थान । कमलालय तीर्थ पावन । नवपाषाण विलोकिलें ॥२३॥ महोदधीतें वेगवती । जेथ मीनली परम प्रीती । परिवारेंसीं तिये तीर्थीं । सुस्नात जाला बळभद्र ॥२४॥ तेथूनि दक्षिणमथुरापुरीं । जेथ मीनाक्षी परमेश्वरी । सुंदरेश्वरातें स्वयंवरीं । वरिती जाली सप्रेमें ॥ २५ ॥ सुंदरेश्वराचे वऱ्हाडी । जेथ सुरवर तेत्तीस कोडी । तिये क्षेत्रीचिया सुरवाडी । वसती आवडी सुखधामें ॥ २६ ॥ वेगवती पुण्यसरिता । जेथ मीनाक्षी जगन्माता । सुंदरेश्वरेंसीं विलोकितां । गणना सुकृता करवेना ॥ २७ ॥ तेथूनि उत्तरे त्रिगव्यूती । अळगिरिनामा वेङ्कटपती । त्यातें वंदूनि राम पुढती । ऋषभाद्रीतें चालियला ॥ २८ ॥ ऋषभाद्रि तोताद्रि त्रिकूटाचळ । गजेन्द्रमोक्षादि तीर्थें सकळ । करूनि हरिक्षेत्रा प्रति बळ । आला केवळ श्रद्धाळु ॥ २९ ॥ हरिक्षेत्र नव त्रिपती । विलोकूनियां रेवतीपती । पुढें रामेश्वरा प्रति । सिन्धुसंगमा पातला ॥ १३० ॥ धनुष्कोट्यादि तीर्थावळी । यथाविधानें करूनि सकळी । क्रमें पूजूनि सुरमंडळी । भूसुरां हळी अभ्यर्चीं ॥ ३१ ॥ दर्शनमात्रें पापक्षय । ऐसा तीर्थांचा समुदाय । सेतुसंगमीं समुच्चय । तितुका यदुवर्य आचरला ॥ ३२ ॥ दर्भशय्या आदिकरून । धनुष्कोटिपर्यंत जाण । लिङ्गरूप वालुकाकण । तीर्थें संपूर्ण जलबिन्दु ॥ ३३ ॥

तत्रायुतमदाद्धेनूर्ब्राह्मणेभ्यो हलायुधः । कृतमालां ताम्रपर्णीं मलयं च कुलाचलम् ॥ १६ ॥

बळरामें ते रामेश्वरीं । पुण्यपावन महाक्षेत्रीं । ब्राह्मणांकारणें विधानसूत्रीं । दिधलीं अयुत गोदानें ॥ ३४ ॥ वस्त्राभरणें दिव्य अन्नें । याचकस्वेच्छा वांटिलीं धनें । तेथूनि पुढें परिवारगणें । साहित चालिला हलायुध ॥ ३५ ॥ कृतमाळा ताम्रपर्णी । तेथ नाहोनि विधिविधानीं । पुढें मलयाचळा जाउनी । अगस्तिमुनी वंदियला ॥ ३६ ॥

तत्रागस्त्यं समासीनं नमस्कृत्याऽभिवाद्य च । योजितस्तेन चाशीभिरनुज्ञातो गतोऽर्णवम् ॥
दक्षिणं तत्र कन्याख्यां दुर्गां देवीं ददर्श सः ॥ १७ ॥

पूर्वी वाढला विंध्याचळ । कुंठित केलें रविमंडळ । तेणें सचिंत अमरपाळ । राहिल्या सकळ यज्ञक्रिया ॥ ३७ ॥ यास्तव काशीप्रती सुरगणीं । जाऊनि प्रार्थिला कुंभजमुनी । विंध्याद्रीचिये उपशमनीं । दाक्षिणादिशेप्रती पाठविला ॥ ३८ ॥ येतां देखूनि मुनिसमर्थ । विंध्याचळ त्या दंडवत । घालितां येरें केला नियत । आज्ञा संकेत सुचवूनी ॥ ३९ ॥ दाक्षिणसमुद्रीं करूनि स्नान । उत्तरे येईन मी परतून । तेव्हां देईन आशीर्वचन । दंडायमान तंव आशिजे ॥ १४० ॥ सागर प्राशी जो आचमना । तया मुनीची अलोट आज्ञा । मस्तकीं धरूनि पर्वतराणा । अद्यापि राहिला दंडवत ॥ ४१ ॥ मलय पर्वतीं तो अगस्ति । राहिला अढळ करूनि वसती । रामें वंदूनि तयाप्रती । विशुद्धभक्तीं पूजियला ॥ ४२ ॥ तेणें अमळ आशीर्वाद । देऊनि गौरविला हळायुध । मुनीची आज्ञा घेऊनि विशद । दाक्षिण क्षारोद ठाकियला ॥ ४३ ॥ तेथ दुर्गा परमेश्वरी । विख्यात जे कन्याकुमारी । तियेतें नमूनि परमादरीं । पुढें द्विविदारी चालियला ॥ ४४ ॥

ततः फाल्गुनमासाद्य पञ्चाप्सरसमुत्तमम् । विष्णुः सन्निहितो यत्र स्नात्वास्पर्शद्गवायुतम् ॥ १८ ॥

तेथूनि पुढें सुचंद्रेश्वर । वटवीरनामक विष्णुक्षेत्र । काळकंठ महारुद्र । आदिकेशव निषेविला ॥ ४५ ॥ कृतमाळा पयस्विनी । स्नानपानीं ताम्रपर्णी । सेवूनियां अवगाहनीं । अनंतशयनीं प्रवेशला ॥ ४६ ॥ फाल्गुनक्षेत्र अनंतपुर । पंचाप्सरस सरोवर । जेथ सन्निहित श्रीधर । पद्मनाभ परमात्मा ॥ ४७ ॥ अमरपुरीतें लाजवी । ऐसी जेथींची ऐश्वर्यपदवी । वनें जीवनें अमृतभावीं । जेथ मानवी अनुभविती ॥ ४८ ॥ दहासहस्र धेनु दान । देऊनियां संकर्षण । तिये क्षेत्रींचे ब्राह्मण । पूजिता जाला अमरेंसीं ॥ ४९ ॥ तेथूनिं पुढें जनार्दन । संकर्षणें अभिवंदून । केलें केरळदेशा गमन । परिवारगण घेऊनियां ॥ १५० ॥

ततोऽभिव्रज्य भगवान्केरलांस्तु त्रिगर्त्तकान् । गोकर्णाख्यं शिवक्षेत्रं सान्निध्यं यत्र धूर्जटेः ॥ १९ ॥

लंघूनियां तळ कावेरी । तिये देशींच्या समस्त क्षेत्रीं । सुस्नात होऊनि प्रलंबारी । त्रिगर्तविषयीं उतरला ॥ ५१ ॥ क्रमें तेथील तीर्थावळी । अभिवंदूनि चालिला हळी । गोकर्णाख्य चंद्रमौळी । समुद्रपाळीं निषेविला ॥ ५२ ॥

आर्यां द्वैपायनीं दृष्ट्वा शूर्पारकमगाद्बलः । तापीं पयोष्णीं निर्विन्ध्यामुपस्पृश्याथ दण्डकम् ॥ २० ॥

आर्या नामक मूकाम्बिका । द्वीप अयन जियेचें देखा । द्वैपायनी ते सुरनायका । नमितां दुःखा नाशक जे ॥ ५३ ॥ पुढें ठाकिलें श्रीगिरिक्षेत्र । शूर्पारक कृष्णातीर । महालक्ष्मीचें करवीरपुर ।

श्रीकरहाटक निपेक्षिलें ॥ ५४ ॥ नृसिंहक्षेत्र कोपारूढ । महाबळेश्वर चंद्रचूड । कृष्णाउगम तो अवघड । सह्याद्रिशिखरीं वंदियला ॥ ५५ ॥ चित्तपावन परशुराम । ज्याचे अंकित काळकाम । त्यांतें वंदूनि यदूत्तम । भीमशंकर वंदियला ॥ ५६ ॥ पुढती भीमातटानुक्रमीं । नीराभीमरथीसंगमीं । प्रह्लादवरद नृसिंहनामीं । वंदूनि पंढरी ठाकियली ॥ ५७ ॥ पुढें पर्यळी वैजनाथ । ठाकिला अवंढा नागनाथ । लवणासुरा जेथ अंत । तें पावन तीर्थ विष्णुगया ॥ ५८ ॥ अनसूया दत्त अत्रिमुनि । रेणुका परशुराम जमदग्नि । मेहकरी शार्ङ्गपाणि । घृष्णेश्वर येळूरीं ॥ ५९ ॥ त्रिसंध्याक्षेत्र ब्रह्मगिरी । पंचवटी कपालेश्वरी । कुमारक्षेत्र तापीतीरीं । सिन्धुसंगम विलोकिला ॥ १६० ॥ तापीपयोष्णीसंगम । अभिवंदूनि उत्तमोत्तम । मन्धातृनृपाचा जेथ जन्म । तो ॐकारेश्वर नमियेला ॥ ६१ ॥ पुढें ठाकिली अवंती पुरी । महाकाळाची अंतुरी । पुण्यपावन क्षिप्रातीरीं । वंदूनि पुढारीं चालियला ॥ ६२ ॥ भृगुक्षेत्र रेवातटीं । पश्चिमसमुद्रीं रेवा पैठी । विन्ध्याद्रीची मर्यादायष्टी । दंडकारण्या लागुनी ॥ ६३ ॥ वंदूनिया दंडकातें । रेवा घालूनि दक्षिणहस्तें । पुढें पातला पूर्व पंथें । नगरी जेथ माहिष्मती ॥ ६४ ॥ कार्तवीर्यादि आघवे । हैहय वधिले जेथ भार्गवें । तेथिंचें तीर्थविधान बरवें । श्रीबळदेवें सारियलें ॥ ६५ ॥

प्रविश्य रेवामगमद्यत्र माहिष्मती पुरी । मनुतीर्थमुपस्पृश्य प्रभासं पुनरागमत् ॥ २१ ॥

मत्स्यावतार जिये क्षेत्रीं । तो कश्यपाश्रम देखूनि नेत्रीं । मनुतीर्थीं सहपरिवारीं । सुस्नात जाहला हळायुध ॥ ६६ ॥ गंगायमुनांचा संगम । तो तीर्थराज प्रयागोत्तम । भरद्वाजाचा पुण्याश्रम । वंदूनि बळराम परतला ॥ ६७ ॥ जेथूनि आरंभिली यात्रा । पुढती तया प्रभासक्षेत्रा । आला एका संवत्सरा । करूनि फेरा भरतवर्षा ॥ ६८ ॥ यात्रा करूनियां संपूर्ण । पूर्णतेचें विंधिविधान । तदंग तोषविले ब्राह्मण । निर्जरगणासमवेत ॥ ६९ ॥

श्रुत्वा द्विजैः कथ्यमानं कुरुपाण्डवसंयुग । सर्वराजन्यनिधनं भारं मेने हृतं भुवः ॥ २२ ॥

तेथ अभ्यागतीं ब्राह्मणीं । कुरुक्षेत्रींची वार्ता श्रवणीं । घातली कीं कौरवश्रेणी । पडिल्या रणीं भूभुजेंसीं ॥ १७० ॥ कौरवपक्षपाती भूवर । तिहींसहित सर्व गान्धार । पडिले ऐकूनि रोहिणीकुमर । मानी भूभार उतरला ॥ ७१ ॥ कौरवीं पाण्डवेंसीं समर । करितां तत्प्रसंगें नृपवर । केवळ जे कां असुरावतार । जाला संहार तितुक्यांचा ॥ ७२ ॥ भीष्म द्रोण जयद्रथ । कर्ण शल्य सौबळसुत । आणि धार्तराष्ट्रही समस्त । पावले अंत समराङ्गणीं ॥ ७३ ॥ एक उरला दुर्योधन । तेणें करूनि पलायन । द्वैपायनाख्य द्वदीं लीन । जळीं लपून राहिला ॥ ७४ ॥ पाण्डवीं धुण्डितां नाना विधी । दुर्योधनाची न लभे शुद्धि । सचिन्त पाण्डव म्हणती युद्धीं । कार्यसिद्धी न साधली ॥ ७५ ॥ दुर्योधनातें वधूनि रणीं । धर्मराजें लाहिजे धरणी । अदृष्टाची विपरीत करणी । जे गेला पळोनि गान्धार ॥ ७६ ॥ ऐसे रसरसिती पाण्डव । त्यांहूनि विशेष वासुदेव । पाञ्चाळादि नृपवर सर्व ।

म्हणती हांव न संडिजे ॥ ७७ ॥ तंव भीमाचे पारधी । तिहीं दुर्योधनाची शुद्धी । भीमापाशीं यथाविधी । कथिली येऊनि साकल्यें ॥ ७८ ॥ पारधी करूनि उत्तम पिशितें । घेऊनि येत असतां पंथें । द्वैपायनाख्य ह्रदीं अवचितें । रहस्य कांहीं ऐकियलें ॥ ७९ ॥ द्रौणि कृतवर्मा गौतम । दुर्योधनासीं गुह्य परम । द्वैपायनाख्य ह्रदीं संगम । करूनिं वदले सविस्तर ॥ १८० ॥ हें गुह्य भीमा निषादीं कथिलें । तेणें धर्मार्जुनां जाणविलें । कृष्णादिकीं ऐकूनि वाहिलें । ह्रदा पातले तत्काळ ॥ ८१ ॥ दुर्योधनातें नानापरी । बोधितां सज्ज नोहे तो समरीं । मग त्या धर्में मधुरोत्तरीं । बोधूनि बाहेरी काढियला ॥ ८२ ॥ सुयोधन म्हणे मी एकाकी । क्षतीं जर्जर परम दुःखी । सज्ज नोहें आयोधनमुखीं । राज्याभिलाषी होऊनियां ॥ ८३ ॥ धर्में प्रतिज्ञा केली त्यासीं । पांचांमाजि तूं भिडशी ज्यासीं । त्यातें जिंकिल्या आम्हां सर्वांसी । निर्द्धारेंसी जिंकियलें ॥ ८४ ॥ दुजा साह्य नोहे कोण्ही । ऐसी धर्माची सत्य वाणी । ऐकोनि भीमा समराङ्गणीं । गदापाणी पाचारी ॥ ८५ ॥ ऐसी द्विजांच्या मुखें वार्ता । रामें कुरुक्षेत्रींची ऐकतां । निवारावया त्या उभयतां । जाता जाला तें ऐका ॥ ८६ ॥

स भीमदुर्योधनयोर्गदाभ्यां युध्यतोर्मृधे । वारयिष्यन्विनशनं जगाम यदुनन्दनः ॥ २३ ॥

गदापर्वीं यमुनातटीं । रामा नारदाची भेटी । तेणें कथिली हे राहटी । कुरुक्षेत्रींची रामातें ॥ ८७ ॥ येणें यात्राङ्गपरिवारा । पाठवूनियां द्वारकापुरा । आपण पातला कुरुक्षेत्रा । भीमगान्धारां वारावया ॥ ८८ ॥ विनशन कुरुक्षेत्राचें नाम । तेथ जाऊनिं तो बळराम । गदापाणि सुयोधन भीम । करितां संग्राम निकराचा ॥ ८९ ॥ त्यांसि वारीन ऐसिया बुद्धी । गेला कुरुक्षेत्रा त्रिशुद्धी । कृष्ण पाण्डव हृदयामधीं । राम देखूनि दचकले ॥ १९० ॥

युधिष्ठिरस्तु तं दृष्ट्वा यमौ कृष्णार्जुनावपि । अभिवाद्याभवंस्तूष्णीं किं विवक्षुरिहागतः ॥ २४ ॥

नकुळ सहदेव धर्मार्जुन । तैसाचि देवकीनंदन कृष्ण । बळरामातें करूनि नमन । मौन धरून राहिले ॥ ९१ ॥ काय बोलावया कारणें । येथ बळरामाचें येणें । अलोट आज्ञा ज्येष्ठपणें । यास्तव भेणें न बोलती ॥ ९२ ॥ असो रामें उभय शिष्य । प्रवर्तले द्वंद्वयुद्धास । आत्मोपदिष्ट कृताभ्यास । कौशल्यास दर्शविती ॥ ९३ ॥

गदापाणी उभौ दृष्ट्वा संरब्धौ विजयैषिणौ । मण्डलानि विचित्राणि चरन्ताविदमब्रवीत् ॥ २५ ॥

दोघे सुभट गदापाणी । प्रवर्त्तले समराङ्गणीं । विजयवाञ्छा धरूनि मनीं । सक्रोध हननीं उदायुध ॥ ९४ ॥ परस्परें गदाप्रहारीं । गात्रें निथळताति रुधिरीं । यथाशिक्षित मंडळें भ्रमरी । देती समरीं मल्लवत ॥ ९५ ॥ चटचटां वाजती गदाप्रहार । खटखटां दशन रगडिती क्रूर । तटतटां उडती महावीर । शक्रवृत्रपाडिपाडें ॥ ९६ ॥ तयां उभयतांतें देखून । बोलता जाला स्निग्धवचन । कौरव-कुळपा सावधान । तें संपूर्ण अवधारीं ॥ ९७ ॥

युवां तुल्यबलौ वीरौ हे राजन्हे वृकोदर । एकं प्राणाधिकं मन्य उतैकं शिक्षयाऽधिकम् ॥ २६ ॥

राम म्हणे गा दुर्योधना । अगा पाण्डवा भीमसेना । तुम्ही दोघे समराङ्गणा । समसमान पराक्रमी ॥ ९८ ॥ दोघे नागायुत बळिष्ठ । दोघे समान अभ्यासनिष्ठ । दोघे प्रतापी वीरपाठ । क्रूर क्रोधिष्ठ समसाम्य ॥ ९९ ॥ त्याही माजी भीम बळिष्ठ । सुयोधना तूं अभ्यासनिष्ठ । तस्मात्समरंगीं यथेष्ट । पावतां कष्ट जय नपवां ॥ २०० ॥

तस्मादेकतरस्येह युवयोः समवीर्ययोः । न लक्ष्यते जयोऽन्यो वा विरमत्वफलो रणः ॥ २७ ॥

तस्मात दोघांची तुल्यता । जयो न पावाल युद्ध करितां । या लागीं सांडूनि समरअहंता । राहिजे निवांत मद्वाक्यें ॥ १ ॥ कराल तितुका संग्राम विफळ । कांहीं साध्य नोहे फळ । ऐसें जाणोनि आत्मकुशळ । जेणें होय तें कीजे ॥ २ ॥ इत्यादि वचनीं हलायुध । वारिता जाला द्वंद्वयुद्ध । परि ते नायकती दुर्मद । तेंही विशद अवधारा ॥ ३ ॥

न तद्वाक्यं जगृहतुर्बद्धवैरौ नृपार्थवत् । अनुस्मरन्तावन्योन्यं दुरुक्तं दुष्कृतानि च ॥ २८ ॥

बळरामाचें स्निग्धवचन । भीम सुयोधन अनादरून । एकमेकांचें इच्छूनि मरण । करिती निर्वाण गदायुद्ध ॥ ४ ॥ विषप्रळय केला पूर्वी । कीं जोहरीं जाळिले कौरवीं । कृष्णें सांगतां नेदूनि उर्वी । आला गर्वी समरातें ॥ ५ ॥ तो मी आजि रणमूर्धनि । प्रतापें वधूनि समग्र धरणी । धर्मराजाच्या शासनीं । वर्त्तवीन निर्द्धारें ॥ ६ ॥ ऐसें बोलतां भीमसेन । वदे सक्रोध दुर्योधन । आजी मी भीमातें मारून । पुन्हा या धाडीन वनवासा ॥ ७ ॥ मयसभेच्या अवलोकनीं । या दुष्टें मम मानहानी । केली यातें समराङ्गणीं । आजि वधीन निर्द्धारें ॥ ८ ॥ ऐसे परस्परें दुरुक्ति । स्मरूनि युद्धा न संडिती । लंघूनि रामाज्ञा निघातीं । वधूं पाहती एकमेकां ॥ ९ ॥ आज्ञाभंग देखूनि राम । होणार बळिष्ठ म्हणे कर्म । तदनुसार यांचा काम । दिसे परम अनुल्लंघ्य ॥ २१० ॥

दिष्टं तदनुमन्वानो रामो द्वारवती ययौ । उग्रसेनादिभिः प्रीतैर्ज्ञातिभिः समुपागतः ॥ २९ ॥

यांचें प्राचीन कर्म जैसें । वोडवलें होणार तैसें । आमुचें स्नेहवादाचें पिसें । येथ कायसें उपयोगी ॥ ११ ॥ अदृष्ट अलोट हरिहरां । कर्मानुसार बुद्धि नरां । शुभाशुभांचा भोग खरा । अवश्यमेव भोक्तव्य ॥ १२ ॥ ऐसें मानूनि निजमानसीं । राम गेला द्वारकेसी । उग्रसेनादि यादवांसी । भेटला सर्वांसि सप्रेमें ॥ १३ ॥ शिष्यद्वयाचें गदायुद्ध । रामें पाहिलें यथाविध । भीमें केला सुयोधनवध । ऐसें विशद गदापर्वी ॥ १४ ॥ वामचरणें सुयोधनशिर । तुडविता जाला वृकोदर । ऐसें देखोनियां बळभद्र । क्षोभें नागर उचलिला ॥ १५ ॥ कृष्णें प्रार्थूनि संकर्षणा । निवारूनियां

भीमसेना । बोधूनि अवतारचरित्रखुणा । समाधाना पाववियला ॥ १६ ॥ गदापर्वी ऐसिया परी । वदली व्यासाची वैखरी । त्या नंतरें प्रलंबारि । द्वारकापुरीं प्रवेशला ॥ १७ ॥ तेथ भेटूनि समस्तांसी । पुढती गेला ऋषींपासीं । सूतहत्यानिवृत्तीसी । तदाज्ञेसी आचरूनी ॥ १८ ॥

तं पुनर्नैमिषं प्राप्तमृषयोऽयाजयन्मुदा । क्रत्वङ्गं क्रतुभिः सर्वैर्निवृत्ताखिलविग्रहम् ॥ ३० ॥

आला जाणोनि बळराम । परमाल्हादें ससंभ्रम । पूजिते जाले मुनिसत्तम । यज्ञोत्तम मानूनी ॥१९॥ जिहीं यज्ञीं रामा हातीं । यजवित्या जाल्या मुनिवरपंक्ती । तिहीं यज्ञीं तो यज्ञमूर्ति । यजिता जाला तदाज्ञा ॥ २२० ॥ यज्ञमूर्ति संकर्षण । त्यातें मुनीश्वर संपूर्ण । पूजिते जाले आनंदोन । यज्ञें सहित यज्ञभोक्ता ॥ २१ ॥ चराचरात्मा जाणोनि राम । तत्पूजनीं मुनींसि प्रेम । म्हणती ईश्वर पूर्णकाम । भाग्यें आश्रमा पातला ॥ २२ ॥ यज्ञें सहित यज्ञभूत । मुनींहीं पूजूनि रामा प्रति । पावले परमानंदावाप्ति । करिती प्रणतिस्तवनादि ॥ २३ ॥ ऐसा मुनींहीं पूजिला राम । जो परमात्मा पूर्णकाम संतोषोनि तो सर्वोत्तम । कैवल्यधाम प्रबोधी ॥ २४ ॥

तेभ्यो विशुद्धविज्ञानं भगवान्व्यतरद्विभुः । येनैवात्मन्यदो विश्वमात्मानं विश्वगं विदुः ॥ ३१ ॥

यज्ञें क्षाळूनि मनोमळ । करूनि चित्तशुद्धि निर्मळ । साधनसंपन्न जे केवळ । सर्वकाळ जिज्ञासु ॥२५॥ तया मुनीश्वरां कारणें । विशुद्ध विज्ञान संकर्षणें । षड्गुणैश्वर्यसंपन्नें । समर्थपणें प्रबोधिलें ॥२६॥ जेणें विशुद्धज्ञानें करून । परब्रह्म जें अधिष्ठान । त्याच्या ठायीं भेदविहीन । विश्व अभिन्न आत्मवें ॥ २७ ॥ आत्मा म्हाणिजे परब्रह्म । सर्वीं सर्वगं सर्वत्र सम । आपणें सहित कैवल्यधाम । बोधे सुगम ज्या ज्ञानें ॥ २८ ॥ जया विशुद्ध ज्ञानें करून । विश्वग विश्वात्मा आपण । जाणते जाले ते मुनिगण । संकर्षणप्रबोधें ॥ २९ ॥ तस्मात धर्मसंस्थापना । सूतहत्येच्या निरसना । भारतवर्षप्रदाक्षिणा । तीर्थें नाना करूनियां ॥ ३० ॥ पुढती येऊनि आश्रमा । रामें भेटूनि द्विजोत्तमां । विशुद्धज्ञानें कैवल्यधामा । समरस केला प्रबोधें ॥ ३१ ॥ मुनींहीं रामा हातीं यज्ञ । करविले ते करूनि पूर्ण । पत्नीसहित अवभृथस्नान । यथाविधान सारियलें ॥ ३२ ॥

स्वपत्न्याऽवभृथस्नातो ज्ञातिबन्धुसुहृद्वृतः । रेजे स्वज्योत्स्नयेवेन्दुः सुवासाः सुष्ठ्वलङ्कृतः ॥ ३२ ॥

ज्ञातिबंधु सुहृद आप्त । राम तिहींसीं परिवेष्टित । शोभला जैसा निशाकान्त । किरणमंडित ज्या परी ॥ ३३ ॥ चंद्रासारिखी श्वेतकान्ती । नीलाम्बराची लाञ्छनद्युती । अलंकारांची किरणपंक्ती । समता अमृतीं सौम्यत्वा ॥ ३४ ॥ सुहृद आप्त भगणा सहित । वसनाभरणीं सुशोभित । पुढती द्वारका आनंदभरित । रेवतीकान्त प्रवेशला ॥ ३५ ॥ उग्रसेनप्रमुख श्रेष्ठां । उद्धवाक्रूरादिकां ज्येष्ठां । गदसारणादिकां कनिष्ठां । अपरां इष्टां वृष्ण्यंधकां ॥ ३६ ॥ भेटता जाला परमानंदें । ऐसीं बळराम-कर्में विशदें । प्रकाशिलीं निगमवृंदें । गाती मोदें मुनिनेचय ॥ ३७ ॥

ईदृग्विधान्यसङ्ख्यानि बलस्य बलशालिनः । अनन्तस्याप्रमेयस्य मायामर्त्यस्य सन्ति हि ॥ ३३ ॥

याचि परीचीं असंख्यात । बलिष्ठा बलभद्राचीं अद्भुत । कर्में अनंताचीं अनंत । वेद वेदान्त प्रकाशिती ॥ ३८ ॥ अपर मर्त्यां समान मर्त्य । मायानाट्य नटला सत्य । प्रमाप्रमाणप्रमेयातीत । तन्ही तो अनंत अगोचर ॥ ३९ ॥ तयाचीं अनंत कर्में असती । वदतां मौनावलिया श्रुती । त्यां माजि किञ्चित म्यां तुज प्रती । भो परीक्षिती निरूपिलीं ॥ २४० ॥ अनंताचीं अनंत कर्में । जो नर स्मरेल नित्य नेमें । त्याचीं हरती सर्व विषमें । मुनि सप्रेमें नृपा कथी ॥ ४१ ॥

योऽनुस्मरेत रामस्य कर्माण्यद्भुतकर्मणः । सायम्प्रातरनन्तस्य विष्णोः सदयितो भवेत् ॥ ३४ ॥

अद्भुतकर्मे बळरामाचीं । नित्य नेमें जो स्मरे वाची । त्यावरी प्रीति श्रीविष्णूची । होय साची अनायासें ॥ ४२ ॥ रत्नपारखियांतें रत्न । सांपडलिया तो करी जतन । तैसा त्यातें श्रीभगवान । प्रियतम पूर्ण स्वयें मानी ॥ ४३ ॥ सायंकाळादि रात्रि समग्र । प्रतिदिवस चारी प्रहर । त्यां माजि स्मरे रामचरित्र । तो नर प्रियकर हरि मानी ॥ ४४ ॥ ऐसी श्रीमद्भागवतीं । प्रश्न करितां परीक्षिती । शुकें कथिली रामकीर्ती । यथामति ते उपलविली ॥ ४५ ॥ तो अध्याय नवसप्तति । वाखाणिला यथामति । या वरी पुसेल परीक्षिती । कृष्णकीर्ति अलौकिक ॥ ४६ ॥ पुढिले अध्यायीं ते कथा । निरूपिजेल सुदामचरिता । तेथ सावध होऊनि श्रोता । परम पुरुषार्था साधिजे ॥ ४७ ॥ एकनाथाचें पदरज । चिदानंदें सेवितां सहज । स्वानंदसुखाचें साम्राज्य । गोविन्द सहज लाधला ॥ ४८ ॥ तें परंपरागत चिद्बोधजळ । दयार्णवीं उपलब्ध सकळ । श्रवणें सेविती सप्रेमळ । ते कलिमल भंगिती ॥ ४९ ॥ संवादमथनीं निवडिती सुधा । ते लाहती अमृतबोधा । एवं दयार्णवीं विबुधा । परमानंदावाप्ति असे ॥ २५० ॥ श्रीमद्भागवत दशमस्कंध । टीका हरिवरद अगाध । दयार्णवकृत परम विशुद्ध । अध्याय प्रसिद्ध नवसप्ततितम ॥ २५१ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुक-परीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां बल्वलवधबलरामयात्रासमाप्तिनामैकोनाशीतितमोऽध्यायः ॥ ७९ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

श्लोक ३४ ॥ ओवी-संख्या २५१ ॥ एवं संख्या २८५ ॥
(अठ्ठ्याहत्तरावा अध्याय मिळून ओवीसंख्या ३५,६१५)

कालयुक्ताक्षिके कृष्णे श्रावणे प्रतिपद्गुरौ । पिपीलिकायां दुर्भिक्षे रामयात्रानिरूपिता ॥ १ ॥

एकोणऐंशिवा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ८० वा

श्रीगणेशाय नमः । अनादिसिद्धा आत्मारामा । श्रीगोविन्दा पुरुषोत्तमा । अशीतितमाध्यायींचा महिमा । श्रोतृसत्तमा परिसविजे ॥ १ ॥ एकोनाशीतिपर्यंत कथा । शुकें निरूपिली नृपनाथा । तेणें आल्हाद पावोनिं चित्ता । पुन्हा हरिचरिता पुसतसे ॥ २ ॥ ये अध्यायीं नृपाचा प्रश्न । ऐकोनि निरूपी शुक भगवान । धनार्थी गुरुबंधु ब्राह्मण । त्या गुरुसेवन पुसे हरी ॥ ३ ॥ हरिगुणश्रवणीं निज आवडी । म्हणूनि श्रवणेच्छेची गोडी । शुकाचार्या ते कथीं फुडी । तेचि रोकडी अवधारा ॥ ४ ॥

॥ राजोवाच ॥ भगवन्यानि चान्यानि मुकुन्दस्य महात्मनः । वीर्याण्यनन्तवीर्यस्य श्रोतुमिच्छाम हे प्रभो ॥१॥

श्रीयोगीन्द्रा भो भगवंता । यावत्काळ मुकुन्दचरिता । तुवां कथिलें तें ऐकतां । न धणे चित्ता संतृप्ति ॥ ५ ॥ यावत्काळ जितुकीं चरितें । मजला कथिलीं कृपावंतें । तयां वेगळीं जीं उर्वरितें । सुकृतभरितें मज सांगा ॥ ६ ॥ रामचरितप्रश्नावडी । ते तां पूर्ण केली फुडी । या वरी मुकुन्दचरिता गोडी । चाखवा रोकडी मम श्रवणा ॥ ७ ॥ म्हणसी जन्मापासूनि सकळ । कथिला श्रीकृष्णकथारोळ । कोणते उरले या वेगळ । कथूं केवळ तुज ते मी ॥ ८ ॥ अनंतवीर्य जो श्रीहरी । त्याचीं वीर्यें अनंतपरी । वदतां वेदाची वैखरी । न पवे पारी पूर्णत्वें ॥ ९ ॥ अनंताचीं अनंत वीर्यें । मर्त्यनाट्यें केलीं कार्यें । मज कथवीं योगिवर्यें । जीं अमर्त्यभुवनीं स्पृहमानें ॥ १० ॥ वीररसाचें पारणें । हरिचरितात्मक केलें श्रवणें । या वरी सप्रेम रसाकारणें । अंतःकरण लिप्साळु ॥ ११ ॥ म्हणसी तुझिया मनोगता । सारखी मज कैंची वक्तृता । भगवन्संबोधना अतौता । कथिला पुरता तव महिमा ॥ १२ ॥ आणि प्रभो या संबोधनें । तुझें प्रभुत्व मजकारणें । कळलें असाधारणपणें । म्हणोनि श्रवणेच्छा उपजे ॥ १३ ॥ भूत-

भविष्यद्वर्तमान । परिच्छिन्न अपरिच्छिन्न । हें तुज विदित अद्यतन । तो तूं सर्वज्ञ योगीशा ॥ १४ ॥ म्हणसी श्रवणीं रमोत्पत्ति । तेणें घडे विषयावाप्ति । तन्निरासें कैवल्यप्राप्ति । चिद्रसराति अंतरते ॥१५॥ तरी यदर्थीं ऐकें स्वामी । ऐसा महिमा मुकुन्द नामीं । मुकुन्ददात्री ऐसी वाग्मी । मोक्षकामीं आश्रयितीं ॥१६॥ मुकुन्दनामश्रवणपठनें । अविरतस्मरणें ध्यानें स्तवनें । नेदी निःश्रेयसाविणें । हे मी जाणें तव कृपा ॥ १७ ॥ कर्मकर्त्ता तो देहात्मा । तत्फलभोक्ता तो जीवात्मा । कर्मविमोचक परमात्मा । जातें महात्मा श्रुति म्हणती ॥ १८ ॥ त्या महात्म्याचें अवतारचरित । परिसतां श्रवण विषयासक्त । होतां होती भवनिर्मुक्त । विषयातीत विश्वग पैं ॥ १९ ॥ विषयसेवनें विषयानिवृत्ती । फावतां विमुख कैं कोण होती । यदर्थीं ऐकें माझी विनती । म्हणे भूपती मुनिवर्या ॥ २० ॥

को नु श्रुत्वा सकृद्ब्रह्मन्नुत्तमश्लोकसत्कथाः । विरमेत विशेषज्ञो विषण्णः काममार्गणैः ॥ २ ॥

उत्तमश्लोक जो श्रीधर । तच्चरिताचे कथनोद्गार । श्रवण करूनि एकवार । कोण पां चतुर विरमेल ॥ २१ ॥ म्हणसी एकवार हरिगुणश्रवणें । चतुर विराम न पवती मनें । तरी वारंवार श्रवणें पठनें । विराम पावणें घडे कीं ॥ २२ ॥ तरी ऐकें गा ब्रह्मनिष्ठा । पुण्यश्लोकावतारचेष्टा । वारंवार श्रवणाविष्टा । भवभ्रमकष्टा विसरविती ॥ २३ ॥ सच्छब्द जें शाश्वत ब्रह्म । मर्त्यनाट्यें तें कुढावी धर्म । तैं शोभवी रूपनाम । सगुण सप्रेम मन मोही ॥ २४ ॥ श्रवणगोचर रसाळ गमती । प्राकृतजनमनाप्रति वेधिती । विषयतृष्णा विच्छेदिती । निर्वाणप्राप्तिकर कीं ना ॥ २५ ॥ त्याचिया कथा त्या सत्कथा । भवभ्रम भंगिती ज्या ऐकतां । गमती प्राकृत जनपदवार्ता । परि त्या तत्वता श्रुतिगम्या ॥ २६ ॥ विषयरसाचे अभिज्ञ । अभ्यासनिष्ठ शब्दशास्त्रज्ञ त्यांहूनि अध्यात्मप्रवीण प्राज्ञ । अपरोक्षज्ञ त्यांही वर ॥ २७ ॥ शाब्द अध्यात्म अपरोक्ष । साद्यन्तप्रवीण कुशल दक्ष । विशेषज्ञ तेचि मुमुक्ष । रस अशेष अनुभविती ॥ २८ ॥ ऐसिये विशेषज्ञकोटी । माजि विषयरसज्ञपरिपाटी । विवरूनि निश्चयात्मक जे गोठी । करूनि पोटीं दृढ धरिली ॥ २९ ॥ विषयरसाचिया सेवनें । कैवल्यसुखा आंचवणें । विषयत्यागें जिताचि मरणें । तेव्हां वरणें अमृतत्व ॥ ३० ॥ यत्तदग्रेविषमिव । विषयत्यागें भावी जीव । पूर्ण लाभतां विरागविभव । तैं हें वास्तवसुख जोडे ॥ ३१ ॥ ऐसा निश्चय कैवल्यलाभा । तेथ हरिगुण शाब्दिक विषयशोभा । कोंवि दावितो कैवल्यप्रभा । श्रवणवल्लभा होऊनियां ॥ ३२ ॥ इंद्रियां जितकें रसाळ रुचे । तितुकें बीज भवभोगाचें । तरी हरिगुणश्रवणें साधकां साचें । केंवि मोक्षाचें फळ लाभे ॥ ३३ ॥ तरी ऐकें गा देशिकाग्रणी । इन्द्रियें सकाम विषयग्रहणीं । तिये रंगतां हरिगुणश्रवणीं । निष्काम होऊनि उपरमती ॥ ३४ ॥ हरिगुण कामाचे नाशक । भववैरस्यें चिन्मात्रसुख । देती ऐसा पूर्ण विवेक । निश्चयात्मक बुध गाती ॥ ३५ ॥ चिमकराबुसादिकांच्या कंदा । तैलाभ्यंगवणी देती प्रमदा । तें जीवनाचि परि तन्मूलच्छेदा । करी विरुद्धा भजूनियां ॥ ३६ ॥ तेंवि हरिगुण विषयरूप । इंद्रियां रुचतां ससाक्षेप । तैं कामाचें करपे रोप । निष्काम चिद्रूप स्वयें करी ॥ ३७ ॥ काममार्गणीं जे गांजले । सुख भावूनि दुःखा भजले । तापत्रयानळें भाजले । जे निर्बुजले भवभंवरा ॥ ३८ ॥ तेथूनि

आपुली व्हावया सुटिका । त्रासें बोभाती कारूणिका । म्हणती धांव धांव गा देशिका । सोडवीं रंका भवग्रस्ता ॥ ३९ ॥ तो ऐकूनि करुणास्वरू । कृपाळु पेखूनि कृपेचें तारूं । स्वयें होऊनि कर्णधारु । काढी सत्वरु भवभग्ना ॥ ४० ॥ काममार्गणीं पूर्वी त्रासिले । हें न विसरे कांहीं केले । अतद्बोधें प्रणतपाळें । बोधितां उपजलें वैरस्य ॥ ४१ ॥ ऐसा साद्यंत अपरोक्षज्ञ । काममार्गणीं परम विषण्ण । सारवेत्ता विषयावितृष्ण । केंवि हरिगुण न सेवी ॥ ४२ ॥ तस्मात हरिगुणश्रवण त्याचें । विषयविरागें जीवन साचें । नवविधभजनें इन्द्रियांचें । साफल्य वाचे नृप बोले ॥ ४३ ॥

सा वाग्यया तस्य गुणान्गृणीते करौ च तत्कर्मकरौ मनश्च ।
स्मरेद्वसन्तं स्थिरजङ्गमेषु शृणोति तत्पुण्यकथाः स कर्णः ॥ ३ ॥

मृत्युलोकीं जन्मती प्राणी । विराजमान पटुतरकरणीं त्यांमाजि धन्य तेचि वाणी । जे हरिगुणगणीं रंगली ॥ ४४ ॥ जिनें हरिगुणांचें कथन । करूनि अनुग्रहिले सज्जन । तेचि वाचा धन्य धन्य । म्हणे विचक्षण परीक्षिति ॥ ४५ ॥ अपर वाचा ते कुत्सित । निन्दादोषपंकें लिप्त । जगाचें उपसी नरकमूत । धिग् धिग् पतित वक्तृत्व तें ॥ ४६ ॥ धन्य धन्य तेचि कर । जे कां हरिभजनीं सादर । अनलस्यें निरंतर । करिती व्यापार भक्तीचा ॥ ४७ ॥ चळा अचळा हरीच्या मूर्ति । जिये क्षिती तयांची वसती । तेथ मंदिरें निर्माण करिती । सप्रेम स्वहस्तीं संतोषें ॥ ४८ ॥ किंवा आयतीं सम्मार्जून । टाकिती उत्कर विसर्जून । रंगवली रेखिती पूर्ण । परम धन्य ते हस्त ॥ ४९ ॥ पादार्चनीं उद्वर्तनीं । अर्घ्यपाद्याद्युपचारदानीं । स्रक्चंदनपुष्पार्पणीं । विलसती पाणी ते धन्य ॥ ५० ॥ विप्र प्राज्ञ अथवा गुरु । यांच्या दास्यीं जे तत्परु । यथाशक्ति परोपकारु । करिती ते कर धन्यतम ॥५१॥ जे श्रान्तांचे श्रम परिहारिती । याचकाभीष्ट अवंचक देती । भीता अभयप्रद जे होती । धन्य त्रिजगतीं ते हस्त ॥ ५२ ॥ जे पद तुळसीवृंदावना । कीं जे हरि गुरु वसत्या सदना । सत्क्षेत्रात्मक पुरपट्टना । प्रदक्षिणा करिताती ॥ ५३ ॥ कीं चालतां तीर्थाटनीं । हरिकीर्तनीं गमनागमनीं । सद्यज्ञाच्या अवभृथस्नानीं । करिती धांवणी ते धन्य ॥ ५४ ॥ अनाथाचिया रक्षणा । धांवूनि पावती तत्क्षणा । क्षुधिता तृषिता अन्नजीवना । सादर दाना पद चलती ॥ ५५ ॥ धन्य धन्य तेचि पद । याहूनिही जे सुकृतप्रद । पदोपदीं पाहूनि विशद । जीवां दुःखद न होती जे ॥ ५६ ॥ हरिभजनार्थ अधोद्वारें । जियें पवित्रें शौचाचारें । अस्पृष्ट कामादि दुर्विकारें । धन्यतरें म्हणिपती तीं ॥ ५७ ॥ ऐसें पंचधा कर्मकरण । यातें प्रवर्तक जें कां मन । तेंही तेव्हांचि धन्य धन्य । संकल्पशून्य जैं होय ॥ ५८ ॥ स्थावरजंगमीं ज्याचा वास । सर्वात्मक जो जगन्निवास । तदनुलक्षें भवभ्रमास । विसरे भेदास ग्रासूनी ॥ ५९ ॥ जलावबोधें जलतरंग । भिन्न दिसतां भेदभंग । स्थावरजंगमात्मक जें जग । अभेद श्रीरंग जें जाणें ॥ ६० ॥ तयाचि बोधें हरिगुणश्रवण । सप्रेम करिती धन्य ते कर्ण । जेणें वेधे अंतःकरण । पुण्यपावन जिया कथा ॥ ६१ ॥ हरिगुणकीर्तनश्रवणापुढें । कैवल्यसुखही ज्यां नावडे । प्रेमोन्मादें होती वेडे ।

धन्य निवाडे ते श्रोते ॥ ६२ ॥ उवरितें जीं ज्ञानकरणें । धन्य होती ज्या आचरणें । जें नृप सांगे शुकाकारणें । सावध परिसणें तें श्रोतीं ॥ ६३ ॥

शिरस्तु तस्योभयलिङ्गमानमेत्तदेव यत्पश्यति तद्धि चक्षुः ।
अङ्गानि विष्णोरथ तज्जनानां पादोदकं यानि भजन्ति नित्यम् ॥ ४ ॥

स्थावरजंगमलिंगमात्र । व्यापक जो कां सर्वेश्वर । त्याते लक्षूनि निरहंकार । नमी तें शिर धन्यतम ॥ ६४ ॥ याजुष नामक रौद्रीयसूक्तीं । वेदीं नमिल्या ज्या ज्या व्यक्ति । चराचरात्मक अभेदमूर्ति । एकात्मस्थिति लक्षूनि ॥ ६५ ॥ तयाचि बोधें सचराचर । नमी लक्षूनि सर्वेश्वर । निरसूनि भेदात्मक अहंकार । तें धन्य शिर श्रुतिमान्य ॥ ६६ ॥ म्हणाल करणत्व नाहीं शिरा । तरी येथ लक्षिलें अहंकारा । सर्वग लक्षूनि सर्वेश्वरा । सचराचरा नत जो कां ॥ ६७ ॥ चक्षुरिन्द्रिय तेंचि धन्य । स्थावरजंगमीं हरि लक्षून । अभेदबोधें समसमान । विवर्तमान अनादरी ॥६८॥ विद्याविनयसंपन्न विप्रीं । धेनुश्वपचश्वानसूकरीं । समदर्शी ते पंडा खरी । पंडितांमाझारी प्रशंसिली ॥६९॥ तस्माच्चराचरीं समदर्शन । लक्षिती ते धन्य नयन । विवर्तजनितभेदभान । अप्रमाण जिये दृष्टी ॥ ७० ॥ लोकसंग्रहार्थ मात्र । प्रवृत्तिबोधें कर्ममूत्र । लक्षूनि होती कर्मतंत्र । येऱ्हवीं सन्मात्र स्वप्रसिद्ध ॥ ७१ ॥ अविभक्तंच भूतेषु । विभक्तापरी जो परेशु । लक्षूनि भजती जे चक्षु । तेचि डोळसु मी मानीं ॥ ७२ ॥ तैसेंचि धन्य त्वगिन्द्रिय । सचेताचेत प्रतिमाद्वय । लक्षूनि केवळ विष्णुमय । कवळी अद्वय जाणोनी ॥७३॥ विष्णूचें कां वैष्णवाचें । पादोदक जें स्पर्शे साचें । तेंचि त्वगिन्द्रिय भाग्याचें । हरिभजनाचें फळ लाहे ॥ ७४ ॥ विष्णुपदजल भागीरथी । तेथ गात्रें जीं निमज्जती । तेंचि धन्यतम होती । विष्णुभक्त्यधिकारें ॥ ७५ ॥ भागीरथी एके प्रान्तीं । वैष्णवांची सर्वत्र गति । त्यांच्या पादोदकें जीं भिजती । तियें अंगें होतीं धन्यतमें ॥ ७६ ॥ व्यापनशीळ जो कां विष्णु । वैष्णव तद्बोधें परिपूर्णु । विष्णुमयाचि जग अभिन्नु । जाणोनि निमग्न जे होती ॥ ७७ ॥ सर्व विष्णुमय जगत । ऐसा निश्चय ज्यांचा सत्य । तेचि यथार्थ विष्णुभक्त । पदजल पूत तयांचें ॥ ७८ ॥ तेणें जीं जीं आंगें भिजतीं । तीं तीं धन्यतमें म्हणिजती । ऐसी दृढतर माझी मती । म्हणोनि विनती करितसें ॥ ७९ ॥ विष्णुपादोद्भवा जाह्नवी । स्थूळबुद्धी तीर्थगौरवीं । विश्वतस्पात् इये नांवीं । जो गोसावी सर्वगत ॥ ८० ॥ त्यातें लक्षूनि भजती भक्त । ते सर्वत्र पदजलपूत । भेदभ्रमें भ्रमती भ्रान्त । अल्पज्ञ अभक्त एकदेशी ॥ ८१ ॥ अभक्तांचिया तरणोपाया । पूर्णही तीर्थाटनादिचर्या । करिती धर्म स्थापावया । परि ते आर्या आर्यतम ॥ ८२ ॥ असो त्वगिन्द्रिय जें कां धन्य । तें हें केलें निरूपण । यावरी रसना तेचि धन्य । प्रसादसेवनें संतृप्त ॥ ८३ ॥ घ्राणही धन्यतम तेंचि । हरिपादार्पित श्रीतुळशीची । सौरभ्यता सेवूनि साची । लाहे सुखाची संतृप्ति ॥ ८४ ॥ एवं करणसमुच्चय । सर्वदा विष्णुभजनमय । विलसे तोचि धन्य होय । हा अभिप्राय येथींचा ॥ ८५ ॥ यालागीं श्रीकृष्णाचें चरित । मज निरूपा अतंद्रित । ऐसें शुकेंद्रा प्रार्थित । कौरव-

नाथ सप्रेमें ॥ ८६ ॥ म्हणूनि शौनका नैमिषवनीं । सूत निरूपी सत्रसदनीं । तें परिसावें श्रोतृजनीं । सावध होऊनि क्षण एक ॥ ८७ ॥

सूत उवाच ॥ विष्णुरातेन सम्पृष्टो भगवान्बादरायणिः । वासुदेवे भगवति निमग्नहृदयोऽब्रवीत ॥ ५ ॥

विष्णुभजनीं इंद्रियवृत्ति । सर्वही रतल्या सप्रेमभक्ति । यालागिं विष्णुरात परीक्षिति । व्यासादि म्हणती मुनिवर्य ॥ ८८ ॥ तया विष्णुरातें नृपवरें । सम्यक बरविया प्रकारें । प्रश्न केला अत्यादरें । कथिला विस्तारें जो हा तुम्हां ॥ ८९ ॥ ऐसिया प्रश्नें बादरायणि । पुसिला असतां सादरपणीं । मानसें निमग्न जाहला कृष्णीं । प्रेमा देखूनि भूपाचा ॥ ९० ॥ सप्रेम सादर मिळतां श्रोता । पूर्णानंदें न भरे वक्ता । तैं तो जाणिजे अवघा रिता । वृथा वक्तृता पैं त्याची ॥ ९१ ॥ इक्षुदंडनिष्पीडना । काष्ठयंत्रें करितां जाणा । कर्कश शब्द गोचर श्रवणा । तेंवि व्याख्याना जो बोधी ॥ ९२ ॥ इक्षुरसाची नेणे चवी । कर्कश भ्रमणें ध्वनी उपजवी । तैसा वक्ता निमग्न भवीं । श्रोत्या गोंवी जठरार्थ ॥ ९३ ॥ तैसा वक्ता नव्हे शुक । श्रोत्या करूनि श्रवणोन्मुख । चाखवी बोधें चिदात्मसुख । परम पीयूष पूर्णत्वें ॥ ९४ ॥ स्वयें निमग्न परमानंदीं । तन्मय करी जो संवादी । तो परीक्षितीच्या प्रश्नवादीं । हृदयारविन्दीं निवाला ॥ ९५ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ कृष्णस्याऽऽसीत्सखा कश्चिद्ब्राह्मणो ब्रह्मवित्तमः ।
विरक्त इन्द्रियार्थेषु प्रशान्तात्मा जितेन्द्रियः ॥ ६ ॥

योगियांमाजि योगाग्रणी । ब्रह्मनिष्ठां चूडामणि । सर्वज्ञ वक्ता श्रीशुकमुनि । वदे तोपूनि कुरुवर्या ॥ ९६ ॥ भारतकुलाब्धिसंभवसोम । कुरुउडुगणामृतधाम । विष्णुरात जो कैवल्यकाम । श्रोता सत्तम परीक्षिती ॥ ९७ ॥ तयातें म्हणे शुकाचार्य । कृतप्रश्नार्थ होईं धुर्य । सादर श्रीकृष्णाचें वीर्य । परिसें आर्य प्रियतम जें ॥ ९८ ॥ कोणी एक ब्राह्मणोत्तम । ब्रह्मनिष्ठ मुनिसत्तम । इन्द्रियार्थ विरक्त परम । प्रशान्तात्मा जितेन्द्रिय ॥ ९९ ॥ ब्रह्म ऐसें वेदासि नाम । वेदत्रयीप्रतिपाद्य धर्म । त्या वेदाचें गात्रोत्तम । जें अध्यात्म ब्रह्मविद्या ॥ १०० ॥ निष्कामवर्णाश्रमाचरण । अलोट ईश्वराज्ञा प्रमाण । तेणें विशुद्ध अंतःकरण । यास्तव श्रीकृष्ण ज्यासी सखा ॥ १ ॥ सुपुष्पा स्वर्गींची साम्राज्यपदवी । तृपितां मृगां मृगजळ जेंवि । कीं कामुकां कामिनीध्यान गोंवी । तेंवि जग भ्रमवी भवभ्रम हा ॥ २ ॥ तया भ्रमाचें निरसन । होतां अध्यात्मबोधेंकरून । तैं जागृता न बाधीच स्वप्न । वैराग्यसंपन्न तेंवि विषयी ॥ ३ ॥ पक्षी न भुलेचि मृगजळा । जरठ मुमूर्षु न चिन्ती अबळा । तेंवि उभयभोगभ्रमसोहळा । उपजे कांटाळा मिथ्यत्वें ॥ ४ ॥ चालतां बोलतां शरीर मढें । तें आणिकाप्रती वृथाचि रडे । विषयभ्रमें भ्रमित वेडे । ऐसें सांकडे सांकडा ॥ ५ ॥ वास्तवबोधें मिथ्याविषय । म्हणोनि प्रशान्त जितेन्द्रिय । संकल्पशून्य मानस होय । तै म्हणों ये प्रशान्तात्मा ॥ ६ ॥ जेणें कल्पिलें चराचर । तें मन जाहलें

कृष्णाकार । यालागिं कृष्ण सखा साचार । तो मुनिवर तपोधन ॥ ७ ॥ राया म्हणसी विरक्त ऐसा । तयाचा योगक्षेम चाले कैसा । तो परियेसीं कौरवाधीशा । होय तैसा तुज कथितों ॥ ८ ॥

यदृच्छयोपपन्नेन वर्तमानो गृहाश्रमी । तस्य भार्या कुचैलस्य क्षुत्क्षामा च तथाविधा ॥ ७ ॥

अनायासें यदृच्छेंकरून । जें संपादे दैवोपपन्न । तेणें गृहस्थाश्रमाचरण । चालवी पूर्ण संतोषें ॥ ९ ॥ अयाचित व्रताचा नेम । गृहस्थाश्रमाचार निष्काम । सर्वांभूतीं भगवत्प्रेम । ब्रह्माध्यात्मपारग जे ॥ ११० ॥ न पाहे जो प्रपंचाकडे । न म्हणे फार किंवा थोडें । जे जे काळीं जें जें जोडे । तितुकेन घडे तात्मिद्धि ॥ ११ ॥ वस्त्रखंडें अस्ताव्यस्त । रंगविरंग उचितानुचित । बहुता सूचिदोरकें ग्रथित । योजी संप्राप्त परिधानीं ॥ १२ ॥ यालागिं तो कुचैलनामा । तयाची भार्या तयाचिसमा । विकळगात्रा जे क्षुत्क्षामा । अभंगनियमा दृढव्रता ॥१३॥ दृढव्रता म्हणाल कैशी । जितुकें अन्न जिये दिवशीं । प्राप्त तेणेंचि हव्यक-व्यासी । समस्तांसी संतर्पी ॥ १४ ॥ कान्त मानूनि निजदैवत । तदाराधनीं अतंद्रित । उपपन्नान्नें करी तृप्त । स्वयें निवान्त क्षुत्क्षामा ॥ १५ ॥ चर्में मढिलें अस्थिपंजरा । वरी टळटळित उमटल्या शिरा । निःशेषता मांसरुधिरा । धैर्यें शरीरा वर्तवी ते ॥ १६ ॥ वसनखंडें बांधूनि पोट । क्षुधेतृषेचे न मनी कष्ट । सुशील सदाचारनिष्ट । सुकृत यथेष्ट संपादी ॥ १७ ॥ जैशा कळिकाळींचिया कळा । तैशी नोहे द्विजाची अबळा । वसनान्नावीण नोहे विकळा । परमसुशीळा पतिव्रता ॥ १८ ॥ पतिशेजारीं सुख-क्रीडणें । न संभवेचि अन्नेंविणें । पति संतुष्ट न करितां जिणें । निष्फळ म्हणे भूभार ॥ १९ ॥

पतिव्रता पतिं प्राह म्लायता वदनेन सा । हरिद्रा सीदमाना सा वेपमानाऽभिगम्य च ॥ ८ ॥

पातिव्रतेचा मुख्य नियम । अनुलक्षूनि पतीचें कर्म । तदनुसार वर्तवी वर्ष्म । स्वयें निर्मम निर्लोभ ॥ १२० ॥ ऐसी द्विजाची पतिव्रता । कोण्हे एके समयीं चित्ता-। माजि मानी निर्दैविता । न घडे कान्तार्चन मातें ॥ २१ ॥ सर्वोपचारी कान्तार्चन । करूं इच्छी माझें मन । परी मी अभाग्य दैवहीन । मनोरथ पूर्ण केंवि होय ॥ २२ ॥ ऐसें चित्तीं चिन्ती सती । तंव तो हृदयस्थ जगत्पती । कृपेनें द्रवूनि प्रेरी मती । ते सच्छ्रोतीं परिसावें ॥ २३ ॥ म्हणे उपाय आहे एक । करूनि पाहूं तो नावेक । पूर्णकर्ता श्रीनायक । मनीं निष्टंक विवरूनियां ॥ २४ ॥ उषःकाळादिरजनीप्रहर । पर्यंत सारूनि आह्निकाचार । शयनीं पहुडलिया भर्तार । जाहली सादर शुश्रूषणा ॥ २५ ॥ तये समयीं कान्ताप्रति । परम सभय करी विनती । कंपायमाना होत्साती । शंके अनुचितीं प्रवर्वतां ॥ २६ ॥ निजकान्ताचें जें ऐश्वर्य । त्याहूनि तुच्छ अमरधुर्य । पतिव्रतांचें ऐसें धैर्य । हें अनार्य अनुचित पैं ॥२७॥ तथापि हृदयस्थें प्रेरिली । कीं सुकृतरेखा उदया आली । म्हणोनि बुद्धि अवलंबिली । दृढतर जाहली तद्योगें ॥ २८ ॥ तोंड वाळलें काचरीपरी । दरिद्रें जर्जरता शरीरीं । भोगविकळता सर्व गात्रीं । भासे वक्त्रीं म्लानता ॥ २९ ॥ ऐशी अवस्था जिये शरीरीं । पतिव्रता द्विजसुन्दरी । कैसी स्वकान्ता विनती करी । ते अवधारीं कुरुवर्या ॥ १३० ॥

ननु ब्रह्मन्भगवतः सखा साक्षाच्छ्रियः पतिः । ब्रह्मण्यश्च शरण्यश्च भगवान्सात्वतर्षभः ॥ ९ ॥

म्हणे भगवंता ब्राह्मणोत्तमा । तुम्ही सदैव कथितां आम्हां । जें आपुला सखा हरि परमात्मा । ज्याची वामा विश्वश्री ॥ ३१ ॥ बहुतेक तुमचा सखा भगवंत । जो प्रत्यक्ष कमलाकान्त । ब्रह्मण्यत्वें ब्राह्मणभक्त । जो शरणागत नुपेक्षी ॥ ३२ ॥ शरणागता वज्रपंजर । ऐसा बिरुदाचा तोडर । भक्तपति यादवेश्वर । जो साचार निगमात्मा ॥ ३३ ॥ ऐसा सखा तुमचा असतां । कायसी आम्ह हे भवचिन्ता । अखंड ज्यातें हृदयीं स्मरतां । त्याप्रति जातां कां उशीर ॥ ३४ ॥

तमुपैहि महाभाग साधूनां च परायणम् । दास्यति द्रविणं भूरि सीदते ते कुटुबिने ॥ १० ॥

ज्याचा सखा श्रीभगवान । त्या महाभाग संबोधन । देतां सखीचें निःशंक मन । सभाग्य पूर्ण हरिमंत्रें ॥ ३५ ॥ म्हणे सभाग्य भो मम कान्ता । तुवां त्याप्रति जाइजे आतां । सर्वज्ञ सर्वात्मा तत्वता । जाणे वृत्तान्ता न सांगतां ॥ ३६ ॥ तो साधूंचा परायण । ज्यातें प्रियतम साधू पूर्ण । वंदी साधूंचे श्रीचरण । थोर लहान न म्हणूनी ॥ ३७ ॥ आपआपणा प्रियतमपणें । जेणें साधूसी सम्मानणें । तेणें देखतां तुजकारणें । तव वेदने जाणेल ॥ ३८ ॥ कुटुंबवत्सल अयाचित । दरिद्रदोषें वेदनाभूत । ब्रह्मनिष्ठ दृढव्रत । जाणोनि त्वरित तुजलागीं ॥ ३९ ॥ द्रविण म्हणिजे बहुत धन । देईल होउनी सुप्रसन्न । असतां सखा श्रीसंपन्न । भोगिजे दैन्य कासया ॥ १४० ॥ जावें नलगे देशान्तरीं । नांदतो अष्टयोजनें दुरी । परम कारुण श्रीहरी । ऐकें थोरी तूं त्याची ॥ ४१ ॥

आस्तेऽधुना द्वारवत्यां भोजवृष्ण्यन्धकेश्वरः । स्मरतः पादकमलमात्मानमपि यच्छति ॥
किं न्वर्थकामान्भजतो नात्यभीष्टाञ्जगद्गुरुः ॥११॥

पुरवी सर्वग सर्वदेशीं । अपर वैकुण्ठक्षीराब्धिवासी । भक्तकारुण्यें सगुणतेसी । अवतारासी अवलंबी ॥ ४२ ॥ मथुरा गोकुळ वृंदावन । सांडूनि प्रस्तुत द्वारकाभुवन । वसवी यादव कोटिछपन्न । ज्या आधीन वर्तती ॥ ४३ ॥ यदुकुळाचा जो ईश्वर । वृष्णिभोजान्धकेश्वर । परंतु केवळ परमेश्वर । तो सर्वान्तर जिवासी ॥४४॥ पदपंकजातें जो स्मरे । त्याचे मनोरथ पुरवी पुरे । निष्काम भजका अर्पी सारे । विभव इन्दिरेसह आपणा ॥ ४५ ॥ छपन्नकोटि यादवपति । संपन्न तव सखा श्रीपति । तुम्ही गेलिया तयाप्रति । समस्त भजती तत्प्रेमें ॥ ४६ ॥ प्राकृत जे कां सखे मित्र । वोपिती केवळ अर्थमात्र । तैसा नोहे श्रीकलत्र । जो स्वतंत्र सर्वज्ञ ॥ ४७ ॥ अभीष्टार्थकामातें देती । ते परिपाकीं विरस होती । जगज्जनक जो श्रीपति । भजकांप्रति तें नेदी ॥ ४८ ॥ रावणाप्रति ऐश्वर्य गहन । देऊनि चकचकी गिरिजारमण । तदुन्मादें दुष्टाचरण । करितां त्रिनयन स्वयें कांपे ॥ ४९ ॥ घेऊनि वानरीं अवगणीं । सेवूनि हृदयस्थ कोदंडपाणि । रावण वधिला समराङ्गणीं । चक्रपाणि न दे तैसा ॥ १५० ॥ रावण कथिला दृष्टान्तमात्र । अभीष्टार्थकामी सर्वत्र । ऐश्वर्य भोगूनि वैरस्यपात्र । न करी श्रीमित्र निजभजकां

॥ ५१ ॥ स्वात्मान म्हणिजे सच्चिन्मुख । वोपी निजभजकां सम्यक । तुमचा सखा तो यदुनायक । जावे आवश्यक त्या भेटी ॥ ५२ ॥ कदापि सन्मुख न वदे वचना । परम साध्वी द्विजाङ्गना । तिणें इत्यादि मृदुभाषणा । विज्ञापना द्विजा केली ॥ ५३ ॥ ऐकूनि सतीची विनत विनंती । द्विजें विवरिलें अपुले चित्तीं । तें तें परिसें परीक्षिती । सप्रेम भक्तिपूर्वक पैं ॥ ५४ ॥

स एवं भार्यया विप्रो बहुशः प्रार्थितो मृदु । अय हि परमो लाभ उत्तमश्लोकदर्शनम् ॥ १२ ॥

सः म्हणिजे तो ब्राह्मण । ऐसा भार्येनें विनवून । बहुतप्रकारें मृदु प्रार्थून । करितां प्रसन्न पैं जाला ॥ ५५ ॥ स्त्रियेचें वचन अनर्थप्रद । ऐसें वदती शास्त्रकोविद । सतीच्या वचनें मज मुकुन्द । दर्शनानंद हा लाभ ॥ ५६ ॥ द्रविणाभिलाष राहो परता । हाचि परम लाभ तत्त्वता । उत्तमश्लोकदर्शन होतां । मम सुकृता साफल्य ॥ ५७ ॥ स्त्री पुत्र कां सत्सेवक । अथवा अपर कोण्ही एक । प्रबोधिती सद्विवेक । तो आवश्यक स्वीकरिजे ॥ ५८ ॥ ऐसा विचार करूनिं मनीं । उदित जाहला कृष्णदर्शनीं । तें तूं कौरवचूडामणी । सावध कर्णीं अवधारीं ॥ ५९ ॥

इति संचित्य मनसा गमनाय मति दधे । अप्यस्त्युपायनं किंचिद् गृहे कल्याणि दीयताम् ॥ १३ ॥

ऐसें चिन्तुनी निज मानसीं । बुद्धि अवलंबिली गमनासी । मग म्हणे वो कल्याणराशी । कृष्ण-भेटीसी काय नेऊं ॥ १६० ॥ अल्पस्वल्प कांहीं सदनीं । हरीसी अर्पावया लागूनी । जरी असेल तरी कल्याणी । देईं आणूनि मजपासीं ॥ ६१ ॥ ऐसें ऐकूनी द्विजाचें वचन । संतोषलें सतीचें मन । म्हणे मम विनती केली मान्य । परम धन्य दैवरेखा ॥ ६२ ॥ आजिचा दिवस कल्याणकर । म्हणूनि स्फुरला मज विचार । ब्राह्मणें केला अंगीकार । उठिला सत्वर संतोषें ॥ ६३ ॥

याचित्वा चतुरो मुष्टीन्विप्रान्पृथुकतण्डुलान् । चैलखण्डेन तान्बध्वा भर्त्रे प्रादादुपायनम् ॥ १४ ॥

मग ते विप्राची सुन्दरी । प्रवेशली विप्रां घरीं । पोहे मागूनि मुष्टी चारी । जर्जराम्बरीं बांधूनियां ॥ ६४ ॥ श्रीकृष्णासी उपायन । दिधलें कान्ता पें आणून । तेणें घेतलें संतोषून । मग प्रयाण आरंभिलें ॥ ६५ ॥

स तानादाय विप्राग्र्यः प्रययौ द्वारकां किल । कृष्णसन्दर्शनं मह्यं कथं स्यादिति चिन्तयन् ॥ १५ ॥

सदा संतुष्ट अंतःकरणीं । या लागिं म्हणिजे विप्राग्रणी । मग तो पृथुकांतें घेऊनी । द्वारके-लागूनि चालिला ॥ ६६ ॥ चैलखडें ग्रथित पृथुक । घेऊनि चालिला उदङ्मुख । कार्यसिद्धीचे सूचक । शकुन सम्यक त्या जाले ॥ ६७ ॥ दृढ निश्चल किल अव्ययीं । पतिव्रतेनें मानिला हृदयीं । विप्रा भेटेल शेषशायी । संशय नाहीं यदर्थीं ॥ ६८ ॥ ऐसा लाभ लक्षूनि शकुना । विप्रप्रियेनें मानिला मना ।

मग ते परतोनि गेली सदना । पुढें प्रयाणा करी द्विज ॥ ६९ ॥ पदोपदीं द्विज चालतां । हृदयामाजी करी चिन्ता । बरव्या प्रकारें कृष्णनाथा । मज भेटविता कोण असे ॥ १७० ॥ सम्यक म्हणिजे बरव्या परी । मज कारणें कैसा हरी । भेटेल हें अभ्यंतरीं । चिन्तन करी पदोपदीं ॥ ७१ ॥

त्रीणि गुल्मान्यतीयाय तिस्रः कक्षाश्च सद्विजः । विप्रोऽगम्यान्धकवृष्णीनां गृहेष्वच्युतधर्मिणाम् ॥ १ ॥

द्वारकादुर्गरक्षणकामें । भंवतीं प्रबळ सेनागुल्में । त्रय लंघिलीं द्विजसत्तमें । श्रीकृष्णनामें चिन्तूनिया ॥ ७२ ॥ पदोपदीं नामस्मरण । करित चाले तो ब्राह्मण । त्यातें देखूनि करिती नमन । वृष्णि यदुगण भोजान्धक ॥ ७३ ॥ ऐसें गुल्मत्रय लंघिलें । पुढें द्वारकापुर देखिलें । ब्राह्मणोत्तमें मनीं भाविलें । साफल्य जालें जन्माचें ॥ ७४ ॥ द्वारकापुरनिवासिजन । कित्तेक दूरस्थ ब्राह्मण । तिहीं सहित द्विजवर पूर्ण । द्वारकाभुवन प्रवेशला ॥ ७५ ॥ प्रथम दुर्ग प्रचंड पवळी । गोपुरीं पताका विचित्र चैलीं । द्वास्थ बैसले प्रतापशाली । नामावळी मुखें पढती ॥ ७६ ॥ द्विजें देखूनि तयां प्रती । म्हणे द्विज प्रवेशीं निषेधिती । ऐसी शंका मानी चित्तीं । तंव ते वंदिती द्विजवर्या ॥ ७७ ॥ आमुच्या स्वामींचें दैवत । म्हणोनि द्विजातें नमिती द्वास्थ । प्रवेशविती नगरा आंत । द्वितीय गोपुरा पाववितीं ॥ ७८ ॥ तेथही चंडप्रचंड वीर । द्वास्थ बैसले प्रबळतर । तिहीं देखतांचि द्विजवर । नमिती सादर होत्साते ॥ ७९ ॥ तेही कक्षा लंघूनि विप्र । तृतीय देहळी प्रति सत्वर । सवें समस्त द्विजांचा भार । घेऊनि सादर प्रवेशला ॥ १८० ॥ तीन्ही कक्षा लंघूनि पुढें । ब्राह्मण जातां निजनिवाडें । भोजान्धक-वृष्णिवाडे । देखीले उघडे दारवटे ॥ ८१ ॥ पारका वारा प्रवेशूं न शके । ऐसे रक्षक बैसले निके । अच्युतधर्मी यादव असिके । द्विजवर देखे प्रति सदनीं ॥ ८२ ॥ ऐसीं यदुगणांचीं सदनें । द्विजे पुरस्थां पुसूनि वदनें । द्वयष्टसहस्र कृष्णायतनें । दाविती नयनें जय विप्रा ॥ ८३ ॥

गृह द्वयष्टसहस्राणां महिषीणां हरेर्द्विजः । विवेशैकतमं श्रीमद् ब्रह्मानंदं गतो यथा ॥ १७ ॥

सोळा सहस्र सदनें ज्यांत । ऐसें एकायतन प्रशस्त । गोपुरद्वारीं बैसले द्वास्थ । निर्भय तेथ द्विज आला ॥८४॥ द्वास्थीं देखूनि द्विजा प्रति । नमस्कारिला सप्रेमभक्ति । काय इच्छा असेल चित्तीं । कृपामूर्ती ते सांगा ॥ ८५ ॥ येरु म्हणे कृष्णदर्शना । जावयाची असे कामना । द्वास्थ म्हणती कीजे गमना । जनार्दना भेटावया ॥ ८६ ॥ कृष्णसदनीं निषेध नाहीं । विशेष ब्राह्मणालागिं पाहीं । आवडे त्या प्रवेशा गेहीं । वसे सर्वीं ही सर्वात्मा ॥ ८७ ॥ ऐसें ऐकूनि द्वास्थवचन । संतोषलें द्विजाचें मन । सोळा सहस्र सतींचें भुवन । प्रवेशून पुढें पाहे ॥ ८८ ॥ कृष्णमहिषी सहस्र सोळा । त्यांचीं भुवनें देखोनि डोळां । ब्राह्मणातें आनंद जाहला । म्हणे सुकृतें सोहळा देखिला हा ॥ ८९ ॥ त्यां माजि कोणे एके सदनीं । ब्राह्मण पाहे प्रवेशोनी । तंव तें श्रीमत्सर्वाभरणीं । वैकुण्ठाहूनि वर विभवें ॥ १९० ॥ सदनीं प्रवेशतां द्विजवर । देहस्मृतीसी पडला विसर । ब्रह्मानंद योगेश्वर । पावतां शरीर जेंवि

विसरे ॥ ९१ ॥ शरीरीं बाणली पराकाष्ठा । चिन्मात्रैकस्वरूपनिष्ठा । होतां आकल्प भवश्रमकष्टा । सहित चेष्टा पारुपल्या ॥ ९२ ॥ कोण्हे एके सदनीं द्विज । प्रवेशला सहजीं सहज । तंव तेथें रुक्मिणी अधोक्षज । तेजःपुञ्ज पर्यंकीं ॥ ९३ ॥ देखतां काष्ठा लागूनि ठेली । देहस्मृतीची भावना गेली । जाणूनि प्रभूनें त्वरा केली । तेही कथिली जातसे ॥ ९४ ॥

तं विलोक्याच्युतो दूरात्प्रियापर्यङ्कमास्थितः । सहसोत्थाय चाभ्येत्य दोर्भ्यां पर्यगृहीन्मुदा ॥ १८ ॥

मंचकासनीं रुक्मिणीसहित । बैसला असतां श्रीअच्युत । दुरूनि ब्राह्मण अकस्मात । देखूनि त्वरित धाविन्नला ॥ ९५ ॥ परमानंदावाप्ति द्विजा । ऐसें कळलें अधोक्षजा । मंचकीं सांडूनि विदर्भात्मजा । धांविला सहजानंदात्मा ॥ ९६ ॥ मंचकातळीं घालोनि उडी । विप्रापासीं अतितांतडी । येऊनि त्यातें परमावडी । कारुण्यप्रौढी द्रवूनियां ॥ ९७ ॥ ब्राह्मण कवळूनि दोहीं बाहीं । सप्रेम आलिंगला हृदयीं । आनंद उथळला माजि दोहीं । कथिला कांहीं तो न वचे ॥ ९८ ॥

सरव्युः प्रियस्य विप्रर्षेरङ्गसङ्गातिनिर्वृतः । प्रीतो व्यमुञ्चदब्बिन्दून्नेत्राभ्यां पुष्करेक्षणः ॥ १९ ॥

विप्रां माजि ऋषीवर । प्राचीन सखा जो प्रियकर । तदंग आलिंगूनि दृढतर । सुखें निर्भर हरि जाला ॥ ९९ ॥ परमप्रीती गहिंवरून । आनंदाश्रु टाकिती नयन । भक्तवत्सल श्रीभगवान । पुष्करेक्षण परमात्मा ॥ २०० ॥

अथोपवेश्य पर्यङ्के स्वयं सख्युः समर्हणम् । उपहृत्यावनिज्यास्य पादौ पदावनेजनीः ॥ २० ॥

या नंतरे निज मंचकीं । विप्रा बैसवी स्वहस्तकीं । अर्पूनि उपायन कौतुकीं । चरणक्षालन आदरिलें ॥ १ ॥ तया ब्राह्मणाचे चरण । क्षाळी स्वहस्तें जनार्दन । हृदयीं धरी आलिङ्गून । मौळ नयन परिमार्जी ॥ २ ॥ मग ते प्रतिष्ठानियां पीठीं । पादावनेजन धरी मुकुटीं । जयाचे पवित्रतेचिये साठीं । अखिल सृष्टी पूत करी ॥ ३ ॥

अग्रहीच्छिरसा राजन्भगवाँल्लोकपावनः । व्यलिम्पद्दिव्यगन्धेन चन्दनागुरुकुङ्कुमैः ॥ २१ ॥

जे कां लोकत्रयपावनी । मस्तकीं मिरवी पिनाकपाणी । त्रिपथगामिनी मंदाकिनी । प्रक्षाळवणी ज्या पदींचें ॥ ४ ॥ असो ज्याचिया नामस्मरणें । अघागेन्द्रां भस्म करणें । त्या श्रीकृष्णें शिरसा धरणें । पदावनेजन विप्राचें ॥ ५ ॥ प्रातिष्ठानि कनकपीठीं । अर्चीं सप्रेमें जगजेठी । अगुरु केशर चंदन-घृष्टि । तें चर्ची बोटीं दिव्य गंध ॥ ६ ॥ प्राणसखा जिवलगामित्र । तत्पूजनीं प्रेमादर । तिलक

रेखूनि मनोहर । मलयागर विलेपिला ॥ ७ ॥ दिव्य सुगंधपरिमळरोळा । अरर्द्रे उठीवरी केला उधळा । वरी अर्पिल्या मंदारमाळा । अक्षता सुढाळा शोभविल्या ॥ ८ ॥

धूपैः सुरभिभिर्मित्रं प्रदीपावलिभिर्मुदा । अर्चित्वावेद्य ताम्बूलं गां च स्वागतमब्रवीत् ॥ २२ ॥

सुरवरसेव्य दशाङ्गधूप । अनळीं योजूनि धरी समीप । पोतासप्रमुख बहुविध दीप । करी साक्षेप दीपावळी ॥ ९ ॥ अमृताहूनि जो विशेष । तैसा नैवेद्य अर्पिला सुरस । गंडूषपात्रीं आंचवणास । देऊनि मुखवास समर्पिला ॥ २१० ॥ रोचक पाचक रसाळ फळें । ताम्बूल दिधला त्रयोदशमेळें । धेनु अर्पूनि मग पुशिलें । स्वागत देवें द्विजा प्रति ॥ ११ ॥ स्वामि येतां मार्गीं श्रमला । येरु म्हणे दर्शनें श्रम परिहरला । दाक्षिणे ठेवूनि तुळसीदळा । करी सोज्वळा नीराजनें ॥ १२ ॥ पुष्पाञ्जली वाहूनि मुकुटीं । स्तुतिस्तवनें मधुर गोठी । मस्तक ठेवूनि पादपीठीं । सुखसंतुष्टी पावविला ॥ १३ ॥ परम अघटित आश्चर्यकर । घटनापटुतर जगदीश्वर । देखूनि चकित विधि शंकर । नरसुरमुनिवरशक्रेंसीं ॥ १४ ॥ तें अवधारीं कौरवराया । कोणतें आश्चर्य गमलें तया । मजही उत्साह सांगावया । कारण विस्मया जाणोनी ॥ १५ ॥

कुचैलं मलिनं क्षामं द्विजं धमनिसन्ततम् । देवी पर्यचरद्भैमीचामरव्यजनेन वै ॥ २३ ॥

वस्त्रखंडें ग्रथितें जीर्ण । या लागिं कुचैल तो ब्राह्मण । क्षुत्पिपासापीडित दीन । परम म्लान मलिनाङ्ग ॥ १६ ॥ केवळ अस्थींचा पांजरा । टळटळीत दिसती शिरा । ऐसियातें व्यजनवारा । घाली सुन्दरा वैदर्भी ॥ १७ ॥ जयेचे कृपेचा अपाङ्गपात । व्हावया सुरवर आर्त्तभूत । मुनिवर तपश्चर्यानिरत । जगन्माता भीमकी ते ॥ १८ ॥ सर्वाभरणीं विराजमान । दिव्य कनकाम्बर परिधान । रत्नदंडी चामर धरून । वीजी ब्राह्मणा अघटित हें ॥ १९ ॥ विस्मय गमला कवणाप्रति । तोही परिसें परीक्षिती । परमाह्लाद पावोनि चित्तीं । श्रीशुक कथीं तें ऐका ॥ २२० ॥

अन्तःपुरजनो दृष्ट्वा कृष्णेनामलकीर्तिना । विस्मितोऽभूदतिप्रीत्या अवधूतं सभाजितम् ॥ २४ ॥

अंतःपुरनिवासिजन । विस्मित जाला तें देखून । केवळ अवधूत ब्राह्मण । श्रीभगवान स्वयें अर्ची ॥ २१ ॥ ज्या कृष्णाची अमळ कीर्ति । सनकादि वैकुण्ठभुवनीं गाती । सुरवर मुनिवर निगम प्रभृति । त्रिजगीं स्मरती स्वहितार्थ ॥ २२ ॥ तया कृष्णानें ब्राह्मण । अवधूत गूढलिङ्गी पूर्ण । कुचैल म्हणिजे विवर्णवसन । त्यातें पूजून तोषविलें ॥ २३ ॥ अमलकीर्ति श्रीकृष्णानें । प्रीतिपूर्वक अंतःकरणें । ब्राह्मणा अवधूता कारणें । अतिसम्मानें पूजिलें ॥ २४ ॥

किमनेन कृतं पुण्यमवधूतेन भिक्षुणा । श्रिया हीनेन लोकेऽस्मिन्गर्हितेनाधमेन च ॥ २५ ॥

ऐसें देखूनि अंतःपुरीं । निवासनिष्ठा ज्या नरनारी । म्हणती यानें जन्मान्तरीं । सुकृतसामग्री संग्रहिली ॥ २५ ॥ या अवधूत ब्राह्मणें । पूर्वी जोडिलीं कोण पुण्यें । ऐसियातें कमलारमणें । अति-सम्मानें पूजियलें ॥ २६ ॥ केवळ भिकारी भिक्षुक । श्रिया हीन दरिद्री रंक । लोकीं निंद्य जो सकळंक । नीच याचक अधम हा ॥ २७ ॥ येणें केलें सुकृत काय । तेणें पुण्यें त्रैलोक्यराय । सम्मानूनि पूजिता होय । परमाश्चर्य हेंचि गमे ॥ २८ ॥ शालिग्राम न भजे शंखा । बृहस्पति न भजे मूर्खा । भूप न भजे नीच याचका । श्रीनायका अनर्ह हें ॥ २९ ॥ श्रीकृष्णाचें स्वरूप काये । तो जा पूजी कवण्या न्यायें । अंतःपुरजन बोलता होये । परमाश्चर्यें तें ऐका ॥ २३० ॥

योऽसौ त्रिलोकगुरुणा श्रीनिवासेन सम्भृतः । पर्यङ्कस्थां श्रियं हित्वा परिष्वक्तोऽग्रजो यथा ॥ २६ ॥

त्रिजगज्जनक द्वारकाधीश । विश्वमंगल श्रीनिवास । तेणें जो हा अतिविशेष । ब्राह्मण कर्कश पूजियला ॥ ३१ ॥ मंचकीं सांडूनि कमलेप्रती । सवेग धावूनि सप्रेमभक्ती । अग्रजबंधु आळंगिती । तयाचि रीती आळंगिला ॥ ३२ ॥ बाह्य दिसतो हा दरिद्री । तथापि न कळे सुकृतथोरी । ऐसें आश्चर्य सर्वान्तरीं । तंव संवाद करी हरि त्यासीं ॥ ३३ ॥

कथायाञ्चक्रतुर्गाथाः पूर्वा गुरुकुले सतोः । आत्मनो ललिता राजन्करौ गृह्य परस्परम् ॥ २७ ॥

संतुष्ट सुपूजित ब्राह्मण । आदरें मंचकीं बैसवून । भूतळीं उपविष्ट श्रीभगवान । करिती भाषण परस्परें ॥ ३४ ॥ परस्परें धरूनि हस्त । अभ्यंतरीं आनंदभरित । स्मरूनि गुरुकुलींचा वृत्तान्त । वार्ता करिती उभयता ॥ ३५ ॥ तुम्हीं आम्हीं गुरूचे सदनीं । जैशा क्रमिल्या दिवसरजनी । त्या त्या स्मरती तुमचे मनीं । किंवा विसरूनि गेलां पैं ॥ ३६ ॥ ऐसें ब्राह्मणा संबोधून । पुसता जाहला श्रीभगवान । वियोग जाहला गुरुगृहींहून । कृतवर्तन त्या वरी जें ॥ ३७ ॥

श्रीभगवानुवाच ॥ अपि ब्रह्मन्गुरुकुलाद्भवता लब्धदक्षिणात् ।
समावृत्तेन धर्मज्ञ भार्योढा सदृशी न वा ॥ २८ ॥

तुम्हीं देऊनि गुरुदक्षिणा । देशिकाची घेऊनि आज्ञा । येऊनियां आत्मसदना । समावर्तना केलें कीं ॥ ३८ ॥ तुम्ही संप्रदायधर्माभिज्ञ । यथासूत्र समावर्तन । करूनि भार्या आपणासमान । वरिली कीं ना मज सांगा ॥ ३९ ॥ ऐसा संशयात्मक हा प्रश्न । म्हणाल केला काय म्हणून । तरी म्यां तुमचें देखतां चिह्न । संशयापन्न मन जालें ॥ २४० ॥ यज्ञोपवीतें बहुत कंठीं । न दिसे बहिर्वास-कासोटी । श्मश्रुकूर्चमूर्धज मुकुटीं । दिसती दृष्टी विसर्जिले ॥ ४१ ॥ यावरूनि मानूं आम्ही । तुम्ही वर्ततां गृहस्थाश्रमीं । आणि भोगवर्जित चिह्नें वर्ष्मीं । जे प्रथमाश्रमीं कीं नेणों ॥ ४२ ॥ अभ्यंगरहित

तनु मलीन । ताम्बूलकषायवर्जित दशन । परिमित वाणी गृहीत मौन । व्रतस्थ म्हणून संशय हा ॥ ४३ ॥ ऐसा संशयात्मक हा प्रश्न । तुम्हांसि केला देखूनि चिह्न । ऐसें ऐकतां मित्रभाषण । मौनें ब्राह्मण हास्य करी ॥ ४४ ॥ तयावरूनि तर्की हरि । अनाग्रहें मंचकावरी । बैसला आणि पट्कच्छ-धारी । गमे श्रोत्री क्षौरकृत ॥ ४५ ॥ करूनि गृहस्थाश्रमनिर्धार । पुढें प्रश्न तदनुसार । करिता जाहला जगदीश्वर । तो सविस्तर अवधारा ॥ ४६ ॥

प्रायो गृहेषु ते चित्तमकामविहितं तथा । न चातिप्रियसे विद्वन्धनेषु विदितं हि मे ॥ २९ ॥

मग म्हणे जी ब्राह्मणोत्तमा । तुम्ही भजलेति गृहस्थाश्रमा । ऐसा निश्चय जाला आम्हां जे । वारिली वामा सत्कुलीन ॥ ४७ ॥ परंतु गृहाच्या ठायीं चित्त । बहुतेक नाहीं तुमचें रमत । अकामें कामक्रिया उपहत । जाली गमत मम चित्ता ॥ ४८ ॥ मजला पूर्ण हें जाणवलें । तुम्ही विद्वांस विरागी भले । नाहीं अत्यंत प्रिय मानिलें । धनकामिनीसदनांतें ॥ ४९ ॥ तरी हें तुम्हां आर्यां योग्य । तन्मात्रिक प्राकृतां भोग्य । स्वर्ग्य मानूनियां अस्वर्ग्य । भजती अश्लाघ्य मंदमति ॥ २५० ॥ तरी कां विद्वांस गृहस्थाश्रमीं । सकामापरी वर्तती नियमीं । ऐसा संशय धराल स्वामी । तरी यदर्थीं तुम्ही अवधारा ॥ ५१ ॥

केचित्कुर्वन्ति कर्माणि कामैरहतचेतसः । त्यजन्तः प्रकृतीर्दैवीर्यथाऽहं लोकसंग्रहम् ॥ ३० ॥

जे कां सकाम विषयासक्त । कर्माधिकारी ते निश्चित । परंतु कोण्ही कामातीत । निष्कामवंत निर्विषय ॥ ५२ ॥ ईश्वरमायारचितप्रकृती । दैवी गुणमयी जीतें म्हणती । विषयवासनारूप निश्चिती । तदासक्ती तो काम ॥ ५३ ॥ दैवी प्रकृति त्यजिली जिहीं । जे कां निष्काम पुरुष ऐसेही । प्रवर्तले लोकसंग्रहीं । कर्मप्रवाहीं मज ऐसे ॥ ५४ ॥ आपुला दृष्टान्त दिधला त्यातें । तें स्वामींहीं जाणिजे चित्तें । मी ईश्वर हें कळलें तुम्हातें । तो मी कर्मातें स्वयें करीं ॥ ५५ ॥ काम आकळूं न शके मज । अथवा कर्मफळाशेचा अनुपज । विषयवासना न नचे भोज । तो मी सहज कर्म करीं ॥ ५६ ॥ यदर्थीं इतुकेंचि कारण । मज करावया कर्माचरण । लक्षूनि लोकांचें संग्रहण । कर्मप्रवीण सकामवत ॥ ५७ ॥ झणें तूं म्हणसी द्विजोत्तमा । तूं परमेश्वर परमात्मा । तुझी साम्यता कैसेनि आम्हां । तरी आम्हा तुम्हां समबोध ॥ ५८ ॥

कच्चिद्गुरुकुले वासं ब्रह्मन्स्मरसि नौ यतः । द्विजो विज्ञाय विज्ञेयं तमसः पारमश्नुते ॥ ३१ ॥

अगा ब्राह्मणोत्तमा स्वामी । गुरुकुळीं म्हणिजे गुरूचे धामीं । कांहीं दिवस निष्कामकामी । शुश्रूषाधर्मी पैं होतों ॥ ५९ ॥ ज्या करणास्तव शुश्रूषापर । कित्तेक काळ गुरूचें घर । वसविलें तें निरंतर । तुझें अंतर स्मरतें कीं ॥ २६० ॥ गुरूपाशानि जाणिजे बरवें । नमनें प्रश्नें सेवनें भावें ।

जाणोनि घेतलिया तें आघवें । निस्तरावें अंधतम ॥ ६१ ॥ विवर्तरूप जो भवभ्रम । अहंतेपासूनि अंधतम । पर्यंत जो कां अतिदुर्गम । लाहिजे नुगम माजूनियां ॥ ६२ ॥ गुरुसेवनें निष्ठाबळें । गुरुप्रसादें विज्ञान विवळे । भ्रमतम जो हा भ्रम मावळे । मग मिळिजे केवळें अमृतत्वीं ॥ ६३ ॥ तुम्हां आम्हांतें एकचि समयीं । स्वमुखें बोधिलें असे गुरुगृहीं । अद्यापि भवभ्रम वर्ते देहीं । जे समता नाहीं म्हणतसां ॥ ६४ ॥ अध्यारोपाचा अपवाद । करूनि चिदैक्य बोधिलें विशद । जिहीं ते गुरु अमृतप्रद । तयांचें पद स्मरतां कीं ॥ ६५ ॥ बहुधा गुरु असतां सृष्टी । त्यामाजि निर्णीत गुरुत्रयकोटी । त्यांतही तृतीय सर्वां मुकुटीं । जो भवसंकटीं कैपक्षी ॥ ६६ ॥ बहुधा म्हणिजे कैसें कोण । गुरुत्रयाचें काय लक्षण । तारी भवतम निस्तरून । तो ही सकरुण अवधारा ॥ ६७ ॥

स वै सत्कर्मणां साक्षाद्विजातेरिह संभवः । आद्योंऽग यत्राश्रमिणां यथाहं ज्ञानदो गुरुः ॥ ३२ ॥

बहुधा माजी त्रिधा श्रेष्ठ । त्यांतही अमृतप्रद वरिष्ठ । ऐसें प्रतिपादी वैकुण्ठ । अंतरनिष्ठ अपरोक्ष ॥ ६८ ॥ प्रवृत्तिप्रवाहसाधन । मुख्य मर्त्या अन्नाच्छादन । तद्विद्येचें प्रबोधन । करिती म्हणून बहुधा तें ॥ ६९ ॥ गाणें नाचणें लिहिणें पठणें । शस्त्रास्त्रविद्या मल्लां भिडणें । उच्च अवघडीं अगम्य चढणें । किंवा उडणें नभोगर्भीं ॥ २७० ॥ कुलाल कार्मार दिवाकीर्ती । त्वष्टा शिल्पिक तांबट खाती । स्वर्णस्तेयादि अनेक जाती । जठरभरणार्थ शिक्षिती जे ॥ ७१ ॥ ऐसियांतेंही होऊनि शरण । गुरुत्वें पूजूनि धरिजे चरण । ऐसे बहुधा गुरु जे जाण । प्रवृत्तिप्रवीण निरूपिले ॥ ७२ ॥ चोरव्याघ्रादि दुर्घटमार्गीं । पडतां कृपाळु जो आपंगी । अल्पस्वल्प होऊनि संगी । दावी सवेगीं सत्पथ जो ॥ ७३ ॥ तेणें दिधलें जीवदान । यालागिं तोही गुरुत्वें मान्य । बुडतां काढी उदकांतून । तो त्या समान कीं ना हो ॥ ७४ ॥ उटजीं प्रदीप्त हिरण्यरेता । त्यामाजि गाढमूढ प्रसुप्तां । बोधवूनि काढी त्या करुणावंता । गुरुत्व तत्त्वता असे कीं ॥ ७५ ॥ किंवा विषाक्तअन्नपान । सेवितां त्यागवी जो बोधून । तेणें दिधलें जीवदान । तैं तो पूर्ण गुरु नव्हे ॥ ७६ ॥ ऐसे सदय क्लेशापहारी । जीवदानी परोपकारी । पूज्य गुरुत्वाचिये हारीं । कथितां वैखरी अनावर ॥ ७७ ॥ ऐसे प्रवृत्तिप्रद बहुविध । त्यांमाजि निर्णीत जे कां त्रिविध । ऐका होऊनियां सावध । जे बोधी प्रबुद्ध श्रीकृष्ण ॥ ७८ ॥ जेणें स्ववीर्यें जननीजठरीं । उत्पन्न केले स्थूळशरीरी । मग हे बहुविध बाह्याकारी । गुरुत्वाधिकारी पैं जाले ॥७९॥ यालागीं आदिगुरु तो पिता । अनन्यभावें त्यातें भजतां । मोक्षाधिकारी होय तत्त्वता । गुरु प्रथमता तो एक ॥ २८० ॥ द्वितीय वर्णाश्रमाधार । करी उपनयनादिसंस्कार । वेदाध्यापक स्वकर्माचार । बोधी साचार सन्मार्ग ॥ ८१ ॥ मंत्रयंत्रांचा उपदेष्टा । नाना प्रयोगागमचेष्टा । द्वितीय गुरूमाजि निष्ठा । सत्य अभीष्टा बोधक जो ॥ ८२ ॥ आतां तृतीय उत्तम पुरुष । ज्ञानप्रद जो मी परेश । निरसीं भवभ्रमाचा दोष । बोधीं अपरोक्ष अमृतत्व ॥ ८३ ॥ सर्व वर्ण सर्वाश्रम । बोधूनि वोपीं कैवल्यधाम । पूर्णकृपेचा कल्पद्रुम । तो पुरुषोत्तम मीचि स्वयें ॥ ८४ ॥ कर्मोपदेष्टा जो गुरु । तोही भवसागराचेंचि तारूं । सत्कर्माचा नियमाचारु । विषयव्यापार पारुषवी ॥ ८५ ॥ स्वैरकथाश्रवणविषय । त्यातें

निषेधूनि आम्नाय । नियमें बोधूनि छेदी भवभय । जो कां सदय कारुणिक ॥ ८६ ॥ त्वागिन्द्रियांची लिप्सा स्पर्शी । तेथ करूनि शास्त्रदर्शी । शिवों नेदी निषिद्धासी । कर्ममार्गासी अनुसरवी ॥ ८७ ॥ कामक्षोभें स्वैर कामिनी । आलिङ्गना हाव मनीं । तेथ वेदाज्ञा प्रबोधूनी । पाणिग्रहणीं प्रवर्तवी ॥ ८८ ॥ जाती आम्नायशाखाशोध । गोत्रनक्षत्रनिर्णयें शुद्ध । पाहूनि विवाह करितां सिद्ध । होय बाध स्वैरत्वा ॥८९॥ ऐसी परिणीत पाणिग्रहणीं । यत्नें शोधूनि कीजे गृहिणी । तेथही जघनक्रियाचरणीं । नियमित रजनी ऋतुकाळीं ॥ २९० ॥ क्रुद्धा क्षामा सदोष रुग्णा । व्रतस्था गुर्विणी प्रबोधहीना । इत्यादि अयोग्या मैथुना । सदाचरणा माजिवज्या ॥ ९१ ॥ चक्षु स्वैर रूपासक्त । तेथही श्रुतीनें केला नियत । निषिद्धदर्शनीं अंधवत । शास्त्रसंकेत जाणोनी ॥ ९२ ॥ रसना लालस स्वैर रसा । परि वेदाज्ञा धरूनि शिरसा । निषिद्धा न सेवी पीयूषा । न टकी विषा श्रुतिपूता ॥ ९३ ॥ सुरभि पूति गंधद्वय । प्रशस्त जाणोनि आम्नाय । यथाधिकारें सेविता होय । भेषजप्राय स्वहितार्थी ॥ ९४ ॥ वदों नये तें न वदे वाणी । करूं नये तें न करी पाणी । न चलिजे तेथ न चाले चरणीं । अगम्यागमनीं न प्रवर्ते ॥ ९५ ॥ मळोत्सर्ग न करिजे जेथ । सहसा मेहन न करी तेथ । शौचाचारीं अतंद्रित । रक्षी नियत वर्ष्मक्रिया ॥ ९६ ॥ देखोनि भवरोग अवघड । सद्वैद्य भेषज योजी दृढ । पथ्या नियमूनियां सांकड । वर्जी धड गोड वावडें ॥ ९७ ॥ तैसे वयसा भरी विषय । यथेष्टाचरणें देती निरय । तेथ कर्मोपदेष्टा जो गुरुवर्य । रक्षी आम्नाय नियमूनि ॥ ९८ ॥ ईश्वरवेदगुरूच्या वचनीं । विश्वासपूर्वक कर्माचरणीं । निष्कामनिष्ठा क्षण-क्षणीं । करी क्षाळणी मनोमळा ॥ ९९ ॥ वर्णाश्रमासी जें कां उचित । तें आचरवी अतंद्रित । मज-सारिखाचि तो गुरुनाथ । म्हणे समर्थ श्रीकृष्ण ॥ ३०० ॥ ज्ञानप्रद याहूनि श्रेष्ठ । म्हणतां शंका उपजली स्पष्ट । कर्मठ कैसेनि कनिष्ठ । तें संतुष्ट अवधारा ॥ १ ॥ तरी सत्कर्माचिया आचरणीं । अहंता वाढे कर्मठपणीं । मग तो ज्ञाननिष्ठा न गणी । कर्मबंधनीं बद्धत्वें ॥ २ ॥ आचारशीळ मानी श्रेष्ठ । इतरा मानी कर्मभ्रष्ट । सहसा नोहे ब्रह्मनिष्ठ । ज्ञानवरिष्ठ नावगमे ॥ ३ ॥ येऱ्हवी रक्षी अघसंकटीं । परंतु गोवी कर्मकचाटीं । अभेदापरीक्षपरिपाटी । ते हातवटी उमजेना ॥ ४ ॥ कुळस्त्रीधर्मयोनिरक्षण । कान्तेसींही तैसीच जाण । वर्ततां होय निःसंतान । पडे खान स्वसुखाची ॥ ५ ॥ योनिरक्षण सतीचें व्रत । नीवीमोक्षण करितां कान्त । वसनरहित शंकातीत । स्वसुखें क्रीडत कान्तेसीं ॥ ६ ॥ तैसें सत्कर्म श्रुतिप्रणीत । आचरिजे चित्तशुद्ध्यर्थ । नितान्तनिर्मळ जालिया चित्त । होइजे संतत सन्मात्र ॥ ७ ॥ ज्ञानाग्निदग्धकर्माणि । गीतेमाजि हे भगवद्वाणी । ज्ञानें जाळितां कर्मश्रेणी । त्यां पंडित म्हणोनि बुध म्हणती ॥ ८ ॥ देहात्मबोधीं कर्मनिष्ठा । जीवात्मबोधीं ध्याननिष्ठा । आत्माबबोधीं स्वरूपनिष्ठा । हें कर्मठा उमजेना ॥ ९ ॥ कवचटोपेंसीं सन्नद्धपणीं । प्रतापें शत्रु भंगिजे रणीं । गृहा आलिया रहित वसनीं । सहित तरुणी पहुडावें ॥ ३१० ॥ जंवरी न कढी शिलेटोप । तोंवरी दुर्लभ सुखाचा जल्प । तेंवि ज्ञानोदयीं कर्मसंकल्प । नोहे अल्प उपयोगी ॥ ११ ॥ गंगापूर लंघनासाठीं । माजि बांधिजे सांगडी पेटी । गंगा लंघिल्या धोदगे कटीं । ते उफराटी विडंबना ॥ १२ ॥ कर्मठतेचा अहंकार । कीं

फळाशेचा बीजाङ्कुर । या दोषास्तव गुरुत्व अपर । श्रेष्ठतर ज्ञानप्रद ॥ १३ ॥ ज्ञानियाच्या ठायीं कर्म । द्विविध असे तें ऐका वर्म । लोकसंग्रहमात्र नियम । संप्रज्ञात समाधिस्था ॥ १४ ॥ पूर्वकर्माचरण मोडी । समूळ देहभावातें तोडी । देह वर्ते प्रारब्ध प्रौढी । कर्म घडमोडी न स्मरतां ॥ १५ ॥ संप्रज्ञात असंप्रज्ञात । दोघे समान समाधिवंत । त्यांमाजि साधकांचें स्वहित । संप्रज्ञात संपादी ॥ १६ ॥ संप्रज्ञातसमाधिवंता । शरण जाऊनि मुमुक्षु स्वहिता । साधी म्हणोनि त्या श्रेष्ठता । वदला जनिता ब्रह्मयाचा ॥ १७ ॥ जनिता केवळ संसारदानी । कर्मठ रक्षी अधःपतनीं । ज्ञानप्रद तो सायुज्यसदनीं । समरसौनी विलमवी ॥ १८ ॥ करूनि सर्व संशयच्छेद । हृदयग्रंथींचा करी भेद । भस्में करी जो कर्में त्रिविध । तो ज्ञानद वर सर्वां ॥ १९ ॥ वेदवादाच्या पुष्पित वाणी । उभयभोगांची उभारणी । बोधूनि गोंवी कर्माचरणीं । यास्तव गौणी त्या गुरुता ॥ ३२० ॥ ज्ञानप्रद जो कां गुरु । केवळ भवार्णवींचें तारूं । उमाणी व्यतिरेकें संसारु । अतद्विचार बोधूनी ॥ २१ ॥ अनादि अविद्येमाजि चैतन्य । प्रतिबिम्बूनी जालें भिन्न । अध्यारोपा वरपडून । विपरीत ज्ञान अवलंबी ॥ २२ ॥ सत्य ज्ञान अनंत वस्तु । सच्चिदानंद आत्मा नित्यु । विचरे तयाचा केला अस्तु । मग विपरीत अवलंबी ॥ २३ ॥ सत्य मानिलें जगद्भान । चित्प्रकाशमय करणवयुन । विषयावाप्ति आनंद पूर्ण । विपरीत ज्ञान तें ऐसें ॥ २४ ॥ विसरे वास्तव तरणिलोप । तैं हरिणां किरणीं सलिलारोप । कीं रज्जु न भासनि भासे सर्प । भ्रमें भय कंप अनुभवी ॥ २५ ॥ तेंवि आपण सन्मय वस्तु । विसरूनि म्हणे मी वर्ष्म अवस्तु । अभेदबोधा करूनि अस्तु । भेद प्रशस्तु दृढावी ॥ २६ ॥ म्हणाल सूर्य भिन्न मृगें भिन्न । पूर्वदृष्ट भिन्न जीवन । तदारोप किरणीं करून । भांबावोनि भ्रमताती ॥ २७ ॥ तैसें येथ नसतां त्रितय । आत्मा केवळ अद्वितीय । अध्यारोप कैसा होय । स्वप्रत्यय असतांची ॥ २८ ॥ तरी माया अविद्याअंगीकारें । ईश्वर जीव द्वय उभारें । वास्तव आत्मत्वाच्या विसरें । बहुधा पसरे भेदभ्रम ॥ २९ ॥ आपण एकला एकान्तीं । मिथ्या माया ते सुषुप्ती । अंगीकारितां स्वप्नभ्रान्ती । भ्रमवी दिगंतीं भेदभ्रमें ॥ ३३० ॥ तया स्वप्नमाजि गगन । पवन दहन जीवन भुवन । प्रतीतिगोचर तन्मात्रभान । अविद्यमान सत्य गमे ॥ ३१ ॥ आत्मप्रियत्वें चैतन्य मात्र । तेथ महाभूतादि तन्मात्र । स्वप्न अवास्तव क्षणभंगुर । प्रतीतिगोचर करी कीं ना ॥ ३२ ॥ तस्मात् प्रधान अंगीकारें । अध्यारोपें दृश्य उभारे ॥ वास्तव आत्मत्वाच्या विसरें । उपजे मरे जीवपणें ॥ ३३ ॥ तया जननमरणा पोटीं । तापत्रयादि दुःखकोटी । लक्ष चौऱ्यायसी योनि संकटीं । भ्रमें घरटी देत असे ॥ ३४ ॥ रडे वोरडे आरडे खिरडे । खुरडूं न शके मागें पुढें । दुःखडोहीं बुडे अवघडे । परि निघणें न घडे तेथूनी ॥३५॥ मातापित्यांच्या मूत्ररंध्रीं । जन्म पावे कुत्सित जठरीं । उकडे विष्ठामूत्रदाथरीं । नवमासवरी कोंडूनियां ॥ ३६ ॥ आड येतां खांडिती चिरिती । तैं उभयतांची अतिविपत्ति । दैवें जहालिया सुप्रसूति । लाहे निर्गति तेथूनी ॥ ३७ ॥ योनीबाहीर पडल्या पाठीं । यातना होती कोट्यानुकोटी । कोण्ही बोलूं न शके वोटीं । क्षुधा पोटीं जाकळितां ॥ ३८ ॥ प्रदीप्त होतां जठरानळा । उष्णहृव्यें देती गरळा । तेणें सबाह्य होतां हरळा । करी तळमळा टेहें टेहें ॥ ३९ ॥ कोमळगात्रासी चहूंकडे ।

तोडिती मत्कुणप्रमुख किडे । त्याचें निवारण करणें न घडे । कोणा पुढें वदों न शके ॥ ४० ॥ वान्ति पित्त श्लेष्मा लाळ । विष्ठा मूत्र अमंगळ । चिळसी न धरीच अळुमाळ । सर्वकाळ चिवडीतसे ॥४१॥ दात डोळे गोवर देवी । हागी ओकी कश्मलप्रभावी । कुत्सित देती भेपजनांवीं । एवं आघवी विडंबना ॥ ४२ ॥ अस्ति ते जायते हे विकार । कथिले अत्यंत दुःखकर । वर्धते म्हणिजे वाढतां गात्र । यातनापात्र बहुसाल ॥ ४३ ॥ बाहेर खेळतां मारिती पोरें । विद्या प्रबोधीं जाचिती पितरें । जैसें निर्धन्याचें कुतरें । अनेक द्वारें वृथा फिरे ॥ ४४ ॥ जातिप्रमाणें संस्कारिती । प्रयत्नें वनिता मेळविती । भरणपोषणप्रवाहखंती । चिन्ता चित्तीं दिनरजनीं ॥ ४५ ॥ लोकीं वाढवी बहुमान । प्रयत्नपूर्वक मेळवी धन । पूर्वजांचें जीर्ण सदन । मोडूनि नूतन संपादी ॥ ४६ ॥ अवघड नवस देवांप्रती । इंगळीं चाले घेवोखेती । कडे कर्मेरी वपा वाती । निम्ब नेसती स्त्रीपुरुषें ॥ ४७ ॥ ऐसिया नवसीं संतान होय । तैं ते नवस फेडूं जाय । थोर श्रीमंत सोयरे पाहे । तयांचे पाय आराधी ॥ ४८ ॥ घाघाट्यानें लेकरें उजवी । मानसन्मानें लोकां भजवी । पूर्वजांची चर्या त्यजवी । कीर्ति गाजवी भूचक्रीं ॥ ४९ ॥ लग्नें मुहूर्तें वृत्ति व्यवहारें । मानसन्मानें लौकिकाचारें । जोडिलें धन वेंचे सारें । दंभें विचरे मग लोकीं ॥ ३५० ॥ पादभाजाया खापर न मिळे । वरि वरि दावी बाह्य झळफळे । चाळवूनियां धनिक भोळे । काढी दिवाळें एकसरें ॥ ५१ ॥ मन धनिकाचें पडे विरडें । खतीं लिहिलें व्याज वाढे । चतुर्थांश नियमूनि तोंडें । मारिती कोरडे नृपदूत ॥ ५२ ॥ बेडी बंदखानीं यातना । विकरा घाली वधूसंताना । टाकूनियां वृत्तिसदना । म्हणे जीवदाना मज दीजे ॥ ५३ ॥ खतीं लिहिलें वाढे व्याज । त्याची करिती ते बेरीज । नसे घ्यावया ऐवज । सांडूनि लाज भीक मागे ॥५४॥ सोयरिच्या जाय दारा । म्हणे माझी सोडवण करा । लेंकी म्हणती निलाजिरा । पिसुणा घरा कां आला ॥ ५५ ॥ म्हणे वेंचा भीड आपुली-। बहुतां हस्तें ऐसिये काळीं । माझी मुक्तता पाहिजे केली । सुहृदीं सकळीं मिळूनियां ॥ ५६ ॥ तंव ते नादरिती वचन । परते पावूनियां अपमान । करिती राजदूत ताडन । तैं दीर्घ रुदन अवलंबी ॥ ५७ ॥ आंगीं धनाचा होता ताठा । तेव्हां केल्या बहुत चेष्टा । जाला धनक्षयें करंटा । बारा वाटा कुटुंबातें ॥ ५८ ॥ ऐसे चिरकाळ भोगी क्लेश । शेवटीं मरे घेऊनियां विष । किंवा पळे सांडूनि देश । वसवी विदेश त्या भेणें ॥ ५९ ॥ ऐसिया संपत्ती विपत्ती । भोगितां त्रास नुपजे चित्तीं । निर्लज्ज हांव धरी पुढती । नुपजे विरक्ती विषयाची ॥ ३६० ॥ ऐसे व्यापार बहुतां परी । परिहार करितां प्रतिवत्सरीं । पुनः पुन्हा पडे घोरीं । परि अंतरीं न त्रासे ॥ ६१ ॥ असो मनुष्यदेहींची कथा । गाढव होऊनि दगड वहातां । किडे पडले पाठीच्या क्षता । तें दुखवतां तळमळी ॥ ६२ ॥ श्वान सूकर वृश्चिक व्याळ । रीस व्याघ्र वृक विडाळ । विष्ठा कृमी या योनि बहळ । भोगी कुटिळ कर्मफळें ॥ ६३ ॥ पुढती मरे पुढती उपजे । योनिसंकटीं पुन्हा निर्बुजे । दैवें नरदेह लाधल्या लाजे । पुढती वोझें माथां घे ॥ ६४ ॥ जीवचैतन्य हे दशा । जन्ममरण पडतां वळसा । करुणा येतां श्रीपरेशा । सप्तपाशां छेद करी ॥ ६५ ॥ अहंतेचा प्रथम पाश । स्त्रीपरिग्रह द्वितीय पाश । संततीचा तृतीय पाश । सदनपाश चतुर्थ पैं ॥ ६६ ॥ स्वजनपाश पांचवा जाणा ।

धनपाश हा महावा गणा । पाशपट्काच्या बंधना । आशापाश सप्तम हा ॥ ६७ ॥ कर्मपाश त्याहूनि दृढ । तो आठवा अतिअवघड । कृपा करी जैं गरुडारूढ । तैं सुरवाड सुटिकेचा ॥ ६८ ॥ तैं तो लाहे सज्जनसंगा । विरक्त होय भवसुखभोगा । हृदयीं वदनीं कमलारंगा । चिंती निःसंग होत्साता ॥६९॥ सेवूनि सद्गुरु करुणावंत । करी परिचर्या । अतंद्रित । निष्काम अवंचक सप्रेमभक्त । देखूनि द्रवत गुरु हृदयीं ॥ ३७० ॥ सद्गुरु होऊनि परमकृपाळ । म्हणे वत्सा तूं क्लेशवहळ । करिसी याचें अभीष्ट फळ । कोणतें केवळ वाञ्छिसी तूं ॥ ७१ ॥ येरु म्हणे मज कामना नाहीं । परंतु बुडालों भवदुःख-डोहीं । येथूनि तारावें लवलाहीं । तारक नाहीं मज कोण्ही ॥ ७२ ॥ विरक्त आणि अवंचक भक्त । जाणूनि सद्गुरु बोधी स्वहित । म्हणे भवभ्रम हा अनृत । नित्यानित्य विवरीं पां ॥ ७३ ॥ दृश्य तितुकें पावे नाश । यथाकाळें ब्रह्मांडास । नाश होय पैं विशेष । मानी विश्वास गुरुवचनें ॥ ७४ ॥ नित्यानित्य वस्तुविचारे । म्हणे स्वामी मायिक न थरे । शाश्वत ब्रह्म केवळ खरें । कृपासागरें मज कथिजे ॥ ७५ ॥ गुरु म्हणती अविनाश ब्रह्म । केवळ तें तूं कैवल्यधाम । अविद्याभ्रमें भोगिले श्रम । मरणजन्म भववळसा ॥ ७६ ॥ दैवें जाहलासी निवृत्तिपर । आतां तुजला नाभीकार । सविश्वासें ज्ञान-विचार । ऐकूनि निस्तर भवजलधी ॥ ७७ ॥ ईश्वरगुरूंची उपासना । प्रेमसद्भावें नवविधभजना । रंगूनि अवचूक दास्याचरणा । इत्यादि साधना न विसंबें ॥ ७८ ॥ इहीं साधनीं वीर्योत्तर । सिद्धि पावे योग सधर । निस्तरूनि भवसागर । तमसःपार पावसी ॥ ७९ ॥ ऐसा आश्वासूनि संतप्त । सद्गुरु-नाथ करुणावंत । अतद्बोधें प्रबोधित । करी निवृत्त व्यतिरेकें ॥ ३८० ॥ म्हणे वत्सा तूं आपण । विवरूनि सांगें मजला कोण । दृश्य नाशवंत म्हणोन । पूर्वींच हे खूण तुज कथिली ॥ ८१ ॥ ब्रह्म-चिन्मात्र वस्तु सत्य । जगदाभास तद्विवर्त । विवर्ताची कैशी मात । तेही निवांत अवधारीं ॥८२॥ स्वतः-सिद्ध संचली । नाहीं अणुमात्र विसंचली । तेथ विपरीत भा.भासली । विवर्त बोली त्या नांव ॥ ८३ ॥ सूर्य अथवा सूर्यकिरणा । अणुमात्र पालट न होतां जाणा । बरडीं मृगजल भासे हरणा । विवर्तसंज्ञा त्या म्हाणिजे ॥ ८४ ॥ रज्जू न नसोनि भासे सर्प । शुक्ति न नसोनि रजतारोप । तेंवि वस्तूवरि विश्व अमुप । हा विवर्त्तजल्प अवगमिजे ॥ ८५ ॥ चिदाभासें हा अध्यारोप । करूनि भोगी दुःख अमूप । अपवादें त्या करूनि लोप । करी चिद्रूप देशिकेंद्र ॥ ८६ ॥ दृश्य मिथ्या हें जाणोन । तूं मज सांगें आपण कोण । सप्तवितस्ति प्रमाण । शरीर म्हणोनि येरू वदे ॥ ८७ ॥ सद्गुरु म्हणती रे बाळका । साद्यंत देह तुज ठाउका । शताब्द जन्मानंतर देखा । न वसे देखा पुढें मागें ॥ ८८ ॥ मायाजनित जाले गुण । पंचभूतें त्यापासून । एवं अष्टधा प्रकृति जाण । भौतिकें तेथूनि बहु होती ॥ ८९ ॥ देहामाजी पंचभूतें । वसती कैसीं ऐक त्यातें । पृथग्पृथगें गुणासहितें । जाणोनि अहंते निरसावें ॥ ३९० ॥ अस्ति नाडी मांस त्वचा । रोमेंसाहित पंचकाचा । देहामाजि हा पृथ्वीचा । अंशसमुच्चय जाण पां ॥ ९१ ॥ अस्थी कीं तूं नाडी मांस । त्वचा रोम कीं कोणचा अंश । याचा करूनियां निरास । जाण चिदंश तूं पृथग ॥ ९२ ॥ रक्त शुक्र मूत्र लाळ । स्वेदादि आपपंचकमेळ । पंचभूतात्मक जाणोनि सकळ । तूं यांवेगळा चिद्रूप ॥ ९३ ॥ क्षुधा तृषा निद्रा तंद्रा । मैथुनादि तेजपंचक

शिष्येंद्रा । तूं यांवेगळा चित्समुद्रा । कोंवि या अभद्रा मी म्हणसी ॥ ९४ ॥ चलन वलन आकुंचन । धावन प्रसरण पंचधा पवन । तूं यावेगळा चैतन्य । कोंवि हें भिन्न मी म्हणसी ॥ ९५ ॥ शोक मोह लज्जा भय । विषयानंद पांचवा होय । पंचधा नभ हें जाणोन सोय । तूं सन्मय हें नव्हसी ॥ ९६ ॥ पंचभूतांचीं पंचकें पांच । जडांश विजातीय हे साच । अष्टधा प्रकृतींचा हा संच । स्थूळप्रपंच तूं नव्हसी ॥ ९७ ॥ स्थूळशरीर तुझें जाण । जागृति अवस्था नेत्रस्थान । याचा विश्वात्मा अभिमान । रजोगुणें स्थूळभोग ॥ ९८ ॥ ऋग्वेद जो वैखरी वाचा । विस्तार अकार मातृकेचा । आद्य चरण हा प्रणवाचा । साक्षी याचा तूं भिन्न ॥ ९९ ॥ एवं अष्टधा हे प्रकृती । अपर जीवरूपा इची विकृती । ऐक तयेची व्युत्पती । अतद्व्यावृत्ति सांख्योक्त ॥ ४०० ॥ अंतःकरण मन मनीषा । चित्त अहंकारादि पंचधा अंशा । आकाशात्मक जाण शिष्या । सत्य जनिता या कर्तृकरणां ॥ १ ॥ निर्विकल्प स्फुरण अंतःकरण । संकल्पविकल्पात्मक तें मन । निश्चयात्मक बुद्धि जाण । अनुसंधानमय चित्त ॥ २ ॥ अभिमानात्मक अहंकार । एकचि वृत्ति पृथगाकार । पंचभूताचे प्रकार । सत्वांकुर स्वगत पैं ॥ ३ ॥ अंतःकरणदेवता विष्णु । मनोदेवता निशारमणु । बुद्धिदेवता तो दुहिणु । नारायण चित्तपति ॥ ४ ॥ अहंकारस्वामी रुद्र । तो चेष्टवी तनु समग्र । शुभाशुभकर्मानुसार । आविष्कार ज्या क्रियमाणीं ॥ ५ ॥ यांचा साक्षी तूं चिन्मात्र । नव्हसी देवता ना वृत्तिविकार । स्वगतभेद हें समग्र । दावीं साचार करूनियां ॥ ६ ॥ व्यान समान उदान प्रमुख । प्राणापानादि पवनात्मक । पंचधाचाळक चेष्टापंचक । तूं निष्टंक हें नव्हसी ॥ ७ ॥ स्थूळशरीर याचेंनि चळे । कल्पना भवभ्रमीं वावळे । यातें निरोधितां मावळे । प्रवृत्ति केवळ करणांची ॥ ८ ॥ आतां ज्ञानेंद्रियपंचक । घ्राण रसना चक्षुत्वक । विषयग्रहणीं श्रोत्रादिक । बाह्य सुखदुःख भोगविती ॥ ९ ॥ श्रोत्रेंद्रियाचें दैवत हरिता । वायु त्वगिंद्रियाचा पाता । स्वामी नेत्रेंद्रियाचा सविता । रसनाचाळिता तो वरुणा ॥ ४१० ॥ अश्विनीकुमार घ्राणपती । तैजसज्ञान करणोत्पत्ती । पंचविषयाची इहीं ज्ञप्ती । तूं निश्चिती हे नव्हसी ॥ ११ ॥ इहीं विवर्ता साच केलें । जीवचैतन्या भांबाविलें । सुखदुःखातें भोगविलें । पात्र केलें शुभा अशुभा ॥ १२ ॥ ज्ञानकारणा कर्मप्रवृत्ति । पंचधा सलीलात्मक वृत्ती । वाक्पाणिपादोपस्थी । पायवादिकीं कर्मेंद्रियीं ॥ १३ ॥ वाक्स्वामी तो हुताशन । पाणीपती तो संक्रंदन । पादेंद्रियपती वामन । चाळी प्रजन प्रजापती ॥ १४ ॥ इत्यादि पंच आवृत्ति । स्थूळदेहीं कर्मप्रवृत्ति । त्यागादानें विषयाप्रती । जे भजविती चिदाभासा ॥ १५ ॥ चेष्टा ज्ञान कर्म करणें । जेथें प्रकाशलीं रजोगुणें । कर्तृकरणां भोक्तेपणें । विषय-भोगणें घडे इहीं ॥ १६ ॥ शब्द स्पर्श रूप रस गंध । पार्थिवांश हे पंचविध । इहीं चिदंशा लाविला वेध । अपरोक्षबोध विसरविला ॥ १७ ॥ एवं तन्मात्र हे पंच । जीवचैतन्यभ्रामक । इंद्रियद्वारा लिप्सा-जनक । तूं निष्टंक हें नव्हसी ॥ १८ ॥ ऐसे पंचवीस विकार । अजड केवळ वृत्त्यंकुर । स्वगत विक्षेप-शक्तिमात्र । विपरीत बोध दृढावी ॥ १९ ॥ अष्टधा प्रकृतीची हे विकृती । जीवरूपा इतेंचि म्हणती । सूक्ष्मलिंग देह वदंती । वदती ग्रंथीं विपश्चित ॥ ४२० ॥ लिंगदेह कंठस्थान । स्वप्नावस्था तैजसाभिमान । प्रविविक्तभोग सत्वगुण । मध्यमा वाणी यजुर्वेद ॥ २१ ॥ उकारमात्रा इयेतें म्हणिजे । प्रणवपाद हा

द्वितीय गणिजे । येथ साक्षित्व मात्र तुझें । अहंकार ओझें वृथा वहासी ॥ २२ ॥ जीवरूपा इयेचें नाम । काय म्हणोनि तें ऐकें वर्म । सर्वघटीं व्यापक व्योम । सर्वग ब्रह्म अद्वितीय ॥ २३ ॥ परमसूक्ष्म पिंजिला तूळ । तंतु होय त्या भरितां पीळ । वोतप्रोत विणितां कुशळ । तैं तो सबळ पट होय ॥ २४ ॥ पटत्वाचिया रूपा नांवा । तंतू वेगळे करूनि दावा । तेंवि या तत्वाचा मेळावा । रूढवी जीवा जीवत्वें ॥ २५ ॥ अन्यथाबोध विपरीतबोध । ते हे विक्षेपशक्ति द्विविध । स्थूळ सूक्ष्मदेहावबोध । विपर्यीं बद्ध जीव करी ॥ २६ ॥ मूळ अज्ञान देहकारण । वास्तवबोधाचें आवरण । सुषुप्ति अवस्था हृदयस्थान । प्राज्ञ अभिमान पैं याचा ॥ २७ ॥ तमोगुण पश्यंती वाचा । सामक भोग आनंदाचा । विस्तार मकार मातृकेचा । चरण प्रणवींचा तृतीय हा ॥ २८ ॥ येथ आत्मा प्रकर्षें अज्ञ । म्हणोनि म्हणिजे त्यातें प्राज्ञ । तूं तो नव्हसी चैतन्यघन । स्वसंवेद्य सन्मात्र ॥ २९ ॥ दृश्यप्रवृत्तीचें विस्मरण । वास्तव-स्वरूपावगमीं अनभिज्ञ । सुषुप्ति अवस्था तिये अभिधान । आत्मा प्राज्ञ जीमाजी ॥ ४३० ॥ देहत्रयाचा व्यतिरेकें । दृश्य ऊमाणितां अशिके । तेथ अज्ञान भूमिके । माजि साधकें निमज्जतां ॥ ३१ ॥ म्हणे स्वामिया सद्गुरुनाथा । तारिजे हस्त घेऊनि माथां । देहत्रयाचा निरास करितां । मज मी तत्वतां न बोधें ॥ ३२ ॥ सद्गुरु म्हणती देहद्वय । विपरीत अन्यथा बोधमय । अबोधमात्र तोचि तृतीय । स्वबोध तुरीय जाण पां ॥ ३३ ॥ जालिया दृश्याचा निरास । मग जाणिवेसीं कैचा पैस । इंद्रियद्वारा विद्याभ्यास । चित्प्रकाश त्या न कळे ॥ ३४ ॥ दृश्य व्यतिरेकें निरसलें । केवळ आत्मत्व मात्र उरलें । तें मज कळेचि आपुलें । म्हणोनि कथिलें जरि शिष्या ॥ ३५ ॥ तरि न कळे हें जातें कळलें । त्या कळण्या जेणें प्रकाशिलें । तेंचि वास्तव आत्मत्व पहिलें । जाण संचलें अपरोक्ष ॥ ३६ ॥ केवळ अज्ञान कारण देह । महाकारण तो ज्ञानमय । मूर्ध्निस्थान अवस्था तुरीय । प्रत्यगात्मा अभिमानी ॥ ३७ ॥ आनंदावभासभोग । अथर्वणवेद परा वाग । शुद्धसत्वसगुण हा चांग । ध्वनी अभंग अर्धमात्रा ॥ ३८ ॥ प्रणवाचा चतुर्थचरण । साक्षित्वाचें अधिष्ठान । साक्षित्वाच्या उपरमें जाण । केवळ उन्मन चिन्मात्र ॥३९॥ तो तूं चिन्मात्र वास्तवरूप । नव्हसी प्रपंच असदारोप । ऐसें प्रबोधी जो संकल्प । भवभ्रम विकल्प निरसूनी ॥४४०॥ करून वास्तवस्वरूपनिष्ठ । जन्ममरणाचे हरी जो कष्ट । तीर्हींमाजि तो वरिष्ठ । सद्गुरु स्पष्ट मीचि स्वयें ॥ ४१ ॥ जहदजहल्लक्षणाबोधें । वायांशवलांशाचिया रोधें । लक्ष्यशुद्धांश अभेदें । होइजेनु सुधें अमृतत्व ॥ ४२ ॥ अमृतत्व होणें याकारणें । राजयोग या मार्गा म्हणणें । येणें न होता परमकठिणें । दुर्घट साधनें हटादिकें ॥ ४३ ॥ याहूनि परम सुगममार्ग । जो कां सप्रेम भक्तियोग । वाक्यविश्वास जेथें अभंग । सेवूनि सांग अवंचकत्वें ॥ ४४ ॥ शौक्र सावित्र आणि दैक्ष । गुरुत्वाचे हे त्रिविधपक्ष । पिता आणि कर्माध्यक्ष । त्याहूनि अपरोक्षप्रद श्रेष्ठ ॥ ४५ ॥ ऐसा जाणोनि दृढनिर्धारु । ज्ञानदायक जो मी गुरु । त्या मज भजूनि भवसागरु । तरती ते नर धीमंत ॥ ४६ ॥

नन्वर्थकोविदा ब्रह्मन् वर्णाश्रमवतामिह । ये मया गुरुणा वाचा तरंत्यंजो भवार्णवम् ॥ ३२ ॥

श्रीकृष्ण म्हणे भो ब्राह्मणा । वर्णाश्रम धर्माचरणा । करिती त्यामाजी श्रेष्ठ ते जाणा । जे

गुरुचरणां अनुमरले ॥ ४७ ॥ मनुष्ययोनीमाजि येथ । त्यांतही आश्रमधर्मवंत । असोनि जेहीं सद्गुरुनाथ । मी संतत सेऊनियां ॥ ४८ ॥ माझिया गुरुवचन निर्धारें । अतद्व्यावृत्ति उपदेशमात्रें । सुखें निस्तरूनि भवजलमारें । तमसःपार पावती ॥ ४९ ॥ ज्ञानोपदेष्टा गुरु तो श्रेष्ट । जन्मकर्मप्रद कनिष्ठ । ऐसें विवरूनि एकनिष्ठ । दास्यीं दृढिष्ट ते धन्य ॥ ४५० ॥ वेदवेदार्थीं अतिप्रवीण । त्याचेंचि जन्म परम धन्य । त्याचेंचि सकळ कर्माचरण । जिहीं सद्गुरुचरण दृढ धरिले ॥ ५१ ॥ मूत्रद्वारें जन्मविते । लक्षचौऱ्यायशीमाजि पिते । किती जाले असती त्यांतें । असे कोणांते गुरुत्व पैं ॥ ५२ ॥ वर्णाश्रम-कर्मनिष्ठे । मंत्रयंत्राचे उपदेष्टे । इहामुष्मिक फळें मिष्टें । बोधूनि कष्टें श्रमविती जे ॥ ५३ ॥ याहूनि तृतीय गुरु जो कां । अध्यात्मबोधें कैवल्यसुखा । बोधूनि निरसी अशेषदुःखा । तो निजसखा जे भजती ॥ ५४ ॥ जो भवसागरींचें तारूं । भ्रांतालागीं कल्पतरू । शरणागता वज्रपंजरू । ऐसा उपकार जयाचा ॥ ५५ ॥ तयाहूनि ब्रह्मांडमठीं । दुसरा श्रेष्ठ न दिसे दृष्टी । यालागीं ज्याचिये पादपीठीं । सुरवरकोटी नत होती ॥ ५६ ॥ यास्तव सद्गुरुभजनाहून । श्रेष्ठ धर्म नाहींच आन । परिहारेंसी श्रीभगवान । बोले वचन तें ऐका ॥ ५७ ॥

नाहमिज्याप्रजातिभ्यां तपसोपशमेन वा । तुष्येयं सर्वभूतात्मा गुरुशुश्रूषया यथा ॥ ३४ ॥

प्रजाति म्हणिजे प्रकृष्ट जन्म । उपनयनपूर्वक व्रतस्थ धर्म । वेदाध्ययनीं परिश्रम । परमानियम करणजय ॥ ५८ ॥ ब्रह्मचर्याश्रमीं जितुके । धर्म बोलिले आचरे तितुके । तेणें जगदात्मा मी न तोखें । जैसा तोषें गुरुदास्यें ॥ ५९ ॥ करू पुराणगाथापठण । करू कां सर्व शास्त्राध्ययन । निगम-पारंगत हो कां पूर्ण । परि तें गौण अवघेंचि ॥ ४६० ॥ दमो कां इन्द्रियकडकडाडें । करो कां व्रतें अतिदुर्घटें । शीतोष्णादि सहननिष्ठें । साहो संकटें तपाचीं ॥ ६१ ॥ फल दल मूल जलाशनें । पवनाशनें कीं अनशनें । मारुतजयें जपध्यानें । गुरुदास्य तुळन न पाविजे ॥ ६२ ॥ अथवा गृहस्थ-धर्माचरण । राजसूयांत यज्ञेंकरून । सांग आह्निक विधिविधान । गुरु सेवनासम न तुळे ॥ ६३ ॥ हो कां याहूनि वानप्रस्थ । अतिजारठ्यें तनु अस्वस्थ । तेथ ही बुद्धि करूनि स्वस्थ । आचरो प्रशस्त तपश्चर्या ॥ ६४ ॥ वात पर्जन्य शीतातप । साहूनि दुःसह करू कां तप । पहुडो स्त्री घेऊनि समीप । काम संकल्प नुदेजतां ॥ ६५ ॥ परि ते सद्गुरुदास्यतुळणे । न तुळे ऐसें श्रीकृष्ण म्हणे । कीं हें दुःसह तनु शोषणे । गुरुशुश्रूषणें सम नव्हती ॥ ६६ ॥ याहूनि वरिष्ठ चतुर्थाश्रम । स्नानसंध्यादि चौगुणे श्रम । भिक्षाशनी वृक्षधाम । सदा अध्यात्म विवरी जो ॥ ६७ ॥ संकल्पाची पूर्णाहुती । करूनि वरिली पूर्णस्थिती । पावले निर्वाणवृत्ति । तोहि न तुळती गुरूभजनीं ॥ ६८ ॥ इत्यादि आश्रमधर्मसाधनी । भ्रंश पावती कर्माभिमानी । सद्गुरुसेवन साधना मूर्धि । निराभिमानी वर मिरवे ॥ ६९ ॥ सर्वभूतात्मा मी जो गुरू । तोषें गुरूसेवनीं अतितरू । वदों जातां सविस्तरू । न पवे पार सेवेचा ॥ ४७० ॥ गुरूदास्याची मज आवडी । गुरुभक्तांचे चरण झाडीं । गुरुसेवकांमदनीं प्रौढी । घेउनि

कावडी जल वाहें ॥ ७१ ॥ गुरुभक्त जेव्हां मागें जाती । त्या मी अनुयायी मागाती । त्याचे पदींची उधळे माती । पावन त्रिजगतीं धरीं माथां ॥ ७२ ॥ गुरुभक्ताचे सवाद्य भागीं । सर्वदां वोळंगें मी सर्वांगीं । गुरुभक्ताच्या दास्यालागीं । माझें त्रिजगीं अवतरणें ॥ ७३ ॥ एकुलतें पोटींचें बाळ । माता करी तत्सांभाळ । चिळसदायक अमंगळ । न म्हणूनि निर्मळ करी स्वयें ॥ ७४ ॥ थुंका श्लेष्मा वांति लाळ । सर्वदा चिवडी मूत्रमळ । कुत्सित सर्वांगीं वोघळ । परि अळुमाळ न विसंवे ॥ ७५ ॥ आपुला जीव त्यातळीं वरी । आथरूनियां रक्षण करी । न्यूनपूर्ण सर्वांपरी । त्याचे शरीरीं संपादी ॥ ७६ ॥ कीं तें निमगें अनन्यशरण । माउलीवीण न स्मरे आन । व्याघ्र सर्पअग्नि जीवन । माता म्हणूनि कवळीतसे ॥ ७७ ॥ देखे ते ते माता मानी । मातेवीण न स्मरे वाणी । मातृप्रेमें अंतःकरणीं । अनन्य-शिराणी परस्परें ॥ ७८ ॥ तैसा सर्वात्मा मी हरी । सद्गुरुनौका भवसागरीं । जाणोनि अनन्य शुश्रूषा करी । बाळकांपरी मज प्रिय तो ॥ ७९ ॥ त्याचिये नीच सेवनीं न लजें । समाविषमाचें न मनीं वोझें । विहिताविहित शुभाशुभ जें जें । तें मी सहजें संपादीं ॥ ४८० ॥ गुरूसेवनें जो मज भजला । लक्ष्मी-हून तो जिवलग मजला । तेणें सर्वात्मा मी त्यजिला । जेणें त्यजिला भाव दुजा ॥ ८१ ॥ जरी तूं म्हणसी द्विजोत्तमा । पितरांहूनिया जिवलग रमा । तरि मी सर्वगत सर्वात्मा । जन्मकर्माविरहित पैं ॥ ८२ ॥ मी भक्ताचे जठरीं जन्में । मी भक्ताचीं आंगवी कर्में । मी भक्ताचीं मिरवीं नामें । गुरु-भक्तप्रेम नाचतमें ॥ ८३ ॥ गुरुभक्ताचा जो कां द्वेषी । त्याचा वैरी मी हृषीकेशी । सर्वदा वैरचाली त्यासीं । दुःखराशी त्या वोपीं ॥ ८४ ॥ गुरुभक्तातें जो सन्मानी । मी तयातें प्रियतम मानीं । मुगुटीं तुरंबीं सुमनाहूनि । भूषण करूनि सप्रेमें ॥ ८५ ॥ गुरुशुश्रूषेकरूनि जैसा । मी पावतसें पूर्णसंतोषा । व्रतें यजनें प्रशमें तपसा । आल्हाद तैसा मी न पवें ॥ ८६ ॥ प्रेमोत्कर्षें द्विजाप्रति । ऐसें बोलूनियां श्रीपती । गुरुसदनींची शुश्रूषा निगुति । स्मरवी चित्तीं पुसूनियां ॥ ८७ ॥ म्हणे आम्हांस कांहीं दिवस । दैवानुसार घडलें दास्य । तें आठवतें कीं तुम्हास । ऐसा द्विजास प्रश्न करी ॥ ८८ ॥ चिरकाळवरि दास्य केलें । प्रेमें अल्पचि तें मानिलें । त्यामाजि येके दिवशीचें स्मरिलें । गुरुबंधुत्वें तें ऐका ॥ ८९ ॥

अपि नः स्मर्यते ब्रह्मन् वृत्तं निवसतां गुरौ । गुरुदारैश्चोदितानामिन्धनानयने क्वचित् ॥ ३५ ॥

गुरुबंधुत्व सप्रेम गोष्टी । करितां गुरुदास्य कथिलें ओष्ठीं । येरहवीं उच्चारितां वाक्पुटीं । निर्वीर्य होय कृतविद्या ॥ ४९० ॥ परस्परें गुरुसेवन । केलें तैंचें पूर्वस्मरण । गुरुगृहीं करितां शुश्रूषण । किंचिद्भगवान तें स्मरवी ॥ ९१ ॥ श्रीकृष्ण म्हणे भो ब्राह्मणा । तुम्हां आम्हां गुरुसेवना । करूनि वसवितां गुरुच्या सदना । कृताचरणा न स्मरसी ॥ ९२ ॥ तें तुज आठवतें कीं नाहीं । तुम्हां आम्हां गुरूचे गेहीं । परिचर्यार्थ वसतां पाहीं । जें स्वदेहीं अनुष्ठिलें ॥ ९३ ॥ अपूर्व कोण्हे एके दिवशीं । गुरुपत्नीनें तुम्हां आम्हासी । प्रेरिलें इंधन आणावयासी । तें न स्मरसी कधीं तन्हीं ॥ ९४ ॥ इंधन आणणें काय कठिण । परंतु अघटित घडला क्षण । त्याचें स्वमुखें श्रीभगवान । करी व्याख्यान तें ऐका ॥ ९५ ॥

प्रविष्टानां महारण्यमपर्त्तौ सुमहद्द्विज । वातवर्षमभूत्तीव्रं निष्ठुरां: स्तनयित्नव: ॥ ३६ ॥

गुरुदास्य न घडे जिये ठायीं । तेथ शिष्यासी साफल्य नाहीं । यालागि कुटुंबीं श्रोत्रिय पाहीं । गुरुत्वविषयीं श्रुति कथिती ॥ ९६ ॥ कुटुंबवत्सल श्रोत्रियश्रेष्ठ । विरक्त विद्वांस ब्रह्मनिष्ठ । ऐसियाचें दास्य यथेष्ट । करितां अभीष्ट फळ देतें ॥ ९७ ॥ यावज्जन्म सेविला गुरु । सेवाविषयीं शिष्य कातरु । भूमी तयाचा मानी भारु । भवसागरु दुस्तर त्या ॥ ९८ ॥ प्रतिष्ठा भोगूनि गुरुसन्निधि । बैसे संवादी संसदीं । दास्यविषयीं वंचकबुद्धि । तो दुर्बुद्धि कुटिळात्मा ॥ ९९ ॥ प्रज्ञाबळें शिकला ज्ञान । परि तें निर्वीर्य अवघें जाण । अंतीं पावे अधःपतन । सेवेवांचून फळ न पवे ॥ ५०० ॥ सदय सद्गुरु येकांतवासी । सेवा नसंगेचि शिष्यासी । परंतु लागे कुटुंबासी । शिष्यें तेंवि अनुसरिजे ॥ १ ॥ गुरुपत्नी कां दासदासी । नियोजिती नीचसेवेसी । अवंचकभावें तियेविषीं । शिष्यें दिननिशीं प्रवर्तिजे ॥ २ ॥ गुरुपोष्याची आज्ञा शिरसा । धरूनि सेवनीं कीजे घिवसा । सद्गुरु सामर्थ्यदानी ऐसा । निश्चय मानसामाजि कीजे ॥ ३ ॥ असो आम्ही तिये काळीं । गुरुपत्नीची आज्ञा मौळी । वंदूनि रिघालों विंध्याचळीं । महाअरण्यामाजिवडे ॥ ४ ॥ महारण्य परम घोर । तेथ निघालों इंधनपर । शुष्ककाष्ठें अतिकठोर । ग्रथिले भार पृथगत्वें ॥ ५ ॥ गुरुगृहीच्या श्रवणस्वार्थें । हांव भरूनि काष्ठें बहुतें । भारे बांधूनि मस्तकावरुते । घेतां अघटित वर्तलें ॥ ६ ॥ वर्षाऋतु संपूर्ण गेला । शरत्काळही अतिक्रमला । हेमंतकाळींचा वृत्तांत कथिला । सखया तुज स्मरतो कीं ॥ ७ ॥ भारे घेऊनि मस्तकावरी । आम्हां निघतां वनाबाहेरी । आकाशमेघ मुसळाधारी । प्रळयापरी वर्षला ॥ ८ ॥ पूर्वेकडून मेहुडी चढती । त्यामाजी विजाही कडकडती । उत्तरेची मारुतगती । झडझडाटी प्रवर्तली ॥ ९ ॥ थेंबटे पडती अतिठोसर । जळमय जालें सर्वांवर । मेघ गर्जती क्रूर कठोर । दचके अंतर चकवोनी ॥५१०॥ वर्षवातापासूनि रक्षी । ऐशी निबिडता नलभे वृक्षीं । अंधकार पडला चक्षी । गेले पक्षी नीडाश्रया ॥११॥

सूर्यश्चास्तगतस्तत्र तमसा चावृता दिश: । निम्नं कूलं जलमयं न प्राज्ञायत किञ्चन ॥ ३७ ॥

घनाच्छादित न भसे नभ । अस्त पावला चंडप्रभ । तमिस्रेचा तिमिरक्षोभ । वलय काकुभ आवरिलें ॥ १२ ॥ करिकरनिकराकार धारा । पडतां नीरें भरली धरा । जळें आच्छादिलें तरुवरा । प्रवाह पुढारा नावगमे ॥ १३ ॥ गमे मांडिला प्रळयकाळ । एकार्णवासारिखें जळ । न लक्षे तटाक पुलिन कूळ । निम्न उथळ न कळेचि ॥ १४ ॥ गुल्फ पोटऱ्या गुडघे कटी । नाभी हृदय कां हनुवटी । भग्न होतां जळसंकटीं । न सुचे गोठी निर्गमनीं ॥ १५ ॥

वयं भृशं तत्र महानिलाम्बुभिर्निहन्यमाना मुहुरम्बुसम्प्लवे ।
दिशोऽविदन्तोऽथ परस्परं वने गृहीतहस्ता: परिबभ्रिमातुरा: ॥ ३८ ॥

हेमंतींचा वात झटके । त्यामाजि जळोपळांचे सटके । विद्युल्लतांचे प्रचंड कडके । लोटती भडके सलिलाचे ॥ १६ ॥ जळें लोपली समग्र मही । मागें पुढें न दिसे कांहीं । आम्ही अत्यंत दुःखित पाहीं । तिये ठायीं जलवातें ॥ १७ ॥ प्रळयकाळींचा एकार्णव । तत्तुल्य गमला आम्हां तो ठाव । शीतें सकंप शरीर सर्व । निमग्न अवयव जळगर्भीं ॥ १८ ॥ थरथरां कांपती शरीरें । खटखटा वाजती दातारें । शिरीं प्रचंड भिजले भारे । दिशा न स्मरे कोणीकडे ॥ १९ ॥ परस्परें हात धरणी । एकमेकांतें सावरूनी । चाही प्रहर साहिलें पाणी । भारे घेऊनि जळप्रळयीं ॥५२०॥ परस्परें धरूनि हस्त । जळ-प्रळयातुर तनु अस्वस्थ । गुरुस्मरणें मन करूनि स्वस्थ । जालों समर्थ तत्सहनीं ॥ २१ ॥ चाऱ्ही प्रहर अकाळजळीं । तैसेचि भारे धरूनि मौळीं । निवान्त राहिलों तिये स्थळीं । गुरु ते काळीं कळवळिला ॥२२॥

एतद्विदित्वा उदिते रवौ सान्दीपिनिर्गुरुः । अन्वेषमाणो नः शिष्यानाचार्योऽपश्यदातुरान् ॥ ३९ ॥

सदना न येतां देखोनि आम्हां । करुणा आली ब्राह्मणोत्तमा । म्हणे पावलीं लेकुरें श्रमा । अति दुर्गमा वरपडलीं ॥ २३ ॥ आमुची अवस्था जाणोनि मनीं । उदय पावलिया दिनमणी । कृपाब्धि गुरुवर संदीपिनी । अन्वेषणीं प्रवर्तला ॥२४॥ आमुची अवस्था जाकळी मना । सदय आचार्यांचा राणा । आम्हा शिष्यांची गवेषणा । करित अरण्याप्रति आला ॥ २५ ॥ देखोनि आम्हांतें सक्लेश । जालें द्रवभूत मानस । कृपेनें कळवळूनि विशेष । वदला अशेष तें ऐका ॥ २६ ॥

अहो हे पुत्रका यूयमस्मदर्थेऽतिदुःखितः । आत्मा वै प्राणिनां प्रेष्ठस्तमनादृत्य मत्पराः ॥ ४० ॥

अहो ऐसिया खेदेंकरून । म्हणे पुत्रहो तुम्ही धन्य । मदर्थ करूनि देहार्पण । दुःख दारुण पावलां ॥ २७ ॥ आत्मा प्रियतम प्राणिमात्रा । कोण्ही नुबगे आत्मगात्रा । तो देह समान यवसपात्रा । करूनि मत्पर जालेती ॥ २८ ॥ आजिचे क्लेश भोगिले तुम्हीं । त्याहूनि सक्लेश जालों पैं मी । सच्छिष्य वसती जे मम सद्मीं । तिहीं या नियमीं वर्तावें ॥ २९ ॥

एतदेव हि सच्छिष्यैः कर्तव्यं गुरुनिष्कृतम् । यद्वै विशुद्धभावेन सर्वार्थात्मार्पणं गुरौ ॥ ४१ ॥

नियमाचरण म्हणाल कैसे । तरी इतुकेंचि जाणावें विश्वासें । गुरुप्रत्युपकरणमिसें । तनुवाङ्मानसें विनटावें ॥ ५३० ॥ कायावाचा मनें द्रविणें । पदार्थमात्रें उपचारभरणें । सद्गुरूसी शरण जाणें । इतुकेंचि करणें आवश्यक ॥ ३१ ॥ सच्छिष्यांहीं ऐसियापरी । सद्गुरूप्रति प्रत्युपकारीं । तनुवाङ्मनें सर्वोपचारीं । अवंचक प्रकारें भजिजे पैं ॥ ३२ ॥ परम विशुद्ध भावेंकरून । सर्वार्थ साधती ज्यापासून । तो देह सद्गुरूसी समर्पून । भजिजे अनन्य सद्भावें ॥ ३३ ॥ इतुकेनि गुरुभजनाची सिद्धी । सिद्धी गेलीचि हें त्रिशुद्धी । जाणिजे सच्छिष्यीं प्रबुद्धीं । वृथा उपाधी यावीण त्या ॥ ३४ ॥ न लगती पहावे अनाध्याय । न लगे शिक्षा सांप्रदाय । अवंचकभावें भजतां हृदय । वसविती आम्नाय गुरुवरें ॥ ३५ ॥

श्रुतिस्मृतिमय मंत्रमाळा । चौदा विद्या चौसष्टी कळा । गुरुप्रसादें हृदयकमळा । येती अमळा शिष्याचिया ॥ ३६ ॥ ऐसा देऊनि नाभीकार । आश्वासूनि निजानुचर । मुखावरूनि उतरूनि कर । आणिलें सत्वर सदनासी ॥ ३७ ॥ कृपापल्लवें परिमार्जिलें अमृतदृष्टी अवलोकिलें । क्लेशकर्दमा प्रक्षाळिलें । मग जे बोलिलें तें ऐका ॥ ३८ ॥

तुष्टोऽहं भो द्विज श्रेष्ठाः सत्याः सन्तु मनोरथाः । छन्दास्ययातयामानि भवंत्विह परत्र च ॥ ४२ ॥

म्हणे भो भो द्विजोत्तम हो । तुमचा मनोरथ पूर्णता लाहो । देखोनि अगाध अवंचक भावो । तुटलों पहा हो मी तुम्हां ॥ ३९ ॥ अवंचकभावें परिचर्येतें । तुम्हीं संतुष्ट केलें मातें । साफल्य तुमच्या मनोरथातें । सत्यत्व लाहो मम वरें ॥५४०॥ माझिया आशीर्वादें करून । तुमचे मनोरथ येथून पूर्ण । सत्यसाचार मद्वरदान । ब्रह्मा लंघन करूं न शके ॥ ४१ ॥ एक तोषलिया सद्गुरु । तोष पावती विधिहर शक्र । किंबहुना हें चराचर । गुरुवरतोषें संतोषे ॥ ४२ ॥ मुनिसुर सद्गुरूचे अवयव । प्रणव सद्गुरूचा वक्त्रप्रभव । सद्गुरुवाक्याचे समुदाव । ते आम्नाय जाणावे ॥ ४३ ॥ सकळ तीर्थांचिया श्रेणी । वसती सद्गुरूच्या चरणीं । स्वयें तेथिंच्या पवित्रपणीं । जगदघहरणीं पटु होती ॥ ४४ ॥ तस्मात तोषवितां देशिका । तोष होय विश्वात्मका । तुमचिया निष्ठा अवंचका । देखोनि संतोख पावलों ॥ ४५ ॥ येथूनि तुमचे मनोरथ । मद्वरदानें सत्य होत । इतुकें बोलूनि सद्गुरुनाथ । वर बोपीत कृपेनें ॥ ४६ ॥ वाजसनेयादि कण्वपाठितें । छंदें अयातयाम समस्तें । तैत्तिरीयादिशाखाधीतें । यातयामें मुनि म्हणती ॥ ४७ ॥ कण्वशाखीं जाणोनि कुमरां । अयातयामा छंदोनिकरा । कृपेनें स्पर्शूनि आमुच्या शिरा । बोपिली गिरा गर्जूनी ॥ ४८ ॥ अयातयामें मद्वरदानें । छंदें प्रकटती तुमच्या वदनें । इहामुत्र साफल्य तेणें । आशीर्वचनें पैं माझ्या ॥ ४९ ॥ अयातयामाची व्युत्पत्ती । परिसा व्याकरणसंमती । शिजलीं अन्नें प्रहराअंतीं । निःसार होती विरसत्वें ॥५५०॥ धगधगीत उष्ण वाफा । निघती अन्नांतूनि घपघपां । कव्ययज्ञीं तें उष्मपां । पितरां प्रियतम सरसत्वें ॥ ५१ ॥ यातयाम जें विगतसार । हव्यकव्यीं निर्जर पितर । न सेविती नीरसतर । ऐसें साचार श्रुतिगदित ॥५२॥ यातयामान्न विगतसार । तैसे निःसार पदार्थमात्र । यातयाम हा नामोच्चार । वदती कविवर गौणत्वें ॥ ५३ ॥ तस्मात् अयातयाम छंदें । संसारवीर्योत्तरें जीं विशदें । प्रसन्न होऊनि परमानंदें । देशिकें वरदें प्रबोधिलीं ॥ ५४ ॥ तियें तत्काळ हृदयकमळीं । प्रकटलीं जैसा अंशुमाळी । स्वप्रकाशें नभोमंडळीं । त्रिजग उजळी उगवूनी ॥ ५५ ॥ तैसे निगमागम अवग्र । हृदयीं प्रकाशले समग्र । ऐसा अनुग्रहचमत्कार । द्विजोत्तमा तुज स्मरतो कीं ॥ ५६ ॥

इत्थंविधान्यनेकानि वसतां गुरुवेश्मसु । गुरोरनुग्रहेणैव पुमान्पूर्णः प्रशान्तये ॥ ४३ ॥

एके दिवशींची किंचित्सेवा । ते मात्र स्मरली म्यां भूदेवा । ऐसा शुश्रूषानिकर अघवा । प्रकट न

करावा निजवदनें ॥ ५७ ॥ याचिऐशीं बहुविध कर्में । अघटितघटितें अतिदुर्गमें । गुरुमंदिरीं वसतां प्रेमें । तियें तुज नियमें स्मरती कीं ॥ ५८ ॥ मानसपूजा हे अनुदिनीं । नित्यनेमें आमुचे मनीं । ध्यानस्थें बैसोनि एकासनीं । करूं गुरुमदनीं परिचर्या ॥ ५९ ॥ अल्प कांहीं घडली पूर्वीं । तितुकी सप्रेम स्मरूनि जीवीं । आह्निकाचारें ते आघवी । मनोमय बरवी करूं सदा ॥ ५६० ॥ यास्तव विसर न पडे आम्हां । माजि अवगमे नित्य नेमा । म्हणोनि प्रश्न तुज द्विजोत्तमा । स्मरसी कीं ना हा केला ॥ ६१ ॥ गुरुशुश्रूषा सप्रेमभजनीं । गुरुसंतोष संपादूनी । प्रसन्न केलिया कैवल्यदानीं । सर्व साधनीं साफल्य ॥ ६२ ॥ गुरूच्या पूर्ण अनुग्रहें करून । चारी पुरुषार्थ साधती जाण । पुरुषासी प्रशमाचें कारण । गुरुशुश्रूषण मुख्यत्वें ॥ ६३ ॥ गुरुशुश्रूषेवीण इतरें । साधनें नव्हती वीर्योत्तरें । हें वर्म जाणोनियां चतुरें । गुरुपरिचर्ये विनटावें ॥ ६४ ॥ ऐसें पूर्वीं गुरुसेवन । घडलें तुम्हां आम्हां लागून । पूर्णकृपेनें ब्रह्मनिर्वाण । उभयां समान प्रबोधिलें ॥ ६५ ॥ अद्यापि कायसा श्रवश्रम । तुम्ही केवळ पूर्णकाम । तुम्हां आम्हां भेद विषम । सहसा अणुमात्र असेना ॥ ६६ ॥ ऐशी भगवन्मुखींची वाणी । ब्राह्मणें परिसोनियां श्रवणीं । म्हणे सहाध्यायी चक्रपाणी । कवण्या पुण्यें मज आतां ॥ ६७ ॥

॥ ब्राह्मण उवाच ॥ किमस्माभिरनिर्वृत्तं देवदेव जगद्गुरो । भवता सत्यकामेन येषां वासो गुरावभूत् ॥४४॥

ब्राह्मण म्हणे भो शेषशायी । मज हें गुरुदास्य घडलें नाहीं । जगद्गुरु तूं सर्वां देहीं । जाणसी सर्वही हृदयस्थ ॥ ६८ ॥ सकळदेवांसी तूं भजनीय । देवदेवोत्तम आर्या आर्य । तुझेनि सहवासें गुरुदास्यकार्य । घडलें कीं ना मी नेणें ॥६९॥ सत्यसंकल्प सत्यकाम । पूर्णचैतन्य कैवल्यधाम । तुझेनि समागमें गुर्वाश्रम । आम्हीं सप्रेम वसाविला ॥५७०॥ तेव्हां काय न घडलें आम्हां । सर्वही घडलें पुरुषोत्तमा । तुझिया सहवासाचा महिमा । नेणे ब्रह्मा शिव शक्र ॥ ७१ ॥ ज्या आम्हांसि गुरूच्या सदनीं । समागम तुझा चक्रपाणि । कोण्या पुण्यें जाला म्हणोनी । हृदयभुवनीं विस्मित मी ॥ ७२ ॥ आम्हांसि घडला तव संगम । हाचि गुरूचा अनुग्रह परम । तूं प्रत्यक्ष कैवल्यधाम । कल्पद्रुम प्रणतांचा ॥ ७३ ॥ गुरुपरिचर्या आचरून । कृपेनें शिक्षित केले जन । सत्प्रवृत्तिप्रतिपादन । भवनिस्तरणें प्रबोधिलें ॥ ७४ ॥ येव्हवीं तुझें जें वास्तव । पाहतां स्वरूप सावयव । मर्त्यनाट्याचें लाघव । तेंचि हें सर्व अवधारीं ॥७५॥

यस्य च्छंदोमयं ब्रह्म देह आवपनं विभो । श्रेयसां तस्य गुरुषु वासोऽत्यंतविडंबनम् ॥ ४५ ॥

छंदोमय जें वेदाख्य ब्रह्म । श्रेयस्कराचा जेथूनि जन्म । तें ज्या तुझें मूर्त्त वर्म । हें जाणती वर्म विपश्चित ॥ ७६ ॥ त्या तुज निगमाध्ययनासाठीं । वसनि शिष्यत्वें गुरुच्या मठीं । करणें परिचर्याराहटी । हे तव गोठी अवगणीची ॥ ७७ ॥ मनुष्यनाट्या संपादणी । तुझी अवघी हे चक्रपाणी । गुरुपरिचर्याविडंबनीं । भवनिस्तरणीं कृतनौका ॥ ७८ ॥ ऐसा ब्राह्मण ते अवसरीं । श्रीकृष्णातें मधुरोत्तरीं । वदला तेणें अभ्यंतरीं । परमानंद हरि मानी ॥ ७९ ॥ कृष्ण तोषूनि आपुले जीवीं । म्हणे हा

ब्राह्मण पूर्णानुभवी । सहसा न गुते भववैभवीं । भेटला केवीं दैववळें ॥५८०॥ याचें दर्शन श्रेयस्कर । आम्हां घडला लाभ थोर । ऐसें हृत्कमळीं श्रीधर । मानूनि सादर त्या पुसलें ॥ ८१ ॥ पुढिले अध्यायीं ते कथा । परीक्षितीतें श्रीशुक वक्ता । निरूपील ते सावध श्रोतां । एकाग्रता परिसावी ॥ ८२ ॥ तें हें श्रीमद्भागवत । अठरासहस्रश्लोकपरिमित । परमहंस रमती जेथ । शुकपरीक्षितिसंवाद ॥ ८३ ॥ तो हा अशीतितमाध्याय । गुरुपरिचर्या यादवराय । भेटतां स्वाध्यायी द्विजवर्य । पुसता जाला ते कथिली ॥ ८४ ॥ या वरी एकाशीतितम । अध्याय उपायिला उत्तम । अपूर्व निर्मूनि हेमधाम । वोपी विश्राम पतिव्रते ॥ ८५ ॥ सद्गुरुपरिचर्येच्या श्रेणी । जो आचरला प्रेमेंकरूनी । तो प्रत्यक्ष प्रतिष्ठानीं । अवतरूनि विराजला ॥ ८६ ॥ गुरुसेवेची हृदयीं गोडी । म्हणोनि श्रीकृष्णा अतिआवडी । खांदा वाहूनि कावडी । वाहे परवडी जल सदनीं ॥ ८७ ॥ परिचर्येतें अतंद्रित । उगाळूनि श्रीखंड बहुत । अर्पी म्हणोनि नामसंकेत । कृष्ण श्रीखंड्या जन वदनीं ॥ ८८ ॥ चिदानंदें सर्वकाळीं । स्वानंदभरित नामावळी । गोविन्द जपतां हृदयकमळीं । होय होळी कलिमळाची ॥ ८९ ॥ गोविन्दाचे स्मरतां पाय । दयार्णव परिपूर्णता लाहे । हरिवरदाचा वक्ता होय । हे निजसोय गुरुभजनीं ॥५९०॥ गौतमीच्या दक्षिणतटीं । वसतां पिपीलिके माजि स्वमठीं । कृष्णद्विजाच्या मिथा गोठी । कथिली राहाटी गुरुगृहींची ॥ ५९१ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यांसंहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां भगवद्ब्राह्मणसंवादे गुरुपरिचर्यानुस्मरणं नामाशीतितमोऽध्यायः ॥ ८० ॥

कालयुक्ताक्षिके भाद्रे द्वितीया वद्य भास्करे । द्विजाधोक्षजसंवादनामाध्यायः समापितः ॥ १ ॥

॥ श्लोक ४५ ॥ ओव्या ५९१ ॥ एवं संख्या ६३७ ॥
एकोणऐशीवा अध्याय मिळून ओवी संख्या ३६,२०६

ऐशींवा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ८१ वा

श्रीगणेशाय नमः । अपार अनंत अक्षय्य सुख । सन्मात्र स्वप्रकाश सम्यक । तो तूं पूर्णत्वें देशिक । भवाब्धितारक गोविंदा ॥ १ ॥ तवपदप्रणतिप्रसादप्रज्ञा । लाहोनि शिरसा वंदिली आज्ञा । भागवतदशमस्कंधव्याख्याना । अशीतिपर्यंत उपलविलें ॥ २ ॥ तेथ अशीतितमाध्यायान्तीं । ब्राह्मणें संवादी श्रीपती । मायानाट्यलाघव व्यक्ती । आणूनि मधुरोक्ति तोषविला ॥ ३ ॥ एकाशीतितमाध्यायीं । द्विजोपायन शेषशायी । पृथुक भक्षूनि लोकत्रयीं । दुर्लभ श्री दे निर्मूनी ॥ ४ ॥ तेचि आतां नृपाप्रति । निरूपील जे शुकभारती । सावध सप्रेमळीं श्रोतीं । एकाग्रवृत्ती परिसावी ॥ ५ ॥

श्रीशुक उवाच ॥ स इत्थं द्विजमुख्येन सह सकथयन्हरिः । सर्वभूतमनोऽभिज्ञः स्मयमान उवाच तम् ॥ १ ॥

द्विजांमाजी जो कां मुख्य । तेणेंसीं सह यदुनायक । या प्रकारें तो सम्यक । वदत होत्साता ते काळीं ॥ ६ ॥ लोकत्रयाचा आर्तिहरण । यालागिं हरि ऐसें अभिधान । सर्व भूतांचें जाणे मन । ब्राह्मणालागून तो बोले ॥ ७ ॥ करितां गुरुगृहींच्या सुखगोष्टी । विप्रमनोगत अंतर्दृष्टी । लक्षूनि वदला जें वाक्पुटीं । श्रवणपुटीं तें ऐका ॥ ८ ॥ मजकारणें सदनींहून । मज्जामयेतें संप्रार्थून । पृथुक आणिले उपायन । ते लज्जेकरून द्विज नार्पी ॥ ९ ॥ जामया सुशीळा साध्वी सती । मदर्थ पृथुक याचून निगुती । भातुकें धाडिलें मज या हातीं । तें द्यावया चित्तीं सलज्ज हा ॥ १० ॥ उद्दाम ऐश्वर्य देखूनि दृष्टी । परम सलज्ज द्विज हा पोटीं । विश्वश्रीमंता जगजेठी । पृथुकमुष्टी कोंवि दीजे ॥ ११ ॥ ऐसा विस्मय मानूनि मनीं । स्वयें सर्वज्ञ चक्रपाणी । ब्राह्मणातें बोले वदनीं । सादर श्रवणीं तें ऐका ॥ १२ ॥

ब्रह्मण्यो ब्राह्मणं कृष्णो भगवान्प्रहसन्प्रियम् । प्रेम्णा निरीक्षणेनैव प्रेक्षन्खलु सतां गतिः ॥ २ ॥

ब्रह्म ऐसें वेदा नाम । प्रणवापासूनि त्रिधा जन्म । वेदत्रयी म्हणतां निगम । अभेद पर एकात्मा ॥ १३ ॥ प्रणवोच्चारें मंत्रमात्र । तत्कारें द्विजरक्षणपात्र । सांग सत्कारें अध्वर । एवं समग्र निगमात्मा ॥ १४ ॥ मंत्रमूर्ती संप्रवृत्ति । त्रिधा अभेद आम्नायव्यक्ति । तेथें साकल्यें निगमशक्ति । जाणे श्रीपति रहस्य हें ॥ १५ ॥ सृष्टिस्थितिलयकर्मबीज । मूर्तिमंत ऐसे द्विज । हें वर्म जाणोनि गरुडध्वज । मानी पूज्य यास्तव त्या ॥ १६ ॥ ब्राह्मणाच्या आशीर्वचनें । प्रतिपाळी जो चतुर्दश भुवनें । हृदयीं लत्ताप्रहारसहनें । भूषण मिरवी श्लाघ्यत्वें ॥ १७ ॥ मंत्र म्हणिजे अक्षरपंक्ती । ब्राह्मणवदनें व्यक्त होती । इतर वर्णां नाहीं शक्ती । वेदाध्ययन करावया ॥ १८ ॥ ब्राह्मणापासूनि बाहुजांहीं । वेदाध्ययन कीजे पाहीं । अध्यापनीं त्या अधिकार नाहीं । ऐसी आम्नायीं मर्यादा ॥ १९ ॥ आह्निकाचरणापुरते मंत्र । वसविती वैश्यवर्णाचें वक्त्र । समग्र श्रवणीं त्यां अधिकार । अनर्ह शूद्र श्रुतिश्रवणीं ॥ २० ॥ ब्राह्मणवचनें पौराणोक्ती । प्रकटिती शूद्रकर्मप्रवृत्ती । साङ्ग षट्कर्मांची वसती । मूर्तिमंत द्विजरूपीं ॥ २१ ॥ आशीर्वादें हरिहरसदनें । संतुष्ट ब्राह्मण कोपिती वदनें । क्षोभले तरी अधःपतनें । देती दैन्यें दिविजांतें ॥ २२ ॥ ऐसा जाणोनि ब्राह्मणमहिमा । श्रीकृष्ण जो ब्रह्मण्यनामा । तो ब्राह्मणा स्वप्रियतमा । वदता जाला निजवदनें ॥ २३ ॥ ब्राह्मणाचें सप्रेमभजन । जाणे यास्तव षड्गुणपूर्ण । अव्याहत श्रीभगवान । बोले वचन द्विजवर्या ॥ २४ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥ किमुपायनमानीतं ब्रह्मन्मे भवतागृहात् । अण्वप्युपाहृतं भक्तैः प्रेम्णा भूर्येव मे भवेत् । भूर्यप्यभक्तोपहृतं न मे तोषाय कल्पते ॥ ३ ॥

सन्मात्रनिष्ठ जे कां संत । त्यांची सद्गती श्रीभगवंत । तेणें द्विजातें सप्रेमभरित । पाहोनि निश्चित बोलतसे ॥ २५ ॥ म्हणे भो भो ब्राह्मणोत्तमा । तुम्ही निजगृहींहूनि आम्हां । उपायन आणिलें धरूनि प्रेमा । तें मज का ना नार्पियलें ॥ २६ ॥ म्हणे तूं म्हणसी अल्पस्वल्प । कृष्ण केवळ त्रैलोक्यभूप । तरी हा न धरूनि संकल्प । ऐकें स्वरूप प्रेमाचें ॥ २७ ॥ मद्भक्त जे सप्रेमळ । अणुप्रमाणही फल जल दल । प्रेमें अर्पितां तिहीं केवळ । मज कनकाचळसम होय ॥ २८ ॥ मेरुप्रमाण अभक्तांहीं । मज कारणें अर्पितां पाहीं । तें मज नोहे तोषदायी । जाण निश्चयीं हें गुह्य ॥ २९ ॥

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति । तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ ४ ॥

पत्र पुष्प फल जीवन । मजकारणें भक्तीकरून । जितात्मा मद्भक्त अर्पितां जाण । तें मी संपूर्ण भक्षितसें ॥ ३० ॥ तुरंबावें किंवा प्यावें । चोष्यादि निःसार विसर्जावें । ऐसा विभाग न धरूनि जीवें । भक्षीं आघवें भक्ताचें ॥ ३१ ॥ गोपाळांच्या वनभोजनीं । मी लिप्साळु चक्रपाणी । विदुराचिया कदन्नाशनीं । अमृताहूनी संतोषें ॥ ३२ ॥ मी नंदाचा गोरक्षक पाहें । अभक्तप्रतिष्ठे दूर होयें ।

मद्भक्तांच्या गुंतोनि स्नेहें । अंकित होयें त्यां सदनीं ॥ ३३ ॥ गौरवांच्या नृपपर्वडी । त्याची मजला न वटे गोडी । ऐसी माझी स्वयंभ खोडी । तुजही फुडी विदित असे ॥३४॥ इत्यादि वचनें पुरुषोत्तमें । विप्र बोधिला उपायनकामें । तथापि सलज्ज मनोधर्मे । संकोचवर्म्मे मौनस्थ ॥ ३५ ॥

इत्युक्तोऽपि द्विजस्तस्मै व्रीडितः पतये श्रियः । पृथुकप्रसृतिं राजन्न प्रायच्छदवाङ्मुखः ॥ ५ ॥

विश्वश्रियेचा जो कां पति । तया कारणें पृथुकप्रसृती । ब्राह्मण नार्पी सलज्जवृत्ति । लक्ष्मी क्षिती अधोवदनें ॥ ३६ ॥ भो भो कौरवचूडामणि । ऐसी द्विजाची मनोग्लानि । सर्वसाक्षी चक्रपाणी । जाणोनि करणी काय करी ॥ ३७ ॥

सर्वभूतात्मदृक्साक्षात्तस्यागमनकारणम् । विज्ञायाचिंतयन्नायं श्रीकामो माऽभजत्पुरा ॥ ६ ॥

सर्वभूतांचा अंतरात्मक । अंतःकरणसाक्षी मुख्य । जाणोनि विप्रागम सम्यक । चित्तीं निष्टंक चिंतितसे ॥ ३८ ॥ म्हणे हा निघतां सदनाहून । पूर्वी श्रीकाम मजलागून । भजला आतां मज देखून । सलज्ज होऊन न वदेची ॥ ३९ ॥ किंवा पूर्वी बहुतजन्मीं । श्रीकामपर स्वधर्मनियमीं । मज भजला मग सद्गुरुसद्मीं । वसतां निष्कामपर जाला ॥ ४० ॥ तो हा मम सखा प्रियतम । दर्शनाचें धरूनि प्रेम । येते समयीं अभीष्टकाम । विप्रांतरींचा हरि चिंती ॥ ४१ ॥

पत्न्याः पतिव्रतायास्तु सखा प्रियचिकीर्षया । प्राप्तो मामस्य दास्यामि संपदोऽमर्त्यदुर्ल्लभाः ॥ ७ ॥

पतिव्रता स्त्री सद्गुणराशी । तियेसी संतोष करावयासी । इच्छूनि अभीष्टवैभवासी । आला मजपासीं प्रियसखा ॥ ४२ ॥ गुरुसदनींचा मम सहाध्यायी । प्रेमा धरूनि माझ्या ठायीं । आला ऐसियातें ये समयीं । मी सर्वही वोपीन ॥ ४३ ॥ इंद्रादिअमरां दुर्ल्लभ लक्ष्मी । ते मी निर्मीनं याचे सद्मीं । ऐसें विवरूनि हृदयपद्मीं । करी तें सत्तमीं परिसावें ॥ ४४ ॥

इत्थं विचिंत्य वसनाच्चीरबद्धान्द्विजन्मनः । स्वयं जहार किमिदमिति पृथुकतंडुलान् ॥ ८ ॥

ऐसें चिंतुनियां अंतरीं । ब्राह्मणें निजमात्रे माझारी । पृथक बांधिले वस्त्रांतरीं । स्वकरीं हरि हरी त्यांतें ॥ ४५ ॥ पृथुकबंधना वस्त्र धड । नाहीं म्हणोनि जीर्ण उदंड । एकवटूनि ग्रंथी दृढ । करूनि निगूढ जे केली ॥ ४६ ॥ ते ग्रंथीतें झोंबूनि हरी । काय म्हणोनि स्वीकरी हरी । पृथुकतंडुल घेऊनि करीं । बोले मुरारी तें ऐका ॥ ४७ ॥

नन्वेतदुपनीतं मे परमप्रीणनं सखे । तर्पयंत्यंग मां विश्वमेते पृथुकतंडुलाः ॥ ९ ॥

कां लपविसी ब्राह्मणोत्तमा । बहुतेक हेंचि उपायन आम्हां । आणिलें इतुकेन मी विश्वात्मा । विश्वें सहित तृप्त असें ॥ ४८ ॥ अंग या कोमळसंबोधनें । म्हणे सखया मजकारणें । प्रियतम उपायन आणिलें तेणें । जगदात्मपणें संतृप्त मी ॥ ४९ ॥ तुझे इतुके पृथुकतंडुल । विश्वें सहित मज केवळ । तृप्त करिती हें वाक्य अढळ । मी गोपाळ तुज वदतों ॥ ५० ॥

इति मुष्टिं सकृज्जग्ध्वा द्वितीयां जग्धुमाददे । तावच्छ्रीर्जगृहे हस्तं तत्परा परमेष्ठिनः ॥ १० ॥

ऐसें बोलूनियां श्रीहरी । वस्त्रग्रंथि मुक्त करी । पृथुकमुष्टि घेऊनि करीं । मुखा भीतरी निक्षेपी ॥ ५१ ॥ ब्रह्मार्पण म्हणूनि भक्षी । द्वितीयमुष्टिग्रहणापेक्षी । ऐसें इंदिरा रुक्मिणी लक्षी । धरी कमळाक्षी करकमळा ॥ ५२ ॥ धरावया श्रीकृष्णकर । जाली वैदर्भी तत्पर । किमर्थ म्हणाल तरी विचार । ऐका सादर होत्साते ॥ ५३ ॥ सूर्यासवें जैसी दिप्ति । तेंवि वैदर्भी वैष्णवी शक्ति । व्यापूनि श्रीकृष्णाची मति । वर्ते निगुती अनुगत्वें ॥ ५४ ॥ भक्तवत्सल श्रीभगवंत । उचंबळला सप्रेमभरित । देतां न म्हणे अल्प बहुत । जाणोनि हस्त येरी धरी ॥ ५५ ॥ परमेष्ठी जो श्रीकृष्णनाथ । तत्परा जे कां तत्पदानिरत । स्वकान्ताचा धरूनि हात । वदली संकेत तो ऐका ॥५६॥

एतावताऽलं विश्वात्मन्सर्वसंपत्समृद्धये । अस्मिल्लोकेऽथवामुष्मिन्पुंसस्त्वत्तोषकारणम् ॥ ११ ॥

इतुकेंचि पुरुषाचें करणें । सर्वसंपत्तीकारणें । अलं म्हणिजे पूर्णपणें । श्रीभगवानें जाणावें ॥ ५७ ॥ एकमुष्टिपृथुकाशनें । जितुकी माजी माया अवलोकनें । ब्रह्मांडगर्भींचीं कारणें । विभवें संपूर्णें आतुडलीं ॥ ५८ ॥ इहलोकींच्या ज्या संपत्ति । कीं चतुर्दशभुवनात्मक ज्या होती । मत्कटाक्षें अमरां प्राप्ति । त्या या प्रति वोपिलिया ॥ ५९ ॥ याहीवरी द्वितीयमुष्टी । भक्षणेच्छा धरिली पोटीं । तरी या अधीन मज शेवटीं । करूं पाहतां कीं काय ॥ ६० ॥ स्वचरणांचा वियोग मातें । करूनि अर्पण कराल यातें । ऐसेंचि चित्तीं असेल निरुतें । तरी द्वितीयमुष्टीतें भक्षिजे ॥ ६१ ॥ तुझिया तोषाचें कारण । सर्वसंपत्तीचें मूळ जाण । प्रेमें अर्पी अणुप्रमाण । संपदा गहन तो लाहे ॥ ६२ ॥ विश्वात्मन् या संबोधनें । विश्वात्मकातें वैदर्भी म्हणे । संपदासमृद्धीकारणें । इतुकेंचि पुरे पुरुषासी ॥ ६३ ॥ तुझिया तोषाचें कारण । इहामुष्मिकसंपदा पूर्ण । दिधल्या हों न शके उत्तीर्ण । करीं शुश्रूषण यास्तव तूं ॥६४॥ इत्यादि अभिप्रायें श्रीकमळा । रहस्यसंकेतें कर धरिला । तें गुह्य जाणोनि मेघसांवळा । हस्त आवरिला पृथुकेंसीं ॥ ६५ ॥ भगवंताचीं ललनारत्नें । ब्राह्मणा पाहों येती यत्नें । नमस्कारिती नम्रपणें । आशीर्वचनें द्विज वोपी ॥ ६६ ॥ म्हणती भावोजी आजिवरी । निष्ठुर झालेती कां अंतरीं । सहोदराहूनि बहुतांपरी । दुर्लभ संसारीं मित्रत्व ॥ ६७ ॥ बाई भेटविली नाहीं आम्हां । किती अपत्यें झालीं तुम्हां । आमुचे ठायीं तुमचा प्रेमा । उदास कां मा आजिवरी ॥ ६८ ॥ ऐसिया सोळा सहस्र युवति । सशत अष्टनायिकाप्रभृति । स्नेहवादें द्विजाप्रति । गौरविती सम्मानें ॥ ६९ ॥ ब्राह्मण म्हणे कुटुम्बामाजी ।

कृष्णें सम्मानिलें मज आजी । सर्व संभावना करिती माजी । होइन सहजीं सभाग्य तैं ॥ ७० ॥ इतुकें कृष्णाचें कुटुम्ब । या वेगळा यदुकदंब । संभावनेचा होईल लाभ । यथावालभ मज भजती ॥ ७१ ॥ ऐसा संतुष्ट अभ्यंतरीं । तिये दिवसीं हरिमंदिरीं । सुखाडला सर्वोपचारीं । सावध श्रोत्रीं तें ऐका ॥७२॥

ब्राह्मणस्तां तु रजनीमुषित्वाच्युतमंदिरे । भुक्त्वा पीत्वा सुखं मेने आत्मानं स्वर्गतं यथा ॥ १२ ॥

दिव्यभोजनाचिया परवडी । अमृतापरिस मधुरता गाढी । अपूर्वफळांचिया कोडी । द्विजा आवडी समर्पिती ॥ ७३ ॥ स्रक्चंदनविलेपनें । सुगंधशलाका धूपदानें । कर्पूरादिनीराजनें । ललनारत्नें समर्पिती ॥ ७४ ॥ सौरभ्य धूसर उधाळिती अबळा । मंदारपुष्पें खोंविती मौळा । एकी समर्पिती ताम्बूला । चरणकमळा एकी चुरिती ॥ ७५ ॥ पानार्थ अर्पिती विविध रस । निवविती मधुरोत्तरीं मानस । रत्नदंडी चामरांस । धरूनि वीजिती पैं एकी ॥ ७६ ॥ मृदुळमंचकीं पहुडवून । करिती सर्वाङ्गशुश्रूषण । एक पदतलसंमर्दन । करिती कोमळ करकमळीं ॥ ७७ ॥ ब्राह्मणाचा धरूनि कर । परमानंदें जगदीश्वर । आत्मभुवन सविस्तर । दावी सादर होत्साता ॥ ७८ ॥ माड्या गोपुरें विचित्र शाळा । एकान्तसदनें सभास्थळा । कोशभाण्डारसमृद्धि सकळा । सादर डोळां द्विज पाहे ॥ ७९ ॥ वनें वाटिका रहाट पाट । जळप्रवाह धडधडाट । फळें पुष्पें पल्लव दाट । गमे वैकुण्ठ यवन्यून ॥८०॥ ऐसिये भुवनीं तो द्विजवर । सुखाडला अहोरात्र । अमरां दुर्लभ दिव्योपचार । ते तेथ समग्र अनुभविले ॥ ८१ ॥ ब्राह्मण मानी आपणातें । शतक्रतूच्या ऐश्वर्यातें । भोगार्हता जाली मातें । स्नेहें भगवंतें स्वीकारितां ॥ ८२ ॥ ऐसिया सुखें श्रीकृष्णसदनीं । ब्राह्मणें क्रमिली दिवसरजनी । प्रभात होतां चक्रपाणी । विप्रालागूनी बोळवी ॥ ८३ ॥

इत्थंभूते विश्वभावेन स्वसुखेनाभिवंदितः । जगाम स्वालयं तात पथ्यनुव्रज्य नंदितः ॥ १३ ॥

उदया आलिया गभस्ती । स्वयें येऊनि ब्राह्मणा प्रति । स्वधामा जावया आज्ञापिती । सादर वृत्ति करूनियां ॥ ८४ ॥ ब्राह्मण व्रतस्थ अयाचित । स्वमुखें न याची कांहीं अर्थ । म्हणे सर्वज्ञ श्रीभगवंत । जाणे हृद्गत सर्वांचें ॥ ८५ ॥ तंव त्या स्वमुखें म्हणे श्रीपति । स्वामी उठावें शीघ्रगति । चालतां उष्ण होईल पंथीं । म्हणूनि निगुतीं वेग करा ॥ ८६ ॥ हर्यंगना नमिती चरणां । म्हणती बाईसी सांगा नमना । आमुचा विसर न पडो मना । ऐसी प्रार्थना बहु करिती ॥ ८७ ॥ कन्या कुमर आलिंगिती । भो पितृव्या आम्हांप्रति । पूर्णस्नेहें आपुल्या चित्तीं । स्मरिजे म्हणती निरंतर ॥८८॥ दासदासी लोटाङ्गणा । घालूनि बोळविती ब्राह्मणा । लंघूनि अंगणा प्राङ्गणा । पण्यस्थाना पैं आला ॥८९॥ विश्वभावन जो श्रीहरि । तेणें ब्राह्मणा धरूनि करीं । आला बोळवीत बाहेरी । पादचारी अनुगामी ॥ ९० ॥ वंदिला असतां परिवारगणीं । विश्वभावनें सुखें करूनी । बोळवीत सवें जावोनी । आनंदातें पावविला ॥ ९१ ॥ ऐकें बापा कौरवनाथा । म्हणसी धनधान्यादि न देतां । आनंद केला

द्विजाच्या चित्ता । कैसा तत्वता मज न कळे ॥ ९२ ॥ तरी विश्वभावन या अभिधानें । अमरां दुर्लभ लक्ष्मी देणें । भावी ब्राह्मणा कारणें । बादरायणें हें सूचिलें ॥ ९३ ॥ सुखेन ऐसिया पदें करूनी । पूर्णानंद जो चक्रपाणी । स्वतुल्य संपत्ति देतां ग्लानी । न धरी मनीं हें सूचिलें ॥ ९४ ॥ नम्र समर्याद विनयोक्ति । अमृततुल्य मधुरा प्रीति । वदोनि विप्रा आनंद चित्तीं । केला निश्चिती हें कथिलें ॥ ९५ ॥ तया आनंदाचें लक्षण । सिंहावलोकनें वक्ष्यमाण । मार्गी विप्राचें चिन्तन । कथितां जाणोन घे राया ॥ ९६ ॥

स चालब्ध्वा धनं कृष्णान्न तु याचितवान्स्वयम् । स्वगृहान्व्रीडितोऽगच्छन्महद्दर्शननिर्वृत्त. ॥ १४ ॥

मग तो ब्राह्मण श्रीकृष्णातें । राहवूनियां आदरें बहुतें । जाता जाला निज नगरातें । सलज्ज चित्तें प्रमुदित पैं ॥ ९७ ॥ चित्त लज्जेनें व्यापिलें असतां । कैंची आनंदाची वार्ता । तरी हे दोहींची व्यवस्था । सावध श्रोतां परिसावी ॥ ९८ ॥ कृष्णापासूनि कांहींच धन । प्राप्त जालें नाहीं म्हणोन । चित्त अत्यंत लज्जायमान । वनितादर्शनसंकोचें ॥ ९९ ॥ बहुतेक वनिता पतिव्रता । सहसा विक्षेप न करी चित्ता । परंतु माझी मज कृपणता । सलज्जता जाकळिते ॥ १०० ॥ एवं लज्जेचें कारण । त्याचें विवरिलें निरूपण । या वरी आनंदाचा पूर्ण । हेतु कोण तो ऐका ॥ १ ॥ महान् म्हणिजे श्रेष्ठश्रेष्ठ । तो कृष्ण विश्ववरिष्ठ । त्याचें देखिलें पादपीठ । तेणें भूयिष्ठ आनंद ॥ २ ॥ तया श्रेष्ठत्वाचीं लक्षणें । पथीं चौं श्लोकीं ब्राह्मणें । विवरिलीं तीं अंतःकरणें । श्रोतीं श्रवणें परिसावीं ॥ ३ ॥

अहो ब्रह्मण्यदेवस्य दृष्टा ब्रह्मण्यता मया । यद्दरिद्रतमो लक्ष्मीमाश्लिष्टो बिभ्रतोरसि ॥ १५ ॥

अहो या अद्ययें परमाश्चर्य । मानूनि म्हणे ब्राह्मणधुर्य । ब्रह्मण्यदेव वृष्णिवर्य । आर्यां आर्य पूज्यतम ॥ ४ ॥ ब्रह्मण्यदेवाची ब्रह्मण्यता । ते म्यां प्रत्यक्ष देखिली तत्वता । तेणें परमानंद चित्ता । तो सर्वथा न बोलवे ॥ ५ ॥ मी दरिद्री अनाथ रंक । लुप्ताचार हीनविवेक । मळिन म्लान गर्हितवेष । मज तो परेश आळंगी ॥ ६ ॥ ज्याचें हृदय वसवी लक्ष्मी । मंडित सकळसद्गुणलक्ष्मी । तये हृदयीं त्रैलोक्यस्वामी । प्रेमसंभ्रमीं मज कवळी ॥ ७ ॥ जें वक्षस्थळ लक्ष्मीनिलय । तये हृदयीं परम सदय । मजला कवळी आनंदमय । ब्रह्मण्यवर्य यास्तव तो ॥ ८ ॥

क्वाहं दरिद्रः पापीयान्क्व कृष्णः श्रीनिकेतनः । ब्रह्मबंधुरिति स्माहं बाहुभ्यां परिरंभितः ॥ १६ ॥

कोण्हीकडे मी दरिद्री रंक । पापी दीन नीच याचक । तुच्छाहूनि तुच्छ अल्पक । कळिमळपंक-निमग्न ॥ ९ ॥ कोण्हीकडे हा पुण्यकीर्ति । श्रीनिकेतन जगत्पति । लोकत्रयाची विश्रान्ति । मंगळमूर्ति निगमात्मा ॥ ११० ॥ ऐसा श्रीकृष्ण थोरां थोर । मी पामराहूनि पामर । लक्षूनि ब्राह्मणजातिमात्र । सप्रेम आदर वाढविला ॥ ११ ॥ बहुतां दिवसांची वोळखी । दुरी देखोनि एकाएकीं । सांडूनि वैदर्भी

मंचकीं । स्नेहें उत्सुकीं धाविन्नला ॥ १२ ॥ विश्वमंगळकमळानिलयीं । आलिङ्गिलें मज दोन्हीं बाहीं । न पाहोनी समता कांहीं । नेलें स्वगेहीं मदुमानें ॥ १३ ॥

निवासित. प्रियाजुष्टे पर्यंके भ्रातरो यथा । महिष्याविजित. श्रांतो वालव्यजनहस्तया ॥ १७ ॥

बराडियासारिखी कान्ति । कुचैल वस्त्राची अनुपपत्ति । ऐसिया मातें धरूनि हस्तीं । सदनीं श्रीपति प्रवेशे ॥ १४ ॥ कमळा विलसे जिये मंचकीं । तेथ मज नेवूनि एकाएकीं । अग्रज बंधूचिये सम तुकीं । बैसवूनी अभ्यर्चीं ॥ १५ ॥ पट्टमहिषी वैदर्भी मुख्य । धरूनि वाळव्यजन सम्यक । श्रम-परिहरणा स-कौतुक । प्रीतिपूर्वक वीजितसे ॥ १६ ॥

शुश्रूषया परमया पादसंवाहनादिभिः । पूजितः परया भक्त्या देवदेवेन देववत् ॥ १८ ॥

सकळ देवांचा वरिष्ठ देव । तो हा श्रीकृष्ण वासुदेव । मातें जाणोनि भूदेव । परम भक्तीनें पूजियलें ॥ १७ ॥ कनकपात्र मांडूनि तळीं । चरण क्षाळी श्रीवनमाळी । कनककलशें भीमकबाळी । वोती करतळीं जळधारा ॥ १८ ॥ दुहिण संक्रंदन ईशान । तें जोंवि पूजिती जनार्दन । तैसिया परी मजलागून । पूजी भगवान भक्तपति ॥ १९ ॥ अत्र गंध पुष्प धूप । नव्हे सामान्य सपर्यारूप । अनर्घ्य उपचार दिव्य अमूप । कंदर्पबाप्पें समर्पिले ॥१२०॥ ब्रह्मण्यदेव साचार हरी । म्हणोनि प्रेमा ब्राह्मणावरी । ऐसा ब्राह्मण अभ्यंतरीं । मार्गी विवरी प्रभुमहिमा ॥ २१ ॥ पुढती वितर्क करी मानसीं । म्हणे सपर्या केली ऐसी । अल्पही धन न द्यावयासी । कारण काय हें मज न कळे ॥ २२ ॥ सदय सर्वज्ञ श्रीमंत हरी । स्नेहाळ होऊनियां मजवरी । गुरुगृहींच्या वार्ता करी । परि अल्पही करीं धन नेदी ॥ २३ ॥ मी तो न मागें अयाचितवृत्ति । वदान्य सर्वज्ञ लक्ष्मीपति । माझी देखूनि सर्वानुपत्ति । नार्पिलें रतिभरी हेम ॥ २४ ॥

स्वर्गापवर्गयोः पुंसां रसायां भुवि संपदाम् । सर्वासामपि सिद्धीनां मूलं तच्चरणार्चनय् ॥ १९ ॥

कांहीं न द्यावयाचें कारण । पाहतां इतुकेंचि कल्पतें जाण । पूर्वी भगवत्पादार्चन । मजलागून न घडलें ॥ २५ ॥ म्हणूनि कृपाळु होऊनि हरी । भगवत्पादार्चनाधिकारी । अकिंचनता देऊनि करी । हें निर्द्वारीं गमतसे ॥ २६ ॥ पाताळभुवनींच्या समृद्धि । मृत्युलोकींच्या वैभवऋद्धि । दिविभोगादि ऐश्वर्यसिद्धि । स्वर्गमोक्षादि संपदा ॥ २७ ॥ या सर्वांचें मूळ जाण । श्रीभगवत्पादार्चन । तें घडावें मजलागून । म्हणूनि भगवान कृपाळु ॥ २८ ॥ पूर्वी पादार्चन न घडलें । म्हणूनि दरिद्र आंगीं जडलें । ऐशियातें धन आंतुडलें । तरी मग पडलें मदभुरळें ॥ २९ ॥

अधनोऽयं धनं प्राप्य माद्यन्नुच्चैर्न मां स्मरेत् । इति कारुणिको नूनं धनं मेऽभूरि नाददात् ॥ २० ॥

हा तंव निर्धन दरिद्री रंक । यातें धन प्राप्त जालिया सम्यक । उन्मत्त होईल मग निष्टंक । न भजे नावेक मजलागीं ॥ १३० ॥ धनमद सर्वांमाजि उच्च । येणें अष्टही होती साच । माझ्या स्मरणाचा नडनाच । मग विसंच पावेल ॥ ३१ ॥ म्हणूनि कारुणिक श्रीहरी । कृपाळु होऊनियां मजवरी । अल्पही धन माझे करीं । नेदी निर्धारीं सर्वज्ञ ॥ ३२ ॥ धनें मातेल हा ब्राह्मण । तेणें न करील भगवत्स्मरण । अभूरि म्हणिजे अल्पही धन । मजलागून नेदूनी ॥ ३३ ॥ बोळवीत बाहीर आला । सप्रेमभावें स्नेह केला । दीर्घदृष्टी हा कळवळा । यास्तव धनाला नार्पिलें ॥ ४४ ॥ ऐसा उपकार श्रीकृष्णाचा । हृदयीं चिन्तूनि स्मरे वाचा । परंतु अणुमात्र वैषम्याचा । शब्द न ठेवी भगवंतीं ॥ ३५ ॥ पूजा आदर स्नेह बहुत । स्मरूनि हृदयीं आनंदभरित । मार्ग क्रमूनि नगरप्रान्त । पावता जाला तें ऐका ॥ ३६ ॥

इति तच्चिन्तयन्नंतः प्राप्तो निजगृहान्तिकम् । सूर्यानलेंदुसंकाशैर्विमानैः सर्वतो वृतम् ॥ २१ ॥

निजगृहाचे समीपप्रान्तीं । ब्राह्मणें देखूनि अद्भुत दीप्ति । म्हणे कोठूनि चंडदीधिति । असंख्यात प्रकटले ॥ ३७ ॥ सूर्यप्रभेचीं व्योमयानें । चंद्रकान्तीचीं दिव्य विमानें । पावकप्रख्यें पुष्पकें वहनें । गृहा सभंवती विराजती ॥ ३८ ॥ निजगृहाचे ऊर्ध्वभागीं । द्विजें प्रभा हे देखोनि वेगीं । भूतळ सभोंवतें पाहे दृगीं । तंव देखे अवघी सुरलक्ष्मी ॥ ३९ ॥

विचित्रोपवनोद्यानैः कूजद्द्विजकुलाकुलैः । प्रोत्फुल्लकुमुदाम्भोकल्हारोत्पलवारिभिः ॥ २२ ॥

विचित्र वनें स्वधामाभवंती । उपवनें उद्यानें शोभती । त्यांमाजी पक्षी अनेकजाती । विराव करिती स्वानंदें ॥ १४० ॥ तिहींकरूनिं व्याप्त वनें । सदना भंवती विचित्र विपिनें । सरें अमृतोपम जीवनें । भरलीं पूर्णें प्रातिविपिनीं ॥ ४१ ॥ प्रकर्षें उत्फुल्ल कुमुदें जळीं । कित्येक सरें नीलोत्पलीं । कित्येक भरलीं रातोत्पळीं । हेमकमळीं कह्लारीं ॥ ४२ ॥ त्यांवरी भ्रमरकुळांचीं गानें । उन्मत्त रुंजती मधुपानें । तिहींकरूनि व्याप्त नयनें । देखिलें ब्राह्मणें स्वधाम ॥ ४३ ॥ अधोर्ध्वभागीं पाहिलें ऐसें । मध्यभागीं माझारी कैसें । द्विज देखता जाला जैसें । परिसें तैसें परीक्षिती ॥ ४४ ॥

जुष्टं स्वलंकृतैः पुंभिः स्त्रीभिश्च हरिणाक्षिभिः । किमिदं कस्य वा स्थानं कथं तदिदमित्यभूत् ॥ २३ ॥

नगरनारी जैशा अमरी । नवयौवना सालंकारी । विलासरासिका अतिसुंदरी । तेहीं माझारी शोभाढ्य ॥ ४५ ॥ मराळगमना कुरंगनयना । मृगाङ्कवदना सुकुन्दरदना । ज्यांचिया कटाक्षें क्षोभ मदना । होतां कदना वाञ्छितसे ॥ ४६ ॥ ऐसिया स्त्रियांहीं सुशोभित । सदन सर्वत्र निषेवित । तेथ पुरुषही सालंकृत । भासती सर्वत्र निर्जरसे ॥ ४७ ॥ ऐसें स्त्रीनरनिषेवित । वनीं विमानीं परिवेष्टित ।

तेजःपुञ्ज अत्यद्भुत । देखोनि विस्मित द्विजवर्य ॥ ४८ ॥ ब्राह्मण म्हणे प्रकाशमय । अद्भुत पुढें दिसतें काय । सादर विलोकूनि जों पाहे । तंव विमाननिचय नभीं देखे ॥ ४९ ॥ म्हणे देवेन्द्राची अमरावती । कीं अनळाची ज्योतिष्मती । कीं भास्करीची भास्करद्युती । यमसंयमनी हें न कळे ॥१५०॥ कीं निर्ऋतीची नैर्ऋत्यधानी । किंवा वरुणाची वारुणी । भासे परिवेष्टित विमानीं । जेंवि पावनी वचनाची ॥ ५१ ॥ कीं धनदाची अलकावती । कीं ईशानाची सद्योजाती । कीं विष्णूची ऐश्वर्यशक्ती । विमानपंक्तिमंडित हे ॥ ५२ ॥ ऐसा विस्मयें वितर्क करी । स्थान कोणाचें हें निर्धारी । विवरूनि पाहतां अभ्यंतरीं । म्हणे नमती भूवरी सुरभुवनें ॥ ५३ ॥ विचित्र उद्यानें उपवनें । सरोवरें पूर्ण जीवनें । लक्षूनि पुढती वितर्क मनें । केला ब्राह्मणें हृत्कमळीं ॥ ५४ ॥ म्हणे हें अश्वावतीचें तीर । पश्चिमभागीं रत्नाकर । एवं माझेंचि हें मंदिर । परि प्रकाशप्रचुर केंवि दिसे ॥ ५५ ॥ तेजःपुंज इये वेळे । कैसेनि जालें हें मज न कळे । ब्राह्मण पाहे उघडूनि डोळे । तें भूपाळें परीसिजे ॥ ५६ ॥

एवं मीमांसमानं तं नरा नार्योऽमरप्रभाः । प्रत्यगृह्णन्महाभागं गीतवाद्येन भूयसा ॥ २४ ॥

ऐसा विचार करी ब्राह्मण । त्यातें नगरवासी जन । दिव्यनरनारीगण । घेऊनि उपायन पुढें आला ॥ ५७ ॥ वाणी सोवाणी सोनार । वसनक्रयी माल्यकार । धान्यक्रयी रंगकार । शिल्पिक कांसार तंतुवाय ॥ ५८ ॥ ऐशा अनेक वार्धुषपंक्ति । उपायनें घेऊनि हातीं । तौर्यत्रिकेंसीं द्विजाप्रति । येऊनि नमिती उल्लासें ॥ ५९ ॥ समस्त म्हणती भो भो द्विजा । आम्ही अवघिया तुझ्या प्रजा । आमुचें पालन बरवे वोजा । महाराजा तां कीजे ॥ १६० ॥ दिव्य वस्त्रें लेवविती । दिव्याभरणें अलंकारिती । उपायनें समर्पिती । एक वोळगती दासत्वें ॥ ६१ ॥ पादत्राणें करिती पुढां । म्हणती शिबिकायानीं आरूढा । एक म्हणती रथ गज घोडा । बैसोनि प्रवेशा निजनगरीं ॥ ६२ ॥ अमरासमान देदीप्यमान कान्ति । ऐसिया नरनारींच्या पंक्ति । ब्राह्मणातें सप्रेम भक्ति । पूजोनि स्तविती उच्चस्वरें ॥ ६३ ॥ तंव येरीकडे द्विजाची पत्नी । ब्राह्मणागमन ऐकूनि श्रवणीं । मंदिरापासूनि तत्क्षणीं । येती जाली तें ऐका ॥ ६४ ॥

पतिमागतमाकर्ण्य पत्न्युद्धर्षातिसम्भ्रमा । निश्चक्राम गृहात्तूर्णं रूपिणी श्रीरिवालयात् ॥ २५ ॥

साध्वी पतिव्रता ब्राह्मणी । एकीं घातलें तिच्या श्रवणीं । तुझा कान्त द्वारकेहूनी । आला भेटूनी कृष्णातें ॥ ६५ ॥ ऐकूनि पतीचें आगमन । उत्कंठ हर्षें सतीचें मन । कोंदाटलें मग अभिगमन । करिती जाली सप्रेमें ॥ ६६ ॥ विराजमान वस्त्राभरणीं । नवयौवना सुभगा तरुणी । साध्वी पतिव्रता सद्गुणी । अपर इंद्राणीसम गमली ॥ ६७ ॥ कमलकानन कमलालय । तेथूनि सुरश्री प्रकट होय । तेंवि ब्राह्मणी आत्मनिलय । सोडूनि लवलाहे पातली ॥ ६८ ॥ पूर्वीं क्षुत्क्षामा कुचैल कृशा । तेचि सुरश्रीसम रूपसा । होती जाहली द्वारकाधीशा । प्रसादलेशापासूनी ॥ ६९ ॥ मराळगामिनी वेगें करून । कान्तासमीप स्वयें येऊन । नमिती जाली आत्मरमण । तें व्याख्यान अवधारा ॥ १७० ॥

पतिव्रता पतिं दृष्ट्वा प्रेमोत्कण्ठाश्रुलोचना । मीलिताक्ष्यनमद्बुद्धया मनसा परिषस्वजे ॥ २६ ॥

पतिव्रता देखोनि पति । यथारूप पूर्वस्थिति । कृशाङ्ग सर्वस्वें अनुपपत्ति । म्हणे श्रीपतिश्रिय हा पैं ॥ ७१ ॥ धन्य याचें अनुष्ठान । जेणें तुष्टला श्रीभगवान । अमरविभवाहूनि गहन । संपदा संपूर्ण वोपिल्या ॥ ७२ ॥ ऐसें मानसीं जंव विवरी । तंव प्रेमसंभ्रम अभ्यंतरीं । सात्विक अष्टभाव उभारी । साध्वीशरीरीं ते काळीं ॥ ७३ ॥ प्रेमोत्कंठा कंठ रोधी । मूर्च्छित जाली मनोबुद्धी । नेत्रीं आनंद-बाष्पनदी । गात्रें स्वेदीं डवडविलीं ॥ ७४ ॥ पुलक रोमाञ्च थरकले देहीं । सकंप गात्र तिये समयीं । शब्द न फुटे न वदे कांहीं । श्वास तोही पांगुळला ॥ ७५ ॥ ऐसें अष्टभावांचें भरितें । पतिव्रतेच्या आंगीं पुरतें । भरोनि वोसरलें मागुतें । मग नेत्रातें झांकिलें ॥ ७६ ॥ पतिव्रतेसी कान्त वंद्य । हरिहर वाञ्छिती आशीर्वाद । ऐसा विवरूनि हृदयीं बोध । वंदी मद्य निजकान्ता ॥ ७७ ॥ म्हणे हा माझा द्विजोत्तम । अखिलकल्याणाचें धाम । प्रत्यक्ष हाचि पुरुषोत्तम । करी प्रणाम या बुद्धी ॥ ७८ ॥ बुद्धि-पूर्वक ऐसा नमिला । नेत्र लावूनि हृदयीं नेला । मनोबाहीं आलिंगिला । बाह्य गलबला सांडूनियां ॥ ७९ ॥ पतिव्रतेनें ऐसा पति । देखोनि नमिला सप्रेमभक्ति । यावरी द्विजें देखिली स्वयुवति । कोणे रीती तें ऐका ॥ १८० ॥

पत्नीं वीक्ष्य विस्फुरन्तीं देवीं वैमानिकीमिव । दासीनां निष्ककंठीनां मध्ये भान्तीं सविस्मितः ॥ २७ ॥

विमानारूढ जेंवि पौलोमी । वेष्टित शतशा अमरोत्तमीं । तेंवि स्फुरद्रूप हेमललामीं । दासीमध्यगा देदीप्य ॥ ८१ ॥ शतानुशत भंवत्या दासी । अमराङ्गना न तुळती ज्यांसी । दिव्य सौन्दर्याच्या राशी । त्यांमाजी सतीसी द्विज देखे ॥ ८२ ॥ गुणलावण्यमंडित यष्टी । अमूल्य दिव्य पदकें कंठीं । जेंवि आवरणें श्रीचक्रपीठीं । तेंवि घरटी दासींची ॥ ८३ ॥ रत्नदंडी चामरें करीं । ऐशा वीजिती दिव्य-किङ्करी । एकी होऊनियां पुढारी । वेत्रधारी खोलती ॥ ८४ ॥ येकी भरोनी कनककुम्भ । वागविती सुधोपम अंभ । एकी घेऊनि सुरसौरभ्य । पुष्पकदंब पैं एकी ॥ ८५ ॥ ऐसिया दिव्यदासींमध्यें । भासुर विलसे परमानंदें । तयेतें देखोनि वेदविदें । विस्मित हृदयीं आश्चर्ये ॥ ८६ ॥ दिव्यरूपिणी हरिसंकल्पें । भासे इंद्राणीचिया रूपें । पूर्ववोळखीचेनि नयनमापें । ब्राह्मणें साक्षेपें उमाणिली ॥ ८७ ॥ मग तो म्हणे हे ममाङ्गना । इची शचीही न पवे तुळना । पतिव्रता हे वृत्तसंपन्ना । ऐसें निजमना-माजि विवरी ॥ ८८ ॥ शिबिकाप्रमुख विचित्र यानीं । वैसावया नागरजनीं । आग्रह केला परि तो ज्ञानी । चरणीं चालूनी गृहा गेला ॥ ८९ ॥

प्रीतः स्वयं तया युक्तः प्रविष्टो निजमन्दिरम् । मणिस्तम्भशतोपेतं महेन्द्रभवनं यथा ॥ २८ ॥

पतिव्रते वनितेसहित । प्रीतिपूर्वक द्विजवरनाथ । प्रवेशला निजसदनांत । पाहे निकेत सुरतुल्य ॥ १९० ॥ निर्जरपतीचें जेंवि सदन । तेंवि मंदिर देदीप्यमान । पाहे एकाग्र करूनि नयन । संपदा गहन

हरिदत्त ॥ ९१ ॥ शतशा रत्नमणींचे स्तंभ । जेंवि रविबिम्बबीजाचे कोंभ । तुळवट किलचा पाट स्वयंभ । दावितो शोभ वैदूर्य ॥ ९२ ॥ त्रिपंचसप्तनवमाळिकें । त्वाष्ट्रनिर्मितें तात्काळिकें । त्रिजगज्जनकें ऐन्द्रजाळिकें । विश्वपाळकें प्रकाशिलीं ॥ ९३ ॥ ऐसिया भवनांमाजी समृद्धि । भगवत्प्रेमसुकृतसिद्धि । ब्राह्मण देखे विशाळबुद्धि । पदार्थऋद्धि ते ऐका ॥ ९४ ॥

पयःफेननिभाः शय्याः दान्ता रुक्मपरिच्छदाः । पर्यङ्का हेमदण्डानि चामरव्यजनानि च ॥ २९ ॥

दुग्धफेना ऐसे श्वेत । गजदंताचे पर्यंक दान्त । कनकवसनीं आच्छादित । हंसपिच्छोत्थ तूळिका ॥ ९५ ॥ मृदुळवसनांचे पासोडे । उपबर्हणें चहूंकडे । कनकशृंखळांचे जोडे । अंतरिक्षडोल्हारे ॥ ९६ ॥ रत्नदंडी चामर व्यजन । प्रतिमंचकीं पृथक भिन्न । परिचर्यार्थ किङ्करगण । अमरां समान विराजती ॥ ९७ ॥

आसनानि च हैमानि मृदूपस्तरणानि च । मुक्तादामविलंबीनि वितानानि द्युमन्ति च ॥ ३० ॥

रत्नखचितें कनकासनें । परममृदुळें वरी आस्तरणें । ऊर्ध्वभागीं दिव्य वितानें । मुक्तादामें विलंबित ॥ ९८ ॥ ठायीं ठायीं रत्नमणि । गगनगर्भी जेंवि द्युमणि । स्फाटिका भित्तीचिया सदनीं । दीपस्थानीं वैदूर्य ॥ ९९ ॥

स्वच्छस्फटिककुड्येषु महामारकतेषु च । रत्नदीपान्भ्राजमानाँल्ललनारत्नसंयुतान् ॥ ३१ ॥

स्वच्छ सोज्ज्वळ लखलखीत । स्फटिकभित्ति सदना आंत । रत्नदीप प्रकाशवंत । गमती भास्वततुलनेचे ॥ २०० ॥ महामरकतमणींच्या भिन्ती । कार्तस्वराच्या खेवणी निगुती । करकौशल्यें शोभविती । दीपपंक्ती रत्नांच्या ॥ १ ॥ रत्नदीप भ्राजिष्ठ ऐसे । ललनारत्नें तत्प्रकाशें । प्रकाशतीं लावण्यरसें । तारुण्यदशें शोभविती ॥ २ ॥ नवनागरा सद्गुणराशि । यूनां कर्षिती कटाक्षपाशीं । नवरसरसिका सुरललनाशीं । स्वप्रकाशीं लोपविती ॥ ३ ॥ ऐसिया ललना ललामपंक्ती । सदनीं परिचर्या आचरती । अनेक भजनांचिया व्यक्ति । रौक्म्यरौप्या ताम्रमया ॥ ४ ॥ गंडूशपात्रें छ्रीवनपात्रें । रत्नखचितें कार्तस्वरें । कीडास्थानें सुरमंदिरें । सोपस्कारें मखसदनें ॥ ५ ॥ अनेक धनधान्यसमृद्धि । धनदालयीं जैसे निधि । गगनगामी मनोरथसिद्धि । यानें वहनें बहुपरींचीं ॥ ६ ॥

विलोक्य ब्राह्मणस्तत्र समृद्धीः सर्वसम्पदाम् । तर्कयाम स निर्व्यग्रः स्वसमृद्धिमहैतुकीम् ॥ ३२ ॥

सर्व संपदांची समृद्धि ऐशी । ब्राह्मणें देखोनि निजमानसीं । तर्किता जाला हें येथें कैसी । प्रकटली आपैसी अकस्मात ॥ ७ ॥ अव्यग्रमानसें तर्की द्विज । संपदासमृद्धीचें काय बीज । कोण्या कारणास्तव हे मज । जाली सहज संप्राप्त ॥ ८ ॥

नूनं बतैतन्मम दुर्भगस्य शश्वद्दरिद्रस्य समृद्धिहेतुः । महाविभूतेरवलोकतोऽन्यौ नैवोपपद्येत यदूत्तमस्य ॥३३॥

पूर्वीलची मी करंटपाळ । अखिलदरिद्रियांचा भूपाळ । कोण्या सुकृताचें ऐसें फळ । जालों मंगळभाजन पैं ॥ ९ ॥ अभागियांचा शिरोमणी । पूर्वीलची हा प्रत्यय मनीं । त्या मज अमरसंपदाश्रेणी । हेतू वांचूनि केविं आल्या ॥ २१० ॥ बहुतेक मज ऐशा दुर्भगा । योग्यता या ऐश्वर्यभोगा । जे द्वारके जाऊनि कमलारंगा । भेटलों इतुकेंचि कारण पैं ॥ ११ ॥ महाविभूति श्रीभगवान । जो यदूत्तम रुक्मिणीरमण । त्याच्या अवलोकना वांचून । अन्य कारण न लक्षे ॥ १२ ॥ अग्नीसी भेटलिया इंधन । निवडे अग्नित्वा घेऊन । तेंवि मज कृष्णाचें दर्शन । कृष्णा समान विभवद हें ॥ १३ ॥ ऐसा निश्चय करूनि मनीं । पुढती वितर्क अंतःकरणीं । ब्राह्मणें केला तो तव श्रवणीं । कुरुकुळतरणी निवेदितों ॥ १४ ॥ अवलोकमात्रें कृपादृष्टी । कृष्ण देता जरी ऐश्वर्यसृष्टी । तरी तुज दिधली ऐशी गोष्टी । निजवाक्पुटीं न कथितां ॥ १५ ॥ ऐसें विवरूनि ब्राह्मणें । अगाध श्रीकृष्णाचें करणें । असंभाव्यही संभावने । माजि आणूनि प्रतिपादी ॥ १६ ॥

नन्वब्रुवाणो दिशते समक्षं याचिष्णवे भूर्यपि भूरिभोजः ।
पर्जन्यवत्तत्स्वयमीक्षमाणो दाशार्हकाणामृषभः सखा मे ॥ ३४ ॥

यादव तितुके दाशार्हक । त्यांचा ऋषभ तो श्रीकृष्ण मुख्य । त्या मम सख्याचें हे सम्यक । जें न वदोनि सम्मुख बहु देणें ॥ १७ ॥ प्रकट न वदोनि याचका पुढें । सव्रीड वदान्य पर्जन्यपाडें । बहुत देऊनि मानी थोडें । निजपडिपाडें भोगाढ्य ॥ १८ ॥ ज्याचे घरीं खावया नाहीं । तो याचकां तृप्त करील कायी । या लागिं भूरिभोगाढ्य शेषशायी । वदान्य पाहीं सर्वस्वें ॥ १९ ॥ भूरिभोज कैसा म्हणाल । तरी लक्ष्मीवायक त्रैलोक्यपाळ । पूर्णकाम भक्तवत्सल । वदान्य अतुल ऐश्वर्यें ॥२२०॥ स्वभक्तांची अल्प सपर्या । देखोनि वोपी पूर्णैश्वर्या । पुढती म्हणे या प्रेमळ धुर्या । अनर्ह श्री या मम दत्त ॥ २१ ॥ याचिये सप्रेम सपर्ये पुढें । अखिल ऐश्वर्य मम दत्त थोडें । म्हणोनि दास्य करणें पडे । वाडेंकोडें तत्सदनीं ॥ २२ ॥ प्रत्यक्ष माझे पृथुक मुष्टि । भक्षूनि मानिली जगदात्मतुष्टि । मग मज पाहोनि कृपादृष्टी । ऐश्वर्यपुष्टि हे दिधली ॥ २३ ॥ पर्जन्याचा दृष्टान्त येथ । द्विज वदला तो इत्थंभूत । वाखाणिजेल सावचित्त । श्रोते समस्त परिसोत पैं ॥ २४ ॥ बहुभोज सभाग्य पर्जन्य कैसा । समुद्र संपूर्ण भरी ऐसा । वदान्यतेचा निःसीम ठसा । देतां सहसा न कडसी ॥ २५ ॥ कदाचित बहुतेकही वर्षोनि जळ । मानी अल्पचि हें केवळ । लज्जित देखोनियां कृपीवळ । म्हणे म्यां प्रेमळ न तर्पिलें ॥२६॥ मग लज्जेकरूनि रात्रभागीं । कर्षकाचीं क्षेत्रें अवघीं । जळें परिपूर्ण करूनि वेगीं । न धरी आंगीं स्फुजातें ॥ २७ ॥ प्रकट न वदोनि कर्षका पुढें । समृद्धि ऐश्वर्य प्रवृद्ध गाढें । देऊनि मानी हें थोडें । येणेंचि पाडें श्रीकृष्ण ॥ २८ ॥ प्रेमळाचें अल्प भजन । बहुत मानी बहुताहून । इन्द्रादिसंपदा तुच्छ

करून । स्वपद देऊन अल्प म्हणे ॥ २९ ॥ न बोलोनियां ऐशी पदवी । देता समर्थ श्रीगोसांवी । त्या कृष्णाची स्थिति आघवी । सप्रेमभावीं द्विज वर्णी ॥ २३० ॥

किञ्चित्करोत्युर्वपि यत्स्वदत्तं सुहृत्कृतं फल्ग्वपि भूरिकारि ।
मयोपनीतं पृथुकैकमुष्टिं प्रत्यग्रहीत्प्रीतियुतो महात्मा ॥ ३५ ॥

मेरूहूनि गौरव गहन । देऊनि किंचित मानी कृष्ण । फल्कट सुहृदाचें अर्पण । बहुताहूनि बहु मानी ॥ ३१ ॥ म्यां आणिले मुष्टि पृथुक । ते घेऊनिं प्रीतिपूर्वक । स्वयें भक्षी मुष्टि एक । दिधलें अनेक हें विभव ॥ ३२ ॥ प्रीति करूनि आदरें हरी । पृथुक होते जे माझे पदरीं । सलज्ज नार्पी मी दरिद्री । झोंबोनि स्वकरीं तो भक्षी ॥ ३३ ॥ परचित्तपारखियांचा राव । समष्टिमात्र ज्याचा देह । यालागीं महात्मा हें नांव । व्याससंभव अनुवादे ॥ ३४ ॥ ऐसा परम कारुणिक । भक्तवत्सल श्रीनायक । त्याचेंचि दास्य मज सम्यक । जन्म अनेक घडो म्हणे ॥ ३५ ॥

तस्यैव मे सौहृदसख्यमैत्री दास्यं पुनर्जन्मनि जन्मनि स्यात् ।
महानुभावेन गुणालयेन विषज्जतस्तत्पुरुषप्रसङ्गः ॥ ३६ ॥

त्याच्याच ठायीं सौहार्द माझें । सदैव असो सप्रेम ओजें । अवंचकभावें सख्य जें म्हणिजे । असो मज सहजें तन्निष्ठ ॥ ३६ ॥ मैत्री म्हणिजे उपकारत्व । अवंचकप्रेमाचें अधिकत्व । दास्य म्हणिजे सेवकत्व । असो एकत्वें तन्निष्ठ ॥ ३७ ॥ सौहार्द सख्य मैत्री दास्य । कृष्णींच माझें असो निःशेष । हेंचि मानसींचें रहस्य । वाञ्छा विशेष हे इतुकी ॥ ३८ ॥ येथ सहाध्यायित्वें हरि । जोडला ऐसीच जन्मान्तरीं । सौहार्द सख्य दास्य मैत्री । घडो निर्द्वारीं पुन्हां पुन्हां ॥ ३९ ॥ आणिक तत्संबंधी तन्निष्ठ जन । निष्काम निर्मम निरभिमान । त्यांच्या ठायीं इत्यादि गुण । सन्निधान द्विज वांछी ॥२४०॥ या वेगळी तत्संपत्ती । सहसा द्विज न वांछी चित्तीं । काय म्हणोनि हें पुसिजेल श्रोतीं । हे शंका-निवृत्ति पुढें करूं ॥ ४१ ॥ प्रस्तुत महानुभाव जो हरि । तेणेंसीं ज्या निरंतरीं । असंगसंग अहोरात्रीं । जिहीं निर्धारीं साधियला ॥ ४२ ॥ तया भक्तांच्या ठायीं माझा । संग असो भो गरुडध्वजा । या वीण आणिक संपदा वोजा । अधोक्षजा मी न मागें ॥ ४३ ॥ भक्तीवांचूनि वैभव अपर । तेथें न रमे ममान्तर । म्हणसी भक्तीचें फळ संपदा प्रचुर । तेथें तूं सादर कां नव्हसी ॥ ४४ ॥ पूर्वी विशुद्ध भक्ति केली । संपदारूपें तेचि फळली । पुढती भक्तीच कां याचिली । तरी ते बोली अवधारा ॥ ४५ ॥

भक्ताय चित्रा भगवान्हि संपदो राज्यं विभूतिर्न समर्थयत्यजः ।
अदीर्घबोधाय विचक्षणः स्वयं पश्यन्निपातं धनिनां मदोद्भवम् ॥ ३७ ॥

अज अव्यय जो श्रीहरि । भगवान षड्गुणैश्वर्यधारी । तो विचित्र संपदा भक्तां घरीं । सहसा

संसारीं न वाढवी ॥ ४६ ॥ विचित्र संपदा म्हणाल कैसी । तरी जी माजि अनेक पदार्थराशी । गणितां एकैक पदार्थासी । संख्या कोणासी करवेना ॥ ४७ ॥ अनेक कुञ्जर अनेक रथ । अनेक अश्व उष्ट्र बहुत । अनेक पदाति प्रान्तरहित । देश दुर्गे भूवलयें ॥ ४८ ॥ अजा अविकें गाई म्हैशी । नियोगीं यूथप दास दासी । वसनाभरणें धनधान्यासी । मर्यादेसी न करवे ॥ ४९ ॥ ऐशा विचित्र संपदा अपार । राज्य म्हणिजे सत्ता सधर । विभूति म्हणिजे कलत्रपुत्र । सुहृदमित्रगोत्रादि ॥ २५० ॥ अविवेकिया भक्ता घरीं । ऐशा समृद्धिं नेदी हरि । वोपी जिज्ञासा अंतरीं । भक्ति निर्धारीं प्रवर्तवी ॥ ५१ ॥ म्हणाल कां या संपदा नेदी । तरी ते अदीर्घबोध मंदबुद्धी । वरपडोनियां अष्टमदीं । विषयविषास्वादीं झळंबती ॥ ५२ ॥ तेणें अंतरती श्रीचरण । मग ते भ्रंशतीच कीं मच्छरण । या लागीं स्वयें विचक्षण । भक्तकल्याण स्वयें लक्षी ॥ ५३ ॥ धनाढ्यासि मदोद्भव । होतो म्हणोनि वासुदेव । आधींच निर्धन करूनि सर्व । हरूनि सद्भाव दृढ वोपी ॥ ५४ ॥ मग ते भगवच्चरणीं निरत । भवैश्वर्या होती विरत । सुदीर्घबोधें सदोदित । हरिगुणचरित प्रशंसिती ॥ ५५ ॥ अविवेकी जे अदीर्घबोध । त्यांसी ऐशिया संपदा विविध । सहसा नेदी श्रीपाण्डुरंग । मा दीर्घबोधप्रद होय ॥ ५६ ॥ तरी दीर्घबोध जे भक्तराज । भक्तिपरिणामसुखाचा ध्वज । लावूनि सेवितां गरुडध्वज । ते न मानिती चोज भवविभवीं ॥५७॥ नृपसंतान जातमात्र । नृपाभावीं त्या धरिलें छत्र । असतां अनेक संपदा विचित्र । परि तें भजे गात्र मातेचें ॥ ५८ ॥ तैसे दीर्घबोध जे सद्भक्त । संपदा लाधलेही समस्त । तथापि न होती तदासक्त । सर्वदा अनुरक्त तव चरणीं ॥ ५९ ॥ सप्रेमळ जे दीर्घबोध । त्यांसी संपदा न करी बाध । संपन्न असतां ध्रुव प्रह्लाद । भजनानंद अनुभविती ॥२६०॥ स्वयें भगवान विचक्षण । संपदाजनित दोषगुण । लक्षूनियां वक्ष्यमाण । भक्तांलागून कदा नेदी ॥ ६१ ॥ असो अन्य भक्तांची कथा । हृदयीं विवरीं द्विजनिजवार्ता । सप्रेम सावध होऊनि श्रोता । श्रवणें स्वहिता अनुभविजे ॥ ६२ ॥ येथें नाहीं शुकवैखरी । परंतु अन्यग्रंथान्तरीं । ब्राह्मण असतां गुरूचे घरीं । श्रीमुरारी समवेत ॥ ६३ ॥ वना धाडिलें इन्धना साठीं । तैं गुरुमातेनें मुष्टि मुष्टि । चणक एकत्र द्विजाचे वोटीं । घालूनि गोठी हे कथिली ॥ ६४ ॥ समस्तांसि मुष्टिप्रमाण । चणक दिधले ते अवघे जण । यथाभागें करा भक्षण । ऐसें वदोन पाठविले ॥ ६५ ॥ वनीं पर्जन्यसंकटकाळीं । बैसल्या सर्वांच्या दांतखिळी । द्विजें चणक ते तिये वेळीं । भक्षिले सकळी न वांटितां ॥ ६६ ॥ तया दोषास्तव दुस्तरी । पडिला दरिद्रदुःखसागरीं । साचचि सहाध्यायी श्रीहरि । तेणें अंतरीं दृढ नियमी ॥ ६७ ॥ बाह्य दरिद्र भोगिलें घोर । परंतु अभंग सदाचार । भगवन्निष्ठ निजान्तर । अढळ अंकुर प्रेमाचा ॥ ६८ ॥ तेणें अत्यंत करुणावंत । हृदयीं द्रवूनियां भगवंत । उद्बोधिलें सतीचें चित्त । ते मग धाडी त्वरित हरीपासीं ॥ ६९ ॥ पृथुकमुष्टि उपायनव्याजें । आणिले जाणूनि गरुडध्वजें । पूर्व चणकांच्या परिहारकाजें । अधोक्षजें ते भक्षिले ॥ २७० ॥ कृष्णें सेवितांचि ते पृथुक । हरला समग्र दोषकलंक । ब्राह्मण जाला निष्कलंक । जाणोनि सम्यक विभवा दे ॥ ७१ ॥ गुरुपत्नीचा आज्ञाभंग । मित्रस्वहरणाचा प्रसंग । मित्रवंचनेचाही डाग । नैष्ठुर्य निलाग आहत्काळीं ॥ ७२ ॥ कृष्ण करितां पृथुकाशन । जालें इत्यादिदोषदहन । केला ब्राह्मण श्रीसंपन्न । शक्राहून सौभाग्यें ॥ ७३ ॥

धनिकां अवश्य मदोद्भव । जाणोनि भक्तां नेदी विभव । हतभाग्य मी भजनानर्ह । म्हणोनि केशव मज वोपी ॥ ७४ ॥ ऐशी कथा ग्रंथान्तरीं । ते सूचिली अल्पोद्गरीं । यावरी ब्राह्मण निजान्तरीं । करी अवसरी श्रीलाभें ॥ ७५ ॥ यास्तव विभवीं मम मन न रमे । हरिपदसेवन भक्तिप्रेमें । इतुकेंचि द्यावें पुरुषोत्तमें । ऐसें नियमें द्विज वाञ्छी ॥ ७६ ॥ मजला न लगे सुरसंपत्ति । अढळ असो पैं श्रीपदभक्ति । ऐसा निश्चय करूनि सुमति । केली प्रवृत्ति ते ऐका ॥ ७७ ॥

इत्थं व्यवसितो बुद्ध्या भक्तोऽतीव जनार्दने । विषयाञ्जायया त्यक्षन्बुभुजे नातिलम्पटः ॥ ३८ ॥

इत्थं म्हणिजे ऐशिया परी । व्यवसायवंत निजनिर्धारीं । बुद्धि करूनि अभ्यंतरीं । वरिला श्रीहरिपदप्रेमा ॥ ७८ ॥ अतीव म्हणिजे अत्यंतभक्त । जाला जनार्दनीं अनुरक्त । हळु हळु विषयांतें त्यागीत । परम विरक्त भवविभवीं ॥ ७९ ॥ दरिद्राचा मानूनि त्रास । न करवे स्वपतीचा संतोष । म्हणोनि जायेनें द्विजास । द्वारकेस पाठविलें ॥ २८० ॥ अंतरवेत्ता श्रीभगवान । आपणा तुल्य ऐश्वर्यदान । देऊनि सतीचें समाधान । केलें पूर्ण जगज्जनकें ॥ ८१ ॥ कल्पिली न वचे मनोरथीं । अगाध अपार सुरसंपत्ती । लाहोनि स्वेच्छा सेवी पती । परि तो चित्तीं सविराग ॥ ८२ ॥ जाये सहित सकळ विषया । भोगीत असतां लंपट न होय । जळीं कमलिनीपत्रन्यायें । अलिप्त राहे हरिप्रेमें ॥ ८३ ॥ विषयीं अत्यंत लंपट नाहीं । परंतु जायेच्या भजनस्नेहीं । अंगीकारी सर्व कांहीं । विरक्त देहीं अहर्निशीं ॥ ८४ ॥

तस्य वै देवदेवस्य हरेर्यज्ञपतेः प्रभोः । ब्राह्मणाः प्रभवो दैवं न तेभ्यो बिभ्रते परम् ॥ ३९ ॥

ब्राह्मणाचें जाणोनि मन । दिधलें सप्रेम निजाङ्घ्रिभजन । सतीनें वांछिलें पतीचें भजन । श्रीसंपन्न ते केली ॥ ८५ ॥ ऐसा प्रभु जो यज्ञपति । देवदेवोत्तम चिन्मयमूर्ती । त्या हरीची ब्रह्मण्यस्थिति । पाहोनि चित्तीं द्विज कल्पी ॥ ८६ ॥ श्रीकृष्णाची ब्रह्मण्यता । देखोनि ब्राह्मण म्हणे तत्वता । विचित्र नोहे सर्वथा । श्रीभगवंता पाहोनि ॥ ८७ ॥ प्रभुत्वें ब्राणह्माहूनी थोर । कृष्णासि नाहीं दैवत अपर । ब्रह्मण्यतेचा हा निर्धार । कृष्ण साचार निगमात्मा ॥ ८८ ॥

एवं स विप्रो भगवत्सुहृत्तदा दृष्ट्वा स्वभृत्यैरजितं पराजितम् ।
तद्ध्यानवेगोद्ग्रथितात्मबंधनस्तद्धाम लेभेऽचिरतः सतां गतिम् ॥ ४० ॥

ऐशियापरी तो ब्राह्मण । भगवंताचा जो जिवलग प्राण । सुहृदाहूनि सुहृदपूर्ण । महिमा देखोन त्या समयीं ॥ ८९ ॥ लोकत्रयीं अपराजित । स्वभृत्यांहीं तो अनंत । जिंकिला ऐशांतें देखूनि त्वरित । तन्निष्ठ होत सप्रेमें ॥ २९० ॥ त्या कृष्णाचें सदैव ध्यान । करितां मन झालें उन्मन । ध्यानातिशयें आत्मबंधन । गेलें सुटोन क्षणमात्रें ॥ ९१ ॥ आत्मबंधन म्हणाल काय । तरी जो अहंकार जाळी देह । त्याचा निःशेष मोडला ठाय । चित्सुखमय द्विज जाला ॥ ९२ ॥ निरभिमान मोकळी वृत्ति । सप्रेम बाणली ध्यानस्थिती । याहूनि कोणती सायुज्यमुक्ति । कैवल्यप्राप्ति ते काय ॥ ९३ ॥

जे गति पावती ब्रह्मनिष्ठ । अल्पकाळेंचि तो द्विजवरिष्ठ । जाला तत्तेजीं प्रविष्ट । दुर्घट कष्ट न करूनि ॥ ९४ ॥ तद्धाम पावला ब्राह्मण । प्राप्तीहूनि तो म्हणाल भिन्न । ऐसें नव्हे तो समरसोन । जाला अभिन्न धामाची ॥ ९५ ॥ पृथुकाख्यान हें साद्यंत । शौनका सांगे नैमिषीं सूत । याच्या श्रवणें फळ प्राप्त । श्रीशुक कथित तें ऐका ॥ ९६ ॥

एतद्ब्रह्मण्यदेवस्य श्रुत्वा ब्रह्मण्यतां नरः । लब्धभावो भगवति कर्मबंधाद्विमुच्यते ॥ ४२ ।

ब्रह्मण्यदेव कमलावर । त्याची ब्रह्मण्यता हे जो नर । ऐकोनि होय आनंदप्रचुर । भगवत्पर तो होय ॥ ९७ ॥ पृथुकाख्यानश्रवणें करून । भगवच्चरणीं सद्भाव पूर्ण । लाहतां कर्मबंधापासून । विमोक्षण तो पावे ॥ ९८ ॥ कर्मबंधापासून मुक्त । अनन्यप्रेमें श्रीकृष्णभक्त । होऊनि मिरवे वैष्णवा आत । जेंवि हनुमंत कां गरुड ॥ ९९ ॥ ऐसें श्रीमद्भागवतीं । पृथुकाख्यान भारता प्रति । कथिलें तो हा एकाशीति । अध्याय निगुती निरूपिला ॥ ३०० ॥ पृथुकाख्यानाचें महिमान । दरिद्रदोषें दुःखी जन । तिहीं करितां श्रवण पठण । श्रीसंपन्न ते होती ॥ १ ॥ ऋणग्रस्तांचीं फिटती ऋणें । पात्र होती भगवत्करुणे । परम आरोग्य होती रुग्णें । होती भग्नें भवदुरितें ॥ २ ॥ अध्याय द्व्यशीतितम यावरी । तेथ भूपांहीं कुरुक्षेत्रीं । वृष्णि देखोनि परस्परीं । गाती वैखरी हरिगरिमा ॥ ३ ॥ श्रोतीं परिसावया ते कथा । प्रसन्न कीजे मनोरथा । पाय ठेवूनि विघ्नां माथां । निजपरमार्था साधावें ॥ ४ ॥ प्रतिष्ठानपुरनिवासी । श्रीएकनाथ चित्सुखराशि । दयार्णवें तच्चरणांपासीं । पिपीलिकेसी वसोनियां ॥ ५ ॥ पृथुकाख्यान समर्पिलें । महाराष्ट्रभाषा तें उपलविलें । श्रीहरिवरें ग्रथन केलें । वोवीप्रबंधें अतिसुगम ॥ ६ ॥ याचें भावें श्रवण करी । त्याचें संकट हरी श्रीहरि । ऐसी हरिवरदाची थोरी । जाणोनि चतुरीं अनुष्ठिजे ॥ ७ ॥ श्रीमद्भागवत दशम स्कंध । टीका हरिवरद अगाध । दशार्णवकृत परम विशुद्ध । अध्याय प्रसिद्ध एकाशीतितम ॥ ३०८ ॥

इति श्रीमद्भागवतेमहापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुक-परीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां पृथुकाख्याने भगवन्मित्रब्राह्मणसंवादे संपदुपलब्धिस्तत्पदप्राप्तिकथनंनामैकाशीतितमोऽध्यायः ॥ ८१ ॥

अधिकाश्वयुजि कृष्णे कालयुक्ताक्षिवत्सरे । अष्टम्या चन्द्रवारे तु पृथुकाख्यानमर्थितम् ॥ १ ॥

श्लोक ४२ ॥ टीका ३०८ ॥ एवं संख्या ३५० ॥
(ऐशींवा अध्याय मिळून ओवी संख्या३६,५२१)

एक्क्याऐंशीवा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ८२ वा

श्रीगणेशाय नमः । श्रीकृष्णपरमात्मने नमः । श्रीपाण्डुरंगसहाय । जें कां कैवल्यामृत परम । तो तूं सद्गुरु परब्रह्म । तुझें नामिलें श्रीपादपद्म । ग्रंथोद्यमसाफल्या ॥ १ ॥ एकाशीतितमाध्यायीं । कृष्णें ब्राह्मण निजसहाध्यायी । शक्रश्रीसम ऐश्वर्य मही- । माजि देऊनि गौरविला ॥ २ ॥ यावरी आतां द्व्यशीतितमीं । कुरुक्षेत्रीं सुकृतकामी । सूर्योपरागीं यात्रानियमीं । नृप संगमीं हरि स्तवितो ॥३॥ तेचि कथा सविस्तर । परिसावया नृप तत्पर । देखूनि निरूपणीं सादर । जाला सत्वर शुक वक्ता ॥४॥

॥ श्रीशुक उवाच ॥ अथैकदा द्वारकायां वसतो रामकृष्णयोः । सूर्योपरागः सुमहानासीत्कल्पक्षये यथा ॥ १ ॥

शुक म्हणे गा कुरुपार्थिवा । श्रवणीं सप्रेमळ तूं बरवा । जाणोनि तुझिया अंतरभावा । होय चढावा वक्तृत्वा ॥ ५ ॥ पृथुकाख्यान संपल्या वरी । हरिगुणश्रवणाची अवसरी । जाणोनि म्हणे अथ या उपरी । द्वारकापुरीं हरि वसतां ॥ ६ ॥ रामकृष्ण द्वारके माजी । ईश्वरावतार हे निर्ज्जरकाजीं । अवतरोनि यदुसमाजीं । वसत असतां ऐश्वर्यें ॥ ७ ॥ तंव द्वापरयुगाचिये अंतीं । अल्प उरल्या असतां तिथी । सूर्यग्रहणाची संप्राप्ति । केली वदंती दैवज्ञीं ॥ ८ ॥ सुतराम् वरव्या प्रकारें करून । महान म्हणिजे मोठें ग्रहण । ब्रह्मप्रळयाचि समान । परम दुश्चिह्नसूचक जें ॥ ९ ॥ ज्योतिर्विदीं परमकुशळीं । वर्तवूनि भूमंडळीं । पर्वमहिमा प्रकट केली । सुकृतशाळी जनपदीं ॥ १० ॥ जैसी ब्रह्मप्रळयावसरीं । व्यक्तिमात्र न थरे दुसरी । तेंवि खग्रासें ध्वांतारी । गगनोदरीं समयूख ॥ ११ ॥ ऐसा सूर्योपराग थोर । असता जाला दुश्चिह्नकर । जैसा ब्रह्मप्रळय घोर । तेंवि हा क्रूर खग्रास ॥ १२ ॥ दैवज्ञीं हें महापर्व । कथितां ऐकूनि पार्थिव सर्व । स्नानदानादि सत्कर्मांहें । पर्व अपूर्व मानूनियां ॥ १३ ॥ मग

ते राजे राष्ट्रें साहित । तीर्थयात्राप्रसंगोचित । निघते जाले तो वृत्तान्त । परीक्षितिवत अवधारा ॥ १४ ॥

तं ज्ञात्वा मनुजा राजन्पुरस्तादेव सर्वतः । स्यमन्तपञ्चकं क्षेत्रं ययुः श्रेयोविधित्सया ॥ २ ॥

ऐकें राया कौरवपति । सूर्योपरागातें समस्ती । पूर्वी ऐकोनि जनपदनृपती । सर्वत्र येती कुरुक्षेत्रा ॥ १५ ॥ सूर्य जयाचें अधिदैवत । तें स्यमंतपंचकनाम तीर्थ । स्नानदानाचा माहिमा अद्भुत । जाणोनि सुकृतार्थ जन येती ॥ १६ ॥ समस्त भूमंडळींचे राजे । राष्ट्रें साहित सुकृतकाजें । स्यमंतपंचक-क्षेत्रा सहजें । येते जाले यात्रार्थ ॥ १७ ॥ स्यमंतपंचक म्हणिजे काय । याचा ऐका अभिप्राय । परीक्षितीतें व्यासतनय । कथिता होय संक्षेपें ॥ १८ ॥

निःक्षत्रियां महीं कुर्वन् रामः शस्त्रभृतां वरः । नृपाणां रुधिरौघेण यत्र चक्रे महाह्रदान् ॥ ३ ॥

अब्रह्मण्य क्षत्रियजाति । वेद द्विजमुखीं विमुखवृत्ति । दुष्कृताचरणीं ज्या प्रवृत्ति । उच्छेदिती धर्मसेतु ॥ १९ ॥ ऐसियांचिया मरणोद्धरणा । विरंचीनें करूनि करुणा । भूतळीं भूभाग निर्मिला जाणा । जो दुश्चरणा क्षयकारी ॥ २० ॥ त्यावरी श्वेतवाराहकल्पीं । कुरुनामक वीर प्रतापी । सोमवंशीं अतिसाक्षेपीं । जन्म पावला भूचक्रीं ॥ २१ ॥ तेणें शासिलें जगतीचक्र । स्वधर्म संस्थापिला अवक्र । भूमंडळींचा अपर शक्र । अगाध नृपवर कुरुनामा ॥ २२ ॥ तयानें जाणोनि पावन क्षिती । अब्रह्म जे क्षत्रियजाति । जेथें निमालिया उद्धरती । परमदुष्कृति दुरात्मे ॥ २३ ॥ ऐसें सामर्थ्य जे भूभागीं । महर्षिमुखें जाणोनि वेगीं । स्वनामक्षेत्र निर्मिलें जगीं । जें अघ भंगी जगाचें ॥ २४ ॥ पुढें हैहय कार्तवीर्य । तेणें जमदग्नि द्विजवर्य । छळूनि आचरला अनार्य । जें अकार्य सद्भूपां ॥ २५ ॥ मुनि-कैपक्षास्तव भृगुपति । क्षोभला जैसा चंडदीधिति । प्रळयकाळीं भूतव्यक्ति । भंगी स्वशक्ति प्रज्वळोनी ॥ २६ ॥ इषुधिकोंदंडकुठारपाणि । वदनीं विश्रुत आम्नायखाणी । उत्पथ निर्दळी समराङ्गणीं । बाणीं बाणीं सरोष जो ॥ २७ ॥ तेणें मारूनि हैहयपति । प्रकट दाविली पितृभक्ति । पुढें सहस्रार्जुनसंतति । स्मरोनि चित्तीं दुर्वैर ॥ २८ ॥ समित्पलाशकुशप्रसूना । भृगुवर सबंधु गेला वना । जाणोनि तिहीं जमदग्निहनना । केलें ध्यानस्थ लक्षूनी ॥ २९ ॥ ग्लानि करितां रेणुका सती । तीतें निर्भर्त्सनि ते दुर्मती । जमदग्निमस्तक घेऊनि हातीं । गेले निघोनि स्वपुरातें ॥ ३० ॥ रेणुकेनें एकवीस वार । केले निजहृदयावरी प्रहार । भार्गवें ऐकोनि आर्तस्वर । आला सत्वर धांवोनियां ॥ ३१ ॥ हैहयांचें अनार्य दृष्टी । देखोनि क्षोभला जगजेठी । माहिष्मती उठाउठीं । भंगूनि कपटी निर्दळिले ॥ ३२ ॥ वाहिले रुधिराचे कल्लोळ । अरिशिरांचे केले अचळ । क्षत्रियरहित वसुधातळ । क्षोभला प्रबळ कराया ॥ ३३ ॥ करीत होत्साता निःक्षत्री भू । राम शस्त्रधरांमाजी अपर शंभु । नृपरुधिरौघें निर्मी प्रभु । ह्रद स्वयंभ कुरुक्षेत्रीं ॥ ३४ ॥ एकवीस वेळां कुटिला उर । यास्तव पृथ्वी एकवीस वार । करीन निःक्षत्री हा क्रूर । संकल्प केला भृगुवर्यें ॥ ३५ ॥ भूमंडळींच्या क्षत्रियश्रेणी । कुरुक्षेत्रीं समराङ्गणीं । वधूनि रुधिरें

नाहाणिली धरणी । पितरां तर्पणीं तोषावलें ॥ ३६ ॥ क्षत्रियरुधिराचे अगाध । रामें निर्मिले प्रचंड ह्रद । तेथिंच्या तर्पणें अमरवृंद । पावती मोद मुनिपितर ॥ ३७ ॥ पूर्वींच पावन विधीतें मही । निर्मिली तेथ कुरुनृपें पाहीं । स्वनामक्षेत्र लोकीं तिहीं । प्रसिद्ध केलें अघहरणा ॥ ३८ ॥ पुढें ते स्थळीं परशुराम । क्षत्रियरुधिरें अगाध परम । ह्रद निर्मूनि विशुद्धकाम । यजिता जाला यज्ञातें ॥ ३९ ॥

ईजे च भगवान् रामो यत्रास्पृष्टोऽपि कर्मणा । लोकस्य ग्राहयन्नीशो यथाऽन्योघापनुत्तये ॥ ४ ॥

ह्रद निर्मिले एनसहर । चकारें तेथेंचि राम अध्वर । यजिता जाला विशुद्धिकर । नैष्कर्मपर असतांही ॥ ४० ॥ साक्षात् परब्रह्म भृगुपति । अस्पृष्ट कर्माचरणाप्रति । लोकसंग्रहार्थ अघनिवृत्ति । सामान्यव्यक्ती सम आचरे ॥ ४१ ॥ निर्विकार निष्काम धाम । उत्पथमथनास्तव तो राम । अवतरोनि प्रतिष्ठी धर्म । स्वयें सकामवत लोकीं ॥ ४२ ॥ परमक्रौर्यें निर्दयवृत्तिं । वाधिल्या उत्पथक्षत्रियजाति । तया पातकाचे निवृत्ति । श्रुतिसंमति मख यजिले ॥ ४३ ॥ ऐसें पावन कुरुक्षेत्र । लोकत्रया माजि पवित्र । स्यमंतपंचक हें विचित्र । नाम सर्वत्र मुनिं पठती ॥ ४४ ॥ भूमंडळींचे भूपति सर्व । सूर्योपराग अगाध पर्व । एकोनि ठाकिती सत्कर्माहें । स्यमंतपंचक सानुग पैं ॥ ४५ ॥ राजे राजनियोगी जन । राष्ट्रीय प्रजाजन सामान्य । तीर्थयात्रा हे परम गहन । जाणोनि प्रयाण आदरिती ॥४६॥

महत्यां तीर्थयात्रायां तत्राऽऽगन्भारतीः प्रजाः । वृष्णयश्च तथाऽक्रूरवसुदेवाहुकादयः ॥ ५ ॥

भरतवर्षांतर्गत प्रजा । तीर्थयात्रार्थ पातल्या वोजा । तेथ यादवही कुरुराजा । आले भाजाकुमरेंसीं ॥ ४७ ॥ वृष्णिवंशज निघाले सर्व । श्वफल्क अक्रूर सह दाशार्ह । आहुकदेवकादि वसुदेव । राम केशव सकुटुम्ब ॥ ४८ ॥ तीर्थयात्रार्थ यादवगण । कुटुम्बें सहित रामकृष्ण । गेले तेव्हां नगरीं कोण । ठेविले रक्षण तें ऐका ॥ ४९ ॥

ययुर्भारत तत्क्षेत्रं स्वमघं क्षपयिष्णवः । गदप्रद्युम्नसांबाद्याः सुचंद्रशुकसारणैः ॥ ६ ॥
आस्तेऽनिरुद्धो रक्षायां कृतवर्मा च यूथपः ।

द्वारकादुर्गरक्षणार्थ । वीर ठेविले प्रतापवंत । ऐका त्यांचा नामसंकेत । वीरश्रीकान्त धनुर्धर ॥ ५० ॥ सारणनामा रोहिणीतनय । संकर्षणाचा अग्रज होय । ऐसाचि शुकनामा वृष्णिधुर्य । निःसीम शौर्य पैं ज्याचें ॥ ५१ ॥ चारुचंद्र जो रुक्मिणीसुत । सुचंद्र त्याचाचि नामसंकेत । सन्नद्ध बद्ध स्वबळें सहित । दुर्गरक्षार्थ स्थापिले ॥ ५२ ॥ अनिरुद्धनामा प्रद्युम्नतनय । तो या सर्वांसि केला धुर्य । कृतवर्मा जो भोजकां आर्य । शौर्यश्रीमंत सेनानी ॥ ५३ ॥ द्वारकादुर्गरक्षणासाठीं । ऐसे वीर प्रतापजेठी । ठेवूनि त्यांसि कथिली गोठी । सावध घरटी द्या म्हणूनी ॥ ५४ ॥ झणें शाल्वाचिये परी । रिक्त लक्षूनि द्वारकापुरी । बळात्कारें रिघती वैरी । यास्तव फेरी न चुकिजे ॥ ५५ ॥ दुर्गबप्रीं

रणमंडळीं । अहोरात्र रक्षक बळी । जागवावे सर्वकाळीं । यंत्रशाळी सिंहरवें ॥ ५६ ॥ ऐसी द्वारका-दुर्गगोपना । वीर प्रतापी प्रबळ सेना । ठेवूनि हस्तप्रक्षाळना । जाते जाले कुरुक्षेत्रीं ॥ ५७ ॥ देवकीची ज्येष्ठ भगिनी । देवरक्षिता वसुदेवपत्नी । तयेचा कुमार प्रतापतरणी । गदाधरानुज गदनामा ॥ ५८ ॥ वैदर्भीचा ज्येष्ठ कुमर । प्रद्युम्ननामा महावीर । त्रिजगीं ज्यातें म्हणती मार । अपर कुमर यदुकुळींचा ॥५९॥ साम्ब जाम्बवतीचा सुत । दुर्योधनाचा जो जामात । ऐसे वीर प्रतापवंत । यदुचक्रांत पुरस्सर ॥ ६० ॥ अनेकजन्मींच्या शमलक्षपणा । जाते जाले तीर्थस्नाना । दैवज्ञमुखें सूर्यग्रहणा । घेऊनि स्वगणासह पोष्यां ॥ ६१ ॥ तयांची सेना सपरिवार । प्रयाणकाळीं परम रुचिर । शोभती जाली मनोहर । ऐकें सादर कुरुसुरपा ॥ ६२ ॥

ते रथैर्देवधिष्ण्याभैर्हयैश्च तरलप्लवैः । गजैर्नदद्भिरभ्राभैर्नृभिर्विद्याधरद्युभिः ॥ ७ ॥

द्वारके बाहेर निघाले भार । समस्त यादव सह परिवार । गगनगर्भीं जैसे अमर । तैसे भासुर विराजती ॥ ६३ ॥ जैसीं अमरांचीं विमानें । जियें म्हणिजती देवधिष्ण्यें । दिव्य रहंवर तेणें मानें । भासुरपणें चापल्यें ॥ ६४ ॥ विमाननिष्ठ जैसे हंस । तैसे प्रजवीन अश्वविशेष । रथीं जुंपिले ते गगनास । पवनवेगें आक्रमिती ॥ ६५ ॥ सजलमेघा सम भासुर । दिग्गजप्राय मत्त कुञ्जर । गर्जती विद्युत्पतनाकार । प्रलयजलधरपडिपाडें ॥ ६६ ॥ गर्जीं रहंवरीं तुरंगीं नर । विद्याधरासारिखे रुचिर । त्वाष्ट्रनिर्मित अळंकार । दिसती भासुर सुरसाम्यें ॥ ६७ ॥ देव गंधर्व साध्य सिद्ध । चारण विद्याधर प्रसिद्ध । वस्वादित्यप्रमुख बुध । ते यदुवृंद साकल्यें ॥ ६८ ॥ अमरीं वेष्टित अमरपति । तैसा यदु-चक्रीं श्रीपति । विराजमान चालती पंथीं । तें तूं भूपति अवधारीं ॥ ६९ ॥

व्यरोचन्त महातेजाः पथि काञ्चनमालिनः । दिव्यस्रग्वस्त्रसन्नाहाः कलत्रैः खेचरा इव ॥ ८ ॥

तेजःपुंज दिसती सकळ । जैसें भासुर रविमंडळ । तैसें समग्र यादवकुळ । तेजबंबाळ पथीं शोभे ॥ ७० ॥ रत्नकाञ्चनमाळा कंठीं । दिव्यसुमनावतंस मुकुटीं । दिव्याम्बर शोभती तगटी । घेतल्या उटी दिव्यगंधीं ॥ ७१ ॥ रत्नखचित वज्रसन्नाह । देदीप्यमान जैसे हव्यवाह । ऐसे वीरांचे समुदाव । भासुर ग्रहगणपडिपाडें ॥ ७२ ॥ सालंकृता वस्त्राभरणीं । तरुणी स्वतेजें लोपिती तरणि । ऐसिया कळत्रीं यादवश्रेणी । जेंवि विमानीं सुरपंक्ति ॥ ७३ ॥ ऐसी द्वारकापुरींची यात्रा । कतिपय-दिवसीं क्रमूनि गोत्रा । ठाकूनि आली कुरुक्षेत्रा । अभिमन्युपुत्रा अवधारीं ॥ ७४ ॥

तत्र स्नात्वा महाभागा उपोष्य सुसमाहिताः । ब्राह्मणेभ्यो ददुर्धेनूर्वासः स्रग्युक्ममालिनीः ॥ ९ ॥

सकळ यादव कुरुक्षेत्रीं । पाहोनि विस्तीर्ण रम्य धरित्री । तेथ राहिले पोष्यकलत्रीं । स्वजन-गोत्रीं । यथासुखें ॥ ७५ ॥ तेथ रामनिर्मित ह्रदीं । सभाग्य यादवांची मांदी । स्नानें करूनि यथा-

विधी । नियमें उपोषित राहिले ॥ ७६ ॥ ब्राह्मणांकारणें धेनुदानें । साळंकृतें यथाविधानें । हेमाम्बरें स्रक्चंदनें । मंडित केलीं तें ऐका ॥ ७७ ॥ पूर्वादिवसीं कृतोपवास । ग्रहणीं होतां वलयस्पर्श । कृताह्निका ही जन अशेष । आले विशेष रामह्रदा ॥ ७८ ॥ तया रामह्रदाच्या ठायीं । विधिवत स्नानें करूनि पाहीं । गोभूहिरण्यादि सर्वही । यथाविधानें समर्पिती ॥ ७९ ॥ देश काळ द्रव्य पात्र । यथाविधि समाहित स्वगोत्र । जाणोनि दानें यथासूत्र । करिती सर्वत्र सत्क्षेत्रीं ॥ ८० ॥ दानपात्र द्विज ग्रहणकाळीं । दानें न घेती सत्कर्मशाळी । तदुदेशें जल करतळीं । संकल्पसलिलीं सोडिती ते ॥ ८१ ॥ यथाविधानें मनोमय । ध्यान करोनि सलिलीं तोय । सोडितां ते सुकृतनिचय । लाहती आम्नायाज्ञेनें ॥ ८२ ॥ मुक्तस्नानोत्तर ते दान । करितां पात्र निर्दूषण । यजमान लाहे सुकृत पूर्ण । तेंही यदुगण आचरती ॥ ८३ ॥

रामह्रदेषु विधिवत्पुनराप्लुत्य वृष्णयः । ददुः स्वन्नं द्विजाग्रेभ्यः कृष्णे नो भक्तिरस्त्विति ॥ १० ॥

पुढती रामह्रदाच्या ठायीं । मुक्तस्नानें करूनि पाहीं । अन्नदानें द्विजसमुदायीं । करिती सर्वही सप्रेमें ॥ ८४ ॥ आमुची भक्ति कृष्णीं असो । भूतीं अभिन्न कृष्णचि दिसो । कृष्णीं सस्निग्ध प्रेमा विलसो । संकल्पघोष हा करिती ॥ ८५ ॥ ऐसीं गोभूतिलाज्यदानें । याचि संकल्पें विधिविधानें । करिती पूजूनियां द्विजरत्नें । मग भोजन स्वयें करिती ॥ ८६ ॥

स्वयं च तदनुज्ञाता वृष्णयः कृष्णदेवताः । भुक्त्वोपविविशुः कामं स्निग्धच्छायाङ्घ्रिपाङ्घ्रिषु ॥ ११ ॥

भुक्तद्विजांची घेऊनि आज्ञा । करिती यदुगण मग भोजना । ज्यांचें दैवत श्रीकृष्ण जाणा । करूनि स्मरणा प्रतिग्रासीं ॥ ८७ ॥ कृष्णस्मरण ग्रासोग्रासीं । कृष्णमूर्ति निजमानसीं । कृष्णप्रेमें भोजनासी । करूनि छायेसी मग येती ॥ ८८ ॥ स्निग्ध हृद्य सुस्वादिष्ठ । कटुतिक्ताम्लक्षारोष्ण मिष्ठ । सदन्नें जेवूनियां यथेष्ट । होती उपविष्ट दुमच्छाये ॥ ८९ ॥ ज्यांची छाया पवित्रतर । नव्हती विभीतकादि हिवर । विस्तीर्ण निबिड पादप थोर । देखोनि यदुभार प्रवेशले ॥ ९० ॥ त्या वृक्षांचे छायेसि वोजा । बैसती आतपनिरसनकाजा । शिबिरामाजी कलत्रप्रजा । राहिल्या सहजा पृथकत्वें ॥ ९१ ॥ ज्यांचीं मूळेंचि अंघ्रिरूप । तिहीं करोनि प्राशिती आप । यास्तव म्हणती अंघ्रिप । बैसले समीप तच्छाये ॥ ९२ ॥ ऐसिये दुमच्छायेतळवटीं । बैसल्या वृष्णियादवथाटी । सुहृदां नृपांच्या पडती गांठी । होती भेटी यात्राङ्गें ॥ ९३ ॥

तत्रागतांस्ते ददृशुः सुहृत्सम्बंधिनो नृपान् । मत्स्योशीनरकौसल्यविदर्भकुरुसृञ्जयान् ॥ १२ ॥

तया कुरुक्षेत्राच्या ठायीं । सुहृदभूपति ससमुदायीं । इष्ट मित्र आप्त पाहीं । भेटती सर्वही पर-

स्परें ॥ ९४ ॥ शरीरसंबंधी सुहृद आप्त । देखती परस्परें समस्त । मत्स्य उशीनर कुरु त्रिगर्त । कौसल्य विदर्भ सृंजय पैं ॥ ९५ ॥

काम्बोजकैकयान्मद्रान्कुन्तीनानर्तकेरलान् । अन्यांश्चैवात्मपक्षीयान्परांश्च शतशो नृप ॥
नन्दादीन्सुहृदो गोपान्गोपीश्चोत्कंठिताश्चिरम् ॥ १३ ॥

कैकेय मद्र आणि काम्बोज । सैन्धव केरल कुन्तिभोज । यां वेगळे सहजीं सहज । पाञ्चाळादि आत्मपक्षी ॥ ९६ ॥ मागधप्रमुख जे कां पर । तत्पक्षी जे राजे इतर । शतानुशत राजे थोर । तेही समग्र पातले ॥ ९७ ॥ आणि जिवलग नंदादिक । बाळपणींचे पशुगोपक । सुहृद सखे श्रीदामप्रमुख । तेही सम्यक देखिले ॥ ९८ ॥ तैशाच गोपी स्नेहभरिता । केवळ प्रेमरसाच्या सरिता । कृष्णदर्शना उत्कंठिता । ध्याननिरता चिरकाळ ॥ ९९ ॥ रामकृष्ण नाहाणिले घरीं । ग्रास भरविले आपुल्या करीं । अंग्या टोप्या सालंकारीं । कडियेवरी वागविलें ॥ १०० ॥ हलरु गाऊनियां पालखीं । केव्हां पहुडविलें मंचकीं । क्रीडती लेकुरांमाजी कौतुकीं । या लीला अनेकी ज्या ध्याती ॥ १ ॥ अक्रूरें नेलियादारभ्य । कृष्णदृगुत्सव अलभ्य । केव्हां भेटेल पद्मनाभ । ऐशा स्वयंभ सोत्कंठा ॥ २ ॥ ऐशियांतें यात्रेमाजि । यादव देखते जाले सहजीं । तयांची प्रेमोत्कर्षवाजी । नृपसमाजीं नृप सांगे ॥ ३ ॥

अन्योन्यसन्दर्शनहर्षरंहसा प्रोत्फुल्लहृद्वक्त्रसरोरुहश्रियः ।
आश्लिष्य गाढं नयनैः स्रवज्जला हृष्यत्त्वचो रुद्धगिरो ययुर्मुदम् ॥ १४ ॥

ऐसे राजे परस्परीं । सुहृद आप्त सह परिवारीं । सम्यक म्हणिजे बरव्या परी । दर्शनें अंतरीं संतुष्ट ॥ ४ ॥ दर्शनहर्षाच्या उत्कर्षें । प्रफुल्लित परस्परें मानसें । वदनपद्माच्या विकासें । पद्मा प्रकटे पद्मालया ॥५॥ परस्परें आलिंगिती । कवळूनि गाढ हृदयीं धरिती । आनंदाश्रु नयनीं ढळती । आंगीं उठती रोमाञ्च ॥ ६ ॥ त्वचा आनंदें प्रस्फुरिता । प्रमुदित स्वेदाची आर्द्रता । पुलक टवटविले तत्त्वता । वाग्देवता पांगुळली ॥ ७ ॥ ऐसीं हर्षोत्कर्षें आंगीं । मिथः दर्शनाच्या प्रसंगीं । चिह्नें उमटलीं तत्प्रसंगीं । तीं तुजलागीं निरूपिलीं ॥ ८ ॥ परमानंद पावले ऐसा । तो तुज कथिला कुरुनरेशा । यावरी स्त्रियांच्या प्रेमोत्कर्षा । मिथा संतोषा अवधारीं ॥ ९ ॥

स्त्रियश्च संवीक्ष्य मिथोऽतिसौहृदस्मितामलापाङ्गदृशोऽभिरेभिरे ।
स्तनैः स्तनान्कुङ्कुमपङ्करूषितान्निहत्य दोर्भिः प्रणयाश्रुलोचनाः ॥ १५ ॥

दर्शनमात्रें त्या वनितांतें । सुष्ठु हृदयें प्रफुल्लितें । स्नेहोत्कर्षें वदनीं स्मितें । उदया येती परस्परें ॥ ११० ॥ स्मितावलोकें अमलापाङ्ग । तिहीं करूनि दृष्टि चाङ्ग । प्रफुल्लित पाहतां वोघ । परस्परें उचंबळे ॥ ११ ॥ तिये स्नेहवृद्धीच्या भरें । अवलोकूनि अत्यादरें । आलिङ्गिती परस्परें । कोण्या प्रकारें

तें ऐका ॥ १२ ॥ कुङ्कुमचर्चित उरोजघातें । सकुङ्कुमा कुचकुम्भातें । संघट्टिती प्रेमें बहुतें । बाहुप्रान्तें कवळोनि ॥ १३ ॥ परस्परें उभय बाहीं । स्नेहें दृढतर कवळितां हृदयीं । कुङ्कुमचर्चित कुचांच्या ठायीं । संघट्ट होतां सुखवृद्धि ॥ १४ ॥ बहुतां दिवसांच्या दर्शनें । अनुभूत सुखदुःख स्मरोनि मनें । बाष्पबिन्दु स्रवती नयनें । प्रणयकारुण्यें द्रवलेनी ॥ १५ ॥ ऐशा अंगनांचिया भेटी । स्नेहोत्कर्षें पडली मिठी । परस्परें स्रवती दृष्टी । सुखसंतुष्टीचेनि भरें ॥ १६ ॥ कथूनि स्त्रियांचा स्नेहोत्कर्ष । पूर्वोक्त नृपांचा विशेष । शुक निवेदी कुरुवर्यास । तोही अशेष अवधारा ॥ १७ ॥

ततोऽभिवाद्य ते वृद्धान्यविष्ठैरभिवादिताः । स्वागतं कुशलं पृष्ट्वा चक्रुः कृष्णकथा मिथः ॥१६ ॥

सुहृत्संबंधी नृपवर । करुसृञ्जयादि उशीनर । काम्बोज कैकय मत्स्य भद्र । नंदादि अपर व्रजौकस ॥ १८ ॥ मग ते भूपति परस्परें । सुहृद इष्ट मित्र सोयरे । नमिते जाले वृद्धाचारें । कोण्या प्रकारें तें ऐका ॥ १९ ॥ वयें धाकुटे जे जे होती । तिहीं नमिलें वृद्धां प्रति । समानवयस्यां अळंगिती । ज्येष्ठ गौरविती आशीर्वादें ॥ १२० ॥ असो नमनाचा प्रकार । स्वागत पुसती त्या नंतर । क्षेमकुशल सह परिवार । पुसोनि अंतर तोषविती ॥ २१ ॥ त्या नंतर ठायीं ठायीं । बैसोनि द्रुमाचे शीतळ सायीं । कृष्णकथा वदती पाहीं । सप्रेम हृदयीं परस्परें ॥ २२ ॥ पुढें त्या कथांचा उल्लेख । महिमा उपसंहारात्मक । नृपातें वदला श्रीशुक । तो नावेक असो आतां ॥ २३ ॥ प्रस्तुत कुन्ती स्व माहेरा । वृष्णिभोजादि सात्वत गोत्रा । देखती जाली त्या प्रकारा । सांगे नृपवरा योगीन्द्र ॥ २४ ॥

पृथा भ्रातॄन्स्वसॄर्वीक्ष्य तत्पुत्रान्पितरावपि । भ्रातृपत्नीर्मुकुन्दं च जहौ संकथया शुचः ॥ १७ ॥

पृथानामक जे कां कुन्ती । जाली स्वजनांतें देखती । बंधु बहिणी तत्संतती । पितरांप्रति आपुलिया ॥ २५ ॥ चुलते चुलत्या भाऊजया । त्यांच्या प्रजाही अवघिया । रामकृष्णां स्वभाचयां । देखोनि हृदयामाजि द्रवे ॥ २६ ॥ अभिवादनें आलिङ्गनें । यथोचित आशीर्वचनें । स्वागतप्रश्नें श्रमापहरणें । परस्परें स्वजनासी ॥ २७ ॥ सप्रेमभावें सुस्निग्ध गोष्टी । कारुण्यभावें कळवळा पोटीं । तेणें अश्रु नेत्रवाटीं । पडती भूतटीं परस्परें ॥ २८ ॥ भेटी जालिया बहुतां दिवसां । यास्तव स्मरोनि अनुभूत क्लेशां । पुसतां सांगतां तिया अशेषा । शोक अपैसा विसर्जिती ॥ २९ ॥ असो परस्परें संवाद । वसुदेवासी कुन्ती विशद । बोलती जाली तो अनुवाद । ऐका सावध क्षणैक ॥ १३० ॥

कुन्त्युवाच । आर्य भ्रातरहं मन्ये आत्मानमकृताशिषम् । यद्वा आपत्सु मद्वार्त्ता नानुस्मरथ सत्तमाः ॥ १८ ॥

कुन्ती म्हणे भो श्रेष्ठा बंधु । तुम्ही स्नेहाळ कृपासिन्धु । माझेंचि विपरित प्रारब्धु । कायसा शब्द तुम्हांवरी ॥ ३१ ॥ माझेचि अपूर्ण मनोरथ । तुम्ही असतां मी अनाथ । महा आपदा मजला प्राप्त । होतां किंचित न स्मरलां ॥ ३२ ॥ तुम्ही सर्वदा सत्तम भले । परंतु माझिये संकटवेळे ।

तुम्हांसि स्मरण नाहीं जालें । अंतर पडलें दुर्दैवें ॥ ३३ ॥ पाण्डुरायें परम अगाध । प्रतापें केले अश्वमेध । तैं भूतळींचें विबुध बुध । नमिती मत्पद श्लाघ्यत्वें ॥ ३४ ॥ पुढें आमुचें अदृष्टपाप । तेणें रायासि जाला शाप । मग वनवासीं कष्ट बहुत । भोगिले तप आचरतां ॥ ३५ ॥ पाण्डुराजा स्वर्गा गेला । आम्हां वनवासीं वियोग केला । धर्मभीमार्जुनयमलां । सहित अबळा आक्रंदे ॥ ३६ ॥ शोकदावानळीं पडिलें । दुःखउन्हाळां वरपडलें । उभय गोत्रां विघडलें । वोघीं बुडालें कर्माच्या ॥३७॥ तये संकटीं तुमचें स्मरण । करूनि विशेष केलें रुदन । तेणें कळवळोनि मुनिजन । हस्तिनापुरा पावविलें ॥ ३८ ॥ तये संकटीं मजलागूनी । स्मरलां नाहीं तुम्ही कोण्ही । ऐसी केवळ दुर्दैवखाणी । तुम्ही असोनी मी जाल्यें ॥ ३९ ॥ भीष्मबाह्लिकादिहीं सकळीं । पांचही बाळें आपंगिलीं । पुढें दुर्योधनादिकुटिळीं । विघ्नें रचिलीं पापिष्ठीं ॥ १४० ॥ भीमा विषप्रळय केला । रात्रीं त्याचा प्राण गेला । पोटीं बांधोनि वज्रशिळा । मग बुडविला गंगाजळीं ॥ ४१ ॥ ऐसिया दुःखाचे संकटीं । कीं तुम्हीं ही ऐकिली असेल गोष्टी । तथापि दैवहीन मी करंटी । म्हणोनि पोटीं न द्रवलां ॥ ४२ ॥ पांचां पुत्रां सहित मातें । कौरवीं जोहरीं जाळिलें दुश्चितें । तेथ रक्षिलें श्रीभगवंतें । विवरपथें काढूनियां ॥ ४३ ॥ विवरपथें पडिलों वनीं । घडल्या अनेक संकटश्रेणी । परि न स्मरतां तुम्ही कोण्ही । अनाथ बहिणी म्हणोनियां ॥ ४४ ॥ पुढें द्रौपदीस्वयंवरीं । कौरवांतें कळल्यावरी । कैसे वांचले म्हणती वैरी । म्हणोनि विचारीं प्रवर्तले ॥ ४५ ॥ कपटद्यूतें जिङ्कूनि सकळां । सभे गांजिली द्रुपदबाळा । मायलेंकुरां विघड केला । तैं न स्मरलां तुम्ही आम्हां ॥ ४६ ॥ असो ऐसीं कोठवरी । दुःखें स्मरोनि करूं अवसरी । तस्मात पापें होतीं पदरीं । ते सामग्री मज फळली ॥ ४७ ॥ उभें ठाकल्या दुरदृष्ट । तैं न स्मरती जिवलग इष्ट । कोण्ही न परिहरिती कष्ट । तेंचि स्पष्ट वदे कुन्ती ॥४८॥

सुहृदो ज्ञातयः पुत्रा भ्रातरः पितरावपि । नानुस्मरन्ति स्वजनं यस्य दैवमदक्षिणम् ॥ १९ ॥

दैवें जेव्हां डावलिलें । तैं कोणाचें कांहीं न चाले । सुहृद आप्त जिवलग भले । ते केतुले ते ठायीं ॥ ४९ ॥ सुहृद स्नेहाळ सोयरे ज्ञाती । पुत्र बंधु चुलते किती । मायबापही पारके होती । मा मामे माउसे कोणीकडे ॥ १५० ॥ स्वजन गणगोत धणीवरी । असोनि कोण्हीही स्मरण न करी । जयाची दैवरेखा पुरी । पाठिमोरी जैं ठाके ॥ ५१ ॥ तस्मात माझें विपरीत दैव । तुम्हां कोठूनि येईल कींव । खेद कुन्तीचा परिसोनि सर्व । बोले वसुदेव तें ऐका ॥ ५२ ॥

श्रीवसुदेव उवाच ॥ अंब मास्मानसूयेथा दैवक्रीडनकान्नरान् । ईशस्य हि वशे लोकः कुरुते कार्यतेऽथवा ॥२०॥

वसुदेव म्हणे बहिणी ज्येष्ठे । केंवि न झळंबों तुझिया कष्टें । परि आम्हां वोखटिया अदृष्टें । महासंकटें दाखविलीं ॥ ५३ ॥ निन्द्य नैष्ठुर्यशब्द आतां । झणें ठेविसी आमुचे माथां । दुरदृष्टें दिधल्या व्यथा । त्या तुज कथितां न सरती ॥ ५४ ॥ आम्ही पुतळे नर अशेष । अदृष्टसूत्रें नाचवी ईश ।

समस्त लोक ईश्वरा वश । करिती करवी तैसें ते ॥ ५५ ॥ तस्मात सर्व लोकां माथां । अदृष्टरूप ईश्वर-सत्ता । ते तूं आमुची कर्मकथा । ऐक तत्वता कल्याणी ॥ ५६ ॥

कंसप्रतापिताः सर्वे वयं याता दिशोदश । एतर्ह्येव पुनः स्थानं दैवेना सादिताः स्वसः ॥ २१ ॥

वसुदेव म्हणे अवो बहिणी । दुष्ट कंस पापखाणी । तेणें त्रासिल्या यादवश्रेणी । तैं नेदी धरणी ठाव आम्हां ॥ ५७ ॥ दाही दिशा कुटुम्बें सहित । आम्ही लागलों विपत्तीभूत । देशोदेशीं दीन अनाथ । याचकवत परिभ्रमलों ॥ ५८ ॥ असो यादवांची हे कथा । काळक्षोभ आमुचे माथां । निगड-बंधादि दुर्घट व्यथा । त्या त्वां तत्वता नायकिल्या ॥ ५९ ॥ दैवानुसार रामकृष्ण । नंदव्रजीं वांचले जाण । नष्टचर्यें गोरक्षण । केलें संपूर्ण चिरकाळ ॥ १६० ॥ नारदमुखें कंसा कळतां । तेणें प्रेरूनि गान्दिनीसुता । करावया त्यांचिया घाता । मथुरे तत्वता आणविले ॥ ६१ ॥ प्रस्तुत आमुचें दैव उदित । यास्तव कंसचि पावला मृत्य । दिगंतींहूनि आम्ही समस्त । पुन्हा मथुरेंत पावलों ॥ ६२ ॥ सफळदैवें स्वस्थानवासी । होऊनि वर्ततों जनपदेंसीं । ऐसिया आम्हांवरी तूं रुससी । कां न स्मरसी तो समय ॥ ६३ ॥ तुम्हीं रुसावें आम्हांचिवरी । परंतु आमुची हे अवसरी । जाणे एक ईश्वरगौरी । अपर संसारी नर न जाणती ॥ ६४ ॥ ऐसा पृथेसीं संवाद । केला वसुदेवें एवंविध । आणि पातला भूपाळ-वृंद । तोही विशद पूजियेला ॥ ६५ ॥

श्रीभगवान उवाच ॥ वसुदेवोग्रसेनाद्यैर्यदुभिस्तेऽर्चिता नृपाः । आसन्नच्युतसंदर्शपरमानंदनिर्वृताः ॥ २२ ॥

मत्स्योशीनरप्रमुख राजे । प्रसंगें दर्शना पातले जे जे । वसुदेवोग्रसेनादिकीं सहजें । बरवे वोजें ते पूजिले ॥६६॥ अच्युत देखोनि यादवां माजी । तया नृपांचीं चित्तें सहजीं । विगुन्तलीं गरुडध्वजीं । म्हणती आजि धन्य जालों ॥ ६७ ॥ समीप बैसोनि अच्युता निकटीं । दर्शन स्पर्शन अंगधृष्टी । सुख-संवादीं वदती गोष्टी । आनंद पोटीं न समाये ॥ ६८ ॥ निर्विषय जो परमानंद । देखोनि बळराम मुकुन्द । पावता जाला भूपाळवृंद । तो तुज विशद निरूपिला ॥ ६९ ॥ यावरी कौरव सह परिवारीं । यादवांचिया बिढागारीं । पातले समस्त ते अवधारीं । कुरुधरित्रीप्राणेशा ॥ १७० ॥

भीष्मो द्रोणोऽबिकापुत्रो गान्धारी ससुता तथा । सदाराः पाण्डवाः कुन्ती सञ्जयो विदुरः कृपः ॥ २३ ॥
कुंतिभोजो विराटश्च भीष्मको नग्नजिन्महान् । पुरुजिद् द्रुपदः शल्यो धृष्टकेतुः सकाशिराट् ॥ २४ ॥
दमघोषो विशालाक्षो मैथिलो मद्रकैकयाः । युधामन्युः सुशर्मा च ससुता बाह्लिकादयः ॥ २५ ॥
राजानो ये च राजेंद्र युधिष्ठिरमनुव्रताः । श्रीनिकेतं वपुः शौरेः सस्त्रीकं वीक्ष्य विस्मिताः ॥ २६ ॥

भीष्म द्रोण कृपाचार्य । धृतराष्ट्र तो अंबिकातनय । सह गान्धारी पुत्रनिचय । दुर्योधनादि शतसंख्य ॥ ७१ ॥ स्त्रियांसहित पाण्डव अवघे । पातले तेही ऐक ओघें । द्रौपदी धर्मराजासंगें ।

द्वितीय पत्नी पौरवी ॥ ७२ ॥ पौरवीपुत्र जो देवक । तोही पातला सम्यक । भीमपत्नी कालीनामक । सर्वगतनामा तत्पुत्र ॥ ७३ ॥ सुभद्रा उलूपी दोघी जणी । अर्जुना सहित या अर्जुनपत्नी । अभिमन्यु इरावत पुत्र दोन्ही । पाकशासनि जयन्तवत ॥ ७४ ॥ विजया सहदेवाची वधू । तत्पुत्र सुहोत्र प्रतापसिन्धु । नृपोडुगणामाजी इन्दु । शौर्यें अगाध समराङ्गणीं ॥ ७५ ॥ नकुळपत्नी करेणुमती। निरमित्रनामा तत्संतति । पांचां द्रौपदेयांची पंक्ती । प्रतिविन्ध्यादिप्रमुखांची ॥ ७६ ॥ कुन्ती संजयविदुरादिक । विराट कुन्तिभोज भीष्मक । पुरुजित नग्नजित दुपदप्रमुख । शल्य मद्रक धृष्टकेतु ॥७७॥ विराट दमघोष विशालाक्ष । मैथिल कैकेय सुशर्मा दक्ष । युधामन्यु आणि बाह्लिक । सोमदत्त भूरिश्रवा ॥ ७८ ॥ नामनिर्देशें हे निगादिले । यां वेगळे भूपाळ भले । धर्मराजातें अनुसरले । अर्थें प्राणें सर्वस्वें ॥ ७९ ॥ पूर्वी राजसूययज्ञकाळीं । दिग्विजयार्थ भूमंडळीं । भीमार्जुनीं सहदेवनकुळीं । प्रतापशाळी वश केले ॥ १८० ॥ तैंहूनि ते धर्मानुचर । होऊनि सेविती युधिष्ठिर । भीष्मप्रमुख हे नृपांचे निकर । पाहती सादर श्रीकृष्ण ॥ ८१ ॥ सामान्य मानवां समान । वृक्षस्थळीं श्रीनिकेतन । भीमकी सहित हे कृष्णतनु । होती लक्षूनि विस्मितपें ॥ ८२ ॥ श्रीवत्सचिह्न इतरां देहीं । कोण्ही देखिलें ऐकिलें नाहीं । यालागीं प्रत्यक्ष शेषशायी । हा यदुगेहीं अवतरला ॥ ८३ ॥ स्वरूपता मुक्ति दे सप्रेमळा । श्रीवत्स मिरवी हरि एकला । आम्हीं तो प्रत्यक्ष आपुले डोळां । भाग्यें देखिला नृप म्हणती ॥ ८४ ॥ ऐसे विस्मित नृपांचे गण । त्यांचें हृद्गत अवलोकून । पूजिते जाले रामकृष्ण । तें तूं श्रवण करीं राया ॥ ८५ ॥

अथ ते रामकृष्णाभ्यां सम्यक्प्राप्तसमर्हणाः । प्रशशंसुर्मुदा युक्ता वृष्णीन्कृष्णपरिग्रहान् ॥ २७ ॥

आपुलिया दर्शनोद्देशें । नृपति आले संतोषें । रामकृष्णीं परमोल्लासें । राजोपचारीं पूजियले ॥८६॥ रामकृष्णांच्या हस्तें करून । पूजा संप्राप्त जे नृपगण । ते प्रशंसिती वृष्णीलागून । धन्य म्हणून भूलोकीं ॥ ८७ ॥ कृष्णें प्रतिपाळिले जे वृष्णि । ज्यांचा प्रेमा सदैव कृष्णीं । जे न तपती त्रितापोष्णीं । मान्य वितृष्णीं गीयमान ॥ ८८ ॥ तया वृष्णींचा धन्य महिमा । जैसा गमला नृपसत्तमा । तदनुसार सुकृतगरिमा । वदती प्रेमपुरस्सर ॥ ८९ ॥

अहो भोजपते यूयं जन्मभाजो नृणामिह । यत्पश्यथासकृत्कृष्णं दुर्दर्शमपि योगिनाम् ॥ २८ ॥

जन्मवंत जे जे नर । तयां मध्यें सफळतर । तुमचेंचि जन्म धन्य रुचिर । म्हणती नृपवर भोजेन्द्र ॥ १९० ॥ अहो या आश्चर्यें करून । कैसें म्हणती जन्म धन्य । निरंतर ज्यांतें कृष्णदर्शन । योगियांलागून दुर्लभ जें ॥ ९१ ॥ ज्याच्या योगें एकही वेळ । आम्ही देखुनि श्रीगोपाळ । धन्य मानूं जन्म सफळ । तो सर्वकाळ यांपासीं ॥ ९२ ॥ अनावर मनाचिया कल्पना । तेणें जीवां पूर्ण चैतन्या । वियोग जाला म्हणोनि नाना । योनिभ्रमणा करितसे ॥ ९३ ॥ तया मनातें कल्पनारहित । करूनि

जीवां पूर्णत्व देत । वियोग भंगूनि योगयुक्त । निजात्मरत जे योगी ॥ ९४ ॥ ऐशा योगियांही दुर्दर्श । कोटि जन्म तपाचे सोस । करितां एकवार त्यांस । दर्शनास अनवसर ॥ ९५ ॥ तो हा सदैव यादवांपासीं । क्रीडे नटोनि मनुष्यवेशीं । ज्याची पूर्णता ब्रह्माण्डासी । दुःखनिराशी सुखदानी ॥ ९६ ॥ यादवांमाजि यादवपणीं । घेऊनि मानवी अवगणी । सदैव वर्ते चक्रपाणी । परि या कोण्ही न जाणती ॥ ९७ ॥

यद्विश्रुतिः श्रुतिनुतेदमलं पुनाति पादावनेजनपयश्च वचश्च शास्त्रम् ।
भूः कालभर्जितभगापि यदंघ्रिपद्मस्पर्शोत्थशक्तिरभिवर्षति नोऽखिलार्थान् ॥ २९ ॥

ज्याची त्रिजगीं अमळ कीर्ति । शश्वत स्वमुखें श्रुति स्तविती । पादावनेजन भागीरथी । पावनकर्त्री त्रिजगातें ॥ ९८ ॥ निगमरूप ज्याची गिरा । स्वशासनीं चराचरा । शिक्षित करी प्राणिनिकरां । शास्त्रनिर्धारा नियमूनियां ॥ ९९ ॥ तस्मात शास्त्ररूप ज्याची वाणी । तो हा प्रत्यक्ष पंकजपाणी । प्रकट नांदे यादवसदनीं । ऐश्वर्यश्रेणीसमवेत ॥ २०० ॥ हें असो आम्हां प्रत्यय एक । बाणला असे निज निष्टंक । जो जाणती समस्त लोक । तोही सम्यक अवधारा ॥ १ ॥ कृतयुगीं प्रकटावेभवें । पूर्णैश्वर्यें भूमी मिरवे । त्रेतीं त्रिपाद धर्मा नामें । क्षीणदैवें चतुर्थांशें ॥ २ ॥ द्वापरीं द्विपाद धर्म जाहला । तैं अर्ध ऐश्वर्या मुकली इळा । प्रस्तुत उदेजतां कळिकाळा । धर्म जाला एकाङ्घ्री ॥ ३ ॥ यास्तव भूमी कळिकाळवेगा । प्रदीप्त होतां भर्जितभगा । जाली सर्वत्र दुर्भगा । ऐश्वर्यौघा अंतरली ॥ ४ ॥ वेदाध्ययनें नव्हती साङ्ग । सन्मार्गाचा जाला भंग । दुराचारी अवघें जग । नव्हती याग विध्युक्त ॥ ५ ॥ तेणें होती खंडवृष्टी । निर्जळ सहजीं सहज सृष्टी । फळ दळ पुष्प न पडे दृष्टी । जनपद कष्टी क्षुत्क्षाम ॥ ६ ॥ ऐसी कळिकाळप्रवाहीं । भर्जितभाग्य असतां मही । कृष्णपादस्पर्शें पाहीं । दुभे सर्वही ऐश्वर्यें ॥ ७ ॥ कृष्णपादस्पर्शें शक्ति । लाहोनि पृथ्वी ऐश्वर्यवती । आम्हां नृपांतें सर्व संपत्ती । वर्षे त्रिजगती सुभगत्वें ॥ ८ ॥ कृतयुगीं पूर्णपणें । पृथ्वी दुभे ऐश्वर्यगुणें । तैसी स्पर्शतां श्रीकृष्णचरणें । आम्हां कारणें कळिकाळीं ॥ ९ ॥ एवं आम्हां भूपाळवर्गां । कृष्ण आनंददायक त्रिजगा । परंतु यादवांचिया विभागा । आला अवघा तें परिसा ॥ २१० ॥

तद्दर्शनस्पर्शनानुपथप्रजल्पशय्यासनाशनसयौनसपिंडबंधः ।
येषां गृहे निरयवर्त्मनि वर्ततां वः स्वर्गापवर्गविरमः स्वयमास विष्णुः ॥ ३० ॥

आम्हां अथवा इतरांप्रति । दुर्लभ दर्शनाची प्राप्ति । तो श्रीविष्णु तुह्मांप्रति । सुलभ सर्वार्थीं सर्वस्वें ॥ ११ ॥ तरुणां वृद्धां बाळां अबळां । नित्य सुलभ दर्शनसोहळा । यथाधिकारें स्पर्श सकळां । उचित वेळा जाणोनी ॥ १२ ॥ मार्गीं चालतां अनुगमनें । प्रजल्प म्हणिजे संभाषणें । शयनीं एकत्र पहुडणें । लेंकुरपणें स्निग्धत्वें ॥ १३ ॥ एकासनीं सभास्थानीं । एक पंक्ती सहभोजनीं । यौन म्हणिजे विवाहलग्नीं । शरीरसंबंधप्रसंगें ॥ १४ ॥ गोत्रसंबंध सपिण्डयोग । अथवा सप्रेम मैत्रप्रसंग । विलास नर्मोक्तियादि

चांग । हा अवघा संयोग ज्या तुमसीं ॥ १५ ॥ येणें करूनि विशेष काय । कोणता लाभ या माजी आहे । तरी तो ऐका म्हणती राये । भोजवर्यादि वृष्णींतें ॥ १६ ॥ जया तुमचे गृहीं विष्णु । स्वयें अवतरला श्राजिष्णु । तुम्हां करोनि भवतितृष्णु । स्वसुखसंपन्न भवनिलयीं ॥ १७ ॥ केवळ संसार मोहप्रचुर । तेथ गृह तें कारागार । टाकावया निरयपूर । मार्ग दुस्तर भवश्रम हा ॥ १८ ॥ ऐसिया निरयमार्गाच्या ठायीं । तुम्हां सुलभ शेषशायी । स्वर्ग मोक्ष दोहीं विषयीं । तृष्णा कांहीं न उरों दे ॥ १९ ॥ इहामुष्मिक नश्वर क्षणिक । बंधाविण मोक्षही फोक । कृष्ण कैवल्यसच्चित्सुख । सुलभ सम्यक ज्या तुमतें ॥ २२० ॥ मोक्षाहूनि विशेषतर । कृष्ण सच्चित्सुखसागर । तत्सहवासें तुम्ही सधर । म्हणती नृपवर भोजपते ॥ २१ ॥ यालागीं जन्मा भजतयांमाजी । सफळ जन्म तुमचेंचि सहजीं । जे सहवासें गरुडध्वजीं । रंगूनि दुजी गती नेणां ॥ २२ ॥ कृष्ण केवळ कैवल्यधाम । आप्तभावें तुम्हां तत्प्रेम । यास्तव न बाधी भवसंभ्रम । भाग्य निःसीम हें तुमचें ॥ २३ ॥ ऐसा नृपांहीं कृष्णमहिमा । प्रशंसिला भोजसत्तमा । यावरी नंदागमनगरिमा । श्रीशुकनामा नृपा कथी ॥ २४ ॥

श्रीशुक उवाच । नन्दस्तत्र यदून्प्राप्ताञ्ज्ञात्वा कृष्णपुरोगमान् ।
तत्रागमद्वृत्तो गोपैरनस्थार्थैर्दिहक्षया ॥ ३१ ॥

पूर्वी नृपांचिया आगमनीं । नंदागमन बादरायणी । वदला तेंचि हें व्यारूयानीं । सिंहालोकनीं निरूपी ॥ २५ ॥ महापर्वकाळ उपरागयात्रा । करावयाकारणें कुरुक्षेत्रा । यादव आले हें नंदश्रोत्रा । वार्तामात्र स्पर्शतां ॥ २६ ॥ उताविळ अंतःकरणीं । यादव आले हें जाणोनी । रामकृष्णप्रमुख वृष्णि । भेटीलागूनि हरिखेला ॥ २७ ॥ आणिके ठायीं जरी उतरावें । तरी दूरस्थदर्शना यावें जावें । कृष्णा सहवास तेणें न फवे । ऐशिया भावें उताविळा ॥ २८ ॥ वोझीं तैसींच गाडियांवरी । यात्रोपकरण सर्व सामग्री । आला यादवां शेजारीं । धरूनि अंतरीं दर्शनेच्छा ॥ २९ ॥ यादवांसमीप प्रशस्त मही । देखोनि नंद उतरला पाहीं । कितेक राहिले दुमाचे ठायीं । वस्त्रगृहीं कितेक ॥ २३० ॥

तं दृष्ट्वा वृष्णयो हृष्टास्तन्वः प्राणमिवोत्थिताः । परिषस्वजिरे गाढं चिरदर्शनकातराः ॥ ३२ ॥

देखोनि अकस्मात नंदातें । वृष्णि पावती आनंदातें । ग्राण येतां शरीरातें । तेंवि सचेत ऊठियले ॥ ३१ ॥ अवचिता नंद पडतां दृष्टी । परमानंद उथळला पोटीं । सर्व उठिले झडझडाटीं । सप्रेम कंठीं आलिंगिती ॥ ३२ ॥ बहुतां दिवसांचें दर्शन । तेणें सप्रेमभरित मन । हृदयीं गाढ आलिङ्गन । देतां नयन पाझरती ॥ ३३ ॥

वसुदेवः परिष्वज्य संप्रीतः प्रेमविह्वलः । स्मरन्कंसकृतान्क्लेशान्पुत्रन्यासं च गोकुले ॥ ३३ ॥

वसुदेव देखोनि नंदाप्राति । हृदयीं कवळूनि परमप्रीति । स्नेहें विह्वल जाली वृत्ति । स्मरे चित्तीं

उपकार ॥ ३४ ॥ कंसें आपणा दिधले क्लेश । ते ते स्मरोनियां अशेष । तैं गोकुळीं पुत्रन्यास । केला निःशेष तो आठवी ॥ ३५ ॥ कंसें आम्हां रोधिलें निगडीं । यादव जाले देशोघडी । कोण्ही न पवे ते सांकडीं । भयें हडबडी भूभाग ॥ ३६ ॥ कोठें ठाव नेदी मही । समीप न ठाके कोण्हीही । दादो तुम्ही ऐसिये समयीं । लेंकुरां दोहीं वांचविलें ॥ ३७ ॥ आप्त जाणोनियां आमुचे । कंस लुंठन करी त्यांचें । हृदय करूनियां वज्राचें । केलें कुमरांचें पाळण तां ॥ ३८ ॥ तुझा उपकार सविस्तरी । लिहितां न पुरे हे धरित्री । आनंदाश्रु ढळती नेत्रीं । सद्गदवक्त्रीं हें वदतां ॥ ३९ ॥ तंव पातले राममुरारी । नंदयशोदे देखोनि नेत्रीं । मस्तकें ठेवूनि चरणांवरी । दंडापरी वंदूनियां ॥ २४० ॥

कृष्णरामौ परिष्वज्य पितरावभिवाद्य च । न किञ्चनोचतुः प्रेम्णा साश्रुकण्ठौ कुरूद्वह ॥ ३४ ॥

कंठीं घालूनियां मिठी । पितरें कवळिलीं सस्निग्ध भेटी । प्रेमें शब्द न फुटे कंठीं । नेत्रपाटीं जळ वाहे ॥ ४१ ॥ कौरवधुर्या परीक्षिति । ऐसी रामकृष्णांप्रति । अवस्था जाकळी ते तुज निगुती । नोहे शक्ति मज कथनीं ॥ ४२ ॥

तावात्मासनमारोप्य बाहुभ्यां परिरभ्य च । यशोदा च महाभागा सुतौ विजहतुः शुचः ॥ ३५ ॥

तैसेचि नंदें हृदयीं गाढ । रामकृष्ण कवळिले दृढ । यशोदाही प्रेमारूढ । दोहीं बाहीं आलिङ्गी ॥ ४३ ॥ सुस्निग्धप्रेमाचिये भरीं । पंच वर्षांच्या लेंकुरांपरी । दोघां घेऊनि अंकावरी । अश्रु नेत्रीं विसर्जिती ॥ ४४ ॥ नेत्रीं स्रवती बाष्पबिन्दु । कीं तो वियोगदुःखासिन्धु । तेणें मागें लोटतां खेदु । जाणों सद्यः परिहरिला ॥ ४५ ॥ नेत्र परिमार्जूनिं हातीं । विशोक अंतर स्थिरावितीं । सुस्निग्ध सप्रेमाची जाती । पुढती पुढती उचंबळे ॥ ४६ ॥

रोहिणी देवकी चाथ परिष्वज्य व्रजेश्वरीम् । स्मरन्त्यौ तत्कृतां मैत्रीं बाष्पकण्ठ्यौ समूचतुः ॥ ३६ ॥

तंव रोहिणी देवकी प्रीति । नमस्कारूनि नंदाप्रति । यशोदेतें आलिङ्गिती । पूर्वील स्मरती स्नेहमैत्री ॥ ४७ ॥ कंठ दाटले वोरसभरें । मुखें शब्द न उच्चारे । ऐसी अवस्था परस्परें । स्फुंदती अंतरें द्रवलेनी ॥ ४८ ॥ मग वसुदेवादि यादवगणीं । नंद बैसविला निजासनीं । यशोदेतें सुखासनीं । देवकी रोहिणी बैसविती ॥ ४९ ॥

का विस्मरेत वां मैत्रीमनिवृत्तां व्रजेश्वरि । अवाप्याप्यैन्द्रमैश्वर्य यस्या नेह प्रतिक्रिया ॥ ३७ ॥

देवकी रोहिणी यशोदेसी । म्हणती व्रजेश्वरी कल्याणराशी । तुमची मैत्री हृदयकोशीं । अहर्निशी स्मरत असों ॥ २५० ॥ ब्रह्माण्डभरी उपकार तुमचा । सर्वथा वदों न शकवे वाचा । निवृत्ति-

कारण असतां साचा । अनिवृत्ति आमुचा जीव जाणे ॥ ५१ ॥ इंद्रलक्ष्मीही जालिया प्राप्त । तदैश्वर्यें होऊं अंकित । तथापि प्रतिक्रिया किंचित । नहूं समर्थ करावया ॥ ५२ ॥ बोलों न शकवेचि सर्वथा । मौन आदरी वाग्देवता । तथापि अल्पस्वल्प उच्चारितां । त्या संकेता परिसिजे ॥ ५३ ॥

एतावदृष्टपितरौ युवयोः स्म पित्रोः सम्प्रीणनाभ्युदयपोषणपालनानि ॥
प्राप्योषतुर्भवति पक्ष्म ह यद्वदक्ष्णोर्न्यस्ताव कुत्र च भयौ न सतां परः स्वः ॥ ३८ ॥

रामकृष्ण हीं लेंकुरें तान्हीं । गुप्त ठेविलीं तुमचिये सदनीं । जननी जनक यां लागूनी । मुळींहूनी अदृष्ट ॥ ५४ ॥ जयांसी नाहीं जन्ममरण । त्यांचे जननीजनक कोण । मा ते देखती कैं कोठून । गिरा हें वचन प्रतिपादी ॥ ५५ ॥ तस्मात तुम्हीच माता पिता । तुमच्या ठायींच पितृत्व तत्वता । ठेविलें मुळींहूनि तत्वता । सर्व लालनता पावलें ॥ ५६ ॥ तुम्हीं उत्संगीं कडिये खांदां । वाहूनि पाविवलें प्रमोदा । भातुकियाच्या अनेक स्वादा । चाखवूनियां लाविलें ॥ ५७ ॥ अंग्या टोप्या पादत्राणें । फडक्या वोढण्या कटिबंधनें । हेमरत्नांचीं विचित्राभरणें । बहुतां गुणें बहु केलीं ॥ ५८ ॥ ऊर्जित अभ्युदय जिताणी । गृहशान्त्यर्थ जोशी जाणी । देवदेव्हारे पुंसवणी । केली सांडणी पायरवीं ॥ ५९ ॥ व्रतें यात्रा सायास नवस । यास्तव केले तुम्हीं बहुवस । दांत डोळे अनेक क्लेश । साहिले विशेष बालत्वीं ॥ २६० ॥ साय दुग्ध दधि नवनीत । शर्करा सद्यस्तप्त घृत । मक्षिकासंभवमधुमिश्रित । तुम्हीं यां संतत कवळ दिल्हे ॥ ६१ ॥ अनेक पक्वान्नपरवडी । बाळच्छंदें घातली कोडी । ती ती पुरविली आवडी । नाहीं सवडी दाखविली ॥ ६२ ॥ विचित्र परोपरीचीं पक्वान्नें । पायस संयाव शुभ्र परमान्नें । घृतपाचितें दिव्य ओदनें । नृपाशनार्हें जेवविलीं ॥ ६३ ॥ स्तनपानादि धारोष्ण क्षीर । प्राशवूनियां निरंतर । वाढविले हे उभय कुमर । हा उपकार केंवि फिटे ॥ ६४ ॥ नाना खेळांचिया परवडी । देऊनि पुरविली आवडी । दिसों न दिधलीं बापुडीं । नाना सांकडीं सोसिलिया ॥ ६५ ॥ कंसभयाच्या संकटीं । विघ्नें सोशिलीं कोट्यनुकोटी । येव्हडी साहोनियां अटाटी । नुमसां गोठी कोठें कैं ॥ ६६ ॥ पोषण पालन ऐसिया परी । तुम्हांपासूनि राममुरारी । पावोनि वाढले तुमचे घरीं । गोष्टी दुसरी न जाणतां ॥ ६७ ॥ तुम्हीच केवळ मातापिता । ऐशी भावना यांचिया चित्ता । न विसंबलां रक्षण करितां । नेत्रपातांचिया परी ॥ ६८ ॥ पातीं सदैव रक्षिती बुबुळां । तैसे परी तुम्ही या बाळां । यास्तव निर्भय खेळती खेळां । मनें मोकळा वावरूनी ॥ ६९ ॥ तस्मात सदय सज्जनांसी । भावना नाहीं स्वपर ऐसी । हें काय वदिजे तुम्हांपाशीं । परि सदैव मानसीं स्मरत असों ॥ २७० ॥ ऐशी देवकी रोहिणी । यशोदेप्रति उपकारश्रेणी । स्मरोनि वदल्या मंजुळवाणी । त्या घातल्या श्रवणीं नृपाचिये ॥ ७१ ॥ त्या वरी गोपींचा वोरस । विरहिणींचा संभ्रमरस । वाखाणील व्यासौरस । तोही विशेष अवधारा ॥ ७२ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ गोप्यश्च कृष्णमुपलभ्य चिरादभीष्टं यत्प्रेक्षणे दृशिषु पक्ष्मकृतं शपन्ति ।
दृग्भिर्हृदीकृतमल परिरभ्य सर्वास्तद्भावमापुरपि नित्ययुजां दुरापम् ॥ ३९ ॥

गोपी पावोनि कृष्णसान्निध्य । संतत ध्यानयोगें जें साध्य । चिरकाळ अभीष्ट आत्माराध्य । म्हणती विरोध विधिकृत हा ॥ ७३ ॥ बहुतां दिवशीं प्रियतमभेटी । यास्तव प्रेक्षणीं आवडी मोठी । परंतु विधीची करणी खोटी । जे पक्ष्मणीं दृष्टि वृथा केल्या ॥ ७४ ॥ या लागीं शापिती विधातिया । म्हणती पातीं कां डोळियां । निर्मिली त्यांची विमेषक्रिया । हरि पहावया विक्षेपक ॥ ७५ ॥ अंगुळें मोडूनि कडकडाटीं । विधातियावरी क्षोभती पोटीं । कृष्णमूर्ति प्राशूनि दृष्टी । नेती भेटी हृदयकमळा ॥ ७६ ॥ हृदयीं नेऊनि कृष्णध्यान । देती सप्रेम आलिङ्गन । ठाकती कृष्णमय होऊ । ताटस्थ्य संपूर्ण तनुभावा ॥ ७७ ॥ योगाभ्यासी योगारूढ । त्यासिही प्राप्ति जे अवघड । ते चित्सुखावाप्ति लाहती उघड । प्रपंचकावाड विसरूनी ॥ ७८ ॥ ऐसिया स्वपादनिरता गोपी । जाणोनियां विश्वव्यापी । सभा सांडूनियां साक्षेपीं । तत्प्रेम जोपी तें ऐका ॥ ७९ ॥

भगवांस्तास्तथाभूता विविक्त उपसङ्गतः । आश्लिष्यानामयं पृष्ट्वा प्रहसन्निदमब्रवीत ॥ ४० ॥

षड्गुणैश्वर्यसंपन्न । यालागीं सर्वज्ञ श्रीभगवान । गोपीहृद्गत अनुभवून । एकान्तस्थान प्रवेशला ॥ २८० ॥ गोपी पावल्या चित्सुखावाप्ति । हृदयीं कवळूनि आपुली मूर्ति । ऐसें जाणोनि कमलापति । तयां एकान्तीं भेटला ॥ ८१ ॥ विविक्तस्थानीं अंतरवेत्ता । जाला गोपींतें आळंगिता । अंतरबाह्य पूर्णावस्था । त्या तन्मयता अनुभविती ॥ ८२ ॥ ऐसिया गोपी कवळूनि हृदयीं । विश्रान्ति पाविल्या अक्षयी । क्षेम कुशल अनामयीं । प्रश्नप्रवाहीं श्रम नुरवी ॥ ८३ ॥ हास्यवदनें गोपींप्रति । मधुरोत्तरीं कमलापति । बोलता जाला तेंचि श्रोतीं । एकाग्रवृत्ति परिसावें ॥ ८४ ॥

अपि स्मरथ नः सख्यः स्वानामर्थचिकीर्षया । गतांश्चिरायिताञ्शत्रुपक्षक्षपणचेतसः ॥ ४१ ॥

स्वमुखें सख्या वो त्यां यदुपति । म्हणे स्मरतां कीं आम्हांप्रति । बहुदिवसांची वियोगप्राप्ति । जाली विस्मृत्ति कीं काय ॥ ८५ ॥ सख्या वो स्मरतां कीं आमुतें । आम्ही गुन्तलों स्वजनस्वार्थें । स्वजनां प्रिय तें करावयार्थें । आसक्त चित्तें चिरकाळ ॥ ८६ ॥ म्हणाल चिरकाळ कां गुन्तलां । तरी शत्रुपक्षाचा क्षय इच्छिला । तत्साधनीं हव्यास चढला । यास्तव क्रमला बहुसमय ॥ ८७ ॥ ऐसिया आम्हांतें जाणोनी । झणें शंका कराल मनीं । तेचि स्वमुखें चक्रपाणि । वर्णी कर्णी तें ऐका ॥ ८८ ॥

अप्यवध्या यथास्मान्स्विदकृतज्ञाविशङ्कया । नूनं भूतानि भगवान्युनक्ति वियुनक्ति च ॥ ४२ ॥

हरि म्हणे सख्या वो ऐका । आम्हांप्रति झणें या कळंका । लावूनि हृदयीं मानाल शंका । अकृतज्ञपंका लेवूनी ॥ ८९ ॥ म्हणाल आमुचे कृतोपकार । सर्व विसरूनियां गिरिधर । आमुचा त्याग करूनि दूर । होऊनि इतर वशिन्नला ॥ २९० ॥ कांहीं एक शंका ऐसी । स्पर्शली म्हणों तुम्हां मानसीं । तरी आम्हांपासूनि गोष्टी तैसी । दिसोनि आली यथार्थ ॥ ९१ ॥ इये शंकेचा परिहार । ऐका साध्वी

हो सचार । दैवाधीन प्राणिमात्र । भगवत्तंत्र वर्ततसे ॥ ९२ ॥ दैवास्तव श्रीभगवान । करितो एक संयोजन । तैसेंचि एका वियोगें करून । करितो भिन्न दूरतर ॥ ९३ ॥ तस्मात संयोगवियोग । भगवत्सत्तेचा प्रसंग । दैवाधीन अवघें जग । पावे निलाग घडविघडी ॥ ९४ ॥ हेंचि उमजे तुम्हांप्रति । तैसी ऐका दृष्टान्तरीति । म्हणे गोपींतें श्रीपति । तें नृपाप्रति शुक सांगे ॥ ९५ ॥

वायुर्यथा घनानीकं तृणं तूलं रजांसि च । संयोज्याक्षिपते भूयस्तथा भूतानि भूतकृत् ॥ ४३ ॥

दैववायु जैसा स्वबळें । वेगळीं करी घनमंडळें । सजळ उचलळीं जलदबळें । करी वेगळे तद्विन्दु ॥ ९६ ॥ किंवा एके स्थळींचीं तृणें । अनेक स्थळीं त्यां कारणें । गगनीं भवंडूनि टाकी प्रुवनें । तेंवि रजःकण भूतळींचे ॥ ९७ ॥ एके स्थळींचे पांसु उडती । अनेक स्थळीं जाऊनि पडती । दैववायूची हे ख्याती । घडूनि विघडती तद्योगें ॥ ९८ ॥ तैसा भूतांतें भूतकर्ता । दैवसूत्रें नाचविता । तस्मात दोष भूतां माथां । कोण्या अर्थे स्थापावा ॥ ९९ ॥ एवं दोष आम्हांवरी । तुम्हीं न ठेविजे निर्धारीं । दैवसूत्र ईश्वरा करीं । चेष्टवी त्या परी जन चेष्टे ॥ ३०० ॥ असो परिहार हा परता । परंतु तुमची सभाग्यता । जे मद्वियोगें विरह करितां । फावला पुरता मत्प्रेमा ॥ १ ॥

मयि भक्तिर्हि भूतानाममृतत्वाय कल्पते । दिष्ट्या यदासीन्मत्स्नेहो भवतीनां मदापनः ॥ ४४ ॥

निश्चयेंसीं माझी भक्ति । कैवल्यदायिनी भूतांप्रति । त्याहूनि तुम्हांसि विशेष प्राप्ति । जाली निश्चिती मद्विरहें ॥ २ ॥ दिष्ट्या म्हणिजे परम कल्याण । संपादलें तुम्हांलागून । जे मद्वियोगाविरहें पूर्ण । जालां मन्मन नित्यवें ॥ ३ ॥ वियोगविरहें मन्मन जालां । तैं मत्प्राप्तीच्या भुवनां आलां । म्हणाल स्नेहें पाविजे तुजला । तो तूं कळला पाहिजेसी ॥ ४ ॥ तुझी प्राप्ति कोणती कैसी । आम्हीं पूर्वी रासविलासीं । भोगिल्या नंतर वियोगासी । देऊनि गेलासि चिरकाळ ॥ ५ ॥ तैं काय प्राप्ति जाली नव्हती । पुढें होणार ते कोणती । सगुण निर्गुण कैसे रीती । ऐसें चित्तीं भावाल ॥ ६ ॥ तरी जें वास्तव स्वरूप माझें । सावध परिसा कथितों ओजें । जेथूनि द्विभुजें चतुर्भुजें । स्वभक्तकाजें धरी रूपें ॥ ७ ॥ मायावलंबें अवगणी । सुरभूसुरभूपाळगणीं । धरिली जे हे सगुणपणीं । कैवल्यदानी ते भजकां ॥ ८ ॥ परंतु माझें वास्तव स्वरूप । ऐका सख्या हो कथितों अल्प । तुम्ही जाणोनि तो संक्षेप । सांडा विकल्प अंतरींचा ॥ ९ ॥

अहं हि सर्वभूतानामादिरंतोऽन्तरं बहिः । भौतिकानां यथा खं वार्भूर्वायुर्ज्योतिरंगनाः ॥ ४५ ॥

दृष्टान्तद्वारा बोधीन जैसें । वास्तव स्वरूप जाणोनि तैसें । स्वस्थ करावीं निजमानसें । हें जगदीशें बोधूनी ॥ ३१० ॥ म्हणे ऐका वो साजणी । सर्व भूतें मजपासूनी । या लागीं आदि मी त्यां लागूनी । अंतःकरणीं हें समजा ॥ ११ ॥ मजपासूनि भूतें जालीं । होऊनि परतीं कोठें गेलीं । मजमाजीच

व्यवहारलीं । यास्तव बोली मध्य मी हे ॥ १२ ॥ मान पुरलिया पावती अंत । तैंही मजमाजी होती निवान्त । स्वप्नद्रष्टा जेंवि जागृत । स्वप्न समस्त एकाकी ॥ १३ ॥ आदिमध्यान्तबहिरंतरीं । सर्व भूतीं निर्विकारी । यदर्थीं गोपींतें म्हणे हरि । ऐका सुन्दरी दृष्टान्त ॥ १४ ॥ जडें भौतिकें शरावादिकें । त्यांमाजि पंचभूतें व्यापकें । साद्यंत सबाह्य जेंवि अचुकें । कदापि पृथकें नव्हती तीं ॥ १५ ॥ पृथ्वी शरावा कारण जाली । नाहीं पृथ्वीपणा मुकली । पृथ्वीमाजि व्यवहारली । अंतीं मिनली निजरूपा ॥ १६ ॥ तरंग जाला जळा पोटीं । तरी काय जळासी पडली तुटी । व्यवहारला जळा पोटीं । जळाचिये पोटीं सांठवला ॥ १७ ॥ तेंवि अंडजादि चारी खाणीं । माजि जितुक्या जीवश्रेणी । त्यांमाजि सबाह्य व्यापकपणीं आदिनिदानीं मी तैसा ॥ १८ ॥ तयांमाजि तुम्हांसि प्राप्ति । विरहप्रेमें जाली सती । येथ शंका कराल चित्तीं । जे सर्वभूतीं सम कीं तूं ॥ १९ ॥ भोग्यस्थानीं सर्व भूतें । भोक्ता आत्मवें तूं तेथें । विशेष सर्वांहूनि आमुतें । प्राप्ति कोणती म्हणाल ॥ ३२० ॥ तरी ऐका वो तुम्हांप्रति । विशेष मत्प्राप्ति कोणती । स्वमुखें सांगे कमलापति । तें येथ श्रोतीं परिसावें ॥ २१ ॥

एवं ह्येतानि भूतानि भूतेष्वात्मात्मना ततः । उभयं मय्यथ परे पश्यताभातमक्षरे ॥ ४६ ॥

शरावादि जडें भौतिकें । त्यांमाजि महाभूतें व्यापकें । साद्यंत सबाह्य अभिन्नात्मकें । ऐसें विवेकें कळलें कीं ॥ २२ ॥ तैसींच चहूं खाणींच्या ठायीं । जितुकीं भौतिकें शरीरें पाहीं । वर्तती साद्यंत सबाह्यीं । कारणभूतीं भौतिकें ॥ २३ ॥ शरावां आणि योनिप्रभवां । भूतां भौतिकां अविशेष बरवा । परि भोक्तियाच्या व्यापकभावा । माजि व्यापकता त्यां नाहीं ॥ २४ ॥ भौतिकें शरीरें तितुकीं भोग्यें । आत्मा भोक्ता तदंतरंगें । त्या आत्मयातें व्यापकयोगें । भूतें भौतिकें न व्यापिती ॥ २५ ॥ भौतिकां व्यापूनि वर्तती भूतें । भौतिकें स्वकारणीं साद्यंतें । आत्मा चिदाभास अलिप्त तेथें । भूतां भौतिकां अव्याप्त ॥ २६ ॥ भूतां भौतिकां आत्मा व्यापक । परि तो त्यांचेनि अव्यापक । भूतें भोग्यें भोक्ता सम्यक । चिदाभास चिन्मय जो ॥ २७ ॥ चिदाभास तो जो जीव । आणि भूतांचा समुदाव । द्विधारूपें जे हे माव । माझ्या रूपीं आभासे ॥ २८ ॥ मी नित्य निर्विकार । प्रकृतीहूनि पर अक्षर । तेथें आभासती साचार । भोग्यभोक्तार दोन्हीही ॥ २९ ॥ माझिया सगुणविरहप्रेमें । भवतमभ्रमाच्या विरामें । सदैव रंगतां निष्कामकामें । मदूपप्राप्ति विशेष हा ॥ ३३० ॥ तैसी अविनाश मदूपप्राप्ति । सगुणविरहें तुम्हांप्रति । लाधली हें जाणा चित्तीं । वृथा मद्भक्ति हों न शके ॥ ३१ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ अध्यात्मशिक्षया गोप्य एवं कृष्णेन शिक्षिताः ।
तदनुस्मरणध्वस्तजीवकोशास्तमध्यगन् ॥ ४७ ॥

शुक म्हणे गा कौरवपाळा । परम धन्य त्या पशुपबाळा । विरहप्रेमें श्रीगोपाळा । भजोनि पावल्या कैवल्य ॥ ३२ ॥ अध्यात्मशिक्षेच्या उपदेशें । त्यांतें निजरूप श्रीपरेशें । बोधिलें मग त्या तत्प्रकाशें । जीवत्वदशे मुकलिया ॥ ३३ ॥ वास्तवस्वरूपाच्या अनुस्मरणें । जीवकोशा ध्वस्त करणें ।

अमृतत्वीं त्यां समरसणें । तथापि भजनें न संडिती ॥ ३४ ॥ ऐसियापरी लाधल्या कृष्ण । गृहव्यासंगें झणें विस्मरण । होईल म्हणोनि तत्पदस्मरण । याचिती श्रवण तें कीजें ॥ ३५ ॥

आहुश्च ते नलिननाभ पदारविन्दं योगेश्वरैर्हृदि विचिन्त्य मगाधबोधैः ।
संसारकूपपतितोत्तरणावलम्बं गेहं जुषामपि मनस्युदियात्सदा नः ॥ ४८ ॥

त्या म्हणती भो पंकजनाभा । तुझिया पदाब्जांची शोभा । कैवल्यलाभाहूनि दुर्लभा । ते तूं सुलभा अम्हां करीं ॥ ३६ ॥ अगाधबोध जे योगीश्वर । तिहीं जें चिंतिलें निरंतर । तें तव चरणारविन्द सुन्दर । वसवो अंतर पैं आमुचें ॥ ३७ ॥ गृहसेवनासक्त ज्या आम्ही । तव पदपंकज हृदयपद्मीं । आमुचे वसो इतुकें स्वामी । निष्कामकामी कामितसों ॥ ३८ ॥ संसारकूपामाजि पतन । जे पावले त्यांलागून । उद्धरणार्थ अवलंबन । ते श्रीचरण दे आम्हां ॥ ३९ ॥ स्वप्रकाश निरंतर । गगनीं अचंचल भास्कर । तैसा तव पदपंकजाङ्कुर । राहो अजस्र हृत्कमळीं ॥ ३४० ॥ सप्रेम प्रार्थूनियां श्रीपति । ऐसी गोपींहीं केली विनति । हरिपदप्रेमा मोक्षावरुती । दुर्लभ तत्स्मृति याचियली ॥ ४१ ॥ ऐसें ऐकूनि श्रीभगवान । म्हणे गोपींचा प्रेमा गहन । होऊं न शकेंचि मी उत्तीर्ण । अनन्यभजनपडिपाडें ॥ ४२ ॥ इतुकी कथा व्यशीतितमीं । कुरुभूपातें श्रीशुक स्वामी । निरोपूनियां हृदयपद्मीं । म्हणे धन्य मी या मननें ॥ ४३ ॥ सूर्योपरागीं कुरुक्षेत्रा । भूमंडळींची भूपाळयात्रा । मिनली तिहीं देवकीपुत्रा । स्तविलें स्तोत्रा त्या कथिलें ॥ ४४ ॥ यावरी व्यशीतितमाध्यायीं । कुरुयदुवनिता एके ठायीं । परस्परें निजविवाहीं । कथा वर्तल्या अनुवदती ॥ ४५ ॥ तये कथेच्या श्रवणा श्रोतीं । अवधान दीजे सादरवृत्ती । दयार्णवाची इतुकी विनती । पुढतोपुढती श्रीचरणीं ॥ ४६ ॥ प्रतिष्ठानीं श्रीएकनाथ । चिद्गगनींचा ज्ञानादित्य । चिदानंदकिरणीं दीप्त । स्वानंदभरित तेजस्वी ॥ ४७ ॥ गोविन्दप्रकाशें धवळी त्रिजगा । कृपामृतें वर्षोनि वेगा । ब्रह्माद्रीहूनि त्रिदाघभंगा । स्वभक्तिगंगा पूर्ण करी ॥ ४८ ॥ तया वोघाची सांठवण । केला दयार्णव स्वपादशरण । श्रोते सज्जन अमृतपान । स्वेच्छा श्रवण करोत कां ॥ ४९ ॥ श्रीमद्भागवत दशम स्कंध । टीका हरिवरद अगाध । दयार्णवकृत परम विशुद्ध । अध्याय प्रसिद्ध व्यशीतितम ॥ ३५० ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां सूर्योपरागतीर्थयात्रावृष्णिकुरुसंगमवर्णनं नाम व्यशीतितमोऽध्यायः ॥ ८२ ॥

श्लोक ॥ ४८ ॥ ओवी-संख्या ३५० ॥ एवं संख्या ३९८ ॥
(एक्क्याऐशीवा अध्याय मिळून ओवीसंख्या ३६,८७१)
कालयुक्तोर्जके शुक्ले दशम्यां भृगुवासरे । पिपीलिकापुरे वृष्णिकुरुसङ्गो निरूपितः ॥

ब्याऐंशिवा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

ह रि व र दा

अध्याय ८३ वा

श्रीगणेशाय नमः । परमामृताब्धिसंभवसोमा । भवभ्रमत्रितापतमोहरधामा । सोमपपट्पदकल्पदुमा । गोविश्रामा गोविन्दा ॥ १ ॥ तव कृपारसपीयूषपानें । दशमस्कंधींचीं शुकवाग्यत्नें । भाषाघडणी हरिवरदानें । केलीं भूषणें श्रोतयां ॥ २ ॥ कंठीं अथवा श्रवणपुटीं । मुमुक्षु मिरविती जे जे दृष्टी । ते नर शोभती वैकुण्ठीं । निर्जर मुकुटीं त्या नामिती ॥ ३ ॥ तो हा कृपामृताचा पाट । ब्रह्मगिरीपासूनि नीट । भाषाप्रवाह घडघडाट । दयार्णवघटीं सांठवला ॥ ४ ॥ सुकृतोदयीं श्रोते सुमति । सदैव सदैव सुस्नात होती । दुर्दैवभ्रमहिमें कांपती । घुंगट न काढती मोहाचा ॥ ५ ॥ असो तयांची किमर्थ कथा । द्व्यशीतितम अध्याय संपतां । गोपी आणि गोपीनाथा । संवाद मिथा तो कथिला ॥ ६ ॥ यावरी त्र्यशीतितमाध्यायीं । कृष्णवनिता एके ठायीं । द्रौपदीसहित वैसोनि पाहीं । कथिती विवाहीं हरिप्राप्ति ॥ ७ ॥ तिये कथेच्या श्रवणाप्रति । सावध होइजे सभाग्यश्रोतीं । श्रीशुकवदनें कुरुभूपति । शापदुर्गति निस्तरला ॥ ८ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ तथानुगृह्य भगवान्गोपीनां स गुरुर्गतिः । युधिष्ठिरमथापृच्छत्सर्वांश्च सुहृदोऽव्ययम् ॥ १ ॥

शुक म्हणे गा कुरुकुलतिलका । श्रवणभक्तिप्रकाशका । हरिगुणपरमामृतप्राशका । सावध निका हो आतां ॥ ९ ॥ गोपीसान्त्वनोपसंहरण । करूनि पुढती श्रीकृष्णगुण । वर्णिता झाला शुकभगवान । तें येथून अवधारा ॥ १० ॥ गोपी नेऊनियां एकान्तीं । प्रबोधूनियां अध्यात्मरीति । पावविल्या चित्सुखावाप्ति । गुरुर्गति यास्तव तो ॥ ११ ॥ विसर्जूनि व्रजवनितांतें । यदुसमाजीं श्रीकृष्णनाथें । पुढती येऊनि युधिष्ठिरातें । क्षेमकल्याण पूशिलें ॥ १२ ॥ जेथ जे जे होते नृपति । तैसेंच क्षेम सर्वांप्रति ।

पुसता झाला रुक्मिणीपति । परमप्रीति करूनियां ॥ १३ ॥ राष्ट्र दुर्गे कोश सेना । नृपा सचिवां वधूसंताना । दासदासी पोष्यां नाना । क्षेमकल्याणा पुशियेलें ॥ १४ ॥ हें ऐकोनि ते भूपती । काय प्रत्युत्तर बोलती । तें तूं ऐकें कुरुभूपती । म्हणे सुमती मुनिवर्य ॥ १५ ॥

त एवं लोकनाथेन परिपृष्टाः सुसत्कृताः । प्रत्यूचुर्हृष्टमनसस्तत्पादेक्षाहतां ह सः ॥ २ ॥

लोकनाथ जो श्रीकृष्ण । तेणें ऐशिया प्रकारेंकरून । अनामयप्रश्नें नृपांचा गण । पुशिला तो बोलतसे ॥ १६ ॥ श्रीकृष्णपाददर्शनावाप्ति । तेणें जाली पापोपहति । प्रफुल्ल प्रसन्नता मग चित्तीं । लाहोनि कथिती सुसत्कथा ॥ १७ ॥ सुष्ठु म्हणिजे सद्गुणभरित । श्रीकृष्णाचें यश ऊर्जित । वास्तव ऐश्वर्य संमिश्रित । वदती श्लोकोक्त तें ऐका ॥ १८ ॥

कुतोऽशिवं त्वच्चरणाम्बुजासवं महन्मनस्तो मुखनिःसृतं क्वचित् ।
पिबन्ति ये कर्णपुटैरलं प्रभो देहभृतां देहकृदस्मृतिच्छिदम् ॥ ३ ॥

प्रभो ऐशिया संबोधनें । ऐश्वर्य सूचिलें समर्थपणें । भो भगवंता आम्हांकारणें । अव्यय पुशिलें तरी ऐक ॥ १९ ॥ तुझें जें श्रीपादपंकजासव । श्रेष्ठांचिया मना पासाव । तन्मुखद्वारा ज्याचा प्रसव । ज्यापुढें वाव अमरसुधा ॥ २० ॥ तें कदाचित एकही वार । श्रवणपुटें जे प्राशिती नर । त्यांसी कोठोनि मग अभद्र । स्पर्शावया उरों शके ॥ २१ ॥ सनकादिक जे ऊर्ध्वरेते । तिहीं संकल्परहितचित्तें । सदैव भोगितां अवचितें । वदनपथें निःसृत जें ॥ २२ ॥ तया महंतांचे वदनींहून । वत पदपंकजासव-महिमान । स्रवतां प्राशिलें श्रवण भरून । त्यां कोठून अशिव शिवे ॥ २३ ॥ एकवार ही प्राशिलें पुरे । मग त्यां अभद्र कोठेंचि नुरे । त्यांचीं कर्में कल्याणकरें । उत्तरोत्तर पैं होती ॥ २४ ॥ अमरसुधेहूनि वरिष्ठ । श्रीपदपंकजासव जें मिष्ठ । तोही परिसा गुण उत्कृष्ट । जो कथिला स्पष्ट मुनिवर्ये ॥ २५ ॥ श्रीपादाब्जासव निर्धारें । एकवारही श्रवणद्वारें । प्राशन केलें मात्र पुरे । अविद्याभुररें मग कैंचें ॥ २६ ॥ कर्मसंभव जें शरीर । याचा कर्ता परमेश्वर । त्याची विस्मृति जें अज्ञान घोर । तच्छेदकर आसव हें ॥ २७ ॥ यालागीं निर्जरसुधेहून । पादाब्जासवीं उत्कट गुण । निर्जर स्वर्गसुधा प्राशून । पावती पतन पुण्यक्षयीं ॥ २८ ॥ तें तव पादाब्जासव दिव्य । श्रवणें नयनें नृपति सर्व । प्राशन करूनि पावलों शिव । कुशल सदैव तव कृपया ॥ २९ ॥ तुझें रूप सगुणनिर्गुण । यथामति करूनि कथन । आम्ही वंदितों तुज लागून । म्हणती नृपगण तें ऐका ॥ ३० ॥

हि त्वात्मधामविधुतात्मकृतव्यवस्थमानन्दसम्प्लवमखण्डमकुण्ठबोधम् ।
कालोपसृष्टनिगमावन आत्तयोगमायाकृतिं परमहंसगतिं नताः स्म ॥ ४ ॥

हीति निश्चयात्मक वचन । नृपगण वदती भो भो कृष्ण । आम्ही तुजप्रति नमितों जाण । स्वकल्याण इच्छोनी ॥ ३१ ॥ ज्या तुजप्रति नमितों आम्ही । तें तव स्वरूप कैसें स्वामी । जें

अवगमलें हृदयपद्मीं । निगमागमीं प्रतिपाद्य ॥ ३२ ॥ वास्तवस्वरूपप्रकाशें करून । निरसलें अवस्था-त्रयावरण । स्वसंवेद्य आनंदघन । अपरिच्छिन्न अखंड जें ॥ ३३ अवस्थात्रयावरण कैसें । मनःकल्पने-माजि उमसे । मग तें बुद्धिनिश्चयवशें । कवळी आपैसें आत्मत्वें ॥ ३४ ॥ अस्थिनाड्यादि प्रपंच स्थूळ । रक्तरेतोद्भव जो समळ । विजातीय अमंगळ । तो आत्मा केवळ धी मानी ॥ ३५ ॥ स्थूळशरीरीं करणकदंब । करी चिदाभास तदवलंब । तैं दृश्याचा विरूढे कोंभ । प्रकटे शोभ त्रिजगाची ॥ ३६ ॥ चिदाभास तो विश्वाभिमानी । जाग्रदवस्था सत्य मानी । भरे विषयांचे आडरानीं । हांव धरूनी हव्यासीं ॥ ३७ ॥ तंव तो मिथ्या विषयाभास । तदभिलाषें पावे त्रास । मिथ्याभ्रमीं कैंचा तोष । भोगी क्लेश जागृतींत ॥ ३८ ॥ तेव्हां वाञ्छी आत्मरति । स्थूळभोक्तया ते अप्राप्ति । अज्ञानप्राचुर्यें सुषुप्ति । माजि विश्रान्ति तैं लाहे ॥ ३९ ॥ तेथ आत्मत्वाचें विस्मरण । प्रकर्षें अज्ञ म्हणोनी प्राज्ञ । आत्मभावें निर्बुजून । प्रज्ञा स्वप्न अवलंबी ॥ ४० ॥ सुषुप्तीमाजि आनंदभोग । तोही अंतरे तैं निलाग । काल्पनिक करणवर्ग । स्वाप्न सवेग मग भावी ॥ ४१ ॥ देखिली ऐकिली स्वप्नगर्भीं । त्रिजगद्रचना होय उभी । तेथ तैजसात्मत्व अवलंबी । भोगलाभीं प्रविविक्तीं ॥ ४२ ॥ लटिक्यामाजि लटुफटु । तेचि स्वप्नींचा नाट्यनटु । काल्पनिक्त अमृतघटु । न शके प्रकटूं मिष्टत्व ॥ ४३ ॥ प्राज्ञ-तैजसविश्वात्मक । अवस्थात्रयीं त्रिनामक । चिदाभास भावी एक । अवस्थाकौतुकभोक्तृत्वें ॥ ४४ ॥ नेत्रीं अवस्थांचें आवरण । स्वरूपीं नाहींच जाण । अतएव आनंदघन परिपूर्ण । अपरिच्छिन्न अखंडत्वें ॥ ४५ ॥ तेंचि प्रविविक्त भोक्तृत्व लटिकें । अभीष्टत्वें क्षणैक न टिके । भयसंकटीं इच्छी सुटिके लाहे घटिके जागर तैं ॥ ४६ ॥ देशकाळवस्तुभेदें । खंडिलें न वचे परिच्छेदें । तें अखंड ऐसिया बोधें । कोविदवृन्दें प्रबोधिती ॥ ४७ ॥ नर्मदेपर्यंत मालवदेश । तेथूनि खंडला निःशेष । तैसा अखंड आत्मयास । देशें निर्देश घडेना ॥ ४८ ॥ चारी लक्ष बत्तीस सहस्र । इतुका विस्तीर्ण कळिकाळ घोर । तो खंडल्यावरी सुन्दर । स्वधर्मप्रचुर कृतयुग पैं ॥ ४९ ॥ काळपरिच्छेदा सरिसा । आत्मा अखंड न खंडे जैसा । वस्तुपरिच्छेदा तोही परिसा । होय तैसा निरूपितों ॥ ५० ॥ क्रमें गजांचें खंडतां सैन्य । पुढें चालती अश्व जीवन । अश्व खंडतां पदातिगण । बोधें परिच्छिन्न निरूपितां ॥ ५१ ॥ देश काल वस्तु ऐसी । परिच्छेदें कळे आपैसी । अखंड आत्मया खंडता तैसी । परिच्छिन्नत्वें न करवे ॥ ५२ ॥ अखिलानंदकदंब तो तूं । अखंड अपरिच्छिन्न संतु । अनेक भेदभ्रमात्मक मी तूं । त्रिकाळीं परंतु नावगमे ॥ ५३ ॥ तुझें स्वरूप अकुण्ठबोध । अवस्थावरणीं न घडे रोध । या लागीं सन्मात्र स्वसंवेद्य । निगमकोविद अनुभविती ॥ ५४ ॥ जरी तूं म्हणसी देवकीतनय । परिच्छिन्न सावयवकाय । त्या मज ऐसें स्तवन काय । योग्य होय विचारा ॥ ५५ ॥ ऐसें न म्हणावें भगवंता । काळनामा काळातीता । संतत सत्पथनिगमगोप्ता । या तव चरिता श्रुति गाती ॥ ५६ ॥ युगानुयुगें अवतरून । स्वधर्मसेतु-निगमावन । करूनि रक्षिसी साधुस्वजन । दुष्टनिबर्हण करूनियां ॥ ५७ ॥ प्रस्तुतकाळें निगम उच्छेद । पावले यास्तव अध्वरवृन्द । असाङ्गतेस्तव नव्हती फळद । त्रिजगा खेद तद्योगें ॥ ५८ ॥ कृतादिकाळीं निसर्गनिष्ठा । यथोक्त वर्णधर्मप्रतिष्ठा । अविधि न करिती निगमपाठा । तैं ते अभीष्टा प्रसवती ॥ ५९ ॥

काळान्तरें द्विजादि मळिन । अनध्यायीं वेदाध्ययन । तेणें निगम वीर्यहीन । निष्फळ यज्ञ तन्मंत्रीं ॥ ६० ॥ द्विजयजनादि निर्वीर्य वेद । तेणें निस्तेज अमरवृन्द । दैत्यासुरां परमानंद । करिती प्रतिपाद्य अभिचार ॥६१॥ निगम उपसर्ग पावले काळें । जाणोनि त्रिजगत्पाळनशीळें । योगमाया तां घननीळें । अवलंबलीळे तनु धरणें ॥ ६२ ॥ ते हे योगमायामय आकृति । मर्त्यनाट्य लावण्यमूर्ति । परमहंसाची सद्गति । परंज्योति मूर्तिमय ॥ ६३ ॥ नव्हसी वसुदेवदेवकीचा । नव्हसी नंदयशोदेचा । गोप्ता द्विज-मखाम्नायांचा । जाणोनि त्रिवाचा आम्ही नमितों ॥ ६४ ॥ त्वा हें युष्मदीं द्वितीयैकवचन । निश्चयार्थी ही अव्यय जाण । हि त्वा पृथक द्विपदीं करून । तें हें व्याख्यान उपलविलें ॥ ६५ ॥ हित्वा एक्याचि पदें आतां । वाखाणिलें सामान्यता । पदसंदर्भ तोही श्रोतां । श्रवण करितां नुबगिजे ॥ ६६ ॥ देह-अहंते आत्मा नाम । गृहधनममता बोलिजे धाम । एवं अवस्थात्रयाचा क्रम । हित्वा म्हणिजे त्यागूनि ॥ ६७ ॥ आनंदसंदोह जो संतत । अखंड अकुंठबोध भगवंत । जाणोनि त्या तव चरणीं प्रणत । आम्ही समस्त नृप म्हणती ॥ ६८ ॥ ऐसे युधिष्ठिरप्रमुख नृपति । श्रीकृष्णाची करूनी स्तुति । वास्तवबोधें करूनि प्रणति । तंव मिनला युवतिसमुदाव ॥ ६९ ॥

॥ श्रीऋषिरुवाच ॥ इत्युत्तमश्लोकशिखामणिं जनेष्वभिष्टुवत्स्वन्धककौरवस्त्रियः ।
समेत्य गोविन्दकथा मिथोऽगृणंस्त्रिलोकगीताः शृणु वर्णयामि ते ॥ ५ ॥

उत्तमश्लोकांचा शिखामणी । तो श्रीकृष्ण वृष्ण्यग्रणी । त्यातें स्तवितां भूभुजगणीं । श्रोतीं जाणोनि पूर्वोक्त ॥ ७० ॥ नृपाति जनपद स्तवीत असतां । तंव तेथें येऊनि कुरुयदुवनिता । परस्परें गोविन्दकथा । कथिती तत्वता उत्साहें ॥ ७१ ॥ शुक म्हणे भो सौभद्रसुता । त्रिजगीं गीयमाना विख्याता । त्या मी कथितों तुजप्रति आतां । मत्स्यजामाता अवधारीं ॥ ७२ ॥ कृष्णमहिमा वर्णिती जन । तंव कौरववनिता प्रेमें करून । यदुवनितांचें पातल्या स्थान । केलें पूजन तिहीं त्यांचें ॥७३॥ क्षेमालिङ्गन परस्परें । जालीं स्वागतप्रश्नोत्तरें । हरिचरिताच्या श्रवणादरें । करिती आदरें सुखचर्चा ॥ ७४ ॥ तेथ द्रौपदी श्रीकृष्णभगिनी । हरिवनितांसि ज्येष्ठ रुक्मिणी । नणदा भाउजया मिळोनी । हरिगुणकथनीं प्रवर्तल्या ॥ ७५ ॥

॥ द्रौपद्युवाच ॥ हे वैदर्भ्यच्युतो भद्रे हे जाम्बवति कौसले । हे सत्यभामे कालिंदि शैब्ये रोहिणि लक्ष्मणे ॥६॥
हे कृष्णपत्न्य एतन्नो ब्रूत वो भगवान्स्वयम् । उपयेमे यथा लोकमनुकुर्वन्स्वमायया ॥ ७ ॥

परमादरें याज्ञसेनी । वैदर्भीतें मुख्य करूनी । कृष्णवनिता अवघ्या जणी । संबोधोनी प्रश्न करी ॥ ७६ ॥ अवो कल्याणी वैदर्भिये । भद्रे कैकये राजतनये । भो रौक्षेयी जाम्बवतिये । नाग्नजितिये कौसल्ये ॥ ७७ ॥ सात्राजितिये सत्यभामे । कलिन्दतनये मेघश्यामे । शैब्ये मित्रविन्दाख्ये वामे । रोहिणी प्रेमें हरिभजके ॥ ७८ ॥ अवो माद्री बार्हत्सेनी । लक्ष्मणे ललितलावण्यखाणी । कृष्णें वरिलीसि

करग्रहणीं । कर्था कल्याणी तें अवघें ॥७९॥ भो भो सुभगा भूपाळदुहिता । षोडश सहस्रा श्रीकृष्णकान्ता । पृथक समस्ता स्वयंवरवार्ता । वरिला भर्ता कोंवि वदा ॥ ८० ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न । अगाध अगोचर अच्युत पूर्ण । तेणें तुमचें पाणिग्रहण । कैसें केलें नरनाटयें ॥ ८१ ॥ स्वमायेच्या अंगीकारीं । मनुष्यचर्येच्या अनुकारीं । तुमतें पर्णिता जाला हरि । तें निजवैखरी निरूपिजे ॥ ८२ ॥ हरिललनांतें संबोधून । पाञ्चाळीनें ऐसा प्रश्न । केला असतां मग त्या कथन । करिती संपूर्ण पृथक्त्वें ॥ ८३ ॥ त्यामाजी रुक्मिणी ज्येष्ठ पत्नी । स्वकरग्रहणाची कहाणी । वदती जाली संक्षेपवाणी । ते श्रोतीं श्रवणीं परिसावी ॥ ८४ ॥

॥ रुक्मिण्युवाच ॥ चैद्याय मार्पयितुमुद्यतकार्मुकेषु राजस्वजेयभटशेखरिताङ्घ्रिरेणुः ।
निन्ये मृगेन्द्र इव भागमजावियूथात्तच्छ्रीनिकेतचरणोऽस्तु ममार्चनाय ॥ ८ ॥

भीमकी म्हणे वो पाञ्चाळतनये । मम स्वयंवर ऐकें माये । दैव विचित्र सांगो काये । परमाश्चर्य झणें मानीं ॥ ८५ ॥ अनेकजन्मार्जितसुकृतें । परमाप्रियतमवैष्णवव्रतें । श्रवणीं पडतां भगवच्चरितें । मानसें तेथें वेधलियें ॥ ८६ ॥ हरियश ऐकूनियां श्रवणीं । हरिरूप भरलें अंतःकरणीं । तेणें वेधतां बाह्याचरणीं । तनुविस्मरणीं वैकल्य ॥ ८७ ॥ हें जाणोनि जननी जनक । करितां स्वयंवरविवेक । ज्येष्ठबंधु हरिनिन्दक । चैद्यमुख्य वर बोधी ॥ ८८ ॥ जननीजनकें हरिअर्पणीं । उदित असतां त्यांतें न गणी । चैद्य नवरा भूभुजगणीं । निश्चय कर्णी पडतां हा ॥ ८९ ॥ विप्रहस्तें विनयविनति । प्रविष्ट होतां कैवल्यमूर्ति । मम कारुण्यें द्रवोनि चित्तीं । आला यदुपति सैन्येंसीं ॥ ९० ॥ चैद्यपक्षी मागधप्रमुख । सुहृदभूपति पृथक्पृथक । कौण्डिन्यपुरा भंवतें कटक । त्याचें अटक देखूनियां ॥ ९१ ॥ अंबिकापुरीं मसैन्येंसीं । प्रतापें राहिला हृषीकेशी । देखोनि चैद्यमागधांसी । क्षोभ मानसीं उदेला ॥ ९२ ॥ कंसवधारतव मागधें । मथुरे जाऊनि सतरा युद्धें । केलीं परंतु त्या गोविन्दें । जीवदानेंसीं सोडिलें ॥ ९३ ॥ अठराविये वेळीं हरि । मथुरा नेऊनि समुद्रोदरीं । सबंधु पळाला मागधसमरीं । अहंता अंतरीं हे त्याचे ॥ ९४ ॥ यास्तव मागध कारुष शाल्व । चैद्यपक्षींचे भूपति सर्व । हरिविजयाचा धरूनि गर्व । म्हणती अनर्ह हें येथ ॥ ९५ ॥ तंव मम जनकें कुळधर्मासी । नोवरी अंबिकापूजनासी । प्रेरितां बंधु भगवद्द्वेषी । मागधा चैद्यासि सुचवितां ॥ ९६ ॥ सूचना होतांचि मागधप्रमुख । वीरश्रीचा धरूनि तंवक । सन्नद्ध बद्ध एकेंएक । पातले सम्यक समरंगा ॥ ९७ ॥ अंबिकापूजना नंतर हरि । अकस्मात मातें हरी । वाहोनियां निजरहंवरीं । मृगेन्द्रापरी चालियला ॥ ९८ ॥ उद्यतकार्मुक भूभुज सकळ । उठिले असतां तिये वेळ । चरणीं मर्दूनि त्यांचें मौळ । हरी गोपाळ मजलागीं ॥ ९९ ॥ वांठिवेचे मुकुट माथां । जिया मिरविती भूपचळथा । पायां तळीं त्या मर्दुनि त्वरिता । जाला हरिता हरि मातें ॥ १०० ॥ अजा अविकांमाजूनि भाग । मृगेन्द्र जैसा ने सवेग । गजयूथातें न करवे लाग । भूभुजवर्ग तेंवि रणीं ॥ १ ॥ ऐसें माझें केलें हरण । पुढती विध्युक्त पाणिग्रहण । त्या श्रीनिकेताचे चरण । असोत पूर्ण मज पूज्य ॥ २ ॥ अवो पाञ्चाळराजतनये ।

अच्युतें मातें वारिलें माये । तें तुज कथिलें सूत्रप्राय । यावरी काय आज्ञापी ॥ ३ ॥ इतुकें रुक्मिणी वदल्यावरी । श्रीकृष्णाची प्रिय अंतुरी । सत्यभामा कथन करी । करग्रहपरी ते ऐका ॥ ४ ॥

॥ सत्यभामोवाच ॥ यो मे सनाभिवधतप्तहृदा ततेन लिप्ताभिशापमभिमार्ष्टुमपाजहार ।
जित्वर्क्षराजमथ रत्नमदात्स तेन भीतः पितादिशत मां प्रभवेऽपि दत्ताम् ॥ ९ ॥

भामा म्हणे माझिया जनकें । स्वबंधुवधाच्या परमदुःखें । तदभिशापाचिया कलंकें । श्रीवत्साङ्का नोकिलें ॥ ५ ॥ अभिशाप तो निरसावया । कृष्ण यादवां घेऊनियां । पदवी हुडकितां निघ्नतनया । मृगेन्द्रें वधिलें देखूनी ॥ ६ ॥ मृगेन्द्राचा घेऊनि माग । पुढें चालिले करूनि लाग । तंव देखिला मृगेन्द्रभंग । ऋक्षें केला वनगर्भीं ॥ ७ ॥ ऋक्षमागोवा पुढारी । काढितां प्रवेशला तो विवरीं । तया मागें रिघोनि हरि । आणिली नोवरी रत्नेंसीं ॥ ८ ॥ मग तें रत्न माझिया जनका । अर्पूनि निरासिलें कळंका । जनकें मानूनि भयाची शंका । स्यमंतें सहित मज दिधलें ॥ ९ ॥ पूर्वी अक्रूरादिकां कारणें । नेमिलें होतें मज वाग्दानें । कृष्णमनोभंगाच्या भेणें । मजला रत्नें सह दिधलें ॥ ११० ॥ ऐसी सत्यभामेची उक्ती । संपतां बोले जाम्बवती । तो वृत्तान्त सावध श्रोतीं । सप्रेमभक्तीं परिसावा ॥ ११ ॥

॥ जाम्बवत्युवाच ॥ प्राज्ञाय देहकृदमु निजनाथदैवं सीतापतिं त्रिणवहान्यमुनाभ्ययुध्यत् ।
ज्ञात्वा परीक्षित उपाहरदर्हणं मां पादौ प्रगृह्य मणिनाहममुष्य दासी ॥ १० ॥

म्हणे मम देहाचा कर्ता । जाम्बवंत जो माझा पिता । तेणें देखोनियां भगवंता । मानिली गौणता मनुजत्वें ॥ १२ ॥ द्वंद्वयुद्धा मिसळला बळें । सत्तावीस दिवस सळें । आपुला स्वामी नेणोनि बरळें । युद्ध केलें निकराचें ॥ १३ ॥ क्षीण जालिया सर्वशक्ति । मग ओळखिला सीतापति । तेव्हां रसरसूनियां चित्तीं । म्हणे अनुचितीं प्रवर्तलों ॥ १४ ॥ ईश्वरावीण मजसीं कोण्ही । पुरों न शके समराङ्गणीं । ऐसा निर्धार करूनि मनीं । कोदंडपाणि परीक्षिला ॥ १५ ॥ तेव्हां सप्रेम चरण धरी । स्तवनीं तोषवूनि श्रीहरि । रत्नें सहित मजला करीं । देऊनि परिहरी अपराधा ॥ १६ ॥ तया प्रभूची मी दासी । सेवा वाञ्छीं चरणांपासीं । यावरी कालिन्दी कथनासी । करिते कैसी तें ऐका ॥ १७ ॥

॥ कालिन्युवाच ॥ तपश्चरन्तीमाज्ञाय स्वपादस्पर्शनाशया ।
सख्योपेत्या ग्रहीत्पाणिं योऽहं तद्गृहमार्जनी ॥ ११ ॥

रविजा बोले मग उत्तर । मदर्थ तपश्चर्यापर । हृदयीं जाणूनि जगदीश्वर । प्रेरी सत्वर निज सखया ॥ १८ ॥ भगवत्सख म्हणाल कोण । तरी जो धनंजय अर्जुन । तेणें ममाशय जाणोन । दाविले चरण स्वामींचे ॥ १९ ॥ श्रीपादस्पर्शनेच्छा मातें । पूर्वीच विदित सर्वज्ञातें । हृदयीं द्रवोनि करुणावंतें ।

केलें निरुतें करग्रहण ॥ १२० ॥ तया प्रभूचिये भवनीं । मी किङ्करी गृहमार्जनी । यावरी मित्रविन्दा वाणी । वदे तें श्रवणीं अवधारा ॥ २१ ॥

॥ मित्रविन्दोवाच ॥ यो मां स्वयवर उपेत्य विजित्य भूपान्निन्ये श्वयूथगमिवात्मबलि द्विपारिः ।
भ्रातृंश्च मेऽपकुरुतः स्वपुरं श्रियौकस्तस्यास्तु मेऽनुभवमंघ्र्यवनेजनत्वम् ॥ १२ ॥

मित्रविन्दा म्हणे परिसा । कृष्णप्राप्ती बहु आशा । लागली असतां मम मानसा । हें श्रीपरेशा जाणवलें ॥ २२ ॥ मग जे माझिये स्वयंवरीं । बंधु केवळ विघ्नकारी । भूभुजां सहित त्यांतें समरीं । जिङ्कूनि हरी मजलागीं ॥ २३ ॥ द्वेषें बंधु नामंत्रिती । सवेंचि येऊनियां श्रीपति । हरूनि मातें केलें युवति । कोणे रीति तें ऐका ॥ २४ ॥ मत्तगजाचा कुम्भकवळ । भक्षणा उदित श्वानमेळ । देखोनि मृगेन्द्र जेंवि तत्काळ । हरी स्वबळप्रतापें ॥ २५ ॥ मृगेन्द्राची देखोनि झडप । श्वानयूथा महा कंप । भयें दश दिशा पळती कळप । भंगले भूप तेंवि रणीं ॥ २६ ॥ मग मज लक्ष्मीनिवास हरी । स्वपुरा नेऊनि विध्युक्त वरी । तत्पदक्षाळन निरंतरीं । प्रतिसंसारीं मज असो ॥ २७ ॥

॥ सत्योवाच ॥ सप्तोक्षणोऽतिबलवीर्यसुतीक्ष्णशृङ्गान्पित्रा कृतान्क्षितिपवीर्यपरीक्षणाय ।
तान्वीरदुर्मदहनस्तरसा निगृह्य क्रीडन्बबंध ह यथा शिशवोऽजतोकान् ॥ १३ ॥

सत्यानामका नाग्नजिती । वृत्तान्त सांगे द्रौपदीप्रति । म्हणे मम जनकें केली युक्ति । मज श्रीपति वरावया ॥ २८ ॥ सप्त अपेट वृषभ मत्त । एकेच समयीं करूनि मुक्त । त्यांतें नाथी प्रतापवंत । तो हो कान्त मम कन्ये ॥ २९ ॥ परम तिखट ज्यांचीं शृंगें । पुष्ट कठिण ज्यांचीं अंगें । लत्ताप्रहारें भिदुर भंगें । गमती अवघे कृतान्त ॥ १३० ॥ नृपवीर्याच्या परीक्षणा । जनकें केली हे प्रतिज्ञा । ऐकोनि कोण्ही पाणिग्रहणा । नृप आंगवणा न करिती ॥ ३१ ॥ हें ऐकोनि कमलाजानि । जाणोनि माझी हृदयग्लानि । साक्षेपें सप्तवृष नाथूनी । पाणिग्रहणीं मज वरिलें ॥ ३२ ॥ जैशीं नेणतीं लेंकुरें । अजापत्यां धरिती करें । तैसे सातही कमलावरें । वृषभ निजकरें नाथिले ॥ ३३ ॥

य इत्थं वीर्यशुल्कां मां दासीभिश्चतुरंगिणीम् । पथि निर्जित्य राजन्यान्निन्ये तद्दास्यमस्तु मे ॥ १४ ॥

एवं स्ववीर्यमूल्यें मातें । क्रीत करूनि कमलाकान्तें । पंथीं भंगोनि नृपांचीं शतें । दासीयूथें सह नेलें ॥ ३४ ॥ रथगजतुरंगपदातिसेना । अनेक दासी पदार्थ नाना । दिधलें मज जनकें आंदणा । पाणिग्रहणा करवूनी ॥ ३५ ॥ ऐसिया परी वरिलें मातें । तद्दास्य असो मज निरुतें । ऐकोनि सत्येच्या वचनातें । भद्रा बोले तें ऐका ॥ ३६ ॥

॥ भद्रोवाच ॥ पिता मे मातुलेयाय स्वयमाहूय दत्तवान् ।
कृष्णे कृष्णाय तच्चित्तामक्षौहिण्या सखीजनैः ॥ १५ ॥

अस्य मे पादसंस्पर्शो भवेज्जन्मनि जन्मनि । कर्मभिर्भ्राम्यमाणाया येन तच्छ्रेय आत्मनः ॥१६॥

कैकेयदेशींचा जो नृपवर । धृष्टकेतु माझा पितर । तेणें जाणोनि मज उपवर । केला विचार द्रौपदिये ॥ ३७ ॥ शूरसेनाची नंदिनी । श्रुतकीर्ति ते माझी जननी । वसुदेवतनय चक्रपाणी । मातुलेय पैं माझा ॥ ३८ ॥ तो कृष्ण वरिला ममान्तरें । तया कारणें अत्यादरें । स्वयें आणूनि माझिया पितरें । विध्युक्तप्रकारें मज दिधलें ॥ ३९ ॥ अक्षौहिणी सेनेसहित । सखिया किङ्करी शतानुशत । आंदण वोपोनि पदार्थ बहुत । श्रीकृष्ण कान्त मज केला ॥ १४० ॥ त्याचा पादस्पर्श मज । जन्मोजन्मीं हो हें गुज । पाञ्चालतनये कथिलें तुज । ऐकें बीज याचेंही ॥ ४१ ॥ त्रिगुणात्मकें बहुविध कर्में । तिहीं निर्दिष्ट अनेक जन्में । विविधा योनींमाजि भ्रमें । भ्रमणार मी जयावरी ॥४२॥ तें या पादस्पर्शेंकरून । कर्मभ्रमणाचें निरसन । होऊनि श्रेयस निज कल्याण । कैवल्यसदन पावेन ॥ ४३ ॥ तरी तो पादस्पर्श मज । जन्मोजन्मीं असो सहज । परमपुरुषार्थाचें बीज । हे अधोक्षजपदसेवा ॥ ४४ ॥ इतुकी भद्रेनें तत्वता । कथिली पाणिग्रहणकथा । यावरी बार्हत्सेनीवार्ता । करग्रहणाची निरूपितों ॥ ४५ ॥

॥ लक्ष्मणोवाच ॥ ममापि राज्यच्युतजन्मकर्म श्रुत्वा मुहुर्नारदगीतमास ह ।
चित्तं मुकुन्दे किल पद्महस्तया वृतः सुसंमृश्य विहाय लोकपान् ॥ १७ ॥

अवो द्रौपदी राजाङ्गने । मित्रविन्देचि समान कृष्णें । माझें मानस वेधिले स्वगुणें । तें तूं श्रवणें अवधारीं ॥ ४६ ॥ नारदें माझिया जनकसदनीं । येऊनि वारंवार अनुदिनीं । कृष्णकीर्ति वदतां कर्णीं । पडतां मम मनीं ठसावली ॥ ४७ ॥ श्रीकृष्णाचें जन्मकर्म । ललितलावण्य रूप नाम । ठाणठकार शौर्य विक्रम । सद्गुणधाम निरूपितां ॥ ४८ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्नता । वात्सल्य दया दक्षिणता । वर्णितां वेध माझिया चित्ता । जाला तत्वता हरिरूपीं ॥ ४९ ॥ पद्मसंभवा पद्मा सती । तिणें जयाची लावण्य मूर्ती । देखोनि वरिला तो श्रीपति । माझ्या चित्तीं ठसावला ॥१५०॥ अनंतजन्मांचें सुकृत । तेणें हरिरत जालें चित्त । लोकपाळांश नृप समस्त । त्यजूनि वान्तपडिपाडें ॥ ५१ ॥ उपनिषदर्थाचें विवरण । करूनि मुमुक्षु विचारप्रवीण । आत्मा वरिती तेंवि भगवान । चित्तें विवरून म्यां वरिला ॥५२॥ एवं मुकुन्दाच्याचि ठायीं । चित्त रमोनि राहिलें पाहीं । ऐसें जाणोनि मम जनकेंही । उपाय रचिला तो ऐका ॥ ५३ ॥

ज्ञात्वा मम मतं साध्वि पिता दुहितृवत्सलः । बृहत्सेन इति ख्यातस्तत्रोपायमचीकरत् ॥ १८ ॥

साध्वी सतिये पतिव्रते । बृहत्सेने माझेनि तातें । कन्यावत्सलें सप्रेमभरितें । मम मतातें जाणोनि ॥ ५४ ॥ तदनुसार दीर्घदृष्टी । कृष्णप्राप्ति इच्छूनि पोटीं । अमाध्य यंत्र रचिलें सृष्टी । जें अभेद कष्टीं सुरासुरीं ॥ ५५ ॥ कृष्णावांचूनि अपरां वीरां । भेदिलें नवचे नृपनिर्जरां । ऐसिया विवरूनि दृढनिर्धारा । यंत्रउभारा तो ऐका ॥ ५६ ॥

यथा स्वयंवरे राज्ञि मत्स्यः पार्थेप्सया कृतः । अय तु बहिराच्छन्नो दृश्यते स जले परम् ॥ १९ ॥

अहो पाञ्चालराजतनये । तव स्वयंवरीं जैसा माये । पार्थप्राप्तीचा उपाय । लक्षूनि यंत्र उभविलें ॥ ५७ ॥ गगनचुम्बित रोवूनि स्तंभ । तयाचे मूळीं स्थापूनि कुम्भ । स्तंभाग्रावरी अत्यंत लांब । वंश स्वयंभ उभारिला ॥ ५८ ॥ तया वंशाचिया अग्रभागीं । मत्स्याभास पार्थालागीं । अभेद्य पार्थाविण जो त्रिजगीं । स्वयें शार्ङ्गी निर्मवी ॥ ५९ ॥ बाह्य वस्त्राची जवनिका । यास्तव न लक्षे इतरां लोकां । यंत्रभेदनीं आवांका । नुपजे सकळिकां भूपाळां ॥१६०॥ तें यंत्र भेदूनि पार्थवीरें । तुज जिङ्किलें चमत्कारें । याहूनि दुर्घट बहुप्रकारें । माझेनि जनकें निर्मियेलें ॥ ६१ ॥ हें ऐकूनि तुझिया चित्तें । झणें मानिजेल पाञ्चालसुते । जें नृपांमाजि अर्जुन तेथें । पातला नव्हता कीं काय ॥६२॥ अर्जुनें तेंही भेदूनि यंत्र । कां न केलें तुज कलत्र । तरी अर्जुनासही अभेद्यतर । तोही प्रकार अवधारीं ॥ ६३ ॥ तुझिये स्वयंवरींचा भास । बाह्य न लक्षे प्राकृतांस । परि स्तंभमूळीं ऊर्ध्व लक्ष । धरितां नेत्रांस गोचर तो ॥ ६४ ॥ तैसा नोहे येथींचा मत्स्य । सबाह्य गूढत्वें आनिच्छ । यास्तव भूभुज जाले तुच्छ । श्रीवत्साङ्कावांचूनी ॥ ६५ ॥ स्तंभमूळीं सजळकुम्भा । माजि लक्षूनि ऊर्ध्व नभा । मत्स्यभेदना भूपति उभा । पंकजनाभाविण न ठके ॥ ६६ ॥ तो एक सर्वज्ञ सर्वद्रष्टा । अभेद्यभेदनीं न मनी कष्टा । अपर भूपति रहितचेष्टा । कोण्ही प्रतिष्ठा न भोगिती ॥ ६७ ॥ तया भूपांचा समस्त । कथितें संकेतें वृत्तान्त । तो तूं ऐकें इत्थंभूत । पाञ्चाळनाथनंदिनीये ॥ ६८ ॥

श्रुत्वैतत्सर्वतो भूपा आययुर्मत्पितुः पुरम् । सर्वास्त्रशस्त्रतत्त्वज्ञाः सोपाध्यायाः सहस्रशः ॥ २० ॥

माझी ऐकूनि स्वयंवररचना । रूपलावण्यशील गुणा । सप्रेम आस्था भूपाळगणा । मम पितृपत्तना ते आले ॥ ६९ ॥ सर्व भूतळींचे भूपती । मत्प्राप्तीची कामना चित्तीं । धरूनि माझिया जनकाप्रती । सेनासंपत्तीसह मिनले ॥ १७० ॥ शस्त्रास्त्रविद्यापारंगत । तदुपदेष्ट्यांसमवेत । सहस्रेंसहस्र शतानुशत । आले त्वरित साटोपें ॥ ७१ ॥

पित्रा सम्पूजिताः सर्वे यथावीर्यं यथावयः । आददुः सशरं चापं वेद्धुं पर्षदि मद्धियः ॥ २१ ॥

कथितां नृपांचे नामोच्चार । ग्रंथ विस्तारा जाईल फार । यालागीं संकेतें व्यासकुमर । आले सर्वत्र हें वदला ॥ ७२ ॥ तस्मात् नृपति जे समस्त । आले जाणूनि माझा तात । पूजिता जाला यथोक्त ।

यथापुरुषार्थ यथावय ॥ ७३ ॥ मंडपीं नृपसभा घनवट । बिरुदें पढती वंदिभाट । यंत्र देखोनि हृदय-स्फोट । महासंकट नृप म्हणती ॥ ७४ ॥ तयांमाजि नामाथिले । धनुर्विद्यासंपन्न भले । श्रेष्ठमुकुटांचे दादुले । ते उठिले मम लोभें ॥ ७५ ॥ शरेंसहित कोदंडातें । यंत्राभास वेधावया ते । घेते जाले उदितचित्तें । मत्प्राप्तीतें इच्छूनी ॥ ७६ ॥ पर्षदि म्हणिजे सभेच्या ठायीं । साभिलाषबुद्धि मत्प्राप्ती-विषयीं । उठतां धडकी उपजे हृदयीं । जयाजय दोहीं माजिवडी ॥ ७७ ॥

आदाय ज्यसृजन्केचित्सज्जीकर्त्तुमनीश्वराः । आकोष्ठं ज्यां समुत्कृष्य पेतुरेकेऽमुना हताः ॥ २२ ॥

बृहत्सेननृप ते समयीं । भूभुजसभा लक्षूनि पाहीं । लक्ष भेदील जांवायी । वाग्निश्चयीं म्यां केला ॥ ७८ ॥ तयासि द्यावया कन्यारत्न । यंत्ररचनेचा केला यत्न । वीर्यशौर्यपुरुषचिह्न । वाहती तिहीं भेदावें ॥ ७९ ॥ आंगीं धनुर्विद्येचा आव । मुकुटमंडित म्हणविती राव । प्रतापवीरश्रीवांठीव । यंत्र भेदूनि मिरवावी ॥ १८० ॥ ऐकूनि नृपाचें बोलणें । मौन धरूनि एक शहाणे । एक सांडूनि आंगवणे । अध्यात्मचर्चा आदरिती ॥ ८१ ॥ एक लघुशंकेकारणें । उठोनि करिती कालक्रमणे । म्हणती आम्हां-मागें कोणें । श्लाघ्यवाणें भेदिलिया ॥ ८२ ॥ एक जलपानार्थ उठती । एक दर्पण अवलोकिती । एक श्मश्रु करें पिळिती । एक स्पर्शती स्वकुण्डलां ॥ ८३ ॥ एक नायकाणियावारी । अन्य वार्ता परस्परीं । करिती सांडूनियां वीरश्री । ऐसी अवसरी बहुतांतें ॥ ८४ ॥ कोण्हीएक ठाकले उभे । सकाम नोवरी-चिया लोभें । चाप घेऊनि पाहती शोभे । वीरश्रीक्षोभें सांडवले ॥ ८५ ॥ एक उचलूनि तें कार्मुक । सज्य करावया धरिती तवक । न चढे तेव्हां तुटलें तुक । न करिती मुख मग वरतें ॥ ८६ ॥ मग म्हणती या चापेंकरून । यंत्र भेदील तो पुरुष धन्य । इतुकें बोलूनि धरिती मौन । चाप ठेवून वोसरती ॥ ८७ ॥ एकीं बहुकष्टीं प्रत्यंचा । वाहूनि पाहती वदनें उचा । चाप स्फाळितां प्रताप त्यांचा । भंगला साचा नृपसदसीं ॥ ८८ ॥ एकीं आकोष्ठ शिञ्जिनी । बाहुप्रतापें आकर्षूनी । चाप नावरतां ते धरणीं । विकळ होऊनि कलंडले ॥ ८९ ॥ तेणें चापें जे दडपले । ते मूर्च्छित वीर पडिले । ऐसे वीरश्रीवंत दादुले । चापें केले गर्वहत ॥ १९० ॥ असो या सामान्यनृपांच्या गोष्टी । यावरी प्रतापी वीर जे सृष्टी । ऐकें तयांची राहटी । भो गोरटी द्रौपदीये ॥ ९१ ॥

सज्यं कृत्वाऽपरैवीरा मागधाम्बष्ठचेदिपाः । भीमो दुर्योधनः कर्णो नाविन्दंस्तदवस्थितिम् ॥ २३ ॥

महाप्रतापी मगधपति । चैद्य अंबष्ठ सोमकनृपति । इहीं सज्जूनि चाप निगुती । भास लक्षिती ऊर्ध्वमुखें ॥ ९२ ॥ तंव त्या मत्स्याची अवस्थिति । विदित नोहे कोणाप्रति । यातस्व भेदनीं भग्नगति । जाली निश्चिती सर्वांची ॥ ९३ ॥ भीम बळिष्ठ महाप्रतापी । क्षणार्धें गुण वाहिला चापीं । भास न लक्षे मग संकल्पीं । स्वयें आरोपी शिथिलत्व ॥ ९४ ॥ साम्राज्यगर्वमद दुर्योधना । तेणें सज्जूनि शरासना । समर्थ न होतां मत्स्यपातना । लाजिरवाणा मग परते ॥ ९५ ॥ कर्ण धनुर्विद्येचा गर्व । आंगीं धरूनि

पिरश्रीआव । चाप सज्जूनियां स्वयमेव । दावी लाघव नृपसदसीं ॥ ९६ ॥ तंत तो भास दृष्टी न पडे । कुम्भीं लक्षी खालन्या तोंडें । मोडितां अनुमानें शरकाण्डें । तेणें न घडे तद्भेद ॥ ९७ ॥ हें देखोनि सर्व नृपति । वसनें लावूनि मुखाप्रति । परमविस्मयें हास्य करिती । लज्जाविपत्ति कर्णातें ॥ ९८ ॥ कित्येक नृपति श्रेष्ठपणें । आसनें न सोडोनियां शहाणे । म्हणती पार्थावांचूनि कोणें । यंत्रभेदणें हें न घडे ॥ ९९ ॥ पूर्वी द्रौपदीस्वयंवरीं । यंत्ररचनेची ऐसी परी । अर्जुनें भेदोनि एकाचि शरीं । नेली नोवरी जिङ्कूनी ॥ २०० ॥ येथही आजि तो अर्जुन । एकाचि बाणें मत्स्यपातन । करूनि हरील वनितारत्न । वृथा आंगवण इतरांची ॥ १ ॥ ऐसी चर्चा नृपसभेची । ऐकूनि मग तो सव्यसाची । उठिला आणि कार्मुकाची । सज्य केली प्रत्यंचा ॥ २ ॥

मत्स्याभासं जले वीक्ष्य ज्ञात्वा च तदवस्थितिम् । पार्थो यत्तोऽसृजद्बाणं नच्छिनत्पस्पृशे परम् ॥ २४ ॥

मग जाऊनि स्तंभमूळीं । जलकलशीं तो मत्स्य निहाळी । त्याची अवस्थिति अवगमली । जाणोनि वळी यत्न करी ॥ ३ ॥ पार्थ होऊनि यत्नपर । कार्मुकीं सज्जूनि सरळ शर । जळीं पाहूनि विन्धितां शफर । स्पर्श मात्र त्या केला ॥ ४ ॥ परंतु भेदूनियां तळवटीं । मत्स्य पाडूं न शके किरीटी । अल्पशक्ति हे कळली गोठी । वदे वाक्पुटीं नृप तेव्हां ॥ ५ ॥ यावरी कोण्ही वीरश्रीवंत । वीर राहिला असे गुप्त । तेणें यंत्र भेदूनि त्वरित । निजपुरुषार्थ प्रकटावा ॥ ६ ॥ ऐसी बृहत्सेननृपाची वाणी । पडतां निखिल नृपांच्या श्रवणीं । शब्द बोलूं न शकती कोण्ही । चक्रपाणि तैं उठिला ॥ ७ ॥

राजन्येषु निवृत्तेषु भग्नमानेषु मानिषु । भगवान्धनुरादाय सज्यं कृत्वाथ लीलया ॥ २५ ॥
तस्मिन्सन्धाय विशिखं मत्स्यं वीक्ष्य सकृज्जले । छित्त्वेषुणापातयत्तं सूर्ये चाभिजिति स्थिते ॥ २६ ॥

नृपांहीं सोडूनि माझी आशा । भेदूं न शकतां मत्स्याभासा । मग ते परतले जावया देशा । भग्न मानसामाजिवडे ॥ ८ ॥ मागधप्रमुख वीरश्रीमानी । दुर्योधनादि पदाभिमानी । एवं सर्व जे साभिमानी । मानहानी त्यां जाली ॥ ९ ॥ एवं भंगले नृपति सर्व । गळाला साभिमानियांचा गर्व । तिये समयीं वासुदेव । उठिला स्वयमेव साटोपें ॥ २१० ॥ धनुष्य घेऊनियां करतळीं । सज्य करूनि श्रीवनमाळी । लीलालाघव स्तंभाजवळी । प्रतापशाळी उभा ठेला ॥ ११ ॥ तया चापाच्या ठायीं शर । संयोजूनियां स्वयें श्रीधर । जळीं लक्षूनि एकवार । छेदिला शफर शरघातें ॥ १२ ॥ छेदूनि मत्स्य पाडिला तळीं । अभिजिन्मुहूर्ती मध्याह्नकाळीं । मध्यभागीं अंशुमाळी । ग्रहमंडळीं शुभशान्त ॥ १३ ॥ यंत्र भेदिले श्रीभगवंतें । देखोनि आनंद मम जनकातें । उत्साह जाला जो त्रिजगातें । पाण्डवकान्ते तो ऐक ॥ १४ ॥

दिवि दुन्दुभयो नेदुर्जयशब्दयुता भुवि । देवाश्च कुसुमासारान्मुमुचुर्हर्षविव्हलाः ॥ २७ ॥

गगनीं लागल्या सुरदुन्दुभि । त्रिदशविमानें दाटलीं नभीं । जयजयकार सुरकदंबीं । नरीं

मुनिवरीं भूभागीं ॥ १५ ॥ दिव्यप्रसूनीं वर्षती देव । गाती सप्तस्वरीं गंधर्व । रंभाप्रमुख अप्सरासमूह । नृत्य करिती ते काळीं ॥ १६ ॥ हर्षविह्वळ निर्जर सकळ । गर्जे जयघोषें भूतळ । त्रिजगीं आनंदकल्लोळ । विजयी घननीळ सुर गाती ॥ १७ ॥ तिये समयीं उत्साहेंसीं । परमानंदें परमात्मयासी । सप्रेम सादर वरावयासी । आलें सभेसी ते ऐक ॥ १८ ॥

तद्रङ्गमाविशमहं कलनूपुराभ्यां पद्भ्यां प्रगृह्य कनकोज्ज्वलरत्नमालाम् ।
नूत्ने निवीय परिधाय च कौशिकाग्र्ये सव्रीडहासवदना कबरीधृतस्रक् ॥ २८ ॥

भगवत्प्राप्तिहर्षनिर्भरें । आपुलें वर्णन आपुल्या वक्त्रें । करिती झाली तें येथ चतुरें । दूषण सहसा न मनावें ॥ १९ ॥ भगवत्प्राप्तीच्या उत्साहें । सभारंगणामाजि लाहें । प्रवेशलें मी द्रौपदीये । परिसती होय तें आतां ॥ २२० ॥ शिबिका गजरथयानाविणें । श्रीकृष्ण वरावया कारणें । रंगीं प्रवेशलें केवळ चरणें । वसनाभरणें मंडित पैं ॥ २१ ॥ चरणीं नूपुरें रुणझुणती । पदविन्यासीं फांके दीप्ती । जगती आक्रमितां गजगती । श्रीकृष्ण चित्तीं भरलासे ॥ २२ ॥ अनर्घ्य रत्नमणींची माळा । कनकग्रथिता परमोज्ज्वळा । हस्तीं घेऊनियां घननीळा । लक्षीं डोळां सप्रेम ॥ २३ ॥ कौशेयवसनांमाजि श्रेष्ठें । नूतनें रंगाळ्यें वरिष्ठें । नीवीबंधेंसीं द्रढिष्ठें । सोत्तरीयपरिधानें ॥ २४ ॥ कृष्णप्राप्तीचा हर्षोत्कर्ष । तेणें मंदस्मित वदनाब्जास । फुल्लार करितां ही मानस । संकोचवी कुमुदोपम ॥ २५ ॥ वक्रापाङ्गीं हरिमुख पाहें । व्रीडापल्लवें छादित राहें । मंदस्मिताचिया उदयें । मुख भासुर भगणपवत् ॥ २६ ॥ मौळप्रसून अर्धचंद्र । विगत उडुपें जेंवि अंबर । शोभे जैसें सनक्षत्र । मुक्तीं भासुर तेंवि शिर ॥ २७ ॥ बिजोरा हांसळ्या निडळपट्टीं । दिव्यसुमनांची ग्रथित दाटी । केशपाशांची रचिली सुघटी । शोभे गोमटी वेणिका ॥ २८ ॥ मूद राखडी केवडा कुहिरी । रत्नखचित कूर्म शफरी । अच्युत आंवळा बदरहारी । वेणिकाग्रीं शुभ गुच्छ ॥ २९ ॥ मंदारमाळा मौळाभरणीं । धरिली शोभे लावण्यगुणीं । हंसविन्यासें रुचिर चरणीं । सभारंगणीं प्रवेशलियें ॥ २३० ॥ शतसाखियांची भंवती घरटी । ज्यांचें सौन्दर्य अप्सरां मुकुटीं । उपचारार्पणाचिये रहाटी । वारिती दाटी वेत्रधरा ॥ ३१ ॥ ऐसी प्रवेशोनियां सभा । नृपांमाजि पंकजनाभा । निरखितां उत्साह नावरे नभा । लावण्यलाभा मन मानी ॥ ३२ ॥ सखीजनींही सभास्थानीं । दाविता नृपरत्नांच्या श्रेणी । त्यांमाजि लक्षिला चक्रपाणी । तें तूं श्रवणीं अवधारीं ॥ ३३ ॥

उन्नीय वक्त्रमुरुकुन्तलकुण्डलत्विङ्गण्डस्थलं शिशिरहासकटाक्षमोक्षैः ।
राज्ञो निरीक्ष्य परितः शनकैर्मुरारेरंसेऽनुरक्तहृदया निदधे स्वमालाम् ॥ २९ ॥

ईषन्मात्र उच्च वक्त्र । करूनि समस्त भूभुजचक्र । भंवतें पाहिलें म्यां सर्वत्र । निमेषमात्र न भरे तों ॥ ३४ ॥ तिया वक्त्राचीं विशेषणें । श्लोकीं कथिलीं व्यासनंदनें । तैसीं हरिवरदव्याख्यानें । उप-

लविजती तीं ऐका ॥ ३५ ॥ उरु म्हणिजे बहुकुंतल । कर्ण आणि गंडयुगल । तया दोहींचें अंतराळ । व्यापूनि कुटिल झळकती जे ॥ ३६ ॥ ऐसे कुन्तळ सारूनि मागें । पाहिलें भूभुजचक्र अवघें । सलंब-कटाक्षमोक्षणवेगें । स्मितापाङ्गें संमिश्र ॥ ३७ ॥ कुण्डलप्रमुख भूषणें श्रवणीं । ज्यांवरी जडिले भासुर मणि । कुन्तल उजळिती स्वप्रभें करूनी । गंडस्थानीं बिम्बित जे ॥ ३८ ॥ नीहार शीतळ जेंवि शरीरीं । तैसी स्मितभा संतापहारी । जिया कटाक्षांमाझारी । तिहीं श्रीहरि लक्षियला ॥ ३९ ॥ इत्यादि सविलास अपाङ्गीं । सप्रेम लक्षिला श्रीशार्ङ्गी । हृदय रंगलें लावण्यरंगीं । तिये समयीं नृपतनये ॥ २४० ॥ चिन्तामणि जेंवि मिडगणीं । शशांक जैसा कां उडुगणीं । तैशा भंवत्या नृपांच्या श्रेणी । पाहोनि नयनीं हरि वरिला ॥ ४१ ॥ कर्दमभक्षक जे दर्दुर । तेंवि उपेक्षूनियां नृपवर । चकोर लक्षी अमृतकर । तेंवि श्रीधर लक्षियला ॥ ४२ ॥ यंत्र भेदूनि सभाङ्गणीं । विजयश्रीसह चक्रपाणी । तरणि लोपी उडुगणश्रेणी । तेंवि नृपगणीं देदीप्य ॥ ४३ ॥ तो म्यां लक्षूनि श्रीगोपाळ । मंदगामी जेंवि मराळ । तैसी जाऊनियां हळुहळु । घातली माळ तत्कंठीं ॥ ४४ ॥ हरिरूपीं जडोनि गेलें हृदय । दैवें साधलें अघटित कार्य । माझा मनोरथ पावला विजय । निर्जरनिचय जय म्हणती ॥ ४५ ॥ हर्षें वर्षती सुमनभार । निर्जर करिती जयजयकार । गंधर्व गाती सप्तस्वर । पढती मुनिवर शुभसूक्तें ॥ ४६ ॥ मंडपीं जाला वाद्यगजर । ऐकें तोही संक्षेपमात्र । उत्साहभरित नरसुरचक्र । सुख अपार मम जनका ॥ ४७ ॥

तावन्मृदङ्गपटहाः शङ्खभेर्यानकादयः । निनेदुर्नटनर्तक्यो ननृतुर्गायका जगुः ॥ ३० ॥

माळा घालितां कृष्णकंठीं । आनंदनिर्भर जाली सृष्टी । नाद न समाये गगनमठीं । जयबोभाटीं वाद्यांच्या ॥ ४८ ॥ मृदंगांचा झणत्कार । ढोलदमामयांचा गजर । शंख भेरी दीर्घस्वर । वाजती उच्चतर दुन्दुभि ॥ ४९ ॥ आनक गोमुख काहळा मधुर । मंगळ तुरें अतिसुस्वर । भाटबंदिजनांचे भार । बिरुदें अपार ते पढती ॥ २५० ॥ नटवे नटिनी नाटकशाळा । कुशळा नर्तकी नर्तनशीळा । दावूनि कौशल्यकळा सकळा । नृत्यें करिती ते समयीं ॥ ५१ ॥ गायक गाती तानमानें । आरोहावरोह-मूर्च्छने । दाविती संगीतशिक्षाचिह्नें । गुणाढ्यपणें गुणवंत ॥ ५२ ॥ ऐसा भरला सभारंग । वरिला असतां म्यां श्रीरंग । लज्जा पावला भूभुजवर्ग । तोही प्रसंग अवधारीं ॥ ५३ ॥ विवाहसोहळा कथावा पुढें । तंव ते भूभुज चहूंकडे । खळबळूनियां उठिले फुडे । तेंचि रोकडें निरूपितें ॥ ५४ ॥

एवं वृते भगवति मयेशे नृपयूथपाः । न सेहिरे याज्ञसेनि स्पर्द्धिनो हृच्छयातुराः ॥ ३१ ॥

श्रीकृष्ण म्यां वरिला ऐसा । तेणें भूपांच्या मानसा । लागला अपयशःकलंक कैसा । जेंवि कोळसा शुभ्रपटीं ॥ ५५ ॥ थोर थोर जे नृपयूथप । परस्परें नोकिती भूप । म्हणती केव्हडें आमुचें पाप । अपयशोलेपें विलेपिलों ॥ ५६ ॥ वरिला असतां म्यां श्रीपती । नृपगण देखों न साहती । सज्ज

जाहले युद्धाप्रती । दुष्ट दुर्मती अविचार ॥ ५७ ॥ आपण भेदूं न शकूं यंत्र । जाणत असतां हें सर्वत्र । कामक्षोभें अविवेकपात्र । जाले विचित्र तें ऐकें ॥ ५८ ॥ कामक्षोभाची विचित्र प्रौढी । जळतां आगीं घालवी उडी । न पाहे आपुली शक्ति केव्हढी । संपन्न बराडी न विचारी ॥ ५९ ॥ तस्मात कामक्षोभाचे भरीं । भूपीं नोकूनि परस्परीं । नधरत दुर्मद मिनले समरीं । हें देखोनि श्रीहरि निजनेत्रीं ॥ २६० ॥

मां तावद्रथमारोप्य हयरत्नचतुष्टयम् । शार्ङ्गमुद्यम्य सन्नद्धस्तस्थावाजौ चतुर्भुजः ॥ ३२ ॥

देखोनि नृपांचा रणोद्यम । तेव्हां मातें पुरुषोत्तम । रथीं वाहूनि तुरंगम । संयाजिले समरंगीं ॥ ६१ ॥ चारी अश्वरत्नें जिये रथीं । दारुका ऐसा कुशल सारथी । योद्धा श्रीकृष्ण प्रतापमूर्ती । सज्जूनि निगुती कोदंड ॥ ६२ ॥ आजौ म्हणिजे समराङ्गणीं । सन्नद्ध ठाकला प्रतापतरणी । मातें भयभीत जाणोनी । द्विभुजीं उचलोनी आलिङ्गी ॥ ६३ ॥ कमले समान मातें हृदयीं । कवळूनि ठाकला समरमही । शार्ङ्गकोदंड हस्तीं दोहीं । टणत्कारिलें सज्जूनी ॥ ६४ ॥ माझें भयभीत अंतर । स्वयें जाणोनि द्वारकेश्वर । चतुर्भुज होऊनियां सत्वर । मजला धरिलें हृत्कमळीं ॥ ६५ ॥ द्विभुजीं मातें आलिङ्गून । द्विभुजीं सज्जूनि चापबाण । मशकप्राय नृपांचा गण । लक्षिता जाला पद्माक्ष ॥ ६६ ॥ जाणोनि प्रभूचा समरोद्योग । दारुकनामा सारथि चांग । साट देऊनियां तुरंग । चाऱ्ही चपळांग चेतविले ॥ ६७ ॥

दारुकश्चोदयामास काञ्चनोपस्करं रथम् । मिषतां भूभुजां राज्ञि मृगाणां मृगराडिव ॥ ३३ ॥

केवळ कंठीरव तो रथ । सुवर्णोपस्करमंडित । नेत्रस्थानीं दारुक तेथ । कृष्ण हृदयस्थ परमात्मा ॥ ६८ ॥ भूभुज पाहतां मृगांचे परी । मृगेन्द्रा ऐसा मातें हरि । जवें जयश्री जातां समरीं । नृपशस्त्रास्त्रीं उठियले ॥ ६९ ॥

तेऽन्वसज्जन्त राजन्या निषेद्धु पथि केचन । संयत्ता उधृद्तेष्वासा ग्रामसिंहा यथा हरिम् ॥ ३४ ॥

मग ते भूतळींचे भूपती । हरिरथ जातां द्वारकापथीं । मागें धांवोनि वातगती । पाचारिती समरंगा ॥ २७० ॥ कोण्ही एक प्रतापवंत । करीं कोदंडें सज्जीकृत । पुढें वावळूनियां स्वरथ । त्रैलोक्यनाथा पडखाळिती ॥ ७१ ॥ ग्रामसिंह म्हणिजे श्वान । भुङ्कती सिंहातें देखून । आडवे धांवती जेंवि दुरून । तेंवि आंगवण नृप करिती ॥ ७२ ॥

ते शार्ङ्गच्युतबाणौघैः कृत्तबाहूरुकंधराः । निपेतुः प्रधने केचिदेके सन्त्यज्य दुद्रुवुः ॥ ३५ ॥

ऐसे वरवाळले जे राजे । त्यांतें देखोनि गरुडध्वजें । शार्ङ्गनिर्मुक्तमार्गणतेजें । शिरें सरोजें सम

हरिलीं ॥ ७३ ॥ शार्ङ्गनिर्मुक्तबाणप्रवाहो । माजले जैसे प्रळयमेहो । किंवा काळाग्निरुद्राक्ष दाहो । करित क्षोभले बहुसाळ ॥ ७४ ॥ शार्ङ्गनिर्मुक्तबाणौघ बहु । तिहीं छेदिले नृपांचे बाहु । कंधर छेदूनि केले राहु । अधरामृतेच्छु बहूतेक ॥ ७५ ॥ अंघ्रि छेदिलिया अंघ्रिप । पडती तैसे समरीं नृप । शार्ङ्गच्युतबाणीं अमूप । खंडिले भूप यवसप्राय ॥ ७६ ॥ बाणीं खंडिती करपदतळें । जंघाजानुकटिमंडळें । गगनीं उसळती शिसाळें । वीरश्रीइसाळे खांखांत ॥ ७७ ॥ मारीं मारीं घे घे म्हणती । आवेशें शरसंधानें करिती । ते कृष्णाच्या मार्गणाघातीं । विखंड होतीं निमिषार्द्धें ॥ ७८ ॥ ऐसे बहु नृप आयोधनीं । पडतां प्रेतीं दाटे धरणी । कित्तेक विमुख समराङ्गणीं । प्राण घेऊनि पळाले ॥ ७९ ॥ पळतां एका नटके वाट । वेंगड्या वळतां पडलें मेट । यादवांचे म्हणविती भाट । करिती बोभाट बिरुदांचा ॥ २८० ॥ एकीं तोंडीं धरूनि तृणें । म्हणविती नंदाचीं गोधनें । पूर्वी जैसीं रक्षिलीं कृष्णें । तेंवि ये क्षणें रक्षावीं ॥ ८१ ॥ एक अक्षतचि समराङ्गणीं । प्रेतप्राय पडले धरणी । एक उदकारें भवानी । भूतें म्हणवूनि स्मरताती ॥ ८२ ॥ खेटकांचीं, करूनि परडीं । खड्ग दिवटीचे परवडी । उदो उदो म्हणती तोंडीं । मागती कवडी तैलार्थ ॥ ८३ ॥ ऐसें कृष्णें एकाङ्गवीरें । वीरां लाविलें घायकाविरें । सुरवर गर्जती जयजयकारें । हृदयीं श्रीधरें मज धरिलें ॥ ८४ ॥ प्रबळ भंगूनि भूभुजसेना । कैसा स्वपुरीं प्रवेश कृष्णा । यावरी अवधारीं त्या कथना । म्हणे कुरुरत्ना शुकयोगी ॥ ८५ ॥

ततः पुरीं यदुपतिरत्यलङ्कृतां रविच्छदध्वजपटचित्रतोरणाम् ।
कुशस्थलीं दिवि भुवि चाभिसंस्तुतां समाविशत्तरणिरिव स्वकेतनम् ॥ ३६ ॥

परिपंथी जे दुष्ट भूपति । समरीं भंगूनियां यदुपति । त्यानंतरें स्वपुरीप्रति । प्रवेश करिता जाहला ॥ ८६ ॥ यंत्र भेदूनि मातें हरि । प्रतापें जिंकूनि करी नोवरी । भूपति लज्जा वरूनि समरीं । अर्कतूळापरी विधुळले ॥ ८७ ॥ तरुणदुर्दशेनें माळा । घालूनि वरिलें भूमिपाळां । मजसह विजयश्री गोपाळा । वरूनि आंगीं विराजली ॥ ८८ ॥ नृप भंगल्यानंतर हरि । कुशस्थळी जे द्वारकापुरी । शृंगार-मंडित अतिसाजिरी । प्रवेश करी तयेमाजी ॥ ८९ ॥ सालंकृता म्हणाल कैसी । प्रासादशिखरें मंडित कळशीं । पताका झळकती पवनस्पर्शीं । ते पट रवीसी आच्छादिती ॥ २९० ॥ गगनचुंबित ध्वजांचे स्तंभ । निबिड पताका चित्रप्रभ । ध्वजाग्रभागीं कनककुंभ । रत्नखचित लखलखिती ॥ ९१ ॥ पुरद्वारें गोपुरें तुंगें । विचित्रतोरणें राजितशृंगें । प्रतापें पाळिली जे श्रीरंगें । स्तविजे त्रिजगें जियेप्रति ॥ ९२ ॥ स्वप्रभेसीं जैसा तरणी । विराजमान सर्वाभरणीं । प्रतीची ठाकी वेष्टितकिरणीं । चक्रपाणी तेंवि नगरी ॥ ९३ ॥ मंगळवाद्यांचे बोभाट । बिरुदावळी पढती भाट । नृत्य करिती नर्तकीनट । भंवते यथेष्ट जन पाहती ॥ ९४ ॥ पुरद्वारप्रवेशकाळीं । वोवाळूनि टाकिल्या बळी । द्विजां वांटिल्या कनकांजळी । याचक सकळी गौरविले ॥ ९५ ॥ वंदूनि उग्रसेन नृपति । स्वगृह प्रवेशे श्रीपति । विध्युक्त विवाह करूनि निगुती । सहृदीं आप्तीं विराजला ॥ ९६ ॥ माझिया जनकें आत्मसदनीं । पूजावा जंव चक्रपाणी । तंव भूभुज अवघे अविचारखाणी । समरांगणीं मिसळले ॥ ९७ ॥ तयां नृपांची करूनि शांति । विजयलक्ष्मी

वरूनि श्रीपति । प्रवेशला द्वारकेप्रति । हें ऐकूनि निगुती मम जनकें ॥ ९८ ॥ विवाहांगसंपत्ति सकळा । सहित सुहृद स्वजनमेळा । घेऊनि द्वारकापुर पातला । साङ्ग सारिला विधि तेथें ॥ ९९ ॥

पिता मे पूजयामास सुहृत्सम्बन्धिबान्धवान् । महार्हवासोलङ्कारैः शय्यासनपरिच्छदैः ॥ ३७ ॥

उभयपक्षींचे सुहृद आले । गोत्रज मित्र सोयरे भले । माझिया जनकें ते पूजिले । संतोषविले सत्कारें ॥ ३०० ॥ मौलागळीं वसनाभरणें । अर्पिलीं समस्तांकारणें । शय्या आसनें सर्वोपकरणें । शिबिरें वितानें समर्पिलीं ॥ १ ॥ वृष्णि भोज अन्धक कुकुर । सात्वत दाशार्ह यदुकुळ साग्र । पूजिले मम जनकें समग्र । दिव्योपचार समर्पूनियां ॥ २ ॥ याज्ञसेनि कल्याणराशि । यानंतरें जामातासी । आंदण दिधलें परियेसीं । संक्षेपेंसीं तुज कथितें ॥ ३ ॥

दासीभिः सर्वसम्पद्भिर्भटेभरथवाजिभिः । आयुधानि महार्हाणि ददौ पूर्णस्य भक्तितः ॥ ३८ ॥

पृथक् एकैक सांगूं किती । ज्या ज्या अघघ्या नृपसंपत्ती । तितुक्या अर्पिल्या सप्रेमभक्ती । श्रीभगवंतीं मम जनकें ॥ ४ ॥ चपळा कुशळा चातुर्यखाणी । सालंकृता सुभगा तरुणी । जयांच्या आंगींच्या लावण्यगुणीं । निर्जररमणी न तुकती ॥ ५ ॥ ऐसिया दासी शतानुशत । सुभट पदाति हय गज रथ । अमूल्य आयुधें इहींसीं सहित । आणि पदार्थ बहुसाल ॥ ६ ॥ भगवान सर्व विषयीं परिपूर्ण । तयासी मम जनकें प्रार्थून । भक्तिपूर्वक हें आंदण । देता जाला आल्हादें ॥ ७ ॥ पूर्णकाम तो इच्छा-रहित । परंतु पुरवी स्वभक्तार्थ । बृहत्सेन जाणोनि विनीत । आंदण समस्त स्वीकेलें ॥ ८ ॥ ऐसा वरिला चक्रपाणी । तथापि ऐकें याज्ञसेनी । उत्कट हेत आमुचे मनीं । तुजलागुनी तो कथितें ॥ ९ ॥

आत्मारामस्य तस्येमा वयं वै गृहदासिकाः । सर्वसङ्गनिवृत्त्याऽद्धा तपसा च बभूविम ॥ ३९ ॥

आत्माराम जो भगवंत । पूर्णकाम कामनारहित । त्याचे सदनीं होऊं समस्त । अष्टमहिषी दासिका ॥ ३१० ॥ जरी तूं म्हणसी द्रौपदिये । ऐसें तुमचें सुकृत काय । जें दासिका होऊनि श्रीकृष्ण-निलय । अनुचरप्राय सेवाल ॥ ११ ॥ तरी ऐकें पांडववनिते । विसर्जूनि सर्व संगातें । निष्काम-तपश्चर्यासुकृतें । होऊं दास्यातें अधिकारी ॥ १२ ॥ ऐसी स्वयंवरकाहणी । याज्ञसेनीप्रति बार्हत्सेनी । वदली त्यावरी समस्ता जणी । षोडषसहस्रा निरूपिती ॥ १३ ॥

॥ महिष्य ऊचुः ॥ भौमं निहत्य सगणं युधि तेन रुद्धा ज्ञात्वाऽथ नः क्षितिजये जितराजकन्याः ।
निर्मुच्य संसृतिविमोक्षमनुस्मरन्तीः पादाम्बुजं परिणिनाय य आप्तकामः ॥ ४० ॥

म्हणती अवो पाञ्चाळतनये । पाणिग्रहणें आमुचीं माये । समासें कथितों ऐकती होय । श्रीकृष्णपाय लाधलों तें ॥ १४ ॥ भूमितनय भौमासुर । त्रिजगीं अजिंक महाघोर । जेणें शक्रादि

सुरवर । केले स्वकिंकर जिंकूनी ॥ १५ ॥ इंद्रमातेचीं कुंडलें हरिलीं । स्वमाते भूमीतें अर्पिलीं । रत्न-शृंगादि संपत्ति नेली । प्राग्ज्योतिषपुरातें ॥ १६ ॥ तया प्रसंगें दिग्विजयार्थ । भौम जाला उद्योगवंत । अग्नि जिंकोनि केला अंकित । पुरपरिधीकृत स्थापिला ॥ १७ ॥ शमन केला आज्ञाधारी । निर्ऋति परिचर्याधिकारी । वरुण प्रतापें जिंकूनि समरीं । छत्र हरिलें सुधास्रावी ॥ १८ ॥ वायु जिंकूनि प्रताप-शक्ती । घरटी देववी स्वपुराभंवती । नम्र होऊनि द्रविणपती । सख्यें निगुती वर्ततसे ॥ १९ ॥ कर्क-शतपोवळें श्रीकंठ । वशवर्ती तो केला स्पष्ट । पिशाचसेनेचे संघाट । वसवी निकट तद्योगें ॥ ३२० ॥ ऐसिया दिग्विजयप्रसंगीं । सुरवर जिंकूनियां त्रिजगीं । कन्यारत्नें हरूनि अवघीं । संग्रह केला निज-भुवनीं ॥ २१ ॥ दिग्विजयीं जे जिंकिले राजे । तयांच्या दुहिता लावण्यतेजें । दिव्यरत्नें जाणोनि वोजें । स्वपुरीं पैजे संग्राहिल्या ॥ २२ ॥ तिया आम्ही सहस्रें सोळा । भौमभुवनीं झालों गोळा । रोधिलों असतो घनसांवळा । दैवें त्या स्थळा पातला ॥ २३ ॥ स्वगणेंसहित मारूनि भौम । विजयी जाला मेघश्याम । अवलोकितां भौमधाम । आमुचे श्रम विलोकिले ॥ २४ ॥ भौमें रोधिल्या नृप-नंदिनी । जाणोनि सर्वज्ञें निजमनीं । कीं ज्या मत्पादाब्जस्मरणीं । स्वमोक्ष वांछूनि रंगलिया ॥२५॥ ज्याचिया चरणस्मरणास्तव । भवबंदीं पडले जीव । मोक्ष पावती तेथूनि सर्व । ऐसा निर्वाह करूनियां ॥ २६ ॥ भौमनिरुद्धा नृपात्मजा । ऐसें जाणोनि मत्पादकंजा । स्मरताती हें गरुडध्वजा । विदित जालें सर्वज्ञा ॥ २७ ॥ मग सोडवूनि आम्हां प्रति । सहित भौमाची संपत्ति । द्वारके आणूनियां श्रीपति । पर्णी निगुती सर्वांतें ॥ २८ ॥ एके घटिकेमाजी सकळा । कृष्णें पर्णिल्या सहस्रें सोळा । आप्तकामही घनसांवळा । आम्हां प्रेमळांस्तव द्रवला ॥ २९ ॥ तयाच्या पदभजनाची प्राप्ति । भाग्यें जाली आम्हांप्रति । यावरी कांहीं वांछा चित्तीं । नाहीं निश्चिती तें ऐका ॥ ३३० ॥

न वयं साध्वि साम्राज्यं स्वाराज्यं भोज्यमप्युत । वैराज्यं पारमेष्ठ्यं च आनन्त्यं वा हरेः पदम् ॥ ४१ ॥

अवो साध्वि पतिव्रते । वृत्तान्त ऐकें पांडवकान्ते । आम्ही न वांछूं साम्राज्यातें । स्वाराज्यातें आदिकरुनी ॥ ३१ ॥ अथवा भोज्यही न वांछूं । वैराज्य पारमेष्ठ्य न इच्छूं । आनंत्यपदही करूनि तुच्छ । विलसों स्वच्छ हरिचरणीं ॥ ३२ ॥ श्रोते म्हणती पृथगा नांवीं । साम्राज्यादि विभवें आघवीं । यांचीं स्वरूपें निरूपावीं । आस्था जीवीं हे वर्ते ॥ ३३ ॥ ऐकोनि म्हणे दयार्णव । सप्तद्वीपींचें नृपगौरव । सपत्नरहित भोगिजे सर्व । साम्राज्य नांव त्या विभवा ॥ ३४ ॥ स्वाराज्य म्हणिजे स्वर्गींचें राज्य । शतमखसुकृतें होऊनि पूज्य । लाहिजे त्याहूनि ऐश्वर्यपुंज । जें कां भोज्य दिविभौम ॥ ३५ ॥ साम्राज्यस्वाराज्यांचे भोग । एकत्र अवक्र घडती साङ्ग । भोज्यनामें तें विभव चांग । ऐका

अव्यंग वैराज्यही ॥ ३६ ॥ अणिमादिका विभूति अष्ट । ज्यातें वोळगती त्या स्पष्ट । विविधा विभवीं जो उपविष्ट । नामें विराट तो पुरुष ॥ ३७ ॥ विराजाचें जें वैभव । वैराज्य ऐसें तयाचें नांव । परमेष्ठीचें ऐश्वर्य सर्व । पारमेष्ठ्य त्या म्हणिजे ॥ ३८ ॥ आनंत्य म्हणिजे अपवर्गातें । त्याची अपेक्षा न धरूं चित्तें । द्रौपदी म्हणे तरी तुम्हांतें । प्रियतम काय तें मज सांगा ॥ ३९ ॥ ऐकूनि म्हणती समस्ता जणी । हरिपदवाञ्छा आमुचे मनीं । याहूनि आणिक या त्रिभुवनीं । याज्ञसेनी प्रिय न वटे ॥ ३४० ॥

कामयामह एतस्य श्रीमत्पादरजः श्रियः । कुचकुंकुमगन्धाढ्यं मूर्ध्ना वोढुं गदाभृतः ॥ ४२ ॥

आम्ही समस्ता संतत पोटीं । हेचि कामना वांछूं मोठी । श्रीमद्भगवत्पदरज मुकुटीं । वाहूं गोरटी महाभाग्यें ॥ ४१ ॥ श्रीमत्पदरज कैसें म्हणसी । जें लक्ष्मीच्या कुचसंस्पर्शीं । कुंकुमाक्त-सौरभ्येंसीं । निरपेक्षेसीं वेधक पैं ॥ ४२ ॥ श्रीकुचकुंकुमसुगंधाढ्य । गदाभृताचे चरण सुदृढ । ते स्वमूर्ध्नि वहावे उघड । हे कामना गोड कामितसों ॥ ४३ ॥ ब्रह्मा शंकर सह सुरवर । लक्ष्मी पदरजो-भरणा शिर । वोडविती ते श्री सादर । ज्याचे पदरजप्राप्तीतें ॥ ४४ ॥ ऐसें हरिपदपंकजरज । त्रिजगीं दुर्लभतर जें सहज । तत्प्राप्तीचें कामनाबीज । वसवी हृत्कंज पैं आमुचें ॥ ४५ ॥ पाञ्चाळीये जरी तूं म्हणसी । पदरज दुर्लभ विधिहरांसी । त्याची प्राप्ति तुम्हांसी । वृथा मानसीं कामितसां ॥ ४६ ॥ तरी येथींचें ऐकें गुज । सप्रेमळ जे भक्तराज । त्यांसी सुलभ श्रीपदकंज । सहजीं सहज अनायासें ॥ ४७ ॥ सुलभ प्राप्ति कोण्हा कैसी । जाली म्हणोनि तूं जरी पुससी । तरी ऐकावें इयेविषीं । संशय मानसीं न धरूनी ॥ ४८ ॥

व्रजस्त्रियो यद्वाञ्छन्ति पुलिन्द्यस्तृणवीरुधः । गावश्चारयतो गोपाः पादस्पर्शं महात्मनः ॥ ४३ ॥

काया वाचा मनेंकरून । श्रीपदकंजीं तत्पर मन । भाविक सप्रेमळ जे पूर्ण । त्यांलागून अति-सुलभ ॥ ४९ ॥ व्रजस्त्रिया सावड्या घुरटा । पुलिंदपत्न्या त्या रानटा । परंतु हरिपदकंजीं निष्ठा । वरिती अभीष्टा सुलभत्वें ॥ ३५० ॥ महात्मया श्रीकृष्णाचें । पदरज सुलभ त्यांतेंचि साचें । तृणवल्लरी-जाळि यांचे । पादस्पर्शाचे मनोरथ ॥ ५१ ॥ गाई चारित असतां वनीं । गोपी गोपाळांलागुनी । पाद-स्पर्शवांछा मनीं । पंकजपाणी ते पुरवी ॥ ५२ ॥ तस्मात् आमुचा जाणोनि भाव । प्रणतवत्सल वासुदेव । पदरजलाभाचें वैभव । वोपी स्वयमेव द्रौपदिये ॥ ५३ ॥ कृष्णपत्न्यांतें स्वयंवरें । पाञ्चाळीनें अत्यादरें । पुसतां तिहीं पृथगाकारें । निरूपिलीं तीं तुज कथिलीं ॥ ५४ ॥ यावरी पुढिले अध्यायीं ।

मुनिवर देखनि शेषशायी । नृपांसहित भजला पाहीं । श्रवणालयीं तें वसवा ॥ ५५ ॥ एकनाथ परमामृत । चिदानंद सुस्वादभरित । प्राशन करिता स्वानंद प्राप्त । गोविन्द निश्चित ते होती ॥ ५६ ॥ दयार्णवें तत्कृपालेश । लाहूनी श्रोतयांतें पीयूष । महाराष्ट्रभाषा वोपी सुरस । नित्यनिर्दोष हरिवरदें ॥ ५७ ॥ एवं श्रीमद्भागवतीं । जें जें वदली शुकभारती । श्रवणीं सादर परीक्षिती । जो हरिकीर्तिरसभोक्ता ॥ ५८ ॥ तये कीर्तीच्या श्रवणपठनें । षड्वैऱ्यांचें उठे ठाणें । श्रोतयां कैवल्यसुख लाहणें । हरिवरदानें सुगमत्वें ॥ ५९ ॥ श्रीमद्भागवत दशम स्कंध । टीका हरिवरद अगाध । दयार्णवकृत परम विशुद्ध । अध्याय प्रसिद्ध त्र्यशीतितम ॥ ३६० ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां सूर्योपरागतीर्थयात्रावृष्णिकुरुसंगमवर्णनं नाम त्र्यशीतितमोऽध्यायः ॥ ८३ ॥

कालयुक्ताक्षिके मार्गे सप्तम्यां कृष्णपक्षगे । भृगौ पिपीलिकायां च हरिपत्न्युक्तिर्निरूपिता ॥ १ ॥

श्लोक ४३ ॥ ओवी-संख्या ३६० ॥ एवं संख्या ४०३ ॥

(ब्याऐंशींवा अध्याय मिळून ओवीसंख्या ३७,२३१)

त्र्याऐंशींवा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ८४ वा

श्रीकृष्णपरमात्मने नमः । मुनिजनमानससरसिजभ्रमरा । सप्रेमपरागसेवनचतुरा । नमो गोविन्दा प्रणतनिकरा । चित्सुखकरा चिद्रूपा ॥ १ ॥ तव पदप्रज्ञाबळें । व्यायशी अध्याय वाखाणिले । क्रमें व्याख्यान उपायिलें । चतुरशीतितमाचें ॥ २ ॥ तेथ मुनीश्वरांचा मेळा । पाहों पातला रामगोपाळां । रामकृष्णीं तो पूजिला । आनंदविला स्तुतिवादें ॥ ३ ॥ ते येथ कथा सविस्तर । परीक्षितीतें व्यासकुमर । निरूपित असे ते सादर । श्रोतीं समग्र परिसावी ॥ ४ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ श्रुत्वा पृथा सुबलपुत्र्यथ याज्ञसेनी माधव्यथ क्षितिपपत्न्य उत स्वगोप्यः ।
कृष्णेऽखिलात्मनि हरौ प्रणयानुबन्धं सर्वा विसिस्म्युरलमश्रुकलाकुलाक्ष्यः ॥ १ ॥

शुक म्हणे गा कौरवनृपति । श्रीकृष्णाच्या समग्र युवति । स्वयंवरवार्ता वदल्या निगुती । हरिपदभक्ती सप्रेमें ॥ ५ ॥ तिया ऐकोनि याज्ञसेनी । सुभद्रा माधवी या अभिधानीं । सुबळरायाची नंदिनी । जे धृतराष्ट्रपत्नी गान्धारी ॥ ६ ॥ गान्धारीच्या सकळ सुना । त्यांवेगळ्या भूपाङ्गना । ऐकोनि कृष्णाङ्गनांच्या वचना । विस्मयापन्ना जाहलिया ॥ ७ ॥ कृष्णीं सप्रेमानिरता गोपी । ज्या विनटल्या श्रीकृष्णरूपीं । त्याही विस्मयें निजसंकल्पीं । निमग्न जाहल्या श्रीकृष्णीं ॥ ८ ॥ कृष्ण अखिलात्मा जो पाहीं । सुस्निग्धप्रेमें तयाच्या ठायीं । हृदय निबद्ध केलें जिहीं । अश्रुकळा तिहीं विसर्जिल्या ॥९॥ स्वयंवरकथानिरूपणामिसें । श्रीकृष्णाचीं उद्दाम यशें । ऐकोनि विस्मित निजमानसें । जाल्या ऐसें निरूपिलें ॥ १० ॥ विस्मयें पावल्या परमानंद । तो वर्णावा जरी का विशद । अपार-

चित्सुखाब्धि अगाध । कथनीं मुग्ध विधि हरही ॥ ११ ॥ एवं तिये कुरुक्षेत्रीं । परस्परें स्नेहसूत्रीं । संवाद जाला तो तां श्रोत्रीं । अवधारिला कीं कुरुवर्या ॥ १२ ॥

इति सम्भाषमाणासु स्त्रीभिः स्त्रीषु नृभिर्नृषु । आययुर्मुनयस्तत्र कृष्णरामदिदृक्षया ॥ २ ॥

नरांसीं नर संवादती । स्त्रियांसीं स्त्रिया अनुवादती । तंव अकस्मात मुनींची पंक्ती । जाली येती ते समयीं ॥ १३ ॥ रामकृष्णांची अंतःकरणीं । दर्शनेच्छा धरोनि मुनि । पातले ते बादरायणि । नामाभिधानीं निरूपी ॥ १४ ॥

द्वैपायनो नारदश्च च्यवनो देवलोऽसितः । विश्वामित्रः शतानन्दो भरद्वाजोऽथ गौतमः ॥ ३ ॥
रामः सशिष्यो भगवान्वसिष्ठो गालवो भृगुः । पुलस्त्यः कश्यपोऽत्रिश्च मार्कण्डेयो बृहस्पतिः ॥ ४ ॥
द्वितस्त्रितश्चैकतश्च ब्रह्मपुत्रास्तथाङ्गिराः । अगस्त्यो याज्ञवल्क्यश्च वामदेवादयोऽपरे ॥ ५ ॥

द्वैपायननामें व्यास । नारद देवर्षि प्रत्यक्ष । च्यवन भृगूचा औरस । देवल सशिष्य असितही ॥१५॥ गाधितनय विश्वामित्र । शतानंद तो अहल्यापुत्र । भरद्वाज अंगिरसप्रवर । गौतम मुनिवर नैयायिक ॥१६॥ भार्गवराम शिष्यांसहित । वासिष्ठ गालव भृगु पुलस्त्य । कश्यप एक द्वित त्रित । अत्रि मार्कंडेय बृहस्पति ॥ १७ ॥ यांवेगळे ब्रह्मपुत्र । मरीचि अंगिराप्रमुख समग्र । अगस्तियाज्ञवल्क्यादि अपर । वामदेवादिक अवघे ॥ १८ ॥ शिष्यशाखांसह मंडळी । पहावया रामवनमाळी । पातले त्यांतें तिये वेळीं । अर्चिती हरिहळी तें ऐका ॥ १९ ॥

तान्दृष्ट्वा सहसोत्थाय प्रागासीना नृपादयः । पाण्डवाः कृष्णरामौ च प्रणेमुर्विश्ववन्दितान् ॥ ६ ॥

येतां देखोनि त्या मुनींतें । नृपति बैसले तेथ जे होते । पाण्डवरामकृष्णादि अवघे ते । उभे ठाकले झडझडां ॥ २० ॥ त्रिजगद्वंद्य जे कां मुनि । त्यांतें देखूनि नमिती मूर्धि । पूजिते जाले सत्कारूनी । चक्रपाणि जेंवि अर्ची ॥ २१ ॥ रामकृष्ण अर्चिती जैसे । समस्त नृपही तयांचि सरिसे । पूजिते जाले सप्रेमरसे । शुद्धमानसें मुनिवर्यां ॥ २२ ॥

तानानर्चुर्यथा सर्वे सहरामोऽच्युतोऽर्चयत् । स्वागतासनपाद्यार्घ्यमाल्यभूषानुलेपनैः ॥ ७ ॥

श्रेष्ठासनीं बैसवोनि सर्वां । स्वागतप्रश्न करिती बरवा । पादार्घ्याचमनादिगौरवा । पूजिते जाले यथाविधि ॥ २३ ॥ मलजगंधें अनुलेपनें । कस्तूरी केशर सुगंध सुमनें । दिव्याभरणें अमूल्यवसनें । तपोधनांतें समर्पिलीं ॥ २४ ॥ धूपदीपदिव्योपहार । फलताम्बूल चामीकर । विविध रत्नें सर्वोपचार । पुष्पाञ्जळि नीराजनें ॥ २५ ॥ ऐसे मुनिवर पूजिल्यावरी । विश्रान्ति पावले अभ्यंतरीं । सुखें बैसले त्यांप्रति हरी । वदे वैखरी तें ऐका ॥ २६ ॥

उवाच सुखमासीनान्भगवान्धर्मगुप्तनुः । सदस्तस्य महतो यतवाचोऽनुशृण्वतः ॥ ८ ॥

धर्मरक्षक ज्याची तनु । त्यालागीं म्हणिजे धर्मगुप्तनु । तो भगवान स्वमुखेंकरून । समाहित वचन बोलतसे ॥२७॥ महतांचिये सभास्थानीं । श्रवण करीत असतां मुनी । बोलता जाला चक्रपाणी । नियतवचनीं तें ऐका ॥ २८ ॥

श्रीभगवानुवाच । अहो वयं जन्मभृतो लब्धं कात्स्न्र्येन तत्फलम् । देवानामपि दुष्प्रापं यद्योगेश्वरदर्शनम् ॥९॥

अहो म्हणिजे हर्षोत्कर्षें । भगवान बोले परमोल्लासें । आम्ही जन्मसाफल्य तैसें । लाधलों जैसें लाहों ये ॥ २९ ॥ जन्मवंतांचें सफळ जिणें । होय साकल्यें ज्या साधनें । देवांसही दुर्लभपणें । आम्हांकारणें तें सुलभ ॥ ३० ॥ जन्मसाफल्याचें बीज । तें साकल्यें आम्हां सहज । देवां दुर्लभ जें निजगुज । तें पदकंज स्वामींचें ॥ ३१ ॥ योगीश्वरांचें दर्शन । तें आम्हां सुलभ पूर्णत्वेंकरून । देखतां स्वामींचे श्रीचरण । त्रिजगीं मान्य धन्यतम ॥ ३२ ॥ देवां दुर्लभ दर्शन तुमचें । आम्हां सुलभ तें आजि साचें । जालों अधिकारी स्पर्शाचे । चरणसेवनाचेनि मिसें ॥ ३३ ॥ देवां दर्शनमात्रही न घडे । आम्हां स्पर्शन सेवन घडे । अघटित घटनेचेनि पाडें । आश्चर्य केवढें वाटतसे ॥ ३४ ॥

किं स्वल्पतपसां नृणामर्चायां देवचक्षुषाम् । दर्शनस्पर्शनप्रश्नप्रह्वपादार्चनादिकम् ॥ १० ॥

अपक्वज्ञानी अल्पबुद्धि । त्यांची विपरीत साधनसिद्धि । भजती देखोनियां उपाधि । फळानिरुपाधि अनोळख ॥ ३५ ॥ मिष्ट उत्कृष्ट नेणती खंड । भजती तदर्थ इक्षुदंड । अल्पफळार्थ कर्मकाबाड । केवळ जडमूढ आचरती ॥ ३६ ॥ तीर्थादिस्नानमात्रीं ज्यांची । तपोबुद्धि वर्ते साची । ऐसिया अल्पता पशूंची । निष्ठा कैंची सत्पुरुषीं ॥ ३७ ॥ पाषाणादिप्रतिमामात्रीं । देवताबुद्धि ज्यांचे नेत्रीं । तयांची निष्ठा योगीश्वरीं । सुकृतकारी न संभवे ॥ ३८ ॥ योगीश्वराचें दर्शन । अंगसंवाहनस्पर्शन । नम्रता प्रश्न पादार्चन । सुकृतसाधनसें न वटे ॥ ३९ ॥ कीं ते स्थूळदृष्टि मूढ । देहात्मवादी जे कां दृढ । तीर्थप्रतिमातपादि उघड । कर्मकाबाड श्रेष्ठ गमे ॥ ४० ॥ योगीश्वरांच्या ठायीं त्यांची । मानुषीप्रतीति वर्ते साची । यास्तव दर्शनस्पर्शनाची । पादार्चनाची असंभावना ॥ ४१ ॥ जैसे आपण मनुष्यदेही । योगीश्वरही तैसेंचि पाहीं । भासती आणि त्यांच्या ठायीं । निष्ठा न बणे पूज्यत्वीं ॥ ४२ ॥ त्यांच्या दर्शनें कल्याणप्राप्ति । स्पर्शनें समस्ताघनिवृत्ति । नम्रप्रश्ने आत्मसंवित्ति । अमृतावाप्ति पादार्चनें ॥ ४३ ॥ ऐसी भावना नुपजे तयां । स्थूळबुद्धि ज्या प्राणियां । असंभावना करूनियां । दृढनिश्चया अनुसरती ॥ ४४ ॥ परि ते तारतम्य नेणती । स्थूळबुद्धि मंदमति । तेचि तारतम्याचे रीती । स्वमुखें श्रीपति वाखाणी ॥ ४५ ॥

न ह्यम्मयानि तीर्थानि न देवा मृच्छिलामयाः । ते पुनन्त्युरुकालेन दर्शनादेव साधवः ॥ ११ ॥

अम्मयें म्हणिजे जलमयें तीर्थें । पापक्षालनीं नव्हती समर्थें । मृत्तिकापाषाणमयदैवतें । जीं असमर्थें फळदानीं ॥ ४६ ॥ योगीश्वरांच्या कृतसंकल्पें । उदकें होती तीर्थरूपें । मृत्तिका पाषाण सुरप्रतापें । स्फुरती जल्पें ज्यांचेनी ॥ ४७ ॥ तया तीर्थप्रतिमांप्रति । भजतां चिरकाळें फळें देती । साधुदर्शनें सफळ होती । मनोरथमात्र भजकांचे ॥ ४८ ॥ प्रतिमातीर्थादिकांचें परम । साधुसेवनीं तारतम्य । क्लेशसाध्य आणि सुगम । पुन्हा पुरुषोत्तम प्रतिपादी ॥ ४९ ॥

नाग्निर्न सूर्यो न च चन्द्रतारका न भूर्जलं खं श्वसनोऽथ वाङ्मनः ।
उपासिता भेदकृतो हरन्त्यघं विपश्चितो घ्नन्ति मुहूर्तसेवया ॥ १२ ॥

पंचमहाभूतें भिन्न । इयें उपास्यें सहवाङ्मन । यांतें उपासितां भेदज्ञ । अघनाशन न करिती पैं ॥ ५० ॥ उपास्य भिन्न उपासक भिन्न । उपासनामार्ग भिन्न । तदाचरणीं फळही भिन्न । भजे भेदज्ञ या बोधें ॥ ५१ ॥ भूमि म्हणिजे प्रतिमा पार्थिव । जळविशेषें तीर्था नांव । अग्न्यर्केन्दुतारका सर्व । तेजस्तत्व जाणावें ॥ ५२ ॥ श्वसनशब्दें बोलिजे पवन । देहचाळक जो मुख्य प्राण । खं म्हणिजे केवळ शून्य । आकाश म्हणोनि जाणावें ॥ ५३ ॥ वाग्देवता ते गायत्री । मनोदेवता ज्योत्स्ना चान्द्री । इत्यादिदैवतें भेदज्ञनरीं । पृथगाकारीं भाजिजेत ॥ ५४ ॥ भेदबुद्धी भेदज्ञ भजती । तैं तीं दैवतें प्रसन्न होती । कल्पित दोषांची निवृत्ती । करूं न शकती चिरकाळें ॥ ५५ ॥ तीर्थाटनें दोष गेला । तंव कर्मलोपात्मक आंगीं जडला । एवं भज्यभेद झाला । दोषां वेगळा करवेना ॥ ५६ ॥ चिरकाळ भजनाच्या प्रसंगें । एक आंगींचा दोष भंगे । तंव अनेकदोषसमुच्चय लागे । तो न भंगे तद्योगें ॥५७॥ तैसे नव्हेती साधुजन । मुहूर्तमात्र ज्यांचें सेवन । केलिया दोषांचें जन्मस्थान । ते भंगिती अज्ञान अभेदें ॥ ५८ ॥ मुहूर्तमात्र ज्यां सहवासीं । वसतां निरसिती ते द्वैतासी । अविद्यानाशें अज्ञानासी । भेदेंसहित क्षालन पैं ॥ ५९ ॥ भेद हरतां अभेदबोधें । चिन्मात्रैक निवळे नुसधें । निवर्त निरासे अखिलानंदें । स्वसंवेद्य चिन्मात्र ॥ ६० ॥ तस्मादभूताद्युपासना । करूं न शकती दोषनिरसना । मुहूर्तमात्र साधुसेवना । करितां सन्मात्र करिती ते ॥ ६१ ॥ यास्तव साधूवांचोनि कोण्ही । समर्थ नव्हती दोषनिरसनीं । साधु उपेक्षूनि तीर्थादिभजनीं । निष्ठा धरिती ते ऐका ॥ ६२ ॥

यस्याऽऽत्मबुद्धिः कुणपे त्रिधातुके स्वधीः कलत्रादिषु भौम इज्यधीः ।
यत्तीर्थबुद्धिः सलिले न कर्हिचिज्जनेष्वभिज्ञेषु स एव गोखरः ॥ १३ ॥

कुणप म्हणिजे जितचि प्रेत । त्रिधातु म्हणिजे कफ वात पित्त । ऐसें शरीर नाशवंत । अहंबुद्धि तेथ जयांसी ॥ ६३ ॥ आत्मबुद्धि त्रिधातुकीं । आत्मीयबुद्धि कलत्रादिकीं । स्वधीशब्दाच्या अर्थविवेकीं । कवळी निष्टंकीं भ्रमग्रस्त ॥ ६४ ॥ माझा देश माझा ग्राम । माझी वृत्ति माझें सद्म । पुत्र कलत्र मित्र आश्रम । कर्म धर्म मामक हें ॥ ६५ ॥ स्वधीशब्दें इत्यादि सकळ । आपुलें मानोनि

ममताजाळ । आणि भूविकार जे जे समळ । देवता केवळ त्यां मानी ॥ ६६ ॥ तीर्थबुद्धि जळाच्या ठायीं । ऐसा जयासी निश्चय पाहीं । योगीश्वरांतें या प्रवाहीं । जाणोनि कांहीं त्यां न भजे ॥ ६७ ॥ त्रिधातुक कुणपदेह । मम सम योगीश्वरही होय । तेथ अधिक कोणतें काय । पूज्यत्व लाहे केंवि हा ॥ ६८ ॥ ऐशिये असंभावनेकरून । योगीश्वरांतें पाहती गौण । नेणती तत्कृत साध्य साधन । मग त्यां महिमान केंवि कळे ॥ ६९ ॥ देहचतुष्टयातीत । प्रत्यगात्मा निर्गळित । स्वरूपसमरसें जे संतत । योगी वर्तत आत्मत्वें ॥ ७० ॥ विश्वात्मकत्वें योगिजन । तेथ कुणपबुद्धि ज्यालागून । तोचि केवळ गो खर श्वान । किंवा हीन त्याहूनिही ॥ ७१ ॥ अभेदबोधें निर्मम योगी । ममता लावी जो त्यां आंगीं । आत्मीयभाव जो नापंगी । तो अभागी गोखरवत् ॥ ७२ ॥ मृत्पाषाणधातुप्रतिमा । देवताबुद्धि तेथ ज्या अधमा । योगीश्वरीं पूज्यत्वगरिमा । न धरी दुरात्मा गोखर तो ॥ ७३ ॥ जळाच्या ठायीं तीर्थ-भावना । भावी तद्योगें अघनिरसना । योगिदर्शनें निष्पापपणा । न मानी जाणा गोखर तो ॥ ७४ ॥ तृणकाष्ठादिभारवाह । वृषभा खरा सम त्याचा देह । अभिज्ञजनाच्या ठायीं रोह । जो करी पहा हो प्राकृतवत ॥ ७५ ॥ ऐसें भगवंतें मुनिजना । बोलिलें अमृतां अनुरूप वचना । आनंद जाला त्यांचिया मना । तो कुरुरत्ना शुक सांगे ॥ ७६ ॥

श्रीशुक उवाच ॥ निशम्येत्थं भगवतः कृष्णस्याकुण्ठमेधसः ।
वच्चो दुरन्वयं विप्रास्तूष्णीमासन्भ्रमद्धियः ॥ १४ ॥

ज्याची मेधा कुण्ठित नोहे । अकुण्ठमेधस त्या म्हणावें । षड्गुणैश्वर्यें जो मिरवे । तो पूर्ण वैभवें भगवंत ॥ ७७ ॥ तया कृष्णाचें ऐसें वचन । ऐकोनि समस्तही मुनिजन । संमत अनुरूप जाणोन । मौन धरून राहिले ॥ ७८ ॥ अन्वय तर्किला न वचे कांहीं । बुद्धि निश्चळ न थरे ठायीं । विचारविवरणप्रवाहीं । प्रत्युत्तरार्थ धी भ्रमती ॥ ७९ ॥ विचारविवरणीं भ्रमित बुद्धि । मौनस्थ बैसले तपोनिधि । विलंबें विवरूनि यथाविधि । वदती त्रिशुद्धि तें ऐका ॥ ८० ॥

चिरं विमृश्य मुनय ईश्वरस्येशितव्यताम् । जनसङ्ग्रह इत्यूचुः स्मयन्तस्तं जगद्गुरुम् ॥ १५ ॥

चिरकाळ विचार करूनी मुनीं । निर्धार केला आपुले मनीं । जें ईश्वरें अनीश्वरपणीं । कर्माधिकारी कां होणें ॥ ८१ ॥ ईश्वर असतां अनीश्वरपण । धरूनि होइजे कर्माधीन । जें जनसंग्रहमात्र कारण । हें विवरून दृढ केलें ॥ ८२ ॥ हास्यवदनें कृष्णाप्रती । प्रत्युत्तरा मुनि बोलती । जगद्रोधात्मक ज्या शक्ती । यास्तव म्हणती जगद्गुरु ॥ ८३ ॥

॥ मुनय ऊचुः ॥ यन्मायया तत्त्वविदुत्तमा वयं विमोहिता विश्वसृजामधीश्वराः ।
यदीशितव्यायति गूढ ईहया अहो विचित्रं भगवद्विचेष्टितम् ॥ १६ ॥

भगवंताचें दुरन्वय वचन । ऐकूनि तूष्णींभूत मुनिजन । जाले तयाचेंचि विवरण । करिती येथून दों श्लोकीं ॥ ८४ ॥ तत्त्ववेत्तयांमाजि परम । श्रेष्ठही आम्ही उत्तमोत्तम । जयाचे मायेचा संभ्रम । योगें भवभ्रम अवलोकूं ॥ ८५ ॥ विश्वसृष्टे जे अधीश्वर । जिनें मोहिले थोर थोर । ऐसी जयाची माया दुस्तर । तो परमेश्वर श्रीकृष्ण ॥ ८६ ॥ ज्या कारणास्तव तो श्रीहरि । स्वयें होऊनि नरशरीरी । अनीश्वरांचिये परी । चेष्टे संसारीं नररूपें ॥ ८७ ॥ लेऊनि मानुषी अवगणी । जरी वर्त्ते मनुष्यपणीं । तन्ही ऐश्वर्यउभारणी । न झांके गुणीं लोपवितां ॥ ८८ ॥ जरी तूं म्हणसी श्रीभगवंता । स्वयें ईश्वर मी जरी असतां । तरी कां घेतों अनीश्वरता । ऐक तत्वतां यदर्थीं ॥ ८९ ॥ अहो या आश्चर्येंकरून । म्हणती तुझें विचित्राचरण । यालागीं आम्हां अतर्क्य पूर्ण । तें अतर्क्यपण अवधारीं ॥ ९० ॥

अनीह एतद्बहुधैक आत्मना सृजत्यवत्यत्ति न बध्यते यथा ।
भौमैर्हि भूमिर्बहुनामरूपिणी अहो विभूम्नश्चरितं विडम्बनम् ॥ १७ ॥

तुझी षड्गुणैश्वर्यता । तें तूं अवधारीं भगवंता । ईहारहित अनीह असतां । ईहा समस्ता प्रकाशिसी ॥ ९१ ॥ केवळ अक्रिय रूपेंकरून । करिसी सृजनावनाशन । बहुधा नसोनि होसी पूर्ण । नपवसी बंधन तद्योगें ॥ ९२ ॥ एक भूमि अनेक भौतिकें । विस्तारूनि घटमठादिकें । बद्ध नोहे तदात्मकें । मृद्विवेकें अविकारी ॥ ९३ ॥ घटमठादि वाचारंभण । तेथ मृत्तिकाचि सत्य जाण । ऐसें जें कां श्रुतीचें वचन । सन्मात्रपूर्ण तेंवि तूं ॥ ९४ ॥ जरी म्हणसी मी वसुदेवपुत्र । केंवि मी स्थितिलयसृजना पात्र । यांचे कर्ते गुण स्वतंत्र । मी परतंत्र तनुधारी ॥ ९५ ॥ ऐसें न म्हणें भो जगदीशा । धर्मसंस्थापक हा मानवी ठसा । घेऊनि वर्तसी मनुजांसरिसा । हेंचि परेशा आश्चर्य ॥९६॥ विभूम्न म्हणिजे तूं परिपूर्ण । तुज जन्मादि मनुजाचरण । अवगणीचें विडंबन । केवळ अनुकरण-मात्रची ॥ ९७ ॥ तेंही अनुकरण किमर्थ म्हणसी । लक्षूनि लोकसंग्रहासी । धर्मसेतु प्रतिपादिसी । ऐक तेविषीं निवेदितों ॥ ९८ ॥

अथापि काले स्वजनाभिगुप्तये बिभर्षि सत्त्वं खलनिग्रहाय च ।
स्वलीलया वेदपथं सनातनं वर्णाश्रमात्मा पुरुषः परोभवान् ॥ १८ ॥

लोकसंग्रहाचिकारणें । अनेक अवतार तुवां धरणें । तयाचीं साकल्यें निरूपणें । कोण्हा वदनें निरूपवती ॥ ९९ ॥ यावरीही प्रस्तुतकाळीं । स्वजनगोपनार्थ भो वनमाळी । शुद्धसत्वात्मक सांवळी । मानुषी मूर्ति हे धरिसी ॥ १०० ॥ स्वलीला म्हणिजे क्रीडाचरणें । वेदमार्गातें प्रतिपादणें । स्वयें वर्तोनि प्रवृत्ति करणें । जनसंग्रहार्थ धर्मपथीं ॥ १ ॥ धर्मपथाचे उच्छेदक । उत्पथपाखण्डप्रतिपादक । ते खळनिग्रहार्थ सम्यक । शुद्धसत्वात्मक तनु धारिसी ॥ २ ॥ येन्हवीं प्रकृतीहूनि तूं पर । उत्तम पुरुष जो अक्षर । वर्णाश्रमात्मक शरीर । धरिसी साचार स्वलीला ॥ ३ ॥ वर्णाश्रमप्रतिपादना ।

अनादिधर्मसेतुसंस्थापना । करावयालागीं ब्राह्मणां । बहुसम्मानें वाढविसी ॥ ४ ॥ यालागीं तूं ब्रह्मण्यदेव । वेदवैदिकक्रतुसमुदाव । याचें वाढविसी महत्त्व । सहेतु वास्तव तें ऐक ॥ ५ ॥

ब्रह्म ते हृदयं शुक्लं तपः स्वाध्याय संयमै । यत्रोपलब्धं सद्व्यक्तमव्यक्त च ततः परम् ॥ १९ ॥

आदिब्रह्म तें तूं मुख्य । जें सन्मात्र शुद्ध सम्यक । निर्गुण निराकार निष्टंक । अखंडैक अद्वितीय ॥ ६ ॥ स्वगतप्रधानावलंबें तेंची । शुद्धसत्वात्मक पूर्णत्वाची । प्रणवरूप आदिबीजाची । आस्तिक्यता प्रकाशी ॥ ७ ॥ प्रणवरूप तें व्यक्ताव्यक्त । कार्यकारणरूपें स्थित । कार्य म्हणिजे क्रियायुक्त । बीज अव्यक्त कारण तें ॥ ८ ॥ त्यामाजि अव्यक्त बीजकारण । जें वेदाख्य अमल शुक्लवर्ण । तेंचि तुझें हृदय पूर्ण । अंतरंग निजरूप ॥ ९ ॥ तयापासूनी मग जें व्यक्त । कर्मकलाप वेदोदित । तें तत्कार्य क्रियासहित । वर्त्ते संतत तव रूप ॥ ११० ॥ क्रियाकलाप म्हणसी कोण । तरी तो त्रिविध कायवाङ्मन । तपःस्वाध्याय संयम पूर्ण । प्राप्तिसाधन उत्तरोत्तर ॥ ११ ॥ कायिक कर्म त्या नाम तप । वाङ्मय वेदपठनादि जल्प । ईश्वरप्रीत्यर्थ निष्कामकल्प । विगतसंकल्प संयम तो ॥ १२ ॥ पूर्वमीमांसापरिशीलन । निष्काम तदुदित कर्माचरण । नित्यनैमित्तिक अनुष्ठान । काम्यनिषिद्धपरित्यागें ॥ १३ ॥ येणें होय चित्तशुद्धी । ब्रह्माजिज्ञासा आकळे बुद्धी । उत्तरमीमांसा सद्गुरु बोधी । तैं उपलब्धी अव्यक्ता ॥ १४ ॥ तदुत्तर संयम क्रमें । मनोजय साधितां नियमें । शुद्धसन्मात्र वृत्तिविरामें । हेमीं हेमें जेंवि मिळिजे ॥ १५ ॥ तस्मात् वेद हृदय तुझें अमळ । यास्तव पूजिसी ब्राह्मणकुळ । हें आश्चर्य नव्हे केवळ । ऐक विवळ तें आतां ॥ १६ ॥

तस्माद्ब्रह्मकुलं ब्रह्मन् शास्त्रयोनेस्त्वमात्मनः । सभाजयसि सद्धाम तद्ब्रह्मण्याग्रणी भवान् ॥ २० ॥

ब्रह्मन् ऐसें संबोधन । सन्मात्रब्रह्म तूं जनार्दन । वेद ब्रह्महृदयवान् । क्रियासंपन्न व्यक्तत्वें ॥ १७ ॥ वेद ब्रह्महृदय अमळ । तत्प्रवर्तक ब्राह्मणकुळ । शास्त्रयोनी जो तूं केवळ । निगमपाळ निगमात्मा ॥ १८ ॥ ऐसिया तुझें प्राप्तिस्थान । वेद मूर्तिमंत ब्राह्मण । त्यांचा वाढविसी सम्मान । तस्मात् ब्रह्मण्यवर्य तूं ॥ १९ ॥ वेदांचें जें वसतिस्थान । यालागीं सद्धाम त्या अभिधान । ब्रह्मनिष्ठाग्रणी तूं पूर्ण । ब्रह्मण्य म्हणोनि द्विज यजिसी ॥ १२० ॥ अनन्यरूपा आपुलिया । भजतां भेद गेला विलया । ब्रह्मण्यबोधें तुज सन्मया । माजि मिळणें उपलब्धि ते ॥ २१ ॥ तस्मात् ईश्वर तूं केवळ । जनसंग्रहार्थ स्वधर्मशीळ । आम्ही तुजसीं पावलों मेळ । कृतार्थ केवळ तद्योगें ॥ २२ ॥ आजि तुझेनि सन्निधिमात्रें । पावन झालों वाङ्मनोगात्रें । तें संक्षेपें कथितों वक्त्रें । विश्वश्रोत्रें परिसावें ॥ २३ ॥

अद्य नो जन्मसाफल्यं विद्यायास्तपसो दृशः । त्वया सङ्गम्य सद्गत्या यदन्तः श्रेयसां परः ॥ २१ ॥

आजि आमुचें जन्मकर्म । पावलें सफलत्वाचें नाम । कैसें तेंही ऐकें क्रम । जें तव संगमें लाधलों

॥ २४ ॥ सच्छब्दें तूं वेदवसति । सन्मात्रैकब्रह्मास्थिति । सत्पुरुषाची परम गति । त्या तव संगती पावोनी ॥ २५ ॥ सकळ श्रेयसांहूनि पर । निर्वाण कैवल्य अमूततर । तो तूं श्रेयसां आधार । अंत साचार अवधित्वें ॥ २६ ॥ तव सान्निध्येंकरूनि दृष्टी । सफळ कैसी ते ऐकें गोष्टी । जें ब्रह्मात्मबोधें अवघी सृष्टी । प्रत्यय प्रकटी दृग्बोधीं ॥ २७ ॥ तैसेंचि तपाचें साफल्य । जें चित्तशुद्धी लाधलों अमळ । तेणें वास्तव बोधास्थळ । जालें केवळ हृत्कमळीं ॥ २८ ॥ विद्याशब्दें बोलिजे ज्ञान । ऐक तयाचें साफल्य पूर्ण । जालें तव सान्निध्येंकरून । तें तूं सर्वज्ञ जाणसी ॥ २९ ॥ अन्यथा विपरीत-विवर्तबोधा । प्रकटी केवळ ते अविद्या । वास्तव चिन्मात्र प्रगटी विद्या । सफलत्व आद्या तुझेनि तये ॥ १३० ॥ ऐसा तव सान्निध्यलाभ । तो आजि आम्हां जाला सुलभ । जे करणगोचर पंकजनाभ । लाधलों स्वयंभ संवादीं ॥ ३१ ॥ ज्या तव महिमा स्तवितां वेद । कुंठित जाला नेतिशब्द । वर्णूं न शकती विधिकोविद । तेथ मतिमंद कें इतर ॥ ३२ ॥ यास्तव नमनमात्रचि घडे । हें तव प्राप्ति साधन उघडें । म्हणोनि संबोधोनियां तोंडें । नमिती रोकडें तें ऐक ॥ ३३ ॥

नमस्तस्मै भगवते कृष्णायाकुण्ठमेधसे । स्वयोगमायया च्छन्नमहिम्ने परमात्मने ॥ २२ ॥

त्या भगवंता तुजकारणें । नमन आमुचें अनन्यपणें । जो तूं ऐश्वर्यषड्गुणें । श्रीकृष्णपणें नटलासी ॥ ३४ ॥ सोमवंशीं यादवकुळीं । मनुजवेषें भूमंडळीं । अवतरोनि महाबळी । दैत्य निर्दळिले जेणें ॥ ३५ ॥ त्या तुजकारणें भो कृष्णा । आम्ही नमितों सांडूनि तृष्णा । कृपेनें निरसीं भवार्कोष्णा । विज्ञापना हे आमुची ॥ ३६ ॥ एक चिन्मात्र सचराचरीं । परि ते कुंठित अविद्याम्बरीं । अकुंठित मेधा तुझी श्रीहरी । जगदुद्धारी यास्तव तूं ॥ ३७ ॥ तया अकुंठमेधावंता । नमो तुजकारणें भगवंता । स्वयोगमायेकरूनि आतां । महिमा छादिता जालासी ॥ ३८ ॥ स्वयोगमायेकरूनि महिमा । आच्छादूनियां पुरुषोत्तमा । वर्तसी तथापि तुझी गरिमा । अकुंठधामा नाच्छादे ॥ ३९ ॥ अविद्यावेष्टित व्यष्टि-चैतन्य । कोटीमाजि तूं जनार्दन । दाविसी मनुजांचें अनुकरण । तो तूं परिपूर्ण परमात्मा ॥ १४० ॥ तया परमात्मया तुजकारणें । मायाच्छादितमहिम्ने । आम्ही नमितों कायवाङ्मनें । नमो ब्रह्मणे या मंत्रें ॥ ४१ ॥ सर्वीं सर्वत्र सर्वात्मका । वर्तोनि न होसी ठाउका । न कळे जिवलगा ही आत्मिका । मा प्राकृतां लोकां कैं कळसी ॥ ४२ ॥

न यं विदन्त्यमी भूपा एकारामाश्च वृष्णयः । मायाजवनिकाच्छन्नमात्मानं कालमीश्वरम् ॥ २३ ॥

एके ठायीं ज्याची वसति । एक्या सुखें ज्या विश्रांति । एकात्मकत्वें त्यांसी तृप्ति । ते नेणती वृष्णीही ॥ ४३ ॥ मा हे भूतळींचे भूपती । नेणती ज्यातें हे भारती । प्रशंसावी कवणे रीती । ऐक यदर्थीं कारणही ॥ ४४ ॥ मायेचिये जवनिकेकरून । आपणां आपण आच्छादून । काळ ईश्वर सत्तावान । तें निजज्ञान लोपविसी ॥ ४५ ॥ अखंडदंडायमान संतत । स्वसामर्थ्यें सदोदित ।

काळत्रयीं अबाधित । करुणातीत काळात्मा ॥ ४६ ॥ अनंतब्रह्मांडांचिया कोडी । प्रवाहे घडी मोडी । ऐशी ज्याची ऐश्वर्यप्रौढी । प्रकाशी घडी ईश्वरता ॥ ४७ ॥ ईश्वर काळात्मा परिपूर्ण । तोचि भेदातीत आपण । असतां यातें नेणती जन । मायाच्छन्न म्हणोनियां ॥ ४८ ॥ सृष्टिस्थितिलयकारणभूत । काळशब्दें तो निर्णीत । एतन्नियंता जो समर्थ । ईश्वर म्हणिजेत त्यालागीं ॥ ४९ ॥ तोचि आपण सर्वात्मक । असोनि न कळे हेचि अटक । दृष्टांतद्वारा हा विवेक । ऐक सम्यक तो कथितों ॥१५०॥

यथा शयानः पुरुष आत्मानं गुणतत्त्वदृक् । नाममात्रेंद्रियाभातं न वेद रहितं परम् ॥ २४ ॥

निद्रिस्त पुरुष आपणातें । विपरीतबोधें जाणे निरुतें । विसरूनि वास्तव स्थूळ तनूतें । स्वप्न भ्रमातें वरपडुनी ॥ ५१ ॥ मनःकल्पित इंद्रियें स्वप्नीं । तद्भाजनित भासे अवनी । स्वप्नसृष्टि देखे नयनीं । जेंवि तो मानी सत्यत्वें ॥ ५२ ॥ खेचर भूचर जलचर वनचर । सिंह व्याघ्र कुंजर सूकर । सेना नगरें राष्ट्र नृपवर । स्वप्नीं साचार प्रत्यय त्या ॥ ५३ ॥ शब्दस्पर्श रूपरसगंध । स्वप्नेंद्रियद्वारा विशद । भासती त्याचा यथार्थ बोध । सहसा अबद्ध तैं न वटे ॥ ५४ ॥ स्वप्नाभास हा सर्वत्र । वाचारंभण नाममात्र । एवं अवघे माझेंचि गात्र । कल्पना विचित्र हे अवघी ॥ ५५ ॥ ऐसें सहसा नेणे स्वप्नीं । सिंह व्याघ्रादि आपणा मानी । या वेगळा निद्रिस्त शयनीं । तो मी म्हणोनि नाविष्करें ॥ ५६ ॥ हाचि स्वप्नदृष्टांत आतां । दृष्टांतद्वारा प्रतिपादितां । जैसा प्रबोध होय चित्ता । तैसा तत्त्वतां अवधारा ॥ ५७ ॥

एवं त्वा नाममात्रेषु विषयेष्विन्द्रियेहया । मायया विभ्रमच्चित्तो न वेद स्मृत्युपप्लवात् ॥ २५ ॥

चिदाभास जैसा स्वप्न । प्रसुप्त स्थूळतनु विसरून । स्वयें स्वप्नसृष्टि होऊन । सत्य मानून तेथ रमे ॥ ५८ ॥ परंतु देवदत्त मी येथ । स्थूळशरीरी सुषुप्तिवंत । ऐसा नेणे स्वप्नभ्रमित । नृपगण तद्वत तुज नेणे ॥ ५९ ॥ स्वप्नीं कल्पित इंद्रियगण । मिथ्या तन्मात्रें प्रतीयमान । त्या इंद्रियीं त्याचें ग्रहण । साच मानून जेंवि करी ॥ १६० ॥ याचि प्रकारें नर जागृत । तूतें नेणेचि पैं प्राकृत । तया नेणण्याचा हेत । स्वप्नदृष्टांतमय अवघा ॥ ६१ ॥ स्वप्न मिथ्या क्षणिक न टिके । तेंवि जागृतीचे ही विषय लटिके । अविद्यामायेच्या उद्रेकें । सांवरूं न शके आत्मस्मृति ॥ ६२ ॥ जे जे विषयीं करणाच्या । चेष्टा प्रवर्तती भोगार्थ साच्या । तेंवि अविद्यामाया तीच्या । योगेंकरून भ्रम चित्ता ॥६३॥ मायाभ्रमोपहत जैं चित्त । तैं आत्मस्मृतीचा होय अंत । विवेकनाशास्तव मग भ्रांत । नेणे प्राकृत तुजलागीं ॥ ६४ ॥ असो नृपावृष्णींची कथा । आमुची जन्मसाफल्यता । पूर्वीं कथिली तेचि आतां । उपसंहरितां अवधारीं ॥ ६५ ॥

तस्याद्य ते ददृशिमाङ्घ्रिमघौघमर्ष तीर्थास्पदं हृदिकृतं सुविपक्वयोगैः ।
उत्सिक्तभक्त्युपहताशयजीवकोशा आपुर्भवद्गतिमथोऽनुगृहाण भक्तान् ॥ २६ ॥

आद्यशब्दें परमपुरुषा । ऐकें आमुच्या सुकृतविशेषा । जें त्रिजगाच्या निरसी कलुषा । आश्रय अशेषां तीर्थां जें ॥ ६६ ॥ तिये गंगेचें जन्मस्थान । तुझें चरणपंकज जाण । तदाश्रयें तें समर्थ पूर्ण । त्रिजग पावन करावया ॥ ६७ ॥ ऐसें तुझें चरणारविंद । सुपक्वयोगें योगिवृंद । अचंचळ हृदयीं ध्याती विशद । परमानंद निजबोधें ॥ ६८ ॥ परंतु दृग्गोचर त्यां नाहीं । विशुद्धचित्तेंचि ध्याती हृदयीं । तें हें तवांघ्रिपंकज पाहीं । प्रकट इंद्रियीं पहात असों ॥ ६९ ॥ जियें कां मिथ्या विषयोन्मुखें । इन्द्रियें भ्रमभरितें भ्रामकें । तियें तव चरणांच्या अवलोकें । केवळ चित्सुखें निवालीं ॥ १७० ॥ यास्तव अगाध पुण्येंकरून । आम्ही देखत असों तव चरण । अतःपर जाणोनि स्वपादशरण । आम्हांलागून अनुग्रहीं ॥ ७१ ॥ स्वभक्त करूनि आम्हांप्रति । मग अनुग्रहीं निजात्मरति । यदर्थीं शंका करिसी चित्तीं । तरी ते विनती अवधारीं ॥ ७२ ॥ म्हणसी भक्ति करूनि विशेष कोण । करित आलां तपाचरण । तेंचि पुढती आचरून । कां पां निर्वाण न साधां ॥ ७३ ॥ ऐसें न म्हणावें परेशा । न लाहतां भक्तीच्या उत्कर्षा । कैवल्यलाभाची दुराशा । वृथा मानसामाजिवडी ॥ ७४ ॥ भक्त्युद्रेक अंतःकरणीं । तो उचंबळे सर्वां करणीं । अभेदात्मत्वप्रेमा भजनीं । अविद्याहरणीं समर्थ जो ॥ ७५ ॥ भक्तिप्रेमाचा उद्रेक । अभेदबोधा प्रकाशक । जीवकोश आशयात्मक । भंगी निष्टंक सावरण ॥ ७६ ॥ ऐसें जाणोनि पूर्वकोविद । भक्तिप्रेमें परमानंद । लाहोनि तवानुग्रह विशद । कैवल्यपद पावले ॥ ७७ ॥ एवं भक्त्युद्रेकें सद्गति । पूर्वापर साधिली संतीं । अन्यसाधनें यथारीती । श्रमतां न लाहती कैं कोणी ॥७८॥ यास्तव आम्हां तव पदभक्ति । अनुग्रहिजे हे करूनि विनति । मुनिवर आज्ञा घेऊनि निघती । हें परीक्षितीप्रति शुक सांगे ॥ ७९ ॥

श्रीशुक उवाच ॥ इत्यनुज्ञाप्य दाशार्हं धृतराष्ट्रं युधिष्ठिरम् ।
राजर्षे स्वाश्रमान्गन्तुं मुनयो दधिरे मनः ॥ २७ ॥

दाशार्ह म्हणिजे यादवांप्रतिं । तो जो श्रीकृष्ण यादवपति । इत्यादि वचनीं विनीतभक्ति । आज्ञा घेती मुनिवर्य ॥१८०॥ तया कृष्णाप्रति पुसोनि आज्ञा । धृतराष्ट्रातें तियेचि संज्ञा । युधिष्ठिरातें कृतप्रार्थना । स्वाश्रमभुवना जावया ॥ ८१ ॥ राजयांमाजि ऋषीश्वरा । ऐकें परीक्षिति श्रवणचतुरा । स्वाश्रमा जावयाकारणें त्वरा । उद्योग मुनिवरीं मनिं धरिला ॥ ८२ ॥ सिद्धपादुका लेइले पदीं । देवार्चनादिमात्रा खांदीं । चंचळ देखोनि मुनींची मांदी । वसुदेव वंदी तें ऐका ॥ ८३ ॥

तद्वीक्ष्य तानुपव्रज्य वसुदेवो महायशाः । प्रणम्य चोपसंगृह्य बभाषेदं सुयंत्रितः ॥ २८ ॥

मुनींचा देखोनि गमनोद्योग । त्यांप्रति जाऊनियां सवेग । वसुदेव केवळ महाभाग । वंदी साष्टांग तयांप्रति ॥ ८४ ॥ तयां मुनींचे धरूनि चरण । तयांसि वचन वक्ष्यमाण । बोलिला सुयंत्रित होऊन । सुष्ठुकर्मा वशवर्ती ॥ ८५ ॥

॥ वसुदेव उवाच ॥ नमो वः सर्वदेवेभ्य ऋषयः श्रोतुमर्हथ । कर्मणा कर्मनिर्हारो यथा स्यान्नस्तदुच्यताम् ॥२९॥

सुष्ठुबुद्धीसीं वश जाला । म्हणोनि सत्पात्रा शरण गेला । त्यांतें काय पुसता जाला । तें नृपाळा अवधारीं ॥ ८६ ॥ नमस्कार म्हणे तुम्हां । सर्वदेवमय तुमचा आत्मा । निगमीं आगमीं तुमची गरिमा । सर्व पुराणें वदताती ॥ ८७ ॥

॥ सम्मतिःपुराणान्तरे ॥ सर्वे देवमयो विप्रः सर्वतीर्थमयस्तथा । तस्मात्तत्पादतीर्थं च पिबेत्पापापनुत्तये ॥ १ ॥

अनधिकारी पढती श्रुति । यालागीं न लिहिली संमति । सर्वदेवेभ्य या पदार्थीं । पुराणोक्ति लिहिलीसे ॥ ८८ ॥ सर्वदेवमय भूदेव । सर्वतीर्थमय अतएव । तो हा ऋषींचा समुदाव । नमूनि वसुदेव काय म्हणे ॥ ८९ ॥ सर्व ऋषींतें म्हणे स्वामी । विनति माझी श्रवणधामीं । ऐकावया योग्य तुम्ही । म्हणोनि पैं मी प्रार्थितसें ॥१९०॥ कैसी विनति पुसाल ऐसें । तरी कर्में करूनि कर्म निरसे । तें मज सांगा कृपावशें । होय तैसें सर्वज्ञ हो ॥ ९१ ॥ जैसें केलिया कर्माचरण । होय कर्माचें निरसन । कीं कर्मच्छेदककर्म कोण । जेणें करून तें खंडे ॥ ९२ ॥ कर्मच्छेदककर्म पृथक । कीं आचरणामाजि पार्थक्य । कर्मांचि कर्मा निरासक । होय सम्यक तें कथिजे ॥ ९३ ॥ ऐसी ऐकूनि वसुदेववाणी । महर्षींचा मुकुटमणि । तो देवर्षि नारदमुनि । बोले हांसोनि मुनिवर्या ॥ ९४ ॥

॥नारद उवाच॥ नातिचित्रमिदं विप्रा वसुदेवो बुभुत्सया । कृष्णं मत्वाऽर्भकं यन्नः पृच्छति श्रेय आत्मनः ॥३०॥

मुनींतें म्हणे भो भो विप्रा । वसुदेवप्रश्न ऐका बरा । ऐकूनि कांहीं आश्चर्य न करा । यथाधिकारा जाणोनी ॥ ९५ ॥ कृष्ण निजार्भक जाणोन । बोधावयाचे इच्छेकरून । आम्हां पुसे आत्मकल्याण । हें आश्चर्य गहन न मानावें ॥ ९६ ॥ सूर्य प्रकट असतां सृष्टी । आंधळियासी नेत्र काठी । कीं निर्दैवा धनाच्या कोटी । नमतां अदृष्टीं अगोचरा ॥ ९७ ॥ तेंवि श्रीकृष्णातें सोडून । आम्हांप्रति आत्मकल्याण । पुसे ऐसा विस्मय गहन । तुम्हांलागून जो गमला ॥ ९८ ॥ तरी यदर्थीं नारद म्हणे । निकट सहवासें हेळने । करूनि घडे अनादरणें । तें हें श्रवणें अवधारा ॥ ९९ ॥

सन्निकर्षोऽत्र मर्त्यानामनादरणकारणम । गाङ्गं हित्वा यथान्यांभस्तत्रत्यो याति शुद्धये ॥ ३१ ॥

अत्यंत सहवासाचे सलगी । ते प्रीति मर्यादा आदरभंगी । याचा अनुभव सर्वां आंगीं । नव्हे सांगी सांगणीची ॥ २०० ॥ गंगातीरीं वसती प्राणी । ते गंगेतें सांडूनी । प्रवर्तती तीर्थाटनीं । दोषक्षालनीं उद्युक्त ॥ १ ॥ उदरीं वाहिलें नवमास । प्रसूत्यादि साहिले क्लेश । सलगी सांडूनि ते मातेस । सासुश्वशुरांस अभ्यर्ची ॥ २ ॥ स्वप्रकाशें मंडित किरणीं । अहरह गगनीं प्रकटे तरणी । नैरंतर्यें न भजे कोण्ही । सादर ग्रहणीं जन होती ॥ ३ ॥ पायसपयाज्यशर्कराभुक्ति । तेथ बाहुल्ये ये विरक्ति ।

कटुवम्लरामठक्षारातिक्तीं । सादर होती कीं ना हो ॥ ४ ॥ एवं सन्निकर्षसलगीगुणें । प्रेममर्यादामहत्त्व उणें । यास्तव कृष्ण मानूनि अर्भकपणें । प्रश्न करणें या योग्य ॥ ५ ॥ वसुदेव अविद्याभ्रमेंकरूनी । कृष्णीं निजार्भकत्व मानी । कृष्णमहिमा ही जाणोनी । सलगी करूनि अनादरता ॥ ६ ॥ कृष्ण दिसतां मनुजाकृति । मनुजा ऐसा न घेपे भ्रान्ति । अगाध कृष्णाची अनुभूति । न नसे कल्पातीं तें ऐका ॥ ७ ॥

यस्यानुभूतिः कालेन लयोत्पत्त्यादिनास्य वै । स्वतोऽन्यस्माच्च गुणतो न कुतश्चन रिष्यति ॥ ३२ ॥

ज्याची अनुभूति न नाशे कदा । ऐका तयाही अनुवादा । जगत्सृजनावनान्त धंदा । होतां अबोधामाजि न लपे ॥ ८ ॥ येर प्राकृत सकळ प्राणी । जननस्थितिलय करितां गुणीं । अनुभव लोपे क्षणक्षणीं । घडमोडणीमाजिवडा ॥ ९ ॥ पूर्व देह पावे लय । तेव्हां हारपे तत्प्रत्यय । नूतन तनु प्राप्त होय । तैं धरी सोय तत्स्मरणीं ॥ २१० ॥ तैसी न नशे हरि अनुभूति । अवतरतांही सुरकार्यार्थीं । स्फुरदूप जे स्वसंवित्ति । ते कल्पान्तीं न पालटे ॥ ११ ॥ अथवा उर्वारुकापरी । अपक्वीं तैक्त्य पक्वीं माधुरी । अनुभूतीचा लोप करी । काळान्तरीं न तेंवि हें ॥ १२ ॥ किंवा आपेंआप जैसी । विद्युल्लता स्फुरणासरिसी । गगनीं लोपे हरिस्मृति तैसी । आपेंआपही न लोपे ॥ १३ ॥ अथवा आणिकाही व्याघातें । न पवे अनुभूति लोपातें । घटप्रतीति मुद्गरघातें । पावे भंगातें ज्यापरी ॥ १४ ॥ अथवा न नशे गुणेंकरून । तेंही ऐका उदाहरण । रूपान्तरोत्पत्ति करून । पालटी गुण पूर्वरूपा ॥ १५ ॥ निद्रालस्यप्रमादजडता । तमोगुणीं वर्ते वस्तुता । रजोगुणें त्या पालट होतां । तृष्णाप्रलोभकार्मठ्य ॥ १६ ॥ तैशी कृष्णाची अनुभूति । अचिन्त्यैश्वर्यगुणसंपत्ति । गुणीं न नशे तेही रीती । यथानिगुती निरूपिली ॥ १७ ॥ कोणा एक्या योगेंकरून । अनुभव व्याहत न होय जाण । सदृष्टांत हें व्याख्यान । शुकभगवान निरूपिती ॥ १८ ॥

तं क्लेशकर्मपरिपाकगुणप्रवाहैरव्याहतानुभवमीश्वरमद्वितीयम् ।
प्राणादिभिः स्वविभवैरुपगूढमन्यो मन्येत सूर्यमिव मेघहिमोपरागैः ॥ ३३ ॥

क्लेशकर्म आणि परिपाक । कीं सत्वरजस्तमोगुणात्मक । इत्यादि प्रवाह अनेक । ज्याचा अनुभव न रोधिती ॥ १९ ॥ ऐसिया अव्याहतानुभवातें । अद्वितीय ईश्वर जाणोनि पुरतें । आपुल्या विभवीं छादित निरुतें । अन्य प्राकृत जन मानी ॥ २२० ॥ क्लेशकर्मपरिपाकगुण । अनुभव न नशे इहींकरून । ऐका तयाचें लक्षण । ब्रह्मनंदन म्हणे मुनींतें ॥ २१ ॥ क्लेश म्हणिजे रागादिक । प्रियतम मानूनि इहामुष्मिक । वास्तव विसरणें निष्टंक । न शिवे कलंक हा कृष्णा ॥ २२ ॥ इहामुष्मिक उभय स्थळीं । प्रियतम मानूनि हृदयकमळीं । कृष्ण कोणता विषय कवळी । स्वबोधशाळी परिपूर्ण ॥ २३ ॥ गा त्या विषयाच्या अनुरागें । सकामकर्में करी आंगें । तत्फळप्राप्तीच्या प्रसंगें । अनुभव भंगे कृष्णाचा ॥ २४ ॥ तरी तो सनातन सर्वगत । इहामुष्मिकी यातायात । स्वबोध विसरूनि मानी

तथ्य। हें तरी तेथ घडूं शके ॥ २५ ॥ विषयानुरागमात्र मळ। अनुभव व्याहत करी केवळ । तो असतां मग कर्म सकळ । करी प्रबळ फळलोभें ॥ २६ ॥ मग त्या कर्माचरणकाळीं । जीवत्व अहंता झांकोळी । अनुभव व्याहत तये वेळीं । होय समूळीं वास्तव जो ॥ २७ ॥ वास्तव अनुभव व्याहत होतां । आपणा भावी परिपाकभोक्ता । परिपाक म्हणिजे कर्माचरिता । माजि सुखदुःख जें निपजे ॥ २८ ॥ सुकृत परिपक्क तेंचि सुख । मानी तद्भोगीं संतोख । वास्तव अनुभूति पावे लुक । स्वबोधच्छादक हें पटळ ॥ २९ ॥ विषयानुराग नाहींच कृष्णा । यालागीं स्वानुभव न झांकी तृष्णा । तदर्थ कर्मे न करी नाना । कार्मेऽव्यपणा माजि नये ॥ २३० ॥ कृष्ण नोहे सुखदुःखभोक्ता । न पवे निजानुभवव्याघात । विडंबानुसार अनुकार करितां । व्याहतप्रत्यय नोहे कीं ॥ ३१ ॥ कृष्ण जन्मला वसुदेवसदनीं । ऐशीच प्रथा सर्व जनीं । परी तो स्पर्शला नाहीं योनी । हें न ठावें मनीं वसुदेवा ॥ ३२ ॥ ज्यासी जन्मचि नाहीं साच । त्याचें कर्महीं मग आहाच । सुखदुःखभोक्तृत्वें नडनाच । कैंचा वाच्य ते ठायीं ॥ ३३ ॥ ऐसा अमळ कालत्रयीं । तद्बोध व्याहत एतत्त्रितयीं । नोहे ऐसा तुमच्या ठायीं । प्रत्यय बाणे कीं ना हो ॥ ३४ ॥ नातरी प्रकाश प्रवृत्ति मोह । हे जे गुणत्रयप्रवाह । मायामय जो कृष्णदेह । वसवूनी प्रत्यय लोपविती ॥ ३५ ॥ वस्तुता कृष्णासी देहचिं नाहीं । तेथ गुणप्रवाह कवणे ठायीं । प्रकटूनि व्याहत करील पाहीं । वास्तव अनुभव कृष्णाचा ॥ ३६ ॥ ऐसियातें अन्य जन । आपुले आंगींचे इत्यादि गुण । तिहीं छादित मानी जाण । सूर्यासमान तें ऐका ॥ ३७ ॥ आपुल्या दृष्टीचिया कवळें । चंद्रा आंगींचें तेज पिवळें । मूर्ख मानी परंतु न कळे । आपुले डोळे मलिन हें ॥ ३८ ॥ कीं आपुली दृष्टि मेघपटळीं । लोपवितां लोपला मानी हेळी । आपुलें विभव तन्मंडळीं । प्राकृतें आंधळीं आरोपिती ॥ ३९ ॥ कीं शारदीं सजळनीहारधुई । निबिड दाटे जिये ठायीं । ते जन म्हणती सूर्यचि नाहीं । प्रकट असतांही न देखती ॥ २४० ॥ कीं राहुमंडळा आणि सूर्या । द्वादश योजनें अंतर तया । असतां नेत्रीं प्राकृतांचिया । ग्रहणीं ग्रासिला साच गमे ॥ ४१ ॥ ऐसा अन्य प्राकृत जन । प्राणज्ञान-क्रियाकारण । समुच्चयें छादितप्रत्यय जाण । आपणासमान हरि भावी ॥ ४२ ॥ पंजरनिबद्ध जैसा पक्षी । पंजरच्छिद्रान्तरेंचि लक्षी । तैसा नव्हे जो अंतरिक्षीं । स्वानुभवपक्षीं उडणारा ॥ ४३ ॥ पंजरनिबद्ध आपुले मनीं । आपणासमान त्याही मानी । आपण बद्ध तो चिद्गगनीं । विलसे म्हणोनी त्या न कळे ॥ ४४ ॥ तैसा कृष्ण आपुले उदरीं । जन्मला मानूनि अनादरी । आम्हांलागीं प्रश्न करी । यथाधिकारीं हें उचित ॥ ४५ ॥ ऐसी नारदोक्ति ऐकून । त्यानंतरें ते मुनिजन । आनकदुंदुभिप्रति वचन । ऐकें राया वदले तें ॥ ४६ ॥

अथोचुर्मुनयो राजन्नाभाष्यानकदुंदुभिम् । सर्वेषां शृण्वतां राज्ञां तथैवाच्युतरामयोः ॥ ३४ ॥

ऐकत असतां सर्व राजे । तेथ उपविष्ट होते जे जे । आणि रामाच्युतही सहजें । श्रवण करीत असतां पैं ॥ ४७ ॥ वसुदेवाप्रति म्हणती मुनी । कर्मनिरास कर्मे करूनी । पुशिला तरी तो ऐकें श्रवणीं । जो प्राचीन कविजनीं निरूपिला ॥ ४८ ॥

कर्मणा कर्मनिर्हार एष साधुनिरूपितः । यच्छ्रद्धया यजेद्विष्णुं सर्वयज्ञेश्वरं मखैः ॥ ३५ ॥

कर्में करूनि कर्म सुटणें । ऐसा प्रकार उत्तमपणें । कथिजेल तो श्रवण करणें । सावधपणें वसुदेवा ॥ ४९ ॥ पूर्णश्रद्धें करून विष्णु । यजिजे होऊनि वितृष्णु । यज्ञसमुच्चयें करून । कर्ममोचन तत्कर्में ॥२५०॥

चित्तस्योपशमोऽयं वै कविभिः शास्त्रचक्षुषा । दर्शितः सुगमो योगो धर्मश्चात्ममुदावहः ॥ ३६ ॥

शास्त्रलोचनीं विलोकून । प्राचीन कवि जे शास्त्रप्रवीण । हाचि सुगम योग म्हणून । निर्धारून दाखविला ॥ ५१ ॥ जो हा चित्ताचा उपशम । त्याचा हेतु योगोत्तम । मोक्षोपाय जो कां सुगम । परम धर्म स्वसुखावह ॥ ५२ ॥ हळूहळूच चित्तमळ । क्षाळतां होय नितान्त अमळ । तैं तें आत्मपुष्टीचें दे फळ । स्वानंद बहळ ज्यामाजी ॥ ५३ ॥ उपशमाचा हेतु काय । योग म्हणिजे मोक्षोपाय । कर्में कर्मविमोचन होय । लागे सुखसोय हळूहळू ॥ ५४ ॥ सुगम म्हणिजे कोणे परी । प्रवृत्तीच्या आश्रयावरी । करितां अवघड न वटे भारी । निजाचारीं स्वधर्मही ॥ ५५ ॥ जो करणीय आवश्यक । यास्तव स्वधर्म हाचि मुख्य । अकरणीं प्रत्यवायजनक । करितां दोष उरों नेदी ॥ ५६ ॥

अयं स्वस्त्ययनः पन्था द्विजातेर्गृहमेधिनः । यच्छ्रद्धयाप्तवित्तेन शुक्लेनेज्येत पूरुषः ॥ ३७ ॥

भो वसुदेवा वृष्णिपते । मानिसी उपनिषच्छ्रुतीच्या मतें । जें त्यागावांचूनि असमर्थें । मोक्षदानीं प्रजादिकें ॥ ५७ ॥ कर्में आणि प्रजोत्पादनें । यज्ञसिद्धयर्थ विविधें धनें । इहीं ऋणत्रयविमोचनें । वृथा वचनें हीं अवघीं ॥ ५८ ॥ एक्या त्यागेंचि करूनि मोक्ष । ऐशा वेदान्तीं श्रुति प्रत्यक्ष । बोलिल्या असतां तुम्ही हा पक्ष । कां पां विशेष दृढावितां ॥ ५९ ॥ तरी ऐकें गा वृष्णिपाळा । विवेकविराग उदया आला । नसतां विषयाचा सोहळा । विहिता वेगळा नाचरिजे ॥२६०॥ विषयलिप्सा वर्ते देहीं । तंववरी बद्धता ऋणत्रयीं । विहिताचरणें सुटिका पाहीं । धनसंतानें सत्कर्में ॥ ६१ ॥ कर्माचरणें चित्तशुद्धि । न होतां वैराग्य न लाभे बुद्धि । तंववरी त्यागाची उपलब्धि । न घडे त्रिशुद्धी बद्धातें ॥ ६२ ॥ विषयलिप्सा जंववरी न तुटे । तंववरी कर्मादि करणें घटे । गृहस्था द्विजा येचि वाटे । कैवल्य भेटे अनायासें ॥ ६३ ॥ गृहमेधिया द्विजा प्रति । येणेंचि मार्गें कल्याणप्राप्ति । स्वस्तिक्षेम हा पथ निश्चिती । येणेंचि निष्कृति कर्माची ॥ ६४ ॥ तो जरी कैसा म्हणसी पंथ । जो कां निष्कामश्रद्धावंत । निर्दोषद्रव्यें पैं यजिजेत । आदिपुरुष यज्ञभोक्ता ॥ ६५ ॥ हृदयीं निष्काम श्रद्धा पूर्ण । यथाशक्ति निर्दोष धन । स्वधर्मार्जित संपादून । यजिजे भगवान आदिपुरुष ॥ ६६ ॥ गृहस्थाश्रमीं या विहिताचरणें । विमुक्त करितातीं तीन्ही ऋणें । ईषणाभंगें त्यागार्ह होणें । त्यागें पावणें अमृतत्व ॥ ६७ ॥ कोण्या योगें ईषणात्याग । तोही वसुदेवा ऐकें चांग । ऋणत्रयाचा प्रसंग । तोही अव्यंग मग ऐक ॥ ६८ ॥

वित्तैषणां यज्ञदानैर्गृहैर्दारसुतैषणाम् । आत्मलोकैषणां देव कालेन विसृजेद्बुधः ।
ग्रामे त्यक्तैषणाः सर्वे ययुर्धीरास्तपोवनम् ॥ ३८ ॥

इच्छा वित्तसंपादनीं वाढे । ते वित्तैषणा म्हणणें घडे । मनौनि तीचें बिराड मोडे । तेंचि निवाडें ऐकें पां ॥ ६९ ॥ पूर्वपक्षीं विहिताचरणें । केवळ चित्तशुद्धीतें करणें । चित्तशुद्धि जाल्या वरणें । विरक्तिवनिता तन्वंगी ॥ २७० ॥ विरक्ति उदेजलिया हृदयीं । चिरळसी मानी ईषणात्रयीं । मग प्रवर्ते साधनोपायीं । बुद्धि निश्चयीं योजूनी ॥ ७१ ॥ कोण्या साधनें काय साध्य । तेंही ऐका कथितों विशद । स्वस्त्ययनाचा पंथा सिद्ध । ईषणात्यागें साधावा ॥७२॥ स्वस्त्ययनही म्हणाल काय । तरी जें अविनाश अमृतालय । तत्प्राप्तीचा साधनोपाय । ईषणात्याग मुख्य तेथें ॥ ७३ ॥ गृहस्थाश्रमाच्या आचरणा । अवश्य सापेक्ष वित्तैषणा । तेथ विरक्ति उपजतां मना । वित्तैषणा खंडावी ॥ ७४ ॥ पूर्वीं संपादिलें जें वित्त । त्याचा क्षेम वाञ्छी चित्त । पुढें संपादनाचा स्वार्थ । योग म्हणिजे तयालागीं ॥ ७५ ॥ योग-क्षेमरूपें जाणा । विविध जाणिजे वित्तैषणा । तिच्या करावें खंडना । यज्ञदानाचेनी क्रमें ॥ ७६ ॥ पंचमहायज्ञादि देख । क्रमेंचि अग्निष्टोमप्रमुख । अग्नौर्यान्तक्रतु सम्यक । कीजे निःशेष वित्तक्षयें ॥ ७७ ॥ राजसूयादि हयनरमेध । नृपार्हे ऐसे मख प्रसिद्ध । एवं निष्कामयज्ञकंद । वित्तैषणेचा खंडावा ॥ ७८ ॥ कीं गोभूतिलप्रमुखदानीं । निःशेषवित्तव्यय करूनी । योगक्षेम विसर्जूनी । वित्तैषणा त्यागावी ॥ ७९ ॥ तैसीच दारपुत्रैषणा । करितां गृहोचितभोगाचरणा । विहितप्रवृत्तिसंपादना । संपादूनि मग त्यागावी ॥ २८० ॥ तारुण्याच्या विलासभरें । वनिताकामीं मन मोहरे । तेथ वर्तोनि विहिताधारें । रतिसुखभोगा लंघावें ॥ ८१ ॥ ऋतुप्रसंगीं स्त्रीसेवन । तेणें होय प्रजोत्पादन । एवं रति-पुत्रफळार्थ जाण । पाणिग्रहण गृहिणीचें ॥ ८२ ॥ विहिताचरणें रतिप्रसंगें । कंदर्पक्रीडानुभव आंगें । तैसेंचि प्रजोत्पादनयोगें । रमणीरंगें रंगावें ॥ ८३ ॥ रतिसंततिफळा गृहिणी । तत्संस्कारविहिताचरणीं । दारपुत्रैषणेपासूनी । मुक्त होइजे शनैःशनैः ॥ ८४ ॥ जातकर्मादि संस्कार । व्रतबंधविवाहप्रमुख थोर । संपादूनि सविस्तर । त्यजिजे दारसुतैषणा ॥ ८५ ॥ देहात्मनिष्ठ वित्तैषणा । तैसीच दारसुतैषणा । देहात्मता निरसतां जाणा । नलगे निरसन त्या पृथक ॥ ८६ ॥ देहात्मता शिथिल जाली । जीवात्मता तैं रूढली । लोकेषणा उदया आली । तेही निरसिली पाहिजे ॥ ८७ ॥ बाणतां जीवात्मप्रतीती । तैं कर्मफळाचा होय स्वार्थी । लोकलोकान्तरावासी । कर्मानुसार साच गमे ॥ ८८ ॥ कर्म जें इष्टानिष्ट-मिश्र । सुरनरतिर्यक्तदनुसार । यास्तव इष्टकर्मीं सादर । लोकैषणापर होत्साता ॥ ८९ ॥ उत्तम-लोकावाप्तीच्छा । लोकैषणा हा संकेत तीचा । तयेसाठीं सुकृताचा । संग्रह करी बहुसाल ॥ २९० ॥ शुद्धसुकृतसंग्रहबळें । लोकान्तरीं सुखसोहळे । भोगेच्छा जे मनीं खवळे । लोकैषणा तिये नाम ॥ ९१ ॥ शुद्धसुकृताचरण शुद्धि । नित्यानित्यविवेकबुद्धि । नितान्त निर्मळ होय त्रिशुद्धी । सत्संवादीं मग विलसे ॥ ९२ ॥ सत्संवादीं रमतां मन । तैं भोगेच्छा मानी वमन । इहामुत्रार्थविरागपूर्ण । ईषणाशून्य सहजेंची ॥ ९३ ॥ अल्पायुषी नरतिर्यक । दीर्घायुषी निर्जरलोक । म्हणोनि तत्प्राप्ति सम्यक । इच्छी

साधक होत्साता ॥ ९४ ॥ तंव त्या सत्संगाच्या बळें । उभय भोगीं मन कांटाळे । कृतान्त ग्रासी यथाकाळें । सुर नर तिर्यक विधि हरही ॥ ९५ ॥ सर्व नश्वर कळल्यावरी । लोकैषणेची मग बोहरी । करूनी सद्बुद्धिवंतीं नरीं । रिघती कान्तारीं तपोवनीं ॥ ९६ ॥ उभयभोगार्थ उभयाश्रमीं । निवास करूनि वसतां ग्रामीं । तेथ विवेकोदयाची ऊर्मी । सत्संगीं आविर्भवे ॥ ९७ ॥ विवेकोदयीं ग्राम्य भोग । ग्रामीं वसती भोगूनि साङ्ग । करूनि सर्वैषणात्याग । जाती सवेग तपोवना ॥ ९८ ॥ धीर म्हणिजे सुबुद्धिवंत । धैर्यें होऊनियां वनस्थ । नित्यानित्यविचारवंत । शमदम संतत साधिती ॥ ९९ ॥ एवं साधनषट्कसंपन्न । प्रमाता अधिकारी तो पूर्ण । त्रिधा आनृण्य संपादून । लाहे स्वस्त्ययन-मार्गातें ॥ ३०० ॥ कैसें ऋण कवणा माथां । हेंही पुससी जरी तत्वता । ऐक तयाचीही व्यवस्था । सावध चित्ता करूनियां ॥ १ ॥

ऋणैस्त्रिभिर्द्विजो जातो देवर्षि पितृणां प्रभो । यज्ञाध्ययनपुत्रैस्तान्यनिस्तीर्य त्यजन्पतेत् ॥ ३९ ॥

जेव्हां द्विजकुळीं जन्मला । तैं तो ऋणत्रयें बांधला । त्या न निस्तरतां त्याग केला । तरी वरपडला अधोगती ॥ २ ॥ व्रती होऊनि वेदाध्ययन । करूनि निरसिजे ऋषींचें ऋण । गृहस्थाश्रमीं करूनि यज्ञ । निर्जरऋण निरसावें ॥ ३ ॥ यथोचितकाळीं रति । संपादूनि प्रजोत्पत्ति । पितृऋणाची निष्कृति । तदुत्तर यति त्यागार्ह ॥ ४ ॥ न करितां हे ऋणनिष्कृति । कैवल्यार्थ जाहलिया याति । तैं तो पावे अधोगति । ऋणनिर्मुक्ति न करूनियां ॥ ५ ॥ ऐसा अनादि आम्नायमार्ग । वसुदेवा तुज कथिला साङ्ग । यावरी तुझा अधिकार चांग । तो ही अव्यंग अवधारीं ॥ ६ ॥

त्वं त्वद्य मुक्तो द्वाभ्यां वै ऋषिपित्रोर्महामते । यज्ञैर्देवर्णमुन्मुच्य निर्ऋणोऽशरणो भव ॥ ४० ॥

वसुदेवा तूं आजिपर्यंत । दोन्ही ऋणांपासूनि मुक्त । वेदाध्ययनें आर्षातीत । पैत्रनिर्मुक्त संतानें ॥ ७ ॥ व्रतबंधादि वेदाध्यन । यथोक्त घडलें तुजलागून । दारपरिग्रह प्रजोत्पादन । क्रमें करून पैं जालें ॥ ८ ॥ आतां करूनि अध्वरनिचय । देवऋणापासूनि मुक्त होय । एवं निरासिल्या ऋणत्रय । योग्यता लाहें त्यागाची ॥ ९ ॥ ऋणत्रयापासूनि सुटिका । कर्में कर्म निरास निका । ऐसें क्षाळूनि कर्मपंका । यतिवरवेषा अवलंबीं ॥ ३१० ॥ वसुदेवातें मुनिसत्तम । म्हणती तुज हा कथिला क्रम । अविशुद्धचित्तांप्रति हा नेम । तूं निःसीम कृतार्थ ॥ ११ ॥ कैसा कृतार्थ म्हणसी जरी । ते ही गोष्टी तूं अवधारीं । वसुदेवा तूं बहुतापरी । पूर्णाधिकारी प्रेमळ पैं ॥ १२ ॥

वसुदेव भवान्नूनं भक्त्या परमया हरिम् । जगतामीश्वरं प्रार्चः स यद्वां पुत्रतां गतः ॥ ४१ ॥

जो त्रिजगाचा ईश्वर । हरि परमात्मा सर्वेश्वर । भक्ति करूनि तूं निरंतर । त्यातें सादर अर्चिसी ॥ १३ ॥ माझी भक्ति कोणे परी । तुम्हां अवगमली म्हणसी जरी । तरी ज्या कारणास्तव

तो हरी । पुत्रता वरी तुम्हां सदनीं ॥ १४ ॥ तुमच्या भक्तिभारें दाटला । म्हणोनि तुमचा पुत्र जाला । न सांगतांचि कळों आला । भक्त्युत्कर्ष हा तुमचा ॥ १५ ॥ वसुदेवातें इत्यादिवचनीं । अनुमोदिते जाले मुनी । पुढील कथा नृपाचे श्रवणीं । बादरायणी निरूपी ॥ १६ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ इति तद्वचनं श्रुत्वा वसुदेवो महामनाः ।
तानृषीनृत्विजो वव्रे मूर्ध्नाऽऽनम्य प्रसाद्य च ॥ ४२ ॥

शुक म्हणे गा कौरवपती । ऐसी ऐकूनि मुनिभारती । वसुदेवमानस प्रसन्नवृत्ती । त्या ऋषींतें प्रार्थी आर्त्विज्या ॥ १७ ॥ मस्तक ठेवूनि चरणांवरी । परम प्रश्रयें प्रार्थना करी । प्रसन्न करूनि बरव्या परी । ऋत्विज वरिले यज्ञार्थ ॥ १८ ॥

त एनमृषयो राजन्वृता धर्मेण धार्मिकम् । तस्मिन्नयाजयन्क्षेत्रे मखैरुत्तमकल्पकैः ॥ ४३ ॥

शुक म्हणे गा कुरुपाळका । वरिलें ऋत्विजां धार्मिकां । मग त्या ऋत्विजीं धर्मात्मका । वृष्णिनामकाप्रति तेव्हां ॥ १९ ॥ तया कुरुक्षेत्राचे ठायीं । उचित करविले क्रतु सर्वही । उत्तम उपचार कल्पी तिहीं । साङ्गोपाङ्ग सदक्षिणा ॥ ३२० ॥

तद्दीक्षायां प्रवृत्तायां वृष्णयः पुष्करस्रजः । स्नाताः सुवाससो राजन्राजानः सुष्ठ्वलङ्कृताः ॥ ४४ ॥

प्रवर्तलिया ते दीक्षेतें । सकळ वृष्णि संतुष्टचित्तें । सुस्नातसालंकृत होत्साते । पद्ममालान्वित विराजती ॥ २१ ॥ तैसेचि राजे सुस्नाव स्वगणीं । सालंकृत वस्त्राभरणीं । पंकजमालामंडित सुमनीं । प्रफुल्लमानसें मिरवती ॥ २२ ॥

तन्महिष्यश्च मुदिता निष्ककण्ठ्यः सुवाससः । दीक्षाशालामुपाजग्मुरालिप्ता वस्तुपाणयः ॥ ४५ ॥

तया नृपांच्या महिषी । आह्लादभरिता हर्षोत्कर्षीं । सालंकृता सुवाससी । कंठीं पदकें ज्या धरिती ॥ २३ ॥ दिव्याभरणीं प्रमुदितवक्त्रा । सौभाग्यमंडित सलिलजनेत्रा । कुंकुमचंदनचर्चितगात्रा । भरूनि पात्रामाजि द्रव्यें ॥ २४ ॥ यज्ञारंभीं उचिताहेणा । पात्रीं भरूनि पदार्थ नाना । सवृष्णिनृपांच्या अंगना । दीक्षासदना प्रवेशती ॥ २५ ॥ तये समयींचा परमानंद । लोकत्रयीं भरला विशद । गगनगर्भीं कोंदला नाद । तोही अनुवाद अवधारा ॥ २६ ॥

नेदुर्मृदङ्गपटहशङ्खभेर्यानकादयः । ननृतुर्नटनर्तक्यस्तुष्टुवुः सूतमागधाः ।
जगुः सुकण्ठ्यो गन्धर्व्यः सङ्गीतं सहभर्तृकाः ॥ ४६ ॥

मखमंडपीं मंगळतुरें । शंखभेरीमृदंगगजरें । काहळाप्रमुख सप्तस्वरें । मंजुळमधुरें वाजती पैं ॥ २७ ॥ दीर्घघोषें गजदुंदुभी । पटहढक्के गोमुखक्षोभीं । कर्णे तुतारें शृंगें उभीं । बाकें बुरंगें बहुसाल

॥ २८ ॥ नटनर्तकी नृत्य करिती । सूत मागध बिरुदें पढती । बंदिजन विविधस्तविती । वंशावळी-प्रशंसक ॥ २९ ॥ सुललितकंठाच्या गंधर्वी । संगीतशास्त्रप्रवीण सर्वी । सभर्तृका तिये पर्वी । गाती सर्वी सर्वत्र ॥ ३३० ॥ तानमानें आलापिती । करनर्तनें भाव दाविती । चपळ चार्वंगी चमकती । रंग भरिती रसकुशला ॥ ३१ ॥ इत्यादि मंगळघोषगजरीं । वसुदेवातें मुनीश्वरीं । अभिषेकिलें कोणे परी । तें अवधारीं कुरुवर्या ॥ ३२ ॥

तमभ्यषिञ्चद्विधिवदक्तमभ्यक्तमृत्विजः । पत्नीभिरष्टादशभिः सोमराजइवोडुभिः ॥ ४७ ॥

यथाविधि वसुदेवातें । समस्तऋत्विज मिळोनि तेथें । अभिषेकिते जाले निरुते । पत्न्यांसहित अठराही ॥ ३३ ॥ नेत्र अंजनें अक्त केले । शरीर नवनीतें माखिलें । पत्न्यावेष्टित अभिषेचिलें । तें चंद्रीं उपमिलें जातसे ॥ ३४ ॥ तारावेष्टित शोभे शशी । तेंवि वसुदेव स्वपत्न्यांसीं । शोभता जाला तेजोराशी । पूर्णकळांसीं अकलंक ॥ ३५ ॥ तदुपरि कैसा दीक्षित जाला । तें अवधारीं जातसे कथिला । सावध करूनि कुरुनृपाळा । अर्थ बोधिला तो ऐका ॥ ३६ ॥

ताभिर्दुकूलवलयैर्हारनूपुरकुण्डलैः । स्वलङ्कृताभिर्विबभौ दीक्षितोऽजिनसंवृतः ॥ ४८ ॥

दिव्याम्बरीं मंडित वनिता । पदभूषणीं नूपुरयुक्ता । वलयमुद्रिकाहारान्विता । सर्वाभरणीं विराजती ॥ ३७ ॥ मौळ वेणिका श्रवण घ्राण । बाहु मणिबंध अंगुळी जाण । कंठ हृदय मध्य चरण । उचिताभरणीं विलसती ॥ ३८ ॥ ऐशा अष्टादश अंगना । सालंकृता सभूषणा । तिहीं सहित दीक्षा-ग्रहणा । करिता जाला वसुदेव ॥ ३९ ॥ कृष्णाजिनें परिवेष्टित । यज्ञविभवें परिशोभित । सर्व वनितांसीं दीक्षित । जाला निश्चित हरिजनक ॥ ३४० ॥

तस्यर्त्विजो महाराज रत्नकौशेयवाससः । ससदस्या विरेजुस्ते यथा वृत्रहणोऽध्वरे ॥ ४९ ॥

तयाचे ऋत्विज तिये मखीं । हेमरत्नाभरणीं चोखी । कौशेयपीताम्बरसुवेषी । सुष्ठुसंतोषें विराजती ॥ ४१ ॥ सदस्यें सहित ऋत्विजगण । वस्त्राभरणीं मंडित पूर्ण । शतमखसदनीं वृत्रहण । विराजमान तत्तुल्य ॥ ४२ ॥ महाराज कौरवनृपति । ऐसा दीक्षित वृष्णिपति । जाला तेथ बळश्रीपति । कैसे शोभती तें ऐक ॥ ४३ ॥

तदा रामश्च कृष्णश्च स्वैः स्वैर्बन्धुभिरन्वितौ । रेजतुः स्वसुतैर्दारैर्जीवेशौ स्वविभूतिभिः ॥ ५० ॥

चराचरात्मक जितुके जीव । त्यांचे ईश बळकेशव । यज्ञप्रसंगीं सबंधु सर्व । शोभते जाले सकुटुम्ब ॥ ४४ ॥ आपुले आपुले बंधु सखे । जिवलग गोत्रज सुहृद असिके । कन्यापुत्रवनिताप्रमुखें ।

निजैश्वर्ये विराजती ॥ ४५ ॥ अणिमादिक अष्टविभूति । महाविभूती लक्ष्मी सती । सादर परिचर्ये तिष्ठती । तिहीं शोभती हरिहरवत् ॥ ४६ ॥

ईजेऽनुयज्ञं विधिना अग्निहोत्रादिलक्षणैः । प्राकृतैर्वैकृतैर्यज्ञैर्द्रव्यज्ञानक्रियेश्वरम् ॥ ५१ ॥

यज्ञापुढें यज्ञ सहजें । अनुक्रमेंचि कथिले जे जे । प्राकृतवैकृतरूपीं वोजें । मंत्रतंत्रादिद्रव्यादिकीं ॥ ४७ ॥ ज्योतिष्टोमादि अशेष । तैसेचि दर्शपूर्णमास । निजाङ्गेंचि साङ्गता ज्यांस । प्रकृतिरूप प्राकृत ते ॥ ४८ ॥ यापाख्यनि संस्थाभूत । एतत्प्रेरित अंगें प्राप्त । ते ते जाणावे वैकृत । सौर्यसत्राादिक अवघे ॥ ४९ ॥ पुरोडाशादि द्रव्यें उचित । यथोक्तमंत्रसूक्तप्रणीत । क्रियाकलाप यथातथ्य । केले समस्त अनुक्रमें ॥ ३५० ॥ यज्ञभोक्ता यज्ञपति । साङ्गोपाङ्गमखसंपत्ति । इहीं करूनि त्या ईश्वराप्रति । यजिता जाहला वसुदेव ॥ ५१ ॥ इत्यादि साङ्गोपाङ्गमख । तिहीं करूनि त्रिजगज्जनक । यजिल्यानंतर मारिषातोक । काय करी तें अवधारीं ॥ ५२ ॥

अथर्त्विग्भ्योऽददात्काले यथाम्नातं सदक्षिणाः । स्वलङ्कृतेभ्योऽलङ्कृत्य गोभूकन्या महाधनाः ॥ ५२ ॥

वेदप्रणीत जे दक्षिणा । ऋत्विजां कारणें दिधली जाणा । यज्ञकाळींच्या विधिविधाना । यथानुक्रमें साधियेलें ॥ ५३ ॥ हस्तमात्रा कर्णमात्रा । मोलागळिया कौशेयवस्त्रां । यथोक्त सालंकृत विप्रां । दानें दिधलीं अळंकारूनी ॥ ५४ ॥ गोभूकन्याप्रमुखदानें । अळंकारूनि वसनाभरणें । स्वलंकृतां द्विजांकारणें । महाधनें समर्पिलीं ॥ ५५ ॥ संतुष्ट केले ऋत्विज ऐसे । पुढें अवभृथ साधिलें कैसें । तेंही अवधारा समासें । कथिलें जैसें योगीन्द्रें ॥ ५६ ॥

पत्नीसंयाजावभृथ्यैश्चरित्वा ते महर्षयः । सस्नू रामह्रदे विप्रा यजमानपुरःसराः ॥ ५३ ॥

पत्नीसंयाजनामक याग । यज्ञांगत्वें करूनि चांग । अवभृथस्नानाचा प्रसंग । तो ही सवेग आदरिला ॥ ५७ ॥ मग ते महर्षि समस्त । विप्र जनपद जे संप्राप्त । रामह्रदीं यजमानसहित । जाले सुस्नात अवभृथीं ॥ ५८ ॥

स्नातोऽलङ्कारवासांसि बन्दिभ्योऽदात्तथा स्त्रियः । ततः स्वलङ्कृतो वर्णानाश्वभ्योऽन्नेन पूजयेत् ॥ ५४ ॥

ऐसा वसुदेव अवभृथस्नात । जाला ऋत्विजां सभ्यां सहित । वसनाभरणीं सालंकृत । त्याग अर्पित याचकां ॥ ५९ ॥ सूतमागधबंदिजन । विद्योपजीवी थोर लहान । वसनाभरणें त्यां संपूर्ण । देता जाला तदिच्छा ॥३६०॥ तैशाचि समस्ता पट्टमहिषी । अवभृथस्नाता यजनानेंसीं । वसनाभरणीं लावण्यराशी । सौभाग्यद्रव्यें सुशोभिता ॥ ६१ ॥ वर्णविभागें जन सर्वत्र । श्वानमर्याद प्राणिमात्र ।

यथोचित अन्नोदकें निकर । पूजिता जाला तयांचे ॥ ६२ ॥ कुरुक्षेत्रा पातले होते । ते सर्वत्र वृष्णिनार्थे । सर्वोपचारीं पूजिले निरुते । श्वानमर्याद दिव्यान्नें ॥ ६३ ॥

बन्धून्सदारान्ससुतान्पारिबर्हेण भूयसा । विदर्भकोसलकुरून्काशिकेकयसृञ्जयान् ॥ ५५ ॥

अन्नोदकें तर्पिले सर्व । त्यानंतरें कृतगौरव । बंधुसुहृदांचा समुदाव । पूजी वसुदेव सद्भावें ॥६४॥ निकटवर्ती गोत्रजनिकर । यादव माधव दाशार्ह कुकुर । भोज अंधक वृष्णिप्रवर । सात्वत समग्र स्वबंधु ॥ ६५ ॥ तिहीं आणिलीं उपायनें । वसुदेवें तच्चतुर्गुणें । कुळ शीळ यथामानें । अहेरार्पणें गौरविले ॥ ६६ ॥ तैसेचि सोयरे सुहृद ज्ञाती । आप्त जिवलग जे भूपती । त्यांतें अहेरीं यथोचितीं । गौरवी निगुती वसुदेव ॥ ६७ ॥ प्रद्युम्नाचा मातुळपक्ष । विदर्भनृपवर जे प्रत्यक्ष । त्यांतें वसुदेव परमदक्ष । पूजी सापेक्ष स्नेहभरें ॥ ६८ ॥ अहेर अर्पूनि विदर्भाप्रती । नग्नजिन्नामा कोसलपती । जयाची कन्या नाग्नजिती । अर्हणोचितीं तो पूजिला ॥ ६९ ॥ त्यावरी गान्धारी महासती । ते गौरविली यथानिगुती । आत्मस्वसा कुंती सती । पुत्रेंसहित गौरविली ॥ ३७० ॥ कौरवसुहृद तिचेनि योगें । तेही पूजिले आदरें चांगें । काशीश्वराच्या स्नेहप्रसंगें । काशीसंभव समर्चिले ॥ ७१ ॥ भद्राजनक कैकेय राजा । वसनाभरणीं पूजिला वोजा । सुस्निग्ध मित्रत्वाचिया काजा । सृंजय नृपति गौरविले ॥७२॥ स्वबंधुपाशुनि सृंजयांत । अहेरीं जे पूजिले नृपनाथा । दारा कुमारी कुमरांसहित । साङ्ग समस्त तोषविले ॥ ७३ ॥ त्यावरी सदस्य ऋत्विजगण । पूजिता जाला देवकीरमण । अहेर विस्तारी संकर्षण । सादर श्रीकृष्ण ते अर्पी ॥ ७४ ॥

सदस्यर्त्विक्सुरगणान्नृभूतपितृचारणान् । श्रीनिकेतमनुज्ञाप्य शंसन्तः प्रययुः क्रतुम् ॥ ५६ ॥

रामकृष्णांच्या प्रतापतेजें । वशवर्ती सुरगण सहजें । आवाहिले जे यज्ञकाजें । बरवे वोजे तें यजिले ॥ ७५ ॥ सदस्यप्रमुखऋत्विज अवघे । वस्त्राभरणीं पूजिले वेगें । चारणपितृगण तत्प्रसंगें । भूतमात्र मनुजादि ॥ ७६ यथोचित अहेर त्यां अर्पून । सभास्थानीं सम्मानून । परिमळद्रव्यें स्रक्चंदन । ताम्बूल दिधलें सर्वत्र ॥ ७७ ॥ श्रीवत्स ज्याचे वक्षस्थलीं । तो श्रीकृष्ण कौशल्यशाली । आणि बलराम महाबळी । जनकाजवळी वोळगती ॥ ७८ ॥ तया श्रीनिकेता श्रीहरिची । सर्वीं आज्ञा घेऊनि साची । प्रशंसा करित अध्वराची । शीघ्र जाती स्वस्थाना ॥ ७९ ॥ विदर्भप्रमुख सुहृदनृपती । गौरविले सप्रेमभक्ती । आज्ञा घेऊनि स्वदेशाप्रती । जातां शंसिती क्रतु अवघे ॥ ३८० ॥ सदस्य आणि ऋत्विजगण । देवमनुष्यपितृचारण । त्यांचें यथोक्त करूनि पूजन । भूतमात्रां तोषविलें ॥ ८१ ॥ आज्ञा घेऊनि गेलिया त्यांतें । तदुपरि श्रेष्ठकौरवांतें । बोळविलें तें ही निरुतें । सांगे नृपातें योगींद्र ॥ ८२ ॥

धृतराष्ट्रोऽनुजः पार्था भीष्मो द्रोणः पृथा यमौ । नारदो भगवान्व्यासः सुहृत्सम्बन्धिबान्धवाः ॥ ५७ ॥
बन्धून्परिष्वज्य यदून् सौहृदाक्लिन्नचेतसः । ययुर्विरहकृच्छ्रेण स्वदेशांश्चापरे जनाः ॥ ५८ ॥

प्रज्ञाचक्षु धृतराष्ट्रनृपति । विदुर त्याचा अनुज सुमति । पृथानंदन प्रतापमूर्ति । धर्मभीमार्जुन त्रिवर्ग हे ॥ ८३ ॥ माद्रीतनय सहदेवनकुळ । अश्विनीकुमार जे कां यमल । पृथानामें कुन्ती केवळ । इत्यादि सकळां गौरविलें ॥ ८४ ॥ वसनाभरणें मोलागळीं । विचित्रयानें पदार्थ सकळी । मधुरोत्तरीं स्नेहबहळीं । सम्मानूनी बोळविले ॥ ८५ ॥ वैष्णवांमाजि जो अग्रणी । तो देवर्षि नारदमुनी । यज्ञारंभीं कथिले मुनी । द्वैपायनादि ते अवघे ॥ ८६ ॥ आणि जे जे सोयरे आप्त । देहसंबंधें बंधुत्व प्राप्त । त्यांतें गौरवूनि यथोचित । हृदयीं धरित स्नेहभरें ॥ ८७ ॥ परस्परें हृदयीं द्रवती । वियोगविरहें नेत्र स्रवती । आज्ञा घेऊनि स्वदेशाप्रती । निघतां खंती उभयत्र ॥ ८८ ॥ सहसा वियोग न साहवे । तथापि एकत्र न राहवे । स्वदेशाप्रति लागलें जावें । विचित्र दैवें विघडालिया ॥ ८९ ॥ देशोदेशींचे प्रजाजन । पुण्यशीळ धर्मसंपन्न । ते स्वस्थानीं करितां गमन । स्वमुखें यज्ञ प्रशंसिती ॥ ३९० ॥ यादवांचीं कुळें अठरा । स्निग्धां आप्तां सुहृदप्रवरां । गौरवूनि त्यां सपुत्रदारां । सहकिंकरां बोळविलें ॥९१॥ यावरी नंद जो व्रजपती । ज्याचे उपकार लिहितां क्षिती । गमे अपाडें अपुरती । बोळवी त्याप्रति तें ऐका ॥ ९२ ॥

नन्दस्तु सह गोपालैर्बृहत्या पूजयार्चितः । कृष्णरामोग्रसेनाद्यैर्न्यवात्सीद्बन्धुवत्सलः ॥ ५९ ॥

नंदव्रजींचे जे निवासी । गोपाळ होते नंदापाशीं । तिहीं सहित व्रजपतीसी । श्रेष्ठोपचारीं पूजियेलें ॥ ९३ ॥ महापूजा जियेचें नांव । जीमाजि महार्ह उपचार सर्व । तिहीं करूनि बलवराव । प्रेमसद्भावें समर्चिला ॥ ९४ ॥ रामकृष्ण उग्रसेन । देवंक वसुदेव आदिकरून । विनयभावें संप्रार्थून । नंद सहगण राहविला ॥ ९५ ॥ मित्रबंधुही करूनि विनति । म्हणती भो भो बलवपति । यज्ञप्रसंगें आम्हांप्रति । पडली गुंती आजिवरी ॥ ९६ ॥ तुम्ही आम्ही एकान्तवासी । बैसलों नाहीं कोण्हे दिवसीं । सुखसंवादें पळघटिकेसी । लोटिलें नाहीं संवादे ॥ ९७ ॥ सुवर्णाची निर्मूनि पुरी । मथुरा नेली समुद्रोदरीं । तैंहूनि सखया पडलों दुरी । स्नेहें अंतरीं झुरतसों ॥ ९८ ॥ अवकाश करूनि यावें भेटी । परंतु शत्रूची भंवती घरटी । संकटाहूनि महासंकटीं । मज्जनोन्मज्जनीं निर्बुजलों ॥ ९९ ॥ सूर्योपरागीं कुरुक्षेत्रा । भाग्यें मिनली समग्र यात्रा । येथ विघ्युक्त सारिलें सत्रा । भेटलों मित्रां आप्तांसी ॥४००॥ तुमचिया सहवासाची धणी । पूर्ण नोहेचि शिराणी । यालागीं कांहीं दिवस रजनी । येथ राहूनी तोषविजे ॥ १ ॥ बंधुवत्सल बलवनाथ । तोषला सप्रेम हृदया आत । कळवळूनि राहिला स्वस्थ । पुढील वृत्तान्त अवधारा ॥ २ ॥

वसुदेवोऽञ्जसोत्तीर्य मनोरथमहार्णवम् । सुहृद्वृतः प्रीतमना नंदमाह करे स्पृशन् ॥ ६० ॥

कौरवकुमुदकाननचन्द्रा । ऐकें परीक्षिति नरेन्द्रा । वसुदेव मनोरथसमुद्रा । लंघूनि गेला आह्लादें ॥ ३ ॥ अंजसा म्हणिजे सर्व प्रकारें । जितुकीं यज्ञाङ्गें दुस्तरें । तितुकीं स्वमनोरथानुसारें । उल्लंघिलीं

संतोषें ॥ ४ ॥ मेरु इतुका उतरला भार । कीं बाहीं निस्तरला सागर । तैसा वसुदेव विज्वर । जाला अध्वर संपलिया ॥ ५ ॥ करूनि दीक्षाविसर्जन । वसनाभरणें अंगीकारून । सुहृद आप्तीं परिवारून । सभास्थानीं विराजला ॥ ६ ॥ प्रफुल्लित हृदयारविन्द । हस्तीं धरूनि गोपनंद । त्याप्रति बोलिला वाक्यें विशद । तो अनुवाद अवधारा ॥ ७ ॥

॥ वसुदेव उवाच ॥ भ्रातरीशकृतः पाशो नृणां यः स्नेहसंज्ञितः ।
तं दुस्त्यजमहं मन्ये शूराणामपि योगिनाम् ॥ ६१ ॥

वसुदेव म्हणे बलवराया । ईश्वराची अगाध माया । कोण्ही समर्थ लंघावया । मनुष्यांमाजी असेना ॥ ८ ॥ ते मायेचा एक अंश । जो कां स्नेहनामक पाश । मी मानितों मनुष्यास । दुस्त्यज ऐसा निर्धारें ॥ ९ ॥ जरी तूं म्हणसी शूर बलिष्ठ । प्रतापवंत वीरश्रेष्ठ । स्नेहपाशाचे काय त्या कष्ट । छेदनीं दुर्घट काय तया ॥ ४१० ॥ तरी तूं ऐकें व्रजेश्वरा । स्नेहपाशें चराचरां । बांधिलें असतां कोण्ही शूरां । सामर्थ्य नाहीं खंडावया ॥ ११ ॥ अथवा शूर कठोरवृत्तिं । त्यांसी न करवे स्नेहनिवृत्ति । परंतु योगियां आत्मरति । फावल्या छेदिती स्नेहपाशा ॥ १२ ॥ तरी योगियांही ज्ञानबळें । न होववे स्नेहपाशावेगळें । तस्मात् ईश्वरें मायाजाळें । विश्व मोकळें आकळिलें ॥ १३ ॥ तेंचि स्नेहबंधन कैसें । प्रत्यक्ष अनुभूत जें अपैसें । बलवेश्वरा सावध परिसें । तुज मी अल्पसें निरूपितों ॥ १४ ॥

अस्मास्वप्रतिकल्पेयं यत्कृताज्ञेषु सत्तमैः । मैत्र्यार्पिताऽफला वापि न निवर्तेत कर्हिचित् ॥ ६२ ॥

आमुच्या ठायीं तुझी मैत्री । मागें पुढें कोण्ही श्रोत्रीं । ऐकिली नाहीं तेथ नेत्रीं । न देखिली हें काय म्हणों ॥ १५ ॥ जये मैत्रीसी नाहीं उपमा । यास्तव म्हणिजे अनुपमा । त्रिजगीं पाहतां आम्हां तुम्हा । अपाड प्रेमा तो ऐक ॥ १६ ॥ कृतोपकारातें जो जाणे । कृतज्ञ ऐसें त्यातें म्हणणें । तें जाणिवेचें जेथ उणें । अकृतज्ञ म्हणणें त्यालागीं ॥ १७ ॥ सज्जनांचे जे मुकुटमणी । सत्तम म्हणिजे त्यांलागूनी । तैसे तुम्ही हें मज लागूनी । अंतःकरणीं जाणवलां ॥ १८ ॥ आम्ही अकृतज्ञ अनुपकारी । ऐसियांही आम्हांवरी । अकृत्रिम तुमची मैत्री । हा निर्धारीं स्नेहपाश ॥ १९ ॥ मैत्री केलिया जे ठायीं । तेथ फळाशा न दिसे कांहीं । ते प्रत्युपकारशून्या पाहीं । आमुच्या ठायीं तव मैत्री ॥ ४२० ॥ अफळा मैत्री कळल्यावरी । उपेक्षा नुपजे तुम्हां अंतरीं । आम्हां ऐसिया अनुपकारी । अद्यापवरी स्नेहवृद्धि ॥ २१ ॥ कोण्हे विषयीं कोण्हे काळीं । प्रेमा न परतेचि स्नेहाळीं । तस्मात् ईश्वरकृतपाशजाळीं । निबद्ध ऐसें मी जाणें ॥ २२ ॥ तुम्ही अकृतज्ञ कैसे । म्हणोनि पुससी तरी परिसें । आमुचा अधिकार आम्हां दिसे । अनायासें निरूपितों ॥ २३ ॥

प्रागकल्पाच्च कुशलं भ्रातर्वो नाचराम हि । अधुना श्रीमदान्धाक्षा न पश्यामः पुरः सतः ॥ ६३ ॥

पूर्वी असमर्थ प्रत्युपकारीं । होतों कंसाचे कारागारीं । म्हणोनि आम्हांपासोनि मैत्री । सफळ न झाली प्रतिकारें ॥ २४ ॥ तये काळींची विपत्ती । बळवराया स्मरतां चित्तीं । आम्हां ठाव नेदी क्षिती । तैं तां संतती वांचविलीं ॥ २५ ॥ न धरूनि क्रूर कंसभय । आम्हां वोपिलें तुवां अभय । ऐसिया उपकारा उत्तीर्ण काय । आम्ही होवावें ते समयीं ॥ २६ ॥ यालागीं आम्हां असमर्थपणीं । तुझिया उपकारालागुनी । अयोग्यता तें तां श्रवणीं । ऐकिलें कीं व्रजनाथा ॥ २७ ॥ कंसमरणानंतर पाहीं । नृपैश्वर्य भोगितां गेहीं । आम्ही मदान्ध तिये ठायीं । मित्रत्व कांहीं नुमसोंची ॥ २८ ॥ आतां राजमदें अंधदृष्टी । पुढें सज्जन न लक्षे सृष्टी । ऐसी अनधिकाराची गोष्टी । यथार्थ वाक्पुटीं वदतसें ॥ २९ ॥ म्हणोनि प्रार्थितों मी ईश्वरा । स्वकल्याण इच्छित्या नरा । न शिवो राज्यलक्ष्मीचा वारा । कां तें अवधारा श्लोकोक्त ॥ ४३० ॥

मा राज्यश्रीरभूत्पुंसः श्रेयस्कामस्य मानद । स्वजनानुत बंधून्वा न पश्यति ययांधदृक् ॥ ६४ ॥

राज्यलक्ष्मीच्या मदें करून । सज्जन अथवा बंधुजन । त्यांतें नोळखे मदान्धनयन । स्नेहरक्षण मग कैंचें ॥ ३१ ॥ नृपश्रीमदें मदान्धदृष्टी । जालिया सज्जन न दिसे सृष्टी । सुहृदमित्रबंधुभेटी । आलिया गोष्टी अनोळखा ॥ ३२ ॥ तुमचे उपकार एवढे शिरीं । असतां आम्ही अनुपकारी । शक्ताशक्त दोहीं परी । यथार्थ वैखरी तें कथिलें ॥ ३३ ॥

श्रीशुक उवाच ॥ एवं सौहृदशैथिल्यचित्त आनकदुंदुभिः । रुरोद तत्कृतां मैत्रीं स्मरन्नश्रुविलोचनः ॥ ६५ ॥

सुहृदस्नेहाची विस्मृति । हृदयीं स्मरोनि अनुपक्रांति । प्रेमशैथिल्यें द्रवला चित्तीं । आनकदुंदुभि ते काळीं ॥ ३४ ॥ तेणें न धरत आलें रुदन । स्मरोनि नंदाचें मित्रपण । टपटपां अश्रु टाकिती नयन । नंद देखोन कळवळिला ॥ ३५ ॥ वसुदेव म्हणे नंदाप्रति । तुमचिया कृतोपकारा गणति । करूं न शकेंचि कल्पान्तीं । हें मम मति जाणतसे ॥ ३६ ॥ ऐसा वसुदेव अधोवदनीं । नंदाप्रति विनीत वाणी । वदतां अश्रु स्रवती नयनीं । नंद ते क्षणीं स्थिरावला ॥ ३७ ॥

नन्दस्तु सख्युः प्रियकृत्प्रेम्णा गोविन्दरामयोः । अद्य श्व इति मासांस्त्रीन्यदुभिर्मानितोऽवसत् ॥ ६६ ॥

ऐसा वसुदेवें प्रार्थिला । समस्त यादवीं सम्मानिला । सख्याचें प्रिय करावयाला । राहता जाला दिन कांहीं ॥ ३८ ॥ मित्र प्रार्थिती परमप्रीती । भोजनानंतर जावें म्हणती । अपराह्णपर्यंत करा वसती । ऐसे गोविती स्नेहपाशें ॥ ३९ ॥ रामकृष्णांच्या मुखवीक्षणें । नंद वेधला अंतःकरणें । मान देऊनि तत्प्रार्थने । अपराह्णपर्यंत राहिला ॥ ४४० ॥ भोजनानंतर अपराह्णकाळीं । व्रजपतीतें प्रार्थिती सकळी । रात्री क्रमोनि सुहृदमेळीं । प्रयाण कीजे प्रभातीं ॥ ४१ ॥ अपरदिवशीं तयाचि परी । म्हणती मध्याह्ना उपरी । प्रयाण कीजे सहपरिवारीं । इतुकी वैखरी मानावी ॥ ४२ ॥ रामकृष्णांच्या प्रेमरसा ।

भुलोनि नंद गुंतला कैसा । आजि उद्यां परवां ऐसा । तेथ त्रिमासां अतिक्रमिलें ॥ ४३ ॥ त्या नंतरें बहु प्रार्थना । करूनि नंदें घेतां आज्ञा । प्रयाणकाळीं वस्त्राभरणा । देते जाले तें ऐका ॥ ४४ ॥

ततः कामैः पूर्यमाणः सव्रजः सहबान्धवः । परार्ध्याभरणक्षौमनानानर्घ्यपरिच्छदैः ॥ ६७ ॥
वसुदेवोग्रसेनाभ्यां कृष्णोद्धवबलादिभिः । दत्तमादाय पारिबर्हं यापितो यदुभिर्ययौ ॥ ६८ ॥

तदुपरि राजा उग्रसेन । वसुदेव उद्धव रामकृष्ण । इत्यादिकीं भिन्नभिन्न । वस्त्राभरणें समर्पिलीं ॥ ४५ ॥ परार्ध्य म्हणिजे अमूल्यतरें । निर्जरलोकींचीं दिव्याम्बरें । अनर्घ्यरत्नें कार्तस्वरें । त्वाष्ट्रनिर्मितें आभरणें ॥ ४६ ॥ अनर्घ्य नानाविधोपकरणें । गोपोपयोग्य दिव्य भाजनें । क्षौमकौशेयें रोमजें ताणें । व्रजपा कारणें समर्पिलीं ॥ ४७ ॥ अग्निधौतें हेमदुकूलें । अमरेन्द्रभोग्यें जिये पट्टकुळें । कुबेरलोकींचीं मुक्ताफळें । मंडित वसनें महाहें ॥ ४८ ॥ वरुणलोकींच्या पदार्थश्रेणी । नंदादिबलवां समर्पूनी । सर्व मनोरथ तिहीं करूनी । पूर्ण केले वज्रपाचे ॥ ४९ ॥ वज्रनिवासी जे बलव । आप्त स्वजन बंधु सर्व । तिहीं सहित बलवराव । पारिबर्हें गौरविला ॥ ४५० ॥ देवकी रोहिणी मुख्य करूनी । अष्टादश वसुदेवपत्नी । यशोदे सहित व्रजकामिनी । वस्त्राभरणीं गौरविल्या ॥ ५१ ॥ रेवती-रुक्मिणीप्रमुख प्रेमें । अनर्घ्य दुकूलें दिव्य ललामें । अर्पूनि पूजिती स्नेहकामें । यशोदादिकां गौळणींतें ॥ ५२ ॥ ऐसें दिधलें जें जें उचित । नंदें घेऊनि तें समस्त । समस्तां पुसूनि स्वगणा सहित । जाता जाला व्रजभुवना ॥ ५३ ॥ समस्त यादवीं गव्यूतिमात्र । नंद बोळविला प्राणमित्र । बृहत्सेनेचा परिवार । वेष्टित नृपवर आहुकादि ॥ ५४ ॥ आज्ञा घेऊनि निघाला नंद । हृदयीं पावला परमानंद । बलवां सहित श्रीगोविन्द । हृदयीं धरिला तें ऐका ॥ ५५ ॥

नन्दो गोपाश्च गोप्यश्च गोविन्दचरणाम्बुजे । मनः क्षिप्तं पुनर्हर्तुमनीशा मथुरां ययुः ॥ ६९ ॥

नंद गोपाळ गोपी सकळी । गोविंदाचे चरणकमळीं । चित्त गुंतलें त्यांतें समूळीं । पुढती आकर्षूं न शकती ॥ ५६ ॥ मन गुंतलें गोविन्दचरणीं । पुढती असमर्थ तदाहरणीं । वाणी वेधल्या तद्गुण-स्मरणीं । विवश प्रयाणीं तनुयष्टि ॥ ५७ ॥ ऐसे मथुरादेशाप्रती । व्रजभुवनातें बलव जाती । मार्गीं आप्त जे भेटती । त्यांतें कथिती महोत्सव ॥ ५८ ॥ नंदप्रमुख मित्र सकळ । सोयरे कुरुमत्स्यपाञ्चाळ । स्नेहवादीं सर्व भूपाळ । बोळविले असतां पैं ॥ ५९ ॥

बन्धुषु प्रतियातेषु वृष्णयः कृष्णदेवताः । वीक्ष्य प्रावृषमासन्नां ययुर्द्वारवतीं पुनः ॥ ७० ॥

समस्त बोळविल्या नंतर । यादवभोजान्धावृष्णिकुकुर । ज्यांचें दैवत श्रीकृष्ण श्रीधर । करिती विचार ते अवघे ॥ ४६० ॥ देखोनि समीप पर्जन्यकाळ । मार्गीं नद नद्या भरती वोहळ । म्हणोनि

निघाले तत्काळ । पातले सकळ द्वारवती पैं ॥ ६१ ॥ जे जे जनपद भेटती त्यांसी । अथवा स्वजनां नागरां प्रती । कुरुक्षेत्रींचा उत्सव कथिती । तो तूं कुरुपती अवधारीं ॥ ६२ ॥

जनेभ्यः कथयाञ्चक्रुर्यदुदेवमहोत्सवम् । यदासीत्तीर्थयात्रायां सुहृत्सन्दर्शनादिकम् ॥ ७१ ॥

यदुदेव तो वसुदेव । त्याचा समग्र यज्ञोत्सव । आणि कुरुक्षेत्रयात्रा सर्व । स्वमुखें अपूर्व प्रशंसिती ॥ ६३ ॥ यात्राप्रसंगें सहज गांठी । जाल्या सुहृदांचिया भेटी । परस्परें त्या संवादगोठी । कथिती वाक्पुटीं आह्लादें ॥ ६४ ॥ चतुरशीतितमोऽध्याय । येथ संपल्यानंतर पाहें । पुढील कथा अपूर्व आहे । सादर तिये परिसा हो ॥ ६५ ॥ पंचायशीव्या अध्यायांत । रामकृष्णांतें प्रार्थितात । मग ते जनका माते सहित । प्रबोधितील ज्ञानातें ॥ ६६ ॥ साही मृत पुत्र आणोनी । आनंदवितील पिता जननी । सावध तिये कथेच्या श्रवणीं । श्रोतीं सज्जनीं बैसावें ॥ ६७ ॥ प्रतिष्ठानीं एकनाथ । सज्जनवृंदीं सुरपूजित । तत्पादाब्जपरागनिरत । भ्रमर संतत दयार्णव ॥ ६८ ॥ काळयुक्ताक्षी वत्सरीं । फाल्गुनसिनीवाली अंगारीं । तद्दिनीं प्रतिष्ठानक्षेत्रीं । भापावैखरी ऋतु कथिला ॥ ६९ ॥ याचिया श्रवणें करून । कुरुक्षेत्रींची यात्रा पूर्ण । सर्व यज्ञांचें अवभृथस्नान । श्रोत्यांलागून जोडतसे ॥ ७० ॥ यालागीं कोण्ही न मानूनि उबग । श्रवणीं आदर कीजे चांग । करुणावत्सल कमलारंग । सर्व प्रसंग संपादी ॥ ७१ ॥ श्रीमद्भागवत दशम स्कंध । टीका हरिवरद अगाध । दयार्णवकृत परम विशुद्ध । अध्याय प्रसिद्ध चौऱ्यायशीवा ॥ ४७२ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कन्धे श्रीशुक-परीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां कुरुक्षेत्रयात्रायां वसुदेवमखवर्णनं नन्दवसु-देवसंवादो नाम चतुरशीतितमोऽध्यायः ॥ ८४ ॥

श्लोक ७१ ॥ टीका ४७२ ॥ एवं संख्या ५४३ ॥
(चौऱ्याऐंशीवा अध्याय मिळून ओवी संख्या ३७,७०३)

चौऱ्याऐंशीवा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ८५ वा

श्रीगणेशाय नमः । अगाधैश्वर्यप्रकाशका । नमो गोविन्दा निष्कलंका । लाहतां तुझिया पदजलपंका । निरसे शंका द्वैताची ॥ १ ॥ अध्याय चौऱ्यायशी पर्यंत । वाखाणिले इत्थंभूत । पंचायशाव्यामाजि अर्थ । तो संकेत अवधारा ॥ २ ॥ मुनीश्वराचे आज्ञेवरून । सादर वसुदेवें आपण । संपादूनि यज्ञविधान । स्वसुत भगवान ओळखिले ॥ ३ ॥ पंचायशाव्यामाजि कथा । प्रार्थूनि वसुदेवें उभयसुतां । ज्ञानोपदेश जाला पुसता । तिहीं तत्वता प्रबोधिला ॥ ४ ॥ देवकीवसुदेवांप्रति जाण । वास्तवबोधें प्रबोधून । दिधले मृत पुत्र आणून । अध्याय इतुकेन समग्र हा ॥ ५ ॥

॥ श्रीशुक उवाच । अथैकदात्मजौ प्राप्तौ कृतपादाभिवन्दनौ । वसुदेवोऽभिनन्द्याह प्रीत्या सङ्कर्षणाच्युतौ ॥१॥

शुक म्हणे गा परीक्षिति । ऐकें बळकृष्णांची कीर्ति । जेणें अक्षयसुखावाप्ति । प्रेमळ लाहती तुज ऐसे ॥ ६ ॥ ऐसें सादर कुरुवर्यातें । करूनि प्रवर्तला कथनातें । तें व्याख्यान श्रोतयांतें । कथी दयार्णव हरिवरदें ॥ ७ ॥ कुरुक्षेत्रयात्रे उपरी । एकदा आत्मज पाहूनि शौरी । स्मरूनि मुनींची वैखरी । काय करी तें ऐका ॥ ८ ॥ आपुलाले भुवनींहून । प्रातःकृत्य संपादून । पितृदर्शना रामकृष्ण । आले देखोन वसुदेवें ॥ ९ ॥ चरण नमस्कारूनियां पुढें । बद्धाञ्जळि किङ्करापाडें । उभे ठाकले ऐसियां कडे । तोषे निवाडें पाहूनी ॥ १० ॥ रामकृष्णांतें ऐशिया परी । देखूनि संतुष्ट अभ्यंतरीं । कर ठेवूनि उभयां शिरीं । आशिषोत्तरीं गौरविले ॥ ११ ॥ प्रीति करूनि पुत्रांकडे । पाहोनि आनंदें वोसंडे । किमर्थ म्हणसी तरी रोकडें । ऐक निवाडें निरूपितों ॥ १२ ॥

मुनीनां स वचः श्रुत्वा पुत्रयोर्धामसूचकम् । तद्वीर्यैर्जातविश्रम्भः परिभाष्याभ्यभाषत ॥ २ ॥

महिमा पुत्रांचा सूचक । ऐसें स्मरोनि तें मुनिवाक्य । पुत्रवीर्यें अलौकिक । विश्वासजनकें जाणविलीं ॥ १३ ॥ पुत्र केवळ ईश्वरेश्वर । प्रकृतिपुरुषांपासूनि पर । माझिये उदरीं मनुजावतार । परि नव्हती साचार मनुज हे ॥ १४ ॥ जन्मापासूनि आजवरी । ज्याची स्मरतां ऐश्वर्यथोरी । मुनीश्वरांच्या वाक्यें निर्धारीं । विश्वास अंतरीं बाणला ॥ १५ ॥ करूनि पादाभिवंदन । पाहूनि सुस्निग्ध नंदन । सप्रेमभावें संबोधून । बोले वचन तें ऐका ॥ १६ ॥

कृष्ण कृष्ण महायोगिन्सङ्कर्षण सनातन । जाने वामस्य यत्साक्षात्प्रधानपुरुषौ परौ ॥ ३ ॥

महायोगिया भो भो कृष्णा । सनातना संकर्षणा । प्रधानपुरुषां दोघां जणां । पासूनी परतर मी जाणें ॥ १७ ॥ या विश्वाचें कारण श्रेष्ठ । स्वरूपभूत जें कां स्पष्ट । प्रधानपुरुषांहून उत्कृष्ट । हें अव्यंग चोखट जाणें भी ॥ १८ ॥ अनेक कारणें असती अपर । त्या सर्वांहूनि उत्कृष्टतर । साक्षात प्रधानपुरुष पर । त्याहूनि परतर तेचि तुम्ही ॥ १९ ॥ कारणांसही कारणभूत । साक्षात् ईश्वर तुम्ही संत । हें मी जाणें इत्थंभूत । शंकारहित होत्साता ॥ २० ॥ येथ शंका कराल ऐसी । या विश्वाच्या होणयासी । बहुधा कारकें श्रुति प्रशंसी । तियेंही अल्पसीं निरूपितों ॥ २१ ॥ कथितों एका उदाहरणा । सर्व प्रमेय अवगमें जाणा । विशेष सांगणें सर्वज्ञां । किमर्थ करणें विस्तार ॥ २२ ॥

यत्र येन यतो यस्य यस्मै यद्यद्यथा यदा । स्यादिदं भगवान्साक्षात्प्रधानपुरुषेश्वरः ॥ ४ ॥

यत्र म्हणिजे जिये ठायीं । ज्या कृत्यानें आपुल्या बाहीं । जिहीं आउतीं करूनि पाहीं । ज्यापासूनि जें करणें ॥ २३ ॥ ज्याच्या निमित्तें करून । ज्या कारणें संप्रदान । जें जें जैसें प्रयोजन । बहुधा भिन्न कारक हें ॥ २४ ॥ यत्र म्हणिजे कुलालशाळे । येन म्हणिजे ज्या कुलालें । जेणें म्हणिजे गुंडाफळें । परजूनि सकळें घट कीजे ॥ २५ ॥ यतो म्हणिजे पचनास्तव । पाकानिमित्त घट अपूर्व । ग्राहका कारणें दानगौरव । द्रव्यग्रहणें प्रयोजिजे ॥ २६ ॥ यदा म्हणिजे जे जे अवसरीं । यथा म्हणिजे जिया परी । होय ऐसी कारककुसरी । सर्व तुम्हांवरी आरोप हा ॥ २७ ॥ स्वप्नामाजि देखिला घट । एवं तो सर्वकारकाचि सगट । स्वप्नमात्रा एकट । तेंवि तूं वैकुंठ भगवान् ॥ २८ ॥ प्रधानपुरुषांचा ईश्वर । अवघा तूंचि विश्वाकार । उपादान सत्य साचार । हा निर्धार श्रुतिगम्य ॥ २९ ॥ मूळ वास्तव न विकारतां । विपरीतबोधरूपविवर्त्ता । तेथ कारकें जडपदार्था । समान वृथा अवगमणें ॥ ३० ॥ प्रधान म्हणिजे भोग्यप्रकृति । तद्भोक्ता पुरुष चिन्मूर्ति । उभयांची जे ऐक्यस्थिति । तो तूं साक्षात् ईश्वर पैं ॥ ३१ ॥ प्रधानपुरुष रामकृष्ण । ऐक्यबोधें एक वचन । श्रीधरस्वामींचें व्याख्यान । अवलोकून उपलविलें ॥ ३२ ॥

एतन्नानाविधं विश्वमात्मसृष्टमधोक्षज । आत्मनानुप्रविश्यात्मन्प्राणो जीवो बिभर्ष्यजः ॥ ५ ॥

अगा ये अधोक्षजा हरि । एवं ऐसिया प्रकारीं । नानाविध विश्व कुसरी । आपणा माझारी स्वयें रचिलें ॥ ३३ ॥ भो भो आत्मया तुवांचि तेथें । आपणा प्रवेशूनियां निरुतें । जन्मरहित जो तूं येथें । भरण पोषण ही करिसी ॥ ३४ ॥ जेव्हां निर्मिलें आकाश । तेथ शब्दत्वें अनुप्रवेश । वायूमाजि जैसा स्पर्श । तेजीं प्रकाशरूपत्वें ॥ ३५ ॥ जळीं अनुप्रविष्ट रस । महीमाजि गंधविशेष । एंव स्वसृष्टानुप्रवेश । करूनि अशेष चेष्टविसी ॥ ३६ ॥ पुण्योगंधः पृथिव्यां च । हा अनुप्रवेश तवोक्त साच । प्राणजीवशक्ति नडनाच । दाविसी संच होत्साता ॥ ३७ ॥ क्रियाशक्तिवान तो प्राण । जीव तो ज्ञानशक्तिवान । तैसा होत्साता आपण । धरिसी संपूर्ण तूंचि तूं पैं ॥ ३८ ॥ याचें धारण पोषणकर्ता । तूंचि अभिन्न माता पिता । कैसा म्हणसी तरी तत्वता । श्रीअनंता अवधारीं ॥ ३९ ॥ पूर्वरूप बोलिजे माता । उत्तररूप म्हणिजे पिता । प्रजासंधि तेथें तत्वता । प्रजनन संधान श्रुति म्हणती ॥ ४० ॥ स्वात्मसृष्टीचिया आभासा । इत्यादि भेद तो कायसा । अभेदद्रष्ट्याचा संकल्प जैसा । तेंवि तूं अशेषा स्फुरणातें ॥ ४१ ॥ जरी तूं म्हणसी वासुदेवा । प्राणादिशक्तिनिकर आघवा । त्यासी कारणत्वाचा यावा । तरी कां म्हणावा ईश हेतु ॥ ४२ ॥ यदर्थीं ऐकें भो जगदीशा । परमकारण मुख्य ईशा । सर्वात्मकत्वेंचि तिया अशेषा । प्रतिपादिजेल अवधारीं ॥ ४३ ॥ प्राणजीवादि विचित्र शक्ति । ते परेशाचीच सत्ता निरुती । दृष्टान्तद्वारा व्याख्यानरीती । भो श्रीपती अवधारीं ॥ ४४ ॥

प्राणादीनां विश्वसृजां शक्तयो याः परस्य ताः । पारतन्त्र्याद्वैसादृश्याद्द्वयोश्चेष्टैव चेष्टताम् ॥ ६ ॥

सूत्रात्मा जो कां प्राण । तो मुख्यत्वें आदिकरून । विश्वसृजनाचीं कारणें पूर्ण । भिन्न भिन्न अवगमती ॥ ४५ ॥ परंतु त्यांचिया समस्त शक्ती । त्या परमेश्वराच्याच निश्चिती । यालागीं परम कारणें ऐसें श्रुती । प्रतिपादिती ईशातें ॥ ४६ ॥ यदर्थीं प्रमाण काय म्हणसी । तरी स्वतंत्रता नाहीं तयासी । शरसामर्थ्य वेधकासी । परेशासि तेंवि हें पैं ॥ ४७ ॥ समुद्रतटीं जेंवि विहिरा । पृथक भासला जरी खरा । तरी तो समुद्राचाचि झरा । ऐसें चतुरा उमजे कीं ॥ ४८ ॥ भगवंतासी स्वातंत्र्य जेंवि । प्राणादिवर्गांसही तेंवि । नसावें कां ऐसी गोवी । वाटे जीवीं तरी ऐका ॥ ४९ ॥ प्राणादिकां आणि भगवंता । अवश्य असो स्वतंत्रता । परि उभयामाजि विसदृशता । ते तत्वता अवधारा ॥ ५० ॥ परेश पूर्ण स्वसंवेद्य । प्राणादिवर्ग परसंवेद्य । या लागीं असादृश्य अनुवाद । उमजे विशद तें ऐका ॥ ५१ ॥ इंद्रियाणि पराण्याहुः । मन त्याहूनि परतर बहु । बुद्धि मनाहूनि स्वयमेव । परेश वास्तव बुद्धिपर ॥ ५२ ॥ सूत्रात्मत्वें स्वातंत्र्य प्राणा । परंतु परेशेंशीं सदृश न म्हणा । जेंवि शकटा अचेतना । यंत्या चेतना विसदृशता ॥ ५३ ॥ शकटोपस्थ चक्रें अक्ष । रज्वादिनिचय जड प्रत्यक्ष । सूत्रन्यायें सचेत उक्ष । परि ते विसदृश यंत्यासीं ॥ ५४ ॥ यंता नियमी जिये पक्षीं । तदनुनियमें चालिजे उक्षीं । अचेतवर्गीं चक्रादि अक्षीं । तदनुशिक्षीं अनुचर्या ॥ ५५ ॥ तेंवि सूत्ररूपें प्राणां । अंगीं स्वतंत्र

जन्ही चेतना । तथापि प्रेरका ईश्वरा पूर्णा । वांचूनि चलना असमर्थ ॥ ५६ ॥ म्हणाल यंता नसतां धुरे । सउक्ष शकट सैराट फिरे । तेंवि प्राणांच्या स्वातंत्र्यें । क्रिया न स्फुरे अनीशत्वें ॥ ५७ ॥ वातवेगें शुष्क पर्ण । नभीं विचरे अचेतन । तथापि स्वतंत्र जेंवि सुपर्ण । जें उभया जाण विसदृशत्व ॥ ५८ ॥ तेंवि प्रेरणा ईश्वराची ॥ सूत्रता गति मात्र प्राणांची । विसदृशता उभयां साची । ऐक्यें उभयाची गति दिसतां ॥ ५९ ॥ अथवा एकलें एक गगन । जें ब्रह्माचें उदाहरण । खं ब्रह्म खं पुराण । श्रुतिप्रमाण उपपत्ति ॥ ६० ॥ तैसा नव्हे प्राणादिवर्ग । वैसादृश्यें वर्तनमार्ग । दोघदोघांचा प्रसंग । ऐक साङ्ग निरूपितों ॥ ६१ ॥ व्यान व्यापक सर्वशरीरीं । साक्षी उदास गगनापरी । निर्विकारी निर्व्यापारी । असे निर्धारी परिपूर्ण ॥ ६२ ॥ समान वर्ते नाभिदेशीं । ग्रंथि ऐसें म्हणती ज्यासी । वैसादृश्य या उभयासी । चळाचळत्वें कळलें कीं ॥ ६३ ॥ उदान देदीप्य राहे कंठीं । अन्नपानादिकां जो घोटी । तैजसयोगें स्वप्नसृष्टी । विविधा प्रकटी काल्पनिका ॥ ६४ ॥ विलक्षण पूर्व उभयाहून । तिसरा हृदयीं वसे प्राण । नासावदनें ऊर्ध्वगमन । स्थूला चेष्टन ज्याचेनी ॥ ६५ ॥ तोही विलक्षण उदानेंसीं । तेंवि अपान पायुनिवासी । अधोमार्गें करी क्षरणासी । एवं सर्वांसि विसदृशता ॥ ६६ ॥ एवं चेता अचेता विखीं । कीं परस्परें प्राणादिकीं । विसदृशता तुज ठाउकी । जाहली कीं ना या उपरी ॥ ६७ ॥ हा इतिहास पूर्वींच कथिला । जें प्राणादि अशेष कारणांला । प्रभूनें निर्मूनि योजिता जाहला । ब्रह्मांडसृजनीं स्वातंत्र्यें ॥ ६८ ॥ तंव त्यां अंगीं स्वतंत्रशक्ती । नाहीं आयतन सृजनाप्रती । सृजूं न शकवे हें जाणोनि पुढती । प्रभु त्या द्योती स्वसत्ता ॥ ६९ ॥ स्वसत्ता प्रभुशक्तिद्योतन । कोणा आंगीं शक्ति कोण । करिता जाला तें व्याख्यान । श्लोकपंचकें अवधारा ॥ ७० ॥

कान्तिस्तेजः प्रभा सत्ता चन्द्राग्न्यर्कर्क्षविद्युताम् । यत्स्थैर्य भूभृतां भूमेर्वृत्तिर्गन्धोऽर्थतो भवान् ॥ ७ ॥

कांतिरूपा प्रभूची शक्ती । चंद्राआंगीं विलसे पुरती । तेजोमयी अग्नीप्रती । प्रभा गभस्ती माजि असे ॥ ७१ ॥ अमळ सत्ता तारांगणीं । स्फुरणरूपा सौदामनी । प्रभूची धारण्यशक्ति धरणी । माजी आधेयां आधार ॥ ७२ ॥ पुण्योगंधः पृथिव्यांच । भूतां धरी गामाविश्य च । जीवनावर्तनाचा नड-नाच । हा शक्तिसंच प्रभूचा ॥ ७३ ॥ वास्तव सत्ता तुझी हे अवघी । अहाच भासे भूतां आंगीं । तेचि निरूपितों प्रसंगीं । अशेषलिंगीं अवधारीं ॥ ७४ ॥

तर्पणं प्राणनमपां देव त्वं ताश्च तद्रसः । ओजः सहो बलं चेष्टा गतिर्वायोस्तवेश्वर ॥ ८ ॥

अगा हे देवा द्योतनशीळा । तुझिया सत्ता श्रीगोपाळा । तर्पणतृप्तिजनकत्व जळा । जीवनकळा प्राणन जें ॥ ७५ ॥ तिथि वार भ योग करण । विष्णुमयचि अखिलजन । तोचि द्रवरूपें आपण । आपोनारायण प्रत्यक्ष ॥ ७६ ॥ तया आपांच्या ठायीं रस । तो तूं परमात्मा श्रीपरेश । रसोऽहमप्सु या वचनास । तूंचि वदलास स्मृतिरूप ॥ ७७ ॥ आणि वायूची पंचधा गती । त्या पृथक्त्वें पांच ही

शक्ती । प्राणांआंगीं ज्या प्रकट दिसती । तिया निश्चिती तव सत्ता ॥ ७८ ॥ जठराग्नीचें उद्बोधंन । चतुर्विध अन्नमात्रांचें पचन । आप्यायक जे तनुगोगण । तुझी ते जाण प्राणशक्ति ॥ ७९ ॥ अंतःकरणपंचकातें । महजानंद जिचेन वर्ते । ते सहोशक्ति व्यानवायूतें । तुझिये निरुतें श्रुतिगदित ॥ ८० ॥ ज्ञानकरणां विषयप्रवृत्ती । ते उदानीं वर्ते तैजसशक्ती । ओज ऐसें तयेतें म्हणती । तुझीच निश्चिती ते अवघी ॥ ८१ ॥ कर्मेंद्रियांची चळवळ । जेणें सावयव टवटवी स्थूळ । तये शक्ती नाम बळ । ते समानीं चळवळ तव सत्ता ॥ ८२ ॥ प्राणें पचाविलें अन्नोदक । नवद्वारें त्या क्षरणात्मक । शक्ति वर्ते जे गतिनामक । तुझीच सम्यक ते अवघी ॥ ८३ ॥ भो ईश्वरा याही वरी । इये ब्रह्माण्डभाण्डोदरीं । तुझ्या शक्ति सविस्तरी । कोणे परी त्या ऐक ॥ ८४ ॥

दिशां त्वमवकाशोऽसि दिशः खं स्फोट आश्रयः । नादो वर्णस्त्वमोङ्कार आकृतीनां पृथक्कृतिः ॥ ९ ॥

महदाकाश स्वयंभ एक । उपाधिवशें दिशांचा दशक । प्राक्प्रत्यगादिनामें पृथक । तो अवकाश मुख्य तूंचि स्वयें ॥ ८५ ॥ स्थाणु अथवा महामेरु । उपाधिरूप दृग्गोचरु । प्राक्प्रत्यद्दक्षिणोत्तरु । तो दिग्विस्तार तूंचि पैं ॥ ८६ ॥ सर्वव्यापक जें आकाश । तदाश्रय तूं हृषीकेश । शब्दतन्मात्र स्फोटविशेष । परा अवस्था जे वाणी ॥ ८७ ॥ तेचि पश्यंती नादरूपें । घुमघुमी अनाहतस्वरूपें । अउमकार अस्पष्ट जल्पें । मध्यमा उपांशु ॐकार ॥ ८८ ॥ पुढें प्रणवाची प्रसृती । स्पर्श उष्माण उपध्माती । नामभेदें पृथक्कृती । पदार्थमात्रचि व्यवहारीं ॥ ८९ ॥ घटपटशकटां भिन्ननामीं । तालुओष्ठपुटोद्यमीं । व्यवहारपटुता सर्वकर्मीं । वैखरीवाणी ते म्हणिजे ॥ ९० ॥

इन्द्रियं त्विन्द्रियाणां त्व देवाश्च तदनुग्रहः । अवबोधो भवान्बुद्धेर्जीवस्यानुस्मृतिः सती ॥ १० ॥

तन्मात्रांचीं पृथग्ज्ञानें । इंद्रियद्वारा भासती भिन्नें । ती ज्या प्रकाशती चैतन्यें । ते चिच्छक्ति म्हणणें तुजलागीं ॥ ९१ ॥ इंद्रियाधिष्ठात्री देवता । विष्णु चंद्रमा आणि विधाता । नारायणादि गौरीभर्ता । तो तूं तत्वता देवगण ॥ ९२ ॥ श्रवणवागादिकांचे ठायीं । ज्ञानकर्मकरणीं पाहीं । दिगग्निप्रमुखदेवतानिचयीं । तुजवीण नाहीं द्योतकता ॥ ९३ ॥ त्या देवांच्या ठायीं तुझा । अनुग्रह हाची गरुडध्वजा । सर्व शक्तीच्या समाजा । उद्बोधक तूं स्वसत्ता ॥ ९४ ॥ तेज यदादित्यगत । चंद्रामाजि ज्योत्स्नामृत । पचनपटुतर अग्नीआंत । शक्तिसामर्थ्य सर्व तुझें ॥ ९५ ॥ अनुग्रहरूपें इत्यादि शक्ती । भूतां भौतिकां वर्तावितीं । देवानुग्रह त्या म्हणिजती । परि तूं निश्चिती त्या अवघ्या ॥ ९६ ॥ श्रोतीं जाणिजे विशेष जल्प । किमर्थ अल्प जाणीतल्या ॥ ९७ ॥ चेष्टा ज्ञानकर्मकरणें । बाह्येंद्रियें त्यांतें म्हणणें । भांबावती विषयस्फुरणें । अंतःकरणें आंतुलिया ॥ ९८ ॥ जें कां बुद्धीचें बोद्धव्य । तो अवबोध तूं वासुदेव । तव प्रकाशें निश्चय सर्व । करी स्वयमेव जे शक्ति ॥ ९९ ॥ जे कां जीवाची अनुस्मृति । बुद्धिनिश्चया प्रतिपादिती । अनुसंधानीं चित्तवृत्ति । ते तूं निश्चिती जगदीशा ॥ १०० ॥

अतंःकरणें कां यां नांव । येथूनि प्रवृत्ति प्रकाशे सर्व । उपरमयोगें निवृत्ति जीव । पावती स्वयमेव हृषीकेशा ॥ १ ॥ देहतादात्म्यें अहंता बाणे । प्रवृत्तीचें तैं बैसे ठाणें । जीव अवलंबी बाह्यकरणें । विषयस्फुरणें भ्रमग्रस्त ॥ २ ॥ तोचि पावे जैं उपरति । तैं नाहं देह ऐशिया मति । ब्रह्माहमस्मि हे सत्स्मृति । लाहे निवृत्ति या करणीं ॥ ३ ॥ अंतःकरणें बाह्यकरणें । जियें प्रकाशलीं ज्या ज्या गुणें । तियें कथितों तुजकारणें । क्षणैक श्रवणें अवधारीं ॥ ४ ॥

भूतानामसि भूतादिरिन्द्रियाणां च तैजसः । वैकारिको विकल्पानां प्रधानमनुशायिनाम् ॥ ११ ॥

द्रव्यशक्तीच्या सहकारें । तमोगुण अव्याकृति स्फुरे । तो चेतवे तामसाहंकारें । भूतें तन्मात्रें उत्पादी ॥ ५ ॥ यास्तव भूतादि म्हणणें तूतें । रुद्रात्मकत्वें वर्तसी तेथें । तमःप्राचुर्यें जडता यातें । अष्टधा रुयातें तूंचि तूं ॥ ६ ॥ तमःप्राचुर्यें यांच्या ठायीं । वैशिष्ट्यकार्यपटुता नाहीं । क्रियायोगें रजःप्रवाहीं । तैजस गोगणीं तोही तूं ॥ ७ ॥ क्रियाज्ञानचेष्टाकरणें । जियें प्रकटलीं रजोगुणें । तो राजस अहंकार तुजविणें । कोणा म्हणणें जगदीशा ॥ ८ ॥ परि या स्वतंत्रता नाहीं । म्हणोनी प्रेरकें यांच्या ठायीं । विविधें कल्पिलीं तूंचि तियें हीं । विकल्पनारुयें कर्तृकरणें ॥ ९ ॥ ज्ञानशक्तीच्या सहकारें । महत्तत्वीं जो सात्विक स्फुरे । तो वैकारिक अहंकार धुरे । सर्वां स्वातंत्र्यें प्रेरक जो ॥ ११० ॥ ज्ञान-प्राचुय प्रेरकता । रजःप्राचुर्यें उपकरणता । तमःप्राचुर्यें भ्रामक जडता । स्फुरे तत्वता गोगणत्वें ॥ ११ ॥ एकली एक मृतिका स्पष्ट । तयेचा निर्मिला न वचे मठ । मृत्पिंडलेपनें कर्दमाविष्ट । उभारे चोखट त्रैविध्यें ॥ १२ ॥ विकल्पनारुयें किमर्थ म्हणणें । तें अवधारा सावध श्रवणें । अध्यात्माधिभूताधि-दैवगुणें । विकल्पें होणें म्हणोनियां ॥ १३ ॥ जळें मृत्तिका कालवली । तैसी ज्ञानशक्ति सत्वीं स्फुरली । उभययोगें रूपा आली । त्रिविधविकल्पा विकल्पना ॥ १४ ॥ अध्यात्माधिभूताधिदैव । येणें संवेद सर्वी सर्व । अवलंबूनि विषयानुभव । लाहे जीव स्थूळपणें ॥ १५ ॥ एवं संवेदनाशक्ती । त्रिधा विकल्पें पावे व्यक्ती । ते वैकारिकता विकारवती । तूंचि श्रीपती निर्धारें ॥ १६ ॥ हा करणांचा कारणनिचय । तूंचि अवघा जरी गुणमय । आणि जीवांचा समुदाय । अविद्यावरणीं प्रसुप्त जो ॥ १७ ॥ जीव ब्रह्मेंशीं अभिन्न । जेणें पावती संसरण । प्रधान तयाचें कारण । तो तूं भगवान् भवहंता ॥ १८ ॥

नश्वरेष्विह भावेषु तदसि त्वमनश्वरम् । यथा द्रव्यविकारेषु द्रव्यमात्रं निरूपितम् ॥ १२ ॥

आणि हे चिज्जडात्मकसृष्टी । जीवासी गोचर इंद्रियदृष्टी । तियें नश्वरें पाठीं पोटीं । अनश्वर तूं द्रव्यवत् ॥ १९ ॥ द्रव्य म्हणिजे मृत्तिका मात्र । कारणरूपें वर्ते अनश्वर । तियेच्या ठायीं मृद्विकार । भासती नश्वर कार्यरूप ॥ १२० ॥ घटकुड्यालयें लक्षकोटी । नामरूपात्मकें भासती सृष्टी । तियें नाश पावल्या पाठीं । जोंवि मृत्तिका शेवटीं अनश्वर ॥ २१ ॥ तये मृत्तिकेमाजि पाहतां । नामरूपाची न दिसे वार्ता । लक्ष चौऱ्यायसीं योनि जातां । तैसी तत्वता घडमोडी ॥ २२ ॥ कटक कुंडलें मुद्रिका

कनकीं । नामरूपें कार्यात्मकीं । नश्वरें नाश पावल्या शेखीं । वास्तव कनकीं अनश्वरता ॥ २३ ॥ कनक आटूनि केली खोटी । तैं कटकांगुलीयादि कार्यकोटी । त्यांमाजि एक ही न दिसे दृष्टी । अनश्वर शेवटीं हेम उरे ॥ २४ ॥ त्रिगुणात्मक कार्यरूप ही तूंची । ऐसी बोलिली गोष्टी साची । तरी मग अनश्वरता कैंची । तरी उक्ति ये विखींची अवधारीं ॥ २५ ॥

सत्वं रजस्तम इति गुणास्तद्वृत्तयश्च याः । त्वय्यद्धा ब्रह्मणि परे कल्पिता योगमायया ॥ १३ ॥

तरी सत्वरजस्तमोगुणत्रया । यांच्या वृत्ति ज्या परिणाममया । त्मा तुज परब्रह्मींच कल्पिलिया । योगमायेनें जगदीशा ॥ २६ ॥ परब्रह्मींचिया प्रकल्पिता । उदय पावती चिन्मय स्फुरतां । अहंकार-महत्तत्व अव्यक्ता । पर्यंत परिणाममय अवघ्या ॥ २७ ॥ त्या परब्रह्मींच तुझ्या ठायीं । योगमायेनें कल्पिल्या पाहीं । यालागीं तुजवीण आन नाहीं । अद्धा निश्चयीं अद्वय तूं ॥ २८ ॥

तस्मान्न सन्त्यमी भावा यर्हि त्वयि विकल्पिताः । त्वं चामीषु विकारेषु ह्यन्वयाव्यावहारिकः ॥ १४ ॥

तस्मात् हे अवधेचि भाव । तुजमाजि वसती हा निर्वाह । नसतां आस्तिक्यानुभव । कोंवि सदैव प्रत्यय हा ॥ २९ ॥ तरी जेव्हां कल्पिले तुझ्या ठायीं । सत्तायोगबळें करोनि पाहीं । सन्मात्रप्रतीति यांच्या ठायीं । उमटे निश्चयीं तव योगें ॥ १३० ॥ येऱ्हवीं हें अव्यावहारिक । तवानलोकें व्यावहारिक । जेंवि राजसत्ता लाहूनि रंक । समस्तलोक स्वयें शिक्षी ॥ ३१ ॥ तुझ्या ठायीं यांचें असणें । तव चैतन्यें सन्मयपणें । तुझे ठायीं यांचें असणें । अव्यवहारीं उपादानवत् ॥३२॥ घटमठवर्जित जैसें गगन । कीं नग न घडितां जेंवि सुवर्ण । तेंवि अव्यवहारीं उदासीन । अवशिष्यमाण तूंचि स्वयें ॥३३॥ ऐसा अखंडदंडायमान । स्वसंवेद्य सनातन । तेथ गुणप्रवाह भ्रमकारण । मायिक जाण सांसृतिक ॥ ३४ ॥ स्थितिलयोत्पत्तिमात्र अवघी । भासे गुणप्रवाहओघीं । तेथ आकाशमात्रेची झगमगी । भूतविभागीं गोचर जे ॥ ३५ ॥ या नांव म्हणिजे गुणप्रवाह । विसरवी स्वसंवेद्यता वास्तव । विसरास्तव ते भेदभाव । चिदंश जीव भ्रमभूत ॥ ३६ ॥ वास्तव विसरा नाम अज्ञान । तदाविष्करण तें निबंधन । तेणेंचि पावती संसरण । चैतन्यघन होत्साते ॥ ३७ ॥ कैसें संसरण जरी तूं म्हणसी । तरी तें ऐकें हृषीकेशी । मुनिकृपेनें मम मानसी । निश्चयेंसीं प्रत्यय जो ॥ ३८ ॥

गुणप्रवाह एतस्मिन्नबुधास्त्वखिलात्मनः । गतिं सूक्ष्मामबोधेन संसरन्तीह कर्मभिः ॥ १५ ॥

ऐसिया भवभ्रमाचे ठायीं । अबुधजीव गुणप्रवाहीं । सूक्ष्मगति नेणती कांहीं । अखिलात्मकता आत्मयाची ॥ ३९ ॥ अंतःकरणींचा चित्प्रकाश । तद्द्वा उजळली हृषीकांस । करणबोधें विषयाभास । गमे जीवास सत्यत्वें ॥ १४० ॥ तेणें स्थूलावच्छिन्नबोध । वास्तव वयुना करी रोध । देहात्मकत्वें कर्मे विशद । आचरे प्रसिद्ध फळलाभा ॥ ४१ ॥ अनिष्ट इष्ट मिश्र फळें । भोगी स्वकृतकर्मबळें । अखिला-

त्मयाची गति आंधळे । नेणे म्हणोनि हे दशा ॥ ४२ ॥ कर्मफळभोगाकारणें । लक्ष चौऱ्यांयशी योनि फिरणें । अखिलात्मगतीच्या विस्मरणें । जीवां संसरणें तें ऐसें ॥ ४३ ॥ ऐसा भवभ्रमा वरपडोनी । कर्मे भ्रमतां अनेक योनी । नरदेह लाहे यथेच्छें करूनी । अघटित म्हणोनी दुर्लभ जें ॥ ४४ ॥

यदृच्छया नृतां प्राप्य सुकल्पामिह दुर्लभाम् । स्वार्थे प्रमत्तस्य वयो गतं त्वन्मायायेश्वर ॥ १६ ॥

जैं शुभाशुभकर्मा समता । तैं नरदेह लाहे तत्वता । येऱ्हवीं चौऱ्यांयशी लक्ष भ्रमतां । विवेकाहेता दुर्लभ पैं ॥ ४५ ॥ विवेकोदया नरदेह मात्र । अपरा योनि कर्मतंत्र । होती कर्मफळाचें पात्र । प्रारब्धसूत्रपतनान्त ॥ ४६ ॥ ऐसा दुर्लभ मनुष्यदेह । लाधल्या वय वेंचे अहरह । मूढ रुग्ण कां व्यंग होय । तरी मग काय लाभोनी ॥ ४७ ॥ तेथ ही दैवें अवयवपटुता । इंद्रियपाटव अनामयता । असोनिही नर न करी स्वहिता । हे तत्वता तव माया ॥ ४८ ॥ दुर्लभ ऐसा नरदेह प्राप्त । विषयीं भुलोनी न करी स्वहित । तयाची वयसा गेली व्यर्थ । तव मायेनें भुलविलिया ॥ ४९ ॥ भो ईश्वरा तुझी माया । कैसी समर्थ भुलवावया । जाणत जाण नेणतिया । माजि बुडवी भवभ्रान्ति ॥ १५० ॥ म्हणसी आश्चर्य येवढें काय । जाणोनि प्रमत्त कोणा न्यायें । तरी बहुधा पाशीं तां बांधिलों आहें । यास्तव न लाहें उमजातें ॥ ५१ ॥ कैसे कोणते पाश म्हणसी । अल्प कथितों ते तुजपासीं । जगज्जगदात्मा तूंचि होसी । परि नेणसी बद्धातें ॥ ५२ ॥

असावहं ममैवैते देहे चास्याध्वयादिषु । स्नेहपाशैर्निबध्नानि भवान्सर्वमिदं जगत् ॥ १७ ॥

हा देह मी ऐसी देहीं । तादात्म्याहंता स्फुरे पाहीं । देहाचिये अन्वयविषयीं । ममता स्फुरे स्नेहभरें ॥ ५३ ॥ मी देह म्हणोनी अहंता वेठे । तदभिमानें बांधला खुंटें । तेथ लागलीं जियें चऱ्हाटें । श्रवणपुटें तीं ऐका ॥ ५४ ॥ मी कुळशीळवंत सुकृती । अपर अकुळी दुःशीळदुष्कृती । इत्यादि विद्या वयसा जाती । देहाहंमती दृढावी ॥ ५५ ॥ ऐसा देहीं निबद्ध होय । मग सुखदुःखाचे सोसी घाय । ममतास्नेहपाशांची सोय । कैसी काय ते कथितों ॥ ५६ ॥ माझी वृत्ति माझी भूमी । दास दासी माझिये धामीं । कन्यापुत्र कलत्र नामीं । स्नेहपाशें हे जाणावे ॥ ५७ ॥ माझे आप्तस्वजनसुहृद । माझे हय गज रथ गोवृंद । स्वार्थ रोधूनि देती खेद । शत्रु विशद ते माझे ॥५८॥ ब्रह्माहमस्मि अद्वयबोध । देहतादात्म्य अहंममभेद । पाश होवोनी वोपी खेद । अनेकविध भासोनी ॥ ५९ ॥ मी माझें हा भेद मुळींचा । तूं तुझें हा पर्याय त्याचा । हा याचें हें म्हणतां वाचा । होय भेदाचा विस्तार ॥ १६० ॥ तेणें गालिप्रदान केलें । प्रतिकारीं म्यां फडसाविलें । तें बीज कलहरूपें फळलें । भोगणें पडलें चीथूचें ॥ ६१ ॥ स्नेह स्नेहें द्वेषें द्वेष । सुहृदीं आप्तीं तोष रोष । ऐसे बांधिती भवभ्रमपाश । चित्सुखास विसरविती ॥ ६२ ॥ ऐसिया परि अवघें जग । पाशनिबद्ध गुंतलें साङ्ग । येऱ्हवीं जगदात्मा तूं अभंग । नित्य निःसंग भगवान् ॥ ६३ ॥ जरी तूं आश्चर्यें म्हणसी हरी । तव पुत्र आम्ही राममुरारी । ईश्वरत्व आमुचे

शिरीं । कवणे परी आरोपिसी ॥ ६४ ॥ तरी तूं ऐकें इये विशीं । स्वमुखें वदलासि आम्हांपासीं । तैं तव वाणीच तुजपासीं । निःश्रयेसीं मी कथितों ॥ ६५ ॥

युवां न नः सुतौ साक्षात्प्रधानपुरुषेश्वरौ । भूभारक्षत्रक्षपण अवतीर्णौ तथात्थ ह ॥ १८ ॥

तुम्ही आमुचे पुत्र नोहां । ऐसा प्रत्यय माझिया जीवा । साक्षात्प्रधानपुरुषां देवां । पासूनि श्रेष्ठ ईश्वरेश्वर ॥ ६६ ॥ येथ मानुषी अवगणी । धरूनिं क्रीडतां माझिये सदनीं । जें भूभारक्षत्रियांच्या क्षपणीं । धर्मस्थापनीं अवतरलां ॥ ६७ ॥ म्हणसी तुज हें कोठोनि कळलें । तरी हें तुवांचि साकल्य कथिलें । तेंही जाईल निरूपिलें । प्रस्तुत प्रार्थिलें तें ऐका ॥ ६८ ॥

तत्ते गतोऽस्म्यरणमद्य पदारविन्दमापन्नसंसृतिभयापहमार्त्तबंन्धो ।
एतावतालमलमिद्रियलालसेन मर्त्यात्मदृक्त्वयि परे यदपत्यबुद्धिः ॥ १९ ॥

तुम्ही नव्हां पैं माझे कुमर । प्रधानपुरुष ईश्वर । उतरावया धराभार । क्षत्रिय अघोर मारूनियां ॥ ६९ ॥ अवतरलेति माझिये सदनीं । म्हणोनि शरण मी तुमच्या चरणीं । बिरुदावळी वेद वाखाणी । तें ऐकोनि श्रवणीं दृढ जालों ॥ १७० ॥ चरणां शरण जे जे आले । ते संसृतिभया वेगळे केले । यास्तव म्यांही दृढतर धरिले । निजार्तिहरणा लागूनी ॥ ७१ ॥ दुःखितांचें दुःखनिरसन । करिसी म्हणोनि तुजलागून । आर्तबंधु हें संबोधन । शुक भगवान स्वयें वदला ॥ ७२ ॥ यदर्थीं म्हणसी जरी भगवंता । मी दुःखिताचा दुःखहर्ता । परी तुजलागीं तों दुःखवार्ता । नसतां वृथा कां शिणसी ॥ ७३ ॥ तरी ऐकें गा चक्रपाणी । इंद्रियलाम्पट्यें करूनी । मनुष्यदेह आत्मपणीं । स्पष्ट मानूनी चेष्टतसें ॥ ७४ ॥ आणि तूं परात्पर ईश्वरेश्वर । हें गुह्य बोलिलासी साचार । त्या तुझ्या ठायीं आत्मकुमर । मानूनि अपत्यबुद्धि मज ॥ ७५ ॥ तुम्हां ईश्वरेश्वरां प्रती । अपत्य मानी माझी मती । यावरी पुरे आतां श्रीपती । इतुकें प्रार्थीं मी तुजला ॥ ७६ ॥ पाञ्चभौतिकीं आत्मबुद्धी । सुतधनकलत्र आत्मीयधी । अपत्यमति ईश्वरावधी । इंद्रियलंपटें म्यां केली ॥ ७७ ॥ ते येथूनि पुरे आतां । इतुकें प्रार्थितसें अनंता । तुझ्या उपदेशें तत्वता । तुझी ईश्वरता मज कळली ॥ ७८ ॥ जरी तूं म्हणसी श्रीमुरारी । कैं तुज वदली मम वैखरी । माझें ऐश्वर्य कवणे परी । तुज अंतरीं अवगमलें ॥ ७९ ॥ यदर्थीं ऐकें जगत्पती । सूतीगृहीं निज संभूती । दावूनिं बोधिली माझी मती । तें मम चित्तीं स्मरत असे ॥१८०॥

सूतीगृहे ननु जगाद भवानजो नौ सञ्जज्ञ इत्यनुयुगं निजधर्मगुप्त्यै ।
नानातनूर्गगनवद्विदधज्जहासि को वेद भूम्न उरुगाय निभूविमायाम् ॥ २० ॥

पूर्वीं सूतीगृहाच्या ठायीं । प्रतियुगीं मी होतसें देही । धर्मरक्षणालागीं पाहीं । ऐसी नवाई वदलासी ॥ ८१ ॥ मी निःसंग जन्मरहित । तुमच्या ठायीं प्रतियुगीं मूर्त । अवतरलों हे वदलासि

मात । तैं कैं असत्य हों शके ॥ ८२ ॥ आमुच्याचि ठायीं युगीं युगीं कैसा । म्हणसी तरी तूंचि परेशा । स्वयें वदलासी जगदीशा । ते परिभाषा अवधारीं ॥ ८३ ॥ अनुयुगं म्हणिजे युगयुगाप्रती । तुम्ही सप्रेम दंपती । सुतपानाम तूं प्रजापती । पृश्नि निश्चित देवकी हे ॥ ८४ ॥ तैं मी पृश्निगर्भनामा । तुमच्या ठायीं लाहोनि जन्मा । निजजनकत्व दिधलें तुम्हां । स्वयें अजन्मा होत्साता ॥ ८५ ॥ त्यानंतर कश्यप अदिती । तुम्हींच दोघें पूर्वदंपती । तुमच्या ठायीं वामनमूर्ती । मी श्रीपती स्वयें जालों ॥ ८६ ॥ आतां तियेंच दंपती तुम्ही । वसुदेवदेवकी ऐसिया नामीं । मी हाचि जगत्कल्याणकामी । तुमच्या सद्मीं अवतरलों ॥ ८७ ॥ ऐसें वदलासि सूतिकालयीं । तें स्मरतसे माझ्या हृदयीं । झणें तूं म्हणसी तो शेषशायी । होतसे देही चतुर्भुज ॥ ८८ ॥ तरी हा निश्चय नाहीं हरी । तूं निःसंग गगनापरी । सुरकार्यार्थ नानापरी । बहुधा शरीरीं नट धरिसी ॥ ८९ ॥ नभ निःसंग जेंवि निर्लेप । घट मठ नटनार्थ्यें अमूप । धरूनि सांडी निर्विकल्प । तव तनुजल्प तैसाची ॥ १९० ॥ भूमन् म्हणिजे सर्वगत । उरुगाय अमळशय विस्तृत । दोंहीं संबोधनीं अनंत । वसुदेव तेथ संबोधी ॥ ९१ ॥ अमळकीर्ति जनार्दना । भो भगवंता अपरिच्छिन्ना । मायाविभूतिरूपें नाना । तुझीं हीं कोणा जाणवती ॥ ९२ ॥ शुक म्हणे गा परीक्षिति । स्वयें वसुदेव वृष्णिपति । बोलिला तें जगत्पति । परिसोनि वदला तें ऐक ॥ ९३ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ आकर्ण्येत्थं पितुर्वाक्यं भगवान्सात्वतर्षभः ।
प्रत्याह प्रश्रयानम्रः प्रहसन्श्लक्ष्णया गिरा ॥ २१ ॥

इत्थं म्हणिजे साद्यंतवरी । ऐकोनि पितयाची वैखरी । सात्वतर्षभ जो भगवान् हरी । मधुरोत्तरीं दे प्रतिवचन ॥ ९४ ॥ समर्याद नम्रपणें । हास्य करूनि प्रसन्नवदनें । बोलता जाला सुललितवचनें । सावधपणें तियें परिसा ॥ ९५ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥ वचो वः समवेतार्थं तातैतदुपमन्महे ।
यन्नः पुत्रान्समुद्दिश्य तत्त्वग्राम उदाहृतः ॥ २२ ॥

भगवान् म्हणे जनकाप्रती । तुमचें वाक्य यथार्थरीती । बोलिलां प्रतिपाद्य जें वेदान्तीं । तें मी श्रीपती सम्मानीं ॥ ९६ ॥ तें वाक्य म्हणाल कैसें कोण । आम्हां पुत्रांतें विषयी करून । बोलिला तत्वसमूह संपूर्ण । तत्वशोधन जें म्हणिजे ॥ ९७ ॥ अहंता ममता मायाभ्रांति । तत्वविचारें येचि रीती । निरसावी हें जनकाप्रती । सांगे श्रीपती तें ऐका ॥ ९८ ॥

अहं यूयमसावार्य इमे च द्वारकौकसः । सर्वेऽप्येवं यदुश्रेष्ठ विमृश्याः सचराचरम् ॥ २३ ॥

भो यदुश्रेष्ठा मम जनका । जैसी निरसनि पुत्रत्वशंका । करूनि तत्वाच्या व्यतिरेका । वास्तव

वारिलें ॥ ९९ ॥ तैसीच आतांही शिकवण । अहं वसुदेव आपण । यूयं म्हणिजे तुम्ही स्वजन । आर्य हा जाण बळराम ॥ २०० ॥ आणि हे द्वारकानिवासी सकळ । अष्टादशधा यादवकुळ । ब्रह्मावबोधेंचि प्राञ्जळ । शोधिजे केवळ भ्रमरहित ॥ १ ॥ द्वारकानिवासी मात्र म्हणसी । तरी ब्रह्मबोधेंचि चराचरांसी । जाणिजे अखिल ब्रह्माण्डासी । निश्चयेंसीं वृष्णीशा ॥ २ ॥ जरी तूं म्हणसी भो मम जनका । विकारवंता गौणा मायिकां । ब्रह्मत्वबोधीं उपजे शंका । तरी या विवेका अवधारीं ॥ ३ ॥

आत्मा ह्येकः स्वयं ज्योतिर्नित्योऽन्यो निर्गुणो गुणैः । आत्मसृष्टैस्तत्कृतेषु भूतेषु बहुधेयते ॥ २४ ॥

खं वायुर्ज्योतिरापो भूस्तत्कृतेषु यथाशयम् । आविस्तिरोऽल्पभूर्येको नानात्वं यात्यसावपि ॥ २५ ॥

सदृष्टान्त श्लोकद्वयें । कथितों तें तूं यथान्वयें । जेंसै प्रतीतिगोचर होये । ऐकें तैशिये सादर तें ॥ ४ ॥ आकाश वायु ज्योति सलिल । भूमी सहित हा महाभूतमेळ । तिहीं केला जो कार्यरोळ । त्यामाजी केवळ वर्ततो तियें ॥ ५ ॥ कुड्य मेडक वप्रें सदनें । भूकृतकार्यें थोरें लहानें । होती जाती तदनुकरणें । अविकारपणें भू तेथें ॥ ६ ॥ कीं नानाबीजां बीज जीवन । विरूढे कार्यरूपें आपण । परी त्यामाजि वास्तव रसाळपण । वर्ते अभिन्न होत्सातें ॥ ७ ॥ तैसेंचि तेज बहुधापणीं । स्थावरीं जंगमीं कां इन्धनीं । अभिन्न असतां भिन्नपणीं । दिसे न होनी बाहुल्यें ॥ ८ ॥ नभ नभस्वान् याचि परी । बहुधा न होनी बहुविकारी । भासती स्वकृतकार्यानुसारीं । तियाचि परी आत्मा ही ॥ ९ ॥ आत्मा निर्गुण गुणातीत । आत्मसृष्टगुणीं तेथ । देहादि गौणीं आविर्भवत । बहुधा गमत अद्वय जो ॥२१०॥ गौणा अनेक जिया उपाधी । तैसाचि भासे तो निरुपाधी । अनेकगुणकार्यप्रभेदीं । होणें जाणें स्वयें दावी ॥ ११ ॥ यथाशय म्हणिजे उपाधिरूप । स्वयें भासोनि निर्विकल्प । वास्तव अमळ नित्य निर्लेप । प्राकृत विकल्प जल्पतां ही ॥ १२ ॥ गुणीं वर्तोनि गुणातीत । सहेतुपदीं प्रतिपादित । श्रोतीं तेथ ठेवूनि चित्त । चिज्जडपदार्थ शोधावा ॥ १३ ॥ स्वयें असोनि एकला एक । बहु दर्पणें करितां सम्मुख । त्यां माजि दर्पे पृथक्पृथक । न होनि अनेक देहधारी ॥ १४ ॥ आत्मादेहातीत सहज । अनेक देहीं उपाधिभोज । नाचे नटोनि अचोज चोज । प्रकृतिकाज प्रकटोनी ॥ १५ ॥ आत्मा केवळ स्वयंज्योती । दृश्यीं दृश्यपणें ये व्यक्ती । करणगोचर भौतिकीं भूतीं । असोनि निश्चिती अगोचर ॥ १६ ॥ नित्य असोनि अनित्यापरी । अनित्यीं अनित्यत्व स्वीकारी । अन्य असोनि जडविकारी । अनन्यत्वा प्रकाशी ॥ १७ ॥ निर्गुण नटे सगुणपणें । इत्यादि बाहुल्य उपाधिगुणें । श्रीधरस्वामींच्या व्याख्यानें । वाखाणिलें हरिवरदें ॥ १८ ॥

श्रीशुक उवाच ॥ एवं भगवता राजन्वसुदेव उदाहृतः । श्रुत्वा विनष्टनानाधीस्तूष्णीं प्रीतमना अभूत् ॥२६॥

राजन् ऐसें संबोधून । जें प्रायोपशयनीं ही राजमान । मोह ममता न धरी मन । यास्तव भगवान् शुक बोधी ॥ १९ ॥ म्हणे भो राया कुरुसत्तमेरु । ऐसा भगवंतें विचारु । कथिला ऐकोनि तो सादरु ।

वसुदेव सत्वर भ्रम सांडी ॥ २२० ॥ विवर्तजनित जे नाना धी । ते निरसली एवंबोधीं । अनेकत्वाची विनष्ट धी । राहे त्रिशुद्धी मौनस्थ ॥ २१ ॥ अकारमात्रेचें अधिष्ठान । संकल्पविकल्पात्मक जें मन । होऊनि ठेलें तें उन्मन । जाहला प्रीतमन यास्तव तो ॥ २२ ॥ पूर्णाबबोधें मन तटस्थ । सहजेंचि गोगण ठेला स्तिमित । यास्तव वसुदेव तूष्णींभूत । श्रोतीं संकेत जाणावा ॥ २३ ॥ वसुदेव विसरला देहभान । ब्रह्मावबोधीं विरालें मन । यावरी देवकी तेथ येऊन । प्रार्थी आपण तें ऐका ॥ २४ ॥

अथ तत्र कुरुश्रेष्ठ देवकी सर्वदेवता । श्रुत्वानीतं गुरोः पुत्रमात्मजाभ्या सुविस्मिता ॥ २७ ॥

कुरुवरश्रेष्ठा अभिमन्युतनया । यावरी देवकी तिया ठायां । आत्मजकृता परमाश्चर्या । ऐकोनि विस्मया पावली जे ॥ २५ ॥ सर्व देवता जियेच्या ठायीं । अंशरूपें वर्तती पाहीं । भगवन्मायेच्या प्रवाहीं । जाली तेही विमोहित ॥ २६ ॥ रामकृष्णां पुत्रीं दोघीं । मृत गुरुपुत्र स्वमायायोगीं । आणिला ऐसें ऐकोनि वेगीं । विस्मय आंगीं बहु भरला ॥ २७ ॥ तेथ म्हणिजे स्वपुत्रां निकटीं । येऊनि त्यांतें प्रियतम गोठी । ऐकवी घालूनि श्रवणपुटीं । तदुक्ति मन्हाठी अवधारा ॥ २८ ॥

रामकृष्णौ समाश्राव्य पुत्रान्कंसविहिंसितान् । स्मरन्ती कृपणं प्राह वैक्लव्यादश्रुलोचना ॥ २८ ॥

रामकृष्णांतें ऐकवणें । करूनि मृतपुत्रां कारणें । आठवूनियां अंतःकरणें । अश्रु लोचनें विसर्जी ॥ २९ ॥ कीर्तिमंतादि षट् पुत्रांतें । कंसहस्तें निमालियांतें । परमवैक्लव्य पावूनि चित्तें । स्मरत होत्साती काय वदे ॥ २३० ॥

॥ देवक्युवाच ॥ राम रामाप्रमेयात्मन्कृष्ण योगेश्वरेश्वर ।
वेदाहं वां विश्वसृजामीश्वरावादिपूरुषौ ॥ २९ ॥

भो संकर्षणा रामा । अप्रमेय तुझी महिमा । श्रीकृष्ण भो मेघश्यामा । योगेश्वरांच्या ईश्वरा ॥ ३१ ॥ मी जाणतें तुह्मांप्रती । विश्वसृष्टे जे प्रजापती । त्यांचे ईश्वर तुम्ही निश्चिती । प्रधानपुरुष प्रत्यक्ष ॥ ३२ ॥ मनुष्यनाट्यें किमर्थ नटलां । म्हणाल तरी या ऐका बोला । भूमाररूपां भूपतींला । वधावयाला अवतरलां ॥ ३३ ॥

कालविध्वस्तसत्त्वानां राज्ञामुच्छास्त्रवर्तिनाम् । भूमेर्भारायमाणानामवतीर्णौ किलाद्य मे ॥ ३० ॥

भो भो आद्या श्रीअच्युता । भूमाररूपां नृपां उत्पथां । विध्वस्तसत्वां कालग्रस्तां । नाशावयार्थ अवतरलां ॥ ३४ ॥ मे म्हणिजे माझ्या ठायीं । तुम्हीं अवतार धरूनिं पाहीं । भाररहित केली मही । चरित्र तेंही देखियलें ॥ ३५ ॥

यस्यांशांशांशभागेन विश्वोत्पत्तिलयोदयः । भवन्ति किल विश्वात्मंस्तं त्वाद्याहं गतिं गता ॥ ३१ ॥

अगा ये आद्या आदिपुरुषा । ज्याचिया अंशांशाचिया अंशा । विभागें सृजनास्थितिविनाशा । होती अपैशा गौण क्रिया ॥ ३६ ॥ यस्य म्हणिजे ज्या पुरुषाचा । माया अंश म्हणिजे साचा । माया अंश तो त्रिगुणांचा । समूह ऐसा जाणावा ॥ ३७ ॥ तेथ रजोगुणें सृष्टिक्रम । सत्वगुणें स्थितिसंभ्रम । तत्संहारीं प्रबळ तम । हे त्रिविध नेम त्रिगुणांचे ॥ ३८ ॥ ऐसे ज्यांचे अंशांशभाग । परमाणुरूप जे योगवियोग । सृष्टिस्थितिलयकर्मेंचांग । तो तूं अव्यंग आदिपुरुष ॥ ३९ ॥ अगा ये विश्वात्मका हरी । सृष्टिस्थितिलयगुणानुकारीं । कर्में होती तुजमाझारी । निश्चयात्मकें तव सत्ता ॥ २४० ॥ किल या निश्चयें ऐसिया तूतें । आजि शरण मी आलें निरुतें । जाणोनि अभय वोपीं मातें । मम विनतीतें अवधारीं ॥ ४१ ॥

चिरान्मृतसुतादाने गुरुणा किल चोदितौ । आनिन्यथुः पितृस्थानाद् गुरवे गुरुदक्षिणाम् ॥ ३२ ॥

काय विनति म्हणाल जरी । तरी गुरुपुत्र मेला चिरकाळवरी । त्या आणावयाची आज्ञा वैखरी । गुरूनें करितां तुम्हांप्रति ॥ ४२ ॥ तुम्ही ते आज्ञा वंदूनि माथां । चिरकाळ मेलिया गुरुसुता । यमसदनींहूनि तो त्वरिता । आणिते जालेती आश्चर्ये ॥४३॥ गुरुपुत्र आणोनि सवेग तुम्हीं । गुरुदक्षिणेच्या नियमीं । अर्पूनि तोषविला गुरुस्वामी । तैसीच पैं मी प्रार्थितसें ॥ ४४ ॥

तथा मे कुरुतं कामं युवां योगेश्वरेश्वरौ । भोजराजहृतान्पुत्रान्कामये द्रष्टुमाहृतान् ॥ ३३ ॥

तैसाच माझा मनोरथ । पूर्ण करावा तुम्हीं त्वरित । भोजराजें वधिले सुत । त्यातें येथ आणावें ॥ ४५ ॥ तुम्हीं आणिलिया मृतसुतांतें । देखों इच्छिजे माझेनि चित्तें । माझी प्रार्थना इतुकी तुम्हांतें । स्वसामर्थ्यें पुरवावी ॥ ४६ ॥ कंसें वधिले आम्हांपूर्वी । ते आणावे कोठूनि केंवी । ऐसी सहसा न वदा गोवी । तुम्ही गोसावीं ईशांचे ॥ ४७ ॥ ईश्वरांचे ईश्वर तुम्ही । हें जाणोनि मी हृदयपद्मीं । मृतपुत्रांच्या दर्शनकामीं । उत्सुक जालें आत्मज हो ॥ ४८ ॥

ऋषिरुवाच ॥ एवं सञ्चोदितौ मात्रा रामः कृष्णश्च भारत ।
सुतलं संविविशतुर्योगमायामुपाश्रितौ ॥ ३४ ॥

शुकमुनि म्हणे भारतेश्वरा । ऐसिया प्रकारें उभयकुमरां । प्रेरिती जाली वसुदेवदारा । जाणोनि ईश्वरां निजतनयां ॥ ४९ ॥ प्रेरिले होत्साते मातेनें । तयेचिया आज्ञावचनें । लंघिते जाले पाताळभुवनें । मनुष्यपणें जे नटले ॥ २५० ॥ रामकृष्ण दोघे जण । योगमाया अवलंबून । ठाकिते जाले बळीचें सदन । सुतळ अभिधान पैं ज्यातें ॥ ५१ ॥

तस्मिन्प्रविष्टावुपलभ्य दैत्यराड्विश्वात्मदैवं सुतरां तथात्मनः ।
तद्दर्शनाह्लादपरिप्लुताशयः सद्यः समुत्थाय ननाम सान्वयः ॥ ३५ ॥

अकस्मात ते सुतळभुवनीं । प्रविष्ट जाले बंधु दोनी । अवचित त्यांतें देखोनि नयनीं । दैत्येन्द्र मनीं हरिखेला ॥ ५२ ॥ आत्मत्वें जे विश्वदैवत । बरव्या प्रकारें स्वभुवनीं प्राप्त । तैसेचि आपुलें अंतरगत । उपास्यदैवत जाणोनि ॥ ५३ ॥ तयांच्या दर्शनाल्हादें करून । आनंदप्रचुरित अंतःकरण । तत्काळ उठिला आसनींहून । परिवारजन सह अवघा ॥ ५४ ॥ चरणांवरी ठेवूनि शिर । निवान्त पडिला दंडाकार । तैसाचि परिवारजन समग्र । करिती सादर दंडवतें ॥ ५५ ॥ दंडवता नंतर पाहीं । आळंगिती दोहीं बाहीं । दिव्यासनीं त्या लवलाहीं । प्रेमप्रवाहीं बैसविलें ॥ ५६ ॥

तयोः समानीय वरासनं मुदा निविष्टयोस्तत्र महात्मनोस्तयोः ।
दधार पदाववनिज्य तज्जलं सवृन्द आब्रह्म पुनद्यदम्बु ह ॥ ३६ ॥

हर्षेंकरूनि वरासनीं । सुखें उपविष्ट बंधु दोन्ही । तयांचे चरण तिये क्षणीं । प्रक्षाळणीं प्रवर्तला ॥ ५७ ॥ मानवी न म्हणोनि वसुदेवतोक । महान् म्हणिजे त्रिजगात्मक । जाणोनि सपर्या-विवेक । करी उत्सुक होत्साता ॥ ५८ ॥ सम्यक उभयतांचे चरण । निजकरतळें प्रक्षाळून । ज्या चरणांचें अवनेजन । कैसें पावन तें ऐका ॥ ५९ ॥ ब्रह्मयापासूनि काडीवरी । अखिल जगातें पावन करी । येव्हढी पवित्रतेची थोरी । लाहे वारी ज्या चरणें ॥ २६० ॥ परिवारेंसीं पादोदक । मस्तकीं वंदूनी सम्यक । गृहें प्रोक्षूनि एकें एक । दैत्यनायक काय करी ॥ ६१ ॥

समर्हयामास स तौ विभूतिभिर्महार्हवस्त्राभरणानुलेपनैः ।
ताम्बूलदीपामृतभक्षणादिभिः स्वगोत्रवित्तात्मसमर्पणेन च ॥ ३७ ॥

मग तो बळि बळश्रीपति । पूजिता जाला सप्रेमभक्ति । स्वसदनींच्या श्रेष्ठ संपत्ति । महाविभूति ज्या म्हणिजे ॥ ६२ ॥ तिहीं करोनि सर्वोपचार । महामूल्याढ्य अलंकार । अर्पूनि नीळपीतांबर । दिव्यवस्त्रें उत्तरीयें ॥ ६३ ॥ दिव्यगंधें अनुलेपनें । टिळे माळा अवतंस सुमनें । परिमळद्रव्यें उधळितां गगनें । निवती मनें दिविजांचीं ॥ ६४ ॥ अगुरुदशांगधूप निगुती । प्रदीप्तपोतास एकारती । अमृतनैवेद्य अर्पूनि भक्ती । फल तांबूल निवेदिलें ॥ ६५ ॥ स्व म्हणिजे संपत्तिधन । गोत्र म्हणिजे बंधुसंतान । वित्त म्हणिजे कोशद्रविण । आत्मा तनु मन जीवधृति ॥ ६६ ॥ एवं सर्वस्व दक्षिणा । अर्पिली कृष्णा संकर्षणा । मंत्रपुष्पें प्रदक्षिणा । अर्पूनि चरणां अभिवंदी ॥ ६७ ॥

स इन्द्रसेनो भगवत्पदाम्बुजं बिभ्रन्मुहुः प्रेमविभिन्नया धिया ।
उवाच हानन्दजलाकुलेक्षणः प्रहृष्टरोमा नृप गद्गदाक्षरम् ॥ ३८ ॥

मग तो इन्द्रसेन म्हणिजे बळी । भगवच्चरण हृदयकमळीं । सुस्निग्ध वारंवार आकळी । प्रेमें विह्वळ होत्साता ॥ ६८ ॥ अष्टभावें भरला पूर्ण । प्रेमें विह्वळ बुद्धि मन । आनंदजळें स्रवती नयन ।

वदनीं वचन पांगुळलें ॥ ६९ ॥ हृष्ट सर्वांगीं थरकले रोम । जाला तन्मूळीं पुलकोद्गम । झरझरा स्वेदें पाझरे वर्म्म । कांपे तनुमम सीतार्ता ॥ २७० ॥ पवनसाठें जलाशयकांठा । वारंवार आदळती लाटा । तेंवि स्फुंदनयोगें कंठा । घोष मोठा घुमतसे ॥ ७१ ॥ ऐसा अष्टभावीं भरला । तैसाचि स्तवना प्रवर्त्तला । अक्षरोच्चार न वचे केला । तो बोलिला सद्गदाक्षर ॥ ७२ ॥ बेंबळवाणीच्या उच्चारें । वदनीं निघती सद्गदाक्षरें । स्फुंदनें येती वारंवारें । स्तवनादरें कलभाषीं ॥ ७३ ॥

॥ बलिरुवाच ॥ नमोऽनन्ताय बृहते नमः कृष्णाय वेधसे ।
साङ्ख्ययोगवितानाय ब्रह्मणे परमात्मने ॥ ३९ ॥

भो अनंता तुजकारणें । नमन माझें अनन्यपणें । बृहते म्हणिजे विस्तीर्णपणें । ब्रह्मांड धरणें निजमौळीं ॥ ७४ ॥ सच्चिदानंदघनश्रीकृष्ण । त्या तुजकारणें माझें नमन । विधात्रादिजगत्सृजन । करिसी म्हणोन वेधा तूं ॥ ७५ ॥ सांख्य योग आणि कर्म । या तिहींचें एकात्मधाम । तो तूं केवळ पुरुषोत्तम । त्या तुज प्रणाम पैं माझा ॥ ७६ ॥ सांख्यें निरसूनि तत्वें तत्व । बोधिलें सन्मात्र जें वास्तव । तन्मय व्हावया निरसूनि माव । योगउपाव निरूपिला ॥ ७७ ॥ योगसांख्याची दशासिद्धी । व्हावया मीमांसा यथाविधी । आचरणें जे अभेदबुद्धी । तो तूं त्रिशुद्धी एकात्मा ॥ ७८ ॥ सांख्ययोग-वितानें करून । निर्धारिलें ब्रह्म पूर्ण । ब्रह्मणे म्हणून त्या तुज नमन । परमात्मया परिपूर्णा ॥ ७९ ॥

दर्शनं वां हि भूतानां दुष्प्रापं चाप्यदुर्लभम् । रजस्तमःस्वभावानां यन्नः प्राप्तौ यदृच्छया ॥ ४० ॥

योगेश्वराम ही दुर्लभ । सर्वथा तुमचा दर्शनलाभ । तो मज जाहला परमसुलभ । हा आश्चर्य-कोंभ न मानावा ॥ २८० ॥ रजस्तमाक्तस्वभावी जन । त्यांसी दुर्लभचि तव दर्शन । तथापि तुझिये कृपेकरून । सुलभ सज्जन मानिती ॥ ८१ ॥ जिया कारणास्तव श्रीपती । आम्हांप्रति तुझी दर्शनावाप्ती । यदृच्छेंकरूनियां अवाचिती । जाहली निश्चिती प्रत्यक्ष हे ॥ ८२ ॥ अहो हेंचि आश्चर्य परम । आम्ही विद्वेष्टे विरोधकाम । केवळ मूर्तिमंत रजस्तम । प्रतीपधर्म पैं ज्यांचा ॥ ८३ ॥ ऐसे आम्ही द्वेष्टे पाहीं । वैर चालितां तुमचे ठायीं । परी सात्विक भक्ताहूनि नवायी । आगळी कांहीं भाग्याची ॥ ८४ ॥ सात्विका भक्तां लागूनि ध्यानीं । तुमच्या दर्शनाची शिराणी । ते हे तुम्ही यदृच्छें करूनी । आमुचे भुवनीं संप्राप्त ॥ ८५ ॥ यदृच्छें करूनि दर्शनातें । तुमचिया लाधलों आम्ही निरुते । हेंचि महद्भाग्य ऐसें चित्तें । आश्चर्यातें मानितसों ॥ ८६ ॥ निसर्गजनितवैरानुबंधी । जातिवैशिष्ट्यें विविधा भेदीं । स्वयें वैरोचनि प्रतिपादी । त्या शुक बोधी कुरुवर्या ॥ ८७ ॥

दैत्यदानवगन्धर्वाः सिद्धविद्याध्रचारणाः । यक्षरक्षःपिशाचाश्च भूतप्रमथनायकाः ॥ ४१ ॥

दितिसंभव ते दैत्यजाति । दानव म्हणिजे दनुसंतति । गंधर्वलोकींचे गंधर्व नृपति । सिद्ध

म्हणिपति सिद्धिवान ॥ ८८ ॥ यक्ष राक्षस विद्याधर । जे कां धनदाचे किंकर । साध्य चारण आणि किन्नर । योनि समग्र निष्कृष्टा ॥ ८९ ॥ ईशानाचे प्रमथगण । शाकिनी डाकिनी इत्यादि भिन्न । भूत प्रेत पिशाच जाण । विनायक म्हणिजे विघ्नपति ॥ २९० ॥ एवं राजस तामसा योनी । सात्विकेंसीं प्रतीपाचरणीं । विरोध चाळिती म्हणोनि वचनीं । वैरोचनी प्रतिपादी ॥ ९१ ॥

विशुद्धसत्त्वधाम्न्यद्धा त्वयि शास्त्रशरीरिणि । नित्यं निबद्धवैरास्ते वयं चान्ये च तादृशाः ॥ ४२ ॥

शुद्धसत्वाचे विशेषेंकरून । साक्षाद्धाम तूं जनार्दन । त्या तुझ्या ठायीं दैत्यादिगण । वैर बांधोन वर्तती ॥ ९२ ॥ वेदविहित अनुशासन । तच्छासना शास्त्राभिधान । तदनुशासना शरीरी पूर्ण । शास्त्र-शरीरी यास्तव तूं ॥ ९३ ॥ तया तुझे ठायीं सर्व । वैरें वर्तती दैत्यदानव । आम्हीही दैत्यान्वयसंभव । परी हें अपूर्व अवधारीं ॥ ९४ ॥ दैत्यकुळीं जन्मोनि आम्ही । रंगलों संतत श्रीपदपद्मीं । तेणें दर्शना-वाप्ति सद्मीं । लाधलों स्वामी यदृच्छया ॥ ९५ ॥ तस्मात सर्वसंपत्तीकरून । संपन्न जे निर्जरगण । ते निकटही समाधान । प्राकृतांसमान न लाहती ॥ ९६ ॥ प्राकृत म्हणसी कोण कैसे । तव पदभजनें भावनावशें । यथाधिकारें पूर्णदशे । पावले तोषें तें ऐक ॥ ९७ ॥

केचनोद्बद्धवैरेण भक्त्या केचन कामतः । न तथा सत्त्वसंरब्धाः सन्निकृष्टाः सुरादयः ॥ ४३ ॥

उत्कर्षें उद्बद्धवैर एक । जे कां शाल्वचैद्यादिक । कामें गोपिकाराधाप्रमुख । सैरंध्र्यादि स्मरतप्ता ॥ ९८ ॥ पाण्डव भक्तिप्रेमभाग्यें । श्रीदामादि मित्रप्रसंगें । वयस्कबलव अंगसंगें । क्रीडायोगें कैशोरीं ॥ ९९ ॥ भयें कंसादि दुर्जन । द्वेषें मागधप्रमुख जाण । अक्रूरप्रमुख वंदनें करून । ऋजुत्वें बिभीषण समरसला ॥ ३०० ॥ एवमादि दैत्यान्वयीं । रजस्तमप्रचुरप्रकृति पाहीं । हृदय बांधोनि तुझ्या ठायीं । पावले सर्वही त्वदात्मकता ॥ १ ॥ तैसे न पावतीच ते जाण । सुरप्रमुखही सत्त्वसंपन्न । तुझें अत्यंत संनिधान । त्यांलागून न तैसें ॥ २ ॥ जरी मानावें हें अघटित । जें सात्विकांहूनिही रजस्तमाक्त । तुझी सन्निकृष्टता प्राप्त । तो इत्यर्थ मुनि बोले ॥ ३ ॥

इदमित्थमिति प्रायस्तव योगेश्वरेश्वर । न विदन्त्यपि योगेशा योगमायां कुतो वयम् ॥ ४४ ॥

इदं म्हणिजे ऐसेंचि वर्म । जे रजस्तमाक्तां तव प्राप्ति सुगम । सत्वसंपन्न सुरसत्तम । न पवती तव धाम निश्चय हा ॥ ४ ॥ बहुतेक तुझी हे योगमाया । योगेश्वरही जाणावया । समर्थ न होती तेथ वांया । आम्ही प्राकृत केउते ॥ ५ ॥ अथवा सात्विकां देवादिकां । सत्वस्वरूपें तव प्राप्ति देखा । हाही निश्चय ब्रह्मादिकां । योगिप्रमुखां न करवे ॥ ६ ॥ विरोधें अथवा आराधनें । घडे तव प्राप्ति विशेष गुणें । हा ही निश्चय अंतःकरणें । केला कोणें न वचेची ॥ ७ ॥ परंतु इतुकाची भरंवसा । अनन्यशरण पदसारसा । तुझिया होती त्या भवफांसा । गोवूं न शके कल्पांतीं ॥ ८ ॥ निष्काम सप्रेम अनन्यपणें ।

तुझिया चरणां शरण होणें । इतुकेन माया स्वबंधनें । बांधूं न शके कोणाही ॥ ९ ॥ होत कां रजस्त-मात्तही असुर । अथवा सत्वसंपन्न सुरवर । निष्काय सप्रेम भजनादर । न होतां दूरतर गुणबद्ध ॥ ३१० ॥ आराधकां कीं विरोधकां । समान तव प्राप्तीच्या लेखा । असो तथापि मज निजरंका । योजीं सात्विका भजनातें ॥ ११ ॥ इतुकी प्रार्थना माझी हरी । जे सत्वसंपन्न आम्हां करीं । निष्काम सप्रेम भक्तांपरी । दृढनिर्धारीं पद भजवीं ॥ १२ ॥

तन्नः प्रसीद निरपेक्षविमृग्ययुष्मत्पादारविन्दधिषणान्यगृहान्धकूपात् ।
निष्क्रम्य विश्वशरणाङ्घ्रिपलब्धवृत्तिः शान्तो यथैक उत सर्वसखश्चरामि ॥ ४५ ॥

तैसा प्रसीद आम्हांप्राति । जैसा निरपेक्षी विरक्ति । पूर्णकामही जालिया पुढतीं । तव पदप्राप्ति गिंवसिजेत ॥ १३ ॥ तुमचें जें कां पादारविंद । धिषण म्हणिजे तो आश्रय शुद्ध । त्याहूनि इतर गृह-संबंध । तो भवभ्रम अंधकूपची ॥ १४ ॥ तया अंधकूपापासून । विभ्रम विरक्त होऊनि पूर्ण । निर्ममत्वें निष्क्रमण । करूनि निर्जन वसवीं मी ॥ १५ ॥ विश्वाचे जे सदनरूप । ऐसे सदय सफळ पादप । त्यांचे मूळीं विगततात । वंदूनि अल्प उपसर्गा ॥ १६ ॥ आपणाचि गळती सुपक्व फळें । यदृच्छें लाहूनि यथाकाळें । जीविका करूनि दैवबळें । सुशांत विचरें एकाकी ॥ १७ ॥ अथवा जे कां विश्वसखे । महांत अमृतमय अशिके । तयांच्या संगीं सुशांत सुखें । विचरें कौतुकें तेंचि करीं ॥ १८ ॥ जरी तूं म्हणसी पुरुषोत्तमा । अल्पसुकृतियां दैत्यां तुम्हां । ऐसा कैंचा सद्भावप्रेमा । उपजे रजस्तमांमाजि असतां ॥ १९ ॥ तरी ऐकें गा कलुषांतका । जेणें झाडणी रजस्तमपंका । होऊनि लाहूं सद्भावसुखा । तेंवि शिक्षका मज शिक्षीं ॥ ३२० ॥

शाध्यस्मानीशितव्येश निष्पापान्कुरु नः प्रभो । पुमान्यच्छ्रद्धया तिष्ठंश्चोदनाया विमुच्यते ॥४६॥

शासनार्हे जे सकळजीव । त्यांचा शिक्षक तूं वासुदेव । मानूं शासन तव ज्यास्तव । तें तूं स्वयमेव संपादीं ॥ २१ ॥ आवडी करूनि तव शासनीं । सदैव रंगों सप्रेम भजनीं । विधिनिषेधादि कर्म बंधनीं । न पडों येथूनि तें करीं ॥ २२ ॥ जें कां म्हणिजे कर्मप्रेरणा । केवळ विधिनिषेधलक्षणा । आम्हां दासांतें जनार्दना । तेथूनि पुन्हा मुक्त करीं ॥ २३ ॥ निश्चयेंसिं तुझा भक्त । नोहे विधिनिषेधा अंकित । ऐसा तव भजनासक्त । करीं निवांत म्हणे बळि ॥ २४ ॥ ऐसी ऐकूनि बळीची वाणी । सर्व तदुक्ति मान्य करूनी । निजगमनार्थ सूचवूनी । चक्रपाणी बोलतसे ॥ २५ ॥

श्रीभगवानुवाच । आसन्मरीचेः षट्पुत्रा ऊर्णायां प्रथमेऽन्तरे । देवाः कं जहसुर्वीक्ष्य सुतां यभितुमुद्यतम् ॥४७॥

बळीनें जे जे याचिले वर । मान्य करूनि ते जगदीश्वर । निजगमनाचा विचार । कथी साचार संक्षेपें ॥ २६ ॥ बळीतें म्हणे कमलामित्र । मरीचिनामा विरिंचिपुत्र । ऊर्णा तयाचें कलत्र । ते षट्-

पुत्रां प्रसवली ॥ २७॥ स्वायंभुव मन्वंतरीं । पुत्रषट्क ऊर्णाजठरीं । असतें जाहलें देवतानिकरीं । मान्य महत्त्वें विराजित ॥ २८ ॥ तंव कोण्हे एके अपूर्व समयीं । वाग्देवी जे स्वसुता पाहीं । तियेशीं रमतां देखोनि तिहीं । प्रजापतीतें हासिन्नले ॥ २९ ॥ क म्हणिजे जो प्रजापती । तेणें वाग्देवी धरूनि हातीं । मैथुनें रमावयार्थ निगुती । मरीचि षट्सुतीं हास्य केलें ॥ ३० ॥

तेनासुरीमगन्योनिमधुनाऽवद्यकर्मणा । हिरण्यकशिपोर्जाता नीतास्ते योगमायया ॥ ४८ ॥

तया बापास्तव पाहीं । तत्काळ मरीचिपुत्र साही । जन्मले दैत्ययोनीच्या ठायीं । गेहीं हिरण्यकशिपूचिये ॥ ३१ ॥ झणें म्हणसी पाप तें कोण । तरी श्रेष्ठाचें उपहासन । कनिष्ठीं केलें यास्तव जाण । अधःपतन त्यां झालें॥ ३२ ॥ प्रह्लादाचा सापत्न ज्येष्ठ । हिरण्यकशिपूचा पुत्र वरिष्ठ । कालनेमिनामा दुष्ट । त्याचे जठरीं जन्मले ते ॥ ३३ ॥ कीर्तिमंतादिनामाथिले । महाप्रतापी दैत्य भले । देवकीजठरा कैसे आले । तेंही कथिलें जातसे ॥ ३४ ॥ तारकामये समरांगणीं । कालनेमीतें चक्रपाणी । वधिता जाला तये क्षणीं । निर्जरश्रेणी आनंदल्या ॥ ३५ ॥ महामायावी काळनेमी । द्वेष धरूनि पुरुषोत्तमीं । भोजकुळीं जन्मला भूमी । कंसनामा प्रतापी ॥ ३६ ॥ तयाच्या वधाकारणें पुढती । पृथ्वी विधि हर निर्जरपंक्ती । जाऊनि क्षीरसमुद्राप्रती । स्तवनीं श्रीपती प्रार्थियेला ॥ ३७ ॥ तयासि देऊनि वरदान । कंसा साचिलें आसन्नमरण । देवकीअष्टमगर्भ जाण । वधील म्हणे नभो वाणी ॥ ३८ ॥ कंस वधील गर्भषट्क । भावी जाणोनि हें निष्टंक । साही कालनेमीचे तोक । देवकीगर्भीं योजविले ॥ ३९ ॥ ते पूर्वीचे मरीचिकुमर । श्रेष्ठोपहासें जाले असुर । मायेसि आज्ञापूनि श्रीधर । देवकीजठरीं त्यां घाली ॥ ३४० ॥ नारदवचनें कंसासुरें । पूर्वजन्मींचीं निज लेंकुरें । जातमात्र वधिलीं निकरें । देवकीजठरीं जन्मलिया ॥ ४१ ॥ मग सातवा देवकीपोटीं । जन्माला संकर्षण जगजेठी । विष्णु आठवा त्याचिये पोटीं । मी कृष्ण भूतटीं अवतरलों ॥ ४२ ॥ कंस वधूनि निर्जरां तोष । दमिले दुष्ट कपटी अशेष । द्वारके माजि करूनि वास । भरिलें यश ब्रह्माण्डीं ॥ ४३ ॥ प्रस्तुत येथें इये काळीं । स्वयें पातलों मी वनमाळी । तें तूं ऐकें राया बळि । जे आज्ञा केली जननीनें ॥ ४४ ॥

देवक्या उदरे जाता राजन्कंसविहिंसिताः । सा ताञ्शोचत्यात्मजान्स्वांस्त इमेऽध्यासतेऽन्तिके ॥ ४९ ॥

देवकीउदरीं जन्मले दैत्य । कंसें केला त्यांचा घात । त्यांतें मानूनि आत्मसुत । शोकाभिभूत देवकी ॥ ४५ ॥ देवकीनें याचिलें मज । कंसहिंसित निजात्मज । मग म्यां ज्ञानीं पाहूनि सहज । आलों वोजें तुजपासीं ॥ ४६ ॥

इत एतान्प्रणेष्यामो मातृशोकापनुत्तये । ततः शापाद्विनिर्मुक्ता लोकं यास्यन्ति विज्वराः ॥ ५० ॥

ते हे आहेत तुजसंन्निध । आतां यांतें नेऊनि विशद । निजमातेचा निरसीन खेद । मग हे शुद्ध

होतील ॥ ४७ ॥ शापविमुक्त जालिया वरी । न तपती तापत्रया माझारी । पुन्हा मिरवती मुनिनिर्जरीं । इतुकें श्रीहरी स्वयें वदला ॥ ४८ ॥ पुढती बळीतें जगन्नाथ । साही जणांचा नामसंकेत । आणि उर्ध्वगतीचा हेत । कथी निवांत तो ऐका ॥ ४९ ॥

स्मरोद्गीथः परिष्वंगः पतंगः क्षुद्रभृद्घृणी । षडिमे मत्प्रसादेन पुनर्यास्यन्ति सद्गतिम् ॥ ५१ ॥

स्मर उद्गीथ परिष्वंग । घृणी क्षुद्रभृत् आणि पतंग । साही मत्प्रसादें चांग । पुढती स्वर्ग अधिष्ठिती ॥ ३५० ॥ ज्येष्ठोपहासन आपण केलें । ये पापाचें फळें हें जालें । ऐसें स्मरण हृदयीं धरिलें । भगवत्प्राप्तीपर्यंत ॥ ५१ ॥ पूर्वीं स्मरातें जाळिलें शिवें । मम जठरीं तो जन्मला दैवें । येथ विख्यात प्रद्युम्ननावें । स्मर जाणावें पूर्वील ॥ ५२ ॥ तेंवि हे स्मरादि साही जण । पूर्वील मरीचिनंदन । कालनेमीचे सदनीं जाण । कीर्तिमंतादि नामाथिले ॥ ५३ ॥ या कारणास्तव तीं पूर्वीं । कीर्तिमंतादि-नामें बरवीं । कुरुवररत्ना तुजला आघवीं । निरूपिलीं तीं यथार्थ ॥ ५४ ॥ पूर्वीं म्हणिजे द्वितीयाध्यायीं । कीर्तिमंतादि कथिलीं पाहीं । मुनिमदनींचिये ठायीं । पंचाशाव्यामाजि कथिलीं ॥ ५५ ॥ असोनि निर्विवाद आख्यान । जाणोनि श्रोतीं कीजे श्रवण । मग त्या षट्पुत्रांतें घेऊन । बळ भगवान निघाले ॥ ५६ ॥

इत्युक्त्वा तान्समादाय इंद्रसेनेन पूजितौ । पुनर्द्वारवतीमेत्य मातुः पुत्रानयच्छताम् ॥ ५२ ॥

इत्यादि संवाद मधुरोक्ति । बोलूनियां बळीप्रति । सुनंदपाणि आणि श्रीपति । षट्सुतांतें घेऊनि ॥ ५७ ॥ इंद्रसेन म्हणिजे बळी । तेणें पूजिले बळवनमाळी । तैसे सुपूजित विक्रमशाळी । निघते जाहले तेथूनी ॥ ५८ ॥ पुढती येऊनि द्वारवतीये । षट्पुत्रांतें देवकीये । अर्पिते जाले परमाश्चर्यें । देखोनि मोहें विह्वळ ते ॥ ५९ ॥

तान्दृष्ट्वा बालकान्देवी पुत्रस्नेहस्नुतस्तनी । परिष्वज्याङ्कमारोप्य मूर्ध्न्यजिघ्रदभीक्ष्णशः ॥ ५३ ॥

मग त्या बाळकांतें देखून । देवकीचे उभय स्तन । पान्हाइले वोरसोन । स्रवती पूर्ण पयोधारा ॥ ३६० ॥ जातमात्र कंसें वधिले । तैसेच साही सुत देखिले । आलिंगूनी हृदयीं धरिले । मग घेतले उत्संगीं ॥ ६१ ॥ अंकीं घेऊनि त्या कुमारांतें । वारंवार हुंगे माथें । अष्टपुत्रां भावी चित्तें । मानी निरुतें श्लाघ्यत्व ॥ ६२ ॥

अपाययत्स्तनं प्रीता सुतस्पर्शपरिप्लुता । मोहिता मायया विष्णोर्यया सृष्टिः प्रवर्तते ॥ ५४ ॥

प्रीती करोनि पाजी स्तन । पुत्रस्पर्शें सस्नुतपूर्ण । न म्हणे रामकृष्णांहून । हे मम नंदन वयोधिक ॥ ६३ ॥ मानी आतांचि प्रसवलें यांतें । विष्णुमायेनें मोहिताचित्तें । आदिपश्चात् न स्मरे तीतें । पाहतां सुतांतें धणी न पुरे ॥ ६४ ॥ विष्णुमायेची अद्भुतशक्ति । जिये करूनि सृजनस्थिति । सकळसृष्टीची प्रवृत्ति । व्यामोहभ्रांती माजिवडी ॥ ६५ ॥

पीत्वामृतं पयस्तस्याः पीतशेषं गदाभृतः । नारायणाङ्गसंस्पर्शप्रतिलब्धात्मदर्शनाः ॥ ५५ ॥

देवकीचे स्तनींचें पय । पवित्र सुस्निग्ध अमृतप्राय । अमृतोपमा कोंवि लाहे । हेतु काय यदर्थीं ॥ ६६ ॥ जगत्पति जो गदाभृत । तत्पीतशेषस्तन्यामृत । लाजवी परमामृता निश्चित । तर्पिले स्वसुत तत्पानें ॥ ६७ ॥ नारायणाचा अंगसंग । लाधले म्हणोनि एनसभंग । जाला आणि प्रत्यय चांग । आत्मस्मृतीच त्यां जाला ॥ ६८ ॥ म्हणाल कैसें आत्मदर्शन । जे मरीचिपुत्र साही जण । श्रेष्ठोपहासें पावले पतन । हें प्राचीन त्यां स्मरलें ॥ ६९ ॥ कृष्णें पूर्वी प्राशिलें स्तन । तें त्या देवकीचें स्तनपान । घडलें तेणें निष्पाप पूर्ण । होऊनि स्वभुवन पावले ॥ ३७० ॥ नारायणाचा अंगसंग । तेणें जाला एनसभंग । पूर्वस्मृतीचा लाधला योग । पावले स्वर्ग तें ऐका ॥ ७१ ॥

ते नमस्कृत्य गोविंदं देवकीं पितरं बलम् । मिषतां सर्वभूतानां ययुर्धाम दिवौकसाम् ॥ ५६ ॥

गोविंद देवकी वसुदेव बळ । यांतें नमूनि अमळ सकळ । भासुर जैसें रविमंडळ । तैसे प्रांजळ देदीप्य ॥ ७२ ॥ पाहात असतां सकळ भूतें । जाते जाले सुरसदनातें । पूर्वीं अमर जैसे होते । जाले असके ते तैसे ॥ ७३ ॥ ऐसें देखूनि देवकी देवी । मानिती जाली आपुले जीवीं । मत्सुत त्रिजगाचे गोसावीं । माया आघवी हे यांचीं ॥ ७४ ॥

तं दृष्ट्वा देवकी देवी मृतागमननिर्गमम् । मेने सुविस्मिता मायां कृष्णस्य रचितां नृप ॥ ५७ ॥

कंसहस्तें चिरकाळ मेले । सजीव मृतपुत्र ते आणिले । स्तन्य सेवूनि निष्पाप जाले । वंदूनि गेले निजभुवना ॥ ७५ ॥ आगमनिर्गम सुतांचा ऐसा । देखूनि देवकी निजमानसा । माजि विस्मय मानी कैसा । कुरुनरेशा तो ऐक ॥ ७६ ॥ म्हणे हे अवघी कृष्णमाया । ब्रह्मादिकांही नये आया । ते प्राकृतां जाणावया । शक्य कैसेनि होईल ॥ ७७ ॥ जातमात्र कंसें वधिले । ते आजिवरी कोठें उरले । ज्यांतें हरिबळ घेऊनि आले । हें अघटित केलें श्रीकृष्णें ॥ ७८ ॥ मृतपुत्रांचीं मायिकरूपें । कृष्णें आणूनि दिधलीं मजपें । मी भुललें हरिसंकल्पें ॥ ७९ ॥ मानिलीं स्तनपें स्वापत्यें । स्तन प्राशूनि निष्पाप जाले । नमस्कारूनि स्वर्गा गेले । मायामय हें मज आपुलें । चरित्र दाविलें श्रीकृष्णें ॥ ३८० ॥ ऐशी देवकी सुविस्मिता । जाहली होत्साती नृपनाथा । रामकृष्णां उभयसुतां । मानी तत्त्वता परेश हे ॥ ८१ ॥

एवंविधान्यद्भुतानि कृष्णस्य परमात्मनः । वीर्याण्यनन्तवीर्यस्य सन्त्यनन्तानि भारत ॥ ५८ ॥

शुक म्हणे गा कुरुकुळदीपा । परम धार्मिका परीक्षिति भूपा । श्रवणभक्तिरसामरपादपा । सत्यसंकल्पा भजलासी ॥ ८२ ॥ ऐसिये परीचीं अनेक चरितें । श्रीकृष्णाचीं परमाद्भुतें । आहेत त्यांमाजि जितुकीं विदितें । तीं तुज श्रुत जालीं कीं ॥ ८३ ॥ देहात्ममानी मंदमति । पशुसाम्यें जे तिर्यग्वृत्ति । आहार मैथून भय सुषुप्ति । यावीण नेणती आपपर ॥ ८४ ॥ सुकृत किंवा दुष्कृत कांहीं । पशुसमान ज्यां ठावुकें नाहीं । जडमूढ पामर जे नरदेहीं । असतां हृदयीं हरि विमुख ॥ ८५ ॥ त्यांहूनि जीवात्ममानी श्रेष्ठ । सुकृतदुष्कृत वोळखे स्पष्ट । सुकृतफळभोग मानी इष्ट । दुष्कृत अनिष्ट कष्टद पैं ॥ ८६ ॥ सुकृतसाधनीं प्रवर्ते लोभें । तेथ ही घाला घालिजे दंभें । सुकृतामाजी दुष्कृत क्षोभे । अहंता वालभें

उत्पादी ॥ ८७ ॥ मग त्या मिश्रफळाच्या भोगा । सांडूनि योनि सुरतिर्यगा । पात्र होऊनि मनुष्यलिंगा । आदरी यागा सुकृतार्थ ॥ ८८ ॥ मग त्या मखसुकृतें करून । जीवात्मबोधें सुकृतवान । अधिष्ठूनियां स्वर्गभुवन । वेंची पुण्य सुरभोगें ॥ ८९ ॥ पुण्यक्षयीं अधोगति । पावें मृत्युलोकावाप्ति । मखसुकृतें जोडोनि पुढती । सुरवरसंपत्ति भोगार्थ ॥ ३९० ॥ तंव प्रमाथी इंद्रियें क्षुब्ध । बळें आचरती विधिविरोध । यथेष्टाचरणें होती बद्ध । सहसा निषिद्ध न टकिती पैं ॥ ९१ ॥ तेणें होय अधोगती । तिर्यग्योनि दुःखद लाहती । दुःखभोगें अघनिवृत्ति । पुन्हा येती नरदेहा ॥ ९२ ॥ जीवात्मनिष्ठ ऐसे भ्रमणीं । त्यांची कथिली भ्रमकाहणी । तेथूनि सुटिकेची शिराणी । काम्याचरणीं त्यांलागीं ॥ ९३ ॥ अवचट लाहती जैं सत्संग । तैं त्यां उमजे निष्काममार्ग । इहामुत्रार्थफळविराग । उपजे चांग ते काळीं ॥ ९४ ॥ अनेकजन्मीं भोगिलें दुःख । ते तैं आठविती सम्यक । म्हणती सकामकर्मठ मूर्ख । सुरतिर्यग्मनुजादि ॥ ९५ ॥ सकामसुकृतें स्वर्ग अनित्य । भोगूनि पावती अधःपात । देह लाहूनि नाशवंत । दुःखें अनंत अनुभविती ॥ ९६ ॥ यालागीं त्यां नित्यनिवेक । करितां अनित्य दुःखदायक । जाणोनि नित्यवस्तु जे एक । ते तैं सम्यक गिंवसिती ॥ ९७ ॥ गवेषणा करितां निगुती । सहसा नावगमे आत्ममती । भाग्यें सद्गुरुचरणीं रती । जालिया होती तन्निष्ठ ॥ ९८ ॥ सद्गुरु बोधी उपासना । सकामकर्मीं दोषदर्शना । करूनि लावी निष्कामभजना । योगसाधना रुचवूनी ॥ ९९ ॥ मानस भक्तियोगें स्तिमित । करवी व्हावया आत्मरत । विषयापासूनियां उपरत । होय तो पंथ प्रतिपादी ॥ ४०० ॥ वासना त्यागी शमसाधनीं । दमें नियोजी इंद्रिय दमनीं । मिथ्यात्वावबोधें करूनि । दृश्यापासूनी उपरमवी ॥ १ ॥ देहवंता त्रितापसहन । न चुके जोडिल्या नृपासन । यालागीं तितिक्षावलंबन । करवी बोधन दृढ धैर्यें ॥ २ ॥ रसास्वादना फलाभिलाष । नसतां न होय श्रमनिरास । वेदान्तवचनीं तैं विश्वास । करीं विशेष श्रद्धालु ॥ ३ ॥ ऐशी शमषट्कसंपत्ति । नितान्तनिर्मळ चित्तवृत्ति । होतां रुचवी आत्मरति । समाधि म्हणती जिये दशे ॥ ४ ॥ आत्मरति ते म्हणाल कैशी । व्यतिरेकबोधें तत्वनिरासीं । भजवी चिन्मात्र आत्मवासी । नाहंतेशीं सोहंत्वा ॥ ५ ॥ ऐसा साधनसंपत्तिवंत । स्वरूपनिष्ठ होय संतत । देहात्मजीवात्मानिष्ठातीत । सन्मात्र संतत स्वात्मत्वें ॥ ६ ॥ वाच्यांश शबलांश त्यागेंकरून । लक्ष्यांश सन्मात्र होय आपण । त्रिविधबंधातीत पूर्ण । आनंदघन अविनाश ॥ ७ ॥ ऐसे जीव जिये पदीं । मिळती सांडूनि सर्वोपाधी । परमात्मा तो कृष्ण त्रिशुद्धी । धर्मविरोधी संहर्ता ॥ ८ ॥ जयासि म्हणती परब्रह्म । पूर्णानंद निष्कामकाम । परमात्मा हें तयाचें नाम । अनंत विक्रम पैं त्याचे ॥ ९ ॥ अनंतयुगीं अवतरून । अनंत दैत्यांचें संहरण । करी स्वसेतुसंस्थान । अनंतवीर्यविस्तारें ॥ ४१० ॥ अनंतवीर्यें अनंताचीं । अनंतचरितें असती साचीं । गाती ऐकती पढती त्यांची । भवभ्रमसंसृति विखंडिती ॥ ११ ॥ अनंतवीर्यें हरीचीं चरितें । गाती ऐकती पढती वक्ते । भगवत्पदवी सुलभ त्यांतें । ऐसें निरुतें शुक वदला ॥ १२ ॥

॥ सूत उवाच ॥ य इदमनुश्रृणोति श्रावयेद्वा मुरारेश्चरितममृतकीर्तेर्वर्णितं व्यासपुत्रैः ।
जगदघभिदलं तद्भक्तसत्कर्णपूरं भगवति कृतचित्तो याति तत्क्षेमधाम ॥ ५९ ॥

शौनकप्रमुखां मुनींतें सूत । म्हणे जो हें मुरारिचरित । ऐके ऐकवी सप्रेमभरित । हरियश अमृतमय रुचिर ॥ १३ ॥ व्यासपुत्र जे शुकाचार्य । तिहीं वर्णिलें सुधामय । येणें जगाचा अघभंग होय । कक्षनिचय पावकवत् ॥ १४ ॥ कृच्छ्रादिकें प्रायश्चितें । जगदघ भंगितां असमर्थें । श्रवणमात्रें मुरारिचरितें । निःशेष त्यांतें क्षय होय ॥ १५ ॥ होतां निःशेष पापक्षय । तैं भगवंतीं चित्त राहे । तोचि मोक्षाचा उपाय । लाहे अनपाय हरिभक्त ॥ १६ ॥ सद्भक्ताचिये श्रवणीं पूर्ण । सप्रेम रुचती भगवद्गुण । तैं तो पावे क्षेमसदन । ज्यातें निर्वाण मुनि म्हणती ॥ १७ ॥ चित्तशुद्धीचें कारण । हरिगुणकीर्तनश्रवणपठन । चित्तशुद्धि जालिया पूर्ण । कैवल्यसदन मग सुलभ ॥ १८ ॥ तस्मात् हरियश गाती पढती । किंवा ऐकती ऐकविती । ते नर कैवल्यसदना जाती । व्याससुतोक्ति हे सत्य ॥ १९ ॥ ऐशी श्रीमद्भागवतीं । श्रीशुकमुखें कैवल्यप्राप्ति । ऐकूनियां परीक्षिति । निवाला चित्तीं निजलाभें ॥४२०॥ ऐशी अनंत मुरारिचारितें । असती म्हणूनि मुनिसमर्थें । बोलिलीं तीं ऐकूनि चित्तें । पुनः प्रश्नातें करी नृप ॥ २१ ॥ तो अध्याय षडशीतितम । जेथ सुभद्राहरणोद्यम । अर्जुनाकरवीं मेघश्याम । पुसेल सप्रेम परीक्षिति ॥ २२ ॥ आणि श्रीकृष्ण विदेहनगरा । जाऊनि विदेहा आणि द्विजवरां । भेटूनि तयाचिया मंदिरा । जाईल शरीरा द्विधा करूनी ॥ २३ ॥ द्विधा म्हणिजे रूपें दोन्ही । समान धरूनि उभयतां भुवनीं । तोष पावूनि तदर्चनीं । वेदान्तवचनीं बोधील ॥ २४ ॥ तिया कथेचिया श्रवणीं । स्वर्गसुखातें कुरवंडूनी । स्वस्थ बैसावें सज्जनीं । कैवल्यदानीं हरिप्रेमें ॥ २५ ॥ इतुकें श्रीमत्प्रतिष्ठानीं । एकनाथाचिये आनंदभुवनीं । लाहूनि प्रसादपायवणी । भाषा वाखाणी दयार्णव ॥ २६ ॥ तें परिसावया सज्जनीं श्रोतीं । अवधान दीजे इतुकी विनती । श्रवणमात्रें भवभयगुंती । उगवे निश्चिती हरिवरदें ॥ २७ ॥ श्रीमद्भागवत दशमस्कंध । टीका हरिवरद अगाध । दयार्णवकृत परमविशुद्ध । अध्याय प्रसिद्ध पंचाशीतितम ॥ २८ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां वसुदेवकृतवासुदेवस्तवन देवक्याः षट्पुत्रानयनं नाम पंशाशीतितमोऽध्यायः ॥ ८५ ॥

वैशाखे पञ्चमीकृष्णे सिद्धार्थेऽब्दे बुधे दिवा । पञ्चाशीतितमोऽध्यायः प्रतिष्ठाने समर्थितः ॥ १ ॥

श्लोक ६० ॥ ओवी-संख्या ४२८ ॥ एवं संख्या ४८८ ॥
(चौऱ्याऐशींवा अध्याय मिळून ओवीसंख्या ३८,१३१)

पंच्याऐशींवा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ८६ वा

श्रीगणेशाय नमः । तव पदपंकजफुल्लारलक्ष्मी । प्रकटे ज्याचिया हृदयसद्मीं । तो नर धनदा न गणी हेमीं । आगमीं निगमीं वाक्पतीतें ॥ १ ॥ तीं पदें स्वर्चित माझिये ध्यानीं । रंगोनि प्रकट दिसती नयनीं । दृश्यविषयाभिलाषग्लानी । वेघें खंडूनि सांडियली ॥ २ ॥ पदाब्जवेघें वेधलें मन । होऊनि ठेलें प्रत्यक्प्रवण । दृश्य मिथ्या विषयभान । असाच जाणोन उपरमलें ॥ ३ ॥ मग अक्षय अच्युताचा । गुणगणमहिमा कथनीं वाचा । योजिली तिणें भागवताचा । दशमस्कंध उपलवितां ॥४॥ देवकीच्या मृतपुत्रांतें । आणूनि दिधलें हरि अनंतें । हरिवरदें तें व्याख्यान पुरतें । वाखाणिलें यथामति ॥ ५ ॥ यावरी षडशीतितमाध्यायीं । परीक्षिति संतुष्ट होऊनि हृदयीं । सुभद्राहरणाची नवायी । परिसावया प्रश्न करी ॥ ६ ॥

॥ राजोवाच ॥ ब्रह्मन्वेदितुमिच्छामः स्वसारं रामकृष्णयोः । यथोपयेमे विजयो या ममासीत्पितामही ॥ १ ॥

कुरुनृप म्हणे ब्रह्मनिष्ठा । वासिष्ठाग्रणी परम श्रेष्ठा । मम मानसीं जे उत्कंठा । ते वरिष्ठा पुरवावी ॥ ७ ॥ उत्कंठेचा करितों प्रश्न । तो निरूपीं विस्तारून । विशेष करितां हरिगुणश्रवण । न पवे मम मन तृप्तीतें ॥ ८ ॥ तरी ऐकें गा योगिराया । सुभद्रानामें वसुदेवतनया । प्राप्त जाली धनंजया । कोण्या उपायें तें सांग ॥ ९ ॥ जे कां रामकृष्णांची बहिणी । रामें सुयोधना लागूनी । देऊं इच्छिली तीतें हरूनी । करी निज गृहिणी कौन्तेय ॥ १० ॥ आणि माझी ते पितामही । दुष्प्राप्य असतां द्वारकानिलयीं । विजयें कैसी वरिली पाहीं । ते नवायी मज सांगें ॥ ११ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ अर्जुनस्तीर्थयात्रायां पर्यटन्नवनीं प्रभुः ।
गतः प्रभासमशृणोन्मातुलेयीं स आत्मनः ॥ २ ॥

शुक म्हणे कौरवपाळा । तीर्थयात्रार्थ फिरतां इळा । अर्जुन प्रभासक्षेत्रा आला । तेथ ऐकिला वृत्तान्त ॥ १२ ॥ तो वृत्तान्त कैसा म्हणसी । मातुळकन्या लावण्यराशी । राम देऊं इच्छी तयेसी । दुर्योधनासी स्नेहभरें ॥ १३ ॥ प्रभुत्वें जो निजांगवणें । एकला त्रिजगा समरीं जिणे । गुह्य वृत्तान्त आपुल्या श्रवणें । ऐकिला तेणें तो ऐसा ॥ १४ ॥

दुर्योधनाय रामस्तां दास्यतीति न चापरे । तल्लिप्सुः स यतिर्भूत्वा त्रिदण्डी द्वारकामगात् ॥ ३ ॥

मातुळतनया संकर्षणें । द्यावी दुर्योधनाकारणें । ऐसें इच्छिलें निजमनें । हें अपरें कोणें न इच्छिलें ॥ १५ ॥ कृष्ण देवकी वसुदेव । आणि समस्तही यादव । ते ही बळरामाचा भाव । ऐकोनि सर्व नादरिती ॥ १६ ॥ अर्जुनें ऐसी ऐकोनि गोष्टी । सुभद्राहरणलिप्सा पोटीं । धरूनि त्रिदंडियतिवरनटीं । नटला कपटी कापट्यें ॥ १७ ॥ काषाय कमंडलु त्रिदंड । प्राणवजाप्ये बुटबुटी तोंड । बहिर्वासार्थ वसनखंड । कशिपु कौपीन भस्मलेप ॥ १८ ॥ मातुळकन्येचा लिप्साळु । त्रिदंडिवेषें वंचिजे बळु । यतिवेष पूज्यतम केवळु । दावूनि समळ कामेच्छु ॥ १९ ॥ ऐसा अर्जुन प्रभासक्षेत्रीं । सुभद्रावृत्तान्त ऐकूनि श्रोत्रीं । यतिवरवेषें द्वारकापुरीं । रिघतां नेत्रीं जन पाहती ॥ २० ॥ देखूनि त्रिदंडियतिवरवेष । नमिती नागरजन अशेष । म्हणती वार्षिक चारही मास । कीजे निवास येथ स्वामी ॥ २१ ॥

तत्र वै वार्षिकान्मासान्न्यवात्सीत्स्वार्थसाधकः । पौरैः सभाजितोऽभीक्ष्णं रामेणाजानता च सः ॥ ४ ॥

ऐकूनि जनांची प्रार्थना । मानस तत्पर सुभद्राहरणा । स्वकार्यसाधक यतिवरराणा । राहिला जाणा स्वस्थमनें ॥ २२ ॥ काया निश्चळ स्वस्थासनीं । दृढतर मौनें वाङ्नियमनीं । ध्यानस्थ मानस सुभद्राहरणीं । दंभाचरणी तपोधन ॥ २३ ॥ त्यातें भाविक द्वारकावासी । नेऊनि पूजिती स्वसदनासी । म्हणती स्वामी चरणस्पर्शीं । पावन कीजे निलयातें ॥ २४ ॥ द्वारकापुरीं लोक बहळ । प्रार्थना करिती सर्वकाळ । त्यांमाजी ज्याचें भाग्य सफळ । तो ने केवळ निजसदना ॥ २५ ॥ ऐसा द्वारकापुरपाटनीं । बहुसाळ भजकांची दाटणी । न येची कोणाचे वाटणीं । नित्य निमंत्रणीं निमंत्रितां ॥ २६ ॥ रामे नेणोनि कपटवेश । जाणोनि त्रिदंडी तापस । नेला स्वसदनीं भिक्षेस । प्रार्थना विशेष करूनिया ॥२७॥

एकदा गृहमानीय आतिथ्येन निमन्त्र्य तम् । श्रद्धयोपाहृतं भैक्ष्यं बलेन बुभुजे किल ॥ ५ ॥

करूनि सद्भावें अर्चन । पात्रीं वोगरिलें दिव्यान्न । प्रणवोदकें तें प्रोक्षून । केलें भोजन यतीश्वरें ॥ २८ ॥ ऐसाचि पंचसप्तवार । रामें पूजिला यतीश्वर । श्रद्धापूर्वक सोपस्कर । कपटाचार नेणोनी ॥ २९ ॥ अपूर्व कोणे एके दिवसीं । रामें निमंत्रित संन्यासी । नेऊनियां स्वसदनासी । सप्रेमेंसीं पूजियला ॥ ३० ॥ रामें सप्रेमें अर्पिलें भैक्ष्य । अर्जुनें भक्षिलें तें निःशेष । तंव देखिलें सुभद्रेस । वेधलें मानस तें ऐका ॥ ३१ ॥

सोऽपश्यत्तत्र महती कन्यां वीरमनोहराम् । प्रीत्युत्फुल्लेक्षणस्तस्यां भावक्षुब्धं मनो दधे ॥ ६ ॥

कपटी यतिवर तये सदनीं । उपवर कन्या लावण्यखाणी । वीरमनोहरा देखोनि नयनीं । जाहला मनीं स्मर क्षुब्ध ॥ ३२ ॥ प्रीतिपूर्वक सप्रेम वक्त्रें । शरत्फुल्लारपंकजनेत्रें । सादर पाहतां सुंदर गात्रें । मन्मथशस्त्रें भेदियला ॥ ३३ ॥ तियेच्या ठायीं रुतलें मन । कामें कलुषी केले नयन । ऐसिया यतिवरा देखून । वेधले नयन कन्येचे ॥ ३४ ॥

सा च तं चकमे वीक्ष्य नारीणां हृदयङ्गमम् । हसन्ती व्रीडितापाङ्गी तन्न्यस्तहृदयेक्षणा ॥ ७ ॥

तंव ते सुभद्रा तन्वंगी । त्यातें देखूनि भुलली वेगीं । दाटली कामेमार्गी सर्वांगीं । व्रीडितापांगी स्मितवदना ॥ ३५ ॥ देखिलें यतीचें नवयौवन । आजानुबाहु सरळ सुपीन । ज्यांतें देखतां स्त्रीजन । हृदयें द्रवोन वश होती ॥ ३६ ॥ ऐसा लावण्यरसपुतळा । सुभद्रेनें देखतां डोळां । सलज्जहास्यवदन-कमळा । वेधिली अबळा स्मरबाणें ॥ ३७ ॥ परस्परें मिनले नयन । मनें आळंगिलें मन । हृदयीं कडतरले स्मरबाण । न थरे अवसान धैर्याचें ॥ ३८ ॥ भिक्षु भिक्षार्थ आणिला सदना । तेणें पाहोनि कन्यकावदना । वश्य जाला म्हणती मदना । यास्तव रदना खाऊनी ॥ ३९ ॥ बळेंचि अवलंबूनि विरक्ति । सवेग गेला मठाप्रति । परंतु चटपट लागली चित्तीं । ते शुकोक्ति अवधारा ॥ ४० ॥

तां परं समनुध्यायन्नन्तरं प्रेप्सुरर्जुनः । न लेभे शं भ्रमच्चित्तः कामेनातिबलीयसा ॥ ८ ॥

जाऊनि आसनीं बैसला मठीं । सुभद्रास्वरूपीं जडली दृष्टी । ध्यानस्थ तियेतें आठवी पोटीं । उपायकोटी तर्कितसे ॥ ४१ ॥ कोण उपाय कीजे आतां । कैसी नव वधू चढेल हाता । ध्यानीं मनीं हेचि चिन्ता । लक्षी तत्वता हरणसंधि ॥ ४२ ॥ अंतःपुरा बाहेर येती । तरी ते संधि साधिली जाती । कोण्याप्रकारें सुंदर युवती । आपुले हातीं चढेल ॥ ४३ ॥ ऐसा मन्मथें केला समळ । न फवे एकान्तसुख अळुमाळ । कामसंभ्रमें चित्त व्याकुळ । लोटी निष्कळ पळ घटिका ॥ ४४ ॥ अर्जुन धैर्याचा पर्वत । अक्षय अभंग प्रतापवंत । कामें बळिष्ठें केला भ्रमित । न सुचे वृत्तान्त मग कांहीं ॥ ४५ ॥ स्नान संध्या कीं तर्पण । यतिवरवेषी आपण पूर्ण । गृहीतवेषाचें आचरण । नोहे आठवण ते कांहीं ॥ ४६ ॥ ऐसा विह्वळ सुभद्रावेधें । स्मरज्वराच्या संतापखेदें । तापला असतां मग प्रारब्धें । अघटितसाध्य तें घडलें ॥ ४७ ॥

महत्यां देवयात्रायां रथस्थां दुर्गनिर्गताम् । जहारानुमतः पित्रोः कृष्णस्य च महारथः ॥ ९ ॥

महा थोर रैवताचळीं । मात्रा मिनली पर्वकाळीं । तो उत्साह पहावया सकळी । आली मंडळी यादवांची ॥ ४८ ॥ यादवांचीं अंतःपुरें । गजरथयानीं निघालीं गजरें । भोंवतें क्षरक वीर भारें ।

वाजती तुरें सोत्साहें ॥ ४९ ॥ सुभद्रा ऐसिये अवसरीं । आरूढोनियां रहंवरीं । द्वारकादुर्गाहूनि बाहेरी । वनिताभारीं निघाली ॥ ५० ॥ द्वारकावासी नागरजन । यात्राप्रसंगें चारी वर्ण । परिवारें थोर लहान । करिती स्मरण पथ क्रमितां ॥५१॥ भोंवती महावीरांच्या घरटी । शूर प्रतापी महाहटी । पदातिहयगज-रथांच्या थापी । शस्त्रें मुष्टी लखलखिती ॥५२॥ मार्गीं चालती स्थिर स्थिर । तंव संन्यासी अर्जुनवीर । निकट सुभद्रारहंवर । देखोनि जर्जर स्मरबाणें ॥ ५३ ॥ अर्जुनाचें मनोगत । पूर्वीच कृष्णासी होतें विदित । देवकीवसुदेवां वृत्तान्त । तेणें गुप्त सूचविला ॥ ५४ ॥ यती नव्हे हा पृथातनय । अर्जुननामा पाण्डव तृतीय । सुभद्राहरणीं लक्षूनि समय । खगेन्द्रन्यायें टपतसे ॥ ५५ ॥ ऐसी कृष्ण करितां सूचना । देवकीवसुदेवांच्या मना । गोष्टी मानली हें श्रीकृष्णा । अंतःकरणीं जाणवलें ॥ ५६ ॥ तदनुमतें तिये काळीं । रथस्था सुभद्रा वेल्हाळी । हरिता जाला प्रतापशाळी । वीरमंडळीमाजूनी ॥ ५७ ॥ खगेन्द्र जैसा अमृतकुंभ । तैसा अवचित अमरेन्द्रडिम्भ । सुभद्रारथीं वळंघूनि क्षोभ । दावी स्वयंभ वीरश्रीचा ॥ ५८ ॥ चडकणा मारूनि वीरां करींचें । इपुधिकार्मुक हरिलें साचें । मंडळ भेदूनियां यादवांचें । सुभद्रा घेऊनि निघाला ॥ ५९ ॥ अर्जुन प्रतापी महारथ । पवनवेगें आक्रमी पथ । ठाकूं पाहे इंद्रप्रस्थ । तंव जाला आक्रान्त यदुभारीं ॥ ६० ॥ सुभद्रेचिया सहचरी । सखिया अनुचरी किंकरी । म्हणती हरिली वसुदेवकुमरी । नव नोवरी यतीश्वरें ॥ ६१ ॥ दंड कमंडलु भिरकाविला । इपुधि इष्वास पराजिला । अकस्मात रथीं चढला । घेऊनि गेला कुमरीतें ॥ ६२ ॥ ऐशा किंकरी दीर्घस्वरें । हाहाकार करिती गजरें । ऐकूनि वीर रक्षक सारे । लोटले निकरें धांवणिया ॥ ६३ ॥

रथस्थो धनुरादाय शूरांश्चारुन्धतो भटान् । विद्राव्य क्रोशतां स्वानां स्वभागं मृगराडिव ॥ १० ॥

म्हणती केवढें नवल जालें । बोडकें संन्यासी कामें भ्रमलें । नोवरी घेऊनियां पळालें । आतां विटंबिलें जाईल ॥ ६४ ॥ डोई बोडूनि घेतला जोग । मग कां इच्छावा वनितासंग । तस्मात् न चुके प्रारब्धभोग । छी थू जग मग करिती ॥ ६५ ॥ ऐसे वरवाळले वीर । म्हणती सुभद्रा नेतो चोर । धरा बांधा अतिसत्वर । मारा क्रूर शरघातें ॥ ६६ ॥ उभा रे उभा कोठें पळसी । कामिनीहारक कोंवि संन्यासी । आरूढ पतन पावलासी । तव वधीं आम्हांसि दोष नसे ॥ ६७ ॥ ऐसा सुभटीं रोधिला रथ । भोंवते वर्षती शरजीमूत । एक म्हणती हें अनाथ । सुभद्रा घेऊनि सोडा हो ॥ ६८ ॥ दंड कमंडलु फडकें जगवें । याचें वैभव हें आघवें । राजकन्येतें हरूनि न्यावें । हें कां जीवें या रुचलें ॥ ६९ ॥ आपुला न पाहतां सरिपाड । वनिताहरण मानिलें गोड । न पुरे कामसुखाचें कोड । काळे तोंड वृथा जाहलें ॥ ७० ॥ ऐसी वल्गना परस्परें । भंवते वीर करिती गजरें । तंव अर्जुनें वाग्दोरे । निजचरणाग्रें सांवरिले ॥ ७१ ॥ सज्जूनि चाप घेतलें करीं । शरजीमूत वारिला शरीं । निजरथ रोधित्या वीरांवरी । स्वयें शरधारीं वर्षोनी ॥ ७२ ॥ बाणें छेदिल्या कोदंडयष्टी । खिळिल्या उदितायुधांच्या मुष्टी । वर्मीं खोंचले प्रतापजेठी । देऊनि पाठी मग पळती ॥ ७३ ॥ एक एका म्हणती स्थिर । पळों नका धरा धीर ।

एक म्हणती महावीर । नोहे यतिवर केवळ हा ॥ ७४ ॥ अर्जुन पिटूनि घातले मागें । कोणी न पवती सुभद्रालागें । मग निघाला लागवेगें । कथिती अवघे बळभद्रा ॥ ७५ ॥ म्हणती राया संकर्षणा । यतिवर नव्हे तो वीरराणा । सुभद्रा हरिली आंगवणा । समराङ्गणा उठावला ॥७६॥ वीर भेदिले तिखट बाणीं । धनुर्विद्येचा अपर तरणी । करचापल्या न पुरे कोणी । पडले धरणी महारथ ॥ ७७ ॥ स्वजन भोंवते आक्रोश करिती । वीर शरधारीं वर्षती । तयां मधूनि प्रतापमूर्ती । गेला युवती घेऊनी ॥ ७८ ॥ भोंवती श्वानें भुंकती गजरीं । तयां न गणूनि जयापरी । मृगेन्द्र जैसा स्वभाग हरी । येणें नोवरी तेंवि हरिली ॥ ७९ ॥ यदुकुळशौर्या लाविली लाज । वीरश्रीचें दाविलें चोज । सुभद्रा हरिली घालूनि पैज । केलें निस्तेज रामकृष्णां ॥ ८० ॥ वृथा आमुच्या छप्पन्न कोटी । वीरश्रीगर्व वाहती पोटीं । सुभद्रा हरूनि यतिवर कपटी । गेला पाठी पाहोनी ॥ ८१ ॥

तच्छ्रुत्वा क्षुभितो रामः पर्वणीव महार्णवः । गृहीतपादः कृष्णेन सुहृद्भिश्चान्वशाम्यत ॥ ११ ॥

तें ऐकूनियां बळभद्र । क्षोभला जैसा प्रळयरुद्र । कीं पूर्ण पूर्णिमे जेंवि समुद्र । तेंवि अनावर सरोष ॥ ८२ ॥ करकराटें खावूनि दाढा । हातीं वसिला प्रचंड मेढा । म्हणे बोडका यती बापुडा । कोठें मजपुढें जाईल ॥ ८३ ॥ संवर्तनामा पराजिला हळ । अपर सौनंद मुसळ । कल्पान्त होतां कृतान्तकाळ । तेंवि तत्काळ उठाविला ॥ ८४ ॥ नेत्रद्वारें निघती ज्वाळ । नासारंध्रें धूम्रकल्लोळ । हें देखूनि भक्तवत्सळ । आला गोपाळ सान्तवना ॥८५॥ कृष्णें येऊनि तत्क्षणीं । माथा ठेविला ज्येष्ठा चरणीं । प्रार्थिता जाला मधुर वचनीं । तें सज्जनीं परिसावें ॥ ८६ ॥ म्हणे भो भो श्रीबळरामा । तुमचा अगाध ऐश्वर्यमहिमा । नावगमेचि आगननिगमां । तो तूं आम्हां सुलभ सखा ॥ ८७ ॥ ब्रह्माण्ड सगळें वाहसी मुकुटीं । त्या तव कोपाची सकोप भृकुटी । कवण साहों शकेल सृष्टी । मनुष्यनटीं जरी नटसी ॥ ८८ ॥ अमरेन्द्राच्या कैपक्षासी । आणि भूभार उतरावयासी । जन्म धरिला यादववंशीं । तें मानसीं आठविजे ॥ ८९ ॥ स्वधर्माचें संस्थापन । आणि साधुसंरक्षण । दुर्जनाचें निबर्हण । इतुकें कारण अवतरणा ॥ ९० ॥ जेणें सुभद्राहरण केलें । त्यातें नाहीं ओळखिलें । म्हणूनि क्रोधाचें भरतें आलें । तें उपसंहरिलें पाहिजे ॥ ९१ ॥ कुढाविला जो अमरेन्द्र । तो हा प्रत्यक्ष अर्जुन वीर । पितृष्वसेचा तृतीय कुमर । सुहृद साचार जिवलग हा ॥ ९२ ॥ आणिक एक ऐकें मात । परमगुह्य जो वृत्तान्त । जेणें होय दोषलिप्त । तो संकेत अवधारीं ॥ ९३ ॥ सुभद्रा जन्मली यादवां घरीं । परि हे शची पौरंदरी । यास्तव अर्जुनालागिं वरी । बिघड न करीं पैं यांचा ॥ ९४ ॥ इचा करिसी मनोभंग । तरी हे करील स्वतनुत्याग । तेणें अपकीर्तीचा डाग । लागल्या अभंग मग न वचे ॥ ९५ ॥ भो भो स्वामी संकर्षणा । तुझे अंतरींची वासना । सुभद्रा द्यावी दुर्योधना । ते अर्जुना केंवि दीजे ॥ ९६ ॥ तरी तूं ऐकें इये विशीं । सुरेन्द्र जाणोनि अर्जुनासी । इनें वरिला निश्चयेंसीं । दुर्योधनासी हे न वरी ॥ ९७ ॥ कलिपुरुषाचा अवतार । तो हा प्रत्यक्ष गान्धार । सुभद्रा याचा न शिवे कर । हा

निर्धार मी जाणं ॥ ९८ ॥ बलात्कारें अघटित घडतां । सुभद्रा करील आत्मघाता । कृष्णें ऐसें स्मरण देतां । रामें तत्वता जाणितलें ॥ ९९ ॥ प्रबळ क्षोभला जरी अग्नि । तो उपशमे अनिन्धनीं । तेंवि कृष्णाच्या विवेकवचनीं । प्रशान्त मनीं बळ जाला ॥ १०० ॥ भोज अंधक दाशार्ह मधु । जिवलग आप्त सुहृद बंधु । तिहीं प्रार्थूनि करुणासिन्धु । केला सावध बळभद्र ॥ १ ॥ मग म्हणे भो जनार्दना । अर्जुनें केलें सुभद्राहरणा । त्यातें आणिजे द्वारकाभुवना । विध्युक्तलग्ना करावया ॥ २ ॥ वसुदेवदेवकी कृष्ण राम । म्हणती विचार हाचि उत्तम । वाढवूनियां सुहृदप्रेम । विवाहसंभ्रम करावा ॥ ३ ॥ पुढें पाठवूनियां अक्रूर । स्थिर केला अर्जुन वीर । स्वयें जावूनि मग बळभद्र । आणिला सादर निजभुवना ॥४॥ द्वारके माजि परमोत्साह । कनिष्ठ भगिनीचा विवाह । रामकृष्णांहीं सुहृत्समूह । आणूनि केला स्नेहभरें ॥ ५ ॥ उद्धव प्रद्युम्न धाडूनि मूळ । धर्म भीम पृथा यमळ । द्रौपदीसहित आणिले सकळ । सृञ्जय पाञ्चाळ मत्स्यादि ॥ ६ ॥ विध्युक्त पुण्याहवाचन । केलें देवकप्रतिष्ठापन । महर्षिमंत्रें लागलें लग्न । नान्दीविधानपूर्वक पैं ॥ ७ ॥ याचकां दिधल्या कनकाञ्जली । अहेरीं सुहृदांची मंडळी । गौरवूनियां भूमंडळीं । कीर्ति भरिली बळकृष्णीं ॥ ८ ॥ अन्नोदकें त्रिजग तृप्त । उपायनीं सुहृद आप्त । धनीं वसनीं संतृप्त । केली लुप्त दुराशा ॥ ९ ॥ विवाहोत्सव दिवस सोळा । केला द्वारके माजि सोहळा । सवें घेऊनि सुभद्रा बाळा । अर्जुन निघाला स्वपुरातें ॥ ११० ॥ तिये समयीं पारिबर्ह । रामें दिधले पदार्थ सर्व । ते निरोपी योगिराव । सावध स्वयमेव अवधारा ॥ ११ ॥

प्राहिणोत्पारिबर्हाणि वरवध्वोर्मुदा बलः । महाधनोपस्करेभरथाश्वनरयोषितः ॥ १२ ॥

वधूवरांतें संतोपकर । हर्षें आंदण दे बळभद्र । धनें गोधनें कार्त्तस्वर । पदार्थ समग्र मूलाढ्य ॥१२॥ अश्व गज रथ दास दासी । चारु चपला चातुर्यराशी । अजा अविकें गायी महिषी । उपकरणासी बहु दिधलें ॥ १३ ॥ अंगीकारूनि पाण्डवीं । पर्णूनि सुभद्रा यादवी । निघतां सुहृदीं आप्तीं सर्वीं । यथागौरवीं गौरविले ॥ १४ ॥ पाण्डव गेले शक्रप्रस्था । ऐसी सुभद्रा लाधली पार्था । आणीक श्रीकृष्णाची कथा । परीक्षितीप्रति शुक सांगे ॥ १५ ॥ तें परिसावी श्रोतृजनीं । भाषा हरिवरद-व्याख्यानीं । जैसें वदवी चक्रपाणी । दयार्णववाणी तेंचि वदे ॥ १६ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ कृष्णस्यासीद्द्विजश्रेष्ठः श्रुतदेव इति श्रुतः ।
कृष्णैकभक्त्या पूर्णार्थः शान्तः कविरलम्पटः ॥ १३ ॥

शुक म्हणे गा मात्स्यीरमणा । श्रुतदेवनामक द्विजवर कृष्णा । प्रियतम प्राणांहूनही जाणा । मिथिलापट्टणामाजि वसे ॥ १७ ॥ अनन्यभावें श्रीकृष्णभक्ति । अव्यभिचारी भजनासक्ति । एकनिष्ठ श्रीपदरति । तृष्णा चित्तीं आन नसे ॥ १८ ॥ जागृत होऊनि उषःकाळीं । आह्निकाचारें भजनशाळी । अहरह आराधी वनमाळी । जीव कां हेळी नभोगामी ॥ १९ ॥ कृष्णभक्तीचा मात्र स्वार्थ । इतुकेन

नित्यत्वें पूर्णार्थ । विषयलोभाचा अनर्थ । स्वप्नीं पदार्थ तो न शिवे ॥ १२० ॥ वनिता वनजाक्षी वालभें । भजत असतां मन्मथक्षोभें । लंपट नोहेचि जेंवि नभें । प्रावृट्गर्भें न लिंपिजे ॥ २१ ॥ विरक्त विवेकी शान्त दान्त । विषयीं अनासक्त उपरत । संशयरहित विपश्चित । सर्वदा संतृप्त स्वानंदें ॥ २२ ॥ ऐसा श्रुतदेवनामा द्विज । श्रुत सर्वत्र पूज्यापूज्य । भजनप्रेमें अधोक्षज । ज्यावरी सहज संतुष्ट ॥ २३ ॥

स उवास विदेहेषु मिथिलायां गृहाश्रमी । अनीहयागताहार्यनिर्वर्त्तितनिजक्रियः ॥ १४ ॥

तो द्विज विदेहदेशान्तरीं । सुखसंतोषें मिथिळापुरीं । गृहस्थाश्रमीं निवास करी । विहिताचारीं अयाचित ॥ २४ ॥ जीविकार्थ ईहारहित । श्रीकृष्णभजनीं ईहावंत । अनुद्यमें अकस्मात । जें आहारार्थ संपादे ॥ २५ ॥ तितुकियामध्यें सदाचार । अतिथिपूजनीं अत्यादर । श्रौतस्मार्तक्रियापर । यजी सुर पितर प्रति पक्षीं ॥ २६ ॥

यात्रामात्रं त्वहरहर्दैवादुपनमत्युत । नाधिक तावता तुष्टः क्रियाश्चक्रे यथोचिताः ॥ १५ ॥

भजनाचरणीं तत्पर गात्र । राहे तितुकी यात्रामात्र । शरीरनिर्वाह अहोरात्र । होय निरंतर जितुकेनी ॥ २७ ॥ प्राप्त जालिया अयाचित । स्वीकरी इतुकें मात्र परिमित । सहसा अधिक न करी स्वार्थ । नियमवंत तपोधन ॥ २८ ॥ नित्यनैमित्तिक उपासना । करी यथोक्त क्रियाचरणा । सदा संतुष्ट राखी मना । विषयवासना खंडूनी ॥ २९ ॥ ऐसा श्रुतदेव द्विजसत्तम । तैसाचि तेथील नृपोत्तम । कृष्णभजनीं ज्या दृढनियम । ऐक नाम त्याचेंही ॥ १३० ॥

तथा तद्राष्ट्रपालोऽङ्ग बहुलाश्व इति श्रुतः । मैथिलो निरहंमान उभावप्यच्युतप्रियौ ॥ १६ ॥

अंग ऐसिया संबोधनें । संबोधूनि नृपाकारणें । हरिभक्तांच्या सद्गुणकथने । संतुष्टमनें कथितसे ॥ ३१ ॥ मिथिलदेशींचा मैथिळनृपति । बहुलाश्वनामा विस्तृतकीर्ति । स्वराष्ट्रपाळक करुणामूर्ति । निरहंकृति निर्मद जो ॥ ३२ ॥ बहुलाश्व नृप श्रुतदेव मुनी । दोघेही सादर अच्युतभजनीं । यालागिं अच्युताप्रिय म्हणोनी । शुक वाखाणी उत्साहें ॥ ३३ ॥ त्यांतें जाणोनि सप्रेमळ । करुणावत्सल श्रीगोपाळ । तद्दर्शना उतावीळ । जाता जाला तें ऐका ॥ ३४ ॥

तयोः प्रसन्नो भगवान्दारुकेणाहृतं रथम् । आरुह्य साकं मुनिभिर्विदेहान्प्रययौ प्रभुः ॥ १७ ॥

त्या दोघांच्या भजनप्रेमें । प्रसन्नवदनें मेघश्यामें । षड्गुणवंतें पूर्णकामें । दारुका नियमें गुज कथिलें ॥ ३५ ॥ तेणें सन्नद्ध केला रथ । सवेग श्रेष्ठ मुनिजनांसहित । आरूढ होऊनि द्वारकानाथ । जाता जाला तद्देशा ॥ ३६ ॥ विदेहदेश बहु पत्तनें । पृथक्प्रान्तदेशाभिधानें । शुकें वाखाणिलीं बहुवचनें । श्रीभगवानें तीं क्रमिलीं ॥ ३७ ॥ प्रभु म्हणिजे स्वेच्छावंत । षड्गुणसंपन्न श्रीभगवंत । हृदयीं

स्मरूनि आपुले भक्त । सप्रेमभरित स्वयें गेला ॥ ३८ ॥ तिये काळीं समागमें । मुनि नेले पुरुषोत्तमें । सादर ऐकें तयांचीं नामें । जीं स्मरतां नियमें अघहंतीं ॥ ३९ ॥

नारदो वामदेवोऽत्रिः कृष्णो रामोऽसितोऽरुणिः । अहं बृहस्पतिः कण्वो मैत्रेयश्च्यवनादयः ॥ १८ ॥

नारद वामदेव आत्रि च्यवन । कण्व बृहस्पति द्वैपायन । अरुणि भार्गवराम सर्वज्ञ । असित मैत्रेय शुक तो मी ॥ १४० ॥ इत्यादि शिष्यप्रशिष्यभार । सवें घेऊनि द्वारकेश्वर । मार्ग क्रमितां स्थिर स्थिर । दर्शना सादर जन येती ॥ ४१ ॥

तत्र तत्र तमायान्तं पौरा जानपदा नृप । उपतस्थुः सार्घहस्ता ग्रहैः सूर्यमिवोदितम् ॥ १९ ॥

मुनिसंगें क्रमितां पंथ । जे जे प्रान्तीं प्रवेशे रथ । ते ते प्रान्तींचे जन समस्त । सह नृपनाथ पुढें येती ॥ ४२ ॥ सप्रेम साष्टांग करिती नमनें । स्तुतिस्तवनें उपस्थानें । सूर्योदयीं अर्थदानें । विप्ररत्नें जेंवि करिती ॥ ४३ ॥ उपायनें तैसिये परी । घेऊनि सादर अर्पिती हरी । ग्रहचक्रेंसि जेंवि तमारी । तेंवि मुनिभारीं जगदात्मा ॥ ४४ ॥ मार्गीं लागले देश बहुत । त्यांमाजि मुख्य पांच सात । जाणावया नामसंकेत । वदला समर्थ तें ऐका ॥ ४५ ॥

आनर्त्तधन्वकुरुजाङ्गलकङ्कमत्स्यपांचालकुन्तिमधुकेकयकोसलार्णाः ।
अन्ये च तन्मुखसरोजमुदारहासस्निग्धेक्षणं नृप पपुर्दृशिभिर्नृनार्यः ॥ २० ॥

आनर्त्तदेश द्वारकाप्रान्तीं । धन्वदेशांची लंघिली क्षिती । कुरुविषयींच्या प्रजा येती । स्वदेशा श्रीपती पातलिया ॥ ४६ ॥ जाङ्गलदेशींचे प्रजाजन । अर्पिती उपायनें संपूर्ण । कंकान्वयीं चाऱ्ही वर्ण । अर्चिती भगवान भवहंता ॥ ४७ ॥ मत्स्यदेशींचा जो नृपनाथ । पुढें येऊनि प्रजांसहित । उपायनीं श्रीभगवंत । अर्चीं यथोक्त उपचारीं ॥ ४८ ॥ पुढें पाञ्चाळविषया येतां । सोमकांसहित प्रजा समस्ता । पाञ्चाळनृपति श्रीभगवंता । अर्चीं घेऊनि समवेत ॥ ४९ ॥ कुन्ति कैकेय मधु कोसळ । अर्णप्रमुख देश बहळ । अर्चिती अभिगमनें गोपाळ । सुकृतशीळ सप्रेमें ॥ १५० ॥ ऐसे अनेकदेशवासी । सन्निध येतां हृषीकेशी । सादर लक्षूनि तद्वदनासी । तृषितां नयनीं प्राशिती ॥ ५१ ॥ तें हरिमुखसरोज कैसें । सुस्निग्धेक्षण प्रमुदित हासें । विराजमान प्रेमोल्लासें । उदार भासुर भगणपवत् ॥ ५२ ॥ तृपितां नयनीं नारीनर । प्राशिती होऊनि अति सादर । अमृतकिरणा जेंवि चकोर । किंवा मधुकर नवकंजा ॥ ५३ ॥ तयां सादर निरीक्षकां । अक्षय सुखलाभ तोही ऐका । क्षालन होय कलिमलपंका । संशय शंका मग न वसे ॥ ५४ ॥

तेभ्यः स्ववीक्षणविनष्टतमिस्रदृग्भ्यः क्षेमं त्रिलोकगुरुरर्थदृशं च यच्छन् ।
शृण्वन्दिगन्तधवलं स्वयशोऽशुभघ्नं गीतं सुरैर्नृभिरगाच्छनकैर्विदेहान् ॥ २१ ॥

फुल्लारमान मुखसरोज । भगवंताचें तेजःपुंज । निजावलोकनीं लक्षितां सहज । निरसली निस्तेज तमोदृष्टि ॥ ५५ ॥ तमिस्राविनष्टदृष्टिमंतां । त्रिजगज्जनकापासूनि तत्त्वता । म्हणाल विशेष लाभ कोणता । तोही आतां अवधारा ॥ ५६ ॥ क्षेम म्हणिजे अक्षय अभय । त्रिजगज्जनक देता होय । तत्त्वज्ञान जें अर्थदृढ्मय । स्वलाभसोय स्ववीक्षणीं ॥ ५७ ॥ आपणा पाहतयां इतुकें फळ । देऊनि मुनींसह श्रीगोपाळ । कैसा मार्ग क्रमी केवळ । तेंही अळुमाळ अवधारा ॥ ५८ ॥ जें दिग्वलयधवळीकृत । नरसुरमुनिवरप्रमुखीं गीत । स्वयश अघघ्न परमोर्जित । तें ऐकत होत्साता ॥ ५९ ॥ शनैः शनैः मुनिसंगती । मार्ग क्रमूनियां श्रीपती । पावला विदेहदेशांप्रती । वार्ता पुरस्थीं ऐकूनियां ॥ १६० ॥ अच्युताकारणें पूजावया । श्रद्धापूर्वक ते गुरुराया । सम्मुख दृष्टी देखोनियां । करिती क्रिया त्या ऐका ॥ ६१ ॥

तेऽच्युत प्राप्तमाकर्ण्य पौरा जानपदा नृप । अभीयुर्मुदितास्तस्मै गृहीतार्हणपाणयः ॥ २२ ॥

आला अच्युत हें देखोन । समस्त मिथिळापुरींचे जन । आदिकरूनि चारी वर्ण । आले घेऊन उपायनें ॥ ६२ ॥ परमानंदें उल्लासभरित । अच्युतासम्मुख येऊनि त्वरित । पूजासामग्री सर्व पदार्थ । हस्तीं घेऊनि सप्रेमें ॥ ६३ ॥

दृष्ट्वा त उत्तमश्लोक प्रीत्युत्फुल्लाननाशयाः । कैर्धृताञ्जलिभिर्नेमुः श्रुतपूर्वास्तथा मुनीन् ॥ २३ ॥

देखूनि उत्तमश्लोकाप्रति । आननें प्रफुल्लित पंकजाकृति । आशय म्हणिजे विकसिता चित्तीं । नमिती श्रीपती सद्भावें ॥ ६४ ॥ कितीएकांहीं बद्धाञ्जली । मौळें सहित चरणकमळीं । चिरकाळ ठेवूनियां वनमाळी । नमूनि हृत्कमळीं निवाले ॥ ६५ ॥ पूर्वीं ऐकिला जैसा महिमा । तैसिया देखूनि पुरुषोत्तमा । केवळ निजजनकल्पद्रुमा । सेवूनि श्रमा आंचवले ॥ ६६ ॥ तयाचि परी मुनिवर्यांतें । नमिते जाले सप्रेमचित्तें । भू भिजविली प्रेमाश्रुपातें । सात्त्विकावस्थे पावूनियां ॥ ६७ ॥ असो नागरजनांची कथा । येतां ऐकूनि श्रीभगवंता । उल्लास श्रुतदेवाच्या चित्ता । मिथिळानाथा सह ऐका ॥ ६८ ॥

स्वानुग्रहाय संप्राप्त मन्वानौ तं जगद्गुरुम् । मैथिलः श्रुतदेवश्च पादयोः पेततुः प्रभो. ॥ २४ ॥

आपुल्या अनुग्रहाकारणें । भगवंताचें मिथिळे येणें । उभयतां मानिते जाले मनें । बहुलाश्व आणि श्रुतदेव ॥ ६९ ॥ ऐसिया मानूनि जगद्गुरूतें । उभयतांहीं सप्रेमचित्तें । प्रभूचे चरणीं ठेविले माथे । स्वसुखामृतें निवाले ॥ १७० ॥ मस्तकीं चर्चूनि चरणधूळी । सभाग्य मानिली वंशावळी । विलंबें उठूनि हृदयकमळीं । श्रीवनमाळी दृढ धारिला ॥ ७१ ॥

न्यमन्त्रयेतां दाशार्हमातिथ्येन सह द्विजैः । मैथिलः श्रुतदेवश्च युगपत्संहताञ्जली ॥ २५ ॥

सप्रेमभरित अंतःकरणें । एकेच समयीं आमंत्रणें । दीधलें भगवंताकारणें । मुनिवर्यगणें समवेत ॥ ७२ ॥ बहुलाश्व नृपति मिथिळेश्वर । तपस्वी श्रुतदेव द्विजवर । कृताञ्जलि प्रार्थनापर । जाले सादर एकसमयीं ॥ ७३ ॥ मुनिगणें सहित चक्रपाणी । एकेच समयीं दोघे जणीं । अर्चना आतिथ्यें करूनी । स्वगृहालागूनी प्रार्थियला ॥ ७४ ॥

भगवांस्तदभिप्रेत्य द्वयोः प्रियचिकीर्षया । उभयोराविशद्गेहमुभाभ्यां तदलक्षितः ॥ २६ ॥

तंव तो षड्गुणैश्वयवंत । मायालाघवी श्रीभगवंत । जाणोनि दोघांचें हृद्गत । नटला त्वरित द्वयरूपें ॥ ७५ ॥ अंतरंगीं स्वभक्तांची । प्रार्थना अंगीकारूनि साची । जाणोनि तयांच्या हृदयींची । प्रेमोत्कंठा सर्वज्ञें ॥ ७६ ॥ तयांचें प्रिय तें करावयाचे । इच्छेकरूनि द्वयरूपाचें । नाट्य नटला हें मायेचें । लाघव कोण्हा न लक्षतां ॥ ७७ ॥ उभयतांचे हृदयींचा भाव । जे आमुचे घरा देवाधिदेव । आधीं पातला हा उत्सव । गगनीं स्वयमेव न सांठवे ॥ ७८ ॥ मी ब्राह्मण अकिंचन । मजवरी तुष्टोनि जनार्दन । आधीं ठाकिलें माझें सदन । म्हणोनि प्रसन्न हृत्कमळीं ॥ ७९ ॥ माझिया गृहाहूनि अन्यत्र । नाहींच गेला कमळामित्र । यास्तव भगवत्कृपेचें पात्र । जालों स्वतंत्र मी एक ॥ १८० ॥ तैसाचि मानी मिथिलेश्वर । प्रेमळ तपस्वी ब्राह्मण थोर । त्याहूनि आधीं मम मंदिर । कृपेनें श्रीधर प्रवेशला ॥ ८१ ॥ अन्यत्र माझिया सदनाहून । नाहींच गेला जनार्दन । ऐसिया भावें नृपाचें मन । सुखसंपन्न सप्रेमें ॥ ८२ ॥ पूर्वीच उभयतां ही अधिकारी । साधनचतुष्टयसंपत्ति पुरी । सप्रेमभक्ति अव्यभिचारी । प्रत्ययकारी ज्या आंगीं ॥ ८३ ॥ यास्तव त्यांतें भगवन्महिमा । निश्चयें आला वयुनावगमा । तदुत्साहें मानिती गरिमा । जैं पातला स्वधामा श्रीकान्त ॥ ८४ ॥ येऱ्हवीं जात्यंधाच्या घरीं । प्रकट प्रकटलिया तमारी । प्रकाशप्रतीति तयाच्या नेत्रीं । कीं अंतरीं प्रकटेना ॥ ८५ ॥ ज्यातें कळला स्पर्शमहिमा । तो आयसीं प्रकटी हेमा । पाषाणप्रतीति दुर्भगा अधमा । त्या तत्प्रेमा अनोळख ॥ ८६ ॥ तेंवि बहुलाश्व आणि श्रुतदेव । भगवत्प्रेमगौरव । म्हणोनि स्वधामा गमनोत्सव । मानिती अपूर्व सुखलाभ ॥ ८७ ॥ दुर्लभ लाभ मानिती पोटीं । तेंचि प्रकटी शुक वाक्पुटीं । परीक्षितीच्या श्रवणपुटीं । श्रोतीं ते गोष्टी परिसावी ॥ ८८ ॥

श्रोतुमप्यसतां दूराञ्जनकः स्वगृहागतान् । आनीतेष्वासनाग्र्येषु सुखासीनान्महामनाः ॥ २४ ॥

असज्जनांसी महिमा ज्याचा । श्रवणाकारणें दूरतर साचा । मग कोठूनि स्पर्शेल वाचा । अधिकार कैंचा दर्शनीं त्यां ॥ ८९ ॥ ऐसे दुर्लभतर ईश्वर । स्वगृहा आले हरिमुनिवर । त्यांतें जनक मिथिळेश्वर । जाला सादर अभिगमनें ॥ १९० ॥ दंडवत प्रणाम करूनि भावें । सप्रेम आलिंगूनि आघवे ।

सभास्थानीं आणूनि बरवे । दिव्यासनीं बैसतील ॥ ९१ ॥ स्वसुखें उपविष्ट आसनीं । ऐसियांतें देखूनि नयनीं । आनंदला जनक मनीं । महामानस यास्तव तो ॥ ९२ ॥

प्रवृद्धभक्त्या उद्धर्षहृदयास्राविलेक्षणः । नत्वा तदङ्घ्रीन्प्रक्ष्याल्य तदपो लोकपावनीः ॥ २८ ॥

अनेकजन्मांचे शेवटीं । दुर्लभ लाभ मानूनि पोटीं । प्रेमोत्कर्ष ब्रह्माण्डघटीं । न सांठवत उचंबळला ॥ ९३ ॥ तया हर्षोत्कर्षें करून । मानस जालें प्रत्यक्प्रवण । सात्विकाष्टकें हरिलें स्मरण । प्रवृत्तिभान पारुपलें ॥ ९४ ॥ आनंदाश्रु लोचनीं स्रवती । उभारल्या रोमाञ्चपंक्ती । स्फुंदन कांपवी गात्रांप्रती । पुलकस्वेद स्वरभंगें ॥ ९५ ॥ ऐसें सात्विकाष्टकाचें भरतें । आंगीं जिरवूनियां मागुतें । उदया येतां प्रवृत्तीतें । भगवंतातें विलोकिलें ॥ ९६ ॥ माथा ठेवूनि सर्वां चरणीं । प्रवर्तला पादार्चनीं । मग तें हरिपादप्रक्षाळवणी । धरिलें मूर्धनीं सकुटुंबें ॥ ९७ ॥ लोकत्रयासि पावनकर । हरिपदप्रक्षालनोद्भव नीर । मौळीं वाहे श्रीशंकर । दुर्लभतर तें मानी ॥ ९८ ॥ ऐसें पदजल वंदूनि माथां । जाहला मुनींसह हरि अर्चिता । तें तूं परिसें कौरवनाथा । सप्रेम कथा भक्तांच्या ॥ ९९ ॥

सकुटुम्बो वहन्मूर्ध्ना पूजयाञ्चक्र ईश्वरान् । गन्धमाल्याम्बराकल्पधूपदीपार्घगोवृषैः ॥ २९ ॥

केवळ ईश्वर ते मुनिवर । तयांसहित कमलावर । पूजिता जाहला मिथिलेश्वर । दिव्योपचार अर्पूनियां ॥ २०० ॥ करवी दिव्याम्बरें परिधान । दिव्यगंधविलेपन । दिव्यसुमन समर्पून । धूप दीप उजळियेले ॥ १ ॥ अर्घपाद्यपूर्वक ऐसी । सपर्या धेनुवृषार्पणेसीं । नैवैद्य समर्पूनि षड्रसीं । त्रयोदशगुणीं ताम्बूल ॥ २ ॥ सफळदक्षिणा नीराजनें । मुकुटीं वाहूनि दिव्य सुमनें । प्रदक्षिणा अभिवंदनें । नमनें स्तवनें स्तुतिपाठ ॥ ३ ॥

वाचा मधुरया प्रीणन्निदमाहान्नतर्पितान् । पादावङ्कगतौ विष्णोः संस्पृशञ्शनकैर्मुदा ॥ ३० ॥

ऐसी सपर्या करूनि नृपति । अमृतप्राय अन्नें तृप्ति । पाववियेलें तयांप्रति । आसनीं निगुती बैसवूनी ॥ ४ ॥ अमृतातें ही परतें सर । म्हणे ऐसी वाचा मधुर । तियेंकरूनि वाक्यें रुचिर । मिथिलेश्वर स्वयें वदे ॥ ५ ॥ सप्रेमप्रीति उपजे पोटीं । ऐसिया सुरसा मधुर गोष्टी । प्रियकर रुचिरा वदोनि वोठीं । बोले वाक्पुटीं हें वचन ॥ ६ ॥ श्रीविष्णु जो रुक्मिणीकान्त । त्याचे चरण अंकीं धृत । हळु हळु संवाहन करित । आनंदभरित होत्साता ॥ ७ ॥ काय वचन बोलिला कैसें । तें ही कुरुवर्या परियेसें । भगवंताचीं ऐकतां यशें । पातक न वसे मग निकटीं ॥ ८ ॥

॥राजोवाच॥ भवान्हि सर्वभूतानामात्मा साक्षी स्वदृक्प्रभो । अथ नस्त्वत्पदाम्भोजं स्मरतां दर्शनं गतः ॥३१॥

हीति निश्चयेंकरूनि साचा । तूं आत्मा या सर्व भूतांचा । स्वदृक् साक्षी उपनिषद्वाचा । तव महिमेचा बडिवार ॥ ९ ॥ आत्मा म्हणिजे चेतायितार । साक्षी स्वबोधप्रकाशकर । स्वदृक् स्वप्रकाश साचार । अन्यविचार अनपेक्षी ॥ २१० ॥ ज्या कारणास्तव प्रभो समर्था । तव पादाम्बुजस्मरण-निरता । दर्शनावाप्ति होय तत्वता । हा निश्चय पुरता श्रुतींचा ॥ ११ ॥ तो आजि प्रत्यय बाणला आम्हां । कीं जें स्मरतां सदैव तुम्हां । प्रत्यक्ष देखिलें पादपद्मां । संप्राप्त सभा माजिवर्डे ॥ १२ ॥

स्ववचस्तदृतं कर्त्तुमस्मद्दृग्गोचरो भवान् । यदात्थैकान्तभक्तान्मे नानन्तः श्रीरजः प्रियः ॥ ३२ ॥

आपुलें उपनिषद्वाक्य बोलणें । सत्य करावया कारणें । मम सभाप्रति केलें येणें । गोचरपणें भगवंता ॥ १३ ॥ माझिये दृष्टीसी गोचर । जालासी भगवंता साचार । जैसा उपनिषद्वाक्योच्चार । तूं तत्पर होत्साता ॥ १४ ॥ जैसी अभेदभक्ताप्रति । समरसैकात्मबोधावाप्ति । मजकारणें प्रतीति । तैसी न लाहती अंगलगें ॥ १५ ॥ ज्येष्ठ अनंत संकर्षण । अज परमेष्ठी निजनंदन । रमा रमणी-प्रियकर पूर्ण । त्यांलागून हें न लाभे ॥ १६ ॥ मां इतरांचा कोण पाड । तव पदप्राप्ति अति अवघड । जाहली जाणोनि कोण मूढ । पुन्हा विघड करील ॥ १७ ॥

को नु त्वच्चरणाम्भोजमेवं विद्विसृजेत्पुमान् । निष्किञ्चनानां शान्तानां मुनीनां यस्त्वमात्मदः ॥ ३३ ॥

अहंता ममता ज्यांच्या ठायीं । तुजवीण निपटून उरलीच नाहीं । त्वंता तवता पाहतां तेही । केली जिहीं निःशेष ॥ १८ ॥ ऐसे पुरुष निष्किंचन । प्रशान्तवृत्ति मानसलीन । मननशीळ जे मुनि-जन । त्यां आत्मदानकर्त्ता तूं ॥ १९ ॥ आपणा देऊनि निष्किञ्चनांतें । त्यांचें सर्वस्व होऊनि पुरतें । संपादिसी तो तूं येथें । मर्त्यभुवनातें आलासी ॥ २२० ॥ मर्त्यभुवनीं तो कोण म्हणसी । तयातें येणें कोण कार्यासी । तें तूं ऐकें हृषीकेशी । तुझें तुजपासीं निवेदितों ॥ २१ ॥

योऽवतीर्य यदोर्वंशे नृणां संसरतामिह । यशो वितेने तच्छान्त्यै त्रैलोक्यवृजिनापहम् ॥ ३४ ॥

स्वयें यदुवंशीं अवतरून । वृजिनार्णवीं बुडतां जन । त्यांचें कल्याण अनुलक्षून । स्वयशा विस्तीर्ण प्रकटी जो ॥ २२ ॥ वृजिनार्णव हा भवसागर । त्यासि नाहींच पारावार । ज्याप्रति वळेंच सचराचर । अहोरात्र संचरती ॥ २३ ॥ तया संचरतया नरांसी । तारावया कारुण्यराशी । स्वयशें वृजिनार्णवाचि नाशी । जो यदुवंशीं अवतरूनी ॥ २४ ॥ राया म्हणसी स्वयश कैसें । जयाचे श्रवणें भवाब्धि नाशे । स्मरणें मननें स्वसंतोषें । जन समरसे निरंजनीं ॥ २५ ॥ तो तूं प्रत्यक्ष माजिया घरा । भाग्यें पातलासि वृष्णिप्रवरा । मी लाधलों नमनाधिकारा । उत्कृष्टतरा महालाभा ॥ २६ ॥ ऐसें म्हणूनि चतुर्थ्यंत । नामषट्कें मिथिलानाथ । नमिता जाला तो श्लोकार्थ । परिसें यथोक्त कुरुवर्या ॥ २७ ॥

नमस्तुभ्यं भगवते कृष्णायाकुण्ठमेधसे । नारायणाय ऋषये सुशान्तं तप ईयुषे ॥ ३५ ॥

कृष्णा नमूं तुजकारणें । ऐसिया मंत्रें साष्टांगनमनें । नमस्कारूनि पुढती म्हणे । तूं षड्गुणें परिपूर्ण ॥ २८ ॥ मथुरा नेली द्वारकेसी । सुधर्मा आणिली भूतळासी । ऐसा षड्गुणैश्वर्यराशी । त्या तुजकारणें नमो नमो ॥ २९ ॥ श्रेष्ठमुनि सुर ऐश्वर्यवंत । तैसाचि म्हणसी मी भगवंत । तरी त्यांचें ऐश्वर्य होय कुंठित । तूं अकुण्ठित मेधावी ॥ २३० ॥ इच्छामात्रें ब्रह्माण्डकोटी । सृजूनि पाळूनि ठेविसी पोटीं । अकुण्ठमेधावी जगजेठी । नमितों मुकुटीं त्या तुज मी ॥ ३१ ॥ सकळनरांचें आयतन । तो तूं केवळ नारायण । त्या तुजकारणें माझें नमन । अहंममएनःशमनार्थ ॥ ३२ ॥ तूं त्रिजगाचा करणपति । तुझेनि करणां ज्ञानप्रवृत्ति । प्रत्यक्प्रवण करणवृत्ति । कर्त्ता निगुती ऋषिवर्य तूं ॥ ३३ ॥ महर्षींच्या करणवृत्ति । तुझेनि त्यां प्रवृत्ति निवृत्ति । महर्षीतें ही ऋष्यकशक्ति । देता निश्चिती ऋषिवर्य तूं ॥३४॥ यालागिं ऋषिवरा तुजकारणें । नमन माझें अनन्यपणें । सुष्ठु शान्तत्व तुझें वाखाणे । वेदवदनें ब्रह्माण्डीं ॥ ३५ ॥ तपःसंपन्न सुशान्तता । तुझ्या ठायीं श्रीभगवंता । जाणोनि विद्यमान तत्वता । तुजकारणें नमितों मी ॥ ३६ ॥ इत्यादिनमनें करूनि काय । प्रार्थनेचा अभिप्राय । पुससी तरी तोही कथिताहें । सदयहृदया भगवंता ॥ ३७ ॥

दिनानि कतिचिद्भूमन्गृहान्नो निवसन्द्विजैः । समेतः पादरजसा पुनीहीदं निमेः कुलम् ॥ ३६ ॥

परब्रह्मा भो यदुमणी । कांहीं दिवस आमुच्या सदनीं । मुनींसहित निवास करूनी । निमीचें कुळ हें पूत करीं ॥ ३८ ॥ मुनींसह आपुल्या पदरजीं । पावन करीं अन्वयराजी । मिथिळावासी तव पदपंकजीं । भजोनि भावें उद्धरती ॥ ३९ ॥ ऐसा भगवान बहुलाश्व नृपें । प्रार्थिला प्रणयपूर्वक साक्षेपें । प्रणतपाळ प्रणतकृपें । कळवळूनि मान्य करी ॥ २४० ॥

इत्युपामन्त्रितो राज्ञा भगवान्लोकभावनः । उवास कुर्वन्कल्याणं मिथिलानरयोषिताम् ॥ ३७ ॥

जो जगज्जनका जन्मविता । लोकभावना त्या भगवंता । मिथिळेश्वरें संप्रार्थितां । राहता जाला तत्सदनीं ॥ ४१ ॥ मिथिळावासी ज्या नरनारी । स्वदर्शनें स्पर्शनें हरी । त्यांचें कल्याण सर्वां परी । सर्वदा करीत होत्साता ॥ ४२ ॥ तेंचि मिथिळेचें कल्याण । जियेमाजि कल्याणमंडित जन । येऱ्हवीं अकल्याणाचें आयतन । कीं तें श्मशान न म्हणावें ॥ ४३ ॥ मंगलायतन जो श्रीहरी । तो जे स्थिरावला नगरीं घरीं । तेथींच्या कल्याणमय नरनारी । कीं न ते पुरी कल्याणमयी ॥ ४४ ॥ सूर्ये केलें तमोनाशन । तेंवि कृष्णें मिथिलाभुवन । स्ववासें कल्याणमय संपूर्ण । केलें जाण परीक्षिति ॥४५॥ अद्यापि साधकजनमंडळी । हृदयीं स्थिरावितो वनमाळी । कल्याणमय ते तेचि काळीं । होती सकळी स्वगुणेंसीं ॥ ४६ ॥ तस्मात नृपाचा भाग्योदय । कीं जेणें प्रार्थितां कमलाप्रिय । तेथ वसूनि कल्याणमय । करी अन्वय मिथिळेसीं ॥ ४७ ॥ ऐसा मुनिजनमंडळीसहित । मिथिळेमाजी श्रीभगवंत ।

राहोनि विदेह कल्याण भरित । केला वृत्तांत तो कथिला ॥ ४८ ॥ तैसाचि श्रुतदेवाच्या सदना । अपररूपें द्वारकाराणा । गेलिया उत्साह द्विजाच्या मना । जाला कथना त्या ऐका ॥ ४९ ॥

श्रुतदेवोऽच्युतं प्राप्तं स्वगृहान्जनको यथा । नत्वा मुनीन्सुसंहृष्टो धुन्वन्वासो ननर्त ह ॥ ३८ ॥

द्विजांमाजि प्रेमळपणीं । उपासकां शिरोमणी । सत्कर्माच्या सदाचरणीं । चक्रपाणिपरायण ॥२५०॥ अच्युत प्राप्त स्वगृहातें । जाणोनि श्रुतदेव सप्रेम चित्तें । मुनींसह नमिता जाला आर्ते । मिथिळानाथें जिया परी ॥ ५१ ॥ आनंद कोंदला त्द्दयकमळीं । सप्रेम नमूनि मुनिमंडळी । नाचे आनंदें धुमाळी । वसन करतळीं झेलूनी ॥ ५२ ॥ चामराकार निजाङ्गवस्त्र । नाचे उडवूनियां सर्वत्र । पूर्ण आनंदरसाचें पात्र । जाहला स्वतंत्र श्रुतदेव ॥ ५३ ॥ त्यानंतरें सप्रेमभरीं । मुनींसह अर्ची कैसा हरी । तें परिसावें श्रोतीं चतुरीं । शुकवैखरीव्याख्यान ॥ ५४ ॥

तृणपीठबृसीष्वेतानानीतेषूपवेश्य सः । स्वागतेनाभिनन्द्याङ्घ्रीन्सभार्योऽवनिजे मुदा ॥ ३९ ॥

तृणासनीं पीठासनीं । कृष्णें साहित मुनींच्या श्रेणी । बैसविल्या गृहा आणूनी । स्वागतवचनीं गौरवूनियां ॥ ५५ ॥ जाणोनि पतीच्या मनोगता । साध्वी भार्या पतिव्रता । नमिती जाहली सह भगवंता । गृहसंप्राप्ता तपोधनां ॥ ५६ ॥ पूर्णकलशीं आणूनियां पाणी । त्यांतूनि उपपात्रीं घेऊनी । कान्त हरिपदप्रक्षालनीं । रिघतां गृहिणी जळ वोती ॥ ५७ ॥ रातोत्पलदलसमान मृदुळ । श्रीकृष्णाचें चरणतळ । भाग्यें द्विजाचें करकमळ । मर्दितां कोमळ तळपताती ॥ ५८ ॥ तेणेंचि न्यायें मुनींचे चरण । सप्रेम प्रक्षाळी ब्राह्मण । साध्वी करीं जळ घेऊन । करी सेचन शनैः शनैः ॥ ५९ ॥ मृदुळवचनीं करूनि स्तुती । आजि धन्य जाहलों म्हणती । लाधलों श्रीचरणांची प्राप्ती । न तुळे सुकृती शतक्रतु ॥ २६० ॥ समस्तसंपदवाप्तिबीजें । तियें स्वामींचीं चरणाम्बुजें । आपत्कुळाच्या दहनकाजें । ब्रह्माग्नितेजें प्रकटलीं हीं ॥ ६१ ॥ अगाध अपार भवसागर । ज्याचा न चोजवे पर पार । तन्निस्तरणीं सेतु सधर । पदपांसुनिकर स्वामींचा ॥ ६२ ॥ अंधतामिस्रहारकभानु । कीं अभीष्टार्थदा कामधेनु । समस्ततीर्थांचें पवित्रीकरणु । तें पदरेणु स्वामीचें ॥ ६३ ॥ माझी अन्वयपरंपरा । लाहतां स्वामींच्या पदपांसुनिकरा । पावन जाली हा प्रत्यय खरा । मम अंतरा बाणला ॥ ६४ ॥ क्षाळूनि मुनींसह भगवच्चरण । मृदुलवचनें करूनि स्तवन । मग तें पादोदक घेऊन । प्रमुदित ब्राह्मण काय करी ॥ ६५ ॥

तदंभसा महाभाग आत्मानं सगृहान्वयम् । स्नापयाञ्चक्र उद्धर्षो लब्धसर्वमनोरथः ॥ ४० ॥

मग त्या पादोदकें विप्र । स्वगृहकलत्रपुत्र मित्र । सहित समस्तही स्वगोत्र । सेचनें पवित्र करी हर्षें ॥ ६६ ॥ पदजलस्नान घालूनि सर्वां । लब्ध हर्षोत्कर्ष जीवा । माजि न संटे मनीं अघवा ।

मनोरथार्थ उपलब्ध ॥ ६७ ॥ अभीष्टमनोरथ लाधलों आजी । जे स्वामिपदाब्जरजीं । सुस्नात कुटुम्ब सान्वयराजी । निष्पाप सहजीं निजभाग्यें ॥ ६८ ॥ ऐशिया लाभें प्रमुदित पूर्ण । ब्राह्मण करी मग पूजन । श्रोतीं होऊन सावधान । तें व्याख्यान परिसावें ॥ ६९ ॥

फलार्हणोशीरशिवामृतांबुभिर्मृदा सुरभ्या तुलसीकुशाम्बुजैः ।
आराधयामास यथोपन्नया सपर्यया सत्वविवर्द्धनान्धसा ॥ ४१ ॥

पूजासंभार सिद्ध केले । ते श्रीशुकें जैसे कथिले । तैसे अनुक्रमें वाखाणिले । जाती वहिले तें ऐका ॥ २७० ॥ चूत कदळें बदरें पनसें । नारिकेळें कपित्थें सुरसें । जंबु जंबीरें अननसें । शेवें शेपें आमळक ॥ ७१ ॥ इत्यादि अनेकफळसंभार । छात्रीं करितां वनसंचार । अनायासें ते समग्र । इक्षुदंडादि आणिले ॥ ७२ ॥ शिवा म्हणिजे राजधात्री । तियेचीं फळें प्रिय सर्वत्रीं । सहज संपादिलीं जीं छात्रीं । वनसंचारीं परिभ्रमतां ॥७३॥ यावरी सुगंधद्रव्यजाती । मृदाशब्दें वेधवती । प्रकट कस्तूरी जियेतें म्हणती । आणि संपत्ति वनोद्भवा ॥ ७४ ॥ कमळें कुश तुळशी पवित्रा । उशीर मूळिका सुगंधतरा । पंचामृतादि सुस्वादु नीरा । पूजासंभारा आणूनी ॥ ७५ ॥ ऐसे संभार यथोपपन्न । परोपतापरहित जाण । संपादिले तिहीं करून । अर्चीं भगवान सप्रेमें ॥ ७६ ॥ पादावनेजन पूर्वींच कथिलें । त्यावरी पूजन आरंभिलें । तें ही जातसे निरूपिलें । श्रवण केलें पाहिजे ॥ ७७ ॥ करूनि पादपूजा प्रथम । मग अर्चितसे पुरुषोत्तम । वसनाभरणें उत्तमोत्तम । स्मरूनि अक्षता वाहिलिया ॥ ७८ ॥ ब्रह्मसूत्र वाहिलें कंठीं । चंदन रेखियला ललाटीं । पुष्पावतंस खोविले मुकुटीं । मलयजउटी चर्चियली ॥ ७९ ॥ कंठीं घातले सुमनहार । वरी उधळिला परिमळ धूसर । धूप दीप सकर्पूर । बहुप्रकार आरतिया ॥ २८० ॥ जेणें सत्वाची वृद्धि होय । आयुः सत्व बळ निरामय । सुखतम आणि रसाळ प्रिय । ते रससोय वोगरिली ॥ ८१ ॥ दिव्यपक्वान्नें अमृतोपमें । तृणधान्याचीं उत्तमोत्तमें । सत्वशुद्धीचीं मुनिसत्तमें । अतिसप्रेमें रुचविलीं ॥ ८२ ॥ ऐसा नैवेद्य अर्पूनि हरि । आंचवणार्थ सुतप्त वारी । केशरकस्तूरी चंदन करीं । करोद्वर्तना मर्दविला ॥ ८३ ॥ सूक्ष्म सपूर श्वेत वसनें । परिमार्जूनि करतळवदनें । सभास्थानीं समाधानें । बैसते जाले मुनिवर्य ॥ ८४ ॥ मध्यें बैसला घननीळ । भवंता मुनिवर्यांचा मेळ । फळें अर्पिलीं रुचिरें बहळ । दीधलें ताम्बूल सकळांतें ॥ ८५ ॥ काया वाचा मन धन सदन । दक्षिणे करूनि कृष्णार्पण । यथाशक्ति भूरि हिरण्य । अर्पूनि मुनिजन तोषविले ॥ ८६ ॥ कर्पूर नीराजन उजळिले । मंत्रपुष्पा समर्पिलें । प्रदक्षिणा करूनि केलें । अभिवंदन पोष्यें सीं ॥ ८७ ॥ अपराधाचें क्षमापन । करवी अंजलिपुट जोडून । अमृतवचनीं केलें स्तवन । आजि मी धन्य म्हणे आपणा ॥ ८८ ॥ ऐसा पूजूनि चक्रपाणी । ब्राह्मण आनंदभरित मनीं । वितर्क करी अंतःकरणीं । तो सज्जनीं परिसावा ॥ ८९ ॥

स तर्कयामास कुतो ममान्वभूद्गृहान्धकूपे पतितस्य सङ्गमः ।
यः सर्वतीर्थास्पदपादरेणुभिः कृष्णेन चास्यात्मनिकेतभूसुरैः ॥ ४२ ॥

मग तो श्रुतदेव ब्राह्मण । मानसीं वितर्क करी पूर्ण । कोण्या महत्सुकृतें करून । मज सन्निधान हें जाहलें ॥ २९० ॥ माझा अधिकार निजमानसें । मी च विवरूनि पहातसें । गृहान्धकूपीं पतित दिसें । त्या मज ऐसें सन्निधान ॥ ९१ ॥ सच्चिदानंदा अनुपलब्धि । मनःसंकल्पें तरळली बुद्धि । धांवे करणांचे पाणधी । विषयासिद्धिप्रलोभें ॥ ९२ ॥ यालागिं अंधाधिषणानयन । न लाहती उपनिषद्बोधाञ्जन । नुदेजतां गुर्वर्क पूर्ण । अंध वयुन निजस्मृतीचें ॥ ९३ ॥ घोर निशीथ अंधकूपीं । तो हा भवभ्रम संसाररूप । गृहासक्तिगृहिणीस्तनप । पोष्य धनधान्यपश्वादि ॥ ९४ ॥ मी ऐसिये अंधकूपीं । पडिलों अहंताममताजल्पीं । आत्मविसरें मनःसंकल्पीं । बद्ध त्रितापीं जाचतसें ॥ ९५ ॥ ऐसिया अंधकूपीं पतिता । मज हा दुर्लभ संगम आतां । प्राप्त जाला पैं अवचिता । कोणा सुकृतास्तव न कळे ॥ ९६ ॥ दुर्लभ संगम तो कोणता । ऐसी शंका कीजेल श्रोतां । तरी जो वदला श्रीशुकवक्ता । तेंचि आतां अवधारा ॥ ९७ ॥ सर्वतीर्थांचें माहेर । तो जयाचा पदपांसुनिकर । केवळ भूतळींचे निर्जर । निवासमंदिर कृष्णाचें ॥ ९८ ॥ तया भूसुरांसहित कृष्ण । अकस्मात माझें सदन । प्रवेशूनि कल्मषदहन । केलें सन्निधान देऊनी ॥ ९९ ॥ शतक्रतूचे तुलने वारी । ऐसा संगम नर निर्जरीं । न भोगिजे तो बैसल्या घरीं । कवणे परी मज घडला ॥ ३०० ॥ ऐसे वितर्क वारंवार । करूनि विस्मय करी फार । दुर्लभ संग सुखाचा भर । सेवनीं सादर तें ऐका ॥ १ ॥

सूपविष्टान्कृतातिथ्यान्श्रुतदेव उपस्थितः । सभार्यस्वजनापत्य उवाचाङ्घ्र्यभिमर्शनः ॥ ४३ ॥

सप्रेम आतिथ्य केलें ज्यांचें । सुष्ठु आसनीं उपविष्ट साचे । निकट बैसूनि चरण त्यांचे । मर्दी सभार्य स्वजनेंसीं ॥ २ ॥ श्रुतदेव ब्राह्मण सप्रेमभरित । सन्निध बैसला एकाग्रचित्त । भार्यापत्यां स्वजनांसहित । चरण मर्दी कृष्णाचे ॥ ३ ॥ ऐसा चरणसंवाहनीं । सादर असतां मंजुळवाणी । बोलता जाला तें सज्जनीं । सावध श्रवणीं परिसावें ॥ ४ ॥

॥ श्रुतदेव उवाच ॥ नाद्य नो दर्शनं प्राप्तः परं परमपूरुषः ।
यर्हीदं शक्तिभिः सृष्ट्वा प्रविष्टो ह्यात्मसत्तया ॥ ४४ ॥

म्हणे भो भो भोगशयना । भवभजनीया भवभंजना । भगणपवंशा भासुरवदना । भद्रारमणा भगवंता ॥ ५ ॥ तुझें दर्शन आजीच आम्हां । जाहलें म्हणों जरी पुरुषोत्तमा । तरी हें पूर्वींच आगमा निगमां । कथितां महिमा जाणतसों ॥ ६ ॥ करणनिकरा अगोचर । जो तूं प्रकृतीहूनियां पर । त्या तव स्वरूपाचा पार । नेणती विधिहरमुनिवर ही ॥ ७ ॥ तथापि नेणती हें न म्हणावें । निगम सुगमत्वें करिती ठावें । तेव्हां वास्तव तत्व आघवें । मादृशजीवें जाणिजतें ॥ ८ ॥ प्रधानाचेनि अंगीकारें । शुद्धसत्वाच्या आविष्कारें । पूर्णचैतन्यपद उभारे । तैं त्वां ईश्वरें जागोनी ॥ ९ ॥ न रमे एकाकी हे वाणी । बहुत्व व्हावें हे शिराणी । तैं स्वशक्ती सत्वादिगुणीं । विश्व सृजूनि उभारिसी

॥ ३१० ॥ तया विश्वीं स्वसत्ताप्रविष्ट । तैंचि गोचर गोगणां प्रकट । आजीच दर्शन जालें स्पष्ट । म्हणतां नीट न घडे कीं ॥ ११ ॥ विश्वीं प्रविष्ट जाहलासि जेव्हां । तैंच फावला दर्शनठेवा । आजीच दुर्लभ लाभ म्हणावा । कां पां केशवा तें ऐक ॥ १२ ॥ आजीच नव्हसी दर्शन प्राप्त । विश्वं विष्णुःहा नामसंकेत । महर्षिमुखें मादृशां विदित । तैं अप्राप्तदर्शन कें ॥ १३ ॥ तस्मात दर्शन पूर्वींच आहे । पैं तें भ्रामक मायामयें । झांकिलें विषयांच्या प्रवाहें । आत्मप्रत्ययें कवळेना ॥ १४ ॥ तो तूं आजी परमपुरुष । मुनिजनेंसीं निजात्मतोष । मूर्त होऊन गोगणांस । फावसी विशेष हा येथ ॥ १५ ॥ कृषीवळें क्षेत्रीं उत्पन्न जोंधळा । कोंभ करबाड ग्रंथि पाला । पोटरा कणिस फुलवरा आला । एवं सगळा यावनाळ ॥ १६ ॥ ऐसियाचें दर्शन जालें । तरी काय यावनाळा न देखिलें । परंतु मूळीं बीज विरूढलें । निर्धारिलें तें न वचे ॥ १७ ॥ यालागिं पाहतां हा अन्वय । तूंचि विश्वात्मा विश्वमय । परं म्हणिजे उत्कृष्ट सोय । दर्शनलाभ आजि या ॥ १८ ॥ कस्तूर्यादिसुरभिवस्तु । माजि जडत्वें सौरभ्य स्वस्थु । तैसाचि पोतासही पदार्थु । घनीभूत अवघाची ॥ १९ ॥ वर्ण नयनांतें गोचर । सौरभ्य घ्राणातें रुचिकर । नाम श्रवणाचा व्यापार । जाणे रसभर रसना ही ॥ ३२० ॥ त्वगिन्द्रियासी शीतळ स्पर्श । एवं पंचधा करणां दृश्य । म्हणतां शनैः शनैः अदृश्य । होय निःशेष अगोचर ॥ २१ ॥ तेंवि चैतन्य घनीभूत । केवळ सच्चिदानंद मूर्त । यादववंशीं श्रीभगवंत । दर्शना प्राप्त दुर्लभ पैं ॥ २२ ॥ मायिक सृष्टि मिथ्याभूत । तेथ आत्मा नित्य सत्य । प्रविष्ट जाला हा वृत्तान्त । ऐक दृष्टान्त देहींचा ॥ २३ ॥

यथा शयानः पुरुषो मनसैवात्ममायया । सृष्ट्वा लोकं परं स्वाप्नमनुविश्यावभासते ॥ ४५ ॥

जैसा शयनीं निद्रित पुरुष । मनःसंकल्पें विश्वाभास । अविद्याभ्रमें सृजूनि अशेष । तदनुप्रविष्ट भासतसे ॥ २४ ॥ अथवा आत्मा तूं ईश्वर । तुझिये मायेकरूनि अपर । स्वप्नींची सृष्टि भासे पर । सत्य साचार जीवातें ॥ २५ ॥ तये सृष्टीचा अभिमानी । स्वप्नींचा लोक विलोकूनी । तदनुप्रविष्ट आपणा मानी । हर्षग्लानी अनुभूत ॥ २६ ॥ परी ते मिथ्या स्वाप्नसृष्टी । स्वप्नामाजि यथार्थ दृष्टि । तूं ही तैसिये परिपाटीं । विश्वपटीं प्रविष्टवत् ॥ २७ ॥ यास्तव तुझें तें दर्शन । जालें असतां न जालें जाण । म्हणोनि आजि दुर्लभ पूर्ण । मजलागून हा लाभ ॥ २८ ॥ दुर्लभ लाभ मज हा जाला । तैसा नोहेचि आणिकाला । साधनसंपन्ना साधकाला । तो तूं गोपाळा अवधारीं ॥ २९ ॥

श्रृण्वतां गदतां शश्वदर्चतां त्वाऽभिवन्दताम् । नृणां संवदतामन्तहृदि भास्यमलात्मनाम् ॥ ४६ ॥

श्रवणनिष्ठ जे तव भक्त । तव पदप्रेमें भवविरक्त । त्यां तव दर्शन ध्यानीं प्राप्त । अमळचित्त म्हणोनियां ॥ ३३० ॥ एवं तव गुणगणव्याख्याते । साधनधनसंपन्न विशुद्धचित्तें । तव दर्शन ध्यानीं

त्यांतें । ध्यानीं एकान्तें फावतसे ॥ ३१ ॥ एक तव पदसपर्यानिरत । विषयप्रवाहीं निःशेष विरत । चित्तशुद्धिद्वारा प्राप्त । त्यां तव एकान्त हृत्कमळीं ॥ ३२ ॥ एक अन्वयबोधशाळी । सर्वभूतीं तव निहाळी । वंदनासक्त करूनि मौळी । प्रेमकल्लोळीं विराजती ॥ ३३ ॥ एक सम्यक् बरव्या परी । उपनिषद्वाक्यांचिया विवरीं । आत्मप्रत्ययें परस्परीं । अमळान्तरीं संवादती ॥ ३४ ॥ ऐसिया अमळान्तरा नरां । साधनसंपन्ना भक्तनिकरां । ध्यानींच दर्शनलाभ पुरा । प्रत्यक्ष न घडे मज ऐसा ॥ ३५ ॥ मजला प्रकट तव दर्शन । अकस्मात रिघोनि सदन । दुर्लभ हाचि पूर्ण । जे प्रत्यक्ष गोगण सेवितसे ॥ ३६ ॥ सुखसंवादें सनाथ केलें । वियोगभेदातें निरसिलें । आत्मबोधें आनंदविलें । तें मी बोलें काय वदूं ॥ ३७ ॥ जरी तूं म्हणसी भो यदुवीरा । विश्वहृदयस्थ ईश्वरा । ध्यानीं दर्शन अमळान्तरा । सूर्यजलधरा समसाम्यें ॥ ३८ ॥ मेघें पिहित ज्याचे नयन । सूर्य न त्या प्रकाशमान । ज्यांची दृष्टि न रोधी घन । साङ्ग विकर्त्तन ते पाहती ॥ ३९ ॥ तैसीच येथ जीवोपाधि । अविद्यात्मक विपरीतबुद्धि । चिदाभासाचें वयुन रोधी । दर्शनसिद्धि तैं कैंची ॥ ३४० ॥ अविद्यावरणाचा निरास । विपरीतभ्रमा तैं होय नाश । तरी हें न घडे सर्वगतास । एकदेशित्व आरोपिलें ॥ ४१ ॥ अविद्याभ्रमा माजिही काये । आत्मयावीण प्रकाशक आहे । तरी दर्शनावाप्ति होये । एका न होय कां म्हणसी ॥ ४२ ॥ यदर्थीं ऐकें भो श्रीधरा । देहात्मवंता श्रुतिज्ञा चतुरां । हृदयस्थ असोनि दूरतरा । कर्मठां नरां तूं अससी ॥ ४३ ॥

हृदिस्थोऽप्यतिदूरस्थः कर्मविक्षिप्तचेतसाम् । आत्मशक्तिभिरग्राह्योऽप्यन्त्युपेतगुणात्मनाम् ॥ ४७ ॥

वेद त्रैगुण्यविषयात्मक । पूर्वपक्षींच्या श्रुति सम्यक । विवरूनि विश्वस्त फळकामुक । करिती मख बहुविध पैं ॥ ४४ ॥ अपरोक्ष आत्मा हृदयस्थ असतां । उपनिषद्बोध न बाणे चित्ता । फलाभिलाषें क्रतुसुकृता । संपादितां न शिणती ॥ ४५ ॥ इंद्र अग्नि सूर्य सोम । वरुणप्रमुख यथाकाम । यजिती पृथग्देवतानाम । मंत्रपठनें नममान्त ॥ ४६ ॥ तयां फळदाता तूं श्रीहरि । भाससी लोकलोकान्तरीं । श्रुतिविश्वासें अंतरीं । प्रतीति पुरी अवगमिती ॥ ४७ ॥ हृदयस्थ आसोनि दूरतर । तयां जाहलासि तूं ईश्वर । स्वपदप्रणतां निकटतर । असतां दूर अवगमसी ॥ ४८ ॥ हृदयस्थ आणि दूर कैसा । म्हणसी तरी ऐकें परेशा । आत्मशक्ति करूनि सहसा । अप्राप्य म्हणूनि दूरतर ॥ ४९ ॥ आत्मा म्हणिजे अंतःकरण । तच्छक्ति त्या करणगण । तिहीं ग्राह्य विषयभान । त्या कोट्टन तव प्राप्ती ॥ ३५० ॥ ऐसियाही अप्राप्तिवंतां । सप्रेमळ श्रीपदप्रणतां । श्रवणादि नवविधभजनासक्तां । निकट तत्वता तूं होसी ॥ ५१ ॥ हेंचि प्रमेय विस्तारून । पुढती श्लोकें वक्ष्यमाण । चतुर्थ्यंत करूनि नमन । वदला ब्राह्मण तें ऐका ॥ ५२ ॥

नमोऽस्तु तेऽध्यात्मविदां परात्मने अनात्मने स्वात्मविभक्तमृत्यवे ।
सकारणाकारणलिङ्गमीयुषे स्वमायया ऽसंवृतरुद्धदृष्टये ॥ ४८ ॥

तुजकारणें प्रणाम माझा । असो भो श्रीगरुडध्वजा । द्विविध भावी तयांतें सहजा । निकट दूरी द्विधात्मका ॥ ५३ ॥ अध्यात्मवेत्ते अपरोक्षज्ञ । निरसनि देहात्माविद्यावरण । परमात्मा तूं प्रतीयमान । केला आपण होत्साते ॥५४॥ तयां कारणें परमत्मत्वें । प्रतीयमान तूं आत्मतत्वें । अविद्यावरणनाशासवें । कीं मोक्षद म्हणावें लागतसे ॥ ५५ ॥ तया परमात्मया तुजकारणें । माझें नमन अनन्यपणें । अभेदबोधें निकट म्हणणें । लागे काय यावरीही ॥ ५६ ॥ अनात्मत्वेत्ते दूरतर । भेदभ्रमें ज्यां आत्मविसर । तयांतें प्रतीतिगोचर । मृत्युसंसारभयभेदें ॥ ५७ ॥ भेदभ्रमें भांबावले । दृश्य सत्यत्वें भाविलें । तेथ जीवत्वें परिणमलें । त्या जीवचैतन्या तुज नमो ॥ ५८ ॥ माया कार्य अविद्यावरण । यालागिं अविद्या सकारण । स्वरूप स्वसंवेद्य परिपूर्ण । माया अकारण यास्तव पैं ॥ ५९ ॥ भेदभ्रमासि अवसर नाहीं । यालागिं अकारण माया पाहीं । देहीं लिंगीं दोहीं ठायीं । द्विधा उपाधी माजिवडा ॥ ३६० ॥ सकारणा अकारणा । उभयलिंगोपलब्धा पूर्णा । तुज नमो श्रीजनार्दना । उभयपणा नियमितया ॥६१॥ आपणा पासुनि उभयोपाधी । त्या उभयां वश्य जो बोधाबोधीं । तया जीवात्मया मी वंदीं । विभक्त-प्रबोधीं मृत्युमया ॥ ६२ ॥ स्वमायेसि तूं अनावृत । यालागिं तूं नियंता श्रीभगवंत । स्वमायेकरूनि असंवृत । ऐसें संबोधी श्रुतिनिकर ॥ ६३ ॥ स्वमायेचें अनावरण । ज्यातें तो तूं श्रीभगवान । यालागीं अलुप्तैश्वर्यपूर्ण । नियंता म्हणोन मायेचा ॥ ६४ ॥ मायानियंतया तूतें । माझें नमन भो पूर्णातें । मायासंवृतां जीवांतें । दृष्टिरोधका तुज नमन ॥ ६५ ॥ देहात्मजीवात्मप्रत्ययवंत । तो नियम्य ही तूंचि येथ । ईश्वर नियंता समर्थ । त्या तुज प्रणत नियंतया ॥ ६६ ॥ ऐसिया परीच्या परमेश्वर । नमन माझें भो ईश्वरा । शिक्षीं आम्हां भृत्यनिकरा । आज्ञा करा सेवेची ॥ ६७ ॥ काय मी करूं तव सेवन । ऐसें कीजे आज्ञापन । इतुकें श्रुतदेवें प्रार्थून । बोलिला वचन तें ऐका ॥ ६८ ॥

स त्वं शाधि स्वभृत्यान्नः किं देव करवामहे । एतदन्तो नृणां क्लेशो यद्भवानक्षगोचरः ॥ ४९ ॥

पूर्वोक्तपरीचा तूं ईश्वर । नाव्यें नव्हसी मानवी नर । यास्तव माझा नमस्कार । प्रार्थना सादर अवधारीं ॥ ६९ ॥ आम्हां भृत्यां शिक्षित करीं । नियोजूनि यथाधिकारीं । करणीय कथावें तें शिरीं । धरूं श्रीहरि निर्धारें ॥ ३७० ॥ मर्त्यालागिं तोंवरी क्लेश । जवंवरी तुझा हा सगुणवेश । गोचर नोहे इंद्रियांस । तंववरी अशेष भवदुःख ॥ ७१ ॥ तूं जरी अक्षगोचर भगवंत । तेव्हांचि भवक्लेशासि अंत । भाग्यें केलें मज सनाथ । कृपावंत होऊनियां ॥ ७२ ॥ इतुकी श्रुतदेवें प्रार्थना । सप्रेम केली जनार्दना । तें शुकें नृपासि कथूनि जाणा । वक्ष्यमाणा निरूपी ॥ ७३ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ तदुक्तमित्युपाकर्ण्य भगवान्प्रणतार्तिहा ।
गृहीत्वा पाणिना पाणिं प्रहसंस्तमुवाच ह ॥ ५० ॥

शुक म्हणे गा कौरवाग्रणी । ऐकूनि द्विजाची विनवणी । बोलता जाला चक्रपाणी । तें तूं श्रवणीं अवधारीं ॥ ७४ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न । यालागिं नामें श्रीभगवान । प्रणतजनांचा आर्तिहरण । हास्यवदनें बोलतसे ॥ ७५ ॥ स्वहस्तें ब्राह्मणाचा हस्त । धरूनि तोषवी त्या प्रशस्त । वाक्यें वदला तीं समस्त । ऐकें

समोक्त नृपनाथा ॥ ७६ ॥ महर्षि ब्रह्मनिष्ठ भले । आपणा सवें सदना आले । तुल्यभावें सम्मानिले । परि स्तवनें तोषविले आपणया ॥ ७७ ॥ प्रश्नादिकें सम्मुखीकरण । आपणा केलें हें जाणोन । दीर्घदर्शी श्रीभगवान । प्रश्नविवरण करूनि वदे ॥ ७८ ॥ स्वभृत्यातें शिक्षा करीं । ऐसें वदली द्विजवैखरी । तदनुसार शिक्षी हरी । तें रहस्य चतुरीं जाणावें ॥ ७९ ॥ आपुल्या ठायीं अधिकतर । देखूनि द्विजाचा परमादर । आपणाहूनि श्रेष्ठ भूसुर । शिक्षापर हें बोधी ॥ ३८० ॥ लोकसंग्रहार्थ पूर्ण । आपुलें भूचक्रीं अवतरण । आपणाहूनि पूज्य ब्राह्मण । हें अनुशासन शिक्षितसे ॥ ८१ ॥ माझे भजनीं आदर मंद । मजहूनि वरिष्ठ वेदविद । जाणोनि भजे जो साधकवृंद । त्या मी मुकुंद प्रिय मानीं ॥ ८२ ॥ साद्यंत लक्षूनि हें रहस्य । मुखीं दावूनि मंदहास्य । शिक्षारूप ब्राह्मणास । बोधी परेश तें ऐका ॥ ८३ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥ ब्रह्मंस्तेऽनुग्रहार्थाय सम्प्राप्तान्विद्धचमून्मुनीन् ।
सञ्चरन्ति मया लोकान्पुनन्तः पादरेणुभिः ॥ ५१ ॥

ब्रह्मन् ऐसिया संबोधनें । ब्राह्मणातें श्रीकृष्ण म्हणे । अनुग्रह कराया तुजकारणें । मुनींचें येणें तव सदना ॥ ८४ ॥ नारदप्रमुख महामुनी । अनुग्रहावया तुज लागुनी । प्राप्त जाले तुझिया सदनीं । अंतःकरणीं हें जाण ॥ ८५ ॥ मज हृदयस्थेंसि ऐक्य । करूनि फिरती लोक अनेक । पदरेणुहि कलिमलपंक । क्षाळूनि सम्यक पूत करिती ॥ ८६ ॥ तपस्तेजाचे केवळ तरणी । सुकृतसागर अगाधपणीं । जयांच्या दर्शनमात्रें प्राणी । कैवल्यसदनीं विराजती ॥ ८७ ॥ प्रबोधाचे कल्पतरु । कारुण्याचे सुधाकरु । शान्तिसुखाचे अकूपारु । जे साकार परब्रह्म ॥ ८८ ॥ ऐसिया मुनींतें आपुल्या सदनीं । संप्राप्त अनुग्रहार्थ जाणोनी । मजहूनी तत्पर ब्राह्मणभजनीं । मामकीं जनीं विनटावें ॥ ८९ ॥ हृदयस्थेंसि मज समवेत । अनेक लोक विलोकित । स्वसंचारें पावन करित । लोक समस्त पदरजीं जे ॥ ३९० ॥ हाचि सातां श्लोकीं स्पष्ट । महिमा वदला श्रीवैकुंठ । तीर्थ क्षेत्र देवता श्रेष्ठ । त्याहूनि वरिष्ठ द्विजवर्य ॥ ९१ ॥

देवाः क्षेत्राणि तीर्थानि दर्शनस्पर्शनार्चनैः । शनैः पुनन्ति कालेन तदप्यर्हत्तमेक्षया ॥ ५२ ॥

तीर्थें क्षेत्रें आणि देवता । दर्शनें स्पर्शनें पूजनें करितां । हळुहळूचि पवित्रता । देती तत्त्वता चिरकाळें ॥ ९२ ॥ अर्चनविधानें पूजितां देवां । यथोक्त चिरकाळ करितां सेवा । पापक्षयाचिया नांवा । श्रुतिगौरवा मेळविती ॥ ९३ ॥ श्रुतिवाक्यांचा विश्वास जयां । ते मानिती पापक्षया । केवळ अविपश्चितां प्राणियां । अप्रत्यया ना तरणें ॥ ९४ ॥ स्नानें पानें स्पर्शनाचमनें । तीर्थें करिती पातकदहनें । हा विश्वास श्रुतींच्या वचनें । परि प्रत्यय बाणणें दुर्लभ कीं ॥ ९५ ॥ मुखें स्तवितां स्पर्शमणी । लोह न पालटी स्पर्शें करूनी । तेंवि तीर्थांची माहात्म्यवाणी । दुष्टाचरणीं न पालटतां ॥ ९६ ॥ दरिद्र न वचता लक्ष्मीवंत । म्हणतां जनपद उपहासित । तेंवि वृथा प्रायश्चित्त । पूर्वाचरित न मोडतां ॥ ९७ ॥ तीर्थीं केलीं प्रायश्चित्तें । न पालटती पूर्वाचरितें । यथापूर्व सकामचित्तें । वर्त्तती त्यांतें कैं शुद्धि ॥ ९८ ॥ तैसींच श्रेष्ठें पुण्यक्षेत्रें । सदोषीं आलोकिलिया नेत्रें । दोष झडती दर्शनमात्रें । ऐसीं स्तोत्रें महिमेचीं ॥ ९९ ॥ तेचि क्षेत्रीं जार चोर । दुष्ट दुराचारी पामर । वसती त्यांचा अघसंहार । कां पां सत्वर न

करिती तीं ॥ ४०० ॥ तरी काय त्यांचा महिमा लटिका । ऐसी न वदे शास्त्रपीठिका । जैं भाग्यें ये दैवघटिका । तैं होय सुटिका सदोषियां ॥ १ ॥ म्हणाल घटिका कोण ते येथ । सावध परिसा तो वृत्तान्त । अर्हत्तमांचा अपांगपात । भाग्यें अकस्मात जैं लाहती ॥ २ ॥ जेंवि नृपाच्या अभयपत्रीं । पुरीं पट्टणीं वार्धुषमात्रीं । वस्तु आणितां ग्राहकीं नेत्रीं । पाहतां सर्वत्रीं घेयिजती ॥ ३ ॥ तेंवि श्रुतींच्या प्रशस्ता वचनीं । दर्शनस्पर्शनार्चना मुनी । येती त्यांचिया अवलोकनीं । अधिष्ठीं जनीं उद्धरिजे ॥ ४ ॥ एवं देवता क्षेत्रें तीर्थें । चिरकाळ सेवितां निष्ठावंतें । तेथेंही पूज्यांच्या अपांगपातें । फळती सुकृतें अघनाशें ॥ ५ ॥ परद्रव्याविषीं जे अंध । परस्त्रीविषीं केवळ षंढ । परापवादकथनीं तोंड । वेडमूक जयांचें ॥ ६ ॥ सत्य सन्मात्र जे समदर्शी । ऋतभाषणी श्रुति-विश्वासी । आत्मवेत्ते विवेकराशी । योगाभ्यासी मनोजयी ॥ ७ ॥ ऐसियांचे पदरजःकण । दुर्लभ तीर्थक्षेत्रां लागून । पदरजीं कें करिती पावन । ऐसें चिंतन तीं करिती ॥ ८ ॥ प्राणप्रतिष्ठादि श्रुतींच्या मंत्रीं । जिहीं देवता प्रतिमामात्रीं । प्रतिष्ठिजती तीर्थीं क्षेत्रीं । ज्यांची अघहंत्री पदधूळी ॥ ९ ॥ चैतन्यरूपी सर्वग एक । त्या मज देवताभेद अनेक । करूनि प्रतिष्ठिती सम्यक । तेथ निष्टंक मी प्रकटें ॥ ४१० ॥ यालागिं तयांचा मी दास । लंघूं न शकें तद्वचनांस । ब्राह्मणवचनीं ज्यां विश्वास । तेही विशेष मज पूज्य ॥ ११ ॥ जिये क्षेत्रीं जे तपिन्नले । त्यांच्या तपस्तेजें तें भलें । तीर्थक्षेत्र वाखाणिलें । तें बोलिलें अर्हत्तम ॥ १२ ॥ ऐसियांचिया अवलोकनें । तीर्थें क्षेत्रें देवायतनें । करूं शकती दोषदहनें । तियें द्विजरत्नें पूज्यतमें ॥ १३ ॥ म्हणसी पूज्यतम ब्राह्मण । श्रेष्ठ कर्मठ तपोधन । श्रुतदेवा हें सहसा न म्हण । जन्मापासून मंगळ ते ॥ १४ ॥

ब्राह्मणो जन्मना श्रेयान्सर्वेषां प्राणिनामिह । तपसा विद्यया तुष्ट्या किमु मत्कलया युतः ॥ ५३ ॥

प्राणिमात्रांहूनि वर । जन्मापासूनि द्विजशरीर । सर्वजीवांसि श्रेयस्कर । निर्जरपितरमुनि-प्रमुखां ॥ १५ ॥ जन्म पावतांचि ब्राह्मण । समस्त तोषती पितृगण । सावित्रजन्में सर्वमुनिजन । आल्हादती द्विजाचिया ॥ १६ ॥ दारपरिग्रहानंतर । दैक्षजन्में यज्ञाधिकार । होतां तोषती निर्जर । एवं द्विजवर पूज्यतम ॥ १७ ॥ सावित्रजन्में तपश्चर्या । दैक्षजन्में त्रैविद्यया । निष्कामकर्में संतुष्टधिया । त्रिजगा प्रियकर ब्राह्मण पैं ॥ १८ ॥ एवं द्विजवर मजहूनि श्रेष्ठ । हें तुज कळलें कीं ना स्पष्ट । कीं पुनः जे मदेकनिष्ठ । लागे वरिष्ठ म्हणणें त्यां ॥ १९ ॥ तापत्रयें जे तापले । उभयभोगीं विरक्त जाले । देशिकेन्द्रा शरण गेले । मन्निष्ठ जाले तद्बोधें ॥ ४२० ॥ घेऊनि माझी उपासना । मनिष्ठ केलें वाङ्मना । उमस न लाहे भववासना । मदाराधनाचेनि बळें ॥ २१ ॥ शरीरें रंगले परिचर्येतें । वचनें रंगले गुणकथनातें । मनें रंगले मद्ध्यानातें । भरले पुरते मत्प्रेमें ॥ २२ ॥ ऐसे श्रेष्ठां श्रेष्ठतर । मदेकनिष्ठ जे द्विजवर । कीं पुन्हा लागे हें उत्तर । प्रशंसापर म्हणावें ॥ २३ ॥ गुरूपदिष्ट जे मत्कळा । वैदिकतान्त्रिकसपर्याजाळा । माजि आकळूनियां स्वलीला । सुखकल्लोळा माजि रमती ॥ २४ ॥ ते पूज्यतम हें काय म्हणूं । कीं मजसमान ऐसें गणूं । ऐसे नव्हेचि ते ब्राह्मणु । वरिष्ठ पूर्ण मजहूनि ही ॥ २५ ॥

न ब्राह्मणान्मे दयितं रूपमेतच्चतुर्भुजम् । सर्ववेदमयो विप्रः सर्वदेवमयोह्यहम् ॥ ५४ ॥

चतुर्भुज मम रूपडें । तें या ब्राह्मणांचेनि पाडें । सहसा मजलागिं नावडे । हें तुज पुढें गुज कथिलें ॥ २६ ॥ सर्ववेदमय ब्राह्मण । वेदमंत्रादि देवगण । सर्वदेवमय मी जाण । प्रियतम पूर्ण मज विप्र ॥ २७ ॥

दुष्प्रज्ञा अविदित्वैवमवजानन्त्यसूयवः । गुरुं मां विप्रमात्मानमर्चादाविज्यदृष्टयः ॥ ५५ ॥

हें गुज न जाणोनियां दुष्ट । ब्राह्मणां न भजती पापिष्ठ । मंदमति दोषाविष्ट । जाणती कनिष्ठ द्विजवर्या ॥ २८ ॥ जगाचा जनक मी जो गुरु । केवळ जगदात्मा ईश्वरु । तोचि ब्राह्मण हा निर्धारु । नाहीं साचार मतिमंदां ॥ २९ ॥ पाषाणप्रतिमादिकांच्या ठायीं । पूज्यता मानूनि सर्वदा ही । भजती परंतु द्विजांच्या देहीं । न भजती कहीं दुष्टात्मे ॥ ४३० ॥ तैसा विप्र मत्पररति । लाहोनि वर्त्ते जो त्रिजगति । तयाची केवळ विशुद्ध मति । कथी श्रीपति तें ऐका ॥ ३१ ॥

चराचरमिदं विश्वं भावा ये चास्य हेतवः । मद्रूपाणीति चेतस्याधत्ते विप्रो मदीक्षया ॥ ५६ ॥

चराचरात्मक हें जग । याचे भाव जे हेतु पृथग । अव्यक्त महत्तत्व विराट लिंग । मन्मय अव्यंग तो पाहे ॥ ३२ ॥ इयें सर्वत्र माझींच रूपें । चित्तीं निश्चित या संकल्पें । धरी मद्दृष्टीच्या पडपें । न शिवे विकल्पें भेदभ्रमा ॥ ३३ ॥ ऐसा स्वमुखें विप्रमहिमा । कथितां हरीसी अनावर प्रेमा । मग तो म्हणे ब्राह्मणोत्तमा । धरीं या वर्मा हृत्कमळीं ॥ ३४ ॥ आम्हां भृत्यांतें शिक्षा करीं । ऐसी वदली तव वैखरी । यास्तव रहस्य हें अंतरीं । धरीं निर्धारीं विश्वासें ॥ ३५ ॥

तस्माद्ब्रह्म ऋषीनेतान्ब्रह्मन्मच्छ्रद्धयाऽर्चय । एवं चेदर्चितोऽस्म्यद्धा नान्यथा भूरिभूतिभिः ॥ ५७ ॥

तस्मात जे हे तव सदनातें । पातले माझेनि सांगातें । तयां ब्रह्मनिष्ठ ब्रह्मऋषींतें । मजहूनि आर्ते भजें द्विजां ॥ ३६ ॥ माझ्या ठायीं जैसी श्रद्धा । त्याहूनि वरिष्ठ यां प्रबुद्धां । करूनि अर्चीं ऐसिया बोधा । घेईं विविधा मग न पुसें ॥ ३७ ॥ मदेकभावें द्विजार्चनें । निश्चयात्मक मी पूजिलों जाणें । या वेगळीं विभवें आनें । अर्पितां न बणे मज तोष ॥ ३८ ॥ माझेनि प्रेमें अर्चितां द्विज । तेणें पूजिलों मी गरुडध्वज । या वीण अनेक संपत्ति सहज । अर्पितां मज सुख न वटे ॥ ३९ ॥ तस्मात् ब्राह्मणभजनाविण । माझें भजन तें केवळ गौण । ऐसें श्रुतदेवा श्रीकृष्ण । रहस्यखूण बोलिला ॥४४०॥ कुरुकंजाकरप्रबोधतरणि । ऐकें भूभुजचूडामणि । शुक म्हणे हें चक्रपाणि । द्विजा लागूनि स्वयें वदला ॥ ४१ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ स इत्थं प्रभुणाऽदिष्टः सहकृष्णान्द्विजोत्तमान् ।
आराध्यैकात्मभावेन मैथिलश्चाप सद्गतिम् ॥ ५८ ॥

भगवन्मुखींचें अनुशासन । ऐकूनि श्रुतदेव ब्राह्मण । कृष्णासहित ते मुनिजन । एकात्मभावें आराधी ॥ ४२ ॥ प्रभु समर्थ जो श्रीहरी । तेणें पूर्वोक्त प्रकारीं । आज्ञापिला तैसिये परी । तो श्रुतदेव

द्विजां भजला ॥ ४३ ॥ मैथिळ ही तयाचि परी । ऐकूनि श्रीकृष्णाची वैखरी । लाधला निगमपद्धति पुरी । सद्गति ऐसें जी नाम ॥ ४४ ॥ सत् हें नाम वेदांप्रति । सद्गति नामें वेदपद्धति । लाधला तद्बोधें विश्रान्ति । हें तुज परीक्षिति कळलें कीं ॥ ४५ ॥

एवं स्वभक्तयो राजन्भगवान्भक्तभक्तिमान् । उषित्वादिश्य सन्मार्गं पुनर्द्वारवतीमगात् ॥ ५९ ॥

एवं म्हणिजे ऐसिया परि । भक्तवत्सल जो श्रीहरि । मैथिळश्रुतदेवांचे घरीं । राहोनि निर्द्धारीं प्रबोधिले ॥ ४६ ॥ सन्मार्ग म्हणिजे वेदमार्ग । उभयभक्तांसि बोधूनि साङ्ग । पुन्हा द्वारकेप्रति श्रीरंग । जाता जाला मुनींसहित ॥४७॥ म्हणाल सन्मार्ग कैसा कोण । तरी त्रिकाण्डनिगमप्रवर्तन । कर्म उपासना अपरोक्षज्ञान । स्वभक्तांलागून प्रबोधिलें ॥४८॥ स्वभक्तांचा भक्त हरी । तेणें निगमपद्धति पुरी । स्वभक्तां बोधूनि द्वारकापुरी । ठाकिता जाहला मुनींसहित ॥ ४९ ॥ इतुकें ऐकूनि परीक्षिती । प्रश्न विवरूनि ठेवी चित्तीं । निर्गुणीं वेदांची पद्धती । कोणे रीती प्रबोधिली ॥४५०॥ केवळ निर्गुण परब्रह्म । आणि तमोगुणीं जाहलें व्योम । तया व्योमापासूनि जन्म । शब्दगुणाचा जाहला ॥ ५१ ॥ तया शब्दाचें प्रवर्तन । सगुणश्रुतिमय जें व्याख्यान । तेणें करूनि श्रीभगवान । ब्रह्मपरत्व उपदेशी ॥ ५२ ॥ ऐसा प्रश्न विवरूनि चित्तीं । वक्ष्यमाणाध्यायीं नृपती । पुसेल तद्व्याख्यानीं मती । धिंवसा न धरी अबुधत्वें ॥५३॥ असो परिहार वक्ष्यमाणीं । येथ प्रस्तुतीं षडशीतितमकथनीं । उभयभक्तां चक्रपाणी । गेला बोधूनी द्वारकेसी ॥ ५४ ॥ इतुकी कथा दशमस्कंधीं । परीक्षितीतें श्रीशुक बोधी । हरिगुरुवरदें भाषाप्रबंधीं । वर्णी त्रिशुद्धी दयार्णव ॥ ५५ ॥ प्रतिष्ठानीं गोदातटीं । श्रीएकनाथसाम्राज्यपीठीं । साधक चिदानंदाची लुटी । स्वानंदतुष्टी लाहताती ॥ ५६ ॥ गोविन्दाच्या नामस्मरणें । सज्जन गर्जती पूर्णपणें । तेणें दयार्णवाकारणें । भरतें चौगुणें प्रेमाचें ॥ ५७ ॥ तया प्रेमरसाचें भरतें । सत्वसंपन्नीं सेविजे पुरतें । ऐसें निमंत्रण श्रोतयांतें । देऊनि वक्तृत्व आवरिलें ॥ ४५८ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कंधे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां सुभद्राहरणं श्रुतदेवमैथिलानुग्रहकरणं नाम षडशीतितमोऽध्यायः ॥ ८६ ॥

सिद्धार्थे च शुचौ कृष्णे तृतीयायां गुरुवासरे । षडशीतितमव्याख्या प्रतिष्ठाने समापिता ॥ १ ॥

॥ श्लोक ५९ ॥ ओव्या ४५८ ॥ एवं संख्या ५१७ ॥
पंच्याऐशीवा अध्याय मिळून ओवी संख्या ३८,५८९

श्याऐशिवा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ८७ वा

श्रीगणेशायनमः । श्रीजगद्गुरवेनमः । ॐनमोजी श्रीगोविन्दा । प्रणवात्मका प्रणतवरदा । प्रभवावनप्रलयधंदा । तदपवादा प्रबोधका ॥ १ ॥ प्रबोधक तूं श्रीगोविन्द । गोशब्दात्मक केवळ वेद । तद्वेत्ता तूं वेदविद । वदवीं विशद वेदस्तुति ॥ २ ॥ तूं वाग्देवी वदविता । लक्ष्मी संपन्न तुझिया सत्ता । विश्व प्रकाशी तुझेनि सविता । चंद्रीं अमृता पूरक तूं ॥ ३ ॥ तो तूं माझिये हृदयकमळीं । सर्वग वससी प्रबोधशाळी । उत्साह संविन्मयकल्लोळीं । तोचि हेलावे दयार्णवीं ॥ ४ ॥ संपतां षडशीतिमाध्यायीं । शुकें नृपाच्या श्रवणालयीं । गोष्टी वदला जे शेषशायी । कथिली पाहीं ते अवघी ॥ ५ ॥ सन्मार्ग बोधूनि उभयभक्तां । कृष्ण झाला द्वारके जाता । परिसोनि ऐसिया वृत्तान्ता । कौरवनाथा स्मय गमला ॥ ६ ॥ सताम् मार्ग तो सन्मार्ग । स्वतःप्रमाणभूत चांग । परतः प्रमाणाचें आंग । न करी लाग जयाचा ॥ ७ ॥ प्रमाण नोहे हें अप्रमाण । ऐसिया वयुनाचें कारण । तो जेथें संशय न वसे पूर्ण । ते वेद जाण सच्छब्दें ॥ ८ ॥ तया सन्मार्गें ब्रह्मोपलब्धी । बोधूनि श्रीकृष्ण कृपानिधी । द्वारके गेला ऐसी शाब्दी । शुक प्रतिपादी परि न घडे ॥ ९ ॥ ऐसी अघटमान शुकोक्ति । हृदयीं मानूनि परीक्षिती । पुसता झाला सप्ताशीति– । तमाध्यायीं तें ऐका ॥ १० ॥ तया प्रश्नाचें उत्तर । देईल श्रीशुकयोगीश्वर । तो इतिहास वेदान्तपर । नारदनारायणयोगें ॥ ११ ॥ तो रायाचा कैसा प्रश्न । सज्जनीं परिसिजे सावधान । मूळश्लोकोक्त पद्यावरून । भाषाव्याख्यान हरिवरद ॥ १२ ॥

॥ परीक्षिदुवाच ॥ ब्रह्मन्ब्रह्मण्यनिर्देश्ये निर्गुणे गुणवृत्तयः । कथं चरन्ति श्रुतयः साक्षात्सदसतः परे ॥ १ ॥

ब्रह्मन् ऐसिया संबोधनें । शुकाचार्यातें नृपति म्हणे । अनिर्देश्यीं ब्रह्मीं निर्गुणे । कैंवि प्रवर्तणें

श्रुतींचें ॥ १३ ॥ असत्सत् या उभयां पर । केवळ परब्रह्म निराकार । तेथें साक्षात् सगुण साकार । श्रुति संचार केंवि करिती ॥ १४ ॥ म्हणाल श्रुतींसी आकार नाहीं । तरी मूर्तिमंत विधीच्या गेहीं । श्रुति वर्तती हे सर्वां ही । व्यासोक्ति कायी विदित नसे ॥ १५ ॥ कीं अंतस्थ उष्माण स्पर्श स्वर । ह्रस्वदीर्घप्लुतादि प्रकार । इत्यादि वर्णीं श्रुत्युच्चार । कीं तो साकार न म्हणावा ॥ १६ ॥ तस्मात् श्रुति ज्या सगुणवृत्ति । साक्षात् परब्रह्मीं कें विचरती । ऐसी शंका धरूनि चित्तीं । करूनि विनती नृप राहे ॥ १७ ॥ इतुका प्रथमश्लोकींचा अर्थ । भाषा उपलविला पदार्थ । श्रीधरस्वामींचें व्याख्यान येथ । विस्तृत शास्त्रपरिभाषा ॥ १८ ॥ भाविकां श्रोतयां अनध्ययनें । वाटे अत्यंत कंटाळवाणें । म्हणती गर्ता जेंवि पापाणें । भरणें उभरणें ठगठग पैं ॥ १९ ॥ यालागीं साडूनियां तो विस्तार । पदसंदर्भव्याख्यानमात्र । उपलविलिया होती सादर । लहान थोर श्रवणार्थी ॥ २० ॥ यदर्थीं श्रोते विपश्चित । म्हणती कोविदां प्रिय हा ग्रंथ । या लागीं व्याख्यान श्रीधरोक्त । भाषापर्यायें परिसवीं ॥ २१ ॥ हें ऐकोनि संतांप्रति । दयार्णवें केली विनति । केवळ अनधीत मंदमति । केंवि त्या हातीं हें वदवां ॥ २२ ॥ शास्त्रपरिभाषापर्याय । अव्युत्पन्ना विदित काय । तथापि तुमचें असतां अभय । दावाल सोय तेंचि वदों ॥ २३ ॥ ऐसी करूनियां विनवणी । माथा ठेवूनि संतां चरणीं । शास्त्रपरिभाषापर्यायकथनीं । दयार्णववाणी प्रवर्तली ॥ २४ ॥ नृप म्हणे भो योगीश्वरा । निर्गुणब्रह्मीं श्रुति साकारा । साक्षात् चरति ऐसी गिरा । ऐकोनि अंतरा स्मय गमला ॥ २५ ॥ जरी श्रुतींचा अर्थ गहन । तरी त्या शब्दांची सांठवण । पात्रावांचूनि थोर लहान । पदार्थ कोण संग्रहिती ॥ २६ ॥ घटमठादि वाजंतरीं । गगन व्यवहारीं आणिजे चतुरीं । व्यजनीं चामरीं पल्लवीं भस्त्रीं । वायु व्यवहारीं वर्तविजे ॥ २७ ॥ इन्धनाधारें प्रवृत्ति अनळा । धात्वादिमृच्चर्मपात्रीं जळा । कीं विविधद्रव्याधारें सकळां । घडे परिमळा प्रवृत्ति ॥ २८ ॥ कुड्यादिसीमावरणें पृथ्वी । व्यवहारीं घडे प्रवृत्ति जेंवी । शब्दांमाजी श्रुत्यर्थ तेंवी । सांठवलासे अगोचर ही ॥ २९ ॥ तया शब्दांची त्रिधा प्रवृत्ति । मुख्या लक्षणा गौणी म्हणती । त्यांमाजी मुख्येची ही गती । रूढि आणि योगभेदीं ॥ ३० ॥ यांची प्रवृत्ति कोणें ठायीं । सावध परिसा कथितों तेही । निर्देशार्हीं पदार्थीं पाहीं । संज्ञासंज्ञिसंकेतें ॥ ३१ ॥ नाम आणि नामधारक । संज्ञासंज्ञी ते सम्यक । निर्देशार्ह असतां देख । प्रवृत्ति शाब्दिक तेथ घडे ॥ ३२ ॥ निर्देश म्हणिजे निवडपणें । घडे जिये वस्तू कारणें । तेथ शब्दांचीं प्रवर्तनें । त्रिविधा भिन्नें जियें कथिलीं ॥ ३३ ॥ वनीं चरतां धेनुशतक । त्यामाजी निवडूनि पुसतां एक । तेथें रूढिप्रवृत्ति देख । त्रिविधात्मक निर्देशी ॥ ३४ ॥ स्वरूप जाति आणि गुणें । त्रिविधबोधें गौ निवडणें । पुष्ट धेनु कपिला म्हणणें । त्रिधा भिन्नें वाक्यार्थें ॥ ३५ ॥ सर्वसाधारणांमाजी पुष्ट । म्हणतां स्वरूपचि निर्दिष्ट । अविकें महिषी अजा यथेष्ट । तैं जाति निर्दिष्ट गोशब्दें ॥ ३६ ॥ पाटला बहुला रक्ता शुक्ला । तैं गुणनिर्दिष्टा म्हणिजे कपिला । रूढिभेदाचा विस्तार केला । त्रिधा मोकळा कळला कीं ॥ ३७ ॥ अनिर्देश्य ब्रह्म निर्गुण । तेथें कैंचे जात्यादि गुण । तस्मात् रूढिप्रवृत्तिप्रवर्तन । तेथ कोठून घडूं शके ॥ ३८ ॥ और्ण कौशेय कार्पास । जातिभेद हे अंबरास । स्थूळसूक्ष्मादि बहुवस । स्वरूपविशेष निर्दिष्ट ॥ ३९ ॥ श्वेत रक्त

चित्राम्बरें । गुणनिर्दिष्टें ऐसीं वस्त्रें । चिदंबरीं या प्रकारें । केंवि शब्दें संचरिजे ॥ ४० ॥ रूढि मुख्या निराकरिली । आतां लक्षणा जे बोलिली । तेही निरूपिजेल भली । सावध परिसिली पाहिजे ॥ ४१ ॥ निर्देशार्ही वस्तुमात्रीं । लक्षणाशब्दप्रवृत्ति वक्त्रीं । उदाहरणीं कथितां श्रोत्रीं । रुचे आणि उमजे ही ॥४२॥ गंगेवरी गौळवाडा । म्हणतां अभिनव वाटे मूढां । तेथ लक्षणाशब्दवृत्ति सुघडा । करी निवाडा शब्दार्था ॥ ४३ ॥ गंगा सांडूनि घेइजे तट । ऐसी जहल्लक्षणा करितां नीट । तैसें ब्रह्म नित्य निर्घोट । काशा निकट लक्षावें ॥ ४४ ॥ दुरूनि पथिका दाविती वाट । वटावरूनि जाइजे नीट । तेथ वट सांडूनि लक्षिजे स्पष्ट । पंथ चोखट वामसव्यें ॥ ४५ ॥ तेंवि ब्रह्मीं लक्षणाप्रवृत्ति । घडे केंवि कोणे रीति । तैसी गौणीचीही व्याप्ति । न घडे निश्चिती निर्गुणीं ॥ ४६ ॥ पुरुषव्याघ्र या संबोधनें । कवि शंसिती नृपाकारणें । तेथ क्रौर्यचापल्यादि गुणें । प्रवृत्ति जाणणें शब्दाची ॥ ४७ ॥ तैसी येथ अद्वयब्रह्मीं । कोठील गुणां उपमी । या लागीं प्रवृत्ति गौणानामी । न घडे व्योमीं पल्लवत् ॥ ४८ ॥ ब्रह्म केवळ अनिर्देश्य । तेथ योगवृत्तीशीं अवकाश । न घडे कैसा तो विशेष । चतुरीं चित्तास आणावा ॥ ४९ ॥ पंकयोगें पंकज कमळ । कीं गंगायोगें गाङ्गकुळ । पुण्ययोगें पुण्यशीळ । कीं दुःशीळ दुष्कृतें ॥ ५० ॥ दशरथयोगें दाशरथि । जनकयोगें जानकी म्हणती । अब्जसादृश्य कराब्जाप्रति । योगवृत्ति गौणी पैं ॥ ५१ ॥ गाङ्गीं मठ म्हणतिये वेळे । लक्षणायोगवृत्तीच्या बळें । गंगातटी लक्षितां विवळे । कीं म्हणिजे जळें प्लावित पैं ॥ ५२ ॥ जलजनामें रूढ कमळ । तैसेंचि जळज पैं जंबाळ । जलजाक्ष रूढीस्तव केवळ । अक्षि जंबाळसम न घडे ॥ ५३ ॥ क्रियानिर्दिष्ट योगवृत्ति । पचनक्रियेची ज्या प्रवृत्ति । पाचक ऐसें त्यातें म्हणती । लेखका न म्हणती पाचक पैं ॥ ५४ ॥ तस्मात निर्दिष्टे वस्तुमात्रीं । इत्यादि शब्दप्रवृत्ति शास्त्रीं । शोभती वक्त्यांच्या वक्त्रीं । श्रुतिस्मृतिमात्रीं सर्वत्र ॥ ५५ ॥ ब्रह्म अनिर्देश्य केवळ । तेथ शब्दप्रवृत्ति होय विफळ । निर्गुणीं गौणवृत्तीचा मळ । न लगे केवळ नभःसाम्यें ॥ ५६ ॥ कार्यकारणांहूनि पर । त्यातें म्हणिजे सदसत्पर । संबंध नसतां लक्षणाकार । ब्रह्मीं संचार केंवि परी ॥ ५७ ॥ एवं वस्तु पदार्थ नव्हे । अपपदार्थेंसीं वाक्यगौरवें । श्रुतिगोचरत्व केंवि घडावें । हें निवडावें सर्वज्ञीं ॥ ५८ ॥ ऐसी शंका विवरूनि चित्तीं । नृपें शुकासी केली विनती । तो सर्वज्ञ करील शंकानिवृत्ती । तेंचि श्रोतीं परिसावें ॥ ५९ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ बुद्धीन्द्रियमनःप्राणाञ्जनानामसृजत्प्रभुः । मात्रार्थं च भवार्थं च आत्मनेऽकल्पनाय च ॥२॥

साद्यंत नृपाची ऐकोनि शंका । कथनीं परमाह्लाद शुका । विवरूनि उत्तर वदला निका । सादर ऐका तें आतां ॥ ६० ॥ महासर्वाप्ययाचे अंतीं । भौतिकें भूतीं लीनें होती । भूतीं आश्रयितां प्रकृति । गौणा प्रकृति साम्या ये ॥ ६१ ॥ तैं मग निर्गुण निराकार । ब्रह्म केवळ निराकार । तेथ शब्दाचा संचार । न घडे साचार कुरुवर्या ॥ ६२ ॥ एवं शंका अंगीकारणें । मान देऊनि नृपाचे प्रज्ञे । शंकापरिहार कोण्या गुणें । करी तें श्रवणें अवधारा ॥ ६३ ॥ पुढती सृजनाचा अवसर । होतां

पूर्णत्वें ईश्वर । शुद्धसत्वात्मक साचार । प्रकृतिपर स्वयें होय ॥ ६४ ॥ तैं प्रकृत्यंतःपाती । प्रसुप्त प्राचीन जीवपंक्ति । तयां यथापूर्व संसृति । प्रभु स्वशक्ति प्रवर्तवी ॥ ६५ ॥ पूर्वसंस्कारवंत जीव । प्रकृतिमाजी लीन सर्व । तयां लिंगशरीर देऊनि देव । करी सावयव संकल्पें ॥ ६६ ॥ दशेन्द्रियें पंचप्राण । मनोबुद्धिसहित जाण । सत्रा कळांचें लिंग पूर्ण । जीवांलागून सृजी प्रभु ॥ ६७ ॥ लिंगशरीर लाहतां जीव । विपरीत ज्ञानाचा संभव । विषयात्मक जे दृश्य भाव । कवळी वास्तव विसरूनी ॥६८॥ पूर्वसंस्कारें संसृति । ऐसी प्राप्त जीवांप्रति । तेथ प्रभु करुणामूर्ति । स्वयें निवृत्ति उद्बोधी ॥ ६९ ॥ लक्षूनि जीवाचें कल्याण । लिंगदेहाचें करी सृजन । त्यामाजी चतुर्विध प्रयोजन । योजी संपूर्ण बीजत्वें ॥ ७० ॥ लिंगदेह लाहतां जीव । स्वयंभ विषयसेवनीं धांव । तदर्थ स्थूळ सावयव । कवळी स्वयमेव आत्मत्वें ॥ ७१ ॥ एवं विषयसेवनासाठीं । पडिली लिंगदेहाशीं गांठी । त्यामाजी सांसारिक रहाटी । कर्मपरिपाटी प्रभु बोधी ॥ ७२ ॥ तया कर्मफळाचा भोक्ता । लाहे लोकान्तरें तत्वता । संपादूनी शुभ सुकृता । हे ही स्वसत्ता प्रभूची ॥ ७३ ॥ एवं विषयार्थ भवार्थ आत्मार्थ । प्रभु लिंगें जीवां देत । निष्कामभजनें तेथ निवृत्त । अकल्पनार्थ त्यालागीं ॥ ७४ ॥ कल्पनेचा अवमान होतां । अपवर्ग स्वतःसिद्ध आइता । ऐसी जीवांची सर्व चिन्ता । पूर्वींच तत्वता प्रभु वाहे ॥ ७५ ॥ एवं धर्मार्थकाममोक्ष । जीव अनुभवील अशेष । ऐसा प्रभूचा कटाक्ष । कृपाविशेष लक्षूनी ॥ ७६ ॥ तस्मात जीवांचि कारणें । सृष्ट्यादिकीं प्रवर्तणें । घडे ईश्वरा सर्वज्ञपणें । तेंचि श्रवणें अवधारीं ॥ ७७ ॥ जीवांसी अविद्यात्मक आवरण । म्हणोनि पावती संसरण । मायावरणातीत पूर्ण । प्रभु म्हणोन नित्य मुक्त ॥ ७८ ॥ प्रभु मायेचा नियंता । अनंतगुणीं परिपूर्णता । असोन न वचे गुणातीतता । अमळसत्ता संतत पैं ॥ ७९ ॥ प्रभूतें आवरूं न शकती गुण । या लागीं नित्य तो निर्गुण । साक्षी स्वसंवेद्य सर्वज्ञ । सर्वशक्तिमान् सर्वात्मा ॥ ८० ॥ सर्वोपास्य सर्वनियंता । सर्वकर्मफळाचा दाता । सर्वमंगलायतन तत्वता । सच्चिदानंद भगवंत ॥ ८१ ॥ इत्यादि विशेषणीं श्रुति । प्रभूचें वैशिष्ट्य प्रतिपादिती । तो श्रुतिसमुच्चय लिंहितां ग्रंथीं । अवर्ण पठती तैं बाध ॥८२॥ अंत्य अवर्ण अनधिकारी । केवळ श्रुतींच्या उच्चारमात्रीं । पातित्य पावती तेचि अवसरीं । पडती दुस्तरीं घोरनरकीं ॥८३॥ या लागीं त्यांचिये करुणे स्तव । विशेषणमात्रीं श्रुतींचा भाव । सूचिला तो अभिप्राव । महानुभाव जाणती पैं ॥ ८४ ॥ प्रभु परमात्मा पूर्णचैतन्य । सर्वग समष्टिप्रपंचवान । ब्रह्माण्डान्तःपाती गहन । केवळ सर्वज्ञ स्वसंवेद्य ॥ ८५ ॥ जीव व्यष्टिप्रपंचमात्र । परिमित सप्तावितस्तिगात्र । किंचिज्ज्ञ सुखदुःखपात्र । स्वकर्मतंत्र फळभोक्ता ॥ ८६ ॥ ऐसियां जीवांसी तत्वता । ईश्वरपदीं सामरस्यता । श्रुति बोलती प्रभूच्या सत्ता । तत्त्वंपदार्थविवरणें ॥ ८७ ॥ तत्त्वंपदार्थां उभयांप्रति । सामानाधिकरण्यप्रतीति । सोपाधिकां समान म्हणती । परि तें निश्चिती न घडे पैं ॥ ८८ ॥ मीमांसकांचिया मतें । वैश्वदेवी आमिक्षेतें । सामानाधिकरण्य निरुतें । पदार्थबोधें तद्धितींच्या ॥८९॥ विश्वेदेव देवता पृथक । आमिक्षा द्रव्य तदात्मक । हा सामानाधिकरण्यविवेक । सोपाधिक मैमांसी ॥ ९० ॥ खांज्य यष्टयश्च म्हणते वेळे । पदार्थीं सामानाधिकरण्य मिळे । तत्वंपदार्थीं मोकळें । तेंवि

हें न विवळे साम्यत्व ॥ ९१ ॥ तत्त्वंपदार्थ दोन्ही भिन्न । यालागीं न घडे सामानाधिकरण्य । तत्पद पूर्णत्वें सर्वज्ञ । त्वंपद अल्पज्ञ कर्मभाक् ॥ ९२ ॥ तैसेंचिं सहज उत्पळ नीळ । द्रव्यगुणांचा स्वयंभ मेळ । निरूढ अजहल्लक्षणा केवळ । तत्त्वंपदमेळ तेंवि नव्हे ॥ ९३ ॥ करकाद्रव्य श्वेतगुण । सहज दोहींचें जननमरण । तत्त्वंपदीं तैसें जाण । सामानाधिकरण्य घडेना ॥ ९४ ॥ तत्पदाचें विशेषण । सहसा त्वंपद नसे जाण । आणि सहजत्व उभयालागून । न घडे म्हणून विरुद्धार्थें ॥ ९५ ॥ त्वंपद अज्ञान कर्मतंत्र । केवळ जन्ममरणाचें पात्र । तत्पद नित्यमुक्त अज अजस्र । विरुद्ध प्रकार हा उभयां ॥ ९६ ॥ तैसीच कुसुमितदुमा गंगा । करितां जहल्लक्षणाप्रसंगा । तत्त्वंपदीं न पवे योगा । सामानाधिकरण्य हें ॥ ९७ ॥ गंगातटीं कुसुमित दुम । कुसुमितदुमा यास्तव नाम । तत्त्वंपदीं कोण तें धाम । काय सांडून लक्षावें ॥ ९८ ॥ यास्तव तत्त्वंपदीं उभयचैतन्य । लक्षूनि सामानाधिकरण्य । जहदजहल्लक्षणा पूर्ण । येथ घटमान श्रुतिप्रणीत ॥ ९९ ॥ जेंवि शत्रु भंगिले स्वहस्तीं । तो हा येथ ध्यानस्थ नृपत्ती । जहद-जहल्लक्षणा निगुती । ऐक्य साधिती उभयांतें ॥ १०० ॥ सन्नद्ध बद्ध रथारूढ । चतुरंगिणी सेना दृढ । शत्रुमर्दनकर्म अवघड । त्यागून रूढ उपाधि हे ॥ १ ॥ जहत् म्हणिजे या उपाधित्यागें । अजहत् नृप-मात्र घेइजे आंगें । ध्यानींचें विडंबन तें आवघें । त्याजितां नृपाङ्गें ऐक्य घडे ॥ २ ॥ तेंवि समष्टिप्रपंच मायोपाधि । व्यष्टिप्रपंच अविद्योपाधि । या जीवेश्वरांच्या उभयोपाधि । निरसतां शुद्धि ऐक्यता ॥ ३ ॥ उपाधि विरुद्धांशत्याग । शुद्ध लक्ष्यें चिदंशयोग । घडे म्हणतां पूर्वी वियोग । कधींही होता सत्कुळा ॥ ४ ॥ उपाधीचिया आवरणें । भासलीं होतीं भिन्नपणें । तीं निरसतां ऐक्य करणें । लागे काय नूतन पैं ॥ ५ ॥ तस्मात उभय चैतन्या ऐक्य । उपाधिनिरासें घडे सम्यक । उपाधिनाशें उभयात्मक । अभिन्न एक परब्रह्म ॥ ६ ॥ एवं निर्गुणीं पर्यवसान । जहदजहल्लक्षणे करून । उभय-चैतन्या घडे पूर्ण । श्रुतिप्रमाण गुरुवचनीं ॥ ७ ॥ अस्थूळादिश्रुतींचीं वचनें । उपाधिनिषेधाकारणें । लूता तंतुसृजनग्रसनें । तेंवि क्रीडणें प्रभूतें ॥ ८ ॥ जेथवरी शब्दाची प्रवृत्ति । तेथवरी वदोनी नेति नेति । मौनमुद्रा धरूनि अंतीं । श्रुति बोधिती सन्मात्र ॥ ९ ॥ वास्तव आत्मावगमें अंतीं । अतन्नि-रसनें श्रुति फळती । चपळा स्फुरोनि घनीं विरती । तेंवि सांठवती परब्रह्मीं ॥ ११० ॥ उपासनादि श्रुतींचीं वाक्यें । ज्ञणीं मानिसी परमार्थविमुखें । सृष्ट्याद्यवलंबनें सम्यकें । ज्ञानसाधनें सन्मय पैं ॥ ११ ॥ तस्मात् ब्रह्मपर साद्यंत निगम । ब्रह्मप्रापक सर्वां सुगम । न बोधतां न वचे भ्रम । यास्तव दुर्गम कर्म जडां ॥ १२ ॥

सैषा हयुपनिषद्ब्राह्मी पूर्वेषां पूर्वजैर्धृता । श्रद्धया धारयेद्यस्तां क्षेमं गच्छेदकिञ्चनः ॥ ३ ॥

ते हे ब्राह्मी उपनिषत् पहिली । पूर्वजीं वडिलांचिये वडिलीं । निष्ठा धरूनि अनुष्ठिली । जे तुज कथिली जात असे ॥ १३ ॥ पूर्वपक्षें चित्तशुद्धि । सिद्धान्तबोधें मोक्षसिद्धि । यथोक्तालंबना यथाविधि । बोधें ब्रह्मपदीं समरसवी ॥ १४ ॥ या लागीं ब्राह्मी ब्रह्मपरा । श्रद्धापूर्वक प्रिय ज्या नरा । वितंडातर्क न शिवोनि गिरा । विवरीत गुरुवरापासीं जो ॥ १५ ॥ श्रद्धापूर्वक श्रवणादर । करूनि मननें धारणापर ।

व्यतिरेकबोधें साक्षात्कार । लाहानि चिन्मात्रमय निवडे ॥ १६ ॥ तोचि अकिंचन अधिकारी । देहादि उपाधि निरसूनि पुरी । लाहे ब्रह्मस्थिति निर्धारीं । सत्य वैखरी हे माझी ॥ १७ ॥ इये उपनिषत्कथनीं पाहीं । प्राचीनगाथा तुज मी कांहीं । संदर्भार्थ कथितों तेही । श्रवणालयीं सांठविजे ॥ १८ ॥

अत्र ते वर्णयिष्यामि गाथां नारायणान्विताम् । नारदस्य च संवादमृषेर्नारायणस्य च ॥ ४ ॥

नारदनारायणसंवाद । नारायणाश्रमीं विशद । हे नारायणान्वित गाथा शुद्ध । ऐकें सावध कथितों ते ॥ १९ ॥

एकदा नारदो लोकान्पर्यटन्भगवत्प्रियः । सनातनमृषिं द्रष्टुं ययौ नारायणाश्रमम् ॥ ५ ॥

कोणे एके अपूर्व समयीं । नारद फिरतां लोक तिहीं । नारायणाश्रमीं पाहीं । येता झाला स्वच्छंदें ॥ १२० ॥ केवळ भगवत्प्रिय नारद । हरिगुणकथनीं परमानंद । गगनगामी आत्मविद । आला स्वच्छंद तपोधन ॥ २१ ॥ नारायणातें देखावया । हृदयीं प्रेमा धरूनियां । नारायणाश्रमालया । आला मुनिवर्या माजिवडा ॥ २२ ॥ गगना सारिखें ज्याचें मन । ज्याचें अमृतोपम भाषण । परोपकारार्थ कर्माचरण । तो सनातन ऋषिवर्य ॥ २३ ॥ त्यातें देखावया कारणें । नारदाचें झालें येणें । जया ऋषीनें निजात्मगुणें । त्रिजग कल्याणें भरियेलें ॥ २४ ॥ ऐका तया ऋषीचे गुण । कथितों संक्षेपें तुज लागून । जेणें जिंकून कायवाङ्मन । केलें कल्याण त्रिजगासी ॥ २५ ॥

यो वै भारतवर्षेऽस्मिन्क्षेमाय स्वस्तये नृणाम् । धर्मज्ञानशमोपेतमाकल्पादास्थितस्तपः ॥ ६ ॥

जो या भारतवर्षामाजी । मर्त्यजनाच्या कल्याणकाजीं । धर्मज्ञानशमादिपुंजीं । युक्त आचरे तपश्चर्या ॥ २६ ॥ आकल्प तपश्चर्यानिश्चय । नियमूनि कायावाचा हृदय । अढळ बैसला मेरुप्राय । वेष्टित समुदाय मुनींचा ॥ २७ ॥ धर्मानुकूळ ज्याचें ज्ञान । ज्ञानानुकूळ धर्म पावन । उभयानुकूळ वृत्त्युपशमन । शमसंपन्न सद्बोधें ॥ २८ ॥ ऐसा तपस्वी चिरस्थायी । विराजमान ऋषिसमुदायीं । वेष्टित कलापग्रामस्थांहीं । भगणवलयीं भगणपवत् ॥ २९ ॥

तत्रोपविष्टमृषिभिः कलापग्रामवासिभिः । परीतं प्रणतोऽपृच्छदिदमेव कुरूद्वह ॥ ७ ॥

त्यातें देखोनि विधिनंदनें । दण्डप्राय अभिवंदनें । प्रसन्न करूनि हेंचि प्रश्नें । रहस्य पुसिलें कुरुवर्या ॥ १३० ॥ ऐकोनि नारदाचा प्रश्न । कल्पस्थायी तपोधन । केवळ जो नरनारायण । वदला वचन तें ऐका ॥ ३१ ॥

तस्मै ह्यवोचद्भगवानृषीणां शृण्वतामिदम् । यो ब्रह्मवादः पूर्वेषां जनलोकनिवासिनाम् ॥ ८ ॥

मग त्या नारदा कारणें । षड्गुणैश्वर्यसंपन्नें । जें बोलिलें नारायणें । तें हे श्रवणें अवधारीं ॥३२॥ कलापग्रामनिवासी मुनि । तेही ऐकत असतां श्रवणीं । इतिहासरूपा पुरातनी । गाथा कथिली ब्रह्मपरा ॥ ३३ ॥ म्हणाल कैसी गाथा कोण । तरी जनलोकवासी श्रेष्ठ मुनिजन । पूर्विलांहूनि पुरातन । संवाद पूर्ण जो त्यांचा ॥ ३४ ॥ जो ब्रह्मपर उपनिषद्बोध । केवळ श्रुतींचा अनुवाद । नारदाप्रति तो ब्रह्मविद । वदला विशद नारायण ॥ ३५ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥ स्वायम्भुव ब्रह्मसूत्रं जनलोकेऽभवत्पुरा । तत्रस्थानां मानसानां मुनीनामूर्ध्वरेतसाम् ॥ ९ ॥

भाविभूतवर्तमान । ज्ञाता सर्वज्ञ नारायण । स्वमुखें नारदा लागून । इतिहास प्राचीन निरूपी ॥ ३६ ॥ पूर्वीं जनलोकाच्या ठायीं । ब्रह्मसत्र होतां पाहीं । स्वायंभुव या नामें तिहीं । लोकीं सर्वही जाणती जें ॥ ३७ ॥ स्वयंभू यजमान जियें सत्रीं । या लागीं स्वायंभुव हें नाम वक्त्रीं । श्रेष्ठीं वदतां चराचरीं । ख्यात झालें सर्वत्र ॥ ३८ ॥ परंतु सत्रें बहुविध असती । मीमांसात्मकें शंसिलीं श्रुती । त्यांमाजी स्वायंभुव हे व्युत्पत्ती । द्विविध श्रोतीं परिसावी ॥ ३९ ॥ स्वयंभू जे सत्रीं यजमान । तयासी स्वायंभुव अभिधान । स्वयंभूपासोनि ज्यांचें जनन । तें तपोधन स्वायंभुव ॥१४०॥ कर्मकलाप यथोक्त चांग । ऋत्विज यजमान यथायोग्य । प्रायश्चित्ताचा न पडे पांग । तें अव्यंग कर्मसत्र ॥ ४१ ॥ कर्मसत्र स्वयंभूकृत । यास्तव स्वायंभुव त्या नामसंकेत । तैसें नव्हे हें वेदोदित । ब्राह्मी संतत मीमांसा ॥ ४२ ॥ स्वयंभूचे स्वायंभुव । ऊर्ध्वरेते कुमार सर्व । ब्रह्मवेत्ते मुनिपुङ्गव । तत्कृत अपूर्व ब्रह्मसत्र ॥ ४३ ॥ समान वक्ते श्रोते जेथ । ब्रह्मनिष्ठ पूर्ण विरक्त । ऊर्ध्वरेते भवनिवृत्त । प्रत्ययवंत अपरोक्ष ॥ ४४ ॥ त्यांमाजी अध्वर्यु करूनि वक्ता । प्राश्निक यजमान तत्त्वता । प्रशंसिता केवळ होता । अनुमोदिता आग्नीध्र ॥ ४५ ॥ ऐसे करूनि ऋत्विजगण । ऊर्ध्वरेते मुनि सर्वज्ञ । ब्रह्ममीमांसामय मख पूर्ण । कृतनिर्वपण जनलोकीं ॥ ४६ ॥ तया जनलोकनिवासियांचा । ब्रह्ममीमांसामय मख साचा । झाला तो आजी मज तां वाचा । प्रश्न केला देवर्षि ॥ ४७ ॥ नारदा तूं जरी म्हणसी ऐसें । तो मख मज कां विदित नसे । तरी तें कथितों सावध परिसें । प्रसंगा सरिसें उपस्थित ॥ ४८ ॥

श्वेतद्वीपं गतवति त्वयि द्रष्टुं तदीश्वरम् । ब्रह्मवादः सुसंवृत्तः श्रुतयो यत्र शेरते ।
तत्र ह्यायमभूत्प्रश्नस्त्वं मां यमनुपृच्छसि ॥ १० ॥

श्वेतद्वीपाप्रति तुजलागीं । तत्रस्थ परमेश्वर मी शार्ङ्गी । अनिरुद्धरूपी विख्यात जगीं । गेलों असतां देखावया ॥ ४९ ॥ अनिरुद्धमूर्तींच्या दर्शना । श्वेतद्वीपाप्रति तां गमना । केलें असतां मागें यज्ञा । मानसपुत्रीं प्रवर्तविलें ॥ १५० ॥ सुष्ठु म्हणिजे बरव्या परी । ब्रह्मप्रतिपादकसंवादकुसरी । ब्रह्ममख वर्तला ते अवसरीं । तुझिया श्रोत्रीं अविदित पैं ॥ ५१ ॥ ब्रह्म म्हणिजे म्हणसी वेद । तरी हा

ब्रह्मोत्तमाङ्गमय वाद । ज्याच्या ठायीं श्रुति निःशब्द । होवोनि प्रसुप्त झालिया ॥ ५२ ॥ जिये ठायीं पूर्ण चैतन्य । विसरे सर्वसाक्षित्वाभिमान । कर्तृत्वभोक्तृत्वज्ञातृत्ववयुन । होय लीन सन्मात्रीं ॥ ५३ ॥ केवळ ब्रह्म तें सन्मात्र । अगाध अपार अगोचर । जेथ समरसे ईश्वर । स्वव्यापार विसरूनी ॥ ५४ ॥ तया पूर्णचैतन्यामाजी । अखिलात्मवयुनें श्रुतींची राजी । लीन होय सहज सहजीं । ऐसी वाजी तिहीं केली ॥ ५५ ॥ एवं उत्कृष्ट ब्रह्मवाद । ऊर्ध्वरेते जे ब्रह्मविद । तिहीं जनलोकीं केला विशद । पूर्वी प्रसिद्ध सत्रमय ॥ ५६ ॥ तेथ तये ब्रह्माध्वरीं । हा प्रश्न केला विधिकुमारीं । जो त्वां मातें या अवसरीं । अत्यादरीं पुसियेला ॥ ५७ ॥ जिहीं अनुष्ठिलें तें ब्रह्मसत्र । ते विधीचे मानसपुत्र । समान श्रुतशील शत्रु मित्र । तपस्वी तीव्र अवघेची ॥ ५८ ॥

तुल्यश्रुततपःशीलास्तुल्यस्वीयारिमध्यमाः । अपि चक्रुः प्रवचनमेकं शुश्रूषवोऽपरे ॥ ११ ॥

श्रुताध्ययनतपःशील । इत्यादि साधनें सर्वां तुल्य । शत्रु मित्र आप्त कौल्य । समान साफल्य आचरणीं ॥ ५९ ॥ ऐशियां माजी कोण वक्ता । म्हणसी कोण प्रश्नकर्ता । तरी त्या सर्वां सम योग्यता । जेंवि अमृता सम गोडी ॥ १६० ॥ समस्त ब्राह्मण वेदाध्यायी । परंतु मखक्रियेच्या ठायीं । जो जो क्षण घेतला जिहीं । ते ते समयीं मंत्र पढती ॥ ६१ ॥ तैसे मुनिवर ब्रह्मनिष्ठ । एक वक्ता करूनि स्पष्ट । अपर प्राश्निक श्रवणाविष्ट । करिती अभीष्ट ब्रह्ममख ॥ ६२ ॥ तेथ सनंदननामा मुनि । वक्तृत्वाचा क्षण देऊनी । बैसविला तो तत्कृतप्रश्नीं । श्रुतिव्याख्यानीं प्रवर्तला ॥ ६३ ॥ सनंदनाप्रति प्रथम प्रश्न । म्हणसी मुनींहीं केला कोण । तरी जो राया मजलागून । विस्मयापन्न त्वां केला ॥६४॥ निर्गुणीं सगुणा श्रुतींची गति । केवळ ब्रह्मीं केंवि चरति । हेचि नारायणाप्रति । नारदें प्रश्नोक्ति पूसिली ॥ ६५ ॥ नारायणें ब्रह्मसुता । ब्रह्मसत्रींची कथिली गाथा । तेथें स्वायंभुवीं सनंदन वक्ता । करूनि वार्ता हेचि पुशिली ॥ ६६ ॥ जे निर्गुणब्रह्मीं सगुणा श्रुति । कैशा कोण्या प्रकारें चरति । यदर्थीं सनंदनमुनिभारती । प्राश्निकांप्रति बोलतसे ॥ ६७ ॥

॥ सनंदन उवाच ॥ स्वसृष्टमिदमापीय शयानं सहशक्तिभिः । तदंते बोधयांचक्रुस्तल्लिंगैः श्रुतयः परम् ॥१२॥

स्वमायेचा अंगीकार । करूनि सृजिलें चराचर । तें स्वसृष्ट विश्व ईश्वर । प्राशूनि सादर शयन करी ॥ ६८ ॥ सृजनावनात्मक ज्या शक्ति । तिहीं साहित करी सुषुप्ति । तया प्रळयाचियेही अंतीं । पुन्हा जागृति जैं लाहे ॥ ६९ ॥ प्रथम जागृति विश्वास तेथ । श्रुतिकदंबातें प्रसवत । मग त्या श्रुति प्रबोधित । बंदिजनवत प्रभुवर्या ॥ १७० ॥ जें कां वास्तव परब्रह्म । तेथ पूर्णचैतन्यावगम । करूनि तल्लिंगीं शंसिसी परम । गुणगण निस्सीम ते ऐका ॥ ७१ ॥

यथा शयानं सम्राजं बन्दिनस्तत्पराक्रमैः । प्रत्यूषेऽभ्येत्य सुश्लोकैर्बोधयन्त्यनुजीविनः ॥ १३ ॥

जैसा सुप्त सम्राट् चक्रवर्ती । तदनुक्रमें ज्यां जीविकावृत्ति । ते बंदिजन तयाप्रति । उपौढ करिती प्रत्यूषीं ॥ ७२ ॥ सुश्लोक म्हणिजे उत्तम कीर्ति । तत्कृत गाऊनि करिती स्तुति । लाहूनि तत्पूर्वी जागृति । जेंवि बोधिती अनुजीवी ॥ ७३ ॥ प्रभूच्या जागृतिसमया पूर्वी । येऊनि प्रत्यूषीं अनुजीवी । प्रबोधिती श्रुतिही तेंवी । निजगोसावी जागविती ॥ ७४ ॥ अनंतगुणीं जो परिपूर्ण । अमलयशोमय तद्गुणगण । तन्निःश्वासीं लाहोनि जनन । स्तविती श्रुतिगण तें ऐका ॥ ७५ ॥

॥ श्रुतय ऊचुः ॥ जय जय जह्यजामजित दोषगृभीतगुणां त्वमसि यदात्मना समवरुद्धसमस्तभगः ।
अगजगदोकसामखिलशक्त्यवबोधक ते क्वचिदजयाऽऽत्मना च चरतोऽनुचरेन्निगमः ॥ १४ ॥

अजितशब्दें परमेश्वर । सगुणनिर्गुण अगोचर । त्यास संबोधी श्रुतींचा निकर । जयजयकार करूनियां ॥ ७६ ॥ तूं अद्वितीय पूर्ण अनंत । मायाद्यावरणीं अनावृत । स्वबोधशाळी सदोदित । या लागीं अजित संबोधन ॥ ७७ ॥ जयजयकारें आम्रेडितीं । भो भो अजिता श्रुति म्हणती । विजयोत्कर्षें तव प्रवृत्ति । वर्तो निश्चिती सर्वत्र ॥ ७८ ॥ कोणत्या व्यापारें करून । जयोत्कर्षाचें आविष्करण । म्हणसी तरी तें करितों कथन । ऐकें सद्गुणसुखसिन्धु ॥ ७९ ॥ अग म्हणिजे स्थावरनिकर । जंगमात्मकांचा समुदाय चर । एवं द्विविध शरीरधर । जीव अपार तव सृष्ट ॥ १८० ॥ तयां जीवांची अविद्या । अजानामका जे प्रसिद्धा । जहि म्हणिजे तिचिया वधा । स्वसंवेद्या करीं प्रभो ॥ ८१ ॥ जीव केवळ चिदाभास । वरपडविले जन्ममरणास । जिणें तयेचा करीं नाश । भो भो परेश प्रभुवर्या ॥ ८२ ॥ कैसी वधावी गुणवती । ऐसा संशय न धरीं चित्तीं । तरी ते दोषांचे कारण होती । गुणसंतती जियेची ॥ ८३ ॥ दोषांकारणें जयेचे गुण । जरी तूं म्हणसी कैसे कोण । तरी तयांचें करितों कथन । ऐकें सर्वज्ञशिखामणे ॥ ८४ ॥ हे स्वैरिणी तुझेनि आंगें । थोराहूनी गुणप्रसंगें । निजानंदावरणयोगें । परमपुरुषातें प्रतारी ॥ ८५ ॥ तमोगुणें निजज्ञानलोपा । करूनि सुषुप्ति आणी रूपा । तीमाजी सत्वगुणाच्या दीपा । विपरीतपडपा प्रकाशी ॥ ८६ ॥ चित्तचतुष्टय सत्वदीपें । उजळे विपरीतबोधकल्पें । तैं रजही मनःसंकल्पें । प्राणेन्द्रियगण उभारी ॥ ८७ ॥ जीवांसी तें तें करणावरण । करूनि आनंदादि सहजगुण । आवरूनि मिथ्या विषयभान । प्रकट दावून भांबावी ॥ ८८ ॥ मग त्या विषयप्रलोभा साठीं । जीव लागती दृश्या पाठीं । जागृत्यवस्थे स्थूलात्मयष्टी । लाहूनि कष्टी बहु होती ॥ ८९ ॥ एवं त्रिगुणात्मकभवजाळीं । गोवूनि जीवांची मंडळी । निजानंदा विमुख केली । यास्तव वाधिली पाहिजे हे ॥ १९० ॥ परप्रतारणाकारणें । स्वैरिणी भरली ही दुर्गुणें । यास्तव जीवांचिये करुणे । संहरणें इयेतें ॥ ९१ ॥ ऐसें तूं म्हणसी भो भो अजिता । ऐसी स्वैरिणी दोषात्का । इणें मजही सदोष करितां । कोण रक्षिता पैं तेथ ॥ ९२ ॥ ऐसें सहसा स्वामी न म्हणें । तूं आत्मत्वें पूर्णपणें । सर्वैश्वर्यें वाहसी पूर्णें । वश करूनि मायेतें ॥ ९३ ॥ पुढती शंका करितां श्रुति । म्हणसी जीव कां ईतें न मरिती । विवेकवैराग्यज्ञानसंपत्ति । संपादूनियां स्वयमेव ॥ ९४ ॥ भो भो अजिता यदर्थीं ऐक । अखिल शक्ति तूं अवबोधक । जीवान्तरगत उद्बोधक । शक्त्युत्कर्ष हाचि तुझा ॥ ९५ ॥ अंतःकरणा

जीवांप्रति । विवेकवैराग्यज्ञानसंपत्ति । तव प्रेरणेवीण निश्चिती । नोहे श्रीपति स्वातंत्र्यें ॥ ९६ ॥ येथ तूं जरी म्हणसी ऐसें । ज्ञानैश्वर्यादिगुणविशेषें । अकुण्ठबोधें मी आथिला असें । जीवां हें नसे काय म्हणोनी ॥ ९७ ॥ आणि जीवांकारणें अविद्या बाधे । मज पूर्णातें ते न बाधे । कर्मज्ञानादिशक्त्यवबोधें । म्यां तद्बधें सोडविजे ॥ ९८ ॥ म्हणसी यदर्थीं प्रमाण काय । तरी हा आमुचा श्रुतिसमुदाय । अन्यप्रमाणाचें कार्य । रूढ नोहे यदर्थीं ॥ ९९ ॥ जरी तूं म्हणसी गुणातीतीं । कैसी श्रुतींची प्रवृत्ति । तरी श्रुतिमयात्मक वेदां वसति । असे संतत सन्मात्रीं ॥ २०० ॥ तो तूं सन्मात्र कोणे समयीं । मायावलंबें सृष्ट्यादिकार्यीं । माये करूनि क्रीडसी पाहीं । अचिन्त्यानंतगुणपूर्ण ॥ १ ॥ सत्यज्ञानानंतानंद । चिन्मात्रैकरसें विशद । प्रकटैश्वर्यें क्रीडतां वेद । तवानुलक्षें विचरतसे ॥ २ ॥ तिये काळीं वदल्या श्रुति । जेथून इयें भूतें होती । विरंचीपूर्वी जगदुत्पत्ति । ब्रह्मयाप्रति जो सृजित ॥ ३ ॥ तया ब्रह्मयाचिये धिषणे । माजी करी जो वेदप्रेरणे । तया देवातें मुमुक्षुगणें । शरण होणें श्रुति म्हणती ॥ ४ ॥ तो तूं म्हणसी देव कैसा । जो आत्मत्वें स्वप्रकाशा । न संडूनि माये सरिसा । नित्य मुक्तत्वें क्रीडावान् ॥ ५ ॥ माये माजी असोनि आपण । मायैश्वर्यगुण प्रकटून । करी मायेचें नियमन । सत्यज्ञानब्रह्ममय ॥ ६ ॥ जो सर्वज्ञ सर्ववेत्ता । इत्यादि अनेक श्रुतिगण वक्ता । तो निगमकदंब तूतें तत्वता । प्रतिपादितसे भो अजिता ॥ ७ ॥ पुन्हा शंका घेऊनि श्रुति । ह्मणें तूं म्हणसी भो श्रीपति । जें चराचरांचा राजा दिवस्पति । कीं अग्नि म्हणती स्वर्गमूर्धा ॥ ८ ॥ ऐसे लोकपाळ पृथक्पृथक । निगमप्रतिपाद्य असतां मुख्य । तेथ प्रतिपाद्य मी हा विवेक । केंवि सम्यक विवरणें ॥ ९ ॥ ऐसें न म्हणें भो परेशा । ऐक यदर्थीं परिभाषा । बृहद्ब्रह्मचि विश्वाभासा । भासक वांचून आन नसे ॥२१०॥

बृहदुपलब्धमेतदवयन्त्यवशेषतया यत उदयास्तमयौ विकृतेर्मृदि वाऽविकृतात् ।
अत ऋषयो दधुस्त्वयि मनोवचनाचरितं कथमयथा भवन्ति भुवि दत्तपदानि नृणाम् ॥ १५ ॥

व्यतिरेककक्रमें कृतनिरास । विवर्त निरसल्या निःशेष । वास्तव उरे जें अवशेष । म्हणिजे त्यास बृहद्ब्रह्म ॥ ११ ॥ तेणें अवशिष्यमाणपणें । दुहिणाग्निरवीन्द्रादिकां कारणें । निमेषोन्मेषीं होणें जाणें । तें तव बृहत्त्व कोणें अवगमिजे ॥ १२ ॥ म्हणसी बृहतापासून । या सर्वांचे उदयास्तमान । तस्मात् ब्रह्म उपादान । सर्वां लागून झालें कीं ॥ १३ ॥ मठघटशरावकुड्यादिकां । मृद्विकारां हेतु मृत्तिका । कीं हेमविकरां कुंडलां कटकां । जेंवि कनका उपादानता ॥ १४ ॥ तैसेंच ब्रह्म विकारवंत । ऐसी शंका न कीजे येथ । अविकृत ब्रह्म सदोदित । विवर्तवत विकारता ॥ १५ ॥ सूर्य अविकार जैसा तैसा । कारण विवर्ता विश्वाभासा । तेंवि अविकृता तुज परेशा । विवर्तरूपें विकारता ॥ १६ ॥ अधिष्ठानत्वें तूं अविकारी । विकार प्रकटिशी विवर्तापरी । इवशब्दार्थें श्रुति निर्धारीं । उपमे धरित्री उपमिली ॥१७॥ घटमठादिविकारां कृत्स्नां । अधिष्ठानत्वें अविकृत मृत्स्ना । मटमठांच्या उदयास्तमानां । न हौनि प्रकटी विवर्तवत् ॥ १८ ॥ वाचारंभणमात्रविकार । मृत्तिका सत्यत्वें अविकार । तेंवि बृहत्त्वें निर्विकार ।

विश्वाकार विवर्तवत् ॥ १९ ॥ अखिल ब्रह्मचि ऐशा श्रुति । तुज एकातें प्रतिपादिती । यास्तव तुझ्या ठायीं धरिती । वाङ्मनसप्रवृत्ति मुनिवर्य ॥२२०॥ मज अद्वैतामानी मुनी । देखिलें कैं कोणी कोठोनी । तरी ते मंत्रच ऋषिवरगणीं । द्रष्टे म्हणोनि जाणावे ॥ २१ ॥ तिहीं वाङ्मनसाचरित । ठेविलें तव धामीं निश्चित । तेंही ऐकें इत्थंभूत । वदती स्पष्टार्थ उभयांचा ॥ २२ ॥ मनें करूनी आचरित । तें तव धामचि निश्चित । वचनाचरितें प्रबोधामृत । वदती संतत तव महिमा ॥ २३ ॥ जैसें आत्यंतिक कृपण । जीवें प्राणेंसीं धरी द्रविण । तैसें तव धाम आणि तव गुण । निर्धारून दृढ धरिती ॥ २४ ॥ किंबहुना नामरूपात्मक विश्व । त्यामाजी पृथग्रामाकृति सर्व । तेथ धरिती तुझाचि भाव । निरसोनि माव निजबोधें ॥ २५ ॥ परि विश्वाभास पृथग्विकार । सहसा न मनिती साचार । बृहद्ब्रह्म तूं विश्वाकार । कृतनिर्धार मोडतां ॥ २६ ॥ येचि अर्थीं उदाहरण । हेंचि श्रुति वदली जाण । जे मनुष्यां भूचरां लागून । भूमि सांडोन न वसवे ॥ २७ ॥ मनुज बैसलाही वृक्षाग्रीं । तरी तो निश्चयें भूमीच वरी । स्थळजळयानीं पुर गोपुरीं । भूम्याधारी तथापि तो ॥ २८ ॥ बहुतीं प्रयत्नीं अंतराळीं । त्रिमाळिकीं चतुरीं कुशळीं । पदें ठेवितांही चिरकाळीं । अचुक भूतळीं असेचि कीं ॥ २९ ॥ भूम्याधारें भौतिकां असणें । तेंवि ब्रह्मचि ब्रह्मेन्द्रपणें । विश्वाकारें अविकार जाणे । ऐसें बोलणें श्रुत्यर्थीं ॥२३०॥ सर्व ब्रह्मचि ऐसें निगमीं । तूतें देखिलें मुनिसत्तमीं । तयाचो प्रवृत्ति व्याख्यानधर्मीं । वदोनि श्रुत्यर्थ दृढावी ॥ ३१ ॥

इति तव सूरयस्त्र्यधिपतेऽखिललोकमलक्षपणकथामृताब्धिमवगाह्य तपांसि जहुः ।
किमुत पुनः स्वधामविधुताशयकालगुणाः परमः भजन्ति ये पदमजस्रसुखानुभवम् ॥ १६ ॥

सर्वकारणत्वें तूं वास्तव । ऐसा परमार्थनिर्वाह । श्रुतिही बोलोनि महानुभाव । प्रवृत्तियोगें दृढाविती ॥३२॥ त्रिगुणमायामृगीनर्तन । कर्ता म्हणोनि संबोधन । अधिपते हें तुजलागून । श्रुतींहीं पूर्ण केलें असें ॥३३॥ भो भो अधिपते परेशा । सूरि म्हणिजे विवेकी पुरुषां । तिहीं तुझिया अमळयशा । सेवूनि दोषा त्यागिलें ॥३४॥ ते विवेकी म्हणसी कैसे । जिहीं तव यश अति उत्कर्षें । लक्षिलें तेंचि विशेषणवशें । श्रुतिसंदर्भें अवधारीं ॥ ३५ ॥ अखिल म्हणिजे संपूर्ण लोक । त्यांचे कायिक वाचिक मानसिक । मळक्षपणीं पटुतर देख । कथामृताब्धि हाचि तुझा ॥ ३६ ॥ त्यामाजी करून अवगाहन । त्रिविधपाप-तापांचें दहन । करूनि टाकिती निपटून । स्वानंदघन मग होती ॥ ३७ ॥ कथामात्रें पापताप । त्यागिती ऐसा तव प्रताप । माझें वास्तव चित्स्वरूप । भजोनि संकल्प निरसिती ॥ ३८ ॥ चित्स्वरूप तें तव धाम । तन्निष्ठ जे कां आत्माराम । त्यागिती आशयसह गुणधर्म । किमुत परम हें म्हणणें ॥ ३९ ॥ आशय म्हणिजे अंतःकरण । एतद्धर्म रागादि पूर्ण । जन्मापासूनि जरामरण । पर्यंत गुण काळकृत ॥ २४० ॥ अंतःकरणचतुष्टय । मनोधीचित्ताद्यहंतामय । धर्म म्हणिजे तयाचे विषय । अवस्थात्रयात्मक अवघे ॥ ४१ ॥ एवं रागद्वेषादिक । तृष्णादुराशावासनात्मक । यांच्या अवलंबें अविवेक । बुडवी निष्टंक

भवडोहीं ॥ ४२ ॥ ऐसे आशयकाळगुण । सूरि क्षाळिती तुज भजोन । भो भो परम हें संबोधन । करूनि श्रुतिगण काय वदे ॥ ४३ ॥ अमलवास्तव त्वद्धामभजनें । आशयकाळगुण क्षाळणें । अखंडैक-रससुख भोगणें । किमुत म्हणणें हें नवल ॥ ४४ ॥ ऐसे सूरि विवेकनिष्ठ । संप्रज्ञातही वर्ततां स्पष्ट । नलिनीदलवत भावस्पृष्ट । नित्य भ्राजिष्ठ निर्लेप ॥ ४५ ॥ इष्टानिष्टमिश्र त्रिविध । येणेंचि कर्मलेपें बद्ध । होवोनि भोगिती कर्म विरुद्ध । तन्मुक्त शुद्ध ते होती ॥ ४६ ॥ ऐसा श्रुतिगण कविजनचर्या । प्रमाण करूनि अनुवादलिया । पुढती तव गुणां कां चिन्मयां । न भजती तयां धिक्कारिती ॥ ४७ ॥

दृतय इव श्वसन्त्यसुभृतो यदि तेऽनुविधा महदहमादयोऽण्डमसृजन्यदनुग्रहतः ।
पुरुषविधोऽन्वयोऽत्र चरमोऽन्नमयादिषु यः सदसतः परं त्वमथ यदेष्ववशेषमृतम् ॥ १७ ॥

ईशावास्योपनिषच्छ्रुति । हरिगुणविमुखां अभक्तांप्रति । नरदेह पडतां होय जे गति । कथी ते श्रोतीं परिसावी ॥ ४८ ॥ सूर्यप्रकाशरहित लोक । केवळ असूर्यनामक । अंधतम जो अज्ञानपंक । केवळ अविवेक गाढमूढ ॥ ४९ ॥ भजनविमुख त्या लोकांप्रति । मेलिया नंतर वसती जाति । आकल्प जेथें अनिर्गति । आत्महंते म्हणोनि त्यां ॥ २५० ॥ ऐसा अनेक श्रुतिसमुदाय । भजनविमुखां बोधी भय । ये श्रुत्यर्थीं तो अन्वय । शुकाचार्य निरूपी ॥ ५१ ॥ असुभृत म्हणिजे सप्राण नर । जरी त्यां तव भजनीं अनुसर । स्वरूपनिष्ठता अति सादर । अथवा तत्पर गुणश्रवणीं ॥ ५२ ॥ अनेक जन्म भोगिले कष्ट । भाग्यें नरदेह लाधले श्रेष्ठ । येथें होऊनि भजननिष्ठ । करिती यथेष्ट परिचर्या ॥ ५३ ॥ व्यतिरेकान्वयें ओतप्रोत । बृहद्ब्रह्मचि सदोदित । गुरुमुखें विवरूनि नित्यानित्य । मिथ्या विवर्त अवगमिती ॥ ५४ ॥ ब्रह्मात्मबोधें आत्माराम । होवोनि ठेले पूर्णकाम । ज्यांच्या दर्शनेंचि भवभ्रम । निरसे दुर्गम अबळांचा ॥ ५५ ॥ एक ते सगुणा तव परिचर्या । करिती नियमूनि वाङ्मनः काया । तव गुणश्रवणें कथनें माया । निस्तरोनियां समरसती ॥ ५६ ॥ यदर्थीं राया भगवद्वचन । सगुणभक्तीं कृतप्रमाण । भीष्मपर्वीं स्वमुखें कृष्ण । पार्थालागून जें वदला ॥ ५७ ॥

सम्मतिः ॥ दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया । मामेव ये प्रपद्यन्ते मायामेतां तरन्ति ते ॥ १ ॥

हरि म्हणे भो धनंजया । दैवी हे जे माझी माया । त्रिगुणद्वारा त्रिजगा यया । प्रसवोनियां भवीं बुडवी ॥५८॥ रजोगुणें सृजी सकळ । सत्वें करीती प्रतिपाळ । पुढती पाहोनि प्रळयवेळ । ग्रासी तत्काळ तमोगुणें ॥ ५९ ॥ गुणमयी ऐसी प्रसवोनि गुणां । गोविलें ग्रसना अवना सृजना । तिहीं सृजिल्या त्रिविधा जना । भवनिस्तरणा अनुपाय ॥ २६० ॥ अनिष्ट इष्ट मिश्र त्रिविध । प्राणी करूनि कर्मबद्ध । विषयभ्रमें भवविरुद्ध । प्रियतम मानूनि निमज्जती ॥ ६१ ॥ दीप कवळूनि पतंग जळती । विषयभ्रमें तैसिया रीती । प्राणिमात्र दुःखावर्तीं । न निस्तरती दुरत्ययीं ॥ ६२ ॥ यज्ञादि इष्टकर्मे स्वर्ग । भोगूं जातां अमरभोग । पुण्यक्षयीं अधोमार्ग । लाहती मग मनुजत्व ॥ ६३ ॥ मिश्रकर्मे मनुजभुवनीं । दुःख

भोगिती सुख मानूनी । अनिष्टकर्मे तिर्यग्योनी । भोगजाचणी अनिवार ॥ ६४ ॥ ऐसे मायाप्रवाहीं पडिले । प्राणिमात्र भवीं बुडाले । त्यांमाजी प्रेमळ जे मज भजले । ते निस्तरले मम माया ॥ ६५ ॥ जरी दुस्तर हे गुणमयी । तरी मद्भक्तांतें कांहीं । बुडवूं न शके कालत्रयीं । जाण निश्चयीं धनंजया ॥ ६६ ॥ ऐसी संमत श्रुतीतें स्मृति । तस्मात तव गुण गाती पढती । किंवा निर्गुणीं व्यतिरेक गाति । जे समरसती ते धन्य ॥ ६७ ॥ तस्मात त्यांचेंचि धन्य जीवित । सफळ त्यांचेंचि प्राणश्वासित । अभक्तांचें भस्त्रावत । वृथा श्वसित श्रुति वदती ॥ ६८ ॥ यदर्थीं श्रुति शंका करिती । जे अभक्तही कामादि फळें वारिती । तरी हे प्राकृत वृथा वदंती । कृतघ्नाप्रति वैफल्यें ॥ ६९ ॥ अभक्त कृतघ्न कोण्या गुणें । तरी कार्यकारणानुग्रहपणें । जीवनहेतु त्या तुजकारणें । न भजती म्हणोनि कृतघ्न ते ॥ २७० ॥ यास्तव त्यांचे मनोरथ । निष्फळ ऐसिया आशयें येथ । कार्यकारणानुग्रहकार्थ । प्रतिपादिती प्रभूचे ॥ ७१ ॥ अव्यक्त महत् अहंकार । आदि करूनि तत्वें समग्र । ज्याच्या अनुग्रहें होती सधर । अंड पटुतर सृजावया ॥ ७२ ॥ अनुग्रह म्हणिजे अनुप्रवेशें । महदादितत्वीं सामर्थ्य ऐसें । समष्टिव्यष्टिमठघटदशे । सृजनावेशें प्रवर्तती ॥ ७३ ॥ तेथ अन्नमयादिकोशपंचकीं । तत्तदाकार होवोनि शेखीं । चेतवितोसी त्या तुज मूर्खीं । न भजोनि वरिली कृतघ्नता ॥ ७४ ॥ चिदेकरस जो परमपुरुष । तयासी अन्नमयादिकोशविशेष । तदाकारतेचा संस्पर्श । भारतीस कैंवि वदवे ॥ ७५ ॥ यदर्थीं श्रुति परिहार करी । अन्नमयादिकोशान्तरीं । अन्वयें तदाकारता खरी । न सरे दुसरी येथ युक्ति ॥ ७६ ॥ पुढती शंका करूनि वदे । पंचकोशाकारता नांदे । तैं सत्यत्वअसंगत्वशब्दें । कैसेनि वेदें प्रशंसिजे ॥ ७७ ॥ ये शंकेचिया परिहारा । वाक्य श्रुतींचें अवधारा । अन्नमयादि कोशां समग्रां । पासूनि परतरा असंगत्व ॥ ७८ ॥ अन्नादिपंचकोशांहूनि पर । चरम ब्रह्मपुच्छ हा उच्चार । सत्यत्व असंगत्व हा निर्धार । केला साचार तिये पदीं ॥ ७९ ॥ ब्रह्मपुच्छप्रतिष्ठा इति । सन्मात्रबोधें वदती श्रुति । तो परमात्मा चिन्मूर्ति । पुन्हा यदर्थीं करी शंका ॥ २८० ॥ ब्रह्मपुच्छप्रतिष्ठामात्र । सत्यत्व असंगत्व पर । तथापि अन्नमयादिकोशाकार । तेथ व्यभिचार झाला कीं ॥ ८१ ॥ अन्नमयादिकांच्या ठायीं । तदाकारान्वितत्वें पाहीं । झालिया मग कैसें काई । असंगत्व घडेल ॥ ८२ ॥ ये शंकेच्या परिहारा । पंचकोशांहूनि परा । ब्रह्मपुच्छ हे श्रुतींची गिरा । प्रतिष्ठा म्हणोनि प्रतिपादी ॥ ८३ ॥ सदसतःपर म्हणोनी । अवशेष ऋतसत्य ऐसी वाणी । स्थूलसूक्ष्मादिकोशांहूनी । व्यतिरेक साक्षीभूतत्वें ॥ ८४ ॥ अवशेष म्हणिजे अवशिष्यमाण । स्थूलसूक्ष्माहूनि विलक्षण । अबाधित जें उरलें जाण । तें स्वरूप पूर्ण ऋतसत्य ॥ ८५ ॥ तरी किमर्थ अन्वित झालें म्हणतां । शाखाचंद्रापरी तत्वता । शुद्धस्वरूपप्रबोधार्था । अन्वितत्व जाणावें ॥ ८६ ॥ श्रुति म्हणती हाचि पुरुष । अन्नरसमयादिपंचकोश । याचे हेचि अवयव शीर्ष । प्रमुख स्थूळसूक्ष्मक्रमें ॥ ८७ ॥ अन्वितत्वें इन्धनाकार । पावक अवगमितां साकार । तैसा पुरुषविधाप्रकार । प्रबोधपर श्रुति वदती ॥ ८८ ॥ एन्हवी ग्रावलोहकाष्ठादिकीं । अनळ अगोचर असेचि कीं । तैसा ब्रह्मपुच्छप्रतिष्ठादिवाक्यीं । शुद्धस्वरूप निर्दुष्ट ॥ ८९ ॥ तस्मात श्रीपरेशा कारणें । श्रवणें कीर्तनें स्मरणें मननें । भजती त्यांचें सफळित जिणें । अपरां श्वसणें भस्त्रावत् ॥ २९० ॥

ऐसें परमेश्वराच्या ठायीं । सर्वात्मकत्वें श्रुति सर्वही । भजनीयत्व वदल्या पाहीं । तें अभक्तां निन्दूनी दृढ केलें ॥ ९१ ॥ आतां अधिकारपरत्वें श्रुति । अगम्यमहिम्न ब्रह्मप्राप्ति । उपाधि अबलंबें उपासिती । ते पृथक्पद्धती दावितसे ॥ ९२ ॥

उदरमुपासते य ऋषिवर्त्मसु कूर्पदृशः परिसरपद्धति हृदयमारुणयोद हरम् ।
तत उदगादनन्त तव धाम शिरः परमं पुनरिह यत्समेत्य न पतन्ति कृतान्तमुखे ॥ १८ ॥

कूर्पदृश जे शार्कराक्ष । ऋषिमार्गीं ते धरूनि लक्ष । कैवल्यलाभास्तव प्रत्यक्ष । उदरं ब्रह्मेति उपासिती ॥ ९३ ॥ ऋषींचिया संप्रदाय मार्गें । शार्कराक्ष निजाधिकारविभागें । उदर उपासिती निजाङ्गें । कोण्या लिङ्गें तें ऐका ॥ ९४ ॥ कूर्प म्हणिजे सिकतारज । ज्यांचे दृष्टीसी वर्ते सहज । शार्कराक्षनामें त्यांतें बुझ । स्थूळदृष्टी भवभजक ॥ ९५ ॥ हृदयाहूनि स्थूळ उदर । तदुपासनीं जे सादर । म्हणाल कोण देवतापर । उपासनासार पैं त्यांचें ॥ ९६ ॥ उदरनिष्ठ जो जठराग्नि । अग्नि देवांचा विष्णु म्हणोनी । प्रतिपाद्य श्रुतिस्मृतींच्या वचनीं । मणिपूरस्थ उपासिती ॥ ९७ ॥ अहंवैश्वानरोभूत्वा । ऐसा स्मृत्यर्थ जाणावा । यदर्थीं बलिष्ठ श्रुतींचा यावा । भाषाग्रंथीं नये लिहितां ॥ ९८ ॥ येचि स्मृतीचें व्याख्यान । मधुसूदनी टीकेवरून । पाहतां श्रुत्यर्थविवरण । विद्वज्जनीं विलोकिजे ॥ ९९ ॥ तस्मात जाठर वैश्वानर । प्रत्यक्ष होऊनि परमेश्वर । प्राणिमात्रांचें वसवी उदर । हा निर्द्धार श्रुतिस्मृतींचा ॥ ३०० ॥ जाणोनि केवळ कूर्पदृश । जे म्हणिजेती शार्कराक्ष । स्थूळदृष्टि रजाक्त अक्ष । त्यांचें लक्ष हें कथिलें ॥ १ ॥ आरुणिसंप्रदायक्रम । प्राचीन ऋषींचें अधिष्ठूनि वर्त्म । कूर्प म्हणिजे परम सूक्ष्म । दृष्टि परमात्मपर ज्यांच्या ॥ २ ॥ हृदयस्थ जें परमात्मतत्व । लक्षूनि तत्प्राप्ती उपाव । उदरोपासनेचा भाव । धरिती स्वयमेव तल्लाभा ॥ ३ ॥ शार्कराक्षांची कथिली कथा । यावरी ऐका आरुणिपथा । साक्षात्परमात्मया हृदयस्था । सूक्ष्मातेंचि उपासिती ॥ ४ ॥ हृदयस्थ सूक्ष्म म्हणाल कैसा । किरणवेष्टित भास्कर जैसा । परिसरनाडींचिया प्रकाशा । माजी आपैसा द्योतक जो ॥ ५ ॥ तया हृहयस्था परमसूक्ष्मा । माजी लक्षूनियां परमात्मा । उपासिती पूर्णकामा । वास्तव तद्धामा ठाकावया ॥ ६ ॥ हृदयारविन्दाभंवती घरटी । शतैकनाडी कर्णिकापीठीं । किरण जैसे भास्करा निकटीं । तत्परिपाटीं देदीप्य ॥ ७ ॥ तयां मध्यग जे कां दहरी । तन्वी नीवारशूकापरी । तेजःपुञ्ज तयेच्या अग्रीं । पीता भास्वती अणूपम ॥ ८ ॥ ब्रह्मा विष्णु शिव केवळ । स्वाराट् तोचि आखंडळ । ऐसा महिमा श्रुतींचा मेळ । वर्णिती बहळ व्याख्यानीं ॥ ९ ॥ मूळाधारापासूनि दहरी । व्यापक तत्प्रभा सर्व शरीरीं । हृदयापासूनि मूर्ध्नीवरी । सुषुम्नामार्गें उर्ध्वग पैं ॥ ३१० ॥ त्यावरी सुषुम्नावर्त्म अधिष्ठून । जे ठाकिती मूर्ध्निस्थान । भो अनंता ते तुजमाजि पूर्ण । समरसोन विराजती ॥ ११ ॥ उत्कृष्ट जें कां तुझें धाम । तें ते पावूनि मुनिसत्तम । टाकिती संपूर्ण संसारश्रम । उत्तमोत्तमसुखलाभें ॥ १२ ॥ पुढती संसार जो कृतान्त । सहसा तन्मुखी न होती पतित । ऐसा श्रुतींचा सिद्धान्त । शुक बोधित कुरुवर्या ॥ १३ ॥ श्रुति म्हणती भो परेशा ।

झणें तूं म्हणसी जीवांसरिसा । मी ईश्वरही अनुप्रवेशा । पावोनि निवासा पावतसें ॥ १४ ॥ अपरनाडी-मार्गें जाती । त्यांची न चुके पुनरावृत्ती । तेथ पुढती शंका करिती । ते तूं नृपती अवधारीं ॥ १५ ॥ उदर-हृदयमूर्ध्निस्थान । उत्तरोत्तर न्यून पूर्ण । ईश्वरासही जीवासमान । तारतम्यें असतां पैं ॥ १६ ॥ तरी मग कोण्या विशेषणें । उपास्यता ईश्वराकारणें । किमर्थ जीवीं ईश्वरा भजणें । सामान्यपणें तारतम्यें ॥ १७ ॥ ऐसिया शंकेच्या परिहारा । श्रुति म्हणती परमेश्वरा । यदर्थीं सहसा शंका न करा । ऐका उत्तरा भो स्वामी ॥ १८ ॥

स्वकृतविचित्रयोनिषु विशन्निव हेतुतया तरतमतश्चकास्स्यनलवत्स्वकृतानुकृतिः ।
अथ वितथास्वमूष्ववितथं तव धाम समं विरजधियोऽन्वयन्त्यभिविपण्यव एकरसम् ॥ १९ ॥

तरी जीवांचें तारतम्य । सहसा नोहे ईश्वरासम । केंवि तें दोहींमाजि प्रथम । जीवांचेंचि श्रुति वदती ॥ १९ ॥ स्वकृत म्हणिजे निजाचरित । इष्ट अनिष्ट आणि मिश्रित । तदनुसार होती प्राप्त । विचित्रयोनि फळभोगा ॥ ३२० ॥ मग त्या विचित्रयोनींमाजी । कर्मसंकल्पफळभोगबीजीं । अनुप्रवेश करूनि सहजीं । आविष्कारें अवभासे ॥ २१ ॥ परिमित निर्मित पुरातनें । योनि म्हणिजे जन्मस्थानें । तेथ जन्मूनि तदभिमानें । देह होवोनि विचंबिजे ॥ २२ ॥ खेचरभूचरजलचरयोनी । स्थावर जंगम वनचर कोण्ही । योनीं माजी देहश्रेणी । अनुकरूनी तारतम्यें ॥ २३ ॥ कुञ्जरयोनी परम थोर । मशक मृकुट अतिलघुतर । तारतम्यें तदाकार । आविर्भवूनि अनुकरे पैं ॥ २४ ॥ अनळ म्हणिजे पावक जैसा । लहान थोर इन्धना सरिसा । अनुकरूनि निजप्रकाशा । करी तद्वत जीवही पैं ॥ २५ ॥ स्वकर्मकृता ज्या ज्या योनी । त्यां माजी तैसाचि अनुकरूनी । जीव प्रकाशे म्हणऊनी । स्वकृतानुकृति बुध म्हणती ॥ २६ ॥ तया जिवांचिये परी । तारतम्य परमेश्वरीं । कैसें न घडे तें श्रुतिनिकरीं । वाखाणिजेतें तें ऐका ॥ २७ ॥ न रमे एकाकी म्हणोन । बहुधा चित्र योनि निर्मून । त्यांमाजी तैसाचि अनुकरून । कूटस्थपणें अवभाससी ॥ २८ ॥ स्वकृता योनींच्या अनुकारें । अनुकरूनि तदाकारें । भाससी म्हणोनि तुज बुधनिकरें । स्वकृतानुकृति म्हणिजे तो ॥ २९ ॥ कर्मजनितयोनिप्रभव । आधीं निर्माण होय देह । तेथ प्रवेश करी जीव । तैसा भाव तुज न घडे ॥ ३३० ॥ जैसी तृणजलूका काडी । पुढील धरूनि मागील सोडी । तैशा देहाच्या परवडी । स्वकर्म आवडी जीव धरी ॥ ३१ ॥ तैसन घडे तुज ईश्वरा । जेंवि स्वयंभ गगनोदरा । माजी होतां घटमठनिकरा । गमे अंबरा अनुकरणें ॥ ३२ ॥ किंवा पावक प्रसवोनि जळ । दुमाकार होय सकळ । तयांचे गर्भीं आपुलें स्थळ । पूर्वींच असे कीं मग निर्मी ॥ ३३ ॥ तेंवि स्वकृता योनीमाजी जाण । पूर्वींच अससी तूं विद्यमान । प्रविष्टा परी तदनुकरण । प्राकृत जन अवगमिती ॥ ३४ ॥ मिथ्याविवर्तरूपा योनी । त्यां माजी वास्तव तुज वांचूनी । नाहींच ऐसें जाणती ज्ञानी । जें श्रुतिवचनीं प्रतिपाद्य ॥ ३५ ॥ जीव प्रविष्ट एका देहीं । सर्वभूतीं तूं निगूढ पाहीं । भूतान्तरात्मा ठायींच्या ठायीं । सर्वव्यापी साक्षित्वें ॥ ३६ ॥ सर्व भूतां माजी वसता । कर्मा-

ध्यक्ष साक्षी चेता । केवळ निर्गुण अविकारता । म्हणोनि स्तविती श्रुतिनिचय ॥ ३७ ॥ विवर्तरूपा योनि मिथ्या । त्यांचें कारण तूं वस्तुता । इहामुत्रिकफळकर्मरहिता । सन्मात्र तत्वता एकरस तूं ॥ ३८ ॥ सांइनि रजस्तमांचा लेप । विशुद्धमति जे निर्लेप । ज्यांसी नातळे पापताप । जे निष्पंक गुणरहित ॥ ३९ ॥ इहामुत्रिकफळाभिलाषी । कर्मव्यवहार न शिवे ज्यांसी । ते तुज जाणती निश्चयेंसीं । सन्मात्रासी स्वात्मत्वें ॥ ३४० ॥ यास्तव विभो तुझ्या ठायीं । उपाधिकृत हें तारतम्य नाहीं । अविच्युत ऐश्वर्य पाहीं । उपास्यत्व तुजचि घडे ॥ ४१ ॥ पूर्वशंकेची निवृत्ति । केली असतां येथ पुढती । परमाश्चर्य मानूनि चित्तीं । वदती श्रुति तें ऐका ॥ ४२ ॥

स्वकृतपुरेष्वबहिरन्तरसंवरणं तव पुरुषं वदन्त्यखिलशक्तिधृतोंऽशकृतम् ।
इति नृगतिं विविच्य कवयो निगमावपनं भवत उपासऽतेऽङ्घ्रिमभवं भुवि विश्वसिताः ॥ २० ॥

श्रुति म्हणती सनातन । अचिंत्यैश्वर्यें तूं पूर्ण । जीवासि न लगे जें लाञ्छन । मां तुज कोटून तें स्पर्शे ॥ ४३ ॥ देहादि उपाधि बहुविध । तिहीं जीवचि नोहे बद्ध । मां तूं केवळ परिपूर्णानंद । कैंवि संबंध तुज त्यांचा ॥ ४४ ॥ अविद्याकामकर्मे करून । जीवदशा लब्धचैतन्य । अवलंबूनि विपरित ज्ञान । मरण जनन पावतसे ॥ ४५ ॥ ऐसा संसृतिवरपडा । जीव दिसतांही बापुडा । वास्तवबोधें पाहतां फुडा । भगवद्भाव श्रुति वदती ॥ ४६ ॥ जीवदशेचा निरसूनि दोष । श्रुति म्हणती जो परेश । आदित्यरूपें तेजोविशेष । चिदाभास पैं तो हा ॥ ४७ ॥ पूर्णत्व श्रुति प्रतिपादिती । तेचि ऐका लक्षणारीती । भद्रीं देखिला जो कां नृपती । तो हा म्हणती मृगयेंत ॥ ४८ ॥ तो तूं ऐसिया वाक्य-विचारें । जीवासि वास्तव पूर्णत्व खरें । बोधिती द्वयोपाधि परिहारें । वस्तुनिर्धारें एकत्वें ॥ ४९ ॥ तेथील सांइनि भद्रासन । मृगयाचाञ्चल्य तुरगासन । केवळ गात्र मात्र लक्षून । नृपत्व पूर्ण अवगमिती ॥ ३५० ॥ तेंवि वाच्यांश शबलांश । जीवेशांचे उपाधिविशेष । निरसूनि घेती पूर्णत्वास । शुद्धलक्ष्यांश एकत्वें ॥ ५१ ॥ जहदजहल्लक्षणाद्वारा । उपाधित्यागें जीवेश्वरां । अभंग एकत्व निर्धारा । माजी आत्मत्व स्वतःसिद्ध ॥ ५२ ॥ लक्ष योजनें भानु गगनीं । जरी तो बिम्बला थिल्लरवनीं । तरी तो निर्लेप स्वस्थानीं । तद्दोषगुणीं नाकळतां ॥ ५३ ॥ तेंवि जीवेश्वरांच्या ठायीं । बद्धमुक्तता मुळींच नाहीं । उपाधिभेदें भासे कांहीं । मोहप्रवाहीं भ्रमग्रस्तां ॥ ५४ ॥ तेथ म्हणती मीमांसक । जीव क्रत्वर्थकर्मपरिपाक । भोगार्थ भ्रमे नाना लोक । फळकामुक होत्साता ॥ ५५ ॥ कर्मे नाना देह धरी । कर्मे भ्रमे स्वर्गसंसारीं । स्तावक मात्र त्या ईश्वरीं । निगमोच्चारीं स्तविजेत ॥ ५६ ॥ परंतु नोहे तो ईश्वर । जीव केवळ कर्मपर । कर्मा वांचूनि दुसरी थार । नाहीं संसार निरसावया ॥ ५७ ॥ कर्मे नाना योनि वरी । कर्मे नाना देह धरी । लक्ष चौऱ्यांशीं माझारी । देतां फेरी न विसावा ॥ ५८ ॥ ऐसें वदती जें याज्ञिक । एकदेशी कर्मठ मूर्ख । तत्त्वमस्यादिवाक्यविवेक । अनोळख ज्यां लागीं ॥ ५९ ॥ असो तयांचें बोलणें । व्यर्थ किमर्थ विस्तारणें । वेदान्तवाक्यश्रवणा विणें । बहिर्मुखपणें वर्तणें

ज्या ॥ ३६० ॥ यदर्थीं मुख्य सनकादिक । उपासनाकाण्डविवेक । बोलती तो श्रुति सम्यक । प्रतिपादक अवधारा ॥ ६१ ॥ जीव पडिला भवभ्रमपूरीं । कर्मसरिताप्रवाहान्तरीं । करुणा भाकितां त्यातें तारी । कर्णधार गुरुवर्य ॥ ६२ ॥ पंचायतनोपासना । रूपें केवळ पूर्णचैतन्या । उपदेशूनि तत्पादभजना । भक्तिनौके बैसवी जो ॥ ६३ ॥ ऐसिया भजनोपनिष्ठां नरां । माजी निवडे भजनाधिकारा । तोचि लंघूनि भवभ्रमपूरा । पावे परपारा पूर्णत्वा ॥ ६४ ॥ येरां उपासकांची गोठी । भवीं बुडती कोट्यनुकोटी । ज्यांतें अभेदहातवटी । भजनराहटी माजि न फवे ॥ ६५ ॥ उपास्यदेवतापर ज्या भक्ति । तैसी च गुरुभजनीं अनुरक्ति । अन्यत्र भवभोगीं विरक्ति । ते लंघिती भवनदी ॥ ६६ ॥ अनन्यभावें औपास्यभजन । तो मी ऐसें अनुसंधान । ऐक्यभावें सद्गुरुध्यान । करितां ज्ञान त्यां होय ॥ ६७ ॥ उपासना चैतन्यघन । अभेदभावें भजतां पूर्ण । तत्त्वमस्यादिवाक्यविवरण । तयांचि लागून उपतिष्ठे ॥ ६८ ॥ येर भजती भेदभावें । भवभ्रमसुखचि तिहीं मागावें । इहामुत्रिक ज्यां नाहीं ठावें । स्वबोधशिवें न पवती ते ॥ ६९ ॥ भिषकापासून भेषजग्रहण । करूनि होऊं इच्छिती अरुग्ण । ते त्या भिषका लागीं शरण । सहसा अनन्य नव्हती कीं ॥ ३७० ॥ तैसे गुरूपासूनि उपासना । घेऊनि करिती भेदभजना । भवभ्रमसुखाची कामना । फळें नाना वांच्छिती ॥ ७१ ॥ दारा धन सुत स्वजन सदन । तनु निरामय चातुर्यपूर्ण । लोकीं सन्मान शत्रुनिधन । भजनीं भेदज्ञ कामिती हें ॥ ७२ ॥ तयां कोठून भवनिवृत्ति । ऐसें न वदोनि वदली श्रुति । असो यावरी पदपदार्थीं । व्याख्यान श्रोतीं परिसावें ॥ ७३ ॥ स्वकर्मार्जित विविध पुरें । नरातिर्यगादि जियें शरीरें । भोगायतनें पृथगाकारें । आविष्कारें धरी जीव ॥ ७४ ॥ श्रुति म्हणती भो ईश्वरा । तोही पुरुष तवांश खरा । अखिलशक्ति ऐश्वर्यधरा । पृथगाकारीं भासतसे ॥ ७५ ॥ जैसे घटमठादि गगनांश । पृथक न होनि गमती अशेष । तैसेचि जीव हे तवांश । चिदाभास म्हणिजती पैं ॥ ७६ ॥ येऱ्हवीं यथार्थबोधें जीव । तुजसीं अभिन्नचि वास्तव । यदर्थीं शंकेसी नाहीं ठाव । भवभ्रम वाव मृगजलवत् ॥ ७७ ॥ अंतर्बाह्यद्वयावरणीं । जीव पडिला कर्मभ्रमणीं । म्हणाल तरी तीं आवरणें दोन्ही । मिथ्या म्हणोनि श्रुति वदल्या ॥ ७८ ॥ अंतरावरण तें कारण । बाह्यावरण कार्य जाण । माया अविद्या म्हणोन । वदती सर्वज्ञ ज्यां लागीं ॥ ७९ ॥ दोन्ही आवरणें असतां जीवा । ईश्वरीं अभिन्न केंवि म्हणावा । सहसा संशय हा न धरावा । श्रवण करावा विवेक हा ॥ ३८० ॥ पाञ्चभौतिक त्रिगुणात्मक । नेति मुखें निरासितां देख । पूर्णचैतन्य उरलें एक । जीव पृथक मग कैंचा ॥ ८१ ॥ ऐसी वस्तुत्वें जीवगति । विचारूनियां निश्चिती । ज्ञानी तव चरणां उपासिती । भवनिवृत्तीकारणें ॥ ८२ ॥ तस्मात् मिथ्या उभयावरण । अविद्या माया कार्य कारण । ज्ञानी विवरूनि वेदान्तश्रवण । तन्निरसनीं प्रवर्तती ॥ ८३ ॥ भवनिवर्तक तवाङ्घ्रि स्वतंत्र । वेदोक्तकर्मबीजाचें क्षेत्र । तेथ अर्पितां कर्ममात्र । आवरणसूत्र तैं भंगे ॥ ८४ ॥ तवाङ्घ्रिक्षेत्रीं प्रेरितां कर्म । सफळ होय तें छेदून भ्रम । हा दृढविश्वासें नेम । करूनि प्रेम पदीं धरिती ॥ ८५ ॥ विश्वासानि तवाङ्घ्रिभजनीं । नवविधप्रेमें रमती ज्ञानी । अनन्यबोधें भ्रम निरसूनी । कैवल्यभुवनीं विराजती ॥८६॥ तिये भक्तीचें पिकतें क्षेत्र । मर्त्यभुवनीं नृदेह मात्र । अन्य लोकीं विषयतंत्र । कर्मानुसार फळभोक्ते

॥ ८७ ॥ आत्मप्राप्तीसी साधन । भक्तीहूनि श्रेष्ठ आन । जें म्हणती तें अनुचित पूर्ण । मुक्तीहून वर भक्ति ॥ ८८ ॥ म्हणाल तरी हे श्रुती । वाखाणिजेल पदपदार्थीं । ईच्या श्रवणें सभाग्य श्रोतीं । अभेद-भक्ती अनुसरिजे ॥ ८९ ॥

दुरवगमात्मतत्वनिगमाय तवात्ततनोश्चरितमहामृताब्धिपरिवर्त्तपरिश्रमणाः ।
न परिलषन्ति केचिदपवर्गमपीश्वर ते चरणसरोजहंसकुलसङ्गविसृष्टगृहाः ॥ २१ ॥

श्रुति म्हणती भो ईश्वरा । दुर्बोध आत्मविचार खरा । तदवगमार्थ विवेक दुसरा । भक्ती वांचूनि असेना ॥ ३९० ॥ भक्ति म्हणिजे जाति काय । हा विवरितां अभिप्राय । प्रेमरसावांचूनि सोय । न लगे अन्वय बोधावया ॥ ९१ ॥ देव भक्त इतुकें द्वैत । परि माजील प्रेम अद्वैत । भेद असतां तेथ किंचित । ये वैयर्थ्य भक्तीसी ॥ ९२ ॥ भक्तितत्व ऐसें एक । जें सर्वीं सर्वत्र रोचक - प्रपंचीं ही विषयसुख । विपरीतबोधें रुचवीतसे ॥ ९३ ॥ युवा युवति परस्परें । सप्रेम भजती स्मर पडिभारें । यामाजी पातिव्रत्य जैं खरें । तैं निस्तरे भवसिन्धु ॥ ९४ ॥ पिता पुत्र कीं सेवकस्वामी । अभेदप्रेमें वर्ततां सह्मीं । विषय सेवितां सुकृतोद्यमीं । भवदुर्गमीं निस्तरती ॥ ९५ ॥ असो हे स्वैराचारें विषय । सप्रेम सेवितां रोचक होय । प्रेम राहित्यें विषप्राय । लागे हें काय सांगावें ॥ ९६ ॥ विपरीतबोधें विषयाभास । प्रगरसोंचि रुचे अशेष । प्रेम भंगतां वैराग्यास । कारण होय तेच क्षणीं ॥ ९७ ॥ विषया-भासीं जें वैरस्य । वैराग्यनामें बोलिजे त्यास । तैं देहादि प्रपंच फोस । प्रेमा ओस सहजेंची ॥९८॥ तैं मग प्रेमा वास्तवबोधें । पूर्णचैतन्यीं येवोनि नांदे । मृगजल सांडूनि अगाधह्रदें । जेंवि निवती पिपासिक ॥९९॥ पूर्णचैतन्य तूं ईश्वर । धर्मसेतुस्थापनापर । घेऊनि युगानुयुगीं अवतार । लीला विचित्र प्रकाशिसी ॥ ४०० ॥ सूर्योदयीं नासे तम । डोळ्यां रुचे प्रकाशप्रेम । तव विग्रहीं भक्तासक्तम । जडती निष्काम सकामवत् ॥ १ ॥ युवा युवति सकाम रमती । विपरीतबोधाचिये भ्रान्ती । वास्तव-बोधें सप्रेमभक्ती । तेंवि लाहती सद्भक्त ॥ २ ॥ तुझी जे कां अवतारमूर्ति । तयेची जे अमोघकीर्ति । तया अमृताब्धी माजि निवती । लाहती विश्रांति अक्षय ते ॥ ३ ॥ तया सप्रेम सुखापुढें । कैवल्य-सुखही नेच्छिती कोडें । तेथ आमुष्मिक बापुडें । कोणीकडे वैवर्ती ॥ ४ ॥ ऐसे विरळा भक्तिरसिक । भक्तिप्रेमापुढें आणिक । अपवर्गादि नेच्छिती देख । रमती सम्यक सत्संगीं ॥ ५ ॥ प्रेमसुखें पूर्ण धाले । केवळ सत्संगीं निवाले । थितें देहादिसुख विसरले । मां इतरां भजले केंवि ॥ ६ ॥ त्वत्पदसरोजहंस-कुळ । झाले सत्संगें जे अमळ । देहगेहादि बंदिशाळ । मानूनि केवळ संन्यासिती ॥ ७ ॥ श्रवण कीर्तन नवविध प्रेमा । भोगितां विसरूनि गेले कामा । अभेदबोधें निष्कामधामा । माजी विश्रामा पावले ॥ ८ ॥ ऐसिया भक्तांचें पदकमळ । मुक्त वंदिती सनकादि अमळ । मुमुक्षुही विश्रांतिस्थळ । वेळाउळ सेविती ते ॥ ९ ॥ तया सुखाची विश्रान्ती । दुर्लभ मानूनि बद्ध वांछिती । एवं सर्वां वरिष्ठ भक्ती । म्हणती श्रुती भो ईशा ॥ ४१० ॥ भक्तिसुखोपलब्धिस्थळ । तें एक हें भूमंडळ । येथ नरतनु लाहूनि अमळ । भजती केवळ आत्मज्ञ ते ॥ ११ ॥ ज्याच्या प्रकाशें विश्वोद्यान । कोणी तयातें न पाहोन ।

विश्वीं विषयाभिलाषें पूर्ण। रमती अनाभिज्ञ मूढत्वें ॥ १२ ॥ जेथूनि जन्म झाला आपणा । विसरूनि तया आत्मकारणा । आत्मच्छायेच्या आलिंगना । स्नेह चौगुणा वाढविती ॥ १३ ॥ अरे प्राणी हो तुम्ही सकळ । अज्ञान पांघुरलां केवळ । तेणें विसरलां आपुलें मूळ । भुललां टवाळ देखोनी ॥ १४ ॥ प्राण-पोषक विषयासक्त । अनित्यपदार्थीं अनुरक्त । होऊनि वदतां जो वेदान्त । तोचि भ्रान्तिकर होय ॥ १५ ॥ सकाम भ्रमकर वेदवचनें । प्रतिपादिती जे कर्माचरणें । तत्फलभोगें जन्ममरणें । योनिभ्रमणें न चुकती ॥ १६ ॥ यास्तव भूलोकीं नरतनु । लाधल्या कीजे ईश्वरभजन । हितोपदेशें श्रुतींचा गण । आक्रोशोन हेंच वदे ॥ १७ ॥

त्वदनुपथं कुलायमिदमात्मसुहृत्प्रियवत् च रति तथोन्मुखे त्वयि हिते प्रिय आत्मनि च ।
न बत रमन्त्यहो असदुपासनयाऽऽत्महनो यदनुशया भ्रमन्त्युरुभये कुशरीरभृतः ॥ २२ ॥

भो भगवंता तुझिये भजनीं । अनुकूल नरतनु सर्वांहूनी । कुलायशब्दें वैयाकरणी । जिये लागून म्हणताती ॥ १८ ॥ कु हें पृथ्वीचें अभिधान । तीमाजी अंतीं होतसे लीन । यालागीं कुलाय म्हणती जाण । देहालागून विपश्चित ॥ १९ ॥ ते नरतनु भजनानुकूळ । आज्ञेसरिसी वर्तनशीळ । आत्मतुल्य प्रिय केवळ । लाहोनि विकळ भजनीं जो ॥ ४२० ॥ तथापि सर्वज्ञ तूं परमात्मा । भावें भजती त्यांचा प्रेमा । जाणोनि पुरविसी तयांच्या कामा । विश्रामधामा विश्वेशा ॥ २१ ॥ अमरतरूच्या तळवटीं । न लावितांही कुसुमादिवाटी । फळपुष्पांच्या विविधकोटी । इच्छितां पोटीं उपलब्ध ॥ २२ ॥ तैसा भक्तभावने सरिसा । तूं सम्मुखची श्रीपरेशा । प्रियतम हितकर तुज ऐसा । आन आपैसा नसतांही ॥ २३ ॥ ऐसा सुसेव्यही तूं असतां । तुझ्या ठायीं प्रेमा चित्ता । सख्यादि भजनें नादरितां । भजती विवर्ता आत्मघ्न ॥ २४ ॥ असत्पदार्थोपासना । अवलंबूनि विपरीतज्ञाना । भजती ऐसिया आत्मघ्नां । दीर्घस्वप्ना वरपडणें ॥ २५ ॥ म्हणती वडील दरिद्री होते । आपण झालों उद्योगकर्ते । नाना व्यवसायीं धनातें । संपादिलें बहुयत्नीं ॥ २६ ॥ धनवर्धना विश्वासुक । पाहोनि योजिले सेवक । तथापि त्यांचा प्रातिमासिक । पाहणें लेख लागतसे ॥ २७ ॥ नामांकितांसीं तनुसंबंध । केले उत्साह अगाध । वनितारत्नें परम शुद्ध । भाग्यें प्रसिद्ध लाधलीं ॥ २८ ॥ रूपलावण्याच्या खाणी । मनोनुकूला गृहवर्तिनी । सालंकृता वसनाभरणीं । तरुणी तरणि तेजाळ्या ॥ २९ ॥ तयांचे पोटीं झाले कुमर । प्रज्ञावंत परम चतुर । तिहीं घेतला कुटुंबभार । धाष्ण्यें धुरंधर निवडिले ॥ ४३० ॥ निष्कापाह्मनि कोटिमान । यत्नें संग्रहिलें कांचन । आयव्ययाचें परिज्ञान । अतिसज्ञान प्रबोधनीं ॥ ३१ ॥ अनेक वस्तूंचे संग्रह । अष्टादशधान्यसमूह । उभराभरी करितां पहा हो । अवकाश लाहों न पवती ॥ ३२ ॥ विश्वास न वाटेचि कोणाचा । धोका द्रव्यरक्षणाचा । निगूढ ठाव निक्षेपाचा । युक्तिप्रयुक्ती निर्मिती ॥ ३३ ॥ ऐसें चित्त ठायीं ठायीं । सर्वदा गुंतोनि गेलें पाहीं । तथापि देखोवेखीं कांहीं । सुकृतप्रवाहीं भरताती ॥ ३४ ॥ कार्तिकमाघवैशाखस्नानीं । जाऊनि बैसती पुराणीं । धन वेंचितां मानिती हानी ।

म्हणती आम्हां हें कोठूनि आठवलें ॥ ३५ ॥ एक म्हणती नायकों आतां । तुम्हीं साधावें परमार्था । सांडूनि प्रपंचाची चिंता । स्वस्थ एकान्ता सेवावें ॥ ३६ ॥ येरू म्हणे बायको भोळी । रक्षूं न शके लुगडें चोळी । ते कैंवि धनसदना सांभाळी । आम्हां वेगळी अतिदीन ॥ ३७ ॥ लेकुरें नेणतीं आम्हांविणें । किविलवाणीं दिसती दीनें । प्रस्तुत नातोंडांचीं लग्नें । करणें लागती आवश्यकें ॥ ३८ ॥ नामा रूपा सारिखे देख । गृहस्थ पाहूनि आवश्यक । त्यांसीं करणें सोयरिक । दीर्घ विवेक करूनियां ॥ ३९ ॥ असत्पदार्थोपासना । सप्रेमभावें ऐसी मना । रुचलिया मग वैराग्य कोणा । भावें आत्मज्ञा उपजेल ॥ ४४० ॥ समयीं आलिया याचकासी । मुष्टि पिष्ट देतां त्यासी । वदान्य मानी आपणासी । सुकृतराशी म्हणे घडल्या ॥ ४१ ॥ सहस्रभोजनें सांवत्सारिकें । कीं श्राद्धपक्षादि वार्षिकें । ग्रहणें व्यतिपातपार्विकें । साधी सम्यकें सुकृतार्थ ॥ ४२ ॥ व्रतें उपावास पारणी । तीर्थयात्रांची धांवणी । म्हणे मजहूनि दुसरा कोणी । देवीं ब्राह्मणीं न भजेची ॥ ४३ ॥ लोकीं माझी गृहस्थिति । स्त्रीपुत्रादि धनसंपत्ति । मजहूनि सुखी नाहीं क्षिति । म्हणोनि चित्तीं श्लाघेजे ॥ ४४ ॥ तंव पूर्वील जे कां विश्वासुक । ठेविले होते जे हस्तक । तेचि होती खग्रासक । पाहतां लेख साकल्यें ॥ ४५ ॥ त्यांसी बोलतां निष्ठुरपणें । तेही बोलती पुरें उणे । पांचांमाजी लाजिरवाणें । नेऊनि भांडणें वाढविती ॥ ४६ ॥ तयांसी होती आन्नान्नगति । सभाग्य केले ते स्वसंगति । कृतघ्न फिरूनि पडिले अंतीं । म्हणोनि खंती बहु वाटे ॥ ४७ ॥ ऐकतां त्यांच्या विषम गोठी । क्रोधें भडका उठे पोटीं । बळें झोंबूनियां कंठीं । वाटे घांटी फोडावी ॥ ४८ ॥ ऐसा प्रचंड क्रोध वाढे । तैं शान्ति क्षमा कोणीकडे । घातपातावरी वावडे । वेंचूनि कवडे नृपसदनीं ॥ ४९ ॥ ऐसे व्यवसाय अनेक । असदाराधनीं मानिती सुख । तेणें प्रबळे शत्रुषट्क । मग भोगिती नरक बहुयोनी ॥ ४५० ॥ रांड मेलिया दुःखें रडे । पोर मेलिया शोकें वरडे । विश्रान्ति न वटे चहूंकडे । वर्णितां तोंडें गुण त्यांचे ॥ ५१ ॥ असो वैराग्य नुपजे देहीं । तंववरी सहसा सुटका नाहीं । आत्महंते मोहप्रवाहीं । ऐसेचि पाहीं निमज्जती ॥ ५२ ॥ नरदेह अनुकूळ नवविधभजना । तो मग लावी तद्गुणकथना । दुःखें व्याप्त अंतःकरणा । माजी वेदना भोगीतसे ॥ ५३ ॥ हरिगुणश्रवणा पटुतर श्रोत्र । हरिकीर्तना अनुकूळ वक्त्र । हरिपरिचर्ये लागीं कर । नरशरीर ऐसें जें ॥ ५४ ॥ असदुपासनेचे राहटी । तें वेंचिती विषयासाठीं । मग भोगिती दुःखकोटी । देतां घरटी भवचक्रीं ॥ ५५ ॥ जेथ जेथ वासना गुंते । तेथ जन्म घेऊनि कुंथे । पावे अनेक दुर्योनींतें । भवभ्रमपथें परिभ्रमतां ॥ ५६ ॥ मर्कट होवोनि कैकाडियाचें । दारोदारीं तत्तंत्र नाचे । कीं सर्प होवोनि गारुडियाचें । कुटुंब त्याचें मग पोपी ॥ ५७ ॥ रीस व्याघ्र उक्ष वृश्चिक । श्वान वानर मार्जार मूषक । रासभ सूकर मृग जंबुक । धरी अनेक कुशरीरें ॥ ५८ ॥ चौऱ्यांशी लक्ष संख्या योनी । माजी नरतनु अनुकूळ भजनीं । केवळ आत्मप्राप्ती लागोनी । देवें निर्मूनि ठेविली ॥ ५९ ॥ चौऱ्यांशी लक्ष योनि भ्रमतां । केवळ विषयभोगीं रमतां । दुर्लभ नरदेह हा अवचितां । लाहिजे तत्त्वता बहुभाग्यें ॥ ४६० ॥ दुर्लभ नरदेह लाभल्यावरी । अन्य योनींचिया परी । विषयासक्त होइजे नरीं । तरी मग थोरी काय याची ॥ ६१ ॥ लाहोनि नरदेह निधान । संपादूनि आत्मज्ञान । ब्रह्मनिष्ठ होइजे पूर्ण । मिथ्या भवभान

विसरूनी ॥ ६२ ॥ आत्मा देखावा ऐकावा । आत्मा मननीं मंतव्यावा । निदिध्यासें अनुभवावा । ध्यावा गावा श्रुति म्हणती ॥ ६३ ॥ श्रुतींचा मुख्य अभिप्राय । भ्रान्त जीवांचा समुदाय । तयांसी लाधलिया नरदेह । परमार्थसोय साधावी ॥ ६४ ॥ असन्मृगाम्बुपानें सुख । मानितां तेथें पावले दुःख । सन्मात्र चिदंबु सम्यक । सेवितां तोख सर्वत्र ॥ ६५ ॥

निभृतमरुन्मनोऽक्षदृढयोगयुजो हृदि यन्मुनय उपासते तदरयोऽपि ययुः स्मरणात् ।
स्त्रिय उरगेन्द्रभोगभुजदण्डविषक्तधियो वयमपि ते समाः समदृशोऽङ्घ्रिसरोजसुधाः ॥ २३ ॥

दमें रोधूनि करणवर्ग । शमें करिती वासनात्याग । अवलंबूनि प्रणवमार्ग । साधिती सांग प्राणजय ॥ ६६ ॥ पवनजयें रोधे मन । तैं तें होय कल्पनाविहीन । ऐसे योगाभ्यासीं प्रवीण । दृढ मुनिजन जे ध्याती ॥ ६७ ॥ ते सन्मात्रोपासक । म्हणोनि पावती अक्षयसुख । द्वेष्टे द्वेष्टिती जरी सम्यक । तरी त्यां वित्सुख सद्द्वेषें ॥ ६८ ॥ स्पर्शमणि पूजितां भावें । अष्टलोहांचीं पात्रें सर्वें । होय हेमचि आघवें । स्पर्शगौरवें सन्मात्रें ॥ ६९ ॥ द्वेषीं यवनीं फोडितां घनें । तें तो घनाचें करीं सोनें । सन्मात्रवस्तु स्वमहिमानें । चित्सुखाविणें आन नेदी ॥ ४७० ॥ किंवा सन्मात्रविग्रहधारी । पाहोनि सकाम भुलल्या नारी । बाहु भुजगेन्द्रवर्ष्मा सरी । देखोनि अंतरीं प्रविषक्ता ॥ ७१ ॥ जरी त्या सन्मात्रसगुणा तूतें । सकामप्रेमें भुलल्या चित्तें । तथापि वास्तव चित्सुखातें । भोगिती निरुतें सद्भजनें ॥ ७२ ॥ तैशाचि आम्ही तुज तत्वता । केवळ श्रुतिरूपी देवता । वास्तवनिर्गुणबोधें भजतां । पदाब्ज माथां धरीतसों ॥ ७३ ॥ तस्मात वास्तवसन्मात्रगुणें । द्वेषें प्रेमें स्मरणें ध्यानें । अभेद तव प्राप्ति पावणें । असद्भजनें दुर्लभ ते ॥ ७४ ॥ मना सहित परतल्या वाचा । न पवोनि अवबोध ज्याचा । तेथ प्रवेश आणिकांचा । होईल कैंचा जाणावया ॥ ७५ ॥ साक्षाद्वेत्ता कोण तया । कीं वक्ता समर्थ बोलावया । येथ कोठूनि सृष्टि इया । स्थूळ सूक्ष्मा इत्यादि ॥ ७६ ॥ ज्याहूनि अर्वाक् देवताचक्र । जें कां सृष्टिसर्जनपर । ज्यापासूनि हें समग्र । होतें झालें स्थूळ सूक्ष्म ॥ ७७ ॥ त्यातें जाणता त्याहूनि कोण । असावा तत्पूर्वी विद्यमान । तरी हें परब्रह्म निर्गुण । एक म्हणोन निगमोक्ति ॥ ७८ ॥ तेथ कैंचा तया पूर्वी । अर्वाक् ब्रह्मादिस्थावरीं सर्वी । ज्याहूनि होयिजे ऐसी पदवी । श्रुति गौरवीं वाखाणे ॥ ७९ ॥ जें कां वास्तव असंग एक । निष्कंप अचंचल निष्टंक । मनाहूनियां जवीन देख । विरोधवाक्य हें न मना ॥ ४८० ॥ कल्पने सरिसें मन वावडे । तंव वास्तवस्वरूप त्याहूनि पुढें । तैं मनाहूनियां जवीन घडे । ऐसें उघडें जाणों ये ॥ ८१ ॥ मृगजळ सांडूनि सूर्यरश्मी । पुढें जाईल कवणिये भूमी । तैसे ज्यावरी ब्रह्मादि आम्ही । विविधा नामीं वैवर्ती ॥ ८२ ॥ यालागीं देव अर्वाचीन । पावूं न शकती जयाचें वयुन । सर्वां पूर्वी विद्यमान । जें सनातन सन्मात्र ॥ ८३ ॥ चंद्र सूर्य तारा पवन । इत्यादि जे जे धावमान । त्या सर्वांचें अतिक्रमण । करून वर्ते सर्वत्र ॥ ८४ ॥ सर्वांचें जें बीज आप । तैसाचि वायु प्राणरूप । ज्यावरी भासोनि ज्यामाजि अल्प । वर्ते आकल्प

पर्यंत ॥ ८५ ॥ इत्यादि वदे श्रुतींचा निकर । भगवत्तत्व दुर्ज्ञेयतर । कोणी जाणों न शकती अवर । ऐसा निर्धार करूनियां ॥ ८६ ॥ अव्यभिचारी भगवद्भक्ति । अंगीकारूनि श्रुति वदती । तो इत्यर्थ आर्षश्रुति । श्रीशुक सुमती बोलतसे ॥ ८७ ॥

क इह नु वेद बतावरजन्मलयोऽग्रसरं यत उदगादृषिर्यमनु देवगणा उभये ।
तर्हि न सन्न चासदुभयं न च कालजवः किमपि न तत्र शास्त्रमवकृष्य शयीत यदा ॥ २४ ॥

बत या अव्ययार्थें श्रुति । भो भगवन्ता ऐसें म्हणती । अग्रसर तूं इये जगती । सर्वां पूर्वी स्वतः सिद्ध ॥ ८८ ॥ तया तूतें अर्वाचीन । उत्पत्तिस्थितिनाशवान । जाणों शकेल पुरुष कोण । ज्ञानकारणावांचूनी ॥ ८९ ॥ सर्वत्र तुजहूनि अलीकडे । यदर्थी काय प्रमाण घडे । तरी यतउदगात् या पदें कोडें । देऊनि झाडें सूचविले ॥ ४९० ॥ यतः म्हणिजे ज्यापासून । प्रथम ऋषि जो कां दुहिण । उत्पन्न झाला तेणें सृजन । केलें संपूर्ण सृष्टीचें ॥ ९१ ॥ आधिदैविक आध्यात्मिक । द्विविध देवगण दुहिणें देख । सृजिले तिहीं विश्व सम्यक । रचिलें अर्वाक उत्तरोत्तर ॥ ९२ ॥ ऐसें तुजमाजी तुजपासून । या विश्वाचें स्थितिलयसृजन । एवं तुजहूनि अर्वाचीन । तुज कोठून जाणती हे ॥ ९३ ॥ ऐसें अर्वाक् उत्तरोत्तर । तुजसीं पडतां बहु अंतर । म्हणोनि न कळे यां तव पार । पडिला अंधार अज्ञानें ॥ ९४ ॥ आणि जेव्हां सर्व आकर्षून । आपणामाजि करूनि लीन । योगमायामंचकीं शयन । उपसंहरून तूं करिसी ॥ ९५ ॥ तेव्हां समस्त जीवकोटी । निद्रित होती मायेच्या पोटीं । ज्ञानसाधनांची त्यां गोठी । नाहीं शेवटीं निद्रितां ॥ ९६ ॥ तेव्हां नाहीं सदसद । स्थूळसूक्ष्मादिक जें विशद । दोहीं मिळोनि एकविध । तो शरीरभेद नसेचि तैं ॥ ९७ ॥ तेव्हां नाहीं काळवेग । अक्षर पळ घटिकाब्दयुग । काळवैषम्यप्रसंग । तोही मार्ग नसेचि तैं ॥ ९८ ॥ तेव्हां कैंचे पृथक् प्राण । तेथ कैंचा इन्द्रियगण । शास्त्रही ज्ञानसूचक पूर्ण । कैंचें कोठून त्या ठायीं ॥ ९९ ॥ तुजपासूनि जन्मला दुहिण । तेणें मन्वादि महर्षिगण । उत्तरोत्तर प्रजासृजन । केला उत्पन्न करावया ॥ ५०० ॥ आध्यात्मिक आधिदैविक । व्यष्टिसमष्टिकरणात्मक । द्विविधदेवताचक्रविवेक । झाला अर्वाक तुजहूनी ॥ १ ॥ तया देवताचक्रद्वारा । विपरीत ज्ञानाचा उभारा । देहवंतां प्राणिमात्रां । अविद्यापरां औपाधिकां ॥ २ ॥ तेणें काळकाळान्तरें । तुजसीं अंतर पडिलें खरें । यास्तव अज्ञान अंधारें । अविद्याभरें दृढावलें ॥३॥ असो देहादि उपाधिवन्तां । मळिनसत्वां काळान्तरितां । भगवज्ज्ञानीं अनर्हता । घडे तत्वता या अर्थें ॥ ४ ॥ परंतु प्रळयाच्या अवसरीं । लय पावल्या चराचरीं । समस्त गुणसाम्येमाझारी । जीवकोटि लीन होती ॥ ५ ॥ मायामंचकीं तुझें शयन । तैं जीवां तुजसीं सन्निधान । असतां तुझें वास्तव ज्ञान । नोहे संपूर्ण जगदीशा ॥६॥ प्राणादिकरणांचा समुदाय । इहीं साधनीं जाणिजे ज्ञेय । तूंही न होसी ज्ञेयविषय । साधनसमुच्चय नसेचि तैं ॥ ७ ॥ तेथ शास्त्र ना शास्त्रवक्ता । श्रवण श्रोता ना मननकर्ता । एवं वास्तवज्ञानवार्ता । नोहे तत्वता दोहीं परी ॥ ८ ॥ यास्तव होवोनि तवाङ्घ्रिशरण । सप्रेम करितां नवविध भजन । कृपेनें

द्रवूनि बोधिसी ज्ञान । तरी भक्तिसाधन वर सर्वां ॥ ९ ॥ याचि श्रुत्यर्था दृढीकरण । करावया व्यासनंदन । करूनि अनेक मतखंडन । करी व्याख्यान तें ऐका ॥ ५१० ॥

जनिमसतः सतो मृतिमुतात्मनि ये च भिदां विपणमृतं स्मरन्त्युपदिशन्ति त आरुपितैः ।
त्रिगुणमयः पुमानिति भिदा यदबोधकृता त्वयि न ततः परत्र स भवेदवबोधरसे ॥ २५ ॥

श्रुति म्हणती भो भो ईशा । याही एका हेतुविशेषा । पाहतां तुझिया ज्ञानप्रकाशा । सुशक्य नोहे पावावया ॥ ११ ॥ ज्ञानोपदेष्टे सांप्रत । भ्रमबाहुल्यास्तव झाले बहुत । आपुलालें ते बोधिती मत । म्हणती सिद्धान्त मुख्य हा ॥ १२ ॥ नाहीं त्याचा जन्म वदती । आहे त्यासी बोलती मृति । न घडे तेंचि घडतें म्हणती । भ्रमाक्तमति बहुवक्ते ॥ १३ ॥ वास्तव आत्मस्वरूप एक । भेदें कल्पिती अनेक । एक अमर नर तिर्यक । म्हणती सम्यक कर्मफळ ॥ १४ ॥ अवबोधरस तो निरामय । त्या तुज म्हणती त्रिगुणमय । अबोधास्तव भेदासि ठाय । करूनि अपाय दृढाविती ॥ १५ ॥ ऐसीं पृथक् अनेक मतें । आरोपितभ्रमभ्रान्तें । उपदेशिती तद्वाक्यांतें । विश्वासतां भ्रमवृद्धि ॥ १६ ॥ वैशेषिक जो मतवादी । नसत्या जगाची उत्पत्ति आदि । अरोपितभ्रमबोधें प्रतिपादी । श्रुतिविरोधी यास्तव तो ॥ १७ ॥ सदेव आदिमध्यान्तीं एक । ऐसा श्रुतींचा मुख्य विवेक । तेथ असज्जनांचा जननाङ्क । कैं कोठून म्हणावा ॥ १८ ॥ पातंजळाचिया मतें । पूर्वी जीवांसि ब्रह्मत्व नव्हतें । योगाभ्यासें साधिजेतें । पंचभूतें प्राशूनी ॥ १९ ॥ धातुवादाच्या साधनें । जेंवि लोहाचें कीजे सोनें । तेंवि जीवा ब्रह्म होणें । योगाभ्यासें करूनियां ॥५२०॥ ब्रह्मचि आसोनि ब्रह्मप्राप्त । ऐसा सिद्धान्त बोले श्रुति । अष्टलोह ऐसिया उक्ति । केली निवृत्ति कनकत्वा ॥ २१ ॥ एकविंशतिदुःखा नाश । तयाचि नांव निःश्रेयस । ऐसा नैयायिकांचा पक्ष । प्रबोधी दक्ष बहुतकें ॥ २२ ॥ अनीशया हें श्रुतींचें वचन । करी तयाचें मतखंडन । कैसें म्हणाल तरी व्याख्यान । सावधान अवधारा ॥ २३ ॥ अनीशानामें जे अविद्या । तिनें उत्पन्न केलें भेदा । यास्तव अनेक दुःख आपदा । भोगितां खेदा पावती ॥ २४ ॥ वास्तव अखंडैकरसीं । तेथ दुःखाची गोष्टी कायसी । भेद असतां दुःखनाशीं । केंवि मोक्षासी पावणें ॥ २५ ॥ सुषुप्तिगर्भीं सर्व दुःखा । नाश झाला असतां देखा । तथापि जीवां नोहे सुटिका । मोक्ष लटिका कीं ना तो ॥ २६ ॥ अविद्येमाजी विद्यमान । मानिती आपण बुद्धिमान । म्हणती वास्तवज्ञानसंपन्न । जघन्यमान असतांही ॥ २७ ॥ जघन्यमान म्हणिजे काई । तरी जरामरणादिदुःखप्रवाहीं । पडिले असतां आपुले ठायीं । मानिती मूढ मुक्तत्व ॥ २८ ॥ अंधें अंध धरूनि हातीं । नेइजत असतां दुर्घटपथीं । पतन पावती महागर्तीं । तैसीच माति भेदज्ञा ॥ २९ ॥ तस्मात सांख्यभेदवादी । जीवात्मभेदातें प्रतिपादी । तया मतातें निषेधी । श्रुति इत्यादिवाक्यार्थें ॥ ५३० ॥ इष्टानिष्ट मिश्रफळ । कर्मजनित हें केवळ । सत्य मानिती कर्मशीळ । मीमांसकमतवादी ॥ ३१ ॥ एकचि अद्वितीय ब्रह्म । तेथ लोक लोकान्तर हा भ्रम । तेथ कैंचें फलद कर्म । वृथा श्रम श्रुति म्हणती ॥ ३२ ॥ स्वप्नामाजी झाला.राय । वृथा डोळे झांकूनि काय । शेखीं

रंकत्व तों न जाय । तोचि हा न्याय याज्ञिकां ॥ ३३ ॥ त्रिगुणमयत्व पुरुषासि येथें । निर्धारितां वास्तव असतें । तरी हें अवघेंचि घडों शकतें । परि तें येथें अघटित पैं ॥ ३४ ॥ श्रुति म्हणती तुझ्या ठायीं । भो जगदीशा भेदचि नाहीं । अबोधास्तव कल्पिला पाहीं । भ्रान्तिप्रवाहीं भ्रमग्रस्तीं ॥ ३५ ॥ त्रिगुणमय पुरुष येणें । हेतुवैशिष्ट्यें उपलक्षणें । तुझ्या ठायीं भेदकल्पने । अविद्यावरणें आवृतीं ॥३६॥ दृष्टीमाजील नीलिमा जेंवी । गगनीं आरोपिजे प्राकृतीं जीवीं । त्वद्विषयिक हें अज्ञान तेंवी । भेदें उपजवी त्रैगुण्य ॥ ३७ ॥ वस्तुता पाहतां तुझ्या ठायीं । अबोधासी ठाववचि नाहीं । मां तो भेद कैंचा काई । त्रिगुणात्मक तुजमाजी ॥ ३८ ॥ ज्ञानघन जो अवबोधरस । तेथ भेदासी कैंचा पैस । अध्यारोपें बहुधा भास । मिथ्या आरोप विवर्तक जो ॥ ३९ ॥ ननु ऐसी करूनि शंका । श्रुति म्हणती भो विश्वात्मका । असत्प्रपंच हा असिका । म्हणाल लटिका जरी तुम्ही ॥ ५४० ॥ असत्प्रपंच उपजत नाहीं । तैसाचि त्रिगुणमय पुरुषही । तरी याची प्रतीति नसावी कहीं । ब्रह्मीं अद्वयीं कीं ना हो ॥ ४१ ॥ ऐसा वदतां जरी सिद्धान्त । तरी प्रत्यक्ष दोन्ही असतां तेथ । जग आणि जगन्नाथ । कां पां अस्त न पावती हे ॥४२॥ इये शंकेच्या निरसना । श्रीशुक योगियांचा राणा । करी आर्षश्रुतिव्याख्याना । त्या सनंदनवचना अवधारा ॥ ४३ ॥

सदिव मनस्त्रिवृत्त्वयि विभात्यसदामनुजात्सदभिमृशन्त्यशेषमिदमात्मतयाऽऽत्मविदः ।
न हि विकृतिं त्यजन्ति कनकस्य तदात्मतया स्वकृतमनुप्रविष्टमिदमात्मतयाऽवसितम् ॥ २६ ॥

तरी अघटितघटनापटीयसी । तुझे मायेची ख्याति ऐसी । तिणें सृजिलें मानसासी । त्रिवृत जयासी कवि म्हणती ॥ ४४ ॥ मोह प्रकाश आणि प्रवृत्ति । या मनाच्या त्रिगुण वृत्ति । एतद्द्वारा कल्पनाभ्रान्ति । जगत्प्रवृत्ति स्फुरवितसे ॥ ४५ ॥ सिन्धुगर्भनिवासी यवन । विविध काचक्रिया उत्पन्न । करिती त्यांमाजि पाहतां नयन । देखति भ्रमोन अनेकता ॥ ४६ ॥ एक पदार्थ बहुधा दिसे । कीं दूरस्थ तें निकट भासे । किंवा मयूरपिच्छा ऐसे । अनेक रंग प्रकाशवी ॥ ४७ ॥ तेंवि मनाचिया कल्पना । जगजगदीशसंभावना । पाञ्चभौतिक स्फुरे नाना । विपरीतज्ञाना माजिवडें ॥ ४८ ॥ तें काय तेथें सत्य असे । नसोनि साचाचि ऐसें भासे । काय निमित्त म्हणसी ऐसें । आस्तिक्य वसे तुझेनि तें ॥ ४९ ॥ डोळ्यामाजी प्रकाश नसता । तरी काचद्वारा अनेकता । कैंची कोण प्रकाशिता । श्रीभगवंता हें तैसें ॥ ५५० ॥ तुझिया वास्तव आस्तिक्यवशें । मनें कल्पितां आस्तिक्य दिसे । पृथक् सत्तत्व पाहतां गवसे । तरी मग कायसें मिथ्यात्व ॥ ५१ ॥ व्यष्टिप्रपंचनिष्ठां पुरुषां । मनोभ्रान्तीचा बाधी वळसा । समष्टिवंता श्रीपरेशा । पृथक्सत्तत्व जरी म्हणसी ॥ ५२ ॥ तरी मायामात्र जो विलास । समष्टिप्रपंच म्हणिजे त्यास । त्यामाजी अभिव्याप्त परेश । वस्तुता फोस दोन्हीही ॥ ५३ ॥ येथही शंका उपजे एक । जे भ्रान्तासी विश्व साच देख । गमे तैसेंचि सत्य पृथक । आत्मवेत्त्यांही स्फुरतसे ॥५४॥ तरी कैसें या असत् म्हणिजे । यदर्थीं उत्तर अवधारिजे । त्रिपुटीसहित यातें सहजें । सन्मात्रत्वें कवि

बुझती ॥ ५५ ॥ जेंवि कनकाचा खंडेराव । श्वान सेवक तुरंग देव । तारतम्यें हे भजकभाव । सोवनीं सर्व कनक म्हणे ॥ ५६ ॥ असन्मात्रा सन्मात्र बोध । कैसा मानिती आत्मविद । भ्रान्त भाविती बहुधा भेद । तें यां अभेद केंवि गमे ॥ ५७ ॥ तरी जें उपादानकारण । तद्रूपें तेंचि प्रतीयमान । बहुधा अलंकारीं सुवर्ण । एक असोन बहु भासे ॥ ५८ ॥ मेखळेचिया पेटियांवरी । सिंह व्याघ्र मयूर कुसरी । आटूनि वेगळे निघते जरी । तरी ब्रह्मीं दुसरी सृष्टि असो ॥ ५९ ॥ घटशरावीं मृद्ब्राण्डपंक्ति । कार्यरूपें अनेक गमती । कारणरूपें अवघी माती । ब्रह्मप्रतीति तेंवि बुधा ॥ ५६० ॥ कनकविकृति जेंवि नग । ब्रह्मविकृति तेंवि जग । ज्ञानी वास्तवबोधें चांग । तेथ अव्यंग अभिरमती ॥ ६१ ॥ म्हणाल ब्रह्मीं विकृति कैसी । तरी स्वकल्पितें विश्वाभासीं । अनुप्रवेश जो पुरुषासी । जेंवि गगनासी घटगभीं ॥६२॥ जरी सत्य ज्ञान ब्रह्म अनंत । किंचित अनेकता नाहींच येथ । अनेकता जे भ्रमनिर्मित । मानी यथार्थ जो कोणी ॥ ६३ ॥ तो मरमरूं वारंवार । पुनःपुन्हा जन्म फार । पावूनि भोगी दुःख घोर । ऐसा निर्धार श्रुतींचा ॥ ६४ ॥ ऐसिया प्रकारें भगवंताची । वास्तव प्रतिपादना जरी साची । तरी तद्विषयिक ज्ञान-प्राप्तीची । सुलभ सिद्धि असतां पैं ॥ ६५ ॥ मग भक्तीचें प्रयोजन काय । ऐसा शंकेसि होतां ठाय । तत्परिहारीं शुकाचार्य । वदता होय तें ऐका ॥ ६६ ॥

तव परि ये चरन्त्यखिलसत्त्वनिकेततया त उत पदाक्रमन्त्यविगणय्य शिरो निर्ऋतेः ।
परिवयसे पशूनिव गिरा विबुधानपि तांस्त्वयि कृतसौहृदाः खलु पुनन्ति न ये विमुखाः ॥ २७ ॥

तरी सर्वभूतनिवासी जो तूं । त्या तव परिचर्येचा तंतु । रक्षूनि उपासिती संतु । ते चि हा मृत्यु निस्सरती ॥ ६७ ॥ निर्ऋति ऐसें मृत्यूसि नाम । त्याचा करूनि अतिक्रम । सुखें पावती कैवल्यधाम । निष्कामकाम होत्साते ॥ ६८ ॥ अतिक्रम कैसा म्हणाल जरी । तरी पाय ठेवूनि मृत्युशिरीं । सुखें तरती भवसागरीं । एवढी थोरी भक्तीची ॥ ६९ ॥ आणि जे अभक्त भजनविमुख । ते होत कां विपश्चितप्रमुख । त्यांतें बांधिसी पशुसम देख । मग भोगिती दुःख तापत्रयें ॥ ५७० ॥ त्यांसी वाचेचिये दावणीं । नामरूपाच्या गळबंधनीं । बांधूनि घालिसी तैं त्यां स्वभ्रीं । सुटिका दुर्लभ जगदीशा ॥ ७१ ॥ यास्तव तुजसीं सौहार्द केलें । तेचि सप्रेमळ दादुले । आपण पवित्र होवूनि भले । पवित्र केलें त्रिजग तिहीं ॥ ७२ ॥ परंतु ज्ञानी विपश्चित । ज्ञानसाधक परि अभक्त । ते न निस्तरती मृत्युपथ । इत्थंभूत निश्चय हा ॥ ७३ ॥ जरी वस्तु अपरोक्ष नित्य । वास्तव ज्ञान ही अपरोक्ष सत्य । तथापि असंभावनातिरस्कृत । परोक्षवत अवगमतें ॥ ७४ ॥ असंभावना विपरीत भावना । तिहीं भ्रमाक्त केलिया मना । तैं अपरोक्षचि परोक्षपणा । अनुसरोनि भव दावी ॥ ७५ ॥ नाहीं झाली चित्तशुद्धि । तंव जे साधिली ज्ञानसिद्धि । परि ते संसारदुम न छेदी । भवभ्रमवृद्धिकर होय ॥ ७६ ॥ ऐसें नोहेचि उपासकां । सप्रेमपरिचर्यासाधकां । भजनें चित्तशुद्धि देखा । होतां विवेका उदय घडे ॥ ७७ ॥ भगवत्प्रसादें अपरोक्षज्ञान । प्राप्त होतां अयत्नें करून । करतळामळवत् करूनि निर्वाण । लाहती संपूर्ण

भ्रमनाशें ॥ ७८ ॥ भगवद्भजनें चित्तशुद्धि । झालिया अपरोक्षज्ञानवृद्धि । पावोनि भवभ्रम समूळ छेदी । हा निरवधि सिद्धान्त ॥ ७९ ॥ सप्रेमभावें उपास्यभजन । तैसेंचि अभेद गुरुसेवन । येथ कांहीं न होतां न्यून । अपरोक्षज्ञान उदया ये ॥ ५८० ॥ श्रुति शंका करिती येथ । सकळसत्वनिवासी नाथ । त्या भगवन्ता तुजला भक्त । सेविती संतत सप्रेमें ॥ ८१ ॥ सकळसत्वनिवासियासी । सेव्यत्व बोलिलें ऐसें म्हणसी । तैं सत्वकारणत्वें निश्चयेंसीं । कर्तृत्व भोक्तृत्व तुज ही ये ॥ ८२ ॥ म्हणसी वस्तुता अलिप्त जरी मी असें । तरी जीवासि ही लिप्तता नसे । उभयां तुल्यत्व असतां कैसें । तारतम्य भजनाचें ॥ ८३ ॥ ईश्वर सेव्य कैसेनि म्हणिजे । जीवां सेवकत्व केंवि साजे । ये शंकेच्या निरसनकाजें । श्रुत्यर्थ ओजें अवधारा ॥ ८४ ॥ अपाणि अपाद अचक्षु ईश । अकर्ण अघ्राण अजिह्व अरस । परित्यागादानगतिप्रकाश । द्रष्टा परेश सर्वांचा ॥ ८५ ॥ श्रवणें वीण सर्व ऐके । रसने वीण सर्व चाखे । घ्राणें वीण गंध असिके । तो जाणतसे अतीन्द्रिय ॥ ८६ ॥ सर्ववेद्यांचा जो वेत्ता । तयास कैंचा आन जाणता । तया आदिपुरुषा महंता । श्रुति अनंता स्तवितातीं ॥ ८७ ॥ तोचि अर्थ शुकाचार्य । कुरुवर्यातें कथिता होय । सनंदनगिरा आर्षश्रुतिमय । उपनिषत्प्राय अवधारा ॥ ८८ ॥

त्वमकरणः स्वराडखिलकारकशक्तिधरस्तव बलिमुद्वहन्ति समदन्त्यजयाऽनिमिषाः ।
वर्षभुजोऽखिलक्षितिपतेरिव विश्वसृजो विदधति यत्र ये त्वधिकृता भवतश्चकिताः ॥ २८ ॥

इन्द्रियसंबंधरहित असतां । सकळ इन्द्रियांचा शक्तिधर्ता । इन्द्रियशक्तिप्रवर्तविता । स्वयें स्वसत्ता अतीन्द्रियें ॥ ८९ ॥ यदर्थीं दृष्टान्त वदला शुक । श्रोतीं परिसिजे तो सम्यक । जेणें संशय नुधवी मुख । उमजे विवेक साकल्यें ॥५९०॥ स्वप्रकाशें देदीप्यमान । यालागीं स्वराट् तुझें अभिधान । अतीन्द्रिय तुझें ज्ञान । नोहे कारण सापेक्ष ॥ ९१ ॥ ऐसा समर्थ जाणोनि तुज । पूजा अर्पी देवतापुञ्ज । अविद्यासंवृत असतां सहज । भजती भोज नाचोनी ॥ ९२ ॥ अनिंमिष म्हणिजे इन्द्रादि देव । तुज भजती हें न अपूर्व । त्यांसी ही पूज्य जे ब्रह्मादि शर्व । ते भजती सर्व सद्भावें ॥ ९३ ॥ जैसे नृपाचे किङ्कर । स्त्रियां सहित सेवनपर । तैसे अविद्यासंवृत ही सुरवर । भजती किङ्कर होत्साते ॥ ९४ ॥ ऐसी पुराणान्तरींची बोली । येथ श्रोतयां जाणविली । यावरी सुरांची भजनचाली । ते ही कथिली जात असे ॥ ९५ ॥ मनुष्यें अर्पिती हव्य कव्य । देव पितरें तें भक्षिती सर्व । जैसे वर्षपति पार्थिव । प्रजागौरव स्वीकरिती ॥ ९६ ॥ भरतवर्षादिवर्षपति । ते मग सेविती चक्रवर्ती । स्वप्रजादत्त ज्या संपत्ति । त्या त्या अर्पिती तच्चरणीं ॥ ९७ ॥ आणि जे जे कार्यीं जे नियुक्त । ते ते करिती अतंद्रित । अभंग आज्ञा पाळिती नित्य । पूजा समस्त हे त्यांची ॥ ९८ ॥ कां पां आज्ञा धरि ती शिरीं । ऐसें परिसा म्हणसी जरी । तरी चकित म्हणिजे भय अंतरीं । तुझें निर्धारीं वागविती ॥ ९९ ॥ यदर्थी ऐका श्रुतिसंकेत । भयें परिमित वाहे वात । भयें सूर्य उदया येत । अतिनियमस्थ ऋतुमानें ॥ ६०० ॥ भयें नियमित पावक जाळी । वडवाग्नि वसे सिन्धुजळीं । भयें इन्द्र यथाकाळीं । वर्षे भूतळीं परिमित पैं ॥ १ ॥

भयें मृत्यु भूतग्रासा । करी नियमित आज्ञे सरिसा । एवं तव आज्ञा परेशा । वाहती शिरसा अमराद्य ॥ २ ॥ तस्मात् करणप्रवर्तक तूं ईश्वर । करणपरतंत्र प्राकृत नर । म्हणोनि तुज भजती सादर । हा निर्धार श्रुत्युक्त ॥ ३ ॥ इतुकेंचि भजनासी कारण । केवळ नव्हे श्रुतिप्रमाण । तुजचि पासूनि उत्पन्न । तव तंत्र जाण या स्तव ही ॥ ४ ॥ जैसे अग्नीचे स्फुलिंग । ऊर्ध्व उसळती लघु सवेग । त्यांसी अग्नीचा वियोग । म्हणणें चांग न भसे हें ॥ ५ ॥ जरी अंशत्वें वेगळे झाले । तरी अग्नित्वा न मुकले । अग्नितेजें तेजाथिले । म्हणोनि बोलिले तत्तंत्र ॥ ६ ॥ तैसे तुज आत्मया पासून । विस्तारती अनेक प्राण । ते सर्व ही तदंश जाण । भासतां भिन्न तव तंत्र ॥ ७ ॥ सर्व लोक सर्व देव । सर्व भूतें सर्व जीव । आत्मया पासूनि यां उद्धव । तस्मात् सर्व तव तंत्र ॥ ८ ॥ मज पासूनि कैं यां जन्म । कैं लाधले रूपनाम । म्हणसी तरी तो अनुक्रम । ऐकें निजात्मवत्सला ॥ ९ ॥

स्थिरचरजातयः स्युरजयोत्थनिमित्तयुजो विहर उदीक्षया यदि परस्य विमुक्त ततः ।
न हि परमस्य कश्चिदपरो न परश्च भवेद्वियत इवापदस्य तव शून्यतुलां दधतः ॥ २९ ॥

अगा ये नित्यमुक्ता स्वामी । मायायुक्त होवूनि तुम्ही । क्रीडतां चराचरात्मक द्विनामीं । भवसंभ्रमीं उद्धवती ॥ ६१० ॥ नित्यमुक्ताची क्रीडा कैसी । म्हणतां ऐक ये विषीं । माये पासूनि दूर अससी । लिप्त न होसी असंगत्वें ॥ ११ ॥ कैसा असंगत्वें विहार । तरी योगसत्ताबळ ईक्षणमात्र । लाहोनि माया सर्व जगत्र । रची स्थिरचर साकल्यें ॥ १२ ॥ नृपाज्ञेच्या सत्ताबळें । अष्ट प्रकृति ऐश्वर्यमेळें । राज्यभार जेंवि चळे । किंवा जळें नाव जैसी ॥ १३ ॥ तेंवि तुझिया ईक्षणसत्ता । माया प्रसवे स्थिरचरभूतां । द्विविधजातींच्या देहवंतां । जीवां समस्तां जगदीशा ॥१४॥ येथ शंका हे करिसी जरी । जे महाप्रळयाच्या अवसरीं । मज माजी लीन झालिया वरी । जीवां माघारीं केंवि परती ॥ १५ ॥ मेघमुखें निवडिला सिन्धु । पवनें विभागिले जळबिन्दु । पुन्हा स्वकारणीं मिनल्या भेदु । उरे हा अनुवादु केंवि घडे ॥ १६ ॥ ऐसें म्हणसी जरी परेशा । तरी अविद्यावरणें जीवां अशेषां । ते तुजमाजी संस्कारलेशा । साहित स्वकारणीं लीन होती ॥ १७ ॥ अविद्या माये माजी लीन । माया तुज माजी सुलीन । पुढती होतां तव ईक्षण । करी उत्थान तव सत्ता ॥१८॥ लाहोनि सत्तायोगबळ । माया प्रसवे ब्रह्माण्डगोळ । तैं अविद्यावरणाथिले सकळ । जीव केवळ जन्मती पैं ॥ १९ ॥ तुझिया ईक्षणें उत्थितें । होती जीवांचीं निमित्तें । तीं कर्में त्या जीवांतें । देती योनींतें उच्चावचा ॥ ६२० ॥ निमित्तें म्हणिजे कर्मसंस्कार लाहोनि तुझें ईक्षणमात्र । उठती जीव तदनुसार । गात्रां पात्र होत्साते ॥ २१ ॥ येथ शंका करिती श्रुति । झणें तूं म्हणसी जगत्पति । मज मीनल्या कर्मे पुढती । निमित्तें होती कां म्हणिजे ॥ २२ ॥ माझिया ईक्षणमात्रें जीव । उत्पन्न होती सर्वत्र सर्व । तेथ निमित्ताचा भाव । कां पां वाव कल्पावा ॥ २३ ॥ ऐसें म्हणसी जरी जगदीशा । तरी तुज पासूनि परमपुरुषा । केंवि वैषम्यें जीवां जशेषां । जन्म कैसा घडेल ॥ २४ ॥ तूं तों परमकारुणिक । तुज पासूनि जैं समस्त लोक । समानसुखभोक्ते सम्यक । असती निष्टंक तैं देवा ॥ २५ ॥ आकाशा

परी सदा सम । स्वपरभेद नसे विषम । श्रुति प्रतिपादी तुझें साम्य । तूं अगम्य वाङ्मनसां ॥ २६ ॥ असत् म्हणिजे अव्यक्तरूपें । हें विश्व होतें पडपें । तेथूनि पुढती सत्स्वरूपें । होती ऐसें श्रुति वदती ॥२७॥ तस्मात शून्यपूर्वक विश्व । ऐसा श्रुतींचा अभिप्राव । शून्या समान तूं वासुदेव । वससी स्वयमेव पूर्णत्वें ॥ २८ ॥ शून्य न होनि शून्यासम । तो तूं केवळ परब्रह्म । न शकती प्रतिपादूं तव धाम । वाङ्मन अनाम अगोचर तें ॥ २९ ॥ तस्मात् सम विषम हे जीव । कर्मसंस्कारें होती सर्व । तूं परमात्मा वासुदेव । वससी स्वयमेव असंगत्वें ॥ ६३० ॥ अविद्योपाधि जीव ऐसे । संसार पावती संस्कारवशें । तेथ ही तव भजनाच्या लेशें । निश्चयेंसे आथिजती ॥३१॥ ऐसें वदोनियां श्रुती । पुढती काय शंका करिती । ती परिसावी सावध श्रोतीं । अवतारणिके माजीवडी ॥ ३२ ॥ अविद्याकृत-कार्योपाधि । तवांश जीव जरी त्रिशुद्धी । तरी हे पडिले अविद्याबंधीं । कवणे विधी सुटती हे ॥ ३३ ॥ जरी अविद्या उपाधि एक । तरी जीव कैसेनि अनेक । एकत्व म्हणतां मुक्ति देख । एका सरिसी सर्वांतें ॥ ३४ ॥ वास्तवबोधें एक जीव । अविद्याभ्रम हे जाणोनि माव । स्वयंवेद्यता अनुभव । लाहोनि स्वयमेव निर्मुक्त ॥ ३५ ॥ तयाचि सरिसे सर्व मुक्त । म्हणणें तुम्हांसि हें संमत । कीं अनेक अविद्यांश येथ । तद्विम्बित एक जीव ॥ ३६ ॥ जरी म्हणाल जीव एक । परंतु अविद्याभेद अनेक । तरी मग मोक्ष न घडे देख । अविद्या पृथक उरलिया ॥ ३७ ॥ तस्मात् इत्यादि तर्कबळें । अनेक जीव अविद्यामेळें । प्रतिपादितां अबळां कळे । निर्दोष मोकळें प्रमेय हें ॥ ३८ ॥ यावनाळाचा एक कण । कणिशदशक त्या पासून । एक्या कणाची तयांतून । कानी होऊनि परिणमतां ॥ ३९ ॥ काणिशदशक तया सरिसी । कानी सहसा नोहे जैसी । बीजभावें संसरणासी । पावणें घडे कीं ना हो ॥ ६४० ॥ तेंवि एका अधिकारिया जीवा पाडें । सर्व जीवांसि मुक्तता न घडे । अविद्यादामनीं सुटे पेडें । मोकळा पडे तोचि पशु ॥ ४१ ॥ आणि अंशरूपें म्हणतां जीव । अवगुणत्वपरिमाणें वास्तव । कीं मध्यमपरिमाणें सावयव । देहा एवढा म्हणतसां ॥ ४२ ॥ कीं महत्परिमाणें गगना । समान जीवां बृहत्त्व माना । तैं मग अंशरूपें नाना । म्हणणें न घडे सर्वथा ॥ ४३ ॥ औट हात प्रमाण देह । त्या माजी अणुमात्र जीव राहे । तैं तो एकदेशीं वसता होय । व्यापक नोहे सर्व देहीं ॥ ४४ ॥ म्हणाल देह सावयव । तया माजी तैसाचि जीव । तैं त्या आलें अनित्यत्व । नव्हे यास्तव चिद्रूप ॥ ४५ ॥ गृहा माजी एकदेशीं । दीप राहोनि गृहा प्रकाशी । अणुत्वें जीव तेंवि देहासी । व्यापूनि राहे म्हणाल ॥ ४६ ॥ तरी दीपासि लावितां स्निग्ध वाति । तेथ उजळे तत्काळ ज्योति । प्रकाशा माजी धरितां हातीं । नुजळे कल्पान्तीं वर्तिका ॥ ४७ ॥ जीव शरीरीं सर्वां ठायीं । व्यापक चैतन्यरूपीं पाहीं । केश ओढितां ठायींच्या ठायीं । सुखदुःखाचा आण असे ॥ ४८ ॥ तरी जितुके देह तितुके जीव । म्हणतां भेदासि झाला ठाव । अभेद अद्वय जें वास्तव । तैं तें वाव श्रुतिवाक्य ॥ ४९ ॥ इत्यादि अनेक शंका श्रुति । करूनि पुढती उपसंहरिती । जीव नित्य सर्वग म्हणती । कोणा एका ऋषिमतें ॥ ६५० ॥ जीव सर्वग नित्य म्हणतां । पूर्वोक्त शंका नुधविती माथा । अविद्याभेदें अनेकता । जीवांसि वदतां दोष नसे ॥५१॥ म्हणोनि अविद्याभेदें करून । अथवा तच्छक्तिभेदें जाण । बद्धमुक्ततासंभवन । मायिक घडे

भ्रमास्तव ॥ ५२ ॥ भेद असाच जेव्हां होय । तैं बद्धमुक्तताही तत्प्राय । ईश्वरपदीं याची सोय । कोण्या अंशें न स्पर्शे ॥ ५३ ॥ बद्धमुक्तेची जैं हे परी । तैं स्वतःसिद्ध ऐक्य जीवेश्वरीं । त्रिशुद्धि निःसंशय निर्धारीं । श्रुति वैखरी प्रतिपादी ॥ ५४ ॥ आणि पूर्वोक्त शंका बृहदारण्यीं । अंतर्यामी नाम ब्राह्मणीं । न साहोनि अद्वैत वाणी । वास्तव म्हणोनी प्रतिपाद्या ॥ ५५ ॥ ते चि येथ आर्षश्रुती । सनंदनोक्त शुकभारती । श्रवणीं सादर परीक्षिती । तैशीच श्रुती परिसावी ॥ ५६ ॥

अपरिमिता ध्रुवास्तनुभृतो यदि सर्वगतास्तर्हि न शास्यतेतिनियमो ध्रुव नेतरथा ।
अजनि च यन्मयं तदविमुच्य नियन्तृ भवेत्सममनुजानतां यदमतं मतदुष्टतया ॥ ३० ॥

श्रुति म्हणे वास्तव ध्रुव अनंत । तेणें चि रूपें सर्वग नित्य । जीव मानाल जरी तनुभृत । तैं त्या समता ईशेंसीं ॥ ५७ ॥ समता असतां न घडे शासन । याहूनि जीव जरी विलक्षण । तरी त्यांसी घडेल नियमन । ईश्वरापासून निश्चयें ॥ ५८ ॥ जीवेश्वरांचें समत्व जयीं । शासनशास्तृत्व न घडे तयीं । झणें पडाल या संशयीं । म्हणोनि निश्चयीं श्रुति बोले ॥ ५९ ॥ यन्मय म्हणिजे जया ऐसें । उपाधी स्तव विकृत दिसे । कारणत्वें त्या कार्यदशे । अडे अपैसें नियंतृत्व ॥६६०॥ कारणत्वें न टाकून । ओतप्रोत स्वबोधें पूर्ण । म्हणाल तें जरी किंलक्षण । तरी जें समान अनुस्यूत ॥ ६१ ॥ यन्मयशब्दें जाणिजे काये । हें अमुकें ते कथिजे सोये । तज्ज्ञानविषयीं जैसें होय तैसें नोहे अद्वैत ॥ ६२ ॥ येथ वस्तु जो ज्ञानें जाणे । तो उरे साक्षी वेगळेपणें । तैं तें जाणणेंचि नेणणें । वृथा मिरवणें ज्ञातृत्वा ॥६३॥ जो साक्षित्वें विरोनि जाये । तो जाणावया उरेल काये । न जाणोनि तो सर्वज्ञ आहे । या अभिप्रायें श्रुति वदती ॥ ६४ ॥ जेणें शर्करा भक्षिली । तेणें गोडी सांगितली । केवळ शर्करा होवोनि ठेली । तैं ते गोडी वेगळी न वदे कीं ॥ ६५ ॥ कळलें ज्या त्या न कळे कांहीं । कळे तें तो विनाशी पाहीं । न कळे ज्यासी त्या कळलें हृदयीं । अभेदबोधें आत्मत्वें ॥ ६६ ॥ तस्मात् यत्तच्छब्दा प्रति । अतर्क्य वस्तु म्हणती श्रुति । अनुस्यूतत्वें नियंतृत्वें स्थिति । सर्वांप्रति जयाची ॥ ६७ ॥ नभ न होनि नादकुसरी । अनुस्यूतत्वें नादान्तरीं । कारणत्वें शासन करी । भेद अंबरीं न शिवोनी ॥६८॥ तस्मात परेश सर्वशास्ता । अनुस्यूतत्वें साक्षी न होतां । अभेदबोधें स्वसंवेत्ता । प्रकृती परता परमात्मा ॥ ६९ ॥ हे ऐकोनि सनंदनवाणी । प्रश्न केला ब्रह्मनंदनीं । तो परिसावया श्रोतृजनीं । सावध श्रवणीं बैसावें ॥६७०॥ विधिसुत म्हणती भो वक्तया । जीव जरी होती परमात्मया । पासूनि तरी मग नियम्यां तयां । नियंतृत्व घडे ईशा ॥७१॥ ऐसें म्हणतां दोष विविध । तो हीं ऐकावा सावध । जें प्रतिदिनीं कृतकर्माचा बाध । अकृत संबंध भोक्तृत्वा ॥ ७२ ॥ अहरहर सत्कर्म जीव करिती । तत्फळ इहामुत्रीं भोगिती । अनित्यत्व जैं जीवांप्रति । तैं फळभोगप्राप्ति कवणातें ॥ ७३ ॥ ईशापाशूनि जीवकोटी । नूतन जन्मती ऐसी गोठी । तैं न करितां कर्मराहटी । घडे कीं सृष्टी भोक्तृत्व ॥ ७४ ॥ कर्म न करितां भोगणें पडे । सम विषम तैं कोंवि घडे । एक नृपासनीं सुरवाडे । एक काबाडें वाहताती ॥७५॥ एक सचिंत एक रुग्ण । एक निरामय

निश्चिन्त पूर्ण । दुःखशोकार्णवीं एक मग्न । एक निमग्न अष्टभोगीं ॥ ७६ ॥ अकृताभ्यागमप्रसंगीं । ऐसी विषमता कोंवि भोगीं । तैं मग मोक्ष जीवांलागीं । स्वरूपहानिमात्रक ॥ ७७ ॥ भस्मीभूत होतां देह । जन्ममरणाचा अभाव । तैं चार्वाकमत स्वयमेव । सिद्ध झाले या बोधें ॥ ७८ ॥ यास्तव बोलणें हें अयुक्त । आत्मा स्वप्रकाशानंद सत्य । तेथ उपाधि अविद्याकृत । नाना अनर्थ उपपादी ॥ ७९ ॥ अविद्याकृतानर्थवृत्ति । इतुकेनि मोक्ष जीवांप्रति । देहीं सहसा न घडे युक्ति । कोणे रीती तें ऐका ॥ ६८० ॥ जीवांसि वास्तव जन्मचि नाहीं । उपाधिजन्में जन्मती पाहीं । जेंवि कां घटमठादिकांच्या ठायीं । न जन्मोनियां नभ जन्मे ॥ ८१ ॥ ऐसा सिद्धान्तप्रतिपादनीं । जे श्रुति वदला सनंदनमुनि । ते परिसावी श्रोतृजनीं । सावध होवोनिं क्षण एक ॥ ८२ ॥

न घटत उद्भवः प्रकृतिपूरुषयोरजयोरुभययुजा भवन्त्यसुभृतो जलबुद्बुदवत् ।
त्वयि त इमे ततो विविधनामगुणैः परमे सरित इवार्णवे मधुनि लिल्युरशेषरसाः ॥ ३१ ॥

पूर्वपक्ष इये ठायीं । विधिनंदनीं केला पाहीं । स्वतः जीवांसी जन्म नाहीं । तरी घडे दोहीं पासाव ॥ ८३ ॥ तेथ प्रकृति जीवरूपें होय । अथवा पुरुष होतसे काय । किंवा प्रकृतिपुरुष हें उभय । जीवरूपें होतसे ॥ ८४ ॥ प्रकृतिच होते ऐसें म्हणतां । तैं जीवांस येतसे जडता । पुरुष ऐसें म्हणों जातां । सविकारता पुरुषा ये ॥ ८५ ॥ दोहीं मिळोनिं जीव होय । तैं लागती दोष द्वय । वास्तव न घडे हा निश्चय । वक्ता श्रुत्यर्थ प्रतिपादी ॥ ८६ ॥ तरी जीवांचा संभव कैसा । वास्तव कथितों सावध परिसा । प्रकृतिपुरुषांचिया अध्यासा । माजी जीवदशा उभारे ॥ ८७ ॥ वास्तव जन्मातीत ईश । अज अनंत जो अविनाश । जन्म मिथ्यात्वें प्रकृतीस । न घडे म्हणोनि अजा म्हणिजे ॥ ८८ ॥ उभयतांच्या अजत्वा स्तव ही । जीवांसि उद्भव घडत नाहीं । श्रुतीनें हाचि अर्थ पाहीं । निर्धारिला म्हणे वक्ता ॥ ८९ ॥ जे मिथ्यात्वें नामें अजा । श्वेत रक्त कृष्णा सहजा । त्रिगुणात्मका बहु ते प्रजा । प्रसवे आपणा सारखिया ॥ ६९० ॥ अजा म्हणिजे शेळिये प्रति । दोघे अज तयेचे पति । एक जीव तो तत्संगती । भोगी आसक्तिसुखदुःखें ॥ ९१ ॥ दुजा तो ईश भोगूनि भोगा । असंग करी इचिया त्यागा । तस्मात् प्रकृतिपुरुषयोगा । पासूनि होती जीव कोटी ॥ ९२ ॥ न घडत दोहींचा संयोग । परस्परें अध्यासयोग । तेणें होती जीव अनेग । असुभृत म्हणिजे सप्रमाण ॥ ९३ ॥ प्राणादि सोपाधिक जीव । जलबुद्बुदवत् होती सर्व । तो उभययोगाभिप्राव । दृष्टान्तद्वारा अवगमिजे ॥ ९४ ॥ बुद्बुद न होती केवळ जळें । अथवा न होती केवळ अनिळें । जळा अनिळांच्या संयोगमेळें । बुद्बुद मोकळे उद्भवती ॥ ९५ ॥ जेथ जेंवि निनित्त पवन । जल बुद्बुदां उपादान । तैसेंचि दार्ष्टान्तीं ही जाण । पुरुष उपादान येर प्रकृति ॥ ९६ ॥ तया अथवा ययास्तव । होय गगनाचा संभव । एवं भूतें भौतिकें सर्व । पुरुषा पासाव श्रुति वदती ॥ ९७ ॥ बहुत व्हावें ऐसा काम । कामिता झाला पूर्णकाम । अग्रीपासोनि स्फुलिंगोद्गम । स्थिरजंगम तेंवि स्वयें ॥ ९८ ॥ तस्मात् परमात्मयापासून । सर्वलोक सर्वप्राण । भूतां देवतादिकांचेगण । होती उत्पन्न स्फुलिंगवत् ॥ ९९ ॥ ब्रह्मा पासूनि

चराचर । तें ब्रह्मत्वाहूनि नोहे अपर । सुवर्णाचे अलंकार । ते कार्तस्वर कीं भिन्न ॥ ७०० ॥ तेंवि परमात्मा उपादान । स्थिरचरप्रपंचा लागून । ऐसिया श्रुतिवाक्या वरून । विकारस्पर्शन नव्हे ईशा ॥ १ ॥ परिणामाच्या अनंगीकारें । उपादानत्व ईशा खरें । विवर्तवादें श्रुतिनिर्धारें । प्रतिपाद्य ऐसें म्हणे वक्ता ॥ २ ॥ अद्वैतवादी कोणी एक । परिणाम अंगीकारूनि सम्यक । आत्मयास विकारता कलंक । झणें स्पर्शेल म्हणोनियां ॥ ३ ॥ निमित्तोपादानाच्या ठायीं । विपरीतभावबोधें पाहीं । प्रकृतिपुरुषैक्यें सर्व ही । जीव उद्धवती हें सिद्ध ॥ ४ ॥ निमित्तकारण पुरुष म्हणतां । सहसा न शिवे विकारता । प्रकृत्युपादानें जडता । आरोप मिथ्या जीवांसी ॥ ५ ॥ येचि अर्थी वदती श्रुति । एकचि अद्वय ब्रह्म म्हणती । अजा एका माये प्रति । प्रतिपादिती गुणमयी हे ॥ ६ ॥ अरे आत्मा हा अविनाशी । बहुधा श्रुति इये विषीं । उपपादिती आणि जीवांसी । उत्पत्ति कैसी ते ऐका ॥ ७ ॥ उपाधिमात्र जन्म पावे । चैतन्य व्यापक तेथें स्वभावें । जन्म तिये उपाधी सवें । स्वतः न पवे जन्म कहीं ॥ ८ ॥ पुढतीं उपाधिविलयें करून । परमात्मस्वरूपीं जीव लीन । इत्यादि श्रुतिवाक्यांचें श्रवण । वास्तव जनन निरसीं पैं ॥ ९ ॥ त्वयि म्हणिजे तुझ्या ठायीं । कारणात्मकें स्वरूपीं पाहीं । ते हे चराचर जीव सर्व ही । उपाधिउदयीं उद्धवती ॥ ७१० ॥ तस्मात् वास्तव जन्म नसे । उपाधीस्तव मात्र दिसे । अनेक नामगुणभेदा सरिसे । लीन होती तुज माजी ॥ ११ ॥ अनेक कार्योपाधीं सहित । विविध-नामगुणां समवेत । तुजमाजी पुढती लीन होत । हा सिद्धान्त श्रुतींचा ॥ १२ ॥ तया लीन होतियां परी । द्विविध वदली श्रुतिवैखरी । दृष्टान्तद्वारा तें अवधारीं । म्हणे उत्तरीं शुक राया ॥ १३ ॥ सुषुप्ति आणि प्रळयसमयीं । प्रपंचा विलय होतसे पाहीं । कैसे कोण कोणाच्या ठायीं । लीन होती नामरूपें ॥ १४ ॥ मधू माजी अशेष रस । लय पावोनि करिती वास । सुषुप्ति सरिसे न निःशेष । कारणनाश न होता ॥ १५ ॥ कारण विद्यामान असे । म्हणोनि जीव श्वासोच्छ्वासें । जाणों येती रसही तैसे । अनोळखपणें रुचिं देती ॥ १६ ॥ कोण मी ऐसा न स्फुरे जेंवि । श्वासोच्छ्वास स्वभाव दावी । दुमकुसुमादि मधु न सुचवी । परी भेषजीं चवी प्रगटितसे ॥ १७ ॥ एवं सुषुप्ति मधुदृष्टान्तीं । उपपादिली ऐसिये रीती । आतां ऐका कैवल्यमुक्ति । सिन्धू मिळती जेंवि सरिता ॥ १८ ॥ वर्षाक्षोभें जेंवि सिन्धुजळा । प्राशूनि नेती मेघमाळा । ते उतरतां भूमंडळा । प्रवाहशीळा नद्या होती ॥ १९ ॥ त्या समस्ता सिन्धुमिळणीं । यथापूर्व होती पाणी । स्वादें बोधें अथवा गुणीं । पुन्हा निवडणी न घडे त्यां ॥ ७२० ॥ परमे म्हणिजे परात्परपुरुषीं । जीवां अमृतत्व समरसीं । पुढती निवडणियाची पुसी । न उरे ऐसी श्रुतिवाणी ॥ २१ ॥ एवं परमेश्वरा पासून । जीव होताती उत्पन्न । तद्वश करिती कर्माचरण । पुढती लीन तेथ होती ॥ २२ ॥ संसारचक्रीं भ्रमण ऐसें । जीवांलागूनि बोलिलें असे । तेथूनि मुक्त होती कैसे । तेंही ईशें दर्शविलें ॥ २३ ॥ तें ईशाचें अभिप्रेत । श्रुति बोलिली विधिसंमत । तदनुसार जे वर्तत । ते निर्मुक्त भवचक्रीं ॥ २४ ॥ पूर्वी समष्टिजीव झाला । व्यष्टिजीवसृष्टि तो व्याला । भवचक्राचे भंवडी भ्याला । निज सुटिकेला अवलोकी ॥ २५ ॥ भूतें भौतिकें अवलोकिलीं । लोकलोकान्तरें पाहिलीं । दिशाप्रदिशांची घेतली । शुद्धि साकल्यें सर्व ही ॥ २६ ॥ तेथ सुटिकेचा न दिसे

वाट । मग होवोनि अंतरनिष्ठ । उपास्थान केलें स्पष्ट । नित्य निघोंट वस्तूचें ॥ २७ ॥ ऋतसत्य जें नामें ब्रह्म । तेथ चित्कळा झाली प्रथम । तयेच्या स्तवनें वास्तव धाम । होऊनि निर्भ्रम स्वयें झाला ॥ २८ ॥ श्रुतीनें तो मार्ग पुढें अबळां । प्रकट दाखविला प्राञ्जळा । आर्षश्रुति ते कौरवपाळा । वदता झाला योगीन्द्र ॥ २९ ॥

नृषु तव मायया भ्रममयीष्ववगत्य भृशं त्वयि सुधियोऽभवे दधति भावमनुप्रभवम् ।
कथमनुवर्ततां भवभयं तव यद्भृकुटिः सृजति मुहुस्त्रिणेमिरभवच्छरणेषु भयम् ॥ ३२ ॥

यया समस्त जीवांच्या ठायीं । तुझिये माये स्तव हें पाहीं । भ्रमचक्र भ्रमतें सर्वदा ही । जाणोनि हृदयीं धीमंतीं ॥ ७३० ॥ भवनिवर्तक जो तूं अभव । त्या तुझ्या ठायीं दृढसद्भाव । धरिती आणि मायाप्रभव । मिथ्या माव निस्तरती ॥ ३१ ॥ नित्य नूतन जन्ममरण । भ्रमचक्राच्या ठायीं जाण । तयापासून तव पदशरण । निर्भय पूर्ण निर्मुक्त ॥ ३२ ॥ तुझ्या ठायीं ज्या अनुवृत्ति । भवभय कैंचें तयां प्रति । तरी तें कोणासि म्हणतां श्रुति । प्रतिपादिती तें ऐका ॥ ३३ ॥ ज्यास्तव तुझें भ्रूभंगरूप । त्रिधारचक्रमय काळसर्प । शीतोष्णवर्षादिप्रभेदकल्प । गणना अनल्प शब्दांची ॥ ३४ ॥ तव पदशरणा न वांछिती । हें काळचक्र तयां प्रति । जन्ममरणाच्या दुःखावर्तीं । भवभयप्राप्ति करीतसे ॥ ३५ ॥ अतएव ऐसें काळचक्र । संसाररूपी महाक्रूर । त्याचे निवृत्तीस्तव सुधीर । होती दृढतर तव भजनीं ॥ ३६ ॥ सुधी म्हणिजे बुद्धिमंत । तुझ्या ठायीं सद्भावयुक्त । होवोनि दुस्तर भवावर्त । निस्तरती हें श्रुति बोधी ॥ ३७ ॥ तो चि भगवच्चरणीं भावो । मनोनियमावाचूनी वावो । मानसानियमें दृढ-सद्भावो । करी रोहो हरिभजनीं ॥ ३८ ॥ सद्गुरूसी न वचतां शरण । सहसा नोहे मनोनिग्रहण । या लागीं कीजे गुरूपसदन । लाहिजे विज्ञान तत्कृपया ॥ ३९ ॥ जो तापला तापत्रयें । शत्रुषट्काच्या कुठारघायें । त्रासला तेणें हृदयीं भय । घरूनि अभय वांछितसे ॥ ७४० ॥ भवदुःखाच्या आहळणीं । आहळला म्हणे त्राता कोणी । भेटोनि पुढती जन्ममरणीं । पडों नेदी सर्वथा ॥ ४१ ॥ ऐसा सचिंत सर्वकाळीं । संसारभयाची काजळी । नित्य जागवी हृदयकमळीं । विषयमेळीं सुख न मनी ॥ ४२ ॥ एवं तापत्रयसंतप्त । इहामुत्रीं पूर्ण विरक्त । सद्गुरू प्रति शरणागत । रिघे त्वरित तो पुरुष ॥ ४३ ॥ समित्प्रसूनोपचारपाणी । करुणास्वरें आर्तवाणी । दृष्टि ठेवूनि सद्गुरुचरणीं । नम्रमूर्ध्नी होत्साता ॥ ४४ ॥ सद्गुरु श्रोत्रिय श्रुतिसंपन्न । तदुदित यथोक्त कर्माचरण । ब्रह्मनिष्ठ प्रबोधप्रवीण । नित्य निमग्न स्वानंदीं ॥ ४५ ॥ ऐसिया सद्गुरू प्रति तो शिष्य । शरण रिघोनि करी दास्य । अवंचकभावें निमिषोन्मेष । कृपाकटाक्ष लक्षूनी ॥ ४६ ॥ येचि अर्थीं अनेक श्रुति । गुरूपसदन प्रतिपादिती । आचार्यवंतां पुरुषांप्रती । ब्रह्मप्रतीति सुलभत्वें ॥ ४७ ॥ इत्यादि श्रुतिवाक्यांच्या ठायीं । दृढ विश्वास धरूनि पाहीं । गुरुभक्तीची बुद्धि कांहीं । कुतर्कें चंचल न करावी ॥ ४८ ॥ सुष्ठुज्ञानसंपन्न पुरुष । आचार्यमुखेंचि ब्रह्मोपदेश । प्रियतम मानूनि स्वानुभवास । लाहे निःशेष भेदलयें ॥ ४९ ॥ ऐशा अनेक बळिष्ठ श्रुति । गुरुभजनातें प्रबोधिती । शुक नृपातें ये चि अर्थीं । बोले सुमति तें ऐका ॥ ७५० ॥

विजितहृषीकवायुभिरदान्तमनस्तुरगं य इह यतन्ति यन्तुमतिलोलमुपायखिदः ।
व्यसनशतान्विताः समवहाय गुरोश्चरणं वणिज इवाज सन्त्यकृतकर्णधरा जलधौ ॥ ३३ ॥

इत्यादिश्रुतिवचनीं विश्वास । न धरूनि करिती ब्रह्माभ्यास । तैं मनोनिग्रह न घडे त्यांस । साधनसोस बहु करितां ॥ ५१ ॥ हृषीकें म्हणिजे इन्द्रियगण । वायुशब्दें बोलिजे प्राण । यमदमें करितां उभयां दमन । अजिंकमन त्यांतें ही ॥ ५२ ॥ दमें इन्द्रियां लागीं दमिती । प्राणायामें प्राणां यमिती । मन अनावर त्यां ही प्रति । श्रमतां स्वमती वश नोहे ॥ ५३ ॥ अनावर मानसतुरंगम । अदान्त दमितां अतिदुर्गम । त्यातें स्वमती करूनि श्रम । साधक अधम दमूं पाहती ॥ ५४ ॥ वायु अनावर गगनोदरीं । मनस्तुरंगम तयाचिये परी । चंचलत्वें नियमा न धरी । साधनकुसरी श्रम करितां ॥ ५५ ॥ अनाश्रयून सद्गुरुचरण । क्लेशें करिती मनोनिग्रहण । ते नर होती खेदभाजन । व्यसनीं निमग्न होत्साते ॥ ५६ ॥ बहुधा होती व्यसनाकुळ । साधनखेदें अतिव्याकुळ । न निस्तरतां भवाब्धिजळ । दुःख बहळ अनुभविती ॥ ५७ ॥ नावाडिया वांचूनि वाणी । पदार्थ घालूनियां जलयानीं । प्रवेशती जे सिन्धुजीवनीं । त्यां लागूनी गति जैसी ॥ ५८ ॥ तैसे स्वमतिसाधक दुष्ट । अनेक साधनीं पावती कष्ट । आत्महत्यारे ते स्पष्ट । विवेकभ्रष्ट म्हणोनियां ॥ ५९ ॥ येचि अर्थीं संमत श्लोक । स्वमुखें बोलिला जो श्रीशुक । सज्ज्ञन परिसोत तो सम्यक । तारक देशिक आश्रयिजे ॥ ७६० ॥

नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारम् ।
मयानुकूलेन नभस्वतेरितं पुमान्भवाब्धिं न तरेत्स आत्महा ॥ १ ॥

नरदेह आद्य सर्वां प्रति । काय म्हणोनि पुसतां श्रोतीं । ऐसी येथींची व्युत्पती । प्रवृत्तिनिवृत्तिप्रद हाची ॥ ६१ ॥ नरदेहींच्या कर्माचरणें । स्वर्गीं देवतादेह धरणें । किंवा तिर्यग्योनि फिरणें । कर्माचरणें जेथींचिया ॥ ६२ ॥ निष्कामसत्कर्मानुष्ठानें । सुप्रसन्न ईश्वरा करणें । तत्प्रसादें मग साधनें । वैराग्यादि प्रकटती ॥ ६३ ॥ साधनसंपन्न मुमुक्षु शुद्ध । सद्गुरु आश्रयी प्रबुद्ध । तत्प्रसादें निर्विवाद । कैवल्यपद मग लाहे ॥ ६४ ॥ तिर्यक् इहामुत्रनिर्वाण । प्रापक नरदेह मुख्य जाण । या लागीं तो आद्य म्हणोन । श्रीशुक सज्ञान बोलिला ॥ ६५ ॥ तो नरदेह जया प्रति । प्राप्त झाला मर्त्यक्षिती । त्यांसी सुलभ हे भारती । योगीन्द्राची वाखाणी ॥ ६६ ॥ एऱ्हवीं दुर्लभ बहुतां यत्नें । न मिळे घेतां बहुधा धनें । अथवा दुर्घट तपःसाधनें । लाहों न शके कोणी ही ॥ ६७ ॥ पुण्याधिक्यें स्वर्गभुवनीं । पापाधिक्यें तिर्यग्योनी । समान तुलना पापपुण्यीं । होतां मिळणी नरदेहा ॥ ६८ ॥ त्या माजी ही कर्मव्यत्यासें । शुष्कें सांसर्गिकें दोषें । कर्मफळाच्या भोगा ऐसे । व्यंग विकळ जडमूढ ॥ ६९ ॥ असो सुलभ नरदेह जयां । अवयव पटुतर लाधलिया । सुदृढ नौका जोडली तयां । भवसागरीं निस्तरण्या ॥ ७७० ॥ सदय सद्गुरु कर्णधार । दुस्तरीं तारक परमचतुर । विशेष प्रेरक मी ईश्वर ।

शास्ता समीर अनुकूळ ॥ ७१ ॥ ऐसी तरणोपायसमृद्धि । लाहोनि न तरेचि जो भवाब्धि । तो नर अधम मंदबुद्धि । लाहे न कधीं सुटिकेतें ॥ ७२ ॥ सद्गुरूसी न रिघोनि शरण । ईश्वरप्रेरणाशास्त्र लंघून । अहंबुद्धि यथेष्टाचरण । करिती आत्मघ्न नरदेहीं ॥ ७३ ॥ ईश्वरानुग्रहा वीण गुरु । तो न तारी भवसागरु । विशेष रुचवी इहामुत्र । कर्मपरतंत्र करूनियां ॥ ७४ ॥ सद्गुरु म्हणोनि असद्गुरु । सेवितां न तारी भवसागरु । वामी कौळिक दाम्भिक क्रूरु । जेंवि संवचोर पथसंगीं ॥ ७५ ॥ अनृताहूनिं पातक थोर । नाहीं म्हणोनि स्मृतीचा निकर । प्रतिपादी ते अनृताचि फार । यास्तव दुस्तर ते मार्ग ॥ ७६ ॥ ध्रुव म्हणिजे नौकेप्रति । सुकल्प म्हणिजे सुष्ठु सुमति । तारकाश्रयें भवावर्ती । सुवातें तरती मुमुक्षु ॥ ७७ ॥ भवावर्तीं बुडणें कोणा । दाटूनि आवडे विचक्षणा । तरी कां बुडती दुष्टाचरणा । वश होवूनि अविरक्त ॥ ७८ ॥ यदर्थीं पूर्वश्रुती माझारीं । त्रिनेमिकाळचक्राची भंवरी । कथिली तेथ युगें चारी । पाडिती फेरीं शुभाशुभां ॥ ७९ ॥ यास्तव कळिकाळ कनिष्ठ । तोचि प्रवर्तला असतां स्पष्ट । यथेष्टाचरण वाटे श्रेष्ठ । कर्मभ्रष्टमति होती ॥ ७८० ॥ द्युमणि अस्त सायंकाळीं । निबिड ध्वान्त दिग्मंडळीं । भूतीं प्रेतीं पिशाचमेळीं । तिये वेळीं प्रकटावें ॥ ८१ ॥ जार चोर दुष्पथाचार । तत्प्रवृत्ति होय फार । कली माजी अनाचार । तैसाच कुनर आदरिती ॥ ८२ ॥ बोलती एक करिती एक । वेषधारी शठ दाम्भिक । त्यांसी गुरुत्वें सेविती मूर्ख । नरकदायक न म्हणूनी ॥ ८३ ॥ मुखें म्हणती हरिदास । केवळ पोटार्थी हरदास । हरिचरणीं त्यां दृढविश्वास । असतां देश कां फिरती ॥ ८४ ॥ एक शंसिती योगमार्ग । कीर्तनामिषें रागरंग । योनिरहित वेश्या साङ्ग । मोडिती आंग नटनाट्यें ॥ ८५ ॥ योगमार्गें आनन्दप्राप्ति । लाहोनि पावता जरी विश्रान्ति । तरी तो किमर्थ धनिकांप्रति । नृत्यगीतीं रंजविता ॥ ८६ ॥ वेदान्त वैराग्य वदती तोंडें । वसनीं भूषणीं भूषिती मडें । त्यांसीं भाळोनि जन ही वेडें । गुरुत्वें कोडें सेवितसे ॥ ८७ ॥ बेषधारियांच्या ऐशा झुंडा । शिष्य करिती पोरें रांडा । संप्रदायें पाखंडबंडा । भंड उभंडा रूढविती ॥ ८८ ॥ अष्टादशयाति शिष्य । करूनि पोषिती कुटुम्बास । हा चि व्यवसाय सावकाश । करिती हव्यास वाढवूनी ॥ ८९ ॥ शिष्यांचिये सभे पुढें । तों करूनि वेडें वांकुडें । गुरु नाचे जठरचाडे । वैराग्य रडे निरूपणीं ॥ ७९० ॥ कोणी तेथें विचक्षण । सहसा न करी परीक्षण । कीं यास असतें वास्तव-ज्ञान । तरी हा वणवण कां फिरता ॥ ९१ ॥ योगमार्गें अमृतावाप्ति । लाधल्या किमर्थ विषयासक्ति । ऐसें न म्हणोनि मंदमति ! शिष्य होती कळिकाळीं ॥ ९२ ॥ वासनाभरणें रागरंग । देखोनि सन्मानी ज्या जग । त्याचा वरिष्ठ मानूनि मार्ग । तेथ सवेग अनुसरती ॥ ९३ ॥ प्रथमाश्रमें त्या वेदाभ्यास । द्वितीयाश्रमें तपःसायास । तुरीय प्रणवास नुपलविती ॥ ९४ ॥ नोहती शैव ना भागवत । नाचरती श्रौत स्मार्त । रूढ करूनि पाखंडमत । वदती परमार्थ आवडता ॥ ९५ ॥ कोण संप्रदाय तयांचा । श्रुति स्मृति न वदती वाचा । धुमाड माजविती विषयांचा । मोक्ष कैंचा मग तेथें ॥ ९६ ॥ शिष्य प्रलोभावया पुरते । आगम विवरूनि घेती निरुते । कौळमार्गें चहूं वर्णांतें । एकत्र करिती दुरात्मे ॥ ९७ ॥ कादिहादि उर्ध्वाम्नाय । नाथ नित्या अहर्गण काय । श्रीविद्येची नेणोनि सोय । शिष्यसमुदाय

मेळविती ॥ ९८ ॥ ऐसे कळिकाळींचे भोंदु । गुरुत्व मिरविती होऊनि साधु । त्यांसी शरण बुद्धिमंदु । होती आनंदु इच्छूनी ॥ ९९ ॥ मृगतृष्णिका मानूनि तोय । तृषार्त आस्था धरूनि जाय । श्रम मात्रचि तो फळ लाहे । ते गति होय तच्छिष्यां ॥ ८०० ॥ साधनसंपन्न मुमुक्षु शिष्य । होऊनि करूं लागे दास्य । कुळाचार बोधिती त्यास । म्हणती विशेष श्रीअर्चा ॥ १ ॥ पंचोपचारें श्री पूजितां । सधका पावती अभिवाञ्छिता । कंटक सदसा नुघवी माथा । अभेदपथा अनुसरिजे ॥ २ ॥ तंव तो म्हणे अहो स्वामी । मुमुक्षु केवळ कैवल्यकामी । त्यांसी प्रयोजन काय वामीं । इन्द्रियग्रामीं कां रमिजे ॥ ३ ॥ तीर्थ म्हणोनि आसव घेतां । विलंब न घडे उन्मत्त होतां । पातित्यदोष लागे माथां । लाभ कोणता या माजी ॥ ४ ॥ शुद्धि सेवनें रसना तोषे । शफरास्वादनें पिण्ड पोषे । मुद्रा चर्वणें विविधा रसें । वीर्य उल्लासें वाढतसे ॥ ५ ॥ बहुधा वीर्यवृद्धीच्या कोडें । पंचमीपरिष्वंग आवडे । तैं वैराग्य पालथें पडे । मोक्ष आतुडे मग कैंचा ॥ ६ ॥ हें ऐकोनि म्हणती गुरु । केवळ विरक्त नर पामरु । शुष्क साधनीं श्रमतां फारु । न पवे परपारु भवाचा ॥ ७ ॥ गुप्तो मुक्तः प्रकटो भ्रष्टः । हें वर्म विदित असे श्रेष्ठां । न कळे कंटकां कर्मठां । वृथा पुष्टां शुष्कांतें ॥ ८ ॥ येरु म्हणे गुप्तगति । विषभक्षणें अमर होती । प्रकट केलिया प्राणी मरती । हे कैं वदंती नायकिली ॥ ९ ॥ ऐसा बोधितां परोपरी । युक्ती प्रयुक्तीं प्रत्युत्तरीं । श्रुतिसंमतें निरुत्तर करी । अनधिकारी त्या म्हणती ॥ ८१० ॥ ऐसे कळिकाळींचे गुरु । यथेष्टाचरणीं विषयपरु । त्यांच्या बोधें नरपामरु । भवसागरु केंवि तरती ॥ ११ ॥ ऐसे कळिकाळीं कर्मभ्रष्ट । आपणां म्हणविती ब्रह्मनिष्ठ । विषयसेवनीं यथेष्ट । सहसा दुष्ट न लसती ॥ १२ ॥ त्यागें एकें अमृतावाप्ति । ऐसा निश्चय केला श्रुति । इतरसाधना संसृति । न चुके कल्पान्तीं अविरक्तां ॥ १३ ॥ तस्मात कळिकाळीं यथेष्टाचारु । बोधिती तेची श्रेष्ठ गुरु । मानूनि तेथ विषयी नरु । होती सादर कळतां ही ॥ १४ ॥ लोकीं म्हणविती हरिदास । धनार्जनाचा हव्यास । त्यांसी उबगला जगदीश । धनलोभास प्रेरूनियां ॥ १५ ॥ योगाभ्यास बोलती तोंडें । कुले मुरडूनि धनिकां पुढें । नाचती धनमानाचे चाडे । कपटी कुडे कीं ना ते ॥ १६ ॥ योगाभ्यासें ब्रह्मानंद । जरी ते पावले असते विशद । तरी मग ऐसें कर्म विरुद्ध । कां मतिमंद आचरते ॥ १७ ॥ जो गजासनीं मिरवला । तो न इच्छी अजयानाला । ब्रह्मानंदें तृप्त झाला । जन मानाला तो न भुले ॥ १८ ॥ भ्रमर वेधला पंकजपाना । तो काय अपेक्षी अपाना । सहस्रदळीं फावल्या पान्हा । स्वाधिष्ठाना केंवि भुले ॥ १९ ॥ तस्मात् शाब्दिक ब्रह्मज्ञान । विषयासक्ति धनसम्मान । उभयभ्रष्ट ते श्वपचाहून । मानिती हीन श्रुतिवक्ते ॥ ८२० ॥ हिजडीं डफडीं डौरकार । पोतभळंदी वाजीगार । धनार्थ फिरती दारोदार । चमत्कार दाखवूनी ॥ २१ ॥ भुते वाघे बहुरूपी नट । जंगम दासरी दांगट । तेंवि गुरुत्वें कर्मभ्रष्ट । भरिती पोट धीटपणें ॥ २२ ॥ वेदाध्ययनें पडलीं ओसें । शास्त्राध्ययना कोणी न पुसे । युक्तिप्रयुक्ति घालूनि फांसे । गुरुत्व ऐसें लढविती ॥ २३ ॥ असो ऐसी कळिकाळीन । नरदेहनौका ही पावोन । दुष्पथ दुरावर्तीं मग्न । होती व्याख्यान तें केलें ॥ २४ ॥ ईश्वरानुग्रहा वांचूनि कांहीं । सद्गुरु प्राप्त होणार नाहीं । शुकाचार्याचा पूर्वज पाहीं । वशिष्ठ निश्चयीं हें वदला ॥ २५ ॥ ईश्वराज्ञा

दृढविश्वासें । निष्कामकर्माचरणवशें । प्रेमळ देखोनि ईश्वर तोषे । करी अनायासें चित्तशुद्धि ॥ २६ ॥ तैं मग इहामुत्रीं विरक्त । नित्यानित्यविवेकवंत । सद्गुरु लाहे अकस्मात । मग रंगे निश्चित तद्दास्या ॥ २७ ॥ चारी आश्रम समान असतां । सद्गुरुपदवी कैंवि गृहस्था । श्रोत्रिय आणि ब्रह्मनिष्ठता । कैंवि शंसितां ते ठायीं ॥ २८ ॥ तरी व्रती तो वेदाभ्यासी । स्वयें रंगला गुरुदास्यासी । तो न बोधी सच्छिष्यांसी । ऐसें सर्वांसी कळलें कीं ॥ २९ ॥ तृतीयाश्रमी तो वनस्थ । तपस्वी राहे दृढनियमस्थ । मनोनिग्रहीं अतंद्रित । शिष्यसंगम न रुचे त्या ॥ ८३० ॥ ईषणात्यागें विरजाहोम । सारूनि केला चतुर्थाश्रम । प्रणवजपमात्राचा नियम । शिष्यसंगम न रुचे त्या ॥ ३१ ॥ यां पासूनि दीक्षाग्रहण । कैलिया निष्फळ होय जाण । ऐसें बोलिला त्रिलोचन । संमतिवचन तें ऐका ॥ ३२ ॥

यतेर्दीक्षा पितुर्दीक्षा दीक्षा च वनवासिनः । विविक्ता श्रमिणां दीक्षा न सा कल्याणदायिनी ॥ १ ॥
पितुर्मन्त्र न गृहणीयात्तथा मातामहस्य च । सोदरस्य कनिष्ठस्य वैरिपक्षाश्रितस्य च ॥ २ ॥
इत्यादि निषेधवचनादेभ्यो मन्त्रं न गृह्णीयात् ।

आत्मा वै पुत्रनामासि । आपुला मंत्र आपणासी । अयोग्य म्हणूनि पितृमंत्रासी ॥ अनादरिलें स्मृतिकारीं ॥ ३३ ॥ यतीनें करूनि विरजाहोम । होमिलें वेदोक्तक्रियाकर्म । त्यासि अयोग्य उपदेशक्रम । आत्माराम स्वयें झाले ॥ ३४ ॥ वेद बोलिला कर्मकाण्ड । तेथ नुमलावें तिंहीं तोंड । उपनिषत्प्रणवार्थ अखंड । विवरूनी गूढ असावें ॥ ३५ ॥ विश्वाभास हा विवर्त । चैतन्य आत्मा नित्य सत्य । पृथक शिष्य कैंचा तेथ । उपदेशार्थ उरलासे ॥ ३६ ॥ मातामह पितृस्थानीं । म्हणोनि निषेध दीक्षाग्रहणीं । कनिष्ठ सोदर आपणाहूनी । गुरुत्वा लागोनी अयोग्य तो ॥ ३७ ॥ तैसाचि वैरिपक्षाश्रित । त्या पासूनि दीक्षा अनुचित । म्हणोनि ब्रह्मनिष्ठ गृहस्थ । श्रुतिसंमत सद्गुरु तो ॥ ३८ ॥ शास्त्रां परस्परें विरोध । यालागीं तत्पक्ष निषिद्ध । भट्टाचार्यीं जेंवि उच्छेद । केला प्रसिद्ध चार्वाका ॥ ३९ ॥ कित्येक पाखंडी दुर्मति । गृहींच्या देवता त्यागविती । वर्णबाह्या ऐसियांप्रति । शरण रिघती दुरात्मे ॥ ८४० ॥ एवं संमतवचनानुसार । ज्यांतें गुरुत्वीं अनाधिकार । त्यांसी शरण न रिघती चतुर । सेविती सधर सर्वज्ञ ॥ ४१ ॥ आश्रमत्रयासी आधार । गृहस्थाश्रमचि केला सधर । यास्तव प्रवृत्तिनिवृत्तिपर । षट्कर्मविचार नियोजिला ॥ ४२ ॥ यजनाध्ययनदानें निवृत्ति । मार्गें साधिजे कैवल्यप्राप्ति । प्रतिग्रहयाजनाध्यापनें प्रवृत्ति । जीविकावृत्ति साधावी ॥ ४३ ॥ एवं आश्रमत्रयाचें ओझें । गृहस्था शिरीं घातलें सहजें । या लागीं शिष्यांच्या समाजें । ते निस्तरिजे परिचर्या ॥ ४४ ॥ जेथ परिचर्या विशेष पडे । तेथ शिष्याचें स्वाहित घडे । इतराश्रमीं सहसा न घडे । हेंही निवाडें जाणावें ॥ ४५ ॥ श्रोत्रिय आणि ब्रह्मनिष्ठ । ऐसें बोलिलें असे स्पष्ट । मुमुक्षुत्वीं जो उपविष्ट । द्विविध कटकट किमर्थ त्या ॥ ४६ ॥ या प्रश्नाचें प्रत्युत्तर । श्रोतीं परिसावें सादर । तरी जीव जितुका नृदेहधर । मोक्षीं अधिकार त्या सर्वां ॥ ४७ ॥ परंतु त्यांच्या द्विविध कोटी । रागविरागपर राहटी ।

त्या सर्वांची करुणा पोटीं । लक्षूनि वाक्पुटीं श्रुति वदती ॥ ४८ ॥ एकां विषयासक्ति न सुटे । त्यांसि बोधूनि कर्मनिष्ठे । विषयविरक्ति आंगीं उमटे । तंववरी हठें निरोधवी ॥ ४९ ॥ तारुण्याचा ओहटतां भर । अंगीं जरेचा संचार । तापत्रयें त्रासतां नर । वैराग्यपर मग होय ॥ ८५० ॥ प्रिय-वस्तूचा होतां नाश । शोकें आहळे मग विशेष । स्त्रीपुत्रादिकीं उदास । तैं होय परवश अनुतापी ॥ ५१ ॥ तेव्हां बोधूनि ब्रह्मनिष्ठा । निरसी जन्ममरणाच्या कष्टा । आत्मानुभवें लावूनि काष्ठा । करी प्रतिष्ठा स्वानंदीं ॥ ५२ ॥ तुरीयाश्रमीं कर्मकाण्ड । पठनीं सहसा नुमलिजे तोंड । यालागीं श्रोत्रिय आणि अखंड । ब्रह्मनिष्ठ स्वानुभवी ॥ ५३ ॥ तस्मात् नौका नरशरीर । ऐसा सद्गुरु कर्णधार । शास्त्रप्रेरक मी ईश्वर । असतां समीर अनुकूळ ॥ ५४ ॥ भवाब्धि न तरे जो नर अधम । तो मग भोगी अनेक जन्म । आत्मघातक पापी परम । त्यालागीं दुर्गम भवसिन्धु ॥ ५५ ॥ सद्गुरूसी कर्ण-धार । म्हणूनि केला जो निर्धार । या वाक्याचें अभ्यंतर । ऐका साचार मुनिगादित ॥ ५६ ॥

॥ श्लोकसंमतिः ॥ सस्कृतैः प्राकृतैश्चैव गद्यपद्याक्षरैस्तथा । देशभाषादिभिः शिष्यं बोधयेत्सद्गुरुः स्मृतः ॥३॥

नौके अहंतेच्या खडकीं । सवेग बैसों पाहे धडकी । तेथ प्राकृतां वाक्यविवेकीं । अवलीं झडकी जळलोटा ॥ ५७ ॥ सवेग वळूनि मागिलीकडे । पूर्वप्रवाहें चालवी कोडें । ज्ञानअहंतेचे कठोर कडे । चुकवूनि पुढें नौका ने ॥ ५८ ॥ असंभावनासंशयावर्ती । नौका बुडों पाहे अवचिती । तेथ संस्कृता उपनिषदुक्ति । सद्भावभक्ति तागादी ॥ ५९ ॥ मुक्तता यथेष्टाचारखळाळी । पडतां शास्त्रोक्तिगुणीं बहळीं । गद्यपद्याक्षरीं बळी । अचंचळजळीं नियमाच्या ॥ ८६० ॥ रसास्वादनवावधानीं । ऋद्धिसिद्धि-हेलावनीं । नौका उलथतां लंगरें करूनी । भापावचनीं स्थिरावी ॥ ६१ ॥ ऐसा सद्गुरु कर्णधार । नृदेहनौकातारक चतुर । तत्सेवनें साधक सधर । मनस्तुषार आकळिती ॥ ६२ ॥ मानसवेग म्हणती मोठा । क्षणार्धें फिरे ब्रह्माण्डमठा । साधकांच्या भंगी निष्ठा । यास्तव काष्ठा असाध्य ॥ ६३ ॥ काशी आणि रामेश्वरीं । क्षणार्धें सहस्र वेरझारी । जगन्नाथीं द्वारकापुरीं । करितां फेरी पळ न लगे ॥ ६४ ॥ यथार्थ मन जरी जात असतें । तरी यात्रेची वार्ता यातें । पुसतां सविस्तर सांगतें । तैं अनावर होतें मग सत्य ॥ ६५ ॥ मना जावया कैंचे पाय । स्मृतिचाञ्चल्यें पवनप्राय । वेगवत्तर भासताहे । जें अभक्तां होय अनावर ॥ ६६ ॥ लाहूनि गुरुकृपेचें बळ । भजनीं नियोजिती प्रेमळ । भावें भजतां श्रीपदकमळ । तैं होय निश्चळ अनायासें ॥ ६७ ॥ भगवद्भजनसुखानुभवें । संकल्पत्यागें मानस निवे । गुरुकृपेवीण निश्चळ नव्हे । उपाय आघवे करितां ही ॥ ६८ ॥ मनश्चाञ्चल्य कुनर पिसे । यास्तव व्यसनशताकुळ ऐसे । बोलिले ते ज्या व्यसनसोसें । भवीं बुडती तें ऐका ॥ ६९ ॥ आणि सद्गुरु कर्णधार । तव पदभजनें भवसागर । तारी ऐसा कृतनिर्धार । तो सविस्तर कथिला कीं ॥ ८७० ॥ तुझिया चरण-भजकां प्रति । सद्गुरुकृपे ज्ञानप्राप्ति । तेणें भवसुखीं होय विरक्ति । व्यसनाची गुंती त्यां नाहीं ॥७१॥ सद्गुरु बोधी तव पदभजन । तेणें न निग्रहितां निग्रहे मन । व्यसनशतका अस्तमान । निमुक्तपणें

सहजेंची ॥ ७२ ॥ अनुभवूनि लोक समस्त । कोठें न चुके दुःखावर्त । ऐसा जाणोनियां सिद्धान्त । होय विरक्त ब्रह्मिष्ठ ॥ ७३ ॥ कर्मरचित सर्व लोक । स्थावरान्त ब्रह्मादिक । जाणोनि करी मग विवेक । म्हणे भवसुख दुःखमय ॥ ७४ ॥ कूपीं देखूनि स्वप्रतिबिम्बा । सिंह आवेशें चढे क्षोभा । कोण्ही न मरितां क्रौर्यवालभा–। स्तव तो उभा बुडे दुःखीं ॥ ७५ ॥ तेंवि धरूनि विषयीं प्रेम । तत्प्राप्त्यर्थ करूनि कर्म । लोक लोकान्तरें समविषम । स्वेच्छा अधम अनुभविती ॥ ७६ ॥ येथ कोणाचा बळात्कार । नसतां सकामकर्मादर । करिती तेणें भवसागर । स्वकृत घोर अनुभविती ॥७७॥ इष्टकर्मांच्या साधनें । ब्रह्मलोका पर्यंत जाणें । पुढती तव पदभजनाविणें । क्षीणपुण्यें अधःपतन ॥७८॥ तैसेंचि करितां अनिष्ट कर्म । पाविजे अंधतम दुर्गम । मिश्रकर्मे नृपोत्तम । धनसुतसंभ्रमकर होय ॥ ७९ ॥ अकृत म्हणिजे मोक्षावाप्ति । कर्मे न पविजे कल्पान्तीं । जेव्हां निष्काम होय मति । नैष्कर्म्यगति तैं लाहे ॥ ८८० ॥

॥ संमतिः ॥ प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् । आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥ ४ ॥
आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशन्ति यद्वत् ।
तद्वत्कामायं प्रविशन्ति सर्वे स शान्तिमाप्नोति न कामकामी ॥ ५ ॥

ऐसीं स्मृतींचीं निश्चयवचनें । हाचि श्रुत्यर्थही जाणणें । कैवल्य निष्कामकर्माचरणें । लाहिजे म्हणे श्रुतिनिकर ॥ ८१ ॥ हृदया माजी वसे काम । तो त्यागिजे तैं निष्काम । होतां लाहिजे कैवल्यधाम । ऐसा नियम निगमान्तीं ॥ ८२ ॥ तस्मात् कर्माचरणें मोक्ष । न लाहिजे हें जाणोनि दक्ष । उभयभोगीं मग अनपेक्ष । होय साक्षेप गुरुभजनीं ॥ ८३ ॥ पूर्वी व्यसनशतान्वित । तैं तो तेथूनि होय विरक्त । स्वदेह दारा सुहृद सुत । गृह धन आप्त न रुचती तैं ॥ ८४ ॥

स्वजनसुतात्मदारधनधामधरासुरथैस्त्वयि सति किं नृणां श्रयत आत्मनि सर्वरसे ।
इति सदजानतां मिथुनतो रतये चरतां सुखयति को न्विह स्वविहते स्वनिरस्तभगे ॥ ३४ ॥

अश्व पदाति रथ कुञ्जर । देश दुर्गे कोश भाण्डार । मंत्री प्रजा स्वप्राणनिकर । न वटे रुचिर विरक्तां । ८५ ॥ पूर्वी रुचिकर मग कां न रुचे । म्हणाल तरी हें ऐका साचें । निजसार तूं सर्वरसांचें । असतां कैंचें मग दुःख ॥ ८६ ॥ तव चरणांचा आश्रय जिंहीं । केला असतां तुझे ठायीं । सर्व रसांचें निजसार तिहीं । भोगिजतसे अनायासें ॥ ८७ ॥ सर्व रसांचें जें निजसार । तो तूं आत्मा निर्विकार । असतां कां पां नर पामर । धनसुत दार आश्रयिती ॥ ८८ ॥ आत्मा केवळ स्वानंदधाम । ऐसें नेणोनि पामर अधम । स्त्रीसंगमीं अतिसकाम । धरिती प्रेम धनधामीं ॥८९॥ कोण ते मायिकरससेवनीं । प्राणी निवती विष सेवूनी । स्वर्येंचि नश्वर जो प्रतिक्षणीं । निःसारपणीं स्वतःसिद्ध ॥ ८९० ॥

शिम्बि धान्याचीं टरफळें । सकण भासती परंतु फोलें । तेंवि निःसार नश्वर असतां अवळें । संसार-सोहळे वाञ्छिती ॥ ९१ ॥ तस्मात अपरोक्षज्ञानेंवीण । श्रमें करूनि शास्त्रपठन । सज्ञान म्हणविती ते अज्ञान । विषयास्वादन न सुटतां ॥ ९२ ॥ एवं श्रोत्रिय ब्रह्मनिष्ठ । ईश्वरानुग्रहें सद्गुरु श्रेष्ठ । तत्प्रसादें आत्माभीष्ट । अपरोक्षज्ञान अवगमूनी ॥ ९३ ॥ सारासारविवेकें करून । सार सन्मात्र निर्धारून । असार मायामय जाणोन । ईश्वराभिमानपर्यंत ॥ ९४ ॥ अनित्य असारीं न रमे मति । तेणें सर्व भोगीं विरक्ति । उपजे ब्रह्मादिस्थावरान्तीं । महत्संगति प्रिय वाटे ॥ ९५ ॥ सद्गुरुबोधें परमतत्व । अपरोक्ष अवगमलें आत्मत्व । युक्तिश्रुतिबळें वास्तव । श्रवणें मननें दृढीकरणा ॥ ९६ ॥ महत्संगें तें श्रवण करणें । इतुकियाचिया लाभा कारणें । तीर्थें क्षेत्रें पर्यटनें । ऐसी मानणें मुनियात्रा ॥ ९७ ॥ येचि अर्थी आर्षश्रुति । वदली सनंदनभारती । नृपा सांगे श्रीशुक सुमति । ते हे श्रोतीं परिसावी ॥ ९८ ॥

भुवि पुरुपुण्यतीर्थसदनान्यृषयो विमदास्त उत भवत्पदाम्बुजहृदोऽघभिदङ्घ्रिजलाः ।
दधति सकृन्मनस्त्वयि य आत्मनि नित्यसुखे न पुनरुपासते पुरुषसारहरावसथान् ॥ ३५ ॥

पूर्वोक्त साधनसंपन्न । मननशील जे मुनिजन । विमद म्हणिजे निरभिमान । जाले श्रीचरण उपासितां ॥ ९९ ॥ तुझें श्रीपद हृदयीं ज्यांचे । रंगलें यास्तव पदजल त्यांचें । अघौघनाशक जालें साचें । म्हणोनि वाचे श्रुति वदती ॥ ९०० ॥ ऐसेही जे प्राप्त पुरुष । तीर्थक्षेत्रोपासनासोस । करिती लक्षूनि लाभ विशेष । महत्संगाचा ते ठायीं ॥ १ ॥ तीर्थसदनीं महत्संग । होतो निश्चयात्मक अव्यंग । तल्लाभास्तव सेविती साङ्ग । तीर्थें क्षेत्रें ऋषिवर्य ॥ २ ॥ अथवा पुरु म्हणिजे अधिकतर । भगवद्भजन पुण्यसार । संग्रहूनि जे नरवर । तीर्थनिकरमय झाले ॥ ३ ॥ ते चि महंत गुरुवरश्रेष्ठ । जेथ वसताती पैं संतुष्ट । सकळतीर्थांचें मूळपीठ । आश्रम अभीष्ट पैं त्यांचे ॥ ४ ॥ त्यांचीं सदनेंचि तीर्थें क्षेत्रें । तिहीं सेविलीं जळें पवित्रें । ब्रह्मादि सुरवर त्यांचिये यात्रे । अहो रात्रें करिताती ॥ ५ ॥ भगवद्भजनाची भाजनें । सुरवरमुकुटीं नीराजनें । त्यांचिया पादपीठाकारणें । करिती कल्याणें वाञ्छनी ॥ ६ ॥ तस्मात सद्गुरु जेथ वसती । तीर्थां क्षेत्रां सेव्य ते क्षिति । जाणोनि मुनिवर तेथेंचि रमती । पुन्हा न रमती भवगेहीं ॥ ७ ॥ पुरुषसारहरनिवास । तेथ मुनिवर न करिती वास । न संडिती गुरुसदनास । मराळ मानस जया परी ॥ ८ ॥ पुरुषसारहर म्हणिजे काय । क्षमा शान्ति विवेक धैर्य । यांचें हरण जेथें होय । तन्नामनिलयें तीं होती ॥ ९ ॥ धैर्य क्षमा शान्ति विवेक । हेंचि पुरुषा माजी सम्यक । सार जाणोनियां निष्टंक । सेविती लोक चतुर्दश ॥ ९१० ॥ यांचें हरण कोणे ठायीं । तरी स्त्रीपुत्रादिधन-धान्यें विषयीं । मोह प्रलोभ संवचोर पाहीं । करिती निश्चयीं भवसदनीं ॥ ११ ॥ ऐसिया सदनीं ते मुनिवर । सहसा पुनरपि न होती स्थिर । आश्चर्य न म्हणावें हें थोर । अमृतसार सेविलिया ॥ १२ ॥ आत्मा जो तूं नित्यसुख । जिहीं सेविला ते मग पुरुष । पुरुषसारहरवसतीस । होती उदास हें कें नवल ॥ १३ ॥ एकवार ही तुझ्या चरणीं । ज्याचें मानस जडलें ध्यानीं । तेही स्त्रीपुत्रादिसदनीं ।

आसक्त होऊनि न मरती ॥ १४ ॥ मृगजळपाना जो तान्हेला । तेणें अमृतह्रद देखिला । तो मग न भुले मृगतृष्णेला । राहे खुंतला सुधाह्रदीं ॥ १५ ॥ तेंवि एकवार ही तव पदरति । सेवूनि पावले विश्रान्ति । ते मग धनसुतवनितासक्ति । सदनीं वसती किमुत पैं ॥ १६ ॥ एकवार ही श्रीपदप्रेमा । फावल्या त्यजिती वधुसुतधामा । मां पूर्वोक्ता मुनिनिष्कामा । भवभ्रमधामा रुचि कैंची ॥ १७ ॥ हें ऐकोनि मीमांसक । म्हणती पूर्वपक्ष एक । यदर्थीं स्फुरला जो नावेक । तो ही सम्यक अवधारा ॥ १८ ॥ मननशीळ होऊनि मुनी । प्रपंच सांडोनि तीर्थसदनीं । महंता पासूनि श्रवणीं मननीं । रमती म्हणोनि जें वदलां ॥ १९ ॥ गृहस्थाश्रमात्मक ज्या वसती । पुरुषसारहर तयांप्रति । जाणोनि सहसा मग न रमती । ऐसें वेदान्तीं प्रतिपाद्य ॥ ९२० ॥ वेदाज्ञेचें लंघन न घडे । लंघितां वेदबाह्यता आंगीं जडे । ऐसें उभयत्र सांकडें । तें ही निवाडें अवधारा ॥ २१ ॥ आम्नाय म्हणिजे वेदां प्रति । क्रियारूप चित्तप्रवृत्ति । यज्ञाचरणें इहामुत्रार्थीं । भजिजे ऐसा सिद्धान्त ॥ २२ ॥ यज्ञक्रियापर आम्नाय । तद्व्यतिरिक्त जो श्रुतिसमुदाय । उपनिषद्भाग जेतुला होय । अनर्थप्राय तो अवघा ॥ २३ ॥ रुखा वरी कां वरुख । तन्मूळरसें वाढला देख । तथापि पत्रपुष्पफळादिक । तेथ सम्यक नुपलभे कीं ॥ २४ ॥ तैशा क्रियाविमुख ज्या वेदोक्ति । अनर्थक्यता तयां प्रति । झणें येईल म्हणोनि सुमति । त्या ही योजिती क्रियाङ्गत्वें ॥ २५ ॥ जेथ जेथ अतदर्थ वाक्यें । उपनिषद्भागीं जीं सम्यकें । जैमिनिप्रमुखीं तीं सार्थकें । केलीं क्रियाङ्गें योजूनी ॥ २६ ॥ जैसे तंत्रवार्तिककार । अतदर्थ उपनिषद्वाक्यें प्रचुर । बोलिला कर्तृस्तवनपर । योजूनि सधर ऋत्वंगीं ॥ २७ ॥ क्रतूचा कर्ता जो कां जीव । यजमान ऐसें तयासि नांव । उपनिषद्वाक्यें तयाचा स्तव । केला म्हणतां सार्थकता ॥ २८ ॥ इतुकेन ऋत्वंग अर्थाकांक्षा । वारिली प्रकटूनि निराकांक्षा । ऐसिया मीमांसकांच्या पक्षा । उत्तर बोले वेदान्ती ॥ २९ ॥ कृष्ण केश करण पटु । सकामें इहामुत्रीं विनटु । ऋत्वंगकर्ता तोचि स्पष्टु । बोलिला श्रेष्ठ स्मृतिकारीं ॥ ९३० ॥ उपउपनिषद्वाक्यें त्याचा स्तव । सहसा न करितीच वास्तव । अपरोक्षबोधें ब्रह्मानुभव । तद्विरोधें प्रबोधिती ॥ ३१ ॥ एकचि अद्वितीय केवळ ब्रह्म । विज्ञानानंदमय निजधाम । अचक्षु अश्रोत्र जें अवर्म्म । विपरीत कर्मकर्तृत्वा ॥ ३२ ॥ अद्वितीयपरमानंदरूप । आत्मा जो कां नित्य निर्लेप । तया कर्तृत्वादि संकल्प । योजिती अल्प मतिमंद ॥ ३३ ॥ तंत्रवार्त्तिककृत जें मत । तुम्हीं मानिलें दृढ संमत । तयाचें ही वाक्य येथ । अननुमत तें ऐका ॥ ३४ ॥

तन्त्रवार्तिककृतः ॥ सर्वथैव हि विज्ञानं संस्कारत्वेन गम्यते । पराङ्गं चात्मविज्ञानादन्यत्रेत्यवधार्यतामिति ॥६॥

कल्पादिसृष्टीपासून येथ । जन्मजन्मान्तरें अध्यस्त । संस्कार जडला आजि पर्यंत । उद्बोधित तो विज्ञान ॥ ३५ ॥

॥ श्लोकार्धसम्मतिः ॥ मोक्षे धीर्ज्ञानमन्यत्र विज्ञानं शिल्पशास्त्रयोः । इत्यमरः ॥ ७ ॥

तस्मात शिल्पशास्त्रमय विज्ञान । स्फुरे सर्वत्र संस्कारजन्य । आत्मविज्ञानावांचून । ऐसें वचन वार्तिकींचें ॥ ३६ ॥ स्त्रियेसी रजोदर्शन कुच । कीं पुरुषासी श्मश्रु कूर्च । यथावयें निघती साच । तेंवि नडनाच सांस्कारी ॥ ३७ ॥ तैसें नोहे ब्रह्मज्ञान । कीं संस्कारें होय उत्पन्न । येथ साधनचतुष्टयसंपन्न । लाहे पूर्ण गुरुकृपया ॥ ३८ ॥ तयाच्या दृढीकरणा मुनी । प्रवर्तती श्रवणीं मननीं । भूतळीं भ्रमती तीर्थसदनीं । महंतां लागोनिं आश्रयिती ॥ ३९ ॥ तेचि श्रवणमननरीती । कैसी प्रतिपादिली महंतीं । तें परिसिजे सावध श्रोतीं । कुरुवरनृपतिसमसाम्यें ॥ ९४० ॥ मीमांसकीं प्रश्न केला । यथाम्नायें तो खंडिला । यदर्थीं संशय असे उरला । तरी तो बोला विवरूनी ॥ ४१ ॥ द्वैत सत्यत्वें जरी असतें । तरी मीमांसकांचें ही मत घडतें । सत्यत्व नाहीं च मुळीं द्वैतातें । मनःकल्पितसें भासतसे ॥ ४२ ॥ इत्यादि प्रश्नोत्तरांच्या श्रवणें । महंता पासूनि मनन करणें । तत्वावधारणा कीजे येणें । प्रकारें म्हणोनि वदे श्रुति ॥ ४३ ॥

सत इदमुत्थितं सदिति चेन्ननु तर्कहतं व्यभिचरति क्व च क्व च मृषा न तथोभययुक् ।
व्यवहृतये विकल्प इषितोऽन्धपरम्परया भ्रमयति भारती त उरुवृत्तिभिरुक्थजडान् ॥ ३६ ॥

हें ऐकोनि मीमांसक । म्हणती विश्व सदात्मक । असत् म्हणणें हा अविवेक । उपपादून देत असों ॥ ४४ ॥ हें विश्व धर्मी हा पक्ष प्रथम । येथ सत् हा साध्यधर्म । सत् उत्पन्नत्वास्तव हा परम । हेतु नाम बोलिजे ॥ ४५ ॥ जें ज्यापासूनि उत्पन्न होय । तें तदात्मक देखिता हे । ऐसी समाख्या म्हणिजे न्यायें । दृष्टान्त आहे तो ऐका ॥ ४६ ॥ कनकापासूनि कुण्डलादिक । तेंवि सदा पासूनि सदात्मक । विश्व सन्मय हा विवेक । अनुमानप्रमाणें प्रतिपाद्य ॥ ४७ ॥ हें ऐकोनि वेदान्तवक्ता । म्हणे अभेद कीं भेदसाधितां । पंचमीनिर्देशें सन्मयता । साधूं जातां भेद घडे ॥४८॥ (ननुतर्कहतमिति) निश्चयेंसीं तर्कहत । ऐसें खंडिलें तुमचें मत । पुन्हा प्राश्निक उपपादित । श्रोते समस्त तें ऐका ॥४९॥ प्राश्निक म्हणे अभेद कांहीं । आम्ही सर्वथा साधीत नाहीं । कनकापासूनि कुण्डल पाहीं । उत्पन्नभेद निषेधितसों ॥ ९५० ॥ कनकापासूनि कुण्डल जालें । न तें कनकत्वा मुकलें । भेदनिषेधा ऐसें केलें । म्हणतां बोले वेदान्ती ॥ ५१ ॥ प्रत्यक्ष आपुली म्हणां माता । परि जनकाची न म्हणां कान्ता । ऐसिया वचनीं निषेधितां । अभेद वदतां मूर्खत्व ॥ ५२ ॥ कनकापासूनि कनकमय । अभेद कनकीं कुण्डल होय । तरी अनैकान्तिक दूषणें जाय । मत तुमचें हें खंडिलें ॥ ५३ ॥ (व्यभिचरति क्व चेति) पित्या पासून पुत्र झाला । क्रियारूप गुणादि त्याला । साम्यता घडे कीं न घडे बोला । व्यभिचार घडला कीं नाहो ॥ ५४ ॥ मुद्गरापासूनि घटध्वंस । मुद्गरासमान म्हणतां दोष । साम्यता न दिसे म्हणोनि ओस । पडिला पक्ष हा तुमचा ॥ ५५ ॥ हें ऐकूनि वादी म्हणे । तदुत्पन्नत्व उपपादणें । न विवरितां दूषण देणें । अयुक्तपणें तुम्हीं आम्हां ॥ ५६ ॥ तदुत्पन्नत्व उपपादणें । तें न मनिजे निमित्त-कारणें । तैं अनेकान्तिकत्वदूषणें । दूषिलें नवचे आमुचें मत ॥ ५७ ॥ हें ऐकूनि पुन्हा वेदान्ती । म्हण

कां वाढवां वृथा युक्ति । तुमच्या मता निषेधी श्रुति । तरी ते उक्ति अवधारा ॥५८॥ (क्वचमृषेति) उपादानही कारणें मृषा । कार्य ऐसे कोठें परिसा । गुणोपादान सर्पाभासा । कारण होय कीं ना हो ॥ ५९ ॥ कनकापाय्यानि कुण्डल प्रकट । भेदें अभेदें दिसे स्पष्ट । तेंवि न देखोनि रज्जुनिष्ठ । भुजंग नष्ट मिथ्यात्वें ॥ ९६० ॥ ऐसें तुमचें मत खंडिलें । अनैकान्तिकत्व दूषणाथिलें । हें ऐकूनि वादी बोले । तेंही परिसिलें पाहिजे ॥ ६१ ॥ पुरतें आमुचें मत नेणतां । तुम्ही आग्रहें दूषण देतां । रज्जु उपादान केवळ म्हणतां । तुमच्या मता सत्यत्व ॥ ६२ ॥ म्हणे वेदान्ती यदर्थी कैसें । तुझें प्रतिपादन जें असे । तें प्रतिपादीं स्वेच्छावशें । संकोच मानसें न करूनी ॥६३॥ ऐकूनि ऐसिया उत्तरा । वादी वदे प्रत्युत्तरा । केवळ रज्जु सर्पाकारा । उपादान हें न वदों कां ॥ ६४ ॥ अविद्याभ्रमें तमाक्त मही । गुणीं फणित्व तियेचे ठायीं । तस्मात् अविद्यागुणां या दोहीं । उपादानत्व वदों आम्ही ॥ ६५ ॥ अविद्यायुक्ति अवस्तु फणी । यालागीं मिथ्यात्व त्या लागूनी । यावरी वेदान्ती वदे वाणी । तैसेंचि म्हणोनि येथ समजा ॥ ६६ ॥ तुल्यदृष्टान्तें दूषिली युक्ति । सदुपादान प्रपंचा प्रति । न घडे ऐसी सधर उक्ति । अविद्याभ्रान्तिस्तव भासे ॥ ६७ ॥ केवळ सन्मात्रीं प्रपंच न घडे । अविद्यायोगें उभया घडे । हें तों आम्ही ही न मनूं कोडें । निषेध तोंडें तुम्हां तुमच्या ॥ ६८ ॥ भ्रमें भासलें तितुकें लटिकें । भ्रम-निरसना नंतर न टिके । स्वप्नींचें वैभव आघवें घटिके–। माजी भासोनि लोपतसे ॥६९॥ हें ऐकोनि वादी बोले । यया हेतूनें न साधिलें । हेत्वंतरें तैं साधूं भलें । प्रपंचालागूनि सत्यत्व ॥९७०॥ तेंचि ऐका हेत्वंतर । इदं इतुका पक्ष सधर । सत्साध्य हा निर्धार । हेतुक्रियाकारित्व ॥ ७१ ॥ या वरी समाख्यानिगमन । व्यतिरेक युक्तिप्रति प्रतिपादन । करितसां ते समजा खूण । उदाहरण परिसोनी ॥ ७२ ॥ हेतु असिद्ध जिये ठायीं । तेथ साध्यही तद्वत् पाहीं । शुक्तिरजतन्यायें दोहीं । सत्यासत्यत्व जाणावें ॥ ७३ ॥ त्रिधा अनुमानाची जाति । बोलिली नैयायिकांची मति । अव्ययी अनुमान एका म्हणती । द्वितीय व्यतिरेक अनुमान ॥ ७४ ॥ अन्वयव्यतिरेकात्मक तृतीय । त्या माजी अन्वयी अनुमानें न होय । तरी व्यतिरेक अनुमानें सिद्ध होय । पक्ष आमुचा निर्धारें ॥ ७५ ॥ जें कां अर्थक्रियाकारी नव्हे । तें सत् ही निश्चयें न वदावें । शुक्तिरजतवत् जाणावें । तैसें न मनावें हें विश्व ॥ ७६ ॥ अर्थक्रियाकारी रजत । शुक्तिजन्य नव्हे निश्चित । तैसा येथ न घडे अर्थ । ऐका स्वस्थ वदतसों ॥ ७७ ॥ विश्वीं अर्थक्रियाकारित्व घडे । म्हणोनि सदत्व ही रोकडें । गंधवत्त्व पृथ्वी कडे । गंधीं सांपडे पार्थिवता ॥ ७८ ॥ ऐकोनि म्हणे वक्ता धन्य । शाखाचंक्रमणें तव संभवन । म्हणोनि स्वपक्षप्रतिपादन । करिसी न शिणोन तैसाची ॥ ७९ ॥ अर्थक्रियाकारित्व जेथें । सन्मात्रत्व सत्य तेथें । म्हणसी तरी हें भ्रमाचें भरतें । व्यवहारार्थ आवश्यक ॥ ९८० ॥ व्यवहारार्थ विकल्पभ्रम । अवश्यमेव इष्ट परम । कूटकार्षा-पणादि कृत्रिम । व्यवहार निस्सीम देखिजतो ॥ ८१ ॥ कूटकार्षापण तें काय । याचा स्पष्टार्थ ऐसा आहे । कृत्रिम रजतादि गाङ्क्य । मुद्रा तन्मय निर्मिती ॥ ८२ ॥ सत्य न होनि सत्यासम । भासवी जो असत्यभ्रम । व्यवहारार्थ तो संभ्रम । इष्टचि परम आवश्यक ॥ ८३ ॥ संध्याकाळीं वसनक्रयी । पडदा बांधिती क्रयविक्रयीं । देखणयांची दृष्टी पाहीं । भ्रामक्त करिती तद्योगें ॥ ८४ ॥ अर्थक्रियार्थ

जो विकल्पभ्रम । तो व्यवहारीं इष्ट परम । देखिजत असतां ही कृत्रिम । ऐसें निस्सीम कळलें कीं ॥ ८५ ॥ हें ऐकोनि वादी म्हणे । असत्वीं भ्रमाचें केंवि होणें । भ्रमोत्पत्ति ते विवरणें । मग दूषणें मत आमुचें ॥ ८६ ॥ यथार्थ सर्प एके ठायीं । देखिला तद्भयाची हृदयीं । वसती होती तेणें पाहीं । भाविला अहि रज्जूवरी ॥ ८७ ॥ सरितासागरीं वास्तव जळ । पूर्वीं देखिलें असे केवळ । भ्रमें भासे तेंवि मृगजळ । तैं भ्रम निर्मूळ केंवि म्हणां ॥ ८८ ॥ अत्यंताभावीं भ्रमोत्पत्ति । कैसी घडे प्रपंचा प्रति । सत्याश्रयें भ्रमा प्रति । होणें न होणें घडो पैं ॥ ८९ ॥ वास्तव प्रपंच देखिला पूर्वीं । स्वप्नीं भ्रमें तो भासला तेंवि । तैं तो अवास्तव न घडे जेंवि । अद्वैत केंवि साधितसां ॥ ९९० ॥ जैसें परब्रह्म सन्मात्र । तैसा प्रपंच सत् स्वतंत्र । द्वैत असतां अद्वैतपर । बलात्कार हा तुमचा ॥ ९१ ॥ यदर्थी भट्टाचार्यवचन । भ्रमोत्पत्तीचें कारण । बोलिलें तें विचक्षण । श्रोते सर्वज्ञ परिसोत ॥ ९२ ॥

॥ भट्टोक्ति. ॥ अध्यस्यते खपुष्पत्वमसत्कथमवस्तुनि । प्रज्ञातगुणसत्ताकमध्यारोप्ये तवानवेति ॥ ८ ॥

असत् खपुष्प अवस्तु गगनीं । भ्रमें नाध्यासी सहसा कोणी । वास्तव सद्भाव प्रज्ञातगुणीं । अध्यारोपण घडे न घडे ॥ ९३ ॥ मृगजळें सासिन्नला मळा । वंध्याकुमर तेथींच्या फळा । सेवूनि पूर्ण सुखें धाला । न वचे केला आरोप हा ॥ ९४ ॥ तस्मात् सद्भाव प्रपंचासी । वास्तव आहे निश्चयेंसीं । भ्रमें अध्यस्त एकदेशी । आरोप ऐसी गोष्टी वदां ॥ ९५ ॥ ऐसें ऐकोनि वक्ता म्हणे । सहसा न मनूं हें बोलणें । अंधपरंपरेस्तव भ्रमाचें होणें । विकल्प म्हणणें श्रुत्यन्वयें ॥ ९६ ॥ तो विकल्प आवश्यक । व्यवहारीं अर्थक्रियार्थ देख । ऐक तयाचा विवेक । स्वस्थ नावेक होवोनियां ॥९७॥ संस्कारजन्य म्हणिजे भ्रम । तरी संस्कारसिद्धीकारणें नियम । पूर्वप्रतीतिमात्र परम । वस्तुमत्यत्व अनपेक्ष ॥९८॥ प्रतीतिमात्र बैसल्या हृदयीं । तें बीजसंस्कार भ्रमासि पाहीं । वस्तुसत्तत्व तिये ठायीं । नापेक्षिजे सर्वथा ॥ ९९ ॥ भ्रमव्यतिरेकाचें अदर्शन । यास्तव अनादि चि तो जाण । पूर्वापूर्व पुरातन । उत्तरोत्तर आरोपें ॥१०००॥ अंधपरंपरान्यायें करून । भ्रमोत्पत्ति संस्कारजन्य । व्यवहारीं अर्थक्रियासाधन । दिसे संपूर्ण तद्योगें ॥१॥ बाळें बागुल देखिलाचि नाहीं । कीं तो वास्तव आहे कहीं । पूर्वापूर्वप्रवाहें देहीं । संस्कार बाणे बाळाच्या ॥ २ ॥ तया संस्कारें व्यवहारसिद्धि । बिभीषा अध्यस्त होय बुद्धि । दुर्गुण आळिकेपण निरोधी । सद्गुणवृद्धि होत असे ॥ ३ ॥ तस्मात् तुझें हेत्वंतर । अप्रयोजक हा कृतनिर्धार । हें ऐकोनि वदे उत्तर । प्रमाणपर प्राश्निक तो ॥ ४ ॥ तुम्हां वेदान्तियां लागून । मुख्यत्वें श्रुतिवाक्य प्रमाण । तरी ऐका श्रुतीचें वचन । द्वैतप्रतिपादनकारक जें ॥ ५ ॥ चातुर्मास्ययाजियां प्रति । अक्षय होय सुकृतावाप्ति । ऐसी नित्यत्व वदे श्रुति । तैं द्वैतापत्ति घडे चि कीं ॥ ६ ॥ सोमयाजी सोमपानें । अमर होऊं म्हणती जेणें । ऐसिया श्रुतींच्या प्रमाणवचनें । नित्यत्व जाणणें कर्मफळा ॥ ७ ॥ तस्मात् नित्य जें कां होय । असद्वस्तु तें कदापि नोहे । कर्मकर्तृफळभोगत्रयें । नित्य निश्चयें श्रुतिवाक्यें ॥ ८ ॥ ऐसें वेदप्रतिपादित । सत् शाश्वत असतां द्वैत । तुम्ही म्हणतां जें अद्वैत । तें असंमत अप्रमाण ॥ ९ ॥

हें ऐकोनियां वेदान्ती । श्वास घालूनि विस्मयगती । म्हणे भगवंता तव भारती । कर्मठा प्रति भ्रामक पैं ॥ १०१० ॥ वेदलक्षणा भारती तुझी । बहुधा वृत्ति करूनि सहजी । कर्मठां श्रद्धावंतां माजी । भ्रमकर होवूनि भुलवीतसे ॥ ११ ॥ मुख्या लक्षणा रूढि गौणी । इत्यादिबहुधावृत्ति करूनी । कर्मठां भारवाहकां लागूनी । भ्रमवी भासूनि नित्यत्वें ॥ १२ ॥ कर्मठ मूर्ख मंदमति । देहात्मजीवात्मप्रतीति । इहामुष्मिक नित्य म्हणती । वास्तव नेणती श्रुत्यर्थ ॥ १३ ॥ कर्मफळांचा नित्य बोध । सहसा न प्रतिपादी वेद । लक्षणे करूनि प्राशस्त्य विशद । विधिवाक्यास्तव प्रशंसी ॥ १४ ॥ विधीच्या एकवाक्यास्तव जाण । प्राशस्त्यमात्रप्रशंसन । अन्यथा वाक्यभेदप्रसंगा भेण । कर्मठ अल्पज्ञ प्रबोधी ॥ १५ ॥ तो हा येथींचा विवेक । कर्मजित हा पैं इहलोक । तस्मात् क्षय पावे निष्टंक । तैसा च आमुत्रिक पुण्यजित ॥ १६ ॥ पुण्यक्षयीं पावे क्षय । न्यायसंमत हा निश्चय । श्रुत्यंतरा विरोध होय । परस्परें पूर्वापर ॥ १७ ॥ यास्तव कर्मजडाप्रति । भ्रामक मात्र पुष्पिता श्रुति । जैसें बाळा भेषज देती । शर्करामतिप्रलोभें ॥ १८ ॥ भेषजदानाचें अभीष्ट । निरामयता वास्तव स्पष्ट । शर्कराप्रलोभग्रहणाविष्ट । हें जाणती श्रेष्ठ सर्वज्ञ ॥ १९ ॥ तेंवि अज्ञान कर्मबोध । चित्तशुद्धयर्थ केला विविध । चित्तशुद्धिद्वारा शुद्ध । बोधे विशद परमात्मा ॥ १०२० ॥ आणि स्वर्गादिफळकामना । ते रोचनार्थमात्र वल्गना । म्हणोनि ब्रह्मपराचि संपूर्णा । निगमासि जाणा ययास्थित ॥ २१ ॥ ऐसें हें येथील वर्म । न कळे भ्रान्ता असोनि सुगम । जाणती ज्ञानी पूर्णकाम । श्रुतिसंभ्रम आघवा ॥ २२ ॥ अन्वयव्यतिरेकात्मक श्रुति । साद्यंत ब्रह्म चि प्रतिपादिती । प्रपंच आहाचसा बोलती । मायिक दर्शविती निदानीं ॥ २३ ॥ तस्मात् प्रपंचाचिया सत्यत्वविषयीं । साधकवचन श्रुतिसमुदायीं । सहसा निश्चयेंसीं नाहीं । जलप्रवाहीं कृशानुवत् ॥ २४ ॥ आणि असत्वीं बहुधा श्रुति । सृष्टिप्रळयात्मका असती । उत्पत्तिनाशा प्रतिपादिती । ब्रह्म निश्चिती अविनाश ॥ २५ ॥ ज्यापासूनि भूतां जनन । पुन्हा ज्यामाजी होती लीन । ज्यावरी भासती वर्तमान । तें अविकार पूर्ण वस्तुत्वें ॥ २६ ॥ आणि श्रुतिमूळक अनुमान । तेंही यदर्थीं प्रमाण । प्रत्यक्ष मिथ्या सविकार जाण । निश्चयें करून प्रपंच हा ॥ २७ ॥ अनुमान म्हणिजे किंलक्षण । तरी पदार्थाचें यथार्थ ज्ञान । जेणें होय अनुलक्षण । तें ज्ञापक पूर्ण अनुमान ॥ २८ ॥ शब्द अनुमान प्रत्यक्ष । इत्यादि प्रमाणांचें लक्ष । ज्याच्या सत्त्वीं न पुरे पक्ष । तो जाणती दक्ष खपुष्पवत् ॥ २९ ॥ हे चि सनंदनभारती । बोले श्रुत्युक्त व्युत्पत्ति । तें परिसावें पवित्र श्रोतीं । ऐके परीक्षिति शुकमुखें ॥१०३०॥

न यदिदमग्र आसन भविष्यदतो निधनादनुमितमन्तरा त्वयि विभाति मृषैकरसे ।
अत उपमीयते द्रविणजातिविकल्पपथैर्वितथमनोविलासमृतमित्यवयन्त्यबुधाः ॥ ३७ ॥

ज्या कारणास्तव हें विश्व । सृष्टीहूनि पूर्वीं सर्व । नव्हतें हा अभिप्राव । तथ्य स्वयमेव सुविचारें ॥ ३१ ॥ तैं हें सदाचि केवळ । आत्मा अद्वितीय निर्मळ । असतें झालें अचंचळ । सौम्या प्राज्ञळ श्रुति वदती ॥ ३२ ॥ आणि हें प्रळयानंतर । होणार नाहीं हा निर्धार । ब्रह्म सदोदित

अविकार । तैं सदसत्पर सन्मात्र ॥ ३३ ॥ असत् म्हणिजे कारणमाया । कार्य जाणिजे भूतमया । त्यांच्या अभावें अद्वया । सहज आत्मया अजस्रता ॥ ३४ ॥ एवं सृष्टि पूर्वीं नव्हतें । न होय निश्चयें प्रळयापरतें । या कारणास्तव मृषा भासतें । स्थितिकाळीं ही तव रूपीं ॥ ३५ ॥ तूं जो आत्मा परात्पर । केवळ चिद्रस अविकार । मध्यें तुजमाजि विश्वाकार । मिथ्या गोचर होत असे ॥ ३६ ॥ पूर्वीं नव्हतें शेवटीं नाहीं । मध्यें ही तें मिथ्याचि पाहीं । ऐसें अवगमिलें कृतनिश्चयीं । सुज्ञां हृदयीं विचारितां ॥ ३७ ॥ म्हणोनि या प्रकारें मिथ्याभूत । विश्व जाणिजे सुनिश्चित । जें द्रविणजाति विकल्पपथ । उपमिजेत तिहींसीं ॥ ३८ ॥ द्रविण म्हणिजे पदार्थमात्र । मृल्लोहहेमरूप स्वतंत्र । तयांचे बहुधा भेद विचित्र । घटमठाकारकुंडलादि ॥ ३९ ॥ घटमठशरावपिण्डाकारें । अवघी मृत्तिकाचि अवतरे । कीं मणिकुण्डलकटकप्रकारें । कार्तस्वरें अनुकरिजे ॥ १०४० ॥ पास फारोळे शूळ परिघ । आयस तद्रूपें अव्यंग । बुद्बुद कल्लोळ तरंग । उदक साङ्ग अवघें तें ॥ ४१ ॥ नानाभिधानीं अंबरजाती । सुज्ञ तंतु चि जाणतो । एवं कारणत्वास्थिती । कार्यें भासती अनेकधा ॥ ४२ ॥ तेथ विकारां नाममात्रता । जरी त्या बहुधा साकारता । कारण मृतिकादि तत्वता । सत्य सर्वदा अभेदें ॥ ४३ ॥ तेंवि आकाशादि महाभूतें । कीं भौतिकें मनुजादि समस्तें । यांसी नाममात्रता पृथक वर्ते । ब्रह्मचि सत्य वास्तव ॥ ४४ ॥ श्रुतिप्रतिपाद्य हेंचि सधर । कीं नामधेय जो विकार । तें वाचारंभणमात्र । कारण स्वतंत्र सत्यत्वें ॥ ४५ ॥ जैसा एक मृत्पिण्ड ओळखिला । मृत्तिकामयाचि अवगमिला । तैसा जो जो मृद्विकार देखिला । तो जाणिजेला तद्रूप ॥ ४६ ॥ कीं एक सुवर्णाचा मणि । बोधे सुवर्णचि म्हणोनी । तरी सर्वही अलंकारभरणीं । तन्मय मनीं जाणों ये ॥ ४७ ॥ जें एक नखनिकृंतन । लोखंड ऐसें कळलें पूर्ण । तें शस्त्रादिविकारभरण । आयस कारण बोळखिजे ॥ ४८ ॥ नामरूपातीत ज्ञानी । आपणा ब्रह्मरूप मानी । तरी आत्मवत्सर्वभूतानि । अंतःकरणीं जाणतसे ॥ ४९ ॥ एवं अनेक उदाहरणीं । सत्यत्व निश्चयें कारणीं । नामधेय कार्यालागूनी । पृथक् सत्तत्व असेना ॥ १०५० ॥ तैसें विश्व हें नाममात्र । वाचारंभण भ्रमाचें पात्र । एक ब्रह्मचि सत् स्वतंत्र । निरंतर अविनाश ॥ ५१ ॥ तस्मात् विश्वसत्त्वीं प्रमाणाभाव । आणि मिथ्यात्वीं प्रमाणसंभव । वितथमनोविलासभव । सत्यत्वगौरव या नाहीं ॥५२॥ वितथ म्हणिजे लटिका फोस । मनःकल्पित जगदाभास । येथ जे धरिती सत्तत्वास । ते मूर्ख भ्रमास वरपडती ॥ ५३ ॥ वंध्यापुत्राचिया घरा । इच्छानि अंतरीं स्नेहादरा । बागुल पाहुणा आला खरा । गंधर्वनगराहूनियां ॥ ५४ ॥ येरें आदर केला थोर । बैसों घातलें अंबर । कांहींबाहीं बोलानि सत्वर । श्रमपरिहार मांडिला ॥ ५५ ॥ वालुकास्नेहें अभ्यंगिला । उष्णमृगजळें न्हाणिला । दिग्दुकूळें परिवेष्टिला । बैसविला शून्यासनीं ॥ ५६ ॥ वायु उगाल्हानि पुष्कळ । गंधें चर्चिला निर्मळ । खपुष्पांची गळां माळ । घालूनि केवळ तोषविला ॥ ५७ ॥ बोडंबरीचे अलंकार । आंगीं लेवविले सुंदर । यावरी भोजनाचा प्रकार । पंक्तिकारसमवेत ॥ ५८ ॥ छायापुरुषादि आपुले सखे । बैसवूनि अत्यंत हरिखें । धूमदुमपत्रें सुरेखें । विस्तीर्ण पृथकें मांडिलीं ॥ ५९ ॥ नेत्रींची बाहुली सुवेषा । जे चतुर देखणी पुरुषां । ते वाढी पदार्थविशेषा । चमत्कारें अतिशीघ्र ॥ १०६० ॥ जाई जुई शेवंतिका । यांच्या फळांच्या

पृथक शाका । स्वर्गींच्या पक्वान्नां साजुकां । परिवेषी कां औदार्ये ॥ ६१ ॥ त्यावरी कांसवीघृत सद्यस्तप्त । पुष्कळ वाढिलें यावत्तृप्त । तंव तेथें अतिथि अकस्मात । दैवें निश्चित मी गेलों ॥ ६२ ॥ तये पंक्तीसि जेविलों । जेऊनियां अत्यंत धालों । सांगावयासि तुम्हांसि आलों । म्हणे इतरां अन्नार्थियां ॥ ६३ ॥ ऐसिया अनृतभाषणा । मूर्खांवांचूनि विश्वासेना । तद्वत्प्रपंचविकत्थना । वाचारंभणा जाणिजे ॥ ६४ ॥ ऐसा वितथ मनःकल्पित । वाचारंभणमात्र विवर्त । प्रपंच सत्य म्हणती संतत । ते अज्ञान अत्यंत तमग्रस्त ॥ ६५ ॥ एथ ऐसा असे प्रयोग । विवादाध्यासित असन्मोघ । आदिअंतीं न दिसे साङ्ग । विश्वबोध म्हणोनियां ॥ ६६ ॥ विवादाध्यासित म्हणिजे काय । तरी याचा ऐसा अभिप्राय । दों प्रकारींचा अन्वय । समासें होय तो ऐका ॥ ६७ ॥ प्राङ्गणीं चोर देखिला । द्रष्टे म्हणती कैसा आला । तेथ बहुतीं वितर्क केला । बहुता परीचा बहुतेक ॥ ६८ ॥ माळवदाची जे कां वाट । तिकडून आला म्हणती स्पष्ट । एक म्हणती भिन्तचि नीट । चढूनि चोखट उतरिला ॥ ६९ ॥ द्वारापिधाना आधीं च आला । ऐसा च एकीं तर्के केला । शेखीं पाषाणें ताडिला । तंव प्रत्यय बाणला छाया हे ॥ १०७० ॥ तेंवि विवाद म्हणिजे विशेषवाद । ज्यास्तव करिती शास्त्रविद । एक म्हणती अनादिसिद्ध । उत्पन्न होत एक म्हणती ॥ ७१ ॥ एक म्हणती संकल्पकर्ता । एक म्हणती ईश्वरसत्ता । एक जीवचि समस्ता । कर्मे तत्वता हेतु वदती ॥ ७२ ॥ एक प्रकृतिचि कर्ती म्हणती । एक काळचि सहसा मानिती । ऐसे बहुप्रकारें वदती । विवादती परस्परें ॥ ७३ ॥ षड्दर्शनांचे विशेष वाद । ज्यावरी तें हें विश्व विशद । अध्यस्त मिथ्या प्रसिद्ध । द्वितीयार्थ तो ऐका ॥ ७४ ॥ विपरीतवादें अनुसंधित । तेंचि विवादाध्यासित । हेंचि स्पष्ट अभीष्ट अभिप्रेत । परिस्वनि दृष्टान्त विचारा ॥ ७५ ॥ रज्जु अस्वनि म्हणिजे सर्प । कीं स्थाणु अस्वनि पुरुषकल्प । कीं शिंपीवरी रौप्यारोप । अवघा जल्प विपरीत ॥७६॥ विपरीतबोधें अवगमिलें । तें विपरीतवादा पात्र झालें । जेव्हां वास्तव प्रत्यया आलें । तेव्हांचि कळलें मिथ्यासें ॥ ७७ ॥ भ्रमाहूनि पूर्वी आरोप । नामरूपात्मक हा अल्प । नव्हता चि कीं सविक्षेप । न दिसे स्वयंभ भ्रमान्तीं ॥ ७८ ॥ आदिअंतीं अविद्यमान । चित्स्वरूपीं विश्व जाण । आकाशादि नामें भिन्न । तें विपरीतभाषण भ्रमास्तव ॥ ७९ ॥ ऐसें विवादें अध्यस्त । देवतिर्यग्मनुजवत । तें निश्चयें नव्हे सत । हा सिद्धान्त श्रुतिगदित ॥ १०८० ॥ अविद्यमान आदिअंतीं । दृश्यविकारीं निश्चिती । शुक्तिरजतादिकांची स्थिति । मिथ्या ते रीती प्रपंच हा ॥ ८१ ॥ आणि मिथ्या जें जें नाहीं । तें दृश्य विकारीं नव्हे कहीं । जैसा आत्मा निरंतर पाहीं । कालत्रयीं सद्रूप ॥ ८२ ॥ आत्मा सर्वदा विद्यमान । सन्मात्रत्वें विकारहीन । निर्गुणत्व अदृश्य पूर्ण । विश्वलक्षण तेंवि नसे ॥ ८३ ॥ विश्व मिथ्या अविद्यमान । दृश्य विकारी म्हणोन । केवळ अज्ञानकारण । द्विलक्षण अनुमानें ॥ ८४ ॥ जेथ ज्या सत्यत्वबुद्धि । तें अज्ञान चि त्रिशुद्धि । ते वारा मोटें बांधिती । गगन प्राशिती तृड्हरणा ॥ ८५ ॥ ते खपुष्प माथां तुरंबिती । मृगजळीं नौके बैसती । बाऊ देखोनि कांपती । भिऊनि चढती स्वस्कंधीं ॥ ८६ ॥ असो त्या मूर्खांची कथा । प्रपंच नाहींच सर्वथा । आत्मा अद्वितीय तत्वता । सनंदन वक्ता बोलतसे ॥ ८७ ॥ हें ऐकूनि प्राश्निक मुनि । आशंकोनि आपुले मनीं । म्हणती प्रपंच निपटूनी । नाहींच निर्गुणीं

परब्रह्मीं ॥ ८८ ॥ जरी प्रपंचसंबंधाचा गंध । चैतन्यीं अस्पृष्ट प्रसिद्ध । तरी जीवें काय केला अपराध । संसृतिबंध तो पावे ॥ ८९ ॥ किंवा असे कांहीं अगण्य । ईश्वरासी बहुतेक पुण्य । ज्यास्तव संसार-वैगुण्य । न पवोनि दैन्य नित्यमुक्त ॥ १०९० ॥ केवळ संसार मिथ्या वदतां । कैंची पापपुण्याची वार्ता । तेव्हां मृषा बंधमुक्तता । साध्यसाधकता कायसी ॥ ९१ ॥ तरी कर्मकाण्ड हा विषय । किंनिमित्तक कैसा काय । ज्याचा वेदीं बहु अन्वय । साधनमय प्रशंसिला ॥ ९२ ॥ ये उत्प्रेक्षेच्या ठायीं । जीवेश्वरविशेष कायी । तो विदित होय श्रुत्यन्वयीं । रूपकें कांहीं जो ग्रथिला ॥ ९३ ॥ दोनी पक्षी जीव ईश्वर । परम जिवलग अत्यंत मित्र । निकटवर्ती जे एकत्र । एक देहतरुवर आश्रयिती ॥९४॥ प्रवृत्तिनिवृत्त्यात्मक जया । पक्ष असती पक्षिद्वया । पावे क्षणक्षणा वृद्धिक्षया । म्हणोनि देहा वृक्षत्व ॥ ९५ ॥ विषयसुखात्मकफळीं । जो पिकला असे सर्वकाळीं । तया देहवृत्तिस्नेहशाळी । पक्षियुगलीं वसिजेत ॥ ९६ ॥ एका वांचूनियां एक । क्षणभरी नसती हें कौतुक । ऐसे अनादि हे जिवलग । परि वृत्तिविवेक भिन्न यां ॥ ९७ ॥ आसक्त होऊनि जीवपक्षी विषयसुखात्मक फळ ये वृक्षीं । परम रुचिकर मानूनि भक्षी । शिव अनुलक्षी साक्षित्वें ॥ ९८ ॥ तया फळाचिया उन्मादें । रमे गुणवतीसीं विनोदें । मग ते लोहित शुक्ल कृष्ण तच्छंदें । बहुतां प्रजातें प्रसवली ॥ ९९ ॥ असो इत्यादि अनेक श्रुति । जीवेश्वरविशेष वदती । तेचि सनंदनभारती । वदे ते श्रोतीं परिसिजे ॥ ११०० ॥

स यदजया त्वजामनुशयीत गुणांश्च जुषन्भजति सरूपतां तदनु मृत्युमपेतभगः ।
त्वमुत जहासि तामहिरिव त्वचमात्तभगो महसि महीयसेऽष्टगुणितेऽपरिमेयभगः ॥ ३८ ॥

सनंदन म्हणे श्रोतयां प्रति । ईश्वर नित्य मुक्त कवणे रीती । जीवासि संसाराची प्राप्ति । कोंवि ते श्रुत्युक्ति अवधारा ॥ १ ॥ तरी तो जीव मायेंकरून । ज्या कारणास्तव भ्रमोन । अविद्येसी अनुशयी पूर्ण । झाला विसरून आत्मत्वा ॥ २ ॥ म्हणाल माया कैसी कोण । अविद्येचें काय लक्षण । तें ऐकावें निरूपण । यथाज्ञानें कथिजेल ॥ ३ ॥ केवळ पूर्णपणें चैतन्य । असतां स्फुरलें अहंपण । तेचि माया जाणिजे सगुण । बीज संपूर्ण भवाचें ॥ ४ ॥ हेचि पुढें विश्वरूप । विस्तारली सविक्षेप । जीस्तव जीव पावे अविद्यालेप । ते ऐका संक्षेप क्रमरीति ॥ ५ ॥ जैसी समुद्रीं उठिली ऊर्मी । ते अनेक बुद्बुदां लागीं निर्मी । ते असोनि ही जळत्वधर्मी । बुद्बुदनामीं अभिव्यक्ता ॥ ६ ॥ जितुकें बुद्बुदाकारें उंचावलें । तितुकेंचि बुद्बुदनामाथिलें । समानत्वें जें राहिलें । उदक बोलिलें जया परी ॥ ७ ॥ तेंवि अहंपणें वेढले । तेचि मायोपाधिक बोलिले । तेथें ही मायेसी अनुसरिले । तितुकेचि पातले जीवत्वा ॥ ८ ॥ मायाध्यासें घनावला । विसर तोचि अविद्या बोलिला । अविद्यायोगें संसार स्फुरला । विपरीतज्ञानें जीवासी ॥ ९ ॥ महत्तेजावलोकनें आपैसी । दृक्तेजीं झांपडी पडे जैसी । मग तमोगभीं रंगविशेषीं । तये दृष्टीसी अवगमिजे ॥ ११९० ॥ तेंवि स्वस्वरूपाठवें विरमली । निजवृत्ति जडत्वा पातली । तमत्वें अविद्या बोलिली । पुढें विक्षेपली

सत्वरजें ॥ ११ ॥ ते अज्ञानरूप अविद्या । तीमाजी सुलीन जीव सद्या । विसरला स्वरूपा अनादि आद्या । अभेद अच्छेद्या भ्रमस्तव ॥ १२ ॥ म्हणोनि ये रीती मायेंकरून । जीव अविद्या आलिंगी आपण । तेव्हां तज्जनित देह कवळून । आत्मत्वें पूर्ण अध्यासी ॥ १३ ॥ अंतःकरणादि वृत्त्यंकुर । हे भोक्तृज्ञातृसंज्ञापर । सत्त्वगुणात्मक अविद्याप्रसर । कर्तृकरण या म्हणिजे ॥ १४ ॥ ज्ञानेन्द्रियें कर्मेन्द्रियें । पंचप्राणादि निश्चयें । राजस सर्ग हा अविद्यामय । तमें होय विषयादि ॥ १५ ॥ एवं एतदात्मक लिंगदेह । याचें आयतन निःसंदेह । स्थूळ शरीर भूतमय । आपणा तन्मय मानीतसे ॥ १६ ॥ मग त्या देहाचे जे धर्म । सुखदुःखादि विकार परम । तन्निमित्तें भोग अधम । भोगी उत्तम होत्साता ॥ १७ ॥ देह जन्मला जये याति । तेचि मानी आपणा प्रति । देह असतां अस्तित्व-प्रतीति । धरूनि चित्तीं भ्रम वाहे ॥ १८ ॥ मी बाळ मी आहें तरुण । मी वृद्ध मी पुष्ट रुग्ण । मी पवित्र मी पापी पूर्ण । मूर्ख सज्ञान मी म्हणे ॥ १९ ॥ प्रियसंवादें अथवा गानें । संतोष मानी आपुल्या मनें । निन्दा किंवा भीकरवर्णें । सुख दुःख श्रवणें अनुभवी ॥ ११२० ॥ एवं शब्द स्पर्श रूप रस । गंधादि विषय हे तामस । अनुकूळप्रतिकूळत्वें त्रास । मानी तोष श्रवणादिकीं ॥२१॥ तया विषयसेवना-साठीं । गृहधनदारादि आटाटी । करी विशेषें न मनूनि खोटी । मग होय कष्टी फळपाकीं ॥ २२ ॥ एवं देहात्मत्वें विषयसेवन । करूनि विसरला पूर्णपण । म्हणोनि हतभाग्य झाला आपण । जन्ममरण पावतसे ॥ २३ ॥ सत् असोनि असत् झाला । चिन्मय असतां जडत्वा आला । आनंदरूप दुःखें श्रमला । वैगुण्य पावला परोपरी ॥ २४ ॥ ऐसा जीव अपेतभंग । म्हणिजे आनंदादि गुण अव्यंग । लोपले ज्याचे नैसर्गिक । अविद्यायोग झालिया ॥ २५ ॥ जैसा ब्राह्मण कामें भुलला । अंत्यजीसंगें भ्रष्ट झाला । पडिवध कर्मापासूनि च्यवला । पातित्य पावला तत्काळ ॥ २६ ॥ किंवा राजा दुष्टाष्टप्रकृती । संगें पावे ऐश्वर्यच्युति । तैसी जीवांची हे स्थिति । झाली निश्चिती उपहत ॥ २७ ॥ ऐसा पिहितानंदादिगुण । होत्साता संसारवैगुण्य । पावे दुःखद जन्ममरण । वास्तव मीपण विसरूनि ॥ २८ ॥ तया जीवाचाचि विषय । कर्मकाण्ड हा निश्चय । प्रवृत्तिनिवृत्तिकारक होय । सम्यक उपाय क्रियात्मक ॥ २९ ॥ श्रुति म्हणती जगदीश्वरा । अनंता अपारा अक्षरा । जीव भोगी संसारा । अविद्यापुरा अधिष्ठूनि ॥ ११३० ॥ तूं तये मायेचा त्याग । करूनि राहसी निःसंग । केवळ सन्मात्रत्वें अभंग । निष्कलंक अद्वितीय ॥ ३१ ॥ म्हणसी तें माझ्याचि ठायीं आहे । मजवीण क्षण ही भिन्न न राहे । ममाश्रयाचि सहसा जिये । कैंवि मज होय तत्त्याग ॥ ३२ ॥ तरी सर्पा आंगीं त्वचा जैसी । न टकूनि टाकी आपैसी । आभासरूपा माया तैशी । तूं त्यागिसी तद्वत पैं ॥ ३३ ॥ ये दृष्टान्तीं ऐसा भाव । स्वगत ही कंचुक सावेव । असतां न मनी गुणवैभव । अहि स्वयमेव निश्चयें ॥ ३४ ॥ त्वचा असतां अतिभूषण । अथवा न मनीच दूषण । गेलिया न स्मरे उदासीन । जाणिजे म्हणोनि त्यक्तवत् ॥ ३५ ॥ गुणवती जे माया अजा । तूं सांडिसी तैसिया बोजा । हें आश्चर्य काय संवित्पुञ्जा । तुज केवळ निजानंदमया ॥ ३६ ॥ निरंतराल्हादरूपिणी । संवित्कामधेनुवृंदधनी । त्या तुज कोण कार्य अजे करूनी । तूं पूर्णपणीं ते उपेक्षिसी ॥ ३७ ॥ अजा म्हणिजे शेळिये प्रति । जे अल्पदुग्धा क्षुद्र

सेविती । कामधेनुखिल्लारपति । न इच्छी निश्चिती तयेसी ॥ ३८ ॥ अजाजनित विषयसुख । जें क्षणिक आणि अल्पक । जीव कामिती अज्ञानमूर्ख । हीनविवेक मतिमंद ॥ ३९ ॥ तूं नित्यानंदसुखकल्लोळ । स्वसंवित्स्फुरणरोळ । तद्गताल्हादें पूर्ण केवळ । उपेक्षाशीळ मायेतें ॥ ११४० ॥ म्हणसी मज कोठून हें सामर्थ्य । तरी ऐकावें करूनि स्वास्थ्य । जें निरोपितसों यथातथ्य । ऋतनिर्मथ्यविशेषणें ॥ ४१ ॥ तूं परमात्मा आत्तभग । म्हणिजे निरंतर अव्यंग । तुज संप्राप्त ऐश्वर्य अमोघ । जें अजस्र साङ्ग तव धामीं ॥ ४२ ॥ उत्कृष्ट ऐश्वर्य अष्टगुणित । अणिमादिमहत्सिद्धिमंत । येथ शोभसी इत्थंभूत । अपरिमित सभाग्य तूं ॥ ४३ ॥ अणिमा गरिमा लघिमा महिमा । प्राप्ति साहवी प्राकाम्या । ईशित्व वाशित्व ऐशा परमा । सहज सुगमा तुजलागीं ॥ ४४ ॥ अणिमा म्हणिजे अणूहूनि सान । होऊनि वर्तणें आपण । गरिमा म्हणिजे स्थूळ होऊन । राहणें जाण लघु असतां ॥ ४५ ॥ तरी तूं सहज अणूहूनि अणीयान । महताहूनिही महीयान । गगनासही तूं सांठवण । निश्चयेंकरून श्रुति बोले ॥ ४६ ॥ लघिमा म्हणिजे अतिलाघवें । सर्वेही करणें चापल्यभावें । तरी सर्वीं सर्वपणें स्वभावें । न करूनि आघवें तूं करिसी ॥ ४७ ॥ महिमा म्हणिजे सर्वत्र पूज्य । होणें जें कां कीर्तिपुञ्ज । तरी ईड्य निगमीं सहज । ब्रह्मादि तुज भजताती ॥ ४८ ॥ प्राप्ति म्हणिजे संकल्पमात्र । करितां दुर्लभ ही विचित्र । पदार्थ प्राप्त व्हावे स्वतंत्र । असतां स्थिर स्वस्थानीं ॥ ४९ ॥ तूं पूर्णपणें सर्वत्र सर्वीं । संप्राप्त अससी पदार्था पूर्वीं । अधिष्ठानत्वें व्यापक विभवीं । हे प्राप्ति गुर्वी तव रूपीं ॥ ११५० ॥ प्राकाम्या जे कामिल्या ठायां । काभिल्या सारिख्या रूपा जया । धरूनि जाणें पालटूनियां । आपुली काया बहुरूप ॥ ५१ ॥ ईशित्व म्हणिजे सर्वत्र सत्ता । आज्ञा मानिजे सर्वीं तत्त्वता । तरी कारणत्वें तूंचि शास्ता । तुझेनि भूतां वर्तणूक ॥ ५२ ॥ तरी व्यापकत्वें सर्वां ठायीं । सर्वरूपें तूंचि पाहीं । तुजवीण पदार्थमात्र नाहीं । जाणती हृदयीं विपश्चित ॥ ५३ ॥ वशित्व म्हणिजे वश होऊन । इतरीं व्हावें पैं स्वाधीन । तरी भूतां तव तंत्रवर्तन । चेष्टक संपूर्ण तूं त्यांसी ॥ ५४ ॥ एवं स्वतःसिद्ध अष्टविभूति । तुझ्या ठायीं संविन्मूर्ति । तेथ शोभसी अजस्रस्थिति । अमोघकीर्ति परमात्मा ॥ ५५ ॥ इतरां सारिखें परिच्छिन्न । देशकाळादिनियमेंकरून । नव्हे तव ऐश्वर्यमान । अमोघ परिपूर्ण निरंतर ॥ ५६ ॥ आकाश तेथवरी अवकाश । तेंवि परिपूर्णरूप तूं परेश । तत्संबंधें ऐश्वर्य अशेष । अपरिमित निर्दोष सहजोंचि ॥ ५७ ॥ यास्तव अपरिमेयभग । हें आसमंतात् जाणावया योग्य । तुझें ऐश्वर्य नाहीं साङ्ग । तो तूं अव्यंग मायातीत ॥ ५८ ॥ सनंदन म्हणे श्रोतयांस । ऐसा नित्यमुक्त हृषीकेश । जीव अविद्याबंधनीं सक्लेश । कर्मकाण्डास आधिकारी ॥ ५९ ॥ म्हणोनि पूर्वोक्तप्रकारें । सत्प्राप्तिसाधननिकरें । स्वहिताकारणें अति आदरें । जे भगवंतातें भजताती ॥ ११६० ॥ यथोक्त वर्णाश्रमाचरण । करूनि प्रपंचीं विरक्त पूर्ण । होऊनि सत्समागमें निपुण । होइजे विचक्षण विवेकें ॥ ६१ ॥ मग अनन्यभावें सद्गुरुचरण । सेवितां उपजे उपनिषज्ज्ञान । भगवत्तत्व अनुभवे पूर्ण । तैं भजिजे भगवान अभेदें ॥६२॥ साधनसंपन्न विवेकी ऐसे । भगवंतातें भक्तिविशेषें । भजती ते हा भव आपैसे । तत्कृपावशें तरताती ॥६३॥ इतर जे कां भजनविमुख । विषयसेवनपर निःशंक । ते भवीं बुडती हीनविवेक । पावती दुःख

जननादि ॥ ६४ ॥ आणि जे देखोवेखीं घेती जोग । भोगीं पावूनियां उपसर्ग । किंचित् आश्रयिती भगवन्मार्ग । विवेकवैराग्य न होतां ॥ ६५ ॥ जैशा नारी प्रसूतिकाळीं । कीं श्मशानीं माणसें भोळीं । विराग पावती भोगफळीं । पुन्हा विषयशाळी पूर्ववत् ॥ ६६ ॥ तेंवि रजस्तमात्मक अषड्वाळें । कर्में करितां गात्रें विकळें । होतां किंचित् त्रास उजळे । तैं टाकिती सळें बहिःसंग ॥६७॥ प्रतिकूळव्यवसायें होती दुःखी । म्हणती निःसंग असती सुखी । त्याग करिती देखोवेखीं । भ्रष्टती शेखीं उभयत्र ॥६८॥ कीं त्यागिले जे जे भोग । पुन्हा इच्छिती त्यांचा योग । म्हणोनि वान्तभक्षक ते अव्यंग । कामानुराग धरितातीं ॥ ६९ ॥ त्यांसि न होय भगवत्प्राप्ति । ना इहलोकीं सुखावाप्ति । अंतीं कुयोनि पावती । क्लेशी होती एनसें ॥ ११७० ॥ जे जे काम कामी अंतरीं । त्यांतें शोची परोपरी । भोग्य मानूनि वासना धरी । कर्में जन्मे तेथ तेथ ॥ ७१ ॥ इत्यादि श्रुत्यर्थविवरणें । सनंदन श्रोत्यांकारणें । बोले जें विशद बोलणें । सम्यगवधानें तें ऐका ॥ ७२ ॥

यदि न समुद्धरन्ति यतयो हृदि कामजटा दुरधिगमोऽसतां हृदि गतोऽस्मृतकण्ठमणि. ।
असुतृपयोगिनामुभयतोऽप्यसुखं भगवन्ननपगतान्तकादनधिरूढपदाद्भवतः ॥ ३९ ॥

श्रुति म्हणती भो भगवंता । जे कां यति हृदिस्थिता । कामसटा भोगान्विता । बळिष्ठभूता नोत्पाटिती ॥ ७३ ॥ यति म्हणिजे यत्नशीळ । तव प्राप्त्यर्थ जे अळुमाळ । परि अंतरीं काममूळें सबळ । विषयजळ प्राशूनी ॥ ७४ ॥ तीं वासनारूप काममूळें । पूर्वाध्यास ज्यां विशाळ आळें । देहाहंकारभोगजळें । सिंची केवळें निरंतर ॥ ७५ ॥ ऐसीं काममूळें बलिष्ठ । जरी नोत्पाटिती अंतर्निष्ठ । आणि वरि वरी लुञ्चिती शेवट । काम उद्भट तरूचे ॥ ७६ ॥ स्त्रीपुत्रादि स्वजन देखा । किंवा गृहादिवृत्तिप्रमुखा । या बहिःसंगकामशाखा । तोडिती अशेखा बहिर्मुख ॥ ७७ ॥ परि मूळाचेनि सुरवाडें । अनेक उठती जुंबाडें । ऐसा नित्य नूतन वाढे । हें मूर्खा निवाडें उमजेना ॥ ७८ ॥ तरी त्या असतां दुष्टा लागीं । तूं हृदयस्थ गूढलिंगी । अप्राप्त होसी निस्संगसंगी । कीं केवळ विरागी नव्हती ते ॥७९॥ हृदयीं असोनि अप्राप्त म्हणणें । हें कैसें घडेल बोलणें । तरी उमजेल उदाहरणें । कृतव्याख्यानें यथास्थित ॥ ११८० ॥ जैसा विसरें कंठस्थमणी । नाहींच वाटे केवळ मनीं । प्राप्त असोनि अप्राप्तपणीं । असतां लागूनि तद्वत तूं ॥ ८१ ॥ एवं अप्राप्त आत्मा तूं ययांसी । ते प्राण प्रोषिती अहर्निशीं । असुतृपयोगी निश्चयेंसीं । म्हणिजे तयांसी यास्तव ॥ ८२ ॥ असुतृप आणि म्हणणें योगी । हे आख्या नव्हे तयां जोगी । तरी विपरीत नामें वाउगीं । काय नसती जगीं इतरांसीं ॥ ८३ ॥ झाडासि आदित्य म्हणती । पाहतां न सांपडे रातीं । वचनागासि अमृतें ख्याती । सेवितां मरती भक्षक ॥ ८४ ॥ शिल्पिकशास्त्रा नाम ब्रह्मा । कीं त्या अर्हता सृजनकर्मा । अज बोलती बोकडवर्ष्मा । कीं तो अजन्मा म्हणावा ॥ ८५ ॥ राक्षसा संकेत पुण्यजन । देखतां मानावा सज्जन । वज्री करी पदघर्षण । संक्रंदन ते होय ॥ ८६ ॥ पाषाणासी नाम चिरा । मस्तकीं ठेवितां दिसे बरा । अयथार्थ ऐशा तया नरां ।

नामानिर्धारा जाणिजे ॥ ८७ ॥ योगियांचा घेती वेष । धरिती जनीं तदावेश । दंभ दावूनि भाविकांस । ठकिती विशेष कापट्यें ॥ ८८ ॥ विध्युक्त सांडिला परिग्रह । मग मनासि झाले गळग्रह । वाढविती आपुला आग्रह । दुर्बुद्धिसंग्रह करूनी ॥ ८९ ॥ भगवीं करूनि मिरविती । शरीर आपुलें जगविती । गोष्टी सांगूनी झगविती । ज्ञान शिकविती अबळांसी ॥ ११९० ॥ घर सांडूनियां हटें । मठ करूनि राहती मोठें । मेळवूनि शिष्य लोठे । दाविती मोठें प्रस्थान ॥ ९१ ॥ स्वस्त्री उपेक्षूनि आवडी । शिष्यिणी मेळविती धांगडी । धनप्राप्ति पाहोनि सवडी । साधनपरवडी दाखविती ॥ ९२ ॥ लटिकेंचि बैसती ध्यानस्थ । नेणूनि आत्मा हृदयस्थ । मानस चंचळ भोगासक्त । अर्चनीं रत म्हणविती ॥९३॥ वरिवरी दाविती विराग । गुप्त सेविती अनेक भोग । कृत्रिम नेणोनियां तें सोंग । धरूनि अनुराग जन भजती ॥ ९४ ॥ वरदळ देखोनि खटाटोप । भाव धरिती मूर्खकळप । पूजिती मानूनि योगाधिप । उपचार अमूप अर्पिती ॥ ९५ ॥ अन्नें वसनें उत्तमोत्तम । स्रक्चंदन वनितावर्ष्म । तत्सेवनें मानिती शर्म । परि नेणती धर्म आपुला ॥ ९६ ॥ जेथ आपणा नाहीं अधिकार । ते प्रकटिती बहु प्रकार । करिती कीर्तन उत्साहगजर । परि लक्ष समग्र विषयांत ॥ ९७ ॥ ऐसे विषयी वृथापुष्ट । भोग सेविती यथेष्ट । पिण्डपोषक क्रियाभ्रष्ट । ते आत्मघ्न नष्ट जाणावे ॥ ९८ ॥ म्हणाल भगवद्भक्तांचें आचरण । सोपाधिक क्रियावान । तद्वत आचरतां यां दूषण । काय म्हणोन देतसां ॥ ९९ ॥ तरी पतिव्रतेचे शृंगार । कुङ्कुमकज्जलादि प्रकार । पुंश्चळी दाविते अनुकार । परि भिन्न अधिकार उभयांचा ॥१२००॥ साध्वी स्वतनु सालंकृत । करूनि भर्तारा रंजवीत । म्हणोनि इहलोकीं कीर्तिमंत । अपवर्ग निश्चित ते पावे ॥ १ ॥ अनियमें पुंश्चळी नारी । बहुधा स्वतनूसी शृंगारी । काम वांछी नानानरीं । सौख्य शरीरीं लक्षूनी ॥ २ ॥ म्हणोनि उपचार तेचि विपचार । दिसती तयेचे दोषाकार । निंद्य इहलोकीं ते नार । नरक अघोर मग भोगी ॥ ३ ॥ तेंवि भजनोपाधि करून । साधु तोषविती भगवान । अपवर्गेच्छा मनीं धरून । विरक्त होऊन वैषयिकीं ॥ ४ ॥ दाम्भिक जनोपाधि दाविती । जनासि विविधा रंजविती । पूजा तयांची वाञ्छिती । सुख भोगिती ऐन्द्रिय ॥ ५ ॥ असो श्रुति म्हणती श्रीभगवन्ता । त्यांसि दुर्गम तूं हृदयीं असतां । तरी काय इतुकी चि हानि त्या मता । मग विपत्ति होय ते ऐका ॥ ६ ॥ इन्द्रियपोषक कपटयोगी । उभय लोकीं दुःख त्यां लागीं । ते जरी म्हणाल कवणे भंगीं । होय तरी श्रुतिगी अवधारा ॥ ७ ॥ मृत्यु म्हणिजे अज्ञान प्रचुर । अंतकनामें हा संसार । अहंताममतात्मक सविकार । त्रिगुणाकार जो भासे ॥ ८ ॥ तो आत्मबोधेंवीण अनिवृत्त । कीं निरसिला नाहींच निश्चित । यास्तव देहात्मभावें आसक्त । विषयसुखार्थ होताती ॥ ९ ॥ तें विषयसुख साधे धनें । म्हणोनि करिती लोकाराधनें । धनवन्ताचीं मनोधारणें । द्रव्याकारण करिताती ॥ १२१० ॥ मठासि आलिया धनवन्त । त्यांचा आदर करिताती बहुत । आपण उच्चासनीं महंत । ज्ञान वैराग्य बोलती ॥ ११ ॥ शिष्य भोंवते परिचारक । व्यजनचामरच्छत्रधारक । मोरकुंचे ढाळिती एक । ऐसे अनेक परिचरती ॥ १२ ॥ यावा देखोनि हा स्वतंत्र । भजों लागती तावन्मात्र । पूजा करूनि इच्छिती मंत्र । धनिक तत्पर होत्साते ॥ १३ ॥ तंव कांहीं एक करूनि मिस । तीर्थोद्यापन उत्साहदिवस । धन

याचिती श्रीमंतांस । साहित्य अशेष करा म्हणती ॥ १४ ॥ मग ते लोक रजोगुणी । ऐकोनि साभिलाष वाणी । फिरोनि दर्शन न घेती कोण्ही । जाणोनि मनीं दाम्भिकसे ॥ १५ ॥ ज्ञान ध्यान आणि चतुरता । बहुदिवसांची स्नेहवार्ता । हे तेव्हांचि गेली तत्वता । कांहीं दे म्हणतां अभिलाषें ॥ १६ ॥ जे जे करीत होते स्तुति । ते चि निन्दा मुखें वदती । ऐकोनि अंतरीं जळपती । खेद करिती अतिशयें ॥ १७ ॥ मग म्हणती हा गांवचि नष्ट । लोक अभक्त येथील शठ । येथ कां भोगावे वृथा कष्ट । जावें स्पष्ट देशावरा ॥ १८ ॥ बाहेर मेळवूनियां धन । यांच्या उरावरीच आपण । घमंड करूं चालवूं पण । लज्जित हे जन तैं होती ॥ १९ ॥ मग शिष्यां सहित देशान्तर । सेवूनि फिरती दारोदार । म्हणविती दंभें योगेश्वर । नारीनर झकविती ॥ १२२० ॥ सकाम साधनांच्या कोटी । अनेक परमार्थाच्या गोठी । सांगूनि वेधिती जनांच्या थाटी । भजनपरिपाटी प्रकटूनि ॥ २१ ॥ आधीं दावूनि निःपृहता । मस्तकीं हात ठेविती पुरता । मग मागती धन तत्वता । करूनि सत्ता त्यांवरी ॥ २२ ॥ म्हणती शिष्यांसी आपण । तुम्ही काया वाचा मन । अर्पूनि झालेति पूर्ण शरण । तरी धनवंचन करूं नये ॥ २३ ॥ तंव येर करुणा बहु भाकिती । स्वामी द्ररिद्री आम्ही म्हणती । यथाशक्त्या जें अर्पिती । देखूनि कोपती तयां वरी ॥ २४ ॥ मग ते शिष्य ही निर्भिडपणें । बोलती भंडविभंड बोलणें । परस्परें कळवंडतां त्राणें । छीथू होय बहु लोकीं ॥ २५ ॥ ग्रामाधिपति देशाधिपति । जाऊनि भेटती तयांप्रति । आज्ञा देखूनि ते बोलती । योगस्थिति हे काय ॥ २६ ॥ तथापि मुखदाक्षिण्यें देती । रुष्ट होऊनि तेचि घेती । ऐसें बहु क्लेशें धन अर्जिती । फिरूनि येती मठासी ॥ २७ ॥ तंव तें दुर्दशेचें धन । महत्क्लेशें संपादून । भोग भोगूं न शकती पूर्ण । उजगरपणें लोकांत ॥ २८ ॥ मग एकान्तीं करूनि स्थळ । निकट शिष्यिणीशिष्यमेळ । तिहींशीं करिती चकंदळ । भयें विकळ होत्साते ॥ २९ ॥ जैसे जार जारिणी नारी । गुप्त भोगिती परस्परीं । परि दुःख वाहती जिव्हारीं । अहोरात्रीं जनभयें ॥ १२३० ॥ विषयसेवन त्यां क्षणमात्र । परी काळजी अंतरीं अहोरात्र । तद्वत हेही अपवित्र । चिन्तातुर अखंडित ॥ ३१ ॥ भोग-वैभव हें यथेष्ट । क्षणें होईल लोकांत प्रकट । विपरीत मानूनि देतील कष्ट । मग जाईल स्पष्ट प्रतिष्ठा ॥३२॥ म्हणोनि इहलोकीं दुःखस्थिती । पावती कुमति ऐसिये रीती । आतां अमुत्र दुःखावाप्ति । तेही निगुती परिसावी ॥ ३३ ॥ पावले नाहींत ज्याचें पद । ऐसा जो तूं स्वयंबोध । ईश्वर कृतकर्माचा फलद । हृदयस्थ प्रसिद्ध परमात्मा ॥ ३४ ॥ त्या तुज पाप्तनि ही दुःख । पावती निश्चयें बहिर्मुख । तें कां म्हणसी तरी विवेक । तो नावेक कथिजेल ॥ ३५ ॥ ज्यासी निजप्राप्तीचा अभाव । ते अविद्यावंत जीव । तिहीं आश्रमधर्म सावयव । अवश्यमेव आचरिजे ॥ ३६ ॥ अंतरीं अप्राप्त तूं पुरुषोत्तम । आणि अज्ञान विषयत्वें जें परम । प्राप्तवर्णाश्रमीं निजधर्म । त्याचा अतिक्रम करूनियां ॥ ३७ ॥ योगी म्हणवूनि यथेष्टाचरण । कैसें केलें तत्कर्मनिबंधन । ते पावती तव दंड पूर्ण । नरकलक्षण आकल्प ॥३८॥ ऐसें परलोकींही असुख । भोगिती ते हीनविवेक । एवं कामिक यति उभयत्र दुःख । लाहती निष्टंक श्रुति म्हणती ॥ ३९ ॥ तंव एक वितर्कें वदती । हे येथ कैसी वदंती । यतीसी कांहींही कृत्य निश्चिती । नाहींच जाणती विपश्चित ॥ १२४० ॥ सुखदःखोपभोगें करून । प्रारब्धक्षय होय पूर्ण । कीं प्रारब्ध-

भोगेंकरून । नोहेच क्षीण सर्वथा ॥ ४१ ॥ या कारणास्तव त्यां वृथा । निन्दितां पुरे नणतां । उभयत्र असुख हें लावितां । दूषण तत्वता किमर्थ ॥ ४२ ॥ आश्रमधर्माचा परित्याग । हें लक्षिता त्यांचें व्यंग । तरी ऐका श्रुत्यर्थ साङ्ग । संशयभंगकारक हा ॥ ४३ ॥ ब्रह्म जाणे तो ब्राह्मण । तो चिदात्मबोधें परिपूर्ण । स्वसुखानुभवें आनंदघन । निरंतर संविन्मय शान्त ॥ ४४ ॥ हा नित्य महिमा ब्राह्मणाचा । कर्में न वाढे विशेष साचा । ना न लगे बाध उणीवेचा । येणें करूनि कदापिही ॥४५॥ प्रावृट्काळीं जयापरी । नद्या मिसळती पूर्णनीरीं । ग्रीष्मीं आटती परि समुद्रीं । न्यूनाधिक्य दिसेना ॥ ४६ ॥ कीं अमृतीं शर्करा मेळविली । तरी त्या अधिक गोडी आली । नातरी कांहीं न्यून जाहली । हे तेथ बोली न शोभे ॥ ४७ ॥ हाचि श्रुतिवचनें विशदार्थ । सनंदन वक्ता समर्थ । बोले विशुद्ध परमार्थ । तें परिसोत श्रवणार्थी ॥ ४८ ॥

त्वदवगमी न वेत्ति भवदुत्थशुभाशुभयोर्गुणविगुणान्वयांस्तर्हि देहभृतां च गिरः ।
अनुयुगमन्वहं सगुणगीतपरम्परया श्रवणभृतो यतस्त्वमपवर्गगतिर्मनुजैः ॥ ४० ॥

श्रुति म्हणती अगा ये सगुणा । षड्गुणैश्वर्यसंपन्ना । श्रीभगवंता नारायणा । सच्चिद्घना जगदीशा ॥ ४९ ॥ तूं जो सर्वभूतीं अनुस्यूत । उपादानत्वें संतत । त्या तुझें ज्ञान ज्या निश्चित । तो बोलिजे त्वदवगमी ॥ १२५० ॥ ऐसा स्वानुभवें तव ज्ञानवान । अभेद आत्मावबोधें पूर्ण । त्या प्रवृत्तिबोध होय शून्य । तेंचि लक्षण परिसावें ॥ ५१ ॥ तूं कर्मफळाचा दाता । भूतमात्रांचा नियंता । तुज ईश्वरापासूनि तत्वता । आविर्भूत कर्मफळें ॥ ५२ ॥ पूर्वजन्मीं जीं अर्पिलीं । कर्में पुण्यपापाथिलीं । तत्फळभूतें जीं बोलिलीं । सुखदुःखें भलीं अनेकधा ॥ ५३ ॥ तया सुखदुःखांचे संबंध । जरी होताती अगाध । तथापि ज्ञानी केवळ शुद्ध । नेणेचि प्रसिद्ध तयांतें ॥ ५४ ॥ तव स्वरूपानुभवीं निमग्न । देहभावीं उदासीन । म्हणोनि न करीच अनुसंधान । सुखदुःखाख्यसंबंधीं ॥ ५५ ॥ सुखदुःखसंबंध जडती कैसे । तरी इन्द्रियविषयसंयोगवशें । प्रारब्धवशात् देहाध्यासें । तें संक्षिप्तसें कथिजेल ॥ ५६ ॥ मानापमान निन्दा स्तुस्ती । शीतोष्णमृद्वादि स्पर्शोत्पत्ति । सुन्दरभीकररूपप्रतीति । होतां उमटती सुखदुःखें ॥ ५७ ॥ सुरस विरस अन्नें पानें । कीं सुगंध दुर्गंध अवघ्राणें । हें कांहींही ज्ञानी नेणे । पूर्णज्ञानें आथिला ॥५८॥ देहप्रारब्धें अनायासीं । सुखदुःखसंबंध निश्चयेंसीं । इत्यादि होती परी तयासी । न कळे विशेषीं स्वानुभवीं ॥ ५९ ॥ अंतःकरणादि वृत्ति परम । अधिष्ठिती इन्द्रियग्राम । तैं देहाध्यासें विषयभ्रम । होय निस्सीम प्रत्यक्ष ॥ १२६० ॥ त्या वृत्ति झालिया स्वरूपीं लीन । कोण सांभाळी इंद्रियगण । तेव्हा बाह्य विपरीत ज्ञान । सहज संपूर्ण मावळलें ॥ ६१ ॥ यास्तव ज्ञानी द्वंद्वरहित । न होय सुखदुःखें मोहित । आत्मानुचिन्तनें संतत । अक्षय आनंद भोगीतसे ॥ ६२ ॥ जरी अदृष्टें भद्रासनीं । महत्त्वें बैसविला ज्ञानी । तरी तेथींचेनि श्लाघा न मनी । कीं रंकपणीं नाभिभवे ॥ ६३ ॥ अथवा ईश्वर मानूनि स्तविला । किंवा निंद्यत्वें निखंदिला । तोषरोषा न पवे भला । कीं अभेद बाणला

प्रत्यय ॥ ६४ ॥ प्रारब्धें नानाविलास । सहज प्राप्त झाले विशेष । कीं वरपडला त्रितापास । तरी सुखदुःखास नाठवी ॥ ६५ ॥ देहतादात्म्य गोलियावरी । द्वंद्वभावना निरसली पुरी । चित्सुख पावला अंतरीं । अक्षय निर्धारीं पूर्णत्वें ॥ ६६ ॥ जेंवि अमृत प्राशूनि धाला । तो षड्रसां न स्मरे वहिला । तत्प्राप्ती स्तव तोषला । कीं न होतां दुखावला हें न घडे ॥६७॥ कामधेनु जयासि प्राप्त । तो कैं अजेसि आठवीत । मा लाभालाभीं तयेच्या होत । खेदमोदमय हृदयीं ॥ ६८ ॥ असो श्रुति म्हणती भगवंता । ऐसा तव रूपाभिज्ञ तत्वता । निःशेष नेणे प्रारब्धजनिता । सहज प्राप्ता सुखदुःखां ॥ ६९ ॥ तरी देहाभिमानी जे नर । नेणती आत्मा परात्पर । तयांच्या वाणी ज्या सधर । संसारपर साकांक्ष ॥१२७०॥ त्या प्रवृत्तिनिवृत्तिकारका । केवळ विधिनिषेधात्मका । विगतदेहाभिमानें नटका । नेणे अशेखा कदापि तो ॥ ७१ ॥ अमुकें बोलावें न बोलावें । अमुकें करावें न करावें । कमुकें स्पर्शावें न स्पर्शावें । कीं न देखावें देखावें ॥ ७२ ॥ अमुकें भक्षावें न भक्षावें । अमुकें त्यागावें अवश्य घ्यावें । ऐसे विधिनिषेध बरवे । वदती सत्यत्वें देहभृत ॥ ७३ ॥ या सुकृतदुष्कृतजनका वाणी । सुखदुःखें फळती निदानीं । ज्ञानी नेणे चि निपटूनी । देहाभिभान गेलिया ॥ ७४ ॥ जेव्हां देहाभिमानाचा विलय । शुद्ध बाणला आत्मप्रत्यय । सबाह्य कोंदलें चिन्मय । नाठवे कार्य कांहीं ही ॥ ७५ ॥ जेंवि पेटिके वरी खंडेराय । जवळी म्हाळसा सारमेय । पूजकातें स्पर्शसंशय । कळतां स्वर्णमय न होय कीं ॥ ७६ ॥ व्याघ्रसिंहादि वाताशक । कामधेनु अश्व अनेक । चित्रींव भिंती वरी सम्यक । देखतां भय तोख न उपजे ॥ ७७ ॥ कारणत्वें आघवी भिंती । भासते मृषा भासती । तेंवि ज्ञातया जगत्प्रतीती । नाहीं च निश्चिती ब्रह्मत्वें ॥ ७८ ॥ वस्तु अद्वितीयकारण । मिथ्या विवर्तप्रपंचभान । तें वास्तवबोधें उडालें पूर्ण । विधिनिषेध म्हणोन अनोळख ॥ ७९ ॥ एवं हाचि इत्यर्थ येथ । विधिनिषेधी सज्ज न होत । जगद्बोधाभाव निश्चित । त्या जाला संतत तव बोधें ॥ १२८० ॥ ऐसें ज्ञात्यांचें लक्षण । जे सबाह्य विकारहीन । हें त्यांसी युक्त चि पूर्ण । येथ विलक्षण कोण म्हणे ॥ ८१ ॥ ज्या कारणा स्तव जिंहीं मनुजीं । तव प्राप्तिसाधक विवेकपुंजीं । अनुदिनीं श्रवणें करूनि सहजीं । चित्ता माजि तूं धरिलासी ॥८२॥ तयासी मोक्षरूपा गाति । तूं निश्चयें होसी जगत्पति । जरी म्हणसी ते कवणे रीति । श्रवणें चित्तीं मज धरिती ॥ ८३ ॥ तरी युगानुयुगीं जे परंपरा । ब्रह्मनिष्ठाची ज्ञानपरा । उपदेशसंतति ते निरंतरा । शिष्योपशिष्यीं विस्तृत ॥ ८४ ॥ तो संतांचा संप्रदाय । जेणें सम्यक ज्ञान होय । तदनुसार साधनोपाय । करूनि प्रत्यय अवगमिती ॥ ८५ ॥ अनन्यभावें सद्गुरू शरण । होऊनि इच्छिती तत्वज्ञान । तैं परंपरागत उपलभ्यमान । देशिक आपण उपदेशी ॥ ८६ ॥ तें देशिकोपदेशें निजसार । तव रूप केवळ परात्पर । श्रवण करूनि अति तत्पर । चित्तीं सादर धरिताती ॥ ८७ ॥ तत्वमस्यादि महा वाक्यां वरून । आपण अभेद तुजसीं पूर्ण । जाणोनि टाकिती देहाभिमान । तव चिन्तन दृढ करिती ॥ ८८ ॥ एवं सत्संप्रदायें श्रवणभृत । अपवर्गगति तूं इत्थंभूत । त्यांसी होसी हें निश्चित । असे युक्त यथार्थ पैं ॥ ८९ ॥ इतुक्या कथनाचा इत्यर्थ । हाचि येथ यथातथ्य । कीं तत्वज्ञानी जे यथार्थ । त्यां नाहीं किंचित दैहिक हें ॥ १२९० ॥ दैहिक जो हा कर्माधिकार । याची शंका ही किंचिन्मात्र । न वर्ते त्यांसि

कीं प्रबोध प्रचुर । सबाह्य अंतर जयांचें ॥ ९१ ॥ हें आश्चर्य नव्हे कीं फार । जे सगुण तव भक्तितत्पर । तव कथाश्रवणादि निष्ठासार । धरिती निरंतर मानसीं ॥ ९२ ॥ तव पदाची ज्यां जवळिक । सप्रेमयोगें जे निःशंक । त्यांसी ही विधिनिषेध बाधक । न होती निष्टंक कदापि हे ॥ ९३ ॥ मा वास्तव बोधें संकल्परहित । त्यां कें विधिनिषेध बाधित । जेंवि स्वप्नींचें विविधा आचरित । झालिया जागृत मृषा गमे ॥ ९४ ॥ श्रोते शंका करिती येथ । संत विशेषें स्वधर्मपथ । आचरत असतां येथ हें उक्त । हा निश्चितार्थ केंवि असे ॥ ९५ ॥ तरी ऐका जी सुनिश्चित । संतांच्या दोनी कोटी येथ । संप्रज्ञात असंप्रज्ञात । हे उभयता मुक्त सम जाणा ॥ ९६ ॥ त्यां माजी केवळ कल्पनातीत । परमहंसदीक्षामंत । ते जाणावे असंप्रज्ञात । विधिनिषेधबोध त्यां नाहीं ॥ ९७ ॥ आणि संप्रज्ञात समाधिस्थ । केवळ लोकसंग्रहार्थ । कामनाशून्य अभिमानरहित । आचरती संतत सहजस्थिति ॥ ९८ ॥ जना कारणें तदनुकार । करूनि दाविती बाह्याकार । अंतरीं निःशंक आत्माकार । वृत्ति निरंतर जयांच्या ॥ ९९ ॥ हे त्यांहूनि महंत अधिक । जगदुद्धारी जे सम्यक । सदाचरणें शिक्षिती लोक । प्रबोधें तारक जडजीवां ॥ १३०० ॥ यद्यदाचरति श्रेष्ठः । तदनुसार इतर स्पष्ट । परि अंतरीं विधिनिषेध पोचट । जाणती चोखट आत्मज्ञान ॥ १ ॥ आणि इतर जे कपटयोगी । केवळ अज्ञान भोगानुरागी । ते इहामुत्रीं दुःखभोगी । होती सोंगी उभयभ्रष्ट ॥ २ ॥ ऐसा येथींचा इत्यर्थ । वदूनि वक्ता समर्थ । आशंकोनि पुन्हा बोलत । तें सुनिश्चित परिसिजे ॥ ३ ॥ म्हणे त्वदवगमी न जाणे । सुखदुःखाख्य लक्षणें । आणि विधिनिषेधा कारणें । हें बोलणें विस्तारिलें ॥ ४ ॥ तरी वितर्कें पाहतां तेथ । तत्व जाणावया इत्थंभूत । केंवि शक्य न कळे मात । दुरवगमत्व कथिलेंसे ॥ ५ ॥ यास्तव हें सत्यचि विचारितां । जें अनवगाह्यमहिम्न तत्वता । जयाची वाङ्मना अगोचरता । अविषयें पाहतां तज्ज्ञान ॥ ६ ॥ म्हणिजे साक्षित्वें परिच्छिन्न । जाणिजे तें विषयत्वें ज्ञान । तैसें नोहे हें अभेद पूर्ण । जाणणें ग्रासून सन्मात्र ॥ ७ ॥ ऐसें दर्शवीत होत्साता । श्रुतिसंमत जाला बोलता । जें याज्ञवाल्क्य तत्वता । प्रबोधी वनिता ब्रह्मिष्ठा ॥ ८ ॥ अवो ये गार्गि तत्व तें जाण । जें ऊर्ध्व असे स्वर्गाहून । पृथ्वीहून खालें सघन । हे द्यावाभूमी ज्या माजी ॥ ९ ॥ जे होवोनि गेले होत । होणार ते ज्या माजी निश्चित । इत्यादि श्रुतिप्रतिपादित । अपरिमित महिमान प्रतिपादी ॥ १३१० ॥ तें सनंदनोक्त भाषण । विशद श्रुतीचें स्तवन । प्रबोधी नारदा नारायण । शुकभगवान म्हणे नृपा ॥ ११ ॥

द्युपतय एव ते न ययुरन्तमनन्ततया त्वमपि यदन्तराण्डनिचया ननु सावरणाः ।
ख इव रजांसि वान्ति वयसा सह यच्छ्रुतयस्त्वयि हि फलन्त्यतन्निरसनेन भवन्निधनाः ॥ ४१ ॥

श्रुति म्हणती भो भगवंता । स्वर्गादिलोकपति जे तत्वता । न पावतीच तुझिया अंता । ब्रह्मादिक ही अतिवेत्ते ॥ १२ ॥ कां म्हणोनि म्हणसी जरी । तरी जे अंतवंत वस्तु पुरी । ते कांहीं ही नव्हसी निर्धारीं । नेणिजे सुरवरीं यास्तव कीं ॥ १३ ॥ असो नेणती ब्रह्मादि द्युपति । परंतु

आपुला शेवट निश्चिती । तूं ही नेणसी सर्वज्ञमूर्ति । हें आश्चर्य किती मानावें ॥ १४ ॥ जरी म्हणसी येणें अज्ञता । मज प्राप्त झाली कीं सर्वथा । तरी सर्वज्ञता सर्वशक्तिता । कैंची तत्वता मज लागीं ॥१५॥ म्हणोनि अनंत या पदेंकरून । अर्थ ऐसा प्रतीयमान । अंत नाहीं तुज लागून । मां कोठून जाणावा ॥१६॥ शशविषाण कळलें नाहीं । खपुष्प पाहिलें नसे कांहीं । मृगजळस्वादुत्व न गमे हृदयीं । म्हणोनि कांहीं मूर्खत्व ॥ १७ ॥ याचे न कळणें सर्वज्ञता । अथवा अप्राप्ति सर्वशक्तिता । बाधित करी हे वक्तृता । अनृत सर्वथा नास्तिक्यें ॥ १८ ॥ नाहीं जें त्या जाणिजे काय । अथवा कधीं तें पाविजताहे । म्हणोनि अनंत तूं निश्चयें । केवळ अद्वय परमात्मा ॥ १९ ॥ तें अनंतत्व कवणेपरी । हें ही निश्चयें अवधारीं । आश्चर्य वाटतसे निर्धारीं । केवढी थोरी तव रूपीं ॥ १३२० ॥ उत्तरोत्तर दशगुणाधिक । ज्यांसी आवरणें महदादिक । ते ब्रह्माण्डनिचय सम्यक । फिरती अनेक तुजमाजी ॥ २१ ॥ काळचक्रें ब्रह्मांड-गोळ । गणनारहित एकवेळ । परिभ्रमती अतिविशाळ । परि पर्यायें केवळ नाहीं कीं ॥ २२ ॥ एक ब्रह्माण्ड काळानुसार । होऊनि गेलियानंतर । मग परिभ्रमे ब्रह्माण्ड अपर । ऐसा प्रकार नसे हा ॥ २३ ॥ एकदाचि अवघीं फिरती । तुजमाजी भो ब्रह्माण्डपति । जेंवि आकाशीं रज जे रीती । समीरें फिरती समुच्चयें ॥ २४ ॥ ज्यास्तव ऐसें अनंतत्व । म्हणोनि श्रुति स्वयमेव । तुझ्या ठायीं फळती सर्व । तव रूपभाव पावूनी ॥ २५ ॥ फळती म्हणिजे तात्पर्यवृत्ती । करूनि अभिप्रायें सूचिती । अनुभवें समाप्त होती । परी साक्षात न वदती ऐसा हा ॥ २६ ॥ कीं सगुणाचे गुण अनंत । निर्गुण तो अगोचर निश्चित । यास्तव न वदवे यथास्थित । वचनें विशद श्रुतीसी ॥ २७ ॥ तरी अपदार्थी तात्पर्य कैसें । घडे म्हणाल जरी विशेषें । कीं पदार्थत्वचि मुळीं नसे । कें तात्पर्यवशें श्रुति फळती ॥ २८ ॥ तरी पदार्थासी च आहे विशद । वाक्यार्थत्व हें प्रसिद्ध । परि तीं वाक्येंही असती द्विविध । विधिमुखें आणि निषेधमुखें ॥ २९ ॥ त्यां माजि विधिमुखवाक्यीं केवळ । नियम हा घडेल सबळ । परि निषेधमुखीं निखळ । न घडे प्राञ्जळ एकविध ॥ १३३० ॥ अपदार्थी ही तात्पर्य । निषेधमुखांचें पूर्ण होय । म्हणाल हे द्विविधवाक्यसोय । कैसी काय तरी अवधारा ॥ ३१ ॥ निषेधवर्जित प्रवृत्ति-कारक । जेंवि हा घट हा पट हें हाटक । हें जळ ही भू हा पावक । इत्यादि वाक्यसंकेत ॥ ३२ ॥ यांसि विधिमुख म्हणावें सहज । इहीं वाच्य तो द्रव्यपुंज । त्यासी वाक्यार्थत्व हे पैज । पडे उमज विचारें ॥ ३३ ॥ ज्या ज्या पदार्थी जैसीं वाक्यें । असती तद्रूपा सूचकें । तीं तीं तैसीच बळिष्ठ अनेकें । विधिविवेकें अनादि ॥ ३४ ॥ हा घट ऐसें बोलतां वचन । अर्थ उमजे कंबुग्रीवमान । कीं हें जल वदतां होय ज्ञान । द्रवशीळ पूर्ण रसरूप ॥ ३५ ॥ एवं विधिमुखवाक्यांचें तात्पर्य । पदार्थींच घडे यथान्वय । अपदार्थी यांची सोय । सहसा न होय प्रबोधक ॥ ३६ ॥ आणि नकारादि निषेध । पूर्वक जीं वाक्यें विशद । तीं निषेधमुखें प्रसिद्ध । जाणिजे शुद्ध विवरणें ॥ ३७ ॥ न तद्भूमि न तत्तोय । न कृष्ण न श्वेत होय । इत्यादि वाक्यांचें तात्पर्य । घडे निःसंशय अपदार्थी ॥ ३८ ॥ म्हणोनि निषेधमुखवाक्यीं नियम । तो सहसा नाहींच निस्सीम । उपाधि निरसनियां अधम । राहिलें उत्तम तें वस्तु ॥ ३९ ॥ आतां हाचि अर्थ सुनिश्चित । अतन्निरसनेन या पदें व्यक्त । जाणती केवळ धीमंत । ऐका श्रुत्यर्थ अन्वयें

॥ १३४० ॥ अतन्निरसन म्हणिजे काय । तरी जें जें कांहीं दृश्य होय । तें तें निरसिजे विकारमय । मग अनुभवें अवाच्य अवगमिजे ॥ ४१ ॥ तें कळण्याहूनि अन्यंत । न कळण्याहूनि ही निश्चित । कीं कळे तें तें नाशवंत । न कळे तें बाधित शून्यत्वें ॥४२॥ आणि धर्माहूनि तें अन्यत्र । अधर्माहूनि जें स्वतंत्र । धर्माधर्म ते गुणविकार । निर्गुण चिन्मात्र अद्वैत ॥ ४३ ॥ आणि कृताकृताहूनि भिन्न । कृत तें मायिक साधारण । अकृत मोक्ष निश्चयें करून । तो बंध सापेक्ष केवळ ॥ ४४ ॥ अस्थूळ अनणु निश्चयें । म्हणिजे स्थूळ सूक्ष्म जें नोहे । सूक्ष्मत्वें अणूमाजी ही आहे । आणि गगनादि समाये ज्यामाजी ॥ ४५ ॥ ऐसीं निषेधमुखवाक्यें । इत्यादि प्रकारें अनेकें । तिहीं तात्पर्य वृत्तिविवेकें । खुणेनें नेटकें श्रुति कथिती ॥ ४६ ॥ तत्त्वमसि अयमात्मा ब्रह्म । इत्यादि विधिमुखवाक्यें हा नियम । याचें लक्षणावृत्तीनें परम । होय पर्यवसान परब्रह्मीं ॥ ४७ ॥ शाखे वरूनि चंद्रीं लक्ष । कीं वृक्षा वरूनि मार्ग प्रत्यक्ष । तेविं तत्त्वमस्यादि श्रुति अशेष । ज्या वर्तती निःशेष तत्पर ॥ ४८ ॥ त्या लक्षणावृत्ती करून । समाप्ति पावती आपण । परि वाच्यत्वें हें ऐसें म्हणोन । तत्व निर्गुण न जाणविती ॥ ४९ ॥ अथवा इदन्न इत्यादि निषेधीं । केवळ शून्यचि न बोधिती कधीं । या स्तव भवनिधना ऐशी शाब्दी । स्वरूपावधि पावलिया ॥ १३५० ॥ म्हणिजे तुझ्या ठायीं समाप्ति ज्यांची । अतन्निरसनें करूनि साची । कीं निरवधिनिषेधाची । संभूति कैंची सर्वथा ॥ ५१ ॥ यास्तव अवधिभूत तूं परमात्मा । त्या तुझ्या ठायीं सर्वोत्तमा । श्रुति फळती जाणोनि सीमा । हा इत्यर्थ सुगम येथींचा ॥ ५२ ॥ येचि विषयीं निदर्शन । दाविजेल साधारण । जेणें तात्पर्यलक्षण । उमजे संपूर्ण निःशब्द ॥ ५३ ॥ जेंवि का पुरुषसुखावाप्ति । झालिया उषेसि सरल्या पुसती । कवण तव भर्ता आम्हां कथीं । परि कळोनि निश्चिती न वदवे ॥ ५४ ॥ तंव ते चित्रलेखा सुजाण । चित्रानि दाविलें त्रिभुवन । पृथकत्वें पुसे आपण । पुरुषरत्न त्या माजी ॥ ५५ ॥ ते जो जो दावी खुणावोनि । येरी निषेधी ना म्हणोनी । शेवटीं अनिरूद्धमूर्ति देखोनी । झाली लाजोनी अधोमुखी ॥ ५६ ॥ जेथ कुंठित झाली निजवाणी । सखीस जाणवलें आपुले मनीं । हाचि इचा भर्ता म्हणोनी । कथिलें न कथूनि उषेनें ॥ ५७ ॥ निषेधासी अवधिभूत । अनिरुद्ध झाला मूर्तिमंत । निषेधवाणी सफळित । झाली जेथ प्रत्ययें ॥ ५८ ॥ तेंवि श्रुतींहीं परमपद । पृथ्व्यादिमायानिषेध । करूनि दर्शविलें निःशब्द । होऊनि विशद तदवधि ॥ ५९ ॥ पावोनि निजात्मस्वरूप । श्रुति होती विगतजल्प । व्यतिरेकवाणीचा आटोप । निर्विकल्प अनुभवें ॥ १३६० ॥ ऐसें सनंदनोक्त श्रुतिव्याख्यान । नारदाप्रति श्रीनारायण । षड्गुणैश्वर्यसंपन्न । कथूनि आपण बोलतसे ॥ ६१ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥ इत्येतद्ब्रह्मणः पुत्रा आश्रुत्याऽऽत्मानुशासनम् ॥
सनन्दनमथाऽनर्चुः सिद्धा ज्ञात्वाऽऽत्मनो गतिम् ॥ ४२ ॥

म्हणे इतुकें हें निरूपण । तें सिद्ध विरिंचिनंदन । ऐकूनि आत्मानुशासन । जें अनुग्रहेंकरून पारमार्थिक ॥ ६२ ॥ केवळ आपुलें प्राप्तिस्थान । जें परमगति आदिकारण । जाणोनि अनुभवसंपन्न ।

पूर्णज्ञान अभिवेत्ते ॥ ६३ ॥ मग जयाच्या मुखीं श्रुतिसिद्धान्त । श्रवण केला इत्थंभूत । त्या सनंदन-ऋषीनें समस्त । पूजिते झाले गुरुत्वें ॥ ६४ ॥ म्हणती धन्य धन्य सनंदना । आत्मावबोधपरिपूर्णा । तव प्रसादें निजगुह्यखुणा । हृद्गतनिधाना पावलों ॥ ६५ ॥ नारदा प्रति ऋषिसमर्थ । जो श्रीनारायण साक्षात । ऐसें कथूनियां तद्वृत्त । बोले इत्यर्थ तो ऐका ॥ ६६ ॥

इत्यशेषसमाम्नायपुराणोपनिषद्रसः । समुद्धृतः पूर्वजातैर्व्योमयानैर्महात्मभिः ॥ ४३ ॥

जे सृष्टीहूनि पूर्वी झाले । विधिमना पासूनि जन्मले । अंतरिक्षगामी भले । म्हणोनि विशेषिले व्योमयान ॥ ६७ ॥ कीं व्योमचि ज्यांचे वहन । ऐसे महात्मे विधिनंदन । सनकादि ब्रह्मनिष्ठ पूर्ण । ज्यां सहज ज्ञान उपलब्ध ॥ ६८ ॥ तिहीं या प्रकारें संपूर्ण वेद । पुराणें आणि उपनिषद । यांचा सारांशरस हा शुद्ध । सम्यक् प्रसिद्ध काढिला ॥ ६९ ॥

त्वं चैतद्ब्रह्मदायाद श्रद्धयाऽऽत्मानुशासनम् । धारयंश्चर गां कामं कामानां भर्जन नृणाम् ॥ ४४ ॥

तूं ही हें रहस्य देवर्षि । सारवाङ्मयीं अशेषीं । विभागा परि हन्मंजुषीं । ठेवीं कीं होसी तद्बंधु ॥ १३७० ॥ केवळ ब्रह्मचि दाया परी । अप्रयत्नलब्ध या प्रकारीं । सेवीं अनुभवें अंतरीं । जैसे निर्धारीं सनकादिक ॥ ७१ ॥ यास्तव नारदा नारायण । ब्रह्मदायाद संबोधन । बोलिला अथवा साधारण । अर्थविवरण दूसरें ॥ ७२ ॥ कीं अगा ये ब्रह्मनंदना । श्रद्धे करूनि या अनुकरणा । ऐकिल्या आत्मानुशासना । सद्गतिकारणा निश्चयें ॥ ७३ ॥ धरित होत्साता अंतरीं । स्वेच्छा विचरें अवनी वरी । प्रबोधें जडजीवां उद्धरीं । कीं कामासि संहरी रहस्य हें ॥ ७४ ॥ जेंवि दक्तिमिरा चंडप्रभ । एनसभारा जाह्नवीअंभ । तेंवि हृद्गत नरांचे कामकोंभ । जाळी स्वयंभ अवगमतां ॥ ७५ ॥ शुक म्हणे गा परीक्षिती । सार्वभौम तूं श्रवणक्षिती । ऐसा शब्दीं सुशिक्षितीं । बोलिला ज्या प्रति नारायण ॥ ७६ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ एवं स ऋषिणादिष्टं गृहीत्वा श्रद्धयात्मवान् । पूर्णः श्रुतधरो राजन्नाह वीरव्रतो मुनिः ॥४५॥

या वरी तो देवर्षि नारद । जें नारायणें तत्व विशद । उपदेशिलें परम शुद्ध । केवळ अगाध सुखरूप ॥ ७७ ॥ तें सविश्वासें अंतःकरणीं । घेऊनियां अनुभवें मुनी । आत्मसाक्षात्कारें ज्ञानी । झाला पूर्णपणीं कृतकृत्य ॥ ७८ ॥ कीं ऐकिला अर्थ सविवेक । हृदयीं धरिला निष्टंक । म्हणोनि जो श्रुतधर नैष्ठिक । बोलता झाला सप्रेम ॥ ७९ ॥ तो नमनात्मक नारदोक्त । नारायणस्तव निश्चित । ऐकें परीक्षिति दत्तचित्त । म्हणे महंत शुकमुनि ॥ १३८० ॥

॥ नारद उवाच ॥ नमस्तस्मै भगवते कृष्णायामलकीर्तये । यो धत्ते सर्वभूतानामभवायोशतीः कलाः ॥ ४६ ॥

यश लक्ष्मी आणि औदार्य । ज्ञान वैराग्य आणि ऐश्वर्य । हे साही अक्षय गुणवर्य । असती सकार्य जयातें ॥ ८१ ॥ त्या भगवंता कृष्णा कारणें । नमन माझें अनन्यपणें । ज्याचे अमळकीर्ति-श्रवणपठनें । दोषां क्षाळणें जगाचिया ॥ ८२ ॥ जेंवि कृशानीं इन्धनें समळ । घालितां निरंतर पुष्कळ । त्यांसि जाळूनि स्वयें निर्मळ । तेंवि कीर्ति प्राज्जळ जयाची ॥ ८३ ॥ म्हणसी नारायणा नामितां येथ । वदला कृष्णनामसंकेत । तरी ऐकें येथींचा भावार्थ । जो असे निश्चित वास्तव ॥ ८४ ॥ कृष शब्द हा भूसत्तावाचक । नकार आनंदप्रतिपादक । एवं सदानंदरूपी निष्टंक । परब्रह्म सम्यक श्रीकृष्ण ॥ ८५ ॥ नारायणादि जे अवतार । ते जयाचे अंश पर । तो पूर्ण हें वदे पुराणनिकर । जें कृष्णस्तुभगवान्स्वयम् ॥ ८६ ॥ सर्वभूतांच्या अभवास्तव । नाना रूपें धरी वास्तव । हाचि स्पष्ट अभिप्राव । ऐका स्वयमेव विवरणें ॥ ८७ ॥ अविद्यायोगें जीव नाना । वरपडे जाले जन्ममरणा । पावूनि त्रिगुणात्मकबंधना । क्लेशें यातना भोगिती ॥ ८८ ॥ तयांचिये दुःखनिवृत्ति । चतुर्विधपुरुषार्थांची प्राप्ति । यांसी करावया करुणामूर्ति । जो धरी व्यक्ति सुन्दर ॥ ८९ ॥ जयाच्या दर्शनें चिन्तनें ध्यानें । स्मरणें गुणकीर्तिवर्णनें । मोक्षावाप्ति जीवां कारणें । ऐसें करणें जयाचें ॥ १३९० ॥ तो श्रीकृष्ण पूर्णब्रह्म । अवतारांचें मूळधाम । योगियांचा निष्काम काम । अभिन्न परम सर्वात्मा ॥ ९१ ॥ तया कृष्णावतारते करून । नारायणातें करी नमन । ज्यास्तव झाला प्रबोधनिपुण । सच्चिद्घन पूर्णत्वें ॥ ९२ ॥

इत्याद्यमृषिमानम्य तच्छिष्यांश्च महामनः । ततोऽगादाश्रमं साक्षात्पितुर्द्वैपायनस्य मे ॥ ४७ ॥

या कारणें तो आद्यऋषी । नारायणाख्य भक्तिविशेषीं । नमस्कारूनि नम्रशीर्षीं । जो अनेकशिष्यीं परिवृत ॥९३॥ तयां शिष्यांसि ही अभिवंदन । महामना नारद जाण । जयाचें मन ब्रह्मसंपन्न । महद्विशेषण यास्तव त्या ॥ ९४ ॥ ऐसा नारदमुनि महामन । त्या नंतरें तदाज्ञा घेऊन । साक्षात् मम पिता द्वैपायन । सत्यवतीनंदन श्रीव्यास ॥९५॥ तयाचिया आश्रमा प्रति । जाता झाला सहजस्थिति । स्मरत होत्साता आपुले चित्तीं । नारायणोक्ति यथा श्रुत ॥९६॥ येथ बोलिला शुक आपण । कीं साक्षात मम पिता द्वैपायन । हें ऐकोनि शंकायमान । श्रोते विचक्षण जरी होती ॥ ९७ ॥ सापत्नविकल्पास्तव माता । वदिजे साक्षाच्छब्दें तत्वता । परंतु पितयासी ऐसें सर्वथा । गमे कथितां विपरीत ॥ ९८ ॥ तरी साक्षात्पदें करूनि अर्थ । जैसा बोलती विपश्चित । तो कथिजेल यथास्थित । श्रीधरोक्तव्याख्यानें ॥ ९९ ॥ कोणे एके समयीं व्यास । करीत असतां अग्निमथनास । अरणीं माजी कांहीं रेतांश । पडिला तयास निर्मथिलें ॥ १४०० ॥ तेथ तत्काळचि श्रीशुक । उत्पन्न झाला निष्टंक । योनिव्यवधाना रहित सम्यक । म्हणोनि साक्षाज्जनक व्यासची ॥ १ ॥ इतरांची जैसी उत्पत्ति । पितृरेत मातृयोनी प्रति । पडतां मिळे तच्छोणितीं । मग धातुमिश्रितीं पिण्ड घडे ॥ २ ॥ तो नवमास मातृजठरीं । सावयव पक्व जालिया वरी । जनन पावतसे निर्धारीं । म्हणोनि उभयजन्यत्व तयासी ॥ ३ ॥ तैसा नोहे शुकप्रकार । केवळ पितृरेतेंचि पवित्र । अरणीं पाखानि जाला स्वतंत्र । या स्तव अरणिपुत्रवदंती ॥ ४ ॥ या अर्थें साक्षात

मम पिता । श्रीशुक बोलिला तत्वता । या वरी ऐका तदुक्त वार्ता । जे नृपासि आतां बोलतसे ॥ ५ ॥ म्हणे अगा ये परीक्षिति । नारद मत्पित्राश्रमा प्रति । गेलिया तेणें जया रीती । सोपस्करिला तें ऐक ॥ ६ ॥

सभाजितो भगवता कृतासनपरिग्रहः । तस्मै तद्वर्णयामास नारायणमुखाच्छ्रुतम् ॥ ४८ ॥

षड्गुणैश्वर्यसंपन्न । केवळ भगवान द्वैपायन । जेणें नारदा देखोन । अभ्युत्थान दीधलें ॥ ७ ॥ पवित्रासनीं बैसविला । स्वागतप्रश्नें तोषविला । गुरुत्वें यथोक्त पूजिला । अभिवंदिला सद्भावें ॥ ८ ॥ मग तो देवर्षि अतिसंतुष्ट । त्या व्यासा कारणें परम श्रेष्ठ । कथिता झाला जें ऐकिलें स्पष्ट । नारायणाच्या मुखाहूनी ॥ ९ ॥ तें पित्या पाद्मनि सहजें सहज । श्रुत झालें यथार्थ मज । जें हें इतुकें कथिलें तुज । तव प्रश्नपैज देखोनी ॥ १४१० ॥

इत्येतद्वर्णितं राजन्यन्नः प्रश्नः कृतस्त्वया । यथा ब्रह्मण्यनिर्देश्ये निर्गुणेऽपि मनश्चरेत् ॥ ४९ ॥

जैसा प्रश्न तां परीक्षिति । आशंकोनि केला मज प्रति । कीं साक्षान्निर्गुणीं ब्रह्मीं श्रुति । कवणे रीति प्रवर्तती ॥ ११ ॥ तें यथातथ्य निरूपण । अनिर्देश्य ब्रह्म निर्गुण । तेथ प्रवर्ते जैसें मन । तें श्रुतिव्याख्यान तुज कथिलें ॥ १२ ॥ मनाचिया उपलक्षणें । वृत्तिरूप श्रुति जाणणें । यांचें जेंवि प्रवर्तणें । ब्रह्मीं होय तें निरूपिलें ॥ १३ ॥ असो आतां इतुक्यावरी । तव शंकेची शर्वरी । न दिसे कीं प्रबोधतमारी । उदेला अंतरीं हृद्गगनीं ॥ १४ ॥ ऐसें बोलोनि मुनिपुङ्गव । तथापि दृढीकरणास्तव । फळितार्थ वेदस्तुतीचा सर्व । संक्षेपें वास्तव नृपा कथी ॥ १५ ॥ तो अभिप्राय यथामति । वाखाणिजेल व्याख्यानरीती । भाविक साकांक्ष आत्महितीं । तिंहीं सादर श्रवणार्थी असावें ॥ १६ ॥

योऽस्योत्प्रेक्षक आदिमध्यनिधने योऽव्यक्तजीवेश्वरो यः सृष्ट्वेदमनुप्रविश्य ऋषिणा चक्रे पुरः शास्ति ताः ।
यं सम्पद्य जहात्यजामनुशयी सुप्तः कुलायं यथा तं कैवल्यनिरस्तयोनिमभयं ध्यायेदजस्रं हरिम् ॥ ५० ॥

जो या विश्वाचा उत्प्रेक्षक । म्हणिजे कल्याणपाहता सम्यक । तो कैसा तरी विविच्यविवेक । ऐका अशेख कथिजेल ॥ १७ ॥ महाप्रळयीं संपूर्ण जग । अव्यक्तीं लीन झालिया साङ्ग । पुन्हा प्रळयावसानीं सर्वग । पाहे मोघ अनुशयी ॥ १८ ॥ अनुशयी म्हणिजे अविद्येमाजी । निद्रित झाली जीवराजी । त्या चतुर्विधपुरुषार्थसिद्धिकाजीं । सृष्टिस्थितिप्रळयादि पावविजे ॥१९॥ धर्म अर्थ काम मोक्ष । चतुर्विधपुरुषार्थ अशेष । सृष्टिस्थितिप्रळय सापेक्ष । न होती प्रत्यक्ष यां वीण ॥ १४२० ॥ येथील स्पष्ट अभिप्राय । कीं जीवांसि देऊनियां देह । प्रतिपाळावे यथावय । शेवटीं विलय करावा ॥ २१ ॥ चतुर्विध-पुरुषार्थीं अधिकार । जन्म झालिया होय सधर । त्रिवर्गस्थितिकाळीं सविस्तर । साधे जो वर स्थूळतनु ॥ २२ ॥ अंतीं मोक्ष ही यथाधिकार । त्रिवर्गपरिपाकें स्वतंत्र । प्राप्त होय क्रियानुसार । निर्विकार

झालिया ॥ २३ ॥ म्हणोनि जीवांचिये करुणेस्तव । ऐसें अवलोकी प्रभु वास्तव । कीं जीव असमर्थ अविद्ये स्तव । विसरले गौरव आपुलें ॥ २४ ॥ त्यांसी हें त्रिविधसृष्ट्यादिक । चतुर्विधपुरुषार्थप्रापक । प्रापणीयचि आवश्यक । ऐसा आलोचक विश्वाचा ॥ २५ ॥ निमित्तकारणत्व जगाचें । येणें ईशासि बोलिलें साचें । ऐसें अवलोकितांची अभांड रचे । अष्टधाप्रकृतीचे संकल्पें ॥ २६ ॥ तेथ होऊनि तत्तदाकार । व्यष्टिसमष्टिरूप अविकार । आदिमध्यनिधनीं निरंतर । वर्ते प्रभुवर विश्वाचा ॥ २७ ॥ आदिशब्दें बोलिजे जन्म । मध्य तें पालनचि परम । निधनें केवळ अंतनाम । आणि जे सुगम पर्यायें ॥ २८ ॥ विद्यमानत्वें इतुक्या कर्मीं । जो वर्ततसे पूर्णत्वधर्मीं । जया न स्पर्शे विकारोर्मी । त्रिविधानुक्रमीं असतां ही ॥ २९ ॥ जेंवि सुवर्ण अलंकारीं । कीं मृत्तिका कुड्यादिविकारीं । विद्यमानत्वें वर्तती पुरी । घडतां राहतां मोडतां ॥ १४३० ॥ येणें उपादानत्व ही बोलिलें । परमात्मया ऐसिया बोलें । येथ वितर्कें म्हणाल हें कथिलें । कैसें घडेल विचारितां ॥ ३१ ॥ प्रकृति आणि पुरुषा कारणें । उभयकारणत्व जाणणें । ऐसें प्रसिद्ध असतां बोलणें । हें प्रतिपादणें कैसेनी ॥ ३२ ॥ तरी सत्यचि वितर्क ऐसा । परंतु येथील अर्थ परिसा । तयांचें ही मूळकारण हा आपैसा । यां उत्पत्ति सहसा ज्यास्तव ॥ ३३ ॥ हेचि अव्यक्त जीवेश्वर । या पदें व्यास ऋषीश्वर । प्रत्यक्ष बोलिला तो विचार । जाणती चतुर विपश्चित ॥ ३४ ॥ अव्यक्त म्हणिजे गुणमयी माया । जीवशब्दें विराटकाया । धर्त्ता समष्टिभूतमया । हीं कारणें जगा या उभयता ॥ ३५ ॥ याचा ही जो ईश्वर मुख्य । अनंतब्रह्माण्डनायक । आदिकारण जगद्व्यापक । सर्वात्मक परमात्मा ॥ ३६ ॥ जयाचें ईशनसत्तावळ । लाहोनि प्रकृतिपुरुषयुगल । सृजी विश्व हें सकळ । तो कारण केवळ मुख्यत्वें ॥ ३७ ॥ आतां तयाचें प्रवेशनियमन । विश्वीं कैसें तें निरूपण । नृपा दर्शवी शुकभगवान । तें श्रोते सुजन परिसोत ॥ ३८ ॥ पूर्वोक्तप्रकारें हें विश्व । प्रकृतिविकृतिरूप सर्व । निर्माण करूनि स्वयमेव । मग केलें ज्यास्तव तो ऋषि ॥ ३९ ॥ प्रकृति म्हणिजे अष्टधा पृथक । भू जळ पावक समीर ख । अहं महत् अव्यक्त प्रमुख । विकृति साङ्ग अवधारा ॥१४४०॥ वृत्तिपंचात्मक एक मन । क्रियाकारक पंचप्राण । ज्ञान कर्म दशधा करण । ऐशा षोडश जाण विकृति या ॥ ४१ ॥ कोणी पंचवीस ही म्हणती । ज्ञेय पंच विषय मेळविती । अंतःकरणादि पृथग्गणिती । एवं लिंगदेह वदंती या साची ॥ ४२ ॥ पंचभूतें तद्गुणविषय । शब्दादिकां संज्ञा होय । हें जडत्वें भोग्यकाय । सुखदुःख होय यांचेनी ॥ ४३ ॥ बुद्ध्यादिकां कर्तृभोक्तृसंज्ञा । आणि दशेन्द्रियां सहित प्राणां । भोगकर्मकरणसूचना । या केलें सृजना जीवार्थ ॥ ४४ ॥ ऋषि ऐसें नाम जीवा । कीं मी ऐसिया अंहभावा । जाणें म्हणोनि ज्ञानविभवा । पात्र परिभावना विपरीत ॥ ४५ ॥ असो जीवा ऋषिसंकेत । ज्यास्तव सृजिलें हें त्या सहित । विद्यमानत्वें आपण निश्चित । अनुप्रविष्ट होत लिंगदेहीं ॥४६॥ जेंवि अनुलक्षें संप्राप्नवत । घटमठादिकीं गगन होत । पूर्वविद्यमानत्वें यथास्थित । परंतु भासत प्रविष्टा परी ॥ ४७ ॥ ऐसा जीवें सहित अनुप्रवेश । सूक्ष्मदेहीं करूनि ईश । मग तयासी भोगायतनें दृश्य । करी प्रत्यक्ष स्थूळतनु ॥४८॥ मग त्या वपुःक्रियानियमें । नियमिता होय संभ्रमें । पृथगिन्द्रियां ज्ञानोद्गमें । तत्तद्धर्मे शासित ॥४९॥ एवं स्थूळ लिंग देहद्वय । जीवासि हरि प्रकटिता होय । मग अंतर्यामित्वें शासनकार्य । करूनि अनप्राय प्रतिपाळी

॥१४५०॥ यथाक्रम देऊनि भोग । रक्षित होत्साता साङ्ग । समत्वें पाळी त्या अभंग । परंतु देवयोग अनारिसे ॥ ५१ ॥ अनेकबीजां एकचि जळ । समत्वें करी प्रतिपाळ । परंतु रसोत्पत्ति केवळ । विविधा फळदळपुष्पादि ॥ ५२ ॥ तेंवि पूर्वसंस्कारानुसार । शुभाशुभप्रवृत्ति सधर । जीवासि होती कर्मतंत्र । इहामुत्रफळभोगा ॥ ५३ ॥ तें त्यांचिया दृढसंकल्पें । फळ देतसे कर्मानुकल्पें । आणि आत्मोपासकां कैवल्यरूपें । होय साक्षेपें तयाच्या ॥५४॥ आतां हेंचि निरूपण । स्वभक्तां सद्गतिकारण । होय परमपुरुष पूर्ण । करी नृपा कथन शुकमुनि ॥ ५५ ॥ अनुशयी जो पूर्णशरण । पूर्वसाधनसिद्ध जाण । घडिघडी दण्डवच्चरण । अभिवंदी आपण तो जीव ॥ ५६ ॥ ज्यातें पावूनि पूर्णावबोधें । अभेदसाक्षात्कारानुबंधें । द्वैतभावनानिरोधें । अजा स्वच्छंदें सांडीत ॥ ५७ ॥ अजा म्हणिजे अविद्या । कार्यकारणरूपसद्या । जे गवसणी स्वबोधा आद्या । तेचि द्विविधा अवधारा ॥ ५८ ॥ कारणरूपा तमात्मका । केवळ संज्ञका तत्कार्यरजःसत्वद्योतका । विपरीतज्ञानें अभिव्यक्त ॥ ५९ ॥ होतां आत्मत्वाचा गाढ विसर । जागृतिस्वप्नात्मक वृत्तिप्रसर । देहाध्यासें सविस्तर । सगुण विकार रूपा ये ॥ १४६० ॥ ऐशी हे अविद्या केवळ । जयाचें स्वरूप अतिनिर्मळ । आत्मत्वें पावूनि टाकी सकळ । जीव प्रेमळ सद्भक्त ॥ ६१ ॥ जरी म्हणसी हें कैसें घडे । ब्रह्मसंपन्न ही निवाडें । अविद्यासंबंध दिसे कोडें । जोंवरीं जीवित मांडे यथास्थित ॥ ६२ ॥ जागृति स्वप्न सुषुप्ति । तिहीं अवस्थांची प्रतिती । काय ज्ञातया नव्हे निश्चिती । कीं न सेवी कधीं शब्दादिक ॥ ६३ ॥ ज्ञानी निद्रा करी हरिखें । निद्रेमाजी स्वप्न ही देखे । जागृति लाहूनि ओळखे । गृहादि आसिकें आपुलें ॥ ६४ ॥ यथायुक्त गोष्टी बोले । इतरीं बोलतां ऐकें वहिलें । क्षुधा लागतां चांगलें । अन्न निफजलें भक्षित ॥ ६५ ॥ तृषाहरणा जळही सेवी । शीतोष्णहरणा वस्त्रें भावी । एवं इत्यादि अविद्यागौरवीं । असतां त्यजिली केंवि मानावी ॥ ६६ ॥ तरी ये विपर्यीं उदाहरण । बोलिला ऋषि द्वैपायन । तें परिसतांचि संपूर्ण । शंकानिवारण होईल ॥ ६७ ॥ जयापरी निद्रितपुरुष । शरीर सांडित निःशेष । येथील भाव जो प्रत्यक्ष । विचारसापेक्ष तो ऐका ॥ ६८ ॥ निद्रित असतां शरीरवंत । ऐसे इतर पाहती जागृत । परी तो आपण न पाहत । निमग्न निश्चित आनंदीं ॥ ६९ ॥ तेंवि जीवन्मुक्ता अविद्यावंत । इतर पाहती ज्ञान अभ्रान्त । तो कांहीं न पाहे स्वरूपस्थित । जो ब्रह्मानंदमय झाला ॥ १४७० ॥ जयाची दृष्टि वेधली कवळें । तो चंद्रमंडळ म्हणे पिंवळें । ऐसें आपणावरूनि अबळें । देहिकबळें त्या लाविती ॥ ७१ ॥ परंतु वस्तुज्ञानी निर्विकार । सबाह्य केवळ आत्माकार । अकर्तात्मक बोधें आत्मप्रचुर । अनुभवें संसार न दिसे त्या ॥ ७२ ॥ तो सर्व बोलोनि अबोलणा । सर्व भोगूनि अभोक्ता जाणा । करूनि अकर्ता योगिराणा । मूर्खा कळेना रहस्य हें ॥ ७३ ॥ विश्व देखोनि अदेखणा । द्वैत निःशेष स्मरेना । अनुभवी जाणे या लक्षणा । गुरुगम्य खुणा गुरुभक्त ॥ ७४ ॥ असो ऐसी अविद्या सर्व । जयाच्या स्वरूपप्राप्तीस्तव । अनुशयी अनन्यभक्त जीव । टाकूनि होय निर्मुक्त ॥ ७५ ॥ तया हरीतें निरंतर । ध्यावें अंतरीं सादर । जन्ममरणादि भय अपार । निवारी समग्र परमात्मा ॥ ७६ ॥ म्हणसी कोठूनि सामर्थ्य ऐसें । श्रीहरीतें परिपूर्ण असे । तरी अच्युतस्वरूपस्थितिवशें । मायानिरासें नित्यबोधें ॥ ७७ ॥ मूळ-

कारण माया जेणें । त्यागिली पूर्णात्मस्थितीनें । म्हणोनि निर्भयता तच्चिन्तनें । ऐसें नृपाकारणें शुक बोधी ॥ ७८ ॥ ऋषिशापास्तव दुर्मरण । सर्पदंशें होणार म्हणोन । परीक्षिति भयभीत आपण । त्यासि निर्भय संपूर्ण हें कथिलें ॥ ७९ ॥ शुद्धपरमात्मस्वरूपबोधें । अभेद आत्मत्वें वृत्ति वेधे । तेव्हां सद्गति स्वयेंचि प्रवृत्तिरोधें । होइजे शुद्धें निज ऐक्य ॥ १४८० ॥ मग देह असतांचि देहातीत । केवळ सन्मयप्रत्ययवंत । होतां मरणवार्ता तेथ । नाहींच निश्चित प्राप्तांसी ॥ ८१ ॥ जेव्हां मरणासीच ठाव नाहीं । तेव्हां दुर्गति कैसी कायी । म्हणोनि ऐसा बोध सुनिश्चयीं । अखंड हृदयीं धरावा ॥ ८२ ॥ समस्त वेदस्तुतीचा इत्यर्थ । या एका श्लोकें एवंभूत । परीक्षितीतें शुद्ध परमार्थ । कथिला येथ मुनीन्द्रें ॥ ८३ ॥ इतुकेन हा अध्याय परम । समाप्त सप्ताशीतितम । साधकीं विवरूनि उत्तम । स्वहित सुगम स्वीकरिजे ॥ ८४ ॥ ये वेदस्तुतीचा अर्थ गहन । व्याख्यान करितां गुंतती सुज्ञ । क्रान्तदर्शी शास्त्रप्रवीण । मां पाड कोणा इतरांचा ॥ ८५ ॥ शास्त्रप्रवीण आणि गुरुभक्त । वेदान्तविचारें आत्मरत । त्यांसी च उमजे इत्थंभूत । राहती प्राकृत भावार्थीं ॥ ८६ ॥ वेदस्तुत्यर्थ परमामृत । गीर्वाणभाषाकूपीं स्थित । व्युत्पत्तिसूत्रें प्रयत्नकृत । लाहती पंडित धीपात्रें ॥ ८७ ॥ ज्यांसि शास्त्रव्युत्पत्तिसूत्र । नाहीं ते राहती आस्थातंत्र । म्हणोनि गुरुवरें हें विचित्र । सुगम स्वतंत्र कृपाळुवें ॥ ८८ ॥ देशभाषापर्यायशब्दें । सुगम भाष्य ओंवीप्रबंधें । सोपान रचिलें जेणें लाधे । प्रमेय समुदें सकळांसी ॥ ८९ ॥ येथें जे जे मुमुक्षु तृषार्त । आबाल सुबोध समस्त । आस्थाचरणें विक्रमवंत । उतरोनि स्वस्थ अनायासें ॥ १४९० ॥ श्रद्धाञ्जळीनें बुद्धिमुखीं । ओपोनि घोंटिती एकाकी । ते विश्रान्ति पावती सच्चित्सुखीं । भवभय ओळखी मग न उरे ॥ ९१ ॥ ऐसा जडमूढां उपकार । सद्गुरुनाथें अपार । ग्रंथरूप केला सविस्तर । सुखकर संपूर्ण दयेनें ॥ ९२ ॥ आदिनाथ दयेचा ओघ । विरंचिपात्रें भरला साङ्ग । तो नारदा लाभतां अव्यंग । तेणें दत्तात्रेयीं मग सांठविला ॥ ९३ ॥ त्या वरी तो अवधूत दयाळ । जाणोनि संतप्त कळिकाळ । जनार्दनीं वर्षला पुष्कळ । तो चि प्राञ्जळ एकनाथीं ॥ ९४ ॥ तेथूनि चिदानंदें प्रवाहत । स्वानंदासी जाहला प्राप्त । गोविन्दें वळोनि यथार्थ । स्थिराविला श्रीमद्दयार्णवीं ॥ ९५ ॥ तये पूर्णदयेनें उचंबळोन । थोर सानें कडसणी न करून । समत्वें प्रबोधामृतप्राशन । करविलें येणें सदुपायें ॥ ९६ ॥ आधीच श्रीमद्भागवत । अठरा सहस्र परिमित । प्रबोधक्षीराब्धि निश्चित । त्या माजी मथित दशम हा ॥ ९७ ॥ इयेही दशमस्कंधामृतीं । साय परमामृत वेदस्तुति । प्राप्य केली सर्वांप्रति । हे अपार उपकृति सद्गुरूची ॥ ९८ ॥ पदापदाचा देऊनि झाडा । अक्षरशा अर्थ रोकडा । शास्त्रपरिभाषा निवाडा । केला उघडा श्रीधरोक्त ॥ ९९ ॥ तत्वार्थ प्रतिपादितां शुद्ध । नाना प्रकारचे शास्त्रवाद । मतान्तरें सिद्धान्तविरुद्ध । पावलीं विशद ये ठायीं ॥ १५०० ॥ तयांचें करूनियां खंडन । केलें वेदान्तप्रतिपादन । मोक्षद निश्चयें भगवद्भजन । ऐसें निरूपण येथींच ॥ ५१ ॥ हें श्रद्धापूर्वक निष्ठावंत । श्रवणें मननें प्रेमभरित । सेविती ते केवळ अच्युत । होती निभ्रान्त पूर्णत्वें ॥ २ ॥ येथ भगवत्तत्त्वज्ञान । करतळामळवत् कथिलें पूर्ण । तें जाणोनि विवेकसंपन्न । निदिध्यासें आपण अनुभविती ॥ ३ ॥ तयां अपरोक्षप्रमेयवंतां । स्वप्नीं न स्मरे भवभयवार्ता ।

अवस्थामात्रीं तन्मयता । शुद्धसमता बाणेल ॥ ४ ॥ आतां पुढिलिये अध्यायीं । ऐसी निरूपणाची नवायी । कीं विष्णुभक्त केवळ निश्चयीं । पावती अद्वयीं समरसतां ॥ ५ ॥ त्याहूनि इतर देवांचे भक्त । भोग्यवैभवचि नाशवंत । या पावती त्यासी सायुज्य नित्य । कैवल्य निश्चित दुर्लभ ॥ ६ ॥ परीक्षितीच्या प्रश्नास्तव । शुकें हें निरूपिलें वास्तव । सहसा न केला विष्णुस्तव । यथार्थ भाव निरूपिला ॥ ७ ॥ ते कथेच्या श्रवणा प्रति । सावध असावें मुमुक्षुश्रोतीं । जेणें भज्यभजनफलावाप्ती । उमजे चित्तीं पृथक्त्वें ॥ ८ ॥ हा निःसंशय विविच्यभाव । पारमार्थिक अन्वय सर्व । वक्ता श्रीकृष्ण-दयार्णव । वदेल अनुभवगौरवें ॥ ९ ॥ सकळमंगलांची जननी । ज्ञानाद्यभ्युदयकारिणी । ते संपादिजे साधकीं जनीं । हरिभक्ति सज्जनीं सुसेव्य ॥१५१०॥ श्रीमद्भागवत दशमस्कंध । टीका हरिवरद अगाध । दयार्णवकृत परमविशुद्ध । अध्याय प्रसिद्ध सत्यायशीवा ॥ १५११ ॥

॥ इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कन्धे श्रीशुकपरीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां वेदस्तुतिनिरूपणं नाम सप्ताशीतितमोऽध्यायः॥७७॥

॥ श्लोक ५० ॥ ओव्या १५११ ॥ एवं संख्या १५६१ ॥
श्याऐंशिवा अध्याय मिळून ओवी संख्या ४०,१००

सत्त्याऐंशिवा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ८८ वा

श्रीगणेशाय नमः ॥ जगदात्मया जगद्गुरो । निजजनजनका कल्पतरो । तव पद स्मरणें भव हा हरो । मानस मुरो तव वेधें ॥ १ ॥ म्हणोनि सद्गुरो सुखनिधाना । प्रणतवरदा प्रबोधगहना । नमन साष्टांग तुझिया चरणा । संसृतिशमना मुहुर्मुहु ॥ २ ॥ करितां तव चरणांचें स्मरण । होय देहत्रया विस्मरण । सबाह्य दाटे सच्चिद्घन । ब्रह्म परिपूर्ण अभेदें ॥ ३ ॥ तेव्हां नम्यनमक हा भाव । नुरविसी देऊनि स्वगौरव । त्रिपुटी ग्रासूनि सुखानुभव । साक्षित्वभाव अभिविलयें ॥ ४ ॥ ऐसा नैसर्गिक अगाध महिमा । सहसा न वदवेचि निगमा । परंतु स्फुरवी अनन्य प्रेमा । गुणगणगरिमा प्रणतांसी ॥ ५ ॥ बहुधा वदती युगानुयुगीं । अजस्र चालती स्तवनमार्गीं । होवूनि तव पदीं अनुरागी । न करिती वावुगी भवचिन्ता ॥ ६ ॥ अनंतयुगीं अनंत मूर्ति । तारक जड जीवां भवावर्त्तीं । सच्चित्सुखमय धरूनि आर्ती । निरसूनि कीर्ति प्रकाशिती ॥ ७ ॥ एका उद्धरिलें प्रबोधामृतें । एक ते भाविक चरणतीर्थें । मौळ स्पर्शोनि पद्महस्तें । कितिएकांतें तारिलें ॥ ८ ॥ एकां सदयावलोकें पाहिलें । ते तत्काळ चि कृतार्थ झाले । एकीं हृदया माजी ध्याइलें । ते ही चुकले भवभया ॥ ९ ॥ एकां अनुदिनीं नामस्मरणें । एक ते चिद्रूपचिन्तनें । एक परिचर्येच्या गुणें । समानपणें उद्धरिले ॥ १० ॥ ऐसीं अनेक शुभ पवित्रें । मोक्षप्रदें श्रवणमात्रें । साकल्यें न वदती वेदशास्त्रें । पुराणें पवित्रें यथामति ॥ ११ ॥ द्वापारान्तीं सगुण विग्रह । कृष्णनामक भवापह । घेऊनि तारिला जीवसमूह । चरित सुखावह प्रकटिलें ॥ १२ ॥ उद्धवार्जुनादि अनन्य शरण । केले चिन्मात्रबोधें पूर्ण । उरले जे कां मादृश दीन । कळिकाळीन भवग्रस्त ॥ १३ ॥ तयांचिये करुणे स्तव । प्रकटावया पूर्णानुभव । श्रीमत्कृष्णदयार्णव । नामें स्वयमेव प्रस्तुत ॥ १४ ॥ पूर्ण दयेनें अवतरून । केलें अपार जगदुद्धरण । विशेष तारिले भाविकजन । गुह्यज्ञान-

प्रबोधनें ॥ १५ ॥ भक्ति ज्ञान आणि विराग । कर्मधर्मादिसन्मार्गयोग । जनीं प्रकटिला अभंग । यथासाङ्ग आचरणें ॥ १६ ॥ दिवसेंदिवस बुद्धिहीन । प्राणी होती कलिकालीन । न कळे वेद शास्त्र पुराण । कळवळून तयांस्तव ॥ १७ ॥ दशमस्कंधाचें व्याख्यान । देशभाषाकृतटीकाग्रथन । ज्या माजी सांठविला संपूर्ण । अर्थ गहन श्रुतींचा ॥ १८ ॥ अगाध गुणचरित्रमहिमान । तेथ अनन्य वक्ता समर्थ कोण । म्हणोनि प्रकटिलें आपुले आपण । अबळां कारणें सुभाषितें ॥ १९ ॥ इत्यादि अनेक अवतारकार्य । संपादूनि स्वविग्रहवर्य । उपसंहरिला देऊनि धैर्य । शेषान्वयग्रथनार्थ ॥ २० ॥ मी तो केवळ अकोविद । अनधीत विशेषें मतिमंद । न कळे काव्यरचनाछंद । आज्ञार्थ सिद्ध स्वयें कीजे ॥ २१ ॥ तुमची अभिनव न कळे लीला । उदकावरी तारिल्या शिळा । समुद्रीं हुताशन ठेविला । अनळीं सलिला प्रकटिलें ॥ २२ ॥ शून्यीं सृजिला प्रभंजन । प्रभंजनीं हुताशन । न पढवूनि चतुरानन । वेदप्रेरणा त्या केलें ॥ २३ ॥ ऐसिया देखूनि महिमाना । न होय चित्तीं असंभावना । प्रकटूनियां सत्तास्फुरणा । काय एक रचना न कराल ॥ २४ ॥ असो ये विषयीं विज्ञप्ती । करणें न लगे चरणा प्रती । लेखनी न प्रार्थी लेखनार्थी । लेखका निश्चिती कदापिही ॥ २५ ॥ किंवा वाद्यें प्रार्थना-पूर्वक । सहसा न विनविती वादक । ते आपुलियासाठीं बहुतेक । चातुर्य सम्यक प्रकटिती ॥ २६ ॥ तेंवि अंतर्यामित्वें बोलवणें । हें इष्टचि समर्था कारणें । म्हणोनि ग्रंथसमाप्ती कारणें । संदेह धरणें मज नाहीं ॥ २७ ॥ ऐसें ऐकूनि श्रोते सज्जन । म्हणती हें कैसें येथ भाषण । हा अभिप्राय विशद करून । आम्हां संपूर्ण कथावा ॥ २८ ॥ तरी ऐकावें श्रोतीं सकळीं । जे कां अळिसम गुरुपदकमळीं । हे जगदुद्धारार्थ नव्हाळी । ग्रंथरूपें केली गुरुवरें ॥ २९ ॥ शायशी अध्याय पर्यंत । निरूपिलें श्रीकृष्णचरित । पुढें सत्यायशीवा प्राप्त । जेथ वेदस्तुत परमात्मा ॥३०॥ तो तेंवीस श्रुत्युक्त श्लोक– । पर्यंत वाखाणिला सम्यक । तंव पुरला अवधि अंक । अवतारात्मक प्रभूचा ॥ ३१ ॥ यथोक्त केलें विधिपाळणा । यास्तव काळातिक्रमणा । न करूनि सायुज्यसदना । प्रत्युद्गमना आदरिलें ॥ ३२ ॥ तेव्हां समीप स्वभक्त-मेळा । होता त्या माजी अनन्यशीळा । मज आज्ञासंकेत केला । ग्रंथ राहिला करावया ॥ ३३ ॥ सोळा शतें बासष्टी अब्दें । शालिवाहनपरिमितशब्दें । क्रमितां रौद्रवत्सरीं मोदें । मार्गशीर्षे शुभमासीं ॥ ३४ ॥ शुक्लपंचमीगुरुवासरीं । ब्राह्मीं मुहूर्तीं शुभावसरीं । प्रतिष्ठानीं गोदातीरीं । स्वधाम निर्धारीं स्वीकेलें ॥ ३५ ॥ त्या वरी सगुणवियोगें खेद । करूनि जाहलों मतिमंद । द्विमासां नंतर पुन्हां विशद । स्वप्नीं अनुवाद हा केला ॥ ३६ ॥ मज संबोखूनि बहुता परी । म्हणती असो तुज अंतरीं । प्रज्ञा स्फुरेल शंका न धरीं । ग्रंथ पुढारीं चालवणें ॥ ३७ ॥ ऐसी सद्गुरूची समर्थ आज्ञा । विशेष संमत सकळां सुज्ञा । येऱ्हवीं सामर्थ्य मज अल्पज्ञा । कैंचें प्रज्ञारहितासी ॥ ३८ ॥ आतां भरंवसा मज निश्चित । कीं दूरस्थ चंद्रमा गगनांत । स्वकान्ति प्रकटित अमृत । असे विदित सर्वांसी ॥ ३९ ॥ कीं सूर्यकान्ति दिवाकर । अंतरें प्रसवे ज्योति प्रखर । मा हृदयस्थ सद्गुरु भ्रमहर । स्व उद्गार न स्फुरवी ॥ ४० ॥ पूर्वी स्वमुखें ओवीप्रबंध । वदोनि सद्गुरु नित्यबोध । लेखनक्रियेसी पैं विशुद्ध । मज करूनि विशद करविलें ॥ ४१ ॥ आतां अंतर्यामित्वें वक्ता । श्रीस्वामिराजचि तत्वता । येथ

मीपणाचिया अर्था । ठाव सर्वथा नसेचि कीं ॥ ४२ ॥ माझ्या मीपणाचा ग्रास । तैंचि केला जी निःशेष । जैं ठेविलें पद्महस्तास । कृपाविशेष करूनियां ॥ ४३ ॥ नामरूपेंसीं पालटिलें । आपुलें नाम मज ठेविलें । उत्तमश्लोकसंज्ञाथिलें । प्रेम दिधलें निजभजनीं ॥ ४४ ॥ म्हणोनि येथ परिहार करणें । न लगेचि विविधा बोलणें । तुम्ही संत सर्वज्ञपणें । अभेदलक्षणें जाणतसां ॥ ४५ ॥ तरी सप्ताशीति अध्याय पहिले । यथानुक्रमें समर्थिले । यावरी व्याख्यान उपाइलें । अष्टाशीतितमाचें ॥ ४६ ॥ ये अध्यायीं निरूपण । हरिभक्त कैवल्य पावे पूर्ण । याहूनि अर्वाद्देवता जाण । तद्भक्त संपन्न भोगसुखें ॥४७॥ शिवादिदेवतान्तरें भजती । ते भोग्यवैभवचि पावती । तयासि दुर्लभ मोक्षावाप्ती । हे संशयनिवृत्ती मुनि करी ॥ ४८ ॥ येथ अष्टम एकादशिनी । पूर्णता पावेल निरूपणीं । श्रोतीं सावध ऐकिजे श्रवणीं । इतुकी विनवणी सेवेसी ॥ ४९ ॥ तुमचें अवधानजीवन । पावतांचि वक्तृत्ववन । लसलसीत होवोनि पूर्ण । नित्यनूतन फळेल ॥ ५० ॥ पूर्वाध्यायीं श्रुत्यर्थभूत । शेवटील श्लोक शुक समर्थ । नृपासि कथिता झाला तेथ । अभिप्राय तथ्य हा कथिला ॥ ५१ ॥ कीं भयनिवर्तक श्रीधर । जो परमात्मा परात्पर । स्वभक्ता मोक्षद निरंतर । हें ऐकोनि सादर परीक्षिति ॥ ५२ ॥ आशंकोनि मुनी कारणें । प्रश्न करी अतिनम्रपणें । म्हणे स्वामी हें निरूपणें । स्फुटव्याख्यानें मज लागीं ॥ ५३ ॥

राजोवाच ॥ देवासुरमनुष्येषु ये भजन्त्यशिवं शिवम् । प्रायस्ते धनिनो भोजा न तु लक्ष्म्याः पतिं हरिम् ॥१॥

देव असुर आणि मानव । त्यां माजि भजती अशिव शिव । ते प्रायशा भोगवैभव । भोगिती होवोनि धनवंत ॥ ५४ ॥ अशिवाविशेषणें व्याख्यान । कीं शिव जयाचें अभिधान । परंतु शिवचि आचरण । तें सलक्षण परिसावें ॥ ५५ ॥ भोगीं धरूनियां त्रास । श्मशानीं राहे विशेष । चिताभस्म सर्वांगास । चर्ची संतोष पावूनी ॥ ५६ ॥ आणि पिशाचांसीं करी संग । भूषणें मिरवी भुजंगभोग । गजादिचर्मीं वेष्टी आंग । जाळिला अनंग सक्रोधें ॥ ५७ ॥ करीं धरूनि नरकपाळ । स्वयें होय भिक्षाशीळ । एवं आचरण अमंगळ । असे केवळ जयाचें ॥ ५८ ॥ ऐसा ही अर्थ कोणी करिती । परी येथील इतुकी च व्युत्पत्ति । अशिव म्हणिजे भोगसंपत्ति । न सेवी निश्चिती कदापि जो ॥ ५९ ॥ तो तिरस्कृतभोग जासनीळ । तद्भक्त धनाढ्य भोगशीळ । आणि साक्षाल्लक्ष्मीपति केवळ । त्रैलोक्यपाळ श्रीहरि ॥ ६० ॥ तयातें जे जे कोणी भजती । ते विशेषें निर्धन होती । परंतु भोगवैभव न पावती । स्वयें श्रीपति आराधितां ॥ ६१ ॥ लक्ष्मीपति या विशेषणें । अभिप्राय ऐसा जाणणें । सर्वभोगयुक्त ऐश्वर्यगुणें । असे पूर्णपणें श्रीविष्णु ॥ ६२ ॥ लक्ष्मीपति तेथ सर्व सिद्धि । सिद्धि तेथ भोगसमृद्धि । समृद्धि तेथ विलासवृद्धि । म्हणोनि सौभाग्यनिधि लक्ष्मीश ॥ ६३ ॥ तयाचे जे निश्चयें भक्त । ते बहुतेक होती भोगत्यक्त । अकिंचन आणि विरक्त । दरिद्रयुक्त सर्वदा ॥ ६४ ॥ परीक्षितीनें ऐसा प्रश्न । शुकासि केला आशंकोन । याचें रहस्य जाणती सुज्ञ । तें परिसा संपूर्ण प्रकटत्वें ॥ ६५ ॥ प्रायशा धनवंत भोगभुज । शिवभक्त ऐसें कथिलें गुज । निर्धन होती जे भजती अज । येथ तात्पर्यबीज या परी ॥६६॥

प्रायशा म्हणिजे बहुतेक । शिवभक्त भोगिती भोगसुख । क्वचित मोक्षाहि सविवेक । होवोनि विरक्त पावती ॥ ६७ ॥ विष्णुभक्त बहुतकरून । विरक्त मुमुक्षु भोगहीन । क्वचित धनिक ही भोगसंपन्न । होती हा श्लेष येथींचा ॥ ६८ ॥ परि वैष्णव न पवतीच वैभव । शाम्भव न पवती मोक्षगौरव । हा नव्हे येथील अभिप्राव । वैशिष्ट्यभाव बोलिला ॥ ६९ ॥ अमो नृप म्हणे शुकाचार्या । वंद्या विपश्चिता प्रबुद्धवर्या । ऐसी विपरीत कां हे चर्या । आम्हां ज्ञानसूर्या प्रकाशीं ॥ ७० ॥

एतद्वेदितुमिच्छामः संदेहोऽत्र महान्हि नः । विरुद्धशीलयोः प्रभ्वोर्विरुद्धा भजतां गतिः ॥ २ ॥

हें संदिग्ध अभिप्रेत । जाणों इच्छितसों यथार्थ । कीं संदेह मोठा येथ । होय निश्चित आम्हांसी ॥ ७१ ॥ म्हणसी संदेह किन्निमित्त । तरी विरुद्ध जयांचें आचरित । ते हरिहर प्रभुसमर्थ । तद्भक्तां विपरीत गति होय ॥ ७२ ॥ जेणें सर्वभोगां तिरस्कारिलें । जया अशिवत्व आंगीं बाणलें । तया शिवातें जे जे भजले । ते भोगाथिले सर्वस्वें ॥ ७३ ॥ आणि सर्व भोगांचा जया योग । ऐसा जो साक्षात श्रीरंग । तद्भक्त केवळ सविराग । दरिद्र अभंग तयांसी ॥ ७४ ॥ हेंचि विपरीत गमे मना । निःसंशय कर्थी या निरूपणा । ऐसें ऐकूनि योगिराणा । वदे त्या वचना अवधारा ॥ ७५ ॥

॥श्रीशुक उवाच॥ शिवः शक्तियुतः शश्वत्त्रिलिङ्गो गुणसंवृतः । वैकारिकस्तैजसश्च तामसश्चेत्यहं त्रिधा ॥३॥

म्हणे ऐकें गा राजर्षी । मुकटमणि तूं चातुर्यशीर्षी । तव प्रश्नाख्याम्बुदवर्षी । मम वक्तृत्ववृक्षीं टवटवी ॥ ७६ ॥ आस्थावंत आणि विरक्त । प्रेमळ विचक्षण सयुक्त । पृच्छक सम्यक प्रसंगोपात्त । तव सम श्रोता दुर्लभ ॥ ७७ ॥ संदेहयुक्त तां केला प्रश्न । तो म्यां परिसिला साद्यंत कृत्स्न । याचें जेणें होय निरसन । तें उत्तर संपूर्ण अवधारीं ॥ ७८ ॥ शिवभक्त धनवंत आणि भोगी । विशेषें विषयीं सानुरागी । किन्निमित्त हे अर्थभंगी । कथितों तुज लागीं विस्तारें ॥ ७९ ॥ शिव निरंतर मायायुक्त । ते माया सहजें त्रिगुणान्वित । तद्योगें गुणसंवृत । अत एव निश्चित त्रिलिंग जो ॥ ८० ॥ त्रिलिंग म्हणिजे तिन्हीं चिन्हें । असती जयातें सगुणपणें । तीं कैसीं म्हणसी तरी विशेषणें । तुज कारणें निवेदितों ॥ ८१ ॥ तमा पोटीं झाला सत्त्व । सत्वगर्भीं रजोद्भव । तो तमचि अवघा सावयव । जो त्रिविधत्व पावला ॥ ८२ ॥ तया परस्परोपमर्दें करून । तमासि त्रैविध्य आलें जाण । यास्तव शिव निश्चयें त्रिगुण । अहंलक्षण जाणिजे ॥ ८३ ॥ सात्विक राजस तामस । एवं अहंकार जो प्रत्यक्ष । तया पासूनि षोडश । विकार अशेष जाहले ॥ ८४ ॥

ततो विकारा अभवन्षोडशामिषु कंचन । उपधावन्विभूतीनां सर्वासामश्नुते गतिम् ॥ ४ ॥

ते षोडश विकार म्हणसी कैसे । मनइन्द्रियभूतरूप अपैसे । देवतालक्षणनिश्चयवशें । जाण

विशेषें चंद्रादिक ॥ ८५ ॥ ते जे इन्द्रचंद्रसूर्यप्रमुख । इन्द्रियरूप सुर सम्यक । यां माजी भजे जो कोणी एक । देवता निष्टंक सद्भावें ॥ ८६ ॥ तो ते देवता उपाध्यनुरूप । विभूतीचें पावे स्वरूप । तत्संपदा भोगी अनल्प । हा विषद अनुकल्प येथीचा ॥ ८७ ॥ एवं मायायुक्तगुणवेष्टित । सगुण केवळ शिव निश्चित । म्हणोनि गौणप्राप्ति तद्भक्त । पावती यथार्थ सोपाधिक ॥ ८८ ॥ आतां विष्णुभक्त मोक्षावाप्ति । कैसेनि विशेषें पावती । हेंही राया तुझिये मति । उमजे ते रीती अवधारीं ॥ ८९ ॥

हरिर्हि निर्गुणः साक्षात्पुरुषः प्रकृतेः परः । स सर्वदृगुपद्रष्टा तं भजन्निर्गुणो भवेत् ॥ ५ ॥

श्रीहरि केवळ निर्गुण । साक्षात् पर जो प्रकृतीहून । उत्तमपुरुष विकारहीन । परमात्मा पूर्ण सन्मात्र ॥ ९० ॥ सर्वद्रष्टा सर्वसाक्षी । अलिप्त सर्वदा प्रवृत्तिपक्षीं । हीं सहेतुक विशेषणें दक्षीं । व्युत्पत्तिचक्षीं पहावीं ॥ ९१ ॥ साक्षी होत्साता सर्व पाहे । यास्तव प्रकृतिपर निश्चयें । प्रकृतिपर म्हणोनि स्वयें । निर्गुण अन्वयें या जाणा ॥ ९२ ॥ ऐसिया हरीतें जो भजे । तो निर्गुणचि होय महजें । ऐसें परीक्षितीसी ऋषिराजें । कथिलें बोजें श्रीशुकें ॥ ९३ ॥ आतां येथील रहस्य गूढ । परीक्षिति उमजला प्रौढ । तें स्पष्टार्थें कथिलें रूढ । जेणें भाविक मूढ न गुंतती ॥ ९४ ॥ श्लोकत्रयाचा अभिप्राय । साद्यंत विवरूनि सान्वय । धीमंत करिती जो निश्चय । तो निःसंशय अवधारा ॥ ९५ ॥ हरिहर उभयतां उभय गुणीं । सत्वतमात्मकमायावरणीं । ऐसें प्रसिद्ध लौकिकीं पुराणीं । असतां निरूपणीं हें कथिलें ॥ ९६ ॥ कीं शिव केवळ गुणात्मक । मायावरणावृत निष्टंक । विष्णु निर्गुण सर्वदृक । माया-कळंक अस्पृष्ट ॥ ९७ ॥ तरी विष्णु कैसेनि गुणातीत । शिव कैसेनि गुणसंवृत । हें निरूपण संदेह-रहित । द्वैपायनोक्त स्फुट ऐसें ॥ ९८ ॥ सच्चिदानंद वस्तु परम । जेथ नसोचि क्रियाधर्म । तेथ अनादिमायासंभ्रम । अहंब्रह्म हा गुणमय ॥ ९९ ॥ तेव्हां गुणमयीयोगें गुणसंबंध । होतां झालें रूप द्विविध । शुद्ध शवळ ऐसें प्रसिद्ध । गुणधर्म योग योगास्तव ॥ १०० ॥ जेंवि आकाश घनमंडळें । स्वभावें जितुकें आच्छादिलें । तितुकेंचि तदावृत बोलिलें । याहून उरलें निर्मळ तें ॥ १ ॥ तेंवि जें मायावरणाथिलें । चैतन्य तें सगुण बोलिलें । तेंचि ईश्वरसंकेत पावलें । त्या शिव ही कथिलें श्रुतींहीं ॥ २ ॥ आतां पदार्था सारिखा विवर्त भासे । कीं रूपावच्छिन्न च्छाया दिसे । प्रतिबिम्ब बिम्बाचिया सरिसें । हें सर्वां उमसे साधारण ॥ ३ ॥ ज्या कारणाचें जें कार्य । तें तद्भावयुक्त हा निश्चय । सच्चिदा-नंदीं विवर्तप्राय । माया गुणमय भासली ॥ ४ ॥ ते मायेचे तीन गुण । सत्वरजस्तमाभिधान । सच्चिदानंदभावें भिन्न । अवभासमान जाहले ॥ ५ ॥ केवळ सद्भावें सत्व प्रकटला । चिदत्वें रजोगुण भासला । अनंदें तम उमगला । हा विसर्ग झाला समकाळीं ॥ ६ ॥ जेंवि सदादि अभिन्न असती । तेंवि सहत्वेंचि गुणही वसती । परंतु शक्त्युद्रेकें भासती । पृथक् स्वस्थितिविकारें ॥ ७ ॥ म्हणाल सदत्वें झाला सत्व । चिदत्वें रजःप्रादुर्भाव । आनंदेंचि तमोद्भव । यासी प्रमाणभाव

कायसा ॥ ८ ॥ तरी प्रत्यक्षचि येथ प्रमाण । अनुभवीं वोळखे खूण । हेंचि विशद संपूर्ण । ऐका विचक्षण श्रोते हो ॥ ९ ॥ सहज सत्वीं ज्ञानशक्ति । जी क्रियाशक्ति निश्चिती । अज्ञानशक्ति तमा प्रति । द्रव्योत्पत्ति ज्यास्तव ॥ ११० ॥ सत् म्हणिजे केवळ अस्तित्व । जेथ अस्तित्व तेथ ज्ञानत्व । आस्तिक्या वांचूनि सर्वथैव । आत्मप्रत्यय कैसेन ॥ ११ ॥ अविद्यायोगें जीवदशे । जही स्वविसरें चैतन्य भ्रंशे । पश्वादियोनित्वें ही विलसे । परिस्फुटे मी ऐसें स्वप्रत्ययें ॥ १२ ॥ तो नैसर्गिक सद्भाव । स्फूरदूपचि स्वयमेव । सतें सत्वासी प्रादुर्भाव । कथिला यास्तव ज्ञानत्वें ॥ १३ ॥ चिदीं असे प्रकाशत्व । चेतनादिवेधकत्व । म्हणोनि क्रियाशक्तिगौरव । रजीं सदैव विक्षिप्त ॥ १४ ॥ आणि आनंदीं स्तब्धता । ते कोंवि म्हणाल जरी तत्वता । तरी कळे सूक्ष्मत्वें विचारितां । अनुभवितां निजान्तरीं ॥ १५ ॥ मायिक आनंदावाप्ति जरी । सौषुप्त वैषयिक होय तरी । वृत्तिविलय होवोनि अंतरीं । ताटस्थ्य निर्धारीं बाणतसे ॥ १६ ॥ मां परमानंदीं स्तिमितत्व । हा बोलणेंचि न लगे भाव । अनुभवीं अर्थगौरव । जाणती तत्व अभिवेत्ते ॥ १७ ॥ असो आनंदीं तमोद्रेक । म्हणोनि तमीं मूढता सम्यक । एवं विनिमय त्रिगुणात्मक । सच्चित्सुख विवर्त हा ॥ १८ ॥ तया त्रिगुणांसी व्यापून । असे तें ईश्वरचैतन्य । केवळ मायावच्छिन्न । जाणिजे सगुणविग्रही ॥ १९ ॥ हा त्रिगुणमयीमायायोग । अविनासंबंध शिवीं साङ्ग । अनादि परस्परानुराग । असे चांग प्रकृतिपुरुषीं ॥ १२० ॥ त्यां माजि मायेचा सत्वगुण । तो केवळ शुद्ध ज्ञानघन । तत्संबंधें ईश्वर पूर्ण । अनुभवसंपन्न स्वबोधें ॥ २१ ॥ आणि तम रज हे द्रव्यक्रिया । शक्तिक द्योतक प्रवृत्तिकार्या । यांच्या योगें होय तयां । प्रपंच उदया सापेक्ष ॥ २२ ॥ म्हणोनि प्रवृत्तिनिवृत्तिपक्षीं । समानत्वें आपणा रक्षी । स्वानुभवें प्रपंचसाक्षी । स्वयें अनुलक्षी पूर्णत्वें ॥ २३ ॥ मी निर्गुण निराकार । सच्चिदानंद निर्विकार । केवळ अद्वैत परात्पर । हा सत्वोद्गार वास्तव ॥ २४ ॥ ऐसा निरंतर स्वरूपस्थित । म्हणोनि नोहे गुणाभिभूत । गुणनियंता सुनिश्चित । परमात्मा अमूर्त तो विष्णु ॥ २५ ॥ आणि प्रवृत्त्यवलंबें साभिमान । सर्वज्ञ सर्वकर्ता आपण । सर्वनियंता सर्वकारण । हें तमगर्भस्फुरण अहंमय ॥ २६ ॥ एवं स्वरूपानुभवें केवळ । शुद्ध परमात्मा निर्मळ । आणि प्रवृत्त्यालंबें शबळ । सगुण प्राज्ञळ तोचि शिव ॥ २७ ॥ असो हे सत्वादि भाव । ईश्वरीं अव्यक्त सर्व । असतां ययांचें स्पष्टत्व । झालें अभिनव तें ऐका ॥ २८ ॥ पूर्णत्व आपुलें स्मरतां । किंचित्स्वरूपीं झाला दुचिता । तंव संकल्प उठिला अवचिता । न रमवे आतां एकत्वें ॥ २९ ॥ तेव्हां बहुत व्हावें आपण । ऐसें प्रपंचाचें अनुसंधान । करितां प्रकृतीस अनुसरून । तदहंपणें वेंठला ॥१३०॥ जें स्वरूपाचें अनवधान । तेथ तमाचें आधिष्ठान । ज्या म्हणती अव्यक्त कारण । रुद्राभिमान तेथींचा ॥ ३१ ॥ त्या तमान्धकारीं ज्ञानप्रकाश । स्वसत्ता स्फुरला तो विशेष । एकत्वीं न रमवे व्हावें बहुवस । या महत्तत्वीं विष्णूस जाणावें ॥ ३२ ॥ अव्यक्तमहत्तत्त्वपरिणाम । रजासह तमसत्वोद्गम । समुच्चयात्मक झाला सुगम । अहंकार नाम तयासी ॥३३॥ हा त्रिगुणात्मक अहंकार । सृष्टि स्थिति आणि संहार । कारक जाणिजे प्रवृत्तिपर । पृथगाकार गुणभेदें ॥ ३४ ॥ आतां इतुकें कथनाचें तात्पर्य । तें येथ उमजे निःसंशय । तो स्पष्ट ऐका अभिप्राय । पूर्वोक्त सोय विवरूनी ॥३५॥ जेंवि वाम दक्षिण उभयाङ्गें ।

एकचि देहा म्हणावें लागे । तेंवि शुद्ध शबल उभयलिंगें । चैतन्य अवघें परमात्मा ॥ ३६ ॥ शुद्धत्वें केवळ महाविष्णु । ज्ञानस्वरूप पूर्ण चैतन्य । शबलत्वें जाणिजे ईशान । जो शिव सगुण ईश्वर पैं ॥ ३७ ॥ तो प्रकृतिसंगें अन्वीयमान । अव्यक्त महत्तत्वीं आपण । सृष्टिकर्तृत्वाचा अभिमान । वेंठला धरून त्रिगुणत्वें ॥ ३८ ॥ तेव्हां सृष्टिकार्याकारणें । सशक्तिगुणांचें आविष्करणें । विविध झालें तें परिसणें । विशद निरूपणें नावेक ॥ ३९ ॥ पृथक् गुणांची स्पष्ट दशा । अन्य गुणांवीण नोहे सहसा । गुण-व्यभिचारें उमटे ठसा । परी एकीं उभयांचा उपमर्द ॥ १४० ॥ जेव्हां अन्योपमर्दें उत्कर्ष । जया गुणाचा होय विशेष । तेव्हां पूर्णत्वें स्पष्टत्व यास । लोप इतरांस अंशत्वें ॥ ४१ ॥ ऐसे परस्परोपमर्दें-करून । स्वप्राधान्यें प्रकटले गुण । त्यांसि पूर्णत्वें अभिव्यापून । वर्ते अभिन्न परमात्मा ॥ ४२ ॥ म्हणाल द्वयोपमर्दें एक गुण । तत्सहकारीं आविष्करण । प्रधानत्वें कैसा कोण । ते प्रतीतिखुण अवधारा ॥४३॥ तिहीं गुणांचा पृथक् सर्ग । तत्तच्छक्ति करूनि साङ्ग । झाला तोही त्रिविध चांग । अन्यगुणयोग अंशत्वें ॥ ४४ ॥ जें कां अंतःकरण पंचक । सात्विक सर्ग ज्ञानशक्तिक । तेथ निर्विकल्पस्फुरणात्मक । केवळ सात्विक श्रीविष्णु ॥ ४५ ॥ तो समष्टि अंतःकरण । जेथ निर्विकल्पक स्फुरण । निर्विकल्पक स्फुरणलक्षण । कैसें तें पूर्ण कथिजेल ॥ ४६ ॥ विकल्प म्हणिजे विपरीत कल्पन । नव्हे तें निर्विकल्पक स्फुरण । केवळ वास्तव स्फुरे जें मीपण । स्वसत्ते करूनि नैसर्गिक ॥ ४७ ॥ तेंचि हृदयस्थाचें रूप । अनुभवी जाणे निर्विकल्प । एथ आशंकेचें स्फुरेल रूप । श्रोतयां स्वल्प मज गमे ॥ ४८ ॥ कीं सविकार अंतःकरण । आत्म्याहून तरी जें भिन्न । विष्णु समष्टीचें अंतःकरण । अविकार पूर्ण केंवि घडे ॥ ४९ ॥ तरी येथील तत्वविचार । ऐका नावेक सादर । जैसा एकचि वैश्वानर । अन्वयाकार इन्धनीं ॥१५०॥ तेथ इन्धनाकार वर्ते । परी दाहकत्वादि स्वधर्मातें । न सोडी ज्यापरी निरुतें । तैसेंचि येथें जाणावें ॥'५१॥ कीं सत्वादि उपाधि माजी । अन्वीयमान ईश सहजीं । प्रकाशमान संवित्पुञ्जी । न मोडे तयाची अखंडता ॥ ५२ ॥ स्वयें निर्विकार पुरुषोत्तम । विष्णुत्वेंही तद्रूप परम । सविकारता ते जीवधर्म । तो ही अनुक्रम अवधारा ॥ ५३ ॥ जीव अविद्येस्तव सविकार । तोचि अंतःकरणादि लिङ्गाकार । या स्तव ते जाणिजे विकारपर । ईशीं विकार ते न पहावे ॥ ५४ ॥ जेंवि प्रतिबिम्बीं विकार होती । कैंची बिम्बीं तयांची स्थिती । तेंवि जीवधर्म ईश्वरा प्रती । सहसा नसती या रीती ॥ ५५ ॥ आतां असोत या गोष्टी अमूप । सत्वें विष्णु अविकाररूप । या वरी विपरीतबोधारोप । सविक्षेपें रजतमें ॥ ५६ ॥ संकल्पविकल्पात्मक मन । तें रजोमिश्रसत्वें करून । तो मूर्तिमंत अमृतकिरण । करी भ्रमण सर्वदा ॥५७॥ आणि सत्वगर्भीं रजांश । तेणें झाला बुद्धिप्रकाश । विपरीतबोधीं निश्चयास । करी विशेष तो ब्रह्मा ॥५८॥ तैसेंच रजस्तममिश्रित चित्त । त्यासि नारायण हा संकेत । अनुसंधानात्मक निश्चित । जेणें अध्यस्त संसार ॥ ५९ ॥ अध्यस्ततादात्म्यें अहंकार । सत्वगर्भींचा तमांकुर । तोचि जाणिजे गौरीवर । जो ईश्वर त्रिवपूचा ॥ १६० ॥ ईश्वर म्हणिजे अनुशासक । प्रवृत्तिपक्षीं जो सम्यक । सर्वेन्द्रियांसी प्रवर्तक । विषयोन्मुखें करूनी ॥ ६१ ॥ स्थूळ लिंग आणि कारण । तिहीं वांचूनि कर्माचरण । न घडे सहसा विषयसेवन । अन्योन्ययोगें कार्यपट ॥ ६२ ॥ कारण तें केवळ अज्ञान । लिङ्ग तें सूक्ष्मवृत्तिस्फुरण । स्थूळ

तरी जडचि साधारण । कार्यहीन पृथक्त्वें ॥ ६३ ॥ म्हणोनि परस्परानुमेळें । एकीभूतत्वें क्रिया विवळे । एवं वर्म हें सुज्ञा कळे । कीं वपुगण चळे अहंकारें ॥६४॥ मनीं अनेक संकल्प उठती । तेथ निश्चय करी धिषणावृत्ति । अनुसंधान तें बाणे चित्तीं । तत्कार्यप्रवृत्ति अभिमानें ॥ ६५ ॥ यास्तव दैहिककर्मकर्तृत्वीं । प्रधानत्व अहंभावीं । तो समष्टि अभिमान भव भवीं । सत्वगर्भी तमोमय ॥ ६६ ॥ ऐसा सात्विकसर्ग त्रिविध । सत्ववैशिष्ट्यें कथिला विविध । आतां राजस सर्ग जो प्रसिद्ध । तोही प्रबुद्ध त्रिधा कथिती ॥६७॥ ज्ञानेन्द्रियें कर्मेन्द्रियें । आणि पंच प्राण जे निश्चयें । या पंचदशांची उत्पत्तिसोये । रजीं होय क्रियेस्तव ॥ ६८ ॥ दिग्वायुसूर्य वरुणनास्त्य । अग्नीन्द्रोपेन्द्रप्रजापति सत्य । निर्ऋति या देवता समस्त । करणास्थित समष्टीच्या ॥ ६९ ॥ तेथ ज्ञानेन्द्रियें तत्वात्मक । कर्मेन्द्रियें रजें सम्यक । जडत्वें प्राण तामस मुख्य । परि रजाचें विशेष प्राधान्य ॥ १७० ॥ यां माजी ही सूक्ष्म रीति । पृथक्पंचकीं त्रिगुणव्याप्ति । कथितां वाढे व्याख्यान अति । जाणती मुक्कळितीं तत्वावित् ॥ ७१ ॥ आणि अज्ञानशक्तीस्तव जडें । पंचभूतें सविषय कोडें । तमा पासूनि झालीं वितंडें । त्रिगुण पवाडे तेथ ही ॥७२॥ सत्वप्रधान बोलिजे आकाश । रजःसत्वात्मक जाणिजे वायुस । रजोवैशिष्ट्यें प्रकाशे हुताश । उदक विशेषें तमर जें ॥ ७३ ॥ तैसी तमवैशिष्ट्यें धरणी । हे संपूर्ण तमाची करणी । एवं परस्परें गुणांची गुणीं । व्याप्ति तत्तत्प्राधान्यें ॥ ७४ ॥ म्हणोनि अन्यगुणावीण स्वतंत्र । कोणी गुण नसे हा निर्धार । परंतु द्वयोपमर्दें जो समग्र । दिसे आविष्कार तयाचा ॥ ७५ ॥ जयाचा पूर्णत्वें आविकार । तोचि बळिष्ठ स्वशक्तिप्रचुर । सामर्थ्यहीन द्विगुण इतर । असतां एकत्र अंशत्वें ॥ ७६ ॥ ऐसें हें सत्व रज तम । त्यां माजी व्यापक पुरुषोत्तम । प्रवृत्त्यवलंबें अहंनाम । गुणसंभ्रमसंयोगी ॥ ७७ ॥ गुणपरत्वें पृथक विभूति । हरिहरकमलासनाख्य मूर्ति । अभेद होत्साता तत्तच्छक्ति । प्रकाशी निगुती एकात्मा ॥ ७८ ॥ सत्वें ज्यासी म्हणिजे विष्णु । तोचि तमोगुणास्तव ईशानु । रजोगुणें कमलासनु । अभिन्न परि भिन्न गुणयोगें ॥ ७९ ॥ ऐसा गुणोपाधीस्तव त्रिविध । परमात्माचि झाला अभेद । ब्रह्मविष्णुरुद्राभिध । हें उमजे विशद उदाहरणें ॥ १८० ॥ वस्तुतः जैसा शुद्ध स्फटिक । सित कुङ्कुमकज्जलोपाधिक । होतां तदात्मकाचिं निष्टंक । दिसे सम्यक नयनांसी ॥ ८१ ॥ तेथ कुङ्कुमकज्जलोपाधिक । उपाध्यनुरूप अवभासक । असतां अविकार घडे लुक । नैसर्गिक तद्रूप ॥ ८२ ॥ कज्जलीं स्फटिक ठेविला । दिसे केवळ कज्जलगोळा । कीं कुङ्कुमीं सहज स्थापिला । तो भासे सकळां तत्पिण्ड ॥ ८३ ॥ म्हणोनि कुङ्कुमकज्जलोपाधिक । वास्तवस्वरूपाचें सम्यक । पाहतां ज्ञान नेदी तात्काळिक । सन्निकर्षें प्रापक चिरकाळें ॥ ८४ ॥ आणि सितोपाधिक । स्वरूपें । वास्तव प्रकटत्वें उद्दीपे । उपाधियोगें सहसा न लोपे । अमाक्षेपें शुद्ध दिसे ॥ ८५ ॥ तैसा सत्वोपाधिक शुद्ध । कीं सत्वीं ज्ञानशक्ति प्रसिद्ध । यास्तव शान्तिरूप स्वतःसिद्ध । जो स्वयंबोध सन्मात्र ॥ ८६ ॥ सताचा जो केवळ भाव । तें प्रसिद्ध जाणिजे सत्त्व । म्हणोनि सत्त्वस्वरूपगौरव । न लोपी वास्तव विरोधें ॥ ८७ ॥ सूर्य न झांकी सूर्यप्रभा । कीं लहरी न लोपी जेंवि अंभा । कीं अवकाश जयापरी नभा । तेंवि स्वयंभा सत्वगुण ॥ ८८ ॥ आणि इतर जे अंशें असती । ते पूर्णसत्वीं लोप पावती । सामर्थ्यहीन सहजस्थिती । लाहती उपहती

अल्पत्वें ॥ ८९ ॥ या कारणें सत्वोत्कर्षें । स्वयंबोध स्वसंतोषें । गुणातीत विष्णु विशेषें । बोलिलें मुनीशें मूळपदीं ॥ १९० ॥ निर्गुण म्हणोनि प्रकृतिपर । परमपुरुष संविन्मात्र । यास्तव साक्षी सर्वद्रष्टार । परात्पर महाविष्णु ॥ ९१ ॥ तयाचीं त्रय स्थानें चांग । त्रिधा वैकुण्ठें जीं पृथग । भूभाग दुर्गाभाग श्रीभाग । तीं ही साङ्ग अवधारा ॥ ९२ ॥ श्री जे केवळ चिच्छक्ति । मूळप्रकृति पूर्णस्थिति । नैसर्गिक अजस्र चित्तीं । अभेद निश्चिती सन्मात्रीं ॥ ९३ ॥ भास्वतीं अभेद जैसी प्रभा । तेंवि पूर्णाची पूर्णता स्वयंभा । तेथें पूर्णत्वेंच ज्याची शोभा । तो श्रीभाग विष्णु परमात्मा ॥ ९४ ॥ आणि सप्तावरणात्मक ब्रह्माण्ड । तेथींचें सप्तमावरणप्रचंड । महत्तत्वाख्य प्रकृति वाड । जेथ निवाड हिरण्यगर्भ ॥ ९५ ॥ तये महत्तत्वीं स्वप्रकाश । सत्यलोकाहून पर प्रत्यक्ष । दुर्गाभाग दुर्निरीक्ष्य । हे असे साक्ष ग्रन्थान्तरीं ॥ ९६ ॥ तैसेंच ब्रह्माण्डीं अवनीवरी । तृतीय वैकुण्ठ आनंदकारी । क्षीरसमुद्रा भीतरीं । भूभाग निर्धारीं जाणिजे ॥ ९७ ॥ परी हे भूभागादि स्थानभेद । कथिले असती एवंविध । तेथ परमात्मा एक अभेद । पूर्णबोध श्रीविष्णु ॥ ९८ ॥ भद्रासनीं आणि अंतःपुरीं । कीं मृगयायानीं जयापरी । एकचि राजा निज निर्धारीं । भेदकुसरी तेथ नसे ॥ ९९ ॥ महोदधि आणि रत्नाकर । कीं सर्वसाधारण समुद्र । म्हणतां समुद्रचि हा निर्धार । परि स्थानपर अभिधानें ॥ २०० ॥ तेंवि परमात्मा आदिपुरुष । तो श्रीभाग पूर्ण परेश । आणि सृष्ट्यवलंबीं प्रकृतीस । अधिष्ठितां प्रकटलें महत्तत्व ॥ १ ॥ तया महत्तत्वा माजी स्थित । तो दुर्गाभाग सुनिश्चित । आणि सृष्ट्युदयीं ब्रह्माण्डांत । भूभाग म्हणिजे तयासी ॥ २ ॥ ज्याचें क्षीराब्धि अधिष्ठान । जो भक्तां कारणें सावयव पूर्ण । केवळ निर्गुणचि गोठून । अवभासमान सगुणां परी ॥ ३ ॥ जळ गोठूनि होय गार । कीं गंध गोठूनि कर्पूर । घृत गोठूनि कणिकाकार । तेंवि साकार श्रीहरि ॥ ४ ॥ जो साकारचि निराकार । कीं निराकारचि साकार । केवळ ज्ञानविग्रही परात्पर । करुणाकर भक्तांसी ॥ ५ ॥ आणि तमप्रधान शबळ । तमीं अज्ञानशक्ति प्रबळ । जे प्रपंचानुसंधानें केवळ । कथिलें प्राज्ञळ दुचितेपण ॥ ६ ॥ मुळीं मायाधिष्ठित ईश्वर । तोचि अव्यक्तीं बोलिजे रुद्र । पुढें समष्टि-अहंकार । जो शंकर मूर्तिमंत ॥ ७ ॥ दधिसमुद्रीं कैलासभुवन । तेंचि जयाचें वसतिस्थान । जो स्वभक्तां समृद्धिदान । करी तोषून भक्तीनें ॥ ८ ॥ प्रवृत्त्यवलंबें प्रकृति अधिष्ठी । तादात्म्य पाहूनियां समष्टी । अहंपणें आपणा वेंठी । म्हणोनि वाक्पुटीं शुक वदला ॥ ९ ॥ कीं शिव निरंतर मायायुक्त । त्रिलिङ्ग आणि गुणसंवृत । केवळ सत्वरजतमाङ्कित । अहंमूर्त निश्चियें ॥२१०॥ तेथ तमाचा पूर्णोत्कर्ष । अल्पत्वें अन्यगुणांचे अंश । म्हणोनि मूढता विशेष । शिवीं प्रत्यक्ष तमाधिक्यें ॥ ११ ॥ तैसाचि रजोत्कर्षें भारतीवर । जया क्रियेस्तव सृजनाधिकार । म्हणोनि विक्षेप निरंतर । तया समग्र रजोगुण ॥ १२ ॥

श्लोकसम्मतिः ॥ सत्वस्य शान्त्या नो जातु विष्णोर्विक्षेप मूढते । रजस्तमोगुणाभ्यां तु भवेतां ब्रह्मरुद्रयोः ॥१॥

गुणाः सत्त्वादयः शान्त घोरमूढाः स्वभावतः । ब्रह्मविष्णुशिवानां च गुणयन्तृ स्वरूपिणाम् ॥ २ ॥

एवं सत्व रज आणि तमीं । ज्ञानक्रिया द्रव्यनामीं । शक्ति नैसर्गिक प्रथमोद्गमीं । शान्त्यादि-नियमीं विलसती ॥ १३ ॥ जेंवि पूर्णिमा तेथ संपूर्ण चंद्र । चंद्र तेथें ज्योत्स्नाप्रसर । ज्योत्स्ना तेथ निरंतर । असे प्रचुर शीतळता ॥ १४ ॥ कीं संत तेथें असे विवेक । विवेकीं समाधान सम्यक । समाधानीं वसे सुख । सुखीं अचुक विश्रान्ति ॥ १५ ॥ कीं आलस्य तेथें जडता । जडता तेथ निद्रा तत्वता । निद्रा तेथ अचेष्टता । होय सर्वथा जया परी ॥ १६ ॥ कीं आशा तेथ प्रबळ दुःख । दुःख तेथें वाटे शोक । शोकीं संमोह अचूक । असे निष्टंक ठेविलासा ॥ १७ ॥ तेंवि सत्व तेथेंचि केवळ ज्ञान । ज्ञान तेथेंचि शान्ति संपूर्ण । शान्ति जेथें तो पुरुष निर्गुण । विकारहीन ओळखिजे ॥ १८ ॥ तम तेथें चि अज्ञान । अज्ञानीं मूढत्व सघन । मूढत्वीं सबळ अभिमान । अभिमानीं सगुण तो पुरुष ॥ १९ ॥ रज तेथेंचि क्रियाशक्ति । क्रिया तेथ विक्षेप निश्चिती । ऐसी हे त्रिगुणाची स्थिति । विविधा रीती स्वाभाविक ॥ २२० ॥ यास्तव संपूर्ण सत्व विष्णु । पूर्णबोधें सुशान्ततनु । विक्षेपमूढता त्या लागून । सकारण न होती ॥ २१ ॥ आणि रजस्तमात्मक ब्रह्महर । त्यां विक्षेपमूढता निरंतर । हा गुणवैशिष्ट्यप्रकार । कथिला साचार यथास्थित ॥ २२ ॥ जेंवि सरिताप्रवाहीं पोहणार । तया अभीष्ट जाणें परपार । परंतु प्रवाहबळें वाहणें फार । अनुपायें प्रवाहवशवर्ती ॥ २३ ॥ तेंवि सत्वांशें ज्ञानसंपन्न । परि प्राधान्यें जे विशिष्ट गुण । तच्छक्तिबळें तदधीन । होय वर्तन आवश्यक ॥२४॥ गुणयोगें गुणाभिनिवेश । धरितां होय तत्प्रकाश । तदनुकरणें आपणांस । जे विशेष आविष्करिती ॥ २५ ॥ एऱ्हवीं मायोपाधिक सर्वेश्वर । तदंश हिरण्यगर्भीं देवताचक्र । त्या स्वयंभू स्वरूपसाक्षात्कार । मुळींच अविसर तन्मयता ॥ २६ ॥ त्यासी गुरुसंप्रदायक्रम । ज्ञानोपलब्धीसी नाहीं परम । स्वयेंचि संप्राप्त निजात्मधाम । स्वसुख सुगम सर्वदा ॥ २७ ॥ याज्ञवल्क्यासी बृहदारण्य । सूर्योपदिष्ट हें प्रमाण । कीं भृगूसी प्रबोधी वरुण । उपनिषत् पूर्ण भृगुवल्ली ॥ २८ ॥ एवं सुर समष्टिकरणरूपी । अनुभवीं सर्वदा निर्विकल्पी । परि पदाभिमानें प्रवृत्ति बोपी । माजी साक्षेपी यादसवत् ॥ २९ ॥ नियुक्तपदाचा अभिमान । धरूनि वर्तती साधारण । भोग भोगिती स्वसिद्धिजन्य । केवळ निमग्न होवोनी ॥२३०॥ जेंवि ज्यास जो अभिनिवेश । तेचि प्रतिपादी विशेष । तेंवि इन्द्रादि जे इंद्रियाधीश । देती भजकांस स्वसंपदा ॥३१॥ एवं षोडशविकार जे कथिले । पृथक चंद्रादिनामाथिले । त्यांसी जे भजती भावबळें । तत्संपदा वाहिले पावती ॥ ३२ ॥ जैसी जयाची उपाधि । तदनुरूप भजक सिद्धि । पावती ते विज्ञानोपलब्धि । न पवती कधीं साधारण ॥ ३३ ॥ मा सर्व संपत्तीचें अधिष्ठान । द्रव्यशक्तिकृत तमोगुण । तमोगुणी पूर्ण गौरीरमण । संपत्तिप्रदान करी भजकां ॥ ३४ ॥ एथ संदेह नसेचि कांहीं । प्रकट उमजे सर्वांसही । म्हणोनि विशेषें भोग नवाई । सत्वर पावती शिवभक्त ॥ ३५ ॥ आणि क्वचिन्मोक्षार्थी जे भजती । ते चिरकाळें मोक्ष पावती । कीं सत्वांशें ज्ञानशक्ती । असे निश्चिती सामान्य ॥ ३६ ॥ केवळ शान्तीचें अधिष्ठान । ज्ञानशक्ती स्तव सत्वगुण । तो पूर्णसत्व रमारमण । करी मोक्षदान निजभक्तां ॥ ३७ ॥ तैसी च क्वचिद्भोगसंपत्ति । स्वभक्तांसि दे लक्ष्मीपति । कीं अंशत्वें तमाप्रति । असे निश्चिती अधिष्ठान ॥ ३८ ॥ प्रमादकारक भोगवैभव । स्वभक्तां नेदी यास्तव । ज्ञानवैराग्यगौरव । देऊनि वास्तव

प्रबोधी ॥ ३९ ॥ तथापि सर्वकामनाबीज । स्वभक्तांचें पाहूनि सहज । उत्कृष्ट संपत्ति त्यां दे अज । परी विवेकबोजपूर्वक ॥ २४० ॥ विवेकवैराग्ययोगें । वास्तवज्ञानानुरागें । मोहित न होती भोगें । संतसंगें सुखावती ॥ ४१ ॥ ध्रुव प्रह्लाद अंबरीष । इत्यादि उत्कृष्ट संपत्तीस । भोगितां न झाले सदोष । उत्पथावेश न धरूनी ॥ ४२ ॥ यज्ञदानादि स्वधर्माचरणें । निष्कामभावें नवविध भजनें । सज्जन-ब्राह्मणगुरुतोषणें । हरी कारणें ते भजले ॥ ४३ ॥ विवेक विरागी भजनानुरागी । सहसा न रमती विषयसंगीं । स्वधर्म आचरती आस्था चांगीं । उदास भोगीं हरिभक्त ॥ ४४ ॥ हें असो जरी म्हणाल । तमोगुणी जासनील । तरी कां असे अभेदशीळ । हरि प्राञ्जळ भोगयुक्त ॥ ४५ ॥ तरी हा ऐसा अभिप्राय । जेथ अवान्तर गुण प्राप्त होय । तो मूळ गुणाहूनि विलसे बाह्य । परि साधन होय मूळगुण ॥ ४६ ॥ यास्तव प्राधान्यें शंकर । तमोगुणी हा निर्धार । तेथ सत्वांश अवान्तर । कर्पूरगौर म्हणऊनी ॥ ४७ ॥ बाह्य तनुभा धवळ चांग । भोगत्यागादि हें सत्वलिंग । बीभत्साचरणाद्यनेग । जडता मोह तोप रोष ॥ ४८ ॥ हे अंतरंगतमोविकार । बाह्य प्रकटती विशेषाकार । सत्योपमर्दें तमप्रचुर । शिवीं निरंतर उमटती ॥ ४९ ॥ क्षुब्ध अथवा सुप्रसन्न । अविलंबें अल्प गुणावगुण । पाहूनि होय न विचारून । हितकारण भक्तांचें ॥ २५० ॥ आणि सत्वगुणात्मक श्रीहरी । तेथ अंशत्वें तम निर्धारीं । तल्लिङ्ग मिरवी बाह्याकारीं । श्याम साजिरी निजकान्ति ॥ ५१ ॥ महत्सिद्धि उत्कृष्ट भोग । सर्व संपत्तीचा योग । बाह्यसंभ्रम हा तमःप्रसंग । द्रव्यशक्तिक जाणिजे ॥ ५२ ॥ शान्ति क्षमा आणि ज्ञान । करुणा-पाङ्गविवेकाचरण । हें अंतःस्थ सत्वलक्षण । तमोपमर्दनपूर्वक ॥ ५३ ॥ म्हणोनि अंतरंग पूर्णबोधें । आसक्त नोहे समृद्धिवेधें । साक्षीभूत परमानंदें । प्रकृतिरोधें गुणातीत ॥ ५४ ॥ गुणातीत म्हणोनि निर्गुण । त्या निर्गुणत्वाचें लक्षण । पूर्वीं कथिलें विस्तारून । तो ब्रह्म पूर्ण श्रीहरी ॥ ५५ ॥ ऐसिया निर्गुणा हरीतें । जे जे भजती प्रेम आतें । त्यांसी नेदी वैभवातें । जाणोनि हितातें तयांच्या ॥ ५६ ॥ ज्ञान वैराग्य निष्कामप्रेम । देवोनि गौरवी भक्तोत्तम । जेणें पावती मोक्षधाम । पुनरागमनविवर्जित ॥ ५७ ॥ ऐसे हे हरिहर समर्थ । भक्तानुग्रही श्यामशेत । अन्योन्यगुणांतें मिरवीत । जिवलग अत्यंत अभेदें ॥ ५८ ॥ हरि अंतरीं पूर्णसत्व । बाह्य मिरवी तमःप्रभाव । हर अंतरीं तमःस्वभाव । बाह्यभाव सत्वगुणी ॥ ५९ ॥ म्हणूनि हरीचे हृदय हर । आणि हराचें हृदय श्रीधर । परस्परें तत्तदाकार । अभेद मित्र अनादि ॥ २६० ॥ हे उभयतांची अभेद विविक्षा । उमजे सर्वज्ञां विचारदक्षां । अल्पज्ञ धरूनि तत्पक्षा । सामान्यविशेषा मानिती ॥ ६१ ॥ ते मूर्ख अत्यंत मतिमंद । न जाणती तत्व अभेद । मुळीं एकचि वस्तु त्रिविध । हरिहराभिधविरिंची ॥ ६२ ॥ तेथ शान्ति मूढता विक्षेप । हे गुण स्वभावारोप । हरिहरभक्तांचा वाद अमूप । कलहरूप तो व्यर्थ ॥ ६३ ॥ सत्वें ज्ञानाचा उत्कर्ष । तेणें प्रकृतीसह निरास । अच्युतीं गुणाचा निःशेष । म्हणोनि रमेश निर्गुण ॥ ६४ ॥ तम अज्ञाना अधिष्ठान । तें प्रकृतीसह पोशी गुण । यास्तव शक्तियुक्त सगुण । गौरीरमण निरंतर ॥ ६५ ॥ शंकर सगुणत्वास्तव । भजकां विशेषें दे वैभव । हरि निर्गुणत्वें यास्तव । निजानुभव दे भक्तां ॥ ६६ ॥ एवं सगुणभजकां गौणप्राप्ती । निर्गुणभजक निर्गुण होती ।

ऐसी येथील व्याख्यानरीति । यथानिगुती निरूपिली ॥ ६७ ॥ मूळश्लोकाचा अभिप्राय । केवळ बीज-वृक्षप्राय । विस्तारिला यथान्वय । शुकोक्त सोय विवरूनी ॥ ६८ ॥ ना तरी दुधा माजी धारवणी । घालूनि विरस फारपणीं । करिजे तैसें न वदली वाणी । मुळींची सोडूनि व्यासोक्ति ॥ ६९ ॥ सुज्ञां संज्ञामात्रें कळे । तेथ गुंतोनि पडती अबळें । तेंचि साद्यंत कथितां बोलें । उमजे वहिलें कीं ना हो ॥ २७० ॥ संज्ञेनें कथिली अक्षमाळा । अभिज्ञा तदर्थ उमजला । पृथग्वर्णोच्चारें अबळां । उमजे तद्वद्विस्तार हा ॥ ७१ ॥ हेंचि विस्तारिलें प्रमेय । पुढें उदाहरण इतिहासमय । शुकें कथिलें तेथें विदित होय । निःसंदेह अध्यायांत ॥ ७२ ॥ तैं द्वैपायनिभाषण । परीक्षिति करी श्रवण । श्रोतीं होऊनि सावधान । एकाग्रमनें परिसावें ॥ ७३ ॥ शुक म्हणे राया भारता । पूर्वीं हाचि प्रश्न रुक्मिणीकान्ता । युधिष्ठिरें केला तत्त्वता । जो त्वां आतां मज केला ॥ ७४ ॥

निवृत्तेष्वश्वमेधेषु राजा युष्मत्पितामहः । शृण्वन्भगवतो धर्मानपृच्छदिदमच्युतम् ॥ ६ ॥

तो कैं केला म्हणसी प्रश्न । तरी तें ऐकें सावधान । अश्वमेधसंपादन । यथाविधान जें केलें ॥ ७५ ॥ गोत्रजहननादि महादोष । तन्निवृत्त्यर्थ अश्वमेधास । त्रिवार संपादिलें सावकाश । पुण्य-विशेष इच्छूनी ॥ ७६ ॥ ते अश्वमेध झाले असतां । तव पितामह कुरुभूभर्ता । राजा युधिष्ठिर तत्त्वता । अवघी चिन्ता निरसूनी ॥ ७७ ॥ षड्गुणैश्वर्यसंपन्न । भगवान्देवकीनंदन । भक्तानुकंपी सर्वज्ञ । जो श्रीकृष्ण परमात्मा ॥ ७८ ॥ तया पासूनियां निजधर्म । श्रेयस्कर जो मोक्षद परम । ऐकत होत्साता सप्रेम । पूर्णकाम स्वस्थमनें ॥ ७९ ॥ सहजीं सहज प्रसंगोपात्त । त्या अच्युताप्रति निश्चित । पुसता झाला आतेभूत । हेंचि निश्चित कळावया ॥ २८० ॥ ज्याचें त्यास जें रहस्य कळे । तें सहवासिया अर्ध विवळे । इतरां संदिग्ध कळे न कळे । तर्कबळें कांहींसें ॥ ८१ ॥ तो स्वयेंचि विद्यमान । असतां पुसतां त्यालागून । स्पष्ट तन्मुखें वर्तमान । कळे संपूर्ण निःसंशय ॥ ८२ ॥ यास्तव भगवन्ताचें शीळ । कीं भक्तां वैभव नेदी केवळ । हें त्याचें त्यासीच निर्मळ । पुसिलें प्रेमळ धर्मराजें ॥ ८३ ॥ मग तो परिसोनियां प्रश्न । प्रभु समर्थ श्रीभगवान । त्या श्रवणेच्छु कारणें आपण । बोलता सकरुण जाहला ॥ ८४ ॥

स आह भगवांस्तस्मै प्रीतः शुश्रूषवे प्रभुः । नृणां निःश्रेयसार्थाय योऽवतीर्णो यदोः कुले ॥ ७ ॥

तो तूं कैसा म्हणसी हरि । जे तापत्रयें संतप्त भारी । मनुष्यदेही मोक्षाधिकारी । प्रपंचदोरीं अतिबद्ध ॥ ८५ ॥ तयां नरांसी निःश्रेयसार्थ । द्यावया कारणें विभु समर्थ । यदूच्या कुळीं कृपावंत । कमलाकान्त अवतरला ॥ ८६ ॥ निःश्रेयस म्हणिजे कल्याण । कल्याणार्थ तो मोक्ष जाण । मर्त्य जनांसी व्हावा पूर्ण । यास्तव अवतीर्ण भक्तपति ॥ ८७ ॥ ऐसा करुणानिधि श्रीकृष्ण । ऐकूनि पाण्डुपुत्राचा प्रश्न । परम प्रीतिवंत होवून । बोलिला वचन कृपेनें ॥ ८८ ॥ आधींच आवडता निजसखा । आणि

आवडती गोष्टी पुसे कां । तेथें स्नेहभरें वक्तृत्वसुखा । कवण लेखा पूर्ण करी ॥ ८९ ॥ धर्म केवळ प्रेममूर्ति । सत्यवादी पवित्रकीर्ति । वास्तव गोष्टी तया प्रति । कथी श्रीपति तें ऐक ॥ २९० ॥

॥श्रीभगवानुवाच ॥ यस्याहमनुल्लागृमि हरिष्ये तद्धनं शनैः । ततोऽधनं त्यजन्त्यस्य स्वजना दुःखदुःखितम् ॥८॥

म्हणे जया मी शेषशायी । पूर्णकृपेनें अनुग्रहीं । तया सुख द्यावया अक्षयी । उपाधि सर्व ही तोडीतसें ॥ ९१ ॥ सर्व उपाधींचें मूळ । राया धनचि असे केवळ । जेणें विषयभोग पुष्कळ । संग बाष्कळ जोडे पैं ॥ ९२ ॥ तया विषयसेवनासाठीं । पडे परमार्थाची तुटी । मग जन्ममरणें वोखटीं । कल्पकोटी होताती ॥ ९३ ॥ यास्तव तयांचें संपूर्ण धन । हळु हळु करितसें हरण । केवळ निर्धन झालिया जाण । विषयसेवन घडेना ॥ ९४ ॥ धान्याचि नसतां पक्वान्न । कीं वृक्ष नसतां फळपुष्पग्रहण । कीं सुवर्ण नसतां अळंकरण । होय कोट्टन संप्राप्त ॥ ९५ ॥ तेंवि धनचि नाहीं हातीं । तरी काय विषय सेवील माती । म्हणोनि धनाची अपहृती । करितां खंती बहु करी ॥ ९६ ॥ देहादिइन्द्रियां अहंपणें । केवळ आत्मत्वें कवळिलें तेणें । त्यातें सौख्य विषयसेवनें । तें न घडतां प्राणें तळमळी ॥ ९७ ॥ जैसा जीवनेंवीण मासा । कीं प्राणरोधें जीवदशा । तैसा तळमळी आपैसा । दरिद्रें क्लेशा बहु पावे ॥ ९८ ॥ जनीं अभिमानें संसार । महत्त्वें केला निरंतर । तैसा न घडतां चिन्तातुर । धरूनि फार जनलज्जा ॥ ९९ ॥ एवं दुःखें करूनि दुःखित । धनरहित शोकाभिभूत । ऐसी दशा झालिया प्राप्त । तैं कैंचा स्वार्थ सुहृदांचा ॥ ३०० ॥ स्वार्था निमित्त झाले वल्लभ । ते स्वार्थ न घेतां पावती क्षोभ । मग मोडूनियां स्नेहकोंभ । स्वजन निर्लोभ त्या त्यजिती ॥ १ ॥ जेंवि सरोवरीं असे जळ । तों वरी जळाशयीं केवळ । सारसादि सेवनशीळ । त्यजिती सकळ जळ नसतां ॥२॥ कीं फळपुष्पादिपर्णयुक्त । जों वरी असे द्रुम निश्चित । पक्षी राहती तों पर्यंत । टाकिती निभ्रान्त खांकरां ॥ ३ ॥ कीं कमळीं असे सुगंध । तों वरीच स्नेहें विविध । गुंजारवती ते षट्पद । त्यजिती आमोद गेलिया ॥ ४ ॥ तेंवि स्वार्था साठीं सेवितां । ते स्वजन अवघे त्यागिती । ऐसी निर्धन झालिया गति । होय निश्चिती तयांची ॥ ५ ॥ येथ श्रोते म्हणती जरी । भगवत्प्रसादाधिकारी । त्यांसी भगवान् निर्धन करी । कें सभाग्य तरी ध्रुवादिक ॥ ६ ॥ याचें ऐसें असे प्रत्युत्तर । कीं हरिभक्तीचे दोन्ही प्रकार । एक बहुतां जन्मीं भक्तिपर । कृपापात्र हरीचें ॥ ७ ॥ दुसरें विद्यमानजन्मीं । विषयसेवन परमकामी । परी कांहीं पूर्वसुकृतोद्गमीं । कमलास्वामी अनुग्रही त्यां ॥ ८ ॥ यां माजी पूर्वानुग्रहीत हरीचे । प्रारब्धानुवशें जन्मती साचे । उत्कृष्ट भजनचि त्यांतें रुचे । कोड विषयांचें न करिती ॥ ९ ॥ त्यांसी जन्मानुजन्मीं सद्विवेक । भगवत्कृपेनें अधिकाधिक । तैसेंचि पुण्य ही निष्कळंक । होय अनेक सहजस्थिति ॥ ३१० ॥ तया सुकृताचें ऊर्जित फळ । पूर्ववासनाबीज समळ । जाणूनियां लक्ष्मीलील । देत पुष्कळ संपत्ति ॥ ११ ॥ संपत्तियोगें नाना विलास । न इच्छितां पावती विशेष । परि स्वसुखीं निमग्न बहुवस । म्हणूनि निःशेष अनासक्त ॥ १२ ॥ संप्राप्तविषयीं न रमती । निरंतर भगवत्स्वरूप

चिन्तिती । ऐसियां बाधक न होय संपत्ती । जेंवि सूर्याप्रती मृगजळ ॥ १३ ॥ मग प्रारब्धक्षयान्तीं निजधाम । पुनरावृत्तिवर्जित परम । अभेदबोधें ते निस्सीम । पावती निष्काम पूर्णत्वें ॥ १४ ॥ यासी संमत भगवद्गीते- । माजी किम्बहुना जन्मनामंते । ज्ञानवान्मांप्रपद्यते । जाणोनि सर्व हें वासुदेव ॥ १५ ॥ ऐसे चरमदशेचे भक्त । पूर्वसाधनासिद्ध निश्चित । दुर्लभची विरळा गत । विकाररहित सत्पुरुषा ॥१६॥ ते श्रीमंत अथवा अकिञ्चन । त्यां न होय कधीं विषयभान । वृष्टि अनावृष्टि समान । समुद्रा पूर्ण स्वतोयें ॥ १७ ॥ ऐसिया भक्तकोटी माजी । प्रह्लादध्रुवादिकांची राजी । संपत्ती वेंचूनि धर्मकाजीं । सप्रेम आजि एकनिष्ठ ॥ १८ ॥ आतां द्वितीय जे कां पूर्वसुकृति । किंचित भगवंतीं अनुसरती । स्वरूप-समाधानेंवीण चित्तीं । न सुटे आसक्ति विषयांची ॥ १९ ॥ विद्यमान जे जे विषय । भोगितां मानसतृप्ति न होय । म्हणूनि करिती बहु व्यवसाय । क्लेशमय मग होती ॥ ३२० ॥ परंतु कांहीं भक्तिलेश । पूर्वार्जित अंतरास । म्हणोनि अधिकारी कृपेस । करी परेशानुग्रह त्यां ॥ २१ ॥ ज्या विषयांसाठीं भोगिती कष्ट । ज्यांस्तव विषयवासना बळिष्ठ । ते विषयासहित संग दुष्ट । तोडी परमेष्ट श्रीहरि ॥ २२ ॥ जैसा रोगें झाला क्षीण । तो स्वेच्छा भक्षितां अन्न । अधिकचि क्लेश पावोन । पुष्ट अरुग्ण नव्हे कदा ॥ २३ ॥ तयाप्रति सद्वैद्य दैवें । दिव्य मात्रा देऊं पावे । तैं पथ्योपचार आघवे । तोडी स्वभावें तयाचे ॥ २४ ॥ तेंवि उपतिष्ठावया स्वबोध । श्रीपरमात्मा परम बुध । विषयसंग तोडी विविध । हें वर्म शुद्ध येथींचें ॥ २५ ॥ असो शंकानिवृत्तीसाठीं । हें कथिलें विस्तार परिपाटीं । यावरी श्रीकृष्ण पाण्डवा गोठी । कथी वाक्पुटीं तें ऐका ॥ २६ ॥ म्हणे अगा हे पाण्डु-नंदना । जया करूं इच्छीं अनुग्रहणा । तयाच्या करीं धनापहरणा । विषयवासना तुटावया ॥ २७ ॥ तो हळु हळु झालिया निर्धन । तया सांडूं पाहती स्वजन । तेणें दुःखित होत्साता विषयाचरण । इच्छूनी प्रयत्न पुनः करी ॥ २८ ॥ ते प्रयत्न झालिया व्यर्थ । त्रासूनि राहतां श्रमित । तंव स्वजन अवदेती बहुत । करूनि लज्जित निखंदिती ॥ २९ ॥ म्हणती वडील कैसे नांदले । तिहीं जें नांव रूप केलें । तें अभिमानें राखिलें । पाहिजे वहिलें आपण ॥ ३३० ॥ पुरुषें न टाकावा उद्योग । उद्यां देव फेडील पांग । डोहाचे ठायीं डोह सांग । पडे अव्यंग मागुता ॥ ३१ ॥ इत्यादि भ्रामकां वचनीं । सज्ज होय तो धनार्जनीं । परि ममानुग्रहास्तव निदानीं । उद्योगकरणी मोघ घडे ॥ ३२ ॥ एवं स्वजनेच्छा करी यत्न । ते निष्फळ झालिया संपूर्ण । त्या टाकिती स्वार्थी स्वजन । मग तो निर्धन होय दुःखी ॥ ३३ ॥ ऐशियावरी अनुग्रहण । कैसें करीं मी कृपाघन । तें अवधारीं सावधान । कुरुकुल-मंडनधुरंधरा ॥ ३४ ॥

स यदा वितथोद्योगो निर्विण्णः स्याद्धनेहया । मत्परैः कृतमैत्रस्य करिष्ये मदनुग्रहम् ॥ ९ ॥

तो त्या प्रकारींचा निर्द्धन । स्वजनत्यक्त दुःखितमन । उद्योग केले धनेच्छेकरून । झाले फळ-हीन ॥ ३५ ॥ जेव्हां निःशेष होय उदासीन । संसारीं विश्रान्ति न पवून । प्रापंचिकासीं

संभाषण । न करी लाजून तत्संगा ॥ ३६ ॥ प्रपंचीं धनवंतांसीं प्रीती । धरूनियां बहुमान करिती । हिणावितो कुशब्दीं ॥ ३७ ॥ सुरंग सुगंधित सुमन । लालस सेवितो तोषून । सुगंधरहिता उपेक्षून । टाकिती ते जन जया परी ॥ ३८ ॥ ऐसें जाणोनिया मानसी । सहसा न इच्छी तत्संगासी । मग निरभिमानी विवेकराशी । जे सर्वांसीं समान ॥ ३९ ॥ जयांसी राव अथवा रंक । शत्रु मित्र निन्दक स्तवक । आप्त कीं परकीय अनेक । सम सम्यक् मदूप ॥ ३४० ॥ जे आशे पाशनि सुटले । जे संसार-सुखासी विटले । जे स्वरूपसुखा विनटले । जयासि आटलें भववारि ॥ ४१ ॥ जे क्षमाजळ अकूपार । कीं ज्ञानतेजें सहस्रकर । संतापहारक सुधाकर । प्रबोधामृतसिञ्चनें ॥ ४२ ॥ जे करिती सप्रेम भजन । सर्वदा स्वधर्मपरायण । विवेकवैराग्यसंपन्न । सगुणनिर्गुणाभिवेत्ते ॥ ४३ ॥ ऐसे जे मत्पर केवळ । साधुजन दीनदयाळ । त्रितापतप्तां सुशीतल । करिती प्राञ्जळ कृपेनें ॥ ४४ ॥ मग तिहींसीं करी मैत्री । निरंतर तत्संग भावें धरी । त्यां हितकर मानी निर्धारीं । प्राण ज्या परी देहातें ॥ ४५ ॥ आधींच संसारीं हा त्रस्त । आणि संत स्वभावें विरक्त । बोधिती प्रपंच नाशवंत । नित्यानित्यविवेकें ॥ ४६ ॥ साधु सर्वदा स्वयें तृप्त । भक्तिज्ञानवैराग्ययुक्त । प्रतिपादिती शुद्ध वेदान्त । निरसनि द्वैत मायिक ॥४७॥ जंव जंव साधुमुखें श्रवण । करी तंव तंव सुखावे पूर्ण । केवळ अनन्यभावें शरण । होऊनी तनुमन समर्पी ॥ ४८ ॥ मग जीवें भावें आवडी । मद्भक्तांची धरी निरवडी । श्रवणमननाची निज गोडी । लागली प्रौढी म्हणोनियां ॥ ४९ ॥ ऐसा मद्भक्तांसी कृतमैत्र । विरक्त शुद्धात्मा पवित्र । ममानुग्रहासी सत्पात्र । करीं मदनुग्रह मी त्यासी ॥ ३५० ॥ तोचि अनुग्रह कैसा । म्हणसी जरी तूं नरेशा । तरी वसवूनि श्रवणदेशा । ऐकें रहस्या एकाग्र ॥ ५१ ॥

तद्ब्रह्म परमं सूक्ष्मं चिन्मात्रं सदनन्तकम् । अतो मां सुदुराराध्यं हित्वान्यान्भजते जनः ॥१०॥

जें सर्वीं असोनि नाढळे । गगनोपमेसी नाकळे । जेथ मनाचें लक्ष पांगुळे । निगम बरळे जें कथितां ॥ ५२ ॥ ऐसें परमसूक्ष्म सनातन । ज्ञानाज्ञानातीत ज्ञान । तेंचि ज्याचें स्वरूप पूर्ण । वदिजे चिन्मात्र म्हणोन ॥ ५३ ॥ सत्तामात्रें प्रकृति जड । चेष्टक साक्षित्वें अखंड । प्रकृतिविलयीं सुरवाड । न मोडे वाड जयाचा ॥ ५४ ॥ कालत्रयीं अबाधित । विकाररहित शाश्वत । पूर्णत्वें ज्या नाहीं अंत । अतयव निश्चित अनंत ॥ ५५ ॥ एवं परमसूक्ष्म चिन्मात्र । सदनंतक जें स्वतंत्र । तें ब्रह्म नित्य निर्विकार । करीं मी पवित्र तयासी ॥ ५६ ॥ या प्रकारें गा कुरुभूपति । ममनुग्रहाची ख्याती । आधि उपाधि तोडूनि पुरती । मद्भक्तसंगती तदनंतर ॥५७॥ सत्संग झालिया नंतर । मी अंतरात्मा परात्पर । अभेद आत्मावबोधसार । करूनि निरंतर चित्सुख दे ॥ ५८ ॥ असज्जडदुःखी देहात्मभाव । निरसनि सच्चिदानंद वास्तव । तयासी करीं मी वासुदेव । जयासी स्वयमेव अनुग्रहीं ॥५९॥ ऐसें ममानुग्रहफळ । प्रारंभीं क्लेशमय केवळ । परिणामीं सुखाचेंचि निखळ । आनंद बहळ अक्षय ॥३६०॥ जैसें दिव्यौषध सेवितां । आरंभीं त्रासद तत्वता । निदानीं करी निरामयता । तैं वोहट समस्तां क्लेशांसी ॥ ६१ ॥

हें नेणती मूर्ख मतिमंद । म्हणोनि मातें टाकूनि प्रसिद्ध । अन्य देवांतें भजती विशद । कीं मी दुराराध्य यापरी ॥ ६२ ॥ अतितरदुःखें करूनि जाण । होय माझें आराधन । चिरकाळ साहतां क्लेश गहन । मत्प्राप्ति पूर्ण तैं जोडे ॥ ६३ ॥ ऐसा मी चिरकाळें सुप्रसन्न । होवोनि निर्विषयसुख दे पूर्ण । यास्तव सुदुराराध्य जाणोन । मज टाकून अनंजन भजती ॥ ६४ ॥

ततस्त आशुतोषेभ्यो लब्धराज्यश्रियोद्धताः । मत्ताः प्रमत्ता वरदान्विस्मरन्त्यवजानते ॥ ११ ॥

त्या नंतरें ते अतिसत्वर । जे प्रसन्न होती सुरवर । त्यां आशुतोषां पासूनि नर । पावती स्वेच्छा राज्यश्री ॥ ६५ ॥ आधींच सकाम अंतःकरण । स्वेच्छा ऐश्वर्य उपलभ्यमान । झालिया होती उद्धत पूर्ण । विषयाचरण बहु करिती ॥ ६६ ॥ राजश्रीमदें मातती । प्रकर्षें ते उन्मत्त होती । शेखीं वरदातें ही नाठविती । फिरूनि करिती अवज्ञा ॥ ६७ ॥ जिंहीं प्रसन्न होवोनि वर । कृपेनें दिधले ऊर्जितकर । तयांचा विसरूनि कृपोपकार । करिती प्रतिकार कृतघ्नवत् ॥ ६८ ॥ ईश्वरोऽहमहं भोगी । सिद्ध मी बळिष्ठ सर्वांगीं । सुखी आढ्य पवित्र सुभगीं । मज सम त्रिजगीं कोण असे ॥ ६९ ॥ ऐसा देहाभिमान वाढे । ऐश्वर्यभोगाच्या सुरवाडें । स्वेच्छा विषयसेवनें मोडे । विहित निवार्डे आचरण ॥ ३७० ॥ मज दुराराध्या जाणोनि त्यजिती । अन्यां आशुतोषांतें भजती । तयांची ऐसी विपरीत स्थिती । मद्भक्त निश्चिती न तैसे ॥ ७१ ॥ शुक म्हणे राया उमजें खूण । युधिष्ठिराचा ऐकूनि प्रश्न । श्रीकृष्णें विशद निरूपण । कथिलें व्याख्यान तें केलें ॥ ७२ ॥ हा अच्युतवाक्यफळाचा रस । जिज्ञासाक्षुधार्त्त कौरवेश । युधिष्ठिर सेवितां तृप्ति तोष । पावूनि निःशेष सुखावला ॥ ७३ ॥ इतुक्या कथनाचें तात्पर्य । ऐक आतां निःसंशय । थोडेंन कथितों सूत्रप्राय । कोमळहृदय भो नृपति ॥ ७४ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ शापप्रसादयोरीशा ब्रह्मविष्णुशिवादयः । सद्यःशापप्रसादोऽङ्ग शिवो ब्रह्मा न चाच्युतः ॥ १२ ॥

शापप्रसादांचें ईश । विधिहरिहरादि प्रत्यक्ष । त्यां माजी सद्यचि कोप तोष । करिती विशेष विधिहर ॥ ७५ ॥ अल्पापराध अथवा भजन । देखूनि शापप्रसाददान । कारक होती विधिईशान । अच्युत जाण न तैसा ॥ ७६ ॥ कीं भूतभविष्यद्वर्तमान । विचारज्ञ कमलारमण । सहसा उतावळी न करून । भजककल्याण पूर्ण चिन्ती ॥ ७७ ॥ शंभु दीर्घ विवेकेंविना । न जाणोनि तदंतःकरणा । सत्वर प्रसन्न स्वभक्तगणा । होऊनि व्यसना मग पावे ॥ ७८ ॥ येचि विषयीं उदाहरण । देत असती विबुध जन । या पुरातनेतिहासातें जाण । तें तूं संपूर्ण अवधारीं ॥ ७९ ॥

अत्रैवोदाहरन्तीममितिहासं पुरातनम् । वृकासुराय गिरिशो वरं दत्वाऽऽप सङ्कटम् ॥ १३ ॥

वृकासुरा कारणें वर । देवोनियां पार्वतीवर । संकट पावता झाला घोर । जें अनावर निवारणा

॥ ३८० ॥ जरी तूं म्हणसी परीक्षिति । वृकासुर कोणाची संतति । कैसें संकट उमापति । पावला त्याप्रति वरदानें ॥ ८१ ॥ तरी तो सविस्तर इतिहास । तुज निवेदितों सावकाश । परिसिलिया अशेष । संशयपुरास निस्तरसी ॥ ८२ ॥

वृको नामासुरः पुत्रः शकुनेः पथि नारदम् । दृष्ट्वाशुतोषं पप्रच्छ त्रिषु देवेषु दुर्मतिः ॥ १४ ॥

वृक हा नामें जाण असुर । पुत्र शकुनीचा साचार । दुर्मतिविषाचें आगर । दुर्गुणाकार मूर्तिमंत ॥ ८३ ॥ तो देवताप्रसादें अभिनव । स्वेच्छा ऐश्वर्यप्राप्तास्तव । तया कारणें स्वयमेव । जातां अपूर्व घडलें पैं ॥ ८४ ॥ अकस्मात् मुनि नारद । मार्गीं चालतां स्वच्छंद । तयातें देखोनियां विशद । पुसे सर्वज्ञ जाणोनी ॥ ८५ ॥ म्हणे अटवीं अटका । पथदर्शक कीं रुग्णा सद्वैद्य चिकित्सक । ना तरी नदीनिस्तरका तारक । दैवें सम्यक जेंवि भेटे ॥ ८६ ॥ तेंवि मी अत्यंत चिन्तातुर । तोषवावया वरिष्ठ सुर । ऐसिये समयीं दैवतंत्र । मिनलासी पवित्र दयाळुवा ॥ ८७ ॥ मम दैवाब्जमुकुला प्रभाकर । मनोरथवना जीवनाकार । साधनग्रावा वैरागर । गमसी मुनिवरवरिष्ठा ॥ ८८ ॥ तूं सर्वज्ञ सर्वग कृपामूर्ति । त्रिजगीं प्रसिद्ध तुझी कीर्ति । तरी जेणें निरसे मम चित्तार्त्ति । ते यथार्थ उक्ति मज सांगें ॥ ८९ ॥ कीं ब्रह्मा विष्णु महेश्वर । त्रिदेवां माजी करुणाकर । भजतां संतुष्ट अपार । होय सत्वर कोण तो ॥ ३९० ॥ ऐसें वृकासुराचें वचन । ऐकोनि देवर्षि सर्वज्ञ । जाणोनि सकाम अंतःकरण । करी भाषण तदुचित ॥ ९१ ॥

स आह देवं गिरिशमुपाधावाशु सिध्यसि । योऽल्पाभ्यां गुणदोषाभ्यामाशु तुष्यति कुप्यति ॥ १५ ॥

म्हणे अगा ये वरदेप्सका । भजें तूं कैलासनायका । तुझा मनोरथतरु आम्रिका । फळेल नेटका सत्वर ॥ ९२ ॥ अल्पगुणदोषें लौकरी । सकोप संतुष्ट त्रिपुरारी । होय यास्तव तद्भक्ति करीं । लाहसी झडकरी तपःसिद्धि ॥ ९३ ॥ म्हणसी यदर्थीं प्रमाण काय । तरी पूर्वीं जयासि गौरीप्रिय । देता झाला विपुलैश्वर्य । तें कथितों प्रत्यय बाणावया ॥ ९४ ॥

दशास्यबाणयोस्तुष्टः स्तुवतोर्बन्दिनोरिव । ऐश्वर्यमतुलं दत्वा तत आप सुसङ्कटम् ॥ १६ ॥

दशवदन जो रावण । आणि बळीचा पुत्र बाण । त्या वरी तोषला पंचानन । अल्प तद्गुण देखोनी ॥ ९५ ॥ बंदी जैसे नृपा प्रति । तत्प्रतापकथनें स्तविती । तेंवि स्तविते झाले सकाममति । उदारस्थिति उमेश्वर ॥ ९६ ॥ सुस्वरसप्तस्वरीं गायनें । तालबद्धवाद्यस्वनें । गद्यपद्यादि काव्यग्रथनें । स्तविलें रावणें सप्रेमें ॥ ९७ ॥ तेंविच बाणासुरें सहस्रकरें । युगपत पंचशतवाद्यनिकरें । कळाकौशल्यें वादनभरें । रमविले स्वसुरें गीतनृत्यें ॥ ९८ ॥ यापरि दशास्य बाणासुर । स्तविते झाले निष्ठापर ।

त्यां वरी संतुष्ट मृडानीवर । आनंद फार होत्साता ॥ ९९ ॥ तुलनारहित उत्कटैश्वर्य । त्यांसि देऊनि वरदवर्य । पश्चात संकट अनिस्तीर्य । पावला अनुपाय भूर्जटि ॥ ४०० ॥ इतुकें वृकासुराचें ध्वनित । बोलिला संक्षेपें विधिसुत । कीं प्रसन्न होवोनियां त्वरित । पावला अद्भुत संकट ॥ १ ॥ तत आप सुसंकटं । या मूळवाक्याचा अर्थ प्रकट । कथिजेल तो ऐकिजे स्पष्ट । ध्वनीतें उपदिष्ट जया परी ॥ २॥ रावणें कैलासभुवन । अंगप्रतापें उत्पाटन । करितां झालें कंपायमान । तैं भयोद्विग्न पार्वती ॥ ३ ॥ भीरू स्त्री स्वभावें गौरी । कवळी शंकरास भयभारीं । तेव्हां घाबरा त्रिपुरारी । क्षोभला अंतरीं सक्रोधें ॥ ४ ॥ आणि बाणासुरें पुररक्षण । याचिलें उद्भटपणें जाण । यास्तव सांडूनि कैलासभुवन । केलें अवास्थान तन्नगरा ॥ ५ ॥ त्यानंतरें तो उन्मत्त पूर्ण । म्हणे मजसीं करीं समराङ्गण । मम भुजांचें कंडूशमन । तुज वीण आन करूं न शके ॥ ६ ॥ ऐसें उफराटें संकट । प्रसन्न होवोनि नीलकंठ । पावला त्याचें फळ उद्भट । झालें प्रकट तयासी ॥ ७ ॥ दाशरथिहस्तें दशानन । ऐश्वर्यें सहित ससंतान । क्षय पावला निपटून । जाणती जन प्रसिद्ध हें ॥ ८ ॥ आणि कंडूयमान बाणभुज । श्रीकृष्णचक्रें भंगले सहज । ऐश्वर्यच्युत अति सलज्ज । झाला बाज स्वजीविता ॥ ९ ॥ पूर्वीं सविस्तर या निरूपणा । शुकें कथिलें मात्स्यीरमणा । असो नारदें बीजरूपें जाणा । केली सूचना असुरातें ॥ ४१० ॥ एवं शिवतुष्टीचें फळ । आणि ध्वनितें विपादमूळ । परिणामेंसीं कथिलें मुकुल । नारदें उतावेळ वृकासुरा ॥ ११ ॥ परंतु अदीर्घदर्शी असुर । स्वार्थसाधक कामप्रचुर । उताविळा प्रमादपर । ऐकूनि सादर तात्पर्य ॥१२॥ कीं आराधितां सत्वर तुष्ट । स्वभक्तां होय नीलकंठ । ऐश्वर्य देतसे यथेष्ट । ऐसा उपदिष्ट नारदें ॥१३॥

इत्यादिष्टस्तमसुर उपाधावत्स्वगात्रतः । केदार आत्मक्रव्येण जुह्वानोऽग्निमुखं हरम् ॥ १७ ॥

मग तो वृकासुर कृतनिश्चय । पाहूनि सुक्षेत्र पुण्यमय । साधनपुष्कर प्रफुल्ल होय । निवाससूर्ये जेथींच्या ॥ १४ ॥ ऐसें कोणतें क्षेत्र पुससी । राया परीक्षिति राजर्षी । तें सविस्तर तुज पासीं । उमजे ऐसी गोष्टी वदों ॥ १५ ॥ पर्वतां माजी पुण्यरूप । जेंवि वृक्षां माजी सुरपादप । जेथ वसती सुरर्षि अमूप । स्मरणें पाप विध्वंसी ॥ १६ ॥ तया सिताद्रिसन्निध । बदरिकाश्रम अत्यंत शुद्ध । जेथ अनृतादि दोष विरुद्ध । नसती वंध्यापुत्रवत् ॥ १७ ॥ जैसें परिससान्निध्यें लोह । पालटे तत्काळ हेम होय । कीं अमृतसेवनें निःसंदेह । अमरत्व देह लाहतसे ॥ १८ ॥ तेंवि साधकांचे सिद्ध । जेथ वसतिमात्रें विशुद्ध । अभुक होतीच प्रसिद्ध । हा निश्चय प्रबुद्ध जाणती ॥ १९ ॥ तें हरिहरात्मक पुण्यक्षेत्र । तपस्विनिषेवित परमपवित्र । तेथ ज्योतिर्लिङ्ग केदार । भजका उदार वरदानें ॥ ४२० ॥ तये केदारीं सुदृढमन । तया हरातें विवेकहीन । भजता झाला स्वगात्रें करून । व्हावया पूर्ण मनोरथ ॥ २१ ॥ कवण्या प्रकारें म्हणसी भजला । निष्ठापूर्वक शंकराला । तरी तमस्वभावें आपणाला । घोरक्लेशा घेऊनियां ॥ २२ ॥ आदिपुरुषाचें मुख पावक । तया माजी हवितां सम्यक । संतृप्त देवता सकळिक । हें वर्म चोख जाणोनी ॥ २३ ॥ स्थंडिल करूनि वृकासुर । तेथ स्थापिता झाला वैश्वानर ।

आसनीं बैसूनि एकाग्र । हवी सादर स्वमांसें ॥ २४ ॥ आपुल्या देहाचें जें मांस । तेंचि हविर्द्रव्य कल्पूनि सुरस । शस्त्रें छेदूनि अवदानास । टाकी गिरीशोद्देशें ॥ २५ ॥ ऐसा कृशानमुखाप्रति । स्वमांसगोळे होमितां कुमति । सप्त दिवस क्रमिले निगुती । वर्तलें अंतीं तें ऐका ॥ २६ ॥

देवोपलब्धिमप्राप्य निर्वेदात्सप्तमेऽहनि । शिरोऽवृश्चत्स्वधितिना तत्तीर्थक्लिन्नमूर्द्धजम् ॥ १८ ॥

महादेवाची उपलब्धि । न पवूनियां स्वकृतसिद्धि । क्लेशी जाला तमोनिधि । पुरली अवधि धैर्याची ॥ २७ ॥ सरली देहाची कृत्यसामग्री । तत्कृंतनें वेदना भारी । होतां कासावीस अंतरीं । उबगला सुरारि स्वजीविता ॥ २८ ॥ मग त्राग्नि सप्तमदिनान्तीं । वक्र च्छुरिका उभयहस्तीं । धरूनि छेदावयास शिराप्रति । आत्मघातीं प्रवर्तला ॥ २९ ॥ हिमाद्रीचें अतिशयें शीत । जेथ भानूचें तेज इन्दुवत । केदारतीर्थीं स्नान नित्य । करितां बहुत शीताकुळ ॥ ४३० ॥ मस्तकींचें सलंब केश । तत्तीर्थमज्जनें आर्द्रशेष । तेणें क्लिन्नमूर्धज शीर्ष । झालें बहुवस असुराचें ॥ ३१ ॥ ऐसिया मस्तकाचें लवन । करूनि शिवातें जीवितार्पण । करितां आततायिपणें पूर्ण । कळवळी सघृण उमेश्वर ॥ ३२ ॥

तदा महाकारुणिकः स धूर्जटिर्यथा वयं चाग्निरिवोत्थितोऽलनात् ।
निगृह्य दोर्भ्यां भुजयोर्न्यवारयत्तत्स्पर्शनाद्भूय उपस्कृताकृतिः ॥ १९ ॥

तेव्हा तो महाकारुणिक । धूर्जटि कैलासनायक । हुताग्नीहूनि तात्काळिक । उठिला सम्यक मूर्तिमंत ॥ ३३ ॥ तेजःपुञ्ज अग्निसमान । दिक्संख्यहस्त पंचानन । उमेसहित सुप्रसन्न । प्रकटला पूर्ण वरदानी ॥ ३४ ॥ राया आपण जैसे मानव । कोणी दुःखित दुःखस्वभाव । अपघात करितां स्वयमेव । पाहूनि मोह निवारूं ॥ ३५ ॥ तयापरी करुणाधाम । शंभु देखोनि स्वभक्तश्रम । हस्तीं धरूनि तद्भुजयुग्म । निवारी परम कृपाळु ॥ ३६ ॥ तंव तो वृकासुर मांसच्छेदें । आणि देवानुपलब्धि-खेदें । मुमुर्षु विकळ बहळतोदें । स्फूर्तिरोधें मूर्च्छित ॥ ३७ ॥ नवल ईश्वरमहिमा विचित्र । होतांचि तत्करस्पर्शमात्र । पुन्हा पूर्ववत शकुनिपुत्र । उपस्कृतगात्र जाहला ॥ ३८ ॥ पुष्टमांसक पिहितत्वक । शिवस्पर्शनास्तव सम्यक । उपस्कृताकृति दिव्यदेक । किम्बहुना अधिक पूर्वीहुनी ॥ ३९ ॥ लब्धस्मृति पूर्णाकृति । झाला असतां तयाप्रति । भक्तवत्सल उमापति । बोलिला मूर्तिमंत हर ॥ ४४० ॥

तमाह चाङ्गगालमलं वृणीष्व मे यथाऽभिकामं वितरामि ते वरम् ।
प्रीयेय तोयेन नृणां प्रपद्यतामहो त्वयात्माभृशमर्द्यते वृथा ॥ २० ॥

पुरे पुरे गा भक्तोत्तमा । तव भक्तीची झाली सीमा । इतुका कष्टसी तूं कां मा । तवेष्टकामा पुरवीन ॥ ४१ ॥ जैसें तुझें अपेक्षित । असेल प्रियतम अंतर्गत । तैसेंच वरीं मज निश्चित । संकोचरहित सुशब्दें ॥ ४२ ॥ तुजलागीं तया बराप्रति । मी देईन गा भक्तपति । तेणें निरसे तुझी आर्ति ।

सुखविश्रांन्ति पावसी ॥ ४३ ॥ मज कारणें अनन्यशरण । अर्पूनि काया वाचा मन । जे नर होती मद्भावपूर्ण । निरभिमान विवेकी ॥ ४४ ॥ मत्प्राप्तीस्तव श्रम । करणें न लगती अनुत्तम । एक दृढतर पाहिजे प्रेम । स्मरतां नाम मी जवळी ॥ ४५ ॥ ते मज सद्भावें अर्पिती तोय । तरी त्या जळेंचि करूनि प्रिय । तयाचिये होय मी सदय । अमृतप्राय सप्रेमें ॥ ४६ ॥ प्रेमाथिलें केवळ जळ । भक्त अर्पिती सप्रेमळ । तेणें प्रसन्न मी उतावीळ । न लगे काळ दीर्घतर ॥ ४७ ॥ ऐसें असतां दैत्यनाथा । अतिशयेंसीं तुवां वृथा । आत्मा पीडिजे सर्वथा । दुर्धर व्यथा करूनियां ॥ ४८ ॥ असो झालें तें मूर्खपणें । आतां वरीं मज कारणें । स्वेच्छा प्रार्थीं स्ववचनें । परिहरी जेणें श्रम अवघा ॥ ४९ ॥ ऐसी शिवाची प्रसन्न वाणी । वृक ऐकोनि अविवेकखाणी । मागता झाला वर निदानीं । तो परिसें कर्णीं नृपनाथा ॥ ४५० ॥

देवं स वव्रे पापीयान्वरं भूतभयावहम् । यस्य यस्य करं शीर्ष्णि धास्ये स म्रियतामिति ॥ २१ ॥

स्वप्रकाशें देदीप्यमान । मूर्तिमंत विभु ईशान । तया देवातें पापसंपन्न । शकुनिनंदन दुरात्मा ॥ ५१ ॥ भूतां कारणें भयावह । ऐसिया वरातें निःसंदेह । वरिता झाला तो अनर्ह । जेणें घडे द्रोह ईशाचा ॥ ५२ ॥ म्हणे जया जयाच्या शिरावरी । मी हस्त ठेवीन निर्धारीं । तो मृत्यु पावो गा त्रिपुरारी । स्पर्शमात्रीं तत्काळ ॥ ५३ ॥ या प्रकारें दुष्ट पापिष्ठ । भूतद्रोहात्मक वर स्पष्ट । याचितां ऐकूनि नीळकंठ । क्रोधाविष्ट जाहला ॥ ५४ ॥

तच्छ्रुत्वा भगवान्रुद्रो दुर्मना इव भारत । ओमिति प्रहसंस्तस्मै ददेऽहेरमृतं यथा ॥ २२ ॥

असो प्रसन्न झालिया कामधेनूस । काय मागिजे उल्बण विष । कीं सम्मुख देखूनि कल्पवृक्ष । अर्कफळास इच्छिजे ॥ ५५ ॥ तेंवि षड्गुणैश्वर्यसंपन्न । समर्थ वरदानी उमारमण । ऐसियातें दुर्भग पूर्ण । याचिता हीन हें झाला ॥ ५६ ॥ चिन्तामणिसमान दाता । त्यासी याचकें विष याचितां । दुर्मना होय तो तत्वता । कोडें चित्ता माजी जसा ॥ ५७ ॥ कीं सर्वज्ञ साधु सद्गुणनिधि । सेवूनि तोषविला यथाविधि । प्रार्थितां मारणप्रयोगसिद्धि । रुष्ट मनस्वी होय तो ॥ ५८ ॥ तया दुर्मनाचिये परि । राया भगवान त्रिपुरारी । क्रुद्ध झाला अभ्यंतरीं । परी निराकारी न तयातें ॥ ५९ ॥ कीं स्वेच्छा माग तें देईन तुजला । ऐसिया स्ववचनें गुंतला । म्हणोनि न वचे निराकरिला । ईश्वरत्वाला ये उणे ॥ ४६० ॥ मग रसरसूनियां मनीं । मूर्खत्व दैत्याचें आठवूनी । हांसत होत्साता शूळपाणी । तथास्तु म्हणोनि दे वर ॥ ६१ ॥ जैसें भुजंगासी दुग्ध । देणें अनुचित प्रसिद्ध । तैसा अयोग्य तो अबुध । द्यावया वर निश्चयें ॥ ६२ ॥ तथापि तया कारणें वर । वरद झाला उपरोधपर । न करूनि दीर्घविचार । अनाधिकार कळतांही ॥ ६३ ॥ ऐसा वरद झालिया शूळपाणी । पुढें वर्तली अपूर्व काहणी । परीक्षिति प्रबुद्धचूडामणी । ते कृतघ्नकरणी अवधारीं ॥ ६४ ॥

इत्युक्तः सोऽसुरो नूनं गौरीहरणलालसः । स तद्वरपरीक्षार्थं शंभोर्मूर्ध्नि किलासुरः ।
स्वहस्तं धातुमारेभे सोऽबिभ्यत्स्वकृताच्छिवः ॥ २३ ॥

सर्पासी पाजिलिया क्षीर । करावया धांवें दंशप्रतिकार । तेंवि वरदवचनें तो असुर । पूर्वोक्त प्रकारें गौरविला ॥ ६५ ॥ त्यावरी कृतकार्य सिद्ध मनोरथ । अवलोकी वरद भूतनाथ । तंव गौरी देखिली तदंकस्थ । लावण्यवंत चिच्छक्ति ॥ ६६ ॥ सकळ सौन्दर्याची खाणी । पुंडरीकाक्षी गोजिरवाणी । सादर देखूनियां नयनीं । झाला तद्वरणीं आसक्त ॥ ६७ ॥ परि शंभूचिया अंकीं स्थित । ते कैसेनि होईल प्राप्त । यास्तव मनीं दुर्विचारकृत । करावया अनर्थ प्रवर्तला ॥ ६८ ॥ जरी शंभूनें दिधला वर । सत्य असेल प्रतिज्ञापर । तरी तन्मौळीं म्यां ठेवितां कर । मृत्यु पावेल निश्चयें ॥ ६९ ॥ मग चार्वंगी गौरी प्राप्त । सहजचि होईल मज निश्चित । ऐसें चिन्तूनियां दुर्वृत्त । प्रमादवंत दुर्बुद्धि ॥ ४७० ॥ तेव्हां गौरीहरणलालस । कृतघ्न दुरात्मा देवद्विष । तो तयाचा वर अशेष । साभिलाष परीक्षार्थ ॥ ७१ ॥ शंभूचियाचि मस्तकावरी । स्वकर ठेवावया निर्जरारी । न्युब्जपाणि निकट निर्धारीं । येऊनि सत्वरी आरंभी ॥ ७२ ॥ ऐसें आचरण विपरीत । कृतघ्नाचें देखोनि त्वरित । स्वकृतास्तव शिव भयभीत । विस्मयकृत बहु झाला ॥ ७३ ॥ आपणाचि दिधला वर । दैत्या कारणें भयंकर । तो आपणासीच दुर्द्धर । झाला फळतंत्र विपरीत ॥ ७४ ॥

तेनोपसृष्टः सन्त्रस्तः पराधावत्स वेपथुः । यावदन्तं दिवो भूमेः काष्ठानामुदगादुदक् ॥ २४ ॥

तेणें अनुपाय चंद्रमौळी । प्रतीप देखोनि दैत्य जवळी । सरकला मागें तये काळीं । त्वराशाळी चपळत्वें ॥ ७५ ॥ तंव वृकासुर ही उताविळा । तैसाच पातला जवळा । देखोनि त्रासला शंभु भोळा । विमुख पळाला त्वरान्वित ॥ ७६ ॥ पळतां परतूनि धाकें पाहे । तों छायेपरी मागें आहे । म्हणोनि धांवतां लाहें लाहें । सकंप होय भयभीरू ॥ ७७ ॥ राया ऐसा घाबरा शर्व । कोठवरी पळाला धरूनि भेव । पुससी तरी ब्रह्माण्डप्रभव । अवकाश सर्व जेथवरी ॥ ७८ ॥ भूलोक भुवर्लोक स्वर्लोक । जनलोक तपोलोक महर्लोक । शेवटीं अवघ्यांहून सत्यलोक । फिरला पंचमुख जवशीळ ॥ ७९ ॥ तंव तो ब्रह्मकपाटा सम । पृष्ठभागीं दैत्य अधम । देखोनि बोले राम राम । संकट विषम वोढवलें ॥ ४८० ॥ सकळ स्वर्गाचा शेवट । ऊर्ध्वदिशेचा प्रान्त रक्षक इष्ट । न मिळे बळिष्ठ कोणीही ॥ ८१ ॥ त्या वरी भूपृष्ठीं सप्तद्वीपें । उत्तरे पासूनियां साक्षेपें । अष्ट दिशांचा प्रान्त वृषपें । महत्कल्पें टाकिला ॥ ८२ ॥ परि सुई मागें जैसा दोरा । तैसें निकट देखिलें असुरा । अंतरीं धरिला भेदरा । मृत्युदरारा घेऊनि ॥ ८३ ॥ अष्टदिक्पाळ इंद्रादिक । पाहोनि राहिले स्तब्ध मूक । परि कोण्ही नये परिहारक । न थके निष्टंक दैत्यही ॥ ८४ ॥ एवं चंद्रचूड श्रमाक्रान्त । व्यसनाकुळित संत्रस्त । जोंवरी स्वर्गभूदिशांचा अंत । फिरला त्वरित कुरुकुप्रा ॥ ८५ ॥

अजानन्तः प्रतिविधिं तूष्णीमासन्सुरेश्वराः । ततो वैकुण्ठमगमद्भास्वरं तमसः परम् ॥ २५ ॥

प्रतिविधि म्हणिजे तत्परिहार । न जाणत होत्साता सुरेश्वर । उगाचि राहिला चिन्तातुर । तंव सुचलें दैवें निदानीं ॥ ८६ ॥ पूर्वी विषप्राशनव्यसन । ऐसेंचि झालें होतें गहन । तें ज्याच्या स्मरणें पावलें शमन । ठाकिजे स्थान तयाचें ॥ ८७ ॥ किम्बहुना हृदयस्थ आत्माराम । मज गमला तोचि पावननाम । अंतरा प्रवर्तक झाला सुगम । म्हणोनि उगम स्मृतीचा ॥ ८८ ॥ असो तदनंतर उमाकान्त । वैकुण्ठा प्रति त्वरान्वित । जाता झाला होवूनि श्रान्त । व्हावया मुक्त ते वेळीं ॥ ८९ ॥ म्हणाल कैसें तें वैकुण्ठ । तरी विशेषणद्वयें स्पष्ट । जैसें विशेषिलें शुकें प्रकट । तेंचि महाराष्ट्र अवधारा ॥ ४९० ॥ भास्वर आणि तमसःपर । ऐसें वैकुण्ठ परात्पर । जेथ न स्पर्शे गुणविकार । ते व्युत्पत्ति साचार कथिजेल ॥ ९१ ॥ तम म्हणिजे अंधकार । अज्ञानरूप भ्रान्तिकर । जेथूनि अन्यथा विपरीत घोर । ज्ञानविकार प्रकटला ॥ ९२ ॥ तया तमाहूनि केवळ पर । तुरीय शुद्ध सत्त्वाकार । वास्तव संविन्मय निजसार । निर्विकार स्वप्रकाश ॥ ९३ ॥ तये वैकुण्ठीं निवासी । वृक्षादि नर पशुपक्षी । आत्माकार स्वरूप लक्षी । विज्ञानराशी समाधिस्थ ॥ ९४ ॥ स्वभावें पक्षी विराव । करिती उपनिषद्भाव । भोगिती ब्रह्मानंद वैभव । प्राणी सर्व जेथींचे ॥ ९५ ॥ जेथ निःशेष तमाचा लेश । नाहीं म्हणोनि स्वप्रकाश । कालत्रयीं जें अविनाश । तें स्वतःसिद्ध निजधाम ॥ ९६ ॥ ऐसें उत्कृष्ट महिमान । वैकुण्ठाचें काय म्हणोन । तेंही कथिजेल संपूर्ण । परिसोत सुज्ञ शुकवाणी ॥ ९७ ॥

यत्र नारायणः साक्षान्न्यासिनां परमा गतिः ॥ शांतानां न्यस्तदण्डानां यतो नावर्तते गतः ॥ ६२ ॥

जेथ साक्षान्नारायण । स्वयें सच्चिदानंद पूर्ण । विरक्तांचें परमकारण । प्राप्तिस्थान वास्तव ॥९८॥ जे सबाह्य त्यागें झाले न्यासी । जिंहीं गृहधनदारस्वजनराशी । उपेक्षूनि अंतरासी । केलें विशेषीं अविकार ॥ ९९ ॥ अंतरींच्या विषयवासना । कामक्रोधादि वैरिगणा । उपसंहरूनि निजज्ञाना । उपनिषत्खुणा अवगमिलें ॥ ५०० ॥ निःशेष गेलिया देहाभिमान । कदापि न स्फुरे विषयभान । केवळ झाले चैतन्यघन । बाणली पूर्ण निजशान्ति ॥ १ ॥ सृष्टि अवघी आत्मरूप । जाणोनि झाले निर्विकल्प । पूर्ण बोधीं भेदानुकल्प । बुडाला अनल्प स्फुरणेंसीं ॥ २ ॥ म्हणोनि झाले न्यस्तदंड । म्हणिजे हिंसारहित रूढ । कायवाङ्मानसी कवाड । लाधले प्रौढ अहिंसा ॥ ३ ॥ मनें कोणाचें अकल्याण । न चिन्तिती अपघातन । जिह्वे विमर्जिलें दुर्भाषण । छेदन ताडन सांडिलें ॥ ४ ॥ ऐसे संन्यासी शान्तरूप । न्यस्तदंड जे निर्विकल्प । तयांची परमगति त्रिजगप । विभु निष्कंप अद्वय ॥ ५ ॥ स्वर्गादिब्रह्मलोकान्त गति सुकृता नुसार विविधा होती । परि पुण्यक्षयीं पुनरावृत्ति । न चुके कल्पान्तीं साधकां ॥ ६ ॥ तेंवि नोहे कीं वैकुण्ठ । जेथ जो पावला अंतर्निष्ठ । तो पुन्हा न चलेचि वाट । अनिष्ट पुनरावृत्तीची ॥ ७ ॥ केवळ अभेदचि तन्मय । सायुज्य लाहे अद्वय । जन्ममरणातीत होय । बोलिजे यास्तव परमगति ॥ ८ ॥ ऐसा परमात्मा नारायण । त्रिकाळज्ञ ऐश्वर्यपूर्ण । देखता झाला तो दुरून । क्लेशायमान त्रिनेत्रा ॥ ९ ॥

तं तथा व्यसनं दृष्ट्वा भगवान्वृजिनार्दनः ॥ दूरात्प्रत्युदियाद्भूत्वा बटुको योगमायया ॥ २७ ॥

तें त्या प्रकारींचें व्यसन । सदाशिवाचें अत्यंत गहन । कीं दैत्यभयें पलायमान । पातला श्रमून आपणापें ॥ ५१० ॥ देखूनियां वृजिनार्दन । तच्छ्रमाभिज्ञ भगवान । दुःखविनाशक सदय पूर्ण । कळवळून काय करी ॥ ११ ॥ एकामागें एक धांवत । सभय सावेश देव दैत्य । हें दुरूनि देखूनि अच्युत । प्रकटला शिव भीत रक्षावया ॥ १२ ॥ योगमायेकरूनि बटुक । सानु सुवेष सम्यक । होवोनियां श्रीवत्साङ्क । लपवूनि मुख्य निजरूप ॥ १३ ॥

मेखलाजिनदण्डाक्षैस्तेजसाऽग्निरिव ज्वलन् । अभिवादयामास तं च कुशपाणिर्विनीतवत् ॥ २८ ॥

ब्रह्मचर्यव्रताचा नट । आगीं बाणला चोखट । मेखळाबद्ध कटितट । स्कंधीं निविष्ट मृगाजिन ॥१४॥ दण्डकमंडलु उभय हस्तीं । कौपीन शोभे ऊरू वरती । उत्तरीय वस्त्र पृष्ठीं निगुती । श्रवणीं झळकती कुण्डलें ॥ १५ ॥ शुद्ध सूज्ज्वळ यज्ञोपवीत । इत्यादिचिह्नीं स्वलंकृत । कमनीय पौगंडवयसा युक्त । सुन्दर शान्त कुशपाणि ॥ १६ ॥ देदीप्यमान अग्निसम । स्वतेजें करूनि पुरुषोत्तम । विलसत होत्साता पूर्णकाम । ऊर्जितधाम कमलाक्ष ॥ १७ ॥ सम्मुख होऊनि विनीतवत । वृकासुरातें प्रोत्साहित । मागें टाकूनि उमाकान्त । अभिवंदिता जाहला ॥ १८ ॥ त्यावरी जिहीं वचनीं मोहित । असुर होय प्रमादयुक्त । तैसीं वाक्यें अतिसुललित । बोले विनीत श्रीहरि ॥ १९ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥ शाकुनेय भवान्व्यक्तं श्रान्तः किं दूरमागतः ।
क्षण विश्रम्यतां पुंस आत्मायं सर्वकामधुक् ॥ २९ ॥

म्हणे भो भो शकुनिपुत्र । तूं अत्यंत सकुमारगात्र । परंतु दिससी श्रमाचें पात्र । ऐसा निर्धार मज वाटे ॥ ५२० ॥ धापां दाटलेंसे पोट । आंगीं वाहती घर्मलोट । मुखश्री उतरली तेजिष्ठ । ऐसें स्पष्ट दिसतसे ॥ २१ ॥ तरी काय दुरूनि आलासि सखया । ऐसें ममे माझिया हृदया । क्षणभरी स्थिर करीं काया । पावें सदया विश्राम ॥ २२ ॥ विश्रान्तिजीवनें वीण । सुकलें सर्वेंही अवयववन । तरी माझें अमृतरूप भाषण । घे श्रवणपुटें अंतरीं ॥ २३ ॥ सकळ पुरुषार्थांचें कारण । पुरुषासी देह हा कामधेनु । यास्तव न पीडीं अतिशयें करून । पावसी शीण सकुमारा ॥ २४ ॥ जों वरी देह असे सावध । तों वरीच स्वधर्म घडे शुद्ध । अर्थ ही प्राप्त होती विविध । विषयानंद करणांसी ॥ २५ ॥ ना तरी देह झालिया विकळ । उन्मळे स्वधर्मांचें मूळ । तुटे पदार्थांची मीळ । इन्द्रियीं हळहळ सर्वदा ॥ २६ ॥ किम्बहुना संप्राप्त विषय । जिवलगसुहृदसमुदाय । सर्वेही विपरीत होवूनि ठाय । देह अनामय नसतां हा ॥ २७ ॥ संक्लिष्टदेहासि गंधर्वगीत । मंद सुशीतळ व्यंजित वात । उर्वश्यादि लावण्यवंत । न रुचती अमृत सम रसही ॥ २८ ॥ स्त्रीपुत्रादिस्वार्थजीवी । पटुतर देहासी भजती

विभवीं । क्षीण अनुद्योगियां भवीं । आप्तीं सर्वीं उपेक्षिजे ॥ २९ ॥ जेंवि वर्षाकाळीं सजळ मेघ । देखोनि केकी नाचती साङ्ग । सम्मुख आळविती सप्रेमाङ्ग । उपेक्षिती मोघ अवकाळीं ॥ ५३० ॥ म्हणोनि देहें पटु तोंचि भोग । सर्वही घडती उत्तम योग । सौख्यदायक आत्मसंग । होती अभंग आपणा ॥ ३१ ॥ तरी सकळधर्मा माजि धर्म । देह रक्षणें हाचि परम । देहासी क्लेशकारी कर्म । सहसा विषम नाचरिजे ॥ ३२ ॥ म्हणसी क्लेशा वांचूनि स्वार्थ । केंवि साधेल यथार्थ । तरी प्रतिकूळ दुःखद अविहित । स्वार्थानर्थ न इच्छिजे ॥ ३३ ॥ जेंवि अश्व विकून कीजे जीन । कीं तरुवरशाखा छेदून । कुंप कीजे तया रक्षण । हें शहाणपण विपरीत ॥ ३४ ॥ तेंवि जया स्वार्थें देह वेंचे । क्लेश-सामग्री पुष्कळ सांचे । तयाचें नांवही नाणिजे वाचे । हेंचि सुज्ञाचें लक्षण ॥ ३५ ॥ यास्तव दानवेन्द्रा चतुरा । विवेकें जाणिसी सारासारा । तरी या घेईं वाक्यविचारा । स्वस्थ अंतरा करूनियां ॥ ३६ ॥ तुज श्रान्त देखोनि अत्यंत । माझें द्रवलें कोमळ चित्त । तरी काय असे तवाभिप्रेत । श्रमसी किमर्थ येतुला ॥ ३७ ॥

यदि नः श्रवणायालं युष्मद्व्यवसितं विभो । भण्यतां प्रायशः पुम्भिर्धृतैः स्वार्थान्समीहते ॥ ३० ॥

अनन्य आणि अवंचक । स्नेहाळ रसाळ शुभचिन्तक । गुह्य तरी ऐसिया निष्टंक । सहसा साशंक न वंचिजे ॥ ३८ ॥ जरी आमुच्या श्रवणा कारणें । तुमचें व्यवसित ऐकणें । योग्य असेल तरी बोलणें । निःशंकपणें समर्था ॥ ३९ ॥ ना तरी असेल तें असो मनीं । परि माझिया अंतःकरणीं । ऐसें गमे गा चातुर्यखाणी । कीं फिरसी साधनीं स्वार्थाच्या ॥ ५४० ॥ सहाय प्रार्थूनियां पुरुष । तिंहींसीं स्वार्थ-विशेष । साधूं इच्छिसी महत्कार्यास । करूनि क्लेश बहुतेक ॥ ४१ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ एवं भगवता पृष्टो वचसाऽमृतवर्षिणा । गतक्लमोऽब्रवीत्तस्मै यथा पूर्वमनुष्ठितम् ॥३१॥

शुक म्हणे गा राजेन्द्रा । कुरुकुळगगनचंद्रा । एवं भगवंतें सुधाधारा । वर्षक गिरा उदार ॥४२॥ तये मृदुळवाचे करून । दैत्यासि पुसिलें संपूर्ण । तेणें पावला समाधान । झाला निस्सीम सुखमय ॥४३॥ धांवतां धांवतां परम क्लेश । पावूनि गळाला जो निःशेष । होती कोरड पडली मुखास । अतिशयें चित्तास विक्षेप ॥ ४४ ॥ तो अवघाचि दुस्तर श्रम । हरला झाला गतक्लम । कीं वर्षलें अमृतवृष्टिसम । हरिमुखव्योम वाङ्मेघें ॥ ४५ ॥ जैसा मुमुर्षु सुधापानें । बिश्रान्ति पावे सावधपणें । तेंवि सुखावला भगवद्वचनें । स्नेहाळगुणें आथिला ॥ ४६ ॥ सग त्या भगवन्ता कारणें वाहिलें । जैसें पूर्वानुष्ठित आपुलें । सविस्तर साद्यंत वीतलें । दैत्यें कथिलें निष्कपट ॥ ४७ ॥ कीं नारदोपदेशें करून । केदारीं घोर अनुष्ठान । केलिया प्रसन्न पंचवदन । होतां वरदान पावलों ॥ ४८ ॥ तया वराच्या परीक्षार्थ । तन्मस्तकीं ठेवितां हस्त । पलयमान शिव निश्चित । म्हणूनि अनुगत मी झालों ॥ ४९ ॥ ऐसें वृकासुराचें वृत्त । सर्वज्ञ असतांही भगवन्त । तन्मुखें पुसूनियां समस्त । प्रतारणार्थ पसूनियां समस्त । प्रतारणार्थ परिसिलें ॥ ५५० ॥ मग करावया बुद्धिभ्रंश । मोहक धारक बटुवरवेश । तयासि बोले जें रमेश । तेंही अशेष ऐका हो ॥ ५१ ॥

श्रीभगवानुवाच ॥ एवं चेत्तर्हि तद्वाक्यं न वयं श्रद्दधीमहि । यो दक्षशापात्पैशाच्यं प्राप्तः प्रेतपिशाचराट् ॥३२॥

म्हणे अगा ये मित्रा जाण । जरी ऐसें आहे वर्तमान । तरी तयाच्या वाक्यातें अभिज्ञ । आम्ही पूर्ण न विश्वासूं ॥ ५२ ॥ तुज शंभूनें दिधला वर । तें तयाचें वाक्य समग्र । मज सत्य न मने कृत-निर्धार । न धरीं अणुमात्र विश्वास ॥ ५३ ॥ तूं म्हणसी काय म्हणोन । वाक्य शिवाचें सत्यत्वहीन । यदर्थीं काय असें प्रमाण । तरी तें कारण परियेसीं ॥ ५४ ॥ पूर्वी विधीचे सभेमाजी । संपूर्ण मुनि सुर यज्ञकाजीं । असतां दक्षही तये माजी । येतां सहजीं संप्रार्थित ॥ ५५ ॥ तैं त्या येणें अभ्युत्थान । न करूनि केला असन्मान । तेव्हां तेणें प्रक्षोभून । दीधला जाण दुःशाप ॥ ५६ ॥ तया शापें हा पिशाचत्व । पावला प्रेतपिशाचराव । तीं ही लक्षणें प्रसिद्ध सर्व । ऐक स्वयमेव विस्तारें ॥ ५७ ॥ प्रेत-पिशाचें स्थळ । श्मशान कुश्चळ अमंगळ । तेथें राहे हा केवळ । प्राशिलें हळाहळ उल्बण ॥५८॥ मदना-सारिखा सुन्दर पुरुष । रतिसुखदायक जो सर्वांस । तो येणें जाळिला निःशेष । विवेकलेश या नाहीं ॥ ५९ ॥ प्रेतदाहित भस्म आंगीं । चर्चीं भूषी महाभोगी । गजचर्म वेढी तेंही त्यागी । म्हणवी योगी नग्नपणें ॥ ५६० ॥ सकळदेवीं महादेव । 'आणि नरकपाळें स्वयमेव । भिक्षा करणें कोण गौरव । कीं असे अर्ह ईशत्व ॥ ६१ ॥ श्वाना पिशाचांसीं क्रीडा । करितां न धरी किंचित व्रीडा । इत्यादि लक्षणीं जाण सुघडा । प्रसिद्ध मृडा पैशाच्य ॥ ६२ ॥ तुज सारिखा विचक्षण । विचारज्ञ बुद्धिनिपुण । विश्वास-लासी काय म्हणोन । व्यर्थ भुलून श्रमलासी ॥ ६३ ॥ हा प्रेतां–पिशाचांचा राजा । राजधानी या स्मशान वोजा । प्रेतानुगांचे विलाप बुझा । वाद्य वोजा यया पुढें ॥ ६४ ॥ चिता तेंचि सिंहासन । अग्रीं तिष्ठे ढोर वहन । अनुचर भूतप्रेतगण । प्रजाजन श्वानादि ॥ ६५ ॥ म्हणूनि ऐसिया पिशाचें वचन । सत्य कें मानिजे आपण । आम्हासी विश्वास पूर्ण । न वटे लक्षण जाणोनी ॥ ६६ ॥ जैसें विकसित गमनपुष्प । किंवा वंध्यातनुज कुलदीपक । हे श्रवणेंचि ऐकावे वाग्जल्प । परी विश्वास अल्प न धरावा ॥ ६७ ॥

यदि वस्तत्र विश्रम्भो दानवेन्द्र जगद्गुरौ । तर्ह्यङ्गाशु स्वशिरसि हस्तं न्यस्य प्रतीयताम् ॥ ३३ ॥

ऐसें असतां दानवेन्द्रा । जरी तुम्हांसी विश्वास खरा । याच्या ठायीं वाटेल पुरा । कीं हा म्हातारा जगद्गुरु ॥ ६८ ॥ देव तिर्यक् आणि मानव । या त्रिजगामाजि श्रेष्ठ भव । यास्तव जगद्गुरु अर्हार्ह । महादेव यथार्थ ॥ ६९ ॥ परंतु पैशाच्ययोगें झाला चळ । तेणें सावध नसे हा केवळ । यास्तव बोले तितुकें वोफळ । ऐसें प्राज्ञजळ मज विदित ॥ ५७० ॥ तथापि तयाच्या ठायीं तुज । श्रेष्ठ म्हणूनि विश्वास सहज । तरी इतुक्या श्रमाचें काय काज । मज वाटे चोज धीमंता ॥७१॥ तूं आपुलिया शिरावरी । हस्त ठेवूनि प्रतीति बरी । सत्वर पाहें बा निर्जरारी । होसील अंतरीं निःसंशय ॥ ७२ ॥

यद्यसत्यं वचः शंभोः कथंचिद्दानवर्षभ । तदैनं जह्यसद्वाचं न यद्भक्तानृतं पुनः ॥ ३४ ॥

जरी कथंचित् दानवश्रेष्ठा । असत्य शंभूचें वाक्य सुभटा । कळलिया मग सांडूनि निष्ठा । न ठेवीं प्रतिष्ठा ययाची ॥ ७३ ॥ तेव्हां भीड टाकूनि स्पष्ट । यातें मारीं तूं यथेष्ठ । वरें काढीं गा उपष्ट । कीं टाकील खोड या वरी हा ॥ ७४ ॥ ज्यास्तव हा लटिका पूर्ण । पुन्हा न करील अनृत भाषण । तरी हितकरण मद्वाक्याचरण । करीं सद्गुणविभूषणा ॥ ७५ ॥ शुक म्हणे गा परीक्षितिराया । दुर्घट भगवंताची माया । तेही येईल तव प्रत्यया । पुढील अन्वया परिसूनी ॥ ७६ ॥

इत्थं भगवतश्चित्रैर्वचोभिः स सुपेशलैः । भिन्नधीर्विस्मृतः शीर्ष्णि स्वहस्तं कुमतिर्न्यधात् ॥ ३५ ॥

ऐशीं मोहक विभ्रमाकारें । भगवंताचीं वचनें चित्रें । । भ्रमकारकें तीं मृदुतरें । ऐकिलीं असुरें सुपेशलें ॥ ७७ ॥ सुपेशलें म्हणिजे रमणीयें । परमरसाळें अमृतमयें । तिहीं करूनि दैत्यहृदयें । झालीं विशेष मोहित ॥ ७८ ॥ मी हस्त ठेविल्या स्वमस्तकीं । मृत्यु पावेन नेमस्त कीं । हे विसरला स्मृति नेटकी । झाला शेखीं भ्रंशितधी ॥ ७९ ॥ तया बुद्धिभ्रंशें कुमति । स्वामिद्रोही भ्रमितस्मृति । स्वशिरीं स्वहस्तातें त्वरितीं । झाला निश्चिती ठेविता ॥ ५८० ॥ तंव स्वार्जितवराचें फळ । वृकासुर पावला तत्काळ । तेंचि श्रोते परिसोत विवळ । अवधान पुष्कळ देऊनी ॥ ८१ ॥

अथापतद्भिन्नशिरा वज्राहत इव क्षणात् । जयशब्दो नमःशब्दः साधुशब्दोऽभवद्दिवि ॥ ३६ ॥

जैसा दुर्धर विद्युत्पात । होतां पाषाणही छिन्न होत । तेथें मनुजादि जंगमें समस्त । कवण मात तयांची ॥ ८२ ॥ ते तंव तत्काळ दग्धीभूत । होती केवळ हतजीवित । जैसा तीव्रतर वज्रघात । अनुपायित अपरिहार ॥ ८३ ॥ तयापरी वृकासुर । कर ठेवितांचि भिन्नशिर । पडतां झाला भूमीवर । दग्धशरीर अचेतन ॥ ८४ ॥ मूर्धा फुटोन भिन्न भिन्न । झाला होतां करस्पर्शन । भर्जित फळा सारिखें जाण । शरीर संपूर्ण दग्धलें ॥ ८५ ॥ तंव क्षणामाजी ऐसें होतां । दैत्यप्रेत भूतळीं पडतां । जयशब्द नमःशब्द तत्वता । साधुशब्द नभीं झाला ॥ ८६ ॥ संकटीं पडिला सदाशिव । महर्षि पितर इन्द्रादि देव । घाबरे होवोनियां वास्तव । होते सर्व पाहत ॥ ८७ ॥ तिहीं अद्भुत हरिचरित्र । पाहोनि झाले सुखनिर्भर । हर्षें केला जयजयकार । वारंवार उत्कर्षें ॥ ८८ ॥ नमो नमो वासुदेवा । वदोनि प्रकटिलें सद्भावा । भला भला या शब्दगौरवा । देऊनि सकळीं अनुमोदिलें ॥८९॥ पापी दुरात्मा दुष्कर । मारिला असतां वृकासुर । एवं ऋष्यादि पितृसुर । सुखनिर्भर होत्साते ॥५९०॥

मुमुचुः पुष्पवर्षाणि हते पापे वृकासुरे । देवर्षिपितृगन्धर्वा मोचितः सङ्कटाच्छिवः ॥ ३७ ॥

नंदनादि वनोद्भवें । आर्थिलीं सुगंधगौरवें । नित्य नूतनें अम्लानत्वें । परमदिव्यें जीं सुमनें ॥९१॥ तयां पुष्पांचा वर्षाव । हरिवरी करिते झाले सर्व । कीं संकटापासूनि शिव । सोडविला माव प्रकटूनी ॥ ९२ ॥ यानंतरें रहितभय । विनिर्मुक्त पार्वतीप्रिय । परंतु सलज्ज कृतविस्मय । पराजितप्राय

चाकाटला ॥ ९३ ॥ तयाचा संकोच हृद्गत । निरसोनि करावया संतोषित । प्रवर्तला कमलाकान्त । प्रसंगोपात्त तें ऐका ॥ ९४ ॥

मुक्तं गिरिशमभ्याह भगवान्पुरुषोत्तमः । अहो देव महादेव पापोऽयं स्वेन पाप्मना ॥ ३८ ॥
हतः को नु महत्स्वीश जन्तुर्वै कृतकिल्बिषः । क्षेमी स्यात्किमु विश्वेशे कृतागस्को जगद्गुरौ ॥ ३९ ॥

यश श्री आणि औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य । हे पूर्णत्वें षड्गुणवर्य । असती अव्यय जयापें ॥ ९५ ॥ तो क्षराक्षराहून परम । निर्विकार पुरुषोत्तम । विभु परमात्मा पूर्णकाम । बोलिला सुगम भवातें ॥ ९६ ॥ सकळ देवांमाजी वरिष्ठ । आपुला जिवलग परम इष्ट । महत्पदपूर्वक त्यासी सुष्ठ । कंबुकण्ठ संबोधी ॥ ९७ ॥ दावूनियां आश्चर्यभाव । म्हणे अहो देव महादेव । हा पापी दुष्ट दुःस्वभाव । परम अनर्ह कृतघ्न ॥ ९८ ॥ आपुलियाचि पापें करून । मृत्यु पावला जी आपण । येथें आश्चर्य करणें कोण । विचक्षण खूण जाणती ॥ ९९ ॥ महत् जे कां महानुभाव । लाधले शान्तिक्षमागौरव । सबाह्य शुद्ध जाणती वाव । संपूर्ण भव विवर्तवत् ॥ ६०० ॥ जयासी शत्रु मित्र सम । स्वरूपनिष्ठ ज्यां उत्तम । विकारहीन पूर्णकाम । यथार्थ स्वधर्म आचरती ॥ १ ॥ ऐसिया संतांच्या ठायीं । जो कोणी जंतु पाहीं । अन्याय करी विरोधें कांहीं । दुर्बुद्धिप्रवाहीं पडोनी ॥ २ ॥ तो कृतकिल्बिष सापराध । कोण क्षेमी होय प्रसिद्ध । तत्काळ अकल्याण विशद । पावे मतिमंद उन्मादें ॥ ३ ॥ मां साक्षात जो विश्वेश्वर । जगद्गुरु जगदाधार । तयाच्या ठायीं भ्रमनिर्भर । जो अविवेकपर कृतागस्क ॥ ४ ॥ तो परमेश्वराचा अपराधी । कल्याणवंत होय कधीं । हें बोलणेंचि नलगे निरवधी । उमजे बुद्धी भलतया ॥ ५ ॥ म्हणोनि अगाध तवैश्वर्य महिमा । आणि अमोघ तव वाक्यगरिमा । सफळ झाला विपरीत अधमा । विपरीतकर्मा आचरतां ॥ ६ ॥ एवं इत्यादि वाक्यगौरवें । शंभु गौरवूनि वासुदेवें । प्रमुदित पाठविला प्रभावें । गौरीसवें कैलासा ॥ ७ ॥ इतुकें साद्यंत वृकाख्यान । हरिहरांचें ऐश्वर्यलक्षण । प्रसादफळपरीक्षार्थ जाण । दर्शिलें उदाहरण श्रीशुकें ॥ ८ ॥ आतां श्रवणपटनाचें फळ । येथील कथी तें नृपातें विवळ । तें एकाग्र करूनि इन्द्रियमेळ । ऐकिजे निर्मळ श्रोतृगणीं ॥ ९ ॥

य एवमव्याकृतशक्त्युदन्वतः परस्य साक्षात्परमात्मनो हरेः ।
गिरित्रमोक्षं कथयेच्छृणोति वा विमुच्यते संसृतिभिस्तथारिभिः ॥ ४० ॥

एवं म्हणिजे या प्रकारें । योगमायावलंबें श्रीधरें । शिवमोक्षण जें निर्धारें । केलें विचित्रें कौशल्यें ॥ ६१० ॥ मना वाचेसि अगोचर । ज्याचा शक्तिसमुद्र अपार । जेथ शक्तिसरिता समग्र । मिळती विचित्र अधिष्ठानीं ॥ ११ ॥ सृष्ट्युदयीं गुणमेघद्वारें । ब्राह्मी रौद्री ऐन्द्र्यादि सुभरें । भरती जेथूनि नानाकारें । तो अव्याकृत शक्त्युदधि ॥ १२ ॥ साक्षात् परमात्मा निर्विकार । गुणसाम्यक प्रकृतीहूनि पर । लीलाविग्रही करुणाकर । स्वभक्तनिकरसंगोप्ता ॥ १३ ॥ तया हरीचें हें चरित । ब्रह्मादिकांसी परमाद्भुत । वृक निर्दाळिला कृतमोहित । रक्षिला भयभीत सदाशिव ॥ १४ ॥ जो सद्भावें करी कथन ।

अथवा सप्रेम परिसे जाण । तयासी पुन्हा जन्ममरण । न होय गौण सांसृतिक ॥ १५ ॥ तो संसृती-पासूनि विनिर्मुक्त । होय तत्काळ निश्चित । आणि जो सांकडला रिपुभयें भीत । क्लेशयुक्त अतिशयें ॥ १६ ॥ तोही श्रवणपठनमात्रें । महत्संकटाहून निर्धारें । मुक्त होय ऐसें व्यासकुमरें । कथिलें पवित्रें महिमान ॥ १७ ॥ इतुकेन हा अष्टाशीतितम । अध्याय झाला परमोत्तम । येथ एकादशिनी अष्टम । संपली सुगमव्याख्यानें ॥ १८ ॥ आतां शेवटीं पातलें ग्रंथायतन । कळसा आलें निरूपण । पुढील अध्यायद्वय तें पूर्ण । अलशस्थानीं अभिव्यक्त ॥ १९ ॥ त्यामाजि ऊननवतितमीं । कथा ऐसी यथानुक्रमीं । सरस्वतीतटीं यज्ञकामीं । असतां संभ्रमीं मुनिगण ॥ ६२० ॥ तिहीं सत्वपरीक्षेकारणें । त्रिदेवीं शान्त्यादिलक्षणें । कोण आथिला पूर्णपणें । भृगूसी यत्नें पाठविलें ॥ २१ ॥ तेणें ब्रह्मेशान अवलोकून । निद्रितहरिवक्षीं पदताडन । केलिया पावला अतिसम्मान । तें कथिलें संपूर्ण ऋषींतें ॥२२॥ हा इतिहास संपल्यावरी । प्रतिज्ञोत्तरें द्वारकापुरीं । अर्जुन आपणा वैश्वानरीं । दाहितां श्रीहरी कळवळिला ॥ २३ ॥ तेव्हां तयासह महाकाळपुरा । जाऊनि तेथींची स्वमूर्तिप्रवरा । प्रार्थूनियां आणिलें द्विजकुमारा । मृता अतित्वरा करूनियां ॥ २४ ॥ तें भगवन्ताचें अद्भुतनाट्य । परिसावयार्थ सोत्कंठ । श्रोतीं होवोनि एकनिष्ट । सुकृत यथेष्ट साधिजे ॥ २५ ॥ इतुकी सेवेसी विनवणी । अपत्याची कर जोडूनी । सद्गुरुवरदें वदेल वाणी । महाराष्ट्रवचनीं हरिचरित्र ॥ २६ ॥ मी तों अत्यंत मंदमति । सद्गुरुकृपेची अद्भुत स्थिति । सज्जन स्वभावें जाणती । जे अनन्यगति अनुभवीं ॥ २७ ॥ आदिनाथक्रमें लब्ध । श्रीएकनाथ चिदानंद । तत्कृपे सनाथ स्वानंद । भरी गोविन्द स्वात्मरसें ॥२८॥ तद्दयामृतासी सांठवण । श्रीकृष्णदयार्णव परिपूर्ण । कळिकळितजीवा उद्धरण । केलें जेणें ग्रंथमिसे ॥२९॥ तयाचे कृपेचें वैभव । मादृशां दीनांसी दे गौरव । जेंवि वैरागर स्वसंगें ग्राव । करी अर्हे श्रेष्ठजनीं ॥६३०॥ सूत्रधारी अचेतन पुतळी । नाचवूनि मिरवी सभामंडळीं । प्राकृत वाणी काव्य सरळी । तेंवि वदवी सहजस्थिती ॥ ३१ ॥ म्हणोनि सकळमंगळायतन । ऊर्जितोदयाचें अधिष्ठान । श्रीस्वामीचें चरणभजन । साधकीं खूण जाणावी ॥ ३२ ॥ श्रीमद्भागवत दशम स्कंध । टीका हरिवरद अगाध । दयार्णवकृत परम विशुद्ध । अध्याय प्रसिद्ध अठ्यांशीवा ॥ ६३३ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कन्धे श्रीशुक-परीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचराविरचितायां हरिहरोभयशीलपरीक्षार्थ वृकासुरोपाख्यान-कथनं नामाष्टाशीतितमोऽध्यायः ॥

॥ श्लोक ४० ॥ ओव्या ६३३ ॥ एवं संख्या ६७३ ॥
सत्त्याऐंशिवा अध्याय मिळून ओवी संख्या ४०,७३२

अठ्यांशींवा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ८९ वा

श्रीकृष्णदयार्णवाय नमः । जय जय सद्गुरु दयासमुद्रा । तुजमाजी जन्म प्रबोधचंद्रा । तत्प्रकाशें भ्रमान्धकारा– । सह तापनिकरा नुरणूक ॥ १ ॥ त्वद्भव शान्तिलक्ष्मी जया । सत्वसंपन्ना पवित्रहृदया । तव प्रसादें वरी तया । पूर्णैश्वर्या पात्रत्व ॥ २ ॥ स्वानुभवाचा कौस्तुभमणी । देदीप्यमान विज्ञानकिरणीं । लेवविसी त्या सनकादिगणीं । कृतार्थपणीं पूज्यत्व ॥३॥ भावपार्यातकोपलब्धि । भजकनिर्ज्जरांतें निरवधि । तुज पासूनि त्यां फळसिद्धि । स्वसुख समृद्धिमय लाभे ॥ ४ ॥ निज निष्ठेची कामधेनु । जया अर्पिसी मंगळतनु । तयांचे सर्व ही काम पूर्ण । होती सुजनसुखकरा ॥ ५ ॥ सकाम कर्मांची जे मदिरा । प्रियतम वाटे विषयी असुरां । तेचि तयांतें देसी चतुरा । जे अयोग्य प्रवरा ज्ञानामृता ॥ ६ ॥ आणि जे श्रद्धावंत अनन्य । जयांचें गेलें कामनादैन्य । त्यां तूं तदमृतदाता वदान्य । करूनि मान्य हरिहरादिकीं ॥ ७ ॥ अज्ञानरोगें क्षीण जाले । स्वसुख पौष्टिक जयांचें गेलें । तयां उपचारक जी निर्मिले । विवेका कृपाळें धन्वन्तरि ॥ ८ ॥ स्वसंभव धैर्यैरावती । ज्या देसी ऊर्जितदैवाप्राप्ति । तो कामादिरिपु जिंकूनि सुमती । शोभे पंक्ती आमरांचे ॥ ९ ॥ उपशमशार्ङ्ग सत्वगुणें । सज्ज प्रभूचें होतां देणें । मुमुक्षु निर्विकल्प बाणे । भेदविन्दाणें निर्दळिती ॥ १० ॥ स्वसंवित्स्फुरणरूपा स्फूर्ती । त्याचि दिव्याङ्गना विलसती । तव सहजस्वभावीं प्रकटती । जेथ सर्वदा रमती विबुधजन ॥ ११ ॥ स्वरूपप्रत्यय उच्चैःश्रवा । जो प्रत्यगात्मा हरिदश्वा । संकल्परथारूढ बरवा । फिरवूनि विश्वा प्रकाशी ॥ १२ ॥ व्यतिरेकान्वयानुवृत्ती । करूनि निश्चयमेरू भंवती । जिज्ञासुवर्गा पूर्णस्थिती । सुदिनप्राप्ती करी सदा ॥ १३ ॥ दैविकी नाभिकारकंबु । तेथ स्फुरदूप वेदकदंबु । जया दैवबळें तयाचा लाभु । तयासी सुलभ सकळ कळा ॥ १४ ॥ तीव्र वैराग्य हळाहळ । धीर वीर शंभु प्रबळ । प्राशूनि अमरत्वें प्रेमळ ।

वंदी काळ पद तयाचें ॥ १५ ॥ आणि अभय सत्व संशुद्धी । इत्यादि दैवीसंपत्ति समृदी । हे मुक्त-प्रभृति रत्नसमृद्धि । सुकृती लाहती तुजपासीं ॥ १६ ॥ एवं अपारगुणरत्नाकर । केवळ कृपेचा तूं अकूपार । कृतार्थता मुमुक्षु निर्ज्जर । तुज नमनें मात्र संपादिती ॥ १७ ॥ नेणों कैं अविद्या दैवबळें । जीवदशादारिद्र प्रबळे । अनैश्वर्य स्वपदा मुकले । ते दैवें पावले जवळीक ॥ १८ ॥ अनन्यभावें शरण होतां । पद्मकर माथां स्पर्शतां । कृपासलिलीं निमज्जतां । त्रितापव्यथा निमाली ॥ १९ ॥ अनंतजन्मीं भोगिलें दुःख । कवण करी तयाचा लेख । तें अवघेंचि विसरूनि सुख । लाधले सम्यक अक्षय ॥२०॥ सहज दैवीसंपत्तियोगें । निजपद पावले चरणानुरागें । जीव ते झाले ब्रह्मचि अंगें । दिवस्थां कौतुकें हांसती ॥ २१ ॥ मंदराचळ येसणे ढिसाळ । वासुकि ऐसे धूड विशाल । सहाय मेळवूनि सपत्नमेळ । केला डहुळ क्षीरनिधि ॥ २२ ॥ विष्णु आराधूनि विशेष । येवढा करूनियां सायास । कोणतें संपादिलें महद्यश । निघाले चतुर्दश पदार्थ ॥ २३ ॥ ते विभागूनि घेतां परस्परें । अप्राप्ति लाळ घोटिजे इतरें । ईर्ष्योत्कर्षें सकामभरें । साचिन्त सुरवरें हळहळिते ॥ २४ ॥ तथापि तद्योगें साधिलें स्वर्ग । तें क्षणिक नाशवंत व्यंग । सपत्नवैरें नित्य दगदग । त्रितापनिदाघ न चूकती ॥ २५ ॥ जन्मादिदुःखा-पासोनि मुक्ति । सहसा न होय दिविजांप्रति । दिहाचे इंद्र चौदा होती । मा कवण गती इतरांची ॥२६॥ येथ प्रणतिमात्रें शरणागता । आघवयाची दैवपात्रता । न्यूनपूर्णविभागविषमता । नसोनि समस्तां सम प्राप्ति ॥ २७ ॥ निजानंदपदींचें राज्य । पूर्णत्वें भोगिती भक्तराज । जन्ममरणाचें निमालें भोज । बाणलें सहज सुखसार ॥ २८ ॥ हा प्रभु तुमचा महदुपकार । मादृशा दीनावरी अपार । अनंत जन्मांचा श्रमपरिहार । जाला पवित्र ये जन्मीं ॥ २९ ॥ नये उपकृतीची निष्कृती । करावया सामर्थ्य प्रणतां-प्रती । कैंचें परंतु वदनें ख्याति । जरी वर्णिजे स्वमति यथार्थ ॥ ३० ॥ तरी मातेचिया स्नेहादरा । काय रूप करूं ये दातारा । कीं वर्षतिया जलधारा । भलतैशा चतुरा गणवती ॥ ३१ ॥ अमृत-गोडीचा निर्धार । कीं भारतीवदनींचे उद्गार । पृथ्वी अंगींचे तृणाङ्कुर । कळती समग्र कवणासी ॥ ३२ ॥ तेंवि सद्गुरो श्रीदयार्णवा । तव कृपामहिमानाविभवा । मिति न होय ब्रह्मादिदेवां । मां कवण केवा इतरांचा ॥ ३३ ॥ येथ रूपकें क्षीराब्धि उपमिलें । हें वास्तव महिम्ना किडाळ गमलें । परी तव गुणीं प्रेम विगुंतलें । तें उचितानुचिता न स्मरवी ॥ ३४ ॥ पूर्वीं ममापराधराशी । सांठविल्या निजक्षमाकोशीं । आतां तेथींचिया अनुचितासी । सांठवणेंसी अर्हता ॥ ३५ ॥ म्हणोनि कृपोपकारवर्णन । न होय तेथें होणें उत्तीर्ण । हें केंवि घडेल अघटमान । तरी कार्तघ्न्यदूषण ये आंगा ॥ ३६ ॥ तद्दोषपरिहारकार्या । कायवाङ्मानसिक चर्या । जोंवरी वर्तमान काया । आयुर्दायावधि टाकी ॥ ३७ ॥ अर्पूनियां अनन्यभावें । दास्यकर्मा अनुसरावें । अवंचकत्वें ओटंगावें । स्मरावें ध्यावें सप्रेमें ॥ ३८ ॥ ना तरी भावूनियां निर्गुण । साडी तव सगुण भजन । तो कृतघ्न पावे अधःपतन । उपतिष्ठे ज्ञान न कदा त्या ॥ ३९ ॥ यास्तव मम मती सकामा । अनन्ययोगें दास्यधर्मा । याहूनि न रुचे समाधिगरिमा । जे साधकां अधमा प्रिय वाढे ॥ ४० ॥ तरी ऐसिये निष्ठेतें करणें । वरिती हें कृपेचेंचि करणें । विषयापासोनि हो करणें । निजपदस्मरणें सर्वदा ॥ ४१ ॥

तरी ते कृपास्नेहाळ माउली । मजवरी स्नेहाची साउली । करूनि इच्छिले लळे पाळी । सुखाच्या सुकाळीं नांदवी ॥ ४२ ॥ आतां नियोजिलें ग्रंथनकार्य । सिद्धी पावविल कृपामाय । मज घडिघडी प्रार्थना उपाय । नलगे साहाय्य उपरोधी ॥ ४३ ॥ गजादिवाहनां पंथ पुसणें । कीं पाटींच्या उदका मार्ग करणें । न लगे नेतार जिकडे नेणें । तेंवि सत्तास्फुरणें मम वृत्ति ॥ ४४ ॥ अथवा संतां श्रोतयांसी । प्रार्थना कीजे श्रवणाविशीं । तरी ये वाग्यज्ञीं श्रोतृरूपीं । पूर्वीच घेतला श्रवणक्षण ॥ ४५ ॥ म्हणोनि आतांचें जें प्रार्थणें । दिसे अत्यंत उपहासवाणें । यास्तव सांडोनि तें बोलणें । कथेसि मनें अवलंबिजे ॥ ४६ ॥ तरी पूर्विले अध्यायीं निरूपण । कथिलें वृकासुराचें आख्यान । तेथ दर्शविलें उत्कृष्ट गहन । ऐश्वर्य संपूर्ण हरीचें ॥ ४७ ॥ इये ऊननवतितमीं । तेंचि दृढीकरणा शुकस्वामी । इतिहासान्तर श्रवणधामीं । सांडवी नियमीं नृपाचे ॥ ४८ ॥ कीं पूर्णमत्वीं शुद्ध ज्ञान । ज्ञानीं नांदे शान्ति गहन । शान्ति मोक्षाचें अधिष्ठान । भजकां कल्याण अक्षय दे ॥ ४९ ॥ जया सत्वपरीक्षे कारणें । सरस्वतीतीरस्थ मुनिगणें । भृगूसि पाठविलें प्रयत्नें । पहावया नयनें त्रिदेवां ॥ ५० ॥ तेणें ब्रह्मा शंभु परीक्षून । विष्णूसि पाहिलें प्रक्षोभून । तंव शान्तीचें एकायतन । कथिलें अनुभवून सकळांसी ॥ ५१ ॥ तिहीं ऐकूनि प्रेमोद्रेकें । निर्भय होऊनि दृढ विवेकें । शान्ति तेथें अभय कौतुकें । या निश्चयें सम्यकें हरि भजले ॥ ५२ ॥ यानंतरें द्वारकानगरीं । द्विजाची मृतसंतति श्रीहरी । अर्जुना सह महाकाळपुरीं । जाऊनि सत्वरी आणिली ॥ ५३ ॥ इये कथेचिये जी प्रान्तीं । अध्याय पावेल समाप्ती । हें इतिहासद्वय येथ सुमती । कथी नृपा प्रती शुकयोगी ॥ ५४ ॥ तेंचि सविस्तर निरूपण । जैसें नृपासि केलें कथन । तैसेंच देशभाषें करून । सावधान श्रवण कीजे ॥ ५५ ॥

श्रीशुक उवाच ॥ सरस्वत्यास्तटे राजन्नृषयः सत्रमासत । वितर्कः समभूत्तेषां त्रिष्वधीशेषु को महान् ॥ १ ॥

शुक म्हणे गा परिसें राया । सरस्वतीतटीं यज्ञकार्या । सत्रीं असते झाले ऋषि तयां । वितर्क बरवा जाहला ॥ ५६ ॥ म्हणसी कोण तो वितर्क कैसा । तरी मुमुक्षुजना हितावहसा । तो काय निमित्त जाला मानसा । तयाच्या रहस्या त्वां ऐकें ॥ ५७ ॥ यज्ञानिमित्त अनेक ऋषी । मिळाले शास्त्रज्ञ क्रान्तदर्शी । वेदवृक्षावरील पक्षी । अनेक शाखीं निविष्ट ॥ ५८ ॥ सिद्धान्त पूर्वपक्षात्मक । अनेकार्थत्व निगमा देख । शाखां परस्परें अनोळख । पुराणें अनेक मतवंतें ॥ ५९ ॥ तयां श्रुतीं आणि स्मृतीं माजी । कोठें वरिष्ठत्व दाखिलें आजी । कोठें तत्पुरुषचि सहजीं । स्तविला विरिंची उत्कर्षें ॥ ६० ॥ ते पृथक् श्रुतिस्मृत्यभिप्राय । घेऊनि ऋषींहीं भजनान्वय । स्वयें रूढविलें संदेहमय । धरूनि धैर्य अभिमानें ॥ ६१ ॥ तंव तेथ प्रसंगें संयोगवशें । मिथा संवादतां ज्ञानाभिलाषें । स्वाभीष्ट स्थापितां सावेशें । युक्तिरहस्यें बोलतां ॥ ६२ ॥ कोण्ही श्रुतिस्मृतींच्या बळें । वैशिष्ट्यें शिवा प्रतिपादिलें । त्यांतें नोकूनि आणिकीं सळें । स्वमतीं विशेषिलें विखनसा ॥ ६३ ॥ एकीं निषेधूनि सकळांतें । सर्वोत्कृष्टत्व श्रीरमणातें । प्रमाणयुक्त श्रुतिसिद्धान्तें । बहुसंमतें निगदिलें ॥ ६४ ॥ एवं विविधा

अनुवादतां । न होय कदापि एकवाक्यता । परस्परें निरुत्तर करिता । संशयावर्त्तामाजी पडिले ॥ ६५ ॥ या कारणें समस्तांस । वितर्क जाला बहुवस । कीं त्रिदेवांमाजी विशेष । वरिष्ठ ईश कोण तो ॥ ६६ ॥ तये संशयनिवृत्तीस्तव । तात्पर्य कळावया वास्तव । प्रत्यक्ष बाणावया अनुभव । यत्न स्वयमेव हा केला ॥ ६७ ॥

तस्य जिज्ञासया ते वै भृगुं ब्रह्मसुतं नृप । तज्ज्ञप्त्यै प्रेषयामासुः सोऽभ्यगाद् ब्रह्मणः सभाम् ॥ २ ॥

तपस्विवंद्य विपश्चित । भृगु ऋषीश्वर ब्रह्मसुत । पाठविते झाले त्वरान्वित । मुनिवर समस्त तयातें ॥ ६८ ॥ जरी कोठें पाठविलें म्हणसी । सत्यलोक वैकुण्ठ कैलासीं । विधि हर विष्णु पाहूनि अक्षीं । जो सत्वशान्तीसी आयतन ॥ ६९ ॥ तया जाणावयाचे इच्छें करून । निश्चयें भृगुसी प्रेरिलें जाण । आतां पुढील परिसें वर्त्तमान । कुरुकुळमंडन भो नृपा ॥ ७० ॥ असतां ऋषींचा समुदाय । भृगूतेंचि कां प्रेरिलें पाहें । म्हणसी तरी जो विभूति होय । निःसंदेह हरीची ॥ ७१ ॥ देवत्रयाचें परीक्षण । करूं शके इतर कोण । महर्षीमाजि मी म्हणोन । ज्या वदला श्रीकृष्ण गीतेतें ॥ ७२ ॥ मग तो स्वपितृसभेप्रति । तच्छील जाणावया निगुती । प्रथम जाता झाला सुमती । परीक्षा पुरती करावया ॥ ७३ ॥ परीक्षेचें जें का वर्म । भृगु सर्वज्ञ जाणे परम । जेणें ज्याची परीक्षा सुगम । तें हृदयंगम चतुराचें ॥ ७४ ॥

न तस्मै प्रह्वणं स्तोत्रं चक्रे सत्वपरीक्षया । तस्मै चुक्रोध भगवान्प्रज्वलन्स्वेन तेजसा ॥ ३ ॥

कामिनीसंसर्गें करून । ब्रह्मचर्य परीक्षे पूर्ण । शूर परीक्षे मांडल्या रण । मित्र व्यसन पावतां ॥ ७५ ॥ निर्धनीं परीक्षिजे वनिता । आचारवंत दरिद्र येतां । पितृवृद्धाप्यीं जाणिजे सुता । कीं निवडे दाता संकटीं ॥ ७६ ॥ घनीं परीक्षिजे हिरा । कीं वरकलीं कार्तस्वरा । स्पर्शमणि लोहीं खरा । दुःखीं धीरा वोळखिजे ॥ ७७ ॥ निर्ममत्व परीक्षे आप्तवियोगें । कीं वीतरागी विषयसंगें । प्रारब्ध वोळखिजे भोगें । वदान्य प्रसंगें जाणिजे ॥ ७८ ॥ शब्दें परीक्षे अंतर । संवादें पंडित साक्षर । दर्शनप्रशस्तीं योगेश्वर । कीं निर्विकार संसर्गें ॥ ७९ ॥ निरभिमान अनादरितां । कीं आत्मनिष्ठ देखोनि समता । क्षमस्वी जाणिजे क्षोभवितां । अमर्यादितां शान्त कळे ॥ ८० ॥ यास्तव भृगु बुद्धिमंत । जाऊनियां ब्रह्मसभेंत । शिष्टाचार न केला तेथ । परीक्षार्थ सत्वाच्या ॥ ८१ ॥ म्हणसी शिष्टाचार कोणता । तरी जो सर्व जगाचा जनिता । मुनिसुरपितरां वंद्य तत्वता । आणि साक्षात्पिता ययाचा ॥ ८२ ॥ तयाप्रति गेलिया आधीं । नमन स्तवन यथाविधी । करावें परंतु हा छळबुद्धी । तपोनिधी कार्यार्थी ॥ ८३ ॥ विधिकारणें विनयें नमन । किंवा प्रेमभावें स्तवन । हें कांहीं न करिता जाला जाण । आशय आन धरोनियां ॥ ८४ ॥ पुष्पवाटिकीं सुरूचा वृक्ष । तैसाचि सभेमाजी दक्ष । सत्वीं धरूनियां अनुलक्ष । उभा प्रत्यक्ष राहिला ॥ ८५ ॥ ऐसें देखोनि उद्धतपण ।

ब्रह्मा रजाचें अधिष्ठान । अमर्यादा न साहोन । क्रोधायमान बहु झाला ॥ ८६ ॥ कुपथ्यें जीर्णज्वर खवळे । सुप्त पन्नग डंवचितां उसळे। तैंवि अंतरीं त्याच्या तये वेळे। क्रोध अतिबळें खवळला ॥ ८७ ॥ ताम्रवर्ण जाले नेत्र । क्षोभें तापलें संपूर्ण गात्र । ऐसा भगवान चतुर्वक्त्र । स्वतेजें प्रज्वळित होत्साता ॥ ८८ ॥ भृगू कारणें सक्रोध । पाहता झाला अतिविरुद्ध । जणूं शापून करील दग्ध । परी कौतुक प्रसिद्ध मोहाचें ॥ ८९ ॥

स आत्मन्युत्थितं मन्युमात्मजायात्मना प्रभुः । अशीशमद्यथा वह्निं स्वयोन्या वारिणाविभुः ॥ ४ ॥

तेंचि प्रकट ऐकें नृपती । स्रष्टा प्रभु तो धिषणापति । आपुल्या ठायीं उठिला अती । अद्भुत ये रीती जो क्रोध ॥ ९० ॥ तयातें आपुल्या आपण । आत्मजाकारणें प्रलोभून । शमिता जाला न लागतां क्षण । कीं स्वयेंचि पूर्ण तद्रूपें ॥ ९१ ॥ जैसें जळाचें कारण वह्नी । आपणचि तद्रूपें होवोनी । तेणें स्वकार्य शमे निदानीं । पंकजयोनी तैसाची ॥ ९२ ॥ यापरी विधीचें लक्षण । भृगूनें पाहिलें संपूर्ण । वृषीं दुग्धवत् सत्वगुण । न देखोन परतला ॥ ९३ ॥

ततः कैलासमगमत्स तं देवो महेश्वरः । परिरब्धुं समारेभे उत्थाय भ्रातरं मुदा ॥ ५ ॥

तया नंतरें झडकरी । कैलासाप्रति खगापरी । जाता झाला पहावया नेत्रीं । संहारकारी त्र्यंबक ॥ ९४ ॥ कोणें एके समयीं शिव । विधीचिया भृकुटीपासाव । जन्मला म्हणोनि विधिपुत्रत्व । बंधु यास्तव भृगूचा ॥ ९५ ॥ असो तो देव महेश्वर । तया बंधू भृगूतें सत्वर । देखोनि झाला सुखनिर्भर । तें लक्षण समग्र अवधारीं ॥ ९६ ॥ हर्षें करूनि आसनाहून । उठूनि स्वबाहु पसरून । आलिङ्गावया स्नेहें पूर्ण । उदित आपण जाहला ॥ ९७ ॥

नैच्छत्वमस्युत्पथग इति देवश्चुकोप ह । शूलमुद्यम्य तं हन्तुमारेभे तिग्मलोचनः ॥ ६ ॥

तंव येरू अंतरीं परीक्षाकाम । देखूनि शिवाचा स्नेहसंभ्रम । न इच्छी आलिङ्गनक्रम । स्तंभोपम दुरी ठेला ॥ ९८ ॥ ऐसें विपरीत आचरण । स्नेहवना दावाग्निसमान । देखोनियां तमाधिष्ठान । उमारमण कोपला ॥ ९९ ॥ भृगूतें म्हणे अरे मत्ता । उत्पथगामी दिससी पुरता । अशिष्टाचारी तूं होत्साता । वर्तसी अदान्ता विपरीत ॥ १०० ॥ निगमागमोक्त उपेक्षणें । उचितीं अनुचितातें जें करणें । तोचि उत्पथ हें जाणणें । उन्मत्तपणें भलतैसें ॥ १ ॥ सर्वत्र नम्रत्वें वर्तणें । हीं तंव सुज्ञाचीं लक्षणें । नातरी सत्पुरुषीं तन्ही होणें । नम्र भलतेणें सद्भावें ॥ २ ॥ अथवा ईश्वराचिया मूर्ति । कीं वंदिजे वडिलांची तो पंक्ति । हे अवघीच सोडोनियां पद्धति । तूं मंदमति उन्मत्त ॥ ३ ॥ ऐसें कठोर बोलता देव । क्षोभें कंपित जाले अवयव । सर्वांङ्गीं प्रकटला क्रोधभाव । आविर्भाव तमाचा ॥ ४ ॥ बाळार्का सरी अति आरक्त । किंवा खदिराङ्गार प्रज्वलित । तैंवि तीव्र जाले अक्ष समस्त । आवेशें अद्भुत क्षोभला ॥ ५ ॥

तत्काळ शूळ घेऊनि हातीं । भृगूतें माराया निश्चिती । प्रवर्तला क्रूरनिघातीं । न धरूनि चित्तीं स्नेह दया ॥ ६ ॥ तंव ऐसा बोडवतां अनर्थ । देवी पार्वती समीप तेथ । आड येऊनि वारिलें त्वरित । तें परिसें यथार्थ नृपनाथा ॥ ७ ॥

पतित्वा पादयोर्देवी सान्त्वयामास तं गिरा । अथो जगाम वैकुण्ठं यत्र देवो जनार्दनः ॥ ७ ॥

शंकराचें चरणयुगळ । तेथें ठेवूनि आपुलें मौळ । सान्तविती जाली केवळ । तयातें मंजुळ वाणीनें ॥ ८ ॥ अहो जी स्वामी देवाधिदेवा । इन्द्रादि इच्छिती तुमची सेवा । तेथ इतरांचा कोण केवा । लाहती विभवा तद्योगें ॥ ९ ॥ ज्यावरी कराल कृपेचा लेश । रंक तो होय त्रिजगाधीश । कीं वक्रावलोकनें अशेष । ब्रह्माण्डकोश संहारां ॥ ११० ॥ तुम्ही केवळ परमेश्वर । तुमचाचि अवघा हा विस्तार । सृष्टि भासे नानाकार । स्वभावान्तर भिन्नत्वें ॥ ११ ॥ विविध जीवांचिया कोटी । विविध तयांचिया राहटी । न्यायान्यायपरिपाटी । त्या घडती अदृष्टीं नियमिल्या ॥ १२ ॥ तया अदृष्टातें प्रेरक । प्रभु तुमचीच सत्ता मुख्य । युक्तायुक्ताचा विवेक । अधीन सम्यक त्या नाहीं ॥ १३ ॥ दुरदृष्टाचिया क्षोभें । बुद्धिवंतहि विचंबे । ज्ञाताचि अयुक्तारंभें । वैगुण्य लाधे प्रसादें ॥ १४ ॥ नावेक देखणा जैसा तरळे । कीं चालतां प्राणी अडखळे । किंवा वक्ताची विसरें बरळे । विपरीतकाळें तैसें तें ॥ १५ ॥ भृगु आपुला केवळ बंधु । तपस्वी पूर्ण सज्ञान साधु । त्याशीं तो न घडावा प्रमादबाधु । परी रहस्य प्रसिद्ध हें न कळे ॥ १६ ॥ अवचटें स्वहस्त निकरें उरीं । कीं श्लेष्मा नाकींचा आंगावरी । पडालिया छेदितां हानि पुरी । दुर्दशा दुसरी लोकांत ॥ १७ ॥ तेंवि ऐसिया गोष्टीचा निकर । आपुलियावरी अत्यंत क्रूर । सहसा न करावा दुर्द्धर । हाचि प्रकार उत्तम ॥ १८ ॥ शिष्टापासून अंतराय । घडतां न कीजे त्या अपाय । पश्चात्तप्त तो स्वयेंचि होय । मृत्युप्राय उमजल्या ॥ १९ ॥ तथापि अपराध पाहूनि दंड । मनुष्य देखोनि प्रौढाप्रौढ । कीं आप्त परकीय सुज्ञ लंड । कीजे उघड सर्वज्ञीं ॥ १२० ॥ यास्तव भृगूचा प्रमादभाव । चित्तीं नाणावा सर्वथैव । शमिजे विषादप्रादुर्भाव । हेंचि अर्ह ईशत्वा ॥ २१ ॥ जेंवि विद्या शोभे विनयेंकरून । कीं वैभव भोगें दानें पूर्ण । शक्ति करितां पररक्षण । पुरुष सज्ञान स्वधर्में ॥ २२ ॥ कुळवंत शोभे सदाचारें । तरुवर पुष्पादिफळसंभारें । वक्ता सुललित शुभाक्षरें । तेंवि महत्त्व शांतिक्षमेनें ॥२३॥ तये शांतिक्षमेचें आगर । प्रभुवरा तुमचें शुद्धान्तर । तुमचिया आधारें धराधर । पृथ्वी समग्र शिरीं धरी ॥ २४ ॥ तुमचिये क्षमेनें धरा । साहे संपूर्ण भूतभारा । समुद्र वडवानळा उदरा । माजि दुष्करा सांठवी ॥२५॥ तरी आतां येथें प्रस्तुत । क्षमा प्रकटिजे हेंचि युक्त । इतुकी प्रार्थना यथार्थ । मानिजे समर्थशिरोमणि ॥ २६ ॥ राया इत्यादि अमृतवाणी । करूनि भवानी चातुर्यखाणी । शान्तविती जाली शूळपाणी । तेंचि क्षणीं नमूनियां ॥ २७ ॥ यावरी भृगु बुद्धिमंत । सत्वभाव पाहूनि तेथ । सिन्धु देखोनी तृषाक्रान्त । परते तद्वत परतला ॥ २८ ॥ मग जेथ वसे श्रीजनार्दन । स्वप्रकाशें देदीप्यमान । म्हणोनि शोभे ज्या देवाभिधान । जो लक्ष्मीरमण

परमात्मा ॥ २९ ॥ तया वैकुण्ठाप्रति सत्वर । गेला शेवटीं मुनीश्वर । आतां तेथील परीक्षाप्रकार । ऐक सादर निकराचा ॥ १३० ॥

शयानं श्रिय उत्सङ्गे पदा वक्षस्यताडयत् । तत उत्थाय भगवान्सह लक्ष्म्या सताङ्गतिः ॥ ८ ॥

स्वानंदमंचकीं भक्तानुरागी । शान्तिश्रियेच्या उत्संगीं । निर्विषयस्वसुखीं अभंगीं । निद्रित शार्ङ्गी परमात्मा ॥ ३१ ॥ ऐसियातें देखोनि नयनीं । प्रत्यगात्मा ब्रह्मयोनी । संकल्पचरणें हृदयस्थानीं । ताडिता मुनी जाहला ॥ ३२ ॥ इतुकिया वरी तो श्रीहरी । सर्वान्तरात्मा निर्विकारी । शान्तिश्रियेसी बोधावरी । येऊनि सत्वरी ऊठिला ॥ ३३ ॥ राया कैसा म्हणसी रमापती । तरी भगवान आणि सताङ्गती । या विशेषणद्वयें तुजप्रति । उमजे ते रीती निवेदितों ॥ ३४ ॥ यश श्री आणि उदारता । ज्ञान वैराग्य सर्व सत्ता । येणें षड्गुणैश्वर्य ईश्वरता । श्रीधरीं तत्वता सूचविली ॥ ३५ ॥ या षड्गुणांचें मुख्य कारण । वस्तुता पाहतां सत्वगुण । सत्वीं नांदे केवळ ज्ञान । तें सत्व पूर्ण श्रीधरीं । ॥ ३६ ॥ म्हणोनि तया ज्ञानपूर्णता । ज्ञान वैराग्य आत्मसत्ता । या तिहींस्तव येरे तत्वता । यशादि सर्वदा आपैतीं ॥ ३७ ॥ ज्ञानास्तव यश संपादे । वैराग्यास्तव लक्ष्मी नांदे । ऐश्वर्य औदार्य समुदें । एवं मिथासंबंधें षड्गुण ॥ ३८ ॥ पूर्णत्वें हे साही गुण । वासुदेवीं अक्षय जाण । इतरांशीं हि हें विशेषण । ग्रंथीं कविजन देताती ॥ ३९ ॥ परंतु अंशत्व तयांचे ठायीं । षड्गुण नांदती कांहीं वाहीं । याची प्रतीति सर्वांसही । उपपत्ति ही कळतसे ॥ १४० ॥ हिरण्याक्षादि शंखासुरा । कीं मधुकैटभादि दुर्विकारां । विधीनें निर्मूनि देऊनि वरा । कोणत्या यशा संपादिलें ॥ ४१ ॥ कीं वृकासुर बाणासुर रावण । शिवें या देऊनि वरदान । जालिया परिणामाची खूण । जाणती सुज्ञ सविस्तर ॥ ४२ ॥ आतांचि प्रस्तुत येथें । भृगूचिया अंतरातें । सर्वज्ञपणें जरी जाणते । तरी कां कोपते तयावरी ॥ ४३ ॥ अच्युतीं ऐसें विपरीत सहसा । न घडे कदापि ही नराधीशा । यास्तव भगवान् आदिपुरुषा । विशेषणदीक्षा यथार्थ ॥ ४४ ॥ आणि पूर्णबोधें स्वरूपस्थित । म्हणोनि निर्विकार अच्युत । ब्रह्मत्वेंची अनुस्यूत । गुणातीत परमात्मा ॥ ४५ ॥ याकारणें विवेकेंकरून । ज्ञानवैराग्यभक्तिसंपन्न । तया संतांचें प्राप्तिस्थान । सच्चिद्घन मूर्तिमंत ॥ ४६ ॥ जयाचिया स्वरूपचिन्तनें । पावूनि तन्मयता पूर्णपणें । कदापि न पवती जन्ममरणें । पुनरावर्तनें सज्जन ॥ ४७ ॥ ऐसा भगवान् लक्ष्मीपती । लक्ष्मीसहित सताङ्गती । उठिला खडवइनि निश्चिती । हाणितां भृगु मुनि पद हृदयीं ॥ ४८ ॥

स्वतल्पादवरुह्याथ ननाम शिरसा मुनिम् ।
आह ते स्वागतं ब्रह्मन्निषीदात्राऽसने क्षणम् । अजानतामागतान्वः क्षन्तुमर्हथ नः प्रभो ॥ ९ ॥

मग आपुला जो शेषतल्प । तयावरूनि विधीचा बाप । धर्मस्थापक ब्रह्माण्डभूप । वेगें निष्कोप उतरोनी ॥ ४९ ॥ जेंवि गुरूतें अवचटें तिष्ठतां । देखोनि सच्छिष्य होय नमिता । तेंवि मुनीतें त्रिजगत्पाळिता ।

स्वशिरें वंदिता जाहला ॥ १५० ॥ यावरी आमृतोपमभाषितें । बोलता जाला अतितर आर्तें । जाणोनी शान्तिवल्लीचीं रसभरितें । फळें तयातें अर्पिलीं ॥ ५१ ॥ तेंचि परिसें कुरुभूषणा । म्हणे अगा ये सुब्राह्मणा । सुखरूप तवागमन सुज्ञा । असे कीं आज्ञा मज करीं ॥ ५२ ॥ येथ यया आसनावरी । स्वस्थ बैसें बा क्षणभरी । मजवरी पाहें कृपानेत्रीं । जालों अधिकारी अपराध ॥ ५३ ॥ तुज सारिखा तपोनिधी । येतां पुढें धांवोनि आधीं । लोटांगणें वंदिजे प्रपदीं । परि मंदप्रारब्धी मी खरा ॥ ५४ ॥ कीं तवागमनसुवेळें । निद्रित झालों दुर्दैवबळें । म्हणोनि अदृष्टें विफळें । मज हें घडलें अनुचित ॥ ५५ ॥ स्वयेंचि पूर्णकृपाभरितें । येथ आलां ऐसिया तुम्हांतें । अभिगमनादिशिष्टाचारितें । दुर्दैवोदितें न भजलों ॥ ५६ ॥ ऐसी न कळनि घडली अवज्ञा । म्हणोनि आमुतें जी सर्वज्ञा । तुम्ही योग्य आहां क्षमापना । क्षमापूर्णा मुनीश्वरा ॥ ५७ ॥ म्हणाल क्षमेची योग्यता कैसी । तरी शमदमादिसाधनविशेषीं । रजतम सांडनि सत्वशुद्धीसी । आत्मबोधासी अवगमिलें ॥ ५८ ॥ यास्तव गेला देहाभिमान । तेणें नाठवे मानापमान । सर्वभूतीं आत्मा समान । अभेद पुर्ण अनुभवला ॥ ५९ ॥ या कारणें क्षमादिलक्षणीं । वसती केली तुमचे करणीं । तरी ममापराधाची करणी । कें अंतःकरणीं स्फुरेल ॥ १६० ॥ आणि मी संतांचा सेवक । केलों धर्माचा संस्थापक । ऐसिया मजहून न कळून चूक । घडली तरी योग्य क्षमापना ॥ ६१ ॥ इत्यादि सुललित भाषणें । गौरवूनी मुनीकारणें । आसनीं बैसविलें रमारमणें । पुढील वर्तणें अवधारा ॥ ६२ ॥

अतीव कोमलौ तात चरणौ ते महामुने'। इत्युक्त्वा विप्रचरणौ मर्दयन्स्वेन पाणिना ॥ १० ॥

पुन्हा नम्रत्वें करी प्रार्थना । कोमलशब्दें दावूनि करुणा । महामुनि या संबोधना । देऊनि ब्राह्मणा श्रीहरि ॥ ६३ ॥ म्हणे बापा महामुनी । तव पद कोमल कमळाहूनी । ताडितां मम हृदयीं कठिनीं । असेल जाली वेदना ॥ ६४ ॥ ऐसें बोलूनि रमारमण । तया विप्राचे दोन्ही चरण । स्वकरें मर्दित होत्साता जाण । जगदुद्धरण जगदात्मा ॥ ६५ ॥

पुनीहि सहलोकं मां लोकपालांश्च मद्गतान् । पादोदकेन भवतस्तीर्थानां तीर्थकारिणा ॥ ११ ॥

खुणावूनि इन्दिरा रमणी । पादक्षालना आणिलें पाणी । स्वमुखें म्हणे चक्रपाणी । अमृतवाणी करूनिया ॥ ६६ ॥ सर्वैश्वर्यप्राप्तिस्थान । त्रिजगीं केवळ सद्ब्राह्मण । तिष्ठति जयापाशीं षड्गुण । अळुमाळ वचन नुलंघिती ॥ ६७ ॥ या अभिप्रायें गदाधर । भगवन् संबोधनें विप्र । संबोधूनियां सादर । प्रार्थनापर विनयत्वें ॥ ६८ ॥ कीं चतुर्दशभुवनात्मक जे लोक । ते सर्वही माझिये आंगीं देख । ऐसा सहलोक मी सम्यक । मज एकीं अनेकं अवघे हे ॥ ६९ ॥ तया मातें पवित्र करीं । आणि जे सृष्टीचे नियमनकारी । मद्गत लोकपाळ आज्ञाधारी । मज अंतरीं नांदती ॥ १७० ॥ इंद्र नांदे माझिये करीं । अग्नि राहे मुखाभीतरी । यमहि तयाचे शेजारीं । गुदद्वारीं निर्ऋति ॥ ७१ ॥ वरुण जिह्वेन्द्रियीं

राहें । वायु त्वचेमाजी समाये । सोम हृदयीं वसती लाहे । ईशही आहे रवि नेत्रीं ॥ ७२ ॥ इत्यादि सर्वही लोकपाळ । मद्गतचि तयांचा मेळ । तयांतेंहि पवित्र निखिळ । करीं प्राजळ दयाळुवा ॥ ७३ ॥ मज एकातें केलिया पुनीत । पवित्र त्रैलोक्यही समस्त । जैसी जेवविल्या गर्भिणी होत । गर्भहि तृप्त तत्सह ॥ ७४ ॥ कीं मूळीं घालितांचि उदक । पाल्हाळती सर्व ही शाख । ग्रहणीं निवळतां रविमयंक । शुद्धता अनेक प्रतिबिम्बां ॥ ७५ ॥ म्हणसी कैसेन कीजे पूत । तरी निजपादोदकें यथार्थ । जें तीर्थासि तीर्थकारी तीर्थ । अक्षयपरमार्थप्रापक ॥ ७६ ॥ तीर्थासि तीर्थकारी कैसें । तरी तीर्थासी तीर्थत्व विशेषें । तुम्हां तपस्वियांच्या पादस्पर्शें । जगाच्या दोषें न लिम्पती ॥ ७७ ॥ भलतैसें हो का पाणी । स्पर्शतांचि तुमचे चरणीं । अखिळ भूगोळींच्या तीर्थाहूनी । कल्मषहरणीं पटुतर तें ॥ ७८ ॥ जैसें भास्करकिरणें तम । पावकदीप्तीस्तव हिम । कीं आत्मज्ञानें न थरे भ्रम । तेंवि तत्तीर्थें नाम पापाचें ॥ ७९ ॥ ऐसा पदस्पृष्टजलाचा महिमा । साक्षात तव पदाची गरिमा । कोण करी तयाची सीमा । जे निगमा आम्हां न वर्णवे ॥ १८० ॥ सकळमंगळांचें स्थान । सर्वैश्वर्याचें अधिष्ठान । अखिलाभ्युदयाचें कारण । पावन चरण हे तुमचे ॥ ८१ ॥ यास्तव धन्य आजींचा दिवस । कीं हा प्रसवला महल्लाभास । अहे जालों पदस्पर्शास । जेणें सर्व सुखास पात्रता ॥ ८२ ॥

अद्याहं भगवँल्लक्ष्म्या आसमेकान्तभाजनम् । वत्स्यत्युरसि मे भूतिर्भवत्पादाहतांहसः ॥ १२ ॥

आजी मी भो तपोधना । षड्गुणैश्वर्यसंपन्ना । एकान्ताचें पात्र जाणा । जालों स्वाङ्गना-लक्ष्मीचें ॥ ८३ ॥ कीं हे सुकृताची अंकिली । सुकृत देखोनि झडा घाली । असुकृतीं निर्बुजे वहिली । जिये पापसाउली न सोसे ॥ ८४ ॥ ऐसी हे केवळ निर्मळ । अखिलमंगलांचें मंगल । आजिचेन मम हृदय-स्थळ । वसवी निश्चळ होऊनी ॥ ८५ ॥ आतां माझिया हृदयालयीं । स्थैर्य पावली हे अक्षयी । अविनासंबंधें चि पाहीं । भरंवसा निश्चयीं मज जाहला ॥ ८६ ॥ जैसी चंद्रा न सोडी ज्योत्स्ना । किंवा पृथ्वी लागूनि मृत्स्ना । वसंतातें वनश्री कृत्स्ना । पंकजजनना मज तैसी ॥ ८७ ॥ हें व्हावया कारण कोण । ऐसें म्हणाल तरी परिसा खूण । हृदयीं लागतां तुमचा चरण । गेलें संपूर्ण अंहस ॥ ८८ ॥ आजि तुमचेन चरणें सहज । हतकल्मष पुण्यपुञ्ज । जालों म्हणोनि हें घडलें चोज । महाराज ऋषिवर्या ॥ ८९ ॥ पुण्यपुञ्ज जालों ऐसा । अव्ययत्वें निधि जैसा । अतःपर जिणें एनसा । मन्नामेंचि सहसा न थारे ॥ १९० ॥ मां मातें स्पर्शूनि दूषित । करी हे कैंची घडेल मात । म्हणोनि श्री मज हृदयीं स्वस्थ । कीं जालों अंकित पदचिह्नें ॥ ९१ ॥ यया चिह्नें हृदयीं जाण । निरंतर श्री वसे म्हणोन । हें प्रसिद्ध श्रीवत्सचिह्न । येणें श्रीवत्सलाञ्छन मम नाम ॥ ९२ ॥ ऐसा नाममुद्राङ्कित तुमचा । अंकिला स्थापिला त्रिवाचा । त्रिजगत्पाळक तुमचेनि साचा । ब्रह्मण्यदेव मी म्हणवीं ॥ ९३ ॥

॥ श्रीशुक उवाच ॥ एवं ब्रुवति वैकुण्ठे भृगुस्तन्मन्द्रया गिरा ।
निर्वृतस्तर्पितस्तूष्णीं भक्त्युत्कण्ठोऽश्रुलोचनः ॥ १३ ॥

राया ऐसें देवाधिदेव । श्रीवैकुण्ठ वासुदेव । ऋषीतें देऊनियां गौरव । बोलतां स्वयमेव नम्रत्वें ॥ ९४ ॥ तयाच्या तिये गंभीरवाणी । करूनियां तो भृगुमुनि । आनंद पावला सुखावूनी । जैसा ज्ञानी स्वलाभें ॥ ९५ ॥ जिज्ञासेची हरली क्षुधा । उत्कृष्ट महिम्नानुभवसुधा । प्राशूनि तृप्त झाला बहुधा । श्रीधरीं श्रद्धा पावूनियां ॥ ९६ ॥ आणि राव ज्या परी रंका । किंवा पंडित ज्ञानाल्पका । सम्मानितां न मानूनि लेखा । अपराधशंका निवारणें ॥ ९७ ॥ मग तो अंतरीं तोषूनि बरवा । पावूनिया संकोचभावा । आदरें दाटे माजि जीवा । कांहीं न सुचूनि मौनावे ॥ ९८ ॥ तया परी तूष्णीम्भूत । जाला मुनीश्वर आनंदभरित । भगवन्निष्ठा बाणली यथार्थ । प्रेमा अद्भुत प्रकटला ॥९९॥ जेंवि सरोवर भरतां पूर्ण जळें । तटाकें सांडूनियां उचंबळे । तेंवि भक्त्युत्कंठित प्रेमबळें । होतां अथिलें सत्वाष्टकें ॥ २०० ॥ शरत्काळींच्या मंदानिळीं । डोलती जैशा वृक्षडाहाळी । तेंवि सर्वावयवमंडळी । सकंप जाली शरीरीं ॥ १ ॥ वर्षारंभीं जेंवि का अद्री । विरूढे कोमळतृणाङ्कुरीं । तैसी सपुलक त्वग्भूवरी । रोमाञ्चहारी थरकली ॥ २ ॥ हेमंतींच्या निशारमणें । स्पर्शितां सस्यीं आर्द्र होणें । तद्वत भगवद्वाक्यगुणें । प्रस्वेदकणें डवरला ॥ ३ ॥ आणि वर्षान्तींच्या पर्वतदरी । सजल जैशा स्रवती नीरी । सबाष्पलोचन तया परी । अश्रुधारीं च्यवमान ॥ ४ ॥ सासुरवासियें बहुता काळें । माता भेटतां मोहबहळें । तैं गहिवरें शब्द पांगुळे । वृत्ति मांदुळे स्नेहभरें ॥ ५ ॥ तेंवि भृगूचा सद्गद कंठ । होतां रोधिली शब्दवाट । ज्ञप्ति मुराली आनंदपुष्ट । होतां यथेष्ट अंतरीं ॥ ६ ॥ एवं सात्विक अष्टभाव । प्रेमोत्सुक्यें तो भूदेव । सत्वशान्तीचा अनुभव । देखूनि अभिनव पावला ॥ ७ ॥ मग तेणेंचि प्रेमोद्रेकें । स्वस्तव परमपुरुषमुखें । न सहूनि अधिकारविवेकें । उठिला वेगें तेथोनियां ॥ ८ ॥

पुनश्च सत्रमाव्रज्य मुनीनां ब्रह्मवादिनाम् । स्वानुभूतमशेषेण राजन्भृगुरवर्णयत् ॥ १४ ॥

परिसें राया श्रवणनिधि । मग तो स्मरोनि मागील शुद्धि । पुन्हा सत्राप्रति येऊनि धीरधी । कृतार्थबुद्धि मुनीश्वर ॥ ९ ॥ चकोरन्यायें मार्ग लक्षी । कीं चातकापरी स्वार्थापेक्षी । सरस्वतीतीरवासी ऋषी । सत्राध्यक्षीं सर्वही ॥ २१० ॥ वेदविद्यापारंगत । वेदार्थ संपूर्ण ज्यां अवगत । सदैव ब्रह्मचर्चानिरत । मननवंत विवेकी ॥ ११ ॥ तयां ब्रह्मवादियां मुनींस । स्वानुभूत जें अशेष । तें साद्यंत गुणरहस्य । कथितां संतोष जाहला ॥ १२ ॥ आधीं ब्रह्मसभे जें वर्तलें । कीं रजोदिनकरें तापिलें । त्याहूनि तमानळें पोळविलें । संतप्त केलें कैलासीं ॥ १३ ॥ शेखीं शान्तिपूर्णिमाधीश । चिदाकाशींचा स्वप्रकाश । वैकुण्ठमंडळीं अविनाश । विष्णु परेश परमात्मा ॥१४॥ तयाप्रति जातां त्वरान्वित । देखोनि मृगाक्षी सह निद्रित । हृदयीं केलें पदलाञ्छित । तंव जाला उदित शान्तिसुखें ॥ १५ ॥ तयाचिया सत्वप्रकाशें । अमृतवाक्यकिरणस्पर्शें । निवाला अत्यंतसुखसंतोषें । तें विस्तारवशें वर्णिलें ॥ १६ ॥ जन्ही महदपराध केला । तन्ही शान्तिविशेषें साहिला । अपकार उपकारसा मानिला । हा अद्भुत देखिला हरिमहिमा ॥ १७ ॥ ऐसें साद्यंत वर्तमान । भृगु सप्रेम कथितां पूर्ण । सकळ ऋषींहीं केलें श्रवण । श्रोतृगगनव्यष्टकरा ॥ १८ ॥

तं निशम्याथ मुनयो विस्मिता मुक्तसंशयाः । भूयांसं श्रद्दधुर्विष्णुं यतः शान्तिर्यतोऽभयम् ॥१५॥

तें परिसिल्यानंतर । विस्मित जाले मुनीश्वर । कां म्हणसी तरी अभ्यंतर । ऐक सादर तेथींचें ॥१९॥ ज्यातें विनयें मात्र न वंदिलें । विधीश्वर इतुकेन ते कोपले । चरणें हृदयावरी ताडिलें । तरी मानिलें श्रीधरें ॥ २२० ॥ आंगीं असोनि पूर्ण सत्ता । मदन्यायें अतिक्रमितां । जेणें हृदयीं साहिली लत्ता । परंतु शान्तता न भंगली ॥ २१ ॥ हे हरीची अविकारता । अद्भुत ऐकोनि मुनींच्या चित्ता । विस्मय वाटला तत्त्वता । इराकान्ता नृपवर्या ॥ २२ ॥ एवं अगाध हरीची शान्ती । जाणोनि विस्मयापन्न चित्तीं । संशयातीत जाले सुमती । विवेकवृत्ती मुनीश्वर ॥ २३ ॥ देवत्रयीं कोण वरिष्ठ । ऐसी चित्तीं होती हुटहुट । ते निरसिली कळल्या स्पष्ट । शीळ प्रकट तिघांचें ॥ २४ ॥ रजस्तमात्मक ब्रह्मा भर्ग । हें अनुभवूनि मुनिवरवर्ग । केवळ सत्वायतन श्रीरंग । हा निश्चय साङ्ग करूनियां ॥ २५ ॥ मग महत्तम निश्चितवंत । तया विष्णूतें श्रद्धायुक्त । वरिष्ठ मानिते जाले समस्त । निष्ठा यथार्थ दृढाविली ॥ २६ ॥ म्हणाल कोण्या हेतूस्तव । तरी ज्याचे ठायीं शान्ति वास्तव । शान्ती स्तव अभय सर्व । असे स्वयमेव जया पें ॥ २७ ॥ शान्ति म्हणिजे अविकारता । केवळ जे दशा सुलीनता । पूर्णसत्वें ते निवान्ता । असे सर्वथा ज्यापासीं ॥ २८ ॥ आणि आर्त्त जिज्ञासु अर्थार्थी । ज्ञातहि परम पुरुषार्थी । हे भयनिवृत्ती कारणें भजती । विविधा वृत्ती करूनियां ॥ २९ ॥ ते ते प्राणी शरणागत । होती निश्चयेंशीं अनार्त । भयनिरासें निष्ठावंत । पावती समस्त अभयातें ॥ २३० ॥ अथवा विरोधी जे द्वेषिती । शेखीं ते हि अभय पावती । पुन्हा जन्ममरणांतें न पवती । त्यां स्वरूपीं श्रीपती समरसवी ॥ ३१ ॥ सापराधी कां निरपराधी । जया प्रति पावल्या निरवधी । पावती निश्चयें अभयसिद्धी । संपूर्ण भयनदी उतरूनी ॥ ३२ ॥ एवं शान्ति आणि अभय । पूर्णसत्त्वें श्री अच्युतीं आहे । आणिक ही चिह्नसमुदाय । असे अनपाय ज्यापासीं ॥ ३३ ॥

धर्मः साक्षाद्यतो ज्ञानं वैराग्यं च तदन्वितम् । ऐश्वर्यं चाष्टधा यस्माद्यशश्चात्ममलापहम् ॥ १६ ॥

स्वागत स्वतःसिद्ध केवळधर्म । साक्षात नांदे जया पें परम । ज्ञान जें केवळ निर्भ्रम । असे उत्तम ज्यापासीं ॥ ३४ ॥ भूतभविष्यद्वर्तमान । प्रवृत्तिनिवृत्त्यात्मक संपूर्ण । अतीन्द्रिय आणि अविच्छिन्न । सर्व हें ज्ञान भगवंतीं ॥ ३५ ॥ आणि वैराग्य ही तदन्वित । म्हणिजे धर्मज्ञानयुक्त । जें उभयानुकुल विहित । असे निश्चित ज्यापासीं ॥ ३६ ॥ धर्मज्ञानासी प्रतिकूळ । कीं तयावांचून जें निखळ । तें वैराग्य अमंगळ । परिणाम वोफळ तयाचा ॥ ३७ ॥ धर्मज्ञानेंसीं संयुक्त । तेंचि वैराग्य यथास्थित । ऐसें श्रीधरी यथार्थ । परमपूत नांदतसे ॥ ३८ ॥ अथवा पाठान्तरें प्रसिद्ध । वैराग्यचि चतुर्विध । ऐसा मुळींचा व्यासनिगद । तें ही विशद परिसिजे ॥ ३९ ॥ प्रथम वैराग्य यतमान । व्यतिरेकनामक द्वितीय जाण । ऐक्येन्द्रियाख्य तिजाची खूण । चतुर्थ पूर्ण वशीकृत ॥ २४० ॥ यतमान म्हणिजे तें ऐसें । परमार्थाचिया यत्नवशें । विषय जाणिजती मिथ्यासे । परि सामर्थ्य नसे तत्त्यागीं

॥ ४१ ॥ म्हणोनि विषय त्यागूं न शकतां । तदिच्छा सहमान सर्वथा । टाकणें सेवीत ही असतां । हें वैराग्य तत्वता पाहिलें म्यां ॥ ४२ ॥ याहून वैराग्य जें दुसरें । कळेल तैसें परिसा वरें । साङ्ग यथेष्ट कां धणी पुरे । इन्द्रियनिकर तोषिजे ॥ ४३ ॥ तैसी विषयांची उपलब्धी । न होतां चित्ता खेद न बाधी । रसिकत्व मनीं न उठे कधीं । सर्वदा बुद्धी उदास ॥ ४४ ॥ अन्नामाजी नसतां लवण । विरस विदश किंवा अपूर्ण । थिटें घोंगडें प्रावरण । विरंग विलक्षण खरबड ॥ ४५ ॥ तथापि तत्सेवनीं प्रवृत्ति । शरीरनिर्वाहीं मनोवृत्ति । उत्तरोत्तर विषयाप्रति । तोडिजे विरक्ति व्यतिरेक हें ॥ ४६ ॥ आतां तृतीय वैराग्यलक्षण । तेंही परिसोत विचक्षण । मनीं रागशैथिल्य पूर्ण । असङ्गपण तन्मात्रीं ॥ ४७ ॥ जेसें मद्यपाचें चालणें । कीं विरहिणीचें वर्तणें । तैसें बाह्येन्द्रियें मात्र करणें । विषयसेवन सहजगती ॥ ४८ ॥ हृदयामाजी भोगानुराग । परमसूक्ष्मत्वें अंतरंग । तेणें बाह्येन्द्रियीं घडती भोग । ऐक्येन्द्रियाख्या या म्हणिजे ॥ ४९ ॥ निःशेष भोगानुरागनिवृत्ती । इन्द्रियें स्वाधीनपणें वर्तती । नियमिल्या ठायीं स्थिरावती । हें वैराग्य निश्चिती वशीकृत ॥ २५० ॥ एवं हें संपूर्ण चतुर्विध । वैराग्य श्रीधरीं स्वतःसिद्ध । जयाच्या लाभें भक्तवृंद । परमार्थ शुद्ध साधिती ॥ ५१ ॥ आणि अणिमादिसिद्धिमंत । अष्टधा ऐश्वर्य हि समस्त । जयाचे ठायीं अव्याहत । असे शाश्वत सुखदायी ॥ ५२ ॥ तेंविचि यश ही आत्ममलापह । म्हणिजे जीवाचा दुर्धर मोह । अज्ञानमय मळ तमावह । जन्मादि ज्या स्तव श्रम भोगी ॥ ५३ ॥ तो त्रिगुणात्मक अज्ञानमळ । जयाचें यश अतिनिर्मळ । परिसतां पढतां प्राज्जळ । जाय समूळ निश्चयें ॥ ५४ ॥ धर्मस्थापन दुष्टहनन । करावया नाना अवतरण । करूनि ऊर्जित चरित पूर्ण । प्रकटती अज्ञानमळहंतें ॥ ५५ ॥ ज्यांचिया स्मरणें ध्यानें गुणचिन्तनें । जीवांचें अज्ञान जाय नाहींपणें । स्वरूपीं समरसे अभेदज्ञानें । हें यश पावन हरी आंगीं ॥ ५६ ॥ एवं शान्ति अभय धर्म ज्ञान । वैराग्य यश ऐश्वर्य पूर्ण । श्रीरमारमणीं विराजमान । भजककल्याण ज्या योगें ॥ ५७ ॥ ऐसा प्रत्ययायुक्त सुनिश्चय । अंतर्यामीं मुनिवर निश्चय । करिता जाला निःसंशय । पुढील अन्वय अवधारा ॥ ५८ ॥

मुनीनां न्यस्तदण्डानां शान्तानां समचेतसाम् । अकिञ्चनानां साधूनां यमाहुः परमां गतिम् ॥ १७ ॥

ऋषि आपण आपणांमाजी । म्हणती निश्चयें स्वसमाजीं । शान्त्यादिसद्गुणीं युक्त कंजी । भवभयभंजी परमात्मा ॥ ५९ ॥ ज्यातें आम्नायसमुच्चय । किंवा सनकादिक ऋषिवर्य । जो मुनींची परमगति होय । ऐसें निश्चयें बोलिलें ॥ २६० ॥ ते मुनि कवण्या प्रकारींचे । जिहीं परमार्थमननें साचें । ठाणें उठविलें कामादिकांचें । वदती वाचे शुभ शब्द ॥ ६१ ॥ मनें न इच्छिती परपीडन । जिव्हें सांडिलें दुर्भाषण । आंगें न करिती ताडन । केलें विसर्जन दंडाचें ॥ ६२ ॥ त्रिविधदंडाचा परित्याग । करूनि शान्ति जोडिली साङ्ग । कामक्रोधाचें जाळिलें दांग । जाले अभंग सुशान्त ॥ ६३ ॥ भूतमात्रीं आत्माराम । जाणोनि भेद जाळिला विषम । समता चित्तासी अत्युत्तम । बाणली निःसीम अनुभवें ॥ ६४ ॥ सर्वसाक्षित्वें उपाधिरहित । निःस्पृह होऊनि वैराग्ययुक्त । जाले अकिञ्चन स्वरूप-

स्थित । स्वधर्मनिरत निर्मम ॥ ६५ ॥ जयां समान मृत्स्नाभर्म । न इच्छिती ऐन्द्रिय शर्म । उरग-त्वग्वत मानिती वर्ष्म । जाणती वर्म भक्तीचें ॥ ६६ ॥ या प्रकारींचे जे मुनिगण । ऐसियांचें प्राप्तिस्थान । साक्षात परब्रह्म पूर्ण । ज्यातें सर्वज्ञ बोलिलें ॥ ६७ ॥ कीं सर्वां गतीहूनि चरमगति । जेथूनि नव्हे पुनरावृत्ति । जेथ अभेदें ज्ञानी समरसती । तो सत्वव्यक्ति श्रीविष्णु ॥ ६८ ॥ ऐसें बोलूनियां ते सुमती । या वरी आणिक जें निर्द्धारिती । भगवन्निष्ठा दृढाविती । ते परिसा युक्ती तयांची ॥ ६९ ॥

सत्वं यस्य प्रियामूर्त्तिर्ब्राह्मणास्त्विष्टदेवताः । भजन्त्यनाशिषः शान्ता यं वा निपुणबुद्धयः ॥ १८ ॥

सत्व जयाची प्रियतम मूर्ति । म्हणिजे सत्वगुणात्मक जे व्यक्ति । तेचि विशेषें ज्या आवडती । जीस्तव प्राप्ती वास्तव ॥ २७० ॥ आणि ब्रह्मशब्दें बोलिजे वेद । तदभिज्ञ ते ब्राह्मण विशद । ज्याचें इष्टदैवत प्रसिद्ध । त्या भजे शुद्ध सद्भावें ॥ ७१ ॥ स्वयें आपण सत्वमूर्ति । भजे सत्ववर्णा द्विजांप्रति । ज्यातें सत्वसंपन्न भजती । निपुणबुद्धि निष्काम ॥७२॥ सदसद्विचारी परम दक्ष । अवलंबिती सन्मार्ग-पक्ष । भक्तिज्ञानविरागाध्यक्ष । धरिती लक्ष स्वरूपीं ॥ ७३ ॥ ऐसे निपुणबुद्धि अनाशिष । म्हणिजे निष्काम जे निःशेष । केवळ शान्त निरपेक्ष । भजती ज्यास सप्रेम ॥ ७४ ॥ तरी सत्वचि कां हरीतें प्रिय । जरी ऐसा होईल संशय । तो ही अंतरीं ये प्रत्यय । विषादान्वयगुणभेदें ॥ ७५ ॥

त्रिविधाकृतयस्तस्य राक्षसा असुराः सुराः । गुणिन्या मायया सृष्टाः सत्त्वं तत्तीर्थसाधनम् ॥ १९ ॥

वस्तुता पाहतां आकृति त्रिधा । सत्वरजस्तमात्मका विविधा । राक्षसासुरसुराभिधा । ज्या सृजिल्या प्रसिद्धा मायेनें ॥ ७६ ॥ एकत्वीं न रमवे व्हावें बहुत । ऐसी आदिपुरुषाची अनाकलित । इच्छाशक्ति जे कां महत । तीसीं संकेत गुणमयी ॥ ७७ ॥ ते लाहतां प्रभूची सत्ता । गुणत्रया प्रसवूनि तत्वता । स्थूळलिङ्गात्मका अनंता । उपाधिरूपता आंतली ॥ ७८ ॥ तया उपाधीमाजी परमात्मा । जिणें गवसूनि प्रकटली गरिमा । विविधाकृति अधमोत्तमा । आणि मध्यमा लेवविल्या ॥ ७९ ॥ जेंवि घटब्राहुल्यें गगनाकृति । अनेक प्रकारीं अवभासती । तेंवि वर्ष्मावच्छेदें अजस्र चित्तीं । अभेदभेदाप्रति अवगे ॥ २८० ॥ त्यामाजी सत्वगुणात्मक सुर । रजोगुणात्मक अनिर्ज्जर । तमप्रचुर राक्षसनिकर । एवं विस्तार हा अवघा ॥ ८१ ॥ तया भगवंताचा यया परी । मायासृष्ट गुण विकारी । तेथ सत्वरूप निजनिर्द्धारीं । कल्याणकारी शुद्धत्वें ॥ ८२ ॥ चहूं पुरुषार्थांचें कारण । जें तत्प्राप्तीचें साधन । तें सत्वचि निश्चयेंकरून । अवगम्यमान ऐसें हें ॥ ८३ ॥ जें जें कांहीं सत्वात्मक । तें तत्प्राप्तिसाधक सम्यक । कर्मधर्मदानादिक । वैराग्यविवेक तप पुण्य ॥ ८४ ॥ सत्वबुद्धीनें सत्वात्मका । भजतां करूनि दृढ विवेका । प्राणी पुरुषार्थां अशेखां । धर्मादिकां लाहातसे ॥ ८५ ॥ एवं सकळकल्याणाचें बीज । तें तव सत्वचि पुण्यपुञ्ज । तया सत्वाची मूर्ति सहज । पूर्णत्वें अज पुरुषोत्तम ॥ ८६ ॥ यास्तव साधकां मुमुक्षुवर्गा । भजनीय विष्णु संसृतिभंगा । आतां या निश्चयशतशृंगा । प्रतीतिधराङ्गा वरी

स्थैर्य ॥ ८७ ॥ ऐसा मुनींचा कृतविवेक । प्रतीतिगत पारमार्थिक । कथिता जाला कवितिलक । वक्ता श्रीशुक नृपातें ॥ ८८ ॥

श्रीशुक उवाच ॥ एवं सारस्वता विप्रा नृणां संशयनुत्तये । पुरुषस्य पदाम्भोजसेवया तद्गति गताः ॥ २० ॥

श्रीशुक म्हणे गा सुहाडा । परीक्षिति बुद्धिसुघडा । पूर्वोक्तप्रकारें निवाडा । करिते रोकडा ते जाले ॥ ८९ ॥ जे सरस्वतीतीरनिवासी । एकत्र मिनले क्रतुकार्यासी । विप्र विपश्चित विवेकराशी । क्रान्तदर्शी प्रबुद्ध ॥ २९० ॥ ऐसे केवळ मुनि सर्वज्ञ । ब्रह्मानुभवें अभेद पूर्ण । परी उत्तरोत्तर नर अज्ञान । संशयापन्न स्वहितातें ॥ ९१ ॥ देवत्रयीं कोण वरिष्ठ । मोक्षप्रद भजकां इष्ट । कवणा भजिजे एकनिष्ठ । संशयाविष्ट यापरी ॥ ९२ ॥ तयांचिया संशयनिवृत्ती । कारणें इत्थंभूत सुमती । निश्चय करूनियां निगुती । भजन विहितीं विपज्जलें ॥ ९३ ॥ कीं श्रेष्ठ आचरोनि दावितीं । इतरांसि लागे तत्प्रवृत्ती । निःसंशय स्वहिता भजती । सद्गति पावती तदाश्रयें ॥ ९४ ॥ जरी ते कैसे कवणा भजले । ऐसें पुससी मज तूं वहिलें । तरी जो पूर्णपणें शान्तिबहळें । सुलीन आपले स्वरूपीं ॥ ९५ ॥ तो पुरुष परमात्मा रमेश । तयाचें पदपद्म हतकल्मष । महत्तम श्रद्धायुक्त सुरस । भजले विशेष निष्ठेनें ॥९६॥ अमळान्तरीं सच्चिदानंद । आदिपुरुषाचें जें श्रीपद । षोडशेन्द्रियोपचार विशद । अर्पूनि शुद्ध भजिन्नले ॥ ९७ ॥ ऐसिया सेवेनें सद्गति । म्हणिजे विष्णूची वास्तवप्राप्ती । अभेदात्मबोधें तये प्रति । पावले निश्चिती मुनिवर ॥ ९८ ॥ चतुर्थ मुक्ति जे सायुज्यता । लाभले अक्षय ते तत्वता । पुन्हा संसरणाची वार्ता । नसे सर्वथा जी योगें ॥ ९९ ॥ येथूनि संपला हा इतिहास । येथ सूचिला माधवोत्कर्ष । सर्वीं सर्वोत्तम रमाधीश । तद्भक्ति निःशेष मोक्षकर ॥ ३०० ॥ इतुकिया कथनाचें तात्पर्य । बादरायणि नृपासि काय । सूचिता जाला उपदेशप्राय । तें विद्वद्वर्य जाणती ॥ १ ॥ सर्वांसि कळावयासाठीं । प्रकट बोलिजेल ते गोठी । स्वहिता साधकीं साधनाविष्टीं । ऐकिजे श्रुतिपुटीं विश्वासें ॥ २ ॥ नृप विप्रशापें गतायुष । दुर्मरणास्तव कृतकल्मष । इच्छी अंतरीं केवळ मोक्ष । धरूनि लक्ष शुकवचनीं ॥ ३ ॥ कवणा देवा शरण जावें । कोण तें साधन आचरावें । ऐसिया या साशंकभावें । शुकासि दैवें पूशिलें ॥ ४ ॥ यास्तव सर्वविदें तेणें । अचुक साधन प्रौढवयुनें । आशु कैवल्याप्राप्ति जेणें । तें कथिलें कृपेनें हरिभजन ॥ ५ ॥ सत्यायशीवे अध्यायीं बोध । वास्तवस्वरूपाचा शुद्ध । करूनि शेखीं अभयप्रद । भजकां गोविन्द हें कथिलें ॥ ६ ॥ त्यावरी आशंकोनियां नृप । भोगी विष्णु त्यागी गरप । भोगी मोक्षद त्यागी अमूप । भोगद सकृप भजकांसी ॥ ७ ॥ कां हें ऐसें विपरीत शीळ । म्हणोनि पुसतां सौभद्रबाळ । अठ्ठ्यायशीवीं शुकें तें पघळ । कथिलें प्राञ्जळ कळेसें ॥ ८ ॥ कीं तमबाहुल्यें गुणसंवृत । शंभु केवळ सगुणमूर्त । आणि पूर्णसत्वें गुणातीत । रमानाथ परब्रह्म ॥ ९ ॥ यास्तव निर्गुण मायातीता । त्या श्रीहरीतें प्रेमें भजतां । भक्त पावती गुणातीतता । कैवल्य तत्वता सायुज्य ॥ ३१० ॥ हा चि दृढत्वें अभिप्राय । प्रत्यया यावया व्यासतनय । सत्वपरीक्षात्मक अन्वय । मुनिकृत विस्तृत हा कथिला ॥ ११ ॥ कीं मुमुक्षु अनन्यशरण । पश्चात्तप्त विरक्त पूर्ण । विगतायुषी

कृतप्रश्न । शमसंपन्न श्रद्धाळु ॥ १२ ॥ ऐसा परीक्षिति अधिकारी । जाणोनि श्रीशुक निर्धारीं । परमसार त्या सर्वसारीं । मोक्षकारी निर्वाणींचें ॥ १३ ॥ तें श्रीहरीचें अनन्यभजन । सर्वोत्कृष्ट अतिपावन । कथिता जाला मुनि सर्वज्ञ । भेपजीं निर्वाण सुधे परी ॥ १४ ॥ इतिहासकथनीं अभिप्रेत । हेंचि शुकाचें इत्थंभूत । भगवन्निष्ठा यथास्थित । संशयरहित मोक्षदा ॥ १५ ॥ तरी श्रोतीं सुज्ञी होचि खूण । जाणोनि कीजे भगवद्भजन । सुगम आणि मुक्तिकारण । सकळां पावन निर्धारें ॥ १६ ॥ भेदभावना देवतान्तरीं । न धरूनि एकचि श्रीहरी । भजतां कैवल्य निर्धारीं । जें दुर्लभ अध्वरीं तपस्तीर्थीं ॥ १७ ॥ अन्य साधनांचे सायास । स्वयें सोडूनियां निःशेष । आश्रयिजे रमाधीश । हेंचि रहस्य सर्वार्थें ॥ १८ ॥ असो आतां हे शुकोक्तगाथा । इचिया श्रवणाचें फळ तत्त्वता । शौनकादिकां जाला कथिता । सूत तें श्रोतां परिसिजे ॥ १९ ॥

॥ सूत उवाच ॥ इत्येतन्मुनितनयास्यपद्मगन्धपीयूषं भवभयभित्परस्य पुसः ।
सुश्लोक श्रवणपुटैः पिबत्यभीक्ष्ण पान्थोऽध्वभ्रमणपरिश्रमं जहाति ॥ २१ ॥

शौनकप्रमुखां म्हणे सूत । हें शुकमुखपंकजविनिःसृत । गंधपीयूषवत प्रशस्त । सुख संतत संप्रापक ॥ ३२० ॥ जैसा हिमतमनाशक प्रभाकर । कीं निदाघसन्ताप हरी हिमकर । दैन्यनिवारक रमा सधर । भवभयनाशकर तेंवि जें ॥ २१ ॥ परपुरुष कमलाकान्त । सुष्ठु कीर्तिमंत तच्चरित । श्रवणपुटें जो प्राशी संतत । होय पांथ श्रमरहित ॥ २२ ॥ संचित प्रारब्ध क्रियमाण । त्रिविध-कर्मात्मक पंथ गहन । अहरह चालूनि करी क्रमण । रहित गणन देहपुरी ॥ २३ ॥ तेथ तापत्रयें अतिव्याकुळ । षड्विकारतस्करकृतविह्वळ । विश्रान्तिरहित भ्रमणशीळ । क्लेशी केवळ संसारी ॥ २४ ॥ तो ते अध्वजपरिश्रम । विसर्जी संपूर्णही विषम । लाभे अक्षय विश्राम । पुरुषोत्तमगुणश्रवणें ॥ २५ ॥ ऐसें ज्याचें शुभ चरित्र । तोचि हा भगवान देवकीपुत्र । दर्शवावया व्यासकुमर । आख्यानान्तर नृपा कथी ॥ २६ ॥ तेचि कथा परम अपूर्व । हृदयस्थ श्रीकृष्णदयार्णव । भापावचनीं वदवी सर्व । ऐकिजे सदैव श्रोतृगणीं ॥ २७ ॥ जरी कोणी म्हणती तर्कवंत । वेदस्तुतीहूनि येथपर्यंत । कृष्णकथा जाली त्रुटित । तरी हा अर्थ येथ नसे ॥ २८ ॥ श्रुतींहीं ज्यातें वास्तव स्तविलें । तेणेंचि शंकरा संरक्षिलें । तेणेंचि द्विजलत्ते साहिलें । तेणेंचि केलें अवतरणें ॥ २९ ॥ कृष्णरूपें यदुकुळीं सुगम । साक्षात् तोचि पुरुषोत्तम । तच्चरितचि अवघें परम । जाणिजे उद्दाम भक्तजनीं ॥ ३३० ॥ तरी वशिष्ठान्वयगगनतरणि । श्रीशुकयोगीन्द्र महामुनि । म्हणे भो कुरुकुलचूडामणि । भगवत्करणी अवधारीं ॥ ३१ ॥

श्रीशुक उवाच । एकदा द्वारवत्यां तु विप्रपत्न्याः कुमारकः । जातमात्रो भुवं स्पृष्ट्वा ममार किल भारत ॥२२॥

कोणे एके समयीं जाण । द्वारकेमाजि असतां कृष्ण । ब्राह्मणस्त्रियेचा नंदन । पावला मरण जातमात्र ॥ ३२ ॥ जननीजठरा बाह्य मात्र । येऊनि स्पर्शला गोत्रागात्र । तत्काळ जाला निधनपात्र ।

आयुष्यसूत्रविखंडनें ॥ ३३ ॥ तंव निश्चयें ऐसें होतां । नवमासश्रमविफळता । देखोनि आक्रोशें जाया रुदतां । सचिन्त तत्त्वता ब्राह्मण ॥ ३४ ॥

विप्रो गृहीत्वा मृतकं नृपद्वार्युपधाय सः । इदं प्रवोच विलपन्नातुरो दीनमानसः ॥ २३ ॥

मानसीं अत्यंत जाला खिन्न । गेला पुत्राशादुम वाळुन । हातीं येऊन जाय निधान । जाला त्याहून बहु आतुर ॥ ३५ ॥ ऐसा ब्राह्मण दुःखाभिभूत । जें नृपसभागृह सुशोभित । जेथ उग्रसेनादि कृष्णप्रभृत । बैसती समस्त यदुनिचय ॥ ३६ ॥ तये नृपद्वारीं जाऊनि त्वरित । ठेवूनियां तनयप्रेत । दीर्घस्वरें विलाप करीत । बोलता विक्षिप्त हें जाला ॥ ३७ ॥

ब्रह्मद्विपः शठधियो लुब्धस्य विषयात्मनः । क्षत्रबन्धोः कर्मदोषात्पञ्चत्वं मे गतोऽर्भकः ॥ २४ ॥

जातमात्र हा ममार्भक । मृत्यु पावला तात्काळिक । हें मज भोंवलें नृपपातक । कीं निष्कळंक मी असें ॥ ३८ ॥ मी सदाचारी सदा निरत । सहसा नाचरें अविहित । हा जाला येवढा महद्घात । येथ निमित्त हेंचि खरें ॥ ३९ ॥ ब्रह्मद्वेष्टा शठबुद्धि । लुब्ध विषयात्मा तमोनिधि । क्षत्रबंधु नृप प्रमादी । वर्ते अविधि केवळ ॥ ३४० ॥ अखिल कल्याणाचें मूळ । वेदविद्ब्राह्मण केवळ । तत्सेवनें अभीष्ट फळ । लाहिजे निर्मळ नृपतीनें ॥ ४१ ॥ तें अभीष्ट फळ हेंचि प्रकट । प्रजांहीं असावें सुखाविष्ट । संततिसंपत्तियोगें विशिष्ट । राजिक दैविक श्रमरहित ॥ ४२ ॥ तें सोडूनि ब्राह्मणभजन । राज्योन्मादें साभिमान । स्वेच्छा विषयसेवनीं मग्न । द्वेषी पूर्ण दुर्बुद्धि ॥ ४३ ॥ बोलणें आन करणें आन । तिर्दय केवळ विवेकहीन । ऐसा नृपतिं छद्मनिपुण । प्रतारणपर नष्ट ॥ ४४ ॥ तत्कर्मदोषास्तव निष्टंक । मृत्यु पावला ममार्भक । जैसा ग्रीष्मवातें दीपक । सस्नेहसूत्रक मालवे ॥ ४५ ॥ कुटुम्बी प्रवर्त्तल्या दुराचारा । क्लेश होती कुटुंबा समग्रा । तेंवि राजा कुबुद्धि जालिया पुरा । प्रजानिकरा अस्वास्थ्य ॥ ४६ ॥

हिंसाविहारं नृपति दुःशीलमजितेन्द्रियम् । प्रजा भजन्त्यः सीदन्ति दरिद्रा नित्यदुःखिताः ॥ २५ ॥

नृपें प्रजारक्षणोद्देशें । स्वयें विहरिजे चमूविशेषें । प्रजापीडक हिंस्र रोषें । दस्यु आवेशें वधावे ॥ ४७ ॥ तेणें पृतना शिक्षित राहे । हिंसक श्वापदां नाश होये । सामंतनिकर धर्षण लाहे । प्रजा अभयें वर्तती ॥ ४८ ॥ हें सांडूनि आर्यचर्या । वृथा पशुपक्ष्यादिनिचया । मारी नागवी जनसमुदाया । न देखूनियां अन्याय ॥ ४९ ॥ ग्राम्यविषयशर्माभिलाषें । इन्द्रियें अनावर असंतोषें । वार्ष्मिक पौषी धर्मनाशें । परोत्कर्षें दुःखात्मा ॥ ३५० ॥ ऐसा हिंसाविहारी दुःशील । अजितेन्द्रिय नृप बाष्कळ । त्यातें भजती ज्या प्रजा निखळ । त्या दुःखदारिद्र्यें पीडती ॥ ५१ ॥ एवं आक्रोशें अनुवर्षी । मोघ होतां संतानकृषी ।

इये गाथेतें विप्रर्षी । गाता अशेषी जाहला ॥ ५२ ॥ जैसा प्रथम बाळ जातमात्र । पंचत्व पावला गतायुगात्र । तैसेंच प्रत्यब्दीं त्यक्तशरीर । जाले कुमर विप्राचे ॥ ५३ ॥

एवं द्वितीयं विप्रर्षिस्तृतीयं त्वेवमेव च । विसृज्य स नृपद्वारि तां गाथां समगायत ॥ २६ ॥

प्रथमा समचि द्वितीय तृतीय । सुतकुणपातें विप्रवर्य । नवमपर्यंत सशोकहृदय । ठेवूनियां नृपद्वारीं ॥ ५४ ॥ पूर्वोक्तवाक्यें दीर्घस्वरें । हाका मारूनि आक्रोशभरें । वारंवार सम्यक्प्रकारें । जाला तीव्रें बोलता ॥ ५५ ॥ परंतु तयासी प्रत्युत्तर । कोणीं न केलें अल्पमात्र । तंव शेवटीं वर्तलें विचित्र । तें कौतुक समग्र परिसिजे ॥ ५६ ॥

तामर्जुन उपसृत्य कर्हिचित्केशवान्तिके । परेते नवमे बाले ब्राह्मणं समभाषत ॥ २७ ॥

मेला असतां नवम बाळ । मृत तत्कुलाय जवनशीळ । ठेवूनि नृपद्वारीं शोकाकुळ । बोलिला प्राञ्जळ ते गाथा ॥ ५७ ॥ कीं भूपतीच्या दुष्कर्मदोषें । मृत्युसदनीं मत्संतान वसे । प्रायशा दुराचारी भूप ऐसे । तत्प्रजा विशेषें सीदती ॥ ५८ ॥ ऐसी उच्चरवें विलापगाथा । यदुपुङ्गव बैसले असतां । पूर्ववत गायिली द्विजें तत्वता । अतिं आर्तता प्रकटूनी ॥ ५९ ॥ तंव अवचटें पाण्डववीर । धनंजयनामा महा शूर । यदुसंसदीं स्नेहप्रचुर । होता सादर हरिनिकटीं ॥ ३६० ॥ तो तये गाथेतें सकळ । परिसूनियां प्रतापशीळ । ब्राह्मणातें कृपावत्सल । बोलिला यदुकुळउपहासें ॥ ६१ ॥

किस्विद्ब्रह्मंस्त्वन्निवासे इह नास्ति धनुर्धरः । राजन्यबन्धुरेते वै ब्राह्मणाः सत्रमासते ॥ २८ ॥

अरे ब्राह्मणा व्यर्थ कां रुदसी । ग्रीष्मनिदाघीं निवों पाहसी । अश्मकीं मार्दवातें इच्छिसी । तरी केंवि होसी कृतार्थ ॥ ६२ ॥ चंदनीं इच्छाफळ याचिलें । तें कल्पतरूवीण लाभे वहिलें । अर्कीं अमृता अभिलाषिलें । तरी वृथा गमलें मनोगत ॥ ६३ ॥ तेंवि तूं आपुल्या दुःखहरणा । क्षितिधर क्षत्री म्हणोनि रुदना । येथें करिसी शोकें विलपना । मोहें परीक्षणा न करूनी ॥ ६४ ॥ इये तुझिये निवासनगरीं । कोणी नाहींच धनुर्धारी । क्षतापासूनि रक्षी क्षेत्री । तो निर्धारीं मज न दिसे ॥ ६५ ॥ जेथ धनुर्धारीच नसे पुरता । तेथें ब्राह्मणाची कैंची वार्ता । जो प्राणासमान विप्रा आर्त्ता । रक्षी तत्वता धार्मिक ॥ ६६ ॥ म्हणसी येथ हे सभेमाजी । बैसली इतुकी राजन्यराजी । तरी हे क्षत्रिय नव्हती जाण तूं आजी । जे ब्राह्मणकार्जीं उपकरती ॥ ६७ ॥ जेव्हां झाला स्वधर्मलोप । जातिवैगुण्या तैं आरोप । यास्तव तुजसारिखे हे भूप । दीनस्वरूप ब्राह्मण ॥ ६८ ॥ हे इतुके ही क्षत्रकुलीन । जेंवि सत्रीं मिळाले ब्राह्मण । येथ तूं इच्छिसी प्रजारक्षण । तरी तें कोठून घडेल ॥ ६९ ॥ क्षत्रिय असोनि कैसे नव्हती । ऐसें मानिसी जरी तूं सुमती । तें ही कथितों मी तुजप्रती । संशयनिवृत्तीकारणें ॥ ३७० ॥

धनदारात्मजापृक्ता यत्र शोचन्ति ब्राह्मणाः । ते वै राजन्यवेषेण नटा जीवन्त्यसुम्भराः ॥ २९ ॥

राजपदवी जयांसी प्राप्त । तयांसि राजन्य हा संकेत । तयांचे राज्यीं शोकाभिभूत । जरी क्लेशयुक्त ब्राह्मण ॥ ७१ ॥ न मिळे ब्राह्मणातें अन्न । व्यवहारार्थ काञ्चन धन । वर्षातपहिमवारणा सदन । वसनावीण पीडती ॥ ७२ ॥ जायातनयावांचूनि श्रम । पावती केवळ द्विजोत्तम । त्यांचें न वारिती दुःख विषम । ते नटासम वेषधारी ॥ ७३ ॥ जेंवि सोंगें घेऊनि जगीं नट । निर्लज्जपणें भरिती पोट । तैसे प्राणपोषक राजे नष्ट । वृथापुष्ट अन्यायी ॥ ७४ ॥ शोकें आक्रंदती ब्राह्मण । जीविका संपादिती आपण । ते नटांहूनि ही केवळ हीन । कीं रंजवूनि तेजिती ॥ ७५ ॥ यास्तव ऐसियां पुढें हाका । मारूनि वृथा कष्टसी तूं कां । जेंवि प्रेतापुढें करितां शोका । सान्तवी लोकां रडतयां ॥ ७६ ॥ मज देखूनि तुझें दुःख । कळवळा आला असे देख । सामर्थ्य आसोनि जो वंचक । तोही एक पापात्मा ॥ ७७ ॥ ऐसें बोलूनियां अर्जुन । भगवन् संबोधनें ब्राह्मण । संबोधूनि पुढें वचन । वदला संपूर्ण तें परिसा ॥ ७८ ॥

अहं प्रजां वां भगवन्रक्षिष्ये दीनयोरिह । अनिस्तीर्णप्रतिज्ञोऽग्निं प्रवेक्ष्ये हतकल्मषः ॥ ३० ॥

तुम्ही स्त्रीपुरुषें अत्यंत दीन । मृतसंतानें शोकायमान । तुमचा भवतरु प्रजावीण । निष्फळ तो करीन मी सफळ ॥ ७९ ॥ मी आपुल्या सामर्थ्यबळें । निधनीं रक्षीन तुमचीं बाळें । हीं प्रतिज्ञोत्तरें माझीं अचळें । तुवां सुशीळें जाणावीं ॥ ३८० ॥ जरी हे प्रतिज्ञा मी न निस्तरें । तरी पावकीं प्रवेशेन निर्धारें । करीन हें तूं जाण खरें । होईन तेणें निष्पाप ॥ ८१ ॥ ब्राह्मणाचे विलापध्वनी । क्षत्रियें ऐकावे आपुले कानीं । वरिष्ठपातक ययाहूनि । नाहीं अवनीवरी कांहीं ॥ ८२ ॥ आणि बोलिला बोल न कीजे साच । हेंही एनस त्याहूनि नीच । तें मी सेवूनि ज्योतिर्वर्च । अनृत वचन निस्तरीन ॥ ८३ ॥ राया कुरुभूमंगळसूत्र । तव पितामह यदु सर्वत्र । देखता ब्राह्मण पवित्र । या वाग्विस्तारा बोलिला ॥८४॥ तें ऐकोनि तो ब्राह्मण । धनंजयातें विचक्षण । देता जाला प्रतिवचन । तें तूं श्रवण करीं पां ॥ ८५ ॥

ब्राह्मण उवाच ॥ संकर्षणो वासुदेवः प्रद्युम्नो धन्विनां वरः । अनिरुद्धोऽप्रतिरथो न त्रातुं शक्नुवन्ति यत् ॥३१॥

ब्राह्मण म्हणे रे अविचक्षणा । बोलसी गोष्टी अप्रमाणा । पाहूनि आपुली संभावना । चतुरें वचना बोलावें ॥ ८६ ॥ जें भास्वता तम अलोट । तेथ खद्योता कें हुटहुट । अमृतें जो गद नव्हे नष्ट । त्या ओषधि पालट काय करी ॥ ८७ ॥ तेंवि संकर्षण ईशावतार । श्रीकृष्ण साक्षात परमेश्वर । धनुर्धरांचा जो महेन्द्र । त्रिजगीं वीर प्रद्युम्न ॥ ८८ ॥ अनिरुद्धहि अप्रतिरथ । ज्या सम कैंचा सुभट समर्थ । ऋक्षीं अप्रतिम निशानाथ । शौर्यें तद्वत आगळा ॥ ८९ ॥ हे जे न शकती रक्षण करूं । तेथ तूं कोठें सामान्य नरू । बोलसी तितुकें बालिशपर । तेंहि सादर अवधारीं ॥ ३९० ॥

तत्कथं नु भवान्कर्म दुष्करं जगदीश्वरैः । चिकीर्षसि त्वं बालिश्यात्तन्न श्रद्दध्महे वयम् ॥ ३२ ॥

राम वासुदेव पद्युम्न । अनिरुद्ध ऐश्वर्यपूर्ण । सर्व जगाचे ईश्वर जाण । स्थितिभवनिधनकारक हे ॥ ९१ ॥ ययांचेनि जें दुष्कर परम । यांसिं जें न घडे अत्यंत विषम । तें तूं करूं इच्छिसी कैसें कर्म । प्रायशा भ्रम तुज जाला ॥ ९२ ॥ बाळक जैसें बुद्धिरहित । चंद्रबिम्बा धरूं धांवत । तेंवि मूर्खत्वें विचाररहित । बोलसी पुष्पवत् विहायसीं ॥ ९३ ॥ गरुडा न घडे अतिक्रमण । तेथ कुक्कुटा कवण मान । विश्वास तव वाक्यीं म्हणोन । सर्वथा जाण मज नये ॥ ९४ ॥ बोलतां अधिकारानुसार । विश्वासती तेथ चतुर । प्रतीतिगत हा वाग्व्यापार । नव्हे असार आम्हांसी ॥ ९५ ॥ ईश्वरा दुष्कर जे कर्मासिद्धी । ते करूं म्हणसी बालिशबुद्धी । तेथ न विश्वासूं आम्ही कधीं । मूर्खवादीं निश्चयेंसीं ॥९६॥ यापरी तेजोभंगकर । ब्राह्मणाचीं वाक्यें उखर । ऐकूनि बोले सुभद्रावर । तें परिसें क्षितिधर-शिरोमणि ॥ ९७ ॥

॥ अर्जुन उवाच ॥ नाहं संकर्षणो ब्रह्मन्नकृष्णः कार्ष्णिरेव च । अहं वा अर्जुनो नाम यस्य वै गांडिवं धनुः ॥३३॥

म्हणे रे ब्राह्मणा नासाबोंडी । धरूनि बुटबुटावें तांतोडी । तुज काय कळे सुभटप्रौढी । शोकें वेडी तव बुद्धि ॥ ९८ ॥ नेणोनि माझा पराक्रम । तूं वल्गना करिसी विषम । जाणसी घडतां परिणाम । पूर्ण काम जैं होसी ॥ ९९ ॥ मी नव्हें सहसा संकर्षण । जो पळाला मागधा भेण । किंवा नव्हे रुक्मिणीरमण । कालयवनभयभीरु ॥ ४०० ॥ कीं मी न होय तो प्रद्युम्न । शिवें जाळिला प्रक्षोभून । कामुकीं ग्राम्यीं संचरून । युवति यून करी कलुषी ॥ १ ॥ ना मी निश्चयें अनिरुद्ध । जो बाणासुरें केला बद्ध । मी अर्जुननामा वीर प्रसिद्ध । ज्याचें धनुष्य विजयद गाण्डीव ॥ २ ॥

मावमंस्था मम ब्रह्मन्वीर्यं त्र्यम्बकतोषणम् । मृत्युं विजित्य प्रयते आनेष्ये ते प्रजां प्रभो ॥ ३४ ॥

म्यां शंकरेंसीं करूनि समर । जिंकिलें त्यातें प्रतिज्ञापर । तेणें तोषला तो मजवर । कृपा अपार करूनियां ॥ ३ ॥ तें त्र्यंबकतोषणकर मम वीर्य । नको अवमानूं सांडोनि धैर्य । अवश्य करीन तुझें कार्य । जेणें आर्य मानवती ॥ ४ ॥ अंतक जिंकूनि रणाङ्गणीं । तव प्रजा आणीन सत्य मानीं । तुझे हद्भूवरी सुखलावणी । करीन जनीं भो द्विजवरा ॥ ५ ॥

एवं विश्रंभितो विप्रः फाल्गुनेन परंतप । जगाम स्वगृहं प्रीतः पार्थवीर्य निशामयन् ॥ ३५ ॥

राया परंतपा भगवन्निष्ठा । एवं फाल्गुनें ब्राह्मणाभीष्टा । प्रौढ बोलूनि स्वप्रतिष्ठा । ब्राह्मणीं निष्ठा प्रकटिली ॥ ६ ॥ यदुपुङ्गवां निराकरून । स्वपराक्रमा अभिवादून । विश्वासविला सुब्राह्मण । प्रजारक्षण आकाङ्क्षु ॥ ७ ॥ मग तो पार्थवीर उद्दाम । ऐकत होत्साता तपोधाम । पार्थें होऊनि

प्रीतिकाम । गेला सत्तम निजसदना ॥ ८ ॥ यावरी पुढें उत्तरातनया । यथाकाळें ब्राह्मणजाया । पूर्ववत गुर्विणी जालिया । वर्तली चर्या ते ऐक ॥ ९ ॥

प्रसूतिकाल आसन्ने भार्याया द्विजसत्तमः । पाहि पाहि प्रजां मृत्योरित्याहार्जुनमातुरः ॥ ३६ ॥

निकट भार्येचा प्रसूतिकाळ । होतां द्विजोत्तम दुःखाकुल । अर्जुनाप्रति जाऊनि विकळ । बोले प्राञ्जळ आम्रेडित ॥ ४१० ॥ कीं मृत्यूपासूनि मत्प्रजेतें । रक्षीं रक्षीं पार्था निरुतें । सत्य करीं स्वप्रतिज्ञेतें । मज आर्तातें सुख देईं ॥ ११ ॥ प्रसूतिकाळ मम भार्येचा । समीप आला जाण साचा । दीप उजळीं स्ववीर्याचा । ममार्तितमाचा नाश करीं ॥ १२ ॥ इतुकें बोलिया आर्त द्विज । तें परिसोनि तो भीमानुज । प्रतीक्षापर प्रसूतिकाज । घेवोनि पैज काय करी ॥ १३ ॥

स उपस्पृश्य शुच्यम्भो नमस्कृत्य महेश्वरम् । दिव्यान्यस्त्राणि संस्मृत्य सज्यं गाण्डीव माददे ॥ ३७ ॥

करपदमुखीं शुद्धोदक । स्पर्शोनियां मग सम्यक । नमस्कारूनि श्रीत्र्यंबक । घेतलें कार्मुक गाण्डीव ॥ १४ ॥ म्हणाल प्रत्यक्ष वासुदेव । पाण्डवसहाय देवाधिदेव । त्यासि कां न नमी सुभद्रा-धव । जो संकटें सदैव परिहरी ॥ १५ ॥ तरी भगवत्तत्त्व जें यथार्थ । तें नेणोनि सहसा पार्थ । उपेक्षा विप्राची निश्चित । केली हें वृत्त लक्षूनी ॥ १६ ॥ कृष्णा न पुसून न विचारून । आदौ सद्भावें न वंदून । एवं तदवज्ञा करून । केलें वर्तन तत्कार्यीं ॥ १७ ॥ दिव्यास्त्रें जीं चमत्कृत । स्मरणमात्रें सिद्धवत । तियें स्मरूनि एकाग्रचित्त । गाण्डीवीं सीत चढविलें ॥ १८ ॥

न्यरुणत्सूनिकाऽगारं उरैर्नानास्त्रयोजितैः । तिर्यगूर्ध्वमधः पार्थश्चकार शरपंजरम् ॥ ३८ ॥

द्रोणदत्त इन्द्रदत्त । रुद्रदत्त असंख्यात । नाना अस्त्रें जीं प्रदीप्त । जपोनि निभ्रान्त निज वाचें ॥१९॥ तींहीं योजिल्या अनेकशरीं । ब्राह्मणस्त्री जये घरीं । प्रसूत जाली विकळगात्री । तें घर निर्धारीं निरोधिलें ॥ ४२० ॥ आसमंतात ऊर्ध्व अध । तिर्यग्भागीं निबिडबद्ध । शरपंजर पार्थ प्रबुद्ध । करिता जाला क्षणमात्रें ॥ २१ ॥ जेथ प्रभंजना नव्हे रीघ । यमप्रवेशयत्न मोघ । पावकीं पिपीलिके मार्ग । न घडे अव्यंग जया परी ॥ २२ ॥ ऐसें अच्छिद्र आणि अलोट । इष्वावरण अतिबलिष्ठ । अस्त्रविद्येचें सामर्थ्य प्रकट । केलें द्रढिष्ठ अलौकिक ॥ २३ ॥ द्विजप्रजारक्षणा निमित्त । पार्थें हा यत्न केला महत । परि ईश्वरसत्तेचा संकेत । न कळे अद्भुत कवणासी ॥ २४ ॥

ततः कुमारः सञ्जातो विप्रपत्न्यारुदन्मुहुः । सद्योऽदर्शनमापेदे सशरीरो विहायसा ॥ ३९ ॥

केल्या नंतर शरपंजर । द्विजपत्नीसी जाला कुमर । विचित्र दैवाचा प्रकार । तो ऐका सादर श्रोते हो ॥ २५ ॥ जन्मतांचि फोडूनि टाहो । पावोनियां जननमोहो । मुहुर्मुहु रडतां बहु । जाला पहा हो

अदृश्य ॥ २६ ॥ गारुडीकृत जैसा उरग । किंवा ऋक्षपतना अध्वग । गगनी लोपे देखतां जग । तेंवि पावला साङ्ग अदर्शन ॥ २७ ॥ देखत देखत जननीनयनीं । सद्य न दिसे पाहतां अवनीं । दंपती विस्मित अंतःकरणीं । करिती विलपन अनुपायें ॥ २८ ॥ म्हणती पूर्वी तनुजप्रेत । होत होतें धरणि-स्थित । हें तंव वर्तलें परमाद्भुत । सदेह गुप्त बाळक हें ॥ २९ ॥ दैव असतां प्रतिकूळ । प्रयत्नें होय हानि बहळ ॥ ऐसें कल्पूनि उतावीळ । अर्जुना जवळ ब्राह्मण ॥ ४३० ॥ येऊनियां तत्काळ तेव्हां । वारंवार घेऊनि आह्वा । फाल्गुना निन्दी आव्हासव्हा । तें श्रोतृदेवा परियेसा ॥ ३१ ॥

तदाह विप्रो विजयं विनिन्दन्कृष्णसंन्निधौ । मौढ्यं पश्यत मे योऽहं श्रद्दधे क्लीबकत्थनम् ॥ ४० ॥

सभेमाजी कृष्णाजवळी । विजय बैसला अस्त्रशाळीं । तयातें निन्दी यदुमंडळीं । विषमबोलीं अपकारें ॥ ३२ ॥ पहा हो माझें मूर्खत्व कैसें । कीं मी क्लीबकथनीं विशेषें । विश्वासलों धरूनि आशे । सत्य आपैसें मानूनि ॥ ३३ ॥ क्लीब म्हणिजे नपुंसक । पुरुषार्थावांचूनि वाक्य । तें व्यर्थ निर्वीर्य लटिक । अर्थक्रियाविहीन पैं ॥ ३४ ॥ गर्भान्ध म्हणे मी रत्न परीक्षीं । अज म्हणे मी ताडीन सिंहवक्षीं । मशक म्हणे नभ झांकीन पक्षीं । हीं बोलणीं जैसीं नपुंसकें ॥ ३५ ॥ बोलण्या सारिखी नव्हे क्रिया । त्याचि नपुंसका बोलिया । गंधर्वनगरीं आपैसया । कोण वसतिया कैं लाहे ॥ ३६ ॥ मृगजळीं कोणी निवाला । ऐसा कधीं नाहीं ऐकिला । वंध्यासुरतें पुत्र जाला । तो न देखिला कल्पान्तीं ॥ ३७ ॥ ऐसें असतां विश्वास तेथें । धरी निश्चयात्मकें चित्तें । मूर्खावांचूनि नाम त्यातें । कैंचें निरुतें कथनीं ये ॥ ३८ ॥ तेंवि माझें मूर्खत्व खरें । वितथकत्थनीं अविचारें । जाणता भांबावलों भ्रमभरें । तें विस्तारें परियेसा ॥ ३९ ॥

न प्रद्युम्नो नानिरुद्धो न रामो न च केशवः । यस्य शेकुः परित्रातुं कोऽन्यस्तदवितेश्वरः ॥ ४१ ॥

प्रद्युम्न अनिरुद्ध बळराम । श्रीकृष्णही ऐश्वर्यधाम । मत्प्रजांचें रक्षणकाम । मी प्रतिसम विलपतां ॥ ४४० ॥ करूं न शकले जे सर्वथा । तेथ यांहूनि वरिष्ठ कोणता । अन्य ईश्वर त्यां रक्षिता । जो दैवगता पालटी ॥ ४१ ॥ ऐसें अघटित मज हें कळतां । भ्रंश केला माझिया चित्ता । तुच्छ करूनियां समस्तां । ईश्वरमूर्ता उन्मादें ॥ ४२ ॥

धिगर्जुनं मृषावादं धिगात्मश्लाघिनो धनुः । दैवोपसृष्टं यो मौढ्यादानिनीषति दुर्मतिः ॥ ४२ ॥

धिक्कार ऐसिया अर्जुनातें । मृषावादें झकविलें मातें । आत्मश्लाघा मिरवी चित्तें । आपणातें स्तवूनियां ॥ ४३ ॥ कीं मी नव्हें रामकृष्ण । अनिरुद्ध किंवा प्रद्युम्न । ज्याचें गाण्डीव धनुष्य जाण । तो मी अर्जुन प्रतापी ॥ ४४ ॥ एवं आत्मश्लाघी अनृताथिला । धिक् धिक् त्याचिया

धनुष्याला । अधिकार आपुला न विचारिला । वृथा वल्गला मूर्खत्वें ॥ ४५ ॥ वारंवार धिक्कार यातें । आणि याचिया गाण्डीवातें । प्रतारिलें मोहूनि मातें । आत्मश्लाघेतें वदूनी ॥ ४६ ॥ अहो जे दैवें अंतकनिलय । पावले अलोट अनुपाय । ते मूर्खत्वास्तव साध्यप्राय । आणील काय हा दुर्मति ॥ ४७ ॥ सामर्थ्य आपुलें न विचारिलें । ईश्वरपुरुषांतें हेळिलें । शेखीं अपयश संपादिलें । दुर्मति स्वलीले अतएव ॥ ४८ ॥ राया ऐसें सक्रोधभावें । धिक्कारूनि अति तुच्छत्वें । ब्राह्मण बोलतां अमार्दवें । अर्जुना उरुरवें यदुवृन्दीं ॥ ४९ ॥

एवं शपति विप्रर्षौ विद्यामास्थाय फाल्गुनः । ययौ संयमनीमाशु यत्राऽऽस्ते भगवान्यमः ॥ ४३ ॥

तेणें खोंचला अभ्यंतरीं । त्रपा उदेली सर्व गात्रीं । तथापि धैर्याचा हेमाद्री । प्रतापधरित्री-प्राणेश ॥ ४५० ॥ विद्या अधिष्ठूनि अमानुषी । जेथ षड्गुणैश्वर्यराशी । यमधर्म राहे निश्चयेंसीं । जे सकळजीवांसी गमनीया ॥ ५१ ॥ तये संयमनीनगरी प्रति । परमत्वरेनें सुभद्रापति । जाता जाला भरंवसा चित्तीं । धरूनि तत्प्राप्तियशाचा ॥ ५२ ॥ गेले जे कां ब्राह्मणबाळ । ते मी रविजापासूनि केवळ । आणीन म्हणोनि उतावीळ । गेला परी विफळ पण जाला ॥ ५३ ॥ तेंचि राया इरारमणा । श्रवणजगतीविभूषणा । परिसें विस्तृत व्यासवचना । वरूनि सुज्ञा प्राञ्जळ ॥ ५४ ॥

विप्रापत्यमचक्षाणस्तत ऐंद्रीमगात्पुरीम् । आग्नेयी नैर्ऋतीं सौम्यां वायव्यां वारुणीमथ ।
रसातलं नाकपृष्ठं धिष्ण्यान्यन्यान्युदायुधः ॥ ४४ ॥

तये संयमनी माजी सादर । इतस्तता द्विजकुमार । पाहता जाला वारंवार । अर्जुन वीर अतंद्रित ॥ ५५ ॥ परि तेथ सर्वथा विप्रापत्य । न देखता जाला निश्चित । तेथूनि तैसाचि त्वरान्वित । गेला पवनवत् ऐन्द्रीसी ॥ ५६ ॥ ऐन्द्री म्हणिजे इन्द्रनगरी । जेथ तो राहे सपरिवारी । तेथ धुंडिला द्विजतोक परी । सहसा नेत्रीं न देखिला ॥ ५७ ॥ त्या वरी अग्नीची देदीप्यमान । तेजःपुञ्ज नगरी जाण । तेथ गेला सुभद्राप्राण । द्विजनंदन साकाङ्क्ष ॥ ५८ ॥ तंव तेथही पाहतां स्वस्थ । जाला मनोरथ खंडित । त्यावरी फाल्गुन जवनवंत । निघाला त्वरित तेथूनिही ॥ ५९ ॥ निर्ऋतीची नैर्ऋतिनामा । नगरी विशाळ परमरम्या । तेथ प्रवेशला नेणोनि वर्मा । ब्राह्मणकामा पुरवावया ॥ ४६० ॥ परी पाहतां न देखिला बाळ । मग चित्तीं करूनियां हळहळ । उत्तरदिशेस सौम्या केवळ । नगरी सुशील सोमाची ॥६१॥ तेथ जाऊनि द्विजबाळक । पाहता जाला धृतकार्मुक । नभीं प्रसूनवत निष्टंक । न लक्षूनि निःशंक परतला ॥ ६२ ॥ मग वायूची राजधानी । वायव्या नामें प्रसिद्ध जनीं । तेथ प्रवेशला अन्वेषणीं । गाण्डीवपाणी शिशूच्या ॥ ६३ ॥ जेंवि कां गगना आंगीं कोंभ । विरक्ता मनीं कुटुम्बलोभ । प्राप्तपुरुषीं जैसा दंभ । तेंवि द्विजडिम्भ न देखिला ॥ ६४ ॥ त्यावरी वरुणाची वारुणी । परम रमणीय ऐश्वर्यखाणी । तेथ जाऊनि आपुले नयनीं । पाहे प्रयत्नीं शिशूतें ॥ ६५ ॥ जैसें रत्नखाणी माजी

मुक्त । न लभे शोधितां नर सयुक्त । तेंवि अपूर्णकाम कृष्णाकान्त । परतला सचिन्त तेथूनी ॥ ६६ ॥ अथशब्दें ईशाननगरी । ईशानी जे रौद्रपुरी । तेही पाहिली शोधूनि पुरी । परी नाडळे नेत्रीं द्विजबाळ ॥ ६७ ॥ एवं अष्टौ दिक्पाळपुरें । पाहिलीं प्रतापें पार्थवीरें । त्यावरी सप्तपाताळविवरें । फिरला अतित्वरें ते वेळे ॥ ६८ ॥ रसातळी दैत्य वसती । ते पाहिले संपूर्ण निगुती । मग सर्वां तळीं कद्रुसंतती । नांदे श्रीपती आज्ञेनें ॥ ६९ ॥ तेथेंहि धुण्डिलें करूनि यत्न । परंतु द्विजबाळ अलभ्यमान । मग परतला अतिजवीन । अन्य स्थान करूनियां ॥ ४७० ॥ नाकपृष्ठ म्हणिजे स्वर्ग । परमदिव्य जेथील भोग । जें अंतरिक्ष नभीं चांग । सुकृती साङ्ग लाभती ॥ ७१ ॥ तया नाकपृष्ठाही प्रति । जाऊनि पाहिली द्विजसंतति । अलभ्य जाणोनि विरामवृत्ति । फिरला कुरुपति तेथूनी ॥ ७२ ॥ मग अन्य धिष्ण्यें उच्चावचें । निवास सुरसिद्धगंधर्वांचे । किन्नरचारणस्थानें साचें । कथितां वाचे बहुतेक ॥७३॥ ते सर्वेही पाण्डुनंदन । फिरला करधृतचापबाण । परि द्विजसुताची शुद्धि जाण । अन्वेषमाण न लाभला ॥ ७४ ॥ जों वरी आपुली सामर्थ्यगती । तेथवरी गेला प्रतापशक्ती । हिम्पुटी होऊनि आला अंतीं । द्वारके प्रती अनुपायें ॥ ७५ ॥ यावरी पुढें वर्तलें जैसें । तेंहि राया सावध परिसें । अर्जुन अतिखिन्न मानसें । व्रीडाविशेषें काय करी ॥ ७६ ॥

ततोऽलब्धद्विजसुतो ह्यनिस्तीर्णप्रतिश्रुतः । अग्निं विविक्षुः कृष्णेन प्रत्युक्तः प्रतिषेधता ॥ ४५ ॥

शोधितां स्थानें तीं पूर्वोक्त । न प्राप्त जाला ब्राह्मणसुत । ऐसा जिष्णु हळहळीत । द्वारके आंत पातला ॥ ७७ ॥ त्यानंतरें अग्निप्रवेश । करावया इन्धनविशेष । संपादिलें पावनि त्रास । असत्यदोष निस्तरणा ॥ ७८ ॥ न निस्तरला स्वप्रतिश्रुत । जें ब्राह्मणा ऐकविलें निश्चित । कीं प्रतापें रक्षीन तव सुत । ते प्रतिज्ञा व्यर्थ जाहली ॥ ७९ ॥ तये प्रतिज्ञेचिये काळीं । नियमें गुन्तला स्ववाग्जाळीं । प्रतिज्ञा न निस्तरतां अनळीं । आपणा जाळीन निश्चयें ॥ ४८० ॥ तैसेंच वोडवलें दैवें । म्हणोनि पावका इन्धनासवें । प्रज्वाळूनि प्रवेशभावें । उदित सत्यत्वें जाहला ॥ ८१ ॥ एवं पावकप्रवेशेच्छु । धनंजय धार्मिक स्वच्छ । त्याचा उद्योग करूनि तुच्छ । दावी पिच्छधरवत हा ॥ ८२ ॥ तयाचा तत्काळ धरूनि कर । कृष्णें वारिलें अतिसत्वर । मग बोलिला वाक्य मधुर । अमृताकार म्रियमाणा ॥ ८३ ॥

दर्शये द्विजसूनूंस्ते मावज्ञात्मानमात्मना । ये ते नः कीर्तिं विमलां स्थापयिष्यन्ति नो नराः ॥ ४६ ॥

तुज मी दावीन द्विजपुत्रांतें । ज्यास्तव जाळिसी तूं आपणातें । वृथा विलिप्त आत्मघातें । न होयीं अनुचितें आचरणें ॥ ८४ ॥ जरी तूं म्हणसी मी अनृती । सर्व ऐकतां सभासदपंक्ती । निखंदूनियां श्रेष्ठांप्रति । स्वकीय कीर्ती बोलिलों ॥ ८५ ॥ बोलिल्या ऐसी न घडली क्रिया । केली प्रतिज्ञा गेली वायां । आतां मुख काय दावूं लोका ययां । या जिण्याहूनियां मृत्यु बरा ॥ ८६ ॥ आणि ब्राह्मणेंसीं केला नियम । अकृत स्वाङ्गीकृत मी कर्म । निस्तरावया अनृतदोष विषम । कृष्णवर्त्मा सेवीन ॥८७॥

यास्तव सदोष मिथ्याभाषक । निर्लज्जपणें मी दुर्दैशाङ्क । जनीं न मिरवीन निष्टंक । कूटकळंक-संस्पृष्ट ॥ ८८ ॥ तरी आपणातें आपणा करून । एवं न निखंदीं व्रीडायमान । मी असतां नारायण । तुज दुर्घट कोण कर्तव्य ॥ ८९ ॥ ज्या कारणें आत्मघात । करिसी ते तूं ब्राह्मणसुत । ब्राह्मणा अर्पूनि समस्त । कीर्तिमंत हो जगीं ॥ ४९० ॥ नरनारायण उभयतां । आपण अभेदरूपें तत्वता । या निश्चयें श्रीकृष्ण पार्था । बोलिला मिथा अभेदें ॥ ९१ ॥ कीं हे इतुकेही पुरुष यादव । आणि द्वारकावासी प्रजा सर्व । आमुचें अमळकीर्तीतें स्वयमेव । अचल वास्तव स्थापितील ॥ ९२ ॥ म्हणतील धन्य धन्य अर्जुन । अमोघधन्वा क्षात्रनिपुण । प्रतापें करी भूसुरत्राण । सत्यप्रतिज्ञ नियतात्मा ॥ ९३ ॥ ब्रह्मादिकां जें दुर्घट । ऐसें कर्म परम अचाट । साधिलें केवळ दैवनिष्ठ । हें मिथा प्रकट वदतील ॥ ९४ ॥ राया भरतकुळावतंसा । तव पितामहा कृष्णकुवासा । इतुकें बोलूनि अग्निप्रवेशा । करितां सहसा वर्जिलें ॥ ९५ ॥ या वरी षड्गुणैश्वर्य संपन्न । कृतार्थ करावया स्वप्रपन्न । द्विजापत्यानयना प्रयाण । करी संपूर्ण तें ऐका ॥ ९६ ॥

इति सम्भाष्य भगवानर्जुनेन सहेश्वरः । दिव्यं स्वरथमास्थाय प्रतीची दिशमाविशत् ॥ ४७ ॥

दारुकां करूनियां निदेश । जो दिव्यस्यंदन स्वप्रकाश । नभौनि उतरला सायुधकोश । अकृत-मानुष सयंत्रहय ॥ ९७ ॥ आणविला सज्ज अति सत्वर । त्या स्वरथी पार्थासह ईश्वर । आरूढ होऊनि प्रमोदपर । पश्चिमदिशे प्रति प्रवेशला ॥ ९८ ॥ कोठवरी गेला म्हणसी जरी । तरी वक्ष्यमाण-श्लोकोत्तरीं । सर्व वृतान्त तो सविस्तरीं । सावध श्रोतीं परियेसा ॥ ९९ ॥

सप्तद्वीपान्सप्तसिधून्सप्तसप्तगिरीनथ । लोकालोकं तथाऽतीत्य विवेश सुमहत्तमः ॥ ४८ ॥

पवनजित हयचतुष्क । अंतरिक्षगामी सम्यक । तिहीं वेगवंत रथ निष्टंग । चंडमयूख ज्या असम ॥ ५०० ॥ तो चालतां परमगतिमंत । ज्यामाजी सप्त सप्त पर्वत । त्या सप्तद्वीपांतें रमानाथ । आणि सप्तसिन्धूंतें लंघूनी ॥ १ ॥ गेला पार्था सह करुणाकर । लीलालाघवें अतिसत्वर । ऐसें हें निगदिलें मात्र । व्यवस्था समग्र तें ऐका ॥ २ ॥ एकएका द्वीपामाजी । सप्तसप्तपर्वतराजी । प्रतिद्वीपा परिघ सहजीं । एका एका सिन्धूचा ॥ ३ ॥ ऐसिया या अनुक्रमें । तयां लंघिलें पूर्णकामें । क्षणैक न लागतां विक्रमें । सुखसंगमें पार्थाच्या ॥ ४ ॥ तयानंतरें महागिरी । लोकालोक जो सर्व भूधरीं । परम उच्चतर शृंगसहस्रीं । ग्रहक्षें सारीं ज्या खालें ॥ ५ ॥ ज्याहूनि अर्वाक् प्रकाश । तेथवरीच लोकनिर्देश । परपाठारीं तमविशेष । शून्य आकाश आलोक ॥ ६ ॥ तया लोकालोकगिरीतें । अतिक्रमूनि कृष्णनाथें । पुढें सुमहत्तम तमातें । वेगें बहुतें प्रवेशला ॥ ७ ॥

तत्राश्वाः शैब्यसुग्रीवमेघपुष्पबलाहकाः । तमसि भ्रष्टगतयो बभूवुर्भरतर्षभ ॥ ४९ ॥

प्रावृटीं कुहूची राति । तया तमाची बहु ख्याति । त्याहूनि अनंतगुणें अति । उपमा ज्या-प्रति नाडळे ॥ ८ ॥ जेथ झांकोळे चंडकिरण । तेथ इतरांचा पाड कोण । तये तमीं हय संपूर्ण । जे स्यंदन प्रवाहक ॥ ९ ॥ शैब्य सुग्रीव मेघपुष्ण । चपळ बलाहक अमूप । जाले गतिभ्रष्ट समपादप । न दिसे अल्प नयनांसी ॥ ५१० ॥ नेत्र जालिया केवळ अंध । पुढें जावया न कळे प्रसिद्ध । यास्तव गतिविरहित मंद । जाले स्तब्ध दिव्य हय ॥ ११ ॥ भरतकुळा माजि वरिष्ठ । म्हणोनि भरतर्षभ प्रकट । संबोधनें हे मुनिश्रेष्ठ । कथी सुनिष्ठविष्णुराता ॥ १२ ॥ या वरी पुढें तो भगवान । कैसें करी हो स्वगमन । तें ही परिसा सावधान । करूनि मन एकाग्र ॥ १३ ॥

तान्दृष्ट्वा भगवान्कृष्णो महायोगेश्वरेश्वरः । सहस्रादित्यसङ्काशं स्वचक्रं प्राहिणोत्पुरः ॥ ५० ॥

तयां गतिभ्रष्टां अश्वांप्रति । देखोनियां रुक्मिणीपति । ऐश्वर्यनिधि अमोघकीर्ति । ब्रह्मादि ध्याती पद ज्याचें ॥ १४ ॥ जो योगेश्वरांचा महेश्वर । ज्याची अघटितघटनापर । मायासंकल्पें ब्रह्माण्डनिकर । करूनि समग्र सांठवी ॥ १५ ॥ तो मायानियंता यदुराय । सहस्रादित्य प्रकाशमय । स्वचक्र पुढें प्रेरिता होय । अप्रमेयतमहरणा ॥ १६ ॥

तमः सुघोरं गहनं कृतं महद्विदारयद्भूरितरेण रोचिषा ।
मनोजवं निर्विविशे सुदर्शनं गुणच्युतो रामशरो यथा चमूः ॥ ५१ ॥

आज्ञे सरिसें अति तेजिष्ठ । भगवदाज्ञाधारक स्पष्ट । ज्याचा मना सम वेग प्रकट । जें संकल्पनिष्ठ हरीचें ॥ १७ ॥ ऐसें सुदर्शन सहस्रार । भूरितरतेजें तम सुघोर । महत्प्रकृतिपरिणामपर । अतिभ्रमकर गहनतर ॥ १८ ॥ तें विदारित देदीप्यमान । प्रवेशलें परमजवीन । न पुरे चपळत्वा पवमान । त्या उपमान परिसा हो ॥ १९ ॥ जेंवि कार्मुकज्याविनिःसृत । श्रीरामाचा शर उद्यत । चमूतें संहार करित । प्रवेशे कृतान्त अनिवार ॥ ५२० ॥ तेंवि अंधारें निवटीत । सुदर्शन चालिलें तमांत । ऐसी हे उपमा व्याससुत । वदला श्लोकांत मुळींच्या ॥ २१ ॥ यावरी पुढें हरिस्यंदन । कैसेन करी तमकमण । तेंही ऐका सावधान । अगाध महिमान कृष्णाचें ॥ २२ ॥

द्वारेण चक्रानुपथेन तत्तमःपरं परं ज्योतिरनन्तपारम् ।
समश्नुवानं प्रसमीक्ष्य फाल्गुनः प्रताडिताक्षो पिदधेऽक्षिणी उभे ॥ ५२ ॥

दुर्गम दुर्गी जेंवि विवर । पर्वत फोडूनि करिती थोर । तया मार्गें चढती वर । दुर्गशिखरपर्यंत ॥ २३ ॥ तेंवि तें निबिड महत्प्रकृति । परिणामरूप अज्ञान व्यक्ति । भ्रान्ति हेतुतम निश्चिती । वारित स्वदीप्ती सहस्रार ॥ २४ ॥ चालिलें परंतु आसमंतात । निबिड तैसेंच संचलें ध्वान्त । मध्यभागीं विवरवत । प्रकाश प्रशस्त चक्राचा ॥ २५ ॥ एवं अग्रभागीं प्रकाशकर । मनोवेगें चालिलें चक्र । तया अनुगतमाग

सत्वर । सरथवारु चालियले ॥ २६ ॥ तया चक्रद्युतीचा बडिवार । ऐकें राया किंचिन्मात्र । प्रळय-काळींचें तेज तीव्र । मंदतर जिये पुढें ॥ २७ ॥ भगवत्सत्तेचें तेज बहळ । तया तमाहूनि पर केवळ । प्राकृततमा अस्पृष्ट निखळ । उत्कृष्ट निर्मळ जे ज्योति ॥ २८ ॥ जयासि नाहीं अंतपार । नित्य अव्याहत अजस्र । तें तेज देखोनि पण्डुकुमर । प्रताडितनेत्र जाहला ॥ २९ ॥ अर्जुनाची दृष्टि प्राकृत । सुदर्शनतेज अत्यद्भुत । देखोनि दिपले अक्ष बहुत । झांकिले निवान्त दोन्ही ही ॥ ५३० ॥ पुढें रथ कैसा चालिला । घोर अंधकार क्रमिला । हें नेणेंचि फाल्गुन वहिला । निश्चळ बैसला पिहिताक्ष ॥ ३१ ॥

ततः प्रविष्टः सलिलं नभस्वता बलीयसैजद्बृहदूर्मिभूषणम् ।
तत्राद्भुतं वै भवनं द्युमत्तमं भ्राजन्मणिस्तम्भसहस्रशोभितम् ॥ ५३ ॥

त्यानंतरें अविलंबें । महत्तेजसमारंभें । तम क्रमितां हयकदंबें । रथ पावला सलिलाप्रति ॥ ३२ ॥ कवणे प्रकारींचें तें उदक । विशदतर आस्थापूर्वक । विशेषणीं परिसा सम्यक । जेंवि श्रीशुक नृपा कथी ॥ ३३ ॥ अगाध अपार वरुणोदक । बहुत विस्तीर्ण भयानक । झडाड वायूचा आत्यंतिक । अमर्यादक जया वरी ॥ ३४ ॥ तया वळिष्ठ पवनें करून । लाटा उसळती महद्भीषण । तेंचि जयाचें भूषण पूर्ण । शोभायमान जळ ऐसें ॥ ३५ ॥ तया उदकामाजी अद्भुत । भवन रमणीय प्रकाशवंत । कोटिसूर्यांची दीप्ती जेथ । खद्योतवत प्रतिभासे ॥ ३६ ॥ जितुकीं ब्रह्माण्डीं द्युतिमंत । ज्योतिषें अथवा भुवनें दीप्त । त्यांहूनि अनंतगुणें उज्ज्वलित । विस्तीर्ण बहुत अनुपम ॥ ३७ ॥ सहस्रमणिस्तंभभ्राजिष्ठ । म्हणिजे नानारत्नांचे यथेष्ट । अनेकरंगीं प्रदीप्त अविट । स्तंभ चोखट ज्या सदना ॥ ३८ ॥ तिहीं ललामस्तंभीं सुशोभित । त्या निलया वर्णितां साद्यंत । होय दुहिण ज्या मूकवंत । मा इतर प्राकृत कायसें ॥ ३९ ॥ म्हणाल ऐसें निलय तें कवण । काय तयाचें अभिधान । तरी स्वानुभवें कथितों पूर्ण । आणिक कथ्यमान श्रीधरोक्त ॥ ५४० ॥ पूर्वीं अष्टाशीतितमाध्यायीं । विष्णुभुवनें कैवल्यदायी । कथिलीं मुख्यत्वें तत्त्रयी । श्रुति स्मृत्यन्वयीं संमत ॥ ४१ ॥ भूभाग दुर्गाभाग श्रीभाग । विविध वैकुण्ठें परम चांग । तयांची व्यवस्था सम्यक सांग । ऐकिली पुन्हा परियेसा ॥ ४२ ॥ श्वेतदीप अनंतासन वैकुण्ठ । हीं विष्णुस्थानें तिन्ही प्रकट । तेथ भूदुर्गाश्रीभाग स्पष्ट । एवं पाठ पुराणोक्त ॥ ४३ ॥ परि येथ सामान्यविशेषणत्वें । मुख्यीं प्राधान्यें जाणावें । एकीं उभयभाग गौणविभवें । एकेक स्वनामें विख्यात ॥ ४४ ॥ श्वेतद्वीपामाजी भूभाग । महदावरणीं दुर्गाभाग । चिदाकाशीं ते श्रीभाग । एक श्रीरंग सर्वत्र ॥ ४५ ॥ दुर्गाभाग हें तयामाजी । ऐसिया निश्चयें मानसकंजीं । प्रत्ययामोद उठे सहजीं । स्मृत्यर्थवाजी जाणोनी ॥ ४६ ॥ तयामीच श्रीधरस्वामी । महाकाळपुर वदले नामीं । असो पुढिले कथानुक्रमीं । असिजे उत्तमीं सादर ॥ ४७ ॥

तस्मिन्महाभीममनन्तमद्भुतं सहस्रमूर्धन्यफणामणिद्युभिः ।
विभ्राजमानं द्विगुणोल्बणेक्षणं सितातापत्रलाभं शितिकण्ठजिह्वम् ॥ ५४ ॥

पूर्वोक्त भासुर रमणीय । परमद्युतिमंत माणिमय । सर्वोत्कृष्टशोभाश्रय । जें वर्णितां सोय न सांपडे ॥ ४८ ॥ तया सदनामाजी अनंत । महाभयंकर अत्यद्भुत । ज्याची विशाळ काया बहुत । मूर्ध्नीं युक्त सहस्र जो ॥ ४९ ॥ तन्मूर्धजनित विस्तीर्ण फणा । त्यावरी पृथक् मणींची ज्योत्स्ना । तद्दिव्यद्युतींहीं उरगराणा । विभ्राजमान तेजस्वी ॥ ५५० ॥ मुखा द्विगुणित सहस्रद्वय । उल्बणनेत्र घूर्णितप्राय । अनिमेष उच्छ्वसत तेजोमय । उगवले सूर्य जयापरी ॥ ५१ ॥ सुक्षेत जैसा स्फटिकगिरी । प्रकाशमय विलसे भारी । तेंवि श्वेतकान्ति जया शरीरीं । सतेज सारी प्रतिभासे ॥ ५२ ॥ तेणें स्फटिकाद्रिसंकाश । दिसे संकर्षण तो विशेष । परि कंठ जिह्वा नीळ अशेष । शोभती प्रत्यक्ष श्वेताङ्गीं ॥ ५३ ॥ ऐसियातें वासुदेव । तयाचि परि कुन्तिप्रभव । देखता जाला सावयव । सगौरव स्वनेत्रें ॥ ५४ ॥

ददर्श तद्भोगसुखासनं विभु महानुभावं पुरुषोत्तमोत्तमम् ।
सान्द्राम्बुदाभं सुपिशङ्गवाससं प्रसन्नवक्त्रं रुचिरायतेक्षणम् ॥ ५५ ॥

तया अनंताचा मृदुलोज्ज्वल । पवित्र देह सुकुमार बहळ । त्यावरी सुखासनीं सुमंगळ । बैसला केवळ परमात्मा ॥ ५५ ॥ ज्याची सत्ता सर्वत्र सर्वीं । सर्वभूताश्रया जैसी उर्वी । म्हणोनि विभु हे अभिधा गुर्वी । विधिसुरशर्वीं अभिवाच्या ॥ ५६ ॥ ज्याचा महिमा अत्यंत थोर । अविदित निगमां सविस्तर । चिन्तिती मुनि सुर गंगाधर । सच्चित्सुकर अखंडित ॥ ५७ ॥ पुरुषांमाजि जे आत्मनिष्ठ । निर्विकल्प सुखाविष्ट । मायाविकारां अस्पृष्ट । उत्तम वरिष्ठ सर्वगुणें ॥५८॥ तयांसि म्हणिजे पुरुषोत्तम । तयांहूनि जो परमोत्तम । सकळैश्वर्य पूर्णकाम । चित्सुखधाम चिद्रूप ॥ ५९ ॥ सतोयं जलदा सन्निभ । श्यामसुन्दरतर सुप्रभ । शोभे शोभाढ्य जलजनाभ । चिन्तकां शुभप्रदायक ॥ ५६० ॥ सुष्ठुपीताम्बर-परिवेष्टित । जेंवि नीळपुरटीं खेवाणित । प्रसन्नवदन सुप्रमुदित । सम प्रफुल्लित नीळोत्पल ॥ ६१ ॥ कमलदलायत आकर्ण । रुचिर सुतेज विस्तीर्ण । करुणावलोक अधिष्ठान । मुखमंडन दक्शोभे ॥ ६२ ॥

महामणिव्रातकिरीटकुण्डलप्रभापरिक्षिप्तसहस्रकुन्तलम् ।
प्रलम्बचार्वष्टभुजं सकौस्तुभं श्रीवत्सलक्ष्म वनमालयावृतम् ॥ ५६ ॥

तेजःपुञ्ज महामणी । तन्मय किरीट कुण्डलें दोन्ही । प्रभे लाजविती सहस्र तरणी । मस्तकीं श्रवणीं विराजित ॥ ६३ ॥ सुप्रभकोटीरा तळवटीं । सहस्रकुन्तळांची दाटी । सहस्रशब्दार्थाची गोठी । असंख्य वाक्पुटीं जाणावी ॥ ६४ ॥ तयां मुकुटकुण्डलांची प्रभा । सहस्रकुन्तळांवरी स्वयंभा । तेणें प्रस्फुरित तेजिष्ठ शोभा । कुन्तळकदंबावरी ज्याचे ॥ ६५ ॥ प्रलंब आजानु सुन्दर । सुपीन सरळ सालंकार । अष्टभुज शोभती ज्या रुचिर । अभयंकर भक्तांसी ॥ ६६ ॥ कौस्तुभमणि तेजःपुञ्ज । तत्सह श्रीवत्स-चिह्नओज । ज्याचिये हृदयीं सुषमाबीज । तिहीं शोभे अज वैशिष्ट्यें ॥ ६७ ॥ आपादवनमाळावेष्टित । सर्वावयवीं विभूषित । विभु परमात्मा अमूर्त्तमूर्त्त । सुविराजित सर्वस्वें ॥ ६८ ॥

सुनन्दनन्दप्रमुखैः स्वपार्षदैश्चक्रादिभिर्मूर्तिधरैर्निजायुधैः ।
पुष्टचा श्रिया कीर्त्यजयाऽखिलर्द्धिभिर्निषेव्यमानं परमेष्ठिनां पतिम् ॥ ५७ ॥

सुनंद आणि नंदप्रमुख । स्वपार्षदगण जे अनेक । गदापद्मचक्रादि शंख । मूर्त्त अशेष निजायुधें ॥ ६९ ॥ श्री पुष्टि आणि कीर्तिसह । स्वयें अजाही विधृतदेह । अणिमादिसिद्धींचा समूह । निकट सर्व मूर्तिमंत ॥ ५७० ॥ स्वाधिकारानुरूप निगुती । पार्षदायुधें श्रियादिशक्ती । मूर्तिधरा अष्टौ विभूती । जया सेविती सद्भावें ॥ ७१ ॥ तिहीं सेव्यमान श्रीमंत । परमेष्ठींचा स्वामी समर्थ । ब्रह्महरेन्द्रादिलोकनाथ । परमेष्टिसंकेत ययांसी ॥ ७२ ॥ तया अखिलपरमेष्ठीचा पति । रुचिरावयवीं सालंकृति । ऐसिया परमपुरुषातें वंदिती । कृष्ण जिष्णु तें ऐका ॥ ७३ ॥

ववन्द आत्मानमनन्तमच्युतो जिष्णुश्च तद्दर्शनजातसाध्वसः ।
तावाह भूमा परमेष्ठिनां प्रभुबद्धाञ्जली सस्मितमूर्जया गिरा ॥ ५८ ॥

कृष्ण साक्षात् आदिपुरुष । अपर तद्रूपें स्वयेंचि ईश । मूर्तिमंत अद्भुत वेष । अभेद निःशेष पूर्णत्वें ॥ ७४ ॥ तया आपणा श्रीविष्णूतें । अच्युत वंदिता जाला निस्तें । सहगत जिष्णुहि प्रेमभरितें । सोत्कंठचित्तें अभिवंदी ॥ ७५ ॥ रंकें अकस्मात निधान । जेंवि नयनीं देखतां पूर्ण । जातसंभ्रम हर्षायमाण । तैसा अर्जुन सप्रेमें ॥ ७६ ॥ तया अजाचें अपूर्व दर्शन । स्वप्रकाश देदीप्यमान । होतां पावला आश्चर्य पूर्ण । विस्मितमन होत्साता ॥ ७७ ॥ मग नमना नंतर तत्वता । श्रीकृष्ण आणि द्रौपदीभर्त्ता । कर जोडूनियां उभयता । तिष्ठते जाले नम्रत्वें ॥ ७८ ॥ बद्धाञ्जलि त्या कृष्णाप्रति । हरद्रुहिणादिकाधिपति । सस्मितवदन रम्याकृति । परंज्योति परमात्मा ॥ ७९ ॥ ऊर्जित म्हणिजे अमोघवाणी । करूनियां ऐश्वर्यदानी । स्वयें बोले तें श्रोतृगणीं । शुकमुखवचनीं परिसावें ॥ ५८० ॥

द्विजात्मजा मे युवयोर्दिदृक्षुणा मयोपनीता भुवि धर्मगुप्तये ।
कलाऽवतीर्णाववनेर्भरासुरान्हत्वेह भूयस्त्वरयेतमन्ति मे ॥ ५९ ॥

भो भो मम कलावतीर्ण । ममांश अवतरलां उभय कृष्णा । भूमी वरी धर्मरक्षण । करावया पूर्ण ये काळीं ॥ ८१ ॥ ऐसिया संबोधनें विभु समर्थ । संबोधूनि कृष्ण कुन्तीसुत । बोले अभिप्राय सुनिश्चित । तो हा समस्त अवधारा ॥८२॥ म्हणे हे द्विजात्मज येथ मियां । आणिलें तुम्हांसि देखावया । तुमच्या संदर्शनाचा माजी हृदया । असे माझिया बहु हेत ॥ ८३ ॥ एतन्निमित्त येथें येणें । घडलें तुमचें ऐश्वर्यगुणें । क्षीराब्धि तोषे शशिदर्शनें । तेंवि पूर्णपणें मी तुष्ट ॥ ८४ ॥ तरी हो आतां ययावरी । पृथ्वीवरील दुराचारी । भूमीसी भाररूपी निर्धारीं । अधर्मकारी जे असुर ॥ ८५ ॥ तयांसि वधूनियां सत्वर । पुन्हा मज पासीं कृतार्थपर । अविलंबें या श्रेयस्कर । धर्म पवित्र स्थापूनी ॥ ८६ ॥ यया कारणास्तव जोंवरी । प्रातापें असाल अवनी वरी । तोंवरी आचरणाची परी । परिसा सारी मुकुळित ॥ ८७ ॥

पूर्णकामावपि युवां नरनारायणावृषी । धर्ममाचरतां स्थित्यै ऋषभौ लोकसङ्ग्रहम् ॥ ६० ॥

पूर्णकाम ही तुम्ही श्रेष्ठ । नरनारायण ऋषि प्रकट । स्थिती कारणें यथेष्ट । आचरा सुनिष्ठ धर्मातें ॥ ८८ ॥ जैसा आचरती नरपुङ्गव । तनुदलक्षें मानव सर्व । परी तयाची करूनि कणव । धर्मगौरव तिहीं कीजे ॥ ८९ ॥ यास्तव तुम्ही अवतार । पूर्णैश्वर्यें जनीं प्रवर । तुम्हांहूनि कोण थोर । दीक्षादातार धर्माचे ॥ ५९० ॥ म्हणोनि लोकसंग्रहासाठीं । आचरा सद्धर्मपरिपाटी । येऱ्हवी पूर्ण तुम्ही सृष्टी । नाहीं हृत्पुटीं कामेच्छा ॥ ९१ ॥

इत्यादिष्टौ भगवता तौ कृष्णौ परमेष्ठिना । ओमित्यानम्य भूमानमादाय द्विजदारकान् ॥ ६१ ॥

शुक म्हणे मात्स्यीमानसहंसा । हरिगुणश्रवणें दुरितध्वंसा । जो अनंतासन ईश ईशां । ऐश्वर्या अशेषा अधिष्ठान ॥ ९२ ॥ तेणें भगवंतें या प्रकारें । ते उभय कृष्ण अत्यादरें । उपदेशिले धर्मकैवारें । करुणाकरें जगदीशें ॥ ९३ ॥ तो ऐकोनि इष्टोपदेश । मग विजय आणि यादवेश । अवश्य म्हणोनि नम्रशीर्ष । नमूनि परेश प्रभूतें ॥ ९४ ॥ सम्यक्प्रकारें आज्ञा प्राप्त । घेऊनि द्विजपुत्रांतें त्वरित । रथीं बैसले तयां सहित । संतुष्टचित्त उभयतां ॥ ९५

न्यवर्ततां स्वकं धाम सम्प्रहृष्टौ यथागतम् । विप्राय ददतुः पुत्रान्यथारूपं यथावयः ॥ ६२ ॥

त्रैलोक्यमंडन अतिपावन । स्वकीयधाम जें द्वारकाभुवन । त्याप्रति जावया कृष्णार्जुन । परतले पूर्ण आनंदें ॥ ९६ ॥ जैसे आले जया पंथें । तैसेच चालिले मागुते । ध्वान्त लोकालोकगिरीतें । सप्तद्वीपांतें लंघूनी ॥ ९७ ॥ सम्यक प्रकर्षें हर्षायमाण । द्वारकेनिकट सहस्यंदन । पावतां श्रीधरें पाञ्चजन्य । उरुरवें जाण आस्फुरिला ॥ ९८ ॥ तंव यदुगणादि द्वारकावासी । चकोर जैसे शशाङ्कलक्ष्मी । कीं मित्रोदया सापेक्ष पक्षी । तेंवि कृष्णागमनासी इच्छिती ॥ ९९ ॥ तिहीं ऐकूनि कंबुरव । हर्षें उत्सुक जाले सर्व । गोपुरीं दामोदरीं सजव । वेंघूनि माधव पाहती ॥६०० ॥ कोण्ही पुराबाह्य ससंभ्रम । धाविन्नले जन सप्रेम । कोण्ही पथीं ठेले दर्शनकाम । सांडूनि धाम नागरिक ॥ १ ॥ लालस ललना हरिप्रेमळा । प्रेमा जयांचा नित्य आगळा । गवाक्षद्वारीं सत्वशीळा । तिष्ठती अबळा दामोदरीं ॥२॥ कोण्ही नागरा प्रेमादरा । पहावया सौन्दर्यसागरा । रथ्याप्रदेशीं स्नेहातुरा । तिष्ठती अपारा प्रमोदें ॥३॥ तया सकळांसी प्रोत्साहित । अपिच्यदर्शनें प्रमुदित । महाद्वारें द्वारके आंत । श्रीकृष्णनाथ प्रवेशला ॥४॥ सपार्थ द्विजसुत रथारूढ । जननयनांचें पुरवित कोड । राजमार्गें नृपसभे रूढ । आला प्रौढविन्दानी ॥५॥ नृपा जुहारूनि कृष्णार्जुन । सभे बैसले प्रतापवान । अद्भुत देखोनि विन्दान । विस्मयापन्न सभासद ॥६॥ मग संतुष्टमनें तत्काळ । ब्राह्मणा बाहूनि उतावीळ । तयाकारणें पार्थ गोपाळ । देते जाले दश पुत्रां ॥७॥ अन्वनुवर्षाचे कनीय । एकएकाहूनि विप्रतनय । ते यथारूप यथावय । अर्पिले सोत्साह ब्राह्मणा ॥८॥

तेणें ब्राह्मणाचा हरला खेद । हृदयीं दाटला परमानंद । अर्जुना देवूनि आशीर्वाद । गेला सुतवृंदसह सदना ॥ ९ ॥ ऐसें हें भगवच्चरित । जनीं देखोनि परमाद्भुत । विस्मयें दाटले समस्त । लीला अघटित वर्णिती ॥ ६१० ॥ अनिस्तीर्णप्रतिज्ञापर । अर्जुन सेवितां वैश्वानर । जीवविला दावूनि द्विजकुमर । करुणाकर भक्तांचा ॥ ११ ॥ एवं भगवन्महिमोत्कर्ष । जनीं अनुभविला अशेष । अनंतकोटिब्रह्माण्डाधीश । श्रीकृष्णास वोळखिलें ॥ १२ ॥ अर्जुना मनीं अभिमान । होता स्ववीर्याचा पूर्ण । तो गेला सर्वही उडोन । कृष्णीं लीन स्वयें झाला ॥ १३ ॥ कवण्या प्रमावें म्हणसी ऐसा । सुभद्राभर्ता जाला सहसा । तरी त्याही ऐकें अर्थविशेषा । नराधीशा परीक्षिति ॥ १४ ॥

निशाम्य वैष्णवं धाम पार्थः परमविस्मितः । यत्किञ्चित्पौरुषं पुंसां मेने कृष्णानुकम्पितम् ॥ ६३ ॥

देखोनि तें विष्णूचें धाम । जें ब्रह्मादिकां अतिदुर्गम । अद्भुतैश्वर्यें अनुपम । द्युतिमंत परम विराजित ॥ १५ ॥ जें प्रकृतिहूनियां पर । स्वप्रकाश निरंतर । लोपती कोटि दिवाकर । सम धुन्धुर जे ठायीं ॥ १६ ॥ जेथ अनंतासम पुष्कराक्ष । परमपुरुष त्रिजगाध्यक्ष । अष्टभुज चारु सुवेश । श्रियाद्यशेष सेविती ज्या ॥ १७ ॥ आयुधें तिष्ठती मूर्तिमंत । ऋद्धिसिद्धि दास्यनिरत । अलक्ष विधिहरां समर्थ । तें पाहूनि पार्थ सुविस्मित ॥ १८ ॥ वारंवार तें मनीं स्मरे । तंव तंव मिश्रित आश्चर्यभरें । श्रीकृष्णाचेंचि ऐश्वर्य सारें । ऐसें अंतरीं निर्द्धारी ॥ १९ ॥ जें किंचित पुरुषाचे ठायीं सार । पौरुष केवळ उर्जितकर । विद्यावयुनबळप्रकार । यशादि समग्र शूरत्व ॥ ६२० ॥ तें कृष्णकृपेचें सर्वहि करणें । हें मानिता झाला निश्चित मनें । वृथा नाडिती अभिमानें । प्राकृतें हीनें अविचारें ॥ २१ ॥ कृष्ण साक्षात् परमेश्वर । सकळसिद्धीचा दातार । भक्तानुकंपी श्रेयस्कर । हा विश्वास प्रवर दृढ केला ॥ २२ ॥ येथूनि संपला हा इतिहास । हरिचरितात्मक अशेष । शुकें येथ कथिला परीक्षितीस । प्रसंगोपात्त प्रास्ताविक ॥ २३ ॥ परी हे भारतयुद्धापूर्वी । वर्तली भगवल्लीला गुर्वी । खूण जाणिजे श्रोतीं सर्वी । केवळ अगर्वी सप्रेमळीं ॥ २४ ॥

इतीदृश्यान्यनेकानि विर्याणीह प्रदर्शयन् । बुभुजे विषयान्ग्राम्यानीजे चात्यूर्ज्जितैर्मखैः ॥ ६४ ॥

ऐसिया प्रकारींचीं बहुत । इये मृत्युलोकीं अत्यद्भुत । वीर्यें अलौकिक रमाकान्त । प्रकर्षें दर्शवीत होत्साता ॥ २५ ॥ मानवनटनाट्यानुसार । नानाविलास कामप्रचुर । अन्नें पानें गानें अपार । वस्त्रालंकार शृंगार ॥ २६ ॥ साष्ट शत षोडशसहस्र । दिव्याङ्गना ज्या अतिसुन्दर । तिहींसा क्रीडा बहुप्रकार । वनविहार जलकेली ॥ २७ ॥ इत्यादिग्राम्यविषयांतें । ग्राम्मासमान परम आत्तें । भोगिता जाला लालसचित्तें । नरानुकारितें जगदात्मा ॥ २८ ॥ आणि स्वयें असतां यज्ञपुरुष । यज्ञभोक्ता त्रिजगदधीश । अत्यूर्जितमखीं सम सापेक्ष । जाला विशेष संयजिता ॥ २९ ॥ ज्योतिष्टोमादि अमोघ यज्ञ । साङ्ग सऋत्विज सदक्षिण । केले भगवंतें परिपूर्ण । आदरें जनसंग्रहार्थ ॥ ६३० ॥

प्रववर्षाखिलान्कामान्प्रजासु ब्राह्मणादिषु । यथाकालं यथैवेन्द्रो भगवान्श्रैष्ठ्यमास्थितः ।। ६५ ।।

जेंवि आपण सर्व कामें पूर्ण । सर्वदा विचरला सुखसंपन्न । तेंवि अखिल ब्राह्मण प्रजाजन । संपदायतन स्वयें केले ।। ३१ ।। जाया तनय गृह धन धान्य । अन्नें वसनें पदार्थ मान्य । यथेष्ट संतति संपत्ति पूर्ण । सुखकारण वैषयिक ।। ३२ ।। इत्यादि जे जे अपेक्षित । स्वार्थपूरक काम समस्त । तयां सर्व कामांतें रमानाथ । ऐश्वर्यवंत श्रीकृष्ण ।। ३३ ।। ब्राह्मण आणि प्रजांचे ठायीं । प्रकर्षें वर्षला सर्वदा ही । निजसुख दिधलें त्यां अक्षयीं । हळहळ कोणा ही असेना ।। ३४ ।। जये काळीं जैसा काम । तयांसि होय हृदयंगम । तो तो पुरवी मेघश्याम । ऐश्वर्यधाम परमात्मा ।। ३५ ।। यथाकाळीं जैसा इन्द्र । वर्षोनिया विपुल नीर । सस्यें तृणें लता तरुवर । सुखनिर्भर संतर्पी ।। ३६ ।। तेंविच कृष्णें विप्रादि प्रजा । कृपेनें संतर्पिल्या ओजा । ऐसा दृष्टान्त ऋषींचा राजा । बोलिला पैजा श्रीव्यास ।। ३७ ।। एवं धार्मिक धर्मरक्षक । सुखसंपन्न सुखदायक । शिष्टाचारप्रचारक । ऐश्वर्यें सम्यक विराजित ।। ३८ ।। सदाचरणें सद्रक्षणें । धर्मपोषणें ऐश्वर्यगुणें । उद्दामवीर्यप्रकटीकरणें । राहिला शिष्टपणें श्रेष्ठत्वीं ।। ३९ ।। तो चि श्रेष्ठपणें चक्रपाणी । परिवारित साधकगणीं । कैसा वर्तला सर्वजनीं । साधक श्रवणीं तें ऐका ।। ६४० ।।

हत्वा नृपानधर्मिष्ठान्धातयित्वार्जुनादिभिः । अञ्जसा वर्तयामास धर्मं धर्मसुतादिभिः ।। ६६ ।।

शाल्व पौण्ड्रक विदूरथ । काशीपति वक्रदंत । कालयवन अधर्मरत । निन्दक दुर्दान्त शिशुपाळ ।। ४१ ।। इत्यादि अनेक अधर्मिष्ठ । जे दुराचारी केवळ नष्ट । तयां नृपांतें कंबुकंठ । वधूनि प्रकट स्वहस्तें ।। ४२ ।। आणि अर्जुनादि स्वपाल्यमान । तेथें स्वसामर्थ्य प्रकटून । कितिएकांतें तयां करून । स्वयें वधवून कौशल्यें ।। ४३ ।। राजसूययज्ञप्रसंगीं । तैसेंच भारतयुद्धरंगीं । कीं पाण्डवाश्वमेध-यागीं । दुष्टांलागीं निवटून ।। ४४ ।। मग कृषीवळ जैसा तृणादिकां । काढूनि सस्यामाजिल निका । राहे निवान्त लक्षूनि पिका । तद्रक्षकां स्थापूनी ।। ४५ ।। तेंवि धर्मसुत तो युधिष्ठिर । आदि करूनि पाण्डवनिकर । तिहींसीं यदुगणासह श्रीधर । धर्मानुसार विचरला ।। ४६ ।। बरव्या प्रकारें अतिसादर । प्रजा करूनि सुखनिर्भर । वर्तता जाला श्रीयदुवीर । होऊनि तत्पर धर्मा प्रति ।। ४७ ।। दुःखदैन्यादि पाप ताप । भूतळीं सर्वही पावले लोप । अमोघ श्रीकृष्णप्रताप । धर्म अमूप वाढला ।। ४८ ।। ऐसें अपूर्व हें कथानक । परीक्षितीकारणें श्रीशुक । कथिता जाला प्रेमोत्सुक । चरित सम्यक प्रभूचें ।। ४९ ।। इतुकेन हा अध्याय बरवा । समाप्ति पावला नित्य नवा । श्रोतीं परिसोनि स्वविसावा । साधिजे अवघा सुश्रवणें ।।६५०।। नित्य नेमें जे ऐकती पठती । तयांचे सर्वही काम पुरती । जीवत्संताना नारी होती । अखिल संपत्ति नर लाहती ।। ५१ ।। भगवत्कृपा होय वाड । मुमुक्षूचेंही पुरे कोड । तत्वज्ञान उमजे उघड । सेवितां गोड हरिकथा ।। ५२ ।। यावरी चरमाध्यायीं कथा । श्रीकृष्णलीला विलासयुक्ता । सहसमस्तमहिषीकृता । समासें तत्वता पुन्हा कथिली ।। ५३ ।। आणि यदुवंशसंभव यादव ।

तद्विस्ताराचें अनंतत्व । सकारण वदला मुनिपुङ्गव । देखोनि राव आस्थावी ॥ ५४ ॥ तये कथेचें महिमान । कथितां शारदा धरी मौन । परमपावनां पावन । साधनांहून अवघियां ॥ ५५ ॥ तेथ श्रोतीं होऊनि सादर । श्रवणवदनें सुधाकार । श्रीकृष्णलीला परम सार । सेविजे अपार सुखकारी ॥५६॥ वेडे बागडे महाराष्ट्र बोल । ठसेठोंबसे आरुप केवळ । परि हरिलीलामृतें रसाळ । उद्धार केवळ गुरुवरदें ॥ ५७ ॥ म्हणोनि श्रोतयां हरिगुणरसिकां । गुरुपदकुवलयनिषेवकां । रुचतील हा भरंवसा निका । मज कृतार्थ रंका करितील ॥ ५८ ॥ येऱ्हवीं मी केवळ हीन । मूढमति अप्रवीण । सरतें केलें कृपादान । करूनि पूर्ण गुरुवरें ॥ ५९ ॥ आदिनाथ श्रीनारायण । तत्कृपाविभव संपूर्ण । पावला स्वयें कमलासन । देवर्षि संपन्न तद्योगें ॥ ६६० ॥ तेथ दत्तात्रेय दिगंबर । जाला केवळ निर्विकार । तत्कृपा-पीयूषसार । संप्राप्त प्रवर जनार्दन ॥ ६१ ॥ मग तें क्रमलब्ध कृपाबीज । एकनाथीं विरूढलें सहज । विशाळ वाढला शाखापुञ्ज । वृक्षराज सफळित ॥ ६२ ॥ सुरस तत्फळ सेवूनि शुद्ध । संतृप्त जाला चिदानंद । तत्परिपाटीं श्रीस्वानंद । आणि गोविन्द यथान्वयें ॥ ६३ ॥ तेंचि श्रीकृष्णदयार्णवें । ग्रंथ-भूमीवरी आघवें । प्रेरिलेंसे मुमुक्षुकणवे । करुणाप्रभावें विस्तारें ॥ ६४ ॥ तत्कार्याचिये पैं अवधी । स्वकृपायतन मामकी बुद्धि । प्रेरूनि वदला स्वयंसिद्धि । ओवीप्रबंधीं अध्याय हा ॥ ६५ ॥ जेंवि कपोळीं स्पर्शोनि कंबु । ध्रुवा वदनीं वेदकदंबु । मुकुन्दें प्रकटिला स्वयंभु । निरसूनि भाव मौढ्याची ॥६६॥ तेंवि शेषग्रथनकार्यीं मज । मंदमतीतें अहं सहज । केलें हें गुरुकृपेचें भोज । प्रतापपुञ्ज नाचतसें ॥६७॥ म्हणोनि विवेकवंत नरीं । भजिजे सद्गुरु अत्यादरीं । तत्कृपा संपादिजे पुरी । कल्याणकारी सर्वस्वें ॥ ६८ ॥ श्रीमद्भागवत दशम स्कंध । टीका हरिवरद अगाध । दयार्णवकृत परम विशुद्ध । अध्याय प्रसिद्ध नव्यायशीवा ॥ ६६९ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कन्धे श्रीशुक-परीक्षित्संवादे हरिवरदाटीकायां दयार्णवानुचरविरचितायां देवत्रयपरीक्षणं द्विजपुत्रानयनं नामो नवतितमोऽध्यायः ॥ ८९ ॥

॥ श्लोक ६६ ॥ ओव्या ६६९ ॥ एवं संख्या ७३५ ॥
अठ्ठचायशिवा अध्याय मिळून ओवी-संख्या ४१,४०१

एकोणनव्वदावा अध्याय समाप्त

कृष्णदयार्णवकृत

हरिवरदा

अध्याय ९० वा

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीपाण्डुरंगाय नमः । जो स्वानंदगगनींचा मित्र । निरसी अविद्याराम समग्र । प्रकाशी आत्मानुभवनेत्र । अपवर्गपात्रजनाचें ॥ १ ॥ जो अनंत फळीं सफळ पूर्ण । सुरतरुशान्तिच्छाये करून । निववी त्रितापतप्तशरण । कल्पनाविहीन करी सदा ॥ २ ॥ जो दैवीउद्यानवसंत । संतकोकिळा कृत कृतार्थ । मुमुक्षुद्विरेफकुळ विश्रान्त । होय संतत ज्याचेन ॥ ३ ॥ जो अचिन्त्यप्रापकचिन्तामणी । भवदुःखचिन्तातुरा निदानीं । स्वसुखें निश्चित करूनी । स्वरूप पूर्ण समरसवी ॥ ४ ॥ जो निष्कामकामनाकामधेनु पूर्ण पूर्णत्वें सुशान्ततनु । साधकजनांचे काम संपूर्ण । नुरवी साधनसिद्धिगुणें ॥ ५ ॥ जो स्वबोधजीवना अभिवर्षक । उदार समशीळ मेघ सम्मुख । चतुर्विधपुरुषार्थी जीव अनेक । सस्यें सम्यक संतर्पी ॥ ६ ॥ जो चिन्मात्रैकदेशींचा भूप । विवेकशासनें सानुकंप । नानार्थकामीं प्रजा अमूप । पाळी अनंत सुखदानें ॥ ७ ॥ जो ब्रह्मत्व प्रदाता आचार्य । असंस्कृतनरां प्रबुद्धवर्य । शमादिव्रतबंधें स्वप्रत्यय । बोधूनि स्वयें ब्रह्म करी ॥ ८ ॥ जो अध्यात्मैकज्ञानसृजिता । मानसविजयें प्रतिपाळिता । सन्मात्रसमरसें उपसंहर्ता । जिज्ञासुगुणा अभ्यंतरीं ॥ ९ ॥ जो पूर्णत्वदीक्षाप्रदातार । प्रत्यगात्मयज्वया ऋत्विग्वर । संपादूनियां ज्ञानाध्वर । करणसभाहारावदानीं ॥ १० ॥ जो कामाद्यरिगणविदळिता । अनावरकरणां आकळिता । तुरीयातारुण्यरससंभोक्ता । सुखीं सुलीनतासंगोप्ता ॥ ११ ॥ जो मुनिजनमानसध्येय । सनकादिवैष्णवां गेय । उपनिषज्ज्ञानियां ज्ञेय । अप्रमेय सनातन ॥ १२ ॥ जो योगियांची योगसिद्धी । भोगियांची भोक्तृत्वबुद्धि । सर्वज्ञ सर्वकळानिधि । निरुपाधि सर्वात्मा । ॥ १३ ॥ जो निर्गुण निराकार । सगुणही शुद्ध साकार । सर्वव्यापी परात्पर । निर्विकार अविक्रिय

॥ १४ ॥ तो सद्गुरु परब्रह्म । श्रीकृष्णदयार्णव परम । मम सद्गतीचें सद्धाम । अवाप्तकाम अनंत ॥ १५ ॥ जयाचेन कृपादृग्वृष्टी । प्रज्ञासरोवर प्रमेयइष्टी । उचंबळे वक्तृत्वतटीं । निवे सृष्टी श्राव्यजळें ॥ १६ ॥ तया अंतर्यामिया समर्था । सद्भावें वंदूनि तत्वता । ग्रथनार्थ चरमाध्यायगाथा । तदनुज्ञया अविलंबिली ॥ १७ ॥ जेंवि देवळाचें बरवेपण । शिखरीं निवडे संपूर्ण । कीं भूषणाचें रौचर्य गहन । शोभायमान कोटीरीं ॥ १८ ॥ कां गोडिसेपण पयाचें । साये माजि अवघें साचें । चंद्रकळांचें परमत्व साचें । विशेषें निर्वचे सतराविये ॥ १९ ॥ तेंवि ये दशमींचें चांगावें । लीलानटनाट्य बरवें । ऐश्वर्य हरीचें गौरवें । सार्वाभ्युदयत्वें उत्कृष्ट ॥ २० ॥ इये शेवटिले अध्यायीं । शुकें वर्णिलें चित्सुखदायी । श्रोतीं सावध असोनि हृदयीं । सेविजे सर्वही सौरस्यें ॥ २१ ॥ ऐसी श्रोतयां सज्जनां । विनयभावें संप्रार्थना । श्रवणमात्रें गुणवंधना । पासूनि गहना सूटिजे ॥ २२ ॥ तरी पूर्विलाध्यायीं परीक्षा । देवत्रयाची मुनींहीं लक्षा । आणूनि भले पुण्डरीकाक्षा । दाविली शिक्षा जनांसी ॥ २३ ॥ आणि द्वारकेमाजि मृतापत्यां । द्विजाच्या आणूनि समस्तां । विजयें सह कृष्णें तत्वता । कीर्तिमहत्ता प्रकाशिली ॥ २४ ॥ या प्रसंगोपात्त कथा शुकें । कथिल्या नृपनाथा कौतुकें । श्रोतीं परिसिल्या सम्यकें । सद्विवेकें सुश्रवणीं ॥ २५ ॥ तेथ कृष्ण साक्षात् परमेश्वर । हें दर्शविलें उपपत्तिपर । तया पूर्णत्वें नाट्यानुकार । धृतावतार संपादी ॥ २६ ॥ आतां आरब्धीचें मुकुलित । सुरस कथानक यथास्थित । कथिजेल आस्थाप्रलंबनार्थ । तें घ्या मनांत बीजवत् ॥ २७ ॥ परम शोभाढ्य द्वारकापुरी । तेथ पोडश सहस्र अंतःपुरीं । स्वपत्नींसह क्रीडला हरी । आणि माझारीं हृदिनीच्या ॥ २८ ॥ त्यावरी तीव्रवेधें विदेहापरी । उन्मत्त जडवत् वदल्या नारी । त्या तदुक्ति संपल्यावरी । कथिली पुढारीं संतति ॥ २९ ॥ कृष्णसंगुप्त यदुवंशज । त्यांचें आनंत्य कथिलें सहज । भगवदैश्वर्यविभूतिपुञ्ज । वर्णिले चोज न म्हणूनी ॥ ३० ॥ इतुका अभिप्राय ये अध्यायीं । परम गोडिरा विश्रान्तिदायी । याचेनि श्रवणें शेषशायी । होय सर्वांही आपैता ॥ ३१ ॥ येथील व्याख्यान तों अतिगहन । परि सिद्धी पाववी सद्गुरु पूर्ण । पितृकव्यारूढ बाळा कठिन । पर्वतीं चढणें कायसें ॥ ३२ ॥ कीं कांसे लागालिया अनाभिज्ञा । नदी दुस्तर केतुली जाणा । सूर्याश्रिता पंगुवा अरुणा । मेरुप्रदक्षिणा काय नव्हे ॥ ३३ ॥ म्हणोनि पदशः श्लोकोक्त शुद्ध । जैसा श्रीशुकें नृपाप्रसिद्ध । केला श्रीकृष्णचरितानुवाद । कथितां अवरोधन धिषणे ॥ ३४ ॥ तेंचि मुनीचें प्रभाषित । नृपेंसीं जैसें सुललित । ऐका सविस्तर दत्तचित्त । भाषायुक्तप्रबंधें ॥ ३५ ॥ प्रथम हरिलीला द्योतक । पांचां श्लोकांचें एक कुलक । पांचवे श्लोकींच निष्टंक । अन्वयात्मक क्रियापद ॥ ३६ ॥ तेचि प्रथमादारभ्य पदशा । श्लोकसंगति कथिजेल सहसा । पंचमश्लोकीं अन्वयठसा । ऐसिया रहस्या जाणावें ॥ ३७ ॥

श्रीशुक उवाच । सुखं स्वपुर्यां निवसन्द्वारकायां श्रियः पतिः । सर्वसम्पत्समृद्धायां जुष्टायां वृष्णिपुङ्गवैः ॥ १ ॥

धर्मसंस्थापनेसाठीं । नटला जो कां मानवनटीं । संहारूनी अधर्मी सृष्टी । धार्मिककोटी

रक्षूनी ॥ ३८ ॥ गृहस्थाश्रमींचे जे निज धर्म । आचरत असतां पूर्णकाम । बहुधा यज्ञ सुकृतधाम । साङ्ग निःसीम आचरला ॥ ३९ ॥ करणरंजक विषय ग्राम्य । नानाविलासमय उद्दाम । सेवी उल्लसित रामाराम । माधवा सम रमाधव ॥ ४० ॥ ऐसा कृतार्था परी कमलापति । जे वृष्णिपुङ्गवीं सेविली प्रीति । जी माजि विपुळ सर्व संपत्ति । समृद्धिमती ती ही बहु ॥ ४१ ॥ ते स्वपुरी राजधानी । पवित्रा द्वारकाभिधानी । स्वयें सुखरूप सुखावोनी । वसत होत्साता तीमाजी ॥ ४२ ॥

स्त्रीभिश्चोत्तमवेषाभिर्नवयौवनकान्तिभिः । कन्दुकादिभिर्हर्म्येषु क्रीडन्तीभिस्तडिद्द्युभिः ॥ २ ॥

साष्ट शतोत्तर सोळा सहस्रा । रमणीय रमणी अतिसुन्दरा । सुभगोपचारीं कृतशृंगारा । वेषोत्तमधरा निजजाया ॥ ४३ ॥ ज्या अमलोद्वर्त्तिता सुस्नाता । सुभगा सुस्निग्धा सुवासिता । कोमळा सुकुमारा उज्ज्वळिता । शरदुत्पलवता विलसती ॥ ४४ ॥ भ्रमरभासुर मृदुळ नीळ । शिरीं धम्मिल्ल सुलंब बहळ । प्रसाधितानुधृत सकळ । वेणिका साळंकृत ग्रथित ॥ ४५ ॥ अमूल्य वर्तुळ मुक्ताजाळी । नभीं नक्षत्रां सम तेजाळी । मौळीं अलका वरी शोभली । तळीं भूषावळी वेणिके ॥ ४६ ॥ भांगीं सिन्दूररेखा नीट । शृंगारसेनाध्वज स्पष्ट । फरा फरारा शेंडा प्रकट । भासे वरिष्ठ शृंगारीं ॥ ४७ ॥ सुरत्नजडित कार्त्तस्वरीं । केतकीच्छद राखडी वरी । मूद तायितयुग्म कुहिरी । नागशफरी कूर्मलसें ॥ ४८ ॥ बिल्वामलक बीजपूर । विविध प्रसूनें शुक मयूर । सालफळ भोंकर बदर । हिरडे स्वर्णतारमयगुच्छ ॥ ४९ ॥ इत्यादिभूषणीं सुभूषित । सुलंब वेणी भुजगाकृत । दर्शनमात्रें कृत मूर्च्छित । क्ष्वेड रतिनाथ उद्बोधे ॥५०॥ प्रान्त तें चि पुच्छ सूक्ष्म । मस्तकालकभा फणां सम । भूषणलांछनें उरंगम । सादृश्यसाम्य वेणिका ॥ ५१ ॥ असो आतां हें रूपक । भूषणें सन्मुखींचीं आइक । शशिकोर मौळ प्रसूनमुख्य । राजती सम्यक मौळाग्रीं ॥ ५२ ॥ तळीं हासळिया आकर्ण । तिर्यग् विलसती संपूर्ण । मध्यें बिजोरा लंबमान । प्रकाशघन तरळतसे ॥ ५३ ॥ श्रवणीं ताटंकें सूर्यासम । विविध बाळिया अत्युत्तम । निडळीं सुरेखिता कुंकुम । मनोरम तळीं पूलिका ॥ ५४ ॥ नयनीं सोगयाचें अंजन । नाकीं मुक्ताफळ शोभायमान । वदनीं ताम्बूल सुरंग पूर्ण । गोंदिली हनु अधराधी ॥ ५५ ॥ रंजित रजनीचूर्ण आननीं । शोभा विलसे कंठाभरणीं । मांगल्यप्रद कृष्णमणी । इतर त्याहूनि तळवटीं ॥ ५६ ॥ मुक्तापुंज एकावळी । सुवर्णमणि चापे कळी । विविधमाळा बहु तेजाळी । त्या वरी शोभली सरी गळां ॥ ५७ ॥ कंचुकी तगतगीत आंगीं । वांकी बाहुवटीं द्विभागीं । भूषणें मिरवती करयुगीं । जडित अवघीं देदीप्य ॥ ५८ ॥ चुडे कंकणें दोरे गजरे । इत्यादि अळंकार हे सारे । करीं मंडित विविधाकारें । अंगुळीं विचित्र मुद्रिका ॥५९॥ कटिमेखळा प्रकाशवंत । विचित्रनवरत्नखेवणित । नानाचित्रींव किंकिणीयुक्त । सुबद्धमंडित नीवीवरी ॥ ६० ॥ चरणीं अंदू नूपुर वांकी । दशांगुळीं भूषणें नेकीं । शोभा विलसे आत्यंतिकी । चालतां जागृती ये मदना ॥ ६१ ॥ परिधानवास अतिसुरंग । श्लक्ष्ण सपूर मृदुतर चांग । विचित्र पल्लवप्रान्तभाग । विभाती तगतग हेममय ॥६२॥ ऐसीं नित्यनूतनें नानावसनें । नाना प्रकारचीं अळंकरणें । दिनशा भूषिती चातुर्यगुणें ।

वर्णिलीं वचनें अति अल्पें ॥ ६३ ॥ जें जया वेळे रुचे मना । त्या प्रकारींच्या अळंकरणा । स्वीकारिती कृष्णाङ्गना । मनोरथपूर्णा प्रमोदें ॥ ६४ ॥ एवं सुवासा साळंकृता । सुयुक्ता सौभाग्यद्रव्यलिप्ता । उत्तम-वेषधारिणी कान्ता । सुन्दरा पूता अतिचतुरा ॥ ६५ ॥ नवयौवनकान्तिसुभरा । चंचच्चामीकराभगौरा । रुचिरावयवीं सौन्दर्यवरा । प्रत्यक्ष इन्दिरा निजरूपें ॥६६॥ जेंवि उद्यानीं लतावृक्ष । अंबुसुरवाडें अशेष । लसलसिती परि विशेष । शोभा प्रत्यक्ष वसंतीं ॥६७॥ तेंवि सुंदरा आंगीं सौन्दर्य । नवतारुण्यें कमनीय । विलसे विशेषें रमणीय । गात्रनिचय रौचर्यें ॥६८॥ निडळ उच्च भ्रू व्यंकटा । सरळ नासिका सुतेजिष्ठा । विशाळनयन खंजरीटा । आकृतिपुटा समाकृत ॥ ६९ ॥ अनिम्न गल श्रवण रुचिर । सुरंगबिम्बा परी ओष्ठाधर । हनुवटी अल्पोच्छ्रित सुंदर । सम सूक्ष्म भासुर द्विजपंक्ति ॥ ७० ॥ शरत्प्रफुल्लित सहस्रदळ । हेमाब्जगुच्छवत् वर्तुळ । सूक्ष्म जळकणीं सार्द्रालुमाळ । शोभा प्राज्ञळ जया परी ॥ ७१ ॥ तेंवि सुगौर वर्तुळ सुप्रभ । यौवनभरें सदानाभ । स्निग्धपुलकोद्गमें सुशोभ । आननबिम्ब विराजित ॥ ७२ ॥ अंस उन्नत भुज विशाळ । करिणीकराकृत मांसळ । रातोत्पळवत् पाणितळ । त्वक् प्रवाळ सर्वाङ्गीं ॥ ७३ ॥ हृदय विस्तीर्ण भुजमध्यग । अशीर्णकामाङ्कुशक्षताभंग । पीनपयोधर उत्तुङ्ग चांग । भेरीपुटाङ्ग न्युब्जवत् ॥ ७४ ॥ उदर वर्तुळ त्रिवळी सह । नाभि गभीर सुपमावह । ऊर्ध्वगरेखाकृततनूरुह । सौक्ष्म्यें बहुसुशोभिता ॥ ७५ ॥ सूक्ष्म कटी पृथु नितंब । ऊरु समान रंभास्तंभ । जानु वर्तुळ जंघा कंबु । मध्यातसन्निभ आगुल्फ ॥ ७६ ॥ आरक्त टांचा अखिल पदतळ । उपमे असमान प्रवाळ । सुलंब तन्वी दशांगुळ । नखचक्रवाल लखलखीत ॥ ७७ ॥ इत्यादिसुललितावयववयुक्ता । अदीर्घ अह्रस्वा अतिमंडिता । उच्च तिर्यक् सम शोभिता । ऋज्वंगभूता रतिरसिका ॥ ७८ ॥ ज्यांचे अवयव भूषणा भूषिती । भूषणें अवयवां शोभविती । अन्योन्य सुषमा मिरविती । ऐशा राजती सुवेषा ॥ ७९ ॥ दश दश पुत्र एकैक कन्या । प्रसवल्या असतां सर्वाङ्गना । नवयौवनकांतिसदना । वर्णिल्या जाणा रमणीया ॥ ८० ॥ हें श्रीकृष्णयोगसामर्थ्य । जैशा लतिका सुधासिंचित । लसलसित अम्लान संतत । केवळ नववत टवटविती ॥ ८१ ॥ आणि ज्या ठायीं ज्या निर्जरा । हरिप्रियत्वा धृतावतारा । हा प्रथमाध्यायीं निगद बरा । केला सारा सविस्तर ॥ ८२ ॥ म्हणोनि नवयौवतकांतिभरा । चतुरा अपीच्या वेषधरा । गजगामिनी पिकस्वरा । विभाती सुन्दरा सुदर्शना ॥ ८३ ॥ मनेप्सित भोगसंभुक्ता । ठाणठकारें प्रमोदयुक्ता । स्वस्वगेहीं स्वसखींसहिता । क्रीडती समस्ता चपलाङ्गीं ॥ ८४ ॥ कंदुकादिकां नाना खेळां । खेळती कौतुकें लाघवशीळा । विद्युत्प्रभा भासुरा चपळा । तळपती लीला अभिपंगें ॥ ८५ ॥ डोळझांकणी लपंडाई । झोंकती हिंदोला गीतप्रवाहीं । ऐसी विविधक्रीडानवाई । क्रीडती सर्वही मनोरमा ॥ ८६ ॥ जे जे वेळे जे जे मना । रुचे ते क्रीडा खेळती सगुणा । ऐसियां सहित रमाराणा । द्वारकापट्टणामाझारी ॥ ८७ ॥ तेचि द्वारका श्लोकद्वयें । पुन्हा प्राञ्जळ व्यासतनयें । विशेषिली गिराप्रवाहें । ते यथान्वयें परियेसा ॥ ८८ ॥

नित्यं सङ्कुलमार्गायां मदच्युद्भिर्मतङ्गजैः । स्वलङ्कृतैर्भटैरश्वै रथैश्च कनकोज्ज्वलैः ॥ ३ ॥

यदुकुळसंभूत अनेक । संप्राप्त ऐश्वर्य सम्यक । यादव महावीर सकळिक । वसती पृथक् स्वस्व-गृहीं ॥ ८९ ॥ सर्वही सेनासंभारवंत । राजसंसदीं विषज्जित । नित्यशा येती प्रणतयुक्त । प्रणमनार्थ नृपाच्या ॥ ९० ॥ आणि परस्परें स्नेहवर्द्धना । जाती एकमेकांचिया सदना । तैसेच सामंत राजे नृपदर्शना । येती स्वसेनामंडित ॥ ९१ ॥ कोण्ही बैसती मत्तमातंगीं । कोण्ही दिव्यस्यंदनीं चांगीं । आवृत अश्वारूढानेगीं । खोळती वेगें भट अग्रीं ॥ ९२ ॥ एक जाती एक येती । तेणें दाटणी होय पंथीं । आणि जलोद्देशें सरिते नेती । हयगजपंक्ती तत्सेवक ॥ ९३ ॥ तुरंगसादी राउत राणे । मिरविती शौर्य स्वतंत्रपणें । यादवां समीप जीविकागुणें । अर्पिलीं जीवितें सदा जिहीं ॥ ९४ ॥ ते स्वस्वप्रभुसदना प्रती । जोहारावया निरंतर जाती । जातां येतां पथीं दाटती । तदश्व अतिसान्निध्यें ॥ ९५ ॥ स्वलंकृत जे पादचारी । भटोद्भट उपकायकारी । देय ग्राह्य प्रेरणा वारी । प्रेषितकार्या वरी विविध ॥ ९६ ॥ कंचुकोष्णीष कटिबंधनें । कटककुण्डलमुद्राद्याभरणें । मंडितकटिकरीं संवेष्टनें । शस्त्र-धारणें विराजती ॥ ९७ ॥ तेंविच मत्तवारण मदच्युत । हेममयपाखरामंडित । शुण्डी आमौळ सुरंगित । घंटानादित घागरिया ॥ ९८ ॥ चरणीं पैंजण विराजित । कटीं शृंखळा पदकाङ्कित । श्रवणीं बाळिया सहमुक्त । भूषामंडितगंडयुग ॥ ९९ ॥ अर्द्धपुच्छ अर्द्धोदर । चित्रित आपाद विचित्र । भूषणीं भूषित कंठास्यशिर । सपल्याण रुचिरतुरंगम ॥ १०० ॥ तडिद्भासुरकार्तस्वरीं । रत्नजडित-द्विचतुश्चक्री । परमोज्ज्वलित तेजिष्ठ भारी । स्यंदनहारी विराजती ॥ १ ॥ चकोर जनपद प्रजाजन । क्रयविक्रयीं उद्यमी निपुण । वस्तुसंभारें पण्याङ्गण । सेविती जाऊन निरंतर ॥ २ ॥ शुल्कदानें वस्तुसंग्रह । करावया साकाङ्क्ष जनसमूह । वर्तती पण्यरंगीं अहरह । उद्योगमय जवशीळ ॥ ३ ॥ नानाप्रवृत्तिकार्योद्योग । इत्यादिसंपादाया लगबग । हिंडती नागर अति सवेग । कमनीय साङ्ग वेषधर ॥ ४ ॥ ऐसिया तयां अगणितां । भटाश्वगजरथीं तत्वता । आणि जनपदीं दाटणी पंथा । माजि समस्तां सघोष ॥ ५ ॥ चालतां परस्परें अडखळती । अतिसंपर्कें ते ठेलती । हयगजरथभयें थोपती । संलग्न चेंपती जन ऐसे ॥ ६ ॥ मत्तगजांचे घंटानाद । रथकेङ्कारीं घडाड विशद । दणाण हयशफांचा तुन्द । जनसंवाद उच्चतर ॥ ७ ॥ तेणें कोण्हाचा शब्द कोण्ही । झडकरी नायकती कानीं । भरले घनदाट पूर्णपणीं । दिवसरजनी पथ सर्व ॥ ८ ॥ जेंवि कुल्या नद्या वर्षाकाळीं । प्रवाहरूपें परिपूर्ण जळीं । भरल्या नवजळागमनमेळीं । सर्ववेळीं आभासती ॥ ९ ॥ तेवि वीथी शृंगाटक । निरंतर भरलेंच निष्टंक । पूर्वोक्तमेळीं निचयात्मक । पाहतां कौतुक पाहतया ॥ ११० ॥ ऐसी संकुळमार्गा द्वारका । अतिशोभाढ्या सकौतुका । यावरी अन्य विशेषणीं ऐका । शोभा सम्यका सबाह्य ॥ ११ ॥

उद्यानोपवनाढ्यायां पुष्पितद्रुमराजिषु । निर्विशद्भृङ्गविहगैर्नादितायां समन्ततः ॥ ४ ॥

उद्यानें आणि उपवनें । सबाह्य प्रफुल्लित रम्यपणें । अतिशोभाढ्या द्वारका तेणें । जेंवि सौभाग्य-चिह्नें सुन्दरी ॥ १२ ॥ नगरान्तरीं हर्म्यभागीं । आराम उद्यान नामलिंगीं । नगरा बाह्य प्रदेशीं सुभगीं ।

तीं उपवनें अवघीं जाणावीं ॥ १३ ॥ ऐसीं उद्यानोपवनें सारीं । भरलीं सुपुष्पित तरुवरीं । चैत्रनंदन जयांची सरी । सौरभ्यप्रकारीं न पवती ॥१४॥ त्या पुष्पित तरुपंक्तींचे ठायीं । सुगंधलोभें सौरभ्यघायी । द्विजालि प्रवेशले सर्वदाही । होऊनि विदेही अतिवेधें ॥ १५ ॥ तया द्विजांचा कूजितराव । द्विरेफकुळांचा गुञ्जारव । घनवट वनोद्यानीं सर्व । रावित सदैव सुस्वरें ॥ १६ ॥ तिहीं भृंगविहंगीं आसमंतात । नादित द्वारकापुरी समस्त । ऐसिये माजि कमलाकान्त । त्रैलोक्यनाथ परमात्मा ॥ १७ ॥

रेमे षोडशसाहस्रपत्नीनामेकवल्लभः । तावद्विचित्ररूपोऽसौ तद्गेहेषु महर्द्धिषु ॥ ५ ॥

षोडशसहस्रकलत्रांचा । एक वल्लभ जो हा साचा । ऐश्वर्ययोग पैं तयाचा । श्रीशुकवाचा अनुवादे ॥ १८ ॥ जितुक्या स्वयोपिता विविध । तितुकीं विचित्र रूपें प्रसिद्ध । पृथक् पृथक् धरूनि विशद । रमता जाला तत्सदनीं ॥ १९ ॥ तींचि तया महिषींचीं सदनें । कैसीं म्हणा जरी सुसंपन्नें । तरी महर्द्धिमंतें ऐश्वर्यगुणें । जेंवि सफळपणें तरु शोभे ॥ २० ॥ महाहरत्नें भूषणें धनें । आसवें गव्यें सर्वही धान्यें । सौरभ्यद्रव्यें दिव्यें वसनें । विचित्रभाजनें उपयोगी ॥ २१ ॥ हयगोस्यंदन स्तंबेरम । दासदासी गुणललाम । इत्यादि समृद्धि निःसीम । जेथ अनुपम विलसती ॥ २२ ॥

प्रोत्फुल्लोत्पलकह्लारकुमुदाम्भोजरेणुभिः । वासितामलतोयेषु कूजद्द्विजकुलेषु च ॥ ६ ॥

ज्यामाजि सोद्यान सरें सुन्दर । रत्नसोपानमय समग्र । तदंतरीं उत्फुल्लतर । इन्दीवरसमुच्चय ॥ २३ ॥ विविधजातींचीं मनोहरें । सरसिजें उत्पळें कह्लारें । कुमुदें अंभोजें नानाकारें । अनेकवर्णें विराजितें ॥ २४ ॥ वातवेगें दोलायमान । तेणें तयांचे परागरेणु । जळीं संमिश्र सौरभ्यपूर्ण । संस्पृष्टपवन सुशीतळ ॥२५॥ तिहीं सुवासित अमळ तोयें । स्वच्छें मधुरें अमृतप्रायें । जेथ सर्वदा पंकजमयें । जें अमरां अतिशयें दुर्लभ ॥ २६ ॥ सफळ पुष्पित उद्यानोद्भव । वृक्षांस्तव पक्षिसमुदाव । प्रियकलरवें कृतविराव । वसती सदैव बहु जेथ ॥ २७ ॥ ऐसिया रमणीय मंदिरीं । पृथग्रूपें श्रीपति शौरी । स्वरमणीं बहु प्रकारीं । द्वारकानगरी माजिवडा ॥ २८ ॥ लीलानुकारें अतिविलासें । जेंवि मानिलें मानिनीमानसें । तैसाच क्रीडला मनोल्लासें । प्रेमोत्कर्षें अलौकिक ॥ २९ ॥ एवं स्थळक्रीडा सदनानेकीं । मुकुलित श्रीशुकें सकौतुकीं । कथिल्यानंतर सरितोदकीं । क्रीडला ते निकी कथा कथी ॥ १३० ॥

विजहार विगाह्याम्भो ह्रदिनीषु महोदयः । कुचकुङ्कुमलिप्ताङ्गः परिरब्धश्च योषिताम् ॥ ७ ॥

नित्य नूतन क्रीडतां निधडा । पुरवी निजाङ्गनांचा हवडा । तंव वसंतग्रीष्मीं अंबुक्रीडा । शमनचाडा निदाघ ॥ ३१ ॥ करावया वनितां सह । संपत्तीसीं यानारूह । पुरा बाह्यदेशीं अहरह । रमानाह जाऊनी ॥ ३२ ॥ क्रीडा उत्सवें ह्रदिनीमाजि । जळीं मज्जूनि पुण्यपुञ्जीं । वेष्टित संपूर्णा प्रमदाराजी । क्रीडला सहजीं महोदय ॥ ३३ ॥ ह्रद बोलिजे डोहाप्रति । अगाध भरलें जळें अति । ज्यां माजि त्या

सरिता ख्याती । ह्रदिनी नामें जाणावी ॥ ३४ ॥ गाधोदका वसती शुष्का । ह्रदिनी सर्वदा विपुलोदका । तदंतरीं क्रीडाकौतुका । यास्तव करी कां श्रीकृष्ण ॥ ३५ ॥ ज्याचें महदैश्वर्य स्वयंभ । विधीशादिकां अतिदुर्लभ । तो लीलानाट्यें सम सलोभ । सेवूनि अंभ विहारे ॥ ३६ ॥ मन्मथसमरावेशोद्गमें । हृदयीं गाढ कवळूनि प्रेमें । योषितांसीं प्रवृद्धकामें । रतिरसशर्मे परिरब्ध ॥ ३७ ॥ यास्तव आलिङ्गनप्रेमाविष्टें । कुंकुमाक्तकुचसंघटें । कुचकुंकुमलिप्तांग नेटें । कवळितां स्पष्ट हरि जाला ॥ ३८ ॥ रतिरसोत्कर्षें प्रस्वेदित । कारणद्रावें अभिलाञ्छित । निदाघयोगें उष्मान्वित । करी स्त्रीयुक्त जळकेलि ॥ ३९ ॥ द्वारके बाह्य अनेक ह्रदिनी । जये वेळे जे आवडे मनीं । तेथ प्रमोदें जळक्रीडनीं । रुक्मिणीजानी प्रवर्ते ॥ १४० ॥ तटा वरूनि आसमंतात । वस्त्रजवनिका दृढ उच्छ्रित । देऊनि तद्बाह्य समस्त । सहचरानुगत सपार्षद ॥ ४१ ॥ सारथि अंबष्ठ मंदुर । शिबिकावाही सयानानिकर । विद्योपजीवी प्रशंसापर । गायक वादक इत्यादि ॥ ४२ ॥ अंतरीं निजजायाकदंबीं । एक आपण विश्वकुटुम्बी । क्रीडे उद्दाम मायावलंबी । जो माथां तुरंबी विधिपुष्पा ॥ ४३ ॥ पूर्वी सगोपी रासक्रीडा । परमाभिनव ईक्षणचाडा । नभीं गंधर्वांच्या झुंडा । गीत सुघडा वादनपरा ॥ ४४ ॥ तेंविच यया ही प्रसंगीं । श्रीकृष्णचरितानुरागीं । स्वाभीष्टार्थ गंधर्ववर्गीं । गायिला शार्ङ्गी वाद्यभरें ॥ ४५ ॥

उपगीयमानो गन्धर्वैर्मृदङ्गपणवानकान् । वादयद्भिर्मुदा वीणां सूतमागधबन्दिभिः ॥ ८ ॥

मृदंग पणव वीणा आनक । इत्यादि वाद्यें जीं सम्यक । अति कौशल्यें अभिवादक । सुस्वरगायक यथाम्नाय ॥ ४६ ॥ तिहीं गंधर्वी पद्यप्रबंधीं । सुताळबद्ध छंदबंधीं । वारंवार स्तवन विशदीं । चरितानुवादीं गायिला ॥ ४७ ॥ तैसा च सूतमागधबंदिजनीं । वाद्यविशेषीं नाना स्तवनीं । उपगीयमान चक्रपाणी । जलक्रीडनीं अनेकधा ॥ ४८ ॥ एवं जळीं प्रविष्ट सुखावह । परमकमनीय महिषींसह । तेथ नर्माचरणें प्रोत्साह । करी विदेह तच्चित्त ॥ ४९ ॥

सिच्यमानोऽच्युतस्ताभिर्हसन्तीभिः स्म रेचकैः । प्रतिसिञ्चन्विचिक्रीडे यक्षीभिर्यक्षराडिव ॥ ९ ॥

भगवदिङ्गितें चाटुचटुळ । कामकुहकेक्षित चंचळ । अवलोकूनि वनिता सकळ । सिंचिती जळ हरिआंगीं ॥ १५० ॥ भोंवताल्या परिघाकार । दावूनि कामक्षोभानुकार । करीं चिरकांड्या पूरितनीर । घेऊनि सादर ताडिन्निभा ॥ ५१ ॥ चहूंकडूनि त्या रेचकीं । पृष्ठीं उदरमुखमस्तकीं । जल शिंपिती सकौतुकीं । हांसती कामुकी विनोदें ॥ ५२ ॥ ऐसा तिहीं वनितागणीं । सिच्यमान चहूंकडूनी । स्वयें शिंपी रेचकपाणी । वनितानलिनी मेघवत ॥ ५३ ॥ जितुके स्त्रियांचे अवयव । त्रपाविशेषें गोपनार्ह । तींचि स्थानें लक्षूनि देव । शिंपी लाघव दावूनी ॥ ५४ ॥ कक्षीं हृदयीं पयोधरीं । ऊरुनितंबीं तन्मध्यविवरीं । उदक सिंची रेचकधारीं । नर्मोत्तरीं उपहासी ॥ ५५ ॥ आपण एक बहुता नारी । निकट सर्वां सम्मुख हरि । जलसिंचनें आणी हारी । मनोविहारी चपलाङ्ग ॥ ५६ ॥ जेंवि

जलनिवासी यक्षराज । यक्षिणीं सह तेजःपुञ्ज । क्रीडे निःशंक निर्लज्ज । करूनि चोज सकाम ॥ ५७ ॥ तेंवि दयिताङ्गीं रमाभर्ता । लीलादिनोदें सभोंवता । जल प्रतिसिञ्चित होत्साता । जाला क्रीडता तच्छंदे ॥ ५८ ॥

ताः क्लिन्नवस्त्रविवृतोरुकुचप्रदेशाः सिञ्चन्त्य उद्धृतबृहत्कबरप्रसूनाः ।
कान्तं स्म रेचकजिहीरपयोपगुह्य जातस्मरोत्सवससद्वदना विरेजुः ॥ १० ॥

तया सिंचित जळें त्या कामिनी । अवसानें उमस न पवूनी । आर्द्रांशुका जाल्या ते क्षणीं । युगपत हृदिनी माजिवडचा ॥ ५९ ॥ मौलागळीं परम सूक्ष्में । वासित वसनें अत्युत्तमें । क्लिन्न होतां जलसंगमें । जडलीं त्वक्समें अंगेंसीं ॥ १६० ॥ म्हणोनि मांडिया कुचप्रदेश । उघड दिसती प्रत्यक्ष । परि क्रीडासंभ्रमें धृतावेश । व्रीडा अशेष न स्मरती ॥ ६१ ॥ वार घालूनियां हरीवरी । तैशाच विवृतावया वारी । सिंचिती भोंवत्या सरोभरीं । चाञ्चल्य प्रकारीं अतिजवें ॥ ६२ ॥ रेचकीं तांतडी जलपूरणा । जलोन्मुखा नम्रानना । पुन्हा ऊर्ध्वोन्मुखा जलरेचना । होतां वदना चाञ्चल्य ॥ ६३ ॥ तेणें मस्तकींचे बृहत्कबर । तद्ग्रथित जे पुष्पनिकर । विखुरले ज्यांचे पृथगाकार । व्यस्त समग्र सुभूषणें ॥ ६४ ॥ ऐसिया अवस्थेनें नारी । प्रियतमा वरी टाकिती वारी । परि तो न येचि सहसा हारी । अखंडित वरी जल सिंची ॥ ६५ ॥ मग निर्वुजूनि अंतःकरणीं । रेचकहरणेच्छेकरूनी । कान्ता-प्रति त्या चपळपणीं । लिगटती जाऊनि संभ्रमें ॥ ६६ ॥ चपळा चपळत्वें नवघनीं । जेंवि मिळती भूतळा क्रमूनी । मागें सरूनि रेचकग्रहणीं । तेंवि उत्सुक कृष्णीं संघटती ॥ ६७ ॥ तंव तत्सान्निध्यें स्मरोद्भव । जाला अंतरीं स्वयमेव । तेणें सर्वां करणीं उत्सव । जो क्रीडानुभव सुखाचा ॥ ६८ ॥ तया उत्सवें सुशोभितमुखा । विराजत्या जाहल्या हरिनायिका । जेंवि शरत्काळींच्या नलिनिका । प्रफुल्लोत्पला जलसौख्यें ॥ ६९ ॥ ऐसिया शातकुम्भाभगौरा । प्रमुदिता निःशंक क्रीडनपरा । चपलेङ्गिता स्मरप्रचुरा । चंचलावयवा विराजिता ॥ १७० ॥ जरी त्यां माजि श्रीकृष्ण विनोदें । म्हणाल क्रीडतां उत्कृष्टमोदें । कोंवि राजला क्रीडानुच्छंदें । तें ऐका विशदें निरूपणें ॥ ७१ ॥

कृष्णस्तु तत्स्तनविषज्जितकुङ्कुमस्रक् क्रीडाभिषङ्गधुतकुन्तलवृन्दबन्धः ।
सिञ्चन्मुहुर्युवतिभिः प्रतिषिच्यमानो रेमे करेणुभिरिवेभपतिः परीतः ॥ ११ ॥

त्या ज्या क्रीडमाना स्वाङ्गना । तदालिंगनें स्रक्संपूर्णा । तत्स्तनकुंकुमास्तव जाणा । रंगल्या सघना जयाच्या ॥ ७२ ॥ निडळपट्टिके ऊर्ध्वभागीं । कुरळ केश द्विरेफरंगीं । तन्निचयजाटिका चांगी । कुटिलानेकीं आकर्णा ॥ ७३ ॥ ते कुन्तळकदंबबंध । क्रीडाभिनिवेशें अमंद । जवें कषायमान विविध । विलसित प्रसिद्ध जयाचें ॥ ७४ ॥ ऐसा कुंकुमरंजित स्रग्वी । कंपितकुंतळवृंदीं सर्वी । विराजमान रुचिरावयवीं । लीळानुभावी श्रीकृष्ण ॥ ७५ ॥ नद्योदकें तो वारंवार । सिंपित असतां स्त्रीनिकर ।

भंवता स्त्रियांहीं सिंपिला स्वैर । नर्मानुकार दावूनी ॥ ७६ ॥ एवं मिथा क्रीडमान श्रीधर । जळीं रमता जाला मनोहर । जेंवि करेणुसह महाकुंजर । क्रीडे दुर्धर निःशंक ॥ ७७ ॥ वसंतकाळीं चलदलोद्भव । कोमल लसलसित पल्लव । भक्षूनि इभइभीसमुदाव । होताति सर्व कामाकुल ॥ ७८ ॥ तया उत्कृष्ट कामोद्दीपना । अगाध हृदिनी करिणीगणा । सहवर्तमान परिभ्रमणा । क्रीडे विदान गजराज ॥ ७९ ॥ शुंडेमाजि घेऊनि नीर । भोंवताल्या परिघाकार । शिंपिती कुंजरी कुंजर । जवळी ना दूर होत्सात्या ॥ १८० ॥ तैसाचि तोहि कामान्वित । स्वकरें तयांवरी सिंचित । इतस्तता उपमर्पत । रमे अद्भुतक्रीडाभरें ॥ ८१ ॥ करिणी करी शुंडादंड । मेळवी स्पर्शी तदंग दृढ । वरि वरी प्रोक्षी वारि उदंड । आळंगी प्रौढ सम्मीळनें ॥ ८२ ॥ तया गजपतीचिया परी । जळीं तरुणींसह श्रीहरी । रमता जाला नर्माचारी । चिरकाळवरी प्रमोदें ॥ ८३ ॥ त्यावरी रमणींसह निवान्त । स्वतनु कुंकुमार्द्रांकित । क्षाळूनियां विलासमुक्त । निघाला त्वरित बाहेरी ॥ ८४ ॥

नटानां नर्त्तकीनां च गीतवाद्योपजीविनाम् । क्रीडालङ्कारवासांसि कृष्णोऽदात्तस्य च स्त्रियः ॥ १२ ॥

शुष्कवाळुवंटा उपरी । येऊनियां सस्त्रीनिकरीं । क्रीडालंकार वसनें सारीं । जीं भिजलीं नीरीं क्रीडतां ॥ ८५ ॥ तीं नटनर्तकीनर्त्तकगण । गीतवाद्योपजीवी जन । तयां देता जाला कृष्ण । अन्यें परिधान करूनियां ॥ ८६ ॥ तैशाचि परी तयाच्या स्त्रिया । भूषाम्बरा क्रीडाकाळींचिया । देत्या जाल्या आनंदमया । सर्वेहि तया सुभूषिता ॥ ८७ ॥ त्यानंतरें जगदीश्वर । क्रीडाविरामानुकार । स्वयें दावी मानवाकार । जो परात्पर अविच्युत ॥ ८८ ॥ सुन्दर वाळुवंट तें मवाळ । विस्तृत आणि समानशीळ । चंद्रप्रकाशें अतिसुज्ज्वळ । विलसे ढवळ रमणीय ॥ ८९ ॥ कुसुकुसुमित द्रुमाचिया पंक्ती । तटाकीं बहुधा विराजती । हृदीं कुमुदें प्रफुल्लें अति । शशिदीधितिसंयोगें ॥ १९० ॥ तया वरूनि मंद सुगंध । शीतळवायुप्रवाह शुद्ध । येणें सद्गुणी विश्रामद । कृतप्रमोद केवळ ॥ ९१ ॥ तेथ स्वमुखें रमारमण । मृदुलास्तरणावरी शयन । करिता जाला तैं आपण । विश्रान्ति पूर्ण पावावया ॥९२॥ तंव निकट संपूर्ण ही युवती । रतिरसलालसा कामाकृति । वेधल्या मानसें कृष्णेङ्गितीं । तयांची स्थिति शुक सांगे ॥ ९३ ॥

कृष्णैस्यैवं विहरतो गत्यालापेक्षितस्मितैः । नर्मक्ष्वेलिपरिष्वंगैः स्त्रीणां किल हृता धियः ॥१३॥

एवं म्हणिजे पूर्वोक्त । सक्रीड श्रीकृष्णांचें चरित । सविलासगतिगामज्यकृत । विनोदयुक्त बोलणें ॥ ९४ ॥ डोळे मोडूनि चंचलतर । विकसित अर्धोन्मिलीत वक्र । रोहेक धरूनियां चिरस्थिर । स्मरशराकार ईक्षित ॥ ९५ ॥ तैसेंच मंदोच्च उच्चतर हास्य । नर्मक्रीडा उपहास्य लास्य । चुंबनासंघट्टनें आस्य । मन्मथावेशें आलिंगनें ॥ ९६ ॥ ऐसिया उद्दामक्रीडानुकारी । इंगितीं मन्मथक्षोभकरीं । चाटुचटुललीलाप्रकारीं । हरिल्या बुद्धि स्त्रियांच्या ॥ ९७ ॥ म्हणोनि केवळ तदात्मक । क्रीडानुवेधें

निष्टंक । जाल्या विरहिणी समसम्यक । नाठवे आणिक हरिवीण ॥ ९८ ॥ जेंवि अमृताची धणी न पुरे । कीं सुखवेळेची मेधा नुतरे । आयुष्यवृद्धीचा हर्ष न सरे । कीं संपत्ति नोसरे सदैवांची ॥ ९९ ॥ तेंवि उत्कर्षें चिरकाळ । क्रीडला असतां गोपाळ । तथापि उत्कंठा अळुमाळ । न शमे केवळ अबळांची ॥ २०० ॥ प्रेमोत्सुक्य अधिकाधिक । मानसीं प्रवृद्ध साभिलाष । रेखिलीं अंतरीं सम्यक् । तीं इंगितें अशेख आठवती ॥ १ ॥ तयांहूनि अन्यचिंतन । विसरल्या मानिनी संपूर्ण । वेधल्या मानसें धृतध्यान । निद्रा निपटून ज्यां न लागे ॥ २ ॥ ऐसिये अवस्थे माझारी । बरळती सर्वा विदेहापरी । प्रेष्ठलीलाभिलाषीं अंतरीं । शुकवैखरी तेंचि वदे ॥ ३ ॥

ऊचुर्मुकुन्दैकधियोऽगिर उन्मत्तवज्जडम् । चिन्तयत्योऽरविन्दाक्षं यास्ता मे गदतः शृणु ॥ १४ ॥

शुक म्हणे गा विष्णुराता । त्या मुकुंदैकबुद्धि निभ्रान्ता । ज्यांच्या मुकुंदचि अंतरीं पुरता । भरला तत्वता अतिवेधें ॥ ४ ॥ देह गेह कीं जन विजन । विसरल्या दैहिक संपूर्ण । चिंतित होत्साल्या विगतमन । प्रेष्ठनळिननयनातें ॥ ५ ॥ जेंवि परिपक्वयोगी समाहित । निर्विकल्प विलीनचित्त । आत्मचिंतनें तन्मयस्वस्थ । केवळ निवृत्त गुणनाशें ॥ ६ ॥ तैशा मुकुंदैकनिष्ठा । चिंतनोत्कर्षें ध्यानाविष्टा । क्षणभरी होऊनि मौनिष्ठा । केवळ विनटा मनोन्मना ॥ ७ ॥ मग उन्मत्तापरि जड । जीं वाक्यें बोलिल्या वितंड । तीं मज वक्तयापासून रूढ । ऐकें सुहाडशिरोमणि ॥ ८ ॥

महिष्य ऊचुः ॥ कुररि विलपसि त्वं वीतनिद्रा न शेषे स्वपिति जगति रात्र्यामीश्वरो गुप्तबोधः ।
वयमिव सखि कच्चिद्गाढनिर्भिन्नचेताः नलिननयनहासोदारलीलेक्षितेन ॥ १५ ॥

कृष्णेङ्गितें हृतधी वनिता । चिंतित असतां तया स्वकांता । बाणली विदेह उन्मदावस्था । तंव देखिली उडतां टिवटिवी ॥ ९ ॥ टिवटिवीचा सहज स्वभाव । करूनियां उच्चविराव । ओरडत उडावें सदैव । बोलती स्वयमेव तयेसी ॥ २१० ॥ श्रीकृष्णविलास साकांक्षा । करूनि स्वकल्पित उत्प्रेक्षा । स्वेच्छा वदोनियां कमलाक्षा । करिती अशेषा जाणवणी ॥ ११ ॥ अवो ये कुररी आक्रोशें । निद्राहीन किन्निमित्तवशें । विलपसी कां तूं विशेषें । स्वसंतोषें कां न निजसी ॥ १२ ॥ इये जगीं रात्रीच्या ठायीं । सौषुप्तविश्रांति सर्वही । प्राणिमात्र घेती पाहीं । निश्चिंत हृदयीं होऊनी ॥ १३ ॥ प्रत्यक्ष अवलोकीं पां येथ । त्रिजगच्छास्ता जगन्नाथ । जगासमान जगीं स्वस्थ । स्वयें निद्रित ये कालीं ॥ १४ ॥ स्वयंभ हृदयाचा परवरी । निजबोधाची संपत्ति सारी । निक्षेपूनियां पूतनारी । जाला निर्द्वारीं गुप्तबोध ॥ १५ ॥ तूं विलपूनियां दीर्घ रवें । निद्रा भंगिसी स्वभावें । हें उचित नोहे जाण जीवें । सखे सदैव विचक्षणे ॥ १६ ॥ अथवा तुझा हा विरुद्ध । सहसा नोहेचि अपराध । क्वचित आम्हांसारिखी प्रसिद्ध । जालीसि निर्विद्धचित्ता तूं ॥ १७ ॥ कोण्या योगें ऐसें ह्मणसी । तरी तेही ऐकें गोष्टी सरिसी । बाणे अनुभव तव मानसीं । निश्चयेंसी तें बोलों ॥ १८ ॥ कमलनयन जो श्रीकृष्ण । त्याचें सविनोद हास्य जाण । तत्सह

उदार लीलेक्षण । तेणेंकरून अतिशयें ॥ १९ ॥ सये भेदिलीं आमुचीं चित्तें । म्हणोनि नपवों विश्रांतीतें । निद्रा न लागे तीव्र आर्त्तें । मनोमोहितें विलपतसों ॥ २२० ॥ बहुतेक ऐसेंच घडलें तुला । यास्तव करिसी वो गलबला । वृत्तान्त आमुतें जाणवला । तुझा आपुल्या प्रत्ययें ॥ २१ ॥ ऐसिया कुररीतें मोहिता । बोलती जंव त्या अवचित्या । तंव चक्रवाकी देखोनि आर्ता । बोलती वनिता तयेसी ॥ २२ ॥

नेत्रे निमीलयसि नक्तमदृष्टबन्धुस्त्वं रोरवीषि करुणं बत चक्रवाकि ॥
दास्यं गता वयमिवाच्युतपादजुष्टां किंवा स्रजं स्पृहयसे कबरेण वोढुम् ॥ १६ ॥

खेदें म्हणती वो चक्रवाकी । नेत्र लाविसी होऊनि दुःखी । परि तुज निद्रा न येचि निकी । हे आम्हां ओळखी पुरतसे ॥ २३ ॥ तेचि कैसी म्हणसी जरी । तरी तूं रुदसी व्यसनें भारी । त्याचें निमित्तही अंतरीं । आम्हां निर्द्धारीं जाणों ये ॥ २४ ॥ कीं दुरदृष्टें रात्रींच्या ठायीं । कीं दग्हीन झालीसि ये समयीं । यास्तव चुकोनियां दिग्वलयीं । वदसी कहीं प्राणनाथा ॥ २५ ॥ तया प्राणनाथाच्या वियोगें ॥ अत्यंत करुण विरहवेगें । येतुली विलपसी मनोभंगें । दैवमोघें कीं काय ॥ २६ ॥ ना तरी श्रीकृष्णदास्यप्राप्ता । आम्ही केवळ तद्वेधयुक्ता । त्या अच्युताची माला तत्वता । जे चरणीं प्रशस्ता रुळतसे ॥ २७ ॥ ते कबरें मस्तकीं वाहों । इच्छितसों करूनि लाहो । तूं ही आम्हांपरी कीं हो । इच्छिसी लाहो अंतरीं ॥२८॥ म्हणोनि ऐसिया दीन स्वरें । परम काकुलती आर्तिभरें । घडि घडी वर्डसी खिन्नान्तरें । विराहातुरे भो सखिये ॥ २९ ॥ चक्रवाकीसी इत्यादि वचनें । अनुवादती जंव आर्तमनें । तंव अकूपार उच्च स्वनें । गर्जता श्रवणें परिसिला ॥ २३० ॥

भो भोः सदा निष्टनसे उदन्वन्नलब्धनिद्रोऽधिगतप्रजागरः ।
किं वा मुकुन्दापहृतात्मलाञ्छन प्राप्तां दशां त्वं च गतो दुरत्ययाम् ॥ १७ ॥

मग त्या जलधीतें संपूर्ण । भो उदन्वन् ऐसें म्हणोन । संबोधूनि वनितागण । बोले वचन कौतुकें ॥३१॥ आदरें आम्रेडितें कृष्णदयिता । म्हणती अरे रे जलवंता । तुज निद्रा न लागेचि तत्वता । जाला सर्वथा प्रजागर ॥ ३२ ॥ ऐसा अलब्धनिद्र सशोक । अधिगतप्रजागर निष्टंक । निरंतर क्रोशसी निःशंक । कां तूं नावेक वद आम्हां ॥ ३३ ॥ बहुतेक चिंतातुर जे प्राणी । जयां स्वार्थहानीची आहळणी । तयांतें सुखसुषुप्ति सदनीं । नये दिनरजनी माजिवडी ॥ ३४ ॥ तरी काय आम्ही पावलों दशा । परम दुरत्यया जे सहसा । तेचि तूं ही गा जलाधीशा । पावलासि बहुशा वाटतसे ॥ ३५ ॥ कोण ते दशा कैसी म्हणसी । तरी ते ऐकें वर्तली जैसी । आमुच्या सौभाग्यलांछनासी । हरिलें मुकुंदें संभोगें ॥ ३६ ॥ आलिङ्गनें कुचकुंकुम । आरक्तरक्तिमा चुंबनें रम्य । सुखाश्रुमार्जनें अंजनोत्तम । कस्तूरी-चंदन करलालनें ॥ ३७ ॥ क्रीडाभिनिवेशें पुष्पजाळी । वसनें भूषणें अतितेजाळी । अस्तोव्यस्त संपूर्ण केलीं । एवं हरिलीं सुचिह्नें ॥ ३८ ॥ ऐशा इत्यादिलक्षणीं खिन्ना । जालों मुकुंदापहृतचिह्ना । तेंवि

कौस्तुभादि रत्ना । करूनि मथना अपहरिलें ॥ ३९ ॥ म्हणोनि मुकुंदापहृतलांछन । क्लेशायमान अतिनिर्विण्ण । अहो आक्रोशसी बा क्षीण । दिससी परिच्छिन्न आम्हांसी ॥ २४० ॥ ऐशा रससूनि जलधीप्रति । बोलती जैं कृष्णैकमति । तंव गगनीं देखोनि निशामति । संबोधिती तें परिसा ॥ ४१ ॥

त्व यक्ष्मणा बलवताऽसि गृहीत इन्दो क्षीणस्तमो न निजदीधितिभिः क्षिणोषि ।
कच्चिन्मुकुन्दगदितानि यथा वयं त्वं विस्मृत्य भोः स्थगितगीरुपलक्ष्यसे नः ॥ १८ ॥

भो इन्दो म्हणोनि आर्त्तवेगें । पुसती पाहूनि स्नेहापाङ्गें । तूं घेतलासि सबळरोगें । तव रूपावलोकें कळतसे ॥ ४२ ॥ पाण्डुरवर्ण जाली काया । माजि दिसतसे कृष्णच्छाया । शैत्यें धरिलें तवाङ्गठाया । दुःखें वायां वय जातें ॥ ४३ ॥ अतएव जाला आहेसी क्षीण । म्हणोनि मंदावली तव भा जाण । तरीच निजदीधितींहीं पूर्ण । तमनिरसन न करिसी ॥ ४४ ॥ किंवा क्वचित मुकुन्दाचीं । रहस्यें अनुभविलीं जीं साचीं । तीं तदेकचिन्तनें अवघींची । विसरूनि शुचि निजचित्तें ॥ ४५ ॥ आम्हां परि मंदवाक् केवळ । जालासि विशेषें सम विह्वळ । शब्द पांगुळला कीं प्राञ्जळ । प्राण मांदुळले आवघे ॥४६॥ म्हणसी विसराचा हेतु कोण । तरी प्रेष्ठगदितें समान बाण । अंतरीं रुततां परम तीक्ष्ण । जालों दीन मूर्च्छिता ॥ ४७ ॥ ऐसा हृद्रोगें परम क्षीण । आमुतें लक्षिजसी गा दीन । समव्यसनें आम्हां लागून । येतसे कारुण्य अंतरीं ॥ ४८ ॥

किं त्वाचरितमस्माभिर्मलयानिल तेऽप्रियम् । गोविन्दापाङ्गनिर्भिन्ने हृदीरयसि नः स्मरम् ॥ १९ ॥

सुरभियुक्त जे मलयभूमी । समीरण जो तत्पृष्ठगामी । मळयानिळ तो प्रसिद्ध नामीं । सुगंधें व्योमीं प्रवाहे ॥ ४९ ॥ तो सहज वाहतां अळुमाळ । आंगीं स्पर्शला सुगंधशीळ । त्या संबोधिती महिषी सकळ । भो मलयानिळ म्हणोनी ॥२५०॥ अगा ये मलयानिळा सुशीळा । तुझें अप्रियाचरण ये वेळा । काय आचरलों आम्ही अबळा । जेणें जालासि निर्घृण ॥ ५१ ॥ तुजकारणें विद्वेषकर । कैं वर्तलों सौजन्यहर । कीं आम्हांसि करिसी शरमार । दुःखित जिव्हार विन्धिसी ॥ ५२ ॥ जरी म्हणसी कवण्या योगें । तरी सविलास कृष्णापाङ्गें । हृदयें आमुचीं भोगानुरागें । भेदलीं संगें क्रीडतां ॥ ५३ ॥ तया निर्भिन्नहृदयामाजि । तूं निजाभिगमनें आजि । मार मारक प्रेरिसी सहजीं । विशेषें करिसी संक्लिष्ट ॥ ५४ ॥ तरी वृथापराधेंविण । विह्वळातें व्यथाजनन । स्मरक्षोभें करणें जाण । तुजलागून उचित नसे ॥ ५५ ॥ घायाळाचें क्षत टोचणें । सदोषा कुटीचें बोलणें । भयभीतातें भेडसावणें । कीं नागवणें अनुत्पन्ना ॥ ५६ ॥ दुःखियातें दुःख देणें । कीं मुमूर्षूतेंचि मारणें । शोकाकुळिता विष पाजणें । कीं बुडविणें बुडतया ॥ ५७ ॥ जेंवि हें अर्हे नव्हे अर्होत्तमा । यास्तव पुण्यशीळा सोरभ्यधामा । विकळा आम्हां वैकल्यगरिमा । तुज देणें बहुधा अनुचित ॥ ५८ ॥ अपकारियातें ही अनिष्ट । न करणें हें सच्छील श्रेष्ठ । अपकारिया अपकार दुष्ट । करणें प्रकट लौकिक हें ॥ ५९ ॥ अनुपकारिया

अपकार । करणें हा अधम प्रकार । परि सुशीळाहूनि निन्द्यतर । हें लक्षण दूर असावें ॥ २६० ॥ एवं अंतरींचेन औत्कंठ्यें । स्मरोद्रेकें वनिता ओंठें । मळयानिळा अन्योपदिष्टें । वेधोत्कृष्टें बोलियल्या ॥६१॥ तंव अकस्मात अवलोकितां । पयोधरीं पयोधर तत्वता । देखिला त्यातें जाहल्या वदत्या । आर्त्तभूता संबोधनें ॥ ६२ ॥

मेघ श्रीमंस्त्वमसि दयितो यादवेन्द्रस्य नूनं श्रीवत्साङ्कं वयमिव भवान्ध्यायति प्रेमबद्धः ।
अत्युत्कण्ठः शबलहृदयोऽस्मद्विधो बाष्पधारा स्मृत्वा स्मृत्वा विसृजसि मुहुर्दुःखदस्तत्प्रसङ्गः ॥ २० ॥

अगा ये मेघा श्रीमंता । हरिभक्तिरूपा श्रीतत्वता । तुज प्राप्त जाली ऐसें स्वता । कळलें चित्ता आमुचिया ॥ ६३ ॥ म्हणसी भक्ति असती नवविध । मज कोणती लाधली प्रसिद्ध । तरी आठवी सख्यनामका शुद्ध । तूं यथाविध पावलासी ॥६४॥ जरी पुससी तुम्हां कैसेन । कळलें यथार्थ हे संपूर्ण । तरी जाणों येतसे लक्षण । जेणें मित्रपण घडतसे ॥६५॥ समान गुण शीळ रूप ज्याचें । त्यासींच सख्य घडे साचें । तेथेंचि प्रीतीचे भोज नाचे । अतिशयें साचे प्रेमरसें ॥ ६६ ॥ सहजें श्रीकृष्ण श्यामवर्ण । तूंही स्वरूपें तैसाचि जाण । तापत्रयखिन्न प्राणिगण । होती शरण जे कोण्ही ॥ ६७ ॥ त्यांची अधमोत्तमकडसणी । न करूनियां चक्रपाणी । निवारी तापत्रय आहळणी । स्वसुखपूर्णीं विश्रामवी ॥६८॥ तेंवि ग्रीष्मातपनिदाघें । जीव श्रमती जे गृहवियोगें । त्यांसि निजच्छाया अमोघें । देसी आंगें महत्सुख ॥ ६९ ॥ वर्षूनियां करुणादृष्टि । जनाकारणें स्वानंदपुष्टि । श्रीकृष्ण देतसे करूनि तुष्टि । तेंवि तूंही सृष्टि प्रतिपाळिसी ॥ २७० ॥ परमसदयत्वें अंबुकण । वर्षूनि जलमय भू संपूर्ण । करूनि स्थिरचरप्राणिगण । तर्पिसी अन्योन्य उपयोगें ॥ ७१ ॥ इत्यादिलक्षणीं साम्यत्व । परस्परें तुमचें सर्व । तरी यादवेन्द्राचा सदैव । निश्चयें स्वयमेव तूं दयित ॥ ७२ ॥ यास्तव तूं तयासि ध्यासी । अंतरीं सप्रेमें चिन्तिसी । तव चिह्नांवरूनि आम्हांसी । कळे मानसीं स्वप्रत्ययें ॥ ७३ ॥ आम्ही तदेकचित्ता वनिता । प्रेमें विनटलों आर्तभूता । तैसाचि तूंही जलवंता । चिन्तिसी तत्वता सद्भावें ॥ ७४ ॥ तींचि ध्यानाचीं चिह्नें कैसीं । उमटलीं तवाङ्गीं निश्चयेंसीं । तुज कथितों स्वप्रत्ययेंसीं । लक्षिलीं जैसीं पृथक्त्वें ॥ ७५ ॥ अत्यंत जालासि उत्कंठित । हृदय दाटलें द्रवीभूत । अंतर कालवत उत्सुकित । मौनें आर्त रुदतोसी ॥७६॥ श्रीवत्सांका प्रति घडि घडी । आठवूं आठवूं आवडी । वियोगें आम्हां पडिपाडी । टाकिसी भूतटीं अश्रुधारा ॥ ७७ ॥ अहा हा येतुला तूं कष्टसी । कां सख्य केलें त्वां तेणेंसीं । कीं दुःखदायक निश्चयेंसीं । प्रसंगविशेषीं तयाचा ॥ ७८ ॥ जिहीं जिहीं सख्योत्कर्ष । केला तयासि विशेष । शेखीं ऐसाचि खेद त्यांस । होय उदास हरि होतां ॥ ७९ ॥ ऐसिया आपुलेनि अंतर्वेधें । बोलिल्या नारी श्रीकृष्णच्छंदें । जलदा प्रति सुसंवादें । तंव कोकिळशब्द परिसिला ॥ २८० ॥ तये कोकिळेतें सप्रेमवेगें । बोलत्या जाहल्या प्रेष्ठानुरागें । तें तूं ऐकें अवधानयोगें । श्रीशुक आंगें नृपा म्हणे ॥ ८१ ॥

प्रियरावपदानि भाषसेऽमृतसंजीविकयाऽनया गिरा । करवाणि किमद्य ते प्रियं वद मे वल्गितकंठ कोकिल ॥ २१ ॥

माधवी म्हणती भो कोकिल । प्रियतम वक्ता श्रीघननीळ । तयाचे मृदु मधुर अतिमंजुळ । शब्द केवळ रमणीय ॥ ८२ ॥ तया परी सुन्दर शब्द । बोलसी तूं परम विशद । मृताकारणें जीववी प्रसिद्ध । तैसिये वाणी करूनियां ॥ ८३ ॥ प्रेष्ठेङ्गितस्मरणबाणीं । हृदयें भेदिलीं तेणेंकरूनी । मूर्च्छिता समान वैकल्यभरणी । सर्वां करणीं आमुचिया ॥ ८४ ॥ ऐसिया विकळाङ्गा आमुतें । श्रीकृष्णसादृश्य-सुशब्दितें । सखिये जीवविलें तां निरुतें । जीवविजे अमृतें जेंवि मृता ॥ ८५ ॥ तरी ऐसा तुझा कृतोपकार । केंवि निस्तरूं हा समग्र । आम्हां न सुचे तो प्रकार । जेणें तवान्तर सुखावे ॥ ८६ ॥ यास्तव सांगें आपुल्या मुखें । आम्हां मानसें निःशंकें । तुझें आवडतें जें कां निकें । करावें सखे आजि काय ॥ ८७ ॥ कीं तुझा परम रमणीय कंठ । ऐकतां मन होय सोत्कंठ । वाटे वदतो कंबुकंठ । वियोगकष्ट परिहरवी ॥ ८८ ॥ इतुकें बोलतां कोकिळेप्रती । दृष्टि पडली पर्वता वरुती । मग तयासीच बोलिल्या सती । तें तूं सुमती अवधारीं ॥ ८९ ॥

न चलसि न वदस्युदारबुद्धे क्षितिधर चिन्तयसे महान्तमर्थम् ।
अपि बत वसुदेवनन्दनाङ्घ्रि वयमिवकामयसे स्तनैर्विधर्तुम् ॥ २२ ॥

भो भो क्षितिधरा उदारबुद्धी । अससी केवळ औदार्यनिधी । तृणकाष्ठवल्ली वृक्षाङ्गादि । न वंचिसी कधीं कवणासी ॥ २९० ॥ योगियां समान आसनबद्ध । मौनें सुस्थित तूं प्रसिद्ध । बैसला आहसी परम बुद्ध । न वदसी शब्द न चळसी ॥ ९१ ॥ अतएव दिससी साधनयुक्त । बहुतेक चिन्तिसी महान्त अर्थ । तरी काय आम्हां परी स्वस्थ । इच्छिसी निश्चित मानसीं ॥ ९२ ॥ म्हणसी तुम्ही इच्छितां काय । तरी वसुदेवनंदनाचे पाय । स्तनें करूनियां चित्सुखमय । हृदयीं सदैव धरूं इच्छूं ॥ ९३ ॥ तेंवि तूं ही स्तनप्राय शृंगीं । श्रीकृष्णचरण सप्रेम वेगीं । धरूं इच्छिसी आस्थाचांगीं । हें आम्हां लागीं कळतसे ॥ ९४ ॥ वरें जरी ऐसेंचि मनोगत । तुझें असेल कां संतत । तरी आमुची अवस्था प्राप्त । होईल निश्चित तुजलागीं ॥ ९५ ॥ एवं आर्त्तचित्तें वेधभरें । वदतां नगेसीं अत्यादरें । सरिता देखिल्या निजनेत्रें । त्यांतें स्ववक्त्रें बोलती ॥ ९६ ॥

शुष्यद्ध्रदाः करशिता बत सिन्धुपत्न्यः सम्प्रत्यपास्तकमलश्रिय इष्टभर्तुः ।
यद्वद्वयं मधुपतेः प्रणयावलोकमप्राप्य मुष्टहृदयाः पुरुकर्शिताः स्म ॥ २३ ॥

भो सिन्धुपत्नी सरिता हो । सांप्रत ग्रीष्मीं तुमचा नाहो । मेघद्वारा अमृतवाहो । करूनि तुम्हां वो ना नंदवी ॥ ९७ ॥ तेणें कष्टता तुम्ही फार । आटून गेले ह्रद समग्र । म्हणोनि झालां सूक्ष्मगात्र । गति जवित्र कुण्ठली ॥ ९८ ॥ उत्फुल्ल कमलशोभा अवघी । आंगिक गेली पौष्टिक संगीं । दीनता बाणली सर्वांगीं । बह्वतरंगीं संताप ॥ ९९ ॥ जेंवि इष्टभर्त्ता जो आमुचा । श्रीकृष्ण मधुपति साचा । प्रणयावलोक पैं तयाचा । अतिसुखाचा नपवूनी ॥ ३०० ॥ आम्ही जालों संक्लिष्टमना । हृदयें दाटलीं विलापें

नाना । दिसतों केवळ आर्त्ता दीना । कृशिता विवर्णा वियोगें ॥ १ ॥ तोंवि स्वभर्तृकृपाऽलाभें । ऐशा जाल्यात विरहक्षोभें । पुन्हा दैवें तदिष्टलाभें । सुखस्वयंभें तोषिलां ॥ २ ॥ यावीण आणिक उपाय । सहसा नाहींच हा निश्चय । आम्ही झुरतसों पद्मिनीप्राय । कृष्णचित्सूर्यप्रभेवीण ॥ ३ ॥ जैं आमुची दुरदृष्टरजनी । समाप्ति पावेल जीवघेणी । तैं सुखोदयें श्रीकृष्णतरणी । ईक्षणकिरणीं जीववील ॥ ४ ॥ इत्यादि शब्दीं सरितांप्रती । बोलिल्या वेधें जंव त्या सती । तंव अकस्मात दैवें निगुती । आला दैवगती मराळ ॥ ५ ॥ त्यातें कल्पूनि श्रीकृष्णदूत । वितर्कें बोलिल्या विनोदयुक्त । तूं परिसें दत्तचित्त । कुरुकुळमानसमराळा ॥ ६ ॥

हंस स्वागतमास्यतां पिब पयो ब्रूह्यङ्गशौरेः कथां दूतं त्वां नु विदाम कच्चिदजितः स्वस्त्यास्त उक्तं पुरा ।
किं वा नश्चलसौहृदः स्मरति तं कस्माद्भजामो वयं क्षौद्रालापय कामदं श्रियमृते सैवैकनिष्ठा स्त्रियाम् ॥२४॥

कोमळामंत्रणें अगा ये हंसा । मच्चित्तार्तिकल्मषध्वंसा । नागर गतिमंता खगाधीशा । सुशब्दीं ऐशा संबोधूनी ॥ ७ ॥ बरव्या प्रकारें सुखरूप । म्हणती आलासि कां निष्कंप । स्थिरता पावे सम पादप । मंदसंकल्प करूनियां ॥ ८ ॥ निश्चळ बरव्या बैसें सुविश्रान्त । पय प्राशी यावत्तृप्त । कांहीं सांगें गुज निश्चित । केवळ हृद्गत शौरीचें ॥ ९ ॥ जरी मी म्हणसी रानींचा पक्षी । अटवी अटूनि स्वभक्ष्य भक्षीं । मज काय कळे तो विश्वसाक्षी । केवळ दक्षीं स्वीकेला ॥ ३१० ॥ तरी न प्रतारीं येणें आमुतें । निश्चयें जाणतों आम्ही तूतें । कीं दूत आहेसि मनःसंमतें । साधक सर्वार्थें कृष्णाचा ॥ ११ ॥ यास्तव मोकळ्या अंतःकरणें । सांगें आमुतें कोमळवचनें । कच्चित स्वस्थ असे कीं मुदितपणें । स्वसौख्यगुणें श्रीअजित ॥ १२ ॥ रमणीयरःमालावण्यगुणीं । भुलोनि ब्रह्मादि सुरश्रेणी । च्यवल्या केवल मन्मथमथनीं । जय न कोण्ही साधियला ॥ १३ ॥ म्हणोनि काममसमरीं अच्युत । कमनीयवधूकदंबीं स्वस्थ । वशीकृतरमणी मन्मथतात । शोभे अजित नाम जया ॥ १४ ॥ तयाच्या कांहीं गोष्टी मधुरा । सांगें तत्संप्राप्ता चतुरा । त्यांविण जालों केवळ आतुरा । जीववीं सुखकरा वाक्यामृतें ॥ १५ ॥ पूर्वीं एकान्तीं मनोहर । आमुसीं बोलिला स्नेहप्रचुर । तें कांहीं स्मरतो देवकीकुमर । चपलान्तर चपलसौहृदा ॥ १६ ॥ त्याचिया सुहृदत्वाचा नेम । एकरूप नाहींच सप्रेम । एकां सगुणीं वेधूनि रम्य । वेधी सकाम आणिकांसी ॥ १७ ॥ नूतनासी लालसवृत्ति । करी विशेषें एकान्तप्रीति । पूर्विल्या उपेक्षी मधुपति । हे सहजस्थिति ययाची ॥ १८ ॥ यास्तव विसरला पूर्व स्नेह । हें तंव वाटे निःसंदेह । तथापि दैवें किंचित आठव । त्या असेल पूर्व तरी सांगें ॥ १९ ॥ ना जरी म्हणसी मज कारणें । स्मरूनि पाठविलें आतां तेणें । तरी ये विषीं ऐकें श्रवणें । क्षुद्रदूता क्षुद्राच्या ॥ ३२० ॥ सत्य नाहीं ज्याचें वचन । आणि एकरूप नित्याचरण । करी अंगीकृताचें उपेक्षण । विश्वासून मग वंची ॥ २१ ॥ तयाशीच म्हणावें क्षुद्र । ऐसियाचा तूं संदेशहर । जरी पाठविलें येथवर । तऱ्ही आम्ही किमर्थ तया भजूं ॥२२॥ कामार्थी तो आपुल्या कामा । बोलावीत असेल आम्हां । पुन्हा पावावया विरामा । आम्ही कामा

येथ यावें ॥ २३ ॥ यावरी वितर्कें मागुतीं अवळा । मानिती स्वमनीं अवलीळा । हेचि आज्ञा मानूनि वहिला । कीजे गेला तरी काय ॥ २४ ॥ मायिक रुसण्याचें अवतरण । दावूनि पुन्हा मनोधारण । कारक बोलती स्निग्धवचन । तें हें संपूर्ण अवधारा ॥ २५ ॥ म्हणसी जरी श्रीकृष्णस्नेह । आहे आम्हांवरी तापापह । तरी त्या आणीं सुखावह । निःसंदेह तूं येथें ॥ २६ ॥ तंव कृष्णाकडे चालिल्यावरी । भावूनि हंसातें म्हणती नारी । तया रतिप्रदातें आणीं झडकरी । परि विकल्प माझारी एक असे ॥ २७ ॥ जें आम्हां सर्वांतें वंचून । एकले प्रियेसीं रमे जाण । तये श्रीवेगळे असपत्न । त्यासीच आण एकले ॥ २८ ॥ जरी म्हणसी ते तदेकनिष्ठा । परमप्रियतमा जिवलगा इष्टा । कें त्यागूं शकेल तीतें कुरठा । जे अति लागटा रंगली ॥ २९ ॥ तरी काय आम्हां स्त्रियांमाजि । तेचि एकनिष्ठा असे सहजीं । त्यागिली आम्हीं भोगराजी । सप्रेमकाजीं त्याविण ॥ ३३० ॥ कीं हा वृथाचि आमुचा प्रेमा । तेचि एक येईल कामा । दृतमिसें ऐसिया रामा । वदल्या विरामा हंसातें ॥ ३१ ॥ अथवा पाठान्तरें द्वितीयार्थ । तोही परिसा जो मूळोक्त । मायिक रोषावेषें तदुचित । बोलती समस्त कृष्णाङ्गना ॥ ३२ ॥ क्षौद्र म्हणिजे मधुर मधु । तद्वद्गोष्टी बोले साधु । स्वार्थमाधक केवळ भोंदु । अरतिप्रद साध्वीतें ॥ ३३ ॥ जे लाघवी वेधी गुणाभिचारें । तये श्रीवांचूनि चिन्तातुरें । आम्ही कासया कामानुकारें । भजूं अंतरें लागटें ॥ ३४ ॥ कीं ते अनादरिली उपेक्षिली । तथापि मागुती झडा घाली । निर्लज्जपणें लागट झाली । ही रहाट भली तिज योग्य ॥ ३५ ॥ आम्हांसारिख्या ज्या मानिनी । सम्मानप्राप्ता स्वसद्गुणीं । एकनिष्ठा सुशीळपणीं । सम्मानरक्षणीं समर्यादं ॥ ३६ ॥ यास्तव अनादता असतां पुरती । तेचि भजो कां पुढती पुढती । कृत्रिमवाद आम्हांप्रती । साधकवृत्ती न करीं रे ॥ ३७ ॥

इतीदृशेन भावेन कृष्णे योगेश्वरेश्वरे । क्रियमाणेन माधव्यो लेभिरे परमां गतिम् ॥ २५ ॥

या प्रकारें ऐशिया भावें । जो योगेश्वरेश्वर प्रभावें । तया श्रीकृष्णीं महद्दैवें । क्रियमाणविभवें माधवी ॥ ३८ ॥ मधुवंशोद्भव माधव । तत्पत्नींचें माधवी नांव । तन्मयाचरणें त्या वास्तव । परमगतीतें लाभल्या ॥ ३९ ॥ परमगति म्हणिजे कृष्णसायुज्य । सप्रेमवेधें आम्नायपुञ्ज । समुद्रीं सरितान्यायें निज । चित्सुखपुञ्ज पावल्या ॥ ३४० ॥ तरी तयांचें ऐसें प्रेम । श्रीकृष्णाचे ठायीं परम । हें आश्चर्य नव्हे भो नृपोत्तम । जेणें निजधामा पावल्या ॥ ४१ ॥

श्रुतमात्रोऽपि यः स्त्रीणां प्रसह्याऽऽकर्षते मनः । उरुगायोरुगीतो वा पश्यन्तीनां कुतः पुनः ॥ २६ ॥

जो ब्रह्मरसाचा अमूर्तमूर्त । त्रैलोक्यसौन्दर्याश्रय निश्चित । कारण वरवेषणाचें व्यक्त । जेथ ब्रह्मादि नित्य वेधले ॥ ४२ ॥ तो बहुधा गीतीं बहु गायिला । निगमागमीं वाखाणिला । शेषादिसुरमुनींहीं वर्णिला । अपरिमित लीला जयाची ॥ ४३ ॥ ज्याचें रूप लावण्य गुण । ठाणठकार नव

तारुण्य । कमनीय अवयव संपूर्ण । लीलाचरण उद्दाम ॥ ४४ ॥ ऐकूनि वेधती केवळ वामा । विरसता तोक्मा रुक्मा धामा । इच्छित सेविजे मेघश्यामा । अन्यत्र कामा विसर्जुनी ॥ ४५ ॥ ऐसा श्रुतमात्र बळात्कारें । कर्षी स्त्रियांचें मन निर्धारें । मा प्रत्यक्ष पाहिला अक्षगोचरें । जिहीं सादरें सहवासें ॥४६॥ तया पाहतयांचें मन न वेधी । ऐसें कोटूनि घडेल कधीं । येथ विस्मय न करीं श्रवणनिधी । कृष्ण त्रिशुद्धी परमात्मा ॥ ४७ ॥

याः सम्पर्यचरन्प्रेम्णा पादसंवाहनादिभिः । जगद्गुरुं भर्तृबुद्धचा तासां कि वर्ण्यते तपः ॥ २७ ॥

ज्या प्रेमें करूनि स्निग्धान्तरें । भर्तृबुद्धीनें श्रद्धाभरें । जगद्गुरूतें अत्यादरें । सेवानुकारें भजिन्नल्या ॥ ४८ ॥ पादसंवाहन प्रक्षाळण । अंगविश्रम ताम्बूलदान । पान भोजन संक्रीडन । भोगार्पण यथोचित ॥ ४९ ॥ इत्यादि परिचर्येनें सकळ । परिचरल्या सर्व ही काळें । तयांचें काय तप निर्मळ । वर्णिजे प्राज्ञळ कोठवरी ॥३५०॥ जो ब्रह्मादिकां अतिदुर्लभ । योगी सकृद्दर्शनलाभ । इच्छिती करूनि तपारंभ । तो यां सुलभ निरंतर ॥ ५१ ॥ तस्मात यांचा सुकृतमहिमा । न वर्णवे सहसा आम्हां । ऐसियां सह वेदोक्तधर्मा । कृष्णपरमात्मा आचरला ॥ ५२ ॥

एवं वेदोदितं धर्ममनुतिष्ठन्सतां गतिः । गृहं धर्मार्थकामानां मुहुश्चादर्शयत्पदम् ॥ २८ ॥

एवं म्हणिजे पूर्वोक्त । यथार्थ केवळ वेदोदित । निजधर्मातें अनुष्ठित । असतां संतत श्रीपति ॥५३॥ धर्म अर्थ आणि काम । प्राप्तिस्थान यांचें सुगम । गृहचि केवळ अत्युत्तम । निगमागमसंमत ॥ ५४ ॥ गृहस्थाश्रमी जो केवळ । त्यासीच साध्य पुरुषार्थमेळ । हें दर्शविता जाला गोपाळ । घडिघडी प्राज्ञळ आचरूनी ॥ ५५ ॥ परमार्थासि अवरोधक । दुर्द्धर कामचि निष्टंक । ज्यास्तव भ्रष्टती निःसंग लोक । होती सकळंक अनुचितें ॥ ५६ ॥ तोचि काम यथाविधि । केवळ धर्मासी अविरोधी । वासनाक्षयें सत्वशुद्धि । करी अभिवृद्धि परमार्था ॥ ५७ ॥ गृहस्थाश्रमीं यथाशास्त्र । वर्ततां पुरे काम समग्र । परिपक्व होय चित्त पवित्र । तेंचि पात्र चित्सुखा ॥ ५८ ॥ येणेंचि सन्मार्ग सुसंतीं । पाविजतसे शुभ सद्गती । ऐसें बोधी भैमीपती । गृहाचरितीं वर्तूनी ॥ ५९ ॥ स्वयें असतां ब्रह्म पूर्ण । तन्निष्ठांचें प्राप्तिस्थान । करावया सृष्टिरक्षण । धर्म पावन आचरला ॥ ३६० ॥

आस्थितस्य परं धर्म कृष्णस्य गृहमेधिनाम् । आसन्षोडशसाहस्रं महिष्यश्च शताधिकम् ॥ २९ ॥

एवं गृहमेधियांचा उत्कृष्ट धर्म । त्याप्रति राहिला पुरुषोत्तम । तया श्रीकृष्णाच्या लावण्यधाम । महिषीललाम पवित्रा ॥६१॥ अष्टोत्तरशताधिक । षोडशसहस्रसंख्याक । त्या महिषींचें गणित सम्यक । निश्चयात्मक नृपाळा ॥ ६२ ॥

तासां स्त्रीरत्नभूतानामष्टौ याः प्रागुदाहृताः । रुक्मिणीप्रमुखा राजंस्तत्पुत्राश्चानुपूर्वशः ॥ ३० ॥

तया स्त्रीललमां भीतरी । अष्टनायिका ज्या सुन्दरी । रुक्मिणीप्रमुखा प्रियकरी । पूर्वी स्ववैखरी तुज कथिल्या ॥ ६३ ॥ आणि अनुपूर्वशा तयांचे पुत्र । यथाक्रमें तुजला समग्र । सनाम कथिले ते विचित्र । सविस्तर नराधीश ॥ ६४ ॥

एकैकस्यां दश दश कृष्णोऽजीजनदात्मजान् । यावन्त्य आत्मनो भार्या अमोघ गतिरीश्वरः ॥३१॥

एकैके स्त्रियेचे ठायीं । दश दश पुत्रांतें शेषशायी । जनिता जाला हे नवायी । न्यूनाधिक कहीं न स्रवला ॥ ६५ ॥ जितुक्या स्वस्त्रिया सर्वही । तितुक्या समपुत्रवती पाहीं । केल्या श्रीकृष्णें ज्या कांहीं । विकल्प नाहीं सापत्न ॥ ६६ ॥ कीं अमोघ रति जयाची पूर्ण । तो प्रत्यक्ष ईश्वर श्रीकृष्ण । सत्यसंकल्पी सनातन । स्वेच्छावतरणसंकर्त्ता ॥ ६७ ॥ असो आतां ते समग्र पुत्र । महाप्रतापी परम पवित्र । ज्यांचा उद्दाम पराक्रम तीव्र । धीर उदार सुशीळ जे ॥ ६८ ॥ एक लक्ष एकषष्टिसहस्र । त्यावरी अधिक अशीतिमात्र । इतुके हो गणनासूत्र । गणितां अवग्र कार्ष्णि हें ॥ ६९ ॥

तेषामुद्दामवीर्याणामष्टादश महारथाः । आसन्नुदारयशसस्तेषां नामानि मे शृणु ॥ ३२ ॥

तयां उद्दामवीर्यामाजी । अष्टादशतनुजराजी । महारथी ऐसी वाजी । शौर्यकाजीं अतिदक्ष ॥३७०॥ जे उदार यशस्वी समरमेश । अतिप्रतापी जेंवि चंडांश । तयांचे पृथकनामनिर्देश । ऐक अशेष मजहून ॥ ७१ ॥

प्रद्युम्नश्चानिरुद्धश्च दीप्तिमान्भानुरेव च । साम्बो मधुर्बृहद्भानुश्चित्रभानुर्वृकोऽरुणः ॥ ३३ ॥
पुष्करो वेदबाहुश्च श्रुतदेवः सुनन्दनः । चित्रबाहुर्विरूपश्च कविर्न्यग्रोध एव च ॥ ३४ ॥

प्रद्युम्न आणि अनिरुद्ध । दीप्तिमान भानु प्रसिद्ध । बृहद्भानु साम्ब मधु । चित्रभानु वृक अरुण ॥ ७२ ॥ पुष्कर वेदबाहु श्रुतदेव । सुनंदन चित्रबाहु सुदैव । विरूप कवि न्यग्रोध । नांव जाण अपूर्व शेवटील ॥ ७३ ॥ एवं नामीं हे अठरा जण । येथ अनिरुद्ध कथिला जाण । तो कृष्णपौत्र हें श्रुतमान । पिता प्रद्युम्न जयाचा ॥ ७४ ॥ तरी सुत सप्तदश गणावे । यांसि शौर्यें तत्तुल्य जाणावें । कीं अनेकतनयीं याही नांवें । असेल कोण्ही पुत्रांचीं ॥ ७५ ॥

एतेषामपि राजेन्द्र तनुजानां मधुद्विषः । प्रद्युम्न आसीत्प्रथमः पितृवद्रुक्मिणीसुतः ॥ ३५ ॥

ऐसे अष्टादश हे महारथी । मधुद्विषाचे पुत्र सुमती । इतुकियांही सकळ सुतीं । प्रथम निश्चिती प्रद्युम्न ॥ ७६ ॥ जो देवी रुक्मिणीचा नंदन । पित्यासारिखाचि दृश्यमान । रूपें वीर्यें गुणें समान ।

प्रतिमा आन प्रभूची ॥ ७७ ॥ आतां ययाचा संक्षेपें वंश । ऐकें प्रसंगें भो नरेश । ज्याचिया स्मरणें अघभ्रंश । होय निःशेष क्षणमात्रें ॥ ७८ ॥

स रुक्मिणो दुहितरमुपयेमे महारथः । तस्मात्सुतोऽनिरुद्धोऽभून्नागायुतबलान्वितः ॥ ३६ ॥

तरी तो प्रद्युम्न महारथी । रुक्मिममातुळात्मजा सती । नामें पवित्रा रुक्मवती । जाला सुमती विवाहिता ॥ ७९ ॥ हें तंव कथानक सविस्तर । पूर्वीं च कथिलेंसे समग्र । असो तियेपासूनि कुमर । जाला सुन्दर अनिरुद्ध ॥ ३८० ॥ अयुतहस्तींचें तयासि बळ । शस्त्रास्त्रविद्येमाजि कुशल । यशस्वी प्रतापी प्राज्ञळ । परम सुशीळ अतिदक्ष ॥ ८१ ॥

स चापि रुक्मिणः पौत्रीं दौहित्रो जगृहे ततः । वज्रस्तस्याभवद्यस्तु मौसलादवशेषितः ॥ ३७ ॥

तो ही रुक्मियाची नात । दौहित्र तयाचा यथार्थ । रोचनानामका गुणवंत । जाला गृहीता तत्पाणि ॥ ८२ ॥ त्यानंतरें त्या अनिरुद्धास । पुत्र जाला त्या वज्रनिर्देश । जो मुसळप्रळय ऋषि-शापरोष । त्याहून अवशेष वांचला ॥ ८३ ॥

प्रतिबाहुरभूत्तस्मात्सुबाहुस्तस्य चात्मजः । सुबाहोः शान्तसेनोऽभूच्छतसेनस्तु तत्सुतः ॥ ३८ ॥

त्यापासूनि जाला प्रतिबाहु । तयाचा आत्मज सुबाहु । सुबाहूचा गुणवंत बहु । पुत्र सदैव शान्तसेन ॥ ८४ ॥ तयाचा तनय शतसेन । त्याहूनि पुढें वर्धमान । वंशपरंपरा संपूर्ण । कथावी गहन कोठवरी ॥ ८५ ॥ भगवत्प्रसादगुणें । महिमा ऊर्जित विख्यातपणें । यदुकुळाच्या शुभलक्षणें । उपमा देणें घडेना ॥ ८६ ॥

न ह्येतस्मिन्कुलेजाता अधना अबहुप्रजाः । अल्पायुषोऽल्पवीर्याश्च अब्रह्मण्याश्च जज्ञिरे ॥ ३९ ॥

या कुळीं दैवें जे जे जाले । असंपन्न सहसा नायकिले । सकळसंपत्तींहीं भरले । पुण्याथिले सज्ञान ॥ ८७ ॥ निर्द्धन किंवा अल्पप्रज । अल्पायुषाल्पवीर्य सहज । अब्रह्मण्य अल्पतेज । ऐसे कोण्हीच न जन्मले ॥ ८८ ॥ अवघेच यथेष्ट धनवंत । तैसेचि विपुळ संतानयुक्त । स्वधर्मतेजें सम भास्वत । ब्राह्मणभक्त ब्रह्मिष्ट ॥ ८९ ॥ वेदोक्तधर्माचरणनिरत । शमसंपन्न इन्द्रियजित । सत्यभाषणी सत्यव्रत । कीर्तिमंत जगत्त्रयीं ॥ ३९० ॥ जरी पुससी ऐसें विचक्षणा । संख्या किती यादवगणा । तरी विदित नसेच हें कोणा । विस्तारपणा बाहुल्यें ॥ ९१ ॥

यदुवंशप्रसूतानां पुंसां विख्यातकर्मणाम् । सङ्ख्या न शक्यते कर्तुमपि वर्षायुतैर्नृप ॥ ४० ॥

अत्यंत बुद्धिकुशळ ज्ञाता । पुरुषां यदुवंशप्रसूतां । बहुविख्यात कर्मवंतां । निरंतर गणितां शतवर्षें ॥९२॥

तथापि तिहीं करूनियां। संख्या करूं न शके राया। हे गोष्टी यावया प्रत्यया। ऐक आपैसया कांहींसे ॥ ९३ ॥

तिस्रः कोट्यः सहस्राणामष्टाशीतिशतानि च। आसन्यदुकुलाचार्याः कुमाराणामिति श्रुतम् ॥ ४१ ॥

सहस्रें सहस्र यदुकुमार। तयांचे आचार्य पढविणार। यदुकुळीं होते विद्यापात्र। गणना विचित्र तयांची ॥ ९४ ॥ तीन कोटि अठ्यायशीं शतें। पृथक् पृथक् इतुकें होते। हें परिसिलें परि निश्चयातें। आम्हां निरुतें करवेना ॥ ९५ ॥ एकैका गुरूजवळ। पुढें अनेक अर्भकमेळ। तयांची व्यवस्था सकळ। कैंवि प्राज्ञळ घडेल ॥ ९६ ॥

सङ्ख्यानं यादवानां कः करिष्यति महात्मनाम्। यत्रायुतानामयुतलक्षेणास्ते स आहुकः ॥ ४२ ॥

पृथक बहुतांचे पढविणारे। ते आचार्यसंख्या निर्द्धारें। जेव्हां इतुकी गणनाद्वारें। ते ही परस्परें श्रुतमात्र ॥ ९७ ॥ परंतु सम्यक जाणिजेत नाहीं। तेव्हां कुमारांची संख्या पाहीं। कैसी करणें घडेल कहीं। गोष्टी हेही विचारीं ॥ ९८ ॥ मां वडिल यादवांची संख्या। कवण करील तें श्रोतृमुख्या। अपरिमितचि ऐसी आख्या। पुराणलेख्या माजिवडी ॥ ९९ ॥ जेथ अयुताचे अयुत लक्ष। इतुका यदुसमुदाय दक्ष। तेणें करूनियां प्रत्यक्ष। राहिला तो ईश आहुक ॥ ४०० ॥ अयुत म्हणिजे सहस्र दश। दशसहस्रें अयुत लक्ष। गणितां गणना होय विशेष। जेथ मनाचें लक्ष पांगुळे ॥ १ ॥ जरी म्हणसी कीं हे येतुले। एकत्र कोठोनियां जन्मले। तरी येविषयीं पुरा वर्त्तलें। तुजला वहिलें कथितों मी ॥ २ ॥

देवासुराहवहता दैतेया ये सुदारुणाः। ते चोत्पन्ना मनुष्येषु प्रजा दृप्ता बबाधिरे ॥ ४३ ॥

पूर्वीं सुरासुरांचें युद्ध। जालें अत्यंत घोर प्रसिद्ध। तेथें मृत्यु पावले जे विरुद्ध। दैत्य विविध बहु दारुण ॥ ३ ॥ तेचि मनुष्यांच्या ठायीं। पुन्हा जन्मले दुःखदायी। पढिले निर्ज्जरांचिये ठायीं। निर्मूळ सर्वही करावया ॥ ४ ॥ मूळ देवांचे साङ्ग यज्ञ। यज्ञकारक मर्त्यसुज्ञ। ते स्वधर्मीं असतां निमग्न। इहामुत्रिका सुरवाड ॥ ५ ॥ यास्तव धर्माचा उच्छेद। करावया प्रवर्तले विशद। पीडूं लागले प्रजावृंद। दृप्त अबुद्ध दुरात्मे ॥ ६ ॥

तन्निग्रहाय हरिणा प्रोक्ता देवा यदोः कुले। अवतीर्णाः कुलशतं तेषामेकाधिपं नृप ॥ ४४ ॥

तयांच्या निग्रहाकारणें। देवां आज्ञापिलें हरीनें। ते अवतरले मानवपणें। यदुकुळीं जाणें सहस्रशः ॥ ७ ॥ ज्यांचे एकाधिप कुलशत। म्हणिजे अनेक कुळें जीं विस्तृत। तयांचा एकचि राजा समर्थ। कीं मिथैकचित्त नरेश ॥ ८ ॥

तेषां प्रमाणं भगवान्प्रभुत्वेनाभवद्धरिः। ये चानुवर्त्तिनस्तस्य ववृधुः सर्वयादवाः ॥ ४५ ॥

तयांसि प्रभुत्वें एक प्रमाण। षड्गुणैश्वर्यसंपन्न। श्रीकृष्ण देवकीनंदन। जाला परिपूर्ण सामर्थ्यें ॥ ९ ॥ तेणें त्रैलोक्यीं निर्भय। अखिलोर्जित आनंदमय। सुरवाडले यादवनिचय। पूर्णाशयें धार्मिष्ठ ॥ ४१० ॥ आणि जे अनुवर्ती हरीचे। वर्तती सहवासें कां साचे। प्रेमानंदें चित्त नाचे। सदा जयांचें सद्भावें ॥ ११ ॥ ते सर्वही यादव सुखें। वाढले विशिष्टदैवोल्लेखें। उल्लंघिलें मर्यादारेखे। पूर्णविवेकें संपन्न ॥ १२ ॥ यादवांच्या बहुकुळश्रेणी। त्यांमाजि वृष्णिकुळीं चक्रपाणी। स्वयें अवतरला कल्याणखाणी। म्हणोनि वृष्णि अतिनिकट ॥ १३ ॥ काय वर्णूं तयांचा महिमा। जे स्थिति दुर्लभ मुनिनिष्कामां। योगियां प्राप्तां अभ्याससीमा। ते यां उत्तमा सहजगती ॥ १४ ॥

शय्यासनाटनालापक्रीडास्नानाशनादिषु। न विदुः सन्तमात्मानं वृष्णयः कृष्णचेतसः ॥ ४६ ॥

निरंतर हरिसंगें वर्त्ततां। वृष्णि पावले तन्मयता। नेणवे आपणातें तत्त्वता। जाहला चित्ता हरिवेध ॥ १५ ॥ निद्रा करितां शय्येवरी। आसनीं बैसतां निर्द्वारीं। निजलों बैसलों हे स्फूर्ति पुरी। स्पर्शकुसरी विसरले ॥ १६ ॥ त्वगिन्द्रियीं मनोवृत्ति। स्पर्शविषयातें जाणती। ते वृत्ति जाली कृष्णाकृति। ध्यातां पुरती तन्मय ॥ १७ ॥ तैसेंचि फिरणें बोलणें। क्रीडास्थानीं क्रीडा करणें। पान भोजन घेणें देणें। भोग भोगणें नानाविध ॥ १८ ॥ इत्यादि कर्माचिये ठायीं। आपण सर्वदा असतां ही। परि आहों ऐसें सुनिश्चयीं। जाले पाहीं न जाणते ॥ १९ ॥ बोलत असतां मी बोलतों। पहुडलों बैसलों जेवितों। फिरतों क्रीडतों घेतों देतों। विसरले चित्तोपरमें हें ॥ ४२० ॥ कीं कृष्णरूप जयांचीं चित्तें। जालीं केवळ प्रेमोच्छ्रितें। अभेद पावले तन्मयत्वातें। गौणश्रमातें मूकले ॥ २१ ॥ जैसें जल स्पर्शलें लवण। तें स्वकारणीं होय लीन। तेंवि चित्ता फावल्या आत्मा पूर्ण। घडे उपादान अविकारें ॥२२॥ मग ते योगी अपरोक्षबोधें। सबाह्य भरती ब्रह्मानंदें। तेचि ब्रह्मलीला विनोदें। स्वभक्तछंदें साकार ॥२३॥ तये कृष्णरूपीं स्वकारणीं। वृष्णिगणाची चित्तश्रेणी। तैसी मिळाली अभेदपणीं। नाठवे करणी मायिक ॥ २४ ॥ उगमीं स्थिरावला जो झरा। तो कैं भरितसे केदारा। तेंवि बुद्धि जाली जे कृष्णपरा। श्रवणादिद्वारा न ये ते ॥ २५ ॥ एवं वृष्णिगणाची स्थिति। जाली कृष्णमयची पुरती। येथ हेतु हाचि गा परीक्षिती। उघड निश्चिती जाणवे ॥ २६ ॥ अलौकिक कृष्णाचें रूप संपन्न। अलौकिक कृष्णाचे सर्व गुण। अलौकिक कृष्णाचें आचरण। स्वकीयरंजन अलौकिक ॥ २७ ॥ अलौकिक कृष्णाचें बोलणें। अलौकिक कृष्णाचें चालणें। अलोकिक कृष्णाचें हांसणें। क्रिया करणें अलौकिक ॥ २८ ॥ अलौकिक कृष्णाचें पाहणें। अलौकिक कृष्णाचें विहरणें। अलौकिक कृष्णाचें क्रीडणें। लीला प्रकटणें अलौकिक ॥ २९ ॥ तेणें यादव जाले विदेहस्थित। कीं सहचरत्वें होते नित्य। यांचा नवलाव न वाटे सत्य। श्रवणें तद्वत जन जाले ॥ ४३० ॥ अद्यापिहि त्रिविध जन। गुणानुवादश्रवणें पूर्ण। वेधूनि होती आनंदघन। ऐसें महिमान अभिनव ॥ ३१ ॥ बद्ध विचित्राचरितानुभवें। मुमुक्षु भवन्नप्रत्ययभावें।

मुक्त ब्राह्मीलीलानुभवें । वेधती जीवें सकळिक ॥ ३२ ॥ अधिकारी कां अनधिकारी । नाहीं कडसणी कृष्णचरित्रीं । अवचटें येतां वदनीं श्रोत्रीं । कैवल्यनगरीं प्रवेशे ॥ ३३ ॥ काय सांगूं बहु नृपाळा । श्रीकृष्णाची अनुपम लीळा । उत्तमोत्तम अवघ्या कळा । वेधजिव्हाळा सर्वांचा ॥ ३४ ॥ अद्भुत स्वरूप सौन्दर्यता । अद्भुत लीलानाटकता । अद्भुत नामसंकीर्तनता । जनपावनता अद्भुत ॥ ३५ ॥ सर्वप्रकारें हें सर्वही । श्रीकृष्णाचें अद्भुत पाहीं । या सम अन्य चरित्र नाहीं । देती ग्वाही श्रुति स्मृति ॥३६॥ कृष्णावतारीं अपूर्ण काम । कृष्णीं राहिला अधमोत्तम । हें नायिकिलें कर्णीं विषम । प्राप्त सुखदाम सकळांसी ॥३७॥ तीर्थ म्हणिजे प्राप्तिस्थान । पाप क्षाळूनि देतसे पुण्य । तें एकदेशीं काळाधीन । अल्प महिमान तयाचें ॥३८॥ कृष्णकीर्ति भलते ठायीं । भलकेव्हांही भलतेणेंही । आठविती भलतीसीही । पावे अक्षयी निजधाम ॥ ३९ ॥ व्यभिचार किंवा चौर्यकर्म । बालक्रीडा ते गोपोपम । गोपिकांसीं स्त्रैणासम । क्रीडला उद्दाम तच्छंदें ॥ ४४० ॥ दुष्टदैतेयनिबर्हण । शिष्टकौन्तेयपरिवर्धन । इष्टभजनीय प्रतिपालन । कष्टवारण आर्त्तांचें ॥ ४१ ॥ किंवा उद्वाह कथानक । आश्रमाचरण निष्टंक । कीं अभिवृद्धि अन्वयात्मक । अथवा सम्यक अवघी ही ॥ ४२ ॥ कोण्ही तऱ्ही कोण्ही गावो । सहज अथवा धरूनि भावो । परंतु पावे मोक्षठावो । संसारभेवो विनाशी ॥ ४३ ॥ ऐसा सर्वोत्कर्ष इतरांचा । देवां अथवा अवतारांचा । नाहींच निश्चय साचा । प्रत्यय आमुचा बलिष्ठ ॥ ४४ ॥ तस्मात् श्रीकृष्णकीर्तीहून । उत्तम न दिसे तीर्थ आन । आणि श्रीकृष्णदेवाहून । उत्तम आन देव नसे ॥ ४५ ॥ कृष्णकीर्तिचि सर्वोत्तम । श्रीकृष्णदेवचि सर्वोत्तम । हेंचि निरूपण सर्वोत्तम । ऐक सर्वोत्तम नृपाळा ॥ ४६ ॥

तीर्थं चक्रे नृपोनं यदजनि यदुषु स्वः सरित्पादशौचं विद्विट्स्निग्धाः स्वरूपं ययुरजितपरा श्रीर्यदर्थेन्ययत्नः ।
यन्नामामङ्गलघ्नं श्रुतमथ गदितं यत्कृतो गोत्रधर्मः कृष्णस्यैतन्न चित्रं क्षितिभरहरणं कालचक्रायुधस्य ॥४७॥

पूर्वीं स्वचरणशौचोदका । सरिता गंगाभिधानका । अधिक तीर्थांहूनि अशेखां । केलें तीर्थ कां श्रीधरें ॥ ४७ ॥ आतां तरी यदुकुळाच्या ठायीं । जें तीर्थ जालें चित्सौख्यवाही । श्रीकृष्णकीर्तिस्वरूप पाहीं । स्वानंददायी सर्वत्र ॥ ४८ ॥ हें पदतीर्थ बहुतां गुणें । न्यून करितें उत्कृष्टपणें । जालें ऐसें नृपा जाणें । पावनखुणें करूनियां ॥ ४९ ॥ स्वर्गेचि सर्व तीर्थांउपरी । शोभे कृष्णकीर्ति त्रिजगत्रीं । सर्वत्र सर्वांतें उद्धरी । रिघोनि अंतरीं प्रियत्वें ॥ ४५० ॥ यास्तव कृष्णकीर्तीचा महिमा । अद्वितीय न सहे उपमा । कीं द्वेष्टे आणि स्नेहाळ समा । स्वरूपधामा पावले ॥ ५१ ॥ यशोदा स्नेहाळ माउली । पूतना द्वेषें मारूं आली । सम दोघींतें प्राप्ति झाली । नाहीं केली कडसणी ॥५२॥ गोपिका कामें कृष्ण भजल्या । याज्ञिकी भावें दर्शना आल्या । त्या समत्वें उद्धरिल्या । नाहींच केल्या न्यूनाधिका ॥५३॥ कंस शिशुपाळ विदूरथ । शाल्व पौण्ड्रक काशीनाथ । द्वेषें चिन्तित होते घात । वैरी निश्चित मानूनी ॥५४॥ पाण्डव भीष्मादि सद्भक्त । कृष्णचरणीं सर्वदा निरत । ते हे उभयता समस्त । पावले नित्य तत्सारूप्य ॥ ५५ ॥ एवं अधमोत्तम समग्र । द्वेषें स्नेहें प्रेमें तत्पर । जाले स्त्रिया किंवा नर । कृष्णाकार

चिन्मात्र ॥ ५६ ॥ तरी हें करणें श्रीकृष्णास । चित्र नोहेचि पैं विशेष । कीं जो परम करुणाधीश । आत्मा अभेद म्हणोनियां ॥ ५७ ॥ तैसेंचि हेंही विचित्र नोहे । तें काय म्हणा जरी निश्चयें । तरी अजित परा लक्ष्मी स्वयें । सेवि सद्भावें जयासी ॥ ५८ ॥ जे कोण्हीहि न जिंकिली । कधीं कोण्हा न प्राप्त झाली । जीस्तव ब्रह्मादि सुरावळी । यत्नबहळीं निरंतर ॥ ५९ ॥ ते सर्वप्रकारें परिपूर्णा । प्राप्त श्रीकृष्णासीच जाणा । कीं स्वानंदबोधें हा योगराणा । तदपेक्षणा न करीच ॥ ४६० ॥ आपणचि जो कल्पद्रुम । तो कैं द्राक्षीचा धरी काम । अमृतोदधि जो निःसीम । तो नदीचा संगम कैं इच्छी ॥ ६१ ॥ तेंवि स्वसंविन्मोदें पूर्णकाम । नेच्छी लक्ष्मीसि ऐश्वर्यधाम । ऐसिया कृष्णातेंचि सप्रेम । भजनीयनेम करूनी ॥ ६२ ॥ रमा आपुलिया दैवोर्जिता । आश्रयी केवळ सत्यव्रता । हेंहि विचित्र कृष्णीं तत्वता । नाहीं पाहतां कांहींही ॥ ६३ ॥ कीं परम मंगळ ज्याचें नाम । अमंगळ नाशूनि दे विश्राम । पापतापादिदुःखविराम । अज्ञानभ्रम दूर करी ॥ ६४ ॥ तेंही न होतां अर्थस्मरण । वर्णात्मकाचि अति-पावन । उच्चारिलें केलें श्रवण । अमंगळघ्न निश्चयें ॥ ६५ ॥ एवं नामचि ऐकतां स्मरतां । अमंगळ नाशूनि मंगळता । दे आवर्तनमात्रें समस्तां । मा प्रत्यक्ष वेधतां तदूपीं ॥ ६६ ॥ कवण्या तरी एका योगें । द्वेषें रोषें मोहानुरागें । मानस गुंततां लागवेगें । कैवल्य स्वाङ्गें न दुर्लभ ॥ ६७ ॥ हें विशेषणेंचि न लगे राया । सर्व प्रकारें हितोपाया । अवतरे शौरि जगाचिया । ज्याची माया अनकळ हे ॥ ६८ ॥ जेंवि निराळीं बांधिती माच । कीं उदकावरी सेतु साच । गोत्रधर्म केला विविच्य । प्रकट तैसाच जयानें ॥ ६९ ॥ विविध ऋषिवंशांच्या ठायीं । विविधगोत्रोचित धर्म पाहीं । पावावया अपवर्ग निलयीं । जनीं सर्व ही प्रतिपादिला ॥ ४७० ॥ तरीं इत्यादि प्रकारें महिमा । श्रीकृष्णाचा नृपोत्तमा । अद्भुतसामर्थ्य जाणतां । अद्भुतकर्माकर्मे ऐसा ॥ ७१ ॥ तया कृष्णासी क्षितीचा भार । हरणें हें नोहेचि चित्र । कीं सर्वसंहारक काळचक्र । तें आयुध तीव्र जयाचें ॥ ७२ ॥ ज्या नरमेधान्तक्रतुज्ञान । तेणें वैश्वदेव साङ्ग पूर्ण । केला तरी आश्चर्य कोण । कीं शूरें मत्कुण जरी वधिला ॥ ७३ ॥ अथवा गरुडें मारिला जंत । कीं सिंहें धरिला बस्त । अनळें जाळिलें तृण निश्चित । तेंवि कृष्णें दैत्य जरी वधिले ॥ ७४ ॥ अनंत ब्रह्माण्डांच्या कोडी । सत्तामात्रें घडी मोडी । ते काळचक्राज्ञाहोडीं । वर्ते प्रौढी ज्याचिये ॥ ७५ ॥ तेथ इत्यादिकहें अद्भुत । म्हणणें कायसें सुचरित । यास्तव श्रीकृष्ण एवंभूत । जाण निश्चित सर्वोत्तम ॥ ७६ ॥ सर्वपूज्य सर्ववंद्य । सर्व नियंता सकळैकाद्य । वेदवेदान्तप्रतिपाद्य । विधिहराराध्य परमात्मा ॥ ७७ ॥ जगाचिया कल्याणार्थ । अवतार पूर्णत्वें समर्थ । अत्युत्कर्षें जयवान मूर्त । विराजे स्वछंद धर्मवान् ॥ ७८ ॥

जयति जननिवासो देवकीजन्मवादो यदुवरपरिषत्स्वैर्दोर्भिरस्यन्नधर्मम् ।
स्थिरचरवृजिनघ्नः सुस्मितश्रीमुखेन व्रजपुरवनितानां वर्द्धयन्कामदेवम् ॥ ४८ ॥

वस्तुता केवळ निर्गुण । सर्वव्यापी सनातन । जीवमात्रांचें वसतिस्थान । आश्रय पूर्ण सकळांचा ॥ ७९ ॥ अंतर्यामिपणें स्वैर । वसवी सर्वदा तदंतर । ऐसिया ह्मणणें देवकीपुत्र । जन्मला साकार

तिजहून ॥ ४८० ॥ हे बोली मात्र ज्या प्रसिद्ध । परंतु वास्तव जो स्वतःसिद्ध । जनानुग्रहार्थ उद्बोध । अयोनिज शुद्ध साकार ॥८१॥ जो यादवनिचयें प्रभुत्वें सेव्य । सभेमाझारी ज्या यदुपुङ्गव । सेवकपणें सेविती सदैव । ईश्वरभाव धरूनियां ॥ ८२ ॥ ऐसिया श्रीकृष्णा प्रभुवरासी । ईच्छामात्रें भूभारहरणासी । सामर्थ असतां विशेषीं । लीला बहुसी प्रकटावया ॥ ८३ ॥ स्वहस्तें केवळ युद्धप्रसंगें । दुष्टां वधूनियां लागवेगें । अधर्मार्ते ते आयुधसंघें । धर्मानुरागें निरसिले ॥ ८४ ॥ न होनि अधिकारसापेक्ष । वृन्दावनस्थ तृणलतावृक्ष । श्वापदें पक्षी नरविशेष । स्थिरचर अशेष जे प्राणी ॥८५॥ तयांचें जन्ममरण-दुःख । निरसिता जाला निःशेख । दर्शन स्पर्शनें सम्यक । केले चित्सुखमय सर्व ॥ ८६ ॥ तेंविच विलसाचातुर्य नेणा । गोपिका केवळ साधारणा । त्यांचिया कामदेवातें वर्धना । सुस्मितश्रीमुखें पाववित ॥ ८७ ॥ तयांच्या जन्मादि दुःखांतें । परिहरिलें कृष्णें निरुतें । न्हणाल कामेंचि संसारातें । केंवि पुरतें निरसलें ॥ ८८ ॥ तरी हा काम नोहेचि सामान्य । देव ऐसें ज्या विशेषण । जो संसारातें जिंकी पूर्ण । ऐसा सद्गुण ज्यामाजी ॥ ८९ ॥ तो भोगद्वारा मोक्षप्रद । व्रजवनितांसि जाला विशद । ऐसिया कामदेवातें मुकुन्द । वर्धित स्वानंदमयकारी ॥ ४९० ॥ जेंवि तृषिता दैवें गंगा । अमृताचीच जोडली पैं गा । ते तृष्णा वाढवीत अंगा । करी अमोघा अमृतची ॥९१॥ तेंवि कृष्णपरमात्मा केवळ । सगुणविग्रही अंबुदनीळ । सकळ सौन्दर्याचें मूळ । ब्रह्म प्राज्ञळ साकार ॥९२॥ सहज विचरतां व्रजमंडळीं । कमनीयरूपीं गोपबाळी । वेधल्या प्रत्यय हृदयकमळीं । नसतां समूळीं वास्तव ॥ ९३ ॥ न कळत ब्राह्मीकाम । यास्तव कामदेव त्या नाम । त्यातें वाढवीत पुरुषोत्तम । श्रीमुखपद्म दावूनी ॥ ९४॥ ऐसऐसया प्रसंगीं । स्थिरजनांची संसारधगी । वारूनि विजयोत्कर्षें शार्ङ्गी । जाला त्रिजगीं विराजित ॥९५॥ याहूनि पूर्वी जगत्पाळना । मत्स्यकूर्मादि दैत्यदलना । निमित्तें जे जे अवतार नाना । रमा रमणानें धरिले ॥ ९६ ॥ परंतु अंशेंचि प्रभुवर्य । संपादावया निर्ज्जरकार्य । प्रसंगें अवतरला जन आर्य । रक्षणोपायावलंबें ॥ ९७ ॥ साधिले तत्कार्यविशेष । तावन्मात्र तच्चरितलेश । कृष्ण तंव पूर्णब्रह्मपरेश । लीलाप्रकाश वैशिष्ट्यें ॥ ९८ ॥ मत्स्यें शंखासुरातें वधिलें । कूर्में महीतें पृष्ठीं धरिलें । वराहें हिरण्याक्षा मारिलें । नृसिंहें हरिले तद्बंधु ॥ ९९ ॥ वामनें नेला बळि पाताळीं । भार्गवें केली क्षात्रहोळी । राघवें निशाचर मंडळी । पंक्तिमौळीसह वधिली ॥ ५००॥ इतुकेंचि चरित प्रासंगिक । वर्तलें ययाचें निष्टंक । याहूनि कृष्णाचें अलौकिक । अपार सम्यक अद्भुत ॥ १ ॥ वैकुण्ठींहूनि मूर्तिमंत । चतुर्भुजपीताम्बरान्वित । गदाचक्राद्यायुधयुक्त । सूतिकागृहांत प्रकटला ॥२॥ तेथ वसुदेव देवकीसी । कथिलें पूर्विल्या त्रिजन्मासी । त्यां अभय देऊनि निश्चयेंसीं । मग तन्मानसीं काय करी ॥ ३ ॥ पुढील कथूनियां करणी । तत्काळ वेंठला शिशुपणीं । वसुदेव घेतां बंधनींहूनी । मुक्त तत्क्षणीं जाहला ॥ ४ ॥ पुढें चालतां गोकुळोद्देशें । कीलबद्धें द्वारें अशेषें । स्वर्येंचि मुक्त जालीं पैसें । रविप्रकाशें कमळवत् ॥ ५ ॥ अंबुद वर्षतां सूक्ष्म सरी । विस्तीर्ण फणा पसरूनि वरी । शेष अनुगत वारित वारी । प्रकाशकारी जाहला ॥ ६ ॥ पुढें यमानुजा पूर्णनीरें । वाहत असतां अत्यंतभरें । द्विभाग जाली वसुदेव त्वरे । नेतां पुढारें श्रीकृष्णा ॥ ७ ॥ गोकुळीं प्रवेशतां वसुदेव । महाद्वारादि द्वारें सर्व । मुक्तें केवळ हें अपूर्व । निशीथ भीरव असतां ही ॥८॥ सूतिके

यशोदे समीप । ठेवूनियां विधीचा बाप । तत्सुता घेऊनिं ससाक्षेप । गेला भूप वसुदेव ॥९॥ एवं आला गेला येथें तेथें । परी कोणा न कळे कांहीं तें । पावतां आपुलिया स्थानातें । द्वारें पूर्ववत् लागलीं ॥५१०॥ हे श्रीकृष्णाची अघटित सत्ता । पुढें जन्मोत्सव व्रजीं समस्तां । ऋद्धि सिद्धि मूर्तिमंता । राहिल्या तत्वता गोकुळीं ॥ ११ । वृद्धा गाई जाल्या तरुणा । वंध्या पुत्रवती अंगना । मूर्ख लाधले चतुरपणा । अधना धनागम जाले ॥ १२ ॥ हे असो प्रथम दशदिनांत । पूतना विरोचनाची नात । विष प्राशूनि मारिली व्रात्य । पवाडा विस्तृत हा कथिला ॥१३॥ तैसेंच परिवर्त्तनोत्साहीं । तीं मासांचा शेषशायी । तैं शकट मोडिला पायीं । वाटली नवायी सकळांसी ॥ १४ ॥ षण्मासांचा असतां कृष्ण । गेला तृणावर्त घेऊन । गुरुत्वें पाडिला गगनींहून । पावला मरण तत्काळ तो ॥ १५ ॥ कौतुकें खेळवितां यशोदा । जृंभणमिसें मुखकुमुदा । विकासूनि ब्रह्माण्डहृदा । दाविलें वृन्दारकपूज्यें ॥ १६ ॥ रिङ्गणादि स्वक्रीडणें । रुचिर नागर कल भाषणें । समाधिस्थ केले जेणें । तनुमनें पोरां थोरांचीं ॥ १७ ॥ चौर्यकर्मादि कौशल्यलीला । करूनिं ठकिल्या गोप-अबळा । यशोदा बांधितां क्रोधशीळा । परि नाकळला तियेसी ॥१८॥ कीं यमलार्जुनप्रपातन । कौबेरांप्रति वरदान । पुन्हा करूनि मृद्भक्षण । दाविलें त्रिभुवन मुखीं माये ॥ १९ ॥ वृन्दावनीं राखितां वत्सें । वत्सासुर पातला द्वेषें । मारियेला तो फिरवून पुसें । कौतुकवशें श्रीकृष्णें ॥ ५२० ॥ तेंविच बकासुर बकरूपें । गिळितां चिरिला तो साटोपें । वत्सां वत्सपां अघरूपसर्पे । गिळिलें कोपें कृष्णाच्या ॥ २१ ॥ ज्याचा भूसंलग्न अधरोष्ठ । ऊर्ध्वोष्ठ मेघसंस्पृष्ट । तद्गळां वाढोनि कंबुकंठ । फोडिलें कपाट दहावें ॥ २२ ॥ निघालें तज्ज्योति तेजःपुञ्ज । सत्यलोकांत फिरूनि सहज । कृष्णींच पावलें सायुज्य । देखिलें चोज ब्रह्मादिकीं ॥ २३ ॥ वत्सां वत्सपां अमृतदृष्टी । पाहूनि पुन्हां जीवविलें मृष्टी । परंतु कांहींच मनःपटीं । स्मयचित्रगोठी नुमटली ॥ २४ ॥ आणि समवयस्कां भीतरी । तत्सम क्रीडता जाला हरी । हे अद्भुत ऐश्वर्याची परी । देखोनि अंतरीं स्मित ब्रह्मा ॥ २५ ॥ परीक्षावया पूर्णैश्वर्य । भूतळीं येऊनि सविस्मय । वत्सां वत्सपां लपविता होय । भोजनसमय लक्षूनी ॥ २६ ॥ हें ज्ञानें जाणोनि कृष्ण । सर्व रूपें जाहला आपण । वत्सवत्सपरूपें नटून । वत्सर पूर्ण विहरला ॥ २७ ॥ परंतु कोण्हा नकळे वर्म । गोगोवळां दिधलें शर्म । व्हावया विधीचा गर्वोपशम । विजयोगधाम उघडिलें ॥ २८ ॥ तंव वत्सरान्तीं विखनस । लपविल्या वत्सां वत्सपांस । कैसा वर्तला कृष्ण परेश । हें पहावयास पातला ॥ २९ ॥ तंव वत्सां वत्सपां पूर्ववत । देखिलें संपूर्ण सालंकृत । क्रीडती कृष्णेंसीं अद्भुत । देखोनि विस्मित विधाता ॥ ५३० ॥ आपण ठेविलें मायागर्भीं । तें तैसेंचि सुषुप्तिकुंभीं । हे कोठूनि आले तत्सन्निभीं । एवं भ्रमनभीं तो पडिला ॥ ३१ ॥ त्याचें करावया भ्रमनिरसन । सर्वरूपें श्रीनारायण । विष्णुव्याक्ति नटला पूर्ण । श्रीवत्सलांछन चतुर्भुज ॥ ३२ ॥ प्रति मूर्ति जवळी पृथग्विधि । ससर्वब्रह्माण्डरचनावधि । सुरतत्वगणासह आराधी । देखूनि विधिधी उपरमली ॥ ३३ ॥ सर्वेंचि हा ऐश्वर्ययोग । लोपूनि स्वाङ्गींच अव्यंग । वत्सरूपेंचि रमारंग । ठेला साङ्ग विधीपुढें ॥ ३४ ॥ मग तेणें अमोघप्रेमोत्कर्षें । दंडवत प्रणमूनियां शीर्षें । हरिपद सिंचूनि अश्रुवर्षें । स्तविला विशेषें पूर्णत्वें ॥ ३५ ॥ उपक्रोष्टा धेनुकासुर । जंतुमात्रातें क्लेशकर । तालवनीं तो

अतिदुर्धर । वधिला समग्र सेनेसह ॥ ३६ ॥ कालियडोहीं कबंधपानें । गोगोपाळ पावले मरणें । ते जीववूनि सुधावलोकनें । पुन्हा तत्करुणेस्तव कृष्णें ॥ ३७ ॥ कालियफणारंगणीं नृत्य । करूनि केलें तद्दमनकृत्य । स्तव उरंगींचा ऐकूनियां सत्य । निर्भय जलधींत पाठविला ॥ ३८ ॥ ऐसा काढूनियां तो सविष । यमुना केली निर्दोष । तैसा समांचा गोपवेष । पवाडा विशेष प्रकटला ॥ ३९ ॥ तये रातींत गोगोपगोपी । श्रमें निद्रित जागृतिलोपीं । असतां दावानळ आटोपी । तो पी प्रतापी श्रीकृष्ण ॥ ५४० ॥ बलरामहस्तें प्रलंबहनन । केलें करितां संक्रीडन । जळतां इषिकावनीं गोगण । सगोप नंदन रक्षिला ॥ ४१ ॥ शरत्प्रावृट्क्रीडारोळ । शोभा वृंदावनाची बहळ । लुब्ध वेणुरवें गोमेळ । गोपिका सकळ तन्मय ॥ ४२ ॥ कात्यायनीव्रतान्तीं गोपी । उपहासिल्या अंशुकलोपीं । व्रतसाङ्गता उपहासकल्पीं । करूनि वोपी वरदाना ॥ ४३ ॥ पुढें यज्ञपत्न्यांचा प्रेमा । तदर्पित भोजनाची गरिमा । हेळिला यज्ञभंगें सुत्रामा । गोवर्द्धननामा प्रशंसिला ॥ ४४ ॥ मघवा क्षोभूनि वर्षतां स्वैर । करीं गोवर्द्धनधराधर । धरूनि तळीं व्रज समग्र । रक्षिला विचित्रविंदानें ॥ ४५ ॥ तेणें वासव अतिलज्जित । दुहिणें सुरभि धाडनि त्वरित । चतुर्दशभुवनराज्याभिषिक्त । केला समर्थ श्रीकृष्ण ॥ ४६ ॥ दिग्पति जाले शरणागत । बल्लव तेणें अतिविस्मित । कीं वरुणें नंद नेला जळांत । तो आणिला श्रान्त स्वजनास्तव॥ ४७ ॥ अद्भुत श्रीकृष्णाची करणी । जाणोनि प्रार्थितां गोपगणीं । वैकुंठ दाविलें तयां नयनीं । जें परेहूनि परतर ॥ ४८ ॥ पुढें रासक्रीडा गोपींसह । पाहूनि विधिहरिहर पावले मोह । नभीं दाटले सुरसमूह । स्तब्ध तापापह सऋक्ष ॥ ४९ ॥ तये रात्रीचें कवण मान । हें अविदित सर्वथा जाण । शंखचूडाचें निबर्हण । उत्तरक्रीडन संपादितां ॥ ५५० ॥ वृषभासुर व्योमासुर । केशिप्रमुख मारिले क्रूर । कंसें प्रेरिला अक्रूर । प्रेमा अपार तयाचा ॥ ५१ ॥ तेणें कृष्ण नेतां मथुरेसी । वेध गोपिकांच्या मानसीं । जो दुर्लभ योगियां ज्ञानियांसी । अहंममतेसी विसरल्या ॥ ५२ ॥ अक्रूर मज्जतां यमुनेंत । त्या स्वरूप दाविलें मूळभूत । केल्या नरनारी स्वरूपस्थित । मथुरापुरस्थ स्वदर्शनें ॥ ५३ ॥ धनुष्य भंगूनि विरूप कुब्जा । केली सरळ समान अब्जा । कंसकाया ओढूनि न्युब्जा । समूळ पैजा वधिला तो ॥ ५४ ॥ राज्यीं उग्रसेन स्थापिला । क्षुद्रकामें अधर्म न केला । मृत गुरुपुत्र आणिला । गोपिकांला बोधविलें ॥५५॥ सतरा वेळ असामान्य । तेवीस अक्षौहिणी सैन्य । वधूनि कृष्ण जाला धन्य । मागधा दैन्य वोपिलें ॥ ५६ ॥ अजिंक्य यादवां काळयवन । मुचुकुन्ददृष्टी त्या मारून । दिधलें मुचुकुन्दा वरदान । हें कौशल्य गहन कृष्णाचें ॥ ५७ ॥ अष्टमहिषींचे उद्वाह । भौमासुराचा वधनिर्वाह । पार्यातहरणीं सुरविग्रह । हा अद्भुत प्रवाह लीलेचा ॥ ५८ ॥ षोडशसहस्रवनितालग्नें । एका समयीं पाणिग्रहणें । यदूंसह अनेक रूपें धरणें । हें विचित्र करणें कृष्णाचें ॥ ५९ ॥ भीमकीचें विनोदच्छळन । बाणानिमित्त हरनिग्रहण । भीमहस्तें मागधहनन । बंधमोचन नृपांचें ॥ ५६० ॥ सिद्धी नेला युधिष्ठिरयज्ञ । तेथ शिशुपाळशिरःकृन्तन । पौण्ड्रकशाल्वनिबर्हण । अधर्मी जन बहु वधिले ॥ ६१ ॥ सुदामाचें पृथुकभक्षण । पुरटपुरीचें तया दान । कुरुक्षेत्रीं गोवळा पूर्ण । गोपिकागण उपदेशिला ॥ ६२ ॥ जनक श्रुतदेव भक्तवर्य । समत्वें कृतार्थ केले उभय । धरूनि तत्प्रेमें रूपद्वय । मुनिसमुदायसमवेत ॥ ६३ ॥

साष्ट शतोत्तर सोळा सहस्र । सदनीं तावद्रूपधर । वर्तला वनितामनोनुसार । स्वधर्मपर श्रीकृष्ण ॥६४॥ संतति संपत्ति आत्मसंग । अवघे या समत्वेंचि साङ्ग । देऊनि पूर्णत्वें अव्यंग । रमारंग निःसंग ॥६५॥ पाण्डवांचें करूनि साह्य । कौतुकें तत्करें वधिल द्रोह्य । वर्धिले धर्मिष्ठ साधुग्राह्य । यदुसमूह स्वकौल्य ही ॥६६॥ इत्यादि अनंत अलौकिक । श्रीकृष्णलीला सकौतुक । संपूर्ण नेणती ब्रह्मादिक । मा मानवी अल्पक काय वदे ॥ ६७ ॥ पूर्वावतारीं प्रगल्भ लीला । इतुकी नाहींच ऐश्वर्यशीळा । जगदुद्धार ही ऐसा न केला । कळे सुज्ञाला तारतम्य ॥ ६८ ॥ वैकुण्ठींचें ऐश्वर्य सर्व । दरारिगदादिजलोद्भव । छंदोगामी पक्षिराव । कृष्णींच पूर्ण विराजले ॥ ६९ ॥ नवल वस्तुमहिमारोह । श्रीकृष्ण चिन्मात्रविग्रह । जगत्कल्याणसंदोह । निःसंदेह विदेह ॥५७०॥ तेथ कोण्ही कोण्या योगें । जडले प्राणी विरागें रागें । संगें पाङ्गें सप्रेमलागें । कीं संभोगें सहज स्थिती ॥ ७१ ॥ ते सायुज्य पावले कृष्णीं । त्यांमाजि तृणादि स्थावरश्रेणी । स्पर्शमात्रें स्वानंदघनीं । पावले साधनीं नसतांही ॥ ७२ ॥ तैसेच पशुपक्षी श्वापदगण । दर्शनमात्रेंचि तद्रूप पूर्ण । दूरस्थ किंवा यादसजन । वेणुस्वनश्रवणेंचि ॥ ७३ ॥ मानवांमाजि तों दोनी कोटि । देव असुर जे जाले सृष्टि । विरोधसप्रेमें परिपाटी । स्वधामतटी पावले ॥७४॥ भयें द्रोहें द्वेषें वैरें । स्नेहें मोहें कामें स्वैरें । सख्यें मैत्र्यें सुहृदाधारें । साक्षात्कारें निजानुभवें ॥७५॥ ब्रह्मभावें भक्तिप्रेमें । अधिकारपांगेंवीण सुगमें । ऐक्य पावले सद्वेधनेमें । पुरुषोत्तमेंसीं सर्वही ॥ ७६ ॥

इत्थं परस्य निजधर्मरिरक्षयात्तलीलातनोस्तदनुरूपविडम्बनानि ।
कर्माणि कर्मकषणानि यदूत्तमस्य श्रूयादमुष्य पदयोरनुवृत्तिमिच्छन् ॥ ४९ ॥

तरी निजधर्मावना कारणें । लीलातनु धरिली जेणें । त्या परात्पर श्रीकृष्णाचीं गहनें । कर्में पूर्णें ऐसीं हीं ॥ ७७ ॥ धृतनाट्यानुरूपोद्दामें । विडंबनें कृतशंतमें । अविद्याव्रतांच्या कर्मनेमें । नाशक वर्में केवळ ॥ ७८ ॥ या यदूत्तमाच्या पादाम्बुजीं । अनुवृत्ति इच्छितसां तां कीं जी । कोण्ही तन्ही ऐको सहजीं । सत्समाजीं सप्रेमें ॥ ७९ ॥ अनुवृत्तिशब्दें जाणिजे भक्ति । कृष्णाचरणीं इच्छूनि पुरती । सेवी तत्कीर्ति जो शुद्धमति । फळ त्याप्रति मुनि सांगें ॥ ५८० ॥

मर्त्यस्तयाऽनुसवमेधितया मुकुन्द श्रीमत्कथाश्रवणकीर्तनचिन्तयैति ।
तद्धाम दुस्तरकृतान्तजवापवर्ग ग्रामाद्वनं क्षितिभुजोऽपि ययुर्यदर्थाः ॥ ५० ॥

श्री म्हणिजे माङ्गल्यरूपा । मोक्षादि कल्याणप्रदीपा । जेथ आहे स्वानंदकल्पा । ते श्रीमत्कथा कृष्णाची ॥ ८१ ॥ ऐकिली कीर्तिली चिन्तिली प्रीती । प्रवृद्ध भक्ति करूनि महती । तेणें मर्त्य पावे तद्धामाप्रति । पुनरावृत्तिविवर्जित ॥ ८२ ॥ कैसे प्रकारींचें तें धाम । ऐसें पुसाल जरी उद्दाम । विशेषणार्थें तरी उत्तम । ऐका सुगम कळेसें ॥ ८३ ॥ अंतकर्ता अनिवार काळ । प्रवाह त्याचा बहुजवशीळ । ज्यामाजि पडिले ब्रह्माण्डगोळ । ब्रह्मादिक सकळ वाहवती ॥ ८४ ॥ नामा रूपा

जितुकें आलें । तें न थरे ज्यापुढें वहिलें । ऐसा काळजव दुस्तर बळें । त्यासी जें नाकळे कदापिहि ॥८५॥ जें सत्य शाश्वत अविकार । ज्याचिये प्राप्तीस्तव साचार । साधक श्रमती वैराग्यपर । भयंकर काळभयें ॥ ८६ ॥ पृथ्वीपति ही ग्रामांतून । वना गेले अतिनिर्विण्ण । ज्याकारणें विवेकानिपुण । भवसुख पूर्ण सांडूनी ॥ ८७ ॥ ललनाललामें लावण्यधामें । विलासविदग्धप्रचुरकामें । रतिसुख ज्यांचे देती उपमे । श्रुतिगण नेमें ब्रह्मसुखा ॥ ८८ ॥ ऐसिया अनुरूपा सुन्दरा । रम्या स्वतुल्या मंदिरा । यथेच्छहयगजपरिवारा । ललामनिकरा द्रविणादि ॥ ८९ ॥ देशदुर्गे पृतनानुग । सकळ शारीरशर्म साङ्ग । उपेक्षूनि भूभुज धिंग । जाले वनग ज्यासाठीं ॥ ५९० ॥ अनळनिवेशा तुल्य कठिन । प्राणायामादि साधिती पूर्ण । शमदमें जिंकिती गोगण । होऊनि निपुण यासाठीं ॥ ९१ ॥ ऐसें दुर्लभ परंधाम । अच्युतस्वरूप सविश्राम । पावती तत्कथासेवनकाम । साधनें सुगम श्रवणादिकें ॥ ९२ ॥ राया भगवदनुग्रहप्राप्ता । येथ विस्मय काय प्रज्ञामंता । हें चित्र नोहे कीं सर्वथा । तेंही तत्वता अवधारीं ॥ ९३ ॥

चित्रं न चैतदुरुगाय पवित्रलीलाविध्वस्तकल्मषकदम्बकमुक्तिरूपम् ।
स्त्रीणाम् सुदुस्त्यजकृतान्तजवापवर्गम् ग्रामाद्वनम् क्षिनिभुजोऽपि ययुर्यदर्थाः ॥ ५१ ॥

तापरहित शशी निश्चित । कीं दैन्यातीत श्रीसंतत । ध्वान्ता वेगळा सविता नित्य । किंवा संत भ्रमहीन ॥ ९४ ॥ तैसी पवित्र लीला पुण्यमय । तये करूनि कल्मषनिचय । विध्वंसिले तमप्राय । जेंवि प्रळय तेजोदयें ॥ ९५ ॥ तें मुक्तिरूप निजधाम । सच्चिदानंद मूर्त परम । उरुगायाचें अत्युत्तम । वास्तव निस्सीम स्वरूप ॥ ९६ ॥ उरुगाय म्हणिजे बहु गाइला । वेदीं पुराणीं जो दादुला । परंतु न सरे ज्याची लीला । जे त्रिजगाला उद्धारी ॥ ९७ ॥ अमृताची जे कां सरिता । प्राप्त जाली जाणतां नेणतां । तेथें जाण नेण लाचावतां । पावती सर्वथा अमृतत्व ॥ ९८ ॥ वस्तुमहिमाचि हा सहज । कृष्णस्वरूप पुण्यपुञ्ज । सांवळें परब्रह्मचि निज । शान्तिबीज केवळ ॥ ९९ ॥ गृहसुतस्वजनासक्ता रामा । स्वभावें केवळ विषयकामा । तिहीं देखोनि मेघश्यामा । मधुमक्षिकासमा विनटल्या ॥६००॥ नित्यानित्यविवेकें वीणें । विटल्या गृहसुतादिकीं पूर्ण । त्यांसि दुस्त्यज अत्यंत जाण । स्वरूप चिद्घन कृष्णाचें ॥ १ ॥ वेधें तन्मय जाल्या अबळा । त्या निस्तरल्या दुस्तरकाळा । सायुज्य पावल्या प्रेमशीळा । हे प्रतापकाळा कृष्णाङ्गीं ॥ २ ॥ जरी कोटीसवाणा अग्निदीप । तरी ध्वान्त नाशे सप्रताप । तेंवि सगुणविग्रह कृष्णरूप अविद्यापाप विध्वंसी ॥ ३ ॥ अतएव काळजवापवादक । श्रीकृष्णधाम अतिसम्यक । ज्या कारणें क्षितिभुज रंक । होऊनि वनौक जाहले ॥ ४ ॥ विपुळैश्वर्यें विराजित । संपन्न सर्वविषययुक्त । असतां महंतां मुखें क्वचित । ऐकतां निश्चित हरिधाम ॥ ५ ॥ कुरवंडूनि तें ऐश्वर्य । चक्रवर्ती ही वनीं आर्य । गेले एकान्ताप्रति निर्भय । एकले सकाय मात्र स्वयें ॥ ६ ॥ ऐसें दुर्लभ असाधारण । तें सुलभ करितां श्रवण कीर्तन । मानव पावे निश्चयें करून । दृढचिन्तन केलिया ॥ ७ ॥ इतुके न हा

चरमाध्याय । समाप्ति पावला सुप्रमेय । एथ दशमस्कंध विद्वत्प्रिय । जाला सान्वय संपूर्ण ॥ ८ ॥ श्रोत्या वक्त्यांचे मनोरथ । येणें सिद्ध जाले यथार्थ । जीणीं पातला परमार्थ । विश्वीं समस्त विपुळत्वें ॥ ९ ॥ कृन्तातभयें भयभीत राजा । केवळ साकांक्ष अभयकाजा । त्या कृष्णप्रभाव बोधूनि ओजा । निर्भय केला मुनीश्वरें ॥ ६१० ॥ म्हणाल पुढें कृतकृत्यता । कैसी नृपाची तत्वता । अलं जाला संवाद वदतां । तुष्णीम्भूतता कोटि शुका ॥ ११ ॥ तरी एकादशस्कंध समस्त । आणि पंचाध्याय-पर्यंत । द्वादशस्कंधीं व्यासमुत । वदला निवान्त नृपनाथा ॥ १२ ॥ त्यांमाजि एकादशस्कंधीं । कथा पंचाध्यायावधी । नारद वसुदेवातें बोधी । जें जनकसंसदीं नरीं कथिलें ॥ १३ ॥ पुढें यदु अवधूतसंवाद । कथिल्या नंतर श्रीमुकुन्द । उद्धवाप्रति तत्व विशद । कथिता शुद्ध जाहला ॥ १४ ॥ तो सविस्तर संपूर्ण अर्थ । वोवीप्रबंधें उघड अत्यंत । महाराष्ट्र वदला श्रीएकनाथ । जगीं प्रसिद्ध तद्योगें ॥ १५ ॥ द्वादशस्कंधींचे पंचाध्याय । तेथील ऐका क्रमें अन्वय । प्रथमीं नृपति पुसता होय । शुकासि सोय पुढील ॥ १६ ॥ कीं निजधामा गेलिया कृष्ण । पुढें क्षात्रवर्ण चिरकाळीन । कळीमाजि राहिला कोण । तो संपूर्ण कथावा ॥ १७ ॥ तेणें मुनीन्द्रें कथिलें भूपा । इतरवंश पावल्या लोपा । मागध राहती कळिकाळकल्पा । माजि अल्पसे अल्पकाळ ॥ १८ ॥ सोमवंशींच्या अनेक शाखा । त्यांमाजि मागधशाखा देखा । कांहीं पुढें राहिल्या सुमुखा । मग ते ही अशेखा भ्रंशेल ॥ १९ ॥ पुढें शूद्रीगर्भज राजे होती । त्यावरी शूद्रचि राज्य करिती । शेखीं केवळ यवन शासिती । अन्यायरीती प्रजांतें ॥६२०॥ ते शूद्र आणि यवन राजे । नाममात्रचि त्यां विराजे । दस्यूत्पथाचरण ओजें । अधर्मभोजें नाचविती ॥ २१ ॥ अनृती अधर्मीं फल्गु दाते । तीव्र क्रोधिष्ठ हिंस्र पुरते । गोद्विज-स्त्रीबाळहंते । वृथा हिंसेतें संपादिती ॥ २२ ॥ प्रजा पीडिती शत्रुप्राय । मोडिती शिष्टसंप्रदाय । प्रजा ही तैशाचि अन्याय– । कारक निर्दय होतील ॥ २३ ॥ हा इतुका प्रथमीं अर्थ । पुढें जो कथिला द्वितीयांत । तोहि कथिजेल श्रीशुकोक्त । परिसा यथार्थ निरूपणें ॥ २४ ॥ शुक म्हणे राया परीक्षिती । दिवसें दिवस पुढें जगती । सत्य शौच दया नीती । निःशेष भ्रंशती कळिकाळें ॥ २५ ॥ आयुष्य वळ वयुन स्मृती । अत्यंत ह्रासें अल्पवती । कामानुसार प्रचारती । विषयां वरुती बहु प्रीति ॥ २६ ॥ दांपत्यभावा कारण रुची । कपटव्यवहार अवघाची । तेथ वर्णाश्रमा वोळखी कैंची । अन्योन्यापत्तिदर्शनीं ॥ २७ ॥ वर्णांमाजि जो कां बळी । तोचि नृपति तये वेळीं । एवं कळिअभ्रें धर्महेळी । लुप्त मंडळीं पृथ्वीचे ॥ २८ ॥ तेव्हां विषमवातातपपर्जन्यें । क्षुधातृषारोगादि दैन्यें । प्राणी पीडती स्वदौर्जन्यें । संतापचिन्तनें हळहळीत ॥२९॥ तीस अथवा वीस वर्षें । नरां आयुष्य कळिप्रदोषें । हेंचि परमायुष्य विशेषें । तेंही क्लेशें भोगिती ॥ ६३० ॥ शूद्रप्राय होती वर्ण । सदा दुर्भिक्षें सौख्यहीन । प्रकर्षेंसीं पाखंडपूर्ण । आचारहीन सर्वस्वें ॥ ३१ ॥ छागप्राय होती धेनु । बटुसमान मानवतनु । अन्वनुकाळें परम सानु । होतील क्षीणु केवळ ॥ ३२ ॥ चौर्यानृत व्यभिचार दोष । दाटती मानवीं विशेष । अणुप्राय औषधि अशेष । नाशती निःशेष पुण्योर्जितें ॥ ३३ ॥ तेव्हां कळीचिये अंतीं । चराचरगुरु ईश्वरमूर्ती । पूर्णसत्वें लक्ष्मीपति । धर्मसंस्थिति रक्षावया ॥ ३४ ॥

शम्भलग्राममुख्यस्य ब्राह्मणस्य महात्मनः । भवने विष्णुयशसः कल्किः प्रादुर्भविष्यति ॥ ५२ ॥

तो शंभलग्रामीं मुख्य । ब्राह्मण विष्णुयशःप्रख्य । तद्गृहीं प्रकटेल दशमसंख्य । कल्की सौख्य-प्रदायक ॥३५॥ परम जवशीळ देवदत्त । अश्वावरी बसोनि सत्य । हातीं घेऊनि असि त्वरित । मारील समस्त दुरात्मे ॥३६॥ दुरभिमानी दस्यु दुष्ट । अनाचार ज्यां केवळ इष्ट । तयां वधूनि धर्म स्पष्ट । स्थापील नीट जगदात्मा ॥ ३७ ॥ मग मळयानिळसंसर्गें । तरु सुगंधित होती वेगें । किंवा वैरागरप्रसंगें । कंकर अवघे रत्नाभ ॥ ३८ ॥ कीं तिमिरावरुद्ध जैसे नेत्र । जैं तदाधिदैवत उगवे मित्र । ठायींच्या ठायींच स्वतंत्र । तेजाकार प्रकाशती ॥ ३९ ॥ तैसा सत्वमूर्ति रमाधीश । तदंगपुण्यानिळस्पर्श । होतां तत्काळ जन अशेष । होती निःशेष सत्वमति ॥ ६४० ॥ त्यावरी होईल कृतयुग । प्रजा जन्मती सात्विक साङ्ग । जये समयीं गुरु चंद्र भग । पावती संयोग पुष्पक्षी ॥ ४१ ॥ एके समयींच तीन्ही ग्रह । समागमेंचि कर्कग्रह । अधिष्ठिती कां सुखावह । तैं प्रारंभ होय कृतयुगा ॥ ४२ ॥ आणि हे सप्त देवऋषी । वर्तती केवळ मघाऋक्षीं । तेव्हां प्रकटे कळिकाळ दोषी । परिमितवर्षीं द्वादशशत ॥ ४३ ॥ द्वादश शतें सुरवत्सरें । तीं चतुर्लक्ष बत्तीस सहस्रें । वर्षें मानवांचीं निर्द्धारें । गणनासूत्रें होताती ॥ ४४ ॥ जेव्हां मघांहून पूर्वाषाढे । जाती सप्तर्षि निवाडें । तेव्हां कळिप्रसिद्धीचे पवाडे । गाजती गाढे भूमंडळी ॥ ४५ ॥ जों-पर्यंत श्रीकृष्णभानु । होता भूनभीं देदीप्यमान । तोंवरी कळिध्वान्त निपटून । नव्हतें हीन अणुमात्र ॥ ४६ ॥ जेव्हां कृष्ण गेला वैकुण्ठासी । तैंहूनि प्रवृत्ति कळिधर्मासी । पृथ्वी अधिष्ठिली दोषीं । जन पापासी वश जाले ॥ ४७ ॥ तथापि पंधरा शताब्दें पूर्ण । ऊर्ध्व गोलियावरीही कृष्ण । प्रबळ कळीचेन होय जाण । कीं क्षात्रशासन करूनियां ॥ ४८ ॥ मग वाढेल दिवसेंदिवस । उच्छेद धर्माचा निःशेष । मोडिती पाखंडें सत्पथांस । जन अनुचितास अनुसरती ॥ ४९ ॥ क्रमल्या दिव्यसहस्राब्दें । उपरि चौ वर्षान्तीं मोदें । कृतयुगारंभ पूर्वानुविधें । जैं मानसें शुद्धें जनांचीं ॥ ६५० ॥ म्हणाल दिव्य द्वादशशत । वर्षें कलियुग हें परिमित । सहस्रान्तींच कैसे कृत । होईल निश्चित अलीकडे ॥ ५१ ॥ तरी कळिप्रचुर सहस्र वर्षें । उरलीं दोन शतें जीं शेषें । तो संध्यासमय युगयोगांशें । उदित प्रकाशें कृताच्या ॥ ५२ ॥ तैं कळिकाळाचा केवळ ह्रास । कृतधर्म प्रकटती अशेष । यास्तव तैंहून कृतयुगास । प्रारंभ ऐसें जाणिजे ॥५३॥ प्रत्यक्ष सूर्योदयापूर्वी । दोनी घटिका दिनोदय जेंवी । तैं अह्निकीं वर्तिजे सर्वी । सुकृतप्रभवीं तो काळ ॥ ५४ ॥ तैसेंचि हेंही जाणावें । शोधकीं धिषणागौरवें । आधीं ही चौ अब्दान्तीं प्रभवें । कळि-प्रभावें पापात्मकें ॥ ५५ ॥ अंतीं चतुर्थोत्तर सहस्र । अब्दें क्रमिलियानंतर । कळि उपशमें पापप्रचुर । पुढें प्रचार कृताचा ॥ ५६ ॥ शुकें हें नृपा कथिल्यावरी । सृष्टिपरिणाम सविकारी । सांगे उद्देशें निर्द्धारीं । विरक्तिकारी विवेकियां ॥ ५७ ॥ म्हणें राया हा मानववंश । तुज म्यां सांगितला अशेष । विप्रक्षात्रादि सविशेष । जैसा प्रवृत्त युगीं युगीं ॥ ५८ ॥ तो अवघाचि पावला नाश । त्यामाजि नामाङ्कित जे विशेष । पुण्य प्रतामें आगळे पुरुष । शौर्यें पौरुषें औदार्यें ॥ ५९ ॥ त्यांची कीर्ति मात्र राहिली येथ । कथा उरल्या कथावयार्थ । परि राजसंतानादि समस्त । पावले अस्त संपूर्ण ॥ ६६० ॥

म्हणसी पुन्हा कृतोदयीं । वर्णव्यवस्था सान्वयीं । कैसी वर्तेल यथान्यायीं । भविष्य तेंही ऐसें असे ॥६१॥

देवापिः शन्तनोर्भ्राता मरुश्चेक्ष्वाकुवंशजः । कलापग्राम आसाते महायोगबलान्वितौ ॥ ५३ ॥

सोमवंशज नृप देवापी । सूर्यवंशज मरु प्रतापी । महायोगबळें निर्विकल्पी । असती कलापग्रामांत ॥ ६२ ॥ योगेश्वरांचा जो निवास । कलापग्राम नाम त्यास । जैं कल्की होय जगन्निवास । दुष्पथांस संहर्त्ता ॥६३॥ तैं कलियुगाचिये प्रान्तीं । कृतयुगाचिये आदिस्थिती । तया वासुदेवाज्ञेनें पुढती । उभयतां येती भूमंडळीं ॥६४॥ ते यथापूर्ण वर्णाश्रम । प्रवर्त्तवितील उक्तागम । एवं चौं युगांचे अनुक्रम । वर्तती विषम नृपाळा ॥ ६५ ॥ राया जितुके प्रतापशीळ । कथिलें तुजला अवनीपाळ । भूमीचे ठायीं ममता पघळ । करूनि सकळ निमाले ॥६६॥ मत्पूर्वजीं हे भोगली । म्यांही बळें अनुशासिली । पुढें पुत्रादि भोगिती वहिली । हें मानूनि गेली नृपराजि ॥ ६७ ॥ पंचभूतात्मक देहाकार । मी आणि माझी इळा समग्र । भावूनि मूढीं ते मृत्युतंत्र । दोन्ही मृद्विकार सांडिले ॥ ६८ ॥ राजसंज्ञा जया देहा । जया पोषिते पावूनि मोहा । त्याचे कृमि कीं पावतां दाहा । भस्महीं पहा परिणाम ॥ ६९ ॥ तस्मादेहभावें अहंता ममता । धरणें मूढत्वें विष्णुराता । हें द्वितीयाध्यायीं श्रीशुक वक्ता । जाला कथिता नृपतीतें ॥ ६७० ॥ पृथ्वी आपुले ठायीं ममता । देखोनि नृपाची विस्मिता । उपहासे जाणोनि मूढता । जे वास्तव स्वहिता विसरले ॥७१॥ जलधिवेष्टित जिंकूनि पुरी । इच्छिती जिंकूं समुद्रांतरीं । परि मोघ घडे कामना सारी । काळा उदरीं पडतांची ॥ ७२ ॥ पृथु पुरूरवा गाधि । नहुष भरतार्जुन सुधी । सगर मान्धाता पुण्यनिधि । राम सद्विधि प्रतिपादिता ॥ ७३ ॥ खट्वाङ्ग धुन्धुहा आणि रघु । इक्ष्वाकुहूनि शर्याति लवु । तृणबिन्दु ययाति गय नृगु । शंतनु आणि भगीरथ ॥ ७४ ॥ ककुत्स्थ कुवलयाश्व नैषध । हिरण्यकशिपु सुरविरुद्ध । लोकां रडवितां रावण अबुध । वृत्र प्रसिद्ध ब्रह्मिष्ठ ॥ ७५ ॥ नमुचि आणि शंबरासुर । हिरण्याक्ष दितीचा पुत्र । भौम नामक महा क्रूर । तारक विचित्र पराक्रमी ॥ ७६ ॥ इत्यादि आणिकही बहुत । ऐश्वर्यवंत राजे दैत्य । सर्वही शूर सर्वजित । अपराजित सर्वज्ञ ॥ ७७ ॥ परि ममताबद्ध कामाङ्कित । शेवटीं अपूर्णमनोरथ । कालाग्निवदनीं तृणवत । पडिले कृतार्थ न होतां ॥७८॥ तयांच्या कथामात्रचि राहिल्या । ज्यां म्यां नृपा तुजला कथिल्या । परंतु कोण्ही दावावयाला । नाहीं उरला भूमंडळीं ॥ ७९ ॥ तस्मात् देहादि विभव नाशवंत । तुज व्हावया प्रतीतिगत । बोलिलों मृतकथा या प्रशस्त । कारण येथ इतुकेंची ॥ ६८० ॥ संसार निःसार हा केवळ । कळावया हें ऐकिजे पघळ । वांचूनि मोक्षदानी नव्हे निखळ । वैराग्य सबळ यांचेन ॥ ८१ ॥ तरी पारमार्थिक कोणतें कथन । ऐसें पुससी जरी निक्षुण्ण । जेणें समूळ तुटे जन्ममरण । तें सावधान परियेसीं ॥ ८२ ॥

यस्तूत्तमश्लोकगुणानुवादः सङ्गीयतेऽभीक्ष्णममङ्गलघ्नः ।
तमेवनित्यं शृणुयादभीक्ष्णं कृष्णेऽमलां भक्तिमभीप्समानः ॥ ५४ ॥

जो उत्तम श्लोकगुणानुवाद । तुज म्यां कथिला श्राव्य विशद । तोचि निरंतर गायिजे शुद्ध । त्यांतेंचि अखंडित ऐकिजे ॥ ८३ ॥ कृष्णीं इच्छी अमळ भक्ति । तेणें तद्गुणानुवादचि प्रीती । गावा

ऐकावा दिवाराती । कीं अमंगळ नाशीं साद्यंत ॥ ८४ ॥ अमंगळ जें जन्मादिदुःख । समूळ संहारी निःशेख । श्रीकृष्णाचें चरित सम्यक । निश्चयात्मक नृपाळा ॥ ८५ ॥ यावरी मुनीन्द्रा पुसे परीक्षिती । कीं कळी माझारी जे जन्मती । ते कळिदोषा केंवि निस्तरती । उपाय निश्चिती मज सांग ॥ ८६ ॥ युगें आणि युगधर्म पृथक । कवण्या प्रकारींचे सकळिक । हेंहि उमजवीं मज सम्यक । विशद नावेक कृपेनें ॥ ८७ ॥ प्रश्न ऐकूनि ऐसा मुनी । वदे नृपातें कृपा करूनी । म्हणे ऐक राया चित्त देऊनि । तव प्रश्न दोन्ही सांगतों ॥ ८८ ॥ जाण धर्माचे चारी पाद । सत्य दया तप दान शुद्ध । इहीं करूनि धर्म प्रसिद्ध । वर्ते विशद कृतयुगीं ॥ ८९ ॥ सदा संतुष्ट करुणावंत । मैत्र समदर्शी शान्त दान्त । सुज्ञ क्षमस्वी आत्मरत । जन निवान्त ते काळीं ॥ ६९० ॥ त्रेतायुगीं धर्मपादांचा । चतुर्थांश भंगे साचा । सत्य तोडी अनृतवाचा । दयेतें हिंसा उपमर्दी ॥ ९१ ॥ असंतोषें तप क्षीण । विग्रहें ऱ्हास पावे दान । तैं कर्म आणि तपोनिष्ठ जन । साधिती पूर्ण त्रैवर्गिक ॥ ९२ ॥ द्वापरीं धर्मपाद चारी । क्षीण होती अर्द्ध निर्धारीं । तैं स्वाध्यायाध्ययनीं पुरी । आस्था अंतरीं द्विजांचे ॥ ९३ ॥ यशस्वी आढ्य कुटुंबी स्वस्थ । सर्वदा सुरार्चनीं निरत । ब्राह्मण क्षत्रिय वैश्य समस्त । तुष्ट निश्चित केवळ ॥९४॥ कलियुगीं चतुर्थ चरण । धर्म वर्तेल संक्षीण । अधर्महेतूंहीं संपूर्ण । तोही नाशेल शेवटीं ॥ ९५ ॥ तैं जन केवळ दुराचारी । निर्दय क्षुब्ध शुष्क वैरी । दुर्भग तृष्णावंत भारी । कार्तघ्न्यकारी मूढात्मे ॥ ९६ ॥ युगपरत्वें काळानुसार । पुरुषीं दिसती गुणविकार । तैसतैसा क्रियाप्रसर । पृथगाकार प्रवर्ते ॥ ९७ ॥ जेव्हां सत्वीं सर्वेन्द्रियें । वर्तती जनांचीं पुण्यमयें । तयीं ज्ञानास्था होये । तैं जाणिजे स्वयें कृतयुग ॥ ९८ ॥ जेव्हां काम्यकर्माचे ठायीं । भक्ति होय प्राणियां पाहीं । तैं रजोवृत्ति त्रिवर्गदायी । जाणिजे हृदयीं त्रेतायुग ॥ ९९ ॥ जेव्हां असंतोष लोभ दंभ । मान मत्सर मनीं स्वयंभ । काम्यकर्मींच अवलंब । तैं रजतममिश्र द्वापर ॥ ७०० ॥ जैं कपट लटिकें निद्रा तंद्रा । हिंसाविषादशोकादि वीरा । मोह दैन्य भय दरारा । कळि तो सारा तामस ॥ १ ॥ त्यामाजि क्षुद्रदर्शी मर्त्य द्वाड । करंटे आणिं बहु खादाड । कामी वित्तहीन उघड । पुंश्चळी उदंड कामिनी ॥ २ ॥ दस्यु उत्कृष्ट अन्यायवंत । आम्नाय पाखंडें दूषित । प्रजाभक्षक राजे व्रात्य । द्विज शिश्नोदरपरायण ॥ ३ ॥ व्रता वेगळे ब्रह्मचारी । शौचहीन अनाचारी । भिक्षु कुटुंबी निर्द्वारीं । ग्रामा भीतरी तपस्वी ॥ ४ ॥ संन्यासी ही अर्थलोलुप । तीक्ष्णभाषी शीघ्रकोप । पुण्यानुकारें करिती पाप । निरपत्रप शठ धूर्त ॥ ५ ॥ निंद्य व्यवसाय मानिती बरा । निर्धन पति सांडिती दारा । सांडूनि पितृभातृनिकरा । स्त्रीपरिवारा जन भजती ॥ ६ ॥ नीच घेती उत्तम वेष । जीविकेस्तव करिती दोष । उत्तम तेणें पावती भ्रंश । करिती उपदेश नीचोत्तमा ॥ ७ ॥ उत्तमासनीं अधर्मज्ञ । बैसोनि म्हणविती सर्वज्ञ । धर्म म्हणती कृतप्रतिज्ञ । झळकविती अज्ञ-जनांप्रति ॥ ८ ॥ पाखंडी नीच गुरुत्वें मान्य । उत्तम शिष्यत्वें त्यांलागून । भजती ऐसें कलिमहिमान । अत्यंत हीन नारकी ॥ ९ ॥ कपर्दिकेसाठीं जन । भांडूनि सांडिती सुहृद पूर्ण । आप्त जिवलग केवळ प्राण । टाकिती क्षोभून स्वार्थास्तव ॥ ७१० ॥ वृद्धपितरांतें ही सहज । न रक्षिती सहसा मनुज । राखिती शिश्नोदराची वोज । विषयभोज नाचविती ॥ ११ ॥

राया परम गुरु जो सर्वोत्कृष्ट । त्याचिया चरणारविन्दा प्रकट । त्रैलोक्यनाथ ही वंदिती श्रेष्ठ । पूर्णाभीष्ट लक्षूनी ॥ १२ ॥ त्या भगवंता अच्युतातें । कळीचे जन सांडूनि चित्तें । पाखंड मतें क्षुद्र दैवतें । भजती आर्त्तें बहुतेक ॥ १३ ॥

यन्नामधेयं म्रियमाण आतुरः पतन्स्खलन्वा विवशो गृणन्पुमान् ।
विमुक्तकर्मार्गल उत्तमां गतिं प्राप्नोति यक्ष्यन्ति नतं कलौ जनाः ॥ ५५ ॥

जयाचें नाम मंगळकर । अवचटें म्रियमाण आतुर । पडतां अडखळती विवशतर । घे जो नर कैसा तन्ही ॥ १४ ॥ रोगें जाला परम क्षीण । वपुवैकल्यें सौख्यहीन । तेणें दुःखें जाजावून । म्हणे नारायण सहजगति ॥ १५ ॥ किंवा अंतकाळीं प्राण । व्याकुळ होती सोडितां स्थान । तये वेदनेनें पैं श्रमून । स्मरे निर्विण्ण रामकृष्ण ॥ १६ ॥ अथवा चालतां पडला भूवरी । कीं अडखळतां विशेष भारीं । आंगें ठेंसलीं भूविकारीं । तेणें हरि हरि जन्ही म्हणे ॥ १७ ॥ तरी ते प्राणि दुःखप्रचुर । तत्काळ कर्मबंध जो दुर्धर । तेथूनि सुटे जड पामर । पुन्हा संसार न भोगी ॥ १८ ॥ संचित प्रारब्ध क्रियमाण । त्रिविधकर्मात्मक बंधन । तो मुक्त होय तयापासून । नामस्मरण करितांची ॥ १९ ॥ त्यावरी उत्तमगतीतें पावे । ऐसा महिमा ज्याचा स्वभावें । त्या पुरुषोतमातें हीनदैवें । जन कळीचे न भजती ॥७२०॥

पुंसां कलिकृतान्दोषान्द्रव्यदेशात्मसंभवान् । सर्वान्हरति चित्तस्थो भगवान्पुरुषोत्तमः ॥ ५६ ॥

जे द्रव्यदेशात्मसंभव । कलिकृत नरांचे दोष सर्व । तयांचे चित्तस्थ वासुदेव । सर्वथैव उपसंहरी ॥ २१ ॥ म्हणसी कैसेन हृदयीं स्थिर । होय परमात्मा रमाधर । कवण्या रीती दोष समग्र । नाशी प्रकार तो ऐका ॥ २२ ॥

श्रुतः सङ्कीर्तितोध्यातः पूजितश्चादृतोऽपि वा । नृणां धुनोति भगवान्हृत्स्थो जन्मायुताशुभम् ॥ ५७ ॥

नानाचरितानुवादें करून । जरि वैष्णवां मुखें ऐकिला पूर्ण । कीं अद्भुतकर्मात्मक गाऊन । कीर्तिला आपण सद्भावें ॥ २३ ॥ अथवा बैसूनियां एकान्तीं । एकवटोनि मानसवृत्ती । ध्यायिला प्रेमें चिन्मयमूर्त्ती । कीं पूजिला प्रीती आदरिला ॥ २४ ॥ एवं कवण्या तन्ही प्रसंगें हरी । भरला केवळ अभ्यंतरीं । नरांचें बहु जन्मांचें हरी । अशुभ निर्द्धारीं भगवान् ॥ २५ ॥ जेंवि सुवर्णाचिये ठायीं । अन्यधातुज दुर्वर्ण पाहीं । त्यातें अग्नि स्वसंगें दाही । हीनत्व कांहीं उरों नेदी ॥ २६ ॥ तेंवि अंतर्गत रमानाथ । जन्मादिकारण जें कां दुरित । तें अविद्येसह नाशी त्वरित । शुद्ध शाश्वत करी स्वयें ॥२७॥

विद्यातपः प्राणनिरोधमैत्र तीर्थाभिषेकव्रतदान जप्यैः ।
नात्यन्त शुद्धि लभतेऽन्तरात्मा यथा हृदिस्थे भगवत्यनन्ते ॥ ५८ ॥

याहूनि आणिक साधनें । बहुधा दैवतोपासनें । तपःप्राणसंरोधनें । तीर्थस्नानें मैत्री ही ॥ २८ ॥ नानाव्रतें दानें जप । इत्यादि केले जन्ही साक्षेप । तथापिहि इहीं निष्कंप । शुद्धि अनल्प न लभे कीं ॥ २९ ॥ जैसी हृदयस्थ श्रीअनंत । तद्भा जडतां अंतरांत । आत्मशुद्धि लाभे यथार्थ । नर निश्चित अविलंबें ॥ ७३० ॥ तस्मात सर्वप्रकारें राया । मनोवृत्ति एकवटूनियां । केशवा धरीं माजि हृदया । न करीं वायां बहुचिन्ता ॥ ३१ ॥

म्रियमाणैरभिध्येयो भगवान्परमेश्वरः । आत्मभावं नयत्यङ्ग सर्वात्मा सर्वसंश्रयः ॥ ५९ ॥

म्रियमाण जे मुमुक्षुगण । तिहीं ध्यायिजे श्रीभगवान । जेंवि अचिकित्स रोगा निदान । पीयूष पूर्ण निश्चयें ॥ ३२ ॥ मग तो अंतरात्मा परमेश्वर । वास्तवात्मभावा प्रति स्वैर । नेत असे गा अति सत्वर । मोह समग्र नाशूनी ॥ ३३ ॥ येथ न धरीं कांहींच संशय । न चले कळींत अन्योपाय । न फळे कांहीं ही साधनसोय । मोक्षकार्य साधावया ॥ ३४ ॥

कलेर्दोषनिधे राजन्नस्ति ह्येको महागुणः । कीर्तनादेव कृष्णस्य मुक्तबन्धः परं व्रजेत् ॥ ६० ॥

केवळ दोषनिधि नृपा हा कळी । तन्ही याचा गुण एक हा महद्बळी । कृष्णकीर्तनास्तवचि समूळीं । होय होळी दुरितांची ॥ ३५ ॥ भावें करितां कृष्णकीर्तन । सर्व बंधांहूनि मुक्त होऊन । परमपदाप्रति अभिन्न । जायिजे जाण निश्चयें ॥ ३६ ॥ परमपद जें परब्रह्म । सच्चिदानंद पूर्णकाम । होय अभेदें तो निःसीम । कीर्तनप्रेम ज्या हृदयीं ॥ ३७ ॥

कृते यद्ध्यायतो विष्णुं त्रेतायां यजतो मखैः । द्वापरे परिचर्यायां कलौ तद्धरिकीर्तनात् ॥ ६१ ॥

कृतयुगीं जो विष्णूतें ध्याय । त्यासी जें फळ प्रापणीय । त्रेतीं मखीं जो यजिता होय । तो जें पावें साफल्य ॥ ३८ ॥ कीं द्वापरीं परिचर्येनें । अर्चक पावे निजनिष्ठेनें । तें हरिकीर्त्तनास्तव जाणें । प्राप्त होय कळीमाजी ॥ ३९ ॥ कृतीं हरिप्राप्ति ध्यानें । त्रेतीं तेचि साङ्गयजनें । द्वापरीं केवळ अभ्यर्चनें । तेचि कीर्तनें कलियुगीं ॥ ७४० ॥ म्हणोनि साधकीं मुमुक्षुगणीं । न पडिजे नाना साधनीं । सुगमप्राप्ति हरिकीर्तनीं । मोक्षदानी हरीची ॥ ४१ ॥ हें मोक्षरहस्य संपूर्ण । तृतीयाध्यायीं निरूपण । केलें औत्तरेया निक्षुण्ण । पुढील कथन अवधारा ॥ ४२ ॥ आधीं तरी प्रळयचतुष्क । नित्य आणि नैमित्तिक । प्राकृतिक आणि आत्यंतिक । कथूनि सम्यक विस्तारें ॥ ४३ ॥ मग पुराणार्थ उपसंहरी । चतुःश्लोकीं मुनिवरस्वरी । तेचि निरूपणाची परी । सविस्तरी ऐसी असे ॥ ४४ ॥

एताः कुरुश्रेष्ठ जगद्विधातुर्नारायणस्याखिल सत्वधाम्नः ।
लीला कथास्ते कथिताः समासतः कात्स्न्र्येन नाजोऽप्यभिधातुमीशः ॥ ६२ ॥

शुक म्हणे भो कुरुवर श्रेष्ठ । जगद्विधाता जो वरिष्ठ । अखिलसत्वाचें धाम प्रकट । श्रीवैकुण्ठ नारायण ॥ ४५ ॥ तयाच्या लीलेचिया कथा । म्यां कांहीं एक तुज अद्भुता । समासें कथियेल्या आतां । ज्या अविदिता संपूर्ण ॥ ४६ ॥ परमायुषी आणि सर्वज्ञ । वडील सर्वांहूनि निपुण । तो ब्रह्माहि विस्तार पूर्ण । कथावया जाण असमर्थ ॥ ४७ ॥ तथापि आस्था देखूनि पुरती । बोलिलों स्वल्पसें यथामती । कीं तूं मुमुक्षु शुद्धमती । कैवल्याप्रति अधिकारी ॥ ४८ ॥ संसारनिरसना उपाय । पुसिला मज तां पावूनि भय । तो गदहरणीं अमृतप्राय । पाहूनि सोय कथिला म्यां ॥ ४९ ॥

संसारसिन्धुमतिदुस्तरमुत्तितीर्षोर्नान्यः प्लवोभगवतः पुरुषोत्तमस्य ।
लीलाकथारसनिषेवणमन्तरेण पुंसो भवेद्विविधदुःखदवार्दितस्य ॥ ६३ ॥

विविध तापत्रयंभूत । दुःखदावानळें पीडित । ऐसा नर जो परम विरक्त । क्लेशाभिभूत केवळ ॥ ७५० ॥ यास्तव दुस्तरभवासिन्धूतें । तरूं इच्छी अतितर आतें । त्यासि तारक साधन निरुतें । भगवत्कथेचें सेवन ॥ ५१ ॥ जो पुरुषोत्तमाचा कथारस । तोचि सेविजे अहर्निश । तेणेंचि तरिजे भव अशेष । यावीण नसे यत्नान्तर ॥ ५२ ॥ कथिल्यादारभ्य तात्पर्य । सम्यक हाचि मोक्षोपाय । तरी श्रीकृष्णकथारसमय । करीं हृदय आपुलें ॥ ५३ ॥ यावरी आतां कथनीय । कांहींच न राहिलें प्रमेय । सारासाराचें सेवनीय । कीर्ति अर्ह कृष्णाची ॥ ५४ ॥ हें जीवा पलाडील रहस्य । मम सद्गतीचें सामरस्य । गुरुसंप्रदायक्रमें शेष । लाधलें सारस्य नृपाळा ॥ ५५ ॥ अनन्य श्रद्धाळु विरक्त । तुज देखूनि कथिलें यथार्थ । ठेवीं जीवाचे जीवीं समस्त । पावसी निश्चित सद्गति ॥ ५६ ॥ परि तो देशिकान्वय आघवा । जीवीं सर्वदा आठवावा । तेणेंचि बोध बोधे बरवा । परमसेवा ही गुरूची ॥ ५७ ॥ यास्तव परंपरा आपुली । शुकें नृपातें निवेदिली । ते सावधानें परिसिली । पाहिजे सकळीं गुरुभक्तीं ॥ ५८ ॥

पुराणसंहितामेतामृषिर्नारायणोऽव्ययः । नारदाय पुरा प्राह कृष्णद्वैपायनाय सः ॥ ६४ ॥

नृपा ये पुराणसंहितेतें । नारदा कारणें वाक्यामृतें । पूर्वीं नारायणऋषि हितें । करुणाभरितें बोलिला ॥ ५९ ॥ तो कृष्णद्वैपायना कारणें । बोधिता जाला सिद्धवचनें । मग तो बादरायण कृपेनें । जो षड्गुणें विराजित ॥ ७६० ॥

स वै मह्यं महाराज भगवान्बादरायणः । इमां भागवतीं प्रीतः संहितां वेदसंमिताम् ॥ ६५ ॥

मज कारणें तो मत्पिता । हेचि भागवती संहिता । ईतें सप्रीति जाला कथिता । जे वेदसंमता निश्चयें ॥ ६१ ॥ ऐसी मजपर्यंत परंपरा । यया प्रबोधसंसारा । जाण महाराजा भूवरा । पुढील प्रसारा अवधारीं ॥ ६२ ॥

एतां वक्ष्यत्यसौ सूत ऋषिभ्यो नैभिषालये । दीर्घसत्रे कुरुश्रेष्ठ सम्पृष्टः शौनकादिभिः ।। ६६ ।।

ऐसें परीक्षितीतें शुक । बोलिला अन्वयें सम्यक । तंव सूत देखिला सम्मुख । होता ऐकत भागवत ।। ६३ ।। तयाकडे दावूनि बोट । म्हणे सूत हा भो कुरुश्रेष्ठ । पुढें नैमिषारण्यीं प्रकट । सांगेल श्रेष्ठ मुनिवरां ।। ६४ ।। दीर्घसत्रोद्यमें ऋषि । शौनकादिक तपोराशि । राहते होतील नैमिषीं । कलिदोषांसि निवारणा ।। ६५ ।। तेथें या पुसतील मोक्षोपाय । कळिकाळभीरु मुनिवर्य । तत्प्रश्नास्तव यथान्वय । परमसदय होत्साता ।। ६६ ।। हा ये भागवती संहितेतें । तये दीर्घसत्रीं स्वस्थचित्तें । मुनीकारणें कथील निरुतें । देखोनियां ते आर्त्तभूत ।।६७।। इतुके न हा अध्याय चौथा । द्वादशस्कंधींचा सर्वथा । समाप्ति पावला तत्वता । अग्रवृत्तान्ता अवधारीं ।। ६८ ।। पारमार्थिक जें कथनीय । तें सर्व कथिलें यथान्वय । तथापि दृढीकरणा प्रत्यय । सारांश अभय नृपा कथी ।। ६९ ।।

त्वं तु राजन्मरिष्येति पशुबुद्धिमिमां जहि । न जातः प्रागभूतोऽद्य देहवत्त्वं न नङ्क्ष्यसि ।। ६७ ।।

शुक म्हणे राया परीक्षिति । तूं हे निःशेष टाकीं पशुमति । ते कैसी पुससी जरि मजप्रति । तरी यथानिगुती अवधारीं ।। ७७० ।। तक्षकदंशें करूनि आतां । मी मृत्यु पावेन सर्वथा । हेचि पशु-बुद्धि तत्वता । मौर्ख्यें मूढता प्रत्यक्ष ।। ७१ ।। नव्हे जो आत्मज्ञ अज्ञान । तो नर होत्साता पशुसमान । मी जन्मलों आहें मरेन । हें मानी आपण देहत्वें ।। ७२ ।। ऐसी पशुबुद्धि केवळ । तूं संपूर्ण टाकीं समूळ । नाशोत्पत्ति देहा निखळ । आत्मा निश्चळ शाश्वत ।। ७३ ।। तूं देह नव्हसी देहसाक्षी । अलिप्त दैहिकविकारपक्षीं । तत्त्वमस्यादि वाक्यलक्षीं । तूं अविनाशी परब्रह्म ।। ७४ ।। देह पूर्वीं नसतां आतां झाला । नाश पावे निश्चयें वहिला । तैसा नव्हसी तूं सन्मयशीळा । चैतन्य सगळा तत्साक्षी ।। ७५ ।। तूं देह नसतां वर्ततां जातां । सन्मात्रत्वें स्वयें पुरता । अनाद्यनंत तत्वता । उत्पत्तिनाशताविरहित ।। ७६ ।। अविद्यायोगें अज्ञानत्वें । त्वां देह मी भावूनि सत्यत्वें । अनेक देह धरिले दैवें । भोगगौरवें भ्रमूनी ।।७७।। तो तूं देह नव्हसी देहधारी । परि अज्ञानत्वें जीवविकारीं । प्रविष्ट जालासि निर्द्धारीं । तो भ्रम अव्हेरीं स्वबोधें ।। ७८ ।। सच्चिदानंद स्वयंबोध । शुद्ध आत्मा तूं एवंविध । आपणा जाणूनि भ्रमविरुद्ध । सार्डीं निषिद्ध मृत्यूचा ।। ७९ ।। मग वास्तवबोधें अतःपर । बीजाङ्कुरवत अन्वयपर । होऊनि नव्हसी देहाकार । पुत्रपौत्रादि स्वरूपें ।। ७८० ।। आत्मा पुत्रनाम तूं अससी । शरदःशतं वांच ऐसी । श्रुति प्रतिपादितां कैसी । होय आपैसी निवृत्ति ।। ८१ ।। ऐसें म्हणसी जरि नृपाळा । तरि देहापासूनि देहमाळा । अन्वीयमान होय सकळां । परि आत्मा वेगळा देहाहून ।। ८२ ।। यास्तव तूं पुत्रादिरूपें । न जन्मसि बोधानुकल्पें । जेंवि काष्ठीं भिन्न अनळकल्पें । तेंवि तूं देहापें देहातीत ।। ८३ ।। येच विषयीं उपपत्ति । ऐकें राया परीक्षिति । जैसा निन्दित आपणा प्रति । मृत निश्चिती देखतसे ।। ८४ ।। स्वप्नीं देहाचा शिरच्छेद । जाहला हें पाहे विध । तस्मात् तो पाहता सिद्ध । आत्मा प्रसिद्ध अजरामर ।।८५।। या कारणास्तव नरेशा । देहोपाधिक जीवदशा । भ्रमें तादात्म्य पावूनि सहसा । तज्जन्मनाशा स्वीकारी

॥ ८६॥ ते आत्मज्ञानें भ्रमनिवृत्ति। जालिया होय सत्प्रतीति। तेव्हां देह निमाल्या स्वयंज्योति। जीव तो स्वस्थिति परब्रह्म ॥ ८७ ॥ जैसें घटावच्छिन्न घटाकाश। तें घट भंगल्या महदाकाश। यथापूर्व होय अशेष। तेंवि जीव परेश स्वानुभवें ॥ ८८ ॥ म्हणसी जीवासी संसार। प्राप्त कैसेन हा सविकार। तरि देह गुणकर्मे समग्र। सृजी विचित्र मानस ॥ ८९ ॥ त्या मनातें सृजी माया। मायेस्तव संसृति यया। जीवासि होय ऐसिया। जाण अन्वया अनुक्रमें ॥ ७९० ॥ जेंवि स्नेहाधिष्ठानवाती। आणि अग्निसंयोग निगुती। तेव्हां दीपासि दीपत्वप्राप्ति। एवं समूहाकृति भव असिका ॥ ९१ ॥ त्रिगुण-वृत्तीनें अवग्र। होऊनि नाशतसे साकार। तेथ आत्मा अलिप्त अजस्र। व्यक्ताव्यक्त पर स्वयंज्योति ॥ ९२ ॥ स्वसत्ते करूनि गगना परी। आधार सकळां ही सर्वत्रीं। ध्रुव अनंत निर्विकारी। अनुपम निर्द्धारीं ज्ञप्तिमात्र ॥ ९३ ॥

एवमात्मानमात्मस्थमात्मनैवामृश प्रभो। बुद्ध्यानुमानगर्भिण्या वासुदेवायनुचिंतया ॥ ६८ ॥

ऐसा देहामाजि देहातीत। आपुले न आपणा निश्चित। सयुक्तबुद्धीनें यथार्थ। विचारीं समर्थ प्रभुवर्या ॥ ९४ ॥ देहाद्युपाधींचा जाणता। मी ज्ञप्तिमात्र द्रष्टा तत्वता। तें दृश्य मी नव्हें सर्वथा। एवं जाण आत्मता व्यतिरेकें ॥९५॥ वासुदेवाच्या अनुचिंतनें। स्वरूप बोधतां पूर्णपणें। अज अव्यय अमृतगुणें। अभयलक्षणें आथिसी ॥ ९६ ॥

चोदितो विप्रवाक्येन न त्वां धक्ष्यति तक्षकः। मृत्यवो नोपधक्ष्यन्ति मृग्यूनां मृत्युमीश्वरम् ॥ ६९ ॥

तरी ऐसा जो तूं चिन्मयरूप। देहातीत ज्ञानप्रदीप। तया तूतें तक्षक सर्प। न दही प्रेरिला द्विजवाक्यें ॥ ९७ ॥ मृत्यूचा ही केवळ मृत्यु। काळात्मा जो ईश्वर सत्यु। त्यातें न जाळिती मृत्यु अनित्यु। कीं अधिष्ठानभूत तो सर्वां ॥ ९८ ॥ नभामाझारी अग्नि जैसा। पावे तया जाळी सहसा। परंतु जाळी विहायसा। घडे हा कैसा प्रकार ॥ ९९ ॥

अहं ब्रह्म परन्धाम ब्रह्माहं परमं पदम्। एवं समीक्षन्नात्मानमात्मन्याध्याय निष्कले ॥ ७० ॥

म्हणोनि वास्तवबोधें राया। तूं ऐसें चिन्तिसी आपणया। कीं जो मी अहंपणें ये प्रत्यया। तो मी ब्रह्म परंधाम ॥ ८०० ॥ जेथ सर्वांचें अवसान। संकल्पांचें अस्तमान। ज्ञानाज्ञानातीत पूर्ण। मी चिद्घन ज्ञप्तिमात्र ॥ १ ॥ आणि उत्कृष्ट पद जें कथनीय। सर्वाद्यबोधीं वेदनीय। तें आपणाहूनी परोक्ष होय। ऐसी सोय न भावीं ॥ २ ॥ श्रुतिस्मृतींहीं वाखाणिलें। ब्रह्मादिऋषींहीं ध्यायिलें। तें ब्रह्म मी निर्वाळलें। अनुभववळें जाण तूं ॥ ३ ॥ घटाकाश महदाकाश। पृथक्सामान्यविशेष। घटाभावीं भिन्नत्व त्यास। कैंचा पैस बोलावया ॥ ४ ॥ जीव केवळ शोकाभिभूत। अज्ञानयोगें उपाधिग्रस्त। वास्तव मी ब्रह्म कळता स्वस्थ। शोकनिवृत्त स्वयें होय ॥ ५ ॥ ब्रह्म मी या साक्षात्कारें। परोक्षत्व निवृत्तिनिर्द्धारें।

अपरोक्षप्रत्ययें ब्रह्माकारें । भेदनिवारे निःशेष ॥ ६ ॥ ऐसिया विचारें राजेन्द्रा । आपणा पाहूनियां धीरा । निष्कळ परब्रह्मीं पुरा । प्रवेशें बरा निरंतर ॥ ७ ॥

दशन्तं तक्षकं पादे लेलिहानं विषाननैः । न द्रक्ष्यसि शरीरं च विश्वं च पृथगात्मनः ॥ ७१ ॥

तेव्हां निर्विकल्पस्वरूपस्थित । तुज जालिया दृश्य समस्त । आठवेनाच बहिर्भूत । देहासहित कांहीं ही ॥ ८ ॥ तक्षक येऊनियां आपण । विषाननें करूनि तीक्ष्ण । डसेलच धरणीं जन्हि जाण । कीं चाटील पूर्ण तव देहा ॥ ९ ॥ तन्ही तूं तया तक्षकातें । अथवा आपल्या देहातें । किंवा संपूर्ण विश्वातें । आपणा वेगळें न पाहसी ॥ ८१० ॥ अवघा तूंचि तूं ओतप्रोत । परिपूर्ण अंतर्बाह्यातीत । तेथें कैंची दुर्मृत्युमात । आनंदभरित अक्षय तूं ॥११॥ सर्पा आंगींची त्वचा जैसी । पडतां भंगतां जळतां त्यासी । नाठवेचि केवळ तैसी । काया आपैसी तुजलागीं ॥ १२ ॥ इतुका नृपातें निर्वाणबोध । श्रीशुकें केला परमशुद्ध । अभय दाविलें परमपद । देहादि विरुद्ध निरसूनी ॥ १३ ॥ यावरी शिष्याची कृतार्थता । परीक्षावया शुक तत्त्वता । जाला तयातें स्वयें पुसता । तें ही श्रोतां परिसावें ॥ १४ ॥

एतत्ते कथितं तात यथाऽऽत्मा पृष्टवान्नृप । हरेर्विश्वात्मनश्चेष्टां किं भूयः श्रोतुमिच्छसि ॥ ७२ ॥

शिष्यस्नेहें कळवळून । परीक्षितीतें शुक भगवान । म्हणे बापा नृपाळा प्रश्न । मज लागून त्वां केला ॥ १५ ॥ विश्वाचा जो आत्मा हरि । त्याचें चरित्रें सविस्तरीं । पुसता जालासि तूं ज्या परी । प्रेमा अंतरीं धरूनियां ॥ १६ ॥ तें हें कथिलें तुजकारणें । यावरी पुनः काय श्रवणें । ऐकों इच्छिसी निजमनें । तीं तूं वचनें मज सांगें ॥ १७ ॥ इतुकें नृपातें पुसूनि शुक । तुष्णीम्भूत जाला सम्यक । येथ पंचमाध्याय निष्टंक । जाला अशेख समाप्त ॥ १८ ॥ या वरी श्रीशुकातें नृपती । पुसलियाचें उत्तर निगुती । कृतार्थपणें देत सुमती । तें शौनकाप्रति सूत कथी ॥ १९ ॥

एतन्निशम्य मुनिनाभिहितं परीक्षिद् व्यासात्मजेन निखिलात्मदशासमेन ।
तत्पादपद्ममुपसृत्य नतेन मूर्ध्ना बद्धाञ्जलिस्तमिदमाह स विष्णुरातः ॥ ७३ ॥

सूत म्हणे भो भो शौनकमुनी । ग्लौसमान तूं श्रोतृभगणीं । भगवद्गुणश्रवणगगनीं । प्रेमज्योत्स्नीं विराजसी ॥ ८२० ॥ तरी ऐकें पुढील अभिप्राय । जेंवि मात्रा देऊनि अनामय । वैद्यें पुसतां आनंदमय । सांगता होय विगतगद ॥ २१ ॥ तेंवि हें कथिलें व्यासात्मजें । निखिलात्मदृशें पुण्यपुञ्जें । महापुराण करुणाबोजें । अभयकाजें भवहंतें ॥ २२ ॥ तेणें निर्भय जाला राव । ऐसा अंतरीं कळला भाव । तथापि पडताळावया अनुभव । शुकें सगौरव पडखळिलें ॥ २३ ॥ ऐकूनि परीक्षिति सद्भावें । माथा लपवूनि सप्रेमजवें । मग त्या नम्रशीर्षें देवें । तत्पदराजीवें स्पर्शिलीं ॥ २४ ॥ एवं चरण वंदूनि

शिरीं । बद्धाञ्जलि नम्रप्रकारीं । श्रीशुकाप्रति निजनिर्द्धारीं । वदला वैखरी विष्णुरात ॥ २५ ॥ तें तयाचें प्रतिभाषण । जेंवि तृप्तोद्गार सुप्रसन्न । श्रोतीं परिसावें सावधान । निजसमाधान परिसतां ॥ २६ ॥

॥ राजोवाच ॥ सिद्धोऽस्म्यनुगृहीतोऽस्मि भवता करुणात्मना । श्रावितो यच्च मे साक्षादनादिर्निधनोहरिः ॥७४॥

नृप म्हणे भो सद्गुरुनाथा । परम सदया विपश्चिता । तव प्रसादें कृतकृत्यता । आत्मपूर्णता लाधलों ॥ २७ ॥ होतों देहात्मभावें गुणग्रस्त । तुवां करुणात्मनें अनुग्रहीत । जालों म्हणोनि कृतकृत्यार्थ । भवनिवृत स्वबोधें ॥ २८ ॥ कीं सकळ जीवांचें कारण । श्रीहरि जो अनादि निधन । मज ऐकविला संपूर्ण । प्राप्तिसाधन समवेत ॥ २९ ॥ हा तुमचे कृपेचा महिमा । वर्णितां न लगे सहसा सीमा । कीं तुमच्या कृपेनें जीवां अधमां । सच्चिदात्मा अवगमे ॥८३०॥

नात्यद्भुतमहं मन्ये महतामच्युतात्मनाम् । अज्ञेषु तापतप्तेषु भूतेषु यदनुग्रहः ॥ ७५ ॥

परि अत्यद्भुत मी न मनीं । महंता अच्युतात्म्याची करणी । कीं अनुग्रह करणें अज्ञानजनीं । तापत्रयाग्निसंतप्तीं ॥३१॥ म्हणाल कोण्या हेतुस्तव । तरि जे करुणेचेचि सावेव । आर्तिहरण सहजस्वभाव । ज्यांचा सदैव केवळ ॥ ३२ ॥ सहज उगवूनियां तमारी । जगाचें अंधत्व जैसें वारी । प्रकाशें केवळ देखणें करी । स्वाधिकारीं प्रवर्तवी ॥ ३३ ॥ कीं गंगा वाहोनि पवित्र जळीं । पाप ताप जगाचें समूळीं । निवारूनि पुण्यबहळीं । त्रिदशमेळीं वंद्य करी ॥ ३४ ॥ हें नैसर्गिक सामर्थ्य याचें । तेंवि सहजशीळ महंतांचें । दुःखनिरसनें प्रबोधें साचें । भवभीतांचें आविद्यक ॥ ३५ ॥ अभीष्टोत्तरीं या अनुमोदून । शुकाचार्यातें नृप सज्ञान । पुन्हा तदनुग्रहलक्षण । कृतार्थपण स्वयें कथी ॥ ३६ ॥

पुराणसंहितामेतामश्रौष्म भवतो वयम् । यस्यां खलूत्तमश्लोको भगवाननुवर्ण्यते ॥ ७६ ॥

स्वामी ये पुराणसंहितेतें । तुम्हांपासूनि सप्रेमचित्तें । परिसता जालों दैवोर्जितें । निजाभयातें वांछूनी ॥ ३७ ॥ कैसे परीची हे संहिता । जीमाजि संपूर्ण रमाभर्ता । षड्गुणैश्वर्य अधिष्ठिता । विधातृजनिता परमात्मा ॥ ३८ ॥ श्रेयस्करा उत्तम कीर्ति । जयाच्या तारक भवावर्ती । तो उत्तमश्लोक ब्रह्ममूर्ति । सगुण निर्गुण वर्णिजतो ॥ ३९ ॥ तो ऐकोनी सर्वान्तरात्मा । निरसलों देहाभिमानभ्रमा । वास्तव आपुल्या पावूनि वर्मा । त्रिविधकर्मा विरहिता ॥८४०॥

भगवंस्तक्षकादिभ्यो मृत्युभ्यो न बिभेम्यहम् । प्रविष्टो ब्रह्मनिर्वाणमभयं दर्शितं त्वया ॥ ७७ ॥

आतां भगवंता भो मुनिवरा । तक्षकादिकां मृत्युनिकरां । पासूनि न धरीं मी भेदरा । निर्भय पुरा जाहलों ॥ ४१ ॥ कीं तुवां निर्वाण अभय । दाविलें ब्रह्म सच्चिन्मय । तेथ अभेद मिसळलों स्वयें ।

अनादि ऐक्य उमजोनी ॥ ४२ ॥ म्हणसी केवळ निर्विकार । जालियावीण आत्मनिर्द्धार । अपराक्ष न घडेचि साचार । तो ही प्रकार अवधारीं ॥ ४३ ॥

अज्ञानं च निरस्तं मे ज्ञानविज्ञाननिष्ठया । भवता दर्शितं क्षेम परं भगवतः पदम् ॥ ७८ ॥

आत्मविषयीं जें अज्ञान । आणि तत्कार्यविकारभरण । निरसलें माझें संपूर्ण । प्रबोधीं स्वप्न जया परी ॥ ४४ ॥ कैसेन निरसलें अज्ञान । तरी तेही ऐकें प्रत्ययखूण । ज्ञानविज्ञाननिष्ठे करून । जालों परिपूर्ण सन्मात्र ॥ ४५ ॥ पिण्डब्रह्माण्डव्यतिरेकें । जीवशिवतत्त्व जाणिजे निकें । परोक्षज्ञानें हें विवेकें । नित्यानित्य कें यथास्थित ॥ ४६ ॥ घटमठमहदाकाशन्यायें । नव्हें मी जीव ब्रह्म स्वयें । हा अपरोक्षानुभव होय । विज्ञानसोय हे म्हणिजे ॥ ४७ ॥ इया ज्ञानविज्ञाननिष्ठेनें । पूर्णप्रत्ययें आथिलेपणें । निरसूनि अज्ञानपेखणें । स्वानंदघनें मी तुष्ट ॥ ४८ ॥ हा मज अभिनव तव प्रसाद । कीं तें भगवंताचें परम पद । तुवां दर्शिलें सच्चिदानंद । क्षेम विशुद्ध अक्षय ॥ ४९ ॥ इतुकें बोलूनि शुका प्रति । गुरुप्रेमें सोत्कंठ चित्तीं । भक्तियुक्तें होऊनि नृपति । पूजना निगुती प्रवर्तला ॥ ८५० ॥ सकळसभासदश्रेष्ठीं । सुरत्नजडितहेमपीठीं । मृद्वासनीं योगपीठीं । श्रीशुकयोगी उपविष्ट ॥ ५१ ॥ तयाचे गंगोदकीं चरण । प्रक्षाळूनि अतिपावन । हृदय नेत्र शिर स्पर्शून । परिमार्जन ठेविलें ॥५२॥ अर्घ्य पाद्य आचमन – । पूर्वक मधुपर्कविधान । संपादूनि नृप संपन्न । वस्त्रालंकरण समर्पी ॥ ५३ ॥ ध्यानमूळ गुरूची मूर्ति । पूजामूल गुरु म्हणती । मंत्रमूळ गुरूची उक्ती । कृपा निश्चिती मोक्षमूळ ॥५४॥ हें वर्म जाणोनि आधीं नृप । गंधाक्षता पुष्प धूप । दीप नैवेद्य समाक्षेप । फळ निष्कोप ताम्बूल ॥५५॥ दक्षिणा नीराजन चरणीं । समर्पूनि उपचारभरणीं । यावरी मूर्तीचे पूजनीं । नृप सज्ञानी प्रवर्ते ॥५६॥ अग्निधौत पीताम्बर । नेसविला अतिसुंदर । त्या वरी अर्पिलें ब्रह्मसूत्र । उत्तरीय वस्त्र निवेदिलें ॥ ५७ ॥ ललाटीं केशरी तिलक । त्रिपुण्ड्र रेखिला सम्यक । उपरि आरक्त सुरेख । लाविल्या सुटंक अक्षता ॥ ५८ ॥ मलयजचंदनाची उटी । ग्रीवोदरादि बाहुवटीं । चंद्रा समान देऊनि पाटीं । घातली कंठीं पुष्पस्रजा ॥ ५९ ॥ अनर्घ जडित कार्तस्वरीं । मुक्ताखचित विविधाकारीं । पृथगवयव अळंकारीं । केले सादरीं विराजित ॥ ८६० ॥ वैष्णवदशाङ्गधूप पुढें । ठेवूनि एकारति कोडें । प्रदीप्त उजळिली निवाडें । नादोत्कृष्टें घंटादिकें ॥ ६१ ॥ दिव्यपीयूषपरमरसाळें । नानापरीचीं शुद्ध फळें । नैवेद्यार्थ अर्पिलीं बहळें । परम सुज्ज्वळें सुगंधितें ॥ ६२ ॥ आरोगणानंतरें उदकें । करमुख क्षाळूनियां निकें । मुखशुद्धि दे प्रेमाधिक्यें । दक्षिणा विवेकें समर्पी ॥ ६३ ॥ आपणा सहित सर्वस्व । अहंताममतास्पद वैभव । अनन्यभावें तो नरदेव । दक्षिणा अभिनव समर्पी ॥ ६४ ॥ मग कर्पूरज्योतिनीराजन । करूनियां देदीप्यमान । त्रिप्रदक्षिणा सारून । साष्टाङ्गनमन बहु केलें ॥ ६५ ॥ कर पद जोडूनि अधोदृष्टी । स्तुतिस्तवनें मुनि वाक्पुटीं । पाववीला सुखसंतुष्टी । वचनाभीष्टीं नृपवरें ॥ ६६ ॥ भो भो स्वामी तूं सर्वस्व । तुजवीण आन न मनीं देव । अभयदाता तूं गुरुराव । स्वसुखवैभवप्रबोधनें ॥ ६७ ॥

तव कृपेस्तव कृतकृत्य । जालें निर्भय परमावृत । साधिला चतुर्थ पुरुषार्थ । न दिसे भव ब्रह्मत्वें ॥६८॥
या तुझिया कृपोपकारा । उत्तीर्ण नव्हे मी दातारा । आतां सर्वापराधनिकरा । तितिक्षा करा वात्सल्यें ॥ ६९ ॥

॥ सूत उवाच ॥ इत्युक्तस्तमनुज्ञाप्य भगवान्बादरायणिः । जगाम भिक्षुभिः सार्कं नरदेवेन पूजितः ॥ ७९ ॥

सूत म्हणे भो शौनकमुनि । ऐसा नरदेवें बादरायणि । मधुरोत्तरीं कृतकृत्यपणीं । आनंदभुवनीं पाविला ॥ ८७० ॥ आणि दिव्योपचारीं प्रेमें । पूजिला साङ्ग सपर्यानेमें । त्यानंतरें उठिला शमें । पदविक्रमें । चालियला ॥ ७१ ॥ तंव श्रवणार्थी भिक्षुनिकर । चालिला देखोनि शुक सत्वर । तत्सह निघाले परिघाकार । जाला अनुचर नृपति हि ॥ ७२ ॥ तयातें आज्ञा देऊनि वेगें । शुक भगवान पूर्णानुरागें । यतिवरांसह स्वच्छंदमार्गें । गेला स्वयोगें सुखरूप ॥ ७३ ॥

परीक्षिदपि राजर्षिरात्मन्यात्मानमात्मना । समाधाय परं दध्यावस्पन्दासुर्यथा तरुः ॥ ८० ॥

मग परीक्षिति ही राजर्षि । बैसोनि आसनीं ज्ञानराशि । आत्मनिश्चयें स्वमनासी । स्वयंप्रकाशीं प्रवेशवून ॥ ७४ ॥ अपरोक्षसाक्षात्कारबोधें । जीवशिवभेद सांडूनि मोदें । परब्रह्म्यातें संकल्परोधें । ध्याता स्वबोधें जाहला ॥ ७५ ॥ जीववृद्धि सांडूनि पुरती । ब्रह्मास्मिबोधें ब्रह्मस्थिती । समाधिस्थ जाला नृपति । व्युत्थानगति विवर्जित ॥ ७६ ॥ प्राणस्पंदन निःश्वासन । निःशेष राहिलें संपूर्ण । वृक्षासमान बद्धासन । बैसला निर्वाणयोगबळें ॥ ७७ ॥ कोठें कैसिया आसनावरी । बैसला नृपति ययापरी । पुसाल तरि ते गोष्टी पुरी । परिसा श्रोत्रीं संपूर्ण ॥ ७८ ॥

प्राक्कूले बर्हिष्यासीनो गङ्गाकूल उदङ्मुखः । ब्रह्मभूतो महायोगी निःसङ्गश्छिन्नसंशयः ॥ ८१ ॥

पूर्वेकडे करूनि अग्र । गंगातीरीं अतिपवित्र । दर्भ पसरिले यथाशास्त्र । बैसला त्यावर उदङ्मुख ॥ ७९ ॥ उत्तरेकडे करूनि तोंड । स्थिर राहिला योगारूढ । प्रकृतिसंग सांडूनि रूढ । जाहला वाड परब्रह्म ॥ ८८० ॥ ज्या आत्मज्ञानमात्र जालें । परि ब्रह्मीं मानस न वळलें । क्वचित्किंचित्सुख फावलें । योगी बोलिलें नाम तया ॥ ८१ ॥ केवळ तन्मयता निश्चळ । स्फुरणातीत अवस्था निवळ । उन्मनी पावला जो प्रांजळ । तो बोलिजे सुशीळ महायोगी ॥ ८२ ॥ ज्ञानें संशय-निवृत्ति प्रखर । विज्ञानें अपरोक्ष साक्षात्कार । ज्ञानविज्ञानसंपन्न सधर । महायोगेश्वर जाणा ॥ ८३ ॥ ऐसा परीक्षिति निःसंगी । छिन्नसंशय महायोगी । समाधिस्थ जाला वेगीं । परमविरागी हरिभक्त ॥८४॥ सैन्धवरवा सिन्धुमाजी । जेंवि पडतां दैवें सहजीं । तत्काळ भिन्नत्वा विसर्जी । चिन्मायुज्यीं तेंवि नृप ॥ ८५ ॥ ऐसें परीक्षितीचें निरूपण । श्रवणादि साक्षात्कारपूर्ण – । पर्यंत कथिलें विस्तारून । सूतें

प्रसन्न मुनिवरां ॥ ८६ ॥ तेंचि श्रोतयां महाराष्ट्रबोलें । यथा मूळोक्त निवेदिलें । यावरी सूतें उपसंहरिलें । वक्तृत्व भलें तें ऐका ॥ ८७ ॥

इति चोक्तं द्विजश्रेष्ठायत्पृष्टोऽहमिहास्मि वः । लीलावतार कर्माणि कीर्तितानीह सर्वतः ॥ ८२ ॥

शौनकादिकां मुनींकारणें । द्विजश्रेष्ठ या संबोधनें । अतिसप्रेमें सूत म्हणे । सद्भक्तिखुणे जाणोनी ॥ ८८ ॥ द्विजांमाजी तुम्ही श्रेष्ठ । कीं भगवद्गुणीं अतिसोत्कंठ । तरि द्विजश्रेष्ठ हो तुम्ही स्पष्ट । पुसिलें प्रकट मज येथ ॥ ८९ ॥ ती पूर्वोक्तप्रकारें सर्व । लीलावतारकर्में देव । जेंवि विचरला सप्रभाव । कीर्तिलीं अभयप्रदायकें ॥ ८९० ॥ सर्व कथनाचें निजसार । कलिमलनाशक मोक्षकर । हरिकीर्ति किंवा नाममात्र । अधिकारपांगविवर्जित ॥ ९१ ॥

पतितः स्खलितो वार्तः क्षुत्त्वा वा विवशो ब्रुवन् । हरये नम इत्युच्चैर्मुच्यते सर्वपातकात् ॥ ८३ ॥

पडला अडखळला कीं आर्त्त । शिकला जृम्भला विवशभूत । स्वभावें हरये नमः म्हणत । सुटे तो सर्व पापांहून ॥ ९२ ॥

संकीर्त्यमानो भगवाननंतः श्रुतानुभावो व्यसनं हि पुंसाम् ।
प्रविश्य चित्तं विधुनोत्यशेषं यथा तमोऽर्कोऽभ्रमिवाति वातः ॥ ८४ ॥

आणि साक्षेपें बुद्धियुक्त । कीर्तनें गाइला भगवंत । कीं साधुमुखें सप्रेमभरित । कीर्तिमंत परिसिला ॥ ९३ ॥ अवतारनाट्यें श्रीअनंत । लीलानुचरितें उदार बहुत । करिता जाला भक्तानुकरित । प्रतापयुक्त जगदात्मा ॥ ९४ ॥ ऐसा भजले सानुभाव । जे जे पुरुष धरूनि भाव । चित्तीं प्रवेशोनि त्यांचें देव । व्यसन सर्व दूर करी ॥ ९५ ॥ जन्ममरणादि भय दुर्धर । चित्तीं वसे जें निरंतर । तेंचि व्यसन अनिस्तर । जीवां अपार दुःखद ॥ ९६ ॥ तयां चित्तीं श्रीरमेश । श्रवणकीर्तनास्तव प्रवेश । करितां करी व्यसना नाश । दृष्टान्त यास परियेसा ॥ ९७ ॥ तमें ज्या परि भरलें नभ । तेथ उदेजतां चंडप्रभ । तमातें नाहीं करी स्वयंभ । पद्मनाभ तेंवि अघा ॥ ९८ ॥ परि या दृष्टान्तीं न्यूनता । कीं गुहागर्भींचें तम तत्वता । न निरसेचि त्याचेनि स्वता । माजी व्यवधानता म्हणऊनी ॥ ९९ ॥ यास्तव योजिला दृष्टान्त आन । कीं जैसा प्रचंड प्रभंजन । वारी अभ्रा न लगतां क्षण । तेंवि भगवान् व्यसनातें ॥ ९०० ॥

अविस्मृतिः कृष्णपदारविन्दयोः क्षीणोत्यभद्राणि शमं तनोति च ।
सत्त्वस्य शुद्धिं परमात्मभक्तिं ज्ञानं च विज्ञानविरागयुक्तम् ॥ ८५ ॥

श्रीकृष्ण परब्रह्ममूर्ति । तत्पदपद्माची अविस्मृति । जे नित्य अविस्मरणस्फूर्ति । अभद्रें सर्वेंही क्षीण करी ॥ १ ॥ शम म्हणिजे वृत्तिस्थैर्य । वासनामात्राचा जो क्षय । तयातेंही करिती होय । यमदमान्वय न साधितां ॥ २ ॥ अंतःकरणाची केवळ शुद्धि । परमात्मभक्ति यथाविधि । आत्मज्ञान सोऽहंसिद्धि । विज्ञानावधि सविराग ॥ ३ ॥ या सर्वांतें सुनिश्चित । पदस्मृति कृष्णाची हे करित । यास्तव सुबुद्धि स्वमनांत । हें कल्याणकृत न विसंबिजे ॥ ४ ॥ यश श्री औदार्य ज्ञान । वैराग्य ऐश्वर्यादि गुण । कृष्णस्मरणीं नांदती पूर्ण । सुखकल्याणप्रदायक ॥ ५ ॥

यूयं द्विजाग्र्या बत भूरि भागायच्छश्वदात्मन्यखिलात्मभूतम् ।
नारायणं देवमदेवमीशमजस्रभावाभजता विवेश्य ॥ ८६ ॥

यास्तव द्विजश्रेष्ठ हो तुम्ही । बहुपुण्यात्मे तपादि नियमीं । परमभाग्याचे निष्कामकामी । कीं पुरुषोत्तमीं अनुसरलां ॥ ६ ॥ इहपरकाम सांडूनि सर्व । सर्वान्तर्यामी वासुदेव । नारायण जो देवाधिदेव । ज्यां नाहींच देव आणिक ॥ ७ ॥ कोण्या हेतूस्तव म्हणाल जरी । तरी ईश सर्वांचा नियमनकारी । ऐसियातें निजान्तरीं । भजतां निर्द्वारीं प्रवेशवून ॥ ८ ॥ श्रीहरीचें वास्तवरूप । निजानुभवें निर्विकल्प । अभेदभावें आपेंआप । चिन्तूनि अकंप भजतात ॥ ९ ॥ धन्य धन्य तुमचें जन्म । धन्य धन्य तुमचें कर्म । धन्य धन्य तुमचें काम । कीं पुरुषोत्तमपर जालां ॥ ९१० ॥ आजि तुमचिया भाग्योत्तमा । सहसा नेणवे मातें उपमा । भजनें लंघिलें कलिमलछद्मा । कैवल्यधामा साधियलें ॥ ११ ॥

अहं च संस्मारित आत्मतत्वं श्रुतं पुरा मे परमर्षि वक्त्रात् ।
प्रायोपवेशे नृपतेः परीक्षितः सदस्यृषीणां महतां च शृण्वताम् ॥ ८७ ॥

आणि मजवरहि उपकार थोर । द्विज श्रेष्ठ हो तुमचा फार । जाला असे कीं हें सार । परमार्थर स्मराविलों ॥ १२ ॥ परम ऋषि जो श्रीशुकमुनी । परिसिलें तयाच्या मुखाहूनी । आत्मतत्व म्यां निज श्रवणीं । पूर्वीं रंगणीं संतांच्या ॥ १३ ॥ जैं प्रायोपविष्ट नृप परीक्षिती । तयाचे संसदीं यथानिगुती । ऐकत असतां महंत सुमती । तैं दैवोदितीं हें लाभलें ॥ १४ ॥ तें बहुतां दिवसांचें स्मराविलें । हरिकीर्तनोत्साहें निवाविलें । माझेंचि मजला दृढाविलें । मज जालें येणें बहु सुख ॥ १५ ॥ वनश्री जेंवि कां वनोदरीं । थोकली राहे जीर्णाङ्कुरीं । वसंतसंगें जयापरी । सुमनादिभारीं रूपा ये ॥ १६ ॥ ऐसें मुनिश्रोतयां सूत । प्रमोदूनियां तोषभरित । यावरी भागवताची तथ्य । महिमा कथित फळयुक्त ॥ १७ ॥ तेचि फळश्रुति आणि महिमा । कैवल्यदायक अत्युत्तमा । श्रोतीं परिसावी धरूनि प्रेमा । सांडूनि गरिमा आविद्यक ॥ १८ ॥

एतद्वः कथितं विप्राः कथनीयोरुकर्मणः । माहात्म्यं वासुदेवस्य सर्वाशुभविनाशनम् ॥ ८८ ॥

सूत म्हणे विप्र हो हें । उत्कृष्टकर्मा वसुदेवतनयें । त्या वासुदेवाचें माहात्म्य स्वयें । कथिलें कथनीय तुम्हांसि म्यां ॥१९॥ कथाया योग्य हेंचि कैसें । ऐसें कल्पाल जरि मानसें । तरी अशुभाचें आपैसें । नाशक असे महिम्न हें ॥ ९२० ॥ पाप ताप दुःख दरिद्र । शोक मोह अपयश क्षुद्र । अज्ञानादि अशुभमात्र । नाशक चरित्र हरीचें ॥ २१ ॥

य एवं श्रावयेन्नित्यं यामक्षणमनन्यधीः । श्रद्धावान्योऽनु शृणुयात्पुनात्यात्मानमेव सः ॥ ८९ ॥

ऐसें अखिल मंगळायतन । परमार्थ विधीनें याम क्षण । हें सद्भाविकां करवीं श्रवण । अनन्यधिषण जो कोण्ही ॥ २२ ॥ आणि श्रद्धावंत जो ऐके श्रोत्रीं । आस्था अंतरीं धरूनि पुरी । तो तत्काळ नर निर्द्वारीं । पवित्र करी आपणातें ॥ २३ ॥ जैसा वक्ता तैसाचि श्रोता । या भागवताचा भक्त पुरता । केवळ आपणातेंचि स्वता । करी सर्वथा पुनीत ॥ २४ ॥ स्नानादिकीं देहचि पूत । होय तैसें हें नव्हे निश्चित । साक्षात आत्मा चेतनानाथ । जो भ्रमें म्हणवीत मी जीव ॥ २५ ॥ तें जें आपुलें निजरूप । अविद्याविनाशें निष्कंप । सच्चिदानंद निर्विकल्प । श्रवणें पठनें करी नर ॥ २६ ॥ नित्य होतां श्रवण पठन । कळे नित्यानित्यविवेक पूर्ण । तेणें होय निजात्मज्ञान । जननमरणभय लोपे ॥२७॥ स्वप्नमाजि दुःखें नाना । जागृति उपाय तन्निग्रहणा । तद्वत उपाय निजमोक्षणा । आत्मज्ञानावीण नसे ॥ २८ ॥ स्वप्नश्रमाचा परिहार । जागृति जालिया उशीर । करावया न लगे किंचिन्मात्र । हेंहि स्वतंत्र तैसेंची ॥ २९ ॥ तेंचि आत्मज्ञान नव्हे सानें । तीर्थें यज्ञें तपें दानें । सगुणनिर्गुणश्रवणें पठनें । वांचूनि आनें केवळ ॥ ९३० ॥ म्हणाल अंतःकरणशुद्धीवीण । कैसें होईल निजात्मज्ञान । तें यज्ञादिक्रियेनें साधे पूर्ण । परी हिंसादि दूषण तेथ वसे ॥ ३१ ॥ जे जे सोपाधिक पुण्यक्रिया । ते ते पापेंवीण नये आया । देशकाळादि प्रत्यवाया । पाविजे विधिनिषेधीं ॥ ३२ ॥ तेथ पापपुण्याचें जोड फळ । बहुधा लाहिजे केवळ । तथापि विरळा पुण्यशीळ । अस्पृष्टमल निर्मळ ॥ ३३ ॥ यास्तव चित्तशुद्धि आणि ज्ञान । होती दोन्हीहि करितां पूर्ण । श्रीमद्भागवताचें सेवन । जाणा सर्वज्ञ श्रोते हो ॥ ३४ ॥ सगुणलीलावतारचरित्रें । नामें अनेकें अतिपवित्रें । ये ग्रंथीं कथिलीं जीं विचित्रें । तीं श्रोतृवक्त्रें सेवितां ॥ ३५ ॥ पाप आकल्प क्षणें नाशे । पुण्योत्कर्षें अपार पोपे । मग कथिलें येथ वास्तव जैसें । अपरोक्ष तैसें बोधा ये ॥ ३६ ॥ यास्तव श्रीमद्भागवताचा । वक्ता श्रोता स्वयेंचि साचा । घोट भरूनि अविद्येचा । पुनीत आपणा करितसे ॥ ३७ ॥ आतां पर्वादिविशेषें । महिमा ज्यापरि वाच्य असे । तोहि परिसा प्रेमोत्कर्षें । स्वस्थमानसें अमोघ ॥ ३८ ॥

द्वादश्यामेकादश्यां वा शृण्वन्नायुष्यवान्भवेत् । पठत्यनश्नन्प्रयतस्ततो भवत्यपातकी ॥ ९० ॥

विष्णुव्रतां माझारी थोर । द्वादशी एकादशी पवित्र । मोक्षमार्गींचें अग्रहार । किंवा वज्र अघनगा ॥ ३९ ॥ या पुण्यदिवशीं पढे ऐके । नियमाचरें पृथक्पृथकें । तेणें फळ होय तेंही आशिकें ।

कथितों निकें व्यासोक्त ॥ ९४० ॥ एकादशीचे पुण्यदिनीं । केवळ निराहारी असोनी । ऐके पढे आनंदोनी । होय तो जनीं अपातकी ॥ ४१ ॥ शुष्कें आर्द्रें सांसर्गिकें । महापापें उपपातकें । तीं सर्व श्रवणें पठनें ऐकें । नाशती विवेकें भ्रमापरी ॥ ४२ ॥ पारणा सारूनि द्वादशीसी । प्रयत होत्साता दिवानिशी । पढे ऐके जो विवेकराशी । होय तो विशेषी आयुष्मान् ॥ ४३ ॥ तयाचीं अपमृत्यादि विघ्नें । होती संपूर्ण ही भग्नें । राहे सर्वदा अरोगपणें । शुभलक्षणें विराजित ॥ ४४ ॥ म्हणाल अनन्यभक्ति करून । करितां श्रीभागवतसेवन । पारमार्थिक साधे पूर्ण । व्यवहारसाधन कैंवि घडे ॥ ४५ ॥ तरि तैसें नव्हे हें एकदेशी । मुक्तिमुक्तिद कल्याणराशी । येथ ऋद्धि सिद्धि तिष्ठती दासी । ऐका संक्षेपेंसीं ते गोष्टी ॥ ४६ ॥

देवता मुनयः सिद्धाः पितरो मनवो नृपाः । यच्छन्ति कामान्गृणतः शृण्वतो यस्यकीर्तनात् ॥ ९१ ॥

राजा जालिया कृपावंत । नियोगी करिती आदर बहुत । तेंवि येणें तुष्ट रमाकान्त । यास्तव समस्त आदरिती ॥ ४७ ॥ इंद्रादि देवता संपूर्ण । महर्षि आदि मुनि सर्वज्ञ । अर्यमादिक पितृगण । तैसेच मनु नरपति ॥ ४८ ॥ हे श्रीभागवताचा गाता ऐकता । तयाच्या सर्व कामांतें तत्त्वता । पुरविती सर्वथा न मागतां । भजती सर्वथा आस्थेनें ॥ ४९ ॥ कीं येथ भागवतीं हरिकीर्तन । तें हा निरंतर करी सुसेवन । जेथ कीर्तन तेथ भगवान । यास्तव संपूर्ण आदरिती ॥ ९५० ॥ श्रीभागवतोपजीवी नर । त्या न स्पर्शे दुःख दरिद्र । चाल्ही पुरुषार्थ अच्छिद्र । लाभे निरंतर यथेष्ट तो ॥ ५१ ॥ यास्तव श्रीभागवतीं प्रीती । जयासि जाली अनन्यरीती । त्या सुलभ सर्वार्थ वोळगती । हे निश्चयोक्ती निर्द्धारें ॥ ५२ ॥

पुराणसङ्ख्या सम्भूतिमस्य वाच्य प्रयोजने । दानं दानस्य माहात्म्यं पाठादेश्च निबोधत ॥ ९२ ॥

आतां पुराणसंख्यासंभूति । आणि येथींचें वाच्य यावत्समाप्ति । तेंविच प्रयोजन ही तुम्हां प्रति । कथितों सद्रीती यथार्थ ॥ ५३ ॥ आणि जैसें करावें याचें दान । आणि माहात्म्य दानाचें संपूर्ण । आणि पारायणाचें लक्षण । जाणा निक्षुण्ण मद्वचनें ॥ ५४ ॥ ब्रह्मपद्मविष्णुपुराण । शिवनारदमार्कंड वान्ह । भविष्यब्रह्मवैवर्त्ताभिधान । लिंगपुराण तें दाहावें ॥ ५५ ॥ वाराहस्कंदवामन । कूर्ममत्साख्य पुराण । गरुडब्रह्माण्डनामक पूर्ण । श्रीभागवत अठरावें ॥ ५६ ॥

एवं पुराणसन्दोहश्चतुर्ल्लक्ष उदाहृतः । तत्राष्टादशसाहस्रं श्रीभागवतमिष्यते ॥ ९३ ॥

ऐसा हा पुराणसमुच्चय । चतुर्लक्षसंख्याक होय । त्यामाजि श्रीभागवताह्वय । श्लोक सहस्र अष्टादश ॥ ५७ ॥

इदं भगवतापूर्व ब्रह्मणे नाभिपङ्कजे । स्थिताय भवभीताय कारुण्यात्सम्प्रकाशितम् ॥ ९४ ॥

पूर्वीं कल्पादिकाळीं विधि । हरिनाभिकंजीं रजोनिधी । जन्मला जैं प्रळयान्तसंधी । राहिला स्तब्धधी पद्मासनीं ॥ ५८ ॥ कांहीं नुमजेचिं परावर । जल मात्र अगाध सर्वत्र । मग निर्बुजला अधिकतर । भवभय घोर पावला ॥ ५९ ॥ ऐसिया ब्रह्मया कारणें । कारुण्यास्तव करुणापूर्णें । हें सम्यक्प्रकारें नारायणें । परमदयेनें प्रकाशिलें ॥ ९६० ॥ आतां श्रीमद्भागवतीं । वाच्य संपूर्ण यथानिगुती । तेंही परिसा सावधवृत्ती । संक्षेपोक्ती वरूनियां ॥ ६१ ॥

आदिमध्यावसानेषु वैराग्याख्यान संयुतम् । हरिलीलाकथाव्रातामृतानन्दितत्सुरम् ॥ ९५ ॥

आदि मध्यावसानीं येथ । आख्यानें जीं कथिलीं शस्त । तीं सर्वही वैराग्ययुक्त । श्रवणें विरक्त मन होय ॥ ६२ ॥ माजि हरिलीलासमूह । तेंचि अमृतरूप निःसंदेह । तेणें शिवादिसुरसमुच्चय । आनंदमय सर्वदा ॥६३॥ ऐसें सर्वानंदकर केवळ । जगत्पावन सार निखळ । श्रीमद्भागवत स्वानंदमूळ । ऐका प्रांजळ प्रयोजन ॥ ६४ ॥

सर्वं वेदान्तसारं यद्ब्रह्मात्मैकत्व लक्षणम् । वस्त्वद्वितीयं तन्निष्ठं कैवल्यैक प्रयोजनम् ॥ ९६ ॥

सर्ववेदान्ताचें सार निर्वाण । जो ब्रह्मात्मक ऐक्य लक्षण । मिथ्या विश्वाकार हा भिन्न । वस्तु अभिन्न अद्वितीय ॥ ६५ ॥ तद्विषयिक जें कैवल्यपूर्ण । अपरोक्षबोधें सायुज्यापन्न । निर्विकल्प विकारहीन । प्राप्य अभिन्नतादात्म्यें ॥ ६६ ॥ म्हणिजे उपनिषदीं महावाक्यें । प्रतिपाद्य ब्रह्म अभेद ऐक्यें । तें तत्त्वमसिविचारें एकें । आत्मविवेकें अपरोक्ष ॥ ६७ ॥ आपणा जाणिजे स्वयंबोधें । विपरीतादिभावनारोधें । तत्फळ एकरसता साधे । कैवल्यशब्दें तें म्हणिजे ॥ ६८ ॥ यावरी दानाचीहि रीती । ऐका समासें यथानिगुती । जेणें लाभे मोक्षसंपत्ती । मुमुक्षां आइती सुलभत्वें ॥ ६९ ॥ ते पाविजे सुप्राञ्जळ । हेंचि प्रयोजन केवळ । श्रीमद्भागवताचें निखळ । सुज्ञीं विवळ जाणणें ॥ ९७० ॥

प्रौष्ठपद्यां पौर्णमास्यां हेमसिंहसमन्वितम् । ददाति यो भागवतं स याति परमां गतिम् ॥ ९७ ॥

भाद्रपदी जे पौर्णमासी । श्रद्धायुक्त तये दिवशीं । करूनि सुवर्णाचिया सिंहासी । शक्ति जैसी असेल ज्या ॥ ७१ ॥ तये सिंहासनीं श्रीभागवत । ठेवूनियां हो यथास्थित । पूजोपचारीं पूजा निश्चित । करावी प्रशस्तमानसें ॥ ७२ ॥ तेंविच दानपात्र जो सद्ब्राह्मण । भगवद्भक्त अतिसज्ञान । तयातें सद्भावें पूजन । तत्सिंहयुक्त त्या दीजे ॥ ७३ ॥ एवं हेमसिंहासनासहित । दे जो ब्राह्मणा श्रीभागवत । तो उत्तमगतीतें पावत । जाण निश्चित हें वाक्य ॥ ७४ ॥ कीं या दानाचें महत्पुण्य । सर्वथा सर्वांसही

अगण्य । मूर्तिमंत कैवल्यसदन । वसतिस्थान देवांचें ॥ ७५ ॥ इतर पुराणें जीं समस्त । त्यांमाजि महापुराण श्रीभागवत । जेंवि खेचरीं प्रकाशे भास्वत । आगळा शोभत सर्वत्र ॥ ७६ ॥

राजं ते तावदन्यानि पुराणानि सताङ्गणे । यावद्भागवतं नैव श्रूयतेऽमृतसागरम् ॥ ९८ ॥

सज्जनांचिये दिव्याङ्गणीं । इतर पुराणांची श्रेणी । तोंवरीच रोचकपणीं । शोभे गुणीं आपुलिया ॥ ७७ ॥ जोंवरी अमृताचा सागर । श्रीभागवत परम रुचिकर । भक्तिज्ञानविरागप्रचुर । श्रेयस्कर नायकिजे ॥ ७८ ॥ जऱ्ही अत्यंतरुचिदायक । जाले षड्रस अलौकिक । तथापि अमृतापुढें निष्टंक । पाड सम्यक न धरिती ॥ ७९ ॥ कोण्या कारणास्तव म्हणाल । तरि तेही ऐका यथार्थ बोल । जिहीं प्रत्ययें अनुभव घ्याल । अंतरीं धराल निजनिष्ठा ॥ ९८० ॥

सर्ववेदान्तसारं हि श्रीमद्भागवतमिष्यते । तद्रसामृततृप्तस्य नान्यत्र स्याद्रतिः क्वचित् ॥९९॥

जें सर्ववेदांताचें सार । तेंचि निश्चयें ज्ञानप्रचुर । श्रीमद्भागवत समग्र । निजनिर्द्धारीं प्रकाशक ॥ ८१ ॥ तद्रसामृतें जो जाहला तृप्त । त्या अन्यत्र आवडी कदाचित । न होय अणुमात्रही निश्चित । पुरे आर्त्त सकळिक ॥ ८२ ॥ याकारणें सर्वोत्कृष्ट । श्रीमद्भागवत स्पष्ट । येचिविषयीं दृष्टान्त इष्ट । ऐका प्रकट यथार्य जे ॥ ८३ ॥

निम्नगानां यथा गङ्गा देवानामच्युतो यथा । वैष्णवानां यथा शम्भुः पुराणानामिदं तथा ॥१००॥

गंगा जैसी निम्नगांमाजी । कीं विष्णु जैसा सुरसमाजीं । कीं वैष्णवीं जेंवि त्रिपुरभंजी । तेंवि पुराणराजींमाजी हें ॥ ८४ ॥

क्षेत्राणां चैव सर्वेषां यथा काशी ह्यनुत्तमा । तथा पुराणव्रातानां श्रीमद्भागवतं द्विजाः ॥१०१॥

आणि सर्वक्षेत्रांमाजि काशी । अनुत्तमा केवळ जैसी । जीहून अन्योत्तम नसे ऐसी । क्षेत्रां शीर्षीं मंडन पैं ॥ ८५ ॥ तेंवि पुराणज्योतिषीं सकळीं । श्रीमद्भागवत अंशुमाळी । उत्तमोत्तम कैवल्य-शाळी । पुण्यबहळीं विराजित ॥ ८६ ॥ ऐसें श्रीमद्भागवताचें । महिम्न ब्राह्मणां कथून साचें । यावरी तात्पर्य सर्वार्थाचें । मुकुलित वाचे स्रुत कथी ॥ ८७ ॥

श्रीमद्भागवतं पुराणममलं यद्वैष्णवानां प्रियं यस्मिन्पारमहंस्यमेकममलं ज्ञानं परं गीयते ।
तत्र ज्ञानविरागभक्तिसहितं नैष्कर्म्यमाविष्कृतं तच्छृण्वन्विपठन्विचारणपरो भक्त्या विमुच्येन्नरः ॥ १०२ ॥

जें श्रीमद्भागवतपुराण । अमळ वैष्णवां प्रिय संपूर्ण । जेथ अर्थवादादिलक्षण । नसे निपटून साद्यंत ॥ ८८ ॥ परमहंसीं जें एक पाविजे । निर्मळज्ञानवस्तु उमजे । तें उत्कृष्ट यामाजि सहजें ।

कथिजतें भोजें बोधमय ॥ ८९ ॥ आणि जेथ सर्वकर्मोपरम । तें नैष्कर्म्यसंकल्पावगम । भक्तिज्ञान-विरागेंसीं सम । अवघें सुगम विस्तारिलें ॥ ९० ॥ तें निजभक्तीनें निरंतर । ऐकत पढत असतां नर । विवेकें होय विचारणपर । तो मुक्त सत्वर होत असे ॥ ९१ ॥ हें रहस्य येथींचें मुख्य । सुश्रोतयां कथूनि प्रख्य । आतां निश्चय आपुला सम्यक । वदे निष्टंक आनंदें ॥ ९२ ॥

कस्मै येन विभासितो यमतुलो ज्ञानप्रदीपः पुरा तद्रूपेण च नारदाय मुनये कृष्णाय तद्रूपिणा ।
योगीन्द्राय तदात्मनाऽथ भगवद्रातायं कारुण्यतस्तच्छुद्धं विमलं विशोकममृतं सत्यं परं धीमहि ॥ १०३ ॥

पूर्वीं ब्रह्मयाकारणें । ज्याचे न ये च अन्य तुलने । तो हा ज्ञानप्रदीप सकरुणें । कथिला जेणें अनुपम ॥ ९३ ॥ मग तोचि नारदमुनीकारणें । ब्रह्मरूपें कथिला वचनें । त्यावरी नारदरूपें कृपेनें । व्यासाकारणें प्रकाशिला ॥ ९४ ॥ व्यासरूपें शुकयोगिया । मग शुकरूपें नृपा तया । भगवद्राता कारणें प्राया । अतिकारुण्यास्तव कथिला ॥ ९५ ॥ जेंवि कृशानें अधिष्ठिली वर्ति । तेचि प्रदीप्त होतसे ज्योति । मग तत्तद्रूपें अनेकांप्रति । प्रकाशी स्वस्थिति अन्वयें ॥ ९६ ॥ तेंवि परंपरागत एवंरूप । श्रीभागवतात्मक ज्ञानप्रदीप । प्रकाशिला तो शुद्ध निर्लेप । परमसकृप चिन्मात्र ॥ ९७ ॥ शोकातीत विमळ शान्त । जरामरणरहित अमृत । नारायणाख्य तत्व सत्य । निजहृदयांत मी ध्यातों ॥ ९८ ॥ ऐसे बोलूनि सूत तेव्हां । प्रेमोत्कर्षें धरूनि भावा । नमन करी देवाधिदेवा । बोधोपकारा आठवूनी ॥ ९९ ॥ कीं ग्रंथ संपतां मंगळाचरण । अवश्य करावें सुवक्तेन । तेंचि मंगळप्रद गुरुदेवनमन । करी सुज्ञ सद्भावें ॥ १००० ॥

नमस्तस्मै भगवते वासुदेवाय साक्षिणे । य इदं कृपया कस्मै व्याचचक्षे मुमुक्षवे ॥ १०४ ॥

षड्गुणैश्वर्यसंपन्न । सर्वसाक्षी नारायण । अखिलभूतनिवासी पूर्ण । रमारमण वासुदेव ॥ १ ॥ नमन त्या भगवंताकारणें । जो ब्रह्मयाकारणें कृपेनें । श्रीभागवत उदारपणें । जाला स्वगुणें उपदेशिता ॥ २ ॥ कीं तो ब्रह्मा परमविरक्त । मुमुक्षु शुद्ध अधिकारवंत । शान्त दान्त पवित्र भक्त । यास्तव निवान्त प्रबोधिला ॥ ३ ॥ ऐसें नमूनि नारायणा । आतां आपुला सद्गुरुराणा । जो निरसिता संसारविगुणा । निजकल्याणा अभिवंदी ॥ ४ ॥

योगीन्द्राय नमस्तस्मै शुकाय ब्रह्मरूपिणे । संसारसर्पदष्टं यो विष्णुरातमजीवयत् ॥ १०५ ॥

समस्त योगियां माजी श्रेष्ठ । शुकयोगीन्द्र सद्गुरु इष्ट । ब्रह्मरूप स्वयें प्रकट । करुणाविष्ट निज शरणा ॥ ५ ॥ तया कारणें साष्टाङ्गनमन । जो प्रणतजनांचें निजजीवन । सौभद्रनंदनातें पूर्ण । जाला आपण जीवविता ॥ ६ ॥ अज्ञानकाळीं संसारोरगें । डंखिला सबळ अविद्यावेगें । तया निज-बोधामृतामोघें । जीवविलें आंगें ब्रह्मत्वें ॥ ७ ॥ एवं नमूनि शुकयोगीन्द्रा । निजदेशिका बोधसमुद्रा ।

यावरी स्वाभीष्ट मागे गुरुवरा । ते सूतगिरा अवधारा ॥ ८ ॥ जया निजगुरुपदीं आवडी । तद्दास्याची जीवीं गोडी । वांछिती परमार्थाची जोडी । कैवल्यहोडी उपेक्षूनी ॥ ९ ॥ तिहीं हेंचि मागिजे गुरुदेवा । उपेक्षूनि इहपरविभवा । मजहि हाचि असे हेवा । सूत ज्या दैवा संप्रार्थी ॥ १०१० ॥

भवे भवे यथा भक्तिः पादयोस्तव जायते । तथा कुरुष्व योगेश नाथस्त्वं मे यतः प्रभो ॥ १०६ ॥

म्हणे जी जी सद्गुरुनाथ । जरि तूं माझा स्वामी समर्थ । तरि इतुकें देईं मज यथार्थ । पुरवीं मनोरथा अंतरींच्या ॥ ११ ॥ तव पदकमळीं अनन्यभक्ती । जन्मोजन्मीं मज ज्या रीती । होय तैसें करीं मजप्रती । योगाधिपती गुरुवर्या ॥ १२ ॥ मी जन्मान्तरा न भियें सहसा । परि वांछी तव पद-भक्तिकुवासा । तव भक्तिवंत जो देहठसा । तोचि सहसा सुखरूप ॥ १३ ॥ इतुकें मागूनि श्रीगुरूतें । परमनिष्ठेनें सप्रेमचित्तें । आतां ग्रंथसमाप्तिवेळे आतें । श्रीहरीतें अभिवंदी ॥ १४ ॥

नामसङ्कीर्तनं यस्य सर्वपापप्रणाशनम् । प्रणामो दुःखशमनस्तन्नमामि हरिं परम् ॥ १०७ ॥

सर्वपापाचें नाशकर्तें । ज्याचें नामसंकीर्तन निरुतें । आणि दुःखशामक निश्चितें । प्रणाम केवळ जयाचा ॥ १५ ॥ एक वेळ नमितां ज्यामी । निरसती संपूर्ण दुःखराशी । सुख अक्षय जोडे पाशीं । जें अविनाशी अविरत ॥ १६ ॥ तया सर्वोत्कृष्ट हरीप्रती । मी नमितों अनन्यप्रीती । सकळ मंगळें मज साधती । यावत्सद्गती तन्नमनें ॥ १७ ॥ एवं गुरुपरंपरा आदि करून । सूतें नमिला श्रीनारायण । ग्रंथसमाप्तिमंगळाचरण । करूनि मौनें राहिला ॥ १८ ॥ शौनकादि ऋषि समर्थ । तेहि जाले परमनिर्वृत । पुरला अभीष्टमनोरथ । पावले निश्चित स्वानुभव ॥१९॥ म्हणाल दशम स्कंध पूर्ण । वाखाणितां मूळाहून । द्वादशस्कंधींचें निरूपण । केलें ग्रथन किमर्थ हें ॥१०२०॥ तरी आरंभीं कथानुक्रम । कळावया स्कंध प्रथम । कथिला संक्षेपसा सुगम । शुकनृपसंगम जेंवि जाला ॥ २१ ॥ तोचि वक्तृत्वाचा शेवट । आणि भागवताचें तात्पर्य स्पष्ट । जाणावया परमोत्कृष्ट । कथिलें इष्ट हें अंतीं ॥ २२ ॥ जैसें उपक्रमाचें उद्घाटन । तैसेंचि करितां उपसंहरण । शोभे यथार्थ ग्रंथायतन । हें वर्म सुज्ञ जाणती ॥ २३ ॥ यास्तव द्वादश-स्कंधींचें प्रमेय । येथ योजिलें यथान्वय । जाणोनियां पूर्वील सोय । युक्त वाङ्मय प्रकाशिलें ॥ २४ ॥ प्रथमद्वादशांचें कथानक । मुकुळ आद्यंतीं निष्टंक । अळंकारार्थ कथिलें सम्यक । दशम सटीक माझारी ॥ २५ ॥ एवं रीतीनें दशमस्कंध । ओवीप्रबंधें परमागाध । यथामूळ वर्णिला शुद्ध । सर्वां विशद कळावया ॥ २६ ॥ बद्धमुक्तमुमुक्षुजनां । प्रिय श्रीकृष्णचरित जाणा । कळिकाळीं तो जगदुद्धरणा । न तत्सेवनाविण अन्य ॥ २७ ॥ याकारणें श्रीगुरुनाथें । ग्रंथ रचिला करुणाबंतें । येथ पुरती समस्तांचीं आर्तें । मनोवांछितें जैसजैसीं ॥ २८ ॥ कीं हा ग्रंथ केवळ कल्पतरु । कीं चिन्तारत्नमय सुवर्णमेरु । येथ कल्पनेचा दैन्यकरु । न उरे नर कदापिही ॥ २९ ॥ कीं हा ग्रंथ इत्थंभूत । श्रीकृष्णदयार्णवोत्थित । जीव संसारग्रस्त श्रान्त । पीयूष प्रशस्त भूलोकीं ॥१०३०॥ ना हा ग्रंथ प्रत्यक्ष कृष्णमूर्ती ।

एकादशिनी अष्ट ज्या असती । तींचि अष्टांगें विलसती । चित्सुखकृतिप्रदर्शकें ॥ ३१ ॥ नव्याय-शीव्याची श्लोकथाटी । तेचि कुन्तळांची रम्य दाटी । नव्वदाव्याची अर्थगुंठी । ते वीरगुंठी मूर्धजांची ॥ ३२ ॥ तरी द्वादशाचें जें निरूपण । जेथ परीक्षिति ब्रह्मसंपन्न । ऋषिगण जाले हरिगुणनिपुण । तो शोभायमान मुकुट शिरीं ॥ ३३ ॥ माजि साहित्याची पुरवणी । तेचि अळंकारभरणी । शब्दलालित्य सुवर्णपणीं । अंबरमिरवणी अंगावरी ॥ ३४ ॥ पूर्वपीठिका तें सिंहासन । वरी मोक्षश्रियेसीं विराज-मान । एवं केवळ श्रीभगवान । ऐश्वर्यदानकारक पैं ॥ ३५ ॥ येथ काया वाचा आणि मनें । सेवक होईल अनन्यपणें । तया संसारभयनिस्तरणें । दुर्घट होणें न कदापि ॥ ३६ ॥ अर्थावबोधें स्वनिदेवन । करो अथवा भारती करून । पठनें विवरोत कीर्तन । कीं संग्रहून पूजोचि कां ॥ ३७ ॥ तो अक्षय सुख संतत । सफळ लाभे मनेप्सित । अधिकारकडसणी नाहीं येथ । वस्तुसामर्थ्य गुणास्तव ॥ ३८ ॥ असो आतां हें वर्णन । अमृताचे आंगींचे गुण । कोठवरी कथावे सुलक्षण । सेवितां पूर्ण अनुभवती ॥ ३९ ॥ परी मज हेंचि वाटे नवल । कीं मी मूढमतीची शेल । आणि मम मुखें हे काव्यबोल । शुद्ध सखोल प्रकटिले ॥१०४०॥ तरि हें आश्चर्य ही येथ न सजे । कीं एकें शेषस्थानीं सहजें । धरा-धारणीं दंड ओजें । केला स्वकाजें शक्तिमान् ॥ ४१ ॥ किंवा सर्वदुर्गंधिराशी । एका सुगंधा पैजे नशी । केलीं स्वसामर्थ्यें जैशीं । उपमावयासी नसे दुजें ॥ ४२ ॥ कीं प्रस्तुत पढविला वेद । महिपा-करवीं एकें प्रसिद्ध । योगेश्वरांचा महिमा अगाध । हा जाणतो शुद्ध सर्वज्ञ ॥ ४३ ॥ तेंवि ये ग्रंथसमाप्तिकाजीं । मज समर्थें योजिलें सहजीं । हा सामर्थ्याचा सृष्टीमाजी । ध्वज हो कां जी उभारिला ॥ ४४॥ आणि आपुलियाचेन स्नेहें । पिता कुमारा सज्जूनि बाहे । आस्थेनें रूढविता होये । सभे निश्चयें श्रेष्ठांचे ॥ ४५ ॥ तेंवि स्वजवळीकें संतीं । बाहूनि करावी प्रीति पुरती । येणें काजें मज ये अर्थीं । योजिलें समर्थें गुरुरायें ॥ ४६ ॥ एवं योगसंपत्ति आपुली विपुळ । श्रीगुरुवर्यें परम विमळ । ग्रंथोद्यमें प्रकटिली सकळ । व्हावया केवळ विश्व सुखी ॥ ४७ ॥ हे ज्ञानसंपदा पुरातन । अक्षय अक्षर सनातन । अजें आत्मजा अर्पिली पूर्ण । कृपेंकरून पद्मालयीं ॥ ४८ ॥ तेणें विधीनें देवर्षीतें । गौरविलें करुणावंतें । नारदें दत्तात्रेया निरुतें । ते योगश्रियेतें निवेदिलें ॥ ४९ ॥ तेथूनि कळिकाळीं आर्तभूत । सुरगिरिस्थ जनार्दनपंत । दर्शन पावूनि सम्यक मूर्तिमंत । जाला कृतकृत्य तद्बोधें ॥ १०५० ॥ आदि अंतीं एकला एक । तो श्रीएकनाथ निष्टंक । तेणें जनार्दन सेवूनि सम्यक । घेतला विवेक परंपरोक्त ॥ ५१ ॥ मग गुर्वाज्ञेनें प्रतिष्ठानीं । राहूनि गृहस्थाश्रमोक्त करणीं । शुद्ध आचरतां जीवश्रेणी । निजज्ञानगुणीं उद्धरिली ॥ ५२ ॥ त्यावरी बहुतां दिवसान्तरीं । श्रीमद्येकादशमस्कंधावरी । टीका लिहितांचि माझारी । जालें शिवपुरीप्रति जाणें ॥ ५३ ॥ तंव ते वाराणसी माझारी । श्रीमच्चिदानंद ब्रह्मचारी । अष्टाङ्गयोगसाधना पुरी । करूनि अंतरीं निराकुल ॥ ५४ ॥ दुग्धमात्राचा स्वल्पाहार । सेवूनि त्यजिले धान्यप्रकार । वैराग्ययुक्तचि निरंतर । स्वज्ञानमात्रविरहित ॥ ५५ ॥ तेथ प्रसंगें दर्शन होतां । वेधली वृत्ति स्थिति पाहतां । शरण होऊनि श्रीएकनाथा । स्वसुख तत्वता लाभिन्नला ॥५६॥ त्यावरी क्रमूनि बहुत वर्षें । रामेश्वरादियात्रोद्देशें । काशीहूनियां दक्षिणादिशे । क्रमिलें योगीशें

चिदानंदें ॥ ५७ ॥ प्रतिष्ठानीं वृन्दावनीं । पूजनें वंदनें संपादूनी । ज्ञानेश्वराची समाधि नयनीं । पुढें पाहूनी भू क्रमिली ॥ ५८ ॥ तंव कृष्णाप्रदेशीं चिमणगांव । तेथ रम्यालयीं महादेव । चित्ता मानला बहु तो ठाव । एकान्त सर्वसुखावह ॥ ५९ ॥ विशेष ग्रामस्थ प्रेमळ व्याजें । स्थिर केलें आपणा सहजें । तत्रस्थ लेखकवृत्तिकतनुजें । भक्तिभोजें नाचविलें ॥ १०६० ॥ ज्या वय पाहतां वर्षें बारा । परि पूर्वसाधनसिद्धचि सारा । तो श्रीचिदानंदपद्माकरा । लाभला बरा स्वमस्तकीं ॥ ६१ ॥ उपदेशमात्रें बोधैश्वर्य । पावला पक्व अवस्था तुरीय । यास्तव स्वानंद अभिधा वर्य । ज्ञापिली अक्षय गुरुरायें ॥ ६२ ॥ पुढें देशिकें यात्रावलंब । केलिया नंतरें काळीं शुभ । स्वानंदें सेविलें वन स्वयंभ । दैहिक लोभ विसर्जूनी ॥ ६३ ॥ स्वसुखसुरवाडें भार्येसह । चिरकाळ क्रमिला सुखावह । सुरसिद्ध दर्शना अहरह । येती स्वयमेव जयाचिया ॥ ६४ ॥ त्या श्रीस्वानंदाची महिमा । अपार वर्णितां अनुपमा । अमानित्वादिगुणीं गरिमा । जेथ उत्तमा संपादिली ॥ ६५ ॥ तया आपुलिया कल्याणकामें । शिवभूपतीनें प्रार्थूनि प्रेमें । रायदुर्गीं स्थापिलें नेमें । सेवानुक्रमें तोषविलें ॥ ६६ ॥ ये स्थानीं गोविन्दराव । शिबिकारूढ सवैभव । उदया आलें योगदैव । तयाचें पूर्व ते ठायीं ॥ ६७ ॥ तेणें सेवितां स्वानंदस्वामी । निवृत्त जाला सर्व कामीं । टाकिली संपत्ति नाशगामी । आत्मारामीं सुरवाडला ॥ ६८ ॥ लौकेषणाह्रियादि वृत्ति । अवघी सोडूनियां प्रवृत्ति । गुरुपरिचर्या केली निगुती । जिया ज्ञानसंपत्ति झड घाली ॥ ६९ ॥ पुढें गुर्वाज्ञेनें श्रीगोविन्दें । जायेसहित सप्रेमच्छंदें । विट्ठल-मूर्ति पाहूनि मोदें । अंबापुरीतें अधिष्ठिलें ॥ १०७० ॥ भक्ति ज्ञान आणि वैराग्य । सेवूनि जयाचें पवित्र आंग । वृद्धि पावलीं विशेष साङ्ग । फिटला पाङ्ग सर्वांचा ॥ ७१ ॥ दैवीसंपत्ति करणगृहीं । विश्रामली सर्वदा ही । सिद्धि इच्छिती इच्छो कांहीं । परि जो नाहीं द्वैतावरी ॥ ७२ ॥ तथापि इच्छा जरि उद्भवली । तरी करुणेचीच समूळ वेली । जे प्रबोधफळीं सदा फळली । जीचेन धाली प्रणतावळी ॥ ७३ ॥ ऐसा समर्थ श्रीगोविन्द । ज्या विट्ठलनामाचा पूर्णच्छंद । यास्तव लौकिकीं अनुवाद । असे प्रसिद्ध या नामें ॥ ७४ ॥ जयाचे पूर्णतेचें लक्षण । मज वर्णितां नये निश्चुण । आकाशाचें पवाडपण । मशका कोठून अवगमे ॥ ७५ ॥ तया देशिकेन्द्राचा संगम । बहुतांसि जाला अत्युत्तम । परी श्रीकृष्णदयार्णवीं परम । वयुनदुम निरूढला ॥ ७६ ॥ तयाचिये छाये तळीं । मादृश निवाले कळिदुष्काळीं । संतृप्त झाले चित्सुखफळीं । नाहींच उरली भवचिन्ता ॥ ७७ ॥ एवं हे परंपरोदित । बोधसंपदा यथास्थित । संसरलीसे अनाकळित । कल्याणकृत स्वजनाची ॥ ७८ ॥ तिया आवडतेन संपन्न । व्हावया निमित्त संपूर्ण । हरिवरदटीकेचें संग्रथन । केलें आपण गुरुरायें ॥ ७९ ॥ हें विश्वमंगळाचें आयतन । समाप्ति पावलें लेखन । तया काळाचें परिज्ञान । ऐकिजे पूर्ण सर्वज्ञीं ॥ १०८० ॥ जैं शालिवाहनशकातें समें । सोळा शते पांसष्टी नेमें । क्रमिलिया यथानुक्रमें । षट्षष्टितमे माझारी ॥ ८१ ॥ रुधिरोद्गारी संवत्सरीं । मार्गशीर्षीं शंतमकरीं । शुक्लपंचमी गुरुवासरीं । तृतीयप्रहरीं पुण्योत्सवीं ॥ ८२ ॥ प्रतिष्ठानीं गोदातटीं । वृन्दावनीं विश्रान्तिमठीं । श्रीमत्पूज्यपादुकानिकटीं । लेखनसृष्टि अलंकारिली ॥ ८३ ॥ आतां श्रोतयां वक्तयां कल्याण । जयाचेन भजनें करून । त्या

सद्गुरुपरमात्मया पूर्ण । असो नमन अखंडित ॥ ८४ ॥ सर्वही सुखरूप होत । सकळ निरामय असोत । समस्त कल्याणें पावोत । अखिल नांदोत आनंदें ॥ ८५ ॥ स्वस्ति श्रीमंगलानि भवन्तु । विश्वपटीं श्रीकृष्णतंतु । नसे सर्वथा द्वैतहेतु । रहितमीतूं अद्वितीय ॥ १०८६ ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणेऽष्टादशसाहस्र्यां पारमहंस्यां संहितायां दशमस्कन्धे श्रीशुकपरीक्षित्संवादे श्रीहरिवरदाटीकायां श्रीमत्कृष्णदयार्णवानुचरविरचितायां श्रीकृष्णलीलाचरितकथा नाम नवतितमोऽध्यायः ॥ ९० ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

॥ श्लोक ५१ ॥ अन्य संमति-श्लोक ५६ ॥ ओव्या १०८६ ॥ एवं संख्या ११९३ ॥
एकोणनव्वदावा अध्याय मिळून ओवी-संख्या ४२४८७
[श्लोक ५२ ते १०७ दशमाच्या नव्वदाव्या अध्यायातील नसून अन्य संमति-श्लोक आहेत.]

नव्वदावा अध्याय समाप्त

समाप्त

प्रभातीं मनीं पांडुरंगा स्मरावें

वरीं स्नान-संध्यादि कर्में समस्तें ।
वरी सारिलीं सर्व दानें स्वहस्तें ।
स्वयें कर्म तें विठ्ठलीं वोगरावें ।
प्रभातीं मनीं पांडुरंगा स्मरावें ॥

प्रयागादिक द्वारका थोर थोरें ।
पुरें पट्टणें पुण्यवंतें अपारें ।
तया भूषणालागिं हें आदरावें ।
प्रभातीं मनीं पांडुरंगा स्मरावें ॥

मुखें वेदविद्यादि शास्त्रें वरिष्ठें ।
व्रतें सर्व संपादिलीं एकनिष्ठें ।
तयांमाजिं हें सार चित्तीं धरावें ।
प्रभातीं मनीं पांडुरंगा स्मरावें ॥

— श्रीकृष्णदयार्णव
('तन्मयानंदबोध', श्लो. २९-३१)

प सा य दा न

हरिगुरुवरप्रसादसिद्धि । हे प्रार्थना सकामबुद्धि ।
ग्रंथश्रवणीं दुष्टोपाधि । कोणा कधीं न स्फुरतु ॥

बद्ध मुमुक्षु आणि मुक्त । त्रिविध जनांचा संघात ।
श्रवणीं बैसतां शुद्धचित्त । अधिकारवंत होआवे ॥

हेतुवाद सांडुनिया । सद्भाव उपजे पाखंडिया ।
श्रवणाधिकार कुतर्किया । प्रत्यय बाणोन उपलभो ॥

कर्मठाची सकाम बुद्धि । तुटोनि बाणो चित्तशुद्धि ।
अपरोक्षबोधाचा संवादीं । अधिकारसिद्धि त्यां हो पां ॥

अनन्यप्रेमा सद्गुरुचरणीं । सर्वां उपजो अंतःकरणीं ।
निंदा द्वेष कोणा न मनीं । श्रवणमात्रीं न रुचावा ॥

मोडो खळाची वक्रता । निष्काम सत्कर्मीं हो आस्था ।
सर्वभूतीं एकात्मता । प्रेम वाढों परस्परें ॥

कडसणीची अहाच मात । सन्मात्रैक शुद्ध शाश्वत ।
विश्वाभास तद्विवर्त । मुख्य परमार्थ हा विवळी ॥

सच्छब्दें जें सन्मात्र वस्त । तन्मय होऊनि वर्तती स्वस्थ ।
तयां सज्जनांसी सांघात । होऊनि स्वहित सर्वा हो ॥

दीनानुकंपी समर्थ संत । शुकासारखे अकस्मात ।
वरदें करोत अधिकारवंत । पढतां ग्रंथ सद्भावें ॥

— 'हरिवरदा', ४९·४७४–४८२